होत चाललेंसें पाहून ती० कै० वसुदेवशास्त्री यानीं दहाव्या आणि अकराव्या भागांच्या अखेरीस लोकांनीं ऐ. ले. संग्रहाला मदत करावी अशी जाहीर विनंती करून पाहिली. परंतु व्यर्थ ! कारण या विनंतीला मान देऊन नवे असे दहा ग्राहकसुद्धां मिळाले नाहींत ! अशाही विपत्तींतून मार्ग काढीत ऐ. ले. संग्रहाचें काम कसें बसें रेंगाळत चाललें होतें; परंतु तीही गोष्ट न खपून दुर्दैवानें ऐ. ले. संग्रहावर एक भयंकर अनर्थाचा प्रसंग आणिला तो असा—

ऐ. ले. संग्रहाचा हा बारावा भाग अपेशी खराच. ती० कै० वासुदेव-शास्त्री यानीं हा भाग तयार करण्यास सुमारें दीड वर्षापूर्वीं सुरवात केली आणि लागलीच त्यांना कामिणीचा विकार झाला. या विकारानें त्यांचें यकृत् बिघडलें आणि शक्ती अगदीं क्षीण झाली. योग्य औषधोपचार होऊन भरपूर विश्रांति मिळाली असती तर त्यांची ताकद थोडीबहुत भरून निघाली असती; परंतु तेंही होऊं शकलें नाहीं. विश्रांति घेण्याविषयीं त्यांना पुष्कळ स्नेह्यां-कडून सूचना मिळाल्या परंतु जीवन्मृताप्रमाणें निरवधि जगण्यापेक्षां कर्तव्य करतां करतां मरण काय वाईट असें यावर त्यांचें ठराविक उत्तर असे. या अवधींत या बाराव्या भागाचें काम संभाळून त्यांनीं ‘ देशकंटक ’ या नांवाचें एक नवीन नाटकही लिहून ठेविलें आहे. गेल्या मार्च महिन्यांत त्यांच्या अशक्त-पणाचें रूपांतर रक्तक्षयांत ( anæmia ) स्पष्टपणें होऊं लागलें आणि त्यांना उठून बसण्याचीही शक्ति नाहींशी झाली. तथापि त्यांचा लेखन-व्यवसाय अखंड चालूच होता. मरणापूर्वीं पंधरा दिवसांची म्हणजे गेल्या २५ मेची गोष्ट. उठून बसलें असतां शरीर एका बाजूला कलंडूं नये म्हणून आपल्याभोंवतीं त्यांनीं गाद्या आणि तक्के यांचे उंचवटे तयार करविले आणि अशा स्थितींत दहा तास बसून ‘ शिंद्याचें हिंदुस्थानांत प्रयाण ’ या प्रकर-णाचीं दोनशें पृष्ठें कॉपी स्वहस्तानें तपासून तयार केली ! कॉपी तयार झाल्या-वर ‘ आतां ही कॉपी वामनरावाकडे पाठव. माझ्या हातून एकदांचें हें का पार पडलें ’ असें म्हणत असतांना तीर्थरूपांच्या मुखावर जी प्रसन्नता आम्हांला दिसली ती यावज्जीव आमच्या डोळ्यासमोरून हालणार नाहीं. कारण अशी प्रसन्नता इतरांच्याच काय पण त्यांच्याही ठिकाणीं पूर्वीं कधीं पाहिल्याचें आम्हांला स्मरत नाहीं. योगसमाधि लागल्यावर मुखावर दिव्य प्रसन्नता येत असते असें म्हणतात. आम्हांला दिसलेली प्रसन्नता तीच असेल काय ?

ऐ. ले. संग्रहावर तीर्थरूपांचा अत्यंत लोभ. ऐतिहासिक-लेख-संग्रहाशिवाय त्यानीं नाना फडनवीस यांचें चरित्र, अधिकारयोग, हरिवंशाची बखर, मालोजी व शहाजी हीं ऐतिहासिक पुस्तकें लिहिलीं आहेत. त्याशिवाय यशवंतराव महाकाव्य, समुद्र, फुटकळ चुटके वगैरे कविताग्रंथही त्यानीं लिहिले आहेत. त्यांचीं गुणोत्कर्ष, तारामंडळ, चित्रवंचना, कृष्णकांचन, शिवसंभव, उग्रमंगल हा नाटकें तर प्रसिद्धच आहेत. हे सर्व ग्रंथ त्यांच्या अलोट बुद्धिप्रकर्षाची साक्ष देतीलच. या सर्व ग्रंथांबद्दल त्यांना अभिमान वाटे, परंतु त्यांचें लोभसर्वस्व मात्र एकट्या ऐ. ले. संग्रहावरच होतें. मरणापूर्वीं चार दिवस कोल्हापूरचे डॉ० गोपाळराव वाटवे एम्. डी. हे त्यांना भेटायला आले होते. त्यावेळीं इंग्रजींत संभाषण झालें तें असें—

तीर्थरूप—मी यांतून बरा होईन अशी तुम्हाला आशा वाटते का ?

डॉ० वाटवे—मी प्रयत्न करून पाहीन.

तीर्थरूप—डॉक्टर या नात्यानें तुम्ही प्रयत्न करणारच. परंतु तुम्हाला कांहीं आशा आहे का ?

डॉ० वाटवे—मला आशा वाटली नाहीं तर मी प्रयत्न तरी कां करीन ? अशाही स्थितीला पोंचलेले रोगी बरे झालेले मीं पाहिले आहेत.

तीर्थरूप—गोपाळराव, हें तुमचें दरबारी उत्तर झालें. ठीक आहे. तुम्ही सर्व डॉक्टर मिळून मला पांच चार वर्षें काम करण्याइतपत तरी बरा करा. ईश्वरानें तशी सवड दिली तर ऐ. ले. संग्रहाची मजल वसईच्या तहापर्यंत पोंचवीन म्हणतों. माझ्याशिवाय हें काम करणारा दुसरा कोण आहे ?

वसईचा तह तर दूरच राहिला परंतु या दुर्दैवी बाराव्या भागालाही जन्मकाळीं पितृदर्शन घडावें असा योगायोग नव्हता. वर लिहिलेलें भाषण झालें तो दिवस शुक्रवार. शनिवार आणि रविवार हे दोन दिवस साधारण बरे गेले. परंतु सोमवारीं दुपारीं त्यांच्या श्वासोच्छ्वासाला अडचण पडूं लागली—काळीज अत्यंत वेगानें चालू लागलें आणि अंगाची भयंकर तलखी होऊं लागली. हीच स्थिति वाढतां वाढतां ज्येष्ठ शु० ९ ता० ११ जून बुधवार या दिवशीं तीर्थरूपांचें देहावसान झालें आणि त्यांच्या पराक्रमी छत्राखालीं रहाणारीं आम्ही कुटुंबांतील माणसें आणि हा दुर्दैवी ऐ. ले. संग्रह सर्वस्वीं निराधार आणि अनाथ झाला ! स्वतःचें मरण डोळ्यापुढें उभें असतांना दुर्धर्ष रोगाचे तडाखे प्रसन्न चित्तानें सहन करणारा, आपला धीर खचूं न देतां उलट दुसऱ्यालाच धीराच्या गोष्टी सांगणारा, आपल्या मरणानें उत्पन्न होणारे आपत्तीचे प्रसंग निर्विकारमनानें जाणणारा असा एखादा पुण्यात्मा कवींच्या काव्यांतूनच वर्णिलेला सांपडावयाचा. एरवीं व्यवहारांत पाहिलं तर

स्वतःचें तर राहोच, परंतु दुसऱ्याचेंही मरण निर्विकारमनानें पाहणारा मनुष्य सांपडणें कठिण. आम्हाला मात्र अशा पुण्यात्म्याचें दर्शन घडलें. कारण तीर्थरूपांची स्मृति शेवटपर्यंत शाबूद होती आणि त्यांचें धैर्यही शेवटपर्यंत अढळ राहिलें. शेवटचे दोन दिवस ते एखादा शब्द मधून मधून विचूक बोलत; परंतु ते शब्दही ऐ. ले. संग्रहासंबंधाचेच असत.

असो. ऐ. ले. संग्रहाचें पुढें काय करायचें हाच आतां मुख्य प्रश्न आहे. तीर्थरूपानीं तयार केलेले बारा भाग आतांपर्यंत छापून निघाले. या भागांमधून सुमारें सहा हजार पत्रें छापिलीं आहेत. परंतु छापण्यास योग्य म्हणून त्यानींच निवडून बाजूस ठेवलेलीं अशीं सुमारें चार हजार पत्रें आम्हाजवळ आहेत. त्याशिवाय सनदा, महजर, देहझाडे, अजमास वगैरे कागद पुष्कळच आहेत. हे सर्व कागद छापून काढायचे तर असले आणखी पांच सहा भाग तरी छापावे लागतील. एक भाग छापून काढण्यास हल्लीं दीड हजार रुपये खर्च येतो. वर्गणी तर सारी पांच सहाशें रुपयेच गोळा होते. अशा स्थितींत सहा भाग छापून काढायचे तर बुडीची रक्कम सहा हजारापर्यंत फुगणार ! सामान्य स्थितींतल्या एका व्यक्तीच्या आहाराबाहेरची ही रक्कम आहे. दोनशें नवीन वर्गणीदार मिळतील तरच ऐ. ले. संग्रहाचें काम पुढें चालू शकेल. तीर्थरूपानीं चालू केलेलें हें राष्ट्रकार्य तडीला नेण्यासाठीं पडतील ते कष्ट सोसण्यांत आम्हाला आनंदच वाटेल. इतिहासप्रेमी लोकांनीं मात्र स्वतः वर्गणीदार होऊन आणि या कार्यासाठीं दुसऱ्यांनाही भीड घालून आम्हाला द्रव्याची मदत करावी. अनेक सद्गुणांचें उगमस्थान आणि आश्रयस्थान म्हणून नांवाजलेल्या महाराष्ट्रांत ही गोष्ट अशक्य-आहे काय ?

असो. पितृविहीन आणि बाळपरवेशी बनलेला हा बारावा भाग संसृतीचा हर्षविषादात्मक फेरा अनुभवण्याकरितां बाहेर पडत आहे. त्यावर सर्वांनीं सहानुभूतीची पाखर घालावी अशी आमची विनंती आहे.

मिरज,
ता० १७ ऑगष्ट १९२४ इ.

यशवंत वासुदेव खरे.

**ताजा कलम.**—या भागांतील 'शिंद्याचें हिंदुस्थानांतील प्रयाण' हें शेवटचें प्रकरण आहे. त्या प्रकरणाच्या प्रस्तावनेंत अजून कांहीं किरकोळ दुरुस्त्या करावयाच्या आहेत असें तीर्थरूप म्हणत असत. परतु त्या दुरुस्त्या कोणत्या हे माहीत नसल्यामुळें आम्ही ती प्रस्तावना निरुपायानें जशीच्या तशीच छापून काढिली आहे.

य. वा. खरे.

नं. ५२८९ (माघ शु. ११—५ फेब्रु.)

नारो विनायक यांचें अथणीहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र छ० १० रमजानचें—

" राजश्री रामचंद्रपंत आपा फौज पलटणसुद्धां करवीरावर तलाव्यास जाऊन लढाई देऊन गोट व पेठ जाळून आल्याचें व राजश्री नारायणराव घोरपडे कापशीकर पाडाव आल्याचें पत्र लष्कराहून मिरजेस आलें त्याची नक्कल पाठविली ती पावली. फार चांगली गोष्ट जाली. "

नं. ५२९०

रामचंद्र परशुराम यांचीं लष्कर नजीक करवीर येथून मिरजेस बाळासाहेब यांस चार पत्रें—

(माघ शु० १५—९ फेब्रु.) " छ० १४ रमजान— आज बराऊन साहेब यांजकडील बैल सर दोनशें मिरजेस हराजिन्नस खरेदी करून भरताड भरून लष्करांत आणावयाकरितां आले आहेत. त्यास जकातीविशीं वगैरे उपद्रव न लावण्याविशीं जकातदारास निक्षून ताकीदीची आज्ञा जाहली पाहिजे."

(माघ व० २—११ फेब्रु.) "छ० १६ रमजान—बराऊनसाहेब पलटणवाले यांजकडील बैल तोफेच्या गोळ्यांचे फर्मे देऊन राजश्री मुकुंद शिवराम यांजबरोबर पाठविले आहेत. तरी गोळे फर्म्यास येतील ते देऊन रवानगीची आज्ञा झाली पाहिजे. लौकरच भरती व्हावी. तेथे वैरण विकत द्यावी."

(माघ व० ४—१३ फेब्रु.) " छ० १८ रमजान. तोफेचे गोळे आणावयाकरितां काल साठ बैल कंपूकडील स्वार बरोबर देऊन पाठविले आहेत. त्यास फर्मे पाठविले आहेत त्याजप्रमाणें गोळे भरतील तितके रवानगी आधीं करावी. सारांश सत्वर येऊन पोचत तें करावें."

(माघ व० ४—१३ फेब्रु.) "छ० १८ रमजान— तोफखान्याकडील गोलंदाज गोळ्यांचे फर्मे देऊन पाठविले आहेत. हे गोळे दाखवावयाची आज्ञा झाली पाहिजे. गोळे पाहून ठेविल्यानंतर मागाहून आणवावयास येतील. सरकारचे दास्तानापैकीं तूर्त गोळे काय फर्म्यास येतील ते द्यावयाची आज्ञा झाली पाहिजे."

नं. ५२९१

अथणीचे मामलेदार नारो विनायक नि॥ रास्ते यांजकडून मिरजेस बाळासाहेबांस तीन पत्रें—

( माघ व० ७–१६ फेब्रु. ) छ० २१ रमजान– धोंडजी वाघ याचा मुक्काम कृष्णा उत्तर तीरीं संगमानजीक आहे. तालिकोटचे खंडणीपैकीं कांहीं ऐवज यावयाचा आहे तो आलियावर कृष्णापार जाणार म्हणतात. पुढें कोणत्या रोखें जातात पहावें. ”

( माघ व० १२–२० फेब्रु. ) छ० २५ रमजान–धोंडजी वाघ याचा मुक्काम चिकआलगुंडी घटप्रभातीरीं आला. महाराव घोरपडे याणीं त्याजकडील कांहीं जमाव आणून मुधोळचें ठाणें घातलें. राजश्री नारायणराव घोरपडे हनगंडीस येऊन राहिले आहेत. वाघ मागती मुधोळाकडे आला. पुढें कोणीकडे जातो न कळे.

( माघ व० ३०–२३ फेब्रु. ) छ० २८ रमजान–वाघाचे लष्करचा मुक्काम मुधोळ नजीक यडहळ्ळीवर आहे. मागती या प्रांताचे लगत्यास लष्कर आलें. पुढें कोणता रोख धरितात नकळे. गोखलेही कौजलगीवर आले म्हणून वर्तमान आहे. वाघास व गोखले यांस सहा कोसांचें अंतर आहे म्हणोन वर्तमान आहे. करवीराकडील अधिकोत्तर असेल तें कळविलें पाहिजे. ”

नं. ५२९२

श्रीगणपति. ( माघ व० १३–२१ फेब्रु. )

पै॥ छ० २८ रमजान. सन मय्यातैन व अलफ.

अपत्यें रामचंद्रानें सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० २६ रमजान यथास्थित असे. विशेष. तोफखान्याकडील सवाई लक्ष्मण तोफेची तयारी जाली आहे ते आणावयासीं लोक पाठविले आहेत. रवानगी करून द्यावी. तसेंच त्या तोफेचे गोळे राजश्री बापूजीपंत वाघ पाठविले आहेत यांचे पदरीं घालावे. घेऊन येतील. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५२९३

श्रीगणपति. ( माघ व० १४–२२ फेब्रु. )

पै॥ छ० २७ रमजान. दोन तास रात्र. मंदवार. माघमास. सन मय्यातैन व अलफ.

अपत्यें रामचंद्रानें शिरसाष्टांगनमस्कार विज्ञापना ऐसी जे, भृगुवारीं मध्यरात्रीस पलटणेंसुद्धा बराऊनसाहेब गोटांतून चालते होऊन पन्हाळा पावनगडचे मध्यभागीं माचीस दोनही किल्याचे दक्षिणेस करवीरकर आपले फौज-

१ कृष्णा व घटप्रभा यांचा संगम. नजीक बागलकोट. २ हें व यापुढची ( नामनिर्देश न केलेलीं ) रामचंद्रपंतांचीं सर्व पत्रें त्यानीं बाळासाहेबांस लष्करांतून मिरजेस पाठविलीं आहेत असें समजावें.

सुद्धां उतरले होते त्यांजवर अलीगोल पलटण पाठविलें. दोनशें लोकान अघाडीस त्यांचे गोटावर चालोन घेऊन तीन तोफा व तीन पेट्या सांडविल्या. त्याणीं तळ सोडला. याणीं त्याच तोफा त्यांजवर फिरवून गोळे लागू केले तेव्हां त्यांचे वस्तु टिकाव होईनासें होऊन डेरेघांटी चढोन दोनी किल्यांचे दर्म्यान पन्हाळयाचे दरवाजाजवळ जाऊन उभे राहिले. आम्हीही साऱ्या फौजांसुद्धां मागाहून एक घटका दिवसाचे सुमारें पलटणांस येऊन मिळालों. इकडील व राजश्री दौलतराव शिंदे यांजकडील व याशिवाय पथकें आहेत त्याणीं कामकाज चांगलें केलें. गोट लुटला. घोडीं वगैरे पाडाव लुटींत डेरे-राहुट्यांसुद्धां आलीं. वरकड सविस्तर मागाहून सेवेसीं लिहितों. आज खराबी त्यांची फार जाली. रवाना छ० २० रमजान प्रातःकाळ. प्रहर दिवस. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५२९४ श्रीगणपति. ( माघ व० १५–२२ फेब्रु. )

पै॥ छ० २९ रमजान. सन मय्यातैन. माघ मास.

अपत्यें रामचंद्रानें शिर सा॥ नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २७ रमजान-पर्यंत यथास्थित असे. विशेष. कालचें वर्तमान सेवेसीं विदित जालेंच असेल. ( आम्हांकडील ) विशेष माणूस घोडें जायां नाहीं. दहा घोडीं ठार व सात आठ माणसें, वरकड दहा पंधरा जखमी, इतकेंच आहे. याजउपरी कोल्हा-पुरास बसावें इतकाच प्रकार. दारूगोळयाविणें खोळंबा बहुत आहे. तर लक्ष्मण तोफ व गरनाळ लौकर गोळ्यांसुद्धां रवाना व्हावी. दुसरें, तोफखान्यांत तोफा आहेत त्यांस गोळे दारू पाहिजे. त्यास वडिलांकडे पूर्वी फर्मे पाठविले त्यांचे गोळे दोन हजार व दारू दोन हजार बारांची कृपा करून पाठविली पाहिजे. म्हणजे वडिलांचे आशिर्वादेंकरून सर्व कार्यें होऊन येतील. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५२९५ श्री. ( २२ फेब्रुवारी. )

पै॥ छ० ३० रमजान. सन मय्यातैन व अल्लफ.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत माघ व॥ १४ पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. शिंदे यांजकडे झाडून कारभार बाळोबातात्याशिवाय होत नाहीं. सर्जेराव घाटगे यांजला गांवें नेमून देऊन त्याणीं गांवीं जाऊन रहावें, दरबारांत राहूं नये, ( असें ठरलें. ) बाया शिंदे यांजला मुलूख व अशेरी किल्ला दिला तो त्यांचें ठाणें बसलें नाहीं.

---

१ पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

यास्तव हल्लीं बाया शिंदे याजबरोबर तात्यानीं पांच पलटणें देऊन अंमल व किल्ला बायांचे हवालीं करून मग पलटणानीं यावें याप्रमाणें तह ठरला आहे. व राजश्री धोंडोबादादा यांजला होळकर याणीं आपली दिवाणगिरी सांगावयाचा करार ठरावांत आणिला आहे. याजप्रमाणें बाजारबोलवा आहे. कळावें बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५२९६ श्री. (माघ व० १४–२२ फेब्रु.)

पै ॥ छ० ३० रमजान. सन मय्यातैन व अल्लफ.

सेवेसी[1] बाळकृष्ण महादेव कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २७ रमजानपावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री रामचंद्रपंत आपानीं व शिंदे यांजकडील पलटणानीं शिराळ्याचें ठाणें हल्ला करून घेतलें आणि फौजसुद्धां करवीरास जाऊन तेथें एक लढाई चांगली महाराजांशीं देऊन नारायणराव घोरपडे पाडाव आणिले. आपलेकडील व श्रीमंत दादा साहेबांकडील फौज अद्याप (करवीरास) गेली नाहीं. श्रीमंत कैलासवासी भाऊसाहेब (कैलासवासी) जाहल्यास पांच मास जाहले. भाऊसाहेब राजश्री-कडे पाडाव गेले त्यांची महाराजानीं काय गत केली ! आणि उभयतां आपण आपांस वडील असतां आपांस घेऊन दादासाहेब याणीं फौजेंत जाऊन लढाया चांगल्या देऊन सर्वांचे डोळे निववावयाचे होते, तें कांहींच जाहलें नाहीं ! घराऊ फडशा न जाहला म्हणून उभयतांकडील फौज न गेली. सरकार चाकरींस अंतर केलें व भाऊंचा सूड घेऊन नक्ष केला नाहीं, यामुळें श्रीमंत राजश्री नानांची मर्जी उभयतांचे ठायीं बहुत रुष्ट जाहली आहे. "घराऊ फडशा आम्हीं करून दिला असता. परंतु समयीं चाकरी सरकारची व भाऊंचा सूड घ्यावयाचा होता. तें अद्याप कांहींच नाहीं. हें फार वाईट केलें;" म्हणून (नाना) म्हणतात. याजकरितां स्वामीनीं आपली फौज व दादासाहेबांकडील फौज पत्र पावतांच (देऊन) शादांची रवानगी (करावी). त्यानीं अकीवाट व शिरोळ व घुमट जातांना हल्ला करून घेऊन फौजसुद्धां आपांकडे जाऊन महाराजांचे फौजेवर चालोन घेऊन चांगला नक्ष करून दाखवावा. सर्वांचीं पत्रें श्रीमंतांस 'रघुनाथराव दादानीं लढाईची शर्त केली' म्हणोन लिहून यावी तरच चांगलें. याचा विचार चित्तांत पुरतेपणीं आणोन सरकारचाकरी करोन दाखवावी तरच सरदारांचें भूषण ! राजश्री नागोपंत

---

१ नानांच्या कारकुनाचें पत्र पुण्याहून बाळासाहेबांस मिरजेस. २ नागो शामजी.

आपाचें पथक रिकामें आहे. माणूस चांगलें आहे. त्यांस बरोबर न्याव-याचें करून नक्ष करून दाखविला पाहिजे. पत्राचें उत्तर यावें. हे विज्ञापना.

नं. ५२९७ श्री. ( माघ व. ३०—२३ फेब्रु. )

नक्कल.

राजश्री बाळकृष्णपंत भाऊ स्वामींचे सेवेशीं.

सा॥ नमस्कार विनंती उपरी. इकडील वर्तमान परवां भृगुवारीं बराऊन पलटणेंसुद्धां पन्हाळा पावनगडचे दक्षिणेस राजमंडळची फौज उतरली त्यांजवर अर्धरात्रौ चालते होऊन जाऊन गांठ घातली. दोन तोफा पाडाव केल्या. त्याच तोफा त्यांजवर लागू केल्या. मागाहून चिरंजीवही घटका दिवसाचे सुमारें जाऊन पोंचले. त्यांचे फौजेचा नाश फार जाला म्हणून पत्र आलें. धोंडजी वाघ तालीकोटाकडे होता तेथील खंडणी एक लक्ष दहा हजार घेऊन बागलकोटची खंडणी घेऊन मुधोळाजवळ आला. नारायणराव घोरपडे निघून तेरदाळाकडे गेले. मुधोळांत ठाणें महाराव घोरपडे यांचें पडलें. कोणी वाघाचें ठाणें पडलें असें बोलतात. यादवाडांत वाघाचा अंमल बसला. येथून चोवीस कोसांवर आला. तीन हजार फौज व पांच हजार पायदळ समागमें आहे. राजश्री धोंडोपंत गोखले मुरगोडानजीक बारीपार फौजसुद्धां होसुराजवळ आहेत. कांहीं फौज येऊन पाच्छापूर गोकाक व हुकेरी येथें ठाणीं घातलीं. येणेंप्रमाणें वर्तमान आहे. रवाना छ० २८ रमजान रविवार. लोभ करावा हे विनंती.

नं. ५२९८ ( माघ व० ३०—२३ फेब्रु. )

बाळकृष्ण महादेव बाळ यांचें पत्र पुण्याहून मिरजेस बाळासाहेब यांस पत्र छ० २८ रमजानचें—

"रामचंद्रपंत आपा करवीरास गेले आहेत. तेथील सविस्तर वहिवाट लिहिली आहे. आपणांस व रघुनाथराव दादांस मसलत सांगितल्यास तोंडास मसलत आली आहे ती सिद्धीस जाईल. नाहीं तर मसलत बिघडेल, म्हणून लिहिलें आहे. त्यास येविषयींचा विचार होत आहे. मागाहून श्रीमंत नानांचे उत्तर घेऊन पाठवितों. श्रीमंत नानांची प्रकृति चांगली नाहीं. शक्त कमी आहे. याजकरितां दिवसगत उतारास लागते."

नं. ५२९९ ( २३ फेब्रु. )

धोंडो बापूजींचें पत्र पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस माघ व० ३० चें.

---

१ पत्र मिरजेहून बाळासाहेबांचे पुण्यास नानांचे कारभारी बाळ यांस.

"नबाबानीं पलटणवाले चाकरीस पलटणें दहा आहेत त्यांस सांगून मशीराचें पारिपत्य केलें अशी बाजार आवई बोलतात."

नं. ५३०० श्रीगणपति. ( २६ फेब्रु. )

पै॥ छ० २ सवाल. गुरुवार. सन मय्यातैन व अल्लफ.

[1]अपत्यें रामचंद्रानें शिर सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत फाल्गुन शुद्ध ३ बुधवारपर्यंत यथास्थित असों. विशेष. वडिलीं चारशें गोळे लहान मोठे देतों म्हणोन पत्रीं आज्ञा केली, त्यास सरकारचे तोफेचें साहित्य थोडें-बहुत आहेच. इंग्रजांकडे सरकारच्या तोफा येत नाहींत ते पक्षीं त्यांजकडे सामान पाहिजे. तर वडिलीं कृपा करून दोन हजार गोळे दिले पाहिजेत. करवीरकरांचें आचरण वडिलांस विदितच आहे. वडिलीं पांच चार वेळ पुण्यास लिहून साहित्य आणविलें. मसलत सिद्ध केली. गोळ्यांवांचून वीस दिवस घालविले ! तर सविस्तर विनंती तीं॥ राजश्री श्रीपतराव भाऊ करितील. तर दोन हजार गोळे फर्मे पाठविले आहेत त्यांचे देवावे. लौकरच गोळे परत पावते करीन. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३०१ श्री. ( फाल्गुन शु० ३–२६ फेब्रु. )

पै॥ छ० ३ सवाल. सन मय्यातैन व अल्लफ. फाल्गुन.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं.

पोष्य गणपतराव विश्वनाथ सा॥ नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता॥ छ० १ सवालपावेतों वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लिहित असिलें पाहिजे. विशेष. "दास्तानपैकीं जिन्नस राजश्री आपा यांजकडे लष्करांत गोळे सुपार २०८ व दारू बारदानें सुमारी २७ येकूण बारदानसुद्धां वजन पक्के ०॥।२ पेशजी पाठविली आहे. त्याची याद अलाहिदा पाठविली आहे त्याजवरून कळेल" म्हणोन लिहिलें, त्यास गोळे सुमार २०८ पाठविल्याप्रमाणें पावले. दारू सत्रा मण पाठविली ती व राजश्री आपा याणीं आणखी दारू आणवून कारखान्याकडे देविली त्याजबराबर ते भाडेकरी आले असिल्यास एकंदर मापांत माप जालें. निराळी दास्तानपैकीं असें समजुतींत आलें नाहीं. दारूचें माप जालें त्याची पावती राजश्री आपा याणीं घेतली आहे. इकडील मजकूर तूर्त अधिकोत्तर लिहिणेंसें नाहीं. सदोदित पत्रीं सांभाळीत गेलें पाहिजे. बहुत काय लिहिणें कृपा लोभ केला पाहिजे हे विनंती.

---

[1] पानशे तोफखानावाले. यांचें हें लष्कर नजीक करवीर येथून पत्र मिरजेस बाळासाहेबांस.

नं. ५३०२ श्री. (फाल्गुन शु० ४–२७ फेब्रुवारी.)

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामींचे सेवेशीं.

पोष्य धोंडोअनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २ सवालपर्यंत यथास्थित असे. राजश्री गोखले कित्तूर तालुक्यांतून परगणे मजकुरीं मारेहाळानजीक बेकरीवर उतरले आहेत. परगणे मजकुरीं दिगरगांवांस परभारें चिट्या केल्या आहेत. गुदस्तां श्री॥ भाऊसाहेबांस पैका दिला तितका देणें, म्हणून स्वांर व गार्दी बसाविले आहेत. रा....... मनस्वी घेतात मारेहाळास मुक्काम येतांच मी कारकून पाठविला. घांसदाणा देणें म्हणून बोलूं लागल्यानंतर "राजमंडळच्यानीं दोन चार वेळां तालुका लुटून खराब केला, गांव अगदीं ओस आहेत," असें सांगितलेवर म्हणूं लागले कीं, राजमंडळकरांनीं कोणता तालुका लुटला नाहीं? पैका आम्हीं घेतला कीं नाहीं? असें बोलतो. "दिगरगांवांस परभारें चिट्या आम्हांस वेगळ्या मागतां हें काय;" म्हटलें तर "भाऊसाहेबांस दिगरगांवांनी दिला कीं नाहीं? त्याचप्रमाणें दिगरगांवांचा सरकारी जो आकार असेल त्याची चौथाई देणें" म्हणून निकड लाविली आहे. शहापूरकरांचा कारकून गेला नाहीं म्हणून सांबरें कर्यातीचा एक गांव लुटला. मग कारकून गेला. मारेहाळ वगैरे खेड्यांनीं पेंवेंदखील काढिलीं. तमाम लूट माफ असें बोलतात. अनिवार लुटार सुद्धां दहा हजार होईल. रयत परागंदा जाले आहेत पाहिलेच. त्यामध्यें हें अरिष्ट आलें आहे. बोलणें कोणतेंही नाहीं. एकच––आकाराची चौथाई देणें––हेंच बोलणें. नाहीं तर खराबी होऊन घाल म्हणतो. उपाय नाहीं. त्यास स्वामींनीं आज्ञा करून पत्र गोखल्यांस व कारकून हुजूरचा पाठविल्यास उपद्रव निवारण होईल. तोंपर्यंत काय करतो न कळे! येऊन उतरला म्हणजे मग बाकी कांहींच राहत नाहीं. दूर आहे तोंच यत्न करावा म्हणतों. परंतु कोणत्यासही ठरत नाहीं. एकच उत्तर, तेव्हां इलाज नाहीं. उत्तर ल्याहावयास सत्वर आज्ञा व्हावी. येथें निकड भारी. कारकून गेले, त्यास आतांच पत्र आलें कीं, उरकोन द्यावें. नाहीं तर कूच करून येऊन अनगोळास उतरतों म्हणून आलें, त्यास इलाज काय? बोलण्यास कांहीं उत्तरच नाहीं. चौथाई देणें म्हणतात. दुसरी गोष्ट नाहीं. त्यास आज्ञा काय ते व्हावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ सखदेव. हा दादासाहेब कुरुंदवाडकरांचा मामलेदार.

नं. ५३०३ ( फाल्गुन शु० ५–२८ फेब्रु. )

नारो विनायक यांचें अथणीहून मिरजेस बाळासाहेब यांस पत्र. छ० ३ सवालचें—

"करवीरवासी महाराज पन्हाळ्याचे माचीस होते तेथें राजश्री रामचंद्रराव आपा व पलटणवाले याणीं रात्रौ जाऊन छापा घातला. महाराज किल्यावर गेले. गोट वगैरे सलतनत लुटली गेली. तोफा आणिल्या" म्हणोन लिहिलें तें कळलें. वाघ मुधोळानजीक होता तेथून कुंदरगीवरून सितीमनी परगणे बागलकोट येथें मुक्कामास गेला. सुरापुराकडे जाणार अशी बोलवा आहे."

नं. ५३०४ श्रीगणपति. ( फाल्गुन शु० ५–२८ फेब्रु. )

पै॥ छ० ३ सवाल मय्यातैन. फाल्गुन मास.

अपत्यें रामचंद्रानें शिर सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० ३ सवालपर्यंत यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. लक्ष्मण तोफ व गरनाळ मुहूर्तें करून चालती केल्याचें व फर्म्याप्रमाणें गोळे निवडावयास लाविल्याचें व दारू राजश्री बापूजीपंत वाघ याजकडे दिल्याचें लिहिलें तें कळलें. ऐशीयास काल छ० २ सवालीं दोनप्रहरीं पलटणें फौजसुद्धां चालोन जाऊन कोल्हापुरास उत्तरेच्या अंगें बनपुरीनजीक मोर्चाची जागा कायम करून पलटणांतील कवाइती व अलीगोल हे माणूस बसविले. सरकारी तोफाही दिवाळतोडी दोन नेऊन लागू केल्या आहेत. गांवांतूनही कांहीं लोक बाहेर पडले होते त्यांची यांची गोळागोळी बरीच होऊन फिरोन ते गांवांत गेले. रात्रीस दुमदारीवर चि॥ राजश्री चिंतामणराव आपा व ती॥ विठलराव बाबा यांस फौजसुद्धां ठेऊन आम्ही फौजसुद्धां गोटास आलों. रातबिरात पन्हाळ्याकडून गोटावर गलबल करितील याकरितां आलों. बंदोबस्त करून आज तेथें नेहमीं राहावयास जाण्याचें ठरावांत येईल तें लिहीन. दारूगोळ्याचें काम. तो जलद येऊन पोंचला पाहिजे. सवाई तोफेचीही तयारी सत्वरच जाली पाहिजे. लक्ष्मण तोफ व गरनाळ लौकर आली पाहिजे. ती॥ राजश्री केसोपंत फडणीस काल पाठविले आहेत. करवीरवासी यांची फरारी जाली. विदित होय हे विज्ञापना.

# करवीरचा वेढा.

## उत्तरार्ध.

( इ. स. १८०० मार्च ते एप्रिल अखेर. )

या प्रकरणांतल्या पूर्वार्धांत रामचंद्रपंतआपानीं करवीरास मोर्चेबंदी करण्याची सुरुवात केली, येथपर्यंत हकीगत आली आहे; त्यापुढची या स्वारीची हकीगत उत्तरार्धांत यावयाची असून तिचीं ' करवीरचा वेढा ' व ' स्वारीचा शेवट ' अशीं दोन पोटप्रकरणें कल्पिलीं आहेत. त्यांत आधीं करवीरच्या वेढ्याचा वृत्तांत यावयाचा असल्यामुळें तो सांगण्याचा उपक्रम करूं.

करवीरच्या उत्तरेस बनपुरीनजीक रामचंद्रपंतानीं पलटणांकडून पहिला मोर्चा बांधविला व त्याच्या डाव्या बाजूस तोफखानावाले पानसे यानीं आपला मोर्चा बांधिला, हें मागें (पृ. ६१३५) सांगितलेंच आहे. बनपुरीसच ब्रह्मपुरी हें आणखी एक नांव आहे. त्या ब्रह्मपुरींत इमारती होत्या त्या वांचतील तर बरें होईल असें रामचंद्रपंतांस वाटत होतें, परंतु या इमारती राखण्यांत आपल्या सुरक्षितपणाला धोका येतो असें समजून ब्राऊन साहेबानें त्या इमारती व शेजारीं मठ होता तोही पाडून टाकिला. ब्रह्मपुरींत सिद्धेश्वराचें देवालय आहे तेवढें मात्र शाबूत राहिलें. रामचंद्रपंतांस मोर्च्यांत रात्रंदिवस रहावें लागत असल्यामुळें ते या सिद्धेश्वराच्या देवालयांतच स्नानसंध्या व भोजन करीत.

मिरजकर गंगाधरराव बाळासाहेब व कुरुंदवाडकर रघुनाथराव दादासाहेब या दोघांस पेशवे व करवीरचे महाराज या दोघांचीही मर्जी संभाळावयाची असल्यामुळें परशुरामभाऊंवर जेव्हां संकटाचा समय आला तेव्हां त्यांनीं भाऊंची उपेक्षा केली असें पूर्वीं ( पृ० ५८६२ ) लिहिलें आहे. भाऊ दिवंगत झाल्यावर रामचंद्रपंतानीं करवीरच्या मसलतीची उभारणी केली त्यांत या दोघांकडून त्यांस विशेषसें प्रोत्साहन मिळालें नाहींच. उलट त्यांविषयीं त्यांच्या मनांत उदासीनपणा व साशंकवृत्ति मात्र उत्पन्न झाली. याचें कारण चिंतामणराव सांगलीकर हे रामचंद्रपंतांस या स्वारींत जिवाभावानें

म्हणून मदत करीत होते. अर्थात् रामचंद्रपंत त्यांचाच कैवार घेऊन आम्हांशीं भाऊबंदकी अधिक माजवितील व आमचें नुकसान करितील असें या दोघांस भय पडलें !

अशी स्थिति होती तरी मोहिमेवर आपापली फौजं पाठविण्याविषयीं नानांचा तगादा बसला व पेशवे सरकारचें आज्ञापत्र गेलें, तेव्हां या दोघांस आपलीं पथकें स्वारीच्या कामावर पाठवावींच लागलीं. तीं पथकें ता० ४ मार्च रोजीं करवीरास येऊन दाखल झालीं. मिरजकरांच्या पथकांत नारायणराव गंगाधर व कुरुंदवाडकरांच्या पथकांत त्रिंबकरावं रघुनाथ हे मुख्य सरदार होते. दोघांसही लष्करी कामाचा अनुभव नव्हता. दोन्ही पथकांत स्वार पायदळ मिळून अदमासें तीन हजार लढाऊ लोकांचा भरणा असावा. शिवाय या पथकांबरोबर इस्मित साहेबाचीं दोन पलटणें मिळून बाराशें कवाइती पायदळ व दोन तोफा होत्या; आणि खरें पाहिलें तर तेंच या पथकांचें मुख्य बळ होतें. इस्मित ( स्मिथ ) हा अंमलदार जातीनें इंग्रज असून कुरुंदवाडकरानीं त्यास नोकरींत ठेवून त्याजकडून हीं दोन पलटणें तयार करविलीं होतीं.

स्वारींत दाखल होतांच मिरजकर व कुरुंदवाडकर यानीं रामचंद्रपंतांस साफ सांगितलें कीं, आम्हांस काय चाकरी सांगाल तीं दोनी पथकें मिळून सांगा. आमच्या पथकांस पृथक् पृथक् चाकरी सांगाल तर आम्ही ती करणार नाहीं आणि त्यांतून चिंतामणरावांच्या संगतीस अथवा हाताखालीं राहून कधींच करणार नाहीं! अशा अडील पथक्यांचें मन न दुखवितां त्यांजकडून नोकरी घेणें आणि भाऊबंदकीची नाजूक तेढ संभाळणें हें फार कठिण काम होतें. आम्हांबरोबर पलटणें आहेत, थोर तोफा आमच्या हवालीं करा म्हणजे स्वतंत्र मोर्चा बांधून निराळी चाकरी करून दाखवितों, असं हे पथके म्हणूं लागले. परंतु यांच्या मोर्चावर शहरवाल्यानीं हुल्लड केली असतां तोफा संभाळण्याचें काम यांच्या हातून झेंपणार नाहीं असें रामचंद्रपंतांस वाटल्यावरून त्यांनीं मिरजकर व कुरुंदवाडकर यांस करवीरच्या पश्चिमेस एक कोसावर शिंगणापूर म्हणून खेडें आहे तेथें टेहळणीच्या कामावर नेमिलें. त्या स्थळाच्या आसपास नदीस उतार असल्यामुळें तेथून करवीरचें माणूस जाईल येईल त्यास प्रतिबंध करावा, व पन्हाळ्याकडून लष्करच्या कहीकबाडास वारंवार उपसर्ग पोंचतो त्याचा बंदोबस्त करावा, हीं दोन कामें त्यांजवर सोंपविलीं होतीं. परंतु हीं कामें त्यांच्या हातून झालीं नाहींत इतकेंच नव्हे,

तर करवीरचा वेढा उठेपर्यंत कोणतेंही काम त्यांनीं मनापासून झटून केलें नाहीं. याचें कारण असें कीं, रामचंद्रपंत पेशवेसरकारास अर्ज करून मिरजेचा किल्ला चिंतामणरावांच्या हवालीं करविण्याच्या प्रयत्नांत आहेत असा संशय या पथक्यांच्या मनांत आला होता ! हा संशय साधार होता किंवा निराधार होता हें नक्की सांगवत नाहीं. "करवीरची मोहीम आटोपल्यावर आपण मिरजेचा किल्ला घेणार, निदान जातां जातां मिरज शहराची तरी नासधूस करणार," असे उद्गार शिंद्यांच्या पलटणांचा सरदार बराऊनसाहेब यानें आपणाजवळ काढिले आहेत असें इस्मितसाहेब एका पत्रांत लिहितो; तें मात्र या संशयाला कांहींसें कारण दिसतें खरें.

रामचंद्रपंतांच्या कुमकेस शिंद्यांचीं पलटणें आलीं होतीं त्यांनीं हा वेळपर्यंत उत्तमप्रकारची कामगिरी बजाविली; यामुळें त्यांस संतोष झाला होता. ही शिंद्यांची कुमक कायमची टिकणारी नव्हे, ही गोष्ट त्यांस अजून कळावयाची होती ! करवीरच्या वेढ्यास सुरुवात होते न होते तोंच ही माहिती त्यांस कळून आल्यामुळें या स्वारीप्रकरणीं त्यांच्या मनास निराशेचा पहिला धक्का बसला. लष्करांत शिंद्यांचें घोडदळ होतें त्यावरचा मुख्य सरदार गणपतराव भिकाजी हा बाळोबातात्यांचा हस्तक होता. त्यास तात्यांकडून हळूच इशारा आला कीं, करवीरच्या मोहिमेचा सोक्षमोक्ष काय तो लवकर करून घ्यावा. कारण सर्जेरावाच्या चिथावणी-वरून दौलतराव शिंद्यांचें मन करवीकरांकडे केव्हां वळेल, हे व ते मराठे मराठे केव्हां एक होतील, याचा नेम नाहीं ! गणपतरावानें तात्यांचीं पत्रें रामचंद्र-पंतांस दाखविलीं तेव्हां ते मनांत दचकले, व त्या पत्रांतला मजकूर पलटणां-वरच्या गोऱ्या अंमलदारांच्या कानीं जाईल तर घात होईल, याकरितां तो गुप्त राहूं द्या, असें गणपतरावास त्यांनीं विनविलें. आणि या मोहिमेचा निकाल जितका लवकर लागेल तितका श्रेयस्कर आहे ही खूणगांठ मनांत बांधिली.

वेढ्याचें काम आरंभीं आरंभीं फार झपाट्यानें चाललें होतें. मोर्चे व शहराची तटबंदी यांमध्यें गवताच्या दोन गंजी होत्या त्या पलटणवा-ल्यांनीं लष्करच्या सोद्यांकडून जाळून टाकविल्या; त्यामुळें तटावर तोफांची शिस्त धरणें सुलभ झालें; आणि पलटणांचा मोर्चा पांच चार दिवसांतच इतका पुढें गेला कीं त्याला व शहराच्या तटाला फक्त दोन अडीचशें हातांचें अंतर राहिलें. इकडे पानशांच्या मोर्चांतून तोफांचा मारा एकसारखा चालू होता तो इतका परिणामकारक झाला कीं, मार्च महिन्याच्या दहा बारा

तारखा होतात तोंच दोनशें हात तट जमीनदोस्त होऊन तेथें मोठें खिंडार पडलें.

ही दुर्दशा पहातांच करवीरचे मुत्सद्दी समेट करण्याविषयीं रामचंद्रपंतांस बहुत आर्जवानें विनवूं लागले. भूदरगड, चिकोडी, मनोळी आणि शिरोळचें ठाणें परत देतों, परशुरामभाऊंचा खून झाला आहे त्याबद्दल सामानगड देतों, आमच्या बोलण्यावर विश्वास बसत नसेल तर हीं सर्व ठाणीं तुमच्या हवालीं होतपर्यंत करवीर ताब्यांत देतों, तुमच्या मुलखाची नासधूस व नुकसानी झाली असेल ती भरून देतों, त्याबद्दल तुमची खात्री पटावी म्हणून राजाज्ञा व हिंमतबहाद्दर यांस वाटेल तर ओलीस द्यावें, अशीं त्यांचीं बोलणीं असल्याचें या प्रकरणांतल्या एका पत्रांत लिहिलें आहे. हीं त्यांचीं सर्वच बोलणीं मनापासून खरीं होतीं असें आम्हांस वाटत नाहीं. तें कसेंही असो, करवीरची राजधानी लढून काबीज करण्याचा हट्ट रामचंद्रपंतानीं धरला असल्यामुळें प्रतिपक्षाकडून आलेला तहाचा संदर्भ त्यानीं या वेळीं मनावर घेतला नाहीं.

तोफांच्या भडिमारानें शहरचा तट ढासळूं लागला असें पहातांच ता० १० मार्च रोजीं तिसरे प्रहरीं शहरांतून सुमारें तीन तीनशें लोक दोन बाजूनीं बाहेर पडले व प्रथम बाणांची सरबत्ती करून मोर्च्यांवर चालून आले. पलटणचे लोक त्यावेळीं हुशार असल्यामुळें त्यांनीं त्यांस हटवून शहरांत घालविलें. त्या वेळीं मोर्च्यांतलें दहा पंधरा माणूस जायां झालें व पलटणांवरचा एक कपतान् रुमाली साहेब म्हणून होता त्यास गोळीची जखम लागली. करवीर दरबारचे मुत्सद्दी घाबरले असले तरी शहरवाल्यांची हिंमत बिलकुल खचली नव्हती, हें या लहानशा चकमकीवरून स्पष्ट होतें.

शहराच्या तटास एवढें मोठें खिंडार पडलेलें पाहतांच पलटणांवरचा मुख्य सरदार ब्राऊनसाहेब 'हल्ला करून शहर काबीज करतों' असें रामचंद्रपंतांस म्हणूं लागला. हल्ल्यानें शहर घ्यावें ही गोष्ट रामचंद्रपंतांस नको होती असें नाहीं, परंतु त्यांचें म्हणणें असें पडलें कीं, तटास अशींच एक दोन निरनिराळीं खिंडारें पडतपर्यंत वाट पहावी, आणि हल्ला करावयाचा तो करते वेळीं दोहीं तिहीं अंगानीं एकदम करावा; म्हणजे तो कुठे तरी लागू होऊन पीछेहाट होण्याचा प्रसंग येणार नाहीं. एकतोंडी हल्ला करणें सुरक्षितपणाचें नव्हे. रामचंद्रपंतांची ही सावधपणाची सूचना योग्य होती, परंतु ती ब्राऊनसाहेबाच्या मनास न आल्यामुळें त्यानें ता. १३ मार्च रोजीं उजाडतां उजाडतां

उतावळेपणानें शहरावर हल्ला केला. त्या हल्ल्यांत पलटणांतले शेंदीडशें लोक जायबंदी झाले व स्वतः ब्राऊनसाहेब यास गोळी लागली. तो प्रकार कसा कसा घडून आला हें खुद्द रामचंद्रपंतांच्याच शब्दांनीं येथें वर्णन करूं.

" दिवाळतोडी तोफा लागू करून भिंताड पाडलें. चढोन जावयाजोगा रस्ताही एकतोंडीं दोन ठिकाणीं जाला शंभर दीडशें हात. त्यास आणखी एक बाजूस तोफा लागू करून वाट करावी, नंतर हल्याचा विचार. एकतोंडींच हल्ला केली असतां आंत माणूस फार आहे, कारेगार होणार नाहीं, असेंही पलटणवाल्यांसीं म्हणणें पडलें असतां तें त्यांचे विचारास न येतां काल शुक्रवारीं एक घटका रात्रीस पहांटेस तोफांची मारागिरी एकसारखी करवून प्रातःकाळीं माणसास माणूस दिसेना असे धुराडींत चालोन घेतलें. त्यांत जिकडे भिंताड पडलें तिकडे जावें तें न होतां वाट धुराडीमुळें चुकोन डावे बाजूस लैना गेल्या. तेथें वरील मारागिरी होऊन दहा वीस माणूस जायां जखमी होतांच फिरले. रस्ता होता तिकडे चाळीस पन्नास माणूस गेलें होतें तें खंदक पार होऊन वरतें चढलें असतां मागील पुरावा न जाल्यामुळें तेंही फिरोन आलें. हल्ला कारेगारच व्हावी, परंतु उतावळीमुळें मार्ग चुकले. धुरांत समजलें नाहीं. ईश्वराची इच्छा ! जायां जखमी मिळोन दीडशेंपर्यंत पलटणांतलि जाले आहेत. त्यांतच खुद्द बराऊन यासही डावे हाताचे खांद्यावर गोळी लागोन गोळी आंतच राहिली आहे. खैर आहे. हें जाल्यावर दोनप्रहरपर्यंत आम्ही तेथें राहून मोर्चे फिरोन जाग्याचे जाग्यावर कायम करून आलों. "

पलटणवाल्यानीं शहरावर हल्ला केला तो वर लिहिल्याप्रमाणें मागें हटला. यांत स्वतःची फार नाचक्की झाली असा पलटणांवरच्या इंग्रज अंमलदारांनीं मोठा कांगावा केला. करवीरकरांचें तहाचें बोलणें आतां बिलकूल ऐकावयाचें नाहीं, मी बरा झाल्यावर करवीरावर पुन्हा हल्ला करून आंतलें माणसान् माणूस कापून काढितों, असें खुद्द ब्राऊनसाहेब म्हणूं लागला. ' इंग्रजी हल्ला फिरली, ' ' इंग्रजी हल्ला फिरली, ' असें या पीछेहाटीचें स्तोम इंग्रज अंमलदारांनीं कांहीं दिवस फारच माजविलें होतें ! काय म्हणे, कंपूचा मुख्य सरदार सतलंजसाहेब हा ' इंग्रजी हल्ला ' फिरल्याचें वर्तमान ऐकतांच चवताळून सर्व कंपूंसह करवीराकडे येण्यासाठीं पुण्याहून निघाला असतां शिंद्यांनीं त्याचीं आर्जवें करून त्यास राहून घेतलें ! कशी मौज आहे पहा ! राज्य मराठ्यांचें, फौज शिंद्यांची, आणि त्या फौजेची हल्ला फिरली ती ' इंग्रजी

हल्ला ' फिरली ! जणुं काय इंग्रजी हल्ला म्हणजे महेंद्राचा अमोघ वज्राघातच ! या एकाच गोष्टीवरून मराठी दौलतीवर आंग्ल संस्कृतीची छाप बसविण्याविषयीं इंग्रजांचा आग्रह आणि स्वतःच्या अजिंकपणाबद्दलचा अमर्याद अहंकार स्पष्ट दिसून येतो.

शिंद्यांच्या इंग्रज अंमलदारानीं हा जो संतापाचा आवेश आणला होता तो खराच आहे असें वाटल्यामुळें रामचंद्रपंतांस फार हर्ष झाला. हे इंग्रज इतके संतापले आहेत त्याअर्थी हे दारूगोळा मागतात तेवढा यांना दिला आणि यांजकडून पुन्हा हल्ला करविला कीं करवीर खात्रीनें हस्तगत होणार, आणि अश्वत्थाम्याप्रमाणें पितृवधाबद्दल आपण शत्रूवर चांगलाच सूड उगविला असें होणार, असें त्यांस वाटूं लागलें ! परंतु या आशातरंगिणींत ते आनंदानें डुंबत असतां या वेळीं असा एक अकाल्पित अनर्थ घडून आला कीं, ज्यायोगानें त्यांची ती आशातरंगिणी एकाएकीं मृगजळाप्रमाणें अदृश्य होऊन तळाशीं राहिलेल्या निराशेच्या रखरखीत वाळवंटांत तळमळत पडणें त्यांच्या प्रारब्धीं आलें ! नानांचा मृत्यु हाच तो अनर्थ होय ! मराठी राज्याच्या स्वातंत्र्याचें अधिष्ठान म्हणून प्रख्याति पावलेलें तें नररत्न नाना फडनवीस फाल्गुन व० ३ गुरुवार ता० १३ मार्च रोजीं अडीच प्रहर रात्रीस देहावसान पावलें. म्हणजे ज्या दिवशीं पहांटेस करवीरच्या मुक्कामीं हल्ला झाला त्याच दिवशीं रात्रीस पुण्याच्या मुक्कामीं नानानीं इहलोक सोडला !

नानांचा आजार व मृत्यु, त्या मृत्यूपासून तत्कालीन राजकीय उलाढालींवर झालेले परिमाण, त्यांच्या मुत्सद्दीपणाचें आटोकाट धोरण, वगैरेबद्दल थोडीबहुत माहिती या प्रकरणांतल्या पत्रांतून आली आहे. तिचे पुढील उतारे वाचकांस मनोरंजक वाटतील.

७ मार्च—“ श्री ॥ राजश्री बाजीरावसाहेब यांचे पत्नीस रजोदर्शन प्राप्त जुन्नरास जालें. ( बाईची ) स्वारी येथें आली. फाल्गुन शु० ९ बुधवारीं गर्भाधान जालें. सायंकाळीं श्री ॥ राजश्री अमृतराव नानांकडे आमंत्रणास आले. परंतु शरीरीं सावकाश नाहीं, ( सबब नाना ) वाड्यांत गेले नाहींत. शिंदे, होळकर वगैरे मंडळी झाडून वाड्यांत आले. समारंभ जाला. सायंकाळीं अर्ध घटका दिवसास नानांकडे नमस्कारास ( श्री॥ बाजीराव ) बाबासाहेब आले होते. कालपासून नानांचा ज्वर कांहीं कमी आहे. आज दानें होत आहेत. ”

१९ मार्च—“ नाना फडनवीस यांचा काल व० ३ गुरुवारीं अडीच प्रहर रात्रीस जाला. ”

१३ मार्च—“ श्री॥ नाना यांचा काळ व० ३ गुरुवारीं मध्यरात्रीस जाला. समस्त मुत्सद्दी आले होते. प्राणोत्क्रमणसमयीं श्री॥ राजश्री ( अमृत ) रावसाहेब हेही आले. परंतु भाषण नाहीं. तसेच वाड्यांत गेले. शव माजघरांतून जाळीपुढें आणिलें. गंगेवर न्यावयाची सिद्धता जाली. तों आरबानीं आपले फडशाकरितां अडथळा घातला. नंतर राजश्री दुल्लभदास यानीं हवाला घेतला, तेव्हां शव बाहेर जाऊं दिलें. या खटपटीस सूर्योदय जाला. नदीवर दहा सहस्र माणूस मिळालें होतें. नानांकरितां शहरांत ते दिवशीं हाहाकार जाला तो काय वर्णावा ? मातोश्री बाया सिद्धटेंकास होत्या. त्यांस भृगुवासरीं प्रहररात्रीस वर्तमान समजलें. नंतर निघाल्या. सायंकाळचे श्री॥ राजश्री रावसाहेब व बाबाफडके, चक्रदेव वगैरे झाडून समाचारास्तव आले होते. ”

दुल्लभदास हा पुण्यांत हरिभक्तीची पेढी होती तिचा मुनीम.

२९ मार्च—“ नाना वारले. एक बायकोही वारली. सुतक फिटल्यावर मोरोबादादा पुण्यास येणार. त्यांस नानांची फडणीसी श्रीमंत सांगणार. नानांच्या दोघी स्त्रिया सिद्धटेंकाहून आल्या त्या तिसरे दिवशीं वाड्यांत आल्या. थोरली बायको चै० शु० २ गुरुवारीं वारली. नानांची क्रिया गंगाधरपंतांचा भाऊ प्रभाकरपंत भानु आबेगांवकर यानीं केली.

३० मार्च—“ नानांच्या पंधराव्या दिवशीं थोरली स्त्री वारली...... शिंदे, नबाब, इंग्रज नानांच्या स्त्रीस दत्तक द्यावा म्हणत आहेत. ”

२४ मार्च—“ नानांचा काळ झाल्यावर भृगुवारीं सरकारचे हुजरे नानांच्या वाड्यांत येऊन बसले व पागा वगैरे जेथें तेथें हुजरे गेले. दुसरे दिवशीं कापडाची मोजदाद झाली. श्रीमंतांची नजर वांकडी असें दिसून आल्यावर धोंडीबानीं सरकारांत बोलून हुजरे उठविले. गंगाधरपंत भानूचा पुत्र चार वर्षांचा आहे, तो दत्तक द्यावा असा बाळोबातात्या व फडके वगैरेचा मानस आहे. ”

धोंडीबादादा हे बाळोबातात्यांचे जोडीदार कारभारी.

१८ मार्च— “ नाना गेले. उपाय नाहीं. याउपर कोणेसमयीं काय घडेल न कळे ! ”

१९ मार्च— "नाना गेल्यामुळें करवीरच्या फौजेंत हाहाःकार उडाला आहे. बुद्धि चालत नाहीं."

हे दोन उतारे रघुनाथराव दादासाहेब यांनीं कुरुंदवाडाहून लिहिलेल्या पत्रांतले आहेत.

२२ मार्च— "नानांसारखा मोहरा गेला! फारच वाईट गोष्ट जाली. श्रीमंतांच्या दौलतीस मोठा आळा होता. इकडील तो पूर्वऋणानुसंबंधी. वर्तमान कळल्यापासून कांहीं सुचत नाहीं. नाना यांचे योगेंकरून हेही दिवस पाहिले येविशींचा विस्तार काय काय लिहावा?"

हा लेख रामचंद्र परशुराम यांचा.

६ एप्रिल— "काल श्री॥ राजश्री (रामचंद्रपंत) आपासाहेबांची गांठ मोर्चांत पडली ते वेळेस (त्यानीं) सांगितलें, नाना फडणीस सर्वांचें छत्र होतें. विशेषतः आम्हांस तर त्यांवांचून त्राता दुसरा दरबारीं कोणीच नाहीं. ईश्वरसत्तेनें ते गेले. पुढें दरबारांत कोणासीं बोलावें, कसें करावें, या विवंचनेंत पडलों आहों."

२३ मार्च—"नाना गेल्यापासून शिंदे यांचे घरीं दुफळी जाली. सर्जाराव व बाणाजी व यादो भास्कर हे बाळोबा व धोंडीबा यांस (कारभारांतून) काढण्याच्या खटपटींत आहेत. तेही सावध आहेत, रात्रंदिवस खलबतें चालली आहेत. बाळोबांनीं बखेड्याचा बंदोबस्त केला आणि काईम राहिले तरच परिणाम. नाहींतर आजच भालेराई जाली!"

२४ मार्च— "(करवीरप्रकरणीं बाळोबातात्यांच्या बोलण्यांत) पहिला नेट नाहीं. नाना गेले त्यामुळें राज्यांतला दाब गेला."

शिंद्यावर नानाचा दाब होता तो नाहींसा होतांच बाळोबातात्यांचा तेजोभंग होण्याची सुरुवात झाली ती शेणवी मुत्सद्दी व सरदार यांच्या जिवावर पुढें लवकरच ओढवणाऱ्या संक्रांतीची दर्शक होती.

२० मार्च—"पुण्याकडील नाना कैलासवासी जाल्याचें वर्तमान आलें. त्याजवरून सर्वांचे उमेदीस उदासीनता जाली त्याचा विस्तार काय लिहावा? इतःपर ब्रह्मसूत्रास त्राता श्री आहे! गेले त्यांचीच (पुण्याची) सामोग्री उभी राहिल्यास राहील. हें वर्तमान येथें इंदुवारीं आल्यानंतर काल प्रातःकाळीं नानांचे पथकांत राजश्री मोरोपंत साठे यांचे डेऱ्यास ती॥ राजश्री आपासाहेब गेले होते. तेथून येते समयीं इंग्रजांकडे गेले. तेथें त्याणीं पुण्याकडील वर्तमान विचारलें. नाना गेले म्हणोन वडिलानीं सांगितल्यावरोन बराऊननें

नानें उत्तर केलें कीं, ' ब्राह्मण्य ' बुडालें ! तुमचे राज्यांतील दाब गेला. तेव्हां वडिलांनीं अशी गोष्ट वडावयाची नाहीं, ( असें म्हणून ) विद्यमानीं आहेत त्यांचीं ( पेशवे वगैरेंचीं ) नांवें घेतलीं. तेव्हां ते सर्व आम्हांस ठाऊक आहेत असें बोलला. तेव्हां विदुर ( शिंदे ) व त्यांचे कारभारी यांचीं वडिलानीं नांवें घेतलीं. तेव्हां बोलिला जे, ( बाळोबा ) तात्या सुज्ञ, दाबाचे पुरुष खरे. परंतु त्यांणीं काळजी वागविली असतां आपले घरची ( शिंद्यांचे दौलतीची ) वागवितील. तुमची दौलत पोटीं पडली. असें समजाविसीस बोलिला. परंतु गर्भ पाहतां विदुराचे दौलतींत आपला व्याप जाला आहे असे ( इंग्रजांचे ) भाव दिसतात. व अधिकारी बेहुशार, व यांची जामियत, तेव्हां प्रमाणच दिसतें. श्रीकृपें घडेल तें खरें. नाना गेले त्यानीं जातेसमयीं राज्यास श्रेयस्कर प्रकार कोणास तरी समजाऊन दिलाच असेल. ( नानांच्या स्त्रीनें ) दत्तपुत्र घेतला असें वर्तमान येथें आहे. व ( त्यांची ) खासगी ( श्रीमंतांनीं ) सरकारदाखल केली असें व मोरोबादादाचे चिरंजीवास व बजाबास ( नानानीं ) श्रीमंतांचे हातीं ' पोषण करावें व दरक चालवावा ' म्हणोन विनंती करून दिलें असें वर्तमान येथें आहे......ही गोष्ट जाली तेणेंकरून बहुतांस संकट जालें. बरें ! श्री कृपा करीतच आहे. "

नाना वारले त्याअर्थीं आतां तुमचें ब्राह्मण्य म्हणजे ब्राह्मणांची सत्ता बुडाली आणि परकी सरकारांस तुमच्या राज्याचा वचक वाटत होता तो नाहींसा झाला, असे वरील उताऱ्यांत ब्राऊनसाहेबानें दोन ठाम सिद्धांत म्हणून सांगितले आहेत ते खरे नव्हेत असें कोण म्हणेल ? तें त्याचें एकट्या पुरतें म्हणणें नसून त्या वेळच्या सर्व इंग्रजांचें तेंच मत होतें.

२२ मार्च—" यशवंतराव होळकर याणें जाटाचा किल्ला एक आपण (व) भोसले मिळून घेतला. द्रव्य बहुत सांपडलें. फौजही हुशार. दीडशें दोनशें-पर्यंत तोफा व पायदळ व स्वांर मिळोन पन्नास हजार संगातें आहे. पुण्याकडे येण्याचा रोंख आहे. भोसले यांचीही फौज कांहीं संगातें आहे. नानांचे सूत्रेंकरून येत आहेत. बुंदेलखंडाचे सरदेपर्यंत आला आहे अशी बाजार बोलवा आहे. याउपर नानांचें वर्तमान ऐकून पुढें येतो किंवा तेथेंच तूर्त रहातो पहावें ! "

बाजीरावसाहेबानीं आपल्या बचावाकारितां दौलतराव शिंदे यांस पुण्यांत राहून घेतलें. त्यांच्या फौजांनीं गेल्या पांच वर्षांत साऱ्या दक्षिणेची राखरांगोळी केली. आज जातों उद्यां जातों अशा थापा मारून शिंद्यानीं

नानांपासून मुबलग द्रव्य वेळोवेळ घेतलें. परंतु कांहीं केल्या ते पुण्यांतून तळ हालवीनात, आणि प्रजेचा संहार थांबेना ! तेव्हां अखेरची तोड म्हणून नानानीं शिंद्यांशीं झुजण्याकरितां परस्पर यशवंतराव होळकरांस उभे केलें होतें असें वरील उताऱ्यावरून स्पष्ट होतें.

नानांच्या विशालबुद्धीची व कर्तृत्वाची छाप लोकांच्या मनावर किती पडलेली होती हें दाखविण्याकरितां आणि लिहिण्यांतला एक मौजेचा मासला म्हणून पुढील उतारा आम्ही येथें देत आहों. हें पत्र नं. ५३३७ ला छापिलें आहे तेथें यांतल्या दुर्बोध शब्दांची फोड निराळी केलीच आहे.

२० मार्च– "विदुराशिबिरस्थ सुकृतीय वर्तमान जे, दक्षिणस्थाचा नाश गुदस्तां हूणानीं केला त्या संधींत पदातीय वगैरे समुदाय पलायित जाहला त्या समागमें मुख्याचा पुत्र निघाला. तो श्रेष्ठ नद्वय पूर्वस्थळास आल्यानंतर त्यांसंनिध प्रविष्ट जाहला. तेव्हां गुप्तवेषें यवनसमुदायीं नद्वयानीं संग्रहीं ठेविला. आणि (स्व) राज्य रक्षणार्थ व तें राज्यग्रहणार्थ प्रयत्नही आरंभिला. श्रीरंगनगरस्थ हूणसमुदाय होता त्यांतील दोन सहस्र यांत्रिकभेद केला व स्थलोस्थलीं गुप्त संधान राखिलें. निमित्यार्थ दुर्गादिस्थलीं हूणाचें ध्वजग्रहण करून या संधानीं असावें असें केलें होतें, व प्राचीन वर्णाभ्य विग्रमानीं कारभारी होता तेथेंही लक्ष ठेविलें होते. श्रीइच्छेनें दोन संवत्सर आयुर्मर्यादा नद्वयाची स्थिर असती म्हणजे हूणनाशच जाला असता. हें वर्तमान सर्वांस अश्रुत. नद्वय कैलासवासी जाल्यानंतर संगमस्थ हूणानीं यवनपुत्राचा शोध लावून श्रीमान् यांस विचारिलें. तेव्हां त्याणीं एकंदर नीट न सांगितलें. तेव्हां क्रुद्ध जाहले. नंतर यवनपुत्रास अधिकारी याणीं हूणहस्तीं दिला. हें वर्तमान संकर्षणास कळल्यानंतर त्याणीं पामरनामक हूणाजवळून आपल्याजवळ आणून स्थापन केलें आहे. पुढें श्रीइच्छा ! परंतु असे दीर्घ प्रयत्न श्रवणच करावयाचे ! अशांचा नाश, तेव्हां राज्यास्थिति कठिणतर दिसते."

या उताऱ्याचें चालू भाषेंतलें शब्दांतर पुढीलप्रमाणें–

"शिंद्याच्या लष्करांतून पुण्याहून बातमी आली आहे कीं, गुदस्तां इंग्रजानीं टिपूस मारून श्रीरंगपट्टण घेतल्यावर टिपूची पायदळ वगैरे फौज पळाली तिजबरोबर टिपूचा एक पुत्र पट्टणांतून निघून पुण्यास आला व गुप्तवेषानें दिवस कंठीत राहिला. पुढें नाना फडनविसांच्या हातांत पुन्हां पूर्वींप्रमाणें राज्यकारभार आलासें पाहून तो टिपूचा पुत्र गुप्तपणें त्यांस भेटला. त्यानीं त्यास आश्रय देऊन पदरच्या आरबांत असामी देऊन ठेविलें. आणि मराठी राज्य-

रक्षावें आणि म्हैसूरचें राज्य इंग्रजांच्या हातून घ्यावें म्हणून उपक्रमास प्रारंभ केला. श्रीरंगपट्टणांतलें दोन हजार कवाइती पायदळ त्यांनीं फितविलें व पूर्वीचा ब्राह्मण कारभारी पूर्णय्या कर्णिक हल्लीं कारभारी आहे त्यासही अनुकूळ करून घेतलें. राज्यांतलीं चित्रदुर्ग वगैरे मजबूत स्थळें आहेत तेथल्या लोकांनीं आपल्या लक्षानें चालावें, केवळ निमित्तापुरतें इंग्रजाचें निशाण किल्यावर कायम ठेवून दिवस काढावे, असेंही त्यानीं संधान केलें होतें. आणखी दोन वर्षें नाना जगते तर इंग्रज नाशच पावावे असें होतें, परंतु ईश्वरी इच्छेनें त्यांची आयुर्मर्यादा संपली ! नाना वारल्यानंतर संगमावर इंग्रज वकील कर्नल पामर रहातो त्यानें टिपूच्या या मुलाचा पत्ता पाडून श्री॥ बाजीरावसाहेबांस विचारपूस केली. ते यथास्थित उत्तर देत ना त्यामुळें इंग्रज क्रुद्ध झाले. नंतर श्रीमंतानीं भयभीत होऊन टिपूच्या मुलास इंग्रजांच्या हवालीं केलें ! हें लांछनाचें कृत्य बाळोबा तात्यांच्या कानीं जातांच त्यांस वैषम्य वाटलें व त्यानीं कर्नल पामर याच्या ताब्यांतून त्या मुलास युक्तीनें काढवून आपल्याजवळ आणून ठेविलें आहे. नानांचे हे असले दीर्घप्रयत्न आम्हांसारख्या सामान्य लोकांच्या आटोक्याबाहेरचे असल्यामुळें ते ऐकून आश्चर्य करीत रहावें इतकेंच आम्हांकडे उरतें. एवढ्या विशालबुद्धीचा मुत्सद्दी नाहींसा झाला त्या अर्थीं याउपर राज्याची धडगत लागणें कठिण आहे. ”

रामचंद्रपंतानीं करवीरच्या राज्यावर स्वारी केली तिचें काम नाना व बाळोबातात्या यांच्या जोरावर हा वेळपर्यंत ठीक चाललें. परंतु नाना वारले व त्यामुळें शिंद्यांच्या दरबारांत बाळोबातात्याचें तेज मावळत चाललें तेव्हां हेही अर्थांतच फिके पडले. त्यानीं आरंभिलेली मसलत एखाद्या नांगर तुटलेल्या व सुकाणू मोडलेल्या गलबताप्रमाणें वाहवटीस लागली. साथीदार निरुत्साह झाले, पलटणें कुचराई करूं लागलीं, आणि नवीन नवीन बखेडे आणि संकटें उत्पन्न होण्याचा प्रारंभ झाला. जें करणें तें स्वतः एकट्यानें धांवाधांव करून करावें असा समय प्राप्त झाला.

सर्जेरावाच्या प्राबल्याला नानांचा दुसरा प्रतिबंधक होता तो नष्ट झाल्यामुळें आतां वाटाघाटीच्या द्वारें आपणास फायदेशीर तह ठरवून घेतां येईल अशी जरी करवीरकरांस आशा उत्पन्न झाली होती व त्यांचे वकील पुण्यास शिंदे व पेशवे यांच्या दरबारांत जरी तहाबद्दल पृथक् पृथक् बोलणें करीत होते, तरी रामचंद्रपंतांशीं बोलतांना करवीरकर मुत्सद्दी बहुत लीनता दाख-

वीत ! "काल पन्हाळ्याहून प्रतिनिधि, भाऊ जोशीराव, बच्याजीपंत, निंबाजी यादव केरल्याच्या बागेंत आले होते. इकडून हरबा आपा व बाबा ( काळे ) फडणीस गेले होते. त्यांचें बोलणें सर्वस्वी आम्हांस रक्षावें, पहिलीं ठाणीं देतों, तह करावा, करवीर घेऊं नये." पण ही सर्व लीनता वरपांगी होती. शत्रूशीं समेटाचा नाद लावून कशी तरी कालवंचना करावी हाच या वाटाघाटींत करवीरकरांचा इरादा होता.

ता० १५ मार्च रोजीं धोंडोपंत गोखले करवीर मुक्कामीं लष्करांत येऊन दाखल झाले. त्यांजवळ चार हजार पायदळ व तितकेच स्वार, शिवाय पेंढार व बाजारबुनगें मिळून एकंदर जमाव दहा पंधरा हजार होता. कुरुंदवाडकरांप्रमाणें धोंडोपंत गोखल्यानींसुद्धां एक पलटण व पांच तोफा असा सरंजाम मुसा वास गो नांवाच्या पोर्च्युगीज माणसाकडून तयार करविला होता व तो या करवीरच्या कामगारीवर बरोबर आणिला होता. रामचंद्रपंतानीं रंकाळ्याच्या बाजूनें मोर्चेबंदी करण्यावर गोखल्यांची योजना केल्यावरून ते तिकडच्या लगत्यास पाण्याच्या सोईकरतां नदीवर मुक्काम करून राहिले. ता० २१ मार्च दिवशीं त्यानीं शहरच्या लोकांस रंकाळ्याचें पाणी बंद केलें आणि तिकडचा मोर्चा बांधून कायम केला. याला उलट जबाब म्हणून शहरवाल्यानींसुद्धां आंतून त्या मोर्च्यावर तोफांची मारगिरी जोराची सतत चालू ठेविली. रंकाळें बंद झालें तरी अजून शहरच्या लोकांना पद्माळ्याचें पाणी मोकळेंच होतें. तेंही बंद करावें म्हणून रामचंद्रपंतानीं त्या कामावर मिरजकर व कुरुंदवाडकर यांचीं पथकें नेमिलीं व त्यांच्या कुमकेस हरीपंतबाबांची फौज दिली. तथापि या पथकवाल्यांचीं मनें तासगांवकरांविषयीं शुद्ध नसल्यामुळें ते मनापासून कामावर झटेनात, व एकट्या हरीपंतबाबांच्या हातून कांहींच होण्याजोगें नव्हतें, त्यामुळें शहरच्या लोकांस पद्माळ्याचा उपयोग पूर्वींप्रमाणें होतच राहिला.

शहर किंवा किल्ला हल्लयानें काबीज करावयाचा, तर त्याला हिय्येबाज व तरबेज पायदळ पाहिजे. तें साधन रामचंद्रपंतांजवळ नसल्यामुळें त्यांनीं शिंद्यांचीं पलटणें कुमकेस आणिलीं होतीं आणि शहर काबीज करण्याचा सर्व भार त्यांवर टाकिला होता हें पूर्वीं दर्शविलेंच आहे. तो त्यांचा भरंवसा अस्थानीं होता असें नाहीं; परंतु पलटणांचा हल्ला मागें फिरल्यावर चवताळलेले इंग्रज अंमलदार रामचंद्रपंतांस म्हणूं लागले कीं, तुम्ही दारूगोळ्याचा तुटवडा पडूं दिल्याकारणानें आमचा खोळंबा व हिरमोड होत आहे. तें सामान

भरपूर मिळवून द्याल तर करवीरची बिशाद काय आहे? तें हंहं म्हणतां काबीज करून दाखवितों! पलटणवाल्यांची ही तकरार खरी होती तरी ती केवळ या मोहिमेलाच लागू होती असें नाहीं तोफा व दारूगोळा हें मराठ्यांच्या युद्धसामग्रीचें प्रधान अंग कधींच नव्हतें. त्यामुळें मोठ्यामोठ्या शहरांना व किल्ल्यांना वेढा बसविण्याच्या भरीस ते पडत तेव्हां दारूगोळ्याची रड नेहमींच उत्पन्न होत असे! हल्लीं सुद्धां तीच स्थिति होती. रघुनाथराव कुरुंदवाडकर हे जुने अनुभवी सरदार. त्यांनीं करवीरच्या लढाईस पन्नास खंडी दारू लागेल असा अजमास केला असल्याकारणानें तेवढीच तरतूद करण्यांत आली होती. परंतु लढाईचें काम रेंगाळणीवर पडलें तेव्हां अर्थात पहिला अजमास निरुपयोगी ठरला. लष्करांत दारुगोळा नसल्यामुळें पलटणें पुढें पाऊल टाकण्याचें नाकारतात आणि वेढ्याचें काम बंद पडतें, असें झाल्यावर रामचंद्रपंतानीं मिरज, कुरुंदवाड, धारवाड, कुसेगल, कऱ्हाड वगैरे ठिकाणांहून दारू व गोळे मिळविण्याचा आटोकाट यत्न केला. अखेरीस तें सामान मिळून सर्व जुळवाजुळव झाली तों एक महिना लोटला. त्या अवधींत राजकारणास निराळा रंग आल्यामुळें पलटणांचा ताव कमी होऊन तीं थंडगार झालीं!

करवीरकरानीं घाटग्याकडे सूत्र राखिलें होतें त्याचा त्यांस केवढा उपयोग होण्याजोगा होता तें मार्च महिन्याच्या अखेरीस प्रत्यक्ष निदर्शनास आलें. सर्जेरावानें पेशवे, शिंदे व खुद्द बाळोबातात्यांनासुद्धां भीड घालून त्या सर्वांकडून रामचंद्रपंतांस पत्रें लिहविलीं कीं, तह ठरविण्याकरितां करवीराहून विश्वासराव घाटगे, रायाजी जाधव, व रामचंद्र जोशीराव पुण्यास येत आहेत. ते येऊन बोलणें ठरेपर्यंत पंधरा दिवस गोळागोळी बंद करावी! हीं अप्रयोजक पत्रें मान्य करावीं तर पलटणांसुद्धां आपल्या व सोबत्यांच्या सर्व फौजांचा खर्च अंगावर सोसावा लागणार व आजपर्यंत केलेले सर्व श्रम व्यर्थ होऊन मसलतीचा नाश होणार, हें पाहून रामचंद्रपंतांनीं तीं पत्रें मान्य करण्याचें नाकारिलें.

वेढा घालणाऱ्या लष्करास करवीरकरांच्या बाजूनें नेहमीं जोराचा प्रतिरोध कसकसा होत होता त्याचें वर्णन या प्रकरणांतल्या पत्रांत जागोजाग आलेंच आहे. बाहेरच्यानीं ब्रह्मपुरी, रंकाळें, पद्माळें, कोठेंही मोर्चा बांधिला अथवा चौक्या बसविल्या, किंवा अन्य प्रकारें पुढें पाऊल टाकण्याचा

उपक्रम केला, तर आंतून तत्काळ तोफा सुरू होत इतकेंच नव्हे, तर शत्रूस हुसकून लावण्याकरितां आंतून निवडक दोन तीनशें पायदळाच्या टोळ्या नेमानें बाहेर पडत व बेलाशक अंगावर चालून येत ! असल्या टोळ्या कितीनदां जरी मारून पिटून माघाऱ्या घालविल्या तरी न डरतां हे लोक प्रत्येक वेळीं उपद्रव द्यायला हजर असायचेच ! लष्करच्या कहीवर खेड्यापाड्यांतले लोक वारंवार छापे घालून माणसें तोडीत व कही पाडून नेत. “ करवीरच्या पश्चिमेस दोन चार गांवांत वस्ती आहे. ते लोक कही पाडून नेतात. एक दोन गांवकरानीं आज नदींतच कही अडविली. तेव्हां आम्हांकडील व कुरुंदवाडकर व गोखलेकडील लोक पाठीवर गेले. तों ( हरिपंत ) बाबासाहेबांस वर्तमान कळतांच फौज व पेंढार चालून गेलें. गांवकर मोडून गांवांत घातले व गांव जाळिला. तो गांव हसूर. बाबासाहेबांकडील ठार व जखमी मिळून २५।३० होतील.” पन्हाळ्याखालीं दोन तीन हजार फौज जमली होती तिच्या टोळ्यानीं छापे घालून पटवर्धन व गोखले यांच्या लष्करचीं उंटें व तट्टें किती लांबविलीं याचा पत्ताच नाहीं ! पन्हाळ्याच्या फौजेंत चतुरसिंग होता तो धाडसी चपळ व शूर असल्यामुळें लष्करच्या सरदारांवर त्याचा वचक असे आणि तो केव्हां संधी साधून काय नुकसान करील याचा नेम नसल्यामुळें त्यांस फार जपावें लागे.

करवीर शहराचें संरक्षण करण्याच्या कामीं महाराजानीं प्रथम राजाज्ञांच्या मदतीला हिंमतबहादर यांस नेमिलें होतें, परंतु आठ पंधरा दिवस होतात तोंच हिंमतबहाद्दर पन्हाळ्यास गेले आणि शहाराचा बचाव करण्याचें जोखीम एकट्या राजाज्ञांच्या शिरावर पडलें. असल्या कामांत केवढी दुर्धर चिंता त्यांस वहावी लागली असेल, त्यांची केवढी निष्ठा, दक्षता, आणि मर्दुमी खर्ची पडली असेल, याची वाचकांनींच कल्पना करावी ! गंगावेशीच्या बाजूस तटबंदीला खिंडार पडलें, आतां हल्ला होणार, असा सुमार दिसूं लागतांच त्यांनीं न डगमगतां आंतून खिंडारासमोर जागोजाग मोर्चे बांधविले होते व पलटणें हल्ला करितील तर त्यांशीं ठासून लढाई देण्याची तयारी रात्रंदिवस राखिली होती. बाहेर ब्रह्मपुरींत रामचंद्रपंत नेहमीं मोर्चांत रहात त्याजप्रमाणें राजाज्ञाही नेहमीं आंतल्या मोर्चांत रहात. त्या दिवसांत ते गंगावेशीनजीक पिशवीकरांच्या वाड्यांत स्नानसंध्या व भोजन उरकीत असत अशी प्रसिद्धि आहे.

ता० २५ मार्च दिवशीं बातमीदारानें करवीरांतली हालहवाल पुढें लिहिल्याप्रमाणें कळविली—

" आंत हत्यारबंद माणूस सात हजारपर्यंत आहे. धान्य वगैरे भरपूर आहे. कमती कशाचीही नाहीं. तोफेचे गोळे भिंतीस लागतात अगर उकाळ जातात. आंतल्या माणसांस इजा नाहीं. वेशी उघडून पाणी नेतात."

पुण्यास पेशव्यांच्या व शिंद्यांच्या दरबारांत नित्य नवीं कारस्थानें घाटत होतीं त्यांत एकाचा दुसऱ्याशीं कांहीं मेळ असेल तर शपथ ! त्या कारस्थानांच्या उलट सुलट बातम्या करवीरच्या लष्करांत लागोपाठ येत होत्या त्या वाचून चमत्कार वाटतो.

( ३० मार्च. ) "अमृतराव यांस दिवाणगिरीचीं वस्त्रें श्रीमंतानीं वर्षप्रतिपदेस दिलीं. 'देवावें' करूं लागले. दरबार त्यांजकडे भरतो. पूर्वीप्रमाणें चक्रदेव त्यांजवळ बसून कारभार करितात."

( २३ मार्च. ) "अमृतराव व चक्रदेव यांस कारभारांतून काढावें अशी श्रीमंतांची मसलत कुंजर, आबा काळे, बळवंतराव नागनाथ, यांशीं चालली आहे. श्रीमंत व शिंदे सर्वथा एकचित्त एक मसलत. खलबतें चाललीं आहेत."

( २८ मार्च. ) " बाळोजी कुंजर व गंगराव नांवाचा नवा माणूस यांची चाल श्रीमंतांजवळ विशेष आहे."

( ३१ मार्च. ) "पुण्यास घाटग्याची प्रबलता विशेष नाहीं. बाळोबाचा नेट चांगला आहे."

( २८ मार्च. ) " पंधरा दिवस लढाई महकूब करावी अशीं येथून करवीरकरांचे वकील पत्रें घेऊन गेले आहेत. हा कारभार घाटग्याच्या भिडेमुळें जाला. केवळ त्याच्याच हातीं कारभार असें नाहीं. उगीच ढवळाढवळ करितो. तात्यानीं समयावर नजर देऊन त्यास नादीं लावून घेतलें आहे."

( २८ मार्च. ) "पुण्यास शिंद्यांचे घरीं घाटग्या व बाणाजी शेट्ये यांची प्रबलता होऊं लागली."

( ३१ मार्च. ) " घाटगे व बाणाजी व गाढवे यांचीं शिंद्यांजवळ खलबतें चाललीं आहेत. पुन्हां सर्ज्याराव शिंद्यांचे दिवाण होणार."

( ३० मार्च. ) " बाळोबातात्यास कुल्ल्यावर करट जालें आहे, पंधरा रोज जाले. हैराण त्याणें फार केलें. ज्वरांशही आहे. बाळोबा कृष्णातीरीं जावयासीं आज्ञा मागत होते, ( शिंदे ) जाऊं देत नाहींत. याउपर तुळा-

पुरास भीमेस जावयास निरोप शिंदे यांजपाशीं मागत आहेत. निरोप जाला नाहीं."

( २८ मार्च. ) "तूर्त गलबलीमुळें तात्यानीं कंपूतले लोक चौकी-पहाऱ्यास आणले आहेत. त्यांचा भरंवसा सतलंजसाहेबावर आहे. बाकी दोन कंपूंचा भरंवसा पुरत नाहीं."

बाळोबातात्यानीं विश्वासूपणाच्या बाबतींत उचले व भामटे यांत काय तारतम्य मानलें देव जाणे ! आम्हांस तर असें दिसतें कीं, सतलंज-साहेब, जानसाहेब, मुकीरसाहेब, सारे एकाच माळेचे मणि होते !

या सर्व बातम्यांचा एकंदर निष्कर्ष काढला असतां पुण्याच्या दरबारांत सत्पक्षाचा अपकर्ष व त्याबरोबरच असत्पक्षाचा उत्कर्ष सपाट्यानें होत चालला होता, आणि बाळोबातात्यांची दिवाणगिरी अगदींच संपुष्टांत आली होती, हें कोणासही दिसून येईल.

मराठे व मोंगल यांचे हितसंबंध परस्परविरुद्ध असल्यामुळें मराठी राज्यांत जों जों अंदाधुंदी माजेल तों तों मोंगलाई राज्यांत शांततेचा प्रभाव अधिकाधिक दिसूं लागणार हें उघडच आहे. आणि हैदराबादेकडून बातमी आली ती अशाच प्रकारची ख्यालीखुशालीची होती--

"मीर अलम ( श्रीरंग ) पट्टणाहून आले ते छ० १२ जमादिलावलीं ( १२ आक्टो. १७९९ ) शहरास दाखल जाले. सामोरे दोन कोसांवर आरस्तुजहांबहादुर व राजेंद्रबहादुर जाऊन समारंभेंकरून घेऊन आले. सांप्रत यांजवर भिस्त बहुत आहे. सालमजकुरीं यांचीच रवानगी मसलतीवर होणार. हजरत बंदेगान अल्ली यांचे पुत्र पोलादजंग यांस आरस्तुजहां यांची कन्या देऊन विवाह छ० १ जिल्कादीं जाला तो छ० २५ जिल्कादीं समाप्त जाला. प्रति दिवशीं लग्नाचा समारंभ होत आहे."

रामचंद्रपंतानीं दारूगोळा मिळविण्याविषयीं यत्न केला होता त्या-प्रमाणें तें सामान एप्रिलच्या पहिल्या आठवड्यांत लष्करांत येऊन दाखल झालें. त्यांत पलटणांकरितां पुण्याहून सतलंजसाहेबानें पांच सहा खंडी दारू व दीडहजार गोळे सवाशें बैलांचें भरताड करून पाठविले. त्याचा हिशोब प्रत्येक बैलावर एक मण दारू व बारा गोळे असा बसतो. पलटणी तोफा लहान असल्यामुळें त्यांचे गोळे दीडपासून अडीच शेरपर्यंत वजनाचे असत. हें सामान इसलामपूर बागणी पर्यंत येतें तों करवीरकर पन्हाळ्याहून फौज पाठवून तें लुटून घेणार अशी लष्करांत बातमी आली. त्यामुळें रातोरात-

हरीपंतबाबांचें पेंढार व शिंद्यांकडील पांचशें स्वार जाऊन दारूगोळा सुरक्षितपणें लष्करांत घेऊन आले. याखेरीज कुरुंदवाड व कऱ्हाड येथूनही थोडी थोडी भरती झाली होती. एकंदर दारू दहा खंडी व गोळे अजमासें चार हजारपर्यंत अशी सामग्री जमली होती. रामचंद्रपंत म्हणतात कीं हें ‘ एका निकडी पुरतें’ म्हणजे एका हल्ल्यापुरतें सामान झालें. ज्याची किंमत दहा पांच हजार रुपयांच्या आंत बाहेर होईल असें हें सामान मिळविण्यास इतका अट्टहास पडावा ही हसूं येण्याजोगी गोष्ट आहे !

दारूगोळ्याची भरती झाल्यावर हल्ल्याची तयारी झाली. “ रणगाडे करावयाचें काम चालीस लागलें. खंदकावर घालण्याकरितां तक्ते तयार केले आहेत. पलटणांस दारूगोळी दिली. काडतुसें तयार करण्याचा हुकूम जाला. तोफेचे थैले करावयास जामदारखान्यांतून खादी देविली. ” इतकें सारें झालें तरी पलटणांकडून हालचालीचें कांहींच नांव निघेना ! पलटणांवरचा मुख्य अंमलदार ब्राऊनसाहेब पूर्वीच्या हल्ल्यांत जखमी झाला होता म्हणून सतलंजसाहेबानें त्यास तब्येत सुधारण्याकरितां पुण्यास बोलावून नेलें होतें, व त्याच्या जागीं डाससाहेब याची करवीरच्या कामगारीवर रवानगी केली होती. या डाससाहेबाच्या लष्करी धोरणास घाटगेशाहीचा रंग पक्का बसला होता. चालू राजकारणाचें चक्र लवकरच उलटणार आहे आणि बाळोबातात्यांची दिवाणगिरी जाऊन त्यांच्या जागीं सर्जेरावाची स्थापना होणार आहे हें त्यास माहीत होतें. तो करवीरावर हल्ला करून घाटग्याची मर्जी कशाकरितां बिघडवील ?

पलटणें टाळाटाळ करतात असें पाहून रामचंद्रपंतानीं केवळ त्यांवरच भार टाकून स्वस्थ न बसतां आपल्या मराठी फौजांच्या हातून जेवढें होण्याजोगें असेल त्याची पराकाष्ठा करून पहावी असा निश्चय केला. गोखल्यानीं आपला मोर्चा पुढें सरकावीत रंकाळ्यापर्यंत आणलाच होता. त्याच्याच शेजारीं त्या तळ्याच्या पाळीवर नवीन मोर्चा बांधावा आणि ब्रह्मपुरींतल्या तोफा तेथें नेऊन रंकाळ वेशीवर मार धरावा अशी रामचंद्रपंतानीं नवीन योजना केली; व त्या कामगारीवर मिरजकर व कुरुंदवाडकर यांचीं पथकें व इस्मितसाहेबाचें पलटण यांची नेमणूक केली. पन्हाळ्याचें पाणी बंद होणें फार अगत्याचें असतां मिरजकर व कुरुंदवाडकर यांच्या हातून तें काम रेटलें नाहीं, सबब वर लिहिल्याप्रमाणें त्यांची रंकाळ्यावर बदली करून त्यांच्या जागीं रामचंद्रपंतानीं आपा देसाई निपाणकर याचें पायदळ कुमकेस देऊन

चिंतामणराव यांस पाठविलें. मग चिंतामणराव व हरीपंत व आपा देसाई यानीं मोठा प्रयत्न करून अखेर शहरच्या लोकांस पद्माळ्याचें पाणी मिळण्याचें बंद केलें.

एवढ्या मोठ्या लढाईत दैवी उपाय, स्वप्नें व दृष्टांत वगैरेंचा उल्लेख न येईल तर आश्चर्यच म्हणावयाचें ! त्यासंबंधानें पुढील उतारे मनोरंजक आहेत. रामचंद्रपंत लिहितातः—

" श्री महालक्ष्मीस एक सहस्र रुपयांचा गांव द्यावा, पूर्वी इनामगांव देवाचे व ब्राह्मणांचे गांव जमिनी आहेत त्या चालवूं, म्हणोन श्रीस प्रार्थना करून ब्राह्मण कांहीं अनुष्ठानास लाविले आहेत."

कोणा एकास देवीचा दृष्टांत झाला तो प्रकार—

"काल दृष्टांत जाला. करवीरची मसलत करितात ही साध्य किंवा कसें ऐशी योजना केली. त्याजवर रात्रौ दृष्टांत जाहला. 'रेडे दोन मारून त्यांचें रक्त अंगास लाविलें. केंस मोकळे सोडिले आहेत. पाठीमागें दोन नागव्या तरवारा घेऊन भाऊसाहेब उभे आहेत. स्त्री मोकळया केंसाची होती.' तिणें उत्तर केलें, 'असें कां करतां ? शहर उजवें घालून रंकाळ्याकडून सन्मुख यावें. तुम्हांस हात देऊन आंत घेतें.' याप्रमाणें आहे. स्त्रीच्या एका हातांत वाटी. त्यांत काय आहे म्हणोन पुसिलें. 'दूध' म्हणोन सांगितलें."

ब्रह्मपुरीकडे इलाज चालेना तेव्हां रामचंद्रपंतानीं रंकाळ्याकडे विशेष जोर करून पहावा, हें ओघानेंच येतें. तथापि त्या हालचालींचा या दृष्टांताशीं अगदींच संबंध नसेल असें म्हणवत नाहीं ! अनुष्ठानास ब्राह्मण लाविले आणि गांव देऊं केले; तथापि देवी स्थानिक स्वराज्याची अभिमानी असल्यामुळें पटवर्धनांस अनुकूळ झाली नाहीं ! पुढचा उतारा मिरजकर मोरेश्वरराव पटवर्धन यांच्या पत्रापैकीं आहे.—

"करवीराहून एक ब्राह्मण पद्माळ्याच्या वेशीकडे विठोबाचें देवालय आहे तेथें आला. करवीरांतून धोत्रें धुवावयास बाहेर आला होता. हेमसिंग याचा चोरपहारा अघाडीस होता त्यानीं धरिला. त्यास आंतील मजकूर विचारिला. त्यानें सांगितलें कीं, 'रत्नाकरपंत गडास गेला नाहीं. करवीरांतच आहे. 'कृष्णमृत्तिके'ची ( दारूची ) वगैरे आबादानी आहे. ढंगानें दररोज नवी तयार होते आहे. मिठाची कमती आहे. लोकांस हगवण लागली आहे. वरकड कमतीचा प्रकार कांहींएक नाहीं. श्रीदेवीचे दृष्टांत ब्राह्मणांस होतात त्यांतील अभिप्राय 'हळदकुंकूं, हरभरेचे भिजाणे, गूळ, ऐसें सवाष्णींस द्यावें.

हळदकुंकूं किल्लेवरून टाकावें. माझे हात गोळे लागून पोळले. गरमी बहुत होते. ’ ऐसे दृष्टांत होतात. देवीचे अंगास हल्ल्याचे दिवशीं घर्म आला होता. याजप्रमाणें आहे. चोळीपातळें सवाष्णींस देतात. येणेंप्रमाणें आहे. ब्राह्मणाचे म्हणण्यांत हल्ल्याचे दिवशीं ‘ देवीचा पाय मागेंपुढें होत होता. मीं पाहिला नाहीं. वरकड गांवांत बोलत होते, ’ असें बोलला. खरें लटकें महालक्ष्मीस ठाऊक ! ”

बाहेरून तोफेचे गोळे येत ते गांवच्या लोकांस लागूं नयेत म्हणून देवी वरचेवर झेलून धरीत असे, त्यामुळें तिचे हात पोळले !

करवीरमुक्कामीं लढाईचा धडाका चालू असतां तिकडे कर्नाटकांत धोंडजी वाघानें केवढा दंगा माजविला होता हेंही वाचकांस कळलें पाहिजे. सबब त्याबद्दल थोडेसें लिहूं. धोंडोपंत गोखले करवीराकडे यावयास निघाले तेव्हां कर्नाटक मोकळें पडलेंसें पाहून धोंडजीनें त्या प्रांतावर स्वारी केली हें पूर्वीं सांगितलेंच आहे. ( भाग अकरावा पृ० ६११८ ) तिकडे गेल्यावर लक्ष्मेश्वरापासून वीस कोसांवर जालीहाळ येथें येऊन त्यानें प्रथम तळ दिला. त्यावेळीं त्याजवळ चार हजार स्वांर, दोनतीन हजार पायदळ व दोन तोफा असें सामान असून तें वाढविण्याचा उद्योग त्यानें सतत सुरू ठेविला होता. धोंडोपंत गोखले व लक्ष्मेश्वरचे मामलेदार बाळकृष्णपंत लागू यांशीं त्याचें हाडवैर पडलें होतें. त्यांत गोखल्यांवर वैर उगविणें तूर्त त्याच्या सामर्थ्याबाहेरचें होतें, पण बाळकृष्णपंताचा नाश करणें सुलभ होतें व त्यासाठीं लक्ष्मेश्वरावर चालून जाण्याचा त्यानें बेत ठरविला. तें वर्तमान ऐकतांच बाळकृष्णपंतांनीं हावनूरच्या मुक्कामाहून वाघाशीं समेटाचें बोलणें लाविलें. त्यावर वाघानें उत्तर दिलें कीं, तुम्हीं लक्ष्मेश्वरच्या मुक्कामीं माझा हत्ती घोडीं उंटें वगैरे अजबाब लुटून घेतला आहे तो भरून द्यावा, आणि तुमच्या ताब्यांत तालुके आहेत त्यांचा ‘घासदाणा’ दहा लक्ष रुपये द्यावा, म्हणजे तुमचा आमचा खटला होणार नाहीं !’ तें उत्तर ऐकतांच बाळकृष्णपंत भयभीत झाले व हावनूर सोडून इंग्रजांच्या लगत्यास राणेबिदनुरास गेले. मग वाघानें लक्ष्मेश्वरचा नाद सोडून गदगावर स्वारी केली व तेथली पेठ लुटून ठाण्यास वेढा घातला. त्या वेढ्याचें काम चालू असतां तो एकदम तीनचार हजार स्वारांनिशीं दौड करून मुधोळावर आला. मुधोळच्या किल्ल्यांत महाराव घोरपडे होते आणि नारायणराव राजे बाहेरून त्यांशीं लढाई करीत होते. महारावांच्या सूत्रानेंच वाघ आला असल्यामुळें त्यानें नारायणराव

राजे यांजवर छापा घालून त्यांच्या फौजेची दाणादाण केली. हा पराक्रम करून वाघ परत गदगास गेला व अजमासें तीन आठवडे लढाई करून त्यानें गदगचा किल्ला घेतला, आणि लगेच डंबळच्या ठाण्यास वेढा घातला. या दंग्यांत त्यास पुष्कळ पैका मिळाला व मुलखांतले पुंड पाळेगार लुटारू बखेडेखोर जेवढे म्हणून लोक होते तेवढे त्याभोंवतीं जमले. त्याच्या फौजेची संख्या पंधरा हजारांवर गेली. स्वतः शूर कर्ता माणूस, जवळ पंधरा हजार फौज आणि पुंड पाळेगार सर्व अनुकूळ, कोणी विचारणार नाहीं, पुसणार नाहीं ! इतकें असल्यावर वाघाचा बडेजाव काय विचारावा ? तिकडचे मामलेदार त्यास चुंबत खंडण्या देऊं लागले, संस्थानिक आर्जवें करूं लागले, आणि त्याचा उपद्रव चुकविण्यासाठीं मोठेमोठे सरदार त्याकडे वकील पाठवूं लागले ! सावनुरापासून पूर्वेस बागलकोटापर्यंत व उत्तरेस शहापुरापर्यंत सारें उत्तरकर्नाटक त्याचें नांव निघतांच चळवळ कांपूं लागलें. त्यानें स्वतःला मुल्केजहांखान नबाबबहादुर असा किताब घेतला होता आणि तो या वेळेपुरता तरी कर्नाटकचा सार्वभौम राजा होऊन बसला होता !

आतां धोंडजी वाघाचें बंड एवढें प्रचंड माजलें कीं, तें मोडण्याकरितां पेशवे अथवा शिंदे यानींच मोठी फौज बरोबर घेऊन स्वतः स्वारीला निघावयास पाहिजे होतें. पण पेशव्यांना रयतेची आस्था तितपतच होती, आणि शिंद्यांनीं जर मोहीम करावयाचीच तर ती त्यानीं कर्नाटकच्या बाजूस न करतां माळवाप्रांतीं केली पाहिजे असा प्रसंग प्राप्त झाला होता. कारण यशवंतराव होळकरानें मोठी फौज गोळा करून शिंद्यांच्या मुलखावर स्वांरी केल्याची बातमी पुण्यास येऊन नुकतीच धडकली होती. गोखले व पटवर्धन यांच्या जहागिरी कर्नाटकांत असल्यामुळें त्यांनीं या कामांत मन घालावयाचें, परंतु ते दोघेही करवीरास गुंतले होते; आणि जरी ते मोकळे असते तरी वाघाचें सामर्थ्य यावेळीं इतकें वाढलें होतें कीं, तो दोघांनाही भारी झाला होता !

मराठी राज्याच्या अधिकाऱ्यांकडून याप्रमाणें वाघाची उपेक्षा होत गेल्याकारणानें तो स्वतःला ज्या वेळीं अगदीं निर्भय मानीत होता त्याच वेळीं दुसऱ्याच एका बाजूनें त्याचा मृत्यु कंबर कसून तयार होत होता ! पलीकडे म्हैसूरच्या राज्यांत इंग्रजांनीं नुकताच अंमल बसविला होता ते निजले नसून वाघाच्या हालचालींकडे त्यांचें पूर्ण लक्ष होतें. त्याचा बंदोबस्त मराठे करीत नाहींत, तर तो आपण केला पाहिजे, न करावा तर तो

पुढेंमागें तुंगभद्रा उतरून म्हैसूरप्रांतीं येईल आणि आपला अंमल उठवील हें त्यांस स्पष्ट दिसत होतें व याकरितां मराठी राज्यांत येऊन वाघावर स्वारी करावी या उद्देशानें त्यांनीं फौजेची तयारी चालविली होती. त्या तयारीच्या बातम्या इकडे येऊं लागल्या तेव्हां पुष्कळांस शंका उत्पन्न झाली कीं, इंग्रजांच्या मनांत मराठ्यांशीं कुरापत काढायची आहे, आणि वाघाच्या बंदोबस्ताचें निमित्त करून स्वांरी करावी व धारवाड घ्यावें असा त्यांचा बेत आहे ! इंग्रजांच्या हालचालींसंबंधानें पुढील उतारे पहा—

" इंग्रजांचा जमाव पट्टण चित्रदुर्ग बिदनूर तीन स्थळीं आहे. इतर स्थळीं कार्याकारण आहे. राजश्री पूर्णय्या कर्णिक चेनापट्टणास जावें म्हणोन कोळीससाहेबसुद्धां कोल्हारपर्यंत गेले होते. त्यास चेनापट्टणाहून पत्रें आलीं जे, " कर्णिक याचे घरीं मुंज आहे. तुम्ही पट्टणास जावें. मागाहून लिहिलें येईल त्याप्रमाणें करावें. " त्यावरून कोळीस इंग्रज व कर्णिक श्रीरंगपट्टणास दाखल जाले. कोल्हापुराकडे सरकारच्या फौजा भारी आल्यामुळें इंग्रज हुशारींत आहेत. धोंडजी वाघ अनेगुंदीप्रांतीं आहेत. त्यांचें नांव करून हल्याळपर्यंत स्वांर येत आहेत. इंग्रजांनीं मुलूख घेऊन पूर्णय्याच्या स्वाधीन केल्यामुळें रयतेस पैसा भारी टिपूचेप्रमाणें लाविला, सबब कित्येक पाटील नाडगीर जमीदारांचीं लक्षें धोंडजीकडे ( असून ते त्याजपाशीं ) जाऊन राहिले आहेत. धोंडजी या ( म्हैसूर ) प्रांतीं आला असतां ठाणीं पडावयास उशीर नाहीं. परंतु इतकें जालें असतां श्रीमंतांच्या राज्याशीं वांकडें इंग्रजांचें आहे. धोंडजी त्यांचे तालुक्यांत आला असतां आधीं धारवाड घ्यावें अशी इंग्रजांची मसलत आहे. "

" चित्रदुर्गास इंग्रज पांच सहा पलटणें आहेत. वाघ तुंगभद्रापार होऊन चित्रदुर्ग हरपनहळ्ळीच्या रोखें गेला असतां तोंडावर पलटणें येणार अशी आवई आहे. पट्टणाहून पलटणें येणार असें वर्तमान आहे. बिदनूर तालुक्यांत सरदेस जागां जागां तरीकिरें व शिकारपूर व धारवाडास समीप सोंदेपैकीं हल्याळ, सांबराणी येथें दोन हजार इंग्रजी जमाव आहे. "

" वासुदेवकाकांच्या पत्रांत बिदनूर, चित्रदुर्ग, पट्टण, तिनी जागीं तयारी होत आहे. धारवाडावर येणार. बिब्याचे पुटाची दारू तयार होत आहे. "

" मासूरचें पत्र आपासाहेबांस आलें त्यांत गोरे तीन हजार व पांच

पलटणें, कानडेप्यादे तीन हजार व पांच हजार स्वार अशी फौज वाघाचे पारिपत्यास रवाना जाली. ”

पुढचें कथासूत्र संभाळण्याकरितां वाघाच्या बंडाविषयीं इतका विस्तार करावा लागला. आतां हा मजकूर इतकाच ठेवून पुन्हां करवीरच्या वेढ्याचा वृत्तांत निवेदन करण्याची सुरुवात करूं.

पैक्याच्या बाजूनें रामचंद्रपंतांची स्थिति फार हलाखीची झाली होती. स्वतःच्या फौजेचा पगार तुंबला आहे तो कोठून द्यावा एवढीच त्यांना फिकीर होती असें नाहीं. पेठे, विंचूरकर, राजेबहादूर वगैरे पुण्याचीं पथकें व पानशे व शिंद्याचें पथक यांचाही खर्च चालविण्याची हमी त्यानींच घेतली असल्यामुळें ते लोक आणि त्यांत विशेषेंकरून शेवटचे दोघे त्यांच्या द्वारीं तगादा बसवून त्यांस फार हैराण करीत. अशा स्थितींत त्यानीं फौजेचा खर्च कमी करण्याकरितां आपले धाकटे बंधु महादेवराव दाजी यांबरोबर कांहीं फौज देऊन त्यांस सामानगडाकडे ‘ पोट भरावयास ’ रवाना केलें. त्याप्रमाणें करवीर सोडून महादेवराव कोगनोळीस जाऊन राहिले. तों त्यांची फौज पगाराची बाकी चुकती केल्याखेरीज पुढें पाऊल टाकूं देईना. सबब त्यांस तेथेंच मुक्काम करून रहावें लागलें.

करवीरकरानीं मुंबईचे इंग्रज व गोव्याचे फिरंगी या दोघांकडेही फौजेची कुमक मागण्यासाठीं वकील पाठविले होते. दोन्ही स्थळांहून त्यांस कुमक मिळाली नाहीं व ती मिळेल अशी मागणाऱ्यांस फारशी आशाही नसावी. शत्रूला बुजागावणें दाखविण्यासाठीं परराज्यांतून कुमक मागण्याचा डाव जुनाच आहे. करवीरास वेढा बसल्यापासून तो उठेपर्यंत तिकडचे मुत्सद्दी पटवर्धनांशीं समेटाचें बोलणें एकसारखें बोलतच होते आणि त्या बोलण्याचा रंग पुण्यांत चाललेल्या राजकारणास अनुसरून वारंवार पालटतच होता ! हल्लीं म्हणजे एप्रिल अखेरीस त्यांच्या बोलण्यांतले मुद्दे असे होते कीं, “दहा लक्ष रुपये देतों. त्याजपैकीं एक लक्ष घराबद्दल देतों, दहा वीस हजार रुपयांचे गांव देतों. अकीवाट, चिकोडी, मनोळी देतों. शिरोळचें ठाणें चांगलें हौसेनें बांधिलें आहे. ( सबब तें देत नाहीं. ) भूधरगड नानांच्या आज्ञेवरून घेतला आहे. ( म्हणून तो परत द्यायलाच नको; ) यावर पटवर्धनाचें म्हणणें पडलें कीं, नाना कारभाराची गादी सोडून महाडास पळून गेले. त्यांनीं भूधरगड आम्हां-

पासून घेण्याविषयीं तुम्हांस सांगितलें असलें तरी तें अधिकारी नानांचें सांगणें नसून अधिकारभ्रष्ट नानांचें सांगणें होय. सबब तें आम्ही मानीत नाहीं. तुम्ही भूधरगड द्यावा आणि शिरोळही द्यावें. बाकीचीं ठाणीं देतच आहां. आम्ही शिंद्याची फौज व पलटणें कुमकेस आणिलीं त्यांचा पैका तुम्ही परभारें शिंद्यांशीं बोलून भागवावा. त्याबद्दल आम्हांस तसदी होऊं नये. पेशवेसरकारची खंडणी तुम्ही द्यावयाची आहे ती मात्र रोख येथें द्यावी. तुम्ही तासगांवचें घर जाळलेंत व भाऊंचा खून केलात याबद्दल तुमची देणगी आम्हांला नको.

या पुस्तकाच्या दहाव्या व अकराव्या भागांत करवीरच्या दरबारीं राहणारा मिरजकरांचा वकील नारो हरि करंदीकर याचीं शेंकडों पत्रें छापिलीं असून त्यांच्या साहाय्यानें आम्हांस करवीर राज्याचा व दक्षिण महाराष्ट्राचा इतिहास विशद करण्याचें काम किती सुलभ झालें हें सांगावयास नकोच. यापुढें या नारोपंताच्या पत्रांचा लाभ या पुस्तकास होणार नाहीं हें वाचकांस खेदानें कळवावें लागत आहे. असें कां म्हणून ते विचारतील तर त्याचें उत्तर असें आहे कीं, करवीरास वेढा बसला तेव्हां नारोपंत शहरांत होता त्यास करवीरकरांनीं कैदेंत ठेविलें. कैदेंत असतांही तो रामचंद्रपंतांस वारंवार सल्लामसलत व आंतली नाजुक बातमी गुप्तपणानें लिहून पाठवीत असे. एकदां कांहीं फितूर करून किल्ल्याच्या मर्मस्थानाला अपाय करण्याचा यत्न करून पहावा असें त्याच्या मनांत आलें; व मी ज्यास जितकें द्रव्य देण्याचा करार करीन तितकें द्रव्य तुम्ही द्यावें, आणि मी मेलों गेलों तर माझ्या बायकापोरांचा संभाळ करावा, या गोष्टी तुम्ही कबूल करीत असल्यास मी खटपट करून पाहतों असें त्यानें रामचंद्रपंतांस कळविलें. त्यानीं त्याचें म्हणणें तत्काळ मान्य केलें. मग नारोपंतानें काय खटपट केली समजत नाहीं, परंतु त्याची ती खटपट उघडकीस येऊन त्यास सामील झालेल्या असामींपैकीं तिघेजण मारले गेले. एक कुणबीण होती तिचा नासिकाच्छेद व जिव्हाच्छेद झाला. खुद्द नारोपंतासमुद्धां फांशी दिल्याची बातमी प्रथम उठली होती, परंतु ती खोटी ठरली. त्यास सडकून मार बसला आणि त्याची कैद अधिक सक्तीची झाली एवढें मात्र खरें. वेढा उठल्यावर नारोपंताची सुटका झाली तेव्हां तो परत मिरजेस आला. परंतु पुन्हां करवीरच्या वकिलीवर त्याची नेमणूक बाळासाहेबांनीं अर्थातच केली नाहीं. पुढें

एकदां राहिमतपुरास कांहीं मुलकी कामावर त्याची योजना झाली होती असें दिसतें. त्यानंतर त्याचें काय झालें तें समजत नाहीं.

शहरावर चढाई करण्याविषयीं रामचंद्रपंत वारंवार डाससाहेब यास सांगत असतांही त्यानें टाळाटाळ करितां करितां अखेरीस सांगितलें कीं, लाख रुपये द्याल तर हल्ला करितों. रामचंद्रपंत बोलले कीं, शहर हस्तगत करून द्या म्हणजे लाख रुपये, निदानीं सव्वा लक्ष रुपयेही देऊं. ऐवजाची हमी पाहिजेतर धोंडोपंत गोखले यांचीच देतों. साहेब म्हणाला कीं, आम्हाला हमी नको. रोख रक्कम आगाऊ पाहिजे. शिवाय शहर घेऊन द्या म्हणतां तर तें आमच्या हातांत काय आहे ? जी खटपट होईल ती करूं ! असल्या बोलण्यांत कांहींच तात्पर्य नसल्यामुळें पलटणें काम करितील ही आशा रामचंद्रपंतानीं सोडिली. तथापि स्वप्रयत्नानें शहर जेरीस आणण्याचा उद्योग त्यांनीं यापूर्वींच आरंभिला होता तो बहुतांशीं सफळ झाला होता हें पुढील उताऱ्यांवरून समजेल. हे उतारे मोरेश्वरराव आबा मिरजकर यांच्या पत्रांतले असून ते लांबलचक आहेत तरीसुद्धां ते येथें देण्याचें कारण असें आहे कीं, एकतर ते लढाईचें चित्र डोळ्यांपुढें हुबेहूब उत्पन्न करणारे आहेत. शिवाय त्यांतलीं बहुतेक स्थळें अद्यापि कोल्हापूरच्या लोकांच्या पहाण्यांतलीं आहेत व जीं सांपडत नाहींत त्यांची माहिती सांगणारे वृद्ध अजून हयात आहेत.

" काल भौमवारीं रात्रौ पहांटेस श्रीकालीचे देवालयाजवळ आंतील लोक मोर्चा बांधून होते त्यांजवर निकड करून उधळून दिले. दोनशें लोक होते. शिद्यांकडील पलटणांच्या तीन चार कुंपण्या व गोखलेकडील लोक व मुसा इस्मित याप्रमाणें लोक जाऊन कालीचे देवालयांत राहिले. ती॥ राजश्री आपासाहेबही ते समयीं तेथें होते. नंतर तेथून वरुणतीर्थानजीक मोर्चा कायम करावयास गोखले यांचे कनिष्ठ पुतणे बापू आरब वगैरे सामान घेऊन गेले. तेथें कस्त चांगलीच करून मोर्चा कायम केला. वरुणतीर्थानजीक जाऊन पोचले. इतःपर त्या पाण्यास होईल तसा उपद्रव करण्याची सोय होत आहे. आंतील लोकांस पाणी तेवढेंच. गोखले यांजकडील पांच असामी ठार व वीस पंचवीस जखमी जाले. जुमा मर्दुमी चांगली आहे. इतक्या कृत्यांत आपासाहेब रंकाळ्यानजीक नदीजवळ होते. कालीचें दर्शन घेऊन नारळ ठेऊन आले. इतकें करून पांच घटका दिवसास माघारे वडील आले. मुसा इस्मित कालीचे जागीं एके तोफेपासीं आहे. आंतील लोक नारळीबागेंत

तुटक येतात. खंदकांतही कांहीं लोक आहेत. मोठाच जागा साधिला. ( वरुण ) तीर्थ फुटलें असतां व पन्नाळें धरिलें असतां आंतील दम कमीच व्हावासा सुमार आहे. लक्ष्मण तोफही नवे जाग्यास न्यावी असें आहे. पहावें. मुसा इस्मित दोन प्रहर रात्रीस येथून गेला तो उत्तरेश्वराजवळच होता. चार घटका रात्रीस प्रारंभ केला. नंतर बुधवारीं प्रातःकाळीं दहा घटका दिवसास गोखले यांचेथें बातमी आली कीं, गडाहून लोक पुढें चालून आले. म्हणोन आपा गोखले फौजसुद्धां गेले. मागाहून उभयतां वडील गेले. आपासाहेबानीं नाना फडणिसांचें पथकही पाठविलें होतें. दोन प्रहर पांच घटका दिवस पावेतों तेथें होते. ”

“ छ० १९ जिल्काद सोमवारीं ( १४ एप्रिल. ) जितीच्या ओढ्याच्या मुक्कामीं कूच करून राजश्री धोंडोपंत गोखले यांचे डावे बाजूस रंकाळेचे उत्तरभागें पंचगंगा उत्तरतीर येथें मुक्काम करून राहिलों. ती॥ राजश्री रामचंद्रपंतआपा याणीं महाकालीच्या देवळांत करवीरकरांची चौकी आहे ती उधळोन मुसा इस्मिताचा मोर्चा कायम करावा म्हणोन आज्ञा केली. त्यावरोन छ० २० जिल्कादीं जागा पाहोन गुरुवारीं रात्रीं मुसा इस्मित तयार होऊन गेला. शिंद्यांकडील एक पलटण व वे॥ राजश्री विष्णु दीक्षित हे तयार होऊन जाऊन देवालयांतील चौकी उठवून मुसा इस्मित याचा मोर्चा कायम जाला. नंतर चार दिवसांनीं शिंद्यांकडील पलटण मोर्चा टाकून गेलें. उपरांतीक वरुणतीर्थाचें पाणी आंत जातें म्हणून तळ्यांतील पाणी बाहीर फोडून द्यावें म्हणोन योजना करून फोडावयास लागले. त्यास आठ दिवस लागलेउपर पाणी बाहीर फोडोन दिलें. महाकालीचे देवळाजवळ लहान तळें होतें त्यांत पाणी येतांच खंदकांत पाणी जाऊं लागलें. तेव्हां वरुणतीर्थाचें पाणी बंद करून तळें फोडून दिलें. तळ्यांतील पाणी निम्मे जाल्यावर वरुणतीर्थाचें बंद केलें होतें तें सोडून दिलें. मुसा इस्मिताचा मोर्चा देवळापुढें कळकीचें बेट आहे तेथें एक आहे. त्यापुढें आणखी एक मोर्चा तयार केला आहे. परंतु आंतील मोर्च्यांवर तितर्फा मार बहुत, याजमुळें माणूस ठरेना. यास्तव वडिलांस विनंती करून लक्ष्मणतोफेची परवानगी घेऊन तोफ आणोन सुरू केली. वरून मारा बहुत होत होता तो बंदीवर पडला. रंकाळेचे दरवाजेपुढें लकडकोट बांधोन चौकी होती. ती चौकी उधळोन द्यावी म्हणोन वडिलांची आज्ञा जाली होती त्याजवरून

मुसा इस्मितास ताकीद केली. मध्यरात्रीचे सुमारें उधळोन द्यावें याप्रमाणें बेत केला असतां वडिलानीं सांगून पाठविलें धोंडोपंतांस चौकी उधळून देणेविशीं. त्यावरोन राजश्रींकडील लोक गेले तेव्हां चौकीचे लोक बेफाम होते. यांनीं जाऊन आग घातली. एक रंजक करतांच ते आंत पळोन गेले. हे माघारे आले. दहापांच माणूस जखमी जालें. दोन घटकांपर्यंत ( आंतून ) गोळ्यांचा वर्षाव एकसारखा होत होता. मागती त्यांनीं येऊन चौकी काइम करून राहिले. उपरांतिक भृगुवारीं आम्ही प्रातःकाळीं भोजनाचा उद्योग उरकोन मोर्चांत गेलों. दोन प्रहरच्या सुमारास एक कुंपणी तयार करोन वरकड लोकांचे मोर्च्यांस सावधगिरी करोन कुंपणी चौकीस लावून देऊन आग घातली. ते लोक आंत पळोन गेलेवर ( पुन्हां आंतले ) दोन अडीचशें इटेकरी पट्टेकरी वगैरे चांगले बाहीर पडले. ते वेळेस दहा बारा जखमी, एक ठार, याप्रमाणें व्यवस्था होऊन ( आमचे लोक ) मोर्चे कायम करून राहिले. मोर्च्यांवर गडबड आंतल्यानीं केली म्हणून वडील त्रिवर्ग व राजश्री गणपतराव पानशे तयार होऊन आले ते लक्ष्मणतोफेजवळ बसले. दोन चार घटकांपर्यंत होते. नंतर गणपतरावजीनीं लक्ष्मण तोफ सुरू करोन भिंताड ( जमिनी ) बरोबर करोन देतों म्हणोन करार केला आहे. तोफ सुरू केली असतां भिंताड बरोबर होईल. हें करावयास कठिण नाहीं. खंदक थोडा आहे. भिंताड समीप मोर्च्यांस शंभर हात आहे. भिंताड पडल्यावर हल्ला करावयास अवघड नाहीं. आंत दारूगोळीचा अभाव आहे. मुख्य मीठ नाहीं. पाणीही अनुष्टुप आहे. माणूस बहुत हगवणीनें मरतें. अवसानाची कमती दिसती. बोलण्याचाही संदर्भ लागला आहे. कोणतें सिद्धीस जातें पहावें. ती॥ राजश्री चिंतामणराव आपा फौजसुद्धां कूच करून ती॥ राजश्री बाबासाहेब यांच्या पलीकडे कात्यायनीच्या अलीकडे मोकाम जाला आहे. बाबासाहेबही तयार जाले होते ते दिवशीं."

"आज मंदवारीं मुसा इस्मित याचे लोकांनीं महाकाळीपुढें नारळीबाग आहे तेथें गेले. तेथें चौकी आहे त्यांची यांची गोळागोळी चांगली जाली. इस्मिनसाहेब याजकडील लोक संभाळून कालीच्या देवालयांत आले."

"किल्ल्यांतून एक माणूस आला त्याचे जबानी आंतील लोकांचें म्हणणें, "आम्ही किती दिवस तवाई सोसावी ? याउपर बाहेर पडोन मोर्चे उधळतों. नाहीं तर त्यांस पालवून शहरांत घेतों." तेव्हां रत्नाकरपंत

याणीं सांगितलें कीं, दम धरणें. चार रोजांत तह होऊन उलगडा पडेल. नाहीं तर तुम्हांस कळेल तैसें करणें."

रंकाळें, पद्माळें व वरुणतीर्थ यांचें पाणी बंद झालें तरी अजून जितीच्या ओढ्याचें पाणी शहरच्या लोकांस मिळत होतें. सबब त्याही बाजूनें दहशत बसवावी म्हणून " गुरुवारीं रात्रीं ( २४ एप्रिल. ) डाससाहेबाकडील पांच कुंपण्या दोन तोफा घेऊन पूर्वेचे अंगें जितीचा ओढा उतरून गेले. तेथें फिरंगाईचें देवालय आहे तें सोडून पुढें गेले. पेठ आहे ती पूर्वींच दग्ध जाली आहे. चावडी मोठी आहे त्यांत कांहीं जमाव होता तो उधळून दिला. दोन प्रहरपावेतों तेथेंच होते. पिछाडीस ती॥ राजश्री बाबासाहेब व चिंतामणराव आपा ऐसे चार पांचशें लोक घेऊन उभे होते. नंतर कुंपण्या माघाऱ्या आल्या. उभयतां गोटास आले."

"कालपासून ( २७ एप्रिल ) चार तोफांची मारागिरी चांगली होत आहे. रंकाळ्याचा दरवाजा धरला आहे. जिभी व दरवाजा शिकस्त होत आला आहे. थोर जरबांमुळें दिवाळतोड होते. शिंदे यांचा मार्ग न पाहतां एक दोन रोजीं हल्लाही करावी हें मानस आहे."

वरील सर्व उताऱ्यांवरून करवीर शहर किती जेरीस आलें होतें हें वाचकांस दिसून येईल. चार दोन दिवसांत शत्रूच्या स्वाधीन झाल्याखेरीज त्याला सुटका नव्हती. तसें झालें असतें तर रामचंद्रपंतांच्या दीर्घप्रयत्नास यश आलें असतें. परंतु तें यश त्यांस न लाभावें अशी त्यांच्या दुर्दैवाची घटना असल्यामुळें त्यांचा मनोरथ सिद्धीस गेला नाहीं इतकेंच नव्हे, तर एकाएकीं वेढा उठवून प्राणरक्षणाकारितां मुलखावर सैरावैरा भटकण्याचा प्रसंग त्यांस प्राप्त झाला ! त्यांवर असें हें संकट ओढवण्याचें कारण पुढील मजकुरावरून समजेल.

शिंद्यांच्या दरबारांत बाळोबातात्यांचा तेजोभंग व घाटग्याची बढती हळू हळू होतां होतां अखेरीस घाटगे व बाणाजी हुजरे व गाढवे व कंपूचे गोरे अंमलदार या सर्वांनीं बाळोबातात्यास कैद करण्याची मसलत ठरवून दौलतराव शिंद्यांकडून तशी परवानगी मिळाविली. तें वर्तमान बाळोबातात्यांस कळतांच त्यानीं ताबडतोब गुप्तपणें रामचंद्रपंतास लिहून पाठविलें कीं, "तुम्हांजवळ पलटणें आहेत तीं सतलंजसाहेबाचीं. त्यांचा विश्वास धरूं नये. दगा करितील. सावध रहा." हीं पत्रें ता. २५ एप्रिल रोजीं सकाळीं रामचंद्रपंतास

पोंचलीं. नंतर लगेच भोजनोत्तर ते आपली फौज तयार करून ब्रम्हपुरींतून सड्या स्वारीनें निघाले ते पन्हाळ्यावर चिंतामणराव व हरिपंतबाबा राहिले होते त्यांजवळ येऊन राहिले. दुसऱ्या दिवशीं त्यानीं आपले डेरे राहुट्या व बाजारबुनगें वगैरे सर्व लटांबर ब्रम्हपुरींतून हालवून पन्हाळ्यावर नेलें. हें स्थलांतर करण्यांत त्यानीं असा बहाणा केला कीं, पन्हाळ्याचें पाणी बंद करण्याच्या कामीं चिंतामणराव व हरिपंत यांस चाकरी फार पडते. सबब त्यांस हातभर लावावा म्हणून आपण इकडे आलों. ब्रम्हपुरींत शिंद्याचीं पलटणें आपणाजवळ आहेत तीं कांहींच उद्योग करीत नाहींत, तर मग तिथेतरी राहून काय करायचें ?

एप्रिलच्या २५ व २६ या तारखा लढाईच्या धुमश्चक्रीच्या होत्या. रंकाळ वेश तोफांच्या भयंकर मारामुळें जमीनदोस्त झाली होती. शहरवा. ल्यांच्या उत्साह अस्तंगत होऊन त्यांचीं मुखें निराशेनें म्लान झालीं होतीं. आतां पलटणांचें सहाय्य घेतल्याखेरीज स्वतःच्याच बळावर आपण करवीर पादाक्रांत करूं असेही उद्गार वेढा घालणाऱ्या सरदारांच्या तोंडून निघूं लागले होते, परंतु दिवा मालवण्यापूर्वीं मोठा होतो त्याप्रमाणें ही युद्धाची उत्कर्षावस्था त्याच्या समाप्तीची सूचक होय, ही गोष्ट रामचंद्रपंताच्या स्थलांतराचें खरें कारण कळल्यावर लोकांच्या लक्षांत येऊं लागली ! पलटणें अंतरावर टाकल्यामुळें दग्याफटक्याचा संभव जरी रामचंद्रपंतानीं टाळिला होता, तथापि पुढें काय होणार ही काळजी उत्पन्न झाल्याकारणानें त्यांचे डोळे पुण्याच्या डाकेकडे लागले होते. ता. २७ एप्रिल रोजीं तात्यांचें दुसरें पत्र आलें. पहिल्या पत्रांत पलटणांचें जें भय गर्भित होतें तें दुसऱ्या पत्रावरून डोळ्यापुढें मूर्तिमंत उभें राहिलें ... या नवीन पत्रांत असा मजकूर होता कीं, घाटग्यानें शिंद्यांकडून दोन लक्ष रुपयांची वरात तुम्हांवर करविली असून ती डाससाहेबाकडे पाठविली आहे. आणि वरातेच्या रकमेबद्दल तगादा बसविण्याच्या निमित्तानें तुम्हांस धरावें असा त्यास हुकूम पाठविला आहे ! हें पत्र वाचतांच रामचंद्रपंतानीं करवीरची मोहीम यशस्वी करण्याच्या मनोरथास तिलांजलि वाहिला ! मनुष्य गांवांत आलेल्या वाघाला तितका भीत नाहीं, पण त्याला घरांत दडून राहिलेल्या सापाला फार भ्यावें लागतें. पलटणवाले मित्र आहेत असें समजून त्यांच्या हिमायतीवर आपण ही मोहीम केली, आणि आतां ते मित्रत्व सोडून प्रच्छन्न शत्रु बनले, हें कळल्यावर रामचंद्रपंतांस चैन कसें पडावें ? उघड वैरी करवीरकर यांचें त्यांस भय नव्हतें. परंतु

प्रच्छन्न वैरी झालेल्या पलटणांचें भय मानणें त्यांस प्राप्त होतें. सरदारांच्या दारीं देणेंदारांकडून धरणें बसणें, तगादा लागणें, सक्तीची जिकीर होणें, या गोष्टी नेहमींच्याच होत्या. तीं संकटें नवीन नसून निवार्य होतीं. पण पलटणांची दगलबाजी हें मात्र अनिवार्य संकट होतें आणि त्याला ग्रामांतराखेरीज उपायच नव्हता !

रामचंद्रपंतानीं पलटणांचें देणें होतें तें खरेंच होतें. दरमहा चार लक्ष रुपये देण्याच्या करारावर हीं पांच पलटणें त्यानीं शिंद्यांकडून मागून आणिलीं होतीं. पाहिल्या महिन्याचा पगार त्यांच्याकरितां बाळोबातात्यानीं स्वतःच चुकविला होता. पुढची दोन अडीच महिन्यांची रक्कम त्यानीं देणें होती ती करवीरकरांकडून खंडणी येईल तींतून द्यावी असा रामचंद्रपंतांचा विचार होता. पण आधीं करवीर स्वाधीन व्हावें तेव्हां पुढें खंडणी वसून होण्याची गोष्ट. त्यासाठींच शहरावर हल्ला करण्याविषयीं ते डाससाहेबास वारंवार तगादा करीत होते. परंतु त्यास घाटग्याची आंतून सूचना असल्यामुळें त्यानें टोलवाटोलवी करून आजपर्यंत दिवस काढले, आणि हा अखेरीस असा धक्का दिला !

तात्पर्य; आरंभिलेल्या मोहिमेची आपल्याच हातानें इतिश्री करून करवीर सोडून जाणें रामचंद्रपंतास नाप्राप्त झालें. मात्र शत्रूचें सान्निध्य असतांही कूच करून जाणें तें निर्भय असावें आणि साजरें दिसावें, एवढाच हेतु सिद्धीस नेण्याचा राहिला. त्यावद्दल धोंडोपंत गोखले वगैरे सरदारांचा सल्ला घेऊन त्यांनीं पुढें कसें करावयाचें तो विचार ठरविला आणि बाळासाहेब मिरजकर यांस पत्र लिहिलें कीं—

"पुण्यांत सर्जेराव व गाढवे यांचें प्राबल्य होऊन आम्हांजवळ पलटणें आहेत त्यांस दोन लक्षांची वरात जाली. राजश्री तात्यांचा इशारा वरातेच्या तगाद्यांत आम्हांस गणपतराव भिकाजीसह कैद करावें असा आला. त्यावरून राजश्री धोंडोपंत गोखले यांचे व सर्वांचे विचारें तोफखान्यासह आम्ही कूच करून कोगनोळीकडे जावें. मागें गोखलेचें पायदळ व ती॥ राजश्री दादांचें पलटण मोर्चेस आहे तसें असावें. पाठीवर गोखले व चि॥ राजश्री बाबा व नारायणराव व त्रिंबकराव आपा व चिंतामणराव आपासह आहेत तसे त्या ठिकाणीं असावें. आंपण कूच करून चालते जालेवर सांगून पाठवावें ( शिंद्याच्या ) पलटणांस व फौजेस ( कीं ) "पैक्याच्या तरतुदेकरितां जातों. ( तुमची ) फौज पायदळ मोर्चास आहे तसें असावें."

याप्रमाणें करून आम्ही चालते जालों. आज रंग मागें कसा तो नजरेस पडेल. पलटणांचे मोर्चे उठले म्हणजे चिरंजीव मंडळी व गोखले कूच करून आम्हांजवळ येतील. एक दिवस दम खावा याअर्थें याजप्रमाणें ठरलें. ईश्वरें हे दिवस दाखविले असतां फिरोन या रंगास गोष्ट आली! सरकारच्या दोन तोफा व लक्षमण तोफ व गरनाळ अशी पलटणें पाठीस लागलीं असतां बरोबर बाळगणें अवघड, याजकारितां मिरजेस पाठवितों. मुलेंमाणसें तासगांवास आहेत तीं तेथेंच असों द्यावीं किंवा कसा विचार करावा तो ल्याहावा. ईश्वराचे चित्तीं असेल तसें घडेल. चिरंजीव मंडळीस टाकून जावें असें नव्हतें, परंतु पैक्याकारितां कलागत करून अप्रतिष्ठा करावी असा ( पलटणवाल्यांचा ) भाव कळलेवरून निकाल काढिला. पुढें जसा डौल दृष्टीस पडेल तसें करीन. भयकृत् भयनाशन ईश्वर आहे. ”

याप्रमाणें पत्र पाठविल्यावर त्यांत लिहिल्याप्रमाणें आपण ऐवज मिळवून आणण्याकरितां जातों, तुम्ही मार्चे आहेत तसेच संभाळून रहावें, असा रामचंद्रपंतांनीं डाससाहेबास निरोप पाठविला. त्यानें तत्काळ उत्तर दिलें कीं, तुम्ही आम्हाला पुण्याहून आणलेंत. मोहीम तुमची. ते तुम्हीच येथून गेल्यावर आम्हाला इथे रहाण्याचें काय कारण! तुम्ही जाग्यावरून हालल्याबरोबर आम्ही मोर्चे उठवून तुमच्या पाठोपाठ येऊं, आणि आमच्या पगाराचा पैका तुम्हापासून घेऊं. डाससाहेबानें हें उत्तर सांगितल्यावर रामचंद्रपंताचा प्रथम एकट्यानें निघण्याचा बेत होता तो फिरला आणि पलटणें काय वाटेल तें करोत, भाऊचंदमंडळी व गोखले पानशे वगैरे सर्व सरदारानीं एकदमच कूच करून जावें अशी मसलत मुकरर झाली. परंतु एवढें मोठें लष्कर तत्काळ जाग्यावरून हालणार कस? निघायच्या तयारीला एक दोन दिवसांचा अवधि लागायचाच. त्याप्रमाणें एप्रिलची ता. २८ व २९ हे दोन दिवस निघण्याच्या तयारीला गेले. एकोणतिसाव्या तारखेस रात्रौ रामचंद्रपंत आपानीं कूच करण्याचा निश्चय ठरवून मिरजकर व कुरुंदवाडकर यांस सांगून पाठविलें कीं, इस्मितसाहेबाचा मोर्चा उठवून तुम्ही गोखल्यांसह ताबडतोब आम्हाकडे निघून यावें. तेव्हां त्या उभयतानीं गोखल्यास मोर्चे उठविण्याविषयीं सूचना केली. त्यावर त्यानीं उत्तर सांगितलें कीं, इतक्यांत मी माझा मोर्चा उठवणार नाहीं आणि तुम्हीही उठवूं नये. रामचंद्रपंतानीं आपला तळ हालवावा, पलटणानीं आपला मोर्चा काढावा,

नंतर आपण मोर्चा उठवूं. आतांच मोर्चे उठवल्यानें सरकारची मसलत नासल्याचें निमित्त व जोखीम आपणावर येणार तें कां घ्यावें ? तुम्ही भिऊं नका. मी व माझे दोघे पुतणे आपा व बापू जिवंत आहों तेथवर तुमच्या लवेसदेखील धक्का लागूं देणार नाहीं. त्यावरून मिरजकर व कुरुंदवाडकर राहिले. अर्थात् रामचंद्रपंतांसही त्या रात्रीं निघण्याचें रहित करावें लागलें.

उजाडल्यावर पुण्याची डांक आली तींत शिंद्यानीं बाळोबातात्यास कैद केलें व सर्जेरावास दिवाणगिरी दिली अशा वर्तमानाचीं पत्रें होतीं.

" राजश्री शिंदे याणीं राजश्री बाळोबातात्या व धोंडीबा व सदोबा-भाऊ यांसी त्रिवर्गास शुक्रवारीं रात्रौ दोन घटका रात्रीस कैद केलें. हल्लीं कारभारी सर्जेराव घाटगे आहेत. "

" मंदवारीं रविवारीं शिंद्यांच्या वाडियांतच होते. इंदुवारीं प्रहर दिवसास सकाळच्या घरीं नेऊन ठेवले. पाहरे आहेत. हिंदुस्थानांतील पत्रें लखबाचीं खुशालीचीं आलीं. व उभयतां टोपीकर बाहेद्वारीस आहेत याज-मुळें ( व ) त्यांचा खंबीर अद्यापवत् आहे म्हणून, ( बाळोबातात्यांस ) दुर्ग दृष्टीस पडला नाहीं. याउपरी काय घडतें पहावें. सैन्याधिपतीसही उभय-तांप्रमाणें करावें असा बेत आहे. ... सारांश शेणवी पटवर्धन यांचें निर्मू-लन व्हावें ही इच्छा चित्तांत वागत आहे. "

या उताऱ्यांत उभयतां टोपीकर बाहेदारीस आहेत असें म्हटलें आहे ते कंपूवाले जानसाहेब व मुकीरसाहेब हे कोणाच्याही बारशाला आणि बाराव्याला जेवायला तयारच ! शिंद्यांच्या कंपूवरच्या या गोऱ्या सरदारानीं नाना फडनवीस यांस विश्वास देऊन त्यांचा घात केला. प्रत्यक्ष आपली धनीन लक्ष्मी-बाई शिंदी हिलाही विश्वास देऊन तिचा घात केला, आणि हल्लीं बाळोबा-तात्यांशीं तसाच विश्वासघात करून त्यांचाही सत्यानास केला ! अखेरीस पुढें इंग्रजांचें युद्ध सुरू झालें तेव्हां आपला अन्नदाता दौलतराव शिंदे याचाही विश्वासघात करण्यास या गोऱ्या सरदारांपैकीं पेरन्, बोर्किन्, डुडेन्स् वगैरेनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं ! इतकें असून या लोकांची इमानीप-णाबद्दल ख्याति होती ती यथार्थ होती असें डफ्साहेब लिहितात हें एक आश्चर्य, आणि आमच्यांपैकीं बुद्धिवान् मुत्सद्दी म्हणविणारे या टोपीवा-ल्यांच्या दगलबाजीला एकामागून एक बळी पडत गेले हें दुसरें आश्चर्य !

वरील उताऱ्यांत सैन्याधिपति म्हणून ज्यांचा उल्लेख आला आहे ते जिऊबादादांचे पुत्र नारायणराव बक्षी होत.

" राजश्री बाळोबातात्या व धोंडीबादादा असे शुक्रवारीं आवशीस चार घटका रात्रीस शिंदे याणीं कैद केले. याउपरी दौलतींत कांहीं बाकी रहात नाहीं. वडिलीं रात्रंदिवस बहुत सावध असावें आणि लष्करांतही सुचवावें. नाहींतर कंपूवाले दगा करावयास चुकणार नाहींत. "

बाळोबातात्या चार आठ दिवसांत कैद व्हावे असा सर्वांचाच अजमास होता तो या पत्रांनीं खरा ठरविला इतकेंच, एरवीं रामचंद्रपंतानीं योजलेल्या तजविजींत या पत्रामुळें थोडाच फेरफार व्हायचा होता! त्यांनी सकाळच्या प्रहर दिवसास बाजारबुणगे पुढें पाठवून दिलें आणि सडी फौज तयार करून पुन्हां मिरजकर व कुरुंदवाडकर व गोखले यांस निघून येण्याविषयीं सांगून पाठविलें. गोखल्यानीं पुन्हां हरकत घेतली कीं, "लष्करची कही दाणावैरण आणण्यासाठीं बाहेर गेली आहे तीं उंटें तट्टें सायंकाळीं परत येतील. तेथपर्यंत निघतां येत नाहीं हें एक. दुसरें असें कीं, आम्ही दिवसास मोर्चांतलें तोफा वगैरे सामान काढून आणूं लागलों तर आंतले लोक येऊन त्यावर गलबल करितील. याकरितां रात्र पडल्याखेरीज येथून हालणें आम्हांस सोईचें नाहीं. तुम्ही पुढें निघून जावें. आम्ही मागून येतों. मागें मिरजकर व कुरुंदवाडकर यांजवर पलटणानीं छापा घातला तर कसें होईल म्हणून तुम्हांस चिंता वाटत असेल तर खात्री असूं द्या कीं, कसाही दुर्धर प्रसंग ओढवो, मी हरप्रयत्न करून त्यांस मिरजेस बाळासाहेबांपर्यंत नेऊन पोचते करीन. " परंतु या चिरंजीव मंडळीस टाकून रामचंद्रपंतांस जाववेना, आणि डेरे राहुट्या वगैरे त्यांचें सामान तर पुढें निघून गेलें; त्यामुळें ते व हरिपंत व चिंतामणराव आपापल्या फौजेनिशीं तसेच सहा प्रहर वाट पहात माळावर हात काढणीनें म्हणजे घोड्यांच्या काढण्या हातांत धरून उभे राहिले! अखेरीस आवशीच्या प्रहर रात्रीस मिरजकर व कुरुंदवाडकर व गोखले यानीं आपलें बाजारबुनगे लादून बंदोबस्तानें पुढें रवाना केले आणि चंद्रास्त झाल्यावर मोर्चे काढून कूच केलें. ते रामचंद्रपंतांच्या फौजेस येऊन मिळाले. नंतर ही सर्व फौज निघाली ती दुसऱ्या दिवशीं सकाळीं कोगनोळीच्या मुक्कामास गेली. गोखल्यांच्या लष्करांत डासासाहेबाचे बातमीदार आदल्या रात्रीपासून मोर्चे केव्हां उठतात ती बातमी काढ-

ण्यासाठीं घिरट्या घालीतच होते. गोखले व पटवर्धन निघून गेल्याचें वर्तमान कळतांच तो इंग्रज अंमलदार पलटणांचा मोर्चा उठवून तोफा वगैरे सर्व सरंजाम बरोबर घेऊन निघाला तो सूर्योदयास रुकडी माणगांवच्या मुक्कामीं गेला.

ता. ३० एप्रिलच्या रात्रीस करवीर शहराच्या बाहेरचा प्रदेश युद्धयमान शत्रूंच्या एक लाख माणसांनीं गजबजलेला होता. आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं पहावें तों तेथें लष्कर नाहीं, लढाई नाहीं, आणि लढाईची वार्ताही नाहीं! जिकडे तिकडे अगदीं सामसूम झालें होतें. कांहीं अकल्पित अतर्क्य असा जादूचा चमत्कार आपोआप घडून यावा तसा हा प्रकार झाला.

थोरले राजाराम महाराजांच्या कारकीर्दींत महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यसंरक्षणाकरितां जें वर्षानुवर्ष मराठ्यांनीं युद्ध केलें त्याचे सर्वश्रेष्ठ प्रवर्तक व प्रेरक रामचंद्रपंत अमात्य यानींच करवीरच्या राज्याची स्थापना केली. त्यानंतर त्या राज्यावर जीं अनेक संकटें आलीं त्यांत एका महाब्राह्मणाचा खून केल्याबद्दल आलेलें हें प्रस्तुतच्या स्वारीचें संकट इतकें भयंकर होतें कीं ज्याच्या योगानें राज्याचा समूळ उच्छेदच व्हावा! तथापि रत्नाकरपंत राजाज्ञा यानीं करवीरची राजधानी दोन महिनेपर्यंत जवामर्दीनें संभाळली म्हणूनच राज्याचा याही संकटांतून बचाव झाला, आणि त्यास कायमपणा आला. करवीरराज्याचे संस्थापक रामचंद्रपंत अमात्य व संरक्षक रत्नाकरपंत राजाज्ञा हे दोघेही ब्राह्मण होते ही गोष्ट स्मरणांत आली म्हणजे मनांत अनेक हर्षविषादात्मक विचार उदय पावतात!!

---

नं. ५३०५

श्रीरंगपट्टणामध्यें पहिले राजे होते त्यासच (इंग्रजानीं) पटीं बसवून त्याचे हाताखालीं राजश्री पूर्णय्या व राजश्री बिष्टापा बदामीकर यास माहितगिरीस ठेऊन आपलेकडील कारकून व हशम त्यांच्या हाताखालीं ठेवून वैत्राट करणेंस लाविले आहेत. बंदींत राहून राज्यकारभार केल्या-

---

१ देवराव देशपांडे यांनीं पत्र बाळासाहेबांस लिहिलें त्याचा हा एवढाच तुकडा मिळाला. हें बहुधा आगस्ट स. १७९९ त लिहिलेलें असून तें योग्य स्थळीं छापावयाचें राहिलें तें येथें छापिलें. या पुढचीं दोन पत्रें अशींच मागें त्या त्या ठिकाणीं छापावयाचीं चुकून राहिलीं तीं येथें छापिलीं आहेत.

प्रमाणें आहे. कोईमतूरकर राजे इत्यादि संस्थानिक जितके इकडे आपआपलीं स्थळें सोडून आले होते त्या सर्वत्रांस बोलाऊं पाठविले आहेत. सोंद्याचे राजे गोव्यास होते तेथून जांबोटीस येऊन हजार दीड हजार लोक सुद्धां सोंद्यास गेले. राजश्री धोंडोपंत गोखले यांस इंग्रजानीं "धोंडजी वाघाचे पुस्तपन्हा केलिया कार्यावर पडणार नाहीं. उगेच असावें अथवा आपण सांगूं तें कार्य करावें. कार्यास पाहिजे तर ऐवज पाठवून देऊं." म्हणोन पत्र पाठविलें होतें. गोखले याणीं "वाघाचा पक्षपात आम्हीं करीत नाहीं. तुम्ही कळेल तसें पारिपत्य करावें;" म्हणोन सांगून पाठविलें म्हणोन वर्तमान आहे. सारांश सरकारची फौज तोंडसी गेल्यास नदीपलीकडे (इंग्रज) राहतील. तें न जालिया दांडगाई करितील ऐसें वर्तमान आहे. आढळलें वर्तमान सेवेसी विनंती लिहिली आहे. साहेबांकडे तिकडील कारकून येत असतील. खरे लटकें सेवेशीं.

नं. ५२०६ श्री. मसुदा.

वडिलांनीं तर स्वामिसेवेवर कस्त करून कैलासवास केला. पुढें करवीरकरांचा सूड घ्यावा हेंच मानस सर्वांचें आहे. चि॥ राजश्री रामचंद्रपंत आपा व बाबा व दाजी यानीं शिपाईगिरीची शर्त लढाईंत केली आहे. सर्वांचा एकदिलच आहे. चाकरीविशीं कोणी कमती करावयाचे नाहींत. मुख्य सरकारांतून व राजश्री नाना यानीं मनावर घेऊन सर्व प्रकारें पैरवी करून सरंजामाचा वगैरे पुरावा पोक्त करावा म्हणजे सरकारकाम होऊन शत्रूवर दाब चढोन नक्ष राहील. महाराज हावभरी होऊन सांप्रत इचलकर्जीनजीक मुक्काम करून आज दोन दिवस तोफांची मारागिरी परस्परें होत आहे. याउप्पर मोर्चे काईम करावे या खटपटींत. राजश्री धोंडोपंत गोखले यांस सरकारांतून पत्रें रवाना जाल्याचा भाव लिहिला तोही कळला. (खासदस्तूर.) वडिलांचा व राजश्री नाना यांचा स्नेह ऋणानुबंध कोणे प्रकारें चालत आला हें सर्वांस ठाऊक आहे. ती॥ भाऊसाहेब स्वर्गीं गेले परंतु राजश्री नाना वडिलांचा हेत करवीरकरांचें पारिपत्य करणेंचा सिद्धीस नेतील. सर्व पटवर्धन मंडळी सेवेस हजर आहेत. सर्व प्रकारें अगत्य धरून करवीरकरांचें पारिपत्य केलेनें महद्यश आणि वडील स्वर्गीं संतोषी होतील.

---

१ अक्टोबर स. १७९९ त लिहिलेला हा मसुदा गंगाधरराव गोविंद यांनीं बाळकृष्णपंत बाळ यांस पाठविलेल्या पत्राचा आहे.

नं. ५३०७ श्री. ( १५ नोव्हेंबर स. १७९९ )

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १२६ सिद्धार्थी नाम संवत्सरे कार्तिक बहुल तृतीया भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति स्वामी याणीं राजमान्य राजश्री गंगाधरराव गोविंद यांसीं आज्ञा केली ऐसीजे, फर[1]द गवई मिरजेंत आहे त्यासीं व कलावंतांचे ताफे चारी येणेंप्रमाणें हुजूर पाठवून देणेंविशीं आज्ञापत्र सादर जाहलें असे. तरी आज्ञेप्रमाणें गवई व कलावंतांचे ताफे हुजूर पाठवून द्यावे. जाणिजे. बहुत काय लिहिणें

मर्यादे
य विरा-
जते

बार. सुरुसूद बार. संमत. सुरु सूद.
बार.

नं. ५३०८ श्री. (फाल्गुन शु. ७–२ मार्च.)

पै छ. १२ सवाल. सन मय्या तैन व अल्लफ.

सेवेसीं बाळकृष्ण लक्ष्मण कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना ता. छ. ५ सवाल-पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तर धोंडजी वाघ जालिहाळनजीक खेड्यावर फौजेसुद्धां आला आहे. बरोबर सरंजाम चार हजार फौज व दोन तीन हजार पायदळ व दोन तोफा आहेत. त्याची आवई दाट आहे जे, "लक्ष्मेश्वरच्या मुकामीं माझा नाश बहुत जाहला आहे, तिकडे जावयाचें," म्हणोन बोलतो असें वर्तमान आहे. याजकरितां इकडे प्रांतातही गडबड आहे. लक्ष्मेश्वरपासून वीस कोसांवर त्याचा मुक्काम आहे. शिबंदी आणखी शें दीडशें ठेऊन लक्ष्मेश्वरचा बंदोबस्त करविला आहे. बातमी वरचेवर लिहून पाठवितों. वरात दहा हजार होनांची जाहली त्यापैकीं आठ दिले. दोन दरबार खर्चापैकीं जमा करितों. सदरहू दहा पावतात, परंतु जमाखर्च याप्रमाणें करावयाची आज्ञा झाली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ लागू. मामलेदार परगणे लक्ष्मेश्वर. पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

नं. ५३०९ श्री. ( फाल्गुन शु० ७–३ मार्च. )

नक्कल.

चि ॥ राजश्री नारायणराव व त्रिंबकराव आपा यांसीं प्रती रामचंद्र परशुराम. आशीर्वाद उपरी. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. तुम्ही उदईक तोफासुद्धां लष्करनजीक येऊन सरकारच्या तोफखान्यासमीप मुक्काम करावा. रवाना छ० ६ सवाल. आवशीच्या सहा घटका रात्र. बहुत काय लिहिणें. प्रातःकाळींच बिनीवाले पाठविले. आम्ही बनपुरीवर आहों. जागा दाखवून देतों. भेटीस यावयाची वेळ जोश्यास पुसोन सांगोन पाठवितों. लोभ करावा हे आशीर्वाद.

ती ॥ राजश्री केसोपंत दादा यांस नमस्कार. चिरंजीव उभयतां घेऊन आलां, अपूर्व जालें ! तोफखाना इंग्रजाजवळ आणवून उतरविला आहे तेथें मुक्काम करवावा. हे विनंती

नं. ५३१० श्रीगणराज. ( फाल्गुन शु० ८–४ मार्च. )

पै ॥ छ० ८ सवाल सन मय्यातैन. फाल्गुन.

अपत्यें आबानें सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० ७ सवालपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. आज दोन प्रहरीं करवीरचे उत्तरेस बावड्यानजीक पंचगंगा उतरोन पन्हाळ्याकडील अंगास मुक्कामास आलों. नंतर सायंकाळच्या तीन चार घटका दिवसास ती॥ राजश्री रामचंद्रपंत आपांकडे ब्रह्मपुरींत श्रीसर्वेश्वराचे देवालयांत भेटीस ती॥ राजश्री नारायणराव काकांचे स्वारीसमागमें गेलों. इकडील सर्वत्रांची भेटी जाली. जावयाचे पूर्वीं ती ॥ राजश्री दाजीचे डेऱ्यास यावयास आले. त्यांची मार्गींच भेट जाली. पानशे यांजकडील मोर्चा एक शिंद्याचे पलटणाचे पूर्वेस व पलटणाकडील मोर्चा एक एकूण दोन मोर्चे आहेत. तीन पलटणचे मोर्च्यांत पलटणें व एक पलटण पानशे यांजकडील मोर्चाचे पूर्वेस व एक पलटण गोटांत, येणेंप्रमाणें वांटणी आहे. मारागिरी आजपावेतों थोर तोफांची होत नव्हती. आज अस्तमानीं थोर तोफा मोर्च्यांत आल्या. लक्ष्मण तोफ व गरनाळ, साऱ्या तोफा आठ दहा मोठ्या एका जागीं मांडावयाची जागा नीट केली आहे. मारगिरी एकदांच करणार. नंतर हल्ला करण्याचा बेत दिसतो. बुरुजावरील मार एक तोफ मोठी होती तिचा

---

१ काळे फडणीस. २ मोरेश्वरराव श्रीपत पटवर्धन. ३ नारायणराव गंगाधर मिरजकर. ४ महादेव परशुराम तासगांवकर. ५ करवीरच्या बुरुजावरून.

बंद आहे. किरकोळ मारागिरी आंतील थोडीच होती. पन्हाळ्यास राजे आहेत. जमाव हजार बाराशेंचा आहे. भारी जमावसुद्धां किल्यांस[1] येऊं नये अशीं बोलणीं किल्लेदारांचीं[2] आहेत असें वर्तमान बाजारी आहे. मोर्चे दोनशें अडीचशें हातांवर खंदकापासोन जवळ गेले. ती ॥ आपासाहेब यांचा मोकाम देवालयाजवळ मोर्च्यांत आहे. चव्हाण शहरांतून निघोन पन्हाळ्यास गेले असेंही बोलतात. उत्तरेकडील व पश्चिमेकडील अंगास कुसवाचें काम मजबूद नाहीं. हलकें आहे. स्वामीचे मठाचा गुंता उरकला! आपासाहेब यांचा हेतु मठ राखण्याचा होता, परंतु बराऊन याणीं सांगितलें कीं, फडशा[3] करणेंविशीं[4] आम्हांस + + + साहेब यांची परवानगी जाली आहे. असे बोलले. वरकड सविस्तर मागाहून विनंती लिहितों. ती ॥ राजश्री चिंतामणराव आपांचे भेटीचा बेत ( रामचंद्रपंत ) आपासाहेबांजवळ ठरोन लागलेच अस्तमानीं भेटीस मंडळी सुद्धां गेलों. भेट जाली. शिलेदार वगैरे लोक आणवून सावधागिरीनें होते. इकडील सावधता साधारणच. प्रयोजनही नाहीं. × × × वडिलांनीं लिहिलें आहे. त्याजवरून श्रुत होईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५३११ श्री. ( फाल्गुन शु० ८—४ मार्च. )

पै॥ छ० ७ सवाल, सन मय्यातैन व अल्लफ. फाल्गुन.

साष्टांग नमस्कार विनंती विशेष "राजश्री ( रामचंद्रपंत ) आपांकडे लष्करांत व येथें किल्ल्याकडे मिळोन पन्नास खंडी दारू पाहिजे. त्यास तूर्त किती मिळेल व दर काय, मासल्यासही किंचित् पाठवावी" म्हणोन लिहून आलें, त्यांस यंदां दंग्यामुळें याच साहित्यानें निभावणी पडली. सरकार जंजिरे याची बेगमी पोक्त. त्यांतील ( सामान ) हुजूरच्या आज्ञेविना व्यवहार करितां अवघड. त्यांत सरसुभ्याची स्वारी येथें आहे. सर्व माहीत राजश्री महादाजीपंत बेडेकर यास आहे. व अलीकडीलही मजकूर त्यांचें पत्रीं लिहिला आहे. श्रवण करितील[6]. आपलें लिहिलें निकडीचें आलें, त्या पक्षीं कच्चे पांच खंडी दारू तयार आहे. पत्राचें उत्तर आपलें येतांच अण-

---

१ करवीरास. २ राजाज्ञाचीं. ३ हिंमतबहादर. ४ काबीज करून लुटण्याचा! ५ नारो गोविंद मामलेदार ता॥ विजयदुर्ग यांचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र. पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची. ६ करवितील.

सकुरा घांटपायथ्यास पोहोंचवून देऊं. दर दरखंडीस एकशें साठ रुपये पडतात. मासल्यास दारू कच्चा शेर पाठविली आहे. अधिक पाहिजे असल्यास बेडेकर यांस सूचना लिहिली आहे त्याप्रमाणें मर्जीस आल्यास उत्तर येईल त्याअन्वयें नूतन तयार करावयाचा उद्योग करून मास पक्षाचे अवकाशें तयार होईल. रोज खंडीभर तयार होईल असा प्रकार आहे. सुराखार असल्यास फार उत्तम पडेल. दारू पांच खंडी लिहिली आहे. त्यास मर्जी असल्यास पाठवीन. परंतु सरकारचें कांहींतरी (लिहिणें) पाहिजे असें मला वाटतें. मग जशी मर्जी असेल तसें करीन. दुसरेकडून आणून देईन असेंही नाहीं. तेथें तरी सरकार आज्ञेखेरीज आणीन तर आणू देत नाहींत यास्तव लिहिलें आहे. येथें सरसुभेदार आहेत हेही अडचण. त्यांचेही कानावर घातलें. त्यानीं तोच जाबसाल केला. परंतु पांच दहा खंडीपर्यंत द्यावी असा प्रकार ठरला आहे. जेथें पोचवावी अशीं पत्रें येतील तेथें पोंचवून देऊं. उत्तर आलें पाहिजे. घरगुती कामास अंतर होणार नाहीं. बहुत काय लिहिणें हे विनंती. सुराखार खेरीज जिन्नस येथें तयार आहेत. खार वीस पंचवीस खंडी येई अशी तरतूद जाहल्यानें सर्व सोई घडतात. कळावें हे विनंती.

न. ५३१२ श्रीगणराज (फाल्गुन शु. ८—४ मार्च.)

पै ॥ छ० ८ सवाल मय्यातैन. फाल्गुन. सौम्यवार.

अपत्यें नारायणानें दोनी कर जोडून सा ॥ नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० ७ सवाल मु॥ लष्कर नजीक करवीर पंचगंगा उत्तरतीर यथास्थित असे. विशेष. छ० ७ मंगळवारीं वडवळ्याहून निघालों तो लष्करास दोन प्रहरा आलों. ती ॥ राजश्री रामचंद्र पंत आपा यांजकडे सांडणीस्वार याजबरोबर पत्र पाठविलें होतें कीं, मिरजेंतून निघोन आलों. आपले भेटीस कधीं यावें ही आज्ञा करावी. त्याजवरून वडिलांची चिठी आली कीं “मृगशीर नक्षत्र दिन शुद्ध चांगली आहे. भेटीस येणें. आपण मोर्च्यांत आहों. मोर्च्या सोडून येतां नये.” ऐशी चिठी आली. त्याजवरून आम्ही मंडळीसुद्धां व चि॥ राजश्री त्रिंबकपंत आपा ऐसे भेटीस गेलों होतों. वडील ब्रह्मपुरीचीं पडकीं भिंताडें आहेत तेथें सर्वेश्वराचें देवालय आहे तेथें असतात.

---

१ सोरमीठ. २ अंजनवेल वगैरे दुसऱ्या किल्ल्यांतून.

पानशे यांचा मोर्च्या श्रीसर्वेश्वराचे देवालयाचे आग्नेयीस आहे तेथे आहेत. बराऊन साहेब याचा मोर्च्या देवालयाचे दक्षणेस आहे. इंग्रजांचे मोर्च्यास व किल्याचे तटास दरम्यान फासला दोन अडीचशें हातांचा आहे. अतःपर पुढें मोर्च्या चालावा इतका अवकाश राहिला नाहीं. सरकारचे कारखान्यांतील थोरल्या तोफांची मारागिरी आज रात्रौ सुरू करून दिवाळ[1] शिकस्त जाल्यावर उपरांतिक हल्ल्याचा बेत ठरेल असें आहे. ती ॥ राजश्री आपासाहेब गोटास भोजनास येत नाहींत. नेहमीं देवालयांत मोर्च्या कायम करून आहेत. चि ॥ राजश्री महादाजीपंत दाजी आमचे गोटास येत होते तों वडिलांकडे जावयास मी निघालों. मार्गीं गांठ पडलीं. तेथें भेट जाली. भेटून चिरंजीव गोटास गेले. कळावें सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३१३ श्री ( फाल्गुन शु. ८–४ मार्च. )

पै ॥ छ. ८ सवाल. मय्यातैन. फाल्गुन.

अपत्यें आपानें सा ॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ. ७ सवाल पावेतों मुक्काम नजीक रुकडी येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. कालमुसा इस्मिथ चिपरी वरच मुक्काम करून राहिला. सरकारची थोरली तोफ आम्हा पासोन कोसावर पुढे अघाडीस मुक्काम जाला. वडिलांस पत्र लष्करांत पाठविलें होतें त्याचें उत्तर आलें जे, कूच करून यावें म्हणोन पत्रीं लिहिलें होतें. त्या अन्वयें तोफखान्यासुद्धां आतांच कूच करून जातों. सदैव पत्रीं सांभाळ करावया आज्ञा जाली पाहिजे. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३१४ श्रीगणराज. ( फाल्गुन शु. ९–५ मार्च )

पै॥ छ. ८ सवाल. मय्यातैन. फाल्गुन

पुरवणी[2]. विज्ञापना ऐसी जे. दुर्बीण मजपाशीं नाहीं. त्यास दुर्बीण पाठवावयास आज्ञा जाली पाहिजे. कारण लागतें यास्तव विनंती लिहिली आहे. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३१५ श्री. ( फाल्गुन शु० ९–५ मार्च )

पै॥ छ० ८ सवाल मय्यातैन.

---

१ भिंताड. २ त्र्यंबकराव रघुनाथ कुरुंदवाडकर. ३ पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची आहे. पत्र नारायणराव गंगाधर यांचें लष्करनजीककरवीर येथून मिरजेस बाळासाहेबांस.

विज्ञापना. दुर्गोजी फराटे व धनाजी फराटे घरास गेले होते त्यांचे रोजमुरे वजा केले आहेत त्याजविशीं स्वामींस विनंती करावी म्हणोन तेथें राहिले आहेत असें ऐकिलें. त्यास तेथें त्याणीं विचारल्यास स्पष्ट "( रोजमुरे ) द्यावयाचे नाहींत. निघोन लष्करास जावें, नाहीं तर घरास जावें" असें सागावें. आणि माहिपतराव व निंबाजी फराटे यांसही लौकर येण्याची आज्ञा व्हावी. गाढवे, फराटे, जिवाजी कोळेकर, शेंडगे, नाईक, इतके तेथेंच आहेत. हे विज्ञापना.

नं. ५३१८ श्रीगणराज. ( फाल्गुन. शु. १०–६ मार्च. )

पै॥ छ० ८ सवाल. मय्यातैन. फाल्गुन.

अपत्यें आपानें सा ॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० ८ सवाल गुरुवारपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. काल रुकडीचे मुक्कामचें पत्र पाठविलें आहे. तेथोन कूच करोन गंगा उत्तरतीर नजीक बावडें येथें मुक्काम जाला. येते वेळेस टेंबलाईचें दर्शन घेऊन आलों. मुक्कामाचा बेत तोफखान्याच्या डाव्या बाजूस करवावा असी ( आज्ञा ) ती ॥ राजश्री रामचंद्रपंत आपा याणीं केली, त्यास वे॥ राजश्री रामचंद्रभट बाबा याणीं आंतील गोळ्याच्या मारागिरींत मुक्काम करावा हें ठीक नाहीं. गंगाउत्तरतीरीं करवावा म्हणून सांगितलें. नंतर येथें मुक्काम करविला. संध्याकाळीं चार घटका दिवसास ती ॥ राजश्री नारायणरावसाहेबसुद्धां वडिलांचे भेटीस गेलों होतों. भेटीचा समारंभ जाला. दोन घटका तेथें बसलों. त्यानीं मोर्चे तपशीलवार सांगितले. जलचराचे मोर्चे दोन अडीचशें हातांवर गेले आहेत. जलचराचे डाव्या बाजूस तोफखान्याचे मोर्चे आहेत. वरचेवर मोर्चे चाललेच आहेत. तेथेंच वडिलांचे निरोप घेऊन आज्ञानुरूप ती॥ राजश्री चिंतामणराव आपांचे भेटीस गेलों. भेट जाली. उद्ईक वर्तमान होईल तें विनंतीपत्रीं लिहितों. सदैव पत्रीं सांभाळ करावयास आज्ञा जाली पाहिजे. वडिलांची स्वारी आज कुरुंद्वाडास गेली याप्रमाणें ऐकलें त्याजवरून विनंती लिहिली. गेलीं असल्यास ल्याहावें. आज्ञा केली पाहिजे. विदित होय हे विज्ञापना.

---

१ पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची आहे. हें पथकाचे अधिकारी आपाजी गोविंद सखदेव यानीं लष्करांतून मिरजेस बाळासाहेबांस लिहिलें. यांत गैरहजर शिलेदारांबद्दल तकरार केली आहे. २ रघुनाथराव कुरुंद्वाडकर यांस त्यांचे पुत्र त्र्यंबकराव आपा यांचें पत्र. ३ वाटवे उपाध्ये. ४ इंग्रज अंमलदार शिंद्यांच्या पलटणांवरचा कर्नल ब्राऊन रिग याचे.

नं. ५३१७ ( ७ मार्च. )

धोंडो बापूजी जोशी यांचें पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र फाल्गुन शु. ११ चें

" श्रीमंत राजश्री चिंतामणराव आपा यांजकडून सरकारांत नित्य पत्रें व कारकून येतात. वडिलांकडील जाबसाल बोलावयास सरकारांत कोणी नाहीं. बाळकृष्णपंत भाऊ बोलले असतां तें नानांकडील. तें ठीक नाहीं. त्यास वडिलांकडील सूत्र सरकारांत असावें. नानांची प्रकृत वृद्धापकाल. त्यांत दुखणें. दिवसेंदिवस वृद्धदशेमुळें ठीक नाहीं. मला सुचलें तें लिहिलें आहे."

नं. ५३१८

छ. मर्जकुरीं वर्तमान तर बराऊनसाहेब याणीं धमधमा रचला आहे तो जागा करवीरचे वायव्येस आहे. आठ तोफा ठेवावयाची जागा केली आहे. त्यास सरकारी कारखान्यांतील तोफा मातबर. त्या इंग्रजांचे हवालीं कराव्या तर पानशे यांचे खातरेस येत नाहीं. निखालस पानशे यांचे हवालीं धमधमा तोफांसुद्धां करावा तर बलकुबल जाली असतां सरकारी लोक तोफेजवळ ठरतील, जागा कायम राखतील, हा भरंवसा नाहीं. लोक गडबडले असतां या लोकांवरच तोफा सुरू करीन ऐसें म्हणणें बराऊनचें पडलें आहे. एकूण जाबसाल ठरावांत आला नाहीं. आज आंतील तोफ बंद आहे. ती॥ राजश्री बाबासाहेब व चि॥ राजश्री दाजी ऐसे डेऱ्यास आले होते. मीही त्यांचे गोटास गेलों होतों. ती॥ राजश्री श्रीपतराव भाऊ मंगळवारीं येथें दाखल जाले. मंगळवारीं ती॥ राजश्री रामचंद्रपंत आपा यांस विनंती राजश्री बळवंतराव लेले याणीं केली कीं, आम्हांबरोबर पलटण व फौज आहे. कारखानेपैकी जरबा[१] देवाव्या. एक अलंग[३] सांगावी. तेव्हां आज्ञा जाली कीं, प्रातःकाळीं विचार करून सांगावयास येईल. नंतर बुधवारीं दोन प्रहरां मुसा इस्मिथ[४] पलटण तोफसुद्धां आला. नंतर बळवंतराव लेले यांस वडिलांकडे विचारावयास पाठविलें. त्यांजवळ वडिलानीं आज्ञा केली कीं, तुम्हाकडील जलैचर आहे तो जमावसुद्धां व करोल[५] ऐसे घेऊन येणें. आम्ही जाऊन मोर्चा सांगतों.

---

१ पत्र नारायणराव गंगाधर यांचें. २ तोफा. ३ एक बाजू संभाळण्यास सोंपवून द्यावी. ४ कुरुंदवाडच्या पलटणाचा इंग्रज सरदार मुसा इस्मित (स्मिथ.) ५ बंदूकस्वार.

नं. ५३१९ (७ मार्च.)

धोंडो बापूजी जोशी यांचें पत्र पुण्याहून मिरजेस फाल्गुन शु० ११ चें—

" राजश्री बाळकृष्णपंत भाऊ बाळ तिकडे येणार होते, परंतु राजश्री नाना फडणीस यांची प्रकृति फार अस्वस्थ आहे, सबब तिकडे येण्यास नानांची आज्ञा त्यांस मिळणार नाहीं. श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब यांचे पत्नीस रजोदर्शन प्राप्त जुन्नरास जालें. ( बाईची ) स्वांरी येथें आली. फाल्गुन शु ॥ ९ बुधवारीं गर्भाधान जालें. सायंकाळीं श्री ॥ राजश्री अमृतराव नानांकडे आमंत्रणास आलें. परंतु शरीरीं सावकाश नाहीं, ( सबब-नाना ) वाड्यांत गेले नाहींत. शिंदे होळकर वगैरे मंडळी झाडून वाड्यांत आले. समारंभ जाला. सायंकाळीं अर्धघटका दिवसास नानांकडे नमस्कारास (बाजीराव) बाबासाहेब आले होते. कालपासून नानांचा ज्वर कांहीं कमी आहे. आज दानें होत आहेत. "

नं. ५३२० श्रीगणराज. ( फाल्गुन शु० १३—९ मार्च. )

अपत्यें आबानें साष्टांग नमस्कार विज्ञापना ता। छ० १२ सवालपावेतों मुक्काम शिंगणापूर करवीरचे पश्चिमेस कोस एक येथें वडिलांचे आशीर्वादें-करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं आशीर्वादपत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. तीर्थस्वरूप राजश्री रामचंद्रपंत आपा याणीं तीर्थस्वरूप राजश्री नारायणराव काका यांस व ती॥ राजश्री त्रिंबकराव आपा यांस शिंगणापुरचे उत्तरेस मुक्काम करवावा म्हणोन सांगितल्यावरून मुक्काम-मजकुरास आज आलों. येथून मोर्चा पाऊण कोस आहे. मोर्चापासून गंगेस उतार मुक्कामाजवळ एक व तेथून दीड कोसावर प्रयागवाडीजवळ उतार एक. करवीराहून आंतील लोक जावयाचा रस्ता आहे म्हणोन येथें मुक्कामास जावें म्हणून सांगितलें आहे. पनाळा येथून तीन कोस आहे. उतारावर चौक्या व छबिना आहे. बातमीविशींही सोय करीत आहेत. उजवे बाजूनें किल्ल्याचे अंगें मुसा इस्मिताचे लोक पलटण सुद्धां उतरले आहेत. डावे बाजूस ती॥ राजश्री त्रिंबकराव आपाचा गोट उजवा घेऊन हेमसिंगाचे लोक उतरले आहेत. करवीरचे अंगें छबिना व पहारे कुरुंदवाडकरांचे आहेत. आमचेपुढें ती॥ राजश्री हरिपंतबाबांचा मुक्काम यावा असाही डौल आहे. बातमी राखून सावधगिरीनें राहिलें पाहिजे. किल्ल्याकडून[1]

[1] पन्हाळ्याकडून.

शेंपन्नास राऊत येऊन कहीवर पाडापाड करितात. जखमीहा कांहीं लोक आज जाहाले. उंटें तट्टें आपासाहेबांकडील पाहून नेलीं. काल रात्रौ शहराचे दिंवाळेचे व मोर्चांचे दरम्यान गवताच्या गंजी दोन होत्या त्यास सोदे यांस बक्षीस देऊन पलटणवाल्यांनीं काल रात्रौ आग देविली. नंतर आंतील मारागिर जाली. इकडून दोन अडीचशें बार जाले. दिवाळतोडी जरबां झाडून लागू आहेत. श्रीइच्छेनें घडेल तें खरें. वरकड वडिलानीं लिहिलेवरून कळेल. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३२१ श्री मार्तंड प्रसन्न. ( फाल्गुन शु० १३–९ मार्च. )

पै॥ छ० १३ सवाल. सन मय्यातैन व अलफ.

राजश्री गंगाधरराव मामा गोसावी यांस.

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित सौभाग्यवती मनकार्णिकाबाई घोरपडे दंडवत विनंती उपरी येथील क्षेम जाणून स्वकीय लेखन केलें पाहिजे. विशेष. पुणेंहून चिरंजीव राजश्री बाळाचे लग्नास येणेंविषयीं लग्नपत्रें आलीं आहेत. आपलेस आलेली पत्रिका राजश्री नारोपंत नानांबरोबर पाठविली आहे. प्रविष्ट होऊन शुभ कार्यास वडिलीं निघावयाचें करावें. अनमान न व्हावा. आम्ही निघावयास पालखी गाडी वगैरे सरंजाम पाहिजे येविषयीं राजश्री नाना विनंती करितील त्याप्रमाणें तरतूद होऊन रवानगी जाहली पाहिजे, येविषयीं वडिलांस विनंती लिहावी असें नाहीं. कार्य घरचें आहे. सूचना विनंती मनन करून सत्वर सरंजामसुद्धां मशारनिल्हेची रवानगी करून दिली पाहिजे. रवाना छ० १२ माहे सवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं. ५३२२ श्रीगणराज. ( फाल्गुन शु० १३–९ मार्च. )

पै॥ छ० १३ सवाल. सन मय्यातैन फाल्गुन मास.

अपत्यें आबानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ० १२ सवालपावेतों वर्तमान यस्थास्थित असे. विशेष. मोर्च्यांतून इकडील बातनीचा जासूद आला त्याचे जबानीचा मजकूर तर दिवाळ पन्नास हात जरबानीं शिकस्त केली. आंतील माणूस झाडून मोर्च्यांतून दिसतें. असा मजकूर आहे. हल्लीं पलटणवाल्यांचा नेट भारी आहे. हाच नेट पल्लयास गेल्यास चांगलाच प्रकार आहे. श्री इच्छा प्रमाण! सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ तटाच्या. २ दिवाळतोडी जरबा=भिंताड पाडणाऱ्या तोफा. ३ देशिंगकर.

नं. ५३२३ श्री. ( फाल्गुन शु० १४—१० मार्च )

पा। छ० १३ सवाल. सन मय्यातैन व अल्लफ.

श्रीमंत राजश्री दादासाहेब साहेबांचे सेवेशीं—

आज्ञाधारक मुसा इस्मिथ फिरंगी सरदार मु॥ कोल्हापूर लष्कर विनंती विज्ञापना. आम्ही आपली आज्ञा घेऊन स्वार जाहलों ते लष्करांत कोल्हापुरास दाखल जाहलों. नंतर श्री॥ राजश्री रामचंद्रपंत आपासाहेब यांची भेट जाहली. आम्ही व राजश्री गणपतरावजी व रावजी असे मिळोन गेलों. भेट घेतली. नंतर आम्ही त्यांस बोलिलों कीं, आम्हांस मोर्चे बसवावयासीं जागा दाखविणें. त्यांनीं उत्तर केलें कीं, मोर्चे यांची जागा आमच्या स्वाधीन नाहीं. ब्राऊनसाहेब फिरंगी सरदार पांच पलटणांचा आहे त्यासीं जागा मागणें. आम्हांकडे नाहीं. असें उत्तर केलें. मग आम्ही मंडळीसुद्धां उठून मुक्कामास आलों. यानंतर श्री॥ राजश्री आपासाहेब व गणपतरावजी व रावजी व आम्ही असे चौघे मिळोन मसलत केली. मग आम्हासीं बोलिले कीं, तुम्ही ब्राऊनसाहेबांकडे जाऊन भेट घेऊन त्यांजला जागा मागणें, म्हणजे काय आहे तें निघोन येईल. काय बोलतील तें ऐकून घ्यावें. शुक्रवारचे रात्री आम्ही जाऊन ब्राऊनसाहेबांची भेट घेतली. त्यांनीं आमचे सामोरे येऊन सन्मान करून घेऊन गेले. उपरांतिक अवघे सरदार मिळोन आमची आदर मुलाखत करून मग आम्हासीं मोर्चे दाखवावयासी घेऊन गेले. आम्हासीं बोलों लागले कीं, तुम्ही अद्याप कां मोर्चे लावले नाहींत ? कां बसलां ? आम्ही उत्तर केलें कीं, तुम्ही सरदार पलटणचे. हुकमाखेरीज कसे मोर्चे बसवावे ? तुम्ही आम्हांस जागा दाखवणें म्हणजे आम्ही मोर्चे बसवूं. असें बोलणें ऐकतांच उगेच बसले. मग बोलों लागले कीं, आमचे मोर्चे कसे बसले आहेत ते पहावयासी चलणें. मग आम्ही ब्राऊनसाहेब व बरोबरचे सरदार असे मिळोन मोर्चेवर गेलों. मग त्यानीं आपला सरंजाम दाखविला व मोर्चे बसलेले दाखविले. मग आम्हांसीं बोलले कीं आमचा सरंजाम कसा आहे ? सरंजाम पाहून आम्ही

---

१ कुरुंदवाडकर. शिंद्यांनीं पलटणें कोल्हापुराकडे पाठवितांना कोल्हापुर घेतल्यावर मिरजेचा किल्ला द्यावा असा पलटणांच्या इंग्रज अंमलदारांस आंतून हुकूम केला होता असें इस्मितच्या लिहिण्यावरून दिसतें. मिरज व कुरुंदवाड येथून गेलेल्या फौजेशीं तासगांवकर व सांगलीकर किती उसनेपणानें वागत होते हेंही या पत्रावरून सूचित होतें.

ब्राऊनसाहेब व सरदार असे ब्राऊनसाहेबांचे राहुटीस आलों. मग ते आम्ही बसलों. मग ब्राऊन आम्हांसीं बोलले कीं, जैसी मेजवानी कोल्हापूरची आली आहे ऐसी मेजवानी मिरजेवर आहे ! मग आम्हांस पुसूं लागले कीं, मिरजेच्या किल्याचा बंदोबस्त कसा आहे ? ××××× कसी आहे ? मग आम्ही बोलिलों कीं कोल्हापूर मिरजेच्या किल्यापुढें पशम ( ? ) आहे. आम्ही मागतीं त्यांसीं बोलिलों कीं, तुम्ही असें कां पुसलें ? हे किल्ले पंतांचे[1] आहेत. मग त्यानीं उत्तर केलें कीं, ' श्रीमंत आम्हापाशीं आहे. धनी बसला आहे.' असें बोलले. मग आम्ही उत्तर केलें कीं तुम्हांपाशीं धनी आहे, परंतु मिरजेचा किल्ला ( हातीं ) येणें बहुत मुष्किल आहे ! मग त्यानीं उत्तर केलें कीं, जातां जातां पेठेस आग लावून देऊं. मग किंल्ल्यास लागूं. असें ऐकून आम्ही उगेच राहिलों. मागती आम्ही त्यांस बोललों कीं आम्हांस चाकरी काय फरमावितां ? मग ते बोलले कीं तुम्हापाशीं जमेत किती आहे ? मग आम्हीं उत्तर केलें कीं बाराशें शिपाई आहेत. शिपाई एक हजार आहे व गोरे काळे ( अंमलदार ) दोनशें आहेत. असे एक पलटणचा सरंजाम आहे. व तोफा दोन आहेत. त्यास आम्हांस मोर्चे यांची जागा दाखविणें. आम्ही तुम्हांस सामील होऊं. असें ऐकून बोलला कीं उद्ईक दोघे सरदार तुम्ही आपले पाठवणें, म्हणजे आम्ही त्यांसीं जागा दाखवूं. तुम्हासीं तीन चार तोफा देऊं. असें ऐकून आम्ही निरोप घेऊन आपले राहुटीस आलों. तेव्हां तीन प्रहर रात्र जाली होती. उदईक आम्ही व श्री॥ आपासाहेब[2] व गणपतराव व रावजी असे मिळून खलबत केलें. मग श्री॥ आपासाहेब पुसों लागले कीं, तुम्हासीं व ब्राऊनसाहेबांशीं काय बोलणें जाहलें तें सांगावें. मग आम्ही सविस्तर निवेदन केलें. आमचे दोघे सरदार त्याणीं बोलाविले आहेत त्यासीं काय आज्ञा ? मग श्री॥ आपासाहेब बोलिले कीं, त्यांसीं जाऊं देणें. जागा पाहून येतील. त्याजवरून आम्ही दोघे सरदार फिरंगी पाठविले. त्याणीं ब्राऊनसाहेबांस आमचा सलाम सांगितला. मग त्यांसीं हे बोलिले कीं, मोर्चेयाची जागा दाखविणें. कैसी जागा आहे ती पाहून मग आम्ही आपले साहेबांस जाऊन सांगतों. मग त्याणीं उत्तर केलें नाहीं. मागती पुसूं लागले कीं, मिरजेचा किल्ला कसा आहे ? जमेत किती आहे व फौज किती आहे ? श्री॥ राजश्री नारायणरावसाहेब

---

१ मिरज वगैरे किल्ले पंतप्रधानांचे आहेत. शत्रूचे नव्हत. २ त्र्यंबकराव आपा.

यांची फौज किती आहे व श्री॥ राजश्री आपासाहेब यांची फौज किती आहे व पलटणची जमेत किती आहे ? असें पुसूं लागले. मग याणीं उत्तर केलें कीं, तुम्ही आम्हांस काय कामास बोलाविलें आणि पुसों काय लागलां ! आम्हांस नोकरी सांगावी. त्याणीं उत्तर केलें कीं, जागा दाखविणेंची आम्हांकडे नाहीं. श्रीमंत आपासाहेब आहेत त्यांजकडे जावें. ते तुम्हांस जागा दाखवतील तेथे मोर्चे बसवावे. असा प्रकार जाहला आहे. एकमेकांस दाखवितात. येथील रीत ठीक नाहीं. अवघा फितूर आहे. त्यास सेवेशीं विनंती लिहिली आहे. तर श्रीमंत बाळासाहेब व श्रीमंत आपण असे उभयतां मसलत करून घरचा बंदोबस्त करणें. येथील मजकूर तरी जें करितात तें लष्करचे धणी करितात. फिरंगी यांजकडे कांहीं नाहीं. आम्हांस सांगितलें आहे कीं, तुम्हीं दोहों कोसांवर मुक्काम करणें. एक नाका बंद करणें. ही कांहीं नोकरी नाहीं. आम्हांस काय ! आपण धनी आहेत. जेथें नोकरी सांगाल तेथें जाऊं. परंतु श्री॥ राजश्री नारायणरावसाहेब व श्री॥ आपासाहेब यांची शरम आम्हांस आहे. आम्ही सेवेसीं पूर्वीं विनंती केली होती कीं आणीक कोणाकडे जावें. त्यांसी आपण इकडे रवाना केलें ! बरें ! असो. येथें कांहीं ठीक नाहीं. हे विज्ञापना.

नं. ५३२४ श्री. ( फाल्गुन शु० १४—१० मार्च. )

पौ॥ छ ० १५ सवाल. सन मय्यातैन व अल्लफ.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं पो॥ गणपतराव[1] विश्वनाथ सा॥ नमस्कार विनंती उपरी येथील कुशल छ० १३ सवाल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असावें. विशेष. आपण पत्र व गुलाबशकरीच्या वड्या सुमार पन्नास पाठविल्या त्या पावल्या. राजश्री त्रिंबकराव[4] आपा व नारायणरावजी व माधवरावजी यांची भेट जाहली. नदीपलीकडे करवीरचे पश्चिमेस पन्हाळ्याचे मार्गावर फौजसुद्धां उतरले आहेत. मी मोर्चांतच आहें. शहरची उत्तरेकडील दिवाळ तोफांचे मारागिरीनें जमीनदोस्त दोनशें हातपावेतों जाहली त्यास आज चार दिवस जाहले. हल्ल्याचा बेत घडेल तो पहावा. हल्ल्याविषयीं आम्हाकडून निकडच आहे. पलटणवाल्यांच्या

---

१ रामचंद्रपंत आपा. २ पानशे तोफखानावाले. ३ गुलाबछकडीच्या. ४ त्र्यंबकराव हा कुरुंदवाडकर रघुनाथराव यांचा व पुढचे दोघे मिरजकर गंगाधरराव बाळासाहेब यांचे पुत्र.

वगैरे सर्वत्रांच्या विचारेंकरून करूं. आज तिसरे प्रहरीं मोर्चांवर गलबल आंतील लोकांनीं बाहीर निघोन केली होती. त्यांस हटवून माघारे घातले. एक पलटणचा कापितान रुमालीसाहेब इंग्रज यास गोळी लागली. (परंतु) वांचला. कळावें. सदोदित पत्रीं संतोषावाप्ति करीत गेलें पाहिजे. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंती.

नं. ५३२५ **श्रीगणराज.** (फाल्गुन व॰ १–१२ मार्च)

विज्ञापना. बलवंतसुत मंगलैग्रामवासी याचे मुखांतरीय[3] वर्तमान कीं पंचमार्य[4] याणीं विदुरचमूंतून कुंपणीद्वय लघु यंत्रिक व बृहद्यंत्रिक एक व अश्वसादी[6] कांहीं मागोन घेऊन रवाना केले.[5] 'कोणीकडे जातात पहावें,' अशी वल्गना (चिंतामणरावानीं) कित्येक प्रकारची केली. त्यास यांचा कारभार केवळ मिथ्या हा सर्वांस संप्रदाय ठाऊक आहे. त्यास सेविशीं येथील श्रेष्ठांचा सलाह येणारच नाहीं. त्यास केवळ बाष्कळ प्रकार. परंतु श्री विष्णुस्मरण दुःस्वप्न पडल्यावर करावें म्हणोन विनंती लिहिली आहे. त्यास ग्रामद्वय आहेत त्यांची सावधता उत्तम प्रकारची असावी यास्तव विनंती लिहिली आहे. बंदोबस्त असावा. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना. सुकृतांकडील कारभार अधिकारी याचा फार अव्यवस्थित आहे सबब त्रिविक्रमार्य[11] व त्रयोदश[12] व वर्तुलायुधोपनामक[13] व हरिसुत[14] बद्वय व नीरातीरस्थ[15] व अस्मन्मध्यस्थ हे सर्व एकरूप जाहले असें वर्तमान आहे, हे विज्ञापना.

नं. ५३२६ **श्रीगणराज.** (फाल्गुन व० १–१२ मार्च.)

पै॥० छ० १५ सवाल. फाल्गुन मास.

अपत्यें आबानें साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १५ सवाल

---

१ पत्र मोरेश्वरराव आबांचें लष्करांतून मिरजेस. २ बळवंतराव मंगळवेढेकर यांच्या मुलाच्या ३ तोंडचें. ४ चिंतामणरावानीं. ५ शिंद्याच्या फौजेंतून पायदळाच्या दोन कंपन्या आणि एक लहान तोफेवरचा व एक मोठ्या तोफेवरचा गोलंदाज–अर्थात् एक लहान व एक मोठी अशा तोफांसह. ६ स्वार. ७ रामचंद्रपंताचा. ८ मिरज व कुरुंदवाड. ९ पुण्याकडील. १० बाजीरावसाहेबांचा. ११ त्रिविक्रमार्य = चिमाजीआपा-कारण प्रथम खालीं, मागून पेशवाईच्यागादीवर, आणि फिरून खालीं, अशीं तीन पावलें त्यानीं टाकिलीं. १२ अमृतराव. कारण अमृत हें तेरावें रत्न. १३ नारोपंत चक्रदेव. १४ ज्याच्या नांवांत दोन बकार आहेत तो हरिपंत फडक्यांचा पुत्र बाबा. १५ बजाबा शिरवळकर. शिरवळ नीरेच्या कांठीं आहे. १६ रास्ते माधवराव.

पावेतों वर्तमान वडिलांचे आशीर्वादेंकरून यथास्थित असे. विशेष. वडिलीं आशीर्वाद पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. इकडील वर्तमान तरी परवां सोमवारीं तिसरे प्रहरीं सहा घटका दिवसास शहरांतून दोहीं अंगानें तीनशेंचा सुमार लोक निघोन मोर्च्यांवर आले. बाण लावून गडबड केली. तोफांजवळ गडबड करावी असा त्यांचा इरादा होता. परंतु पलटणांतील हुशारी होती सबब काट न जाहला. आंतील गडबड होतांच पलटण तयार होऊन सलका मारल्या व जरबांचे वारही जाहले. नंतर लोक माघारे गेले. आंतील लोकांपैकीं जखमी जालेच असतील. बाहेरील मोर्च्यांतील लोक दहा पंधरा जायां व जखमी जाले. येक रोखें मोर्चा होता तेणेंकरून पन्नास हात भिंताड शिकस्त जालें. त्याजागीं मारागिरी राखून दुसरे जागीं मोर्चा तोफा थोर लावावयास तयारी होत आहे. ती जागा पहिल्या मोर्च्यांचे पश्चिमेस दोनतीनशें हातांचे तफावतीनें आहे. लौकरच तयारी होईल. सोमवारीं अलिजाबहाद्दर यांजकडील गणपतराव खर्चीची तनचाई सांगावयास ती॥ राजश्री रामचंद्रपंत आपांकडे आले होते त्याजवरून कांहीं तोडही जाली असें वर्तमान आहे. बराऊन साहेब याचें बोलणें जे, पन्नास सहस्र रुपये चांदवडी बक्षीस द्यावे, म्हणजे तीन रोजांत हल्ला करितों असें आहे. इकडून कमीजास्ती बोलतात. हें वर्तमान बाजारी. भौमवारीं मोर्चांतून ती॥ राजश्री आपासाहेब निघोन तीर्थस्वरूप राजश्री नारायणराव काका यांचे डेऱ्यास आले व त्रिंबकराव आपांचे डेऱ्यास आले. साखरपाणी विडा घेऊन स्वांरी माघारी गेली. करवीरकर राजे गडास आहेत. जमाव हजार दीड हजार फौज आहे असें म्हणतात. कांहीं लोक खालीं उतरोन कोस दोनकोस तलावा व कहीस उपद्रवही करितात. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्रीगणराज. ( फाल्गुन व० १—१२ मार्च. )

नं. ५३२७

पै॥ छ० १५ सवाल. सन मय्यातैन व अल्लफ.

विज्ञापना. पुण्याकडील पत्रांतील अर्थ प्रघटांत येत नाहीं. येथील कामकाजास जलदी होऊन उलगडा करविल्यास चांगलें असें वाटतें. फौजेंतील तनचाई खरीच आहे. सर्व भिस्त मसलतेची पलटणांवर आहे. दुसरा मोर्चा तयार जाहल्यानंतर अजमास समजेल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ चिठी मोरेश्वरराव श्रीपत यांची लष्करनजीक करवीर येथून मिरजेस.

नं. ५३२८ श्री. ( फाल्गुन. व. ३—१३ मार्च. )

विज्ञापना ऐशी जे, श्रीमंत नाना यांचा काळ व॥ ३ गुरुवारीं मध्यरात्रीस झाला. समस्त मुत्सद्दी आले होते. प्राणोत्क्रमणसमयीं श्रीमंत राजश्री ( अमृत ) रावसाहेब हे ही आले, परंतु भाषण नाहीं. तसेच वाड्यांत गेले. शव माज-घरांतून जाळीपुढें आणिलें. गंगेवर न्यावयाची सिद्धता झाली. तों आरबांनीं आपले फडशाकरितां अडथळा घातला. नंतर राजश्री दुलभदास यानीं हवाला घेतला तेव्हां शव बाहेर जाऊं दिलें. या खटपटीस सूर्योदय जाला. नदीवर दहा सहस्र माणूस मिळालें होतें. नानांकरितां शहरांत ते दिवशीं हाहाकार झाला तो काय वर्णावा ! मातोश्री बाया[2] सिद्धटेकास होत्या त्यांस भृगुवारीं प्रहर रात्रीस वर्तमान समजलें. नंतर निघाल्या. रविवारीं प्रातःकाळीं आपल्या वाड्यांत आल्या. सायंकाळचे श्रीमंत राजश्री रावसाहेब, व बाबा फडके, चक्रदेव, वगैरे झाडून समाचारास्तव आले होते. स्वामींस कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५३२९ श्री. ( १३ मार्च. )

पै॥ छ० १७ सवाल. गुरुवार. फाल्गुनमास. सन मय्यातैन.

सेवेशीं महादाजी बल्लाळ बेडेकर कृतानेक सा॥ नमस्कार बिज्ञापना तागायत फाल्गुन वद्य ३ गुरुवारपर्यंत वर्तमान यस्थास्थित असे. विशेष. इकडील करवीरचें वर्तमान वरचेवर आपल्यास कळतच असेल. मोर्चे शहरा-संनिध गेले आहेत. किंचित शिंद्याचा पैका रोजमरे याचा वगैरे बक्षीस द्यावयाचा आहे तो त्यास पावल्याखेरीज हल्ला करीत नाहीं. त्याणीं बाकी नव्वद हजार रुपये काढिले आहेत ते मागतात. येथें पैका आहे नाहीं हें ठाऊकच आहे ! दुसरा मजकूर ( करवीरकरांकडून ) तहाचें बोलणें लागलें आहे. भूधरगड चिकोडी मनोळी शिरोळ घुमट द्यावें, याशिवाय जाजती सामानगड तालुका खुनाचे ऐवजीं द्यावा, याजप्रमाणें सारीं ठाणीं यांचे हवालीं होत तोंपर्यंत करवीर दरम्यान द्यावें. दुसरेयाचे हवालीं करावें अगर यांचेच[3] स्वाधीन करावें. सारीं ठाणीं व महाल स्वाधीन जाल्यावर मग करवीर फिरोन माघारें करवीरकर यांचे हवालीं करावें. याप्रमाणें बोलणें होत आहे.

---

१ धोंडोबापूजी जोशी याचें पत्र पुण्याहून मिरजेस. २ नानांच्या दोघी स्त्रिया. ३ पटवर्धनांच्या.

आणखी पुढें नक्त ऐवज मसलत संबंधी व नागावा जाला आहे त्यापैकीं जो ठरेल त्याचे ऐवजीं वोली द्याव्या, रत्नाकरपंत व चव्हाण स्वाधीन करावे, याचप्रमाणें बोलणें ठरत आहे. अद्याप पुरतें ठरण्यांत व बोलण्यांत आलें नाहीं. आपणास वर्तमान आइकिलें तें कळावें याजकरितां लिहिलें आहे. बाहीर मात्र कोठें बोलों नये. पत्र वाचून विसर्जन करावें. कोठें एक नांव कळों नये. होईल तें मागाहून लेहून पाठवीन. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३३० श्रीगणपति. ( फाल्गुन व० ५–१५ मार्च. )

पै॥ छ० १९ सवाल. सन मय्यातैन. फाल्गुन.

अंपत्यें रामचंद्रानें शिर सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १८ सवालपर्यंत यथास्थित असे. विशेष. वडिलीं श्रीगणपतीकडील पालखीचे व चिरंजीवाकडील पालखीस लागवड लागली आहे त्याचे व कागदगड्डयांचे ऐवजाविशीं लिहिलें, त्यास श्रीकडील पालखीचा ऐवज ती॥ राजश्री केसोपंत काळे यांजकडून वडिलांकडे देविला आहे. पोंहचता होईल. बाकी ऐवज राहिला तोही सोय पाहून देवितों. इकडील मजकूर तरी दिवाळतोंडी तोफा लागू करून भिंताड पाडिलें. चढोन जावयाजोगा रस्ताही एकतोंडी दोन ठिकाणीं जाला शंभर दीडशें हात. त्यास आणखी एक बाजूस तोफा लागू करून वाट करावी, नंतर हल्याचा विचार. एकतोंडीच हल्ला केली असतां आंत माणूस फार आहे, कारेगार होणार नाहीं, असेंही पलटणवाल्यांसी म्हणणें पडलें असतां तें त्यांचे विचारास न येतां काल शुक्रवारीं एक घटका रात्रीस पहांटेस तोफेची मारगिरी एकसारखी करवून प्रातःकाळीं माणसास माणूस दिसेना असे धुराडींत चालोन घेतलें. त्यांत जिकडे भिंताड पडलें तिकडे जावें तें न होतां वाट धुरामुळें चुकोन डावे बाजूस लैंना[2] गेल्या. तेथें वरील मारगिरी होऊन दहा वीस माणूस जायां जखमी होतांच फिरले. रस्ता होता तिकडे चाळीस पन्नास माणूस गेलें होतें तें खंदक पार होऊन वरतें चढलें असतां मागील पुरावा न जाल्यामुळें तेही फिरोन आले. हल्ला कारेगारच व्हावी, परंतु उतावळीमुळें मार्ग चुकले. धुरांत समजलें नाहीं. ईश्वराची इच्छा ! जायां जखमी मिळोन दीडशेंपर्यंत पलटणांतील जाले आहेत त्यांतच खुद्द बराऊन यासही डावे हाताचे खांद्यावर गोळी लागोन गोळी आंतच राहिली आहे. खैर आहे. हें जाल्यावर दोन प्रहरपर्यंत आम्ही तेथें

---

१ पत्र बाळासाहेबांस मिरजेस. २ लाइन्स्-शिपायांच्या रांगा.

राहून मोर्चे फिरोन जाग्याचे जाग्यावर कायम करून आलों. वे॥ विष्णु दीक्षित यांस डावे बाजूस उरावर गोळीचा धक्का लागला. खैर आहेत. सवाई तोफ लौकर आली पाहिजे याकरिता तयारीची जलदी होऊन रस्सेसुद्धां सत्वर रवाना जाली पाहिजे. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३३१ श्रीगणपति. ( फाल्गुन. व. ५-१५ मार्च. )

पै॥ छ. २० सवाल. सन मय्या तैन व अल्लफ. फाल्गुन.

अपत्यें रामचंद्रानें शिर सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ. १८ सवालपर्यंत यथास्थित असे. विशेष. वडीलीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. तोफ सवाईचा तयारीचा कारखाना चालत आहे येविशींचा व पुण्याकडील वर्तमान वाघ सुरापुराकडे गेल्याचें लिहिलें तें कळलें. ऐशीयास काल करवीरास हल्ला केली होती ते कारेगार न जाल्याचें सेवेशीं पत्र पाठविलें आहे. पोहचेल. सवाई तोफ लौकर आली पाहिजे, याकरितां वडिलीं तयारीची जलदी करवून सुती फौजा वगैरे सरंजामसुद्धां तयारी करवून रवानगी व्हावी. पुण्याकडील वर्तमान लिहिण्यांत नाहीं त्यापक्षीं बाजारीच असेल. येथील करण्यास मोठाच हिसका बसला. वडिलांचे आशीर्वादेंकरून सर्वही घडतें, परंतु मुख्य टोपीकरास[1] गोळी लागली याजमुळें लांबणीस पडलें. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३३२ श्रीगणराज. ( फाल्गुन व. ६-१६ मार्च. )

पै॥ छ० २० सवाल सन मय्यातैन. फाल्गुन.

विज्ञापना. राजश्री धोंडोपंत गोखले काल मंदवारीं तिसरे प्रहरीं फौजसुद्धां लष्करांत दाखल जाले. खासा यावयाचेपूर्वी त्यांजकडील जागा विचारावयास व भेटीचा मुहूर्त विचारावयास कारकून ती॥ राजश्री आपासाहेबांकडे आला. त्याजवरून वडिलांनीं ब्रह्मपुरीजवळ नदी उतरोन मुक्काम करावा म्हणोन सांगितलेवरून मशारनिल्हे मुक्कामास येऊन सर्वेच पंचवीस स्वारांनिशीं मोर्च्यांत श्रीसर्वेश्वराचे देवालयांत जाऊन भेट वडिलांची घेतली. गुदस्तांचे इतमामाप्रमाणें झालें नाहीं. कारण शोध करून लिहितों. मशारनिल्हेसमागमें कित्तूरकरानीं मखमली अंबारी दिलेली आहे व रत्नाकरपंताकडील नौबत निशाण आहे. हत्ती चार पांच व फौज दीड हजार स्वारींबरोबर अशा डौलेंकरून जमून गोटास आले.

---

१ शिंद्याच्या पलटणांवरील सरदार ब्राऊन साहेब यास.

मागाहून पांच तोफा व एक पलटण सुसा बासगो यांचें आहे व दोन हजार पायदळ येणेंप्रमाणें जमाव आहे. मशारनिल्हेनीं शिंगणापूरचे मुक्कामीं जाऊन रंकाळेकडून मोर्चा कायम करावा असें ठरावांत आलें आहे. कूच करून जातील. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५३३३ श्री. ( फाल्गुन व० ६—१६ मार्च. )

पुरवणी विज्ञापना. उत्तरतीर येथें येऊन आमच्या डाव्या बाजूस उतरले. बरोबर सहा तोफा चार हजार पायदळ चार हजार फौज व पेंढार बुनगे बाजार मिळोन दहा पंधरा हजार पर्यंत जमात आहे. येते क्षणीं ती॥ राजश्री आपासाहेबाची भेट जाहली. आज कूच करून कालचे रोखें जाणार आज किंवा उद्यीक. आंतील गोळा येऊन त्यांच्या फौजेंत येऊन पडतो. या उपरांतिक येथे ठराव व्हावयाचा दिसत नाहीं. लौकरच कूच होईल. शहरातही दोन तीनशें पावेतों माणूस गोळयानीं मेलें म्हणोन वर्तमान आहे. माचीस दोनतीन हजार फौज जमली म्हणोन लोकवार्ता. सत्य मिथ्या कळत नाहीं. वरकड सविस्तर ती॥ राजश्री नारायणराव यानीं विनंती लिहिली असेल त्याजवरून विदित होईल. सदैव पत्रीं साभाळ करावया आज्ञा जाली पाहिजे विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३३४ श्रीगणराज. ( फाल्गुन व. ७—१७ मार्च. )

पे॥ छ० २० सवाल. सन मय्यातैन. फाल्गुन.

विज्ञापना. येथील बारकाईचें वर्तमान तर पुण्याहून विदुराकडील सेनेंत प्रथमाक्षरी आहे त्यास संकर्षपणाचे लेख आले कीं विदुराची चित्तानुवृत्ति ज्ञातिविषयावर जावी असा भाव दिसतो. त्यास जलदीनें मनोगत उरकोन घ्यावें. पुढें परस्वाधीनतेवर न जाई असें करावें, असें लिहिणें येथील

---

१ मोरेश्वरराव आबानीं बाळासाहेबांस लिहिलेल्या पत्राचा हा एकच बंद मिळाला. २ धोंडोपंत गोखले उतरले. ३ पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची आहे. हें मोरेश्वरराव श्रीपति यांचें पत्र लष्करांतून मिरजेस बाळासाहेबांस. ४ शिंद्याकडील. ५ प्रथमाक्षर ओंकार. तें गणपतीचें स्वरूप, म्हणून प्रथमाक्षरी म्हणजे गणपति अर्थात् गणपतराव भिकाजी. ६ बाळोबातात्याचे. ७ जात्याभिमानामुळें शिंद्याचें मन पटवर्धनांस सोडून कोल्हापुरकरांकडे वळेलसें वाटतें. याकरितां कोल्हापुर लौकर काबीज करा.

हल्याचे पूर्वीं आलें तें पत्र येथें दाखविल्यापासून सर्द जाले. प्रथमाक्षरी यास बहुत प्रकारें समजोन सांगोन तांब्रास कळों दिल्हें नाहीं. नंतर हल्लाही जाली व माघारीही हटली त्यामुळें तांब्र[2]जाति अभिमानास बहुत प्राप्त जाले आहेत. विदुरानीं इतःपर कोणे प्रकारेंही आज्ञापिलें असतां इतःपर कत्तल करणें, दुसरा विचार नाहीं, याप्रमाणं अधिकारी[3] यांसीं बोलतो. कत्तल करणें[4] ते समयीं पशुज्ञाति व मृत्तिका पाषाण मात्र अवधि आहेत अशीं प्रतिज्ञा भाषणें आहेत ! इतःपर कदाचित् विदुराकडून राजकारण आकर्षण जाल्यास उपाय विदुराचाही चालावयाचा नाहीं. सारांश वडील कैलासवासी पुण्यवान्, तेणेंकरून निग्रहास कारण होत गेलें. एरवीं जें विदुरलेखांत येतें तेंच शेवटास जातें. परंतु शर्तीवर गोष्ट आली. ही गोष्ट किमपि वाच्यतेंत न यावी. समजलें वर्तमान सेवेशीं लिहिलें आहे. मला आधार वडिलांचे चरणांचा. त्यावाचून दुसरें पाहणें नाहीं. सांभाळ करणार वडील समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५३३५ श्रीगणराज. ( फाल्गुन व० ८–१८मार्च. )

पै॥ छ० २१ सवाल. सन मय्यातैन व अल्लफ. फाल्गुन.

वि[6]ज्ञापना. राजश्री धोंडो बापूजी यांचें पत्र आलें. त्यास नाना गेले ! होणारास उपाय नाहीं. ( याउपर ) कोणे समयीं काय घडेल (नकळे.) उपाय देखील राहिला नाहीं. श्रीगजाननाचे कृपेकडून काय घडेल ते खरें ! राजश्री मोरोपंतास पत्र येण्याविशीं जावें. राजश्री बाळकृष्णपंत भाऊंसही पत्रें जावीं. नानांचीं कुँटुबें तुळजापूरचे निमित्यें गुंडसुद्धां गेलीं पूर्वींच, असें ऐकतों. कालचे पत्रीं सविस्तर लिहिलें आहे. रवाना छ० २१ सवाल विदित होय हे विज्ञापना.

---

१ रामचंद्रपंत आपास गणपतराव भिकाजीनें तीं चाळोबाचीं पत्रें दाखविल्यावरून ते घाबरले. त्यांनीं गणपतरावास विनवून पत्रांतला मजकूर पलटणांवरच्या इंग्रज अंमलदारांस त्याजकडून कळूं दिला नाहीं. २ सर्व इंग्रज अंमलदार चिडले आहेत. ३ ब्रऊनसाहेब रामचंद्रपंत आपास म्हणतो. ४ कत्तलीच्या सपाट्यांत गुरेंढोरें आणि दगडमाती इतकें मात्र वगळावयाचें ! ५ गेलें असतें. ६ पत्र रघुनाथराव नीळकंठ यांचें कुरुंदवाडाहून मिरजेस बाळासाहेबांस. पत्रावरील मिति व तारीख पैस्तीची आहे. ७ बायका. ८ नागोजी गुंड हा नानांचा अत्यंत विश्वासांतला नोकर.

नं. ५३३६ श्रीगणराज. ( फाल्गुन. व. ९–१९ मार्च. )

पै॥ छ० २२ सवाल. सन मय्यातैन व अलफ. फाल्गुनमास.

[1]विज्ञापना. त्रिधारी निवडुंगाचे क्षीराविशीं आज्ञा, त्यास मी मिरजेंत असतांच आज्ञा जाली होती. त्यास येथें त्रिधारी निवडुंग क्षीर निघावया-जोगा नाहीं. असतें तर पाठविलें असतें. राजश्री गोखले आले. चि॥ राजश्री आपाचीं पत्रें आलीं त्यांतील वर्तमान नाना गेल्यामुळें सैन्यांत हाहाःकार उडाला आहे. त्यास ईश्वरें मोठी गोष्ट अनुचित केली ! बुद्धि चालत नाहीं. मला येण्याविशीं आज्ञा, त्यास शेजारी दोनी ग्रामेस्थ[2] करवीरची हल्ला फिरली त्यामुळें शेर झाले आहेत. दंगा करावयास पाहतात अशी बातमी आली आहे. दक्षिणेस जो गृहस्थ आहे तो बहुत थोर ! पत्रीं लिहितां येत नाहीं. शिबंदी पेचामुळें कांहीं सुचत नाहीं. भैंदरगीकडे जप्तीवाल्यानीं पांच हजार प्यादा ठेवून दंगा आरंभिला आहे. पुण्याकडे तो ऐशी गत जाली; राजश्री मोरोपं-तोंस पत्र पाठवून आणवावें. होळकर हिंदुस्थानांत होते ते फौज घेऊन बऱ्हाणपुरास आले. समागमें पंचवीस हजार फौज आहे, शंभर तोफा, असें लिहिलें राजश्री बाळाजी विष्णूचें करवीरास आलें. तेव्हां हीं पलटणें येथें या देशीं राहातात कीं नाहीं ? पलटणें गेलीं म्हणजे फिरोन तीच गत असे भाव दिसतात. येथें तो ती वार्ताही नाहीं. रवाना छ० २२ सवाल विदित होय. राजश्री काकांची प्रकृत्त आहे तशीच आहे. हे विज्ञापना. दोन तीन उद्यानें शाहाजीस दाखविलीं परंतु क्षीर आज्ञेप्रमाणें निघावयाचा निवडुंग नाहीं. हे विज्ञापना.

नं. ५३३६.अ ( फाल्गुन व०–१९ मार्च. )

नारो विनायक यांचे अथणीहून मिरजेस बाळासाहेब यांस पत्र. छ.२२ सवालचें—

" नाना फडणवीस यांचा काल वद्य तृतीया गुरुवारीं अडीच प्रहर रात्रीस जाहला, दहन दुसरे दिवशीं जाहलें, म्हणोन पुण्याहून आजच पत्रें आलीं. मोठीच वाईट गोष्ट जाहली. "

---

१ रघुनाथराव कुरुंदवाडकर याचें पत्र मिरजेस बाळासाहेबांस. पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची आहे. २ अकीवाट व शिरोळ या ठाण्यांतले शत्रूचे लोक.

नं. ५३३७ **श्रीगणराज.** ( फाल्गुन व. १०—२० मार्च )

विज्ञापना. विदुरशिबिरस्थ सुकृतीय वर्तमान जे, दाक्षिणस्थाचा नाश गुदस्तां हूणानीं केला त्या संधींत पद्मातीय वगैरे समुदाय पलायित जाहला. त्यासमागमें मुख्याचा पुत्र निघाला तो श्रेष्ठ नद्वय पूर्वस्थलास आल्यानंतर त्या संनिध प्रविष्ट जाहला. तेव्हां गुप्तवेशें यवनसमुदायीं नद्वयानीं संग्रहीं ठेविला आणि (स्व) राज्य रक्षणार्थ व तें राज्य-ग्रहणार्थ प्रयत्न ही आरंभिला. श्रीरंगनगरस्थ हूणसमुदाय होता त्यांतील दोन सहस्र यांत्रिकभेद केला व स्थळोस्थलीं गुप्त संधान राखिलें. निमित्यार्थ दुर्गादि स्थलीं हूणाचे ध्वजाग्रहण करून या संधानीं असावें असें केलें होतें व प्राचीन वर्णाश्रय विद्यमानीं कारभारी होता तेथेंहीं लक्ष ठेविलें होतें. श्रीइच्छेनें दोन संवत्सर आयुर्मर्यादा नद्वयाची स्थिर असती म्हणजे हूणनाशच जाहला असता. हें वर्तमान सर्वांस अश्रुत. नद्वय कैलासवासी जाल्यानंतर संगमस्थ हूणानीं यवनपुत्राचा शोध लावून श्रीमान् यांस विचारिलें. तेव्हां त्यांनीं एकंदर नीट न सांगितलें. तेव्हां क्रुद्ध जाहले. नंतर यवनपुत्रास अधि-कारी याणी हूणहस्तीं दिला. हें वर्तमान संकर्षणास कळल्यानंतर त्याणीं पामरनामक हूणाजवळून आणून आपल्याजवळ स्थापन केलें आहे. पुढें श्रीइच्छा ! परंतु असे दीर्घ प्रयत्न श्रवणच करावयाचे ! अशांचा नाश, तेव्हां राज्याची स्थिति कठिनतर दिसते. सूचनार्थ विनंती लिहिली आहे. हे विज्ञापना.

---

१ पत्र मोरेश्वरराव आबाचें बाळासाहेबास लष्करांतून. "शिंद्याच्यालष्करांतून.पुण्याहून बातमी आली आहे कीं गुदस्तां इंग्रजानीं टिपूस मारून श्रीरंगपट्टण घेतल्यावर टिपूची पायदळ वगैरे फौज पळाली तिजबरोबर टिपूचा एक पुत्र पट्टणांतून निघून पुण्यास आला व गुप्त वेषानें दिवस कंठीत राहिला. पुढें नानाफडणविसांच्या हातांत पुन्हां पूर्वी प्रमाणें राज्यकारभार आलासें पाहून तो टिपूचा पुत्र गुप्तपणें त्यांस भेटला. त्यानीं त्यास आश्रय देऊन पदरच्या आरबांत असामी देऊन ठेविलें व म्हैसूरचें राज्य इंग्रजांच्या हातून घेण्याच्या उपक्रमास प्रारंभ केला. श्रीरंगपट्टणांतलें दोन हजार कवाइती पायदळ त्यांनीं फितविलें व कारभारी पूर्णय्या कार्णिक यासही अनुकूल करून घेतलें. राज्यांतलीं चित्रदुर्ग वगैरे मजबूत स्थळें आहेत तेथल्या लोकानीं आपल्या लक्ष्यानें चालावें, केवळ निमित्तापुरतें इंग्रजाचें निशाण किल्यावर कायम ठेऊन दिवस काढावे, असेंही ह्यानीं संधान केलें होतें. आणखी दोन वर्षें नाना जगते तर इंग्रज नाशच पावावे असें होतें, परंतु ईश्वरी इच्छेनें त्यांची आयुर्मर्यादा संपली ! नाना वारल्यानंतर संग-

( पुढील पान पहा. )

नं. ५३३८ **श्रीगणराज.** (फाल्गुन व० १०–२० मार्च.)

पै॥ छ० २३ सवाल. सन मय्यातैन. फाल्गुन.

विज्ञापना. मोर्चे दिल्हे आहेत व आणखी नवीन तजवीजही होत आहे. परंतु तह करावयाची तजवीजही बोलत[1] आहेत. कारण एक मोठी गोष्टी कमी पुण्यांकडील[3], व भ्रम मराठी दौलतीचा घालवूं नये, असा अंदेशा पाहून समेट करावा असें आहे म्हणोन बाजारी वर्तमान आहे. मागाहून सविस्तर शोध आंतील बाहेरील बोलण्याचा लावून कळेल तें लिहितों. मोरेंवेकरास पाठवावें असें गडोंवरील सूत्र आहे. सविस्तर मागाहून विनंती लिहितों हे विज्ञापना.

नं. ५३३९ **श्रीगणराज.** ( फाल्गुन व. १०–२० मार्च. )

पै॥ छ० २३ सवाल. सन मय्यातैन अल्लफ. फाल्गुन.

[6]विज्ञापना. चि॥ राजश्री रामचंद्रपंत आपांचें पत्र मला आलेलें पाठविलें तें पावलें. उत्तर पाठविलें आहे. रवाना करावया आज्ञा जाली पाहिजे. राजश्री गणपतराव यास लष्करांतून येण्याविशीं लिहिलें आहे. आल्याउप्परी सत्वरच येतों. राजश्री बाळकृष्णपंत यास पत्र काय ल्याहावें म्हणोन आज्ञा,

---

( मागील पानावरून )

मावर इंग्रज वकील कर्नल पामर रहातो त्यानें टिपूच्या या मुलाचा पत्ता पाडून श्रीमंत बाजीरावसाहेबांस विचारपूस केली. ते यथास्थित उत्तर देतना, त्यामुळें इंग्रज क्रुद्ध झाले. नंतर श्रीमंतानीं भयभीत होऊन टिपूच्या मुलास इंग्रजाच्या हवालीं केलें. हें लांछनाचें कृत्य बाळोबा तात्यांच्या कानीं जातांच त्यांस वैषम्य वाटलें व त्यांनीं कर्नलपामर याच्या ताब्यांतून ह्या मुलास युक्तीनें काढवून आपल्याजवळ आणून ठेविलें आहे. नानांचे हे असले दीर्घ प्रयत्न आम्हासारख्या सामान्य लोकांच्या आटोक्याबाहेरचे असल्यामुळें ते ऐकून आश्चर्य करीत रहावें इतकेंच आम्हांकडे उरतें. एवढ्या विशाल बुद्धीचा मुत्सद्दी नाहींसा झाला त्या अर्थी याउपर राज्याची धडगत लागणें कठिण आहे." असा या पत्रांतला एकंदर अभिप्राय आहे. यांतल्या दुर्बोध शब्दांच्या अर्थांची फोड अन्यत्र जागोजाग केली असल्यामुळें त्यांवर निराळ्या टिपा येथें दिल्या नाहींत.

१ पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची आहे. पत्र मोरेश्वरराव आबाचें बाळासाहेबांस. २ रामचंद्रपंत बोलूं लागले आहेत. ३ नानांच्या मरणामुळें. ४ हरबाजीराव धायगुडे. यांस ५ पन्हाळ्याहून महाराजांचे. ६ पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची आहे. हें रघुनाथराव यांचें कुरुंदवाडाहून बाळासाहेबांस मिरजेस पत्र.

त्यास अद्याप कांहीं मनसबा ल्याहावयाचा नाहीं. समाधानार्थ पत्र जावें. उत्तर कार्य नानांचे कोण करितो हेंही वर्तमान आलें पाहिजे. रवाना छ० २३ सवाल विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३४० **श्रीगणराज.** ( फाल्गुन व० १०—२० मार्च )

पै॥ छ० २३ सवाल. सन मय्यातैन. फाल्गुन.

[1]विज्ञापना. पुण्याकडील नाना कैलासवासी जाल्याचें वर्तमान आलें त्याजवरून सर्वांचे उमेदीस उदासीनता जाली त्याचा विस्तार काय लिहावा ? इतःपर ब्रम्हसूत्रास त्राता श्री आहे ! गेले त्यांचीच ( पुण्याची ) सामोग्री उभी राहिल्यास राहील. हें वर्तमान येथें इंदुरवारीं आल्यानंतर काल प्रातःकाळीं नानांचे पथकांत राजश्री मोरोपंत साठे यांचे डेऱ्यास ती॥ राजश्री आपासाहेब गेले होते. तेथून येते समयीं इंग्रजांकडे गेले. तेथें त्याणीं पुण्याकडील वर्तमान विचारिलें. नाना गेले म्हणोन वडिलानीं सांगितल्यावरोन बराऊननें उत्तर केलें कीं, ब्राह्मण्य बुडालें ! तुमचे राज्यांतील दाब गेला. तेव्हां वडिलानीं सांगितलें, अशी गोष्ट घडावयाचीं नाहीं. विद्यमानीं आहेत त्यांचीं नांवें घेतलीं. तेव्हां ते सर्व आम्हांस ठाऊक आहेत असें बोलला. तेव्हां विदुर व त्याचे कारभारी यांचीं वडिलांनीं नांव घेतलीं. तेव्हां बोलिला जे तात्यां सुज्ञ दाबाचे पुरुष खरे, परंतु त्याणीं काळजी वागविली असतां आपले घरची वागवितील. तुमची दौलत पोटीं पडली. असें समजाविशीस बोलला, परंतु गर्भ पाहतां विदुराचे दौलतींत आपला व्याप जाला आहे असे भाव दिसतात; व अधिकारी बेहुशार व यांची जमियत, तेव्हां प्रमाणच दिसतें. श्रीकृपें घडेल तें खरें. नाना गेले त्याणीं जातेसमयीं राज्यास श्रेयस्कर प्रकार कोणास तरी समजाऊन दिलाच असेल. ( नानांच्या स्त्रीनें ) दत्तपुत्र घेतला असें वर्तमान येथें आहें, व खासगी सरकारदाखल केली असें, व मोरोबादादाचे चिरंजीवास व बजाबास श्रीमंतांचे हातीं 'पोषण करावें व दरक चालावा' म्हणोन विनंती करून दिले असें वर्तमान येथें आहे. वडिलांचें समजण्यांत श्रुत असेलच. हे विज्ञापना. ही गोष्ट जाली तेणेकरून बहुतांस संकट जालें. बरें ! श्रीकृपा करीतच आहे. हे विज्ञापना.

---

१ पत्रावरील तारीख व मिति पैवस्तीची आहे. पत्र मोरेश्वरराव आबाचें. लष्करांतून मिरजेस. २ पेशवे व अमृतराव व चक्रदेव वगैरे. ३ बाळोबातात्या. ४ शिंद्यांच्या दौलतीची. ५ इंग्रजांचा. ६ दौलतराव शिंदे. ७ शिरवळकर.

नं. ५३४१ ( फाल्गुन व० ११– २१ मार्च. )

नारायणराव गंगाधर पटवर्धन यांचें पत्र मिरजेस. रवाना छ० २४ सवाल.

" मोर्चांस शेर वगैरे जातच आहे. आंतील मारगिरी गोखल्यांचा मोर्चा रंकाळ्यावर आहे त्याजवर चालली आहे, एकूण रंकाळेकडील पाणी बंद जालें. मोर्चा कायम ठरला. सल्लयाचेंही बोलणें लागलें आहे. परंतु बराऊनसाहेब याचें म्हणणें कीं, सल्ला करावयाचा नाहीं. विशाळगडकर पंतप्रतिनिधि श्रीजोतीबाचे डोंगरावर आले आहेत. कांहीं एक विचार बोलावयास आले. त्यास इकडून राजश्री हरबाआपा व बाबा फडणीस ऐसे उदईक मंदवारीं बोलणें ऐकण्यास जाणार आहेत. "

नं. ५३४२ श्रीगणराज. ( फाल्गुन व० ११–२१ मार्च. )

पै॥ छ० २५ सवाल सन मय्यातैन व अल्लफ. फाल्गुन.

विज्ञापना तागायत छ० २४ सवाल पावेतों सुखरूप असो. विशेष. आज प्रहर दिवसास ती॥ राजश्री रामचंद्रपंत आपाकडून सांडणीस्वार चिठी राजश्री बळवंतराव लेले यांचे नांवची घेऊन आला कीं, तुमचें प्रयोजन आहे, येणें, म्हणोन आलें. नंतर मशारनिल्हे वडिलांकडे गेले. वडिलांचे व मशारनिल्हेचें बोलणें बरेंच जालें. वडील बळवंतराव याजवळ बोलले कीं, तुम्हांस परवां सांगितलें त्याचें काय केलें ? असें वडील बोललेवर मशारनिल्हेनीं विनंती केली कीं, काल विनंती केलीच आहे. ती॥ राजश्री बाबासाहेब यांचे लष्करांत बाजार व पेंढार आहे. त्यांस पन्हाळेकडे जाणेंची आज्ञा जाली म्हणजे आम्ही उभयतां सिद्धच आहों म्हणोन विनंती केली. त्याजवरून वडील म्हणाले जे, बाबाच तिकडे गेलेवर तुम्हांकडील मात्र फौज जावी आणि मिरजकरांकडील येथेंच राहील. असें बोललेवर लेले याणीं उत्तर केलें कीं, बाबांसही बरोबर द्यावें. आम्ही प्रत्येकें[२] निराळी चाकरी करणार नाहीं. वडील आज्ञा करितील ती चाकरी उभयतानींच करावयाची असें बोलले. वडिलांचे मनांतील भाव दृष्टीस पडला कीं, बाबा व त्रिंबकराव आपा पलटणसुद्धां पन्हाळेकडे पाणी धरावयास जावें आणि मी येथें एकटाच फौज घेऊन राहिलों म्हणजे आम्हास म्हणावें कीं, त्रिंबकराव आपा पन्हाळेकडे गेले, तुम्ही येथें एकटेच राहिलां, तर ( ही ) पन्हाळेकडील वाट;

---

१ पत्र नारायणराव गंगाधर याचें करवीराहून मिरजेस बाळासाहेबांस. २ पृथक्.

त्यापेक्षां ( तुम्ही येथें राहणें ) ठीक नाहीं. असें म्हणोन पलीकडे न्यावें आणि ती॥ राजश्री चिंतामणराव आपांचे फौजेची व आमची गांठ घालावी असा पुढील रंग दिसतो. आणि त्रिंबकराव आपांची व आमची गांठ तोडावी या प्रयत्नांत आहेत असें दृष्टीस पडों लागलें. परंतु आम्ही उभयतांच चाकरी मिळोन करणें ती करूं. प्रत्येकीं करणार नाहीं. वडिलांस कळावें. जाहलें वर्तमान वडिलांस विनंती लिहिली आहे. त्रिंबकराव आपा व बाबांस मिळोन चाकरी तिकडील सांगावी हा एक बेत दिसतो अथवा आम्हां उभयतांस व चिंतामणराव आपांस मिळोन त्रिवर्गांस सांगावें, मग बाबांस सांगूं नये, हा एक बेत आहे. कोणीकडून तरी संकट प्राप्त करावें असा मनोदय दिसतो. वडिलानीं कोणतीही चाकरी सांगितल्यास आम्ही उभयतांशिवाय करीत नाहीं. परंतु त्यांचे मनोदय प्रत्येक चाकरी सांगावी, कामकाज पडावें, फजीती चौघांत व्हावी, हे इरादे आहेत. परंतु आम्ही प्रत्येक जावयाचें करीत नाहीं हेंच बोलणें घातलें आहे. सर्व आशीर्वाद वडिलांचा.

नं. ५३४३ श्रीगणराज. ( फाल्गुन व० ११—२१ मार्च. )

पै॥ छ० २६ सवाल. सन मंय्यातैन व अल्फ.

अपत्यें आबानें साष्टांग नमस्कार विज्ञापना त॥ छ० २४ सवालपावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. रा. धोंडोपंत याणीं मोर्चे पूर्वीं विनंती लिहिल्याजागीं काईम आज पहांटेस केले. पद्माळेंकडील अंगें मोर्चांचा ठराव होत आहे. हल्ला करून ठाणें घ्यावें हा इरादा इंग्रजांचा आहे. राजेबहादरांचें पथकही पुण्याहून आलें. पांचशें स्वार आहेत. काल दोन प्रहरीं तीर्थस्वरूप राजश्री चिंतामणराव आपा येथें भोजनास आले होते......... नवती. पूर्वीं येतो असें......पाठविला होता त्यांतील कारण मागाहून व आणखी वर्तमान पुर्ता शोध करून मागाहून विनंती लिहितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५३४४ ( २२ मार्च. )

धोंडो बापूजी जोशी यांचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र. रवाना फाल्गुन व॥ १२ चें—

" यशवंतराव होळकर याणें जाटाचा किल्ला एक आपण व भोसले मिळून घेतला. द्रव्य बहुत सांपडलें. फौजही हुशार. दीडशें दोनशेंपर्यंत

---

१ पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची आहे.

तोफा व पायदळ व स्वार मिळोन पन्नास हजार संगातें आहे. पुण्याकडे येण्याचा रोंख आहे. भोसले यांचीही फौज कांहीं संगातें आहे. नानांचे सूत्रेंकरून येत आहेत. बुंदेलखंडचे सरदेपर्यंत आला आहे अशी बाजार बोलवा आहे याउपर नानांचें वर्तमान ऐकून पुढें येतो किंवा येथेंच तूर्त राहतो पहावें !"

नं. ५३४५ (फाल्गुन व० १२–२२ मार्च.)

नारायणराव गंगाधर यांचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र. पै॥ छ० २५ सवाल—

"करवीरांतून एक मनुष्य आला तो सांगत होता कीं, आंत मनुष्य हत्यारबंद सात हजारपर्यंत आहे. धान्य वगैरे संग्रह चांगला आहे. कमती कोणत्याही जिनसाची नाहीं. बाहेरील गोळे येतात त्याणीं दिवाळतोड[1] होत्ये, परंतु आंतील मनुष्य कांहीं जायां जखमी होत नाहीं. तोफेचा गोळा भिंताडास लागतो किंवा उकोळ[2] जातो. वेशी उघडून पाणी नेतात. एक अंगी मोर्चा यामुळें शहर आयां आलें नाहीं. हिंमत आंतील चांगली आहे. ती॥ राजश्री बाबासाहेब यांजकडील कही गेली होती तिजवर गडकरी याणीं हल्ला करून कांहीं घोडीं पाडून नेलीं. पागेपैकीं कांहीं उंटेंही गेलीं."

नं. ५३४६ श्रीगणराज. (फाल्गुन व० १२—२२ मार्च.)

पै॥ छ० २५ सवाल. सन मय्यातैन व अल्लफ.

[3]विज्ञापना. तीर्थस्वरूप राजश्री रामचंद्रपंत आपा याणीं राजश्री आपाजी गोविंद[4] यांस बोलवून आज्ञा केली जे, पन्हाळेच्या दक्षिणेस ओढा आहे तेथें जाऊन मुक्काम करावा आणि पन्हाळेवर चौकी बसवून पाणी बंद करावें, असी आज्ञा केली. त्यास उत्तर सांगितलें जे, आमची उभयतांची[5] फौज थोडी. पन्हाळयावर चौकी पायदळाची बसवावी तेव्हां दिवसरात्र फौज पाठीमागें पाहिजे. व आम्हांबरोबर बाजारही नाहीं. तिकडून दाण्यासवगैरे इकडे यावें लागतें. यास्तव ती॥ रा॥ बाबासाहेब[6] यांस आज्ञा व्हावी म्हणजे त्याजबरोबर आम्ही जाऊं. त्यास त्यांचें बोलण्यांत बाबासाहेबांस यावें तर

---

१ भिंताड पडतें. २ नेम चुकल्यामुळें फुकट जातो. ३ पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची आहे. पत्र नारायणराव गंगाधर यांचें मिरजेस बाळासाहेबांस. ४ सखदेव. हा मिरजकरांच्या पथकावरचा सरदार. ५ आमची मिरजकरांची व कुरुंदवाडकरांची. ६ हरिपरशुराम ऊर्फ हरिपंत बाबा.

इकडील गोटांत रखवालीस कोणी नाहीं. यास्तव दुसरी आणीक फौज पाहिजे तर ती॥ रा॥ चिंतामणराव आपा यांस जावयास सांगतों. ते व तुम्ही मिळोन जावें अथवा तुम्हीच जावें. नाहींतर उत्तर कळवावें. त्यास आपाजी गोविंद याणीं विनंती केली, बाबासाहेबांची रवानगी जाहली म्हणजे आम्ही जातों. दुसऱ्याबरोबर जावयाचें ( तर ) वडिलांचे आज्ञेशिवाय कसें जावें ? गोटास जाऊन याचें उत्तर कळवितों. असें सांगून काल सायंकाळीं आले. आम्ही आज उत्तर पाठवितों. "आम्ही व चिरंजीव रा॥ त्रिंबकराव आपा उभयतांनीं जावें तर जमाव थोडा, यास्तव बाबासाहेबांस आज्ञा जाहल्यास त्यांज बरोबर जाऊं" असें लिहून पाठवितों. वडिलांस सविस्तर विदित व्हावें यास्तव विनंती लिहिली आहे. आज्ञा होईल त्याप्रमाणें करावयास येईल. रा॥ धोंडोपंत गोखले यांचे मोर्चे रंकाळ्याकडील बाजूस आज रात्री बसले. आज प्रातः-काळापासून गांवची व बाहेरची तोफांची मारागिरी फार होत आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३४७ श्री. ( फाल्गुन व० १२—२२ मार्च. )

पै॥ छ० २८ सवाल. सन मय्या तैन व अल्लफ.

सेवेसीं बाळकृष्ण महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २५ सवालपावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असें. विशेष. स्वामीनीं कृपा करून श्रीमंत नानांस तीन पत्रें पाठविलीं तीं पावलीं व मजला सात पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर सविस्तर कळला. श्रीमंत नाना तो कैला-सवासी जाहले. आतां सर्वांशीं गोड राहून घरकलह तोडून टाकावा. किल्ल्याची खबरदारी बहुत सावधतेनें करून रात्रंदिवस हुशारी असावी. नाना सर्वांचें छत्र गेलें ! चिरंजीव सौ॥ स चैत्र मासीं आणावयासीं पाठवावें. मूल कल्याणास आहे. आज्ञा येईल त्याप्रमाणें रवानगी करितों. सेवकास सर्व प्रकारें आधार स्वामिचरणावा आहे. नानांची मला आज्ञा जाली होती कीं, मी चांगला बरा जाहलियावर तुझी रवानगी मिरजेस करीन. पटवर्धनां ( पैकीं ) महत् कार्यास उपयोगी गंगाधरराव व रघुनाथरावदादा[1] पडतील हा ( नानांचा ) हेतु बहुत होता. आतां ते तो कैलासवासी जाहले ! उभयतानीं एक विचारें राहून बहुत सावधान असावें. विशेष विनंती काय लिहूं ? दादोजी गंगाधर ही

---

१ चंद्रचूड.

कैलासवासी जाहले. बाळोबा तात्यांसही बहुत समाधान नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. निरंतर आज्ञापत्र येत असावें. श्रीमंत पंतप्रधान स्वामींकडील व अलिजाबहादर शिंदे यांजकडील साधन असावें. हे विज्ञापना.

नं. ५३४८ श्रीगणपति. ( फाल्गुन व० १२ – २२ मार्च. )

पै॥ छ० २७ सवाल. सन मय्या तैन. फाल्गुन व० १४

अपत्यें रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २५ सवालपर्यंत यस्थास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. नाना याणीं कैलासवास केल्याचें व करवीर प्रकरणीं काम लांबणीवर पडों नये येविशींचे विस्तारें आज्ञा पत्रीं लिहिली, ऐशियास नानांसारखा मोहरा गेला! फारच वाईट गोष्ट जाहली. श्रीमंतांचे दौलतीस मोठा आळा होता. इकडील तो पूर्वऋणानुबंधी. वर्तमान कळल्यापासून कांहींच सुचत नाहीं. ईश्वर इच्छा प्रमाण ! नाना यांचे योगेंकरून हेही दिवस पाहिले. येविषयींचा विस्तार काय काय म्हणोन लिहावा ! ! मसलत प्रकरणीं वडिलीं ज्या ज्या कल्पना लिहिल्या तितक्याही खऱ्याच आहेत. ते हरदमख्याली. कोणतें कसब करावयास चुकणार नाहींत. प्रथम जलदी केली, कामकारेगार जालें नाहीं. दारूगोळा खर्च जाहला त्याची तरतूद जाली पाहिजे. हल्लीं रा॥ गणपतराव[1] यांची खर्चास मागण्याची निकड आहे. काल धरणेंदाखल येऊन बसलेही होते. आज त्यांचे गोटांत धरणें आहेच. अशा अडचणी आहेत. ईश्वरेंच पार पाडावें. होईल ते जलदी करितों. मेहनतीस व कारस्थान करण्याविशीं आळस नाहीं. वडिलांचे आशीर्वादें मनोदयानुरूप घडेल तेव्हा खरें ! रा. धोंडोपंत गोखले यांस रंकाळ्यानजीक मोर्चा सांगितल्यावरून तो मोर्चा त्याणीं कायम केला. पद्माळ्याकडेही चौकी ठेवावयाचा बेत आहे. उऊन मागाहून लिहितों. ती॥ राजश्री दादासाहेब यांचें पत्र पोहोंचलें. तिकडेही विनंती वे॥ राजश्री बाबा दीक्षित गेले त्यांजबरोबर सांगून पाठविली आहे. सविस्तर ती॥ राजश्री धोंडोपंत मामा यांस विनंती करावयासीं सांगितलें आहे. उत्तर यावें. वडिलीं त्वरा करण्याविशीं व कित्येक बुद्धिवाद लिहिले ते योग्यच आहेत. येथील प्रकार विलक्षण! ज्या काळीं जें होणें तें वडिलांचे अशीर्वादेंकरून घडेल. विदित होय हे विज्ञापना.

---

१ शिंद्याच्या फौजेवरचा सरदार गणपतराव भिकाजी.

नं. ५३४९ श्री ( फाल्गुन व० १३—२३ मार्च. )
असालबमोजीब नक्कल.

पै॥ छ. २६ सवाल. फाल्गुन. सन मय्या तैन व अल्लफ.

विज्ञापना ऐसीजे, सरकारांत मुख्यें व बळवंतराव नागनाथ व बाळोजी कुंजर, आबा काळे यांची मसलत निराळीच चालली आहे. त्यांतील भाव श्रीमंत रावसाहेब व चक्रदेव कारभारांत नसावे. रा॥ मोरोबा दादा यांस आणावें अशी योजना चालली आहे. शिंदे मुख्य व इकडील मुख्याचे एकचित्त, एक मसलत, असे घाट बनत आहेत. यांत परिणाम कसा लागतो पहावें! चक्रदेव याणीं बहुत प्रकारें दौलतीचे कल्याणाचे भाव सांगितले. (पेशवे ते सर्व) चांगले म्हणतात, परंतु कोणाचाच विश्वास धरीत नाहींत ! खलबतें चालत आहेतच. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५३५० श्री ( फाल्गु० व० १३—२३ मार्च. )

पै॥छ० २६ सवाल. फाल्गुन. सन मय्यातैन.

विज्ञापना. श्रीमंत नाना गेल्यापासोन शिंदे यांचे घरीं दुफळी सर्जाराव व बाणाजी व यादोभास्कर वगैरे व मुख्य यांचें चित्त एक होऊन तात्यां व दादा यांस बसवावें असे घाट चालले आहेत. उभयतांस समजलें. आपले तर्फेनें बंदोबस्त करीत आहेत. कोणत्या कलावर जातें कळत नाहीं. रात्रंदिवस खलबतें चाललीं आहेत. तात्यानीं बंदोबस्त केला आणि काईम राहिले तरच परिणाम. नाहीं तर आजच भालेराई जाहली ! ईश्वर काय घडवील तें खरें ! श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५३५१ श्रीगणपति. ( फाल्गुन व० १३—२३ मार्च )

पै॥ छ० २६ सवाल. सन मय्यातैन फाल्गुनमास.

विज्ञापना ऐसी जे, नाना यांचा काल जाहल्याचें वर्तमान आल्यानंतर तपशीलवार पत्रें अद्यापि आलीं नाहींत. जनवार्ता वडिलांच्या ऐकण्यांत (आहेत) तशाच येथें आहेत. सत्यमिथ्या कशावरून म्हणावें ? एक दोन रोजांत लिहिलें आल्यास सेवेशीं कळवितों. नानासारखा मोहरा गेला ! काय ल्याहावें ! सावध पुरुष. कांहीं तरी बोलणें व बंदोबस्त सांगणें जाहलें असेलसें वाटतें.

---

१ पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची आहे. पत्र धोंडोपंत जोशी याचें पुण्याहून मिरजेस. २ पत्र पुण्याहून धोंडोपंत जोशी याचें मिरजेस. ३ शेणवी कारभारी बाळोबा तात्या व धोंडीबा दादा.

लिहिलें येईल तें प्रमाण ! अथणीहून वाघाचे मजकुराचें पत्र आलें त्याची नकल पाठविली ती पाहिली. अजून दुसरें पत्र पुण्याहून आलें नाहीं. हल्ला कारागीर न जाहली हें (पुण्यास) लिहिलें त्याचें उत्तर आलें नाहीं. इंग्रज हट्टी आहेत. बोलणें पुष्कळ बोलतात. घडेल तें प्रमाण. आज बराऊनसाहेब बरे सुमाराचे होऊन मोर्च्यांत येत आहेत. काल पन्हाळ्याहून संधानार्थ प्रतिनिधि, भाऊ जोशीराव, बच्याजीपंत, लिंबाजी यादव, केरल्याचे बागेंत आले होते. इकडून राजश्री हरबा आपा व बाबा फडणीस गेले होते. मुख्य बोलणें "सर्वस्वें आम्हांस रक्षावें. पहिलीं ठाणीं देतों. तह करावा. करवीर घेऊं नये असें." उत्तर कसें सांगून पाठवावें ते आज्ञा करावी. पुण्यांतही तह घाटत आहे. प्रस्तुत काळीं आमचे स्वाधीन कांहींच नाहीं. इंग्रजांचा निकर्ष करवीर घ्यावें असा आहे. परंतु पुणेंहून आज्ञा त्यांचे मुख्याची येईल तसें घडेल. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३५२ श्री. ( फाल्गुन व० १३ – २३ मार्च.)

पै॥ छ० २६ सवाल. सन मय्यातैन व अल्लफ.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं.

[1]पो॥ गणपतराव विश्वनाथ सा॥ नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता॥ छ० २४ सवालपावेतों यस्थाथित असे जाणोन स्वकीय कुशल लिहीत असावें. विशेष. सवाई तोफेस तक्त वगैरे सरंजाम तयार जाला असेल तोच अस्मानतडाख्यास कामास पडेल. त्यास गाडा वगैरे सरंजाम तयार होऊन अस्मानतडाखा तोफ गाड्यावर घेऊन लिहून पाठवावें म्हणजे फांजा वगैरे ( देऊन ) लोक पाठवून आणवूं. तूर्त गाडा तयार करावा याबद्दल लोहार व घणकरी पाठविले आहेत. यांस लोखंड वगैरे सरंजाम लागेल तो तो देवऊन गाडा लौकर तयार होईल तें करवावें. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंती.

नं. ५३५३ श्री. (फाल्गुन व० १३ – २३ मार्च. )

असलबमोजीब नक्कल.

पै॥ छ० २६ सवाल. सन मय्यातैन. रविवार.

[2]विज्ञापना. इकडे गडबड या रीतीची जाली आहे. ऐसियास स्वामींनीं

---

१ मिरजेहून तुमची आज्ञा झाल्याखेरीज. २ पत्रावरील मिती व तारीख पैवस्तीची आहे. पत्र पानशे तोफखानावाले यांचें.

बहुत हुशारीनें बातमी चहूंकडील पक्की राखून असिलें पाहिजे. कोणाचा भरवसा न धरतां आपल्या फौजेंत हुशारी असावी. नाना गेले तेव्हां मोठाच आधार गेला. परंतु दम सोडून परिमाण नाहीं. सर्वांनीं एकदिल होऊन मणगटाच्या जोरानें मारल्याचे हाताखालीं राहिलें तरच चौघांची नजर स्वामींकडे राहील व दौलतीचाही बचाव. सरकारी पथकें तोफखानासुद्धां आहेत त्यांच्या मनोधारणा राखिल्या पाहिजेत. प्रसंग अवघड जाणोन विनंती लिहिली आहे. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३५४ श्री. ( फाल्गुन व० १४–२४ मार्च. )
असलबरहुकूम नक्कल.

छ० २७ सवाल. फाल्गुन. इंदुवार.

विज्ञापना. नाना यांचा काळ जाल्यानंतर भृगुवारीं सरकारचे हुजरे नानाच्या वाड्यांत येऊन बसले व पागा बागा वगैरे झाडून जेथें तेथें हुजरे गेले. दुसरे दिवशीं कापडाची मोजदाद जाली. नजर वांकडी अशी समजल्यानंतर राजश्री धोंडिबा दादा येऊन सरकारांत बोलून झाडून हुजरे बसले होते तेथून उठविले. कैलासवासी गंगाधरपंत भानु यांचा पुत्र चार वर्षांचा आहे तो दत्तक घ्यावा असा राजश्री तात्यांबा व फडके वगैरे यांचा मानस आहे. खटपट चालली आहे. घडेल तें मागाहून लिहितों. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५३५५ श्री. ( चैत्र शु० ९ – ३ एप्रिल. )
नक्कल.

साहेब मेहरबान कर्म फर्माय दोस्ता वासुदेवपंत काकासाहेब जुसल मुलाहुताला.

अजैतर्फ नवाब मुलुकेजहांखां बहादर सलाम बाजत सलाम मोहवलमकसूद अंकी दरीविला येथील खुषी छ० माहे जिल्काद मुक्काम गदग जाणोन आपली षादमानी कलमी करीत गेलें पाहिजे. दिगर मजकूर भास्करपंत हमरहा खत पाठविलें ते मजकूर मालूम जाहले. कितेक मसल-

१ हें व पुढचीं दोन पत्रें पुण्याहून बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे यानीं रामचंद्रपंत आपांस लिहिलीं त्यांच्या नकला त्यांनीं मिरजेस पाठविल्या. २ शिंद्याचे कारभारी व बाळोबा तात्याचे जोडीदार. ३ मासूरचे ठाणेदार वासुदेव काका पटवर्धन शीळकर यांस हें धोंडजी वाघाचें पत्र. वाघास टिपूनें मुसलमान केल्यावर त्यानें नबाब मुल्केजहां बहादूर हें नांव घेतलें.

तांचे मजकूर लिहिले होता, तरी लक्ष्मेश्वर मुक्कामावरी मशरूल बाळकृष्णपंत-भाऊ विश्वासघात करून आमचे लष्करचे हाथी, तोफखाना, उंट, घोडी, बैल, बेसुमार सरंजाम घेतले आहेत. दरपरगण्यांत घेतलें ते पसा आहे. जराबाजरा जिंद-गानी सोडून दिल्यास त्यांचा आमचा खटला होणार नाहींच. सावनूरचे परगणेंत घासदाणा वाजवी द्यावा म्हणजे तालुकेची खराबी होणार नाहीं. मासूरचे परगणेंत एक काडीचा धक्का लागणार नाहीं. सुखरूप असावें. आमचे आपले स्नेहांत इतर विचार घडणार नाहीं. हे मजकूर मशरूल बाळकृष्णपंत भाऊंकडे मुद्दाम भास्करपंतास पाठवून मखलासी करून तुमचे खातरजमा करून घेऊन तुमचें पत्र आठवे रोजीं आलिया जलद जबाब लिहूं. मखलासी पडलियास मुलखांत स्वारी होऊन खराबी होणार नाहीं. हें वर्तमान त्यांस लिहून पाठविणें. या बातेस सुस्ती न करावी. आपासाहेबांकडे नरसिंगराव व्यंकटराव गेले ते तीन महिने जाहले. ताहाल तिकडून कोणताही जाबसाल ठरवून आले नाहींत. कोल्हापूरचा प्रसंग कितेक अंतरंग मशरूल भास्करपंतास सांगितलें आहे ते तुम्हांस कळवितील तें आपासाहेबांस पत्र लिहून पाठवून जबाब आणावे. या बातेस जादा काय लिहिणें. बाजे कैफीयत भास्करपंताचे जबानी मालूम होईल. खताचे दर जबाब जलद पाठवणें. जाणिजे. हे किताबत.

श्री. ( फाल्गुन व० १४--२४ मार्च. )

नं. ५३५६

असल बमोजीब नकल.

पै॥ छ० २७ सवाल. फाल्गुन.

विज्ञापना. माझी प्रकृत बरीच आहे. काल इंदुवारीं प्रातःकाळीं रा॥ बाळोबा तात्या यांजकडे गेलों होतों. चार घटका बोलणें जालें त्यांतील आशय पाहतां मान चढलें असें भासलें. पेशजी रा॥ गणपतराव यांचे विद्यमानें करवीराहून बचाजीपंत येणार म्हणोन लिहिलें आहे, त्यास तो प्रकार खरा. पुढील समेटाचें वगैरे पुसिलें. त्याजवर उत्तर जालें जे, तिकडून बोलणार येत आहेत. ते आल्यावर काय तो जाबसाल ठरेल. सारांश नाना गेले याज-मुळें दुसरा कोणी ( प्रतिस्पर्धी ) नाहीं हे पोटांत वागूं लागलें. स्वामी शहास गुंतले. नाइलाज ! सोडतां येत नाहीं व येथील उलगडाही होत नाहीं, त्या अर्थे खर्च होऊन व्यर्थ बसावें असें जालें ! नाना गेले याजमुळे राज्यांतील दाब गेला. यांत सर्व समजोन होणें ते व्हावें. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५३५७ श्रीगणराज. ( फाल्गुन व. १४—२४ मार्च. )

पै ॥ छ० २९ सवाल. सन मय्या तैन व अल्लफ.

अपत्यें आबानें साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता॥ छ० २७ सवाल पावेतों वडिलांचें आशीर्वादेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं आशीर्वाद पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. इकडील वर्तमान तरी पन्हाळेंकडील अंगास तीर्थस्वरूप राजश्री हरिपंत बाबा व नारायणराव काका व त्रिंबकराव आपा त्रिवर्ग फौजसुद्धां पलटणसुद्धां जितीचे ओढ्यावर मुकामास काल आलों. सायंकाळचे दोन घटका दिवसास कांहीं लोक पन्हाळ्यानजीक आले असें वर्तमान ऐकल्यावरून इस्मित तोफा लैन घेऊन जाऊन चार बार करून माघारा आला. लोकही गेले. नंतर तीन प्रहर रात्रीस मागती लोक तलावानजीक आल्याची बातमी पलटणची आली. त्याजवरून जरबांसुद्धां इस्मित तयार होऊन तेव्हांच मेढापावेतों गेला. दोन कुंपण्या पुढें पाठवून आलेले लोकांवर सलका जाल्या. तेव्हां आलेले लोक हटून गेले. पलटणांतील चोर पाहरे वगैरे मेढापावेतों आहेत. आज प्रातःकाळीं शहरांतील उकाळ गोळे गोटावर दोन आले. एक मेंढरूं मयत जालें. गोटावर मार[1] चांगला नाहीं, सबब पुढें जावयाचा बेत आहे. सेवेसीं श्रुय होय हे विज्ञापना.

नं. ५३५८ श्रीगणराज. ( फाल्गुन व० ३०—२५ मार्च. )

अपत्यें नारायणानें व महादेवानें दोनी कर जोडून सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ. २८ सवाल यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पाठविलें. याच प्रकारें सदैव पत्रीं सांभाळ करावा. ती॥ राजश्री आपासाहेब याणीं आज्ञा केली कीं पन्हाळयाकडे जाऊन × × × × म्हणोन, त्याजवरून आम्ही व चि॥ राजश्री त्रिंबकपंत आपा व ती॥ राजश्री बाबासाहेब असे रविवारीं कूच करून जितीचे आसपास पन्हाळ्याचे अंगें घेऊन उतरलों. मुकामास आलों तेच दिवशीं करवीराहून शेंदोनशें माणूस बाहेर आलें होतें. नंतर मुसा इस्मिथ याणें दोन तोफा व आपण खासा जाऊन दहा बार व सळका सोडिल्या तेव्हां आंतील माणूस बाहेर आलें होतें तें आंत गेलें. पन्हाळयाचें पाणी बंद करावयाचा बेत होत आहे. झालेवर सेवेशीं लिहितों. रंकाळ्याचे पाणी धोंडोपंत गोखले याणीं

[1] मार होणें चांगलें नाहीं.

बंद केलें. धोंडोपंत याणीं मोर्चा काईम केला आहे. वरकड वर्तमान चिरंजीव लिहितातच आहेत. कळावें सेवेशीं विदित होय हे विज्ञापना. सेवेशीं बाळाजी गणेश. दोनी कर जोडून सा॥ नमस्कार विज्ञापना. परिणाम यथास्थित दिसत नाहीं. श्री घडवील तें खरें. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३५९ श्री. ( फाल्गुन. व. ३०–२५ मार्च. )

पै॥ छ २९ सवाल. सन मय्यातैन चैत्र मास.

सेवेशीं बळवंत[1] लक्ष्मण. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ २८ सवाल भौमवार दोन प्रहर दिवस पन्नाळें दक्षिण भाग येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान बराऊन फिरंगी कंपूवाला जखमी जाहल्यामुळें आजपावेतों विराम होता. काल फिरंगी मोर्चांत आला. ठाणें घेतां म्हणतो. परंतु चर्या पाहतां एक प्रकारची दिसते. काल मी बनपुरीस मोर्चांत गेलों होतों. श्रीमंत राजश्री आपासाहेबांची गांठ पडोन बोलणें जाहलें. उद्योगाची जारी दिसत नाहीं. पैका दिवसेंदिवस वाढतो. चौघांस चार कामें वांटून द्यावीं, एकाचे ईर्षेनें एकजण काम करील, अशी विनंती केली, व दोन थोर तोफा पन्नाळचे ( बाजूस ) दिल्यास काम बहुतेक होईल म्हणोन ( बोललों ) त्यावरून स्वकीय तापत्रय बहुत सांगितलें. सारांश " खर्चाची वोढ मोठी. दारू नाहीं. करवीरकरांचे वकील पुण्यांत आहेत त्यानीं तूर्त गोळा वाजूं नये अशी मनाचिठी घेतली म्हणोन लिहिलें आलें. राजश्री धोंडोपंत गोखले यांचे मोर्चे पन्नाळ्याचे अंगें आहेत त्यांस पुढें होऊन जागा साधावी म्हणत असतां मनावर घेत नाहीं, तेव्हां कसें करावें? ईश्वर इच्छेनें घडेल तें घडो! राजश्री मोरोपंत साठे पुण्यास पाठविले आहेत. सविस्तर त्यांबरोबर लिहिलें आहे. काय ठराव होतों पहावें. शिंद्याचे घरीं घाटग्याचा पगडा फिरोन पडावा असाही डौल दिसतो. काय घडतें पहावें. " असें उत्तर जाहलें. श्रीमंत राजश्री दाजीसाहेब यांची फौजसुद्धां सामानगडाकडे प्रतिपदेस रवानगी होणार. कारण काय म्हणोन विनंती केल्यास त्याचें उत्तर ' पोट चार दिवस भरावें ' असें जालें. सारांश आजपावेतों एवढा व्यूह केल्यासारखा डोंगरांतून रत्न निघतें कीं उंदीर याचा तर निश्चय नाहीं! बहुतकरून करवीरकरांचे ग्रह अनुकूल दिसतात. वरकड सविस्तर श्रीमंत राजश्री नारायणरावसाहेब लिहीतच आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ ठेले. कुरुंदवाडकरांचे कारभारी.

नं. ५३६० श्रीगणराज. ( चैत्र शु. १–२६ मार्च. )

पै ॥ छ २९ सवाल सन मया तैन व अलफ.

[1]विज्ञापना. इकडे मुक्काम करून येण्याचा वगैरे तपशील पूर्वी विनंती पत्रीं लिहिलाच आहे. त्यानंतर बोलण्याप्रमाणें कूच ही जाहलें. नद्वयें[2] कैलासवासी जाहल्यानंतर पंचम[3] यानीं पंचमस्वामीकडून[4] कृष्णनामकद्वारें[5] सुकृतास[6] भारती[7] मुख्य अमात्यपदवीस पाठविली. आर्यअनुजांस[8] किमपि अज्ञात आहे असें वर्तमान तहकीक समजण्यांत आहे. पाशमुक्त[10] जाहल्यावर मार्गावरोध नाहीं. श्रीइच्छेनें घडेल तें खरें; विदुरनिकट संकर्षणें[11] यास प्रतिबंध करावा अशी बुद्धि घंटारवाची[12] जाहली असें वर्तमान आहे. त्यावर श्रीकृपा खरी ! जलचरांचें[13] लक्ष संकर्षणाकडे पूर्वी होतें. आतां पल्ला कोणचा होतो न कळे. आर्यतनुजांस[14] मुख्य पदवी याची पत्रिका आली जे नद्वयगमनामुळें तुम्हीं कार्यभागीं मांद्यत्व कराल त्यास तो प्रकार न होतां दक्ष असावें. सामोग्रीस गुंता नाहीं. कोणेविशीं दर्द नसावी. असे भाव लिहिले आहेत. पुढें हाच नेट राहिल्यास बरें आहे. गडास बोलण्यास बाबा काळे गेले होते. स्थळांचें बोलणें होतें. परंतु मिटलें नाहीं. इकडील सैन्यांत तोफा भारी असल्यानें काम होईल. काय ठरतें पहावें. पन्हाळेंवे तळ्याचे मेढावर मोर्चे कायम करावे असें मानस तिकडील दिसतें. काय घडतें पहावें. गोखले यांचे मोर्चे रंकाळ्याचे अंगें संध्यामठासंनिध बसले आहेत. सारांश देशकाळ वर्तमान आहे त्या प्रमाणें सर्वांचे मतीं परिणाम लागावा. भोजनास[15] आल्यांचे कारणांचा तपशील साधुत्वग्रहण आपण करावें असें कारण दिसतें. विदित होय. सर्व आधार वडिलांचे चरणांचा. दुसरा प्रकार नाहीं. हे विज्ञापना.

---

१ पत्रावरील तारीख व मिती पैवस्तीची आहे. पत्र मोरेश्वरराव आबाचें बाळासाहेबांस लष्करांतून मिरजेस. २ नाना. त्यांच्या नांवांत दोन नकार आहेत. ३ परशुरामभाऊंनीं अथवा गंगाधररावानीं आपला पांचवा मुलगा मानिलेला चिंतामणराव आपा. ४ आपले वरिष्ठ अधिकारी रामचंद्रपंत आपा याजकडून. ५ काळे बाबा यांच्या द्वारें. ६ पुण्यास. ७ चिंतामणरावांस मिरज देण्याविषयीं पत्र. ८ पेशव्यांस. ९ आर्यअनुजांस = रामचंद्रपंतांच्या भावांस. १० घाटगे कैदेंतून सुटल्यापासून त्यास कोणी अडथळा करूं शकत नाहीं. ११ विदुर निकट संकर्षण बाळोबा तात्या. १२ घाटग्याची. १३ येथल्या पलटणांवरील इंग्रज अधिकाऱ्याचें. १४ परशुराम भाऊंच्या मुलांस पंतप्रधान यांचें पत्र आलें. १५ चिंतामणराव आपा आमच्या गोटांत आपण होऊन भोजनास आले ते भलेपणा घ्यावा म्हणून.

नं. ५३६१ श्रीगणराज. ( चैत्र शु० १–२६ मार्च. )

चिरंजीव[1] राजश्री दादा यांसीं आशीर्वाद उपरी. आमची अवस्था कोठवर लिहावी ! आपणास विदित आहे. खर्चास नाहीं. खरेदी सालाबाद गल्लेची व कडबेची देखील चिरंजीवानीं[2] नेली. पुढें काय करावें ? आम्ही कोठवर धीर धरावा ? नानां[3] एक सांगावयास जागा होती ते देवाज्ञा जाले. वळखणार कोण आहे ? यास्तव माझा परिणाम लागे असें करावें. अबरूनें पार करावें. दुसरें मागत नाहीं. अबरूवर आलें आहे. अंत पाहूं नये. प्राणनाश करून घ्यावा हें प्राप्त आहे. पत्र पाहून परत पाठवावें. लिहावयास इतकें तरी कोणास आपले विना लिहावें ? श्री इच्छा असेल तें चुकत नाहीं. वडील पुण्यवान् होते. मी कोणाचें वाईट केलें नसून हा समय आला ! बरें ! छ० २९ सवाल बुधवार लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. ५३६२ श्री. ( चैत्र शु० २ – २७ मार्च. )

पै॥ छ० ३ जिल्काद. सन मय्यातैन व अल्लफ.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब साहेबांचे सेवेसीं

विनंती सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेऊन शिर सा॥ नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० १ जिलकादपर्यंत स्वामींचे कृपेकरून कसबे रहिमतपुरचें व सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. करवीरचे मसलतीमुळें रहदारी गांवावरून भारी पडली आहे. बत्तीसशिराळ्यावरील जखमी येथें राहिले आहेत त्याजपासून कंपूकडील आजारी जखमी थकले रहावयाचा ठिकाणा त्यांस हाच जाहला आहे ! दररोज पुण्याकडून करवीराकडून येत जात आहेत त्यास दोन चार रोज येतांजातां मुक्काम करितात. रोज गांवांत दंगा. बेगारीस तट्टें व बैल व बिगारे यांचा सुमार राहिला नाहीं. बराऊन साहेब यास गोळी लागोन जखमी जाहले म्हणोन पुण्याहून डाससाहेब फिरंगी करवीरास गेले. त्यांचा मुकाम काल येथें होता. आज निघोन करवीरास गेले. त्यांजबरोबरील उंटें थकलीं तीं येथे लोक जखमी यांजपाशीं ठेवून गेले. त्यांची निगादास्त दाणा, वैरण, मसाला, चारा त्यांजकडील लोक सांगतील त्या प्रमाणें आम्ही करावा ! डाससाहेब यांणीं मुक्काम केला त्याणीं दाणा वैरण घोड्यांस उंटांस मसाला व खाशांस गरमी जाहली सबब साखर खडी याप्रमाणें घेतलें. पंचेचाळीस रुपये खर्च लागला.

---

१ गंगाधरराव गोविंद उर्फ बाळासाहेब यांचें पत्र मिरजेहून रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस. २ चिंतामणराव यानीं. ३ फडनवीस.

रहदारी पडली. कोठपर्यंत किती दिवस बरदास्त तरी करावी ? उपद्रव भारी. बायका देखील धरतात. उपाय नाहीं. बोलावयास गेलें असतां शिवीशिवाय बोलणें नाहीं ! कजिया करून मारितात ! कंपूचाच उपद्रव भारी. रयत उठोन जावयाच्या सुमारास आली आहे. बहुत काय लिहिणें सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३६३ श्रीगणराज. ( चैत्र शु० २–२७ मार्च )

छ० २ जिल्काद. सन मय्या तैन चैत्र.

विज्ञापना[1]. मुसाइस्मत यास पन्हाळ्याचें पाणी बंद करावें, दुमदारीवर[2] त्रिवर्गीपैकीं[3] एक जण आम्हीं राहतों, म्हणून सांगितलें. परंतु जलचैर याचें म्हणणें दारूगोळा व दोन जरबा चांगल्या दिलेशिवाय पाणी बंद होणार नाहीं. मजजवळ आहेत या तोफा लहान. याणें परिणाम लागावयाचा नाहीं. रवाना छ० १ जिल्काद. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३६४ श्रीगणराज. ( चैत्र शु० ३–२८ मार्च. )

पै॥ छ ३ जिल्काद. चैत्र मास. सन मय्या तैन व अल्लफ.

अपत्यें आबानें साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २ जिल्काद पावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून वर्तमान तरी यथास्थित असे. विशेष. वडिलीं आशीर्वादपत्र पाठविलें तें पावलें. आज्ञेप्रमाणें मजकूर कळला. इकडील वर्तमान तरी पुण्याहून सतलंजसाहेब हल्लीं पलटणें आलीं या कंपूचा मालिक, त्याजकडून दोन शेणवी गृहस्थ परवां बराऊनसाहेबाकडे आले. त्यांतील वर्तमान ऐकण्यांत आहे जे, हल्लीं करवीरची हल्ला काईम न जाहल्यामुळें बहुत अजुर्दा होऊन खुद्द ( सतलंजसाहेब ) मदतीस निघोन येत होते. परंतु अलिजाबहादूर याणीं ' खुद्द जाऊं नये, तीन पलटणें रवाना करावीं ' असें सांगितल्यावरून पलटणांची तयारी करवून पुढें या गृहस्थांस रवाना केलें असें वर्तमान आहे. कारभारांत बेदाच आहे. परंतु कंपूचे नेटावरून माजी कारभारी यांचा टिकाव जाहला आहे असें वर्तमान आहे. दुसरे जागीं तो पाशमुक्त[6] आहे तेव्हां श्रीइच्छेनें परिमाण लागावा ! इकडील वर्तमान मोर्चांतील मारागिरा सामानाचे तनचाईमुळें महकूब आहे. माफक मारगिरी होते. चार पांच खंडीची तयारी मसाल्याची जाली आहे.

---

१ पत्र नारायणराव यांचे मिरजेस. २ पिछाडीवर. ३ मी, त्रिंबकराव व हरिपंतबाबा यांपैकीं ४ इंग्रज इस्मित याचें ५ तोफा. ६ घाटग्या कैदेतून सुटला आहे.

आणखीही तयारी होत आहे. कांहीं पैका बराऊन यास पलटणांतील जर-बांचे सामानास दिला आहे. परंतु तेथून वर्तमान सत्य असल्यास पलटणां-समागमेंच सामान येईल असा सुमार आहे. सामानगडाहून किल्लेदाराचीं पत्रें पाण्याचे वगैरे सामानाचे हलाकीचीं ग्रामस्थांस[1] येत होतीं तीं दरम्यान इकडे सांपडलीं गेलीं. सबब त्यावरून ती॥ राजश्री दाजीसाहेबांची रवानगी तिकडे ठाणीं बसल्यास बसवावयास जाली आहे. पन्हाळेकडील अंगचे मोर्चांचा ठराव जाला नाहीं. तूर्त मार्गावरोध करून आहों. गडकरी यांजकडून प्रस्तुत तहाचा प्रकार व्हावा म्हणोन यत्न होत आहे. इकडील करवीरचें बोलणें आहे त्यांचें मानस मोबदला सामानगड निदान रांगणा द्यावा असें आहे. सारांश कैलासवासी वडील पुण्यवान् त्या योगें तूर्त पलटण-वाल्यांस इरे प्राप्त जाली आहे. श्री इच्छेनें शेवटास जावें म्हणजे यथास्थित आहे. तूर्त मसाल्याची मार्गप्रतीक्षा आहे. आल्यानंतर तयारीच आहे. आणखी आढळेल तें अनालस्यें सेवेशीं विज्ञापना लिहीन. वडिलांचे चरणांवांचून दुसरें कांहीं नाहीं. गोरबंद[2] व सरोसर[3] पाठवणेंस आज्ञा व्हावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

५३६५ श्री. ( चैत्र शु० ३–२८ मार्च. )

पै॥ छ० ५ जिल्काद. इंदुवार.

सेवेशीं बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना. छ० २ जिल्काद पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष स्वामीनीं छ० २३ सवालचीं पत्रें पाठविलीं तीं छ० २८ मिनहूस पावलीं. लिहिला मजकूर कळला. राजश्री बाळोबातात्या यांची प्रकृत चांगली आहे. राजश्री मोरोपंत आल्यावर एक दोन बैठका जाल्या. आणखी एक दोन होतील. नंतर मशारनिल्हेची रवानगी करितों. लढाई महकूब करावी म्हणोन पंधरा दिवसांचा करार करून वकील पत्रें घेऊन गेले आहेत तीं आजपर्यंत पोंहचलींच असतील. हा कारभार घाटगे यांचे भिडेमुळें जाला. तुर्त घाटग्याची प्रबळता. त्यास केवळ त्याचेच हातीं कारभार असेंही नाहीं. परंतु उगेच ढवळाढवळ करावयास चुकत नाहीं. हा रागरंग पाहून तूर्त समयावर नजर देऊन ( बाळोबा ) तात्यानीं त्यास नादीं लावून घेतलें आहे. सारांश आपापल्या मतलबासारखे हुशारीनें आहेत. सविस्तर मजकूर मोरोपंत याजबरोबर सांगून पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ करवीरकरांस. २ गोरबंद = घोड्याच्या तोंडास शोभार्थ घालण्याचा पट्टा. ३ घोड्याच्या गळ्यांत घालावयाचा एक दागिना.

नं. ५३६६ श्री. (चैत्र शु० ३–२८ मार्च.)
नक्कल असलबमोजीब.

पै॥ छ० २ जिलकाद.

विज्ञापना. (बाळोबा) तात्यानीं दोन दिवस गलबलीमुळें आपले घरीं कंपूंतील लोक चौकी पाहाऱ्यास आणिले आहेत. तात्यांस पूर्ण भरंवसा सतलंज साहेब यांचा आहे. वरकड दोन कंपूंचा भरंवसा पुरत नाहीं. ईश्वर इच्छेनें काय घडेल पहावें. एक कंपू स्वाधीन पक्केपणें आहे त्याअर्थी विलग न पडे असें वाटतें. भवितव्यच न कळे. पत्रें पाहून स्वामीपासीं रहावीं. षट्-कर्णीं न व्हावीं. याउपर अधिक लिहिणें अवघड आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५३६७ श्री. (चैत्र शु ३–२८ मार्च)
असल बमोजी नक्कल

पै॥ छ २ जिलकाद.

विज्ञापना. रा॥ धोंडोपंत गोखले आपले सरंजामासुद्धा छ० १८ सवालीं मंदवारीं करवीरचे मुक्कामीं येऊन तेचं दिवशीं भेट घेतली. दोन पलटणें व गारदी मिळोन तीन साडेतीन हजार पायदळ व चार हजार पर्यंत फौज सहा तोफा याप्रमाणें सरंजाम आहे. मागाहून सविस्तर लिहून कळवूं. पोक्त सरंजा-मानिशींच आले आहेत. सरकारचें एक पत्र जरबेचें सरंजामी वगैरे तालुकि-यांतील ऐवज घेतला असेल तो त्यांचा त्यांस देणें (असें आलें पाहिजे.) सरकारी पत्रानें ऐकणें कळतच आहे, परंतु घेऊन पाठविणें म्हणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. ऐसियास मशारनिल्हे पोक्त सरंजामानिशीं आहेत व त्यांची नजरही चांगली दिसत नाहीं. यास्तव बहुत जपून असिलें पाहिजे. चांगला पोक्त गृहस्त मध्यस्त पडून मशारनिल्हे शपतपुरःसर मेळवून घेतल्यास चांगलें आहे. नाहींतर त्यांस फिसादी बहुत आहेत त्या स्वामीचे ध्यानांतच आहेत, परंतु सेवकही वारंवार लिहीतच आहे. या प्रसंगीं कोणावर विश्वास ठेवणें चांगलें नाहीं, यास्तव आंतील बातमी त्यांची वरचेवरी आणवून त्याचे रंगावर चालावें. सारांश भरंवसा धरावयाचा नाहीं. तितका लोभ धरून

---

१ पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची आहे. हें पुण्याहून बाळाजीपंत सहस्रबुद्धे यानीं रामचंद्रपंत आपास लिहिलें. २ पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची आहे. पत्र पुण्याहून सहस्रबुद्धे यांचें रामचंद्रपंत आपांस.

मेळवून घेतले असतां या समयांत विश्वास ठेवणें आवघड. स्वामी सर्वज्ञाण आहेत. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५३६८ श्रीगणराज. ( चैत्र शु० ३—२८ मार्च. )

पै॥ छ० २ जिल्काद्. चैत्रमास. सन मय्यातैन व अल्लफ.

विज्ञापना. चिरंजिव राजश्री रामचंद्रपंत आपाकडून पत्रें आलेलीं पाहिलीं. पाहोन माघारीं पाठविलीं आहेत. राजश्री बळवंतराव लक्ष्मण यांचें पत्र पाठविलें आहे. श्रीगजाननर्निर्मितापुढें कोणाचा इलाज आहे ? उत्तर लिहावयास सुचत नाहीं. वेदमूर्ति आले त्यानीं मला तीन प्रश्न केले. १ आपण लष्करास यावें. सर्व व्यवस्था आज्ञेप्रमाणें होईल. २ लाख रुपये कर्ज द्यावें. महाल लावून देतों पाहिजे ते. ३ दारू पांच खंडी पहिली दिली. हल्लीं पांच खंडी दिली पाहिजे. उत्तरें १ लष्करास यावयाचें, त्यास तीर्थस्वरूपांची तुमची माझी गांठ पडली पाहिजे. २ कर्जाचा प्रकार त्यास ज्यास महाल पाहिजे तो दिलीया कोणी कर्ज देईल. ३ दारू पांच खंडी दिली आहे. पलटणांसमागमें आणखी पांच खंडी दिली याप्रमाणें उत्तर केलें. गृहकृत्याची एकी आजचे प्रसंगीं करावी. काल परम दुर्घट आला. श्रीमंत राजश्री नारायणराव घोरपडे यांस मकँारग्रामास पाठवितां, मिरजेचा विश्वास राहिला नाहीं ! अशा गोष्टी बोलिलों. काय उत्तर करतात पाहावें. बाळाजीपंत सहस्रबुद्धे आतां लिहितात, 'सर्वांनीं एकरूप असावें'. मागें लिहीत नव्हते ! मुख्य श्रीगजानन पार करणार. परिणामी दुःखाचें चिंतन करूं नये. रवाना छ.२ जिल्काद्. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३६९ श्री. ( चैत्र शु० ३—२८ मार्च. )

पै॥ छ० १६ जिलकाद. सन मय्यातैन चैत्र.

राजश्री बाळासाहेब गोसावी यांसीं अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ बापूजी शिंदे. दंडवत. विनंती येथील कुशल ता॥ छ० २ जिलकाद जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. इकडील वर्तमान धोंडजी वाघ फौजसुद्धां जालिहाळ तालुक्यांतून येऊन गदगची पेठ मारून ठाण्यास मोर्चे देऊन बसला आहे. पुढें सावनुर तालुका आदीकरून कित्तूरपर्यंत शिलशिला करणार. आम्ही उगेच राहिल्या आसपास तालुके देखील वैराण होतील. त्या जवळ पांच हजार फौज, पांच हजार पायदळ, दोन तोफा,

१ पत्र रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें मिरजेस बाळासाहेबांस. २ सेनापति कापशीकर. ३ मंगळवेढ्यास.

याप्रमाणें भरणा आहे, तेव्हां हजार दोन हजार स्वार पायदळ ठेऊन त्याचे मोकाबल्यास उभे राहिल्याखेरीज परिणाम नाहीं. सध्यां नवा भरणा करावयास आरंभ केला आहे. दोन तीनशें स्वांर पांच सहाशें पायदळपर्यंत ठेविलें. आणीकही आलेल्यांस ठेवितों. येविशीं राजश्री आपासाहेब यांसही पत्र लिहिलें आहे. आपणास कळावें. पत्राचें उत्तर आलें पाहिजे. राजश्री बापू परचुरे व बापूजीपंत दोडवाडकर यांसही आपले विचारास येईल तशी सूचना असावी. माझ्यानें होईल त्यास मी चुकणार नाहीं. बहुत काय लिहिणें कृपा लोभाची वृद्धि करावी हे विनंती.

नं. ५३७० श्री. ( चैत्र शु० ३—२८ मार्च. )

असलबमोजीनक्कल.

पै॥ छ० २ जिलकाद.

विज्ञापना[1] ऐसीजे, राजश्री गणपतराव भिकाजी यांजकडील फौजेचा ठराव करोन कोणत्या तारखेपासून दर स्वांरास काय द्यावें हें रा॥ तात्यांस[2] पुसोन याचा ठराव करोन लिहिणें म्हणून आज्ञा, ऐसीयास हा शिंदे यांचे घरचा कारभार. आज विचाराव्यास गेलें असतां मनस्वी बोलणीं पडतील. आम्हीं बुडाल्यास त्याचें कांहीं जात नाहीं. येथील खंबीर चांगला होता याजमुळें हे दिवस दृष्टीस पडले. येथील आसरा कमी पडतांच बोलणें भिन्न दिसों लागलें. येविषयींचे पर्याय पेशजी लिहिलेच आहेत. येथें ठराव करून घ्यावयाचा नाहीं. पेशजी लिहिल्याअन्वयें उत्तर साफ जालें असतां ते ठराऊन देतील. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५३७१ श्रीगणराज. ( चैत्र शु० ३ – २८ मार्च. )

पै॥ छ. २ जिल्काद. चैत्र मास. सन मय्या तैन व अलफ.

अपत्यें[3] साष्टांग नमस्कार विज्ञापना. छ. २९ सवाल बुधवारीं गणपतराव नि॥ शिंदे यांजकडील धरणें वडिलांकडे बसलें होतें. सायंकाळच्या चार घटका दिवसास भोजनास उठले. ' वैशाख वद्य प्रतिपदा पावेतों फडशा करावा, तूर्त पंचवीस हजार रुपये चार रोजांत द्यावे, ऐसा ठराव झाला आहे. पानसे यांची तोड पडली नाहीं. आपले ठेवगुकीची हुजरात व पथक यांस

---

१ पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची आहे. पत्र रामचंद्रपंत आपास पुण्याहून बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे यांचें. २ नानांचा. ३ पत्र नारायणराव यांचें मिरजेस बाळासाहेबांस.

पैशाचें दर्शन नाहीं. महागाईमुळें लोकांस फांके होऊं लागले.[1] चिरंजीव राजश्री महादाजीपंत दाजी आज सुमुहूर्ते कूच करून सामानगड तालुक्यांत जावयासाठीं आले. कळावें. कृष्णमृत्तिकेची[2] कमती फार. धारवाड व कुसेगल व कराड येथें कारकून गेले आहेत. जाऊन दहा बारा रोज जाहले. माघारे आले नाहींत. नागोपंतआपा यानीं एक कच्चा खंडी दारू दिली. सखोपंत लिमये पुण्यास राजश्री बाळोबातात्या पागनीस यांजकडे पाठविला आहे. पुण्यांत अलिजाबहाद्दर यांचे घरीं सखाराम घाटगे व बाणाजी शेटे यांची प्रबलता होऊं लागली. माजी कारभारी यांचा ठराव कैसा होतो पहावें. याप्रमाणें वर्तमान आहे. श्री इच्छा प्रमाण! बाळोजी कुंजर व गंगराव म्हणोन नवा गृहस्थ आहे ऐसी उभयतांचीच चाल फार श्रीमंतांजवळ आहे. सारांश पुण्यांत बेदाच आहे. येथील स्थळ[3] रक्षून संधान करावें. लांबवूं नये. मसलत लांबविल्यास शेवटास कशी जाईल न कळे, याजमुळें आटोप्यांत आणावीसें मानस आहे. काय घडतें पहावें. बराऊनसाहेब हल्ला माघारी हटली याजमुळें बहुत शरमिंदा आहे. तह करूं नये म्हणून वडिलांजवळ बहुत प्रकारें श्रमी होऊन बोलतो कीं, "इंग्रजी हल्ला फिरली याजमुळें आमचा नामोश जातो. ऐशास एक वेळ जंगी सामान दारूगोळा द्यावें. श्रीकृपें फत्ते होईल. तत्राप न जाहल्यास तोंड दाखविणार नाहीं." पुण्याहून सतलंजसाहेब खासा चार पलटणें घेऊन येत[4] होता, परंतु अलिजाबहाद्दर याणीं सतलंजसाहेब यास जाऊं नये, पलटणें पाठवावीं, म्हणून सांगितलेवरून[5]

नं. ५३७२ **श्रीगणराज.** ( चैत्र शु० ४–२९ मार्च )

पै॥ छ० ४ जिल्काद. सनमय्या तैन. चैत्रमास.

विज्ञापना. छ ३ जिल्काद पावेतों सुखरूप असो. विशेष. काल छ० २ जिल्कादीं ती॥ राजश्री रामचंद्रपंत आपानीं[6] चिंतामणराव आपा यांस व बाबासाहेब यांस आज्ञा केली कीं, करवीरचे पश्चिमेकडे दोन चार गांवांत वस्ती आहे. रोजिना कहीस उपद्रव करितात. तर तुम्हीं उभयतां जाऊन गांव मारून यावें; म्हणोन आज्ञा केली. त्यावर काल चिंतामणराव सांगितलेप्रमाणें तयार होऊन आले तों बाबासाहेब तयार झाले नव्हते. मग आप्पासाहेब माघारे गेले. दुसरे दिवशीं मंदवारीं बाबासाहेब तयार

---

१ उपास पडूं लागले. २ दारूची. ३ बाळोबा तात्यांचा टिकाव. ४ करवीर घेण्याचा इरादा सोडून. ५ रामचंद्रपंत आपांजवळ. ६ पत्र इतकेंच अपूर्ण सांपडलें.

झाले तों आपासाहेब तयार नव्हते ! वरकड कही आमचे गोटाची वगैरे पुढें गेली. नंतर गांवकर राशिवडेकर आणि एक दोन गांवचे मिळोन कहीवर चालोन घेऊन कही भरलेली आणि नदीतून अडविली. अर्धी कही त्यानीं वळली. तों आम्हांकडील प्यादे बारगीर वगैरे व कुरुंदवाडकरांकडील आणि गोखलेकडील वगैरे लोक मिळोन पाठीवर गेले. इतक्यांत बाबासाहेब एकटेच गेले होते त्यांस वर्तमान कळतांच फौज व पेंढार चालोन गेले. त्यांची व यांची झटापट झाली. तों बाबासाहेब यांजकडील लोकांनीं गांवकर यांस गांवांत मोडून घातलें आणि गांव जाळिला. गांवांत थोरले दोन वाडे मात्र राहिले. आंत माणसें आहेत. गांवास अग्निप्रवेश करून वडील माघारे आले. राशिवडें याकडेस गेले नव्हते. हसूर म्हणोन गांवाचें नांव—तेवढेंच दग्ध करून आले. वडील गेले होते म्हणोन कही फारकरून आली. नाहीं तर सारीच ( शत्रूनें ) न्यावी अशी कांहीं वेळ आली होती. परंतु ईश्वरें पार पाडली. आम्हांकडील उंट नफर ३ पाडाव गेले व सालिते सुमार ८ व भारकस गेले व पलाणें एक व झूल एक गेली. सारवान असामी एक ठार पडला व एकास जखमा लागल्या आहेत. वरकड खैर आहेत. पागेचीं तट्टें वगैरे शाबूत आहेत. वरकड शिलेदारापैकीं वगैरे गेले आले समजलें नाहीं. चिरंजीव राजश्री त्रिंबकराव आपाकडील एक उंट गेला व बारगीर गोळी लागून जखमी आहे. ती॥ राजश्री बाबांकडील पागेचीं घोडीं दोन ठार पडलीं व दोन जखमी आहेत. बारगीर असामी ४ जखमी पेंढारी व लमाण व शिलेदार मिळोन पंचवीस सुमार जखमी आहेत. पेंढारी व लमाण दोघे तिघे ठार जाहले असें वर्तमान झालें. आणखी पत्ता लागल्यावर लिहितों. कळावें सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३७३ श्रीगणराज. ( चैत्र शु० ४—२९ मार्च. )

पै॥ छ० ४ जिल्काद. सनमय्यातैन. चैत्र.

अपत्यें नारायणानें दोंनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० ३ जिल्काद यथास्थित असे. विशेष इकडील वर्तमान तर जासुदाबरोबर लिहिलेंच आहे त्याजवरून विदित होईल. आज वडिलांकडे मोर्चांत बळवंतराव लेले व गणपतराव ऐसे गेले होते. त्याणीं वर्तमान सांगितलें कीं, पुण्याहून पंधरा दिवसाचे फुरसतीची चिठी आली जे, "गोळा वाजवूं नये. करवीरकरानीं रसद नेऊं नये. कुमक बाहेरील आणोन

घेऊन जाऊं नये. मिंताड पाडिलें असेल त्याची उस्तवारी करूं नये. मोर्चा आहे त्याजप्रमाणें कायम राखून असावें." याजप्रमाणें लिहिलें आलें याचा विचार पंधरा रोज उगेंच राहून काय करावें हें घाटत आहे. आपणाकडे व ती॥ राजश्री दादासाहेबांकडे पत्रें लिहून पाठविलीं आहेत. पुण्यास राजश्री बाळोबातात्या पागनीस यांजकडे वारंवार पत्रें जातात. "कैलासवासी भाऊसाहेब यांचे पाठीमागें आपण चित्तावर घेऊन मसलत उभी केली. हल्लीं तहाचें बोलणें हुजूर ठरतें हें होऊं नये. करवीरास एक वेळ श्रीमंतांचें निशाण चढावें. नंतर किल्ला त्यांचे हवालीं केल्यास चिंता नाहीं. न होय पक्षीं आम्हांस आज्ञा द्यावी. कुटुंबासह श्रीमहायात्रेस जाऊं. आम्हीं येथें राहून नक्ष रहावयाचा नाहीं." ऐसें बहुत प्रकारें लिहून पत्रें रवाना केलीं आहेत. काय उत्तर येतें पहावें. राजश्री गणपतराव पानसे यांचें धरणें कालपासून मंदवार तिसरा प्रहरपर्यंत बसलें होतें. वडिलानीं स्पष्ट उत्तर केलें कीं, पैसा मजजवळ मिळावयाचा नाहीं. आपण तोफांसुद्धां जाणार तर जावें. ऐसें उत्तर झालें. पैसा निर्माण नाहीं हें समजोन पानसे यानीं नगारा केला. तेव्हां वडिलांस पक्केपणें समजलें कीं, जातात. तेव्हां गणपतराव नि॥ शिंदे अलिजाबहादर यांस मध्यस्ती सांगितली. परंतु ठरलें नाहीं. आज भोजनास मात्र उठले. उद्यां ठराव करावा ऐसा बेत ठरला आहे. काय घडतें पहावें. सेवेशी विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३७४ श्री. ( २९ मार्च. )

पै॥ छ० ७ जिल्काद. सन मय्यातैन. चैत्र.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी दोनी कर जोडून त्रिकाल चरणावर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत चैत्र शुद्ध ४ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री बाळाजी नाईक भिडे याणीं पुसिलें कीं, नाना वारोन अठरा रोज जाहले. मिरजेहून बोलण्यास सरकारांत कोण आला आहे ? असें विचारलें. नंतर "नानांचें वर्तमान कळल्यानंतर यावयाचा, त्यास फाल्गुन मासही सरला. या उपर होईल. श्रीमंत राजश्री चिंतामणराव आपांकडून येथें फकीरचंद चोपदार व खिजमतगार आहे. आपण आजोबा. आपल्यास पत्रें येत असतील." असें मी बोललेनंतर नाईकानीं उत्तर केलें कीं, आमचें त्यांचें ठीक नाहीं. बाई आम्हांवर रागानें येथें होती. त्यांचें मला कांहीं ठाऊक नाहीं. आहे तो बाळासाहेब आहे. नाना वारले. बायकोही वारली. हें सुतक फिटल्यानंतर राजश्री मोरोबादादा पुण्यास येणार. नानांची फडणिशी त्यांस सरकारांतून सांगणार. दादा येथें

आल्यावर राजश्री बाळासाहेबांविशीं मी त्यांसीं बोलोन सरकारांत बोलोन बाळासाहेबानीं येथें यावें असें करून कल्याण होय तें करितों. असें भिडे बोललेनंतर तुम्हीं बोललां हें मिरजेस समजलें पाहिजे असें बोललों. मी बोललों असें लिहून पाठवा असें भिडे बोललेवरून वडिलांस लिहिलें आहे. व "राजश्री शंकराजी भिकाजीकडील कारकून मिरजेस नूतन गेला आहे त्यास ही मी हा मजकूर सूचना बाळासाहेबांस करावयाविशीं सांगितला आहे. त्याणें सांगितला असेल." असें नाना भिडे बोलले. वडिलांस समजावें. नानांच्या दोघी स्त्रिया सिद्धटेकाहून नाना वारल्यानंतर तिसरे दिवशीं वाड्यांत आल्या. थोरली बायको आजारी होती ती चैत्र शु० २ गुरुवारीं प्रहर दिवसास देवाज्ञा झाली. तिची क्रिया दायाद तीन दिवसांचा भानू आहे तो करीत आहे. नानांची क्रिया राजश्री प्रभाकरपंत भानु गंगाधरपंत भानूचा भाऊ याणीं केली. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५३७५ श्रीगणपति. ( चैत्र शु॥ ५ – ३० मार्च.)

पै॥ छ० ६ जिल्काद. सन मय्यातैन चैत्र शु ॥ ७ सोमवार.

अपत्यें रामचंद्रानें दोनी कर जोडून शिरसा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० ४ जिल्काद वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. सावधपणाविशीं आज्ञा, त्यास आज्ञेप्रमाणें आहें. सामानगडाकडे चिरंजीव दाजीस फुटोन रवाना करणें चांगलें नव्हे म्हणोन लिहिलें, त्यास पोटाचें मोठें अवघड. परंतु वडिलीं लिहिलें तें खरें. यास्तव कोगनोळीसच मुक्काम करविला आहे. काल पत्रें करवीरकरानीं आम्हाकडे पाठविलीं. दौलतराव शिंदे यांचीं व सर्जेराव घाटगे व बाळोबा तात्या यांचीं पत्रें आणोन आम्हांस व त्यांजकडील फौजेंतील राजश्री गणपतराव भिकाजीस व टोपीकरांस आणून लाविलीं. त्यांतील मजकूर करवीरकरांकडून विश्वासराव घाटगे व राजश्री रायाची जाधव व रामचंद्र जोशीराव बोलावयास येत आहेत. ते येऊन ठरावांत येईजे पावेतों तेथें गोळागोळी बंद करणें". अशीं आलीं. करवीरकरांस इतकी संधी सांपडली तेव्हां दिवसगतीवर पडलें. वरकड तेथील पुण्यांतील प्रकार आहेत ते राजश्री बाळाजी विष्णु यांच्या पत्राच्या पुरवण्या नऊ आल्या आहेत त्या पाठविल्या आहेत त्यांवरून सर्व ध्यानांत येईल. पाहून माघाऱ्या पाठवाव्या. आम्हांस पोटाची अडचण. हें दीर्घसूत्रीं पडलें. शिंद्याचे फौजेस, पलटणांस (पैका पाहिजे) खेरीज आपलें पोट, याखेरीज कांहीं

सुचत नाहीं. याचा विचार कसा करावा तो ल्याहावा. इतका व्यूह करून शेवटीं असें फोल जालें. पुढें कसें करावें ते आज्ञा जाली पाहिजे. मी रात्रंदिवस हुशार आहें. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३७६ श्री. ( ३० मार्च )

पै॥ छ० ७ जिल्काद. सन मय्या तैन. चैत्र.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना चैत्र शुद्ध ५ पावेतों वर्तमान बालकाचें यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री अमृतरावसाहेबांस दिवाणगिरीचीं वस्त्रें श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेबानीं वर्षप्रतिपदेस दिलीं. ‘ देवावें ’ करूं लागले. दरबार रावसाहेबांकडे भरतो. राजश्री नारोपंत चक्रदेव पहिल्याप्रमाणें कारभार रावसाहेबांजवळ बसून करितात. राजश्री बाळोबातात्यांस कुल्ल्यावर करट झालें आहे. पंधरा रोज जाले. हैराण त्यानें फार केलें आहे, व ज्वरांशही आहे. नानांचे समाचारास यावयाचें (त्यांस) सामर्थ्य (जालें ) नाहीं. राजश्री आबा चिटणीस यांजलाही ज्वर येत आहे. मोदी यांजलाही वाखा आहे. बाळोबा कृष्णातीरीं जावयासीं आज्ञा मागत होते. ( शिंदे जाऊं ) देत नाहींत. या उपर तुळापुरास भिमेस जावयास निरोप शिंदे यांजपाशीं मागत आहेत. निरोप झाला नाहीं. होणार आहे असी बाजारबोलवा आहे. राजश्री गोविंदराव काळे किल्ल्यावर आहेत व शिवरामपंत थत्ते. गणेशपंत कात्रे असे किल्ल्यावर आहेत त्यांस आणणार. सनदा लिहिल्या अशी जनवार्ता बहुत आहे. राजश्री मोरोबादादा सुतक फिटल्यावर पुण्यास येणार असें बोलतात. सर्जेराव व बाणाजी शेटे व फकीरजी गाढवे शिंद्यापाशीं खलबतें करितात. सर्जेराव मागती शिंद्याकडील दिवाणगिरी कारभार मागीलसारखा करून सरकारांत बोलण्यास येणार असें बोलतात. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५३७७ श्रीगणराज. (चैत्र शु० ५–३० मार्च.)

पै॥ छ० ४ जिल्काद. सन मय्यातैन. चैत्र.

विज्ञापना. महाराजांकडून तहाचें बोलणें बोलावयाकरितां बचाजीपंत देऊळगांवकर व वाकनीस व आपाजीपंत ऐसे तीन असामी आले आहेत. गणपतराव निसबत शिंदे यांचे गोटांत उतरले आहेत. पुण्याचीं पत्रें त्यांनींच

---

१ पत्रावरील तारीख व मिती पैवस्तीची. पत्र नारायणराव यांचें मिरजेस बाळासाहेबांस.

आणिलीं आहेत. कोणें प्रकारें तह ठरला हा बेत येथें कळला नाहीं. याजकरितां वडिलांचे चित्तीं परभारें तह होऊं नये ऐसें आहे. बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे याणीं लिहिलें आहे कीं, सतलंज साहेब यांचें म्हणणें " इंग्रजी हल्ला फिरली त्याजपक्षीं हल्ला करून करवीर घेतों. नंतर तुम्हीं कोणास देणें त्यास द्यावें. मोठा आग्रह पडला आहे. काय निश्चय ठरतो पुण्यांत हें न कळे. येथें बराऊनसाहेब यांचाही मोठाच इरादा हल्ला करावयाचा आहे. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३७८ श्री. ( चैत्र शु० ५--३० मार्च )

पै॥ छ ७ जिल्काद. सन मय्या तैन. चैत्र शु. ८ बुधवार.

सेवेशीं विज्ञापना तागायत छ ४ जिल्काद पावेतों सेवकाचे वर्तमान यथास्थित असे. विशेष स्वामीनीं छ०२४ सवालचें पत्र पाठविलें तें पावलें. श्रीमंत नानांनीं एकाएकीं कैलासवास केला. आतां विवेक करणें सर्वांस प्राप्त. ईश्वरी सत्ता प्रमाण. नानांचें उत्तरकार्य राजश्री प्रभाकरपंतभानु आंबेगांवकर यांजकडून उत्तम प्रकारचें केलें. उभयतां मातुश्री तिसरे दिवशीं पुण्यास आल्या. नानांचे पंधरावे दिवशीं थोरली मातुश्रीस देवाज्ञा झाली. पुत्राची विचारणा होत आहे. श्रीमंत मोरोबादादा जुन्नरास आहेत. तेरीख राजश्री नारोपंत चक्रदेव घालीत आहेत. शिंदे, नबाब व इंग्रज यांचा विचार नानांच्या स्त्रीस पुत्र द्यावा म्हणोन बोलत आहेत. घडेल. चिंता नाहीं. श्रीमंत पंत प्रधान सर्वांचे सांगितल्यावरून कृपा करितील असें वाटतें. ( आपण ) घरकलहाचा फडशा करून टाकावा हेंच चांगलें. करवीराकडील वर्तमान पत्रीं लिहिलें तें कळलें. पुढें होईल तें लिहावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५३७९ श्रीगणराज. ( चैत्र शु० ६--३१ मार्च. )

विज्ञापना. पुण्याकडील वर्तमान येथें ऐकण्यांत आहे कीं, विदुरगृहीं पूर्ववत् प्रकार कारभाराचा आहे. घटारवाची प्रबळता विशेष नाहीं. इकडील मसलतीचा नेट चांगला आहे. येथें गणपतराव आहेत त्याणीं फौजेच्या धरण्याचा गवगवा पेजशी वडिलांजवळ येऊन केला; अधिक उणी कबुलायत करून घेतली, हें वर्तमान संकर्षणास कळोन त्याणीं गणपतराव यांचे बंधूस

---

१ पत्र बाळकृष्णपंत बाळ यांचें पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस. २ मोरेश्वरराव आबाचें लष्करांतून बाळासाहेबांस पत्र. ३ शिंद्याच्या दरबारीं बाळोबातात्याचाच बोलबाला आहे. ४ घाटग्याची. ५ रामचंद्रपंतांजवळ ६ बाळोबातात्यास.

निषेध केला कीं, अन्न तुमची वाढविली हें तुमचे मनांत न येतां दंगा केला हें चांगलें नव्हे. मर्जीनुरूप ( आमच्या चाकरीस ) रहाणें तरी रहावें असें सांगितलें. व येथें वडिलांकडे साहित्यपत्र 'उपद्रव न करणें. समजोन रहावें.' अशीं पत्रें आलीं आहेत. परंतु दिलीं नाहींत. बराऊन साहेब येथून गेला हा लढाईचे कामास बहुत हुशार होता. हल्लीं डाससाहेब आहे हाहि बराच आहे. तीर्थस्वरूप राजश्री महादाजीपंत दाजी आहेत तेथें आहेत. मालवणाहून पलटणें करवीरकरांचे कुमकेस यावीं अशी वदंता आहे, परंतु ती प्रमाण नव्हे. यांतील कारण जे, धारवाडचे स्वारींत लिटलीसमागमें लिहिण्याचे अधिकारावर इटावसाहेब म्हणोन होता तो प्रस्तुत गोमांतकास आहे. त्याजसमागमें पलटणें चार आहेत. त्यास त्याचीं पत्रें वडिलांस आठ पंधरा दिवसांत आलीं जे, दोस्तीची बढती असावी असा भाव आहे. तेव्हां पलटणें येणें समजतच आहे. सरकारी अंतःकरण इकडील लक्षास नीटसें तूर्त नाहीं. पुढें श्रीइच्छा. बाबा फडणीस जावयाचे होते; परंतु गेले नाहींत. तूर्त तासगांवींच आहेत, कारण जे त्यांचा कारभार उद्दाम. मोठ्या कामावर गेले असतां ठीक नव्हत. आपल्यास प्रतिबंधक होईल. विदित होय हे विज्ञापना. आज इंदुवारीं रात्रौ पलटण पाठवावयाचा बेत होता. परंतु पाठवून आंतील मोर्चा उधळून दिला नाहीं. हे विज्ञापना.

नं. ५३८० श्री. ( चैत्र शु० ६–३१ मार्च. )

पै॥ छ० ५ जिल्काद.[1]

विज्ञापना. हल्ला माघारी फिरल्यावरून सतलंजसाहेब आपल्या जागें बहुत अर्जुदे जाहले. घाटगेही पत्र त्यांजवळ मागत होते, परंतु त्याणीं दिलें नाहीं. त्याचा नेट विना ठाणें सर केल्यावांचून दुसरा व्यवहार करावयाचा नाहीं. आपल्या इतल्यानें बराऊनसाहेब चालले नाहींत याजमुळें त्यांजवर रोष बहुत. येथून डाससाहेब टोपीकर बराऊनच्या ऐवजीं बरोबर एक कंपनी चौसष्ट लोकांची देऊन त्याची रवानगी आपणाकडे केली, त्यास आजचा पांचवा दिवस. आजपर्यंत पोचले असतील. त्यास सांगणें आहे जे, आपासाहेब व तुम्ही एक होऊन ठाणें बशर्त घेऊन कापून काढणें. याबद्दल कोणा-

---

१. गणपतराव भिकाजीस देण्याकरितां रामचंद्रपंताकडे बाळोबातात्यांनीं धाडिलीं आहेत. २ पत्रावरील तारीख पैवस्तीची आहे. पत्र बाळाजीपंत सहस्रबुद्धे यांचें पुण्याहून करवीरास रामचंद्रपंत आपास.

सही- वाईट वाटो. याप्रमाणें सतलंजसाहेबांचा नेट आहे. स्वामीस सविस्तर समजावें म्हणोन लिहिलें आहे. तेथें वहिवाट कशी आहे ती लिहिली पाहिजे. मनोदयानरूप घडेल तें खरें. सेनेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५३८१ श्री. (वैशाख–एप्रिल.)

इंग्रजांचा जमाव पट्टण चित्रदुर्ग बिदनूर तीन स्थळीं आहे. इतर स्थळीं कार्याकारण आहे. राजश्री पूर्णय्या कर्णीक चेनापट्टणास जावें म्हणोन कोळीससाहेबसुद्धां कोल्हारपर्यंत गेले होते. त्यास चेनापट्टणाहून पत्रें आलीं जे, कर्णीक याचे घरीं मुंज आहे. तुम्हीं पट्टणास जावें. मागाहून लिहिलें येईल त्या प्रमाणें करावें. त्याज वरून कोळीस साहेब इंग्रज व कर्णीक श्रीरंगपट्टणास दाखल झाले. कोल्हापुराकडे सरकारच्या फौजा भारी आल्यामुळें इंग्रज हुशारींत आहेत. धोंडजी वाघ अनेगुंदी प्रांतीं आहेत त्याचें नांव करून हल्याळ पर्यंत स्वांर येत आहेत. इंग्रजांनीं मुलूख घेऊन पूर्णयाचे स्वाधीन केल्यामुळें रयतेस पैसा भारी टिपूचें प्रमाणें लाविला, सबब कितेक पाटील नाडगीर जमीदारांची लक्षें धोंडजीकडे जाऊन राहिले आहेत. धोंडजी या प्रांतीं आला असतां ठाणीं पडावयास उशीर नाहीं. परंतु इतकें झालें असतां श्रीमंतांचें राज्याशीं वांकडें इंग्रजांचें आहे. धोंडजी त्यांचे तालुकेंत आला असतां आधीं धारवाड घ्यावें अशी इंग्रजांची मसलत आहे. पुढें समजून गेलें आहे. कसें होतें पहावें. बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. ५३८२ श्रीगणपति. (चैत्र शु० ७–१ एप्रिल)

पै॥ छ. ० ६ जिल्काद. सन मय्या तैन व अल्लफ.

विज्ञापना. नवा टापींकर आला आहे याचें हरद्र कारकून पाठवून घेतलें. 'त्यांत ठाणें घेईनच. गोळा मना व्हावयाचा नाहीं.' असेंच बोलणें झालें. दारूगोळा सामान मुबलक पाहिजे. आज रुबरू (मला भेटावयास) येणार आहेत. जें ठरेल तें विनंती लिहितों. "अस्मानतडाखा गाड्यावर चढवून सिद्ध झाला. बैल वगैरे सामान हत्तीसुद्धां पाठवून घेऊन जावें."

---

१ मासूरचे ठाणेदार वासुदेव काका पटवर्धन शीळकर यानीं बाळासाहेबांस लिहिलेल्या पत्राचा हा अखेरचा बंद एवढाच मिळाला. २ पत्र रामचंद्रपंत आपाचें बाळासाहेबांस ३ शिंद्याच्या पलटणांवरचा नवीन इंग्रज आफिसर डासंसाहेब, हा ब्राऊन साहेबाच्या जागीं आलेला.

म्हणोन आज्ञा केली, त्यास सिद्धता करून पाठवितों. विदित होय हे विज्ञापना. मौजे दुधगांव येथें पन्हाळेकर याणीं तोफा मार्गशीर्ष मासीं लाविल्या होत्या त्यावेळचे गोळे आंत आलेले गांवकरानीं जमा करून ठेविले आहेत यास्तव त्यांस आज्ञापत्र पाठवावें म्हणजे आणून घेईन. लवकर आज्ञा आली पाहिजे. विदित होय हे विज्ञापना.

५३८३ श्रीगणपति. ( चैत्र शु० ८–२ एप्रिल. )

पै॥ छ० ९ जिल्काद. सन मय्यातैन व अलफ. चैत्रमास.

अपत्यें रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ७ जिल्कादपर्यंत यथास्थित असे. विशेष. वडिलीं आशिर्वादपत्र पाठविलें तें पावलें. "राजश्री बाळाजी लक्ष्मण नि॥ अलिजाबहाद्दर रहिमतपूरचे जमिनीविशीं पेंत्रे घेऊन आले आहेत. त्यास यामागें तरी अशी पद्धत नव्हती. उत्तर येईल तसें करूं." म्हणोन आज्ञा, ऐशियास "महाल सरकारांतून सरंजामास आहे. जमीन दुसरीकडे दिली असतां सरंजामाचे पुरवणींत ऐवज कमी पडतो. येविशीं आज्ञा व्हावी." असें उत्तर लिहून द्यावें. पुढें ईश्वरइच्छेनें घडेल तें घडो. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३८४ श्रीगणराज. ( चैत्र शु० ९–३ एप्रिल.)

पै॥ छ०९ जिल्काद. सन मय्या तैन. चैत्र मास

अपत्यें नारायणानें दोन्ही कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ०८ जिल्काद यथास्थित असे. विशेष. वडिलीं आशीर्वादपत्र मदार सांडणीस्वाराबरोबर पाठविलें तें छ०६ रोज मंगळवारीं चार घटका रात्रीस पावोन लिहिला मजकूर कळला. ऐवज आला त्याची पावती अलाहिदा नाईक यांचे नांवची पाठविली आहे. पावेल. पागेकडील जिन्नस आला त्याची पावती पाठविली आहे. राजश्री धोंडोपंत गोखले यांचे मोर्चे नदीपासून पुढें गेले. पंचवीस चाळीस हात जागा साधली. जरबा नेऊन ठेविल्या. मकान कायम केलें. आज गोखले यांचे मोर्चेवर सायंकाळच्या दोन घटका दिवसास आंतील दोनशें माणूस बाहेर पडलें होतें. वरील जरबांची मारगिरी बहुत झाली. इकडीलही मारगिरी मुबलक झाली याजमुळें हटून किल्लेंत गेले. जायां जखमी काय माणूस जाहलें हें पक्केंपणें

---

१ पत्र बाळासाहेबांस. २ पेशव्यांचीं पत्रें. ३ पत्र लष्करांतून मिरजेस बाळासाहेबांस. ४ शहरांतून तोफांची.

समजण्यांत आलें नाहीं. आल्यावर सेवेशीं लिहितों. काल गोखल्यांचे लष्करचीं गुरें गडकरी याणीं दोन तीनशें नेलीं. गडकरी गडाखालीं अलीकडील बाजूस कांहीं जमाव घेऊन उतरले आहेत म्हणून बोलतात. झुटी लढाई करून एकीकडे हल्ला करावी या मनसबेंत रामचंद्रपंतआप्पा आहेत. हल्ला आदितवारीं नेमली आहे असें वर्तमान आहे. मोर्चांचें सामान बहुत निकडीनें जात आहे. बेतांत गोष्ट लवकरच येईल. वडिलीं आज्ञापत्र प्रथम कांहीं मजकुराचें लिहिलें, त्यास आज्ञेप्रमाणें वर्तमान समजलेप्रमाणें लिहितों. चिठी आज्ञेप्रमाणें झाली. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३८५ श्रीगणपति. ( चैत्र शु० ९–२ एप्रिल. )

पै॥ छ. ८ जिल्काद गुरुवार सन मय्या तैन व अल्लफ.

[1]अपत्यें रामचंद्रानें दोन्ही कर जोडून शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. बराऊन साहेब जखमी झाला म्हणोन बदली तेथून[2] दुसरा डाससाहेब आला. त्याचें म्हणणें "आपले पलटणचे तोफेचे गोळे दारू द्यावी म्हणजे लवकरच या कामाचा उलगडा करतों," असें म्हणतो. त्यास दारू थोडीबहुत मेळविण्याचा यत्न केला आहे. परंतु गोळेवांचून अडलें आहे. दीड शेरी दोन शेरी सव्वादोनशेरी अडीचशेरी असे गोळे पाहिजेत. त्यास वडिलीं या समयास लिहिलें या प्रतीचे गोळे तीनशें ''ारशें गोळे सांडणस्वार पाठविला आहे याजबरोबर पाठवून द्यावे. दिवस पर्जन्याचे. ( आपण ) खर्चाचे पेंचांत. मध्यें काम शीतल पडलें होतें तें फिरून सुधारलें आहे तों गोळयामुळें अडलें आहे ! वडिलीं यासमयीं गोळयांची पुरवणी केली असतां श्रीकृपा करीलसें दिसतें. त्यांचें मागणें विशेष नाहीं. तर ती॥ राजश्री धोंडोपंत बाबा विनंती करतील ती मनांत आणून लवकर गोळे आले पाहिजेत. नानांची स्त्री थोरली वारली. पत्र पुण्याहून आलेलें पाठविलें आहे त्यावरून विदित होईल. बहुत काय लिहिणें. अस्मानतडाखा तयार जाला त्याचे गोळे शिलकेस आहेत कीं नाहीं ते आज्ञा करावी. हे विज्ञापना.

नं. ५३८६ ( ३ एप्रिल )

धोंडो केशव नेने याचें हुबळीहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र चैत्र शुद्ध नवमीचें.

---

१ पत्रावरील तारीख व मिती पैवस्तीची आहे. पत्र बाळासाहेबांस. २ पुण्याहून. ३ वळींवाच्या पावसाचे.

" धोंडजी वाघ याची आवई आली. गदगास मोर्चे दिले आहेत. अद्यापि ठाणें घेतलें नाहीं. आपण सडा तीन चार हजारांनिशीं कोठें गेला याचें ठिकाण नाहीं. तमाम महालांच्या खंडण्या घेतो. फौज चार हजार व पायदळ चार हजार येणेंप्रमाणें फौज आहे. मी आजच निघोन परगणे तडसास जातों. सावनुरास यावयाची कस्त त्याची भारी आहे. सावनुरास आलियावर तडस पांच कोश जवळ. तेथें उपद्रव होईल. स्वामीचे पुण्यप्रतापें निवारण होईल. सरकारच्या फौजा आल्यावर सहजच पारिपत्य होईल. तूर्त राजश्री बाळकृष्णपंत सरसुभेदार यांजवर त्याची कस्त भारी आहे. सुभेदार राणेबिन्नुरास गेले."

नं. ५३८७ श्रीगजानन. ( ३ एप्रिल. )

पै॥ छ० १२ जिल्काद सन मय्या तैन.

अपत्यें बापूजी त्रिंबक परचुरे शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत चैत्र शु॥ ९ नवमीपावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून यथास्थित असों विशेष. इकडील वर्तमान धोंडजी वाघ गदगास येऊन आज दहा दिवस जाहले. पेठ घेऊन लुटली. ठाणें अद्याप लढत आहे. आंतील दम बराच आहे. पुढें काय होईल तें पहावें. मुळगुंद व आणीगिरें येथील घासदाणा, खंडणी मामलेदार यांणीं कबूल केली. मुळगुंद येथील रा॥ बाळाजीपंत यांणीं वीस हजार रुपयेवर खंडणी उरकोन वसुलास राऊत आणिले आहेत व आणीगिरें येथीलही वीस हजार रुपयांवर खंडणी उरकली. पुढें कुंदगोळ हुबळीपर्यंत राऊत येणार. येविशीं आज्ञा काय ते करावी. खंडणी कबूल केली तरी विश्वास धरितां येत नाहीं. पेठेचें तमाम गुळें जाहलें. वसूल बंद जाला. या प्रांतांत कोणी त्राता नाहीं. सर्व भर श्रीसांबावर आहे. फौजा येऊन बंदोबस्त जाला तरी क्षेम व ठाणीं राहतील. सेवेशीं कळावेंकरितां विनंति लिहिली आहे. वाघाचे गडबडीमुळें शंभर दीडशें लोक ठेविले आहेत. दारूगोळा सरंजाम केला आहे. विदित होय. बहुत काय लिहिणें कृपालोभ करीत जावा हे विज्ञापना.

नं. ५३८८ (चैत्र शु० १०–४ एप्रिल.)

वासुदेव धोंडदेवें[1] यांचे मिरजेस बाळासाहेबांस[2] पत्र. छ० ९ जिल्कादचें. ठाणें मासूर येथून—

" धोंडजी वाघ दहा हजार फौजेसहित गदगास येऊन मोर्चे लाविले

१ लागू. २ पटवर्धन शीळकर.

आहेत. सावनूर प्रांतांत उपसर्ग देणार अशी आवई आहे. आजपर्यंत कांहीं उपद्रव केला नाहीं. गदगचें ठाणें घेतल्यानंतर पुढें काय करतो पहावें. बातमीस माणसें पाठविलीं आहेत. येतांच वर्तमान लिहून कळवितों. इंग्रजांकडील जमाव चित्रदुर्गास पांच सहा पलटणें आहेत. वाघ तुंगभद्रा पार होऊन दुर्गप्रांत अगर हरपनहळ्ळीच्या रोखें गेले असता तोंडावर पलटणें येणार अशी आवई आहे. श्रीरंगपट्टणाहूनही पलटणें रवानगी केली म्हणून वर्तमान आहे. बिदनूर तालुकेंत सरहद्देस जागजागां तरीकिरें व शिकारपूर व धारवाडास नजीक सोंदे तर्फ हल्याळ सांबराणी येथें दोन हजार चार हजार पावेतों ( इंग्रजाचा ) जमाव आहे. वाघाची दहशत भारी. त्याजकडून बिदनूर प्रांतांत व सावनूर तालुकेसहित झाडून गुळें[1] जालें. सरसुभा राजश्री बाळकृष्णपंतभाऊ हावनुरास होते त्याणीं राणेबिन्नुरास आले त्यामुळें तालुका अगदीं मोकळा पडला. आम्हांस भेटीस येणेंविशीं पत्रें पाठविलीं होतीं. एक दोन रोजीं एक वेळां जाऊन बोलून त्यांची मसलत काय ठरावांत येती तें समजून येतों. पट्टणास बातमीबद्दल मुजरद जोडी रवाना केली आहे. दोन रोजांत येतील. वर्तमान येईल तें लिहून पाठवितों."

नं. ५३८९ श्रीगणराज. (चैत्र शु ७ १२–६ एप्रिल.)

पै॥ छ० ११ जिल्कादू. सन मय्या तैन. चैत्र.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. जंगी सामानाची तयारी प्रथम एक वेळ दीडखंडी दारू आणली. आणखी तीन खंडी दारू कराडाहून आणविली आहे. बैल आणावयास गेले. कुरुंदवाडाहून वडिलांनीं[3] पक्के दीड खंडी दारू दिली ती आणावयास उंटें गेलीं आहेत. गोळा वडिलांकडून येत आहे. सामान दृष्टीस पडल्यावर हंमामा सुरू करून कार्य करावें हा इरादा आहे. श्रीनें सिद्धीस न्यावें आणि यश यावें. काय घडतें पहावें. श्रीमहालक्ष्मीस एक सहस्र रुपयेचा गांव द्यावा, पूर्वी इनाम गांव, देवाचे व ब्राह्मणांचे गांव जमिनी आहेत त्या चालवूं, म्हणोन श्रीस प्रार्थना करून ब्राह्मण कांहीं अनुष्ठानास लाविले आहेत. येणेंप्रमाणें आहे. डाससाहेब याचा दारूगोळा पुण्याहून सतलंज साहेब यांणीं रवाना केला आहे. धारवाडाहून

---

१ लागू. २ पत्र नारायणराव यांचें लष्करांतून मिरजेस बाळासाहेबांस. ३ रघुनाथराव दादांकडून. ४ तुम्हांकडून.

कांहीं मसाला छ० ४ जिल्कादीं रवाना जाहला म्हणोन पत्र आलें आहें. बाजारी कैफीयत सर्जेराव घाटगे याणीं श्रीमंतांस अर्ज केला कीं, करवीरकर बहुत हलाख जहाले. तहाचें बोलणें ठरावास आणावें. त्याजवरून श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, पन्नास लक्ष रुपये सरकारांत द्यावे. भाऊचें घर जळलें आहे व खून जाहला आहे तो जाबसाल तेथें सरदार आहेत त्यांजपाशीं बोलून द्यावा. प्रांत पूर्ववत्प्रमाणें त्यांचे हवालीं करावा. वावगी वर्तणूक करूं नये. ऐसें उत्तर जाहलें आहे म्हणोन वर्तमान आहे. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं ५३९० श्रीगणराज. ( चैत्र शु० १२–६ एप्रील. )

पै॥ छ० ११ जिल्काद. सन मय्या तैन. चैत्र.

विज्ञापना[1]. करवीराहून माणूस एक मोर्चांत आला तेथें डाससाहेब याजकडील लोकांनीं धरिला. त्याणें किल्लेंतील मजकूर सांगितला. बारुद सरली. दररोज चार मण कच्चे होती तेवढी खर्च होते. गोळा मुबलक आहे. माणसांस दररोज कैली शेरभर जोरी व राँगी देतात. मिठाची व मिरच्यांची कमती फार पडली आहे. हिंमत चांगली आहे. पाणी पन्नाळें व जितीचे ओढ्याचें आणितात. लोक कार्याकारण पळून जातात. हगवण लागली आहे. येणेंप्रमाणें आहे. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३९१ श्रीगणराज. ( चैत्र शु० १२–६एप्रिल. )

अपत्यें आबानें साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ११ जिल्काद पावेतों वडिलांचे आशीर्वादें करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं आशीर्वादपत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर आज्ञेप्रमाणें कळला. इकडील मजकूर तर डाससाहेब याचा मानस एक दोन रोजांत गडबड करावी असा होता व आहे. परंतु मसाला नवता सबब आज राहिले. त्यास पुण्याहून दारू व गोळे सामान आलें तें बागणीस आलें. उदईक यावें असें आहे. मसाला पावल्यावर जलदी व्हावीसें आहे. श्रीजगदंबा प्रसन्न होईल तेव्हां खरें. दारूगोळा आल्याचे बातमीवरून गडकरी यांनीं झुकावा केला असें वर्तमान. परंतु इकडूनही कुमक मार्गांत गेली व बागणीस असतां तसनस जाली नसेलसें दिसतें. मागाहून सामान पावल्याचें शोध करून सेवेशीं लिहितों. सविस्तर

---

१ पत्र नारायणराव यांचें लष्करांतून. २ दारू. ३ नाचणी. ४ दारूगोळा लुटून नेण्याचा यत्न केला.

तीर्थस्वरूप रा॥ नारायणराव काकांचें पत्रावरून श्रुत होईल. गोरबंद व सरोसर आज्ञेप्रमाणें पाठवावयास आज्ञा व्हावी. सेवेशीं श्रुत होय. स्थळांतून बाहेर माणसें सांपडतात. मिठाचा तोटा आहे. हे विज्ञापना.

नं ५३९२ श्रीगणराज. ( चैत्र शु० १२–६ एप्रिल. )

पे॥ छ० १३ जिल्काद. सन मय्या तैन. चैत्र.

अपत्यें नारायणानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथिल क्षेम तागायत छ० ११ जिल्काद यस्थास्थित असे. विशेष. आज कहीची चाकरी आम्हांस व चिरंजीव रा॥ आपांस आली होती. फौज रा॥ आप्पाजी गोविंद यांजबरोबर पाठविली होती. कही भरून आले. कळावें. पौर्णिमेस ग्रहण राशीस आलें आहे. त्यास नागबिंब तीळपात्र ऐसें बुधवारीं येथें पोहोचेल ऐसें रवाना जाहलें पाहिजे. महादाजीपंत बेडेकर यांस पत्र पोंहचून जबाब आणून सेवेशीं पाठवीत आहें. पावेल. चतुरसिंग कांहीं जमावानिशीं गडाहून आले, याजकारितां दोनतीन पागा वडगांवाकडे रवाना केल्या आहेत. बागणीस दारू गोळी टोपीकरांची पुण्याहून आली आहे. एक दोन रोजांत येथें दाखल होईल. गडकरी यांजकडील जनाव दारू गोळी आली आहे त्याचे मोहल्यावर आला ही बातमी येथें समजल्यावर अलिजाबहाद्दर यांजकडील पांचशें स्वार व ती॥ रा॥ बाबासाहेब यांजकडील पेंढारी ऐसे रवाना रातोरात केले आहेत. कळावें. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं ५३९३ ( ६ एप्रील. )

धोंडो बापूजीचें पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र चैत्र शु॥१२ चें. " राजश्री बाळोबा तात्यास आरोग्य आहे परंतु तो कारभारामध्यें मन घालीत नाहीं व आबाही घालीत नाहीं. सर्जेराव मन घालणार. कार्याकारण बोलणेंही सर्जेराव करूं लागले. परंतु तात्यांस विचारलेशिवाय शिंदे करीत नाहीं असा प्रकार बोलवा आहे. "

नं ५३९४ श्रीगजानन. चैत्र शु० १२–६ ( एप्रिल )

पै॥ छ० १३ जिल्काद. सन मय्या तैन व अलफ. चैत्र.

श्रियाविराजित राजमान्य राजश्री गंगाधररावाजी स्वामीचे सेवेशीं पोष्य धोंडो[1] बल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल

---

१ गोखले, सरदार.

तागायत छ० ११ जिल्काद जाणून स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. वेदमूर्ति बाळकृष्णा भट लेले राजापूरकर यांजवळ कृष्णाजीपंत चितळे याचे स्त्रीनें वस्तवानी ठेवावयास दिली होती. त्यास बहुतेक भटजी वर्तमान असतां चितळे यांची त्यांस माघारी दिली व कांहीं बाकी राहिली त्याजकरितां यांस सरसुभा प्रांत कोंकण यांजकडून मसाला करून पुण्यास नेलें. तेथें पंचाईत होऊन बाकी ठरली त्याचा फडशा केला म्हणोन भटजींनीं घरीं आपल्या मुलास पत्र लिहिलें. उपरांत भटजी घरीं राजापुरास येतांना चिपळोणास मृत्यु पावले. याजकरितां चितळे यांणीं भटजीचे घरीं कारकून पाठवून त्याचे स्त्रीची वस्तवानी वगैरे घरांतील चीजवस्त होती ती घेऊन भटजींचें हातची याद आहे ती व फारीखत देतों म्हणोन स्त्रीस व मुलीस मिरजेस घेऊन आले आणि अटकेंत ठेविली होती. त्यास यांजमध्यें कांहीं त्राण नाहीं. अन्न वस्त्रास थारा नाहीं. बायकोचा विषय ! मातुश्री साळूबाई याणीं कृपा केली म्हणोन जिवानिशीं मात्र जगली. पुढें कोणेही प्रकारें यांचें जाणें घरीं होय तें करावें. भटजींचें वर्षश्राद्ध समीप आलें याजकरितां यांस गेलें पाहिजे. मूलही तेथें आहे. वर्षश्राद्धास साहित्य म्हटलें तर तेंही अनुकूल नाहीं असा यांचा विचार आहे. यास्तव आपण कृपा करून यांचा वृत्तान्त समजोन मुक्तता होय तें करावें. बाकी देणें मनास आणितां निघालेंसें जालें तरी मूल लहान आहे तो थोर जाल्यावर सोईसोईनें देईल. यांजमधें ताकद नाहीं. व भटजींस ऐवज ठेवतेसमयीं दोन हजार रुपये देऊं म्हणोन चितळे यांचें आश्वासन आहे ऐसें यांचे म्हणण्यावरून समजलें हें एक, व भटजींचें पत्र फडशा केल्याचें मुलास आलें हें दोन. तिसरें यांचे नातवानीचा विचार. आपल्या ध्यानांत सर्व अर्थ आलेच असतील. तरी यांचें जाणें होऊन तेथें गेल्यानंतर कदाचित् चितळे यांचा उपसर्ग जाहल्यास राजश्री नारायण रावजी सुभेदार यासीं आपलें पत्र असावें, म्हणजे त्याचें निवारण करितील. लेले आमचे परम स्नेही होते व आत्तही आहेत. यास्तव अगत्यवादें लिहिलें आहे. आपण अगत्यवाद धरिला पाहिजे. सारांश ब्राह्मणाची स्त्री अनुत्पन्न. आपण गरीबनवाज आहेत. कृपा करून मुक्तता व्हावी. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दिला पाहिजे हे विनंति.

नं. ५३९५ श्री. (६ एप्रिल)

छ० २९ सवाल. सन मय्या तैन व अल्लफ. चैत्र शु० १

पु॥[1] सेवेशीं विज्ञापना. काल श्रीमंत राजश्री आपासाहेबांची गांठ मोर्चांत पडली तेवेळेस त्यांनीं सांगितलें, नाना फडणीस सर्वांचे छत्र होतें. विशेषतः आम्हांस तर त्यांवांचून त्राता दुसरा दरबारीं कोणच नाहीं. ईश्वर-सत्तेनें ते गेले. पुढें दरबारांत कोणाशीं बोलावें ? कसें करावें, या विवंचनांत पडलों आहों. राजश्री धोंडोंपंतबाबा जोग यांस विचार पुसावयाकरितां मिर-जेस वडिलांकडे पाठविले व वेदमूर्ति दीक्षितांस कुरुंदवाडीं पाठविले आहेत. उत्तरें येतील त्या अन्वयें करूं असें मजपाशीं......... तेथें स्वामींजवळ जो ......... जाहलेंच असेल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५३९६ (फाल्गुन व० १४ श. १७२१–२४ मार्च.)

" विज्ञापना. इकडील वर्तमान तरी त्यांजकडील आंतील दहा पांच मुरदे खंदकांत पडले होते व इकडील मुडदेही पडले होते. सबब आंतील लोकांनीं बाहेरील मुडदे न्यावे, आम्ही आंतील नेऊं, असें सांगितलेवरून जिकडील तिकडे मुरदे नेले. आंतील चार पांच माणूस चांगलें जायां जालें असें वर्तमान आहे. इकडील तपशिलें विनंती लिहिलीच आहे. शुक्रवारीं दोनप्रहरा गडावरील पेंढारी वगैरे दोन चारशे स्वार श्रीचे डोंगराजवळ आले होते त्यांचे मोकाबिल्यास येथूनही पेंढारी काल गेले होते. इतक्यांत त्यांचें कूच होऊन माचीस गेले. इकडील पेंढारी याणीं कांहीं पाडापाड करून बैल आणिले. काल रविवारीं मोर्चानजीक रंकाळेचे आंगें हवा मारून शेदोनशें प्यादे आंतून मोर्चांवर आले. पलटणांतील चोर पहारेकरी याणें पाहून हुषारी केली परंतु पक्के माऱ्यांत येऊं दिल्हे. नंतर छऱ्यांचे बार केले तेणेंकरून पांचसहा माणसें ठार जाहलीं व आठ दहा जखमी जालीं. तेव्हां माघारे पळोन गेले. इकडीलही दोन तीन माणसें जखमी जालीं. पुण्यास दारूगोळ्याविशीं पलटणांतून पत्रें गेलीं होतीं त्याजवरून रविवारीं अस्तमानीं पुण्यांतून गोळे दोन हजार व दारू येणेंप्रमाणें सामान आलें व मागाहून दोन पलटणेंही येत आहेत. दोन तीन रोजीं येतील असें वर्त-मान व होळकराचे फौजेचा दंगा शिंद्याचे सरंजामी तालुकियांत जाला सबब बाया कूच करून त्या रोखें सांप्रदायानुरूप तालुका खराब करीत गेल्या असेंही बाजारी वर्तमान आहे. बराऊन याची जखम बरीच आहे.

---

१ पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची. पत्र बाळाजीपंत जोशी हिपरगीकर यांचें मिरजेस बाळासाहेबांस.

चांगली बरी होयपावेतों आपला अधिकार ग्वालेरीच्या पलटणाचा मुख्य गोरा होता त्यासच पांची पलटणांचा अधिकार सांगितला बराऊनसाहेब याणें, असें वर्तमान आहे.

नं. ५३९७ ( चैत्र शु० १३–७ एप्रिल. )

धोंडो बापूजीचें पत्र पुण्याहून मिरजेस. पै॥ छ. १२ जिल्काद चैत्रमास.

" यशवंतराव शिवाजी यांजसभोंवतीं चौकी शिंदे याणीं बसाविली. राजश्री बाळोबातात्या कारभार करीत नाहीं म्हणतात. आबा चिटणिसांस सांगणार तेही करीत नाहींत. सर्जेराव कारभारी होऊं पहातो."

नं. ५३९८ श्रीगणराज. ( चैत्र शु० १४––८ एप्रिल. )

पै॥ छ० १३ जिल्काद. सन मय्या तैन. चैत्र.

अपत्यें साष्टांगनमस्कार विज्ञापना. करवीरांतून एक ब्राह्मण पन्हाळच्याचे वेशीकडे विठोबाचें देवालय आहे तेथें आला. करवीरांतून धोत्रें धुवावयास बाहेर आला होता. हेमासिंग याचा चोर–पाहारा अघाडीस होता त्यांनीं धरला. त्यास आंतील मजकूर विचारला. त्याणें सांगितलें कीं, रत्नाकरपंत गडास गेला नाहीं. करवीरांतच आहे. कृष्णमृत्तिकेची वगैरे आबादानी आहे. डंगानें दररोज नवी होते आहे. मिठाची कमती आहे. लोकांस हगवण लागली आहे. वरकड कमतीचा प्रकार कांहीं एक नाहीं. श्रीदेवीचे दृष्टांत ब्राह्मणांस होतात त्यांतील अभिप्राय हळद कुंकूं हरभरेचे भिजाणे गूळ ऐसें सवाष्णींस द्यावें. हळदकुंकूं किल्लेवरून टाकावें. माझे हात गोळे लागून फार पोळले. गरमी बहुत होते. ऐसे दृष्टांत होतात. देवीचे अंगास हल्ल्याचे दिवशीं घर्म आला होता. याजप्रमाणें आहे. चोळीपातळें सवाष्णींस देतात. येणेंप्रमाणें आहे. ब्राह्मणाचे म्हणण्यांत " हल्ल्याचे दिवशीं देवीचा पाय मागें पुढें होत होता. मी पाहिला नाहीं. वरकड गांवांत बोलत होते " असें बोलला. खरें लटकें महालक्ष्मीस ठाऊक! विदित होय हे विज्ञापना.

नं. ५३९९ श्री. ( चैत्र शु० १५–९ एप्रिल. )

पै॥ छ० १७ जिलकाद. सन मय्यातैन चैत्र.

विनंती सेवेसीं देवजी कृष्ण देशपांडे कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना

---

१ मोरेश्वर श्रीपत पटवर्धन याचें लष्कर नजीक करवीर येथून पत्र मिरजेस बाळासाहेबांस. २ बाळासाहेबांस शहापुराहून पत्र.

येथील क्षेम ता॥ छ०१४ जिलकादपर्यंत स्वामीचे कृपे सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. यानंतर इकडील वर्तमान तर धोंडजी वाघ याजकडील दोन तीन हजार फौज गदगाहून मुधोळास एकाएकीं येऊन बाहीर राजश्री नारायणराव राजे होते त्यांस जमीयतसुद्धां बुडाविलें. किल्यांत राजश्री महाराव राजे आहेत. गदगावरील फौजेपैकीं कांहीं फौज मोरवेस आली आहे. येकुडी, दोडवाड, मुरगूड, कित्तुर, शहापूर वगैरेकडे ती फौज येणार म्हणोन वर्तमान चहूंकडून आलें आहे याप्रमाणें मजकूर. येथील लोक यात्रेस्तव संवदत्तीस श्रीएकवीरेचे दर्शनास गेले आहेत. तेथें दैवयोगें काय घडतें पहावें ! सेवेसीं होईल तें वर्तमान विनंती लिहीन. गदग लढत आहे. मुळगुंद वगैरे महालांस ऐवज घेतो. होणार काय आहे न कळे. बेळगांवकरांस गुळें प्रांतचें येईल तें ठेऊन घेणेंविशीं आज्ञापत्र सादर व्हावें. पेशजीप्रमाणें उपद्रव करूं लागतील याजकरितां विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५४०० श्री. ( चैत्र—एप्रिल )

काल दृष्टांत जाहला. करवीरची मसलत करितात हीं साध्य किंवा कसें ऐसी योजना केली. त्याजवर रात्रौ दृष्टांत जाहला. "रेडे दोन मारून त्यांचें रक्त अंगास लाविलें. केंस मोकळे सोडिले आहेत. पाठीमागें दोन नागव्या तरवारा घेऊन भाऊसाहेब उभे आहेत. स्त्री मोकळ्या केसाची होती. तिणें उत्तर केलें. 'असें कां करतां ! शहर उजवें घालून रंकाळ्याकडून सन्मुख यावें. तुम्हांस हात देऊन आंत घेतें. याप्रमाणें आहे. स्त्रीच्या एका हातांत वाटी. त्यांत काय आहे म्हणोन पुसिलें. दूध म्हणोन सांगितलें."

नं. ५४०१ श्रीगणराज. ( चैत्र शु० १५–९ एप्रिल )

पै॥ छ० १४ जिल्काद. सन मय्या तैन. चैत्र.

विज्ञापना. तीर्थस्वरूप राजश्री चिंतामणराव आप्पा यांस इकडे फौजसुद्धां रवाना करावें, वरुणतीर्थाचा मोर्चा बिकट, चाकरी कठीण, बलकुबलेस फौजेचा जमाव असावा, याजमुळें वडिलांची रवानगी करावी हा बेत दिसतो. परंतु मोर्चा तीर्थाकडील हा काईम होणें कठीण दिसतें. घडेल तें खरें. पुण्याहून बारुद आली त्यांजबरोबर अलीगोल दोनशें नवें माणूस आलें. पहिले अलीगोल त्यांपैकीं कांहीं माणूस जाग्यां जखमी जाले याजमुळें भरतीस अलीगोल रवाना जाले ते येऊन दाखल जाहले. रणगाडे

करावयाचें काम चालीस लागलें आहे. खंदकावर घालावयास तक्ते करविले आहेत. पलटणांतील पायदळास बारूद व गोळी दिल्हीं. काडतुसें तयार करणेचा हुकूम जाहला. तोफेचे थैले करावयास खादी जामदारखानेंतून देविली आहे. विदित होय हे विज्ञापना.

नं· ५४०२ श्रीगणराज. ( चैत्र शु० १५—९ एप्रिल. )

पै॥ छ० १४ जिल्काद. सन मय्या तैन. चैत्र.

अपत्यें आंबानें साष्टांगनमस्कार विज्ञापना तागायत छ० १४ जिल्काद-पावेतों वडिलांचे आशीर्वादें करून वर्तमान यथास्थित असे. विशेष· वडिलीं आशीर्वादपत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. इकडील वर्तमान तरी पुण्याहून बारूदी सामान अलिजाबहादुरांकडील पलटणांतील यावयाचें होतें तें बैल सर अजमासें सवाशें पावेतों आलें. दीड हजार अजमासें गोळे व पांच सहा खंडी दारू पक्के वजन याप्रमाणें (सामान ) आलें. धारवाडाहून एक खंडी पक्की दारू व पांचशें गोळे आले. कुरुंदवाडाहूनही दीड खंडी दारू आली. व करहाडाहून दीड खंडी दारू आली. व आणखी तिकडून यावी असा बेत आहे. सामान बहुतकरून जमत आहे. एके निकडीचें[1] सामान तूर्त आहे. श्रीइच्छेनें घडेल तें खरें. पुण्याकडील वर्तमान सविस्तर येथें समजण्यांत येत नाहीं. तथापि समजलें तें लिहिलें आहे नानांची प्रकृत तात्कालिक बिघडून कैलासवासी जाले असें वर्तमान आहे. यांतील अर्थ श्री जाणें·![2] कर्नाटकांतून वर्तमान आलें. असें बाजारी बोलतात कीं इंग्रजांनीं धारवाडचे मसलतीची तयारी योजिली आहे. सामान होत आहे. असें वर्तमान आहे. पुण्यांत 'देवावें' श्रीमंत राजश्री अमृतराव करीत आहेत. कारभारांत जम बराच आहे असें बोलतात. सविस्तर वर्तमान तीर्थस्वरूप राजश्री नारायणराव काकांचे लिहिण्यावरून श्रुत होईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

इंग्रज डाकीनसाहेब याचा मानसही हल्ल्याची निकड करण्याचा आहे. कधीं होती पाहावी. हे विज्ञापना.

नं. ५४०३ श्रीगणपति. ( चैत्र शु० १५—९ एप्रिल )

पै॥ छ० १६ जिल्काद. दोन तास रात्र. चैत्र मास. सन मय्या तैन व अल्लफ.

---

१ पत्र मोरेश्वराव आबाचें लष्करांतून बाळासाहेबांस मिरजेस. २ लिहिणारा सुचविती कीं नाना आपमरणानें मेले असें नाहीं!

अपत्यें रामचंद्र परशुराम साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० १४ जिल्काद यथास्थित असे. विशेष रा॥ नारोपंत करंदीकर यांजकडून आंतून मुद्दाम माणूस पत्रें घेऊन आला होता. तीं पत्रें वडिलांकडे पाहावयासीं पाठविलीं आहेत. पाहून माघारीं पाठवावीं मशारनिल्हेनें लिहिलें कीं श्रीनरसोबाचे वाडींत चिटणीसांच्या बायका आहेत ह्या स्वारी पाठवून आणिल्या असतां आपली सुटका होती. यत्न करावा. ती॥ रा॥ दादासाहेब यांस लिहिलें आहे. वडिलींही दादांस लिहावें· कुरुंदवाडास समीप आहे. नारोपंत सुखी आहे. पनाळ्याहून अद्यापि मंडळी पुणेंयास गेली नाहीं. तरतूद करीत आहेत. इंग्रजांकडे[1] पलटणें आणावयासीं नागोजी घाटगे गेले आहेत ते माघारे मालवणास आले. पलटणें येत नाहींत. क्षेत्रांत मीठमिरची नाहीं. माणूस हैराण आहे. हगवणी लागल्या आहेत. याप्रमाणें वर्तमान आहे. वरचेवरी माणसें एक दुसरें येत आहेत. गोंव्यास इंग्रजाकडे पत्रें देऊन (करवीरकरानीं ) माणसें पाठविलीं होतीं तीं आलीं. ते इकडे येत नाहींत. तीर्थस्वरूप राजेश्री वासुदेव काकांचीं पत्रें आलीं त्यांत चित्रदुर्ग बिदनूर, पट्टण तीनही जागीं ( इंग्रजाची ) तयारी होत आहे. धारवाडावर येणार. बिब्याचे पुटाची दारू तयार होत आहे. काकांनीं मुद्दाम मनुष्य पाठविला आहे. पक्कें वर्तमान येईल तव्हां खरें. जुने हुबळीकर याणीं हरीपंत फडके वाघाकडे पाठविले. प्रांत घेऊन त्यास द्यावा ( या हेतूनें ) म्हणोन ती॥ रा॥ गणपतराव काकांचें पत्र आलें. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४०४ **श्रीगणराज.** ( चैत्र व० १–१० एप्रिल. )

पै॥ छ० २७ जिल्काद. सन मय्यातैन. चैत्र.

चि॥ राजश्री बाळासाहेब[2] यांसीं प्राति वासुदेव[3] धोंडदेव आशीर्वाद विनंती तागायत छ० १५ जिल्काद वर्तमान यथास्थित असे. विशेष. धोंडजी वाघ याचें लक्ष भाऊसाहेबाचे पायांजवळ होतें म्हणोन शिकारपूरची लढाई शिकस्त जाली असतां सावनूर तालुक्यास उपद्रव न देतां पूर्वील स्नेह लक्ष्मण हरीचा जाणोन राजश्री बाळकृष्णपंत भाऊजवळ जाऊन गोखले यांचे दाटीमुळें[4] आश्रय करावा, आणि पूर्वील लक्षानुरूप सांनिध्यास यावें, असें मशारनिल्हेचें चित्तांत

---

१ करवीरकरांकडून मुंबईच्या इंग्रजांकडे. २ पटवर्धन भिलवडीकर. ३ पटवर्धन शीळकर मासूर येथील ठाणेंदार. ४ गोखले लुटतील या भयानें.

होतें. तों गोखले येऊन लक्ष्मेश्वरींच फौजेचा गळाठा जाला. नंतर निघोन तोरगल मनोळीस गेला. पुढें भाऊसाहेबांचा काळ जाहला. नंतर मसलतही सरकारांतून करवीरावर होते असें जालें. तेव्हां नरसिंगराव वेंकटराव मुलेंमाणसेंसुद्धां मासुरास होते. त्यांस चि॥ राजश्री आपासाहेबांकडे पत्र देऊन पाठविलें. ते मिरजेस गेले. राजश्री भगवंतराव भिमाजी यांचे विद्यमानें भेट घेऊन येत होते. त्यांस वाघा-कडील म्हणोन अटकाव आपण करून ठेविले आहेत म्हणोन वाघाचे लष्करची बातमी त्यांचें घरीं आली. त्याजवरून मासुरामध्यें बायकामुलें श्रमी होतात. हें वर्तमान मशारनिल्हेचे बंधु राजश्री श्रीनिवासराव घरीं आहेत त्याणीं येऊन सांगितलेवरून हें पत्र आपणास लिहिलें आहे. ते घराणदाज थोर. आपण आज्ञा कराल त्याप्रमाणें वागणूक करणार. यास्तव त्यांस अटकाव केला अस-ल्यास मोकळी होऊन मासुरास पाठवून द्यावें. जामीनाचा वगैरे कोणे विशीं त्यांस उपद्रव न व्हावा. मुलेंमाणसेंच अम्हांजवळ आहेत यास्तव लिहिलें आहे. वाघाचें पत्र आलें त्याची नक्कल पहावयास पाठविली आहे त्याजवरोन कळेल. लक्ष्मेश्वर वगैरे तालुक्यास वाघाकडील उपद्रव होऊं नये म्हणोन पत्रें पाठविलीं आहेत. जमीयत पायदळसुद्धां दहा बारा (हजार) पावेतों त्याची आहे. इंग्रजही आपलाली हद्देनें तयारींत आहेत. होईल वर्तमान तें मागाहून लिहितों. इंग्रजांस तयारीविशीं चेनापट्टणचा हुकूम आहे कळावें. नरसिंगराव वेंकटराव यांस रवानगी करून द्यावी. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. ५४०५ श्रीगणराज. ( चैत्र व० २–११ एप्रिल. )

पै॥ छ० १८ जिल्काद, सन मय्यातैन. चैत्र व॥ ४

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. आज भृगुवारीं ब्रह्मपुरीहून ती॥ रा॥ आपासाहेब यांची चिठी उभयतांचे नांवची आली कीं, बळवंतराव लेले व बाळाजी गणेश जोशी यांस पाठवून द्यावें. त्यास बळवंतराव लेले यांस अवरोध आहे याजमुळें सदाशिवपंत जोशी व बाळाजी गणेश यांस वडिलांकडे पाठविले. त्याणीं आज्ञा केली कीं; सरकारचा मोर्चा बनपुरीचा आहे तो काईम राखून रंकाळ्याचे पाळीवर दुसरा मोर्चा ठरवावा आणि थोरल्या जरबा रंकाळयाचे अंगें आणोन दिवाळतोड करावी. ऐसियास तुम्ही उभयतानीं पलटणसुद्धां कूच करून यावें. धोंडोपंत गोखल्यांचा मोर्चा आहे त्याचे उजवे बाजूस तुमचा मोर्चा बसवावा म्हणोन सांगितलें. गोखले व मुसा इस्मित व डाससाहेब यांजकडील

---

१ पत्र नारायणराव यांचें. २ मला व त्र्यंबकराव आपा कुरुंदवाडकर यांस. ३ सदाशिव कृष्ण जोशी मनोळीकर.

शाहणा पलटणांचा सरदार ऐसे जाऊन मोर्चा धरावयाचीं मकानें पाहून आले. येऊन वडिलांस विनंती केली. गोखले याणीं आपला मोर्चा पुढें चालविला. सरकारी तोफा सुरू करावयाची जागा पाहिली. आज रात्रींत तोफा ठेवावयाचें मकान काईम होईल. येणेंप्रमाणें आहे. आमचें कूच करून जाण्याचा प्रकार तर आज शुक्रवारची रात्र याजमुळें बेत ठरला नाहीं. शनिवारीं कूच करावें तर व्यतिपात आहे. कोणचा विचार ठरेल तो सेवेसीं जाहीर करूं. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४०६ श्रीगणराज. ( चैत्र व० ४—१३ एप्रिल. )

पै॥ छ० १८ जिल्काद. सन मय्यातैन. चैत्र.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. आम्ही कूच करून तिकडे गेले नंतर इकडेस पन्हाळ्याचे अंगें ती॥ रा॥ बाबासाहेब आहेत. ती॥ रा॥ चिंतामणराव आपा यांस इकडे आणावें, आपाजी देसाई निपाणीकर याजकडील पायदळ व कांहीं गार्दी ऐसे देऊन पन्हाळ्याचे पाणी बंद करावें आणि तळें फोडावें, हा बेत आहे. आम्हांस येऊन पाऊण महिना जाहला. चाकरी सरकारची येथें आल्यासारखी दृष्टीस पडली नाहीं. यास्तव तिकडे येण्याविशीं आज्ञा जाहली आहे ऐसें वाटतें. पाहतां अर्थी गोष्ट खरीच आहे. दोनी गोट धोंडोपंतांचे शेजारीं उतरावे, पलटणें व धोंडोपंतांचें पायदळ उतरले आहेत तेथें बुनगें ठेऊन सडे लोक मोर्चांत रहावे, ऐसा घाट आहे. खासा धोंडोपंत आपण राहणार ऐसेंही बोलणें आहे. सारांश आठ रोजांत कोणताही विचार व्हावा ऐसें आहे. खर्चास पैसा नाहीं. लोक उठोन जातात. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४०७ ( चैत्र व० ४—१३ एप्रिल. )

नारायणराव गंगाधर यांचें पत्र मिरजेस बाळासाहेबांस पै॥

छ० १८ जिल्कादचें[1]—

“ पलटणवालेची बारुदगोळी बागणीस आली होती ती लष्करांसें येऊन सुखरूप दाखल जाली. बराऊनसाहेब काल गुरुवारीं सडा पुण्यास गेला चि॥ राजश्री महादेवराव दाजी यांचा मुक्काम कोगनोळीवरच आहे. त्यांजकडील नेमणुकेचे लोक पैका न पावल्यामुळें अद्याप गेले नाहींत. गेल्यानंतर तेथून कूच व्हावेंसें आहे. ”

१ पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची आहे. पत्र नारायणराव यांचें.

नं. ५४०८ श्री. ( चैत्र व० ५–१४ एप्रिल )

पै॥ छ० २ जमादिलाखर. सन मय्यातैन. कार्तिक

विनंती सेवक तिमराव गोविंद. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १९ जिलकाद पर्यंत मुक्काम भागानगर येथील वर्तमान यथास्थित असे. विशेष. छ० १६ रबिलाखरीं करवीरकरांशीं लढाई जाहली, तेथें श्रीमंत भाऊसाहेब कैलासवासी जाहले, हें वर्तमान श्रवण जाहल्यापासून शरीरीं प्राण × × × म्हणोन लिहावें ? ईश्वरइच्छेस उपाय नाहीं. सेवकांनीं मागें येण्याविषयीं आज्ञा पाठवावी म्हणोन एक दोन वेळां विनंती लिहिली होती ते समयीं एक दोन महिने रहावें म्हणोन पत्रें आलीं. त्यावर दोन तीन महिनेपर्यंत इकडे पत्रें आलीं नाहींत. यामुळें माझें रहाणें जालें. सांप्रत श्री॥ राजश्री आपासाहेब यांस विनंती लिहिली आहे. आज्ञा येईल त्याप्रमाणें सत्वरच निघून सेवेशीं येतों. इकडील वर्तमान तरी मीरअलम पट्टणाहून आले ते छ० १२ जमादिलावलीं शहरास दाखल जाहले. ( सामोरे ) दोन कोसांवर आरस्तुजहा बहादूर व राजेंद्र बहादूर जाऊन समारंभेंकरून घेऊन आले. सांप्रतकाळीं यांजवर भिस्त जबरदस्त आहे. सालमजकुरीं मसलतीस यांचीच रवानगी सत्वर होणार अशी वदंता आहे. हजरत बंदेगान अल्ली यांचे पुत्र पोलादजंग यांस आरस्तुजाह बहाद्दूर यांची कन्या देऊन विवाह छ० १ जिलकादीं आरंभ जाला तो छ० २५ रोजीं समाप्त होणार. प्रतिदिवशीं लग्नाचा समारंभ शहरांत होत आहे. सेवेशीं विदित होय. हे विज्ञापना.

नं. ५४०९ श्रीगणराज. ( चैत्र व० ६—१५ एप्रिल. )

पै॥ छ० २० जिल्काद. सन मय्यातैन व अल्लफ.

विज्ञापना. तीर्थस्वरूप राजश्री आपासाहेब याणीं आम्हांस व चिरंजीव रा॥ आपा व ती॥ रा॥ बाबासाहेब यांस पन्हाळ्याचें पाणी बंद करावयास पाठविलें. पाऊण महिना जाहला. पाणी बंद जाहलें नाहीं. वडिलांची आज्ञा एक दोन वेळां आली, परंतु दारूगोळी व मोठ्या जरबा दोन दिलेव्यतिरिक्त काम कैसें होईल हाच विचार सांगत गेले. परंतु पाणी बंद जाहलें नाहीं. नंतर वडिलांचे चित्तीं आलें जे, जवळचे कारभारी यांचे हातून मोर्चा धरावा,

---

१. पत्र बाळासाहेबांस. २ पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची आहे. पत्र नारायणराव यांचें

मेहनत करावी, ते काम करीत नाहींत; ऐसेही समजण्यांत आलें. तदोत्तर वडिलानीं ही चाकरी उपस्थित केली ते समयीं आम्हीं सांगितलें जे, गृहछिद्र[1] याजप्रकारचें आहे हें तुम्हास जाहीर आहे. वडीलें येऊन पाणी बंद करणार हें ठीक नाहीं. आम्ही अगोदर आलों आहों. ही चाकरी करून दाखवूं. अनंतर दिवाळेस तोफा लावून मोर्चा कायम करावयाचा, मोठा नक्ष वाढवावयाचा तो विचार मग करावयाचा, ऐसें सांगितलें. परंतु चिरंजीवांचें मानस 'पाणी बंद करावयाचें काम हलकें. मोठें काम करून लौकिक करावा' हा चिरंजीवानी मनसवा करून सर्वांस वडिलानीं बनपुरींत बोलाविले ते दिवशीं चिरंजीवानीं वडिलांजवळ सांगितलें कीं, गोखले यांचे उजवे हातास मोर्चा आमचे पलटणास निभावणार नाहीं. सरकारी तोफेजवळ आज्ञा जाहली तर पलटणवाला चाकरीस हजर आहे. त्याचे चित्तींही चाकरीचा इरादा मोठा आहे. ऐसें बोलिले. नंतर वडिलांजवळचे बैठकेस बोलणें पडलें तेव्हां मी वारंवार विनंती केली कीं, पहिली चाकरी आम्ही करितों. अनंतर दुसरी. पहिली सिद्ध जाहलेव्यतिरिक्त दुसरी करीत नाहीं ऐसे बोलिलों. अगोदर वडिलांकडे जाते वेळेस आम्ही व चिरंजीवानीं एकवाक्यतेनेंच बोलावें ऐसें रावजी लेले यांचे विद्यमानेंच ठरलें असतां चिरंजीव अपरोक्ष बोलले. चाकरी कबूल केली. आम्ही बोलत होतों, तेथेंच राहावें. तें म्हणणे राहिलें. ऐसा प्रकार जाहला.

नं. ५४१० श्रीगणराज. ( चैत्र व० ८–१६ एप्रिल. )

पै॥ छ० २२ जिलकाद. सन मय्यातैन व अलफ.[2]

[3]विज्ञापना. करंदीकराकडून भारती[4] थोडी बहुत समयानुसार सविस्तर मजकुराची दुर्गस्थ[5] येत असते. काल प्रातःकाळीं दोन पुरवण्या आल्या त्या ती॥ रा॥ काकांस[6] दाखविल्या. त्यांतील भाव सविस्तर काकानीं लिहिल्यावरून श्रुत होईल. "अशा समयीं स्वामिकार्यावर दृष्ट ठेऊन गोष्ट होते. समयानुसार अभ्यंतरीय जंतूंस[7] चामीकर–दापर्न–निश्चय[8] केला पाहिजे. येविशीं प्रत्योत्तर

---

१ चिंतामणरावांची आमची भाऊबंदकी. पद्माळ्याचें पाणी आम्हांकडून बंद झालें नाहीं. तें काम आतां चिंतामणरावांनीं केलें म्हणजे आमची मानखंडना होते. २ चिंतामणराव. ३ पत्रावरील मिती व तारीख पवस्तीची आहे. पत्र मोरेश्वरराव-आबाचें. ४ पत्रें. ५ करवीरच्या किल्ल्यांतून. ६ नारायणरावगंगाधर यांस. ७ किल्ल्यांतल्या लोकांस. ८ सोनें (द्रव्य) देवविण्याचा करार.

आल्यास यत्न करीन. व पुढें परिणाम[1] यथास्थित लागावा " असे भाव भारतींत होते. त्याचें उत्तर मान्यतेचें लागलेंच गेलें. आणखी व्यंकटनामक वर्णाग्र्य[2] ताम्रपर्णीतीरवासी[3] यावयाचा आहे तो आल्यानंतर साध्य भाव होतील. वृत्तांत अष्टविध दशविध आहेत ते वडिलांचें पत्रावरून श्रुत होतील. सारांश हें वर्तमान कृष्णमृदि[4] प्राचीन शून्यता. नवीन उत्पन्न होते. बाह्यतः उद्योग दिनप्रतिदिनीं न जाहल्यास ती संग्रहीं होते. यास्तव तद्विषयीं व्ययार्थ मिथ्या उद्योग होत असावा हें व जलनामापरतीर्थी[5] अवरोध व्हावा म्हणजे जीवनाचाही अभाव आहे, असें विस्तारें ( लिहिलें ) आहे. सारांश विनंती लिहिली आहे. वाच्यता नसावी. काल पुरवणी एक लिहिली आहे तिचें विसर्जन व्हावें. अन्यत्र कोणी पाहूं नये. हे विज्ञापना.

नं. ५४११ श्रीगणराज. ( चैत्र व० ८–१६ एप्रिल. )

पै॥ छ० २२ जिलकाद, सन मय्यातैन व अल्लफ.

अपत्यें आबानें साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २१ जिलकादपावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून वर्तमान यस्थास्थित असे. विशेष. वडिलीं आशीर्वादपत्र पाठविलें तें पावलें. मजकूर कळला. गोरबंद व मखमली जरी सरोसर पाठाविली ती पावली. चांगली आहे. इकडील वर्तमान सविस्तर पेशजी लिहिलें आहे. अलीकडील वर्तमान तरी काल भौमवारीं रात्रौ पहांटेस श्रीकालीचे देवालयाजवळ आंतील लोक मोर्चा बांधून होते त्यांजवर निकड करून उधळून दिलें. दोनशें लोक होते. शिंद्याकडील पलटणाच्या तीन चार कुंपण्या व गोखले यांजकडील लोक व मुसा इस्मित याप्रमाणें लोक जाऊन कालीचे देवालयांत राहिले. ती॥ रा॥ आपासाहेबही ते

---

१ या खटपटींत मी मेलों गेलों तर माझ्या कुटुंबीयांचा सांभाळ करावा. २ ब्राह्मण. ३ हा कोण ? तांबें हा गांव मोंगलाई हद्दीस आहे व तांबी नदी कोकणांत आहे. तांबे, तांबीकर, तांबेकर, तांबवेंकर यांपैकीं कोणच्या तरी आडनांवाचा हा असावा. नांवावरून माणूस कर्नाटकी भासतो व कानडीच्या अनुरोधानें हेमगी हें आडनांव येथें अधिक संभवतें. ४ दारूचा तुटवडा करवीरच्या किल्ल्यांत पूर्वीपासूनच पडला आहे नवीन तयार होते तिचा दररोज खर्च होत न गेल्यास संग्रह होऊं लागेल. याकरितां नेहमी हल्ल्याच्या वगैरे खोट्या हुलकावण्या दाखवून किल्लेकऱ्यांस दारू खर्च करणें भाग पाडावें. ५ वरुणतीर्थ वेशीला मोर्चा बसवावा म्हणजे आंत पाण्याचा दुष्काळ पडेल.

समयीं तेथें होते. नंतर तेथून वरुणतीर्थानजीक मोर्चा कायम करावयास गोखले यांचे कनिष्ट पुतणे बापू आरब वगैरे सामान घेऊन गेले. तेथें कस्त चांगलीच करून मोर्चा कायम केला. वरुणतीर्थानजीक जाऊन पोहोंचले. इतःपर त्या पाण्यास होईल तसा उपद्रव करण्याची सोय होत आहे. आंतील लोकांस पाणी तेवढेंच. गोखले यांजकडील पांच असामी ठार व वीस पंचवीस जखमी जाले. जुमामर्दुमी चांगली आहे. इतक्या कृत्यांत आपासाहेब रंकाळयानजीक नंदीजवळ होते. कालीचें दर्शन घेऊन नारळ ठेऊन आले. इतकें करून पांच घटका दिवसास माघारे वडील आले. मुसाइस्मित कालीचे जागीं एके तोफेपाशीं आहे. आंतील लोक नारळी बागेंत तुटक येतात. खंदकांतही कांहीं लोक आहेत. मोठाच जागा साधिला. तीर्थ फुटलें असतां व पश्चाळें धरिलें असतां आंतील दम कमीच व्हावासा सुमार आहे. लक्ष्मण तोफ ही नव्या जाग्यास न्यावी असें आहे. पहावें. मुसाइस्मित दोन प्रहर रात्रीस येथून गेला तो उत्तरेश्वराजवळच होता. चार घटका रात्रीस प्रारंभ केला. नंतर बुधवारीं प्रातःकाळीं दहा घटका दिवसास गोखले यांचे येथें बातमी आली कीं, गडाहून लोक पुढें चालून आले. म्हणोन आपा गोखले फौजसुद्धां गेले. मागाहून उभयतां वडील गेले. आपासाहेबानीं नाना फडणिसांचें पथकही पाठविलें होतें. दोन प्रहर पांच घटका दिवस पावेतों तेथें होते. गडकरी यांचें एक घोडें गोळीनें ठार जाहलें वगैरे तपशील वडिलानीं लिहिलेवरून कळेल. उत्तरेश्वराजवळ मोर्चे गेले त्याचा तपशीलही वडिलांचे लिहिलेवरून कळेल. सेवेसी श्रुत होय. राजश्री गणपतराव पानशी ती॥ रा॥ महादाजीपंत दाजीसमागमें लहान तोफा घेऊन सामानगड तालुक्यांत जाणार. हे विज्ञापना.

नं. ५४१२ श्रीगजानन. ( चैत्र व० ११–१९ एप्रिल.

पै॥ छ० २६ जिल्काद. सन मय्यातैन व अल्लफ.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं प्रती विनायक भास्कर आशीर्वाद उपरी येथील क्षेम ता॥ छ०२४ जिलकाद यथास्थित असे. विशेष. अलीकडे आपल्याकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तर सदैव पत्र पाठवीत जावें. इकडील वर्तमान तर राजमंडळाचें बोलणें आलें आहे. राजश्री केसोपंत काळे व

---

१ वरुणतीर्थ. २ बापू गोखल्यांचा थोरला भाऊ. ३ हरिपंतबाबा व चिंतामणराव आपा.

हरबा आपा ऐसे बोलावयास गेले होते. वरकड कलमें बहुतेक मिळतात परंतु परभारें ( करवीरकर ) शिंदे यांजकडे बोलतात. दौलतराव यांचें पत्र आलें कीं 'रघुनाथराव माने सल्लेचें बोलणेंस येणार त्यांजबरोबर स्वार देऊन पुण्यास पोहोंचाऊन द्यावे. ऐसीं पत्रें येतात " तुम्ही इकडेही बोलतां, तेव्हां तुम्ही कोणाकडे काय बोलतां हें पक्कें समजेना ! " ऐसें लिहून पत्र पाठविलें आहे. काय उत्तर येतें पहावें. केसोपंत फडणीस व हरबा आपा यांजबरोबर जाबसाल महाराजांकडील " दहा लक्ष रुपये देतों. त्याजपैकीं एक लक्ष रुपये घराबद्दल देतों व भाऊसाहेब यांचें खुनाबद्दल दहावीस हजार रुपयेचे गांव देतों. अकीवाट चिकोडी मनोळी देतों. शिरोळचें ठाणें चांगलें हौसेने बांधलें आहे. भूदरगड नानांचे आज्ञेवरून घेतला आहे. त्यास इकडील वकिलांनीं उत्तर सांगितलें जे, नाना गादीवरून गेले[2] किल्ल्यास. त्याजपक्षीं त्यांचें लिहिणें मानावयाचें नाहीं. शिरोळ व भूदरगड द्यावा. शिंद्यांची फौज आहे त्यांचे पैक्याचा जाबसाल परभारें तिकडेच बोलावा. सरकारी खंडणीचा जाबसाल बोलावा. तह ठरावांत येईल. घराचा व भाऊसाहेब यांचे खुनाचा जाबसाल बोलूं नये. ऐसें बोलावयाचें मानस चिरंजीव राजश्री आपासाहेब यांचें आहे. कोणताही जाबसाल ठरत नाहीं. काय घडेल तें खरें. वरचेवर वर्तमान चिरंजीव बाळाजी गणेश याजवळ सांगत आहों. तो आपणास लिहीतच आहे. राजश्री नानाकडील साठे याणीं कारकून चिरंजीव[3] याकडे बैसविले होते. त्यास चिरंजीव रा॥ आपा याणीं साफ सांगितलें जे, मिरजेस जाऊन आपला जाबसाल करून घेणें. येथें मुलांस पुसावयाचा नाहीं. कारकुनांस उठवून नेणें. त्यावरून त्यांचा कारकून उठून गेला आहे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. ५४१३ श्री. ( चैत्र व ११–१९ एप्रिल. )

२

[4]घराबद्दल द्यावे. भाऊसाहेब यांचे खुनाबद्दल गांव द्यावा. आकिवाट,

---

१ सबब शिरोळ व भूदरगड देत नाहीं. २ फडणिशी जाऊन नगरच्या किल्ल्यांत कैदेंत गेले. सबब त्यांचें बोलणें सरकारांत मंजूर समजावयाचें नाहीं. ३ बाळासाहेब यांचे पुत्र नारायणराव यांजकडे कर्जाच्या वसुलीकरितां. ४ मोरेश्वरराव आबानीं बाबासाहेबांस लिहिलेल्या पत्राचा हा पुढचा बंदच तेवढा मिळाला. यांत बहुतेक मागच्या पत्रांतल्या मजकुराचाच अनुवाद केला आहे.

शिरोळ, चिकोडी, मनोळी देतों. शिरोळचें ठाणें चांगलें हौसेनें बांधलें आहे. रायाजी जाधव यांजकडे ठाणें आहे तें ठाणें दिल्हें असतां रायाजी जाधव तुटतो. ( सबब तें देत नाहीं. ) भूदरगड नानांचे आज्ञेवरून घेतला आहे तो किल्ला आपण मागूं नये ऐसें म्हणणें. ऐशास शिरोळचें ठाणें आपणाकडे राहिलें असतां कुरुंदवाडास मिरज लांब पडते. भूदरगडचा प्रकार तर नाना गादी सरकारची सोडून कोंकणांत गेले. तेथून तुम्हास पत्र दिलें तें पत्र मंजूर नाहीं. शिरोळ, भूदरगड यावा आणि शिंदे आलिजाबहाद्दर यांची फौज पलटणें आहेत त्यांचा पैक्यांचा जाबसाल शिंदे यांजकडे उरकावा. सरकारी खंडणीचा जाबसाल बोलावा. ठराव करावयास येईल. घराचा व कैलासवासी भाऊसाहेब यांचे खुनाचा जाबसाल बोलूं नये. " सरकार चाकरी करावी आणि येणेंप्रमाणें बोलावें ऐसें मानस तीर्थरूप राजश्री आप्पासाहेब यांचें आहे. तिकडून उत्तर आले नंतर हे जाबसाल बोलावे हा उपक्रम आहे. काय घडेल तें खरें. खंडणीचा जाबसाल आपण उगाविला असतां शिंद्यांकडील ऐवजाचें झट काय येईल याचा अंत लागत नाहीं. त्यांच्या बोल्या भारी, त्याजपक्षीं परिणाम कैसा लागेल ? शिंद्याचे फौजेचा वगैरे जाबसाल राजमंडळकरांनीं परभारें उरकावें, सरकारीं जाबसाल येथें उलगडे, ऐसें मानस वडिलांचें आहे. श्री परिणामास नेईल तें खरें. सेवेशी विदित होय. हे विज्ञापना.

नं. ५४१४ श्री. ( चैत्र व० १२–२० एप्रिल. )

पै॥ छ० २५ जिल्काद. सन मय्यातैन. चैत्र.

विनंती विशेष. आज गदगचीं पत्रें आलीं त्यांत लिहिलें आहे जे, आज एक मास जाला. शहरपन्हा लढाऊ जागा नव्हे, दहा हजार माणूस लहान थोर. दग्यानें एकाएकीं तीस कोसांची चाळीस कोसाची मजल करून आला. कुमक आजपर्यंत येईल हा भरंवसा होता. त्याचें ठिकाण नाहीं. इतक्यांस खावयास कोठपर्यंत पुरेल ? तशांतही हरकसे दिवस घालविले. आज पांच सहा दिवस जोंधळे मीठ मिरशेंगा अगदीं सरल्या. तेव्हां दम निघत नाहीं. तह करावा तर डंबळकर देसाई वाघास मिळोन चढास लाविलें. तेणेंकरून वाटेस न येई. आज उद्यांत जाबसाल आला आहे. आमचे दैवीं तो देश

---

१ पत्र बाबा काळे यांचें बाळासाहेबांस मिरजेस. हें अपूर्ण सांपडलें. पत्रावरील मिती व तारीख पेवस्तीची आहे.

पहावा असें असल्यास कौलानें जाबसाल उरकत आहे. नाहीं तर ईश्वरी सत्तेनें घडणें तें घडेल. खेरीज बाहेरील दुसरें दिवशींचें पत्र आलें त्यांत ( गदग वाघाच्या हातीं ) गेल्याची वार्ता आहे. खरें खोटें समजेल असें लिहिलें आहे. पाहतां विल्हेस लागलें असें दिसतें. येथील उरकल्यावर ( वाघ ) डंबळास जाणार. तेथें लोकांची भरती कमी आहे. शोध आज पंधरा वीस दिवस करितात, परंतु चहूंकडे त्याचा उपद्रव होणार म्हणोन कोठेंच लोक मिळत नाहींत. दोन तीनशें माणूस आहे. देसाई त्यांत मिळाला आहे तेव्हां अविवेकच दिसतो. तत्राप कुमक न गेल्यास आठ पंधरा दिवस दम धरितील. तो कांहीं परिणाम मोजावयाचा नाहीं. शिरहट्टीकर खानगौडाचे संबंधीक कोणी आहेत तेही येऊन वाघास भेटले असें लिहिलें आहे. राजश्री बाळकृष्णपंत भाऊ याणीं ( वाघाकडे ) बोलावयास पाठविले होते. त्यांसीं उत्तर केलें जे, दहा लाख रुपये, खेरीज लक्ष्मेंश्वरावर ( आम्हांस ) लुटलें त्यासंबंधें फडशा करावा. व सावनूरकर जमीदारही ( वाघास ) मिळाले असें लिहिलें आहे. ऐशास आपली व राजश्री दादा यांची फौज करवीरास बसली आहे, निमित्य सरंजामी तालुकेचें आहे, जलद आठ दिवसांत तिकडे जाऊन पोहचली असतां पोटही भरेल आणि पुढें हरएक कामें आहेत. ईश्वरमात्र साह्य असावा. मलाही आज्ञा जाली असतां मी बरोबर जाईन. यास्तव आज रातोरात करवीरास पत्रें जाऊन एक दोन दिवसांत कूच व्हावें असें जाल्यास उपयोगी. आपणही मसलतीनें पहावें ( कीं ) लिहिला उपयोग कसा आहे ? राजश्री आपासाहेब यांस लिहिलें, परंतु चिन्ह दिसत नाहीं. करवीर घेऊन राजसूय यज्ञ जाला असतां वाडिलांची इच्छा तृप्त होती ( असें त्यांस वाटतें. ) पाहतां व्यवहाराचा धर्मही खराच आहे. विचार करून तर

नं. ५४१५ श्रीगणराज. ( चैत्र व० १३—२१ एप्रिल. )

पै॥ छ० २६ जिल्काद. सन मय्यातैन व अल्लफ.

अपत्यें आबानें साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २५ जिलकाद पावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून वर्तमान यथास्तित असे. विशेष- इकडील वर्तमान तरी मोर्चे पश्चिमेचे अंग गोखले यांचे व मुसा इस्मित याचे आहेत. त्या मोर्च्यांत दिवाळतोडी जरबा नाहींत सबब लक्ष्मण तोफ आणोन दिवाळ शिकस्त करवावी म्हणोन बेत होत आहे. त्यास दिवस पांच जाहले. तोफ जाऊन सुरुवात कधीं होते पहावें. घोडें एका-

जवळ, लगाम एकाजवळ, अशी स्थित जाहली आहे. डास आला आहे हा स्तिमिताईत आहे. कारण समजण्यांत येत नाहीं. फौजेंतील गृहस्थाचा हुकूम राखून आहेत. श्री इच्छेनें घडेल तें खरें. कोणचाही कारभार गरम नाहीं. आज गणपतराव भिकाजी याणीं (वडिलांच्या) दारीं धरणें केलें. आज सायंकाळीं वडिलांचें भोजन जालें. आंतील माणसें बहुत श्रमांत आहेत. अशा संधीस निकड करणेंस पश्चिमेकडील अंग बहुत सोईचें आहे. त्याचा विस्तार काय लिहावा ? घडेल तें खरें. वरुणतीर्थावर मोर्चे गोखले यांचे आहेत तें पाणी मेढ फोडून बाहेर आणावयास्तव माणसें फोडावयास लावलीं आहेत. सुरुंग करून दारू घालून उडवावयाचा बेत चालला आहे. त्याच तोंडीं थोर तोफा असल्यानें चांगलें. पन्हाळेंचें पाणी बंद केलें आहे. आंत पाणी वरुणतीर्थाचें मचूळ व जितीचे ओढ्याचें व खारें विहिरींस आहे. मिठाचा तोटा आहे. बरसातीचे दिवसांस तफावत असती म्हणजे बसूनच काम होतें. आतां चारी यत्न यथावकाशें होत आहेत. साध्य वडिलांचे पुण्येंकरून होईल तो सुदिवस. वरकड सविस्तर तीर्थस्वरूप राजश्री काकानीं लिहिल्यावरून श्रुत होईल. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४१६ श्रीगणराज. ( चैत्र व० १२–२० एप्रिल. )

पै॥ छ० २६ जिल्काद. सन मय्यातैन अल्लफ.

अपत्यें सा॥ नमस्कार विज्ञापना. डास साहेब यांस काल बोलावून आणून बहुत प्रकारें वडिलानीं सांगितलें. त्यास साहेब बोलिले कीं, चिंता न करावी. मंदवारीं चंद्रोदय जाहलेवर तोफांची मारागिरी रंकाळेचे अंगें सुरू करितों. किल्लेचें भिंताड शिकस्त जाहलें म्हणजे हल्ला करितों. ऐसा करार ठरोन डास साहेब गोटास गेले ते रविवार तिसरा प्रहरपर्यंत आलेच नाहींत. याजमुळें त्यांजकडील कारकून अंताजीपंत आहेत त्यांस सांगितलें जे, दारूगोळा होता तो ( तुमच्या ) स्वाधीन केला. किरकोळी सामान काय पाहिजे तेंही पावलें. तोफा कराराप्रमाणें आल्या नाहींत. तर आज याव्या आणि सुरू काम व्हावें. ऐसा निरोप सांगून वडिलीं पाठविला त्याचें उत्तर आलें जे, दारूगोळा कमतीच आहे. दुसरें खर्चास नाहीं. खर्चाची चिठी द्यावी. नंतर काम सुरू होईल. त्यास राजश्री धोंडोपंत दादा गोखले यांचे विद्यमानें वडील बोलले कीं करवीर हस्तगत करून द्यावें, लाख रुपयेची निशा गोखले यांचीच

१ पत्र मोरेश्वरराव आबा यांचें. २ रामचंद्रपंत आपानीं.

द्यावी. ऐसें बोलणें पडलें. त्यास साहेबांचें म्हणणें पडलें कीं, रोख ऐवज द्यावा. सावकारी निशा घेत नाहीं. हें एक. दुसरें किल्ला घेऊन द्या म्हटलिया आमचे हातींचें काय आहे? मेहनत होईल ती करूं. ऐसें बोलणें पडलें. वडिलांचें म्हणणें सवालक्ष रुपयेची निशा देतों. किल्ला घेऊन द्यावा. त्या गोष्टीस रुकार साहेबाचा पडत नाहीं. याजमुळें वडिलांचे चित्तांत शिंदे अलिजा बहाद्दर याचे फौजेचा व पलटणांचा विश्वास पुरत नाहीं. हिरण्यश्राद्ध[1] जाहलें असेल तरं[2] या गोष्टी बोलतात! बोलण्याचा धर नाहीं, तेव्हां परिणाम कैसा लागेल? ऐशा फिकिरींत पडले आहेत. कोणत्या थरास जातें न कळे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५४१७ श्रीगजानन. ( चैत्र व० १३–२१ एप्रिल.)

पै॥ छ० १४ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख.

अपत्यें[3] बापूजी त्रिंबक परचुरे शिर सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० २६ जिल्कादपावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों विशेष. वडिलीं आज्ञापत्र छ० १३ जिल्कादचें पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. इकडील वर्तमान धोंडजी वाघ याणें गद्गास मोर्चे वीस दिवस बसविले. आंतील दम बराच होता. स्थळचे जमीदार डंबळकर वाघास मिळाले. करितां गद्गाचे ठाणेंतील लोक घाबरे होऊन डंबळकरांचे विद्यमानें ठाणें हवालीं केलें. देसाई याजकडे ठाणें वाघानें दिलें. दोन अडीच लाख रुपये खंडणी ठरविली आहे त्याचा वसूल घेतला. बहुत लोकांचे प्राण गेले. व्यंकटराव नि॥ आनंदराव हुपरीकर हे मुलेंमाणसांसुद्धां डंबळकर याणीं पार करून दिले. त्यांचीं मुलें माणसें कुसेगलास आलीं आहेत. कळावें. धोंडजीचें कूच होऊन डंबळचे किल्यास मोर्चे होऊन चार पांच दिवस जाले. आंतील दम आहे. परंतु स्थळीक जमीदार ( वाघास ) मिळाले आहेत याजकरितां लवकरच ठाणें देतीलसें वाटतें. ईश्वरइच्छा प्रमाण! पाळेगार तमाम या प्रांतींचे ( वाघास ) मिळाले आहेत याजकरितां स्थळें हस्तगत होतात. तिकडील गुंता दोन चार दिवशीं उरकोन वाघ हुबळीकडे येणार याजमुळें तमाम लोक पळोन गेले. खंडणीस आज्ञेप्रमाणें कोणास बोलावयास पाठवीत नाहीं. आज्ञेप्रमाणें सावधपणें आहों. प्रांताचा अगदीं वसूल बंद जाला. शिबंदीचे खर्चाचें संकट आलें आहे. आज एक मास जाला दंगा होऊन. पुढें काय होतें

१ शत्रूकडून लांच खाल्ला असेल. २ म्हणून. ३ पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

पहावें. कुंदगोळकर लागू ( ? ) यांणींही खंडणीचे जाबसालाकरितां (वाघाकडे) कारकून पाठविला आहे. मुळगुंदकर मामलेदार निघोन गेले. आण्णीगेरीकर मामलेदार कुसेगलास आहेत. या प्रांताचा धर सुटला. संरक्षण करणार या समयीं कोणी दिसत नाहीं. सेवेशीं श्रुत होय. बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे विज्ञापना.

नं. ५४१८ श्रीगणराज. ( चैत्र व० १४—२२ एप्रिल. )

पै॥ छ० २७ जिल्काद. सन मय्यातैन. चैत्र.

विज्ञापना. सुक्रुतांकडील[1] पंचमार्य[3] याचे यत्नाचें वर्तमान सविस्तर श्रुत जालेंच असेल. त्यास येविशींचा इलाज खंबीर जाला पाहिजे. सूचनार्थ विनंती लिहिली आहे. येथील कलगना बहुत ! त्यांतील भाव ठिकाण पाहून खंबीरपणा जाला असे दिसतात. परंतु श्रीकृपेंकरून परिणाम लागणें तो लागेल. कृष्णमुख[4] उभयत्रही मतलबीच आहेत. वडिलांचें पुण्य विचित्र, तेव्हां काळजी किमपि करणेंच नाहीं. परंतु यत्नास आळस नसावा. तेथील स्थळें[5] शुद्धि पंचमार्य यांची जाल्यावर छत्रात्मजाचे[6] पल्यांत राहणें समजतच आहे ! नंतर सर्व खातरजमा ज्याची त्यास समजेल. असो. श्रीइच्छा ! समजला प्रकार विनंती लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५४१९ श्रीगणराज. ( वैशाख शु० २—२६ एप्रिल. )

पै ॥ छ० २ जिल्हेज सन मय्यातैन. वैशाख.

---

१ पत्र मोरेश्वरराव आबाचे. २ पुण्याकडील. ३ गंगाधरराव यांस जसे चार मुलगे तसा पुतण्या चिंतामणराव हा पांचवा. शिवाय तो आर्य म्हणजे श्रेष्ठ, धनी, सरदार, सबब त्यास नांव पंचमार्य. अथवा परशुराम भाऊंना चार मुलगे व पुतण्या चिंतामणराव हे सर्व मिरजकरांविरुद्ध एकाच कूटांत मिळाल्यामुळें चिंतामणराव यांस नांव पंचमार्य. एका रसिक मित्रानें या शब्दाचा असा अर्थ सुचविला कीं गंगाधरराव व त्याचे चार पुत्र याणीं मारण्यास योग्य तो पंचमार्य ! ! ! चिंतामणरावांच्या सांगण्यावरून रामचंद्रपंतांनीं बाळोबातात्याशीं बोलणें केलें कीं, मिरजेचा किल्ला बाळासाहेबांकडून काढून चिंतामणराव यांस द्यावा. बाळासाहेब बऱ्या बोलानें न ऐकतील तर त्यांवर जबरदस्ती करण्यांत इकडे पलटणें आलीं आहेत यांचा सुद्धां उपयोग करावा; असा लिहिणाऱ्याचा अभिप्राय. पण हा सर्व कुतर्कांचा प्रकार दिसतो. ४ केसोपंत व बाबा काळे. ५ एकदां चिंतामणराव आपांच्या हातांत किल्ला गेल्यावर. ६ परशुराम भाऊ हे सर्व पटवर्धनांचें छत्र, म्हणून त्यांचा पुत्र रामचंद्रपंत हा छत्रात्मज !

विज्ञापना. तहाचें वर्तमान पूर्वी गडकरी बोलत होते कीं, "भूदरगड व सामानगड तालुका, शिवाय शिरोळ अकीवाट, चिकोडी, मनोळी यांवी, दहा पंधरा लक्ष रुपये देतों. खुनाबद्दल पंचवीस हजारांचे गांव देतों." तें वेळेस ठरलें नाहीं. हल्लीं बोलतात कीं, भूदरगड देत नाहीं. सामानगडचें नांवच नाहीं. बाकी मुलूख देतों. दहा लक्ष रुपये देतों म्हणतात. परंतु तेंही ठरावांत आणोन बोलणें करारांत आणीत नाहींत. रोज बोलणें एक पडतें. ऐसें आहे. श्री सिद्धीस नेईल तेव्हां खरें. आज मंदवारीं मुसा इस्मित याचे लोकांनीं महाकाळीपुढें नारळीबाग आहे तेथवर गेले. तेथें चौकी आहे. त्यांची यांची गोळागोळी चांगली जाली. इस्मित साहेब याजकडील लोक सांभाळून कालीचे देवालयांत आले. गोखले यांजकडील मोर्चांतील तीन चार असामी ठार जाले. काल भृगुवारीं आंतील लोक बाहेर आले होते. मारागिरी चांगली जरबांची जाहली. आंतील तीन चार माणसें जायां जखमी होऊन गेले. इस्मिथसाहेब याजकडील दहा बारा माणूस जखमी जाले. धोंडोपंत गोखले यांजकडील कारकून आज बोलावयास गेले आहेत गडकरी याजकडे. परंतु एकीकडीलही संधान मिटत नाहीं. किल्ल्यांतून एक माणूस आला त्याचे जबानीं आंतील लोकांचें म्हणणें 'आम्ही किती दिवस तवाई सोसावी? याजउप्पर बाहेर पडोन मोर्चे उधळतों. नाहीं तर त्यांस पालवून ( शहरांत ) घेतों!' तेव्हां रत्नाकरपंत याणीं सांगितलें कीं, 'दम धरणें. चार रोजांत तह होऊन उलगडा पडेल. नाहीं तर तुम्हांस कळेल तैसें करणें.' याजप्रमाणें सांगणेंत आहे. खरें लटकें न कळे. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४२० श्री. ( २६ एप्रिल )

पै॥ छ० ५ जिल्हेज. सौम्यवार. सन मय्यातैन. वैशाख.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत वैशाख शुद्ध ३ मंदवार प्रातःकाळ पावेतों सुखरूप असों. विशेष. राजश्री शिंदे याणीं राजश्री बाळोबातात्या व धोंडीबा व सदोबा भाऊ यांसीं त्रिवगांस शुक्रवारीं दोन घटका रात्रीस कैद केलें. हल्लीं कारभारी सर्जेराव घाटगे आहेत. मला ज्वर येत आहे. कळावें बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५४२१ श्री. ( वैशाख शु० ३ –२७ एप्रिल. )

पै॥ छ० ३ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख.

---

१ पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची आहे. पत्र नारायणराव यांचें.

श्री॥ राजश्री बाळासाहेब साहेबांचे सेवेशीं--

विनंती सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेऊन शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २ जिल्हेजपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष स्वामीनीं आज्ञापत्र पाठविलें तेथें आज्ञा कीं, " श्री॥ राजश्री पंत प्रतिनिधि यांजकडील हलालखोर याचें घर कसबे रहिमतपुरीं आहे. त्याचा व कानडे प्यादे यांचा खटला जाला. त्या मजकुराचें पत्र कऱ्हाडाहून आलें त्याची नक्कल पाठविली आहे त्याजवरून मजकूर समजेल. तेथें मजकूर कसा घडला असेल तो यथास्थित चौकशी करून खरा मजकूर लेहून पाठविणें व ज्याकडून खून जाला असेल त्यास पाठवून देणें " म्हणोन आज्ञा, ऐशीयास मन्या हलालखोर याचे दोघे लेंक राजश्री मानाजी फांकडे यांजकडे चाकरीस होते. पांडुरंगपंत[1] या प्रांतीं होते त्यांजपाशीं होते. हलालखोर यांणीं रात्रौ गांवांत येऊन येथील कच्ची पक्की बातमी त्यास सांगावी, येऊन रयतेस दबावदबव करावी. दोन तीन वेळां पांडुरंग महादेव गांवावर आले ते समयीं आमची त्यांची झटपट जाली त्यांत हेही होते. पांडुरंग महादेव पुण्यास गेल्यावर हलालखोर गांवांत यावयास चोर, तेव्हां उमाजी नाईक रामोशी याचा लेंक पुनाजी नाईक कऱ्हाडास चाकरीस आहे त्याजपाशीं चाकरीस जाऊन राहिले. येथेंही रखवाली पुनाजी नाईक याचीच आहे. माघमासीं पुनाजी नाईक रहिमतपुरास आला त्याजबरोबर हलालखोरही आले. यात्रेचे दिवशीं दीड प्रहर रात्रीस देवाची पालखी पेठेंत आली तेथें कानडे प्यादे होते. हलालखोरही ढाल पट्टा घेऊन आला. कंपूकडील लोक गांवांत आहेत तेही तेथें आले. तेव्हां हलालखोर पट्टा खेळावयास लागला. तेव्हां कानडे प्यादे पट्टा खेळावयास लागले. त्यांस हलालखोर बोलला कीं, " मी मानाजी फाकडे याचा चाकर. असे शेंपन्नास कानडे पुढें घालीन ! " असें बोलला. तेव्हां कटकट जाहली. आणि कंपूचे लोक बसले होते त्यांचे मागें उभा राहून मनस्वी भाषण केलें. नंतर पालखी देवळास गेल्यावर कानडे चौकीवर आले. हलालखोर आपले घरास गेला. हलालखोर याचें घर वोढ्यास पाण्याचा मार्ग आहे तेथेंच आहे. त्या मार्गानें कानडे वोढ्यास जात होते. हलालखोर आपले दारांत बसोन " अशीं कानडीं प्यादीं शेंपन्नास पुढें घालणार ! यांचा इतका दिमाक काय आहे ? पांडुरंगपंत येत आहे. आला म्हणजे तमाशा

१ मानाजी फांकड्याचा कारभारी.

पाहतों." अशीं भाषणें करीत बसला होता. हें बोलणें मार्गानें जातां येतां कानड्यांनीं आईकिल्यावर त्यास बोलले कीं, या बोलण्यानें मार खाशील. असें बोलले. तेव्हां हलालखोर बोलला कीं, 'धमक असल्यास येणें' म्हणोन बोलोन ढालपट्टा घेऊन उठला. तेव्हां पांच सात असामी प्यादे काठ्या घेऊन उठले. तेव्हां पट्टा प्यादे यांजवर टाकिला तो एकानें काठीवर संभाळून एकानें[1] काठी मारिली ती चुकोन त्याचा बाप आजारी जवळ उभा राहिला होता त्यास डोचकींत बसली. तो खालीं पडला. तेव्हां दोन तीन असामी हलालखोर होते त्यांसही काठ्या लागल्या. हलालखोर याचे हातचा पट्टा व ढाल घेतली. कोणी तरवारेनें हाटलें नाहीं. ज्याचे डोचकींत काठी लागली तो आजारी होताच. तशांत काठी लागली. तिसरे दिवशीं मेला. वरकड-कोणी आजपर्यंत मेले नाहींत. चांगले आहेत. व हलालखोर याचें घर लुटल नाहीं. इतका काजिया दोन प्रहर रात्रीस जाला तो मला समजला नाहीं. अडीच प्रहर रात्रीस समजला तेव्हां चौकसी केली. चौकसी पहातां हलालखोर याचा अन्याय. परंतु काठी लागोन त्याचा बाप तिसरे दिवशीं मेला तेव्हां तो अन्याय राहून हाच पुढें आला. तेव्हां पुनाजी नाईक यास आणोन समजूत केली. हलालखोर यास दहा वीस रुपये खर्चासही देवविले. नंतर पंधरा दिवस हलालखोर समजोन होता. मग आम्हांस म्हणों लागला कीं, आम्ही दोघे भाऊ आहों यांस चाकरीस ठेवणें व चाहूरभर[2] जमीन इनाम करून देणें. असें बोलणें लाविलें त्यास आम्हीं सांगितलें कीं, चाकरीस ठेवावयाचे नाहींत व जमीन कोणी देत नाहीं. याप्रमाणें सांगितलें. सरकारचे प्यादे व तूं पट्टा खेळावयास लागोन कटकट जाली यांत कोणी मारिलें नाहीं. तूं गरीब आहेस, शें पन्नास रुपये घेत असल्यास तसेंच करावयास येईल. याप्रमाणें सांगितल्यावर पंधरा रोज घरीं राहून त्याचा चुलता कऱ्हाडास चाकरीस आहे तेथें जाऊन राहिला आहे. हलालखोर मोठा माजोरी आहे. गांवांत तफावतीनें वर्तणूक करीत नाहीं. पेठेंतून चालला असतां ब्राह्मणांस अथवा बायकांस वसार देत नाहीं. अंगास अंग लावून चालावें असा मस्तखोर आहे. पांडुरंगपंताजवळ होता तव्हांपासून चुरस लागली आहे. प्यादे सरकारचे व हलालखोरही येथील चाकर आहे. या समयीं लोक दुखाविले असतां येथील इभ्रत जाईल. कानड्यांकडे अन्याय आहे, परंतु हलालखोराबद्दल

---

१ एका हातानें काठीवर पट्ट्याचा वार संभाळिला व दुसऱ्या हातानें काठी मारिली. २ एकशेंवीस बिघे म्हणजे एक चाहूर !

कानड्यांचें पारिपत्य केलें असें जालें म्हणजे हलालखोर चढला! गांवांत आम्हांस देखील मानणार नाहीं. जाहला मजकूर खरा तो सेवेशीं विनंती लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५४२२ श्रीगणराज. ( वैशाख शु० २—२६ एप्रिल. )

पै॥ छ० २ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख.

अपत्यें[1] सा॥ नमस्कार विज्ञापना. काल भृगुवारीं दोन प्रहरां भोजन करून ती॥ राजश्री आपासाहेब पन्हाळ्याकडे गेले. गुरुवारीं रात्रीं डाससाहेबांकडील पांच कुंपण्या दोन तोफा घेऊन पूर्वेचे अंगें जितीचा ओढा उतरून गेले. तेथें फिरंगाईचें देवालय आहे तें सोडून पुढें गेले. पेठ आहे ती पूर्वींच दग्ध जाली आहे. चावडी मोठी आहे त्यांत कांहीं जमाव होता तो उधळून दिला. दोन प्रहरपावेतों तेथेंच होते. पिछाडीस ती॥ राजश्री बाबासाहेब व चिंतामणराव आपा ऐसे चार पांचशें लोक घेऊन उभे होते. नंतर कुंपण्या माघाऱ्या आल्या. उभयतां गोटास आले. पन्हाळ्याचें पाणी बंद कराव्याबद्दल रात्रंदिवस उभयेतांस चाकरी फार पडते व शिंदे यांजकडील फौज व पलटणें आहेत हे कोणताही उद्योग करीत नाहींत. आज ब्रह्मपुरींत सडें बुनगें होतें तें व गोट ऐसा कूच करून पन्हाळ्याकडे आमचा मुक्काम होता त्या जाग्यावर ती॥ राजश्री बाबासाहेब यांचे लागत जाऊन उतरले. वडिलांचे लष्करचें कूच तिसरे प्रहरीं जालें म्हणोन बातमीस वडिलांकडे कारकून पाठविला होता त्याजवळ सांगितलें जे, याजप्रमाणें मजकूर आहे. तुम्ही आहां तेथेंच असावें. मोर्चा काईम राखावा. आम्हांस त्या जाग्यांत कोणत्याही कामाचा उलगडा न पडे यास्तव कूच केलें; म्हणोन बोलिले. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४२३ श्रीगणराज. ( वैशाख शु० ३—२७ एप्रिल. )

पै॥ छ० ३ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख.

अपत्यें आबानें सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० २ जिल्हेज मंदवारपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. आशीर्वादपत्र येऊन सांभाळ होत नाहीं. सदैव आज्ञापत्रीं सांभाळीत असावें. यानंतर इकडील वर्तमान छ० १९ जिलकाद सोमवारीं जितीच्या ओढ्याचे मुक्कामाहून कूच करून राजश्री धोंडोपंत गोखले यांचे डावे बाजूस रंकाळेचे उत्तर भागें पंचगंगा

---

१ हें व पुढचें पत्र नारायणराव यांचें. २ हरिपंत व चिंतामणराव यांस.

दक्षिणतीर येथें मुक्काम करून राहिलों. ती॥ राजश्री रामचंद्रपंत आपा याणीं महाकाळीचे देवळांत करवीरकरांची चौकी आहे ती उधळोन मुसा इस्मिथाचा मोर्चा कायम करावा म्हणोन आज्ञा केली, त्यावरून छ० २० जिल्कादीं जागा पाहोन गुरुवारीं रात्रीं मुसा इस्मिथ तयार होऊन गेला. बरोबर राजश्री गणपतराव महादेव गेले होते. शिंद्याकडील एक पलटण व वे॥ राजश्री विष्णु दीक्षित हे तयार होऊन जाऊन देवालयांतील चौकी उठवून मुसा इस्मित याचा मोर्चा काईम जाला. उजवे बाजूस वरुणतीर्था-नजीक पलटण शिंद्यांकडील व दीक्षित यांचा मोर्चा कायम जाला. नंतर चार दिवसांनीं शिंद्याकडील पलटण मोर्चा टाकून गेलें. उपरांतिक वरूणतीर्थाचें पाणी आंत जातें म्हणोन तळयांतील पाणी बाहीर फोडोन द्यावें म्हणोन योजना करून फोडावयास लागले. त्यास आठ दिवस लागले उप्पर पाणी बाहीर फोडोन दिलें. महाका-ळीचे देवळाजवळ लहान तळें होतें त्यांत पाणी येतांच खंदकांत पाणी जाऊं लागलें. तेव्हां वरुणतीर्थाचें पाणी बंद करून तळें फोडोन दिलें. तळयांतील पाणी निम्मे जाहल्यावर वरुणतीर्थाचें बंद केलें होतें तें सोडून दिलें. मुसा इस्मिताचा मोर्चा देवळापुढें कळकीचें बेट आहे तेथें एक आहे. त्यापुढें आणखी एक मोर्चा तयार केला आहे. परंतु आंतील मोर्चावर तितर्फी मार बहुत, याजमुळें माणूस ठरेना, यास्तव वडिलांस विनंती करून लक्ष्मण तोफेची परवानगी घेऊन तोफ आणोन सुरू केली. वरून मारा बहुत होत होता तो मंदीवर पडला. रंकाळेचे दरवाजेपुढें लक्कडकोट बांधोन चौकी होती ती चौकी उधळोन द्यावी म्हणोन वडिलांची आज्ञा झाली होती, त्याज-वरून मुसा इस्मितास ताकीद केली. मध्यरात्रीचे सुमारें उधळोन द्यावें या-प्रमाणें बेत केला असतां वडिलानीं धोंडोपंतास सांगोन पाठविलें चौकी उधळोन देणेंविशीं. त्यावरून राजश्रीकडील लोक गेले. तेव्हां चौकीचे लोक बेफाम होते. याणीं जाऊन आग घातली. एक रंजक करतांच ते आंत पळोन गेले. हे माघारे आले. दहा पांच माणूस जखमी जालें. दोन घटकांपर्यंत गोळ्यांचा वर्षाव एकसारखा होत होता. मागती त्यांणीं येऊन चौकी काईम करून राहिले. उपरांतिक भृगु-वारीं आम्ही प्रातःकाळीं भोजनाचा उद्योग उरकोन मोर्चांत गेलों. दोन प्रहरच्या समयास एक कुंपणी तयार करून वरकड मोर्चाचे लोकांस

सावधागिरी करून कुंपणी चौकीस लावून देऊन आग घातली. ते लोक आंत पळोन गेलेवर ( पुन्हा आंतले ) दोन अडीचशें पर्यंत इटेकरी पट्टेकरी वगैरे चांगले बाहीर पडले. ते वेळेस दहा बारा जखमी, एक ठार या प्रमाणें व्यवस्था होऊन ( आमचे लोक ) मोर्चे काईम करून राहिले. मोर्चांवर गडबड आंतल्यानीं केली म्हणोन वडील त्रिवर्ग व राजश्री गणपतराव पानशे तयार होऊन आले ते लक्ष्मण तोफेजवळ बसले. दोन चार घटकां-पर्यंत होते. नंतर गणपतरावजीनीं लक्ष्मण तोफ सुरू करून भिंताड बरोबर करून देतों म्हणोन करार केला आहे. तोफ सुरू केली असतां भिंताड बरोबर होईल. हें करवायास कठीण नाहीं. खंदक थोडा आहे भिंताड समीप मोर्चास शंभर हात आहे. भिंताड पडल्यावर हल्ला करावयास अवघड नाहीं. आंत दारूगोळीचा अभाव आहे. मुख्य मीठ नाहीं. पाणीही अनुष्टुप् आहे. माणूस बहुत हगवणीनें मरतें, अवसानाची कमती दिसती. बोलण्याचाही संदर्भ लागला आहे. कोणतें सिद्धीस जातें पहावें. ती॥ राजश्री चिंतामणराव-आपा फौजसुद्धां कूच करून ती॥ राजश्री बाबासाहेब यांच्या पलीकडे कात्यायनी-च्या अलीकडे मोकाम जाला आहे. बाबासाहेबही तयार जाले होते ते दिवशीं. सदैव पत्रीं सांभाळ करावया आज्ञा केली पाहिजे. वरकड सविस्तर ती॥ राजश्री नारायणराव याणीं लिहिलें असेल त्यावरून विदित होईल. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४२४ श्रीगणराज. ( वैशाख शु० ३–२७ एप्रिल. )

पै॥ छ० २ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख.

विज्ञापना. शिंदे यांची फौज व पलटणें आहेत त्यांस मसाला व चाबिना वगैरे सरंजाम दिला. परंतु त्यांचे पोटांतील धर्म काय आहे हें समजत नाहीं. तोंडानें मिष्टी भाषणें अपूर्व करितात, परिणामास कांहींच जात नाहीं, हें एक. दुसरें पुण्यांतून कांहीं पत्र आलें आहे त्यांतील अभिप्राय प्रकट जाला नाहीं. परंतु बाजारी अफवा बाळोबा तात्यांच्या कारभाराची कमती, घाटगे यांची बढती. प्रसंग कोणते वेळेस कसा पडेल हें न कळे, याजमुळें आलिजा-बहाद्दर यांजकडील जमेत आहे त्यांस अंत्रा पाडावा हें ध्यानीं आणोन कूच केलें ऐसेंही म्हणतात. काय बेत आहे नकळे. आम्ही गोखले यांचे शेजारीं आहों. कालपासून चार तोफांची मारागिरी चांगली होत आहे. रंकाळ्याचा दरवाजा धरिला आहे. जिभी व दरवाजा शिकस्त होत आला आहे. थोर जरबांमुळें दिवाळतोड होते. शिंदे यांचा मार्ग न पाहतां एक दोन रोजीं हल्लाही करावी

हें मानस आहे. परंतु लोकांस पैसा नाहीं, पायदळही नाहीं, श्री परिणामास कैसें नेतो न कळे. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४२५ श्रीगणराज. (वैशाख शु. ३–२७एप्रिल.)

पै॥ छ० २ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख.

विज्ञापना. ती॥ राजश्री श्रीपतराव भाऊ आज वडिलांचे लष्करचें कूच जाहालें त्याजबरोबर हे निघोन मुक्कामास गेले. येथें मामलत वडिलांजवळून भाऊनीं केली आहे त्याजवर वरात शिंदे यांस दिली होती. यांजकडील कारभार अनान्वित ! कोणे वेळेस वरातेचा तगादा पडेल हें न कळे, ऐसें ध्यानीं आणोन उदईक रविवारीं कूच करून मिरजेस जातों ऐसें येथें येऊन सांगून गेले. कळावें. ती॥ राजश्री विनोबाआबांस वडिलीं पत्र पाठविलें त्यास ते कुरुक्षेत्रास[2] गेले आहेत. आल्यावर पत्रें पोहचवून जबाब घेऊन पाठवितों. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४२६ (वैशाख शु० ३–२७ एप्रिल.)

नारायणराव गंगाधर यांचें पत्र लष्करांतून बाळासाहेबांस मिरजेस—

" मासूरचे[3] पत्रांतील अन्वय अधिकोत्तर असलिया त्याहावयास आज्ञा करावी. येथें वडिलांचे पत्रांत इंग्रज गोरे तीन हजार व पांच पलटणें व कानडे प्यादे तीन हजार, व पांच हजार फौज ऐसी वाघाचे पारिपत्यास रवाना जाहली म्हणोन लिहिलें होतें. "

नं. ५४२७ श्रीगणराज. (वैशाख शु० ३—२७ एप्रिल.)

पै॥ छ० ३ जिल्हेज. सुरुसन मय्यातैन व अल्लफ.

[4]अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. इकडील वर्तमान काल भोयाबरोबर लिहिलेंच आहे. येकूण वर्तमान तथ्य आहे याजमुळें सर्वांस गिरोफदारी प्राप्त जाहली आहे. ( करवीरकर ) तहाचें बोलणें इकडे बोलत होते आणि पुण्यास भाऊ जोशीराव व विश्वासराव सर्जेराव ऐसे गेले ! जाऊन चार रोज जाहले. इकडे तहाचें बोलणें आहे तें होपळ ! उगाच नाद मात्र. यास्तव राजश्री बाळोबा तात्या पागनीस यांस पत्रें वडिलानीं लिहिलीं आहेत कीं, "तहाचें बोलणें बोलून समेटांत आणावयास गडकरी यांजकडील वकील आले आहेत त्याजपक्षीं ठरावांत जाबसाल येतील. त्याजप्रमाणें आपली फौज व पलटणें आहेत यांचा दरमहांचा ऐवज आपणच तेथें

---

१ पत्रावरील तारीख व मिती पैवस्तीची आहे. पत्र नारायणरावांचें. २ कुरुंदवाडास. ३ रामचंद्रपंत आपांस कर्नाटकांतून पत्र आलें त्यांत. ४ पत्र मोरेश्वरराव आबाचें.

घ्यावा. आणि येथें आहेत त्यांस पत्र यावें कीं, दरमहांचा ऐवज येथें घेतला. खंडणीचे ऐवजी घेतों. तुम्ही आपासाहेबांस ऐवजाविशीं वारंवार विचारूं नये ऐसें उत्तर यावें म्हणजे जाहलें. वरकड फौजेस वगैरे ऐवज खर्च होत आहे त्याचें बोलणें बोलून ठरावांत आणून लिहिणें आपलेकडेसच आहे." ऐसीं पत्रें लिहून तयार जाहलीं आहेत. सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४२८ श्रीगणराज. ( वैशाख शु० ३–२७ एप्रिल. )

पै॥ छ० ३ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख.

विज्ञापना[1]. काल पुण्याहून पत्रें आलीं त्यांतील अभिप्राय राजश्री दौलतराव शिंदे व घाटगे व आबा चिटणीस व कंपू हे एकत्र होऊन बाळोबातात्या पागनीस यांस कांहीं प्रतिबंध करावा हा बेत आहे. पागनीस यांसही मनसबा कळल्यावर तेही आपले जागां सावध आहेत. राजश्री बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे यांसही सूचना पागनीस याणीं केली कीं, पलटणें तुंम्हांजवळ[2] आहेत हीं सतलंज साहेबाचीं. यांचा विश्वास धरूं नये. ऐसी सूचना केली म्हणोन लिहिलें आलें. त्याजवरून वडिलानीं कूच करून पद्माळ्याचे अंगें जाऊन उतरले आहेत. वरकड सविस्तर ती॥ राजश्री श्रीपतराव भाऊ आले आहेत. विनंती करितील त्याजवरून विदित होईल. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४२९ श्रीगणपति. ( वैशाख शु० ३–२७ एप्रिल. )

पै॥ छ०४ जिल्हेज. मय्यातैन व अल्लफ.

अपत्यें रामचंद्रानें दोनी कर जोडून शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. छ० २ जिल्हेज वर्तमान यथास्थित असे. विशेष. पुण्यांत सर्जेराव व गाढवे यांचें प्राबल्य होऊन आम्हांजवळ पलटणें आहेत त्यांस दोन लक्षांची वरात जाहली. राजश्री तात्यांचा इशारा वरातेचे तगाद्यांत आम्हांस व गणपतराव भिकाजीसह कैद करावें असा आला. त्यावरून राजश्री धोंडोपंत गोखले यांचे व सर्वांचे विचारें तोफखानासह आम्ही कूच करून कोगनोळीकडे जावें, मागें गोखलेचें पायदळ व ती॥ राजश्री दादांचें पलटण मोर्चेस आहेत तसें असावें. पाठीवर गोखले व चि॥ राजश्री बाबा व नारायणराव व त्रिंबकरावआपा व चिंतामणरावआपासह आहेत तसें त्या ठिकाणीं

---

१ पत्र नारायणराव यांचें. २ तुमचे यजमान पटवर्धन यांजवळ.

असावें, आपण कूच करून चालते जालेवर सांगून पाठवावें. शिंद्यांच्या पलटणांस व फौजेस कीं ' पैक्याचे तरतुदेकरितां जातों. तुमची फौज पायदळ मोर्चास आहे तसें असावें '. याप्रमाणें करून आम्ही चालते झालों. आज रंग मागें कसा तो नजरेस पडेल. पलटणचे मोर्चें उठले म्हणजे चिरंजीव-मंडळी व गोखले कूच करून आम्हांजवळ येतील. एक दिवस दम खावा याअर्थें याजप्रमाणें ठरलें. ईश्वरें हे दिवस दाखविले असतां फिरोन या रंगास गोष्ट आली! पुण्याचें पत्र गणपतराव भिकाजीस आलें. त्याचे [1]×××× त्याचें आलें त्याची नक्कल तेथून लिहून आलेलीच बजिन्नस पाठविली आहे त्यावरून सारे अर्थ ध्यानांत येतील. सरकारच्या दोन तोफा व लक्ष्मण तोफ व गरनाळ अशीं पलटणें पाठीस लागलीं असतां बरोबर बाळगणें अवघड याजकरितां मिरजेस पाठवितों. मुलें माणसें तासगांवास आहेत तीं तेथेंच असों द्यावीं किंवा कसा विचार करावा तो ल्याहावा. ईश्वराचें चित्तीं असेल तसें घडेल! सविस्तर प्रातःकाळीं ती॥ राजश्री भाऊंजवळ सांगितलें व पत्रेंही दाखविलीं होतीं. त्याणीं विनंती केलीच असेल विदित होय हे विज्ञापना. माझे बरोबरचे चिरंजीव मंडळीस टाकून जावें असें नव्हतें. परंतु पैक्याकरितां कलागत करून अप्रतिष्ठा करावी असा पलटणवाल्यांचा भाव कळलेवरून निकाल काढिला. पुढें जसा डौल दृष्टीस पडेल तसें करीन. भयकृत् भयनाशन ईश्वर आहे ! हे विज्ञापना.

( नं. ५४३० श्री. ( वैशाख शु० ४--२८ एप्रिल. )

नक्कल.

विज्ञापना. उभयतां[2] भृगुवारीं कैद जाहले. मंदवारीं रविवारीं ( शिंद्याच्या ) वाडियांतच होते. इंदुवारीं प्रहर दिवसास सकाळच्या[3] घरीं नेऊन ठेविले. पाहरे आहेत. हिंदुस्थानाकडील पत्रें लखबाचीं खुशालीचीं आलीं व उभयतां[4] टोपीकर बाहेदारीस[5] आहेत याजमुळें, त्यांचा[6] खंबीर अद्यापवत् आहे म्हणोन, दुर्ग[7] दृष्टीस पडला नाहीं. या उपरी काय घडतें पहावें. सैन्या-

---

१ कागद फाटल्यामुळें येथील अक्षरें गेलीं आहेत. २ श्रीपतराव मोरेश्वर. ३ पत्र बाळाजीपंत सहस्रबुद्धे यांचें रामचंद्रपंत आपास. ४ बाळोबातात्या व धोंडीबादादा. ५ पलटणांवरचे दोघे मुख्य इंग्रज आफिसर बाळोबाच्या सुरक्षितपणाबद्दल जामीन आहेत म्हणून. ६ टोपीवाल्यांचा निश्चय वचनाप्रमाणें वागण्याचा आहे म्हणून. ७ पुन्हा नगरास कैदेंत रवानगी.

धिंपतीसही उभयताप्रमाणें करावें असा बेत आहे. ते आपले जागां सावध जाहले आहेत. सारांश शेणवी पटवर्धन यांचे निर्मूलन व्हावें ही इच्छा ( घाटग्याच्या ) चित्तांत वागत आहे ! यांत सर्व समजोन जें करणें तें करावें. विना फौजेनें बळकट होऊन फिरती स्वारी केल्याविना परिणाम नाहीं. याजउपरी इकडून पत्रें बहुमानेंकरून लिहितील[२]. परंतु त्याजवर जावयाचें नाहीं. अगदीं भुलथाप ! याजकारितां सुचविलें आहे. पत्रें जावीं असेही घाट चालले आहेत म्हणोन लिहितों. जितकी सावधगिरी होईल तितका उपयोग. नाहीं-तरी बाकी राहिली नाहीं. प्राण घ्यावा ( हाच बेत. ) दुसरा अर्थ नाहीं. वरचेवरी स्वामींकडून बातमी कळत असावी. चार पांच रवानग्या स्वामींकडे केल्या त्यांपैकीं एकाचें उत्तर आलें. बाकी चार जोडच्यांचीं पत्रें पावल्याचीं उत्तरें यावीं. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५४३१. श्री. ( वैशाख शु० ४—२८ एप्रिल. )

पै॥ छ० ९ जिल्हेज. सन. मय्यातैन व अल्लफ.

विनंती सेवेसीं देवजी कृष्ण देशपांडे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० ३ जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपें यथास्थित असे. विशेष. यानंतर इकडील वर्तमान तर धोंडजी वाघ याणीं डंबळांस वेढा घातला आहे. लढत आहे. आठचौं रोजीं तेथील देसाईचें कौलकरार घेऊन देणार म्हणोन वर्तमान आहे. तालुकेचे नाश होणेंत बाकी राहिली नाहीं. वाघाचें वर्तमान ऐकून चित्रदुर्गाहून दोन पलटणें हरिहरच्या पलीकडे आलीं आहेत. याणें त्यांच्या तालुकेंत उपद्रव केलिया ते याचें पारिपत्य करणार. तूर्त याची जरब त्यांजवर कांहीं नाहीं. त्याणीं यास खातरेंत ठेविले नाहींत ! दुर्गांची उस्तवारी दारूगोळी सरंजाम सर्व तेथेंच भरणा इंग्रज करीत आहेत. श्रीरंगपट्टणचे किल्ल्यांत घरें होतीं तीं मोडून जवळ पांच कोसांवर मासूर म्हणोन राज्याचें स्थान आहे तेथें राजा पटीं बैसविला आहे. सर्व शहर तेथें पेट इत्यादि वसणूक करवितात. पट्टण निखालस लढाईस जागा करितात. फरांशीस आलेले वगैरे मिथ्या ! त्यांजवर कसाला. ते येत नाहींत. टिपू सुलतान याचे चिरंजीव दहापांच होते ते तिर्चेनापल्लींत कैदेंत ठेविले आहेत. पूर्णय्या कारभारी आहे त्याजवर दोघे फिरंगी येखत्यारी देखरेखीस ठेविले आहेत. पाळेगार त्यांस अनुकूळ जाहले होते त्यांस खर्चास नेमून देतात. ज्याजती घेतातसी लबाडी असलिया पारिपत्यास उशीर नाहीं ! गोमां-

१ नारायणराव बक्षी यांस. २ पेशवे तुम्हांस पत्रें लिहितील.

तकचे करवीराकडे येण्याचें वर्तमान नाहीं. उगेच लोकवार्ता! त्यांचे यजमान यांची आज्ञा आलीया जाणें येणें. त्याविना एक पाऊल पुढें ठेवीत नाहींत. सरंजाम सर्व सिद्ध आहेत. एक दिवसदेखील अवकाश नको. परंतु स्वस्थ आहेत. कित्तूरकर देसाईकडे गोखले याणीं दोनशें राऊत ऐवजाकरितां पाठविले आहेत त्याणीं निकड केली आहे. कांहीं ऐवज देणार आहेत. सामानगडकरी यांचा उपद्रव भारी जाहला आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५४३२ ( वैशाख शु० ५ – २९ एप्रिल. )

रामचंद्र श्रीधर काळे यांचें पत्र तासगांवाहून मिरजेस छ० ४ जिल्हेजचें:—

" राजश्री बाळाजीपंत सहस्रबुद्धे यांचें आतांच पुण्याहून पत्र आलें त्यांत लिहिलें आहे कीं, राजश्री बाळोबातात्या व धोंडीबादादा असे शुक्रवारीं आवशीस चार घटका रात्रीस शिंदे याणीं कैद केलें. या उपरी दौलतींत कांहीं बाकी रहात नाहीं. वडिलीं रात्रंदिवस बहुत सावध असावें आणि लष्करांतही सुचवावें. नाहींतर कंपूवाले दगा करावयास चुकणार नाहींत. "

नं. ५४३३ श्री. ( वैशाख शु० ५ – २९ एप्रिल.)

पै॥ छ० ५ जिल्हेज. सौम्यवार. सन मय्यातैन. वैशाख.

श्री॥ राजश्री बाळासाहेब साहेबांचे सेवेशीं.

विनंती सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेवून शिर सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० ४ जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपेंकरून कसबे राहिमतपूरचें व सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. पुण्याकडील वर्तमान तर शुद्ध ३ शुक्रवारीं संध्याकाळीं राजश्री बाळोबा पागनीस व धोंडिबादादा यांस धरिलें व बाजीबामोदीचा पुत्र व भगवंतराव व यशवंतराव शिवाजी हे त्रिवर्ग पळोन जानसाहेबाचे कंपूंत गेले. इतकें करावयास राजश्री सर्जेवार घाटगे व बाणाजी बाबा हुजरे हे कारभार करीत आहेत त्यानीं करविलें. राजश्री गोपाळराव चिटणीस यांस रुबरू शिवीगाळ झाली. मानाजी फांकडे यांस देवाज्ञा जाली. राजश्री गणेशराव[1] करवीरचे फौजेंत आहेत त्यांची निभावणी होणें कठीण आहे. तिकडे गडबड होणार. करवीरकर महाराज यांजकडून वकील राजश्री भाऊ जोशीराव व विश्वासराव सर्जेराव घाटगे व महाराज यांचे पुतण्ये व आणखी एकदोन गृहस्थ मातबर ऐसे दोनशें स्वारांनिशीं पुण्यास गेले. काल मुक्काम माहुलीचा होता. वे॥ राजश्री

१ गणपतराव भिकाजी.

बाळकृष्णशास्त्री पुणियास सुखरूप पावले. त्यांचें उत्तर आणोन पाठविलें आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४३४ श्री. ( वैशाख शु० ६—३० एप्रिल. )

नक्कल.

विज्ञापना ता॥ छ० ५ जिल्हेज बुधवार सायंकाळ प्रहररात्र पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. भृगुवारचें पत्र तिसरे प्रहरचें रवाना जाहलें तें मंगळवारीं अस्तमानीं पावलें. लिहिलें वृत्त कळलें. पत्रांतील भाव पाहतां करवीरची आशा सुटत नाहीं ! शुद्ध प्रकार दिसत नाहीं म्हणोन सुचवीत गेलों तत्राप चित्तांत भरलें नाहीं ! असो. जसा ईश्वरी घटितार्थ असेल तसें घडेल. परंतु सेवकधर्म आहे तितका ( आम्हीं ) करावा. पलटणांस व फौजेस तीन योजनेंअलीकडे तफावत असूं नये म्हणोन ( मी ) लिहिलें, परंतु 'जितक्या आवया ( तितक्या खऱ्या ) असेंच वाटोन हवालदील होत नाहीं' म्हणोन उत्तर आलें ! त्यास आवईवरच लिहिलें असें घडणार नाहीं. त्यास अद्यापतरी सावध व्हावें. लांब फटकून असावें यांत सर्व आहे. या उपरी मर्जी ! आशेस गुंतणें चांगलें दिसत नाहीं. सेवकानें सूचना करावयाचे रीतीनें करीत गेलों. टोपीकरांची संगत पत्र पावतांच सोडावी. पत्रीं विस्तार काय लिहूं ? मुखजबानी कळेल. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५४३५ श्री. ( वैशाख शु० ६—३० एप्रिल. )

पै॥ छ० ५ जिल्हेज. वैशाख. सन मय्यातैन.

विनंती. करवीराहून राजश्री आपासाहेब निघाले किंवा अद्यापवत् तेथेंच आहेत ? बातमी आलीच असेल. ( लिहावयास ) आज्ञा व्हावी. पुणेंचा जासूद एके गृहस्थाचा आज तिसरे दिवसाचा आला. त्याच्या सांगण्यांत बाळोबा, धोंडिबा, कृष्णराव मोदी, आबा चिटणीस यांचे घरचे कैद जाहले. आणखी करीत आहेत असें सांगत होता. चतुरसिंग तोफांच्या लागावर शिरोळास चार पांचशेंनिशीं आले असें सांगतात. राजश्री दाजीबा कोगनोळीवर होते ते तोफांसुद्धां बोरगांवच्या मुक्कामीं आले असें चिरंजीव राजश्री धोंडोपंत बापू यांचें पत्र चिकोडीचें आलें. आपली बातमी

---

१ हें रामचंद्रपंतांस पत्र पुण्याहून बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे यानीं लिहिलेलें.
२ पत्र बाळासाहेबांस मिरजेस. हें लिहिणारा कोणी सरदार बडा मनुष्य कुरुंदवाडकरांचा आप्त असावा. कोण तो लक्षांत येत नाहीं.

आलो असेल. राजेश्री नारायणरावजी व चिरंजीव राजश्री त्रिंबकराव आपा कोठें आहेत ? करवीरकरांची दाटी तो बहुत दिसती. आपलेकडील बातमी पक्केपणें करवीरावर शिंद्याकडील जमाव आहे तेथें असावी. आळस करूं नये. नेहमी दहा माणूस ( बातमीस ) चांगले ठेवावे. ( बातमीचा कारकून ) आपला वंशिक असल्यास बरेंच जाहलें. नाहीं तर मजकडून पाहिजेतर सोईकरून ठेवीन. एक ब्राह्मण व माणसें दहा असामी असावीं. त्यानीं रात बिरात वर्तमान पोहोंचवीत जावें. रोजच्या रोज बातमीनें खबरदारी राहील तशी दुसरे यानें राहणार नाही. आपणास सुचवावें असा अर्थ नाहीं. धोंडजी वाघ डंबळास वेढा देऊन बसला आहे. आज दहा दिवसांचें पत्र डंबळचें आलें. पाण्याचा तोटा पडेल असें लिहिले आहे. श्रीमंतांच्या राज्यास क्लेश, तेव्हां जेणेंकरून अडचण तें प्राप्त होईल ! करवीराकडील बोलणार पुणीयास जोशीराव भाऊ व आकाराम यादव व बचाजीपंत व घाटगे, हत्ती बरोबरी दोन, नक्त ऐवजही कांहीं बरोबर घेऊन मंदवारीं कराडास गेले. रविवारीं मसूरच्या मुक'मीं गेल्याचें पत्र आलें कराडचें. कृपा करावी हे विनंती.

नं. ५४३६ ( वैशाख शु० ६ – ३० एप्रिल. )

रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें पत्र मिरजेस बाळासाहेबांस पै॥ छ० ५ जिल्हेज सौम्यवार. सन मय्यातैन.

" पुण्याहून पत्रें आलीं त्यांतही राजश्री बाळोबातात्यांस कैद[1] केलें असें आहे. आणखी जबानी ढालाईत एका दोघांचीं नांवें सांगतो. परंतु बाजारी सांगणें. चक्रदेव, नागनाथ, चौधरी रूपराम वगैरे बाजारी. विदित होय हे विज्ञापना. सात असामी कैद करावयाचा संकल्प असें म्हणतात."

नं. ५४३७ श्रीगणराज. ( वैशाख शु० ६–३० एप्रिल. )

पै॥ छ० ५ जिल्हेज सौम्यवार. दोन तास रात्र.

विज्ञापना[2]. तोफा चिरंजीवानीं लावून देऊन आपण निकाल काढून निघाले. आज तोफा नदीपावेतों आणल्या. परंतु आपल्याकडील पत्र असें आलें. दागिने भारी. विना जमीयतेशिवाय लावून द्यावयास धैर्य होत नाहीं. येथून दोन तीनशें माणूस व शंभर राऊत दिल्हे. परंतु शिरोळास शंभर पेंढारी ताकवड्याचे वाटेनें आले त्याणीं बैल नागाविले. गणेशपूरचे बैल रयतांचे

---

१ कैद केले असें बाजारी वर्तमान. २ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

येत होते ते नेले. बातमी येतांच तोफा माघाऱ्या नेल्या. हल्लीं पत्र पाठविलें आहे. आपणाकडून तीनशें माणूस पायचें व स्वार आलिया निभावतील. येथूनही दोन तीनशें माणूस देतों. राऊतही देऊन रवाना करीन. दुसरें, चि॥ राजश्री रामचंद्र-पंत आज कोगनोळी कारदगें या मुकामास गोखलेसुद्धां येणार असें स्पष्ट चि॥ राजश्री त्रिंबकराव आपानीं सांगितलें. त्यास चि॥ राजश्री नारा-यणराव फौजसुद्धां व आमचे पथकाचे लोक व पलटण इकडे आण-वितों. श्रीनें असा समय वैरियास आणूं नये! मुंजीची योजना साहित्य जालें आहे. आज्ञा जालिया कार्य करावें, परंतु भरंवसा येत नाहीं. पलटणवाल्यांची बुद्धि विपर्यास. काय दगा होईल नकळे. करवीरकर व ते एक जाले असतां जसें म्हटलें तसें करतील. याचा विचार करोन आज्ञा जाली पाहिजे. चि॥ राजश्री रामचंद्रपंत आपा कोणीकडे जातात हेंही समजलें नाहीं. मागें तोंड जाल्याउपर कांहीं रहात नाहीं. वाघ जमियतेनिशीं आहे. या प्रसंगीं करवीरकरांकडे येतो असें जालिया चिरंजीव व गोखले यांस रहावयास मिळणार नाहीं. जागा देणार नाहीं. पहिल्या द्वेषापेक्षां विशेष जालें. नारो हरीचे वर्तमान विपरीत बोलतात. पुण्यासही आपलीं पत्रें जावीं. सरकारांतही गोष्ट अनुचित जाली अशीं पत्रें जाऊन कांहीं जालिया बरें. नाहीं तर सारें सरकारांत निवेदन करोन मुक्त होणें उत्तम. घाटग्यास पैका पाहिजे. पटवर्धन पैकेकरी! ब्रह्मद्वेषी चांडाळ याचा सहवास! कांहीं सुचत नाहीं. उत्तर समर्पक यावें. पलटण वगैरे आणवितों. तोफा मोठें विष घेऊन पदरीं पडलें! काय करावें? रवाना छ०५ जिल्हेज. विदित होय हे विज्ञापना. हरकसेंही करून जमीयत उद्ईक सूर्योदयापूर्वी येथें यावी. भाकरी वगैरे साहित्य समागमें आणावें. अनंतर येथून जमीयत देवून तोफा रवाना करितों. बैलही असुदे होतात. हे विज्ञापना.

नं. ५४३८ श्रीगणपति. (वैशाख शु० ६ – ३० एप्रिल.)

पै॥ छ०५ जिल्हेज. सौम्यवार. सन मय्यातैन. वैशाख.

अपत्यें रामचंद्रानें सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० ५ जिल्हेज बुधवारपर्यंत यथास्थित असे. विशेष. परवांचे दिवशीं पुणें याचीं पत्रें पाठविलीं होतीं त्यापैकीं चुकून राहिलीं तीं हल्लीं पाठविलीं आहेत. हल्लीं पुणेंयाहुन राजश्री गणपतराव भिकाजी नि॥ शिंदे यांचे घरीं पत्र आलें त्याची नक्कल त्याणीं पाठविली ती पाठविली आहे त्यावरून

विदित होईल. आम्ही आज दोन तीन दिवस पद्माळेंजवळ मुक्काम करून हुशार होतों. आज चि॥ राजश्री नारायणरावासह कूच करून कोगनोळीस गोखलेसुद्धां जातों. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४३९ श्रीगणराज. ( वैशाख शु० ६–३० एप्रिल. )

पै॥ छ० ५ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख.

विज्ञापना. येथील मजकूर तर घटकाभर धीर नाहीं. कोणेसमयीं जावयाचें होईल न कळे. आज प्रातःकाळीं वडिलांकडून कारकून आम्हांकडे व गोखले यांजकडेस आला होता कीं, आतांच कूच करून आम्हांकडे यावें. घटकेचा बिलंब न करावा. याप्रमाणें निकडीचा निरोप आला त्याजवरून गोखलेकडे बाळाजी गणेश यांस पाठविलें होतें. नंतर (रामचंद्रपंत) आपांस गोखले याणीं उत्तर केलें कीं, दिवसास मोर्चे उठवावयाचे नाहींत. उठविले असतां आंतील गलबल करितील. यास्तव तुम्ही आज सायंकाळीं सारी फौज घेऊन निघोन जावें. आम्ही व मिरजकर रात्रौ मोर्चे उठवून मागाहून संभाळून येतों. मिरजकरांविशीं आपण चिंता न करावी. मला कळेल तसे संभाळून आणून आपणाकडेस येतों. दिवसास मोर्चे उठावितां नये. यास्तव याप्रमाणें कर्तव्यता प्राप्त होते. वडील कोणे वेळेस निघतील याचा भरंवसा नाहीं. आणि त्यांजबरोबर जाऊन परिणामही नाहीं. ते कोणीकडेस भडकतील न कळे. त्यांचे बरोबर गेलें असतां आतांच पांच चार महिनेची बेगमी खर्चाची केली पाहिजे, आणि त्यांचे बरोबर सडे जाहलें पाहिजे. बुणगें लावून देऊन जावयास पाहिजे. खर्चाची वगैरे बेगमी जाली पाहिजे. याप्रमाणें मजकूर आहे. तर याची आज्ञा काय येणें ती लवकर यावी. विनंती लिहिली याचा मजकूर पुरता वडीलपणें ध्यानांत आणून काय आज्ञा करणें ती करावी. मिरजेकडे यावयास आज्ञा जाहल्यास निभावणी पडेल. अथवा यांच्या बरोबरच ( जाणें ) जाहलेस जसें होईल तसें खरें ! वडिलीं कोणता एक विचार करून लिहिणें. लवकर लिहिलें यावें. कळावें सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४४० श्रीगणराज. ( वैशाख शु० ६–३० एप्रिल. )

पै॥ छ० ५ जिल्हेज. सौम्यवार. सन मय्यातैन.

विज्ञापना. वडील तर तयार होऊन राहिले आहेत. कोगनोळीच्या

---

१ पत्राबरील मिति व तारीख पैवस्तीची आहे. पत्र नारायणराव यांचें. तसेंच पुढचें.

रोखें जातीलसें वाटतें. आम्ही रात्रौ गोखलेसुद्धां त्यासुमारें जाणार. वडिलांकडून या पत्राचीं उत्तरें घेऊन माणसें येतील त्यांणीं गोखले यांचे फौजेची बातमी घेऊन यावें. विदित होयं हे विज्ञापना.

नं. ५४४१ श्रीगणराज. ( वैशाख शु० ६–३० एप्रिल. )

पै॥ छ० ५ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख. सौम्यवार.

विज्ञापना.[1] डाससाहेब नि॥ शिंदे काल मंगळवारीं सायंकाळीं राजश्री धोंडोपंत यांजकडे आला होता. त्याचें बोलणेंतील प्रकार ती॥ राजश्री रामचंद्रपंत आपा आमचे तलबेचे ऐवजाकरितां मोर्चा सोडून तिकडे गेले. असो. चिंता काय ? तेथून त्याणीं कूच के वर आम्ही मोर्चे उठवून त्यांचे माग लागतों. आणि पैका उगवेल तसा घेऊं. असें बोलोन गोटास गेला. नंतर अस्तमान जालेवर आम्ही अगोदरचे बेताप्रमाणें " मुसा इस्मित याजकडील मोर्चे उठवून आणावितों आणि बुनगें वडिलांकडे पाठवितों. आपली तयारी व्हावी " असें सांगोन गोखले यांजकडे पाठविलेवर राजश्री बाळाजी गणेश जोशी यांजवळ गोखले याणीं सांगितलें जे, मोर्चे अगोदर उठवून सरकारचें निमित्य कोणी घ्यावें ? ती॥ राजश्री रामचंद्रपंत आपानीं तेथून कूच केलेवर सहजच इंग्रजांचे मोर्चे उठणार. तुम्ही उतावळी करूं नये. माझा लेंक[2] मोर्चांत आहे. मी व आपले दोघे चिरंजीव आहेत तों पर्यंत तुमचे लवेस लागणार नाहीं. खातरजमा असावी. इतकें असोन तुम्ही जाणारच असल्यास उपाय काय ? जावें. गेलां असतां जोखीम जाल्यास मजकडे काय आहे ? असें विस्तारें राजश्री बाळाजीपंत व राजश्री गणपतराव महादेव यांजपाशीं सांगितलें. रात्रौ मुसाइस्मित याचे मोर्च्यांत व आमचे गोटांत डासाकडील बातमी होती. तों इतक्यांत तीन प्रहर रात्रीस कारकून वडिलांकडील गोखलेकडे आला कीं आज तर मुक्काम केला. उदईक जसें समजेल तसें करूं. विदित होय हे विज्ञापना

नं. ५४४२ श्री ( वैशाख. शु० ६––३० एप्रिल. )

पै॥ छ० ५ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख.

विनंती. काल एका गृहस्थाचें पत्र पुणेंहून आलें त्यांतील हांशील राजश्री बाळोबा व धोंडीबा उभयतांस कैद केलें. खास नि॥ ही कैद होत आहे. राजश्री बाळाजीपंत सहस्रबुद्धे याणींही तोंड चुकविलें आहे. परंतु

---

१ पत्र नारायणराव यांचें मिरजेस बाळासाहेबांस. २ पुतण्या आपा अगर बापू. ३ बाबा काळे यांचें पत्र तासगांवाहून. पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची आहे.

केवळ खरें वाटत नाहीं. ती॥ राजश्री आपासाहेब एक दिवस करवीरास होते तेही चालते जाले असें सांगतात. राजश्री धोंडोपंतही निघणार असा संकेत आहे. पत्रांत गोखले त्या लगत्यास आहेत हेंहि खऱ्यांत आहे. दूरची बला करवीरामुळें जवळ प्राप्त जाली अशी दिसती ! आज चार वर्षें हा देश त्याणीं पाहिला नव्हता. काल राजश्री नरसोपंत व राजश्री विठ्ठल रघुनाथ आम्हांकडील लष्कराहून आले त्यांचे सांगण्यांत लष्करांत बैदे. बहुत अस्ताव्यस्त ! एक [1]प्रकार दिसतो. आपला पल्ला मुख्यांजवळ कांहीं आहे किंवा नाहीं ? नसल्यास पुढील तजवीज काय केली आहे ? आसरेनें लहान मोठे आम्ही सर्वत्र आहों. मसलत कोणे पल्यास पोंहचती न कळे. याची तजवीज काय ? लष्करच्या यजमानांचा मतलब मोंगलाईचा दिसतो असें [2]म्हणतात. तो तरी पल्ला होतो किंवा नाहीं आपण जाणा ! चहूंकडील बातमी व संधानें आपलीं आहेतच. पुढील विचाराची आज्ञा करावी. कृपा करावी हे विनंती.

नं. ५५४३ श्रीगणराज. (वैशाख शु० ८–२ मे)

छ०७ जिल्हेज. सन मय्यातैन.

[3]अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. इकडील वर्तमान काल कानोजी नाईक भोई याजबरोबर लिहिलेंच आहे. त्याजवर बुधवारीं प्रातःकाळीं सहा घटका दिवसास वडिलानीं कारकुनाबरोबर निरोप पाठविला जे गोखलेसुद्धां कूच करून आतांच येणें; म्हणोन आज्ञा आली. अगोदर आपलें बुनगें झाडून लाऊन देऊन निरोप पाठविला. त्यास येथून सांगून पाठविलें जे, दिवसाचे मोर्चे उठविले असतां निर्वाह होणार नाहीं व मध्यें दोन चार दिवस कही गेली नव्हती याजमुळें कांहीं तट्टें कहीस पाठविलीं आहेत याजमुळें अस्तमान होईपावेतों कुच होणार नाहीं. या प्रमाणें गोखले यांचे व आमचे विचारें ठरोन वाडिलांकडे चिठी पाठविली. ती॥ राजश्री रामचंद्रपंतआपा व बाबासाहेब व चिंतामणरावआपा ऐसे त्रिवर्ग फौजेसुद्धां सडे हातकाढणीनें माळावर आम्ही आलों नाहीं, आम्हास सोडून जावयाचे नाहीं, म्हणोन उभे सहा प्रहर राहिले. अस्तमान जाहल्यावर प्रहर रात्रीचे सुमारें आमचे व गोखले यांचें बुनगें चालतें केलें. बुनग्याबरोबर कांहीं गोखले यांची फौज व कांहीं आम्हा-

---

१ चमत्कारिक प्रकार. २ आपासाहेब मोंगलाईंत जाणार म्हणतात. ३ पत्र नारायणराव गंगाधर यांचे मिरजेस गंगाधरराव गोविंद उर्फ बाळासाहेब यांस.

कडील स्वार रा॥ बाळाजीपंत भिडे यांजबरोबर देऊन चालते केले. ते गेल्यावर आम्ही तयार होऊन राहिलों. चंद्रास्त जाहल्यावर मोर्चे उभयतांकडील उठविले आणि चालते जाहलों. बुनगें याची व वडिलांची गांठ पडल्यावर बाळाजीपंतानीं सांगितलें जे, कूच जाहलें. मोर्चेही उठले. गुंता नाहीं. स्वारी मागाहून येत आहे. असें सांगितलेवरून वडीलही चालते जाहले. आम्ही येथें प्रातःकालचे प्रहर दिवसास आलों. गोखले यांचे व इस्मितसाहेब यांचे मोर्च्यांत डासाकडील बातमी होतीच. हे उभयतां उठतांच शिंदे यांजकडील जलचर यांचे मोर्चे उठले आणि तेथून कूच करून रुकडी माणगांवचे मुक्कामास पलटणें गेलीं. बुधवारीं प्रातःकालचे चार घटका दिवसास पुण्याचीं पत्रें वडिलांकडे आलीं. संकर्षणास अज्ञातवास प्राप्त जाहला. आपणासही त्याच पल्ल्यास आणावें असें आहे. यास्तव सत्वर तफावतीनें रहावें" असें पत्र येतांच वडिलीं कूच केलें. बुनगें रवाना करून माझी वाट पहात राहिले होते. मी लौकर यावें म्हणून कारकून सांडणीस्वार व माणसें वडिलांची व ती॥ राजश्री चिंतामणराव आपांची येतच होतीं. विदित होय हे विज्ञापना.

# करवीर राज्यावर स्वांरी.

## स्वांरीचा शेवट.

### मे. स. १८००

करवीराहून फौजा उठल्या त्यांचा पहिला मुक्काम मेच्या पहिल्या तारखेस कोगनोळी येथें व तेथून दुसरा मुक्काम सदलग्यानजीक कोणी येथें वेदगंगा व चकोत्रा यांच्या संगमास झाला. तेथून हें लष्कर होनाळी प्रांत सामानगड येथें गेलें. मेच्या सहाव्या तारखेस विंचूरकर, राजेबहादर, पेठे, व साठे दिम्मत नाना फडनवीस हे सरदार आपापलीं पथकें घेऊन परत गेले. बाकीची सर्व फौज हुकेरीकडे आली. गोखले व पानशे दाणावैरणीची सोय पाहून पटवर्धनांच्या आगेंमागें चार दोन दोन कोस उतरत असत व वाटेंत पटवर्धनांचीं गांवें लागलीं असतां रयतेस मारून लुटून बेमुरवत खंडणी घेत ! रामचंद्रपंतांस गोखले व पानशे यांचें सांनिध्य व मैत्री आवश्यक असल्यामुळें हा उपद्रव त्यांस निमूटपणें सहन करावा लागे.

करवीरच्या लढाईंत नारायणराव घोरपडे सेनापति पाडाव झाले ते कुरुंदवाडास होते हा मजकूर मागें आलाच आहे. (पृ० ६१३२) बंदीवानापासून खंड घेऊन त्यास सोडावयाचें, अशी त्या काळची वहिवाट होती व तीस अनुसरून सेनापतीपासून कांहीं पैका काढावा हा रामचंद्रपंतांचा विचार होता. परंतु सेनापति निर्धन असल्यामुळें खंड भरण्याची तजवीज त्यांच्या हातून होईनाशी झाली. त्यावरून त्यांस आपल्या ताब्यांत देण्याविषयीं रामचंद्रपंतानीं कुरुंदवाडकरांस लिहिलें. तेव्हां त्यांस हातीं द्यावें तर ते यजमान, आणि न द्यावें तर भाऊबंदांशीं द्वेष, असें हें रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस संकट प्राप्त झालें. त्या संधींत शिंद्यांची फौज पलटणांबरोबर होती, तिचे सरदार शिंदे व माने म्हणून होते. त्यांनीं सेनापतींस आपल्या हवालीं करण्याविषयीं रघुनाथरावांस सक्तीचा तगादा लाविला आणि तसें न कराल तर आपण कुरुंदवाडावर चालून येऊं असें भय घातलें. तेव्हां तेंच निमित्त करून त्यांनीं सेनापतींस शिंद्यांच्या लष्करांत पाठवून दिलें.

शिंद्यांचीं पलटणें करवीराहून उठन आलीं त्यांचा पहिला मुक्काम रुकडी माणगांव येथें झाला. तेथून तीं रुई इंगळीवर आलीं. नंतर बोर-

गांव व येडूर येथें कांहीं दिवस राहून तीं मे महिन्याच्या अखेरीस जुगूळ येथें मुक्कामास आलीं. कवाइती पायदळ पलटणें स्वारींवर निघालीं म्हणजे त्यांच्या कुमकेस स्वारांची फौज लागत असते. ती फौज दाणावैरण मिळवून आणते व तिच्या सरदारांस मुलखाची पूर्ण माहितगारी असल्यामुळें प्रत्येक गांवच्या ऐपतीप्रमाणें खंडणी वसूल करून ते आपला व पलटणांचा चरितार्थ चालवितात. शिंद्यांचीं पलटणें पुण्याहून निघालीं तेव्हां त्यांच्या कुमकेस बाळोबातात्यांनीं दोन अडीच हजार स्वार दिलेले होते. त्यांवर गणपतराव भिकाजी नांवाचा सरदार होता तो त्यांचाच हस्तक होता. रामचंद्रपंतास वरातेच्या निमित्तानें पलटणांकडून धरवावें अशी तेव्हां सर्जेरावानें मसलत केली तेव्हां या गणपतरावासही पकडावें असा त्याचा बेत होता. परंतु ती कुणकुण गणपतरावास समजल्यावरून तो करवीरचा वेढा उठण्याच्या संधींत डाससाहेबाच्या ताब्यांतून निसटून पळून गेला. त्याच्या जागीं दुसरा अधिकारी नेमावयास पाहिजे, सबब डाससाहेबानें त्याच फौजेंतले माणकोजी शिंदे व खंडोजी माने म्हणून शिलेदार होते त्यांसच फौजेचे सरदार नेमिलें व ही हंगामी योजना दौलतराव शिंद्यांकडून मंजूर करून घेतली. करवीर हद्दींत आवाडाव न करण्याविषयीं पलटणवाल्यांस जरी सर्जेरावाची ताकीद होती तरी इतर मुलखांत वाटेल तें करण्याविषयीं कोणाचीच आडकाठी नव्हती. बोरगांव, व येडूर व जुगूळ येथें मुक्काम असतां भोंवतालच्या पटवर्धनी खेड्यांत धुमाकूळ घालण्याची पलटणांनीं सुरवात केली तेव्हां माणकोजी शिंदे व खंडोजी माने यांजकडे मिरजकर बाळासाहेब यांनीं कारकुनाबरोबर पत्र पाठविलें कीं "लष्करचा मुक्काम जुगुळानजीक आला आहे. त्यास आमच्याकडील गांव सरदेस आहे त्यांस उपसर्ग लागूं नये. दौलतरावबाबा शिंदे यांचा व आमचा पूर्वीपासून घरोबा आहे हें तुम्हांस माहितच आहे." या पत्राचें उत्तर माणकोजीनें लिहिलें कीं " घरोब्याचे जागीं इकडूनही दुसरा अर्थ नाहींच, परंतु करवीरचे मसलतीकरितां पुण्याहून पलटणें व फौज राजश्री आपासाहेब याणीं आणिली असतां कराराप्रमाणें ऐवज दिला नाहीं व सरकारची मनाईही माघारे येण्याविशीं आणिली नाहीं. आपण कूच करून रात्रौ निघून गेले. आम्ही माघारे जावें तर आज्ञा नाहीं. याजमुळें या प्रांतीं रहाणें प्राप्त. तेव्हां खर्चासही पाहिजे. साडेतीन लाख रुपये राजश्री आपासाहेब यांजकडे येणें. ते निघोन दूर गेले. खर्चाची अडचण. याजमुळें गांवगन्ना घासदाणा घेणें प्राप्त. आपण बंदोबस्त करून देविल्यास गांवगन्ना उप-

सर्ग लागणार नाहीं. आपणाकडून बंदोबस्त न जालियास गांवगन्ना घासदाणा घेतल्याखेरीज दिनचर्या चालत नाहीं ! " यावर बाळासाहेबांचा पुन्हां निरोप गेला कीं " करवीरचे मोहिमेस राजश्री आपासाहेब यांचे कुमकेस सरकारआज्ञेवरून आलां, येविशींचा जाबसाल त्यांजकडे विचारावा. आम्हांकडील सरंजामांत रोखे गांवगन्ना केले असतील ते स्वांर उठवून आणवावे. दौलतरावांचा व आमचा घरोबा कोणे रीतीचा आहे हें जाणतच आहां " परंतु ही रास्तपणाची तकरार माणकाजी थोडीच मनावर घेणारा होता ! कुणीकडे दुबळे बाळासाहेब आणि कुणीकडे पांच पलटणें व दोन हजार स्वांर बाळगणारे माणकोजीबावा ! कुणीकडे मिरजेच्या किल्ल्यांतला बैठा मामलेदार आणि कुणीकडे तरवार उपसलेला घोड्यावरचा शिलेदार ! माणकोजीनें बाळासाहेबांस उत्तर पाठविलें त्यांतून उपरोध व उपहास उघड उघड दिसतो. "यजमानांचा व आपला घरोबा. त्यांत दुसरा अर्थ काय आहे ? यजमानांची फौज ती आपली नव्हे असा अर्थ नाहीं ! असें असतां कांहीं खर्चाची तोड आपण न काढावी हें स्नेहाच्या जागां नसावें. आपासाहेब व आपण आम्हांस दोन नाहींत येविशीं विस्तारें काय ल्याहावें ? खर्चाची बेगमी यासमयीं आपण केल्यास उत्तम आहे. आपलीच फौज असतां अगदीं अनास्थेचा अर्थ पत्रीं दर्शविला ! आपली मर्जी प्रमाण ! "

पटवर्धनांची फौज करवीराहून निघाल्यापासून तिसरे दिवशीं तींतून कुरुंदवाडकर निघून घरास आले. नंतर चिंतामणराव सांगलीकर फुटले व त्यांनीं गोखल्यांची संगत धरली. प्रथम त्यांचा बेत तासगांवकरांबरोबरच चार महिने हिंडावें असा होता व त्यास अनुसरून त्यांनीं "शिलेदार लोकांचे राहुटीगणीत पृथक पृथक जाऊन सांगितलें कीं, आम्ही ती॥ राजश्री रामचंद्रपंत आपा यांस सोबत चातुर्मास्य देणार. भाजी भाकर मी देईन. नालबंदी तूर्त मिळणार नाहीं. ऐसी सोबत देणार असलां तर मजबरोबर यावें. नाहीं तर आपले घरास जावें. ऐसें सांगितलें. नंतर लोकांनीं एकवाक्यता करून आम्ही बरोबर येतों ऐसें सांगितलें आहे." याप्रमाणें शिलेदार मंडळींची बळकटी करून घेतल्यावर चिंतामणरावांनीं रामचंद्रपंतास सांगितलें कीं, आम्ही चार महिने फौज बाळगून तुम्हांबरोबर हिंडलों. लढाईचें श्रमसाहस सोसलें. पुढेंही तुम्हांस सोडावें असें मनांत नाहीं. पण आम्ही बरोबर फौज बाळगली आहे हिचा खर्च कसा चालेल? याकरितां तुम्ही मिरजेस बाळासाहेबांस लिहून आम्हांला तिकडून खर्चास मिळवून यावें. त्यावर राम-

चंद्रपंतांनीं उत्तर केलें कीं, वांटणीची याद झाली आहे. (पृ. ५२५२) ती तुम्ही कां मान्य करीत नाहीं ? पांच लक्षांचा तालुका तुमच्या जिमेस असतां तुम्ही खर्चाची ओरड करावी हें योग्य नाहीं. हें बोलणें चिंतामणरावांस पटलें नाहीं. यादीप्रमाणें न वागतां सरंजामाच्या महालांत ठाणीं आहेत तीं आधीं आपल्या ताब्यांत घेऊन चुलत्यास शेखीच्या गोष्टी सांगाव्या असा त्यांचा बेत होता. त्या बेतास तासगांवकर अनुकूल होत नाहींतसें पाहून हुकेरीच्या मुक्कामीं रामचंद्रपंताचें लष्कर सोडून त्यांनीं धोंडोपंत गोखल्यांचा आश्रय केला. दोघांनीं एकत्र राहून पडेल तो प्रसंग संपादावा, एकमेकांची कुमक करावी, व स्वारींत जें द्रव्य मिळेल तें यथाविभागें वांटून घ्यावें, असा चिंतामणराव व गोखले या दोघांत करार ठरला. गोखल्यांजवळ पायदळ व तोफा आहेत, आपल्याजवळ तें साधन नाहीं, याकारितां त्यांची कुमक घेऊन आपल्या सरंजामांतलीं ठाणीं काबीज करावीं असा चिंतामणरावांचा हेतु होता; व त्याप्रमाणें त्यानीं या नवीन सोबत्याचें सामान मदतीला घेऊन आठ पंधरा दिवसांतच शहापुरचें ठाणें घेतलें. गोखल्यांच्या मैत्रीमुळें चिंतामणरावांस लढाईत तरवार गाजविण्याची व स्वतंत्र सरदारीची लायखी स्थापित करण्याची संधी कशी मिळाली हें पुढच्या प्रकरणीं सांगण्यांत येईल.

रामचंद्रपंत हुकेरीहून निघाले ते घोडगिरी, बागेवाडी, हुणशाळ याप्रमाणें मुक्काम करीत घटप्रभेच्या आसपास मेअखेरीपर्यंत राहिले होते. पानशेही जवळच होते. गोखले व सांगलीकर दूर नव्हते तरी त्यांचें तोंड कर्नाटकाकडे फिरलें होतें. आपण धोंडजी वाघावर चालून जाणार असें या सरदारानीं जाहीर केलें होतें. तथापि पाच्छापूरची बारी उतरून जाण्याचें कोणाच्याच मनांत येऊं नये, वाघाशीं लढाई करायचें सोडून उलट त्यास मिळवून घेण्याचा उद्योग रामचंद्रपंतानीं करावा, याचें कारण काय? मिरजेपासून तीस चाळीस कोसांत या फौजांचें वास्तव्य होण्याचें कारण असें दाखविण्यांत येत होतें कीं, शिंद्याचीं पलटणें मिरजेनजीक राहिलीं आहेत तीं शहरास व किल्ल्यास उपद्रव देऊं लागतील तर त्यांवर दहशत राखण्याकरितां फौजा जवळ पाहिजेत. हें कारण खरेंच आहे. तथापि घटप्रभा व कृष्णा यांच्या दरम्यान या फौजांचे मुक्काम होण्याचे आणखी एक कारण त्यांचा संबंध पुण्यांत चालू अस-

लेल्या राजकारणाशीं होता हें होय. तो संबंध कसा हें पुढच्या प्रकरणावरून समजेल.

वाघानें गदग घेतल्यावर डंबळच्या ठाण्यास वेढा घातला होता तरी त्याचा डोळा सावनुरावर होता इतकेंच नव्हे, तर त्याच्या स्वारांच्या किरकोळ टोळ्या तिकडच्या खेड्यांतून घिरट्या घालूं लागल्या होत्या. तेथील मामलेदार बाळकृष्णपंत लागू यांनीं वाघास खंडणी देण्याचा पुन्हां नाद लाविला होता तरी बारीपलीकडे असलेल्या फौजा अलीकडे आल्यावर त्याच्या दंग्याचा बंदोबस्त होईल ही त्यांस आशा होती. परंतु वाघानें डंबळ घेतलें व तो सावनुराकडे येण्यास मोकळा झाला तेव्हां त्यांस पुन्हां प्राणसंकट प्राप्त झालें.

बाजीरावसाहेबानीं आपल्याभोंवतीं नवीन मंडळी गोळा केली होती त्यांचा निर्वाह कसा चालवावा ही त्यांस वारंवार पंचाईत पडे, आणि फलाण्यास 'असुक गांवच्या कावळ्यांची खानेसुमारी करून ये' असलें कांहीं तरी काम सांगून मुलखावर पोट भरावयास लावून द्यावें असेंही त्यांच्या हातून केव्हां केव्हां घडत असे. याला उदाहरण परशुरामभाऊंच्या फौजेनें सातार्‍याचें शहर लुटलें १७९८ च्या आगस्टांत आणि त्या लुटीची चौकशी करण्याचें काम श्रीमंतानीं कोणा एकास सांगितलें तें १८०० च्या मे महिन्यांत! श्रीमंतांजवळ रहाणार्‍या मंडळींत आबा काळे, बळवंतराव नागनाथ, बाळोजी कुंजर, रूपराम चौधरी, गोपाळराव मुनशी व सदाशिव माणकेश्वर हे त्यांच्या फार प्रीतींतले व विश्वासांतले लोक होते. या लोकांची नेहमींची मागणी आम्हांस निर्वाहाकरितां सरंजाम पाहिजेत, व ते देशीं जवळपास पाहिजेत, अशी असे. ती त्यांची हौस पुरविण्याकरितां जुने सरंजामी होते त्यांस नागवून या नव्या मंडळींची भर करणें श्रीमंतांस भाग पडे. अशी ही सरंजामांची घालमेल होऊं लागली तेव्हां चोहोंकडे अधिकच घोंटाळा व दंगा माजून राहिला. सातार्‍याभोंवतालच्या दहावीस कोसांच्या टापूंत ही धामधूम कशी चालली होती याचें वर्णन रहिमतपूरच्या कमावीसदारानें केलें आहे तें असें—

" शहर सातारा लुटला गेला त्याची चौकशीची मामलत राजश्री बाळाजी व्यंकटेश फरासखाने करून आले आहेत. बरोबर दोनशें आरब आहेत. किल्ले वैराटगडाखालीं मुकाम आहे. राजश्री मुरार-

राव जाधव भुइंजकर यांचा सरंजाम जप्त होऊन श्री॥ राजश्री अमृतरावसाहेब यांजकडे आहे. वैराटगड जाधव यांजकडील. तेथील सुभा आबा काळे यांजकडून राजश्री शिवरामभट जरंडीकर राजश्री गणपतराव कुर्लेकर यांजपाशीं होते—त्याणीं करून किल्ल्यास आले आहेत. ते व बाळाजी व्यंकटेश एक होऊन गांवगन्ना रोखे करितात. सातारप्रांतीं रोखे केले. तेव्हां रास्ते यांजकडील कारभारी याणीं लोक पाठवून दोन चार शिपाई धरोन आणोन चारशें लोक बाळाजी व्यंकटेश याजवर पाठविले. तेव्हां त्यांची यांची लढाई वैराटगडाखालीं जाली. तिकडील इकडील दहावीस लोक जखमी होऊन रास्ते यांजकडील लोक कचकरून माघारे आले. त्यांचें यांचें लागलें आहे. प्रांतांत दंगा जाला आहे. पुढें काय होतें पहावें. श्री॥ राजश्री पंतसचिव यांचा सरंजाम जप्त होऊन शिंदे यांजकडील दोनशें स्वांर भोरास आले. सचिवांचीं मुलेंमाणसें राजगड तोरण्यास गेलीं. किल्ले वंदनगड बाळोजी कुंजर याजकडे जाला. त्याजकडील लोक चारपांचशें किल्ला घ्यावयास माचीस येऊन बसले आहेत. देवस्थळे व राजश्री माधवराव पिंगळे यांचा सरंजाम जप्त होऊन आबा काळे यांजकडे वैराटगडाकडे जाला. नाना फडणीस यांजकडे वांई प्रांतांत गांव होते त्यांची जप्ती राजश्री तुळसाजी शिंदे याणीं केली. त्यांच्या पागा येऊन मौजे कटापूर येथें बसल्या आहेत. असे दंगे प्रांतांत होऊन रोखे गांवगन्नांनीं मनस्वी होत आहेत. सातारकर महाराज व शिंदे यांचें एक ताट व्हावें असें बोलणें चतुरसिंग भोसले याणीं लाविलें आहे असें बाजारी वर्तमान आहे."

या उताऱ्याच्या अखेरीस सातारकर महाराज व दौलतराव शिंदे यांचें एक ताट व्हावें असें चतुरसिंगानें बोलणें लाविल्याचें वर्तमान लिहिलें आहे ती बाब ध्यानांत धरण्याजोगी आहे.

'चढती कमान बढती दौलत' अशा प्रकारची सर्जेरावाची भरभराट सुरू झाल्याबरोबर त्याच्या नोकरांनीं सुद्धां मुलखांत कजाखीचा अंमल गाजवूं लागावें यांत आश्चर्य नाहीं. सर्जेरावाची सासुरवाड पाटणकरांकडे होती. तो कैदेंत होता तोंवर त्याची बायको माहेरीं पाटणास होती. कैदेंतून सुटून शिंद्याची दिवाणगिरी मिळाल्यावर सर्जेरावानें आपला दिवाण बापूजीपंत फणसळकर यास दोनशें पलटणी शिपाई व दीडशें स्वांर बरोबर देऊन स्त्रीस आणावयाकरितां पाटणास पाठविलें. त्याप्रमाणें बापूजीपंत तिला घेऊन

परत फिरला तो गांवोगांव रोखे करून खंडण्या घेत चालला! तो रहिमतपुरास येऊन कांहीं आवाडाव करूं लागला तेव्हां त्याच्या स्वारांशी गांवच्या लोकांचा कांहीं कज्या झाला. त्यावरून तो क्रुद्ध होऊन तेथल्या कमावीसदारास बोलला कीं, “ आज सर्जेराव याच्या कुत्र्यास देखील कोणी आडवें येणार नाहीं. असें असतां तुम्ही आमच्या स्वारांस मारामार कैसी केली? आम्हांस तुमचा गांव घ्यावयाचा. ” असें बोलून तो गांवावर चालून येण्यास तयार झाला. मग एक दिवस घोळ पडून त्याची कशीबशी समजूत झाली व तो पुण्यास गेला. परंतु जातांना तो बजावून गेला कीं, बाईस पुणें मुक्कामीं पोंचती करून तेथून फौज पाठवितों व तुमचा गांव घेतों! यांत सांगायची गोष्ट एवढीच कीं, हा दिवाण बोलल्याप्रमाणें पुढें ह्याच्या धन्यानें खरोखरच करून दाखविलें!

सर्जेरावानें शिंदे बायांवर मारेकरी घातले असतां त्या संकटांतून त्या कशा निभावल्या हें मागच्या भागांत ( पृ० ६१२६ ) सांगितलेंच आहे. त्या प्रसंगानंतर त्या तुळापुराहून निघून जांबगांवास गेल्या. बाळोबातात्यांचा बोलबाला होता तोपर्यंत त्याच्या भरंवशावर तेथेंच त्या स्वस्थ होत्या. परंतु पुढें त्या मुत्सद्यास सर्जेरावाचें ग्रहण लागलेलें ऐकतांच तें खग्रासाच्या स्थितीला पोंचण्याची वाट त्यानीं पाहिली नाहीं! त्या बाया ‘सांप्रदायाप्रमाणें मुलूख ओस करीत’ हिंदुस्थानचा रस्ता धरून चालल्या. मेच्या अखेरीस त्यांची मजल वरणगांव पाचोऱ्या पर्यंत पोंचली व पुढें दरमजल यशवंतराव होळकराकडे जाण्याचा त्यांचा विचार होता.

ता० २५ एप्रिल दिवशीं बाळोबातात्या व धोंडीबादादा यांस शिंद्यानीं आपल्या वाड्यांत बोलावून नेऊन कैद केलें. तेव्हां प्रथम दोन तीन दिवस त्यांस तसेंच ठेविलें होतें. नतर त्यांस घरीं येऊं दिलें व त्यांवरची कैदेची सक्ती बरीच कमी केली. परिचित माणसें त्यांजकडे येत जात त्यांशीं बोलावें बसावें, कोणास चिटीचपाटी लिहावयाची झाली तर तीही लिहावी, येथपर्यंत त्यांस मोकळीक मिळाली होती तरी त्यांवर पहारा होताच. बाळोबामागून बाजीबा मोदी, नारायणराव बक्षी व यशवंतराव शिवाजी व देवजी गवळी यांच्या घरावर शिंद्यानीं पहारे बसविले होते ते अद्यापि कायम होते.

बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे हा आजपर्यंत तासगावकरांचा वकील

पुण्यास होता. त्याचें वळण नाना फडणवीस व बाळोबातात्या यांजकडे चांगलें होतें. परंतु खुद्द श्रीमंतांशीं त्याची फारशी जानपच्छान नव्हती. कारण तिकडे न जातांच त्याचीं कामें होत असत. नाना मेले व बाळोबा कैद झाले तेव्हां बाळाजीपंताची वकिली संपली. आतां पुढें प्रत्यक्ष श्री॥-बाजीरावसाहेब व त्यांचे मुत्सद्दीमंडळ यांशीं बोलणें चालणें करण्याचा प्रसंग आला तेव्हां त्या कामावर नवीनच वकील नेमणें जरूर असल्यामुळें रामचंद्रपंतआपानीं रामचंद्र श्रीधर उर्फ बाबा काळे फडणीस यांची पुण्यास वकिलीच्या कामावर रवानगी केली. बाबा काळ्यांवर श्रीमंतांची थोडी-बहुत मर्जी आगाऊच होती, त्यामुळें त्यांच्या वकिलीचा चांगला उपयोग होण्याजोगा होता. या बाबा काळ्यांचीं पत्रें पुढच्या प्रकरणांतून वेळोवेळीं छापण्यांत येतील.

'करवीर राज्यावर स्वारी' हें या प्रकरणाचें नांव आहे. स्वारी करणाऱ्या सरदारांची व फौजांची चोहोंकडे कशी पांगापांग होत गेली हें एवढा वेळ सांगितलें त्याअर्थीं आतां हें प्रकरण संपलेंच म्हणायला हरकत नाहीं. कोणी म्हणेल कीं, स्वारीच्या अखेरीस तह व्हायचा असतो त्याची हकीकत सांगितल्याखेरीज हें प्रकरण कसें संपवतां ? यावर उत्तर इतकेंच आहे कीं, तह झाला तो परस्पर पेशवे व करवीरचे महाराज यांत झाला, आणि या मोहिमेचे उत्पादक पटवर्धन सरदार यांना वगळून तो तह ठरविण्यांत आला, सबब त्याचा तपशील येथें देण्याचें कारण नाहीं. पुढच्या प्रकरणांत तो यथास्थानीं येईलच.

---

नं. ५४४४ श्री. ( माघ शु० ७-१ फेब्रुवारी. )

ती॥ राजश्री आपासाहेब वडिलांचे सेवेशीं

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ ६ रमजानपावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. वडिलीं आज टेंबलाईनजीकचें पत्र पाठविलें तें पावलें. ती॥ राजश्री केसोपंतदादा कालच गेले. आज पोंचले असतील अथवा उद्यां रविवारीं पोंचतील. मला वडिलांचे पत्रीं आशीर्वाद लिहिला आणि आज्ञा कीं 'येऊन जाणें.' त्यास उद्यां रविवारीं तासगांवास जातों. तेथें ती॥ राजश्री सरवोपंत काकाचे मुलीचें लग्न आहे. लग्न जालें म्हणजे आज्ञेप्रमाणें येतों. जवाहीराचा मजकूर सर्व

वडील विनंती करितील. येथील थोर गृहस्थ मंगळीचे आहेत ! येथें पंचवीस हजारांचें ( जवाहीर ) ठेवून आठ हजार रुपये देखील देत नाहींत. तेव्हां ठीक नाहीं. आपले मर्जीस आल्यास हा जिन्नस पुण्यास गुप्तरूपें पाठवावा. तेथें सोईस पडेल. सूचना लिहिली आहे. विचारास येईल तसें करावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. वडिलीं ती॥ राजश्री बापूसाहेबांस सूत्र लावून पाठवावें म्हणोन वडिलांस लिहिलें होतें. तें सूत्र राजश्री विठ्ठलपंत फडके यांजकडे पाठविलें. ते लावून खुण करून लिहितील. मी तासगांवास गेलों यामुळें मीच लावून पाहिलें नाहीं. सेवेशीं श्रुत होय. ती॥ राजश्री बाळासाहेबांस.... हून चिरंजीवाचें पत्र तीन लक्ष रुपये देणें म्हणोन आलें. (बाळासाहेब) शंखतीर्थ करितात ! सर्व राग आपलेवर आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५४४५ श्री. ( माघ व० ४—१२ फेब्रुवारी. )

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० १८ रमजान पर्यंत तासगांवीं सुखी आहें. विशेष. वडिलीं आज्ञापत्र पाठविलें कीं, "खर्चाचें कमी, याजमुळें काम तटलें. तर लवकर येणें" म्हणोन आज्ञा. ऐसीयास मी येऊन खर्चाची तरतूद होती असा अर्थ असता तर प्राणापर्यंत हजर आहें. परंतु इतकें पुण्य मजपाशीं कोठें आहे ? वडिलीं ती॥ राजश्री दादांपाशीं सर्वांपासून ऐवज घेतला तसा द्यावा म्हणोन मागितला. वडिलानीं माझा उजूर आपल्यास दाखविला त्याजवरून लवकर येणें म्हणोन मला आज्ञा जाहली आहेसें वाटतें. त्यास मी येऊन अधिक कांहीं नाहीं. वडिलीं काय ती आज्ञा वडिलांस करावी. रास्ते यांजकडील बापट याचे सद्तीसशें रुपये पुण्यातील देणें आहेत त्या गृहस्थानें अथणीकर सावकार याची चिठी केली आहे ती[1] चिठी मी माघारी टाकली आहे. परंतु तंटेबाजीनें परिणाम कसा लागेल ? याचा विचार कसा करावा तो कळवावा. आणि ऐवजविशीं मी येऊन तरी अधिक काय करणार ? विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४४६ श्रीगणराज. ( वैशाख शु० ८—२ मे )

पै॥ छ०९ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख शु० १० रविवार.

अपत्यें नारायणानें[2] दोनी कर जोडून सा॥ नमस्कार विज्ञापना. तेथील क्षेम तागायत छ०७ जिल्हेज मुक्काम कोणी नजीक सवदलगें येथें

---

१ ही सावकाराला शिवी. २ नारायणराव गंगाधर यांचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र.

सुखरूप असों. विशेष. अलीकडे चार रोज पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर सदैव पत्रीं सांभाळ केला पाहिजे. इकडील वर्तमान यमाजी बोथाटी बारदार याजबरोबर लिहिलें आहे त्याजवरून विदित होईल. चि॥ राजश्री महादाजीपंत दाजी सदलगेंवर आहेत. वरकड पथकें पुण्याचीं चिरंजीवाजवळ आहेत. इकडे येण्याविशीं वडिलांचीं[1] पत्रें गेलीं आहेत. येतील. या मुक्कामापासून धोंडोपंत गोखले दोन कोसांचे अंतऱ्यानें राहिले आहेत. गोखले यांस कूच करून इकडे येणें म्हणोन कारकून वडिलानीं पाठविला आहे. येतील. चि॥ राजश्री दाजी फौजसुद्धां कूच करून सदलगेंहून आले. येथून एक कोसावर फौज आहे. खासा येथें आले त्यांजबरोबर बाजारबुणगें चांगलें आहे. राजश्री गणपतराव पानसे इकडे आले नाहींत. त्यांस दोन तोफा थोर आहेत त्या मिरजेस पाठवून बाकीचे जंबुरे बरोबर घेऊन यावें म्हणोन सांगून पाठविलें. चिठ्याही गेल्या. परंतु आले नाहींत. पुण्याचीं पथकें त्यांजबरोबरच आहेत. इकडे अद्याप कोणी आले नाहींत. (त्यांचे) पोटांत भय आहे कीं पलटणवाले (यानीं) लुटलिया काय करावें ? चार रोजीं सुभत्ता पडतो, नंतर वडिलांजवळ लष्करांत यावें, ऐसा (त्यांचा) मनसबा आहे. ती॥ राजश्री दादांचीं[2] पत्रें मला चार पांच आलीं व परभारें वडिलांकडे[3] दोन वेळ आलीं त्याजवरून वडिलानीं आम्हांस पुसिलें. त्यास मी विनंती केली कीं, आपण वडील. आपले आज्ञेवितरिक्त जावयाचें नाहीं. मिरजेहूनही ती॥ राजश्री काकासाहेबांचें पत्र आलें नाहीं, म्हणोन सांगितलें. त्यास आपासाहेबांनीं सांगितलें कीं, वडिलांचे पत्राशिवाय मी उभयतां चिरंजीवांस[4] निरोप देत नाहीं. कुरुंदवाडास मुंज आहे तर गणपतराव यास आपली फौज व पलटण घेऊन जाणें ऐसें सांगितलें. तदोत्तर रावजीनीं उत्तर केलें कीं, नारायणराव यांस सोडून मला येण्याची आज्ञा नाहीं. मी जात नाहीं. ऐसें सांगितलें. त्यावरून वडिलानीं फौज व सरंजाम कुरुंदवाडास रवाना करणें म्हणोन सांगितलें. कळावें सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४४७ श्री. ( वैशाख शु० ८—२ मे. )

विज्ञापना[5]. येथील जाल्या वर्तमानाचीं पत्रें छ. २७ जिलकादीं दोन रवानग्या केल्याच आहेत. त्याअन्वयें स्वामी निघोन फौजेंत येऊन झाडून

---

१ रामचंद्रपंतआपाचीं. २ कुरुंदवाडाहून रघुनाथराव याचीं. ३ रामचंद्रपंत आपांकडे. ४ कुरुंदवाडकर त्र्यंबकराव व मिरजकर नारायणराव यांस. ५ पुण्याहून बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे याचें रामचंद्रपंतआपास पत्र.

फौज एक जागां जमावसुद्धां जमलेच असतील. त्यास पलटणांस व स्वामींस बारा कोसांअलीकडे तफावत असों नये. हें पत्र पोंचतांच जवळ असल्यास निघोन लांब जावें. जवळ राहिले असतां भरंवसा येत नाहीं. याजप्रमाणें ल्याहावयाची सूचना[1] आली त्याजवरून लिहिलें आहे. पत्र पावतांच दुसऱ्या पत्राचा आक्षेप न करितां चिकोडीचे मैदानांत जावें. परंतु पाठीमागील बातमी चांगली राखावी. गणपतराव[2] यास पत्र राजश्री बळवंतराव[3] याणीं दिलें आहे त्याची नक्कल आपणांकडे पाठविली त्याजवरून ध्यानांत येईल. लखोटा त्यास द्यावा. उभयतानीं एक विचारें होऊन याप्रसंगीं प्राण रक्षावे. हा रंग बहुत दिवस रहात नाहीं. मास पक्षाची अवध आहे. इतकें जालें म्हणोन स्वामीनीं बेदिल होऊं नये. रक्षकांची[4] मिजाज काईम आहे. सारांश फौज पलटणांस अंतर लिहिल्याअन्वयें असावें यांत सर्व आहे. विश्वास काडीमात्र धरूं नये. राजश्री दौलतराव यांस पत्र ल्याहावयाचें, त्यास नकल पाठविली आहे त्यांत भाव आहे त्याप्रमाणें पत्रांत बरोबरीच्या ( नात्यानें ) जरबच ठेऊन लिहावें व गणपतराव याणीं पत्र लिहावयाचें त्याचाही भाव त्यांतच आहे. ऐसीं पत्रें जलद यावीं. याप्रमाणें इष्टांकडून[5] सांगणें आलें. राजश्री धोंडोपंत गोखले समागमेंच असतील. परंतु निखालसता कशी आहे हें ध्यानांत आणूनच व्यवहार व्हावा. एकदिलपणें असल्यास चांगलेंच आहे. तोफखानासुद्धां पेंढार झाडून जमीयत एक जागां असावी. चोहींकडे फोडावयाचें नाहीं. श्री॥ राजश्री दाजीसाहेबसुद्धां एक व्हावें. लांब कोणास ठेऊं नये. स्वामी एक गोलानें राहून असल्यास येथेंही अवघड सर्वांस वाटेल. याजकरितां सूचना लिहिली आहे. थोर तोफा जलद मिरजेस किल्यांत लाऊन द्याव्या. बाहीर बुणगेंही सडेंच असावें. खात्रीचे छबिने तोंडावर असावे. पादचारी[6] यांचा भरंवसा धरावयाचा नाहीं. स्वामी लिहिल्या अन्वयें आपल्या जमीयतेंत आल्यानंतर वरातेचें मागणें येईल त्यास स्पष्ट उत्तर व्हावें कीं, तुम्ही पैका मागतां कशाचा ? पेशजी तुम्हांस आम्ही कुमकेस आणिलें तेव्हां ठरलें आहे कीं पोटास देऊन चाकरी घ्यावी. त्यास आम्ही तुम्हांस खर्चास दिलें असतां चाकर आमचे जाहलां. चाकरी सांगतों (ती) चाकरी करून दाखवावी.

---

१ सूचना बाळोबातात्याकडून. २ बाळोबाचा हस्तक शिंद्याच्या फौजेंत सरदार होता तो. ३ गणपतरावाचा भाऊ. ४ बाळोबातात्याची. ५ बाळोबातात्यांकडून. ६ पायदळ पलटणें शिंद्यांचीं.

नंतर तुमचें देणें कांहीं राहिलें असल्यास देऊं. करवीर घेऊन दिल्यास पैका पावेल. नाहीं तरी आम्हीं काय म्हणोन द्यावें ? असें उत्तर निखालस व्हावें. त्यांजकडोन बोलण्यास म्हणोन पांच चार किंवा एक दुसरा आला असतां मुख्यानीं समक्ष गांठ घालूं नये. मध्यस्थें बोलणें बोलावें. स्वामी जितके बातमी राखून हुशार जरारे[1] राहतील तितका गुण इकडे लौकर येईल. मंगळवारीं स्वारी वाड्यांत आली त्यांतील भाव रावसाहेब[2] यांस सोडून परस्परें खलबतें जालीं. खलबतांत रावसाहेब अगदीं नाहीं. त्यांतीलही भाव पक्केपणें मागाहून लिहितों. रावसाहेब यांचा अपमान मोठाच जाला याजमुळें मर्जी रुष्ट आहे. सारांश घाटगे याणें पलटणांत फिसात केली आहे. करवीरकर व पलटणें तूर्त काळीं एक असें समजोन त्यांजपासोन फटकोन तफावतीनें रहावें. येथें कोणतीही मिजाज कायम नाहीं. हें पत्र स्वामींस सूचनार्थ लिहिलें आहे. याउपरी ढील केल्यास पेचांत यावें लागेल. अजूरदार[3] दोन रोजांचे करून पाठविले आहेत. कोणत्या वेळेस पोंचतील तें लिहिलें पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५४४८ श्री. ( वैशाख शु० ८—२ मे. )

नक्कल

विज्ञापना[4]. आपण मजलीस फौजेसुद्धां निघोन ( पलटणांस ) अंतरा पाडिल्याचें पत्र काळ्यांचें[5] आलें, त्याजवरून संतोष जाहला. याजउपरी जवळ अगदीं राहूं नये. लांब असावें. बातमी राखोन होणें तें व्हावें. काल जोडी रवाना केली त्यांजबरोबर सांगोन पाठविलें आहे त्या अन्वयें घडावें. कोणाचा भरंवसा धरूं नये. याउपरी जितकी जुमामर्दी होऊन बळ धरून दाब बसेल तितकें उभयतांस[6] सुटकेचें घडेल. उभयतांस मुक्त करणें. (हें घडविणारा) दुसरा स्वामींशिवाय नाहीं. यांत सर्व समजावें. इकडून जुन्या मंडळीच्या नजरा तिकडे लागल्या आहेत. मैदान धरिल्याची बातमी आल्यानंतर सर्वांस हुशारी येईल. सारांश या प्रसंगीं सर्वांचें कार्य रक्षण करणें आपलेकडे. नाहींतर दौलतेची बाकी रहात नाहीं. उद्यीक सविस्तर लिहितों. रवाना भृगुवासर. दोन प्रहर. उभयतां आपले घरीं पत्नीसुद्धां आहेत. त्रिवर्गांस तिहींकडे करावीं असा बेत करोन

---

१ सडे. २ अमृतराव. ३ दोन अजूरदार हे रोजावर मजुरी ठरवून पाठविलेले हंगामी जासूद. ४ बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे यांचें रामचंद्रपंत आपांस पत्र. ५ बाबा काळे यांचें तासगांवांहून. ६ बाळोबातात्या व धोंडीबादादा. ७ बाळोबा, त्यांची स्त्री व धोंडीबा.

गेले तों स्त्रीनें कपाळ फोडून घेतलें. दोन घटका प्राण कासावीस जाहला. तेव्हां तसेच ही वेळ पावेतों आहेत. काय घडतें पहावें. टोपीकरांचा भरंवसा अगदीं नाहीं. सैन्याधिपतीस[1] इमान देऊन वाड्यांत[2] नेले आहेत. अद्यापवर बाहेर आले नाहीं. दोन दिवस जाहले. अंतऱ्यानें चार दिवस चोंहींकडील बातमी राखून फटकून असावें. बायांकडे शहाणा कारकून जलद जावा. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५४४९ श्री. ( वैशाख शु० ८—२ मे. )

नक्कल

राजश्री[3] खंडेराव माने व माणकोजी शिंदे गोसावी यांसीं

स्ने॥ रामचंद्र परशुराम आशीर्वाद विनंती उपरी. कुरुंद्वाड, इचलकरंजी बोरगांव वगैरे खेडीं आहेत त्यांस तुम्हांकडून उपद्रव होऊं नये. रखवालीच व्हावी. तुम्हांस लिहून कळवावें असें काय आहे ? येविशीं ती॥ राजश्री दादासाहेबही[4] लिहितील. अगत्य बंदोबस्त करावा. रवाना छ० ७ जिल्हेज. हे विनंती.

नं. ५४५० श्रीगणराज. ( वैशाख शु० ८—२ मे. )

छ० ७ जिल्हेज. मध्यातैन.

विज्ञापना. ती॥ राजश्री रामचंद्रपंत आपांस पुण्याचीं पत्रें बुधवारीं प्रातःकालीं आलीं तेच दिवशीं नानांकडील पथक व विंचूरकर, बारामतीकर, वगैरे पथकें झाडून वडिलांकडे यावयासीं तेथून कूच करून निघाले. राजश्री गणपतराव भिकाजी निसबत पागनीस यांसही आपले हुकमांत ठेवावें असा डास साहेब याचा मनसबा होता. परंतु अगोदर मशारनिल्हेस इशारा कोणीकडून जाहला तेव्हां गणपतराव याणीं डासास सांगितलें जे, ती॥ राजश्री रामचंद्रपंत आपा कूच करून गेले. त्यांजवळ कांहीं तुम्हांविशीं बोलोन येतों. असा बाहणा सांगोन तेही निघाले. राजश्री धोंडोपंत गोखले यांजवळ बोलणें तहाचे बोलावयासीं गडकरी यांजकडून नरसिंगराव गुजर याचा लेक व हुजऱ्या व आणखी चांगलाच गृहस्थ मोठा असे तिघे जण आले आहेत. त्यास गोखले यांस कांहीं हिरण्य द्यावयाचें केलें होतें यास्तव तिघांसही गोखले

१ नारायणराव बक्षी यांस. २ कैद करण्याकरितां शिंद्यांच्या वाड्यांत. ३ पलटणांबरोबरच्या सरदारांस हें रामचंद्रपंतांचें पत्र. ४ कुरुंदवाडकर. ५ नारायणराव गंगाधर यांचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र.

याणीं अडकावून ठेविले आहेत. राजश्री गणपतराव भिकाजी फौजेसुद्धां सडे वडिलांजवळ आहेत. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४५१ श्रीगणराज. ( वैशाख शु० ८–२ मे. )

छ० ७ जिल्हेज. मय्यातैन. वैशाख.

अपत्यें[1] साष्टांग नमस्कार विज्ञापना. कुरुंदवाडहून वडिलांचें पत्र आलें कीं, पलटणसद्धां कूच करून तुम्ही येणें म्हणोन पत्र आलें. त्यास वडील हातकाढणीनें आम्हांसाठीं सहा प्रहर राहिले आणि आजच त्यांचा निरोप घेऊन यावें तर ठीक दिसणार नाहीं. आणि वडिलानीं माझे नांवें पत्र लिहून चिरंजीव राजश्री दाजीकडे पाठविलें. त्याणीं तीर्थस्वरूप राजश्री आपासाहेब यांजकडे पाठविलें. आपासाहेब याणीं मजकडे पाठविलें आणि विचारावयास पाठविलें कीं, तुम्ही कूच करून जाणार तर वाच्यता न करितां अगोदर मला कळविणें. मग तुम्ही आम्ही त्याचा विचार करून ठरवूं. ऐसें सांगितलें. त्यास मी वडिलांकडे कारकुनाबरोबर निरोप सांगून पाठविला कीं, तीर्थरूप राजश्री काकासाहेबानीं मला आपले हवालीं केलें आहे. आपण आज्ञा करितील त्याजप्रमाणें वर्तणूक करूं. आम्हांकडे विचार करावयाचें कांहीं नाहीं. ऐसें सांगितलें आणि मिरजेसही लिहून पाठविलें आहे. पलटणें रुकडी माणगांवाकडे गेलीं त्याजपक्षीं कोणीकडे दंगा करणार हें समजत नाहीं. सर्व मजकूर ध्यानीं आणोन जी आज्ञा करणें ती करावी. ऐसी विनंती केली आहे. वडीलही चिंता करीत होते कीं कुरुक्षेत्रीस उपनयन आहे. कैसें निर्विघ्नपणें कार्य होतें ! मिरजेंतही जमाव नाहीं. कैसे करावें ? म्हणोन श्रमी होते. पलटणांचा रोख कोणीकडे होतो हें पहावें. वडील आम्हासाठीं सहा प्रहर उभे होते आणि आम्ही आजच कूच करून गेल्यास कैसें दिसेल ? यास्तव सेवेसीं लिहिलें आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४५२ श्रीगणराज. ( वैशाख शु० ८—२ मे. )

छ० ७ जिल्हेज. मय्यातैन व अल्लफ.

अपत्यें[4] साष्टांग नमस्कार विज्ञापना. वडील आम्हांस ( लष्करांत ) ठेऊन आपण कूच करून येणार होते तेव्हां आम्हीं गोखले यांचे शेजारीं

---

१ नारायणराव गंगाधर व त्र्यंबकराव रघुनाथ पटवर्धन यांचें रघुनाथराव यांस पत्र. २ रामचंद्रपंत. ३ कुरुंदवाडास. ४ नारायणराव गंगाधर यांचें मिरजेत बाळासाहेबांस पत्र.

आहों त्याजपक्षीं त्यांचा इतल्ला असावा म्हणोन कारकुनाबरोबर गोखले यांजकडे सांगून पाठविलें. नंतर गोखले यांणीं खातरजमेचें सांगणें सांगितलें. तुम्हांस आपासाहेब यांजवळ अथवा मिरजेस बाळासाहेब यांजवळ पोहोंचते करितों. चिंता न करावी. तुम्हास तिलप्राय धक्का लागूं देणार नाहीं. अगोदर मला ( अपाय ) नंतर तुम्हांस. अशी खातरजमेचीं उत्तरें केलीं. त्याजवरून आम्ही स्वस्थ होतों. येते वेळेस ते व आम्ही मिळोनच आलों. विदित होय हे विज्ञापना.

अपत्यें माधवानें[1] दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. इकडील वर्तमान वडिलानीं सविस्तर लिहिलें आहे त्याजवरून कळेल. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४५३ श्रीगणराज. ( वैशाख शु० ८—२ मे. )

छ० ७ जिल्हेज. मय्यातैन.

विज्ञापना[2]. पुण्यांत छ० ३ जिल्हेज रविवासरीं आलिजा बहादूर यांचे फौजेची व सरकारचे फौजेची लढाई जाहली. सरकारांतून पुण्याचे नाकेबंदीचा बंदोबस्त अगोदरच केला होता. लढाई चांगली जाहली. फार माणूस सरकार कामास आलें; म्हणोन बाजारी वर्तमान आहे. लिहिलें आलें नाहीं. लढाईस चारपांच रोज जाहले. खरें वर्तमान असतें तर लिहिलें येतें. यास्तव बातील वर्तमान ऐसें वाटतें. श्रीमंत सौभाग्यवती मातुश्री बाईसाहेबांस[3] अगोदरच सिंव्हगडास पाठविणार होते. हेंही वर्तमान आहे. नारो हरि करंदीकर यांची कुळंबीण करवीरांत होती तिचें नाक व जीभ कापून बाहेर लाऊन दिली. तिला बोलावयास चांगलें येत नव्हतें. तिनें सांगितलें कीं, नारो हरीस गळीं दिला. त्याजबरोबर माणसें येक दोन होतीं तींही मारलीं असें सांगितलें. कुळंबीण पद्माळ्याकडील छबीन्यांत सांपडली. तिनें सांगितलें वर्तमान लिहिलें आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४५४ श्रीगणराज. ( वैशाख शु० ९–३ मे. )

पै॥ छ० ९ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख.

विज्ञापना[4] छ० ७ जिल्हेजीं कोगनोळीहून कूच करून कोणीनजीक संवदलगें येथें मुक्कामास आलों. काल डास साहेब याणीं कोडोली इंगळीवर मुक्काम केला. इंगळी तमदलगें भारलें. आज कूच करून कोठें गेलें हें न कळे.

---

१ माधवराव गंगाधर. २ नारायणराव यांचें पत्र बाळासाहेबांस मिरजेस. ३ पेशव्यांची स्त्री. ४ पत्र नारायणराव यांचें बाळासाहेबांस.

दानोळी कोथळीचे मुक्कामास जाणार हें वर्तमान ऐकिलेवरून सेवेशीं लिहिलें आहे. त्यास पलटणवाल्यांची बातमी चांगली राखून आम्ही व चि॥ राजश्री आपांकडील फौज व पलटण ऐसे तिकडे यावें येविशीं ती॥ राजश्री आपासाहेब यांस पत्र लवकर आलें पाहिजे. तिकडील बातमी आढळेल त्याप्रमाणें आमचे येण्याची आज्ञा व्हावी. त्यासारखे वडिलांची आज्ञा घेऊन येऊं. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४५५ श्रीगणपति. ( वैशाख शु० ९–३ मे. )

नक्कल.

अपत्यें रामचंद्रानें शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ ८ जिल्हेजपर्यंत यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. "पलटणांचा रोख इकडे जाहल्यास उपद्रव लागेल. मुंजीचाही समारंभ आहे. याकरितां चिरंजीव राजश्री नारायणराव यांची रवानगी सरंजामसुद्धां करावी;" म्हणोन लिहिलें, ऐसियास पलटणांचा उपद्रव तिकडे लागेल असें कांहीं नाहीं. देण्याघेण्याविशीं मात्र त्यांचें बोलणें आहे. या मजकुराविशीं त्यांचीं पत्रेंही आतांच आलीं आहेत. आम्हीही त्यांचे कूच मुक्कामाचे सुमारावरच कूच मुक्काम करून आहों. याकरितां चिरंजीव नारायणराव यांची रवानगी केली नाहीं. (तुमच्या) पलटणाचे लोक पाठवावे तरी बुनग्यासुद्धां येका रोजांत येऊन पोहोचावयाचे नाहींत. याकरितां कांहीं लोक सडे रवाना केले आहेत. पोहोचतील. चिरंजीवांची रवानगी करावी असेंच असल्यास तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब यांजकडे लिहून वडिलांची चिठी पाठवावी. येतील. अथवा तिकडे शिंदे निसबत पलटणांचा शिलशिला लागतो असेंच दृष्टीस पडल्यास चिरंजीवासही पाठवितों. आम्हीही त्याच रोखें यावयाचें करूं. मुख्य गोष्ट बेतास यावयाचा रंग दिसत नाहीं. इकडून बातमी राखिली आहे. अधिक उणें वर्तमान येईल तें सेवेसीं लिहून कळवीन. वडिलींही बातमी येईल ती कळविली पाहिजे. रा॥ गणपतराव यांसीं फौज आपलेकडील घेऊन जा म्हणोन सांगितलें. परंतु त्याणीं उत्तर केलें जे, आपली आज्ञा चिरंजीवांस सोडून जावयाची नाहीं. त्यास सूतर स्वार पाठविला आहे. आज्ञेप्रमाणें करूं. आपलीं पत्रें भृगुवारीं अस्तमानीं दोनी पावलीं. पुण्याकडील फेर कारभार व्हावयाचा होता तें वर्तमान असेल ते आज्ञा करावी. विदित होय. आज मौजे कोणीवर वेदगंगा

---

१ कुरुंद्वाडकर त्र्यंबकराव. २ पत्र रघुनाथराव कुरुंद्वाडकर यांस.

व चिकोत्राचे संगमास मुक्काम आहे. पलटणांचे वर्तमानासारखें पुढें कूच मुक्काम करीन. हे विज्ञापना. नारायणराव घोरपडे यांजकडील कारभार उरकत नाहीं. पुढें पलटणें जवळ आलीं ते पक्षी मागती यांचें पुढें कसें म्हणोन गणपतराव यांनीं पुसिलें. त्यावरून विनंती लिहिली आहे. तरी घोरपडे यांस इकडे पोहोंचतें केलें पाहिजे. हे विज्ञापना.

नं. ५४५६ श्रीगणराज (वैशाख शु० ९–३ मे.)

पै॥ छ० १० जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाखमास.

अपत्यें नारायणानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० ८ जिल्हेज. सुखरूप असों. चिरंजीव राजश्री आपाचें पलटण व फौज आज वडिलांची आज्ञा घेऊन कुरुंदवाडास गेले. जाजती ओझें आमचें व थकलीं तट्टें होतीं तीं गोविंद शामराव व बापूजी कृष्ण काळे यांजबरोबर हत्तीसुद्धां पाठविलीं आहे. पावेल. वडिलांची आज्ञा येईल त्याप्रमाणें एकदोन मजली बरोबर जातों. वडिलांची आज्ञा आली म्हणजे निरोप घेऊन (मिरजेस) येतों. काली रात्रौ सविस्तर मजकूर लिहून पाठविलाच आहे. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४५७ श्री. (वैशाख शु० ९—३ मे.)

राजमान्य[1] राजश्री तुळजाजी घाटगे सर्जेराव यांस आज्ञा केली ऐसी जे, हुजुरून आज्ञा करून चि॥ राजश्री विश्वासराव[3] घाटगे सर्जाराव व वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामचंद्र जोशीराव व राजश्री आकाराम यादव हवालदार व राजश्री बच्याजी बल्लाळ यांसीं पाठविलें[4]. येऊन पोचले असतील. आपणास हुजूरचें लक्ष सर्वोपरी. त्यांत सर्व. तेथील बाजी आपले हातीं आली आहे. याप्रसंगीं जितकी सेवा करून दाखवाल तितकी स्वाधीन आहे. येविशीं आपणास आज्ञापत्रीं आज्ञा करून कळवावेंसें नाहीं. सर्व कारभाराची बाजी आपले स्वाधीन. यांत जो कारभार करणें तो बहुत धीरानें करीत जावा. मोठेपण आपलेकडे आलें आहे, तेव्हां नेणतेपणा सोडून बहुत सावधपणें करणें तें करीत असावें. आपण सुज्ञच आहेत. विस्तारें प्राज्ञा करणें न लगे.

---

१ हें करवीरचे शिवाजी महाराज छत्रपति यांचें आज्ञापत्र. २ यावरून सखाराम घाटगे सर्जेराव यांचें खरें नांव तुळजाजी असें होतें हें सिद्ध झालें. सखाराम हें टोपण नांव. त्यांच्या आजाचें नांव तुळजाजी हेंच आहे. ३ विश्वासराव हे महाराजांचे जामात व सखाराम घाटगे यांचे थोरले बंधु. ४ पुण्यास पाठविलें. ५ शिंदे व पेशवे यांच्या दरबारांची.

करवीरावरील फौज उठून गेली यांजमुळें ताकिदी ठेऊन घेतल्या. त्यांजकडे पाठविल्या नाहींत. कळावें. वरकड आज्ञेप्रमाणें व राजश्री जिवाजी यादव हवालदार यांसीं लिहिलें आहे त्याजवरून कळेल. जाणिजे. सु॥ मय्यातैन व अलुफ. रवाना. छ० ८ माहे जिल्हेज. बहुत काय लिहिणें.

बार (शिक्का)

नं. ५४५८ श्रीगणराज. (वैशाख. शु० १०--४ मे.)

पै॥ छ० ९ जिल्हेज. सन मय्यातैन व अलुफ.

विज्ञापना. पलटणवाल्यांची बातमी येथें आहे कीं, हरिपुरची कही केली. त्याजमुळें बहुत चिंता लागली आहे. वडिलानीं कापसीचे रोखें आज कूच केलें. चार रोज फौज जगवावी याजमुळें इकडे आले आहेत. दोन रोज गोटांत बाजार नाहीं. लमाण पेंढारी हें कांहीं नाहीं. गांव उध्वस्त याजमुळें दाणा मिळत नाहीं. पायली दीड पायलीची धारण. घोड्यास दोनतीन रोज दाणा नाहीं. पागेचीं दोचार तट्टें थकून राहिलीं. शिलेदार बारगीर यांस पैसा नाहीं. लोकांचा गवगवा मोठाच पडला आहे. काय करावें ! येथें चार रोज आम्हांस ठेवावयाचें असल्यास खर्चास हर कैसेंही करून लवकर रवाना केलें पाहिजे. तेथील ओढीचा प्रकार माहीतच आहे. परंतु रानांतील कारभार. पैशाशिवाय चालावयाचें नाहीं आणि वडील रोजचेरोज कूच करून जाणार. त्यांचे बोलणेंत लांब जावयाचें नाहीं म्हणतात. परंतु वरचेवर कूच होतें. तिकडेच यावयाचें असल्यास दिवसेंदिवस लांब पडतें. पल्ला आटपावयाचा नाहीं. अथवा वडील जातील तिकडेसच जावयाचें असलेस खर्चाची बेगमी सध्या आजच जाहली पाहिजे तर निर्वाद होईल. कोणे समयीं कोणीकडे जातील तें कळत नाहीं. शिलेदारांनीं तर आजच गवगवा घातला. याची काय ती आज्ञा होणें असेल ती व्हावी. विदित होय हे विज्ञापना.

न. ५४५९ श्रीगणराज. ( वैशाख शु० १०–४ मे. )

पै॥ छ० ९ जिल्हेज. सन मय्यातैन.

---

१ यावरून करवीरास वेढा घालून बसलेल्या फौजांस वेढा उठविण्याविषयीं पेशव्यानीं ताकीदपत्रें पाठविलीं होतीं हें स्पष्ट होतें. २ पत्र नारायणराव गंगाधर यांचें बाळासाहेबांस. तशींच पुढचीं दोन.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. पलटणवाल्यांचा मुक्काम रुई इंगळीवरच आहे. त्यांजकडील सांडणीस्वार वडिलांचे नांवें पत्रें घेऊन आला आहे जे, "आम्ही आपले तैनातीस आहों. आपण निरोपाचे विडे देऊन पाठवावे. तलबेचा ऐवज बाकीस आहे तोही पाठवावा;" म्हणोन लिहिलें आहे. इकडूनही पत्र पाठविलें होतें कीं, तुमचा मुक्काम कोठें आहे हें लिहिणें. ऐसें पत्र गेलें त्यांचें उत्तरही तिकडून सामोपचारेंच आलें आहे. डास साहेब याणीं पुण्यास लिहिलें आहे. तिकडून उत्तर येईल त्याप्रमाणें करणार. आपला हुकूम आल्यास आपलेकडेही येतों ऐसें लिहिलें आहे. राजश्री गणपतराव पानशे याणीं येकसंबेंवर रोखा करून पंचवीस माणूस जखमी जाहलें. गुरें ही वळवून नेलीं. माणसांस तोफेवर बसविलें! ओलीही नेल्या आहेत. नऊशें रुपयेचा रोखा घेतला आहे....तीनशें रुपये घेतले. याप्रमाणें उपद्रव करतात. श्री इच्छेस उपाय नाहीं. चिरंजीव रा॥ दाजीनीं आपला खासगीचा गांव म्हणोन सांगून पाठविलें, परंतु मनाई जाहली नाहीं. सेवेशीं श्रुत होयें हे विज्ञापना.

नं. ५४६० श्रीगणराज. ( वैशाख शु० १०–४ मे. )

पै॥ छ० १० जिल्हेज. इंदुवार. सन मय्यातैन व अल्लफ.

अपत्यें नारायणानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ता॥ छ० ९ जिल्हेज रविवासर यथास्थित असे. विशेष. वडिलीं आशीर्वाद पत्र छ० ७ रोजचें पाठविलें तें छ० ८ मिनहूस पावलें. लिहिला मजकूर कळला. वडिलानीं कोणीहून कूच केलें ते मौजे होनाळी प्रांत सामानगड येथें मुक्काम जाहला आहे. नजीक वल्लभगड आहे. आजचा दिवस येथें मुक्काम आहे. "चिरंजीव सौभाग्यवती बया राजापुरच्या पैलीकडे मिठगवाणास पोहोंचली व तासगांवाहून चिरंजीव राजश्री बापू[1] आदीकरून मिरजेस आलीं. श्रीगणेशतळ्याचा उत्सर्ग होऊन ब्राह्मणभोजन जाहलें. शिरोळास गडाहून दीडशें स्वार इचलकरंजीचे मार्गानें वाटेनें तोडीतच आले. प्रस्तुत लष्करचा मुक्काम कोठें आहे हें सविस्तर लिहिणें;" म्हणोन लिहिलें तें कळलें. इकडील वर्तमान दिनचर्येचें रोज लिहिलें जात आहे त्याजवरून विदित होईल. सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

अपत्यें माधवानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. वडिलीं

---

१ पत्र लिहिणारांचे धाकटे बंधु व मिरजमळा संस्थानाचे स्थापक.

वडिलांचे पत्रीं आशीर्वाद लिहिला तो पावला. संतोष जाहला. इकडील वर्तमान वडिलांचे पत्रावरून कळेल. सेवेसी विदित होय. हे विज्ञापना.

नं. ५४६१ श्री. ( वैशाख शु० ११–५ मे. )

पै॥ छ० ११ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख.

राजश्री बाळासाहेब गोसावी यांसीं

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ माणकोजी[1] शिंदे दंडवत विनंती येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत असावें. विशेष. लष्करांतून कांहीं कामाकरितां दोन असामी मिरजेस पाठविले होते ते चोर म्हणून तेथें अटकाविले आहेत. अशास सरकारांत चोर बाळगतात असें नाहीं. वाणी याचे दुकानीं जिन्नस घेतला त्यांत आपले हातानें कमपेश घेतला म्हणून चोर जाला असा विचार नाहीं. याजकरितां सरकारचीं माणसें सोडून देवावीं. रवाना छ० १० जिल्हेज. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं. ५४६२ श्रीगणराज. ( वैशाख शु० ११—५ मे. )

पै॥ छ० १० जिल्हेज. इंदुवार. तृतीय प्रहर. सन मय्यातैन व अल्लफ. वैशाख.

विज्ञापना[2]. येथील कूच मुक्कामाचा मजकूर सर्व धोंडोपंत यांचे इतल्ले-वर आहे. त्यांजवळ जमेत आहे. त्यांचे अनुमतानेंच होत आहे. पुढील विचार पुण्यांत किंचित् स्वस्थ जाहलें तर सर्व यथास्थित आहे. ती॥ राजश्री दादांचीं पत्रें आलीं त्यांत संकर्षणाविशीं[3] जलैचर[4] यांची सक्ती बोलण्याविशीं चांगली आहे. संकर्षणास भोजनास सोडिलें. करवीरचे मोर्चे उठविले नसले तर उठवूं नये ऐसें लिहिलें होतें. पत्र वडिलांकडे कुरुंदवाडाहून पहावयास आलेंच असेल. त्या पत्राची नक्कल येथें आली होती त्यांत कांहीं जीव दिसत आहे. श्री काय परिणामास नेईल तें खरें. पानशे यांचा बेत ( आम्हांबरोबर ) याव-याचा दिसत नाहीं. पांच रुपये मिळवून खावे, तालुकेस उपद्रव करावा, हाच बेत दिसत आहे. विठल शिवदेव यांचें पथक पुण्यास निघोन गेलें. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४६३ श्रीगणराज. ( वैशाख शु० ११–५ मे. )

पै॥ छ १० जिल्हेज. इंदुवार सन मय्यातैन.

---

१ शिंद्याच्या पलटणांबरोबर घोडदळ होतें त्यावरचा सरदार. २ नारायणराव गंगाधर यांचें बाळासाहेबांस पत्र मिरजेस. ३ बाळोबा तात्याविषयीं. ४ इंग्रज.

विज्ञापना. सदाशिवपंत जोशी दोन वर्षांनीं घरास आले. नांदणीहून मिरजेस येतांना टाकवडेंजवळ पेंढारी यांनीं ठार मारिलें. त्यांची स्त्री सहगमन जाणार म्हणोन लिहिलें तें कळलें. ईश्वरें अनुचित केलें. जोशी चांगले मनुष्य होते. श्री इच्छेस उपाय नाहीं. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४६४ ( वैशाख शु० १२--६ मे. )

रामचंद्र परशुराम यांचें पत्र मिरजेस बाळासाहेबांस छ० ११ जिल्हेजचें—

" पुण्याकडील वर्तमान आलें असेल ते आज्ञा करावी. मनस्वी इकडे वर्तमानें येतात. फौजेपैकीं नानांकडीरु व पेठचे व राजेबहादर, इंचूरकर पुण्याकडे गेले. तोफखानेवाले आपले परगण्याकडे जातात. धोंडोपंत व आम्ही सर्वत्रानीं मिळून वाघावर जावें असें योजिलें आहे. इतक्यांत पुण्याकडील कळतें."

नं. ५४६५ श्री. ( वैशाख शु० १२--६ मे. )

पै॥ छ० ११ जिल्हेज. मय्यातैन. वैशाख.

राजश्री बाळासाहेब गोसावी यांसीं

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ माणकोजी शिंदे. दंडवत विनंती येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष. लष्करची रसदेची उंट वगैरे खेप भरून लष्करांत यावयाची ती मिरजेस आली आहे. त्यास स्वांर प्यादे आपल्याकडील देऊन येडूर मांजरीस पोंचती करावी. म्हणजे लष्करांतून स्वांर पाठवून आणवून घेऊं. पेशजी कामागिरीकरितां सरकार पागेचे स्वांर मिरजेस गेले होते. तेथें घोडी रास १ चोरीस गेली. आंत परवानगी न जाली याजकरितां तळ्यावर मुक्काम करून राहिले होते. त्यास राखणदार यास ताकीद करवून घोडीचा शोध करून लष्करांत पोंचती करून द्यावी. सरकारची घोडी. याचा लढा राहूं नये. बहुत काय लिहिणें. लोभ करावा. रवाना छ० ११ जिल्हेज. हे विनंती.

नं. ५४६६ श्री. ( वैशाख शु० १२–६ मे. )

पै॥ छ० १४ जिल्हेज. सन मय्यातैन वैशाख मास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब साहेबांचे सेवेसीं विनंती सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेऊन शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० ११ जिल्हेजपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री सखाराम

---

[1] सदरहूप्रमाणें खंडेराव माने यांचेंही पत्र आहे तें येथें घेतलें नाहीं.

घाटगे सर्जेराव यांची बायको आजपर्यंत कसबे पाटणास होती. हल्लीं सर्जेराव यांचा बोलबाला जाहला याजकरितां पुण्याहून न्यावयास बापूजीपंत फणसळकर व दोनशें पलटणचे लोक व दीडशें स्वांर इतका सरंजाम येऊन बाईस घेऊन पाटणाहून निघाले. प्रांतांत रोखे करीत खंडण्या घेत मौजे अंगापूरचे मुक्कामास छ० ७ जिल्हेजीं आले. तेथून कसबे मजकुरावर रोखा करून दहा लोक व दहा स्वांर पाठविले. पंचवीस रुपये मसाला केला. तेव्हा रोखा घेऊन लोक ठेऊन घेतले. आणि गांवकर बोलावयास पाठविले. इतक्यांत कही मजरे नहरेवाडीवर गेली होती तेथें कजिया जाहला म्हणोन वर्तमान आलें. त्याजवरून बापूजीपंत फणसाळकर याणीं "आमचे स्वांरांस मारामार करून घोडीं दुखावलीं याचा जाबसाल करणें. आज सर्जेराव याचे कुऱ्यास कोणी आडवें येणार नाहीं; असें असतां तुम्ही स्वांरांस मारामार कशी केली ?" अशीं तुफानी बोलणीं मनस्वी बोलोन "आम्हांस गांवच घ्यावयाचा, मिरजेकडील गांव असतील तितके अगोदर घ्यावयाचे," अशीं भाषणें करून स्वारी तयार केली. तेव्हां गांव गडबडोन पळों लागला. तेव्हां आम्हीही तयार होऊन गांवाबाहेर उभे राहिलों. दोन रोज हाच दंगा चालला होता. तेव्हां आबा चिटणीस यांजकडील कारकून व अंगापुरकर देशमुख याणीं मध्यें पडोन साडेतीनशें रुपये घासदाण्यासुद्धां ठराव करून आम्हांस सांगोन पाठविलें. त्याजवरून साडेतीनशें रुपये दिले आणि लोक व स्वांर उठोन लाविले. प्रांतांत दंगा फार करून दिला आहे. चांगलीं घोडीं गांवगन्ना ठिकाण पाडून बळेंच सोडून नेतात ! मारामारीचा सुमार राहिला नाहीं. बापूजीपंत सर्जेराव याजपेक्षां जाजती आहेत ! मशारनिल्हे बोलोन गेले कीं पुण्यास बाईस पोहोचवून मिरजकरांकडील गांव घ्यावयास माघारे यावयाचें. ऐसीं बोलणीं बोलले. याजमुळे गांवांतही कोणाकोणास खुशाली जाहली आहे ! शिबंदी बाळगल्याशिवाय परिणाम नाहीं. रोज दंगा चालला आहे. खर्च फार. जमा थोडी. शिबंदीचा गवगवा रोज पडतो. त्यांत हीं आरिष्टें येतात ! उपाय नाहीं जाहला मजकूर विदित व्हावा याकरितां लिहिला आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४६७ श्रीगणराज. ( वैशाख शु० १२–६ मे. )

तालीक.

चिरंजीव राजश्री रामचंद्रपंत आपा यांसीं. आशीर्वाद उपरी. तुम्ही

१ गंगाधरराव गोविंद ऊर्फ बाळासाहेब यांचें मिरजेहून रामचंद्रपंतांस पत्र.

पत्र रविवार प्रातःकालचें पाठविलें तें येथें काल इंदुवारीं अस्तमानसमयीं पावलें. चिरंजीव राजश्री "दादानीं आपली पलटण व फौज व्रतबंधामुळें नेली. चिरंजीव राजश्री नारायणराव यांसही पाठवावें याविशीं पत्र आलें होतें. मिरजेहून पत्र आल्यावर रवानगी करूं असा जाब दिला;" म्हणोन लिहिलें तें कळलें. "फौजेचा खर्च चालला पाहिजे. कौली मुलखांत राहोन परिणाम नाहीं. सावनूर तालुकियांतही वाघाचा उपद्रव. यास्तव तिकडेच जातों. पुढें श्रीकृपेनें व वडिलांचे आशीर्वादें घडेल तें खरें! सारांश कोठेंच परिणाम नाहीं. वडिलांचें पुण्य विचित्र इतकाच आधार. दुसरें नाहीं. शिंदे यांजकडील पलटणवाल्यांचें म्हणणें फौजेची व पलटणांची चाकरी जाली आहे त्याचें देणें व शिवाय दोन लक्ष वरातेचें मागणें आहे. फडशा करून निरोप द्यावा. नाहींतर जिकडे तुम्ही तिकडे आम्ही, असें आहे;" म्हणोन लिहिलें, ऐशियास सावनूर प्रांतांत गेलें असतां गुण किती व दोष किती हें पहावें. तिकडे वाघ बजमियत आहे. इंग्रजांची पलटणें हरीहर व चित्र-दुर्ग वगैरे जागांजागां तयार आहेतच. आपणांजवळ जमीयत थोडी. वडिलांचा लौकिक मोठा. राजश्री धोंडोपंत गोखले यांजवळ सामान पोक्त. त्यांचे लक्षानें चालावें लागेल. त्यांचा व वाघाचा कटाक्ष भारी. वाघानें चार रुपये संपादून तवाना जाहला आहे. त्याची कस्त गोखले यांसीं गांठ घालावीच असें ऐकण्यांत आहे. तुम्ही तिकडे गेलां; नकळे, मोकावला जाहला, यशअपेश श्री स्वाधीन! वाघ नामोहरम होऊन तुंगापार गेला तर तेवढ्या निमित्तानें इंग्रज तुंगा अलीकडे येऊन गदग वगैरे वाघानें घेतलेलीं ठाणीं आम्ही घेतों म्हणून पाय शिरकावितील. मग त्यांचा शिलशिला प्राप्त. पीछावर शिंदे यांचीं पल-टणें. असें आहे. याचा विचार कसा हें ध्यानांत सर्व आणून पहावें. इकडे प्रांताची आस्था सोडून तिकडे गेलां असतां मग करवीरकर कांहीं बाकी ठेवणार नाहीं. श्री कृपेनें राजश्री बाळोबा तात्या सुटले असें ऐकण्यांत आहे. त्यांजकडे कागदपत्र पाठवून दोन लाखांचे वरातेची मनाई करवावी. जाले चाकरीची तलब मागतात याचा प्रकार करवीरची खंडणी होईल त्या ऐवजीं पावेल. गोखले यद्यपि गेले तरी सरकारचीं पतकें व तोफखानावाले आदीकरून आपण मजबुतीनें राहोन कांहीं चिकोडी व गोकाक व जत परगणा (यांत) फिरते असावें हें चांगलें; असें आमचे विचारें दिसतें. असेंच घडल्यास चिरंजीव राजश्री नारायणराव यांस इकडे आणूं नये. आपणाजवळच ठेवावे असें मानस

आहे. आपले विचारें सावनुराकडे जावें असेंच असल्यास चिरंजीवाची रवानगी इकडे करून द्यावी. करवीरकरांची प्रबलताच जाल्यास आमचेच फौजेनें काय होणें आहे ! श्रीसत्तेनें घडेल तें प्रमाण. रवान. छ० ११ जिल्हेज. आपलेजवळ जमीयत कमी. गोखलेजवळ जाजती. फत्ते जाली तर यशास पात्र ते होणार. मागें हटली फौज तर नामोष आपला ! ऐसें आणखी सरकार तालुका आपणाकडे व सरंजाम आहे. गोखले सक्ती आपले रुबरू करून ऐवज घेतील. गुंता नाहीं. तेव्हां आई जवळ असोन दुसरेनें मुलास मारलेप्रमाणें अपकीर्ति आणि बारीपार आपण गेल्यानें इकडील आस्था सोडून निघोन गेले असाही शब्द विख्यात होईल. गोखले गोड बोलून पेचीं पाडतील. गोखले यांचे द्विगुणित सरंजाम खासकलमी असावा. हल्लीं विसकळीत मसलत जाली. हा समय नसतां आपण जातां तर विहित होतें. मला सुचला प्रकार लिहिला आहे. जें करणें तें विचार करूनच आपण करितील. परंतु चित्तीं पुरता पेश अंदेशा आणून ठराव करणें तो करावा. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

नं ५४६८. श्रीगणपति. ( वैशाख शु० १३–७ मे. )

पै॥ छ० १३ जिल्हेज. वैशाख. सन मय्यातैन.

अपत्यें[1] रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १२ जिल्हेजपर्यंत यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री बाळोबातात्या मोकळे जाहले याप्रमाणें वर्तमान इकडे चोंहोंकडून आलें आहे. तिकडे कागदींपत्रीं लिहून आलेंच असेल. पलटणांचा मुक्काम बोरगांवानजीक होता तेथून येडुरास आला अशी वार्ता आहे. पक्कें समजण्यांत आल्यावर कळवितों म्हणून व शिरोळ व अकीवाटकरांचा तिकडे मार्गीं वगैरे उपद्रव होतो येविशींचें लिहिलें तें कळलें. ऐशियास दाणावैरणीची बेगमी मासपक्षपर्यंत यथास्थित होऊन चार रुपये खंडणीचेहि मिळते. परंतु करवीरकरांचें दैव विचित्र त्याप्रमाणें होतें ! वडिलांची प्रकृति बिघडल्याचें पेशजी लिहिलें आलें होतें. हल्लीं उपशम आहे म्हणोन आज्ञा; त्याजवरून संतोष जाहला. तोफखाना व पथकें याणीं पुण्याचा रोख धरिला असेंहि वर्तमान आहे. आम्हीही कूच करून हुकेरीचे रोखें जातों. तेथें गोखले यांची गांठ पडोन ते ठरतात किंवा पुढें जातात पहावें. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

---

१ पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

नं. ५४६९ श्रीगणराज. ( वैशाख शु० १३–७ मे. )

पै॥ छ० १४ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तीर्थस्वरूप राजश्री चिंतामणराव आपा याणीं वडिलांस विचारलें कीं, "आम्हास आपणाजवळ येऊन चार महिने जाहले. आम्हांस खर्चास नाहीं. त्याजपक्षीं आम्ही निघोन पोट भरावयास जातों." त्यास वडिलानीं सांगितलें कीं, "तुम्हांस पोटास नसावयास काय जाहलें? पांच लक्षांचा तालुका तुमचे हवालीं आहे. चिरंजीव राजश्री नारायणराव[1] फौज घेऊन आले आहेत यांसही तीन दिवस घोड्यांस दाणा नाहीं. लोकांस खर्चास नाहीं. कालदेश याजप्रकारचा. रिकामा खटला वाढवणें ठीक नव्हे. यादीबरहुकूम खटला तोडून टाकावा." ऐसें बहुत प्रकारें सांगितलें. परंतु तें तीर्थस्वरूप यांचें चित्तास येत नाहीं. आज फुटोन हुकेरीचे मुक्कामास गेले. राजश्री धोंडोपंत गोखले यांजकडील कांहीं जमाव घेऊन शहापुराकडे उपद्रव करावा हा हेतु आहे. त्यास वडिलानीं गोखले यांस सांगून पाठविलें आहे कीं, चिंतामणराव आपा सरंजामचे महालांत उपसर्ग करणार. त्यांस आपण कुमक देऊं नये. याजप्रमाणें सांगून पाठविलें आहे. आणि आम्हांस याजप्रमाणें मजकूर जाहला म्हणून मिरजेस लिहून पाठविणेंविशीं वडिलांनीं आज्ञा केली. त्याजवरून सेवेसीं लिहिलें आहे. ऐशास त्याणीं आज दीड कोसाचा अंतरा धरिला. पुढें काय मसलत आहे ही समजत नाहीं. आम्ही येथून आज दोन प्रहरा दोन माणसें देवराव कृष्ण देशपांडे यांचे नांवें पत्र लिहून रवाना केलीं आहेत. आपणही जलद पत्रें रवाना करून बंदोबस्त राखावा. ती॥ तिकडे गेले असतां कोणी गोळी वाजविणार नाहीं, आणि चार रुपयेही देतील! कालमाहात्म्य याजप्रमाणेंच आहे. यास्तव विनंती लिहिली आहे. तिकडील बंदोबस्त व्हावा. कळावें सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४७० श्रीगणराज. ( वैशाख शु० १३—७ मे. )

पै॥ छ० १४ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख.

विज्ञापना. वडील दरकूच बारीपार होणार. छ० १३ रोज गुरुवारीं घोडगिरीचा मुक्काम आहे. त्यास आम्ही बरोबर जावें तर आज तीन दिवस

१ पत्र नारायणराव यांचें मिरजेस बाळासाहेबांस. तशींच पुढचीं दोन.

घोड्यांस चंदी नाहीं. लोकांस खर्चास नाहीं. कर्जी रुपये घेऊं म्हटल्यास मिळत नाहीं. आठवडा मनोती शेंकडा चार रुपयेप्रमाणें देऊन चारशें रुपये घेतले. ऐसा समय आला. इकडील विस्तारें लिहून दोन तीन रवानगी केल्या. परंतु समर्पक उत्तरही आलें नाहीं. पारीपारी जाहल्यावर खर्चास पावणार नाहीं, तेव्हां संकट पडेल. यास्तव गोकाकचे मुक्कामाहून वडिलांची आज्ञा घेऊन यावें म्हणतों. घरास माघारे यावें, तरी संकट. न यावें, वडिलांचे स्वारीबरोबर जावें, तर पैसा नाहीं. वडील यांजवळ जमेतही थोडी आणि पाच्छापुरची बारी उतरून वाघावर जावें असा बेत आहे. गोखले यांचेंही मानस वाघावर जावें हाच घाट आहे. काय होतें हें पहावें. चारशें रुपये आणिले ते लागलेच खर्च जाहले. उद्यां कैसें होतें पहावें. तीर्थस्वरूप राजश्री चिंतामणराव आपा याणीं लोकांचे राहुटीगणीक पृथक् पृथक् जाऊन सांगितलें कीं आम्ही तीर्थस्वरूप राजश्री रामचंद्रपंत आपा यांस सोबत चातुर्मास्य देणार. भाजीभाकर मी देईन. नालबंदी तूर्त मिळणार नाहीं. ऐसी सोबत देणार असलां तर मजबरोबर यावें. नाहींतर आपले घरास जावें, ऐसें सांगितलें. नंतर लोकानीं एकवाक्यता करून आम्ही बरोबर येतों ऐसें सांगितलें आहे. वडिलांबरोबर चिंतामणरावआपा चालिले. त्याजपक्षीं सरंजामी महालांची आशा सुटली ऐसें दिसतें. यास्तव जलद इशारा महालकरी यांस पोहोंचून ठाणें यांची मजबुती जाहली पाहिजे. तीर्थस्वरूप राजश्री रामचंद्रपंत आपा यानीं ती॥ राजश्री चिंतामणराव आपा यांस सांगितलें कीं, (तुम्ही) आमचें सांगणें ऐकत नाहीं तर कुरुंदवाडास ती॥ राजश्री दादासाहेब आहेत ते सर्व जाबसालांचा निर्वाह करून देतील. निदान पक्ष नच होई तरी मग जावें. ऐसें सांगितलें. परंतु वडिलांचे विचारास गोष्ट आली नाहीं. याजमुळें कूच करून तफावतीनें उतरले. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५४७१ (वैशाख शु० १४-८ मे.)

रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र. पैवस्ती छ० १३ जिल्हेजचें—

" श्री॥ राजश्री नारायणराव आपा येथें होते. त्यास पलटणांचे दोघे सरदार शिंदे माने यानीं पत्र पाठविलें जे, श्रीमंताची रवानगी करून द्यावी. त्यावरोन एका पत्राचें उत्तर लिहोन दिलें जे श्रीमंत राजश्री येथें आहेत ते

---

१ घोरपडे सेनापति कापशीकर.

राजश्री दौलतराव बाबा यांजपाशीं आहेत असें समजावें. चि।। राजश्री रामचंद्र-पंत आपास ल्याहावें. त्यांचें पत्र येतांच जेथें पाहिजे तेथें पोहचवून देऊं. असें लिहिलें असतां दुसरें पत्र आलें जे, आम्हांस राजश्री दौलतरावबाबांची आज्ञा आहे जे, "जेथें असतील तेथून तुम्ही आणोन पाठवून द्यावे. नाहीं तेपक्षीं पलटणांसुद्धां आम्हांस यावें लागेल असे अनेक प्रकार लिहिले. त्यास काल वेद-मूर्तीस बोलावून आणोन विचार पुसला. " चि॥ राजश्री रामचंद्रपंत आपा तो दूर गेले. पुढें ही या देशीं राहतात असें नाहीं. येथें तो असा प्रसंग गुदरला. पलटणवाले अविवेकी. काय करावें ? " मग वेदमूर्तीच्या विचारें लावून द्यावे ( असें ठरलें. ) त्याजवरोन काल पालखी व राजश्री देवराव हुकेरीकर यांस समागमें देऊन लावून दिले. श्रीमंतांस विनंती केली, " प्रसंगीं मला रक्षावें. चि॥ राजश्री रामचंद्रपंत आपांचा कारभार आकसकोशीचा. आपण प्रसंगीं यावें लागेल. " असें बोलोन लावून दिले. प्रसंग विलक्षण. कांहीं उपाय नाहीं. "

नं. ५४७२ श्री. ( वैशाख शु० १४–८ मे. )

नक्कल.

राजश्री रघुनाथ राव दादा गोसावी यांसीं सकल गुणालंकरण अखं-डित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने।। नारायणराव घोरपडे सेनापति दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करीत आसिलें पाहिजे. विशेष. आपला निरोप घेऊन आलों ते लष्करास पावलों. आपले सरंजामा-विशीं वगैरे बोलोन ठेविलें आहे. कोणेविशीं उपसर्ग व्हावयाचा नाहीं. वर-कड सविस्तर राजश्री देवराव सांगतील त्यावरून कळेल. रवाना छ० १३ जिल्हेज. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं. ५४७३ श्री. ( ९ मे ).

आश्रित[1] रामचंद्र दीक्षित. अनेक आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत वैशाख शु ।। पौर्णिमा जाणोन स्वकीय कुशल लेखन करावें. विशेष आपण त्रयोदशी बुधवारचें पत्र पाठविलें तें आज गुरुवारीं पावलें. पत्रीं मजकूर राजश्री नारायणराव घोरपडे यांचा मजकूर श्री।। राजश्री दादांस लिहिला असतां उत्तर आलें नाहीं म्हणोन लिहिलें, त्यास पलटणें व फौज बोरगांवाचे मुक्कामीं आहेत. त्यास राजश्री माणकोजी शिंदा व राजश्री खंडे-राव यांचीं पत्रें[2] एका दिवसांत दोन ' नारायणराव घोरपडे यांस पाठवून द्यावें '

---

१ उपाध्ये रामचंद्र दीक्षित वाटवे. २ पत्र रामचंद्रपंत आपांस.

म्हणोन आलीं. त्यांतील मजकूर ' जेथें असतील तेथून आणोन पाठवावें म्हणोन हुकूम आहे ' म्हणोन लिहिलें, त्याजवरोन नारायणराव घोरपडे यांस वस्त्रें देऊन दहा स्वार समागमें व पालखी व रा॥ देवराव हुकेरी यांस बरोबर देऊन काल दोन प्रहरां लष्करास पाठविले. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

नं. ५४७४ श्रीगणराज. (वैशाख शु० १५–३ मे.)

पै॥ छ० १६ जिल्हेज. सन मय्यातैन व अलूफ.

अपत्यें नारायणानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १४ जिल्हेज भृगुवार मुक्काम घोडगिरी घटप्रभा दक्षिण तीर. यथास्थित असे. विशेष. वडिलीं सदाशिव पवार व बापू बारमुला याजबरोबर छ० ११ जिल्हेज भौमवारचीं पत्रें पाठविलीं तीं छ० १३ रोजीं प्रातःकालचे प्रहर दिवसास बडकुंदरगीचे मुक्कामीं पावलीं. लिहिला मजकूर कळला. ती॥ राजश्री रामचंद्रपंत आपांचें पत्र पाहून प्रविष्ट केलें. त्याचें उत्तर जाहलेलें वगैरे सविस्तर पुरवणी पत्रीं लिहिलें आहे त्याजवरून विदित होईल. बडकुंदरगी नजीक हुकेरी येथून गुरुवारीं कूच करून मुक्काम मजकुरीं आलों. या मुक्कामास ती॥ राजश्री आपासाहेब व बाबासाहेब व चिरंजीव राजश्री दाजी हीं तिन्ही पथकें व आमचें पथक इतके मात्र आलों. गोखले व पानशे हे मागेंच तीन चार कोसांवर राहिले आहेत. काल येथें आलों ते दिवशीं मागील तळावर वडिलांकडील शिलेदार ऐवजाकरितां अडोन राहिले होते. दोन प्रहर फिरे पावेतों सडीस्वारी तळावरच होती. नंतर लोकांची समजूत करून निघोन मुक्कामास आले. आम्हीही बरोबरच होतों. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४७५ श्री. (वैशाख शु० १५—९ मे.)

छ० १४ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख.

विज्ञापना. आज राजश्री देवराव हुकेरी आले. त्यास सेनापति यांस पोहोंचवून पावती आली. सेनापति यांणीं फिरंगी वगैरे यांस बहुत प्रकारें सांगून तालुक्यास उपद्रव होऊं नये असें सांगितलें. कूच मुक्काम होणें तों पुणियाहून लिहिलें येईल त्याप्रमाणें करणार. व सेनापति यांणीं लिहिलें आहे कीं, उभयतां शूद्र यांस कुरुंदवाडीं भोजनास बोलावावें. असें आहे. त्यांस येथून

---

१ पत्र बळवंतराव लेले यांचें कुरुंदवाडाहून मिरजेस बाळासाहेबांस. २ शिंद्याच्या फौजेचे सरदार माणकोजी शिंदे व खंडेराव माने.

यजमान स्वामीनीं विनंती लिहिली आहे. आज्ञा येईल त्याप्रमाणें बेत होईल. श्रीमंत राजश्री नारायणराव साहेब यांस लौकर यावयाची आज्ञा जाली पाहिजे. येविशी विनंती लिहिली आहे. हा मार्ग प्रशस्त. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४७८ श्रीगणपति. ( १० मे. )

पै॥ छ० जिल्हेज. मग्यातैन.

अपत्यें रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत वैशाख व॥ १ भृगुवार पर्यंत मुक्काम घोडगिरी घटप्रभातीर येथें सुखरूप असों. विशेष. वडिलीं आशीर्वादपत्र पाठविलें तें पावलें. बारीपलीकडे जाण्यास गुणदोष किती तें लिहिलें, 'पुढें करणें तें समजूनच करावें. राजश्री बाळोबातात्या सुटले म्हणोन ऐकतों' म्हणोन आज्ञापत्रीं होतें. त्यास पार पैलीकडे जावयाचें कारण एक तर सामान थोडें. पुढें टिकाव होणार नाहीं. पुण्याकडील पथकें गेलीं. तोफखाना आपले महालाकडे जाणार. गोखले वाघावर जाणार. चि॥ राजश्री चिंतामणराव आपा गेले. आमची फौज फार करून गेली. राहतां चि॥ राजश्री बाबा व नारायणराव व दाजी व आम्हीं मिळून दोन हजार आहों. वाघावर गोखले जाणार त्यांसमागमें जावें म्हणजे गोखले याणीं सावनूर व सरंजामी महाल यांसीं उपद्रव करूं नये. ( असें होईल. ) तिकडे गेलें म्हणजे निर्वेध तालुका होईल, लावणी होईल, खर्चास मिळेल तें घेऊन कित्तूर तालुक्याकडे यावें. असें योजिलें आहे. इकडे राहून चार दिवस दम खावा, राजिक दैविक पाहून करावें, तर तादृश आसराही नाहीं. खर्चाचें मोठें संकट आलें. उपाय नाहीं. पलटणवाले पुढें कोणती चाल धरितात कळत नाहीं. हे सर्व अर्थ समजून आज्ञा व्हावी. तोंपर्यंत रामदुर्गचे बारीचे आंत आहें. एक महिना अडचणीचा आहे. पुढें नद्यांस पाणी येत आहे. मग थोडके सामानानिशीं कोठें राहिलें तर ( कामास ) येईल असें आहे. पुण्याकडील वर्तमान लिहिलें आलें असेल ते आज्ञा करावी. बारीपलीकडे जाऊं लागलों म्हणजे चि॥ राजश्री नारायणरावे यांसीं सेवेसीं पाठवितों. तोंपावेतों आहेतच. फौजा आल्या हें ऐकून वाघ कसें करतो तेंही कळत आहे. त्याजकडे ती॥ राजश्री वासुदेवकाकांचे विचारें संधानही केलें आहे. त्याचा रोष गोखले यांजवर मोठा आहे. मसलत

---

१ पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

शेवटास आली होती, परंतु ईश्वरइच्छेनुरूप न जाहली ! कोठें कर्जवाम मिळतें तरी इकडेच फिरून राहून दम खाल्ला असता. विदित होय हे विज्ञापना. चिरंजीवास देवी आल्याचें कळलें. वडिलांचे आशीर्वादें आरोग्य होईल. हे विज्ञापना.

नं. ५४७७ **श्रीगजानन.** ( वैशाख व० ३–११ मे. )

पै॥ छ० १७ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांस प्रती विनायक भास्कर व हरि भास्कर आशीर्वाद उपरी येथील क्षेम ता॥ छ० १६ जिल्हेज...... काल रात्रौ चिरंजीव राजश्री आपासाहेब यांस विचारिलें कीं, चि॥ रा॥ चिंतामणराव आपा बारीपार जाहले. गोखले याणीं जमाव दिला आहे हें काय ? त्यास चिरंजीवानीं उत्तर केलें कीं, आपास बहुत प्रकारें सांगितलें परंतु न ऐकतां गेले. तेव्हां आम्ही सांगितलें कीं, सांगतां हें यथार्थ. परंतु लोकापवाद येक प्रकारचा होतो. आपण सांगितलें असतां सर्व ऐकतात आणि आपणाशिवाय सांगणार कोण आहे ? ऐसें सांगितलेवर चिरंजीव बोलले कीं, गोखले यांजकडे कारकून पाठवून विचारतों. "घरगुती आमचे कारभारांत कुमक तुम्ही दिली हें ठीक नव्हे. याचा जाबसाल करावा लागेल. असें सांगून पाठवितों म्हणाले; आणि आपा बोलिले कीं, मजविशीं काकांचे चित्तांत काय असेल न कळे. तेव्हां सांगितलें जे, आपणाविशीं पूर्वी बाळासाहेब यांचे चित्तीं होतें खरें. तुम्ही मिरजेंत शपत दिली त्यापासून बाळासाहेब यांचे चित्तीं तुम्हांविशीं कांहींएक नाहीं. तुम्हांस कांहीं आढळलें असलेस आम्हांस सांगावें. आम्ही खातरजमा करूं. ऐसी खातरजमा केली. त्याजवरून आपांचीही खातरजमा जाहली. आपा बोलिले कीं, चिंतामणरावआपा यांचें व जिउबा अण्णाचें सा चौ महिनेंत विटतें. ऐसेंही बोलिले. आम्ही चिंरजीव रा॥ आपास सांगितलें कीं, चिंतामणराव आपा व गोखले साहेबसुभा पुण्याहून करणार. पत्रें गेलीं म्हणोन ऐकितों. त्यास आपा बोलिले, साहेबसुभा करणार तर सुखनैव करोत ! धणी ज्यास देतील त्याणीं करावा. ऐसें बोलिले. येणेंप्रमाणें आहे. कळावें. " ( चिंतामणराव ) आमचें न ऐकतां गेले हें कांहीं ठीक केलें नाहीं. बरें ! तूर्त दिवस एक प्रकारचे आहेत. त्याणीं कां ऐकावें ?" असें म्हणत असतात. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. ५४७८ श्री. ( वैशाख व० ३—११ मे. )

नक्कल.

राजश्री रघुनाथराव दादा गोसावी यांसीं अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ खंडेराव माने व माणकोजी शिंदे. दंडवत. विनंती येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित असावें. विशेष. राजश्री नारायणराव घोरपडे सेनापति यांची रवानगी करून पाठविले ते काल अस्तमानीं लष्करास येऊन पोंचले. आपले तालुकियांत लष्करची कही वगैरे उपद्रव कांहीं व्हावयाचा नाहीं. वरचेवर येविशीं ताकीदही करीत असतों. आपण कोणेविषयींचा संशय चित्तांत न आणावा. बहुत काय लिहिणें लोभ करीत असावें. हे विनंती.

नं. ५४७९ श्री. ( वैशाख व० ३–११ मे. )

मुस्ताख मेहेरबान दादासाहेब दामोहबतहू—

अजि दिल येखलास डास साहेब. सलाम. बाजद सलाम. आकी येथील खैर खुशी ता॥ छ० १६ जिल्हेज जाणोन आपली कलमी खैर करीत जावें. दिगर राजश्री नारायणराव घोरपडे सेनापति यांस आपण येथें पाठविले ते पोंचले. आपले कडील तालुकेस वगैरे इकडून उपद्रव होणार नाहीं. हमेशा पत्र पाठवीत जावें. ज्यादा काय लिहिणें हे किताबत.

नं. ५४८० श्रीगणराज. ( वैशाख व० ३—११ मे )

पै॥ छ० १६ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख.

विज्ञापना. आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. वडिलीं आज्ञा केली ती खरी, परंतु करूं काय ? तीर्थरूप मातोश्री निघतां निघत नाहींत. काल पलटण फौज येथें आली. आज रवानगी करितों. वडिलांपाशीं येऊन पोंचतील तेव्हां खरी ! असा समय कधींही नाहीं. श्रीमंत राजश्री नारायणराव आपापाशीं ही कारकून बातमीस आहे. परंतु विश्वास धरितां येत नाहीं. कृष्णाबाई शिंदीचा वाडा रिकामा करविला पाहिजे. भांडीं-येथून पोंचावयाचीं नाहींत. राजश्री बाळाजी शिवराम यांचे निसबतीस भांडीं लिहोन द्यावयाची आज्ञा करावी. रवाना छ० १६ जिल्हेज. विदित होय हे विज्ञापना.

---

१ मिरजेनजीक शिंद्याचीं पलटणें आलीं तीं किल्ल्यास उपद्रव देणार असें वाटल्यावरून बाळासाहेबांनीं कुरुंदवाडकर रघुनाथराव यांस कुटुंब व फौजेसह मिरजेस येण्याविषयीं लिहिलें त्याचें हें रघुनाथरावांनीं उत्तर लिहिलें. २ हल्लीं ज्यास लागूंचा वाडा म्हणतात तो.

नं. ५४८१ श्री. ( वैशाख व० १३—११ मे. )

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० १२ जिल्हेजपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. पुण्याहून राजश्री बाळाजीपंत सहस्रबुद्धे याचें पत्र वडिलांचे नांवचें आलें तें पाहिलें. राजश्री बाळाजीपंत सोनी यांस पत्रही म॥ निल्हेचें होतें त्यांत लिहिलें आहे कीं, कुटुंबास बहुत जपावें. त्यास आपले आज्ञेप्रमाणें सारीं मुलें मनुष्यें मिरजेस बाळाजीपंतानीं लाऊन दिलीं. याजउपरी जपणें काय आहे ? पलटणें बोरगांवावर आहेत ऐसें आईकलें. आपली स्वारी तो सामानगड तालुकेंत जाली आहे. याजउपरी पलटणवाले काय करितात पहावें. सारांश वडिलीं गोखले यांची संगत सोडूं नये आणि मिरजेकडे नदर असावी. सर्वांस माहीर एक मिरजेशिवाय नाहीं. आणि पलटणवाले संधि पाहतील. दुरोख असला म्हणजे वाटेस जाणार नाहींत. विंचूरकर तो माघारे गेले. साठे बरोबर राहतील किंवा माघारे जातील समजत नाहीं. तैसेच तोफखानेवाले पानशे कसें करितात पहावें. शिंदे यासीं दावा कसा पुरवेल हीच काळजी. बाया फिरल्या ऐसेंही बाजारी वर्तमान आहे. परंतु कोणताही परिणाम नाहीं. त्यांत पुण्यांत बाळाजीपंतांस लिहून एखादी तोड निघे आणि बचाव होतोय, तर बरेंच आहे. भडकत फिरून काय परिणाम ? वडील सर्वजाण आहेत. आपण तरी काय करितील ? धरली खांदी हातास येऊं लागली तर उपयोग. नाहींतर इलाज नाहीं. तशांत हा प्रसंग गुदरला आहे. तर जेथें भार कमी होई अशी स्थळाची योजना होऊन उरकण्यांत...नाहीं तर वडिलांपाशीं पैका नाहीं आणि दिवस बरसाती डोईवर आले याचाही विचार जाहला पाहिजे. त्यास पुण्यास लिहून धरबंद करवावा. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५४८२ श्री. ( वैशाख व० ३–११ मे. )

ती॥ राजश्री आपासाहेब वडिलांचे सेवेशीं—

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० १६ जिल्हेजपर्यंत तासगांवीं सुखी आहें. विशेष. वडिलीं छ० १३ रोजचें पत्र पाठविलें तें आज रविवारीं प्रातःकाळीं पावलें. पत्रीं आज्ञा "पुण्यास जाणें आणि पळटणांस मनाई पाठवावी". त्यास ही सूचना चार दिवस आधीं येती म्हणजे तसाच गेलों असतों. आज मुहूर्ताचा विचार

---

१ पत्र रामचंद्रपंत आपास तासगांवाहून.

केला तों कुंभराशीस मुहूर्त द्वादशी भौमवारीं उत्तम आहे. आजपासून दहा दिवस आहे. मध्यें मुहूर्तच नाहीं ऐसें दीक्षितांचें म्हणणें, त्यास कसें करूं? त्यांत काल प्रातःकाळपर्यंत चि॥ राजश्री बाबाजीपंत गोगटा येथें होता तो राजश्री गोपाळ विठ्ठल यांचे सोबतीनें आपले दर्शनासाठीं लष्करास जावयास गेला. जर वडिलांचा कागद पोंचेपावेतों ... येथें असता म्हणजे ... तसाच पुढें चालता जालों असतों. अथवा त्यास पुढें रवाना करून मागाहून मी जातों. आज एक वर्ष जाहलें. ज्याज्यांकडे वडिलांचीं बोलणीं होतीं ... ... जितकीं बोलणीं तितकीं चि॥ बाबाजीपंताचे विद्यमानचीं. तेव्हां मी एकटा जाऊन कांहीं फल नाहीं. बाबाजीनें दहा वेळां त्या गृहस्थाकडे जाऊन बोलणें सिद्ध करावें. नंतर मला नेऊन खातरजमा मात्र करवावी. ऐसा क्रम तीन वर्षांचा. तेव्हां मी एकटा जाऊन दारोदार फिरेन म्हटल्यानें कार्यसिद्धिही लवकर होणार नाहीं आणि तसी कुत्तेखसाई माझ्यानें होणार नाहीं. आणि त्यांत वडिलांची प्रतिष्ठाही तेथें रहाणार नाहीं. पुण्यांतील पद्धत कोणाच्याही घरास गेलें तर गैरराबता आहे. तेव्हां ती पायपिटी करणार बाबाजीपंत चांगला. चिरंजीव बोलून येऊन मला घेऊन गेला म्हणजे ताजीम मान्यता राहती. प्रतिष्ठेनें काम होतें. असें आहे. त्यांस वडिलीं हें पत्र पावतांच आधीं बाबाजीपंताची रवानगी करून द्यावी. चिरंजीव येथें आला म्हणजे शेवटीं शिवालिखिताचा मुहूर्त सिद्ध करून निघोन जातों. खटपट जिवादारभ्य करितों. यश आपले आशीर्वादें येईल. कळावें. बाबाजीपंतानें तीन वर्षें खटपट केली. आपले पाय पहावे हा हेतु धरून पुण्याहून येथें आला. येथून निघोन कालच प्रातःकाळीं वडिलांकडे गेला. त्यास चिरंजीव .... रक्षून मी विनंती करावयास ती॥ राजश्री दादांस लिहिलें आहे. ते विनंती करितील. त्याप्रमाणें बाबाजीपंतास यादबूद करून देऊन पागेचीं दोन घोडीं बसावयास देऊन आधीं रवानगी करून द्यावी. अनमान करूं नये. मी त्याची मार्गप्रतीक्षा करीत बसलों आहें. पुण्यांत दहा जागीं हिंडणें तें कांहीं माझे वस्तु व्हावयाचें नाहीं. आपण म्हणतील हिंडणें कां होत नाहीं? त्यास पायांत सामर्थ्य नाहीं ऐसें नाहीं. परंतु तसें हिंडल्यानें महत्त्व उणें पडून हलकेपणा येतो. याजमुळें काजीकोतवाली करून कार्य संपादिलें पाहिजे. माझी जितकीं आजपर्यंत संधानें होतीं तीं देखील चिरंजीवाशिवाय दुसरेयास ठाऊक नाहींत. याजमुळें त्यास लवकर रवाना करावा. नानानीं कैलासवास केला तेव्हांपासून

कोणे कामाकार्याचा उद्योग जाला असतां........अशी वेळ प्राप्त जाली. ईश्वर कशी कृपा करी पहावी. असो. प्रयत्न करावा. फलदाता ईश्वर आहे. या दौलतीचे पक्षपाती तात्या नाना ते गेले....जाहले. तेव्हां आम्हांस ...त्राता कोण ? असो. चिंता करून काय होणें ? आला दिवस ढकलावा. पुण्यास पोंचेंपर्यंत राजश्री बाळाजीपंतदादास मला पाठविलें (हें) कळवूं नये. जर कळेल तर व्यर्थ उठान येतील. सरकारबातमीस अंतर पडेल. जरी मी तेथें गेलों तरी त्यांणीं तेथें असावें. मी नेहमीं तेथें रहावयाचा नाहीं याजमुळें विनंती लिहिली आहे. पुण्यांत पत्रें आपले नांवचीं पाहिजेत त्यांची नांवनिशी याद लिहून पाठविली आहे. त्याप्रमाणें पत्रें चिरंजीवाबरोबर रवाना करावीं. यशवंतराव घोरपडे यांस किताब 'अमीरुल उमराव' आहे. नानांचा[1] कागद मीं पाहिला आहे, त्याप्रमाणें ल्याहावें. वडिलीं बाबाजीपंतास याद करून द्यावी आणि रवानगी लवकर करावी, म्हणजे आज्ञेप्रमाणें निघोन जातों. विना चिरंजीव आलेशिवाय मी जाऊन तेथें कांहीं फल व्हावयाचें नाहीं. जर चिरंजीव येथें होता तेव्हां आज्ञा आली असती म्हणजे चिरंजीवास ... ... ... घेऊन गेलों असतों. .......मागें पुढें पडलें. असो. त्यास हें पत्र पावतांच आधीं रवानगी करावी ......येसाजीपंत बापट नि॥ रास्ते यांस अडतीसशें रुपये द्यावयाचे आहेत त्याची तोड पडली पाहिजे. यासमयीं वडिलांपाशीं मागावे तरीही ठीक नाहीं. तसेंच मला पुण्यांत खर्चास पाहिजे. कनिष्ठपक्ष बाबाजीपंत व मी घोडींमाणसें भोजनखर्च मिळोन अडीचशें रुपये दरमहा पाहिजे, हेंही संकट आणि वडिलांचा इलाज नाहीं. त्यास वडिलीं शेगुणसीवर पेस्तर सालचे ऐवजीं अडतीसशें व हे खर्चाचे तीन महिन्यांचे सातशेंपर्यंत ऐसे पंचेचाळीसशें रुपयांची वरात पाठवून द्यावी. ये समयीं गांवाकडून पैसा प्राप्त होणें कळतच आहे परंतु एखाद्यापासून दोन रुपये कर्ज घेतां येतील. तसेंच पुण्यांत बापटास या वरातेवर नजर देऊन खत लिहून देऊन तूर्त उपद्रव चुकवितां येईल यास्तव विनंती लिहिली आहे. तर पंचेचाळीसशें रुपयांची वरात करून आधीं पाठवावी. ती॥ दादांस समजल्यास मान्य करणार नाहींत. कारण सालमजकुरीं करवीरकर व वाघ मिळून तिनी गांवची बाकी ठेविली नाहीं. सालमजकुरीं गांवांचा खंड घेतला, शिवाय लुटून गांव जाळले. शिवाय आमचें खासगत बारा हजार रुपयेपर्यंत त्या गांवांवर फाजील

---

१ नानाफडनवीस यांनीं घोरपडे यांस असा किताब ज्यांत लिहिला होता तें पत्र मी पाहिलें आहे.

आहे. तेव्हां दादा कबूल करणार नाहींत. त्यास वडिलीं कसेंही करून एवढी पेस्तर सालची शेगुणसीवर चिठी करून अगत्य पाठवावी. आमचे नांवचें पत्र ल्याहावें आणि पाठवावें. म्हणजे तूर्त चार महिने काम चालवितों. लिहिल्याप्रमाणें ही तोड निघत नसली तर उपाय नाहीं. त्यास सर्व मजकूर समजावे या भावें लिहिलें आहे. तर लिहलेप्रमाणें चिरंजीवाची रवानगी आणि ही पेस्तर सालचे ऐवजीं पंचेचाळीसशें रुपयांची वरात येणेंप्रमाणें पाठवावी म्हणजे निघोन जातों. दिक्कत नाहीं. होईल यथाशक्त मेहनतीस अंतर करीत नाहीं. मग जसें ईश्वरें योजिलें आहे तसें होईल. पुण्यांत राजश्री बाळाजीपंत दादापाशीं जासूद होते ते दादा गुप्त जाहलेपासून जासुदास निरोप आहे. यास्तव तीन जोड्या जासुदांच्या, चालणारे, विश्वासू, तरणे, मेहनत करीत, ऐसे पाठवून द्यावे. मजपाशीं पद्मीण घोडी आहे ही थोर, वाटे तिटेनें एकटें जाणें, तेव्हां ही घोडी बरोबर हें अवघड आणि पुण्यांतही घोडीस पाहून सर्वांच्या नेत्रांस पाणी सुटेल. यास्तव या घोडीस या समयीं नेणें ( ठीक नाहीं. ) तर वडिलांपाशीं खरगा तुरकी घोडा आहे तो लावून द्यावा म्हणजे पद्मीण बाळासाहेबांपाशीं ठेवून त्यास घेऊन जाईन. घोडी थोर म्हणोन विनंती लिहिली आहे. पुण्यांत एखाद्या लुच्चानें मागितली असतां नाहीं म्हणणें संकट आणि देणें तर दोन हजार रुपयांचें पाठाळ पुन्हा मिळावयाचें नाहीं. यास्तव तपशीलवार विनंती लिहिली आहे. मग जशी मर्जी असेल तैसें ल्याहावें. पुण्यांत सर्व काळ हिसके, तेव्हां घोडें चालणार असावें. मग मर्जी. अथवा ती॥ राजश्री दाजीसाहेबांपाशीं लखमेश्वऱ्या आहे तो तरी पाठवावा म्हणजे ठीक. यांत जसें विचारास येईल तसें करावें. वडिलीं वरात पाठविणेंस आळस करूं नये. वडिलीं दादांजवळ चिठी लिहून मागितली असतां अनमान करितील. त्यास वडिलीं आपणच लिहून पाठवावी. इतकेंही लिहिलें असतां सर्वा गोष्टींची अनास्था करून उत्तर न आलें तरी चिंता नाहीं. चिरंजीवाचें मनोगत रक्षून याद करून देऊन रवानगी करावी म्हणजे निघोन जातों. माझें लिहिणें फार पडतें. वाचून पहावयास आळस करूं नये. आपली फौज पैक्याशिवाय बेदिल. सबब आपण राजश्री धोंडोपंतदादा गोखले यांस सोडूं नये. आपण...यावत् सरकारांतून बंदोबस्त होईपावेतों गोखले यांचे विचाराशिवाय असूं नये. तूर्तचे प्रसंगीं दैवानें त्यांसच हातीं धरलें आहे. जसा प्रसंग पडेल तसें चालावें. वडील सर्वजाण आहेत म्हणोन

विनंती लिहिली आहे. वडिलांची स्वारी बारीपार चालली तेव्हां या प्रांतास उदक सुटलें ! मिरजेची आणि कुरुंदवाडची फौज जरीं या प्रांतीं असती तर कांहीं तरी परिणाम. असो. जसें या प्रांताचे दैवीं असेल तसें घडेल. सारांश होणार सोडीत नाहीं. माझे मतें त्रिवर्ग[1] वडिलांपैकीं एकानें तरी पुण्यांत असावें. तेथील विचार पाहून लिहीन तैसें घडावें. आज सर्व पटवर्धनांत मिळोन पंचवीस लक्षांचा मुलूख असून सर्वा जागीं अन्नानगत जाहली आहे, याहून आश्चर्य कोणतें ? तेव्हां काल विपरीत हेंच समजावें. दुसरी तोडच नाहीं. उत्तर सत्वर यावें. मार्गप्रतीक्षा करितों. बहुत काय लिहिणें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५४८३ श्री. ( वैशाख व० ३—११ मे. )

यादी स्मरणार्थ. पुण्यास जावयाचें, त्यास कलमें कोणासीं कसें बोलावें याविशीं सुमार आठ. बोलणेचीं कलमें लिहिलीं आहेत याचीं उत्तरें तपशीलवार यावीं—

१ श्रीमंताशीं कसें बोलावें तें तपशीलवार लिहून यावें.

१ श्री॥ आमृतरावसाहेबांशीं कसें बोलावें ? मी गुदस्तां पुण्याहून आलों तेव्हां रावसाहेबांची मर्जी रक्षून वाळवें तालुका भाऊसाहेबांस सांगून ठाणें थोराताकडील घालून देवितों ऐशी बशर्ती बोलून आलों होतों. मागाहून रावसाहेबानीं वाळव्यासाठीं हुजरे पाठविले ते वडिलांची स्वारी शिराळयास जाईपावेतों वाळव्यांत होते. त्यासही कमावीसदार याणें धकाबुकी केली. ते हुजरे पुण्यास गेले. आजपर्यंत नाना तात्या ( आमचे ) वकील ! त्यांचे जोरावर वाळवें राहिलें. आतां मी जातों. सर्व दौलतीचें काम रावसाहेब करितात. त्याणीं वाळवेंचा मजकूर धणीपणानें पुसिल्यास स्वालजाब कसा करूं ? रावसाहेबांची मर्जी रक्षावी अशी असल्यास बशर्त वाळवेंचे ठाणें रावसाहेबांचे हवालीं शिबंदीचा वगैरे पैसा न मागतां आज करावें, अथवा मी कसें बोलावें तें लिहून कळवावें; त्यासारखें बोलेन. परंतु याजउपरी रावसाहेबांशीं वाळव्यासाठीं ओढणें चांगलें नाहीं. दुसरें कारण आपली स्वारी बारीपार गेली असतां करवीरकरांचे दहशतीपुढें आपले मामलेदार ठाणें टाकून पळतील. तेव्हां ठाणेंही नाहीं आणि रावसाहेबांची मर्जीही नाहीं ऐसें होणार. त्यास सुचला मजकूर लिहिला आहे. मर्जीस येईल त्याप्रमाणें लिहून यावें. त्याप्रमाणें स्वालजाब करीन.

---

१ तुम्हां तिघा बंधूं पैकीं.

१ पाऊण लाख...याणीं उत्तर पुसिलें तर काय बोलावें ?
१ दीडलक्षासाठीं रास्ते यांनीं पुसिलें तर काय बोलावें ?
१ याजउपरी श्रीमंतांचें लक्ष धरावयाचें किंवा कसें ?

दौलतराव शिंदे यांसीं कसें बोलावें ? त्याणीं जर पुसिलें कीं, "तुम्ही करवीरचे मोर्चे कां उठविले? आम्हांकडून करवीरच्या पारिपत्याविशीं अंतर होतें कीं काय ? तुम्हीच मोर्चे उठवून पलटणचे मोर्चेही तुम्हींच उठविले. आणि पलटणें जाग्यावर टाकून तुम्हीच पळून गेलां. जर पलटणें मारलीं गेलीं असतीं तर कसें होतें ? त्यास केले चाकरीचा पैका देणें" ऐसें उत्तर शिंदे यांणीं केल्यास त्यासीं कसें बोलावें ? जर पलटणवाले यांचा फितुराचा कागद सांपडला असल्यास मग बोलण्यास अवघड नाहीं. त्यास ही कुत कशी जाहली हें कळवावें. किंवा तुम्ही बाळोबास कैद केलें म्हणोन आम्ही मोर्चे उठविले असें बोललें तर ज्या दिवशीं त्याणीं पुण्यांत कैद केलें तेच दिवशीं आपण ब्रम्हपुरीवरून पलटणांपासून दूर सरलां. तेव्हां काय उत्तर करावें ? बाळोबातात्यांचें पत्र आलें असिलें कीं, "पलटणें दगा करणार. तुम्ही मोर्चे उठवून दूर रहावें," ऐसा दस्तऐवज जर शिंदे यांस दाखविला तर मग बोलणारास ठीक पडेल आणि आम्ही पुण्याचे इशाऱ्यावर दूर जाहलों ऐसें बोललें असतां आम्हांस पैका पडणार नाहीं. जर असें पत्र पुण्याहून आलें आसिलें तर मोठीच तोड आहे. किंवा पलटणांचा फितूर दस्ताऐवजीं असल्यास एक तोड. तिसरा जाबसाल शिंदे यांसी बोलावा असें ध्यानांत येत नाहीं. या तोडी दोन्ही नसल्यास मग शिंदे यांसीं बोलावें तें काय? ते म्हणतील तितका पैका पलटणांचा व फौजेचा द्यावा म्हणजे परिणाम. नाहीं तर बोलणाराची अबरू राहणार नाहीं. यास्तव सुचला प्रकार लिहिला आहे. त्यास कसें बोलावें ? मनाई, पैका मागूं नये, पलटणें उठोन जावीं......शिंदे यांसीं बोलण्यास मुद्दा अस्सल....... बोलणाराचें कांहीं चालणार नाहीं. तर कसें बोलावें, कोणे बोलण्यानें ते काईल होतील, हें ल्याहावें. तसें बोलतां येईल.

१ मी पुण्यास जाणार तेव्हां अडतीसशें रुपयेसाठीं येसाजीपंत बापट यांचा तगादा होईल. तेव्हां मागणाराचाच वेध लागला तर मग बोलणें कसें सुचेल ? यास्तव परवां तोड लिहिली आहे त्याप्रमाणें पंचेचाळीसशें रुपयांची वरात शेगुणसीवर पेस्तर सालचे ऐवजीं पाठवावी. ऐवज येणें

दुरापास्त परंतु खटपट करून पाहूं. त्यांत स्वारी बारीपार जाणेंची योजना आहे, तेव्हां या प्रांतांतून पैसा उत्पन्न होणें कळतच आहे ! परंतु वरात पाठवावी. रास्ते यांचे हवालीं करूं. अथणीस हे गांव समीप आहेत, उगवून घेतील. यास्तव लिहिलें आहे. उत्तर समर्पक यावें.

१ बाबाजीपंत गोगटे यास लवकर रवाना करून द्यावें.

८

आठ कलमांची यादी ...

नं. ५४८४ श्री. ( वैशाख व० ४—१२ मे. )

तीर्थस्वरूप राजश्री आपासाहेब वडिलांचे सेवेशीं

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसा ॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० १९ जिल्हेजपर्यंत सुखी आहें. विशेष. ती॥ राजश्री बाळासाहेबांचा आणि चिंतामणराव आपांचा कलह लागला आहे. त्यास या समयीं जर समजूत होईल तर फार चांगलें. दिवस या रीतीचे प्राप्त जाहले. चिंतामणरावआपा समजतील कीं बशर्त बोलल्याप्रमाणें फडशा करून घेऊं. त्यास इतका हट्ट धरूं नये. आणि जितकें दैवी असेल तितकें प्राप्त होईल. म्हणोन कलह तुटक करून टाकावा हें फार चांगलें. आमचे मनांत ही यंदां करवीर घेऊं असें होतें. परंतु ईश्वराचे मनास न आलें. तेव्हां आमचे दैवानें नाना मेले, तात्या मेल्यासारखे जाहले, आणि मसलत बुडाली ! हें सर्व समजत असतां कजिया तोडून घेत नाहींत यावरून अपूर्व भासतें ! त्यास एकानें तरी मागें सरावें. आजचे प्रसंगीं आपण जसें सांगाल तैसें चिंतामणराव आइकतील यांत दिक्कत नाहीं. करवीरकर यांचें पारिपत्य आमचे वस्तु न जालें त्याअर्थी सांगलीस चिंतामणराव यांची वस्ती होणें ईश्वरस्वाधीन आहे. मग मसलत अवघड पडेल. त्यापक्षीं आजचे प्रसंगी समजूत होईल ती सर्वोपरी चांगली आणि श्रेयस्करही. वडिलांचा हट्ट चालवला यांत वांकडे किमपि नाहीं. कमपेश कांहीं ठीक नाहीं. सरकारचा प्रकार...हे भाव दृष्टीस पडतच आहेत. सर्व ध्यानीं असावें. हरकसें करून कलह मिटे ऐसें केलें पाहिजे. चिंतामणरावआपांचे दैवीं आहे तर ईश्वर त्यांस दुसरे कोठें देईना ? यासाठीं जीव देत बसावें कीं काय ? वडील सर्वजाण आहां म्हणोन अधिक आगळें लिहितों. नाहीं तर प्रयोजन नाहीं. काल विपरीत आला आहे. यांत आपण बाळासाहेब चिंतामणराव ऐसें एकरूप राहिलां असतां चार दिवस दौलत

काईम राहील. वडिलीं हरतऱ्हेनें चिंतामणराव यांस सांगून पहावें. मग आपले कडील बोल चुकला. यास्तव विनंती लिहिली आहे. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. आपण राजश्री बाळाजीपंतदादा सहस्रबुद्धे यांस आणवणार म्हणोन ऐकतों, त्यास हें काय करितां ? मी पुण्यास जाऊन माझें रहाणें होईल, मला कोणी उपद्रव करणार नाहींत, ऐसें होऊंद्या; मग जो विचार करणें तो करावा. नाहीं तर पुण्यांत माझेंही वास्तव्य नाहीं... बाळाजीपंत तेथें आहेत. बातमी ही दरबारची नाहींसें होईल. ऐसें घडूं नये. पुढची काडी धरून मागची सोडावी हें न्याय्य आहे. त्यांस तूर्त आणवूं नये. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५४८५ श्रीगणराज. ( वैशाख व० ४–१२ मे. )

पै॥ छ० १८ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख.

अपत्यें नारायणानें शिर सा॥ नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १७ जिल्हेज इंदुवार मु॥ गुडुस नजीक दीड कोस बागेवाडी. घटप्रभा उत्तर तीर. यथास्थित असें. विशेष. इकडील वर्तमान तरी घोडगिरीचे मुक्कामाहून कूच करून काल रविवारीं येथें आलों. काल कूच जाहल्यावर वडिलानीं नवा येक पठाण ठेविला आहे त्याचा घोडा करवीरचे लढाईंत गेला. त्याचे स्वाल जाबास येऊन धरण्यास बसला तो तीन प्रहर तळावरच होता. वडिलही उपोषित बसले होते. त्या घोड्याची किंमत चौघांकरवीं बाराशें रुपये ठराऊन ठेविले होते. तो ऐवज द्यावयाकरितां बसला होता. ऐवज प्राप्त होणें कळतच आहे ! मोबदला त्या किंमतीचें घोडें चौघे सांगतील तें द्यावें असें होऊन सायंकाळीं अस्तमानास स्वारी गोटास आली. तदोत्तर भोजन जाहलें. रा॥ धोंडोपंत गोखले हुकेरी-वर आहेत. येमकनमुरडीची खंडणी पन्नास हजार रुपये घेतली. हुके-रीस चौकी दिली आहे. तेथील जाबसाल उरकोन घेतल्याशिवाय कूच होत नाहीं. याप्रमाणेंच बारीअलीकडे त्याचीं ठाणीं आहेत तेथें असें करणार. नंतर बारीपार होणार असा सुमार आहे. पानशे या मुक्कामास परवांच आले. तेही गोकाक तालुकेंत रोखे मनस्वी करितात. हल्लीं वडिलांचें व पानसे यांचें बोलणें होऊन ठराव जाहला कीं, वडिलांबरोबरच जावें. वडिलानीं पानशे यांस थोडेंबहुत खर्चासही द्यावें असें ठरलें. पुढें काय होतें न कळे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

१ पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

नं. ५४८६ श्री. ( वैशाख व० ५–१३ मे. )

पै॥ छ० १९ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख.

अपत्यें[1] केसो सदाशिव काळे साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील ता॥ छ १८ जिल्हेज भौमवासर प्रात:काल पर्यंत यथास्थित असे. विशेष. हल्लीं घटप्रभातीरास हुणशाळचे मुक्कामास आलों आहों. पुढें घोरपडे यांचे प्रांतांत जावें हा प्रकार एक, व एक तोरगल, मनोळी इकडे जावें या प्रमाणें आहे. काय ठरतें पाहावें. मुख्य गोष्ट खर्चास अगदीं नाहीं. तोफखानेवाले व आम्ही सर्व एकत्र होऊन जावेंसें केलें आहे. काय घडेल तें पहावें. श्रीमंत राजश्री चिंतामणराव आपा यांजपासोन निघोन गेले. बहुत प्रकारें यांनीं सांगितलें, परंतु न ऐकतां गेले. राजश्री धोंडोपंत गोखले मागें हुकेरीवरच आहेत. येतों येतों म्हणतात. येका दो दिवसांत यावेसें आहे. साऱ्यांनीं मिळून वाघाकडे जावेंसें केलें आहे. जातील तेव्हां खरें. काल विचित्र आला आहे. वेदमूर्ति राजश्री चिदंबर बावा दिक्षित यानींही सांगितलें आहे कीं, दिवसेंदिवस काल महा कठीण येत आहे. व पूर्वी शिवरात्रीस श्री रेवण सिद्ध बावांनीं सांगितलें होतें कीं दोन महिनेनंतर राजिक मोठें होईल. त्याप्रमाणेंच घडत चाललें आहे. श्रीमंत राजश्री नारायणराव व माधवरावजी व आबा व यादवरावे[2] नाना वगैरे मंडळी सुखी आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५४८७ श्री. ( वैशाख व० ५–१३ मे. )

पै॥ छ० १३ जिल्हेज. मय्यातैन व अलफ.

मुस्तैाख[3] मेहरबान बाळासाहेब दामोहबतहू—

अजी दिल येखलास डास साहेब. सलाम. आंकी येथील खैर खुशी जाणोन आपली कलमीं खैर करीत जावी. दिगर कंपूकडील गोटीराम बजाज याचे उंट कापडाचे पुणेंहून आले ते मिरजेस राहिले. ऐशियास वाटेच्या दंग्यामुळें इकडे यावयास सुभत्ता नाहीं. तर आपण पंचवीस प्यादे व स्वांर देऊन कंपूंत येऊन पोंचत ऐसें करावें. ज्यादा काय लिहिणें. प्यार मोहबत असों दीजे. हे किताबत.

---

१ पत्र बाळासाहेबांस मिरजेस. २ यादवाडकर. ३ पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची आहे.

नं. ५४८८ श्री. ( वैशाख व० ६–१४ मे.

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे. कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना....लिहिली आहे. याशिवाय बोलणीं असतील तीं बोलतां येतील. त्यापैकीं राजश्री बाळाजीपंतांसही पुसतां... पैक्याचा तगादा कंपूवाले करणार. पुण्याहून कंपूवाले यांजकडे वरात ( करवीर मुक्कामीं ) पाठविली तो ऐवज कोणता ही माहिती समजावयाजोगी ल्याहावी म्हणजे तेथें बोलावयास ठीक पडेल. इतकें ल्याहावयाचें कारण, कोणे एके प्रकारें त्यांस काईल केलें पाहिजे. तरच हा वेध सुटेल. नाहीं तर पायां पडून कांहीं व्हावयाचें नाहीं. आपलेपाशीं पैका नाहीं आणि तिरस्थळीचें येकविचार नाहीं, येणेंकरून बाकी कोठेंच राहिली नाहीं. सरकार या रीतीचें, तेव्हां बोलणारानें कसें बोलावें ? परम संकट आहे. असो. येथेंच लिहीत बसून फल नाहीं. वडिलीं लवकर चि॥ राजश्री बाबाजीपंताची रवानगी करून द्यावी, म्हणजे तेथपर्यंत जातों. तेथील रंग पाहून तपशीलवार लिहीन. मग जी आज्ञा करणें ती करावी. तशी वर्तणूक करीन. आज पुण्यास जातांच एक रास्ते यांजकडील येसाजीपंत बापट याचा तगादा आहे तेवढ्याची निवृत्ति जाली म्हणजे उघडे माथ्यानें फिरतां येईल. त्याची तोड लिहिली आहे त्याप्रमाणें घडावें. सव्वा दोन लक्षांचे कागद ( रास्त्यांकडे ) गुंतले आहेत तो कारभार थोर आहे. त्यासाठीं केवळ कोणी आजच अबरू घेणार नाहींतसें भासतें. मग दैव समजत नाहीं. बाबाजीपंत याची...मार्गप्रतीक्षा करीत बसलों आहें....आणि त्याजकडील ठीक नाहीं. परवां चिरंजीव न आल्यास मला ...जावयाचें नाहीं. कोठेंही धाडणें तर त्यास पाठविला पाहिजे. आपण म्हणतील तोच कशास पाहिजे ? दुसरा कोणी कां न्याना ? ऐसें चित्तांत येईल तें खरेंच आहे. परंतु आज काम जें पडेल तें अवघड. नवा न्यावा त्यास माहीत करावा तरच नेला पाहिजे. त्यांत चिरंजीवानें माझेबराबर तीन वर्षें जी मेहनत केली त्यास साक्षी ईश्वर आहे. इतक्या गोष्टी कळाव्यात म्हणून विस्तारें लिहिलें आहे. चिरंजीवाची सोई यथास्थित करून देऊन रवानगी करून दिली तर येईल. नाहीं तर येणार नाहींसें भासतें. यास्तव वारंवार विनंती लिहिली आहे. वडिलीं चिंतामणरावआपांचा आणि बाळासाहेबांचा कलह हरकसें करून जर मिटविला तर दिगांतरीं भाऊसाहेबांचे मागें कीर्ति आपली होईल. सर्व आपले ध्यानांत आहेत. आमचे

नांवें मिरजेंतील अदना मनुष्य देखील दगड फोडीत असतो. त्यास एवढी समजूत जर आपण केली तर मोठी गोष्ट होईल. बाळासाहेब आइकत नाहींत तर चिंतामणराव याणीं तरी आइकावें. दैवीं आहे तर नवें मिळत नाहीं असें नाहीं. आणि दैवीं नसल्यास आहे तें देखील रहात नाहीं. आपले चित्तांत येईल कीं असें मिरजकर यांचें मनांत कां येईना ? त्यास असें म्हणावें कीं ते वडील. त्यांचाच हट्ट शेवटास न्यावा. कलह राखूं नये. याजउपरी ओढणें बरें नाहीं........यांत फल नाहीं. सुचला प्रकार लिहिला आहे. आपल्या ध्यानीं सर्व आहे. आपण तरी काय करितील ? जर आइकलें तर आपण सांगतील यांत दिक्कत नाहीं. रवाना छ० २९ जिल्हेज हे विज्ञापना.

नं. ५४८९ श्रीगणराज. ( वैशाख व० ८–१६ मे. )

पै॥ छ० २१ जिल्हेज सन मय्यातैन व अल्लफ.

विज्ञापना. श्रीमंत राजश्री नारायणराव घोरपडे यांची रवानगी पलटणवाल्यानीं पुण्यास केली. समागमें जखमी वगैरे कचरा पाठविला. चिरंजिव राजश्री रामचंद्रपंत आपा कोठें आहेत किंवा कुसेगलास गेले ? पुण्याकडील वर्तमान लिहावयास आज्ञा जाली पाहिजे. आज्ञेप्रमाणें येणार त्यास पलटणांचा उपद्रव पत्रीं लिहितां येत नाहीं. रवाना. छ० २१ जिल्हेज. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४९० श्री. ( वैशाख व० ८–१६ मे. )

पै॥ छ० २२ जिल्हेज. मय्यातैन. वैशाख. मंदवार.

सेवेशीं विनंती सेवक बाळाजी महादेव चरणावर मस्तक ठेऊन शिरसा ॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २१ जिल्हेजपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. शहर सातारा लुटला गेला त्याची चौकशीची मामलत राजश्री बाळाजी व्यंकटेश फरासखाने करून आले आहेत. बरोबर दोनशें आरब आहेत. किल्ले वैराटगडाखालीं मुक्काम आहे. राजश्री मुरारराव जाधव भुईंजकर यांचा सरंजाम जप्त होऊन श्री ॥ राजश्री अमृतरावसाहेब यांजकडे आहे. वैराटगड जाधव यांजकडील. तेथील सुभा आबा काळे याजकडून राजश्री शिवरामभट जरंडीकर—राजश्री गणपतराव कुर्लेकर याजपाशीं होते—त्याणीं करून किल्यास आहेत. ते व बाळाजी व्यंकटेश

---

१ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र. २ आपल्या आज्ञेप्रमाणें मीं मिरजेस यावें, परंतु.

एक होऊन गांवगन्ना रोखे करितात. सातारप्रांतीं रोखे केले. तेव्हां रास्ते याजकडील कारभारी याणीं लोक पाठवून दोन चार शिपाई धरोन आणोन चारशें लोक बाळाजी व्यंकटेश याजवर पाठविले. तेव्हां त्यांची यांची लढाई वैराटगडाखालीं जाली. तिकडील इकडील दहा वीस लोक जखमी होऊन रास्ते याजकडील लोक कचकरून माघारे आले. त्यांचें त्यांचें लागलें आहे. प्रांतांत दंगा जाला आहे. पुढें काय होतें पहावें. श्री॥ राजश्री पंतसचिव यांचा सरंजाम जप्त होऊन शिंदे यांजकडील दोनशें स्वार भोरास आले. सचिवाचीं मुलेंमाणसें राजगड तोरण्यास गेलीं. किल्ले वंदनगड बाळोजी कुंजर याजकडे जाला. त्याजकडील लोक चार पांचशें किल्ला घ्यावयास माचीस येऊन बसले आहेत. देवस्थळे व राजश्री माधवराव पिंगळे यांचा सरंजाम जप्त होऊन आबा काळे याजकडे वैराटगडाकडे जाहला. श्रीमंत नाना फडणीस यांजकडे वाई प्रांतांत गांव होते त्यांची जप्ती राजश्री तुळसाजी[1] शिंदे याणीं केली. त्यांच्या पागा येऊन मौजे कटापूर येथें बसल्या आहेत. असे दंगे प्रांतांत होऊन रोखे गांवगन्नानीं मनस्वी होत आहेत. सातारकर महाराज व शिंदे यांचें एक ताट व्हावें असें बोलणें चतुरसिंग भोसले याणीं लाविलें आहे असें बाजारी वर्तमान आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४९१ श्रीगणराज. ( वैशाख व० ८—१६ मे. )

पै॥ छ० २३ जिल्हेज सन मय्यातैन. वैशाख.

श्रियासह चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं प्रति विनायक भास्कर आशीर्वाद उपरी. येथील क्षेम ता॥ छ० २१ जिल्हेज मुकाम दासनाळ तालुके मनोळी यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. ' राजमंडळचे रोखे मिरज प्रांतावर जाहाले आहेत. तर चिरंजीव राजश्री नारायणराव यास पाठवून द्यावें ' म्हणोन लिहिलें, त्यास चिरंजीव राजश्री आपा यास निरोपाविशीं विचारिलें. निरोप याच मुकाहून देतों ऐसें ( त्यानीं ) सांगितलें आहे. आपणाकडे सांडणीस्वार पाठविला आहे. तिकडील जाबाची वाट पहातात. जाब आला म्हणजे निरोप देतील. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. ५४९२ श्री. ( वैशाख व० ९—१७ मे. )

ती॥ राजश्री आपासाहेब वडिलांचे सेवेशीं.

---

१ हा शिंद्यांचा लेंकवळा.

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिर सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० १५ जिल्हेजपर्यंत तासगांवीं सुखी आहें. विशेष. वडिलांकडून पत्रच येत नाहीं त्यावरून अपूर्व भासलें. असो. आठ चार दिवशीं मीच निघोन येतों. चि॥ राजश्री बाबाजीपंत गोगटे हे पुण्याहून राजश्री बाबा पोतनिसाचे कार्यासाठीं आले. मिरजेस गेले होते. हल्लीं राजश्री धोंडोपंतदादा गोखले यांजकडील दरखाविशीं आले आहेत. वडिलांचीही भेट होईल. बहुतकरून गोखले याजपाशीं राहणारसा रंग दिसतो. बाबाजीपंतानें पुण्यांत तीन वर्षें जी मेहनत केली आहे ती पत्रीं कोठवर ल्याहावी ? आपण सर्वजाण आहेत. त्यास वडिलीं आपले पदरीं बाळगावें याविशीं सविस्तर ती॥ राजश्री केसोपंत दादा विनंती करितील त्याप्रमाणें बंदोबस्त करून देऊन आपलेपाशीं ठेवून घ्यावे. अनमान होऊं नये. जी मेहनत मजपाशीं बाबाजीपंतानें केली त्याच्या शतांश जरी मेहनत आपलेपाशीं चिरंजीव करिता तर आपण पालखी देते ! असो. त्याचें सार्थक आपण करावें. मजपाशीं जी मेहनत केली......या भावेंच त्याणें खटपट केली आहे. त्याचें मनन करणें आपलेकडे आहे. आपण म्हणतील आमचेच पाय भुईस नाहींत, तर त्याचा बंदोबस्त करणें तो काय ? त्यास ऐसें चित्तांत आणूं नये. आपलें...... आहे. वडिलीं याद करून द्यावी म्हणजे......दैवानें वडिलांचा सर्व बंदोबस्त होईल. म्हणोन विनंती लिहिली आहे. कनिष्ठपक्ष सरंजामी महालांत यथास्थित बंदोबस्त करून द्यावा. आपण म्हणतील, कसा बंदोबस्त करून द्यावा ? त्यास सर्व मजकूर ती ॥ दादा समजावितील त्याप्रमाणें व्हावें. मग मर्जी. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय. राजश्री बाळाजीपंत जोशी यास तीनपर्यंत पोंचते केले. बाकीविशीं तूर्त उपद्रव करूं नये म्हणोन आज्ञा व्हावी. पुणेंयाकडील वगैरे मजकूर चिरंजीव विनंती करितील. हे विज्ञापना.

नं. ५४९३ श्री. ( वैशाख व० ९-१७ मे. )

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसा ॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० २२ जिल्हेजपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. कौजलगीवर मुक्काम आहे म्हणोन लिहिलें तें कळलें. बाबाजीपंताबरोबर सांगून पाठवितों, लवकर निघावयाचें करावें, म्हणोन लिहिलें, त्यास चि॥ राजश्री बाबाजीपंत येऊन पोंचले म्हणजे निघोन

जातों. दिक्कत नाहीं. परवांचे पत्रीं विनंती लिहिली आहे त्याप्रमाणें येसाजीपंत बापट याचे पेचांतून पार होईन ऐसें तूर्त वरात देऊन करावें म्हणजे निघोन जावयास दिक्कत नाहीं. मला बाळाजीपंत सहस्रबुद्धे याणीं पुण्याहून पत्र पाठविलें त्याची नक्कल करून सेवेशीं पहावयास पाठविली आहे. पाहून अर्थ चित्तांत आणून ठेवावे. मीही त्यांस उत्तर लिहिलें आहे. त्यांत लिहिलें कीं, तात्या कैद व्हावे, मग मी वर्तमान कळतांच पुण्यास यावें, ऐसा नवस कांहीं केला नाहीं ! सर्व एका छायेस बसलों आहों. तेवढी छाया राक्षिली असतां उष्ण लागणार नाहीं. इतकें उत्तर मात्र लिहिलें आहे. वडिलांस कळावेंकरितां लिहिलें आहे. मी पुण्यास जावयास त्यांस संतोष नाहींसा भासतो. त्यास मी जाऊन कार्य नासे असें असल्यास...जात नाहीं. उत्तर यावें. बहुत काय लिहिणें. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५४९४ श्री. ( वैशाख व० ९—१७ मे. )

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २२ जिल्हेजपर्यंत सुखी असें. विशेष. शिंदे यांचे घरीं आजचे प्रसंगीं कारभार मुखत्यारीनें राजश्री आबा चिटणीस करितात. त्यांस आपलें पत्र यावें असें लिहिलें आहेच. परंतु आबाचा आमचा परिचय बहुत आहे ऐसें नाहीं. त्यास राजश्री मोरोपंतमामा जोग यांचा आणि आबांचा बहुत स्नेह आहे. यास वडिलीं आपलें नांवें पत्र मोरोपंत जोग यांस लिहून पाठवावें कीं, माझा आबांचा परिचय यथस्थित करून द्यावा. आणि आबांपाशीं आपणही आम्हाविशीं बोलावें. याप्रमाणें आपण ल्याहावें. मोरोपंत वांईस आले असले तरी आठ दिवस अवकाश करून पुणियास जावें याप्रमाणें ल्याहावें. किल्लीनें कुलूप निघालें म्हणजे श्रम पडत नाहीं यास्तव लिहिलें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५४९५ श्री. ( वैशाख व० ९–१७ मे. )

ती॥ राजश्री आपासाहेब वडिलांचे सेवेशीं

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिर सा॥ नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ० २२ जिल्हेजपर्यंत तासगांवीं सुखी आहें. विशेष वडिलीं छ० १३ जिल्हेजचें पत्र घोडागिरीचे मुक्कामचे पाठविलें त्यांत आज्ञा पुण्यास जाणें म्हणोन लिहिलें होतें, त्या पत्राचीं प्रत्योत्तरें दुकित्ता पाठविलीं आहेत. त्याचे उत्तराची मार्गप्रतीक्षा करीत बसलों आहें. जाबाची काय आज्ञा येईल तसा निघोन जातों. चि॥ राजश्री बाबाजीपंत गोगटे याचा बंदोबस्त करून

रवाना करावा तर मी पुण्यास गेल्याचें फल. नाहींतर मला पाठवून प्रयोजन नाहीं. तैसीच वरात पाठवावी. वरात न आली असतां येसाजीपंत बापट नि॥ रास्ते तो माझी अबरू ठेवणार नाहीं. मी बापटाचे देण्याचे फिरक्यांत हिंडू लागलों तर सरकारकाम सुचणार नाहीं. यास्तव विनंती लिहिली आहे. आजच खर्चाची अट घालावयाचें...तुमचें काम....परंतु वरात आणि बाबाजीपंत गोगटे ऐसे पाठविले असतां जावयास ठीक पडेल. नाहीं तर आज्ञा पाळिलीच पाहिजे. परंतु मग अवघड. त्यास वडिलीं चिरंजीवाची रवानगी आधीं करावी. पुण्याकडील बाजारी वर्तमान वडिलीं शिंदे यास पत्र पाठविलें होतें म्हणे. तें आपाजीपंत अण्णा बारामतीकर याणीं राजश्री आबा चिटणिसांपाशीं पोचविलें. त्यानींही धातुपोषण गोड बोलले. 'मागती करवीरास मोर्चे बसवितों, याचप्रमाणें सरकारचे कागद तयार होत आहेत. आणखी हजार राऊत शिंदे यांचे येत आहेत.' तूर्त शिंदे यांचे घरीं मुखत्यार चिटणीसच आहेत ऐसें वर्तमान एकानें सांगितलें. सत्य मिथ्या ईश्वर जाणे. राजश्री बाळाजीपंत दादा गुप्तच आहेत. आठवले यांचे द्वारें कागद शिंदे यांचे घरीं पोचविणें हें दादाच करितील. येणेंप्रमाणें वर्तमान बाजारी बोलतात. कळावें. मला पुण्यास जाणें म्हणोन आज्ञा आहेच. तर मजपाशीं पश्चीण घोडी आहे ही फार थोर. दुसरें घोडें पाठवावें म्हणोन परवांचे पत्रीं लिहिलें आहे. लिहिलेप्रमाणें आलेस उत्तम. नाहीं तर हिला नेतच आहें. उत्तराची मार्गप्रतीक्षा करीत बसलों आहें. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५४९६ श्री. ( वैशाख व० ९ —१७ मे. )

पै॥ छ० २७ जिल्हेज. सन मय्यातैन व अल्लफ. वैशाख.

मुसलाख मेहेरबान बाळासाहेब दामोहबतहू.

आजि दिलएखलास डाससाहेब सलाम. आंकी येथिल खैरखुषी तागायत छ० २२ जिल्हेज जाणोन आपली कलमी खैर करीत जावें. दिगर आपण पत्र पाठविलें तें पावलें, कंपूकडील गोटीराम बजाज याचे कापडाचे उंट पोंहोचवणेंविशीं पेशजी आपणांस लिहिलें होतें त्याजवरून आपण स्वांर व ( पायदळ ) कंपणी देऊन पोहचाविले ते येथे येऊन पोंचले. प्यार मोहबत असों दीजे. ज्यादा काय लिहिणें हे किताबत.

नं. ५४९७ श्रीगणराज. ( वैशाख व० १०–१८ मे. )

पै॥ छ० २३ जिल्हेज. सन मय्यातैन व अल्लफ.

विज्ञापना. तीर्थस्वरूप राजश्री बाबासाहेब आज दोन रोज मुधोळाकडे तलाव्यास सडे होऊन गेले आहेत. येथील फौज दररोज थोडीबहुत उठोन जात आहे. त्याजपैकीं लोकांची समजाविशी करितात ते येत आहेत. जातात ते धोंडोपंत गोखले यांजवळ राहातात. तो ठेवीत आहे. सारांश वडिलांजवळ जमियतेची कमती पडूं लागली. कळावें. तीर्थस्वरूप राजश्री ( चिंतामणराव ) आपासाहेब शहापुरास गेल्यावर पत्रें पाठविलीं तीं काल वडिलांजवळ आलीं. त्यांतील अभिप्राय " पोटास नाहीं म्हणोन आलों. शहापुरास ठाणें घातलें. " ऐसें लिहिलें होतें. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५४९८ श्री. ( वैशाख व० ११–१९ मे. )

नक्कल.

(शिक्का)

अजसुभा रा॥ दौलतराव शिंदे. तहां मोकदमानी कसबे रहिमतपुर. सु॥ मय्यातैन व अल्लफ. सरकारांत आंबे पाहिजेत. याजकरितां हें ताकीदपत्र सादर केलें असे. तरी कसबे मजकूर पैकीं पंचवीस हजार आंबे सरकारांत पाठवून देणें. जाणिजे. छ० २४ जिल्हेज. मोर्तबसूद.

नं. ५४९९ श्री. ( वैशाख व० १२–२० मे. )

पै॥ छ० २ मोहरम. सन मय्यातैन व अल्लफ.

सेवेसीं बालकृष्ण लक्ष्मण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता॥ छ० २५ जिल्हेज मुक्काम हावनूर वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण छ० १५ जिल्हेजचें पत्र पाठविलें तें छ० २४ रोजीं मुक्काममजकुरीं येऊन पावलें. पत्रीं आज्ञा जे, श्रीमंत राजश्री "रामचंद्रपंत आपा व चिंतामणराव आपा व धोंडोपंत गोखले फौजसुद्धां तिकडे लौकर येतात. तरी वाघ यासीं घासदाण्याचें बोलणें बोलों नये. ठाण्याची बंदोबस्ती आहेच. सावधतेनें रहावें." व पुण्याकडील लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियास तिनी फौजा भागोजीकोप नजीक सतीगिरें येथें आल्या असें वर्तमान येथें बाजारी आहे. माणसें ही पाठविलीं आहेत. वाघ डंबळास मोर्चे देऊन बसला आहे.

---

१ पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची आहे. पत्र नारायणराव यांचें बाळासाहेबांस मिरजेस.

ठाण्यांत दम आहे. इतक्यांत फौजा आल्या म्हणजे शह उठेल. वाघाचाही जमाव भारी आहे. गोखले यांजवर त्याचा द्वेष बहुत आहे. काय घडतें पहावें. लक्ष्मेश्वरचे घासदाण्याविशींची निकड भारी जाली. बोलण्यास कोणी येतें किंवा प्रांतांत स्वारी करावी ऐसीं बोलणीं ( वाघाचीं ) पडूं लागलीं. तालुक्यांत स्वांर फिरूं लागले. याजकरितां बोलावयासीं वाघाकडे पाठविले आहेत. आज्ञेप्रमाणें त्याजकडे लांबणीवर घालावें अशी सूचना पाठविली आहे. कांहीं बोलणें ठरावांत आलें असें वर्तमान आलें आहे. मागाहून सविस्तर विनंती लिहितों. इंग्रजाकडील जमाव चार रोजांत हरिहरास कांहीं आला. आणखीही मागाहून वाघाचें पारिपत्यास येणार आहे. नगर तालुका व हरिहर बसवा पट्टण बालेहोसूरकर यांजकडे आहे ते आमचे उपयोगीं या देशीं फार पडतात. नदीपलीकडे कोणते स्थळास कोणी लक्ष्मेश्वरचा गेला असतां जागा देऊन परामर्ष करितात. आमची देखील परमाणगी त्याणीं इंग्रजांची आणून ठेविली आहे. स्नेह समयीं उपयोगीं आहे. इतकें संकट स्वामीचे पुण्यें करून आतां व्हावयाचें नाहीं. फौज मात्र लौकर यावी. इकडे वर्तमानें मनस्वी येतात. वरचेवर लिहावयासीं आज्ञा असावी. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५०० श्री. ( वैशाख व० ३०–२३ मे. )

पै॥ छ० १ मोहरम. सन मय्यातैन. जेष्ठ.

सेवेसीं विनंती सेवक बाळाजी महादेव दामले. चरणांवर मस्तक ठेऊन शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २८ जिल्हेज पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. बत्तीसशिराळेंवर कंपूकडील लोक जखमी जाहलेले येऊन राहिले आहेत. त्यांपैकीं कांहीं मेले व बरे होऊन लष्करांत गेले. त्यांपैकीं वीस असामी राहिले आहेत ते अद्याप आहेत. आणखी आज साठ असामी जखमी कंपूकडील आले. गांवांत मोठे अरिष्ट करून दिलें आहे. पेठेंतील घरें उदम्यांचीं जबरदस्तीनें घेऊन आंत राहिले. उपद्रव भारी जाहला आहे तो लिहितां येत नाहीं. विठ्ठल शिवदेव यांचे फौजेचा मुक्काम चार रोज होता. शंभर रुपये घासदाणा पडला. काल कूच होऊन माहुलीवर मुक्काम गेला. आज कंपूकडील जखमी आले त्यांणीं अंबराई झोडपून आंबे नेले. नेहमीं राहिले तेव्हां आंबे हातास येतां दिसत नाहीं. आंब्याचा चीक पाठवून देणेंविशीं ( आपलें ) आज्ञापत्र आलें आहे त्याप्रमाणें पाठवून देतों. राजश्री बाळाजी वेंकटेश यांची व

रास्ते यांची लढाई होऊन बाळाजी वेंकटेश यांचा मोड मौज वझरडें येथें जाहला. मशारनिल्हे पळोन किल्ले चंदनगडाखालीं आले आहेत. किल्ले चंदनगड व किल्ले वंदनगड यांची लढाई रोज होत आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५०१ श्रीगणपति. ( ४ जून १७९९ )

पै ॥ छ० ३० जिल्हेज. सन मय्यातैन व अल्लफ.

[1]अपत्यें रामचंद्रानें शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना ता। जेष्ठ शुद्ध १ भौमवारपर्यंत यथास्थित असे. विशेष. वडिलीं आशीर्वादपत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. हरिपुराहून सांगलीवर खटला करावयास लोक आल्याचें लिहिलें तें कळलें. दिवस एक प्रकार ! खटला होऊं नये अशी वडिलीं आज्ञाही केली व इकडूनही मातुश्रीस लिहिलें आहे. येथून कुमक व्हावयाची नाहीं. यशवंतराव शिवाजी बहादुरवाडीपलीकडे गेल्याचें कळों आलें. पठाणानीं केडगांवचा नाश केला हें ऐकून परम वाईट वाटलें. राज्यक्रांतीसच आरंभ, तेथें विधिनिषेध काय आहे ! अलीकडे पुण्याकडील कांहींच कळत नाहीं तर लिहून पाठविणें. चिकोडीचें ठाणें घेतलें. करवीरकर कूच करून भोजेवर वेदगंगा दुधगंगांचे संगमास गेले. आज कूच होऊन पुढें जाण्याचे होते. परंतु शिलेदारानीं कूच करूं दिलें नाहीं. गवगवा पडला आहे. दिवस अखेरीचे आले. पैशास ठिकाण नाहीं. लढाईचा मोकदमा. जवळ खर्चास नाहीं याजमुळें मोठेंसें संकट आहे. ईश्वर परिहार करील तेव्हां प्रमाण ! वडिलांची प्रकृत दिवसेंदिवस गुणमुख आहे. दिक्षित बावा हुकेरीस होते. आज लष्करापासून कोसावर आले आहेत. सायंकाळीं दर्शनास जावें म्हणतों. दर्शन घेऊन सविस्तर लिहून पाठवीन. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५०२ श्री. ( ज्येष्ठ शु० १—२४ मे. )

पै॥ छ० २९ जिल्हेज. सन मय्यातैन जेष्ठ.

मुसलाख मेहेरबान बाळासाहेब दा।मोहबतहू—

अर्जी दिलएखलास डाससाहेब कपितन. सलाम. बांजत सलाम. आंकी येथील खैरखुषी तागायत छ० २९ जिल्हेजपावेतों वर्तमान यथास्थित असे. दिगर. आपण खत पाठविलें तें पावलें. "मिरज प्रांताच्या गांवास रोखा

---

१ हें मिरजेस बाळासाहेबांस रामचंद्र परशुराम यानीं लष्करांतून लिहिलेलें पत्र अकराव्या भागांत यथास्थळीं छापावयाचें चुकून राहिलें तें येथें छापिलें.

पत्र होऊं नये. राजश्री दौलतराव बाबा यांचा व आमचा दुसरा विचार नाहीं;" म्हणोन लिहिलें व कारकून पाठविला आहे असें लिहिलें तें सर्व कळलें. त्यास कारकून येथें आले नाहींत ते आलेवर सर्व बंदोबस्त सांगतील त्याप्रमाणें केला जाईल. ज्यादा काय लिहिणें हे किताबत.

नं. ५५०३ श्री. ( ज्येष्ठ शु० १—२४ मे. )

पै॥ छ० २ मोहरम. सन मय्यातैन. ज्येष्ठ.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब साहेबांचे सेवेसी. विनंती सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेऊन शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २९ जिल्हेज पर्यंत कसबे रहिमतपूरचें व सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री दौलतराव शिंदे यांचें ताकीदपत्र आंबे पंचवीस हजार पाठवून देणें म्हणोन आलें आहे त्याची नक्कल पाठविली आहे. पन्नास स्वांर कांहीं कामाबद्दल कसबे कोरेगांवास आले आहेत. त्यांपैकीं पंचवीस स्वांर ताकीदपत्र घेऊन आले. त्याणीं येतांच पाटील धरून पन्नास रुपये रोज म्हणून घेतले. उपाय चालत नाहीं. कजियास येतात. बागेची जप्ती करून आंबे उतरावयास लागले आहेत. पांच पन्नास रुपये देऊं करीत होतों, परंतु आइकत नाहींत. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५०४ श्री. ( ज्येष्ठ शु० १—२४ मे. )

पै॥ छ० २९ जिल्हेज. सन मय्यातैन.

राजश्री बाळासाहेब गोसावी यांस

सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित माणकोजी शिंदे. दंडवत. विनंति येथील कुशल तागायत छ० २९ जिल्हेज जाणून स्वकीय कुशल लिहीत असावें. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लष्करचा मुक्काम जुगुळानजीक आला आहे,त्यास आपल्याकडील तालुक्याचें गांव सरदेस आहेत त्यांस उपसर्ग लागूं नये म्हणून लिहिलें,व सरकारचे घरोब्याचा अर्थ लिहिला, ऐसियास घरोब्याचे जागीं इकडूनही दुसरा अर्थ नाहींच; परंतु करवीरचे मसलतीकरितां पुण्याहून पलटणें व फौज राजश्री आपासाहेब यांणीं आणिली असतां कराराप्रमाणें ऐवज दिला नाहीं. व सरकारची मनाईही माघारे येण्याविशीं आणिली नाहीं. आपण कूच करून रात्रौ निघोन गेले. आम्ही माघारे जावें तरी आज्ञा आली नाहीं याजमुळें या प्रांतीं राहाणें प्राप्त. तेव्हां खर्चीसही पाहिजे. साडे तीन लाख रुपये राजश्री आपासाहेब यांजकडे येणें. ते निघोन दूर गेले. खर्चाची अडचण. याजमुळें गांवगन्ना घासदाणा घेणें प्राप्त.

येविशीं राजश्री जिवाजी गोपाळ कारकून आपणाकडून आले त्यांस साविस्तर मजकूर सांगितला आहे. मशारनिल्हे विनंति करितील त्याअन्वयें बंदोबस्त आपण करून देविल्यास गांवगन्ना उपसर्ग लागणार नाहीं. आपणांकडून बंदोबस्त न जालीयास गांवगन्ना वासदाणा घेतल्याखेरीज दिनचर्या चालत नाहीं. येविशींचा अर्थ ध्यानांत आणून जिवाजीपंत यांस सत्वर पाठवून द्यावें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंति.

नं. ५५०५ **श्रीगणराज** ( ज्येष्ठ शु० ३ – २६ मे. )

पै॥ छ० १ मोहरम. सन मय्यातैन. ज्येष्ठ.

विज्ञापना[1]. शहराची हुशारी असावी. सर्वांस स्पष्ट सांगावें ( कीं ) आपले मार्ग बघावे. मी फौज ( घेऊन ) बाहेर असतां ( पलटणवाले ) दुर्गाकडे पाहों शकणार नाहींत असें बुद्धीस दिसतें. तोफखानेवाले यांस इशारा करावा. तेही समीप आणवावे. तोंपावेतों राजश्री बाळोबा तात्यांची मुक्तता जालीतर मग चिंता नाहीं. पत्रें आपलीं ही गुप्तरूपें रवाना व्हावीं. चिंता नाहीं. आतांही विशेष प्रतिबंध राजश्रींस नाहीं. पत्रें जावीं असें बुद्धीस दिसतें. मग आपल्या विचारास येईल तसें करावें. विदित होय हे विज्ञापना.

जाल्या गोष्टीची आंच राजेश्रींसही[2] साता काळजांपलीकडे आहे. तेही अंतर करणार नाहींत असें दिसतें. मग कळेना. हे विज्ञापना.

नं. ५५०६ **श्रीगणराज.** ( ज्येष्ठ शु० ३–२६ मे. )

पै. छ ८ मोहरम इंदुवार प्रहर दिवस सन मय्यातैन व अल्लफ.

विज्ञापना. एक गृहस्थाचें पत्र कांहीं वर्तमानाचें आलें त्याची नक्कल पहावयास पाठविली आहे. अवलोकन होऊन माघारे पाठविणेंची आज्ञा जाली पाहिजे. पलटणवाल्यांनीं काल कही पाठवून कुसनाळ, मोळवाडच्या सुमारें तिकडे तोफा होत होत्या. परंतु वर्तमान आलें नाहीं. करवीरास पांच लक्ष रुपयांची वरात आहे. तिकडे दोनशें गाडदी वसुलास काल गेले अशी जनवार्ता. राजश्री मोरोपंत[3] जाऊन पत्रें आलीं असलिया आज्ञा जाली पाहिजे.

---

१ मिरजेच्या किल्ल्यास पलटणें वेढा घालणार असें वाटल्यावरून हें रघुनाथराव कुरुंदवाडकरानीं मिरजेस बाळासाहेबांस पत्र लिहिलें. तसेंच पुढचें. २ बाळोबा-तात्यांस. ३ तुमचे वकील मोरोपंत पुण्यास पोंचून त्यांचें पत्र आलें असेल तर.

श्रीचा उतार पाणी येऊन मोडला. राजश्री हरबा आप्पा धायगुडे चिकोडीस आले असें एकानें सांगितलें. विदित होय. रवाना छ ७ मोहरम हे विज्ञापना.

नं. ५५०७ श्री. ( ज्येष्ठ शु० ३—२६ मे. )

पै॥ छ० ३ मोहरम. सन मय्यातैन ज्येष्ठ मास,

राजश्री बाळासाहेब गोसावी यांसीं.

सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत रा॥ स्ने॥ माणकोजी शिंदे दंडवत विनंती येथील कुशल ता॥ छ० १ मोहरम जाणून स्वकीय कुशल लिहीत असावें. विशेष. आपण पत्र पाठविलें ते पावलें. " करवीरचे मोहिमेस राजश्री आपासाहेब यांचे कुमकेस सरकार आज्ञेवरून आलां येविशींचा जाबसाल त्यांजकडे विचारावा. आम्हांकडील सरंजामाचे महालांत रोखे गांवगन्ना केले असतील ते स्वार उठवून आणवावे. सरकारचा व आपला घरोबा कोणे रीतीचा आहे हें जाणतच आहां; " म्हणून पत्रीं विस्तारें लिहिलें समजलें. ऐशास यजमानांचा व आपला घरोबा त्यांत दुसरा अर्थ काय आहे ? यजमानांची फौज ती आपली नव्हे असा अर्थ नाहीं. असें असतां कांहीं खर्चाची तोड आपण न काढावी हें स्नेहाचे जागां नसावें. व राजश्री आपासाहेब व आपण आम्हांस दोन नाहींत येविशीं विस्तारें काय लिहावें ? खर्चाची बेजमी थोडीबहुत या समयीं आपण केल्यास उत्तम आहे. आपलीच फौज असतां अगदीं अनास्थेचा अर्थ पत्रीं दर्शविला ! आपली मर्जी प्रमाण ! बहुत काय लिहावें लोभ करावा हे विनंती.

नं. ५५०८ श्री. ( ज्येष्ठ शु० ३–२६ मे. )

पै॥ छ० ३ मोहरम. सन मय्यातैन. ज्येष्ठ मास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब साहेबांचे सेवेशीं.

आज्ञाधारक खंडेराव माने पाटील कसबे रहिमतपूर दंडवत. विनंती विज्ञापना. ता॥ छ० १ मोहरम स्वामींचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. साहेबीं आज्ञापत्र पाठविलें तेथें आज्ञा जे, "मिरज महालांतील गांवगन्ना घासदाण्याचे रोखे होऊन दंगा मांडिला आहे. येविशी राजश्री माणकोजी शिंदे यांस पत्र लिहिलें आहे. तरी मिरज प्रांतांत हरयेक विशीं उपद्रव लागों नये" म्हणोन, त्यास कंपूकडील व लष्करचा विचार आनिवार. त्यांत प्रस्तुत लोकांस खर्चास मागावयास लष्करांत कोणी मालक अद्यापि हुजुरून आले नाहींत. यामुळें खर्चा वेंचाची बहुत अडचण येविशींचा पर्याय राजश्री जिवाजी गोपाळ यांजवळ समक्ष सांगितला. मशारनिल्हेनीं विनंती

केलीच असेल. व येथूनही बंदोबस्त राखण्याचे पर्यायें राखीतच आहों. परंतु निरुपाय गोष्टीस उपाय नाहीं. बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५०९ श्रीगणराज. ( ज्येष्ठ शु० ४—२७ मे. )

पैा छ ३ मोहरम ज्येष्ठमास. सन मय्यातैन व अल्लफ.

विज्ञापना[1]. आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. पलटणवाल्यांचे कुचाचे भावाचें पत्र एका गृहस्थाचें आलें तें पाठविलें तें पावलें. आज्ञेस उजूर नाहीं. पत्र पाठवीत आहें हें पाहोन जलचर गेले असतां कांहीं उपयोग व्हावयाचा आहे नाहीं ही आज्ञा जाली पाहिजे. चिरंजीवाचे लग्नाचें लिहिलें, त्यास निरंकुश ! ते पक्षीं काय म्हणतील तें खरें. ( त्यांच्या वयास ) पंधरा वर्षें जालीं खरीं. वधू थोर पाहिजे. लहान वधू केली असतां दादाभाई हे प्रधान आहेत ( ? ) ते पक्षीं वधू चांगली थोर[3] वर्षा सहा महिन्यांनीं नाहाण येई अशी पाहोनच करावी तें उत्तम. तोफ नवी गाड्यावर तेरदळपैकीं चढविली[4], होणें काय ? अस्मान तडाख्यापेक्षां तो थोर नाहीं ! घरची घरकूल बल तो येत नाहीं. नाइलाज आहे. एक घटका लागूं दिली नसती. दिक्षीत मसलतीस गेले आहेत. यशस्वी मसलतीचा प्रारंभच होय ! उपाय नाहीं. राजश्री मोरोपंत पुण्यास गेले, उत्तम जालें. पर्यायें पर्यायें वर्तमान येत जावें. विशेष बोलण्याशीं प्रसंग कोणाशीं कसे याची आज्ञा जालीच असेल. आपलें पुण्य समर्थ हा वेदान्त कदापि लिहिणार नाहीं, कोणाचे घातपात केले नाहींत. पुढेंही कर्तव्य नाहीं. ते पक्षीं श्रीगजानन उपेक्षा करणार नाहीं. पलटणवाल्यांनीं मागें सरकून कूच केलें. तालुक्यांत राऊत वगैरे गेले त्यांचा उपसंहार करोन मग कूच करणार. चिरंजीव राजश्री रामचंद्रपंत आप्पा कोठें आहेत ? रा॥ हरबा आप्पा धायगुडे कोगनोळीस आले असें बोलतात. पत्र पाहोन विसर्जनास आज्ञा जाली पाहिजे. आज्ञेप्रमाणें अंतर नाहीं. रवाना छ. २ मोहरम बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. ५५१० श्रीगणपति. ( ज्येष्ठ शु० ५—२८ मे. )

पै॥ छ० ४ मोहरम ज्येष्ठमास.

विज्ञापना ता॥ छ० ३ अपत्यें[5] रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार

१ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें बाळासाहेबांस पत्र मिरजेस. २ गणपतराव परशुराम यांच्या. ३ एकूण त्या वेळींसुद्धां लग्नाच्या मुली एवढाल्या वाढवीत होतेच ! ४ चिंतामणरावानीं चढविली. ५ पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

मोहरम बुधवारपर्यंत वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. वडिलीं रविवारचें पत्र पाठविलें तें पावलें. भौमवारीं अस्तमानीं वर्तमान कळलें. सर्व प्रकारें वडिलांवर संकट आलें आहे. श्री कृपा करील. आम्हाकडेस ऐवज शिंद्याकडील पलटणांचा येणें तो आपले जवळ पलटणवाले मागणार ! कालचरित्र म्हणावें ! आम्ही निघते समयीं उभयतां शिंदे माने यांचें बोलणें निखालस होऊन निघालों. पुढें तेथें आपलेस पत्र साडे तीन लक्ष रुपये येणें आहेत म्हणोन लिहितात ! काय चिंता आहे ? वडिलीं शहरचा बंदोबस्त करवावा. मीही जमखंडीचे सुमारें येतों. वडिलांस त्याणीं उपद्रव करितात असेंच दिसोन पक्केपणें आलें तर आज्ञा व्हावी. पुण्याहून पत्रें आलीं तीं व आपलीं पत्रें एकदांच पावलीं ! त्याच्या नकला करून सेवेसीं पाठविल्या आहेत. वडिलीं पत्र पाठविलें यांतील अर्थ एकच दिसतो. ते पक्षीं कात्रजेच्या मुक्कामीं पलटणें आल्याचें खरें नव्हे असें वाटतें. आणखी वर्तमानास माणसें गेलींच आहेत. चिरंजीव राजश्री बाबा व आपा व गोखले यांजकडे पुण्याचीं व आपलीं पत्रें आतांच पाठविलीं. बारीपलीकडे जाऊं नये, अलीकडे येणें, असें लिहिलें आहे. काय करितात पहावें. वडिलीं धैर्य सोडूं नये. श्री संकटनिवारण करील. वडिलांचें पुण्य विचित्र आहे. नकला पाठवाव्या म्हणजे उत्तरें पुण्यास लिहितों. वरचेवर पत्रें आलीं पाहिजेत. नित्य येक पत्र वडिलांकडील यावें. वाघानें डंबळ घेतलें. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५११ श्रीगणपति. ( ज्येष्ठ शु० ६–२९ मे. )

पै॥ छ० ४ मोहरम. ज्येष्ठमास. सन मय्यातैन.

विज्ञापना. माणकोजी शिंदे व खंडेराव माने यांजकडून अगर पलटणवाले यांजकडून नाना प्रकारचीं सोंगें घेऊन माणसें येतात. त्याणीं गांवांत येऊं नये, विष्णुपंतांची विहीर त्यांचे दृष्टीस पडूं नये, असा बंदोबस्त पुरतेपणें जाहला पाहिजे. बातमी नेऊन दगा करावयास चुकणार नाहींत. हे विज्ञापना.

नं. ५५१२ श्रीकेदार प्रसन्न. ( जून–आषाढ )

सेवेसी आनंदराव बिन यमाजी शिंदे सरंजामी मौजे कवठें गुळंद व मौजे नरवाड दंडवत विनंती विज्ञापना ऐसी जे, आमचीं दोनी गांवची अवस्था

---

१ चिट्ठी रामचंद्रपंत आपाची बाळासाहेबांस.

जाळून लुटून बेचिराख होऊन गेली. घरीं कवठ्यास जाऊन राहूं म्हटलें तर येक आंकणभर देखील राहिलें नाहीं. कडबा दाणादुणा देखील झाडून गेला. हें साहेबांस परभारें विदित जाहलें असेल. तशामध्यें घरखोपट तरी बांधून गांवीं वस्ती करूं म्हटल्यास कर्जदारांच्या पेचांत बहुत आहों. त्यास साहेबांनीं माझा बंदोबस्त करून दिलीयास गांवास जाऊन घरखोपट बांधून रयतांस धीर भरंवसा देऊन वस्ती व्हावी या प्रमाणें आज्ञा व्हावी. आणि स्वार चाकरीस आहेत त्यांचे निरोपाची आज्ञा व्हावी. आमची अवस्था सर्व राजश्री बाबाजीपंत चांफेकर यांस विदित आहे. ते निवेदन करितील. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

नं.५५१३ श्री गणपतिर्जयति. ( ज्येष्ठ शु० ९–१ जून. )

अस्सलबमोजीब नक्कल.

पै॥ छ० १२ मोहरम. ज्येष्ठ मास. सन इहिदे मय्यातैन,

अपत्यें[1] चिंतामणीनें शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० ७ मोहरम पर्यंत वडिलांचे आशीर्वादें सुखरूप असों. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावोन लिहिला मजकूर कळों आला. पत्रीं आज्ञा " मुकाम कोठें आहे ? कोणीकडे जावयाचें योजिलें ? शिंद्याकडील पलटणें व फौज जुगोळावर आहे. तमाम तालुकेंत उपद्रव आरंभिला आहे. पुण्याकडील वर्तमान अनेक प्रकारचें बोलतात. घर कोठें दिसत नाहीं. तुम्ही तिकडे लांबत चाललां. मागें[2] आहे तें लोक नाश करितात याचा विचार काय केला ? चिरंजीव राजश्री हरिपंत बाबांस लांबूं नये असें लिहिलें आहे. आम्ही जमखंडीलगत जातों. मिरज शहरास अपाय होऊं लागल्यास उपराळा न जाल्यास चांगलें दिसणार नाहीं. " म्हणोन विस्तारें लिहिलें, ऐसियास वडिलीं लिहिला मजकूर हें प्रसिद्ध आहे व खरेंही आहे. आम्ही पाच्छापुराकडून मुरकीबावी प्रांत कित्तूर येथें आलों. चार मुक्काम येथें जाले. ती॥ रा॥ बाबा साहेब भृगुवारीं येथून नजीक कोसावर आले आहेत. वडिलीं लिहिलें हे भाव सर्व रा॥ धोंडोपंतांस वडील[3] बोलले. त्याचे पर्याय गोखले यानीं बोलिले ते वडील येथून सेवेसीं लिहितील त्यावरून विदित होईल. परम अवघड दिवस प्राप्त जाले. या समयीं

१ चिंतामणराव सांगलीकर यांचें रामचंद्रपंत आपास पत्र. २ तुम्हीं द्रव्य मिळवायला दूर जातां खरे, पण मागें तुमच्या घरादाराची पलटणें नासाडी करितात याचा विचार काय ? असा भाव. ३ हरिपंतबाबा.

श्रीनें रक्षावें! उदईक येथून कूच होऊन रुद्रापूरचे मुक्कामास जावें असें बोलणें ठरलें आहे. प्रस्तुत वडिलांचा मुक्काम कोठें आहे तो व तिकडील मजकूर ल्याहावया आज्ञा जाहली पाहिजे. याची तोड वडिलीं काढिलीच असेल. मुख्यस्थांनीं कोणीतरी पाठवून बंदोबस्त केला पाहिजे. सदैव आशीर्वाद पत्र पाठवून बालकाचा सांभाळ करावा. सेवेसीं विदित होय. आमचे दिनचर्येचे परम संकट प्राप्त जालें आहे. वडिलांचे आशीर्वादें करून निवारण होईल. परंतु काल कठिण आहे. हे विज्ञापना.

नं. ५५१४ श्रींगणराज. (ज्येष्ठ शु० १०--२ जून.)

तालिक.

चिरंजीव राजश्री रामचंद्रपंत आपा यांसीं आशीर्वाद उपरी. पलटणवाले[1] यांचे रोखे तमाम प्रांतांत जाहले. नीर च प्रांताचा निघत चालला आहे. पुढें लावणीचें संकट ईश्वरें आणिलें आहे. प्रजेस त्राता नाहींसें जाहलें. प्रांतांत चिरंजीवाचा अंमल आहे. तीर्थस्वरूप कैलासवासी भाऊसाहेबांचीं बोलणीं वचन जें होतें तें ईश्वरास विदित असेल. दैवयोगें कांहीं दिवस—विपरीत भावी होणार तदनुसार—प्रकृत बिघडून शेवटच जाहला. प्रसंगोपात वडिलांचीं पत्रें आलेलीं ही मजजवळ आहेत. असो. तीर्थस्वरूप कैलासवासी नीळकंठराव दादा व भाऊसाहेब उभयतांचे स्थळीं चि॥ रा॥ दादा व आपण असें समजोन आपणांस पत्र लिहून दिलें. यादीचा ठराव आपण केलात त्याजवरही लिहून दिलें. असें असतां जिकडील तिकडे तालुके होऊन फडशा[2] होत नाहीं. किल्लेचा खर्च आपण ठरविला त्या बेरजेंत गांव लावून घ्यावे म्हणून सांगितलेवर तेही गांव लावून घेऊन याद दिलीच आहे. आपण यादी ठरवीत असतां चिरंजीव जाऊन मंगळवेढें व करकंब घेऊन अंमल बसाविला. चारी महाल देशांतील तेथें चिरंजीवानीं अंमल बसाविला. चिरंजीव राजश्री नारायण राव यांस फौजसुद्धां आपणाकडे कोणे प्रकारची खर्चाची अडचण असोन रवानगी करते समयीं दागिने मोडून रवानगी केली. आपणाजवळ चिरंजीव[3] असतां चि॥ रा॥ चिंतामणराव आपा याणीं जाऊन शहापूर घेतलें. प्रस्तुत बारीपार चिरंजीव[4] गेले. गोखलेचा आश्रय केला आहे. आपणाजवळ असोन बुद्धींत न येई असे प्रकार जाहले! इकडेही करवीरवासी यांचा शिलशिला, सबब चि॥ रा॥ नारायणरावांस फौजेसह आणिलें. कर्नाटकचे महाल

---

१ पलटणें मिरजेस उपद्रव देणार याची. २ पेशव्यांच्या दरबारीं. ३ पत्र गंगाधरराव गोविंद उर्फ बाळासाहेब यांचें. ४ चिंतामणरावांचा.

शिबंदीचे पेंचांत आले. लावणी कमी आणि करवीरवासी व रा॥ धोंडोपंत याणीं ऐवज दोन तीन सालांपासोन घेऊन तालुकेची बाकी राहिली नाहीं. आम्हांस ऐवज कोठून येणार? जुजबी आला असेल तो निदर्शनास येईल. आपण उभयतां मधें असोन माझी अवस्था या प्रकारें जाहली हें ईश्वरास मानणार नाहीं. वडील स्वर्गाहून पहात असतील. माझे वयासही पन्नास वर्षे होत आलीं. शरीरसामर्थ्यही दुखणेंनें अशक्तता जाहली. पेंच तो दैवयोगेंकरून या प्रकारें प्राप्त जाहला त्याचा विस्तार कोठवर लिहूं? आपण उभयतांनीं ठराव केला असें असोन तुमची गोष्ट चिरंजीव न आईकत हेंच अपूर्व आहे! माझे प्राणांवर येऊन बनली आहे. शेवटवर अंत पहावा असेंच आपले चित्तीं असल्यास यत्न काय आहे? हल्लीं पलटणवाले बाकी प्रांताची ठेवीत नाहींत. पेस्तर कोणासही पैसा प्राप्त होणें दुस्तर! प्रांतची वस्ती राहणें कठीण. निरानरसिंव्हपुराकडे पलटणें आलेलीं सांगोलें-पलीकडे मांजरीवर आलीं, असें वर्तमान आहे. बरें, ईश्वरी इच्छेस जें आलें असेल तें अन्यथा होणार नाहीं. वडील गेले तेव्हां आम्ही वांचून हीं सुखें! आपण उभयतां सरदार दरम्यान असोन जाहाली. आमचा शेवट ईश्वरें कुटंबसह आपणासही प्रेरक ईश्वर तदनुसार होईल. तीर्थस्वरूप कैलासवासी भाऊसाहेब यांचें स्थळीं तुम्ही आहांत. तेव्हां वडीलच आहेत असेंच जाणून होतों. तुम्ही कुशल श्रीकृपें असावें हीच इच्छा. आराध्याजवळ मागणें दुसरें नाहीं. परंतु आमचा अंतच पाहात चालला हें उत्तम नाहीं. कलियुगांत चिरंजीवी माणसें कोठून राहाणार? त्यांत अर्धी मजल आमची जाहली. आम्ही प्रवाहीं पडिलों. तमासा पाहिलेनें पुढें मागें आपणास लोक चांगलें म्हणत असें विचारास आल्यास करावें. वारंवार लिहिणें काय आहे? आमचे दैवयोगें हे दिवस प्राप्त जाहाले आहेत! छ० ८ मोहरम. लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. ५५१५ श्रीगणपति. (ज्येष्ठ शु० १०–२ जून.)

पै॥ छ० ११ मोहरम सन इहिदे मय्यातैन व अलफ.

अपत्यें रामचंद्रानें शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना त॥ छ० ८ मोहरमपर्यंत यथास्थित असें. विशेष वडिलीं आशीर्वादपत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकुर कळला. त्याची उत्तरें विनपशील.

---

१ पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

वडिलीं मिरजेचा शहरचा बंदोबस्त केला आहे व आज्ञेप्रमाणें आम्हीही समीपच आहों. श्री–कृपें अरिष्ट उपद्रव न लागतां निरसन होईल. कलम १

कैलासवासी वडिलानीं रुप्याचा रथ घोड्याचा करविला होता त्याचा मजकूर लिहिला, त्यास इकडेही वोढ. दिनचर्या चालणें कठीण. याकरितां रुपें असेल तें फरोक्त करावें. घोड्यासुद्धां फरोक्त करावें. कलम १

चिरंजीव राजश्री बापू याचे लग्नाचा मजकूर लिहिला, त्यास राजश्री नारोपंत भिडे चिकोडीकर यांची मूल लहान याकरितां वडिलांचे विचारास आलिया इचलकरंजीस गाडगिळाची मूल आहे तेच निश्चयांत आणावी. कलम १

पत्राच्या नकला सुमार १२ बारा पाहून पाठविल्या त्या पावल्या. कलम. १

राजश्री बाळकृष्णपंत म्हसकर अद्यापि आले नाहींत. कलम १

राजश्री भास्करपंत मामा जमखिंडीकर यांची नात नवरी मूल आहे ते थोर किंवा भिडे यांची मूल थोर ? दोहींतून चांगली कोणती ? याचाही शोध मनास आणावा. कलम १

येणेंप्रमाणें पांच कलमें लिहिलीं आहेत त्याजवरून विदित होईल. अनवाल व येंडिगिरें येथें देसाई याणीं काटकाई करून ठाणीं घातली होतीं. याकरितां आम्ही या रोखें येऊन येंडिगिऱ्याचें ठाणें घातलें. अनवालचेंही बसेल. घटप्रभेस पाणी आलें आहे. उतरलेनंतर गलगल्याचे रोखें जातों. तेथें कांहीं घासदाणा घेऊन जमखंडीस येतों. वडिलांकडील पत्रें आलेलीं इंदुवारीं दोन प्रहरीं पावलीं. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५१६ **श्रीगणराज.** ( ज्येष्ठ शु० २–२५ मे. )

पै॥ छ० १ मोहरम सन मय्या तैन. ज्येष्ठ.

विज्ञापना. राजश्री नागो शामजी यांजकडे चिकोडी दिली.[3] सदलगें वगैरे ठाणीं त्यांचीं बसलीं असें वर्तमान आलें. नेरलीस राजश्री हरबा आप्पा धायगुडे व राजश्री नागोपंत आप्पा यांची दोन हजार फौज जमा जाली असें वर्तमान. रवाना छ० ३० जिल्हेज. विदित होय हे विज्ञापना. हेरवाडास

१ धाकटा भाऊ गणपतराव परशुराम. २ पत्र रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें बाळासाहेबांस मिरजेस. ३ रामचंद्रपंत आपानीं दिली.

राजमंडळचा रोखा आला. पंधरा प्यादे ठाणें स्वाधीन करणें म्हणोन आले. हे विज्ञापना.

नं. ५५१७ श्री. ( ज्येष्ठ शु० १३—५ जून. )

पै॥ छ० १४ मोहरम. सन इहिदे मय्यातैन ज्येष्ठ वद्य १

सेवेसीं विज्ञापना ऐसी जे. छ० ११ मोहरम गुरुवारचे तारखेचीं पत्रें छ० १० मोहरमीं लेहून ठेविलीं. पत्रें तयार जालीं. नंतर सरकारचे वाड्यांत गेलों तों श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वारीहून वाड्यांत येतांच राजश्री आपाजीराम याणीं विनंती केली कीं, राजश्री गंगाधररावजी यांजकडील कारकून आले आहेत. 'येऊं देणें' म्हणोन परवानगी जाली. आपाजीपंत घेऊन मला गेले. श्रीमंत राजश्री पंत प्रधान संध्या करीत होते. नमस्कार केला. पत्र स्वामींचें दिलें. पत्र वाचून पाहिलें. नंतर मी विनंती केली कीं, आज्ञा होईल तेव्हां हरयेकविसीं विज्ञापना करावयाची आहे. ऐकोन मान हालविली. आज्ञा दिली. राजश्री बाबा काळे यानींहीं श्रीमंतांची भेट घेतली. राजश्री नारोपंत चक्रदेव यांजकडे गेले होते तेथेंही भेटले. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५१८ श्री. ( ज्येष्ठ शु० १३—५ जून. )

पै॥ छ० १४ मोहरम. सन इहिदे मय्यातैन. जेष्ठ.

विज्ञापना. कर्नाटकांतील वाघाकडील, तुंगभद्रेपलीकडील जलचर यांजकडील, व करवीरचे महाराज यांजकडील, व आलिजा बहादूर यांजकडील पलटणांतील बातमी, याप्रमाणें वरचेवर स्वामींकडून श्रीमंत रा॥ पंत प्रधान यांचें नांवें पत्री यावीं. पत्र माझे लखोट्यांत असावें. मी पाहून प्रविष्ट करीत जाईन. तेणेंकरून स्वामींचे जागां सरकारचें लक्ष चांगलें बसेल. मीही हरयेकविशीं सरकारांत विनंति करावयांस प्रशस्त होईल. वरचेवर दोनचार दिवसांचे अंतऱ्यानें पत्रें येत जावीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ पत्र मोरो आपाजी परांजपे वकील याचें पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस. ह्याच प्रमाणें पुढच्या नंबरचें.

# जुन्या मुत्सद्यांवर संक्रांत.

## जून स. १८००

पुण्याच्या राजधानींत हल्लीं दोन दरबारें होतीं. एक बाजीरावसाहेबांचें व दुसरें शिंद्यांचें. या दोन दरबारांतल्या मुख्य व्यक्ति पेशवे व शिंदे हे आपापल्या दरबारी धोरणांत जी वारंवार उलटापालट करीत होते तिजमुळें गेलीं पांच वर्षें महाराष्ट्रांत पराकाष्ठेची अंदाधुंदी माजली होती. असल्या राज्यविध्वंसक उलाढाली ते दोघे कां करीत होते याचें अंशतः वर्णन मागच्या प्रकरणांतून जागोजाग आलेंच आहे. तथापि या प्रकरणांतला मजकूर वाचकांस नीट समजावा म्हणून तोच विषय पुन्हां सामग्र्यानें पण संक्षेपानें येथें नमूद करितों.

मराठी राज्यांतल्या कर्त्या माणसांची इच्छा प्रतिकूल असतांही केवळ वस्तुगतीच्या ओघामुळें बाजीरावसाहेब पेशवाईच्या पदावर आरूढ झाले, तरी पण तेवढ्यानेंच त्यांची हौस पुरण्याजोगी नव्हती. ज्यांनीं आपल्या वडिलांशीं विरुद्ध वागून त्यांस अधिकारभ्रष्ट केलें त्या सर्व सरदारांचीं व मुत्सद्यांचीं पाळेंमुळें खणून काढावीं, व मागचें सर्व राजिक उलथें पालथें करून आपली सत्ता अबाधित चालण्यासाठीं जुन्या अधिकारावर आपल्या वतीचीं नवीन माणसें नेमावीं, हा त्यांस ध्यास लागला होता. श्रीमंतांची महत्वाकांक्षा अशी ही प्रचंड होती तरी ती पूर्ण करण्याजोगें अवसान त्यांच्या अंगीं कांहींच नव्हतें हें खरें, तथापि ती उणीव दौलतराव शिंद्यांनीं भरून काढण्याचें श्रीमंतांस वचन दिलें असल्यामुळें त्यांचे मनोरथ सफळ व्हावे असाच संभव दिसत होता. शिंद्याची फौज मोठी आणि जय्यत तयारीची असून तिचा खर्चही मोठा होता. त्या फौजेच्या खर्चास लागेल तें द्रव्य श्रीमंतानीं कुठून तरी पैदा करून द्यावें, अथवा तें पैदा करण्याचे उपाय शिंद्यांकडून जे जे सुचाविण्यांत येतील ते कितीही क्रूर, जुलमी अथवा अन्यायाचे असले तरी त्यांस मान्यता देत जावी; आणि शनिमहाराजांप्रमाणें श्रीमंतांची वक्रदृष्टि ज्या ज्या दुर्दैवी प्राण्यावर पडेल त्याचें शिंद्यांनीं निसंतान करून श्रीमंतांची इच्छा तृप्त करावी, याप्रमाणें दोहीं पक्षीं करार ठरला होता!

या स्वामिसेवकांमधला असला हा दुष्ट स्वरूपाचा उपजीव्योपजीवक-संबंध आजपर्यंत निर्बाधपणें चालला याचें कारण बाजीराव व दौलतराव यांचीं संकटें व चिंता हुबेहुब एकच स्वरूपाच्या असल्यामुळें त्यांची मैत्री जुळणें स्वाभाविक होतें !

पुण्यांत पेशवे व शिंदे यांचीं दरबारें जरी मुख्य समजलीं जात होतीं तरी महाराष्ट्राच्या राजकारणांचें केंद्रस्थान त्या दरबारांत नसून तें त्याच ठिकाणीं असणाऱ्या दुसऱ्या पोटदरबारांत नांदत होतें. पेशव्यांचे कारभारी नाना फडनवीस व शिंद्यांचे कारभारी बाळोबातात्या हे या दोन पोटदरबारांचे अधिष्ठाते असून ते स्वतः व त्यांचीं अनुयायी मंडळें सामर्थ्यानें व द्रव्यानें संपन्न होतीं. पेशवे व शिंदे धनी होते तरी त्यांची दौलत बहुतांशीं या कारभाऱ्यांच्याच हातीं गेलेली होती. दोघेही कारभारी अनुभवी व शहाणे असून राज्यांतले सरदार व मुत्सद्दी वगैरे प्रमुख लोकांवर त्यांच्या अकलेची छाप बसलेली होती. आपापल्या धन्यांची अविवेकाकडे प्रवृत्ति पाहून तिला आळा घालण्यासाठीं हे दोघे कारभारी ऐक्यानें वागत होते. पेशवे व शिंदे हे तरुण व हौशी धनी आपलें प्रभुत्व गाजविण्यासाठीं कितीही आतुर असले तरी हीं कारभाऱ्यांचीं प्रस्थें धुळीस मिळाल्याखेरिज त्यांच्या अधिकाराला कोण विचारतो ? त्यांत आणखी एक अतिशय नाजुक अडचण या दोघाही धन्यांच्या घरांत जुन्या कारकीर्दींतल्या बाया होत्या त्यांच्यामुळें उत्पन्न झालेली होती ! कारभाऱ्यांच्या नादीं लागून या बाया दत्तक घेतील व आपणास अधिकारभ्रष्ट करितील हें दोघांनाही भय होतें ! माजी पेशव्यांची स्त्री यशोदाबाई हिनें चिमाजी आपास दत्तक घेऊन कसा बखेडा माजविला हें मागें सांगितलेंच आहे. महादजी शिंद्यांच्या बायकासुद्धां आम्ही नवीन दत्तक घेऊन तुझी दौलत काढून घेऊं म्हणून दौलतराव शिंद्यांस नेहमीं धमकी देत होत्याच !

कारभारी एवढे प्रबळ होते तरी ते पेशवे व शिंदे यांस पदच्युत करूं शकले नाहींत हा प्रभाव शिंद्यांचे तीन कवाइती कंपू पुण्यांत होते त्यांचा होय. त्या तीन कंपूंत मिळून वीस पलटणें व शंभर तोफा होत्या. हे कंपू शिंद्यांशी इमानानें वागत असल्यामुळें त्यांच्या जोरावर पेशवे व शिंदे यांचा आजपर्यंत टिकाव लागला. उलटपक्षीं श्रीमंतांचा द्वेष व शिंद्यांचें सैन्यबळ हीं एकत्र होऊनसुद्धां तीं कारभाऱ्यांच्या सत्तेचा नायनाट करण्यास समर्थ

झालीं नाहींत हा प्रभाव नानांच्या तेजस्वी बुद्धिवैभवाचाच समजला पाहिजे! ते दिवंगत झाल्यावर मात्र जुनें राजिक मोडून टाकण्याविषयींचा श्रीमंतांचा हेतु तडीस जावयाचा मार्ग मोकळा झाला. मात्र तो निष्कंटक झाला असें नाहीं. अमृतराव, बाळोबातात्या, व नानांची अनुयायी मंडळी हे त्यांच्या मार्गांतले कंटक अजून दूर व्हावयाचेच होते. ते दूर करण्याच्या कामीं श्रीमंतांस थोडे थोडके प्रयास पडले असें नाहीं.

बाळोबातात्या कैद झाले व त्यांच्या जागीं शिंद्यांची दिवाणगिरी सर्जेरावास मिळाली हें पाहतांच आपल्यावरसुद्धां कारागृहाची पाळीं लवकरच येणार ही पुण्यांतल्या जुन्या मुत्सद्यांस काळजी पडली; व हें अरिष्ट टाळण्यासाठीं ते मसलती करूं लागले. त्यांतून याच वेळीं सर्जेरावानें श्रीमंतांस विनंती केली कीं, आपण मला कृपा करून शिंद्याची दिवाणगिरी दिली त्याचप्रमाणें पेशवाईचा कारभारही आपण माझ्या हातें घ्यावा. दोन्ही दिवाणगिऱ्या मी संभाळतों! घाटग्याच्या या अर्जास साफ नकारात्मक उत्तर न देतां श्रीमंतांनीं होय, नाहीं, आज, उद्यां, अशी चाळवाचाळवीची भाषा सुरू केली. त्यामुळें अमृतरावांस संशय उत्पन्न झाला. त्यांनीं श्रीमंतांशीं भांडून दिवाणगिरीच्या अधिकाराचीं वस्त्रें नुकतींच गेल्या पाडव्याला मिळविलीं होतीं. त्या अधिकाराला घाटग्याची साडेसाती लागणार असें मानून ते श्रीमंतांवर नाखूष झाले आणि बाळोबा व नानांची मंडळी यांच्या मसलतींत सामील झाले.

जुन्या मुत्सद्यांचे हेतु काय होते हें येथें एकदां सांगून ठेविलें पाहिजे. शिंद्यानें बाळोबातात्या यांस कैदेंतून सोडावें आणि त्यांस पुन्हा दिवाणगिरी द्यावी, घाटग्याला कैदेंत घालावें, आणि पुण्यांतून तळ हालवून हिंदुस्थानांत निघून जावें. तसें तो न करील तर त्याला जबरदस्तीनें दक्षिणेंतून काढून लावावें. तो गेल्यावर अमृतरावानीं नालायख पेशव्यांस जरबेंत ठेवून राज्याचा कारभार मुखत्यारीनें हांकावा. फडणिशीच्या कामावर नानांचे प्रतिस्पर्धी मोरोबादादा यांस नेमावें असा पेशव्यांचा हेतु आहे तो सर्वथा तडीस जाऊं देऊं नये. नानांच्या स्त्रीस दत्तक देऊन त्याच्या नांवें फडणिशीचा दरक चालवावा. याप्रमाणें या मंडळीच्या बड्या बड्या मसलती होत्या. मात्र त्या तडीस नेण्याची अक्कल बाळोबातात्यांखेरीज कोणांतही नव्हती. त्यामुळें सर्वांनीं कारस्थानें खेळविण्याचा भार तात्यांवर सोंपविला व ते सांगतील त्या धोरणानें चालावें असें ठरविलें. तात्याही आपण जें जें करितों तें सर्व अमृतरावसाहेबांच्या हुकमानें करतों असें गृहीत धरून व्यवहार करूं लागले.

बाळोबातात्यानीं आपले उद्देश सिद्धीस नेण्यासाठीं कशीं कशीं सूत्रें खेळविलीं याचें आविष्करण आतां करूं. त्यांचा मुख्य भरंवसा लखबा लाड याजवर होता. पाटीलबाबांच्या कारकीर्दींत प्रसिद्धीस आलेला हा शूर व फौजबंद शेणवी सरदार आग्र्याचा सुभेदार होता. बाया बिथरल्यापासून हा दौलतरावांशीं फटकून वागत होता तरी त्यानें उघडपणें बेबनाव केला नव्हता. अलीकडे लाड यानें जयपूरच्या राजावर जय मिळविला त्या निमित्तानें शिंद्यानीं वानवडीस खुशालीचा दरबार भरविला, आणि बाळोबा व धोंडीबा या कारभाऱ्यांस त्या समारंभाकरितां बोलावून नेऊन भरदरबारांत कैद केलें ! यावरून शिंद्यांचें धोरण आकळणें किती कठीण होतें, तें दिसून येईल. लखबा लाड यालासुद्धां कैद करावें असें शिंद्यांच्या मनांत होतें. पिरू फिरंगी व अंबाजी इंगळे हिंदुस्थानांत होते त्यांस त्यानीं तसा हुकूमही पाठविला होता. परंतु लखबादादा सावध असल्यामुळें त्यावर ह्या दोघांचा काट चालला नाहीं. लखबानें बाळोबातात्यांस आश्वासन दिलें होतें कीं, माझ्या येण्यानें तुमचें काम होत असेल तर मला जरूर कळवा. मी तत्काळ दक्षिणेंत फौजेसह निघून येण्यास सिद्ध आहें. तात्यांचें दुसरें संधान यशवंतराव होळकराकडे लागलेलें होतें. तो पंचवीस हजार फौज बाळगून उज्जनीच्या आसपास शिंद्यांचा मुलूख लुटीत होता. शिंद्यांचा पाडाव करण्यासाठीं बाळोबांच्या मसलतींत सामील होण्यास त्याची केव्हांही तयारी होती ! शिंदेबाया तर तात्यांच्या मुठींतच होत्या म्हटलें तरी चालेल. त्यांचा मुक्काम हल्लीं बऱ्हाणपूरच्या आसपास होता तरी पुण्याहून सूचना जातांच त्या तत्काळ परत फिरल्या असत्या. तात्यांचें आणखी एक संधान पटवर्धन, पानशे व गोखले यांजकडे लागलें होतें; त्यामुळें ते सरदार सुमारें पंधरा हजार फौजेसह कृष्णा व मलप्रभा यांच्या दरम्यान जागोजाग एक महिनाभर थबकून राहिले होते. चक्रदेव व अमृतराव यांचेंही बोलणें करवीरचा वेढा उठल्यापासून या सरदारांकडे निराळें सुरू होतेंच. त्यांतून बाळोबातात्यांचा व परशुरामभाऊंचा स्नेह कसा होता हें प्रसिद्धच आहे. तात्या जसें सांगतील तसें वागण्यास परशुरामभाऊंच्या पुत्रांची तयारी होती इतकेंच नव्हे, तर हें नवीन कारस्थान कसें काय रंगारूपास येतें इकडे रामचंद्रपंत आपांचें लक्ष एकसारखें वेधून राहिलें होतें !

शिंदे व बाजीरावसाहेब यांस कह्यांत आणण्याकरितां बाहेरून कुमक मिळविण्याची जी जी खटपट करण्यांत आली ती येथवर सांगितली.

खुद्द पुण्यांतसुद्धां या दिशेनें केलेले प्रयत्न चांगलेच सफळ झाले होते. बक्षी व यशवंतराव शिवाजी वगैरे शेणवी सरदारानीं शिंद्याच्या घोडदळांत बराच फितूर माजविला होता. चक्रदेव, गोडबोले, शिराळेकर वगैरे नानांच्या मंडळीनीं हुजरातींत तोच उद्योग केला होता. नाना फडनवीस वारल्याबरोबर त्यांच्या पदरीं असलेले दोन तीन हजार आरब बेकार झाले. शिंद्याचें धरणें आल्यास त्याचा प्रतीकार व स्वरक्षण करितां यावें म्हणून जुन्या मुत्सद्यांपैकीं पुष्कळानीं हे आरब आपापल्या ऐपतीप्रमाणें पन्नास, शंभर, दोनशें, पांचशें, असे चाकरीस ठेविले होते. शामीरखान रोहिला फार वर्षांपासून पेशवे सरकारच्या नोकरींत होता. त्याच्या जमातींत पांच सातशें पठाण होते. नारोपंत चक्रदेव यानीं या रोहिल्यास त्याच्या सबंध जमातीसह आपल्या निसबतीस लावून घेतलें होतें ! बिथरलेल्या मुत्सद्यानीं बाळगलेले हे पठाण व आरब खुद्द आपल्या राजधानींत प्रत्यहीं धामधूम करितात हें बाजीरावसाहेबांस मोठेंच शल्य भासत असे. नानांच्या निसबतीस लोहगडचा किल्ला होता तेथील किल्लेदार धोंडोपंत निजसुरे यानें राजरोस बंडाचा झेंडा उभारला होता. त्याच्याही पदरीं बरेच आरब होते.

या दिवसांत आणखी ज्या लोकांनीं नानांचे आरब चाकरीस ठेविले त्यांपैकीं जयीबाई होळकरीण व परशुरामपंत प्रतिनिधि यांचीं नांवें येथें नमूद केलीं पाहिजेत. कारण त्यांचा संबंध पुढील मजकुरांत येणारा आहे. शिंद्यानें मल्हारराव होळकरास छापा घालून मारिलें तेव्हांपासून त्याची स्त्री जयीबाई ही आपल्या मुलास घेऊन जुन्या कोटांत केसोपंत कुंटे यांच्या वाड्यांत बंदोबस्तानें राहिली होती. तिच्या मुलास मारण्याकरितां काशीराव होळकरानें दोनतीनशें मारेकरी नुकतेच पाठविले होते. त्यांस बाईच्या लोकांनीं पराजित करून हुसकून लाविलें होतें. तथापि पुन्हा तसा प्रसंग आल्यास आपली मजबुती असावी म्हणून बाईनें दोनशें आरब चाकरीस ठेविले होते. परशुरामपंत प्रतिनिधींच्या वयास चोविसावें वर्ष सुरू होतें. त्यांचा स्वभाव लहानपणापासून आडदांड व स्वच्छंदी असे. त्यांची कुसंगत सुटावी व त्यांस धाक रहावा म्हणून नानांनीं मागेंच त्यांस कऱ्हाडाहून आणून पुण्यांत आपल्या देखरेखीखालीं ठेविलें होतें व सरकारच्या परवानगीखेरीज शहर सोडून जाऊं नये अशी त्यांस मनाई केली होती. अजून ते तसेच लवाजम्यानिशीं नजरकैद असल्यादाखल पुण्यांत होते. अलीकडे पेशव्यांशीं व मुख्यत्वें त्यांच्या प्रीतींतले बाळोजी कुंजर व आबा काळे यांशीं पंतांचा बेबनाव वाढल्यामुळें आपणा-

वर निकर्ष होऊं लागल्यास झूज द्यायला खबरदार असावें म्हणून त्यांनीं चारपांचशें आरब पदरीं बाळगले होते.

प्रतिपक्षाशीं कुरापत काढण्यापूर्वीं त्याबद्दल खोट्या कंड्या पिकविण्याची वहिवाट नेहमींची आहे. शत्रु संकटांत पडला आहे, कमकुवत झाला आहे, त्याचीं कारस्थानें विस्कळलीं आहेत, त्याचा नाशकाळ समीप आला आहे, अशा अर्थाच्या या कंड्या असतात. हल्लींसुद्धां तसल्याच गप्पांचा सुकाळ पुण्यांत माजला होता. इंगळे व पिरू यांस लखबानें पराजित करून पकडून छकड्यावर बांधून ठेविलें आहे, तो दक्षिणेंत त्वरेनें चाल करून येत आहे, जयपूरवाल्यांची दहा हजार फौज त्यास मिळाली आहे, मस्तानीचा नातू व बुंदेलखंडाचा सुभेदार अलीबहाद्दर यास लखबानें मिळवून घेतलें आहे, बाया परत फिरून पुण्याकडे येत आहेत, पिरूची दुर्दशा झाल्यामुळें पुण्यांतले कंपूवाले हिंदुस्थानांत जाण्याकरितां शिंद्याजवळ निरोप मागतात, तिकडे जाण्याची खुद्द दौलतरावास घाई झाली आहे, त्याच्या लष्करानें पावसाळ्याच्या बेगमीकरितां सांठविलेला कडबा देखील विकून टाकिला, अशा या कंड्या एक ना दोन ! किती म्हणून सांगाव्या ? या कंड्यांबरोबरच लुंग्यासुंग्या मुत्सद्यांच्या वल्गना शिंदा बुडवितों, कंपू कापून काढितों, यंव् करितों, त्यंव् करितों, अशा सररास ऐकण्यांत येत होत्या !

याप्रमाणें हा ‘ बाजीराव विरुद्ध अमृतराव ’ अशा स्वरूपाचा डाव बाळोबातात्यांनीं मांडला तो प्रतिपक्षावर हटकून मात करतां येईल अशाच कौशल्यानें मांडला होता. तात्यांच्या दुर्दैवाची गोष्ट एवढीच कीं त्या डावाची मांडणावळ कसकशी होत आहे इकडे शिंदे, घाटगे व पेशवे यांचें प्रथमपासून लक्ष लागलेलें होतें ! ते बेफाम नव्हते. सर्व गोष्टींची वर्दी त्यांस क्षणोक्षणीं लागत होती. हा डाव त्यांना आरंभींच उधळून टाकतां आला असता, तथापि त्यांनीं तसें केलें नाहीं हा मोठाच शहाणपणा केला ! कारण त्या योगानें त्यांस आपले शत्रु कोण, मित्र कोण, कोणाचे ढंग कसे आहेत, याची स्वस्थपणानें परीक्षा करण्याची आयतीच संधि मिळाली. शिवाय त्यांस घाई करण्याचें कांहीं प्रयोजनही नव्हतें. बाळोबांच्या खेळांतले मोहरे होळकर, लखबादादा, बाया, पटवर्धन वगैरे होते ते परस्परांपासून व खुद्द तात्यांपासूनसुद्धां दूर होते. ते एकत्र यावे, त्यांचा एकवाक्यतेनें कार्यक्रम ठरावा, आणि नंतर पुढील उद्योग व्हावा, या गोष्टी घडण्यास अवकाश होता. उलटपक्षीं शिंद्यांचे

मोहरे वानवडीच्या छावणींत सशस्त्र व सज्ज झालेले रात्रंदिवस उभेच होते! वेळ आली म्हणजे तात्यांचा डाव घटकेंत उधळून देऊं ही त्यांची खात्रीच होती. ती वेळ केव्हां येते याचीच ते वाट पहात होते.

हा वेळपर्यंत बाळोबातात्यानीं कागदी घोडेच नाचविले, पण मे महिन्याच्या अखेरीस खरोखरीचे घोडे नाचविण्याची वेळ आली असें त्यानीं मानिलें व तो मार्ग धरून पहिलें पाऊल टाकिलें. तें असें कीं, त्यांनीं फौजेच्या खर्चाकरितां कांहीं द्रव्य बरोबर देऊन आपला दिवाण रामचंद्रपंत आपांकडे पाठविला व त्यांस कळविलें कीं, "तुम्ही, पानशे व गोखले मिळून सर्वींनीं ताबडतोब कूच करून पंढरपूरच्या सुमारें यावें. लखबादादा व यशवंतराव होळकर व शिंदे बाया यांशीं आपण संकेत ठरविला आहे त्याप्रमाणें त्या सर्व फौजा लवकरच गोदावरीच्या तीरास येतील. नंतर पुढें कसें करावयाचें तें कळवूं त्याप्रमाणें अमलांत आणावें." ही वार्ता दौलतराव शिंद्यांच्या कानीं जातांच आतां या म्हातार्‍याची उपेक्षा करणें वाजवी नाहीं, याचा पक्का बंदोबस्त केलाच पाहिजे, अशी त्यांची खात्री झाली! तत्काळ त्यानीं बाळोबातात्या व धोंडीबादादा यांस वानवडीच्या छावणींतून उचलून नगरच्या किल्यास पाठवून दिलें. झालें! सूत्रधार व पारिपार्श्वक यांची याप्रमाणें जखडबंदी झाल्यावर सारेंच नाटक संपलें! बाकीचे मुत्सद्दी रंगून तयार झाले होते त्यांची संभावना व्हायची तेवढी राहिली. तेंही काम एक महिनाभर यथास्थित चालून समाप्त झालें! तो प्रकार कसकसा घडत गेला हें आतां अनुक्रमानें निवेदन करावयाचें आहे.

ता० ३१ मे दिवशीं आपल्या छावणींतला फितूर मोडण्याकरितां शिंद्यानीं पहिला तडाखा मारला तो इतका आकस्मिक व भयंकर होता कीं तेवढ्यानेंच गुन्हेगारानीं गांगरून स्तब्ध व्हावें! त्यानीं आपल्या फौजेंतले सरदार "तुळसाजी शिंदे, मानाजी वांबळे व सुभानजी मोरे याचा लेक एकूण तीन असामींस अस्तमान जाहल्यानंतर डेर्‍यांत बोलावून आणून कैद करून तसेच तोफेच्या तोंडीं दिले. प्रातःकाळीं प्रेतें घाशीराम याचे बागेनजीक मार्गावर खाटेवर घालून आणून टाकिलीं. त्यांजकडे बायांकडे फितूर हा आरोप होता."

ही बातमी शहरांत पसरतांच पेशव्यांशीं बेदिल झालेल्या मुत्सद्यांस पराकाष्ठेची दहशत बसली. त्या दिवसापासून त्यांची 'शिदा बुडवितों' 'कंप

कापून काढितों ' वगैरे बडबड अजीबात बंद झाली ! आपला पक्ष किती दुर्बळ आहे व फंद फितूर माजविण्यांत केवढा भयंकर धोका आहे हें त्यांस या प्रसंगानें प्रथमच कळून आलें आणि तेवढ्यानें त्यांचे डोळे उघडले. तात्यानीं उभारलेलें कारस्थान सोडूं नये, पुढें चालू ठेवावें, असा अमृतरावांचा अजूनसुद्धां इरादा होता तरी ते सोबत्यांशींदेखील जें बोलायचें तें सावधपणानें मोघम मोघम बोलूं लागले !

मिरजप्रांतीं शिंद्यांच्या पलटणांबरोबर घोडदळ होतें त्यावर माणकोजी शिंदे व खंडेराव माने हे सरदार नेमलेले होते असें पूर्वीं लिहिलें आहे. शेणव्यांच्या फितुरांत हे दोघे सामील असल्याचा पत्ता दौलतरावांस लागल्यावरून त्यांचीसुद्धां वरील त्रिवर्ग फितुऱ्यांप्रमाणेंच दशा करावी असा शिंद्यांचा इरादा होता व त्यांस ताबडतोब पकडण्यासाठीं त्यांनीं डाससाहेबास हुकूम देखील पाठविला होता. परंतु ही कुणकुण शिंदे व माने यांस आगाऊच लागल्यामुळें ते सावध होते. त्यामुळें ता० ५ जून रोजीं पलटणवाल्यानीं त्यांस धरण्याचा यत्न केला असतां थोडीशी चकमक झाडून ते उधळून गेले.

लष्करांतला फितूर मोडण्याच्या बाबतींत शिंद्यानीं उग्र स्वरूप धरलें होतें तें आणखी प्रमुख सरदारांचे बळी मागतच होतें ! नारायणराव जिवाजी बक्षी, यशवंतराव जिवाजी व देवजी गवळी हे ते सरदार होत. त्यांवर पहारे बसलेच होते. मात्र त्यांचा जीव केव्हां कसा घ्यायचा इतकेंच ठरायचें राहिलें होतें. इतक्यांत सुदैवानें हात आंवरता घेण्याची दौलतरावांस बुद्धि झाली म्हणून या वेळेपुरता या लोकांचा जीव वांचला. तुळसाजी शिंदे वगैरे तिघांस तोफेच्या तोंडीं दिल्यापासून शिलेदार मंडळींत फारच असंतोष माजला होता. त्यांत बक्षी व त्याचे दुसरें दोघे सोबती यांवर पहारे बसलेले पहातांच सैन्यांत मोठी खळबळ उडाली, आणि आपलें निग्रहाचें धोरण असेंच पुढें रेंटल्यास तें सुखाचें होणार नाहीं असा शिंद्यांस सुमार दिसूं लागला. त्यामुळें मनांतला दंश तितकाच ठेवून त्यांनीं या त्रिवर्ग सरदारांवरचे पहारे उठविले व बक्षीचें समाधान केल्यासारखें दाखविण्यासाठीं त्यास बोलावून नेऊन सन्मानाचीं वस्त्रें दिलीं.

बाळोबातात्यांचें उच्चाटन होतांच रामचंद्रपंत आपा व त्यांचे सोबती गोखले व पानशे यांस पुण्याकडील मसलतीचा नाद सोडून द्यावा लागला. त्या मसलतीच्या नादांत या सरदारांनीं एक महिना फुकट घालविल्यामुळें

धोंडजी वाघास धारवाडप्रांतांत ताव मारण्यास चांगलेंच फावलें ! अजूनसुद्धां हे सरदार एकमतानें झटून त्या बंडखोराच्या पराभवाचा कांहीं यत्न करते तर तो अगदींच व्यर्थ झाला असता असें नाहीं. परंतु वाघाची सद्दी अजून जबरदस्त असल्यामुळें तसा योग जमून आला नाहीं ! कर्नाटकांत पानशांचा सरंजामी मुलूख नसल्याकारणानें वाघाच्या मसलतींत मन घालण्याचें त्यांस प्रयोजन नव्हतें व पेशवेसरकारचा त्यांस तसा हुकूमही नव्हता. ते फौजेसह कूच करून आपल्या उद्योगाला दुसरीकडे निघून गेले. राहतां राहिले गोखले आणि पटवर्धन. वाघाच्या धिंगाण्यामुळें त्यांचे परगणे ओसाड होत चालले होते त्या अर्थी त्यांना मात्र त्याच्या बंदोबस्ताचें अगत्य होतें. त्याप्रमाणें गोखले व सांगलीकर कूच करून तिकडे गेले, पण त्यांजबरोबर रामचंद्र-पंतआपाचें जाणें झालें नाहीं. त्यांनीं आपले बंधु हरिपंतबाबा यांस दीड हजार स्वार व दीड हजार पेंढार बरोबर देऊन गोखल्यांकडे पाठविलें आणि आपण देशीं राहिले. त्याचें कारण असें कीं या संधींत उत्पाती सर्जेरावानें पटवर्धनांचें घरदार घेऊन आपला तळीराम गार करण्याचा जो डाव मांडला होता त्याचा प्रतिकार करण्यासाठीं यावेळीं त्यांस फौजेसह मिरजेच्या आसपास रहाणें भागच पडलें.

पुण्यांत माजलेले बखेडे मोडण्याकरितां यावेळीं सर्जेराव हा क्रूर, धीट व करारी माणूस बाजीरावसाहेबांस आवश्यक झाला होता, व त्यावर त्यांची मर्जी सुप्रसन्न असे. ही श्रीमंताची मर्जी आपणावर कां झाली आहे हें सर्जेराव जाणून होता. आपण एखादा शब्द टाकला तर तो मोडण्याची छाती या प्रसंगीं श्रीमंतांस होणार नाहीं अशी त्याची समजूत होती. त्यानें पटवर्धनांचा मिरज तासगांव कुरुंदवाड वगैरे सरंजाम मला द्यावा अशी त्यांस गळ घातली. दुसरी कोणतीही गोष्ट जर तो मागता तर ती त्यास देऊन त्याची मर्जी राखण्यास श्रीमंतांची हरकत नव्हती; पण हें मागणें मात्र त्यानीं पहिल्याच खेपेस साफ नाकारलें ! याचें कारण त्यांची पटवर्धनांवर कृपा होती असें मात्र नव्हे. बाजीरावसाहेबांची वृत्ति नेहमीं संशयी व नानाप्रकारचे तर्कवितर्क घेणारी असे. कोणास किल्ला सरंजाम वगैरे देणें तर तो दिल्यानें मागणारा पुढें मागें आपल्यास डोईजड होईल कीं काय हा विचार ते नेहमीं पहात. याचा थोडासा मासला मिरज सांगलीच्या वांटणींत पहावयास सांपडतो. मिरजेचा किल्ला आपणास मिळावा म्हणून बाळा-साहेब मिरजकर व चिंतामणराव सांगलीकर दोघेही भांडत होते. त्यांत बाळा-

साहेब गरीब स्वभावाचे कारकून, धनी सांगेल तसें ऐकणारे, सबब श्रीमंतानीं किल्ला त्यांजकडेच कायम केला. वास्तविक पहातां चिंतामणरावांस किल्ला मिळणें वाजवी होतें. पण ते करडे शूर शिपाई, एकदां किल्ला हातीं लागल्या-वर उलट गोष्टी सांगूं लागले तर काय करावें, असा तर्क घेऊन श्रीमंतांनीं त्यांच्या हातास मिरजेचा किल्ला लागूं दिला नाहीं ! प्रस्तुत घाटग्याच्या बाबतींत तर ही विचारसरणी त्यांना साहजिकच सुचण्याजोगी होती. आधींच हा भांडखोर दांडगेश्वर, त्यांतून पुन्हां दौलतरावाचा सासरा, आणि सर्वांत वाईट गोष्ट ही कीं, हा कोल्हापूरच्या राजमंडळांतला सरदार आणि महारा-जांचा आप्तविषयी ! पटवर्धनांचा सत्तावीस लक्षांचा सरंजाम याच्या हातीं गेल्यावर हा आम्हालासुद्धां गिळून टाकील अशी पेशव्यांस शंका येणें साहजिक होतें. त्यामुळें चार दोन दिवस गेले नाहींत तों सर्जेरावानें येऊन अर्ज करावा, श्रीमंतानीं नन्नाचा पाढा वाचावा, असा क्रम दोन तीन महिने चालला होता. आपल्या सासऱ्याचें एवढें काम करून द्यावें म्हणून खुद्द दौलतरावानीं भीड घातली तरी तीसुद्धां श्रीमंतांनीं जुमानली नाहीं !

पण पेशव्यांच्या अशा झिडकारणीला सर्जेराव थोडाच बधणारा होता ! त्यानें शिंद्यांचें संमत घेऊन विचार ठरवला कीं, हे श्रीमंत बऱ्या बोलानें सनद देत नाहींत तर पटवर्धनांचा सरंजाम आधीं जबरीनें हाताखालीं घालून मग सनद मागावी म्हणजे चुंबत देतील ! याप्रमाणें मसलत ठरल्यावर त्यानें ती अम-लांत आणण्याचा उपक्रम तत्काळ केला. मिरजेनजीक जुगूळ येथें पांच पलटणें होतीं तीं या कामावर उपयोगीं पडण्यासारखीं होतींच. त्यांच्याच भरतीस आणखी दोन पलटणें, पंधराशें स्वार, व तोफा बरोबर देऊन घाटग्यानें आपला दिवाण पंढरपुराकडे पाठविला. त्या प्रांतीं मंगळवेढें, करकंब वगैरे पटवर्धनांचीं ठाणीं आहेत तीं घेऊन या नवीन फौजेनें जुगूळच्या फौजेस मिळावें आणि सर्वांनीं मिळून एकदां मिरजेवर निकराचा एल्गार करून पहावा, असा संकेत ठरविण्यांत आला होता.

आमच्या सरंजामांतून पलटणें काढा, त्यांचा आम्हांस फार उपद्रव होतो, त्या उपद्रवामुळें वाघाची मसलत आम्हांस सुचत नाहीं, व सरकारचें फार नुकसान होतें, याप्रमाणें मिरजेचे बाळासाहेब पेशव्यांच्या व शिंद्यांच्या कानींकपाळीं ओरडत असतां त्याचा विचार होणें बाजूस राहिलें, आणि आपला सर्वस्वीं नाश करणारें हें नवीनच संकट सर्जेरावानें अचानक आणून पुढें उभें केलें, असें पहातांच पटवर्धन मंडळी चिंताक्रांत झाली.

तिकडे गोखले सांगलीकर व हरिपंतबाबा मुरगोडच्या बारीपर्यंत गेले होते ते वाघाची दहशत खाऊन आपसांत भांडत तेथेंच थबकून राहिले. त्यांचें चढाईचें धोरण सुटलें, आणि वाघापुढें आपला निभाव कसा लागेल हीच काळजी त्यांना पडली ! ते रामचंद्रपंतांस निघून येण्याविषयीं वारंवार पत्रें पाठवूं लागले. पण हे कसचे तिकडे जातात ! वाघाच्या मसलतीवर आपण एकदां गुंतून पडलों तर ती कोठवर लांबेल, तिला किती दिवस लागतील, कुणी सांगावें ? आपण तिकडे गेलों आणि इकडे सर्जेरावानें घरादाराचें वाटोळें केलें तर काय करावें ? हे विचार मनांत आल्यामुळें त्यानीं कर्नाटककाकडे पाठ केली आणि देशीं रहाण्याचें ठरविलें. पटवर्धनांची मूळ जागा आणि मुख्य जागा मिरज. तेथेंच त्या सर्वांचीं आणि त्यांच्या आश्रितांचीं कुटुंबें आणि वित्तविषय ठेवलेला होता. सबब हरप्रयत्नानें त्या स्थळाच्या रक्षणाची तजवीज करणें त्यांस नाप्राप्त झालें. ते फौजेचें पोट भरण्यासाठीं ठाणीं काबीज करीत व खंडण्या गोळा करीत विजापूर कलादगीच्या टांपूंत फिरते राहिले. तथापि पलटणांच्या हालचालींवर त्यांची नजर होतीच.

अखेरीस ता० १६ जून रोजीं शिंद्याचीं तीं पलटणें जुगूळचा मुक्काम सोडून मिरजेपासून सात मैलांवर मालगांव येथें येऊन उतरलीं. येतांच त्यानीं खेड्या खेड्यानीं घांसदाणा उकळण्याचा सपाटा लावला. आतां मात्र आणीबाणीची वेळ आली असें समजून बाळासाहेबानीं रामचंद्रपंतांस निकडीचें बोलावणें पाठविलें, तेव्हां ते तिसऱ्याच मजलीस जमखिंडीअलीकडे कृष्णेच्या दक्षिणतीरास येऊन उतरले. या प्रसंगीं पटवर्धनानीं किल्ला व शहर बचावण्याची मजबुती यथास्थित केली होती. कुरुंदवाड व मिरज हीं दोन्हीं पथकें मिळून चार हजार स्वार शहरापासून थोड्या अंतरावर तयार होऊन राहिले होते. किल्ला व शहर मिळून अडीच तीन हजार निवडक शिबंदी रात्रंदिवस चौकीपहारा करीत होती. पलटणें शहरावर चालून येतील तर रामचंद्रपंतानीं तत्काळ कृष्णा उतरून यावें, आणि मिरजेची फौज मिळवून घेऊन शत्रूशीं लढाई करावी, असा बेत ठरला होता. बाळासाहेबांचे ते दिवस मोठ्या काळजीचे गेले. ‘ किल्ल्यास कांहीं धोका आहे कीं काय ’ असा प्रश्न त्यानीं एका विद्वान् ज्योतिष्यास विचारला. त्यानें स्वरशास्त्र व रमल पाहून आणि ‘कोटचक्र ’ घालून निष्कर्ष काढलेला लिहून दिला तो पुढच्या प्रकरणांत छापलाच आहे. त्यांत ‘किल्यास भय नाही’ असा सिद्धांत काढिलेला आहे तोच

अखेरीस खरा ठरला. श्रीमंतांशीं दोन अडीच महिने घासाघीस केली तरी ते कबुली देतना, आणि पटवर्धनांशीं कलागत काढावी तर तिचा परिणाम कोठवर लांबेल हेंही कळेना, असें पाहून सर्जेरावानें पटवर्धनांचा सरंजाम घेण्याचा नाद सोडिला. त्या योगानें पलटणें मिरजेच्या वाटेस गेलीं नाहींत हें खरें, पण त्यानीं प्रांतांतून धुडगूस घालण्यांत मात्र कांहींच तथा ठेविली नाहीं !

माणकोजी शिंदे व खंडोजी माने पळून गेल्यावर त्यांची सरदारी रिकामीच होती ती आजपर्यंत कोणी तरी हंगामी अलबते गलबते चालवीत होते. हल्लीं घाटग्याच्या शिफारशीवरून दौलतरावानीं त्या सरदारीवर निपाणीचे शिदोजीराव नाईक निंबाळकर उर्फ आपा देसाई यांची नेमणूक केली. आपा देसाई यानीं मुलखांतून पलटणें फिरवावीं व त्यांचा चरितार्थ चालवावा असें ठरलें. या सरदारीमुळें पेशवाईंत नांवलौकिकास येण्याचा त्यांस मार्ग मिळाला. पटवर्धनांशीं आपा देसाई यांची मैत्री फार दिवसांची होती. जरी या नवीन मिळालेल्या अधिकारामुळें त्यांचे त्यांशीं बेबनाव होण्याचे प्रसंग वारंवार आले तरी त्यानीं रंग राखून अशा तऱ्हेची वागणूक ठेविली कीं त्यामुळें उभयपक्षीं मैत्रीचा बिघाड होऊं शकला नाहीं. सुमारें दीड पावणे दोन महिनेपर्यंत मालगांवच्या मुक्कामीं शिंद्याचीं पलटणें होतीं. नंतर तीं तेथून निघून जुलई अखेरीस कृष्णाउत्तरतीरीं कुडचीनजीक उगार येथें जाऊन उतरलीं. तिकडे त्यानीं जाण्याचें कारण पुढील प्रकरणीं सांगण्यांत येईल.

इकडे पुण्यांत जुन्या मुत्सद्यांवर ओढवलेल्या संक्रातीचा पर्वकाळ प्राप्त झाला असून फार महत्वाच्या धरपकडी होत होत्या, व त्या अनुषंगानें आरब पठाणांशीं झालेल्या भयंकर चकमकींच्या दणदणाटानें सर्व शहर हदरून गेलें होतें. त्या अनार्थांचें सविस्तर वर्णन करण्याचें काम एवढा वेळ आम्हीं थांबवून धरलें होतें तें आतां करूं. शिंद्यांच्या सैन्यांतला फितूर आतां मोडल्यासारखा झाला होता तरी श्रीमंतांच्या राजधानींतले फितुरी मुत्सद्दी अजून सावपणानें वावरत होते त्यांचा बंदोबस्त व्हावयाचाच होता. या लोकानीं आपल्या प्रभुत्वाचा ऱ्हास करण्यासाठीं काय काय खटपटी केल्या याची बित्तिम बातमी जरी श्रीमंतांस लागलेली होती, तरी त्यांस मुद्यावर धरल्याखेरीज त्यांचें शासन करतां येईना. ते मुत्सद्दी तर दरबारी डावपेचांत निढांवलेले आणि दस्तैवजांत कधींही न सांपडणारे होते ! त्यांच्या अंगीं गुन्हा लागणार कसा आणि त्यांचें पारिपत्य होणार कसें ? इतर कोणास ही मोठीच पंचाईत पडा-यची, पण बाजीरावसाहेबांस त्याचें कांहींच वाटत नव्हतें ! कपटाचे कूटपाश

टाकून सावज आपणाकडे कसें ओढून आणावें हें त्यांस कोणी शिकवावयास पाहिजे होतें असें नाहीं. त्यांतून त्यांना शिंद्यांचा दरबार सर्वथा अनुकूळ. तो दरबार पाटीलबावांच्या कारकीर्दीपासून कावेबाजपणाविषयीं प्रसिद्ध. त्याच्या हुलकावणीला खुद्द नाना फडनवीससुद्धां भीत असत. अशा त्या दरबाराची श्रीमंतांशीं एकरूपता असल्यावर त्यांच्या इष्ट कार्याची सिद्धि होण्यास कितीसा उशीर लागणार ? त्यानीं या प्रसंगीं इतक्या कौशल्यानें सूत्रें नाचविलीं कीं, ज्या योगानें त्यांना पकडावयाचे होते ते गुन्हेगार न बोलावतां येऊन त्यांच्या जाळ्यांत आपोआप अडकले ! तो वृत्तांत असा—

मोरोबादादांचे पुरातन स्नेही आपाजीपंत गोंधळेकर आजपर्यंत अज्ञातवासांत होते. नाना मृत्यु पावतांच मोरोबादादांस पुन्हां फडणिशीच्या कामावर आणण्याची खटपट करावी असें त्यांच्या मनांत आलें. ही गोष्ट बाजीरावसाहेबांजवळ काढिली तर ते तत्काळ रुकार देतील हें त्यांस ठाऊक होतें. पण त्याचा काय उपयोग ? श्रीमंतानीं एखादी गोष्ट स्वबुद्धीनें केली तरी ती नांदूं देणें अगर न देणें सर्वस्वी शिंद्यांच्या मर्जीवर होतें. शिवाय त्यांत दुसरी अडचण अशी होती कीं, नानांच्या पक्षांतले लोक नानांच्या स्त्रीस दत्तक देऊन त्याच्या नांवें फडणिशी चालवावी म्हणून धडपड करीतच होते. हे विरुद्ध बाजूचे लोक आधीं कारागृहांत कोंडून घातल्याखेरीज मोरोबाची अमदानी सुयंत्रपणें कशी चालावी ? तें काम पेशव्यांच्या शक्तीबाहेरचें असून शिंद्यांखेरीज कोणासही होण्याजोगें नव्हतें. कांहीं ‘ तत्वमसि ’ चा प्रभाव दाखविल्यास बुभुक्षित शिंदे आपलें म्हणणें जरूर मान्य करितील असें गोंधळेकर यांस वाटत होतें. त्यांनीं श्रीमंतांजवळचे बाळोजी कुंजर, आबा काळे, सदाशिव माणकेश्वर वगैरे लोक आपल्या मसलतींत घेऊन शिंद्यांशीं बोलणें घातलें कीं, तुम्ही नानांची मंडळी शिराळेकर चक्रदेव गोडबोले इत्यादिक आहेत ते सर्व धरून आमच्या हवालीं करावे आणि मोरोबादादांस आणून फडणविशीच्या अधिकारावर स्थापावें. या कामगिरीबद्दल आम्ही तुम्हांस तीस लक्ष रुपये देऊं ! एवढी थोरली रक्कम गोंधळेकर पदरची कोठून देणार ? नानांची मंडळी गबर आहेत, ते एकदां कबजांत सांपडले म्हणजे त्यांस माराकूट करून इतका ऐवज काढतां येईल, असें त्यांस वाटत होतें. दौलतराव शिंद्यानीं गोंधळेकर यांस महिनाभर नाद लावून नानाप्रकारें वाटाघाट केली पुष्कळ आढेवेढे घेतले, तुमचें म्हणणें आम्हांस फारसें रुचत नाहीं असा

बाहणा केला, आणि होय किंवा नाहीं असें निश्चयात्मक उत्तर कांहींच न देतां हें प्रकरण तितकेंच मोघम लोंबकळत ठेविलें!

अशी टाळाटाळी करण्यांत गोंधळेकर बोलतात असल्याच प्रकारचें बोलणें विरुद्ध पक्षाकडून आपल्याकडे यावें असा दौलतरावांचा डाव होता. थोडीशी आशेला जागा ठेविली असतां त्या लोकांस आपणाकडे येण्याचा धीर होईल असा त्यांचा अंदाज होता. आणि शेवटीं झालें तसेंच! गोंधळेकरांची डाळ शिजत नाहीं असें दृष्टोत्पत्तीस येतांच भयभीत व आतुर झालेल्या चक्रदेव शिराळेकर प्रभृति मुत्सद्यांनीं घाईघाईनें आपलें चंबूगवाळें शिंद्यांच्या दारांत नेऊन टाकलें! ते शिंद्यांस म्हणूं लागले कीं, गोंधळेकर देतात ती तीस लाख रुपयांची रक्कम आम्हीच तुम्हांला देतों. तुम्हीं श्रीमंतांकडून नानांच्या स्त्रीस दत्तक देवावा, श्रीमंतांजवळ कुंजर प्रभृति चार लुच्चे लोक जमले आहेत ते आमच्या हवालीं करावे, आणि तुम्ही फौजेसह कूच करून हिंदुस्थानांत निघून जावें! एकूण एका हातांत पेशव्यांचें बाहुलें आणि दुसऱ्या हातांत नानांचें पोरगें धरून राज्यांत आम्ही स्वच्छंदानें नाच घालूं इच्छितों, तसें करण्यास आम्हाला मुभा द्यावी, हेंच मागणें या मुत्सद्यानीं शिंद्यांजवळ मागितलें! प्रचंड कारस्थानाचा व्यूह रचूनसुद्धां जी गोष्ट आपणाला घडवितां आली नाहीं, ती लांचलुचपतीच्या आणि मनधरणीच्या बळावर घडवून आणतां येईल अशी यांना आशा सुटली! आपण यांच्या घातपाताच्या मसलती केल्या, यांचें मन दुखविलें, आणि आतां हात जोडून यांच्या दारीं गेलों असतां हे कसे वळतील? मनांतलें शल्य कसें विसरतील? हाही विचार त्यांस सुचला नाहीं! यावरून 'साऱ्यांच्या अकला गेल्या' म्हणून पटवर्धनांचा वकील लिहितो तें कोणासही पटण्याजोगें आहे. दौलतरावांना काय? त्यांनीं तत्काळ या मुत्सद्यांचें म्हणणें मान्य केलें, फारच खूष झाल्याचें सोंग आणलें, मिठ्या मिठ्या बाता मारल्या, आणि अखेरीस तुम्ही कसें कसें वागावें, आम्ही काय काय करावें, याबद्दल तुमचीं आमचीं बोलणीं झालीं हीं कागदावर उतरलीं पाहिजेत; एकदां कराराच्या यादी देऊन घेऊन झाल्या म्हणजे उभयपक्षीं भरंवसा पुरण्यास हरकत नाहीं, अशी अट घातली. त्याही गोष्टीस हे राजी झाले! सर्वांनीं मिळून कलमबंदीची तपशीलवार याद शिंद्यांस लिहून दिली. शिवाय त्यानीं या वेळीं दरबारखर्च म्हणून शिंद्यांच्या दरबारांत कांहीं लाख दोन लाख रुपये वांटले, श्रीमंतांनासुद्धां त्यांच्याच द्वारें आणखी रक्कम देण्याचें

कबूल केलें, आणि कृतकृत्यता मानून घरोघर निघून आले! त्यांच्या या कृत्यांना अमृतरावांची आंतून प्रेरणा होती तरी ते प्रत्यक्ष बोलण्यांत नसल्या-कारणानें यादींत त्यांचें नांव नमूद झालेलें नव्हतें.

ही मुत्सद्यानीं स्वदस्तूरची लिहून दिलेली याद दौलतराव शिंद्यानीं तत्काळ श्रीमंतांपुढें हजर केली. लगेच या हरामखोरांस पकडून आपल्या हवालीं करण्याविषयीं श्रीमंतानीं शिंद्यांस हुकूम दिला. या प्रकरणांत यापुढें दोघांनीं कसें कसें वागावयाचें हा सिद्धांतसुद्धां याच भेटींत ठरला. मग श्रीमंतानीं चक्रदेव वगैरे मंडळीस बोलावून सांगितलें कीं, तुम्ही म्हणतां या गोष्टी मान्य करण्याचें माझ्या मनांत नव्हतें, पण दौलतरावानीं नेट धरल्यामुळें मी कबूल झालों. तेव्हां आतां कराराप्रमाणें सर्व गोष्टी लवकर उरकून गेलेल्या बऱ्या! तुम्ही नानांस दत्तक मुलगा कोणता देणार! दत्तविधानाचा मुहूर्त कोणता योजिला आहे? या-वर मंडळींत विचार करून चक्रदेव व शिराळेकर यानीं श्रीमंतांस कळविलें कीं, बळवंतराव राजे भानु यांचा मुलगा आहे तो दत्तक द्यावा असें आमच्या मनांत आहे. ज्येष्ठ शु. १० स (ता० १६ जून) दत्तविधानाला मुहूर्त चांगला आहे. त्या दोन्ही गोष्टी श्रीमंतानीं बिनतकरार मंजूर केल्या तेव्हां मुत्सद्दी मंडळीचा हर्ष पोटांत मावेनासा झाला! या दत्तविधानाच्या मसलतीचा पुकारा शहरांत हां हां म्हणतां होऊन आबालवृद्धांस आनंद झाला. अशी स्थिति असतां ता० १६ जून रोजीं दत्तविधान व्हावयाचें त्या आधींच १४ व्या तारखेस भलताच प्रकार होऊन शहरच्या लोकांच्या मनाला भयंकर धक्का बसला! धरणीकंपाचे धक्के बसावे त्याप्रमाणें मागोमाग आणखी भयंकर धक्के बसत गेले! चवदाव्या तारखेस बाजीराव साहेबानीं आपल्या अतर्क्य लीलेचा प्रभाव दाखविण्याची सुरुवात केली. त्या दिवशीं त्यानीं नानांच्या पक्षांतल्या सर्व मंडळीस शनवारवाड्यांत बोलावून नेऊन अकस्मात् शिंद्यांकडून कैद करविलें! मागून त्या मंडळींच्या पदरीं असलेल्या जबरदस्त आरब पठाणानीं निकराचें झूज केलें तरी त्यांवर सवाई जबरदस्ती करून त्यांचीं बंडें मोड-ण्यांत आलीं, शहरांतले सर्व आरब काढून लावण्यांत आले, आणि पकड-लेल्या मुत्सद्यांच्या पायांत शृंखला घालून त्यांस किल्ल्यावर रवाना करण्यांत आले. याप्रमाणें शिंद्यांच्या मदतीनें पंधरा दिवसांत जिकडे तिकडे बंदोबस्त करून श्रीमंतानीं आपलें राज्य निर्वैर केलें. हा सर्व वृत्तांत आम्ही स्वतःच्या

शब्दानीं निवेदन करण्यापेक्षां तें काम त्या वेळच्या पत्रांतले उतारे देऊन केलेलें उत्तम. सबब आम्ही तसेंच करितों. मिरजकरांचा वकील मोरोपंत परांजपे व तासगांवकरांचा वकील बाबा काळे यांच्या पत्रांतून हे उतारे घेतले आहेत.

मुत्सद्दी मंडळी कैद केली तो वृत्तांत—

" काल राजश्री दौलतराव शिंदे आलिजाबहादूर यांची स्वारी दोन प्रहरीं सरकारवाड्यांत जमियेतसुद्धां आली. श्री॥ राजश्री ( अमृत ) रावसाहेब यांजपाशीं चार घटका खलबत होऊन श्री॥ राजश्री पंतप्रधान यांजकडे गेले. बरोबर राजश्री घाटगे, आबा चिटणीस, यादवराव भास्कर, बाणाजी शेटयाकडील विठ्ठलपंत, याप्रमाणें होते. आठ दिवस नानांस पुत्र द्यावयाचा याप्रमाणें सरकारांत बोलणें (शिंदे) नित्य बोलतच होते. राजश्री नारोपंत चक्रदेव, चिंतोपंत देशमुख व धोंडोपंत लिमये—चक्रदेव यांचे मेहुणे—व नानांकडील बजाबा शिराळेकर व राघोपंत गोडबोले, चिमणाजी खंडेराव, इतक्या असामींस आरसेमहालांत बोलावून आणून नानांस पुत्र द्यावयाचा याचा विचार बोलों लागले. मुलाचें अक्षरही व मुलास पहावयास आणिला. आणि इशारा करून तीनचारशें लोक आरसेमहालांत घेऊन सदरहू सहा असामींस कैद केलें. सायंकाळचे सहा घटका दिवसास नजरबंदी होतांच चक्रदेव यांजकडील शहामीरखान रोहिले तीनशेंनीशीं चाफेखणांत होते त्यांस कळतांच तोडे शिलगावून लेस जाले. त्रिवर्ग श्रीमंत एकीकडे होते. दिवाणखान्याचे पूर्वेकडील खोलींत होते. रोहिले अडले त्यांस बाहेर जाणें म्हणून सांगितलें. त्याणीं चक्रदेव यांस स्वाधीन करणें म्हणोन आड धरिली. तेव्हां आबा काळे व बाळाजीपंत पटवर्धन यांस त्यांजकडे बोलावयास पाठविलें कीं, नारोपंत सरकारचाकर. त्यास सरकारांतून नजरबंदी केली. नारोपंताचे निसबतीस तुम्ही होतां, परंतु तुम्हीही चाकर सरकारचे. तुम्ही तलबेविशीं खटला करूं नये. बाळाजीपंत पटवर्धन याणीं आपला जिमा केला. लोकांनीही अजमास पाहिला, खटला करून परिणाम नाहीं. दहा घटका रात्रीस तोड पडोन शहामीरखान जमावासुद्धां निघोन गेला. नंतर शहरचा बंदोबस्त जागां जागां नाकेबंदी केली. वाड्याभोंवतीं दोन पलटणें दहा पंधरा तोफा आणून ठेविल्यानंतर पंधरा घटका रात्रीचे सुमारें शिंदे गोटास गेले. हा कारभार श्रीमंतांचेच विचारें जाला. सहा आसामी सरकारवाड्यां-

तच आहेत. शिंदे यांजकडे नाहीं. पुढें चौकशीचे अंतीं काय घडतें पहावें. बाळोजी कुंजर याचे लोक सहा असामींचे चौकीस आहेत. तिरंदाजीचे दिवाणखान्यांत आहेत."

"राजश्री चिंतोपंत देशमुख यांची मुक्तता होईल असा रंग आहे. वाड्यांत मात्र आहेत. वाड्यासभोंवतीं पलटणें तोफा आहेत. शहरांत लोकांस धीर पुरत नाहीं. अकस्मात् हुल्लडी होतात."

"राजश्री लक्ष्मणराव चक्रदेव रात्रीस पळोन जात होते. तोफखान्याजवळ चौकीदारानीं धरिले. वाड्यांत दाखल केले. छ० २१ मोहरमीं राजश्री दादा गद्रे व बाजीपंत अण्णा यांचे पुत्रास वाड्यांत नेलें आहे. झाडून मंडळी वाड्यांतच आहेत. चौकशी होणें आहे. नानांचे वाड्यांत आरब आंतील चौकांत व दिवाणखान्यांत शिरले आहेत. नानांकडील राघोपंत पेंडशे व भाऊ कापशे लोहगड किल्ल्यास पळोन गेले, ऐशी बातमी आहे.....सुधानामक यांस मोठी चिंता प्राप्त झाली आहे. त्यांजवर दंगा करावा ऐसें लौकिकांत बोलतात. अद्यापवत् मंडळी वाड्यांत आहे. वाड्यांत कांहीं लोक शिंदे यांचे, कांहीं सरकारचे. वाड्यासभोंवते शिंदे यांजकडील दोन पलटणें, दहा पंधरा पलटणी तोफा याप्रमाणें सरंजाम आहे. सरकारचे वाड्यांत बंदी आहे. कोणी जात नाहीं. सरकार निसबत मात्र असेल त्याणीं जावें. दिल्लीदरवाजावर घाटगे याजकडील येक कारकून व सरकारचे दोन कारकून आहेत. कंपूकडील लोक दरवाजांत आहेत. कांहीं लोक सरकारचेही आहेत. गृहस्थांस कैद केलें त्या दिवशीं मी सरकारवाड्यांत गेलों होतों. बंदी जाल्यानंतर कारभार उरकोन पंधरा घटका रात्रीस स्वारी शिंदे यांची गोटास गेल्यानंतर दरवाजावर चौकशी होऊन पांच चारशें ब्राह्मण मंडळी वाड्यांत होते त्यांस बाहेर काढून दिलें. शामीरखानाची समजी जाली यामुळें दंगा वाड्यांत जाहला नाहीं. नाहीं तर वाड्यांत तरवार चालावी ऐसाच विचार जाहला होता. सर्वांचीं तोंडें सुकोन गेलीं होतीं. ईश्वरें खर केली."

"ज्या दिवशीं चक्रदेव यांस कैद केलें तेव्हां सरकारचे लोक वाड्यांत होते. शामीरखान रोहिला पांचशें लोकांनिशीं आंत होते. शिंदे यांजकडीलही पांच सातशें लोक वाड्यांत होते. जेव्हां मंडळी कैद केले तेव्हां शामीरखान याणें कांहीं वांकडें बोलला कीं, "मंडळी धरावयाचें प्रयोजन काय?

त्यांस सोडून देणें. अथवा आमचा विसा वर्षांचा फडशा तलबेचा करणें. हें होत नसल्यास तरवार चालेल." ऐसें गुरकावतांच सर्वांस जड पडलें. तेव्हां शामीरखान याची तोड पडावयास एक प्रहर लागला. खुद्द श्रीमंतानीं सांगितलें कीं, आमचे कारकून आम्ही कैद केले. तुम्ही सरकार चाकर असतां दंगा करणें ठीक नाहीं. जो तुमचा तलबेचा फडशा होणें तो आम्ही करवून देऊं. तुम्ही जमातसुद्धां बाहीर जाणें. तेव्हां शहामीरखान आपले कारकुनास बरोबर घेऊन वाड्यांतून बाहेर निघोन आपल्या वाड्यास गेला. त्याचा कारकून विनायकपंत घांगरेकर म्हणोन आहे त्यासही कैद करणार आहेत हें समजून त्यासुद्धां गेला. इतकी गोष्ट होण्यास शुक्रवारीं बारा घटका रात्र जाली. नंतर शिंदे यांची स्वारी डेरियास गेली."

"वाड्यांत मंडळी कैद केली. बारा दिवस जाले. अद्यापवर सरकार वाड्यांतच आहेत. चिमणाजी खंडेराव यास ताडण केलें. आणखी कोणा एकास कांहीं निकर्ष केला नाहीं. या उपरांतिक न कळे. चिंतोपंत देशमुख यांची मुक्तता जाली. परंतु सरकारवाड्यांतच आहेत. त्यांचे घरीं आरब आहेत. (हे घरीं) गेले असतां दंगा करितील म्हणून आपले घरीं जात नाहीं. फडावर कामकाज तेच पहात असतात. तेरीख खासा श्रीमंत राजश्री पंतप्रधान घालितात. बाळोजी कुंजर कारभारामध्यें प्रमुख व बळवंतराव नागनाथ आहेत."

"सरकार वाड्यांत प्रतिबंध ज्यांस केला होता ते आजपावेतों वाड्यांतच होते. छ० २ सफर बुधवारीं (ता० २५ जून.) मध्यरात्रीस किल्ले प्रतापगड व रायरी येथें रवाना जाले. चक्रदेव असामी दोन, बजाबा शिराळेकर व राघोपंत गोडबोले व आणखी एक कारकून एकून पांच असामी राजश्री बाळाजीपंत पटवर्धन खासा पागासुद्धां व कुंजर याची पागा येणेंप्रमाणें घेऊन किल्ल्यास पोंचवावयास गेले आहेत. चिमणाजी खंडेराव व आणखी दोन असामी चौकशीबद्दल वाड्यांतच ठेविले आहेत."

कैद झालेल्या मंडळींच्या पदरीं आरब होते ते आपल्या तलबेसाठीं अडून बसले व दंगा करूं लागले. तसेंच मुत्सद्यांस कैद करतेसमयीं वाड्यांत शामीरखान रोहिला श्रीमंतांशीं बिथरून वाड्यांतून निघून गेला होता. त्यावरून त्या आरबांचें व रोहिल्यांचें पारिपत्य करण्यांत आलें तो प्रकार—

"आरब प्रबळ जाहले. शहरांत कजिया कफावती करून खून करावे, याप्रमाणें आज दोन तीन वर्षें शेर जाले. याजकरितां श्री॥ राजश्री

पंतप्रधान यांची मर्जी काठिण जाली. आरब शहरांत चाकर आहेत त्याणीं सर्वांनीं निघोन देशास जावें याप्रमाणें ठरोन आरबांस ताकीद केली. कै॥ नानांकडील आरबांस ताकीद केली. त्याणीं उत्तर केलें कीं 'आम्हांकडे कांहीं नाहीं. खावंदांची मर्जी नाहीं असें असल्यास आमचे तलबेचा फडशा करून द्यावा. निघोन जातों.' "तलब कोण देतो ? 'जाहली चाकरी पावला मुशाहिरा !' उठोन जाणें;" म्हणोन आज्ञा जाली. परंतु त्याणी मान्य केलें नाहीं. नानांचे वाड्यांत राहून दंगा मांडिला. तेव्हां वाड्यास तोफा लाविल्या. आरबांकडील दहा असामी ठार जाले. सरकारचे व शिंदे यांजकडील मिळोन वीस बेवीस माणूस गोळीनें ठार जाहले. परंतु कौलास येत नाहीं हें समजोन सरकारांतून त्यांचे तलबेचा फडशा करून देऊन घालवून दिले. आरब निघोन गेले."

"भवानी पेठेंत दोन पलटणें व फौज येऊन शहामीरखान याच्या वाड्यास तोफा लाविल्या. पांच घटका दिवस पावेतों लढाई जाली. इकडील तिकडील मिळोन दोनशें माणूस लढाईंत पडलें. शेंदीडशें जखमी जाहलें. पांच घटका दिवसास शामीरखान याचा लेक पडला.. नंतर आपले बायकांस मारून वाड्याबाहेर पडला. घोड्यावर बसतेसमयीं मांडीस गोळी लागली. इतक्यांत शिंदे यांजकडील पठाण येऊन घोड्यावर बसवून घेऊन गेले. खैर आहे. पठाणानीं वचन देऊन नेलें. सहावे घटकेस नानांचे वाड्यास तोफा लागू केल्या. सायंकाळाचा सहा घटका दिवस पावेतों तोफा चालिल्या. परंतु उत्तरेकडील मात्र सोप्याचा कोण पडला. खपरेल ढांसळलें. आरब हटले नाहीं. त्यांनीं सरकारचे लोक दहा वीस ठार केले. अद्यापि समजी जाली नाहीं. श्री॥ राजश्री पंतप्रधान यांची मर्जी कठिण आहे. "वाडा पाडावा पारिपत्य करावें, निदानीं वाडा जाळावा, परंतु आरब शेर जाहले आहेत, जागां जागां शहरांत कलागत करून खून करितात, यास्तव पारिपत्यच करावें." याप्रमाणें ताकीद आहे. उद्ईक काय घडतें श्रीसत्ता ! भवानी पेठ व गंज पेठेचा शेरा व वेताळ पेठ लुटली गेली. गरीब नागवले. ... शहरांत भय प्राप्त जालें आहे."

"बजाबा शिराळेकर यांजकडील पांच सातशें आरब आहेत. कांहीं निजसुरे यांजकडील आहेत. ते आरब त्या दिवशीं कै॥ नाना फडणीस यांचे वाडयांत शिरले. तैसेच तुळशीबागेपर्यंत पांच सात वाड्यांनीं आहेत. चक्र-

देव यांचे घरीं आहेत. त्यांणीं जंग धरिला कीं, बजाबा वगैरे कैद केलेत, तेव्हां आमचे तलबेचा फडशा कोण करितो ? तलबेचा फडशा करणें. आम्ही पार होऊन जाऊं. ऐसें म्हणूं लागले. तेव्हां मागती शिंदे यांचे कारभारी दशमीच्या दिवशीं सरकार वाड्यांत येऊन मनसबा ठरविला कीं, आरब व शामीरखान यांचें पारिपत्य करितों. हें ठरावून एकादशी मंगळवारीं प्रांतः-काळीं एक पलटण येऊन शामीरखान याचे घरावर तोफा लागू केल्या. तेथें रोहिल्यांचें पलटणचें झूज जालें. प्रथम पलटणाच्या दोन तोफा शामीरखान याणें ( हल्ला करून हिसकून ) आणिल्या. तिकडील इकडील शंभरपर्यंत माणूस जायां जाहलें. वेताळपेठ आणि चौथाई भवानीपेठ ऐसी लुटून टाकिली. नंतर शामीरखान कत्तल होऊन जातो तेव्हां शिंदे यांजकडील पठाण मध्यस्थ पडोन सलुखानें दीडशें दोनशें माणसांनिशीं शिंदे यांजकडे घेऊन गेले. याजउपरी शामीरखानाचा ग्रंथ समाप्त जाहलासा वाटतो. मग कळेना. ”

सन १७८० त जनरल गॉडर्ड याशीं कोंकणांत मराठ्यांच्या लढाया झाल्या तेव्हां नाना फडनवीस यानीं ईर्षेनें इंग्रजी पायदळाशीं बरोबरीनें लढणारें शेलकें देशी पायदळ चाकरीस ठेविलें. तीं माणसें कशीं कणखर कजाख होतीं याचा शामीरखान हा एक मासला आहे. शिंद्याच्या फौजेंतले पठाण मध्यस्थींत पडले त्यानीं त्याला शिंद्यास भेटवून आब्रूनें पार करून दिलें आणि आपलें इमान राखलें. नाना फडनवीस व बाळोबातात्या यांस इमान देऊन विश्वासघात करणाऱ्या युरोपियन आफिसरांपेक्षां हे आडमुठे पठाण शंभर पटीने बरे म्हटले पाहिजेत ! ! !

“ ( सरकार ) वाड्यापाशीं शिंदे यांचीं दोन पलटणें होतीं त्याणीं नानांचे वाड्यास तोफा लागू केल्या. रस्त्यांतून तोफा वाड्यास लागू होईनात. दोन प्रहरपर्यंत शेंपन्नास गोळे मारिले. परंतु लागू जाले नाहीं. आरबानीं वाड्यावरून दहा वीस माणूस जायां केलें. फारच निकड करावी तर शहर मारलें जातें म्हणोन तृतीय प्रहरापासोन आरबांशीं बोलणें लाविलें आहे. तेव्हांपासोन गोळी बंद आहे. तह जाल्यास कलह तुटला. नाहीं तर जें होणें असेल तें होईल. परंतु याजउपरी वाढत नाहींसें वाटतें. ”

पुण्यांतून आरब काढून लावण्याची मसलत ठरली तेव्हां जयीबाई होळकरीण हिच्या पदरीं दोनशें आरब होते त्यांस रजा देण्याविषयीं बाईस तगादा लागला. तिनें श्रीमंतांस विचारलें कीं, शिंदा आमच्या वाईटावर आहे

आणि त्याच्या आश्रयाला राहणारा माझा दीर काशीराव माझ्या मुलास मारण्यासाठीं टपलेला आहे. आरबांना रजा दिली तर माझ्या मुलाचें रक्षण कसें होईल ? यावर श्रीमंतांनीं तुमच्या वाटेस कोणी एक जाऊं शकणार नाहीं असें आश्वासन दिलें इतकेंच नव्हे, तर तिला मुलासह राहण्याकरितां खुद्द शनवारवाड्यांत निराळी जागा नेमून दिली व दोघांस आपलेजवळ इतमामानें ठेवून घेतलें. प्रत्यक्ष धन्यानेंच अभय दिलें आणि आपल्या वाड्यांत ठेऊन घेतलें, तेव्हां आतां आपण शिंद्याच्या बाबतींत निर्भय झालों असें मानून बिचारी जयीबाई खुशाल झाली ! श्रीमंतांनासुद्धां फार हर्ष झाला. पण त्याचें कारण मात्र निराळें होतें ! हा होळकराचा मोहरा आयताच आपल्या हातीं लागला हें शिंद्याला खूष करण्याचें उत्तम साधन मिळालें; कारण पडेल तेव्हां याला शिंद्याच्या हवालीं करून त्याच्याकडून वाटेल तें काम करून घेतां येईल; हेंच तें कारण होय !

होळकरणीच्या आरबांप्रमाणें प्रतिनिधींचे आरब मात्र बरीच कटकट माजल्याखेरीज निघाले नाहींत. तो प्रकार—

"श्री ॥ राजश्री पंतप्रतिनिधि यांजकडे चारशें आरब होते. त्यांचे चाळीस हजार रुपये तलब चढली होती. त्यांनीं तीन दिवस पावेतों श्री ॥ प्रतिनिधि यांस व वाड्यांतील झाडून मंडळी चाळीस पन्नास समवेत उपवासी बसविले होते. चाळीस हजारांपैकीं तीस हजार पावेतों बाकीचाही फडशा करून देतों म्हणोन ( पंतानीं ) करार केला तेव्हां भोजनास उठिले. आणखी दहा हजार तलबेपैकीं व पंधरा हजार रुपये आरबांचे जमातदारापासोन कर्ज पंतानीं घेतलें आहे त्याचा फडशा करून घेतल्याखेरीज धरणें उठत नाहीं. तोही ऐवज घेतील."

"श्री॥ राजश्री पंतप्रधान व उभयतां श्रीमंत ( यांची ) कै ॥ नानांचे वाड्यांत स्वांरी आली होती. छ०२८ मोहरम रविवारीं सायंकाळचे घटका दिवसास स्वांरी येऊन नानांचे स्त्रीचें शांतवन करून अर्ध घटका स्वांरी राहून पुन्हां गणेश दरवाजानें पायउतारा वाड्यांत गेले. येतांना हि पायउताराच आले होते."

नानांची बायको जिऊबाई त्यावेळीं नऊ वर्षांची. तिच्याजवळ श्रीमंतानीं नानांचें द्रव्य, इतमाम, फौज कांहीं एक राहूं दिलें नव्हतें. असें असतां आतां तिच्या घरीं श्रीमंतानीं उभयतां बंधूंसह चालत जावें, तिला समाधाना-

च्या चार गोष्टी सांगाव्या, धीर भरंवसा द्यावा, इतकें त्या बालिकेचें प्रस्थ माजविण्याचें कारण काय ? या प्रश्नाला उत्तर हें कीं, ही आपल्या हातांतून निसटून लोहगडास जाईल, हिचे कारभारी हिला दत्तक देऊन खूळ माजवितील, हिला नेहमीं आपल्या वाड्यांत जवळ बाळगिलें पाहिजे, या गोष्टी बाजीराव साहेबांच्या मनांत घोळत होत्या. त्यास अनुसरून ही मुलगी आम्ही आजपासून सरकार दिमतीस लाविली, हिचा कबजा घेतला, असें श्रीमंतानीं लोकांत जाहीर केलें !

मोरोबादादांचे सर्वच प्रतिस्पर्धी श्रीमंतानीं कारागृहांत बसवून ठेवले, तेव्हां आतां त्यांना राज्यकारभारांत येण्याचा मार्ग निर्वेध झाला. त्याप्रमाणें त्यांस पुण्यास आणण्याची तजवीज सरकारांतून सत्वरच झाली.

"मोरोबादादा यांस पत्रें जावयाचें शिंदे यांचे विचारें ठरोन पत्रें गेलीं. दादानीं व बळवंतराव नागनाथ व आपाजीपंत गोंधळेकर व बाळोजी कुंजर यार्णी मिळोन दौलतीचा कारभार करावा याप्रमाणें शिंदे यांणीं श्रीमंतांचे विचारें ठरविलें आहे. पुढें काय घडतें न कळे. विचार एक होत असतो आणि अकस्मात् भलतीच गोष्ट घडून येते ! याप्रमाणें भुलथाप होते. याजकरितां प्रमाण घडोन येईल तें सत्य ! शहरांत तो लोक भयभीत आहेत.......मोरोबादादा यांस आणावयास पुरंदरे यांस रवाना केलें. चार पांच पागा, पुरंदरे यांचें पथक, अंबारी, दोन हत्ती खुले, कांहीं गाडद, याप्रमाणें रवाना जाले आहेत."

नंतर मोरोबादादांची स्वारी पुण्यास येऊन पेशव्यांच्या व त्यांच्या भेटी झाल्या त्या समारंभाचें वर्णन—

"मोरोबादादा फडणीस जुन्नराहून आषाढ शु॥ प्रतिपदा सोमवारीं पुण्यास आले. श्रीमंत गारपिरावर (सामोरे) गेले होते. शिंदे होळकरही फडणिसांस भेटावयास आले होते. भेटीचा समारंभ यथास्थित होऊन शिंदे होळकर आपले मुक्कामास गेले. श्रीमंतानीं खवाइथांत दादा घेतले होते. तैसेच वाड्यांत आले. नंतर दादा मुरलीधराचे देवालयीं येऊन राहिले. आठ पंधरा दिवस तेथेंच रहाणार. तेच दिवशीं रात्रीस श्रीमंतानीं दादांस भोजनास बोलाविलें. भुईवर भोजन करीत होते ते ते दिवशीं ताटांत जेवले ! कंठी शिरपेंच जेगा चार वस्त्रें दिलीं."

मोरोबादादा भुईवर जेवीत होते ते कधींपासून ? सन १७७८ त ते कैदेंत गेले तेव्हांपासून कीं तीन वर्षांपूर्वीं त्यानीं झूटा संन्यास घेतला होता

तेव्हांपासून ? चातुर्मास्यांत म्हाताऱ्या बायका भुईवर जेवणें हें व्रत म्हणून आचरणांत आणितात तें आम्हांला ठाऊक आहे. मोरोबादादांसारख्या थोर माणसानें त्रागा म्हणून असें करणें हा प्रकार विचित्र वाटतो !

पुण्यांत चालू असलेल्या धराधरीच्या आणि खडाजंगीच्या ऐन हंगामांत सर्जेरावानें धांदल करून करवीरकरांस पेशव्यांकडून तह ठरवून देवविला. एक वर्षापूर्वी नाना व परशुरामभाऊ हयात असतां करवीरकरानीं जो तह ठरवून घेतला होता ( पहा भाग दहावा. पृ. ५५७७ ) त्यांतलीं व हल्लीं ठरलेल्या तहांतलीं कलमें एकच होतीं. करवीरच्या महाराजानीं पेशव्यांस खंडणी सात लक्ष रुपये व तह ठरवून दिल्याबद्दल शिंद्यांस दरबारखर्च म्हणून चार लक्ष रुपये द्यावे एवढें एकच कलम काय तें हल्लींच्या तहांत अधिक होतें. पेशव्यांच्या खंडणीची निर्गत हप्तेबंदीनें व्हावी असें ठरलें होतें. पण दरबारखर्चाची रकम रोख द्यावयाची असते. दौलतरावांकडे रोख भरणा करण्यापुरते चार लाख रुपये तरी महाराजांजवळ कुठे होते ? ती अडचण सर्जेरावानें दूर केली. शिंद्यांच्या चार लाख रुपयांची हमी त्यानें स्वतः पतकरली व त्या रकमेची फेड चिकोडी व मनोळी या दोन महालांच्या वसुलांतून मी करून घेईन असें त्यानें कबूल केलें. हे महाल परशुरामभाऊंच्या ताब्यांत महाराजानीं रदकर्जांत लावून दिलेले असतां घाटग्यानें तह ठरवून दिला त्यांत पटवर्धनांस कर्जाबद्दल कांहीं एक न देतां हे महाल त्यांजकडून काढून महाराजांस द्यावे असें कलम घातलें होतें ! रामचंद्रपंत आपांचा वकील बाबा काळे यानें महाराजांस सरकारांतून महाल परत देणें तर द्या, परंतु माझ्या यजमानाचें कर्ज बुडवूं नका, म्हणून दरबारांत पुष्कळ तकरार केली, परंतु त्याची कांहींच दाद लागली नाहीं. तो लिहितो--

"रामचंद्र परशुराम यांचें देणें आहे तें बुडवावें, चिकोडी तालुका माघारा द्यावा, याशिवाय पावणेतीन लक्षांचा सरंजाम सरकारपैकीं महाराजांस द्यावा, कर्नाटकपैकीं द्यावा, असें म्हणतात. परंतु यादवाड गोकाक पाच्छापूर ऐसे त्यांस लगत (आमचे) तालुके आहेत तेच ते मागणार ! शिंदे घाटगे देवविणार, तेव्हां जें मागतील तेंच ( हे ) देतील ! सरकारपैकीं तालुका देतात त्याऐवजीं जेव्हां सरकारांत कार्य लागेल तेव्हां फौज चाकरीस यावी असा करार. सात लाख रुपये करवीरवासी याणीं सरकारांत द्यावे. त्यास हप्तेबंदी सालमजकूर सन इहिदे मय्यातैनांत आश्विन मासीं दोन लाख. इसनेंत

अडीच. तैसेंच सल्लासांत अडीच. एकूण सातांची भरती. येणेंप्रमाणें ठराव होत आहे. आमचें बोलणें कोणी आइकत नाहींत. मला येथें येऊन आज पंचवीस दिवस जाले. शिंदे यांची घाटगे यांची भेटी घेतली. याजउपरी रोज जाऊन येतों. येथें कोणासीं काय बोलावें ? जें शिंदे व सर्जाराव करील तें होतें. आमचा तांता श्रीमंतांकडे अथवा सर्जाराव यांजकडे अगदीं नाहींसा जाला. कै॥ नाना व पागनीस यांजकडे भर आमचा पडला. लिहिलीं द्वारें अगदीं बुडालीं याजमुळें या थरास आलें. खटपटीस अंतर करीत नाहीं. परंतु कोणी विचारीना ! जेथें बोलावयास जावें तो दरबारखर्च मागणार. शिंदे यांचे लष्करांतून जाऊन आलें म्हणजे पुनर्जन्म जाल्यासारखा होतो ! खटपट करीत आहें. काय ठरेल तें लिहितों. याजउपरी करवीरची आशा राहिली. कर्ज बुडालें. चिकोडी जाती. सावनूर तालुकाही असाच वांटतात. आजपर्यंत स्वाऱ्यांचें चाळीस लाख रुपये कर्ज सरकारांत, तें नानांस पुसावें ऐसे रंग येथील ! तेव्हां सर्व कर्जसुद्धां पाणी पडलें. फक्त सरंजाम राहिला म्हणजे भाग्य आहे. त्यासही सर्जेराव जप्ती करीन म्हणतच आहे ! त्यांत श्रीमंतांची अवकृपा. इतक्या नोबती गुदरल्या आहेत. यांत ईश्वर कशी लज्जा राक्षितो समजत नाहीं."

बाळोबाताल्यांची मसलत तडीस जावी, जुनें राजिक कायम रहावें, यासाठीं रामचंद्रपंत आपांची तळमळ कां चालली होती हें आतां वाचकांस नीट समजून येईल. पूर्वीचें राजिक परंपरेनें जरी कायम असतें तरी तें पूर्वीच्या करारानीं बांधलें गेलें असतें. सरकारच्या स्वाऱ्याशिकाऱ्या पार पाडण्यांत परशुरामभाऊंस चाळीस लाख रुपये कर्ज झालें तें नाकारण्याची छाती त्या राजिकाला झालीच नसती ! पण जुने दरबारी मेले गेले, अडकले, सारी धूळधाण होऊन गेली, आणि नवे पेशवे व नवे कारभारी यांची अमदानी सुरू झाली. आतां पटवर्धनांस कोण विचारतो ? त्यानीं कर्जाची गोष्ट काढली तर बाजीरावसाहेब स्वच्छ उत्तर देत कीं, तुमचें कर्जबिर्ज आम्ही कांहीं एक जाणीत नाहीं ! सवाई रावसाहेब, नाना फडणवीस व हरीपंत फडके यानीं तुम्हांला कर्ज काढावयास सांगितलें. त्या कर्जाचा जाबसाल तुम्हीं त्यांना पुसावा ! आमच्या कामांत तुम्हांला कर्ज झालें नाहीं. तें आम्ही कां कबूल करावें ?

वाघाचें बंड मराठ्यांच्या हातून मोडवत नाहीं त्याअर्थी आपण त्यांच्या मुलखांत फौज पाठवून तें मोडलें पाहिजे असा इंग्रजांनीं निर्धार ठरवून

स्वारीची तयारी केली होती हें पूर्वीं लिहिलेंच आहे. एखाद्या मसलतींत पडायचें तें नांवाला कां होईना, पण कोणी तरी सोबती घेऊन पडावें, असा इंग्रजांचा शिरस्ताच आहे. त्यांनीं निजामअली हा नामधारी सोबती वाघाच्या मसलतीकरितां योजून आपल्या रेसिडेंटमार्फत पेशव्यांशीं नेटाचें बोलणें लाविलें कीं, नबाब व आम्ही वाघावर स्वारी करणार व त्यासाठीं तुंगभद्रा उतरून फौजांसह तुमच्या मुलखांत येणार. तर तसें करण्याची आम्हांस परवानगी द्यावी. पेशव्यानीं सुमार पाहिला कीं, आपण नको म्हटलें तरी हे येणारच. मग हे मागतात ती परवानगी देऊन आपलें आपण भूषण कां राखूं नये ? असा विचार करून त्यानीं इंग्रजांस परवानगी दिली इतकेंच नव्हे, तर त्यांस सामील होण्याविषयीं गोखले पटवर्धन वगैरे तिकडच्या सर्व सरदारांस रेसिडेंटानें मागितलीं तशीं पत्रें लिहून दिलीं.

इंग्रजांचे बेत व तयारी वाघाला ठाऊक नव्हती असें नाहीं. पण तो त्यांस थोडाच जुमानीत होता ! एकाहून एक आश्चर्याचे त्याचे पराक्रम चाललेच होते. या वर्षाच्या जून महिन्यांत त्याच्या उत्कर्षाचा परमावधि होऊन गेला. त्यानें शेंकडों ठाणीं घेतलीं व तमाम मुलखांतून दुबार तिबार खंडणी जबरदस्तीनें वसूल केली. गोखले, सांगलीकर व हरीपंतबाबा मुरगोडच्या बारीअलीकडे होते त्यांच्या मनांत जलदीनें जाऊन सावनूरच्या भक्कम ठाण्यांत शिरावें आणि तेथून वाघाशीं लढाई द्यावी असें होतें. परंतु त्यानें तो बेत ओळखून अघाडी मारिली आणि सावनूर हिकमतीनें घेऊन त्यांस चुरमुरे खात बसविलें ! त्या प्रांताचे सुभेदार बाळकृष्णपंत लागू आपल्यावर वाघाचा दांत आहे हें ओळखून तो तिकडे येण्यापूर्वींच इंग्रजांकडे हरिहरास जाऊन बसले होते. तरी त्यानीं शीळकर पटवर्धनांपैकीं वासुदेवकाका यांस सावनूरच्या बंदोबस्ताकरितां ठेविलें होतें. काकाची व वाघाची ओळख पूर्वींची होती. स्नेहाचीं बोलणींचालणीं व पत्रव्यवहार करून वाघानें काकाचा विश्वास संपादन केला होता. सावनुरास येतांच त्यानें वासुदेवकाकास सांगितलें कीं, तुम्ही आम्ही स्नेही, त्यांतून मी रामचंद्रपंत आपांच्या पदरचा म्हणवितों. तुम्हांला उपद्रव मी देणार नाहीं. मला पिराचा नवस फेडण्याकरितां कंदुरी करावयाची आहे, तेवढ्यापुरती चारशें माणसांनिशीं गांवांत येऊन जाण्याची मला मोकळीक द्या म्हणजे झालें. काकानें वाघाच्या विश्वासावर जाऊन तशी मोकळीक देतांच तो साळसूदपणें सावनुरांत शिरला आणि आंतील

लोकांशीं मारामार करून ठाणें बळकावून बसला! काका समजत होता कट्टरी बकऱ्यांची, आणि वाघाला करायची होती माणसांची! एकूण काकाच्या हातचें सावनूर गेलें त्याला कारण हा सारा समजुतीचा घोटाळा झाला म्हणायचा!

सावनूरचा किल्ला कबजांत येतांच त्या राज्याचे अकराही महाल वाघानें घेतले इतकेंच नव्हे, तर शेजारच्या इंग्रजी मुलखांत शिरून त्यांचीं बदनगुड्ड वगैरे पांच सहा ठाणीं घेतलीं. नंतर घांटाखालीं सोंधें प्रांतांत धामधूम करण्यासाठीं हजार स्वार रवाना करून तो धोंडोंपंत गोखल्यांचा समाचार घेण्यासाठीं सकल सैन्यासह मिश्रीकोटास येऊन दाखल झाला. सुरापूर व कनकगिरी येथील संस्थानिक त्यास सामिल झाल्यामुळें त्याच्या सैन्याची संख्या आतां तीस हजारांवर गेली. गोखल्यांच्या व त्याच्या लष्कराला फक्त तीन कोसांचें अंतर राहिलें. अशा या आणीबाणीच्या वेळीं हरिपंत बाबा अंतरावर होते ते अधिकच सरकून बाजूस गेले. अर्थात् लढाईचा हंगामा गोखले व चिंतामणराव सांगलीकर यांवरच येऊन पडला.

गोखले कित्तूरच्या गढींत शिरले होते. गढीबाहेर चिंतामणराव राहिले होते. आणि कोसा कोसावर त्यांच्या स्वार शिपायांच्या चौक्या बसलेल्या होत्या. त्या चौक्यांपैकीं एक चौकी वाघानें मारून काढिली तो वृत्तांत चमत्कारिक आहे. एके दिवशीं अकस्मात् वाघाचे तीनशें स्वार त्या चौकीजवळ दिसूं लागले. चौकीदार रिकामा वेळ घालविण्याकरितां वाघशेळ्यांचा खेळ खेळत होते. त्यानीं 'तुम्ही कोण' म्हणून विचारपूस केल्यावर 'आम्ही तुमचेच' म्हणून स्वारांनीं सांगितलें! हे तासगांवकरांचे स्वार असतीलसें समजून चौकीवाले बेफामपणानें खेळांत दंग होऊन राहिले. तों स्वारानीं येऊन झपाटा मारिला आणि हां हां म्हणतां त्यांची कत्तल केली! वाघ बनलेले आणि शेळ्या झालेले---सर्वांचाच वाघानें सप्पा उडविला!

वर लिहिल्याप्रमाणें धोंडजी वाघानें आपणास चोंहोंकडून घेरलें असें पहातांच या अडचणींतून कसें निसटून जावें हा विचार करणें गोखले व चिंतामणराव यांस प्राप्त झालें. तसें ते न करिते तर चार दोन दिवसांत लढाईचें तोंड लागावें व त्यांचा नाश व्हावा हें अपरिहार्य होतें.

नं. ५५१९ श्रीगणराज. ( वैशाख शु० ८–२ मे )

पै॥ छ० ७ जिल्हेज. मय्यातैन.

विज्ञापना. राजश्री यशवंतराव सखाराम पानशे याणीं गणपतराव पानशे यांसीं लिहून पाठविलें कीं, श्रीमंत राजश्री अमृतराव साहेब याणीं व राजश्री नारोपंत चक्रदेव याणीं सांगितलें जे, "पुण्यांत [1]बैदा जाहला आहे. त्यास तुम्हीं आपले नांवें [2]ल्याहावें. रामचंद्रपंत आपा यांस सांगून करवीरचा मोर्चा उठवावा आणि तुम्ही व आपा, मिरजकर, कुरुंदवाडकर, पेठे, व साठे, विंचूरकर, राजे बहादर, ऐसे मिळोन श्रीकृष्णेच्या पाण्यावर मिरजेचे आसऱ्यानें जमून राहावें." ऐसें पत्र शनिवारचे रवानगीचें आलें आहे. वडिलानीं आजच वाचून पाहिलें आणि आम्हांसही मजकूर सांगितला तो सेवेसीं लिहिला आहे. यशवंतराव याणीं तोफखाना मिरजेस पोहोंचता करावा आणि सावध रहावें म्हणोन गणपतराव यांस लिहिलें होतें. बाळोबा तात्याची गत तोच समय (आम्हांवर) गुदरावा ऐसा समय होता. परंतु श्रीनें राखिलें ! सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५२० श्रीगणराज. ( वैशाख शु० १०–४ मे. )

पै॥ छ० ९ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. पुण्याहून काल पत्रें आलीं त्यांतील अभिप्राय [3]संकर्षणास प्रतिबंध केला हें खरें. जयनगरचे राजे हिंदुस्थानांत आहेत त्यांची व लखोबा लाड नि॥ शिंदे यांची लढाई जाहली. जयनगरवाल्यास बुडाविलें. हीं पत्रें आलीं त्या समारंभाची सरबत्ती केली. त्या गडबडींत यांस कैद केलें. नंतर [4]वखारींत पामरसाहेब आहेत त्याणीं शिंद्याकडील कंपूचे इंग्रज आहेत त्यांस बोलाऊन आणोन विचारिलें कीं, वचन देतां आणि बेमानी करून कैद करतां ही इंग्रजी चाल नव्हे ! बाळोबा तात्यांकडून अंतर पडलें असल्यास आम्हीच पारिपत्य करूं ऐसें बोलिले. नंतर कंपूचे इंग्रज व [5]पामरसाहेब

---

१ पत्र नारायणराव गंगाधर यांचें मिरजेस बाळासाहेबांस. २ गणपतराव पानशे यांस पत्र लिहावें. ३ बाळोबातात्यास. ४ संगमावर इंग्रजांची वखार होती तीच अलीकडे रेसिडेन्सी हें नांव पावली होती ! ५ पाल्मर कोण, कंपूवाले कोण, हें त्यावेळच्या लोकांस कांहींच ठाऊक नव्हतें ! त्यामुळेंच कर्नल पाल्मरसंबंधानें या पत्रांत हा विचित्र मजकूर लेखकानें लिहिला आहे.

याणीं राजश्री दौलतराव शिंदे यांचे सभोंवतीं चौकी देऊन बसले आहेत. शनवारचें उपोषण जाहलें. रविवार दीड प्रहर पावेतों चौकी होती आणि माणूस आला. याजप्रमाणें लिहिलें आलें. आणखी वर्तमान होईल ते सेवेसीं मागाहून लिहितों ऐसें लिहिलें आहे. घाटगा कारभार करूं लागला. श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब यांचें लक्ष किंचित् घाटगे यांजकडे आहे हें समजोन श्रीमंत राजश्री अमृतरावसाहेब व राजश्री नारोपंत चक्रदेव हुजरात व इंग्रज यांचें एक लक्ष आहे. त्यानीं श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेबांस विनंती केली कीं, राज्याची गत काय ? त्यांस आज्ञा केली कीं, याचें उत्तर सांगावयास येईल ! ऐसें वर्तमान लिहिलें आहे. सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५२१ श्रीगणराज. ( वैशाख शु० १३–७ मे. )

पै॥ छ० १४ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख.

[1]विज्ञापना. पुण्याहून पत्रें छ० ११ मिनहूस आलीं त्यांतील मजकूर राजश्री बाळोबा तात्या पागनीस अलिजाबहादर यांचे पहाऱ्यांतून सुटोन आपले वाड्यांत आहेत. परंतु सभोंवते पाहरे जळचर यांचे आहेत. घाटगे यांचें वर्तमान आलें होतें तें बातल आहे. वरकड " लश्कर करवीरचे मोर्चे उठवून मोठी सावधगिरीनें रहावें. येक जागां मुक्काम करून राहूं नये. " संकर्षण व पटवर्धन यांचें ठिकाण नाहीं ऐसें करणें, नाना यांजकडील लक्षांत चक्रदेव वगैरे आहेत त्यांचेंही याजप्रमाणें करावयाचें, ऐसा बेत खचित आहे. " म्हणोन लिहिलें होतें. आणि श्रीमंत यजमानानीं पुण्यास येणेंविशी बहुत प्रकारें मायावी लिहिणें लिहितील. परंतु ऐकूं नये. याजप्रमाणें लिहिलें आलें. तेंच कागद वडिलानीं आम्हांस दाखविले. त्यांतील अभिप्राय याजप्रमाणें आहे. सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५२२ श्रीगणराज. ( वैशाख व०२–१० मे. )

विज्ञ[2]पना. चि॥ राजश्री रामचंद्रपंत आपाकडे जासूदजोडी पाठविली होती ती आली. चिरंजीव घोडगिरीवर गेले ते पक्षीं स्वदेशीं राहतात असें नाहीं. येथून मला येण्याविशीं आज्ञा; त्यास पलटणें समीप. एकाएकीं निघून येतां येत नाहीं. काय करतात हेंही समजतें. श्रीमंत राजश्री नारायण[3]राव

---

१ पत्र नारायणराव गंगाधर यांचे मिरजेस. २ कुरुंदवाडकर रघुनाथराव यांचें बाळासाहेब मिरजकर यांस पत्र. ३ घोरपडे कापशीकर.

आपा यांजपाशीं बातमीस ठेविला आहे. ( पलटणांचा ) अविवेकी कारभार. स्थळ टाकून निघतां येत नाहीं. न निघावें तर सर्वस्व घात होतो. त्यास गडबडून आजच मी निघालिया स्थळास करवीर ( कर ) समयें अपाय करितात. गुंता नाहीं. ( आमची ) पलटण वगैरे जवळ आणोन शनैः शनैः रवानगी करून देतों. मग श्रीगजाननानिर्मितास उपाय नाहीं. परंतु आज मीच गडबडून निघालिया शिंद्यांच्या पलटणांस गडबडून निघालों असें होतें. सर्वांचे, वेदमूर्तींच्या, सर्वांच्या विचारा आलें आहे. कांहीं सुचत नाहीं. रवाना छ० १४ जिल्हेज. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५२३ श्रीगणराज. ( वैशाख व० ३–११ मे. )

पैा छ० १६ जिल्हेज. सन मय्यातैन. वैशाख.

[1]विज्ञापना. राा नारो हरि करंदीकर यांस करवीरकरानीं मारलें म्हणोन लिहिलें होतें, परंतु आंतून ब्राह्मण आले त्यानीं सांगितलें कीं, मार दिला. कैदेंत आहे. कुळंबिणीचें नाक जीभ कापिली खरी. मराठी माणसें तीन मारिलीं खरीं. करंदीकर जिवंत आहेत. पुण्याहून एका गृहस्थाचें पत्र आलें आठ रोजांचें. त्यांतील वर्तमान बाया माघाऱ्या आणविल्या. संजीवनी[2] व चक्र वगैरे जुनें मंडळ एकवाक्यतेनेंच आहेत. पोक्त जमाव करून शंभुमहादेवाकडे जम पाडावा, इकडील फौजा आणवाव्या, आणि शिंदे अलिजाबहादर, यांजवर एक वेळ हंगामा करावा, हा इरादा आहे. येथें वडिलांजवळ कांचनाचें नांवही नाहीं, त्याजपक्षीं यांजवळ जमाव कैसा ठरतो ? ऐसें आहे. श्रीइच्छेनें घडेल तें खरें ! तीा राा रामचंद्रपंत आपा यांस जबाब पोंचून पत्र दिलें तें पाठविलें आहे. सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५२४ श्री. ( नक्कल ) ( वैशाख व० ९—१७ मे. )

राजमान्य राजश्री बाळाजी विष्णु दिम्मत रामचंद्र परशुराम गोसावी यांसीं.

सेवक अमृतराव रघुनाथ. नमस्कार. सुरु सन मय्यातैन व अल्लफ. तुम्ही सरकारचा निरोप न घेतां निघोन गेलां हें ठीक न केलें. हल्लीं हें पत्र सादर केलें असे. तरी कोणेविशींचा अंदेशा न धरितां सत्वर निघोन हुजूर येणें. जाणिजे. छ० २२ जिल्हेज. आज्ञाप्रमाण. मोर्तब.

---

१ पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची आहे. पत्र नारायणराव यांचें बाळासाहेबांस मिरजेस. २ अमृतराव व चक्रदेव.

नं. ५५२५ श्री. (नक्कल) ( वैशाख व० ९–१७ मे )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्र परशुराम स्वामी गोसावी यांसीं—

पोष्य अमृतराव रघुनाथ. नमस्कार. विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुम्ही सरकारांत पत्रें पाठविलीं तीं प्रविष्ट जालीं. लिहिला मजकूर विदित जाला. ऐशास येविशींचीं उत्तरें लौकरच तुम्हांकडे रवाना होतील. जाणिजे. छ० २२ जिल्हेज. सु॥ मय्यातैन व अल्लफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं. ५५२६ श्री. (नक्कल) ( वैशाख व० ९–१७ मे. )

पै॥ छ० २ मोहरम.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्रपंत आपा स्वामीचे सेवेशीं.

पोष्य नारो शिवराम चक्रदेव. सा॥ नमस्कार विनंती उपरी, येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. तुम्ही सरकारांत तीन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिले मजकूर सविस्तर कळले. त्याचीं उत्तरें श्रीमंतांस विनंती करून लौकरच रवाना करितों. छ० २२ जिल्हेज. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नं. ५५२७ श्री. ( १८ मे )

पै॥ छ० २९ जिल्हेज. मय्यातैन व अल्लफ.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी शिर सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत वैशाख व॥ १० पावेतों वर्तमान बालकाचें यथास्थित असे. विशेष. वडिलांकडून अलीकडे पत्र येत नाहीं. इकडील मजकूर अधिकोत्तर नाहीं. राजश्री बाळोबा व धोंडिबा यांजला ज्वर येतो अशी बाजार आवई होती, परंतु अलीकडे आरोग्य जाहलें ऐसेंही बोलतात. बाया वेरुळापुढें गेल्या. लखबाच्या व अलीबहाद्दर यांच्या भेटी जाहल्या. यशवंतराव याजपाशीं पंचवीस हजार जमाव आहे. बायांकडील पत्रें उभयतांकडे गेलीं असेंही बोलतात. शिंदेकडील वकील आबा व सर्जेराव वगैरे येऊन मिरज व तिकडील सरंजामाच्या सनदा मागत होते. परंतु सरकारांतून जाबसाल स्पष्ट होऊन " मिरजेकडे मागें गोपाळराव याणीं काय पराक्रम केला आईकत आहां. त्यांचें पारिपत्य

---

१ पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

होणें लांब. आणखी उपाधि नवी आणून घालतील याचा विचार पक्कपणें करून मग सनदा सरकारांत मागणें." असें राजश्री बळवंतराव नागनाथ सर्जेराव यासीं बोलले. याजप्रमाणें बोलणें होऊन वकील लष्करांत गेले. चार दोन रोज याजप्रमाणें बोलतात. कळावें. मला दिवसेंदिवस आरोग्य आहे. स्नान नित्य असें करीत नाहीं. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५२८ श्री. ( १९ मे. )

पै॥ छ० २८ जिल्हेज. मय्यातैन व अल्लफ.

सेवेशीं सा ॥ नमस्कार विज्ञापना तागायत वैशाख व० ११ प्रातःकाळपावेतों वर्तमान यथास्थित. विशेष. लखबा सावध आहे. त्याणें जयपूरवाल्यांशीं लढाई करून त्यांचा मोड करून यश संपादिल्याचीं पत्रें येतात. शिंदे यांणीं तोफा मारिल्यानंतर बाळोबाचें वर्तमान त्यांस कळलेवर त्याणें जयपूरवाल्यांसीं सख्य करून त्यांजकडील फौज कुमकेस दहा हजार आणली. सावध आहे. अलीबहादरही लखबास येऊन मिळाले. यशवंतराव होळकर वीस हजार जमावानिशीं आहे त्याचीं परस्परें पत्रें गेलीं. बायांची पत्रें लखबास गेलीं. यशवंतराव यांस गेलीं. बाया घांट उतरून बऱ्हाणपूर सुमारें आगेमागें आहेत. लखबाचे दंग्याचा बंदोबस्त करण्याविशीं पिरू फिरंगी व अंबोजी इंगळे गेले होते सरकारआज्ञेवरून. परंतु लखबा सावध जाहले. त्याचा सरंजाम भारी हें सर्व वर्तमान येथें आलेवर येथें ठीक नाहीं. बाळोबा व धोंडीबा सुखरूप आहेत. बाया लखबा होळकर एकत्र होणार. पुढें विचार काय ठरतो न कळे. येथें विचार भारी पडला आहे असें लोक बोलतात. वडिलांस कळावें. बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना.

नं. ५५२९ श्री. नक्कल. ( वैशाख व० ११—१९ मे. )

पै॥ छ० २ मोहरम.

विज्ञापना. तागायत छ० २४ जिल्हेज पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींकडून छ० १३ जिल्हेजचें पत्र आलें त्या अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यास वरचेवर पत्र येऊन वृत्त कळलें पाहिजे. पेशजी पत्रें सरकारांत

---

१ पत्र धोंडो बापूजी जोशी याचें पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस २ लखबादादा लाड यास कळल्यावर. ३ बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे याचें पत्र पुण्याहून रामचंद्रपंत आपास.

आलीं तीं वरचेवर प्रविष्ट केलीं. उत्तराविशीं उद्योग चाललाच आहे. परंतु मीच निकड करून घेत नाहीं. कारण पत्रें कोणे तऱ्हेची कशीं लिहितील हें कळत नाहीं. याजकरितां सोईनें घेतों. हल्लीं श्री॥ राजश्री रावसाहेब व राजश्री नारोपंत चक्रदेव यांचें पत्र घेऊन पाठविलें आहे. पत्रांत प्रकार तर कांहींच नाहीं. परंतु खुणेचें मलाही येणेंविशीं रावसाहेब यांचे पत्र घेतलें त्याची नक्कल पाठविली आहे. पत्र घेतलें तेंच पत्र आठ चार दिवस उघड होतां नये. यांतील कारणें बहुत आहेत तींही सेवेशीं वरचेवर कळत जातील. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५३० श्रीगजानन. ( वैशाख व० १४–२२ मे. )

नक्कल.

सेवेसीं शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता।। छ० २७ जिल्हेज पर्यंत स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. बंडगर प्रकरणीं मजकूर अलाहिदा लिहिला आहे त्याजवरून ध्यानास येईल. येथून सत्रंजसाहेब फिरंगी दिमत शिंदे यांचा हलकारा करवीरचे मसलतीस पलटणें नेलीं आहेत त्यांस बोलावणीयास कागद गेला आहे कीं, तुम्ही मजल दर मजल पुणीयाचे मुक्कामीं येत्रोन पोहोंचावें; म्हणोन बलावणें गेलें आहे. पलटणें लौकर येतील. स्वामीनीं कसेंही करावें, परंतु शिरोळ व आकीवाट ठाणें पलटणें इकडे येतांच हस्तगत करावीं म्हणजे मोठा नक्ष होईल. कोणाचा आक्षेप न धरितां हस्तगत व्हावें. उगीच संशयांत पडों नये. घाटगे वगैरे कारभारी अस्तास पावतात. करवीरचा कारभार विसकळीत होतो. स्वामीनीं कुरुंदवाडास राहणें केलें ही गोष्ट चांगलीच केली. अलीकडे शिंदे यांजकडील कोणी सरकारांत येत नाहीं. झाडोन पलटणें उत्तरेस जाणार. श्रीकृपे बंदोबस्त लौकर होईल. पत्रीं विस्तार लिहिता येत नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. स्वामीनीं कोणाचा मुलाहिजा न धरितां हस्तगत ठाणीं करावीं हीच विनंती सेवकाची. मोठी मजा घडती असें सेवकाचे बुद्धीस वाटतें. हे विज्ञप्ति.

नं. ५५३१ श्री. ( वैशाख व० १४–२२ मे. )

विज्ञापना. राजकी वर्तमान परवांचे पत्रीं लिहिलें आहे. अलीकडे नवल विशेष नाहीं. पटवर्धनांचा सरंजाम घाटगा मागत होता. पेरूचा बंदो-

---

१ हें व पुढचें अशीं दोन्हीं पत्रें बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे यांनीं पुण्याहून रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस लिहिलीं.

बस्त लखवानीं करतांच अगदीं काम हलकें पडलें. अलीकडे चारपांच दिवस त्याजकडील कोणही कचेरीस येत नाहींत. घाटगा बाळोबा पागनीसाकडे दोन रोज वेरझारे करितो. तो परिछिन्न आपल्यास कारभार लागत नाहीं असें सांगतो. शिंद्यानीं चिटणिसांस स्पष्ट सांगितलें जे, तुमचे मसलतीवर ही गोष्ट केली. खर्चाची तरतूद करावी. नाहींतरी परिछिन्न कामावर येणार नाहीं. लौकर बंदोबस्त करावा. आपल्यांत आपण मसलतींत पडले आहेत. येथें फिरंगी आहे तो पिरूचें वर्तमान आइकल्यापासून तिकडे जाण्याची गडबड करितो. कडबा संग्रह केला होता तो विकणार. करवीरचे मसलतीस पलटणें गेलीं त्यांस बोलावण्यास जासूद जोडी गेली असें खचित वर्तमान ऐकिलें तें सेवेसीं लिहिलें आहे. आणखी होईल तें मागाहून लिहितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. स्वामी कुरुंदवाडीं पलटणवाल्यांचे उरावर राहिल्याची मसलत चांगली केली. या उपर पलटणवाले माघारे येतात. जमाव आहे. शिबंदी वाढली आहे. उगवण्याची तरतूद केली असतां उत्तम आहे. राजश्री बाळाजी यादव यात्रेहून आज दोन प्रहरीं पुण्यास आले. संगमावर उतरले आहेत. संध्याकाळीं वाड्यांत येतील. हे विज्ञापना.

नं. ५५३२ श्री. ( ज्येष्ठ शु० १–२४ मे )

पै॥ छ० २९ जिल्हेज. मय्यातैन व अल्लफ.

विज्ञापना[1]. राजकी वर्तमान पलटणवाल्यानीं त्या प्रांतीं धूम माडली आहेच. येथून आणखी दोन पलटणें काल शनिवारीं निघून शिवऱ्याच्या मुक्कामास गेलीं. त्या प्रांतीं येऊन दंगा करणार. घाटग्याचा आग्रह मिरजसुद्धां आपले सरंजामास लावून घ्यावयाचा. दोन तीन बैठका अलीकडे जाहल्या. खलबतांतील बोलणें कोणी सांगतात, ( श्रीमंत ) मिष्ट भाषण मात्र करितात. तिकडील महाल देत नाहींत. तत्राप श्री॥ राजश्री आपासाहेब यांजकडील मात्र देणीं अद्याप ठरून सनदा जाहल्या नाहींत. ते[2] आपले स्थळीं पुष्कळ बोलतात आणि इकडे बोलणें लाविलें आहे. तिकडे जबरदस्तीनें वहिवाट करावी हें योजून पलटणें रवाना केलीं म्हणतात. एक पंथ दे काज ! मुलूख हाताखालीं पडतच आहे. साधल्यास पाठलाग करून त्यांचें पारिपत्य करावें

---

१ बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे याचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र. २ घाटगे. ३ रामचंद्रपंतांचें.

अशीही मसलत आहे. घाटग्याकडील वासुदेवपंत म्हणोन सांगलीकर गृहस्थ आहे तो येथें मिरजकर यांचे वाड्यांत येत असतो. त्याणें राजश्री धोंडो बापूजी याजपाशीं सांगितलें जे, पलटणें तिकडे धांदल करावयास जातात. याशिवाय दोन पलटणें मंगळवेढ्याकडे रवाना जालीं. महालीं उपद्रव करून पैका घेऊन किल्यास उपसर्ग करावा हा बेतही आहे असें सांगितलें. त्याणीं त्यासी बोलणें केलें जे, तुम्ही सांगलीचे रहाणार. त्यांचें अन्न खाल्लें, असें असोन प्रसंगीं असतां मिरजेचा बंदोबस्त उपद्रव न होणेंविशीं करावा किंवा नाहीं ? तसेंच स्वामींचें नांवही घेतलें. तेव्हां त्याणें सांगितलें कीं, श्रीमंतांचें पत्र आपल्यास व घाटगे यांस सामोपचारें यावें. पांच रुपये खर्च केले असतां बंदोबस्त होईल. श्री ॥ राजश्री चिंतामणराव आपा खेरीज करून खेडीं वगैरे आसपास किती आहेत त्याची याद आणवावी. तशीच स्वामींकडील खेडीं वगैरेची याद आणवावी. बंदोबस्त करून रखवालीस जासूद नेमून देतों. असें बोलले तेव्हां त्यांणीं[1] त्यांजकडून श्री॥ राजश्री बाळासाहेबांचे नांवें पत्र घेतलें. आज प्रातःकाळीं मला बोलावूं पाठविलें. मी गेलों. वर्तमान सांगून पत्र दाखविलें. उत्तम आहे. पाठवावें. मीही विनंती लिहून उत्तर आणवितों. बाळासाहेब व आपासाहेब दोन नाहीं असें सांगितलें. तत्राप संस्थानें दोन म्हणतात. रक्षण जालें असतां आपले तालुक्याचे अजमासें आम्हीही बोलूं. याप्रमाणें धोंडो बापूजीसीं बोलून ठिकाणास आलों. स्वामींसही इतकें लिहिलें आहे येविशीं आज्ञा करणें ती केली पाहिजे. 'श्री॥ राजश्री आपासाहेब व गोखले व चिंतामणराव आपा एकत्र आहेत. धोंडजी वाघाचें संधान करून त्यासही मिळवून घेतला' म्हणोन येथें वर्तमान आहे. 'हैदराबादेस कारकून गेला होता. नबाबाचे श्रवणीं पडून त्यांनीं पेशजी रहावयास किल्ला व महालांचा डौल[2] केला होता तसा करून देतों म्हणोन सांगितलें. त्यांचीं पत्रें आलीं' म्हणोन ऐकिलें. दुसरें, फरासिसानीं दगा करून चेनापट्टण घेतलें; पट्टणास मोर्चे[3] लाविले आहेत; म्हणोन वर्तमान आहे. इंग्रजाकडीलही पत्रें[4] येणेंविशीं आलीं आहेत म्हणोन येथें दाट आवई आहे. खरें किंवा कसें स्वामीस समजलें असेल. आज्ञा करावी. घाटग्यानीं लखोबादादास कैद

---

१ धोंडोपंत जोशी याणीं. २ गोपाळराव गोविंद यांजकरितां मागें किल्ला देऊं केला होता. ३ बेहड्याचा मसुदा. ४ आपणाकडे येण्याविषयीं रामचंद्रपंत आपास पत्रें.

करावयाची मसलत करून येथील विसर्जन[1] करावें, ( असें योजिलें होतें. ) तिकडे पत्रें रवाना जालीं होतीं. अंबोजी इंगळे व पिरू[2] डबाई यांनीं मसलत करून लखोबास बुडवावें असें पत्रांत लिहिलें होतें. तीं पत्रें अगोदर लखोबासच सांपडलीं. नंतर त्याणीं त्याच थैल्या तिकडे रवाना केल्या. त्याणीं भेटीचा पैगाम केला, ( लखोबानीं ) उत्तम म्हणोन सांगितलें. दोन हजार लोकांनिशीं भेटीस आले. पत्रेंच यांस सांपडलीं होतीं त्याजवरून याणीं आगाऊ बंदोबस्त करून भेटीस बोलाविलें. त्यांचे मतें हुशार नसेल म्हणोन दोन हजार लोकांनिशीं उभयतां भेटीस्तव निघाले. मागाहून पलटणांस तयारी करून येणेस सांगितलें. त्यांची स्वारी येतांच याणीं गोटांत झाडून ताकीद केली होती. हेही तयार जाहले. डेऱ्याजवळ येऊन उतरले. लोक बाहेर राहिले. थोडक्यांनिशीं आंत गेले होते. त्यानीं बेत करून ठेविलाच होता. लागलेच दोघांस धरून ठेविलें. समागमें लोक गेले होते त्यांजवर हल्ला केली. कांहीं लोक कापून काढिले. कांहीं पळाले. डबाईस तोफेचे तोंडीं देत होते. अल्लीबहाद्दर याणीं देऊं नये म्हणोन सांगितलेवरून दोघांस खोडा घालून छकड्यावर ठेविले आहेत.[3] ( कोणा ) रजवाड्यास लखबांनीं लुटला होता त्याचें संधान घेऊन पंचवीस लक्ष रुपये घेतले. त्याची चीजवस्त माघारी देऊन विवेक करून घेतला. दहा हजार फौज त्याची यांचे कुमकेस आली म्हणोन वर्तमान. बाया शिंदे ( व ) होळकर यांजकडे रावसाहेबांचीं पत्रें गेलीं त्याजवरून ते सर्वत्र तिकडे जमून ( बायानीं ) दत्तक घेऊन शल्य करावें अशी मसलत यांची आहे. काय घडतें पहावें. बाजीबा मोदी याचा लेक कैदेंत होता. शिंदे यांची स्वारी त्याचे घरास गेली होती. स्त्रियांचा परामर्ष केला. नंतर आठा दिवशीं त्याचे तीन लक्ष रुपये उचापतीचे बुडवून आणखी पंचवीस हजार रुपये दंड ठरला म्हणोन वर्तमान आहे. यशवंत शिवाजी कैदेंत आहे त्याचीही सुटका एक दोन दिवशीं होणार. बाळोबा पागनिसाकडे त्यांचे लष्करांतील ओळखी जातात येतात. बंदी नाहीं. आपासाहेब यांजकडेही फौज धरावी, देशांत आसपास असावें, असीं पत्रें गेलीं आहेत म्हणोन ऐकिलें. चहूंकडे संधानें करून शिंदा बुडवावा हा डौल आहे. हिंदुस्थानाकडील

---

१ बाळोबाचें विसर्जन. २ डिबाईननें तयार केलेल्या पलटणांवरचा अधिकारी पिरू म्हणून त्याचें हें नांव पिरू डबई ! ३ पिरू व इंगळे यांस लखबादादानीं कैद केल्याचें वर्तमान खोटें.

वर्तमान आल्यापासून शिंद्याचें बोलणें श्रीमंतांशीं "आम्ही देशास जातों. करोड रुपये खर्चास द्यावे." असें पडलें आहे म्हणतात. राजीबिराजी कसा डौल पडतो न कळे. श्रीमंतांचें लक्ष शिंद्यांचे ठाई. घाटग्यानीं कारभार करावा. (असें त्यांच्या मनांत आहे.) काळ्या व चौधरी व बळवंतराव नागनाथ व बाळाजीपंत पटवर्धन व बाळोजी कुंजर व सदाशिव माणकेश्वर इतक्यांवर विश्वास. वरकड रावसाहेब आदिकरून कोणाचा नाहीं. सर्वत्र येथील कारभारी यांपैकीं चक्रदेव यांचे बंधूनीं पृथक् बोलावून (मला) सांगितलें कीं, "कुरुंद-वाडीं दोन पलटणें व शिलेदार व पायदळ वगैरे सरंजाम पोक्त आहे. घरचा एकोपा करून नबाबाकडे व फरासिसांकडे राजकारण करून जमीयतीचा जम पाडून शिंद्याचीं पलटणें बुडवून स्वदेशांत फौजेचें पोट भरून बल पाडलें असतां श्रीमंतांचे नांवचे शिक्के व पत्रही पाठवितों. येथें प्रसंगीं रावसाहेब आहेतच. जम पडला जाहला म्हणजे सूचना करावी. येथेंही जम पाडून शिंदा बुडवावा. श्रीमंत बाजीरावसाहेब यांचें नांवें दौलत चालवावी. त्यांचे पायांशीं अंतर करावयाचें नाहीं. परंतु शिंद्याचे लक्षांत येऊन अव्यवस्थित करून सरकारची नामोशी जाती. सांगितलें असतां विश्वास पटत नाहींतसे होतात." असे कित्येक प्रकारचे सल्ले सांगतात. स्वामींस विनंति लिहून कळवून उत्तर सांगतों म्हणोन बोललों. त्याणीं विश्वासानें सांगितलें. शेवटीं "घरचा विवेक न जाहल्यास आपण मसलत बळावून डौल पाडावा. आपला बंदोबस्त आपले मनोगता-नुरूप करून देवितों. खर्चास स्वराज्य परराज्य. सर्व जमीयतीचे पाठीं! शिंदे कोठपर्यंत पलटणें रवाना करतील? तिकडे (लष्कर) रवाना केलें तर येथें हलकें पडतें. आपण मोडून टाकितों." असें बोलणेंतील भाव आहेत. कार-भारांतील डौलही तसाच दिसतो. सर्व स्वामींस श्रुत व्हावें म्हणोन विनंति लिहिली असे. उत्तर पाठविणें तें बरीक बहुत मार्गानें जपून. आणणारास ताकीद असावी. येथूनही तशीच ताकीद करतों. घाटग्यास शहरांत कार-भारास आणावयाची मर्जी श्रीमंतांची. रावसाहेब[1] रुकार देत नाहींत. दोन वेळ त्याणीं सांगून पाठविलें. याणीं उत्तर दिलें कीं तसें करूं नये. तेव्हां खासदस्तुरची चिठी मुहूर्त पाहून यावें अशी गेली म्हणून ऐकितों. तो कार-भारास आल्यावर रंग कसा पडतो पहावें. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

१ अमृतराव.

शिंद्यांची पलटणें दोन निघोन गेल्याचें सदरीं लिहिलें आहे. त्यानंतर आणखी शोध केला. नेमणूक होऊन प्रत्येक[1] उतरले आहेत. खर्चामुळें चालते जाले नाहींत. करवीरकरांचें बोलणें ठरत नाहीं सबब आणखी मोर्चेबंदी करावी अशी तजवीज होत आहे. पलटणवाल्यांस पत्रें गेलीं व स्वामींस व आपासाहेबांस वगैरे यांस आज्ञापत्रें जाणार असें ऐकिलें. आणखी शोध करितों. पक्कें वर्तमान घेऊन मागाहून लिहितों. शिंद्यांस हिंदुस्थानांतील पायबंद मातब्बर बसला आहे तेणेंकरून बहुत विचारांत पडले आहेत. पिरू डब्राईस लखबानें धरून खोडा घातल्याचें वर्तमान आल्यावरून येथें त्याचा फिरंगी मुसेल आहे तो तिकडे जावयास गडबड करितो. कडव्याच्या गंजी घातल्या आहेत त्या विकणार. बाळोबाचे घरास परवांचे रात्रीस दौलतराव शिंदे एकटयानीं जाऊन पायांवर डोई ठेविली. " तुझें तूं आटोपून घेऊन बंदोबस्त करावा " म्हणोन त्यानीं उत्तर केलें. मला अगत्य नाहीं. माझा वृद्धापकाल जाला. महायात्रेस मार्गस्त करावें किंवा तुम्हांजवळच आहें. अन्न खादलें ते पक्षीं तुमचे पायाजवळ बरें वाईट व्हावें. बहुतच गळीं पडले तेव्हां बोलले कीं ... ... .... असामी आपले हातांत द्यावी. वारंवार भलता कारभार करूं नये. " ही गोष्ट ( शिंद्यांनीं ) कबूल केली व चौकी काल उठली म्हणोन बोलतात. पक्कें वर्तमान समजलें नाहीं. न उठली तरी आठ चार दिवसांत उठेल असें वाटतें. बायानीं दत्तक द्यावयाचा नेम केला आहे असें वर्तमान आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५३३ श्री. (नकल) ( ज्येष्ठ शु० ४–२७ मे. )[2]

पौ॥ छ० २ मोहरम.

विज्ञापना. नवे कारभारी यानीं शहरांत येऊन दंगा करावा असाही बेत केला होता. परंतु रावसाहेब व चक्रदेव एकरूप आहेत याजमुळें काट चालत नाहीं. व उत्तरही[3] जरबेचें होतें. काय घडतें मागाहून लिहितों. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५३४ श्री. ( ज्येष्ठ शु० ४—२७ मे. )

नकल.

पौ॥ छ० २ मोहरम.

---

१ पृथक्. २ पत्रावरील मिति व तारीख पैवस्तीची आहे. पत्र बाळाजीपंत सहस्रबुद्धे यांचें रामचंद्रपंतांस. ३ पेशव्याकडून उत्तर.

विज्ञापना. तेथील मंडळीस झाडून होतचिठ्या गेल्या आहेत म्हणोन ऐकतों. त्यास जितका आपला जमाव असेल तितक्यांत बळकटी असावी. कोणाचा विश्वास धरूं नये. विश्वासही देतील. परंतु त्याजवर जावयाचें नाहीं. सर्वांची परीक्षा थोडक्याच दिवसांत आहे. स्वामीनीं मात्र हुशारीनें दम धरून असावें. इकडून पत्रें मुख्यस्थानचीं अथवा दुसरीकडून बहुमानें करून विश्वासें जातील त्यांजवर जावयाचें नाहीं. अगदीं भुलथाप ! घाडगेशाई जाली. परंतु रंग फार दिवस रहात नाहीं. स्वामीकडील मुलूख झाडून घाडगे यास देणार असें ठरलें आहे. कारभारासही जवळ असावे हेंही चाललें आहे. चक्र( देव )ही सावध आहेत. उभयतां[3] इष्ट सुखरूप घरींच आहेत. अधिक उणें नाहीं. बायांकडे कारकून लौकर जावा. मीही इकडून संधान केलें आहे. भवानीपंतही[4] येतील त्याजवरून सर्व समजेल. सारांश आपण जितके बळकटीनें राहतील तितका गुण लौकर येईल. मागाहून वरचेवर लिहीतच आहें. तिकडून तपशीलवार पत्रें आल्यावांचून कांहींच सुचत नाहीं. यास्तव वरचेवर पत्रें यावीं. हा रंग बहुत दिवस ठरत नाहीं. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५३५ श्री. ( ३० मे )

नकलेची नक्कल.

अपत्यें[5] विष्णूनें कृतानेक शिर सांष्टाग नमस्कार विज्ञापना तागायत ज्येष्ठ शु॥ ७ सप्तमी भृगुवार दोनप्रहरपावेतों सुखरूप असो. विशेष. निरोप घेऊन आलों तो दोन रोज मिरजेंत राहून तासगांवास आलों. काल अस्तमानीं रा॥ बाळोबातात्यांकडून श्री॥ रा॥ आपासाहेब यांजकडे जावयाकरितां कारकून पत्रें घेऊन आला तो येथें वस्तीस राहिला. आज प्रातःकाळीं लष्करास जावयाकरितां निघोन गेला. त्याचे सांगणेंतील मजकूर रा॥ तात्यांचें म्हणणें कीं, बारीपार न जावें. झाडून फौजा एक ठायीं जमा करून रहावें. येथील बंदोबस्त आम्ही लवकरच करून घेतों. खर्चावेंचाचे अडचणीमुळें फोडून बारीपार न जावें. खर्चावेंचाचे सोय करून देतों. कांहीं खर्चाचें रा॥ भवानी खंडेराव याजबरोबर देऊन पुणियाहून कुल्यांस येऊन राहिले

१ बाळाजीपंत सहस्रबुद्धे यांचें रामचंद्रपंत आपास पत्र पुण्याहून. २ सर्व पटवर्धन सरदारांस भेटीस येण्याविषयीं पेशव्यांच्या स्वदस्तूरच्या चिठ्या. ३ बाळोबा व धोंडीबा. ४ हा बाळोबा तात्यांनीं रामचंद्रपंत आपाकडे पाठविलेला कारकून. ५ पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

आहेत. उत्तर आलें म्हणजे भवानराव यजमानांकडे जाणार. नंतर झाडून फौजा घेऊन पंढरपूरचे रोखें यावें असें ठरलें आहे. पलटणांची काळजी न करावी. त्यांचा बंदोबस्त आम्ही करितों. भवानराव येऊन पावतांच कूच करून पंढरपूरचे रोखें यावें असेच पत्रांत भाव आहेत म्हणोन या गृहस्थाचे सांगण्यांत आहे. श्री॥ रा॥ अमृतराव साहेब व चक्रदेव यांचें लक्ष तात्यांकडे आहे. प्रधान अगदीं विदेही जाहले. त्यांस अनुकूल विदुर जाहले. त्यापेक्षां ब्राम्हण्य रहात नाहीं ! बंदोबस्तास त्वरा करावी म्हणोन अमृतराव यांचे निरोप नित्य तात्यांकडे जात आहेत. लखबादादा व होळकर एकत्र होऊन त्यांस जाऊन मिळावयाकरितां बाया दरमजल जात आहेत. त्याही झाडून फौजा गंगेचे रोखें सुमारें दरकूच रवाना जाली. लखबादादा, होळकर बाया मिळोन दहा कोसांचे सुमारे गंगेनजीक येतील. भवानी खंडेराव म्हणजे तात्यांचे दिवाण हल्लीं कुर्ल्यास आहेत. आमचे फडणीस[1] पुणियास जावयाकरितां गेले ते कुर्ल्यास जाऊन त्यांची भेट घेऊन पुढें जाणार. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५३६ श्री. (ज्येष्ठ–जून.)

स्मरणार्थ.[2] गुप्तमार्गाकडून वर्तमान आलें जे, पुण्यग्रामीं शिंदे यांजकडील मराठे सरदार एकदिल होऊन रविवारीं अस्तमानीं घाटगे व खुद्द शिंदे यांस घेऊन चार हजार असामी बसली आहे. घाटगे यास तोफेचे तोंडी द्यावें आणि मुख्यास कैद करूं म्हणतात. शिंदे यांचें म्हणणें घाटगे यास जिवें मात्र मारूं नका. बंध धरून ठेवावा असें जालें आहे. कंपूवालेचा रोख द्वैमांश आहे. राजमंडळचे वकील आकाराम यादव व विश्वासराव घाटगे व बच्याजी बल्लाळ त्रिवर्ग तीन हत्ती पन्नास स्वांरसुद्धां पळून परवां दिवशीं अस्तमानीं एका गांवीं राहून काल करवीरास पावले. जानराव जाधव व भाऊ जोशी मात्र गुप्त पुणेंत आहेत. कसा प्रसंग पडतो तें पाहून मग येणार. चौदा लाख रुपये खंडणी द्यावी असा करार (करवीरकरानीं केला) त्यास श्री॥ राजश्री अमृतराव याणीं सांगितलें जे, पटवर्धन यांजकडे खंडणीचा जाबसाल जाहलेस उत्तम. नाहींपेक्षां ते पुरातन सरदार, दौलतीस अपाय करितील ! मुख्य श्रीमंत (व) शिंदे यांचा लक्ष एक. असा विचार आहे. त्रिस्थळीं[3]

---

१ बाबा काळे. २ या पत्रांतला मजकूर इथून तिथून सर्व गप्पा होत. ३ तासगांव मिरज व कुरुंदवाड या तीन ठिकाणीं जप्ती करण्याकरितां घाटग्याचे कारकून येत होते.

जप्तीस कारकून चारशें पायदळ दोनशें राऊत येत होते. चार कोसांवर हें वर्तमान ऐकोन तेथेंच स्तंभन जालें असें वर्तमान ऐकिलेलें कळावें याकरितां लिहिलें आहे. बहुत करून सत्य होईलसें दिसतें. आपली बातमी आली असलेस कळवावें अगर संध्याकाळ सकाळीं वर्तमान तहकीक येईल. राजमंडळचे वकील ज्या गांवीं राहिले होते त्यांस पाहून आलेले गृहस्थानीं वर्तमान सांगितलें तें आपणास कळावें करितां लिहिलें आहे. खर्ची कागद पाठविला आहे. आपण सोवळेनें असलिया राजश्री नारोपंताकरवीं पत्र वाचून पाहावें. काल आपण लाखोटा पाठविला. याच पत्र श्रवण[1] वचन सत्यासंतु.

नं. ५५३७ श्री. ( जून. )

नक्कल.

विज्ञापना. " फौज ठेवावी म्हणोन लिहितां, त्यास आज्ञा कोणाची, कर्तव्य काय, निर्वाह कोण करील, तें लिहिणें म्हणजे जमा करूं, पैका पाठवावा. लोकांचे प्राण घेऊन ( पैका काढणें ) आमचे हातून घडावयाचें नाहीं. आमचे वडिलांची चाल ऐसी नाहीं; " म्हणोन पत्रीं आज्ञा. ऐसीयास फौज ठेवण्यास आज्ञा[3] या प्रसंगीं होणें हें घडावयाचें नाहीं. कर्तव्य काय, कर्तव्य काय, निर्वाह कोण करील, हें दुसरेस पुसून परिणाम नाहीं. ज्याणीं ओझें घ्यावें त्याणींच परिणाम पहावा. पैका इकडून जावा असें असतें तरी येथें शंभर राऊत स्वांरीबरोबर[4] कां नसते ! दिवसमाहात्म्य तसेंच आहे. इकडील पैक्याची वाट कां पहावी ? वडिलांची चाल म्हणावी तर त्याणीं उत्कृष्टता ती केली. पेशवाईची दिवाणगिरी केली त्यापेक्षां विशेष तें कोणतें ? मांडवगणाहून साताऱ्यास आले तेव्हां फौज ठेवावयाची आज्ञा कोणी केली होती ? सातारा तख्ताची जागा. समय पडला तेव्हां अंदेशांत पडले नाहींत. स्वामिकार्यच केलें. पुढें पंचवीस हजार फौज जमा करून तुंगभद्रेपर्यंत अंमल बसविला. मोठेपणा अंगीं आला हें पाहून सरकारांतून साहेबसुभ्याची शिक्के कट्यार गेली. झाडून इतमाम पाठविला. प्रांताची जप्ती मोकळी जाली. त्यावेळेस निर्वाह कोण करील हें पाहिलें नाहीं. दुसऱ्याचें ओझें आपण घेऊन ३ टक्के(?)

---

१ म्हणजे काय ? श्रवण यापुढें ' जाहलेला ' असा शब्द लिहून खोडलेला आहे. २ पुण्यांत काय घेत चालले आहेत हें ओळखून फौज गोळा करा असें पुण्याहून बाळाजीपंत सहस्रबुद्धे लिहीत असतां रामचंद्रपंत आपानीं मानिलें नाहीं त्या प्रकरणीं हें पत्र सहस्रबुद्धे यांचें. ३ अमृतरावाची आज्ञा. ४ स्वांरी अमृतरावांची.

एकसहां चालविले. दिगंत कीर्ति केली. या प्रसंगीं आपलें ओझें दुसरेकडे जातें. असो. वडील चित्तावर घेत नाहींत इतकीच गोष्ट खरी. वडिलीं चित्तांत आणिलें असतां आज्ञाही विचारणार नाहींत. व कर्तव्य निर्वाह सर्व ध्यानांत आहेत. सर्व सेनासमुद्र मिळाला आहे. यांत वडिलांपरिस मला अधिक कोणी दिसत नाहीं. परंतु कांहीं दिवस राहिले आहेत ते मागें सरल्यानंतर इतक्याही गोष्टीस पुढें वडील अनुसरतील. कै॥ वडिलांचा पुण्यप्रताप तसाच आहे. विदित होय हे विज्ञापना.

५५३८ श्री ( १ जून )

पै॥ छ०९ मोहोरम सन मय्या तैन. ज्येष्ठ शु॥ ११

सेवेशीं विज्ञापना. तागायत ज्येष्ठ शु॥ ९ रविवार प्रातःकाल. सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. रा॥ बाळोबा तात्या व धोंडीबा व तात्याची स्त्री यांस किल्ले नगर येथें रवाना केलें. तेथें पोहोंचोन उत्तर आलें. अलिजाबहादूर यांजकडे कारभारी रा॥ आबा चिटणीस, यादवराव भास्कर, बाणाजी शेट्ये व सखाराम घाटगे, आणखीही दोन चार याप्रमाणें आहेत. फौज पांच हजार गणती जाली. पुण्यांत तीन कंपू मिळोन वीस पलटणें आहेत. अलिजाबहादूर कारभारामध्यें एकंदर मन घालीत नाहीं. सर्जेराव केवळ जिवाळ्याचे. याजखेरीज दुसरा विचार नाहीं. फौजा तिकडे रवाना व्हावयाचा विचार होऊन रा॥ बापू फणसळकर व बाळाजीपंत जांबगांवकर यांस रवाना केलें. बरोबर स्वार पांचशें व एक पलटण तोफा ५ पांच येणेंप्रमाणें आहे. पंढरपूरचें ठाणें घालावें. करकंब, मंगळवेढें येथें ठाणें घालावें. जुगुळास जमाव आहे तो इकडून जातात हे पंढरपूरचे सुमारें गेले म्हणजे तिकडून त्यांणीं यावें, याप्रमाणें विचार येथें अलिजाबहादूर यांजकडे जाला आहे. श्री॥ रा॥ पंतप्रधान यांजकडे दोन चार वेळां "श्री॥ रा॥ रामचंद्रपंत आप्पा यांचा सरंजाम आम्हांकडे द्यावा" म्हणोन घाटग्यानें विनंति केली व आम्हांकडील व श्री॥ रा॥ दादांकडील याप्रमाणें आम्हांस द्यावा म्हणोन विनंति केली. श्रीमंतांनीं आज्ञा साफ केली कीं, सरकारचे दौलतीपासून सरदार पटवर्धन. त्यांच्या सरंजामाची घालमेल करावयाची नाहीं. केली असतां अनर्थास कारण होईल. एक वेळ कै॥ गोपाळराव मोगलाईमध्यें रुसोन गेले त्याणीं मागें काय पराक्रम केले हे तुम्हांस ठाऊक असतील. त्यांचा सरंजाम आमच्यानें देवत नाहीं.

१ मोरो आप्पाजी परांजपे वकील याचें पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र.

साफ सांगितलें. तत्राप घाटगेराव उद्योगास प्रवर्तले आहेत. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६३९ श्री. ( ज्येष्ठ शु० १०–२ जून. )

पै॥ छ० १३ मोहरम जेष्ठ मास. सन इहिदे मय्यातैन व अल्लफ.

सेवेसीं मोरो आपाजी परांजपे दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता। छ० ८ माहे मोहरम इंदुवार प्रातःकाल सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. काल रविवारीं प्रातःकालीं लक्ष्मणदास बैरागी याचे घोड्यावर मोतादद्दार होता त्याजबरोबर पत्र लिहून सेवेसीं रवाना केलें आहे. त्या पत्रावरून श्रुत होईल. रा॥ नारोपंत चक्रदेव यांची भेट काल प्रातःकालीं घेतली. पत्र स्वामींचें प्रविष्ट केलें. एकांतीं बोलणें जाहलें. सारांश "करवीरवासी महाराज प्रबळ जाले. सरकारची मसलत बिघडली हें चांगलें जाहलें नाहीं, होणार चुकत नाहीं. असो. पुढें विचार तुम्हांकडील काय आहे? जमेत आहे किंवा दूर केली?" त्यावरून बोलिलों कीं, जमेत दूर करावयाचा समय नाहीं. झाडून फौजा तयार आहेत. श्रीमंत रा॥ रामचंद्रपंत आपा बारी नजीक आहेत. धोंडोपंत गोखले पाच्छापूरनजीक आहेत. श्रीमंत रा॥ दादांकडील फौज दोन हजार व पलटणें कुरुंदवाडास आहेत. आम्हांकडील फौज दोन हजार व श्रीमंत रा॥ चिंतामणराव आपा यांजकडील फौज दोन हजार याप्रमाणें आहे. आमची फौज मिरजेनजीक आहे. तेरदळ परगण्यांत आपासाहेब यांची फौज आहे. जमेत आहे. करवीरची मसलत बिघडली. नक्ष सरकारचा. आम्ही सेवक सरकार आज्ञेप्रमाणें सेवाचाकरी करावी. त्यांत कमती व्हावयाची नाहीं. याउपर सरकारची मर्जी. सरकारचीं पथकें विंचूरकर व नानांकडील व पानशे सर्वत्र तिकडून निघोन आले. सरकारआज्ञेवरून आले असतील. त्यावरून त्यांणीं उत्तर केलें कीं, त्यांस आज्ञा करून पुन्हा त्याणीं तिकडे जावें म्हणोन पत्रें गेलीं आहेत. तूर्त पानशे यांजपाशीं जाऊन मिळावें. नंतर वाघाची मसलत आहे. आणखी कांहीं काम उभें राहिल्यास झालेंच पाहिजे. याप्रमाणें उत्तर जालें. "श्रीमंतांस विनंती करितों. तुम्ही आल्याचा मजकूर सविस्तर बोलोन तुम्हांस कळवितों. त्याप्रमाणें मिरजेस लेहून पाठविणें." म्हणोन सांगितलें आहे. श्रीमंतांची भेट जालीयाबर सेवेसीं सविस्तर विनंती लिहितों. बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ हें व पुढचीं दोन पत्रें लेखकानें मिरजेस बाळासाहेबांस लिहिलीं.

नं. ५५४० श्री. ( ज्येष्ठ शु० १०—२ जून. )

पै॥ छ० १३ मोहरम. सन. इहिदे मय्यातैन व अलफ.

विज्ञापना. अलिजा बहादर याणीं अष्टमी मंदवारीं तुळजाजी शिंदे, मानाजी वांबळे व सुभानजी मोरे याचा लेक येकूण तीन असामींस अस्तमान जाहल्यानंतर डेऱ्यास बोलावून आणून कैद करून तसेच तोफेचे तोंडीं दिले. प्रातःकाळीं प्रेतें घासीराम याचे बागेनजीक मार्गावर खाटेवर घालून आणून टाकिलीं आहेत. त्यांजकडे बायांकडील फितूर हा आरोप होता. आणखी राजश्री नारायणराव बक्षी, देवज गवळी, बाळापा आपा या त्रिवर्गांस बसविलें आहे म्हणोन बातमी लष्करची आली आहे. मागाहून तहकीक लिहून श्रुत करितों. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५४१ श्री. ( ज्येष्ठ शु॥ ११—३ जून. )

सेवेशीं बालकृष्ण लक्ष्मण कृतानेक सा॥ नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० ९ माहे मोहोरम मंगळवार प्रातःकाळपर्यंत मु॥ हावनूर वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींकडून आज्ञापत्रें येऊन वर्तमान कळत नाहीं. तर सदैव पत्र लिहिणेस आज्ञा जाली पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तर डंबळचें ठाणें धोंडजी वाघ याचें पडून चार दिवस जाले. आंतील लोकांस कौल देऊन उतरोन कैद करून ठेविले आहेत. तेथून बल्लारीकडे मोगलांचे तालुक्यांत जावयाची आवई घालोन तिकडील रोखें कूच करून अकस्मात् स्वारी फिरोन छ० ७ मोहरम रविवारीं दोन प्रहर दिवसास शिरटीच्या ओढ्यास मुक्काम करून बुणगें वगैरे तोफांच्या मारा चुकाऊन अर्धकोशपर्यंत मुक्काम केला आहे. तेव्हांच सडी स्वारी दोन तीन हजार फौजेनिशीं जाऊन लक्ष्मेश्वरची पेठ लुटली. ठाण्याभोंवतें चार घटका उभे राहून मागती मुक्कामास शिरटीस आले. लक्ष्मेश्वरच्या लोकांची यांची गोळागोळी जाली. आंतील दहा पांच माणूस पडलें. दम धरून गोळी वाजविली. पुढें ईश्वरसत्तेकडून काय घडतें पहावें. त्याचे लष्करांत आवई पाहतां शिरटीजवळ मुक्काम केलाच आहे. तेथें शह देऊन लक्ष्मेश्वर सहजांत घ्यावें असें आहे. होईल तें वर्तमान वरचेवर लिहून कळवितों. आपले लष्करचें वर्तमान तर राजश्री धोंडोपंत गोखले व श्री॥ राजश्री चिंतामणराव आपा व बाबासाहेब त्रिवर्ग बारीपार होऊन मुरगोडचे अलीकडे दोन कोस होसूरच्या ओढ्यावर

---

१ लागू. मामलेदार. पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

मुक्काम आहे. इकडे लौकरच येणार. आवई आहे आणि पत्रेंही लिहितात. परंतु तूर्त यावयाचा सुमार दिसत नाहीं. पंधरा वीस रोज सहजांत लागतील. श्री॥ राजश्री आपासाहेब बारीपैलीकडूनच माघारे मिरजेस गेले असें वर्तमान आहे. वाघ यांजकडे बोलावयासीं कारकून पाठविले होते. इतकियांत फौजा येतात हें ऐकून बोलणें बोलेनासा जाला. कारकून लष्कराबरोबर आहेत. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५४२ श्री. ( ज्येष्ठ शु० १२–४ जून. )

पै॥ छ० ९ मोहरम. मय्या तैन. ज्येष्ठ. भौमवार.

विज्ञापना. रा॥ नारोपंत चक्रदेव यांस आज सहा सात दिवस शरीरीं सावकाश नाहीं यास्तव सरकारवाड्यांत जात नाहीं. घरींच आहेत. घरीं जमेतही आहे. प्रकृत बरीच आहे. विकृत तो नाहीं. परंतु पोट दुखतें म्हणतात. मस्तकासही भार येतो. याप्रमाणें लौकिकांत आहे. रा॥ चिमणाजी खंडेराव, जाधव याजकडील, चक्रदेव यांचे हाताखालीं काम काजास होते तें आज आठ दिवस चंपत जाले. कोठें आहेत न कळे. शिंदे यांजकडील शहरांत कोणा एकास आज पावेतों उपद्रव लागला नाहीं. शिंदे यांचे सैन्यांत खर्चीविशीं मोठा गळाठा जाला आहे. पेशजी चिरंजीव रा॥ धोंडोपंत यांणीं पत्र लिहिलें होतें तेव्हां शहरांत बातमी आली होती कीं, "लखबा लाड व जैपूरवाले व अल्लीबदाद्दर एकत्र जाले. पीरू साहेब यास प्रतिबंध केला. यशवंतराव होळकर व सर्वत्र एकत्र होणार. बाया शिंदे बराणपुरचे सुमारें गेल्या." या प्रमाणें लिहिलें होतें. परंतु तो प्रकार कांहीं एक नाहीं. बाया शिंदे बराणपुरा अलीकडे सोळा कोसांवर आहेत. लखबा याजपाशीं जैपूरवाले किंवा अल्लीबहाद्दर मिळाले नाहीं. लखबाजवळ जमेत दहा हजारांचे आंत आहे. अंबोजी इंगळे व पीरू साहेब मिळोन लखबास दगा करावा ऐसें होतें. परंतु सावध होऊन मात्र निघोन गेले. अंतर्यानें आहेत. तूर्त प्रसंगीं होळकर मात्र जमेतं सुद्धां हुशार आहेत. वरकड मजकूर पेशजी लिहिला होता; परंतु तो कांहीं एक नाहीं. या उपर श्रीइच्छा ! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५४३ श्री. ( ४ जून )

छ० ९ मोहरम. सन मय्यातैन. ज्येष्ठ शु॥ ११ मंगळवार.

विज्ञापना. नारोपंत चक्रदेव घरीं आठ दिवस शरीरीं सावकाश नाहीं म्हणोन होते. त्यास श्रीमंत राजश्री पंत प्रधान यांणीं बाळोजी कुंजर यांस खातरजमेविशीं पाठविलें होतें. परंतु ( चक्रदेव )

वाड्यांत गेले नवते. काल राजश्री बाळाजीपंत पटवर्धन, चक्रदेव यांजकडे श्रीमंतांनीं पाठवून चक्रदेव यांचीं हरएकविशीं खातरजमा केली. काल तृतीय प्रहरीं श्रीमंतांचे वाड्यांत गेले. दर्शन घेतलें. श्रुत होय हे विज्ञापना.

येतांना तासगांवाकडून आलों. राजश्री बाबा काळे यांची भेट जाली. पुण्यांस यावयाचा निश्चय बोलण्यांत आला. एकदोन दिवशीं निघोन येतों म्हणोन बोलिले. आज तागायत आलेच असतील. हे विज्ञापना.

नं. ५५४४ श्रीगणराज. ( ज्येष्ठ शु० १२–४ जून. )

पैा छ० १० मोहरम. अखेर साल. सन मय्या तैन व अल्फ.

विज्ञापना[1]. पुण्याचीं पत्रें आलेलीं पहात्रयास पाठविलीं तीं पाहोन माघारीं पाठविलीं आहेत. आजपावेतों केला विचार त्याचा परिणाम या थरास आला! मला येणेंची आज्ञा, त्यास येण्यास उजूर नाहीं. परंतु येथें पलट-णवाले आहेत हे तूर्तच कलहास प्रवृत्त होतात कीं काय किंवा पुण्याचे येणार जाणाऱ्यांचा मार्ग पाहतात? त्यास मी येथून आलों असतां याच स्थळास अपाय भासतो. चिरंजीव राजश्री रामचंद्रपंत आपाकडेही वर्तमान लिहावें. ते व राजश्री गणपतराव पानसे यांनीं सडे येऊन आपणास भेटून पुढील कर्तव्यतेची एकवाक्यता जाली असतां चांगलें. मी आपणास भेटलों, आपण मला भेटून फल काय? श्रीमंतांची भेट होऊन राजश्री मोरोपंतांचीं[2] पत्रें काय येतात? आपण ही पत्रें राजश्री मोरोपंतास लिहावीं जे, या गोष्टी सरकारां-तून घडू नयेत. मागें वडिलांस आश्रय श्रीमंत कैलासवासी माधवराव साहेबांचा होता सबब त्या गोष्टी जाल्या. हल्लीं श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांचा काय आशय? श्रीमंत राजश्री अमृतराव यांचा काय आशय आहे? मुख्य आशय समजोन गोष्टी जाल्या पाहिजेत. इतकेही विचार राजश्रींस लिहावे. मग जें करणें तें करावें. शहरांत आपले कृपेकडून जन सुखी होता. आतां पेठेस निरोप द्यावा. झाडून गृहस्थ मंडळी कुटुंबें आदिकरून निरोप द्यावा. हीं[3] गोष्ट जाल्यास अथणी वगैरे रास्त्यांचे तालुके राहातात असें तरी प्रमाण कशा-वरून? मुख्यत्वे पुण्यास लिहावें. राजश्री मोरोपंताचें काय लिहिलें येतें त्याप्रमाणें पुढील कर्तव्य. तोंपावेतों या पलटणवाल्यांचें कूच मुक्काम

---

१ कुरुंदवाडकर रघुनाथराव नीलकंठ याचें कुरुंदवाडाहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र. २ वकील पुण्याचा याचा. ३ शिंद्याच्या पलटणांनीं मिरजेस वेढा घातल्यास.

पौर्णिमेच्या आंत बाहेर समजतें त्याप्रमाणें येतों. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५४५ श्री. ( ५ जून )

सेवेशी बाळकृष्ण लक्ष्मण. कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत ज्येष्ठ शु॥ १३ मु॥ हावनूर वर्तमान यथास्थित असे. विशेष. वाघ याचें कूच डंबळाहून होऊन लक्ष्मेश्वरास आल्याचें परवां विनंतीपत्र लिहिलें आहे. त्यानंतर लक्ष्मेश्वरास मुक्काम करून देसाई व त्याचे दिवाण राजश्री तिमाप्पा व आणखी गांवांतील चार प्रमुख वाघ याणें हाताखालीं घेऊन एक रात्र खासा फौज तोफा वगैरे सरंजामसुद्धां गांवांत येऊन किल्ल्याजवळ उभे राहून जेथें जेथें लाग होते तेथें तोफा आणून जेर केलें. ठाणें जुनें, शत्रूस सामील गांवकरी, त्यांत एक दिवस दम धरून गोळागोळी होऊन ठाण्यांतील दहा पांच जायां जखमी जाले व ठार जाले. व एक कारकुनास तरवारेची जखम लागली व त्याजकडील दहावीस माणूस ठार व जायां जखमी व दोन चार घोडीं पडलीं. तेव्हां वाघ इरेस पडून हल्ल्याचा उपद्व्याप केला. तेव्हां नवे लोक होते ते गांवकरांसीं मिळाले. तेव्हां जुने माणूस शेंदीडशेंपर्यंत होते त्याणीं सुमार पाहून कौल घेऊन शिरटीस गेले. लक्ष्मेश्वरप्रांतांत अंमल देसाई याचा जाला आहे. शिरटीसही दोन चार रोजानीं चौकी घ्यावी याकरितां डंबळकर देसाई याचे लोक कुमकेस येणार व तिमाप्पाही लोक जमा करीत आहेत. शिरटीचे ठाण्यांत आठशेंपर्यंत जमाव आहे. माणूस विश्वासू आहे. जकीरा वगैरे सामान आहे. जमीनदारानीं लबाडी केली. वाघाचाही जमाव भारी आहे. लक्ष्मेश्वरास ठाणें पडतांच नीट सारी फौजसुद्धां सावनुरास गेला. बाहेर मुक्काम करून–राजश्री वासुदेवपंत काका यांचे स्नेह बहुत. अलीकडे बोलणें व कागदपत्र इकडील तालुक्यास हरएकाविशीं उपद्रव होऊं नये म्हणोन एकमेकांची पत्रें स्नेहभावाचीं येत होतीं. काका यास विश्वास चांगलाच दाखविला. त्या स्नेहेंकरून काकांस सांगोन पाठविलें कीं, आम्हांस कंदोरी करावयाची आहे. चार पांचशें माणसांनिशीं येतों. परवानगी घ्यावी. त्यावरून काकानीं आंत घेतले. लागलाच बाहेर गेला. काकाची भेटी जाली नाहीं म्हणोन

---

१ पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

मागती माघारे जाऊन भेट घेतली. दरवाज्यांतून आपले लोक घातले. काकास सांगितलें कीं, तुमचे लोक काय आहेत ते एक दरवाज्यास जमा करून ठेवणें. आमचा व श्री॥ राजश्री रामचंद्रपंत आपा यांचा दुसरा विचार नाहीं. धोंडोपंत गोखले येथें येणार याकरितां बंदोबस्तास आलों. दुसरे दिवशीं काकास कैद करून ठेविले आहेत. 'मासूर ठाणें देणें. तुम्हास सोडून देतों.' असें म्हणणें पडलें आहे. जाहलें वर्तमान लिहिलें आहे. पुढें काय होतें पहावें. ईश्वरें मोठें संकट आणिलें आहे. पार होईल तो सुदिवस. फौजा मलप्रहरे-वर आल्या आहेत. पुढें कधीं येतात कळेना. वाघ याणें सारे पाळे-गार जमा करून त्यांचीं संस्थानें त्यांचे हवालीं करीत आहे. इंग्रज यांचे प्रांतांतीलही कांहीं पाळेगार येऊन सामील जाले आहेत. एक दोन ठाणीं काट-काई करून सोंदे प्रांतांत वाघाचीं म्हणवितात. इंग्रजांचाही सरंजाम हरिहर वगैरे ठाण्यानीं जमा होत आहे. दोडवडास लोक पाठवावे तरी हें प्राप्त जाहलें. ठाणियाची जागा मात्र राहील. वरकड कोणतीं स्थलें रहात नाहींत. प्रसंग कठिण आला आहे. स्वामींचे पुण्यप्रतापें पार पडेल. वरचेवर विनंती लिहितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४५४६ श्रीपांडुरंग. (५ जून)

श्री॥ राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं. विनंती सेवेशीं बापूजी बल्लाळ वझे. सा॥ नमस्कार विनंती विज्ञापना. तागायत ज्येष्ठ शु॥ त्रयोदशीपावेतों साहेबांचे कृपेकरून मु॥ श्रीक्षेत्र पंढरी येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. सालगुदस्तां पंढरीचे रखवालीस नबाब निजाम नवाजजंगबहादुर होते ते समयीं त्यांस युद्धविषयीं सरंजाम महाल मुलूक (जहागीर) होण्याचा दिन मोताद व राजकीय विचार वगैरे कलमबंदीवार लिहून दिल्हें होतें. त्या दिनमोतादीस सर्व त्यांस परंडा नळदुर्ग वगैरे पांच सहा लक्षांचा सरंजाम जाला. आणिक विचार त्यांचे अनुभवास आले. त्यांत नबाबही बहुत चतुर. यवनज्योतिषांत गम्यही त्यांस आहे. तेणेंकडून त्यांचा आमचा दोस्तीचा प्रकार घडला. सालमजकुरीं चैत्रमासीं मला जासुद पाठवून बोला-वून नेलें. परंडा येथें महिनाभर होतों. येतेसमयीं परगणे मोहोळ येथें तीन गांवांत चावरभर जमीन इनाम करून दिली. पारशी सनदा करून दिल्या व जमीदार यांचीं पत्रें करून देविलीं. परांड्याहून येऊन पंधरा दिवस जाले. स्वामींस वर्तमान कळावें याजकरितां लिहिलें आहे. स्वामींचा निरोप घेऊन मिरजे-हून येऊन दीडवर्ष होत आलें. सालगुदस्तां बहुत पेंच पडले. मनुष्यांत स्थिति

राहिली नाहीं. घरींच आजपर्यंत आहें. परांड्यास मात्र मासभर होतों. यांतील सर्व विचार समक्ष निवेदन करीन. स्वामीविशींचा ज्योतिःशास्त्ररीत्या मासफल वगैरे विचार करून यथामति ठेविला आहे. स्वामीचरणापर्यंत येणें जरूर आहे. येऊन सर्व समजावून देईन. आषाढीचे आंतच मिरजेस येतों. पेशजी एक दोन वेळां पत्रें लिहिलीं होतीं परंतु साहेबांस पोहोंचलीं नाहींत. बाळकृष्ण शागीर्द हिपरगीकरांचे लग्नाबरोबर आला होता ते समयीं विचारपूर्वक पत्र लिहिलें होतें. घेऊन जा म्हणोन सांगितलें असतां गडबडीनें गेला. तसेंच पत्र आम्हापाशीं राहिलें. स्वामींस पोहचलें नाहीं. आतां मीच लौकर येतों. समक्ष विचार सांगणें मला जरूर आहे यास्तव कागदीं लिहिला नाहीं. कांहीं भविष्यविचार सांगणें आहे. ध्यानांत आला आहे. येऊन निवेदन करीन. समीपच स्वामीविशींचे शुभग्रहदशायोग आहेत. अकस्मात् योग घडोन अत्युच्चता आहे. यांतील विस्तार समक्षच सांगेन. आमचा शरीरपिंड स्वामींच्या अन्नाचा. यथामति समजेल तें निवेदन करीन. कर्ता श्रीहरि समर्थ आहे. स्वामीही कृपा मजवर बालकाप्रमाणें करितात. असें असतां अलीकडे कृपासूचक पत्र येऊन सांभाळ होत नाहीं तेणेंकरून चित्तास उदासीनता. सर्व लक्ष, प्रेमा, साहेबांचे चरणीं आहे याची दखलगिरी श्रीहरीस असेल. स्वामींच्या चरणाची इच्छा. यावेगळें दुसरी कांहीं परवा बाळगीत नाहीं. हरघडी पत्रद्वारा बालकाचा समाचार घेत असला पाहिजे. वरकड राजश्री सुंदरपंत सांगतां कळेल. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असों दीजे हे विज्ञापना.

नं. ५५४७ श्री. ( ज्येष्ठ शु० १३—५ जून. )

पै॥ छ० १४ मोहरम, सन इहिदें मय्यातैन. ज्येष्ठ व॥ १

विज्ञापना. रा॥ नारोपंत चक्रदेव यांचें वारंवार सांगणें कीं, "मिरजेचे किल्याची बदोबस्ती आधीं चांगली असावी. लढवाई सामान पोक्त राखावें. सावधता असावी. याप्रमाणें पत्रें लेहून लौकर रवाना करणें" म्हणोन सांगितलें. श्रीमंत रा॥ पंतप्रधान व रावसाहब यांचाही मानस असाच आहे. लौकर ल्याहावें. त्यास पत्र प्रविष्ट होतांच किल्यांत दाणावैरण वगैरे सरंजाम मजबुती होऊन सरकारांत विनंतीपत्रें आलीं पाहिजेत. सर्व मुत्सदी उभयतां श्रीमंतांचे मंडळांतील यांचेंही म्हणणें सर्वांच्याप्रमाणेंच आहे. सारांश ( घाट-

[1] वकील मोरोपंत परांजपे याचें पुण्याहून मिरजेस बाळासाहेबास पत्र.

ग्याचा ) अविचारी विचार, भलतीच बुद्धि होईल, याजकरितां सावधता असावी. सर्व दौलत मिरज किल्ला आहे. स्वामींजवळ सर्वांचीं कुटुंबें आहेत. यांचा संभाळ जाला पाहिजे. समय येक रीतीचा आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५४८ श्री. ( ज्येष्ठ शु० १३–५ जून )

पै॥ छ० १४ मोहरम. सन इहिदे मय्यातैन व अलुफ.

विज्ञापना[1]. राजश्री सखाराम घाटगे सर्जेराव यांस पत्र स्वामींनीं दिल्हें तें पत्र राजश्री वासुदेव नारायण यांजपांसीं दिल्हें. त्यांनीं पत्र प्रविष्ट केलें. पत्र वाचून बहुत संतोष जाहला. 'आमचा रावजींचा स्नेह फार. त्यांनीं पत्र पाठविलें. उत्तम आहे'. म्हणोन तेंच पत्र राजश्री अलिजाबहादर यांजकडे घेऊन गेले. पत्र वाचून दाखविलें. नंतर सर्जेराव बोलले कीं, त्यांचे प्रांताचा बचाव जाहला पाहिजे. त्यावरून उत्तर जालें कीं, सरकारचीं व कंपूकडील पत्रें व हरकारा नेमून देऊन पत्रें रवाना करणें. याप्रमाणें सर्जेराव यांनीं परवानगी घेतली म्हणोन वासुदेव नारायण यांनीं सांगितलें. मुख्य पत्रीं दीड हजार रुपये दरबार खर्चास लागतील म्हणोन त्यांचे बोलण्यावरून लिहिलें होतें. परंतु हल्लीं हजार रुपये वासुदेव नारायण यांनीं ठराव चिटणीस कंपूवाले वगैरे मिळोन करार केले आहेत म्हणून सांगितलें. कंपूंतील हरकारा देतात, सरकारच्या हुजऱ्या पाहिजे असल्यास देतात, याप्रमाणें ठरलें. त्यास आम्हीं वासुदेव नारायण यांस सांगितलें कीं आमचा कारकून कंपूचे फलट-णांमध्यें नेहमीं जाऊन राहील आणि आम्हांकडील सरंजामाचे महालांतील गांव समजावील त्यांस उपसर्ग लागों नये. पत्रें दाखल होतांच आमचे महालांतून उठून दुसरेकडे जावे. अगोदर रोखेपत्र केलें असल्यास मना व्हावें. बशर्त काम जाहल्यास हजार रूपये देऊं म्हणोन करार केला. आज उद्यां सत्य मिथ्या मशारनिल्हे बोलिले तें कळेल. खरेंच असल्यास हजार रुपयेपावेतों जाहल्यास बंदोबस्त करून घेणें म्हणून स्वामींची आज्ञाच होती. त्यावरून कबूल केलें असे. घाटगे यांचे भेटीस येणें म्हणोन मशारनिल्हे (मला) ह्मण-तात. सुमार पाहोन जातों. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५४९ श्री. ( ज्येष्ठ शु० १३—५ जून. )

पै॥ छ० १४ मोहरम. सन इहिदे मय्यातैन व अलुफ.

सेवेशीं विज्ञापना ऐसीजे. अलिजाबहाद्दर यांजकडील कुल येखत्यारीचे

---

१ वकील मोरोपंत परांजपे याचें पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र.

कारभारी राजश्री सखाराम घाटगे व यादवराव भास्कर व आबा चिटणीस व आणखी येकदोन आहेत. त्यांत प्रमुख सर्जेराव. त्याणीं सरकारांत येक-दोन वेळां सक्त रद्बदली केली कीं, श्रीमंत रामचंद्रपंत आपा यांचा सरंजाम आम्हांस द्यावा व मिरजेचाही किल्ला द्यावा. त्यावरून सरकारांतून श्रीमंत राजश्री रावसाहेब याणीं साफ सांगितलें कीं, कोणाचा सरंजाम काढून कोणास द्यावयाचा नाहीं. हे गोष्ट तुम्ही बोलूं नये. याप्रमाणें सांगि-तलें. परंतु ते उगेच रहात नाहीं. अलिजाबहाद्दर यांच्या सनदा[1] घेतल्या आहेत म्हणोन ऐकींव वर्तमान आहे. पांचशें स्वार व पांचशें कंपूकडील लोक देऊन राजश्री बापूजीपंत फणसळकर यांस रवाना केलें आहे. त्याणीं पंढर-पुरास जावें, तेथें ठाणें घालून परगणे करकंब मंगळवेढें याही ठाण्यास उपद्रव करावा, ऐसा मनसबा त्यांचा आहे. त्यास ठाण्याची सावधता असावी. कोणते समयीं त्यांस कशी बुध्य उत्पन्न होईल कळत नाहीं. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५५० श्री. ( ज्येष्ठ शु० १३–५ जून. )

पै॥ छ० १४ मोहरम. इहिद्दे मध्यातैन ज्येष्ठ व॥ १

सेवेसी विज्ञापना ऐसीजे. रा॥ नारोपंत चक्रदेव यांची भेट मात्र जाहली, किंचित बोलणें जाहलें, म्हणोन पेशजीचे पत्रीं विनंती लिहिली आहे. त्यास पुन्हा मशारनिल्हेची गांठ घालून बोलणें केलें त्यांतील भाव जे, " तुम्ही सर्वांनीं हुशारीनें रहावें. किल्ल्याची खबरदारी चांगली राखावी. (किल्ल्यांत) पाण्याची कमती आहे म्हणोन ऐकतों. " त्यास पाणी किल्ल्यांत आहे, पेठेंतही पाणी विपुल आहे, म्हणोन सांगितलें. " उत्तम आहे. सरंजाम किल्ल्यांत दाणा, वैरण वगैरे जकीरा पोक्त असावा. जैलचर[3] सन्निध आहेत. कोणे समयीं त्यांस कशी बुद्ध होईल कळत नाहीं. याजकारितां फार खबर-दारीनें असावें. येथील प्रकार सर्व तुम्ही पाहिलाच आहे. कोणे समयीं कशी बुद्ध त्यांस होईल कळत नाहीं. सावनूर तालुकेयांत वाघ जमेत करून ठाणीं घालितो. खंडण्या घेतो. त्याचे पारिपत्याविशीं सरकारचीं पत्रें रा॥ रामचंद्र-पंत आपा यांस पाठवावयाची परवानगी श्रीमंतांची जाली आहे. पत्रेंही ल्याहावयास सांगितलीं आहेत. येक दोन दिवसांत रवाना होतील म्हणोन

---

१ पटवर्धनांचा सरंजाम जप्त करण्याबद्दल सनदा। २ वकील परांजपे याचें पत्र पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस. ३ शिंद्याच्या पलटणांवरचे इंग्रज सरदार.

ल्याहावें. " याप्रमाणें सांगितलें आहे. शिंदे याणीं तीन असामींस तोफेचे तोंडीं दिलें त्याजवर आणखी कोणाचा नाश केला नाहीं. दुसरे चार असामींस कैद केलें आहे म्हणोन विनंती लिहिली होती, परंतु ते गोष्ट नाहीं. जाला कारभार तितकाच जाला. याउपर श्रीइच्छा ! त्यांचे सैन्यांत मोठा दाब पडला आहे. तसाच इकडे. असो. मागाहून विनंती लिहितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५५१ श्री. ( ज्येष्ठ शु० १३—५जून. )

पै॥ छ० १४ मोहरम. सन इहिदे मय्यातैन ज्येष्ठ. वद्य १

सेवेसीं बाळकृष्ण महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १२ मोहरम पावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं रा॥ मोरोपंतांची रवानगी पुण्यास केली ते येऊन पावले. आलिजाबहादूर याणीं आपले लष्करांतील तीन सरदार मानाजी वांबळे व तुळसाजी शिंदे व मानाजी मोरे यांचे चिरंजीव धुळोजी मोरे या तिघांस तोफेचे तोंडीं देऊन उडविलें. रा॥ बाळोबा पागनीस व धोंडीबास नगरास पाठविलें. सांप्रत कारभारी रा॥ आबा चिटणीस व सखाराम घाटगे व यादो भास्कर व बाणाजी शेटे आहेत. श्रीमंत रा॥ बाबासाहेबांचे[1] व रावसाहेबांचे[2] चित्तापासून निखालसता नाहीं. बायाशिंदे वरणगाव पाचोऱ्यावर आहेत. हिंदुस्तानांतील सरदार आपले जागां सावध आहेत. नारायणराव बक्षी व देवजी गवळी येथेंच आहेत. त्यांजवर ( शिंद्यांचा ) रोष आहे. परंतु अद्याप ( मोकळे ) आहेत. पुढें काय होईल तें न कळे. श्रीमंत नानांचे येथें पुत्रांचें[3] अद्याप ठरावांत आलें नाहीं मिरजेचे किल्याचा बंदोबस्त बहुत सावधपणें सर्व सरंजामानिशीं पोक्त असावा. कोणते समयीं कसा प्रसंग घडेल हें कळत नाहीं. रात्र दिवस बहुत हुशारी असावी. श्रीमंत रा॥ मोरोबा दादा जुन्नरास आहेत. विशेष नाहीं. आतां तरी सर्वांनीं एकरूप असावें. श्रीमंत रा॥ दादासाहेबांस माझे साष्टांग नमस्कार प्रविष्ट जाहले पाहिजेत. वरकड सविस्तर रा॥ मोरोपंतानीं सेवेसीं विनंती लिहिली आहे त्यावरून विदित होईल. बातमी श्रीमंतांस वरचेवर लिहून येत असावी. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५५२ श्रीगणपति. ( ज्येष्ठ शु० १४—६जून. )

पै॥ छ० १५ मोहरम इहिदे मय्यातैन व अलफ.

---

१ पत्र बाळासाहेबांस मिरजेस. २ पेशवे व अमृतराव. ३ नानांच्या स्त्रीस दत्तक देण्याचें.

अपत्यें रामचंद्रानें शिरसा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० १२ मोहरमपर्यंत यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. पलटणांचा मुक्काम जुगळासच आहे. तेथून मिरज प्रांतांत रोखे पत्र होऊन व कहीक-बाडाचा उपद्रव लागल्याचें व करवीरकरांकडील कारकून त्यांजकडे आल्याचे वर्तमानाचें व इचलकरंजीकरांकडे पुण्याचें लिहिलें आल्याचें लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐशीयास लाइलाज गोष्टीस उपाय काय ? ईश्वर ईच्छेनें जें घडेल तें प्रमाण ! रहिमतपुराहून पत्र आलेलें पहावयास पाठविलें तें पाहून माघारा पाठविलें आहे. त्यांतील मजकुराची वार्ता इकडेही आहे. इकडील वर्तमान तरी येंडीगिरें व अनवाल हीं ठाणीं देसकानीं काटकाई करून घेतलीं होतीं यास्तव इकडे येऊन ठाणीं बसविलीं. याउपरी गलगल्याचे रोखें जातों. तिकडे पानशेही तोफखान्यासुद्धां आले आहेत. गलगल्यास ठाणें घालावें हा त्यांचा बेत. सरकारच्या सनादाहि त्यांजवळ आहेत ऐसेंही ऐकण्यांत. काय घडतें पहावें. नदीचा उतार मोडल्यामुळें पैलतीरीं आहेत. करवीरकरांनीं पन्नास हजार रुपये देऊं करून पुन्हां ठाणीं घालावयास ऐलतीरीं पलटणें येणें हा मजकूर समजलाच आहे ! तूर्त इकडे येत नाहीं. तेथेंच राहून उपद्रव करीत आहेत. विदित होय हे विज्ञापना.

५५५३ श्रीगणपति. ( ७ जून. )

पै॥ छ० १५ मोहरम इंदुवासर. इहिदे मय्यातैन व अलफ.

अपत्यें रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमा पावेतों मुक्काम शिलीकिरें नजीक येंडिगिरें येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असे. विशेष. छ० ८ मोहरमचें वडिलीं पत्र पाठविलें तें छ० १२ मिनहूस पावलें. पुण्याकडील व रहिमतपुराहून पत्रें आलेलीं पाहिलीं. रा॥ बाळोबा तात्या व धोंडीबा व सौ॥ स्त्री अशीं नगरास गेलीं. रा॥ बाळाजी विष्णूकडील पत्रें आलेलीं पहावयास पाठविलीं आहेत. मागें पत्रें आलीं त्यांतील भाव व हल्लीं आलें यास त्यास संगत अगदीं नाहीं. ईश्वरइच्छेपुढें कांहींच चालत नाहीं. होणारानुरूप होतें. चिरंजीव रा॥ बाबा व चिंतामण-राव आपा व गोखले बारीपलीकडे आहेत. गोखले यांचा धाघावर जाण्याचा अनमान आहे. तलूर म्हणोन मनोळीजवळ ( ठाणें ) आहे त्याचे पारिपत्यास येणार आहेत. मिरजेकडे पलटणवाल्यांचा शिलाशिला याजमुळें दूर जाऊं नये म्हणोन मशारनिल्हेस लिहिलें होतें त्याचें उत्तर आलें जे, आपण तलु-

रास यावें. विचार करून मग ठराऊं. त्यांतील आशय चिरंजीवानीं लिहिला आहे. " फौजेस दीड लक्ष रुपये दरमहा पाहिजे हा कोण देतो ? ती॥ रा॥ बाळासाहेब व दादा देतात कीं काय ? " असें ( गोखले यांचें ) म्हणणें आहे. आम्ही चिरंजीवास लिहिलें आहे; " त्याची संगत करूं नये. आम्हांसही पोटास पाहिजे, म्हणोन किचूर, धारवाड इतक्यांत असावें. " गोखले व आपा तलुरास येतील असें वाटतें. मी तिकडे जात नाहीं. अरिष्टें आलीं आहेत. वडिलांचे आशीर्वादें सुरक्षित होईल तेव्हां खरें ! बाळकृष्णपंत म्हैसकर काल आले. सारें सांगितलें. ईश्वरइच्छा प्रमाण ! बहुत काय लिहिणें. विदित होय हे विज्ञापना. चिरंजीव रा॥ बाबा व आपांस पत्रें पाठविलीं त्याचीं उत्तरें आलेलीं पाठविलीं आहेत. पाहून पाठवावीं. हे विज्ञापना.

नं. ५५१४ श्री. ( ज्येष्ठ शु० ५–२८ मे )

पै॥ छ ५ मोहोरम. सन मय्यातैन व अलफ.

श्री॥ राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेशीं.

पोष्य धोंडो अनंत कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना तायागत छ० ३ मोहोरम यथास्थित असों. विशेष. स्वामीनीं पत्र पाठविलें तें पावलें. इकडील वर्तमान गोखले पाच्छापुरास आहेत. श्री॥ राजश्री चिंतामणराव आपाही त्यांजवळ पाच्छापुरींच आहेत. आज उद्यां कूच होऊन बारीपार जाणार. डंबळाकडे जाऊन आधीं वाघाचे पारिपत्य करावें हा बेत आहे. काय होतें पहावें. जातांना दोडवाडावरून जाणार असेंही बोलतात. कोणीकडून जातात पहावें. येकमनमुरडीचें ठाणें घेतलें. मागती आंत घोडीं सामान ×××× रात्रीं आंतून पळोन गेलीं. ठाणें यांचें बसलें. बैल कोठीचे सैदमिरा देसाई यानें नेले होते व देवजी रुद्र याजकडे पाच्छापूर होतें. सैदमिरा गोखल्याकडे कैदेंत होता तो पळोन सामानगडाकडे जात होता. गोखल्यास बातमी कळून पाठलाग केला तेव्हां जाऊन मणगुती येथें गांवांत सामानगडकरानीं ठाणें घातलें होतें तेथें शिरला. मोंवत्या यांच्या चौक्या बसून जमाव होऊन हल्ला करून गांव घेऊन सैदमिरास धरून नेला. बारा हजार रुपये गुन्हेगारी घेऊन देवजी रुद्र जामीन होऊन सोडला. ऐवज देईपर्यंत कैदेंत आहे. याकरितां आमचे बैल गेले होते म्हणून पत्र व वाणी कोठिवळ्या पाठविला. त्यास ( गोखल्यानीं ) उत्तर दिलें. " तो कैदेंत आहे. सुटतांना याचा जाबसाल होईल. स्मरण आहे." असें लिहून उत्तर दिलें. तेथून आपले बैल

सुटून यावयाचे नाहींत. दुराशा मात्र ! वाणी गरीब बुडाले. येविशीं आज्ञा काय होईल त्याप्रमाणें करावयास येईल. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. ५५५५ श्रीगणपति. ( ज्येष्ठ व० १–८ जून. )

पै॥ छ० १६ मोहरम. सन इहिदे मय्यातैन व अलफ. ज्येष्ठमास.

अपत्यें रामचंद्राने शिरसा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० १४ मोहरमपर्यंत यथास्थित असे. विशेष. वडिलीं आशीर्वादपत्रें पाठविलीं. " चार पांच दिवस जाले. पत्रें पाठविलीं त्याचीं उत्तरें आलीं नाहींत. हल्लीं तुमचा व चि॥ राजश्री हरीपंत बाबा यांचा व गोखले यांचा मुक्काम कोठें आहे हें ल्याहावें. हल्लीं पुण्याहून पत्रें आलीं त्याच्या नकला पाठविल्या आहेत " म्हणोन, ऐशीयास या पत्राचे पूर्वीं वडिलांची पत्रें आलीं तीं पावोन त्याचीं उत्तरें रवाना जालीं तीं सेवेशीं पोंचतील. आमचा मुक्काम प्रस्तुत येंडीगिऱ्या-नजीक आहे. चि॥ राजश्री हरीपंत बाबा गोखलेसह कोसा दीड कोशाचे अंतऱ्यानें मौजे नागनूर तालुके कित्तूर येथें मुक्काम करून होते. काल त्यांचीं पत्रें आलीं त्यांत लिहिलें होतें कीं मौजे रुद्रापूर तालुके मुरगोड येथील मुक्कामास येतों. आले असतील. गोखले याणीं मला आपले पत्रांत लिहिलें होतें कीं, पुढील विचार ठरावांत मसलतीचा आणिला पाहिजे. यास्तव आपणही कूच करून याच रोखें यावें. त्याचें उत्तर पाठविलें कीं, इकडे पलटणें आहेत त्यापक्षीं आमचें येणें व्हावयाचें नाहीं. वाघानें डंबळ घेतलें. मोकळा जाला. त्याचें पारिपत्य व्हावें. शत्रूस प्रबळ होऊं देऊं नये असें लिहिलें आहे. वाघावर गोखले यांस जाण्याचा विचारच आहे. काय घडतें पहावें. वाघ सडा होऊन सावनूर तालुक्यांत गेला असेंही वर्तमान आहे. तिकडील लिहिलें येतांच कळवितों. पुण्याचे पत्राच्या नकला आल्या त्या चि॥ राजश्री बाबाकडे पाठवावयाकरितां ठेवून घेतल्या. तुरची ढवळीस ( पलटणवाल्यांचे ) रोखे जाल्याचें ( आपण ) लिहिलें, त्यास राजश्री बाळाजीपंत सोवनी याचें इकडेही पत्र आलें होतें. वडिलानीं उत्तर त्यास दिलें त्याप्रमाणें इकडूनही लिहिलें आहे. पलटणें अलाव्यामुळें मुक्काम करून राहिलीं होतीं. अलीकडे मुक्कामच आहे किंवा कूच होऊन रोख कोणता धरिला हें ल्याहावयास आज्ञा जाली पाहिजे. दिवस मोठे संकटाचे आले आहेत. त्यांतून पार पडणें ईश्वर-इच्छा व वडिलांचें पुण्य ! आम्ही एक दोन रोजीं येथून कूच करून गल-गल्याचे रोखें जातों. याजउपरीं घाटगेशाहींत अबरू व ब्राम्हण्य राहणें

परम अवघड आहे ! श्री इच्छा प्रमाण ! बहुत काय लिहिणें विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५५६ श्रीगणपति. ( ज्येष्ट व० २–९ जून. )

पै॥ छ० २० मोहरम सन इहिदे मय्यातैन व अलफ. ज्येष्ठमास.

अपत्यें रामचंद्रानें शिरसा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० १५ मोहरमपर्यंत यथास्थित असे. विशेष. इकडील सविस्तर मजकूर वडिलांकडील खिजमतगार आले होते त्यांजबरोबर लिहिला आहे. पत्रें पाहून विदित होईल. " छ० ११ मोहरमीं गुरुवारीं पलटणवाले यांत व खंडेराव माने व माणकोजी शिंदे यांत वांकडें येऊन त्यांची त्यांची लढाई जाली. माने शिंदे यांचा मोड होऊन फौज पळाली त्यांतील जायांजखमी स्वार व माणसें मंगसुळीजवळ आपणास गुरुवारीं आढळलीं, " या प्रमाणें ती॥ राजश्री धोंडोपंत बाबा जोग यांजकडील माणूस इकडे आला होता त्याणें जबानी सांगितलें. सत्य मिथ्या काय असेल तें असो. असें जालें असतां वडिलांकडून लिहिलें यावें. तरी सविस्तर ल्याहावयास आज्ञा जाली पाहिजे. आम्ही आज घटप्रभा उत्तरतीरास आलों. पुण्याकडील येईल तें वर्तमान आज्ञा करावी. बहुत काय लिहिणें विदित होय हे विज्ञापना. लक्ष्मेश्वर व सावनूर वाघानें घेतलें. मुक्काम सावनुरीं आहे. लक्ष्मेश्वर देसाई याचे स्वाधीन केलें असें लिहिलें कुसेगलचे आलें आहे. ईश्वर इच्छा प्रमाण ! हे विज्ञापना.

नं. ५५५७ श्रीगणपति. ( ज्येष्ठ व० ३–१० जून. )

पै॥ छ० १८ मोहरम. सन इहिदे मय्यातैन व अलफ. ज्येष्ठ व॥ ६

अपत्यें रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० १६ मोहरमपर्यंत यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. त्याजवरून व रहिमतपूरच्या पत्राच्या नकलेवरून पुण्यांत जालें कृत्य व इकडे जुगूळचे मुक्कामीं जालेलें सविस्तर कळलें. ऐशीयास जो पर्याय पुण्यांत जाला तोच इकडील माने व शिंदे यांस घडावयाचा, परंतु पूर्वसूचना त्यांस समजल्यावरून निभावून गेले. याउपरी कोणत्या थांग्यास जातात पहावें. बहुतकरून बायांकडेच जातील. दुसरी जागाच नाहीं असें वाटतें. ईश्वरइच्छा काय आहे ते त्याचा तो जाणे ! याउपरी जुगळावरील

---

१ शिंद्यांनीं तुळसाजी शिंदे वगैरेंस तोफेच्या तोंडीं दिल्याचें. २ माने व शिंदे यांवर पलटणवाल्यानीं हल्ला केला तो प्रकार.

पलटणें कोणता रोख धरितात पहावें. पुण्याहून सामिलातीस सरंजाम येत होता त्यास जप्तीची ... त्याअर्थें त्यांचा मार्ग पाहत मुक्काम मजकुरीं राहतात किंवा पुढें कोणीकडे हालचाल करितात हें काय घडतें पहावें. मिरज प्रांतांत रोखे केले होते ते स्वांर गेलेच असतील. पुढें पलटणवाले यांचे वस्तु तितका आक्रम व्हावयाचा नाहीं. दुसरा कोणी कर्ता दुर्बुद्धि येईल तेव्हां घडेल तें घडो. आपले आपल्यांत ( भांडण ) लागलें याचा परिणाम कळतच आहे. तूर्त पलटणें तालुक्यांत आहेत यांचा उपमर्द श्रीगजानन लौकरच करील. प्रजापालक अनाथनाथ ईश्वर आहे. सर्वांची काळजी त्यास आहे. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५५८ श्रीगणपति. ( ज्येष्ठ व० ५–११ जून. )

पै॥ छ० १८ मोहरम. सन इहिदे मय्यातैन जेष्ठ व॥ ६ गुरुवार.

अपत्यें रामचंद्रानें शिरसा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० १७ मोहरमपर्यंत यथास्थित असे. विशेष. वडिलीं आशीर्वाद पत्रें पाठविलीं तीं पावलीं. पुण्याचीं पत्रें आलीं त्याच्या नकला पाठविल्या त्याजवरून व राजश्री बापूजी केशव जोशी याचे पत्रांतील मजकूर लिहिला त्याजवरून सविस्तर कळलें. इकडील मजकूर तरी आम्ही घटप्रभा उतरोन काल मौजे अमलझरी परगणे गलगलें येथील मुक्कामीं आलों. चि॥ राजश्री हरीपंतबाबांकडून पत्रें आलीं त्यांत लिहिलें आहे कीं, राजश्री आनंदराव लागू यांचें पत्र आलें तेंच बाजिन्नस पाठविलें आहे त्यावरून कळेल. त्या पत्रांतील सारांश धोंडजी याणें लक्ष्मेश्वर येथें ठाणें घालोन सावणुरास जाऊन तेथें ती॥ राजश्री वासुदेवपंतकाका होते त्यांस कैद केलें. बंकापूरचेंही ठाणें घेतलें, व इंग्रजांकडीलही ठाणीं बदनगुड वगैरे दोन चार घेतलीं. व हावनुराकडे कांहीं स्वांर रवाना करून सोंदेंप्रांतांत हजार स्वांर पाठवून तिकडे ही शिलशिला लाविला. आपण खुद्द कुंदगोळास येणार असें लिहिलें आहे. सावणूर तालुक्यांतून चार रुपये उत्पन्न करून पोटास खावे, दोन दिवस कालहरण करावें, या बेतानें चिरंजीवाची रवानगी तिकडे केली होती तो प्रकार राहिला. व तालुकाही गेल्यांतच जमा. वाघाची जवामर्दी व सामानपूर पाहोन गोखलेही विचारांत पडोन बारीपार जाले होते ते अलीकडे येणार. आले असेंही वर्तमान आहे. येतात त्यांचे वस्तु दम धरून राहवत नाहीं तेव्हां चिरंजीवासही नेणें प्राप्त. खर्चाची ओढ त्यामुळें राहिली फौज ते बेदील. राहत नाहीं. थोडें बहुत देऊन दिलदिलासा

करावा तरी सावनूर तालुक्यांत बखेडा जाल्यामुळें तोही विचार राहिला. एवंच कालाचा जोरा त्याप्रमाणें सर्व गोष्टी घडतात. पुढें ईश्वरें काय योजिलें आहे कळत नाहीं. आणखी पुण्याकडील कळवावें. नागो शामजी याणीं चिकोडी रक्षावी असा निश्चय करून निरोप घेऊन गेले. मागाहून राजश्री हरबा आपानीं जावें असें ठरलें होतें त्याचप्रमाणें शेपन्नास स्वार गाडदी जमातदार देऊन आजच रवानगी केली. सेवेशीं कळावें. पुलावर फणसळकर आले होते ते कोठें आहेत ? शिंदे माने पळून कोठवर गेले ते आज्ञा जाली पाहिजे. काळ मोठा दुस्तर आहे. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५५९ श्री. ( ज्येष्ठ व० ६–१२ जून. )

पै॥ छ० २१ मोहरम. ज्येष्ट मास. इहिदे मय्या तैन व अलूफ.

विज्ञापना. कै॥ नानाफडणीस यांस पुत्र द्यावयाचा राजश्री अलीजा बहादर यांजकडून सरकारांत बोलण्याचा नेट पडोन श्रीमंतांचा रुकार आला. अस्त जाहल्याचे पूर्वीं पुत्रविधान होईल. राजश्री बळवंतराव राजे भानू यांचा पुत्र द्यावयाचा ठरला आहे. राजश्री बज्याबा शिराळेकर याणीं व राजश्री नारोपंत चक्रदेव याणीं उभारणी केली. सिंदे यांजकडे कांहीं दरबारखर्च पडला आहे असें ऐकण्यांत आहे. कांहीं सरकारांतही पडला असेल. मागाहून पक्कें समजल्यानंतर लिहितों. दशमीस पुत्रविधान व्हावें असा विचार ठरत आला आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५६० श्री. ( ज्येष्ठ व० ६–१२ जून. )

पै॥ छ. २१ मोहरम. इहिदे मय्यातैन व अलूफ.

विज्ञापना. श्रीमंत राजश्री रावसाहेब यांची भेट जाहली हें वर्तमान विनंती जासुदाबरोबर पत्रें पाठविलीं आहेत त्या पत्रीं लिहिलें आहे. श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांची भेट जाहली. श्रीमंतांस स्वामींनीं पत्र दिलें तें प्रविष्ट केलें आणि विनंती केली कीं, " स्वामींचे पायांजवळ दुसरा विचार नाहीं. कितीएकविशीं विनंती करावयाची आहे. आज्ञा होईल तेव्हां विनंती करीन. " म्हणोन बोललों. नंतर मान मात्र हलविली. नमस्कार करून आलों. त्यानंतर पुन्हां गांठ पडावयाचा विचार राजश्री आपाजीपंतांस पुसला. मर्जी पाहून गांठ पाडितों म्हणोन सांगितलें. श्रीमंतांची प्रकृति शैत्य होऊन बिघडली

१ हें व पुढचीं बारा पत्रें वकील मोरोपंत परांजपे याणीं पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस लिहिलीं.

होती. एक दिवस स्नानदेखील केलें नाहीं. अद्यापवत् प्रकृति पूर्वस्थितीस आली नाहीं. आल्यानंतर गांठ पडावयाचा विचार करून विनंती राजश्री आपाजीपंत समक्ष असतां करून उत्तर होईल तें सेवेशीं विनंती लिहितों. श्रीमंत राजश्री रावसाहेब[1] यांची भेट मात्र प्रथम जाहली होती. नंतर फिरोन एकांतीं गांठ घालून विनंती केली कीं, स्वामींचे पायांजवळ मला तिकडील जाबसाल हरएकविशीं विनंती करावयास पाठविलें आहे. राजश्री गंगाधरराव जी यांचें लक्ष स्वामीचे पायांव्यतिरिक्त नाहीं. स्वामींस खातरजमा असावी. सांप्रत करवीरची मसलत बिघडली. शह उठून फौजा निघाल्या. राजश्री रामचंद्रपंतआपा सात आठ हजार फौजेनिशीं गोकाकचे सुमारें आहेत. राजश्री धोंडोपंत गोखले पांच हजार फौजेनिसीं पाछापुरानजीक चारपांच कोसांचे अंतरानें आहेत. राजश्री रघुनाथरावदादा यांजकडील फौजा दोन हजार व पलटणें दोन कुरुंदवाडास पंचगंगेवर मुकाम आहे. राजश्री चिंतामण रावआपा परगणे तेरदळ येथें दोन हजार फौजनिसीं आहेत. आम्हांकडील फौज मिरजेनजीक आली आहे. जुगुळावर पलटणांचा मुक्काम आहे. प्रांतांत रोखे करून ऐवज घेतात. मनस्वी उपद्रव आरंभिले आहेत. स्वामींचा किल्ला[2] राजश्री रावजी यांचे स्वाधीन आहे. नामी जागा. संरक्षण जाहली पाहिजे याकरितां तीन हजार किल्याची सिबबंदी नेहमीं पांचसहा वर्षें आहे. फौजेचा खर्च तसाच. दोन हजार फौज नेहमीं. शिवाय पागा सलतन. प्रांताची गत तो करवीरवासी प्रबल जाहल्यापासून या रीतीची. सर्वस्वी कर्जाचे पेंचांत आलों. पुढेंही खर्च चालला पाहिजे. लज्जा रक्षणार स्वामीचे पाय आहेत. गंगाधर रावजी यांची स्थित रीत स्वामीनीं लौकिकांत ऐकिलीच असेल. याप्रमाणें विनंती केली. नंतर उत्तर आलें तें अलाहिदा पुरवणीपत्रीं विनंती लिहिली आहे. हे विज्ञापना.

नं. ५५६१ श्री. ( ज्येष्ठ व० ६–१२ जून. )

पै॥ छ० २१ मोहरम इहिदे मय्यातैन व अल्लफ.

विज्ञापना. मी पुण्यास आल्यानंतर दोन दिवसानीं राजश्री बाबा काळे आले. खजिन्याचे विहिरीजवळ राहिले आहेत. श्रीमंतांची उभयतांची भेट जाहली. राजश्री नारोपंत चक्रदेव यांचीही भेट जाहली. त्यांचें व राजश्री रावसाहेब

---

1 अमृतराव. 2 मिरज.

यांचें एक वेळ मात्र बोलणें जाहलें त्यांत काय विचार बोलिले हें समजलें नाहीं. नारोपंत यांचेंही बोलणें जाहलें आहे. पुरता विचार समजल्यानंतर विनंती लिहितों.. राजश्री बाळाजी विष्णुही पुण्यांत गुप्त आहेत. 'बाबा काळे यांची व माझी भेट जाहली नाहीं.' असें बाबा एका गृहस्थाजवळ म्हणत होते, परंतु मिथ्या. त्यांची गांठ नित्य पडते. बाबांची माझी पुण्यांत गांठ पडली नाहीं. त्यांचें चित्त प्रशस्त माझे जागां नाहीं त्याअर्थीं मी तरी त्यांचे बिराडास जाऊन फल नाहीं. मजपाशीं बोलण्याचा विचार त्यांचा होणार नाहीं. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५६२ श्री. (ज्येष्ठ व० ६–१२ जून.)

पै॥ छ० मोहरम. ज्येष्ठ मास. इहिदे मय्यातैन व अलुफ.

विज्ञापना ऐसी जे, सरकारांत अखेर तारीख छ० १० मोहरम जाली. अवल साल छ० ११ मोहरम. सालाचें नांव सन इहिदे मय्यातैन व अलुफ. याप्रमाणें सरकारचे कीर्दीस व सनदा पत्रीं चालिलें. श्रुत होय. गंजीजवळ कैलासवासी भाऊंचे पागेचे भिंतीबाहेरील दक्षिणेकडे आमची जागा पेशजी बैरागी यास मठ बांधून दिला होता ती. त्यास भाऊंची जागा पागेची घेऊन वांटून[1] दिली. वेदशास्त्रसंपन्न रा॥ विश्वनाथ जोशी यांस आमचे जाग्याचे उत्तरेकडे जागा वाड्यास दिली. त्याणीं सरकारांत विनंती करून आमची देखील जागा परमानगी घेतली. दोन वेळां परमानगी सरकारची आली त्यांस सांगितलें कीं, मिरजेस यजमानांस लिहिलें आहे. तिकडून उत्तर आलेवर सांगतों. त्यास जाग्याचा प्रकार येकेरी खपरेल दहा खण होईल इतकी होती. फार नवती. परंतु पुण्यांतील जागा. त्याणीं तो निकड फार लाविली आहे. शेवटीं रुबरू श्रीमंतांजवळ नेऊन ताकीद करवितील. येविशीं विनंती लिहिली आहे. आज्ञा येईल त्याअन्वयें करीन. सदाशिव पेठेंतील वाड्यांत बळवंतराव नागनाथ याणीं उंटें, घोडीं, हत्ती बांधिला आहे. भाडेकरी आंत छपरें घालून आहेत त्यांस नानाप्रकारें उपद्रव लाविला आहे. छपरबंद आंत होता त्यास तो घालविला. त्यांजकडे चिरंजीव धोंडोपंत येकदोन वेळां गेले होते. परंतु यांचें बोलणें अलक्ष मानून बंदोबस्त करितों म्हणोन मात्र बोलतात. परंतु ताकीद माणसांस करीत नाहीं. त्यांचा वाडा आमच्या वाड्याशेजारीं. मधें भिंत मात्र. त्यांचा

---

१ सरकारांतून वांटून दिली.

चालचलाव जाला आहे. उपद्रव करितात. येकदोन दिवशीं मी त्यांजकडे जातों. बरे वजेनें त्यांशीं बोलतों. उत्तर काय करितील ते विनंती लिहितों. जोशी जागेकरितां खटले करितील. रुबरू सरकारांत आज्ञा जाली असतां नाहीं म्हणावें किंवा काय उत्तर करावें याची आज्ञा जाली पाहिजे. हे विज्ञापना.

५५६३ श्री. (ज्येष्ठ व. ६–१२ जून.)

पै॥ छ० २१ मोहरम इहिदे मय्यातैन व अल्लफ.

विज्ञापना ऐसीजे, रा॥ दौलतराव शिंदे आलिजाबहाद्दर यांजकडील कंपूंतील पलटणें सुमार सहा हिंदुस्थानांत रवानगी जाहली. छ० १६ मोहरमीं मौजे मुंढवें येथील मुक्कामास गेलीं. एकदोन दिवसांत चालतीं होतील. हिंदुस्तानांत दंगा आहे याजकरितां रवानगी जाली आहे म्हणोन बातमी आहे. बाया शिंदे बरानपूरचे नजीक आहेत. त्यांचे बंदोबस्ताकरितां रवाना केलीं असतील नकळे. मल्हारराव होळकर यांजवर दंगा होऊन पेशजी मृत्यु पावले त्यांस पुत्र जाहला आहे तो रा॥ केसोपंत[1] कुंटे यांचे वाड्यांत जुने कोटांत आहे. तेथें चौकी पाहरा चांगलाच आहे. ऐसें असतां रा॥ काशीबा होळकर यांजकडील लोक दोन अडीचशें चालोन आले होते. दंगा करावा हा मनसबा होता. परंतु साधला नाहीं. इशारा अगोदर होऊन (वाड्यांतले) सावध होते. वाड्याजवळ येतांच दरवाजा लावून कटकट जाहली. दहावीस माणूस जायां जखमी आले होते त्यांजकडील जाहलें. इलाज चालला नाहीं. निघोन गेले. नंतर आणखी दीडशें दोनशें आरब चाकरीस ठेविले आहेत. मजबुतीनें आहेत. या प्रकारचा तूर्तप्रसंगीं विचार चालिला आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५६४ श्री. (ज्येष्ठ व० ६—१२ जून.)

पै॥ छ० २१ मोहरम. इहिदे मय्यातैन व अल्लफ.

सेवेसीं विज्ञापना. श्रीमंत " राजश्री चिंतामणराव आपा याणीं रा॥

---

१ केशव गणेश कुंटे. हे थोरल्या मल्हाररावांच्या कारकीर्दीपासून होळकरशाहींतले एक प्रमुख मुत्सद्दी होते. देवासचे कारभारी रा. ब. विष्णुपंत कुंटे व धुळ्यांस डा. दामोदरपंत कुंटे होते ते व इंदूरचे बाळाभाऊ कुंटे हे सर्व याच केसोपंत कुंट्यांच्या वंशांतले होत. या कुंट्यांचें मूळगांव नागांव अल्लीबागेजवळ आहे तें. दुसरे एक कुंटे नानाफडनविसांचे विश्वासू कारभारी होते ते भिवंडीचे कुंटे. ते निराळे व हे निराळे.

धोंडोपंत गोखले यांस घेऊन दोडवाड येथील ठाणें घालावयास गेले आहेत. अलीकडे पांचसहा दिवस पत्रें दोडवाडाहून आलीं नाहीं. आल्यावर लिहितों" म्हणोन आज्ञा पत्रीं लिहिली आहे, ऐशास घरकलह कोणेही तऱ्हेनें तुटावा, लांबवूं नये, याजकरितां आजपावेतों आपण क्षमा केली. ऐसें असतां अलीकडे त्याणीं शहापुरास ठाणें घातलें. हल्लीं दोडवाडाकडे गेले आहेत. ठाण्याचा कारभार. जर करितां धीर धरिला तरी बचाव होईल. नाहींतरी ठाणेंही घालितील. पुढे विचार कोणता ? किल्ला स्वामींचे स्वाधीन. गडबडीचे दिवस. शिबंदी आहे त्या पेक्षां जाजती राखोन संरक्षण जाहलेंच पाहिजे. वरकड पागा पावलोक व खासगत संसार हे खर्च दौलतीचे कसे चालावे ? त्यांजकडून विभागाचा फडशा हरतऱ्हा करून व्हावा, तरी त्यांस कोणते गोष्टीची काळजी ? सरंजाम झाडून त्याणीं आपणाकडे चालता केला. मिरजप्रांत देखील त्यांजकडे. ऐशास हा विचार सेवकानें स्वामींस लिहावा हें सामर्थ्य नाहीं. परंतु पुढें काय करावें हाच विचार आहे. त्यास विना गडबड केल्याखेरीज परिणाम नाहीं. तासगांवकर मंडळी यांचा विचार पाहतां भाग तुटों नये हाच आहे. त्यांत उभयतां कृष्ण[1] उपनामक याणीं तो शर्तच केली आहे. पुढें दम बांधावा अथवा ते काय म्हणत असतील ते गोष्ट कमजाजती कबूल करावी, या विचाराखेरीज दुसरा अर्थ नाहीं. शिंदे यांचा अविचारी कारभार. पटवर्धन यांचा सरंजाम घाटगे यांस द्यावा येविशीं बहुत खटपट सरकारांत केली. परंतु ती गोष्ट सरकारांतून परमानगीची जाली नाहीं. तथापि त्यानीं उद्योग त्या प्रांतांत अंमल बसवावा येविशींचा आरंभिला आहे. किल्ला स्वामींचे स्वाधीन. पैसा कोणीकडून यावयाचा अर्थ नाहीं. किल्ल्याचा बचाव जाला पाहिजे. इकडे लौकिकामध्यें पुण्यांतील संभावित गृहस्थांचें म्हणणें कीं, पटवर्धन एकरूप सर्व आहेत तरी शिंदे यांस मीठ देखील घालणार नाहीं ! खातरजमादेखील सरकारांत आहे आणि प्रकारही तसाच आहे. घरांत पाहतां विचार या प्रकारचा घडोन आला आहे. घरकलहाचा मजकूर श्रीमंतांस विदित करावा, इकडून खटपट करून उलगडा करावा, तरी दरबार खर्चाचा विचार जाहल्या खेरीज कसा बनोन येतो ? तशांत उद्योग करावा तरी स्वामींची आज्ञाही मला नाहीं. याजकरितां श्रीमंत रा॥ रावसाहेब यांस विनंती केली कीं, घरकलह आहे.

---

१ केसोपंत काळे व बाबा काळे.

भाग तुटत नाहीं. स्वामींस श्रुत असावें. इतका भाव मात्र सुचविला आहे. पेशजी बाबा काळे सरकारचे कैदेंत होते त्यांची मुक्तता रा॥ आपाजीपंत याणीं केली. हल्लींही श्रीमंत रा॥ पंतप्रधान यांची भेट रा॥ आपाजीपंत यांचे वजारतीनें घेतली आहे. रावसाहेब यांजकडे मात्र बाबांचें बोलणें जाहलें. श्रीमंतांकडे बोलणें जालें नाहीं. रा॥ आपाजीपंतास घरकलहाचा मजकूर सर्व सांगितला. "उभयतां काळे व आणखी एक दोन लुच्चे मिळोन या तऱ्हेस गोष्ट आणिली आहे. जर करितां तुम्ही श्रीमंतांकडून निक्षून ताकीद व्हावयाचा प्रकार केला असतां गोष्ट उत्तम. तुम्हीही त्यांजपाशी बोलावें कीं, आमचें ऐकण्यांत यांचा घरकलह लांबवावयास तुम्हीच कारण. याप्रमाणें रागें भरोन बोलिलां असतां मशारनिल्हेही सावध होतील. श्रीमंतांनीं ताकीद केली असतां सर्वोपरी उत्तम आहे." त्यावरून आपाजीपंत याणीं श्रीमंतांकडून निक्षून ताकीद करवितों. मीही फजीत करून सांगतों. याप्रमाणें खचीत एक दोन वेळां बोलणें केलें आहे. काळे यांचें आपाजीपंतांचें बोलणें जाहल्यानंतर विनंती लिहितों. श्रीमंत रा॥ रावसाहेब व चक्रदेव यांचा विचार एक आहे. श्रीमंतांची कृपा आपले जागां होईल. चक्रदेव यांची गांठ येक दोन वेळां पडली. त्यांचेंही मानस आपले ठायीं चांगलें आहे. आणि पुढेंही दिवसेंदिवस अधिक होईल असा सुमार आहे. त्यास हा मजकूर घरकलहाचा श्रीमंत रा॥ रावसाहेब यांस नारोपंत चक्रदेव यांस प्रमुख करून समजावून बोलण्यांत आणावा अशी मर्जी असिल्यास स्वामींनीं विचार करून उत्तर पाठविलें पाहिजे. पेशजी दोन यादी ठरल्या त्यांच्या व कलमबंदीचे यादीची नकल व वरकडही जाबसाल काय ठरावांत आले होते ते येणेंप्रमाणें नकला करून पाठवून दिलें पाहिजे. रा॥ आपाजीपंत यांस यादी समजावून देऊन त्यांचे अर्थ ध्यानांत खचित आणितों. यादी त्यांजपाशीं देत नाहीं. जर करितां प्रसंग पडल्यास यादीच्या नकला असाव्या. मर्जीस आल्यास पाठवावयाची आज्ञा जाली पाहिजे. सूचना मजकूर विनंती लिहिली आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५६५ श्री. ( ज्येष्ठ व० ६-१२ जून. )

पै॥ छ० २१ मोहरम इहिदे मय्यातैन व अल्लफ.

विज्ञापना ऐसीजे, घरकलहाचा मजकूर अलाहिदा दोन बंदाची पुरवणी पत्र स्वामीस लिहिलें आहे त्याप्रमाणें श्रुत होईल. विना क्रूरपण धरिल्याखेरीज कलह मिटत नाहीं. तशी गोष्ट स्वामीचे विचारास येत नाहीं ! तरी

एकदोन गोष्टींची त्यांची आड असेल ती कबूल करावी. घडतां घडेल तें प्रमाण हाच विचार असिल्यास उद्योगास आरंभ करावा. तेही दोडवाडाकडे गेले आहेत. इतक्यांत त्वरा करून हरिपूर येथील संस्थान मातुश्री सुद्धां किल्ल्यांत आणावें. जिवाजीपंत यांचें कुटुंब व मातुश्री किल्ल्यांत दाखल होतांच अर्धा दम कमी होईल. नंतर कौलापूर, ऐनापूर, मोळें येणेंप्रमाणें जप्त करून दाणा वैरण व नक्त जें उत्पन्न होईल तें घ्यावें. प्रांतांत रोखे करून वसूल घ्यावा. त्याणीं झाडून वसूल नेला, आतां आपण वसूल कसा घ्यावा, याचा विचार पाहोन निर्वाह नाहीं ! कलह तुटल्यानंतर त्यांस पेस्तर सालचे ऐवजीं मजुरा द्यावयास येईल. प्रांतांत ठाणीं बसविलीं असतां ते येऊन फिरोन ठाणीं बसवितील याचा विचार कसा करावा ? तरी ठाणीं बसवून ऐवज जो येईल तो घ्यावा, पुढें पहातच असावें. त्यांणीं आले असतां किल्ल्याचे गळीं पडवत नाहीं. प्रांतांत अमल बसवितील ( तर ) आपण उठवीत असावें ! याप्रमाणें महिना दोन महिना तापल्याखेरीज सांधत नाहीं. इकडे त्यांजकडून बोभाट आला असतां श्रीमंतांस विनंती करून खातरजमा करून देतों. सुचला मजकूर विनंती लिहिला आहे. श्रीमंत रा॥ रघुनाथराव दादा यांस मर्जीस आल्यास कळवावा. त्यांचें विचारास आल्यास त्यांणीं सर्व प्रकारें साह्य व्हावें. याप्रमाणें एकांतीं विचार होऊन वचन घ्यावें. नंतर उद्योग व्हावा. त्यांजकडून वाट पाहिली असतां सरंजाम त्यांजकडे चालतो. पैका वसूल ते करितात. त्यांस कोणतेही गोष्टीची निकड नाहीं. स्वामी आपण आज तागायत लौकिकास भिऊन क्षमा केली. परंतु तो अर्थ या प्रसंगीं कार्यावर पडिला नाहीं. आपण क्षमा करीत गेलां, त्याणी एकेक गोष्ट अधिक करीत गेले, त्याणें शेर जाले ! तासगांवकर यांस तो संतोषच आहे ! मी मिरजेस असतां पांच सात पत्रें श्रीमंत रा॥ दादांस पाठविलीं असतां स्वारी यावयाचा योग जाहला नाहीं. त्यास हल्लीं दादांस पत्रें एकदोन वेळां जाऊन त्यांची स्वारी यावी. विचार व्हावा. नाहींतरी दादांकडेस तरी कोणीं खातरजमेनें बोलावयास पाठवावें. बोलोन दादांस घेऊन मिरजेस यावें. तसें तरी व्हावें. लौकर याचा विचार जाला पाहिजे. इकडे ज्याचें त्यास संकट पडिलें आहे. कोणी मनास आणीत नाहीं. येथें पुसिलें असतां स्वामीचे पुण्येंकरून जाबसाल यथास्थित करीन. टळत नाहीं. सेवेसीं विदित होय. पत्राचें उत्तर लौकर आलें पाहिजे. हे विज्ञापना.

नं. ५५६६ श्री. ( ज्येष्ठ व० ६—१२ जून. )

पै॥ छ० २१ मोहरम. इहिदे मय्यातैन व अलफ.

विज्ञापना. रा॥ बाळाजी नाईक भिडे याणीं स्वामींस पत्र ल्याहावयास सांगितलें कीं, बाळासाहेब यांचें पत्र श्रीमंत रा॥ मोरोबादादा यांस यावें कीं, "आपली स्वारी पुण्यास जुन्नराहून येणार ऐसें ऐकण्यांत आहे. त्यास याचा विचार काय ? तूर्त प्रसंगींचा विचार एक रीतीचा आहे. सर्व प्रकारें वडिलांपासून आपले घरचा स्नेह कसा हें चित्तांत आहेच. विस्तारें ल्याहावें ऐसें नाहीं. पूर्वस्नेहास वृद्धि असावी. पत्राचें उत्तर यावें" म्हणोन एक पत्र मिरजेहून आणवून जुन्नरास रवाना करणें म्हणोन सांगितलें. त्यास नानांस बोलिलों कीं याचा अर्थ काय ? त्याणीं उत्तर केलें कीं, दादानीं दौलतीचा कारभार करावा याप्रमाणें श्रीमंतांचे व दौलतराव बाबा यांचे चित्तांत येऊन निश्चय ठरला आहे. लौकरच विचार होईल. त्यास उत्तर केलें कीं, रा॥ आपाजीपंत गोंधळेकर शिंदे यांचे सैन्यांत नेहमीं वीस दिवस जाऊन हाच कारभार ठगवीत होते. परंतु ठरला नाहीं. शिंदे तीस लक्ष रुपये मागों लागले. यांजकडून तिसांचा पतकर न घेववे. ते काली निघोन पुण्यांत आले. ऐसें जालें असतां नाना ! आपण सांगतां यांतील अर्थ काय ? त्यावरून "त्याणीं पैक्याचाही विचार केला आहे. खाचित आहे. तुमचें पत्र मात्र तूर्त यावें. बाळासाहेब यांचे जागां दादांची कृपा पूर्ण आहे. पुढें डौल साधला असतां बाळासाहेब यांजखेरीज कोणतेही गोष्ट करावयाची नाहीं याप्रमाणें दादांचें मानस आहे. आम्हांसही दादांकडून याच प्रकारें सूचना आहे." याप्रमाणें नानानीं सांगितलें. त्यावरून विनंती लिहिली आहे. मर्जीस आल्यास पत्र यावें. स्नेहाचा विचार पत्रीं असावा. दस्तऐवज मात्र कांहीं एक असों नये. विचारास आल्यास पत्र आलें पाहिजे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५६७ श्री. ( ज्येष्ठ व० ६—१२ जून. )

पै॥ छ० २१ मोहरम ज्येष्ठ मास. सन इहिदे मय्यातैन व अलफ.

विज्ञापना. श्रीमंत रा॥ रावसाहेब यांस विनंती केली ते विनंती पुरवणी अलाहिदा आहे. आणखी विनंती केली कीं, तूर्त प्रसगींचे दिवस एक तऱ्हेचे फौज पायदळ दूर करितां येत नाहीं. पुण्यांतील विचार तो शिंदे यांजकडील या रीतीचा. पुढें स्वामीनीं चित्तांत विचार करून आज्ञा करणें ती जाली पाहिजे. आजपावेतों स्वामींचे पायांजवळ आम्हाकडील कोणी विनंती करावयास नव्हतें. त्यास नानाची प्रकृत येक रीतीची. काय त्यांचें

चित्तांत येईल न कळे. याजकरितां इकडे पायांजवळ कोणी नव्हतें. परंतु लक्ष स्वामींचे चरणाखेरीज नाहीं. याप्रमाणें विनंती केली. नंतर उत्तर आलें कीं, करवीरची मसलत शिंदे याणीं बिघडली. महाराजांकडून तहाचें बोलणें बोलावयास आले आहेत. शिंदे यांचे मार्फतीनें बोलणें बोलतात. परंतु ठरावांत येत नाहीं. बोलणें चालिलें आहे. ठरावांत येईल. पर्जन्यकाळ आला. पुन्हा शह बसवावा तर ठीक नाहीं. याजकरितां जसें ठरेल तसें ठरावून फडशांत आणावें असें आहे. पुढें पहावयास येईल. तूर्त शिंदे याणीं त्यांचें लक्ष धरिलें आहे. त्या प्रांतांत पलटणेंही आहेत. तहच करावा याप्रमाणें विचार आहे. वरकड विचार तूर्त वाघ प्रबळ जाहला आहे त्याचें पारिपत्य जाहलें पाहिजे. याचा निश्चय ठरोन पत्रें रा॥ रामचंद्रपंत आपा यांस पाठवितों. गंगाधररावजी यांची स्थित बहुत थोरपणाची ऐकण्यांत आहे. इकडील जाबसाल त्यांस सुचवावयाचा असेल ते तुम्हांस आज्ञा होईल त्याप्रमाणें लिहिणें. नारोपंत चक्रदेव यांची गाठ पडल्यानंतर पत्र रवाना करावयाचा विचार करितों व रा॥ गंगाधरराव यांचेही पत्राचा जाब देऊं" म्हणोन आज्ञा जाली. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना:

नं. ५५६८ श्री. ( ज्येष्ठ व० ६--१२ जून. )

पै॥ छ० २१ मोहरम. ज्येष्ठ मास. इहिदे मय्यातैन व अल्लफ.

विज्ञापना. श्रीमंत रा॥ रावसाहेब यांस विनंती केली कीं, श्रीमंत रा॥ बाळासाहेब व चिंतामणराव आपा यांचा घरकलह आहे. मागें यादी बुदी ठरोन दोन यादी केल्या त्यांतून मनास येईल ती याद त्याणीं कबूल करावी याप्रमाणें ठरलें. एक याद त्याणीं उचलून कबूल केली. नंतर फिरोन नानाप्रकारचीं बोलणीं बोलों लागले. चार लुच्चे मिळोन घरकलह उगाच वाढविला. स्वामींस श्रुत असावें याजकरितां विनंती केली आहे. म्हणोन बोलिलों. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५६९ श्री. ( ज्येष्ठ व० ६--१२ जून. )

पै॥ छ० २१ मोहरम. ज्येष्ठमास. इहिदे मय्यातैन व अल्लफ.

विज्ञापना ता॥ छ० १८ मोहरम सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. बाया शिंदे बरानपुरानजीक वरणगांवावर आहेत. कोणी म्हणतात कीं शहरास दाखल जाहल्या. परंतु सावकारींत शहरांत दाखल जाहल्याचें नाहीं. शिंदे याणीं त्रिवर्गांस तोफेस दिलेनंतर गोटांत मोठा गवगवा पडला,

कोणास डेऱ्यास बोलाविलें असतां शिलेदार न येत. कोणास धीर न पुरे. देवजी गवळी व नारायणराव बक्षी यांजकडे डेऱ्यास चौकी बसविली होती. नंतर गवगवा फार जाला. फौज असा दंगा केला असतां राहणार नाहीं या प्रमाणें रा॥ अलिजा बहादूर यांस कोणी समजाविलें. तेव्हां देवजी गवळी यांजकडील व बक्षीकडील चौकी उठविली. आणि बक्षीस आणून वस्त्रें दिलीं. फौजेंत सर्वांस दिलभरंवसा देणें म्हणोन सांगितलें. तूर्त प्रसंगीं उपशम जाहला आहे. परंतु कोणा एकास विश्वासाची जागा राहिली नाहीं. मथुरेस अंबोजी इंगळे दहा हजार फौज दहा पलटणेंसुद्धां आहेत. लखबा लाड दहा हजार फौज दहा पलटणांसुद्धां जमाव सुद्धां आठ कोश मथुरेपलीकडे आहेत. जैपुरचे रोखें अलीबहादूर निराळेच सात आठ हजार फौजेनिशीं आहेत. यशवंतराव होळकर उज्जनीअलीकडे सावेरी परगणे यांत पंधरा वीस हजार फौजेनिशीं आहेत. शिंदे यांचे सरंजामांतील महालांत झाडून अंमल ( त्यांणीं ) बसविला. प्रांतांत बाकी राहिली नाहीं. हिंदुस्तानांत मोठा बैदा जाहला आहे. जसा पैका मिळेल त्या रीतीनें प्रांत मारून घेतात. बाया शिंदे व होळकर यांचा व लखबा लाड यांचा एक विचार ठरला आहे म्हणोन लौकिकांत आहे. परंतु कशावरून म्हणावें! लखबास व होळकर यांस अंतर फार. बाया ही बरानपुरानजीकच आहेत. पुढें विचार कसा पडतो न कळे. सहा पलटणें इकडून हिंदुस्थानांत रवानगी जाली. आजचा मुक्काम मुंढवें येथील आहे. पुढें दर कूच जातात किंवा उगाच दबाव पाडावा म्हणोन निघालीं आहेत न कळे. मागाहून आढळेल ते विनंती लिहितों. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५७० श्री. ( ज्येष्ठ व० ६—१२जून. )

पौ॥ छ० २१ मोहरम. ज्येष्ठ मास. सन इहिदे मय्यातैन व अलफ.

विज्ञापना. छ० १२ मोहरमचीं पत्रें सदाशिव खिजमतगार याजबरोबर स्वामींचीं आलीं तीं छ० १६ मोहरमीं भौमवारीं दोन प्रहरीं पावलीं. " करवीरवासी महाराज यांचे डेरे जाहले. खासा डेरादाखल होणार. श्रीमंत रा॥ रामचंद्रपंत आपा अनवाल तालुके यांत जमखंडीचे नजीक पांच कोशांचे अंतऱ्यानें आहेत. वाघानें बारीपलीकडे ठाणीं घातलीं. जुगुळास पलटणें आहेत त्यांनीं प्रांतांत रोखे करून ऐवज घेतात. त्यास श्रीमंतांस विनंती करावी आणि शिंदे यांजकडील मनाई ताकीद होऊन व्हावी " म्हणोन आज्ञा, त्याप्रमाणें छ० १७ मोहरमीं श्रीमंत राजश्री रावसाहेब यांस विनंती

करून सविस्तर श्रुत केलें. शिंदे यांजकडील कारभारी आले म्हणजे सूचना करणें म्हणजे रुबरू ताकीद करून पत्रें निक्षून देवितों म्हणोन आज्ञा जाहली आहे. कारभारी येतांच सूचना करून ताकीद करवितों. पत्रेंही देतील तीं रवाना करितों. पेशजी घाटगे यांस पत्र स्वामीनीं पाठविलें तें रा॥ वासुदेव नारायण सांगलीकर याजकडून प्रविष्ट करविलें. मिरज प्रांत वगैरे श्रीमंत राजश्री बाळासाहेब यांचे महालांस उपद्रव लागों देत नाहीं म्हणोन घाटगेराव बोलिले म्हणोन वासुदेव नारायण याणीं सांगितलें. किरकोळ कंपूवाले वगैरे हजार रुपये दरबारखर्च लागेल. बशर्त काम जालें असतां यावे लागतील. सरकारचीं पत्रें घेतों. कंपूकडील हरकाराही घेतों म्हणोन बोलिले. करावें म्हणोन वासुदेवपंतांस सांगोन स्वामींसही विनंती लिहिली आहे. आठ दिवस जाहले. पत्रें आज उद्यां आणितों म्हणतात. असो. काय तें कळलेवर विनंती लिहितों. श्रीमंत रा॥ रावसाहेब यांजकडूनही ताकीद करून पत्रें घेतों. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५७१ श्री. ( ज्येष्ठ व० ६—१२ जून )

पै॥ छ० २१ मोहरम ज्येष्ठ मास. सन इहिदे मय्यातैन व अल्लफ.

विज्ञापना ऐसीजे, पुण्यांत पाण्याचें अवर्षण जाहलें होतें. खडकीचे पुलाजवळून लोक पाणी आणीत होते. नहरास पाण्याचा बिंद नाहीं ऐसा प्रकार जहाला होता. रोहिणीचे सरते चरणाचा पर्जन्य जाहला. मृग जाहल्यापासून नित्य पर्जन्य लागतो. नदीस नहरास पाणी जाहलें. मृगाचे नक्षत्रांत पुण्यांत सदाशिव पेठेंत वीज पडोन दोन माणसें मृत्य पावलीं. सदाशिव पेठेंतील कैलासवासी नानांचे नहरास पाणी पुष्कळ जाहलें. पुण्यांत धारण हरबरे सवादोन पायली, जोरी अडीच पायली मापटें, बाजरी अडीच पायली, तूप सवाशेर अदपाव, तेल सवाचार शेर, या प्रमाणें आहे. चांदवडीस हल्लीं शिक्यास बट्टा पावणे सात रुपये शेकडा आहे. हिंग महाग आहे. वरकड जिन्नस पाडोपाड आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५७२ श्रीगणपति. ( ज्येष्ठ व० ६–१२ जून )

पै॥ छ० २१ मोहरम. सन इहिदे मय्यातैन. ज्येष्ठ मास.

अपत्यें रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १८ मोहरम पर्यंत यथास्थित असे. विशेष. खुलीचंद याचे दुकान राजश्री खंडेराव माने व माणकोजी शिंदे यांचे गोटांत जुगुळचे मुक्कामीं आहे. त्यास हल्लीं त्या गोटांत

बाजारबुणग्यासुद्धां पलटणांची चौकी बसली या करितां युक्तीचे वाटेनें खुलीचंद आपली चीजबस्त काढून मिरजेस आणणार. त्यास हा पहिलेपासून इकडील लक्षांतील. याकरितां याची चीजबस्त शहरांत घेण्यास कोणेविसीं दिक्कत न पडतां आज्ञा जाहली पाहिजे. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५७३ श्री. ( ज्येष्ठ व० ७--१३ जून. )

पै॥ छ० २१ मोहरम. सन इहिदे मय्यातैन व अल्लफ.

सेवेशीं बालकृष्ण महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १९ मोहरम पावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत कैलासवासी नाना यांस पुत्र दत्त द्यावा, म्हणून रा॥ दौलतराव शिंदे बाबा यांजकडून श्रीमंत पंतप्रधान स्वामींकडे नेट पाडविला. पुत्राचे प्रकरणांत श्रीमंत रा॥ रावसाहेब व नारोपंत चक्रदेव पुर्तेपणें आहेत. ज्येष्ठ वद्य दशमीस मुहूर्त चांगला आहे. त्या दिवशीं दत्तविधान व्हावें असा बेत आहे. श्रीमंतांचे व शिंदे यांचे विचारें ठरावांत आलें आहे. पंत प्रधान स्वामींचे चित्तांत नव्हतें, परंतु शिंदे यांचा नेट बहुत पडला यास्तव ठरावांत आलें आहे. चिरंजीव सौ॥ मुली कल्याणाहून पुणें यास रा॥ बापूजीपंत जोशी घेऊन आले. स्वामीं-कडे लौकरच येतील. वरकड साविस्तर रा॥ मोरोपंत याणीं विनंती लिहिली आहे त्यावरून विदित होईल. किल्याची हुशारी सर्व सरंजामाविशीं चांगली करावी. रात्रंदिवस बहुत सावधता असावी. दिवस येकप्रकारचे आहेत. श्रीमंत रा॥ दादासाहेब व स्वामी एकरूप आहेत त्या अर्थीं कोणताही प्रसंग पडल्यास चिंता नाहीं ही खातरजमा वाटते. एकरूपतेंत किमपि अंतर नाहींच. नसावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५७४ श्री. ( १४ जून. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं

विनंती सेवक भास्कर सखदेव. कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत ज्येष्ठ व॥ ८ पर्यंत स्वामीचे कृपावलोकनेंकडून वर्तमान यस्थास्थित असे. यानंतर स्वामीनीं कृपाकरून पत्र पाठविलें तें पावलें. पत्रीं आज्ञा जे, श्री॥ राजश्री " गणपतराव बापू यांचे विवाहाचा निश्चय वद्य नवमी रविवारीं केला आहे. शरीरसंबंध राजश्री जनार्दनपंत गाडगीळ

---

१ हा परशुराम भाऊंचा सर्वांत धाकटा मुलगा. वडील वारलेले, त्रिवर्ग बंधु स्वारीच्या कामावर गुंतलेले, सबब याचें लग्न बाळासाहेबानीं मिरजेस केलें.

यांची नात वधू नेमस्त केली आहे. तर सहकुटुंब सहपरिवार यावें ” म्हणोन आज्ञा, त्याजवरून संतोष जाला. सेवेसीं विदित होय. कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

नं. ५५७५ श्री. ( ज्येष्ठ व० ८–१४ जून. )

छ० २४ मोहरम सन इहिदे मय्यातैन. ज्येष्ठ वद्य १२

सेवेसीं मोरो आपाजी साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २० मोहरम सेवकाचें वर्तमान क्षेम. काल रा॥ दौलतराव शिंदे आलिजाबहाद्दर यांची स्वांरी दोन प्रहरीं सरकार वाड्यांत जमयेतसुद्धां आली. श्रीमंत रा॥ रावसाहेब यांजपाशीं चार घटका खलबत होऊन श्रीमंत रा॥ पंतप्रधान यांजकडे गेले. बरोबर रा॥ घाटगे, आबा चिटणीस, यादवराव भास्कर, बाणाजी शेटच्याकडील विठ्ठलपंत, याप्रमाणें होते. आठ दिवस नानांस पुत्र द्यावयाचा याप्रमाणें सरकारांत बोलणें नित्य बोलतच होते. रा॥ नारोपंत चक्रदेव, चिंतोपंत देशमुख व धोंडोपंत लिमये– चक्रदेव यांचे मेहुणे–व नानांकडील बजाबा शिराळेकर व राघोपंत गोडबोले, चिमणाजी खंडेराव इतक्या असामींस आरसेमहालांत बोलावून आणून नानांस पुत्र द्यावयाचा याचा विचार बोलों लागले. मुलाचें अक्षरही व मुलास पाहावयास आणिला. आणि इशारा करून तीनचारशें लोक आरसेमहालांत घेऊन सदरहू सहा आसामींस कैद केलें. सायंकाळचे सहा घटका दिवसास नजरबंदी होतांच चक्रदेव यांजकडील शहामीरखान रोहिले तीनशेंनिशीं चांफेखणांत होते त्यांस कळतांच तोडे शिलगावून लेस जाहले. त्रिवर्ग श्रीमंत येकीकडे होते. दिवाणखान्याचे पूर्वेकडील खोलींत होते. रोहिले अडले त्यांस बाहेर जाणें म्हणून सांगितलें. त्याणीं चक्रदेव यांस स्वाधीन करणें म्हणोन अड धरिली तेव्हां आबा काळे व बाळाजीपंत पटवर्धन यांस त्यांजकडे बोलावयास पाठविलें कीं, नारोपंत सरकार चाकर. त्यास सरकारांतून नजरबंदी केली. नारोपंताचे निसबतीस तुम्ही होतां, परंतु तुम्हीही चाकर सरकारचे. तुम्ही तलबेविशीं खटला करूं नये. बाळाजीपंत पटवर्धन याणीं आपला जिमा केला. लोकांनींही अजमास पाहिला. खटला करून परिणाम नाहीं. दहा घटका रात्रीस तोंड पडोन शहामीरखान जमावासुद्धां निघोन गेला. नंतर शहरचा बंदोबस्त जागां जागां नाकेबंदी केली. वाड्यास-

---

१ हें व पुढच्या नंबरचें पत्र मिरजेस बाळासाहेबांस लिहिलेलीं.

भोंवतीं दोन पलटणें दहा पंधरा तोफा आणून ठेविल्या. नंतर पंधरा घटका रात्रीचे सुमारें शिंदे गोटास गेले. हा कारभार श्रीमंतांचेच विचारें जाहला. सहा असाभी सरकार वाड्यांतच आहेत. शिंदे यांजकडे नाहीं. पुढें चौकशीचे अंतीं काय घडतें पाहावें. बाळोजी कुंजर यांचे लोक सहा असामींचे चौकीस आहेत. तीरंदाजीचे दिवाणखान्यांत आहेत याउपर काय काय घडतें श्री-इच्छा प्रमाण! हा ग्रंथ पूर्वीं कोणी येका गृहस्थानीं मला सांगितला आणि आपणास पत्र ल्याहावयास सांगितलें होतें. स्वामीचें पत्र जुन्नरास आहेत[1] त्यांस पत्र यावें म्हणोन विनंती लिहिली होती तो हा प्रकार ऐसें दिसतें. तहकीकात म्हणवत नाहीं. मागाहून विस्तारेंकरून सेवेसीं विनंती लिहितों. सावधता बहुत असावी. येविशीं विनंती लिहिली आहे. किल्ला स्वामीचे स्वाधीन आहे. सर्वांचें लक्ष स्वामींकडे व खातरजमा किल्ल्याविशींची आहे. विचार अविचार न पाहतां किल्ल्यांत हरयेकविशीं बेगमी व जकीरा राखोन असावें याप्रमाणें येथेंही कोणी सांगणारानीं सांगितलेप्रमाणें बापूजीपंत जोशी यांची आज रवानगी केली नाहीं. रागरंग पाहोन निघोन येतील. हें पत्र स्वामींस प्रविष्ट होतांच तसेच उत्तरें देऊन सहा घटकांत माणसांची रवानगी जाली पाहिजे. पेशजी विनंती लिहिल्याप्रमाणें जुनरचें पत्र यावें. समय दिसोन. आल्यास पत्र पाठवावयाचें. सारांश गोष्ट सावधता असावी. येक दोन दिवशीं आणखी इकडील विस्तारेंकरून विनंती लिहितों. बापूजी केशव मुखजबानी श्रुत करितील त्याजवरून विदित होईल. सर्वांची शहाणपणें अकला गेल्या! श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५७६ श्री. ( ज्येष्ठ व० ८—१४ जून. )

पै॥ छ० २४ मोहरम.

विज्ञापना. ता॥ छ० २० मोहरम मंदवार सायंकाळ चार घटका दिवस. क्षेम. मुख्य पत्रीं विनंती लिहिली आहे. राजश्री चिंतोपंत देशमुख यांची मुक्तता होईल असा रंग आहे. वाड्यांत मात्र आहेत. वाड्यासभोंवती पलटणें तोफा आहेत. शहरांत लोकांस धीर पुरत नाहीं. अकस्मात् हुलडी होतात. श्रीइच्छा! जासूद महादू डांस तिसरे दिवशीं पोंहचेल. त्याचा श्रमपरिहार जाहला पाहिजे. पहिला जासूद गेला त्यास महादूस पत्र पाठवून रवानगी केली पाहिजे. जासुदास चार असामींचा रोजमुरा आषाढ मासचा दर-

---

[1] मोरोबादादा.

महा तीन रुपयांप्रमाणें द्यावयाची आज्ञा जाहली पाहिजे. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५७७ ( ज्येष्ठ व० ९–१५ जून. )

रामचंद्रपंत आपासाहेब यांचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र छ० २१ मोहरमचें—

चिरंजीव रा॥ बाबा मारेहाळावर आहेत. पांच सहा दिवस पत्र आलें नाहीं. चिरंजीव रा॥ चिंतामणराव आपा व गोखले मुरगोडावर आहेत. उभयतां चिरंजीवांस इकडील सविस्तर पुण्याकडील वगैरे लिहितच आहें. गलगल्याचें ठाणें पानशे यांजकडे जालें. आम्ही आज कूच करून बिळगीकडे गेलों. अमावास्येपर्यंत तिकडे दिवस घालवून जमाखिंडीकडे येतों. पुढें घाटगेशाईचा व पलटणांचा डौल पाहून आज्ञा करावी, म्हणजे तसें करीन. "

नं. ५५७८ श्रीगणपति. ( ज्येष्ठ व. ९—१५ जून. )

पै॥ छ० २२ मोहरम. सन इहिदे मय्यातैन. ज्येष्ठ मास.

अपत्यें रामचंद्रानें शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २१ मोहरमपर्यंत यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर कळला. "वाघ सावनूर तालुक्यांत गेला. ठाणीं घातलीं. ती॥ रा॥ वासुदेवपंत काका यांसही नजरबंदी केली." हें वर्तमान आलेलें वडिलांस लिहिलें आहे. तीं पत्रें पावलींच असतील. अलीकडे तिकडून कांहीं पत्रें आलीं नाहींत. आल्यानंतर कळवितों. रा॥ धोंडोपंत गोखले व चिरंजीव हरिपंत बाबा व चिंतामणराव आपा मुरगोडाआसपास मुक्काम करून आहेत. वाघ भारी जमला. त्याची दहशत धोंडोपंत गोखले यांस पडली. वडिलीं लिहिल्याअन्वयेंच ताला माला पाहून नारीअलीकडे येणें जाल्यास यावें असें चिरंजीवांस लिहून पाठविलें आहे. गलगल्यास ठाणें पानशे यांचें बसलें. आम्ही या उपरी गलगले तालुक्यांतून जमाखिंडीचें रोखें जातों. माने व शिंदे श्रीमहादेवाचा घांट डावा टाकोन उतरोन गेले, त्या पक्षीं ते शिंदे बायांकडे जातात. पलटणें जुगुळावर आहेत त्यांस पुण्याचीं पत्रें येऊन त्यांचें कूच व्हावें. दिवसगत कां लागली कळत नाहीं. पत्रें आल्यानंतर कोणता रोंख धरितात पहावें. चिरंजीव रा॥ चिंता[1]—

---

१ हें पत्र इतकेंच अपूर्ण सांपडलें.

नं. ५५७९ श्री. ( ज्येष्ठ व० ९—१५ जून. )

पौ॥ छ० २५ मोहरम. ज्येष्ठ मास. इहिदे मय्यातैन व अल्लफ.

सेवेसीं मोरो आपाजी. दोनीकर जोडून शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २१ मोहरम रविवार सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील जालें वृत्त कालचे पत्रीं विनंती लिहिलेंच आहे. सरकार वाड्यांत ( चक्रदेव वगैरे ) नजरबंदीनें ठेविले आहेत. चौकशी होणें आहे. पलटणें सरकारवाड्यासभोंवती दोन. वीस तोफा पलटणी आहेत. चौकी पाहरा बहुत हुशारीनें आहेत. जाला रंग या उपरांतिक आणखी कांहीं व्हावा ऐसा प्रसंग लौकिकांत आहे. श्रीसत्ता प्रमाण ! सारांश श्रीमंत रा॥ पंतप्रधान व अलिजा बहादूर एकरूप आहेत. कालचा विचार जाहला यांत दोन शकला आहेत. निश्चयांत समजल्यानंतर विनंती लिहितों. कालचे पत्रीं येक विचार लिहिला आहे. परंतु संशय आहे. ज्यास स्वामीचें पत्र यावें तिकडील जाबसाल किंवा आणखी एक प्रकार आहे. सुधा[1] नामक या विचारांत अगोदर कोणी नव्हते म्हणतात. तेच समयीं त्यांस श्रुत करून कारभार केला म्हणतात. कोणी अगोदरापासून होते म्हणतात. असो. आतां कोणी दौलतीमध्यें राहिलेंच नाहीं. आतां विचार कोणता राहिला आहे ? जे दिवस जातील ते खरे ! मिरज प्रांतांत पलटणें आहेत हा भावगर्भ चांगला नाहीं. परिछिन्न दगा फटका करावा हा मनसबा आहे. सावध असावें. येविशीं विनंती वारंवार स्वामींस लिहीत गेलों आहें. स्वामी सर्वज्ञ आहेत. सेवकानें ल्याहावें ऐसा विचार नाहीं. इकडील मजकूर रा॥ बापूजीपंत जोशी विनंती करितील त्यावरून श्रुत होईल. हे विज्ञापना.

नं. ५५८० श्री. ( ज्येष्ठ व० १०—१६ जून. )

विनंती विशेष. आतांच पुणेंचें पत्र आलें त्यांतील वर्तमान शिंद्याची स्वारी शुक्रवारीं शहरांत येऊन राजश्री नारोपंत चक्रदेव व श्री॥ कैलासवासी नानांच्या निसबतीच्यांस कैद केलें व श्री॥ राजश्री अमृरावसाहेब यांस कैद केलें. कोणाच्या सांगण्यांत हातीं सांपडले नाहीं असें आहे. परंतु सांपडले आहेत. चौक्या वाड्यांत अद्यापवत् आहेत. बाहेरील माणूस आंत येऊं देत नाहींत. शहरांत बहुत गडबड जाली आहे. उभयतां[3] खासे सुद्धां कैद होतील आजचा सुमार पाहतां. असें लिहिलें[2]

---

१ अमृतराव, २ हें खोटें, ३ बाजीराव व चिमाजी आपा.

आहे. अडीच दिवसांचा जासुद आला आहे. कृपा करावी हे विनंती. खासे शिंदे भृगुवारीं सायंकाळपर्यंत आंत होते असें जासुदाच्या सांगण्यांत. रात्रीस हा निघोन आला. पुढें काय जालें न कळे. कळावें हे विनंती.

नं. ५५८१ श्रीगणपतिर्जयति. (ज्येष्ठ व० १०–१६ जून.)

पै॥ छ० २७ मोहरम. ज्येष्ठ. सन इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. पुण्याहून सरंजाम करकंब मंगळवेढ्याकडे रवाना जाल्याचें ऐकून कांहीं स्वांर व पायदळ ती॥ मातुश्री काकूनीं हरिपुराहून रा॥ मोरो धोंडदेव कुंटे याजबरोबर रवाना केलें ते जाऊन पोंहचलेच आहेत. येथूनही थोडाबहुत सरंजाम रवाना केला आहे. मजबुती करून सावधगिरीनें रहावयाविशीं लिहिलें आहे. श्रीकृपेंकरून घडेल तें प्रमाण. उंटांविशीं लिहिलें, त्यास उंटें येथें मिळत नाहींत. येविशीं परवां विनंती लिहिली आहे. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५८२ श्री. (ज्येष्ठ व० १०–१६ जून.)

नक्कल.

पै॥ छ० २४ मोहरम.

सेवेसीं जिवाजी रामचंद्र. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २२ मोहरमपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं कृपा करून पत्र पाठविलें तें पावोन लिहिला मजकूर कळों आला. पत्रीं आज्ञा “पेशजी रा॥ धोंडोपंत व आम्ही व चिंतामणराव आपा यांचें बोलणें जाहलें त्यांत त्रिवर्गानीं एकत्र होऊन चार रुपये मिळवून शत्रूचें पारिपत्य करावें” त्याचें काय केलें तें लिहिणें. शत्रु दिवसेंदिवस जास्ती होतो त्याचा विचार करून लिहिणें. रा॥ धोंडोपंत यांचें म्हणणें होतें (कीं) सावनूर तालुक्यांत जावें, पोट भरावें, वाघाचें पारिपत्य करावें. त्यास तुम्ही येविशींचा गोखले यांजवळ समाचार घेऊन वाघाकडे चाल करीत असले तर निश्चय करून उत्तर पाठविणें; म्हणजे त्यासारखे आम्ही येतों. चार दिवस त्रिवर्ग पोट भरून तालुक्याचा बंदोबस्त करूं. असें होत असल्यास उत्तर यावें. नाहींतर आमचें पोट कसें भरतें ? आम्हांस बारीपार जावें लागतें. विचारून उत्तर ल्याहावें.” म्हणून आज्ञा, ऐसियास आपले आज्ञेप्रमाणें रा॥ धोंडोपंत

१ विठ्ठलराव पांडुरंग यांचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र नेरदळाहून. २ पत्र लिहिणार हे सांगलीकर चिंतामणराव यांचे कारभारी. यांचें हें हरि परशुराम यांस पत्र.

दादा गोखले यांस लिहिलेअन्वयें विचारिलें. त्यांचे बोलणेंतील भाव " जे समयीं आम्ही बोललों ते समयीं वाघ डंबळास होता. आम्ही जाऊन सावनुरांत शिरलों असतों म्हणजे बोललेप्रमाणें घडतें. आतां वाघ सावनुरांत आला. इकडील चारपांच ठाणीं घेतलीं व आणखी घेणेंचे तजविजेंत आहे. त्याजवळ सामान पोक्त आणि सावनुरांत शिरला आहे, येविशींचा मनसबा पोक्त्या उपर करून गेलें पाहिजे. कागदोपत्रीं काय काय म्हणोन लिहावें. तिकडून कारकून यावा, त्याशी सविस्तर बोलूं, नंतर याचा विचार." असें बोलले. त्यास स्वामीनीं कोणीतरी येविशींचें बोलावयास गोखले याशीं बोलावयास पाठवावें म्हणजे सर्व समजून विनंती करितील. मिश्रीकोट वाघानें घेतलेचें वर्तमान आलें आहे. राहिलीं ठाणीं घेत आहे याचा विचार स्वामीनीं पोक्त करून दिनमेकावर घालविल्यास वीस लक्षांचा तालुका जातो. मारेहाळाकडे जाऊन शत्रूस शेर केला. असें लोक म्हणतात. गोखले यांचे महाल नाहींत. त्याणीं काळजी कां करावी? आपण करावी; ते माघारे सरकून गेलां! शहापूर प्रांतांत लुटालूट जाहली म्हणोन कमाविसदारांचीं नित्यांनीं पत्रें येतात. संरक्षण केल्यास चार रुपये घरांत येतील हेंही सेवकानें काय ल्याहावें? सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५८३ श्री. ( ज्येष्ठ व० ११—१७ जून. )

पै॥ छ० २८ मोहरम सुरुसन इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. ता॥ छ० २३ मोहरम भौमवासर प्रातःकाल सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत रा॥ मोरोबादादा यांस पत्रें जावयाचें शिंदे याचें विचारें ठरोन छ० २१ मोहरम रविवारीं सांडणीस्वारां बरोबर पत्रें गेलीं. पत्रें पावतांच चार कोश निघोन आले. छ० २२ मोहरम काल इंदुवारीं खेडानजीक येणार होते. आज अथवा उदयीक श्रीमंतांच्या भेटी होणार. दादानीं व बळवंतराव नागनाथ व आपाजीपंत गोंधळेकर व बाळोजी कुंजर याणीं मिळोन दौलतीचा कारभार करावा याप्रमाण शिंदे याणीं श्रीमंतांचे विचारें ठराविलें आहे. पुढें काय घडतें न कळे. विचार येक होत असतो आणि अकस्मात् भलतीच गोष्ट घडोन येते! याप्रमाणें भुलथाप होते. याजकारितां प्रमाण घडोन येईल तें त्य! शहरांत तो लोक भयाभीत आहेत. स्वामींचें पत्र श्रीमंत रा॥ मोरोबा दादा यांस यावें याप्रमाणें रा॥ बाळाजी नाईक भिडे याणीं सांगितल्यावरून सेवेशीं लिहिलें आहे. त्याप्रमाणें पत्रही स्वामींकडून रवाना जालेंच असेल. रा॥ बाळाजी नाईक याणीं दोन

वेळां मला बोलावून नेलें होतें. "दादानीं कारभार करावा याप्रमाणें ठरलें आहे. त्यास मोरोबा दादा यांचा मानस कीं, गंगाधररावजी यांचा आपला स्नेह असावा याप्रमाणें बहुत आहे. यास्तव तुमचें पत्र मिरजेहून लौकर यावें" म्हणोन पुसतात. त्यास पत्र स्वामींचें रवाना जालेंच असेल. नसल्यास पत्र रवाना व्हावें. मर्जीस आल्यास पत्रें यावीं. उगीच स्नेहवृत्तीचें पत्र आलें असतां चिंता नाहीं. श्रीमंत रा॥ मोरोबा दादा यांस आणावयास पुरंदरे यांस रवाना केलें. चार पांच पागा, पुरंदरे यांचें पतक, अंबारी, दोन हत्ती खुले, कांहीं गाडद, याप्रमाणें रवाना जाहले आहेत. अस्त जाहल्याचे पूर्वीं श्रीमंतांच्या भेटी व्हाव्या याप्रमाणें विचार ठरला आहे. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५८४ श्री. (ज्येष्ठ व० ११–१७ जून.)

पै॥ छ० २८ मोहरम सु॥ इहिदे मय्यातैन व अलफ.

आषाढ शुद्ध ७ रविवासर.

विज्ञापना[1] ता॥ छ० २३ मोहरम भौमवार प्रातःकाल सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींस पत्रें छ० २० मोहरम मंदवारचीं पाठविलीं आहेत त्या पत्रीं मजकूर लिहिला आहे. त्यानंतर रा॥ लक्ष्मणराव चक्रदेव रात्रीस पळोन जात होते. तोफखान्याजवळ चौकीदारानीं धरिले. वाड्यांत दाखल केले. छ० २१ मोहरमीं रा॥ दादा गद्रे व रा॥ बाजीपंत अण्णा यांचे पुत्रास वाड्यांत नेलें आहे. झाडून मंडळी वाड्यांतच आहेत. चौकशी होणें आहे. नानांचे वाड्यांत आरब आंतील चौकांत व दिवाणखान्यांत शिरले आहेत. नानांकडील राघोपंत पेणसे व भाऊ कापशे लोहोगड किल्यास पळोन गेले ऐसी बातमी आहे. वाड्यांत तो नाहींत. वरकड कारकून मंडळी वाड्यांत नाहीं. रा॥ बाळकृष्णपंत बाळ पुण्यांतच कोठेंतरी आहेत. पुढें काय घडतें न कळे. सुधानामक यांस मोठी चिंता प्राप्त जाली आहे. त्यांजवर दंगा करावा ऐसें लौकिकांत बोलतात. काय घडतें न कळे. अद्यापवत मंडळी वाड्यांत आहे. वाड्यांत कांहीं लोक शिंदे यांचे, कांहीं सरकारचे. वाड्यासभोंवते शिंदे यांजकडील दोन पलटणें, दहा पंधरा पलटणी-तोफा, याप्रमाणें सरंजाम आहे. सरकारचे वाड्यांत बंदी आहे. कोणी जात नाहीं. सरकारनि॥ मात्र असेल त्याणीं जावें. दिल्लीदरवाजावर घाटगे

---

१ हें व पुढच्या नंबरचें पत्र वकील मोरोपंत परांजपे यांनीं मिरजेस बाळासाहेबांस लिहिलीं

याजकडील येक कारकून व सरकारचे दोन कारकून आहेत. कंपूकडील लोक दरवाज्यांत आहेत. कांहीं लोक सरकारचेही आहेत. गृहस्थांस कैद केलें त्या दिवशीं मीं सरकारवाड्यांत गेलों होतों. बंदी जाल्यानंतर कारभार उरकोन पंधरा घटका रात्रीस स्वारी शिंदे यांची गोटास गेल्यानंतर दरवाजावर चौकसी होऊन पांच चारशें ब्राह्मण मंडळी वाड्यांत होते त्यांस बाहेर काढून दिलें. शामीरखानाची समजी जाली यामुळें दंगा वाड्यांत जाहला नाहीं. नाहींतर वाड्यांत तरवार चालावी ऐसाच विचार जाहला होता. सर्वांची तोंडें सुकोन गेलीं होतीं. ईश्वेरें खैर केली. जासुदाची रवानगी लौकर जाली पाहिजे. सेवेसीं विदित हे होय विज्ञापना.

नं. ५५८५ श्री. ( ज्येष्ठ व० ११--१७ जून. )

पै॥ छ० २८ मोहरम सुरूसन इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. ता॥ छ० २३ भौमवार सायंकाळ घटका दिवस. प्रातःकालीं इकडील वृत्त लेहून जासूद रवाना केला इतक्यांत भवानी पेठेंत दोन पलटणें व फौजा येऊन शहामीरखान याच्या वाड्यास दहाबारा तोफा लाविल्या. पांच घटका दिवस पावेतों लढाई जाली. इकडील तिकडील मिळोन दोनशें माणूस लढाईंत पडलें. शें दीडशें जखमी जाहलें. पांच घटका दिवसास शामीरखान याचा लेक पडिला. नंतर आपले बायकांस मारून वाड्याबाहेर पडिला. घोड्यावर बसते समयीं मांडीस गोळी लागली. इतक्यांत शिंदे यांजकडील पठाण येऊन घोड्यावर बसवून घेऊन गेले. खैर आहे. पठाणानीं वचन देऊन नेलें. सहावे घटकेस नानांचे वाड्यास तोफा लागू केल्या. सायंकाळचा सहा घटका दिवस पावेतों तोफा चालिल्या. परंतु उत्तरेकडील मात्र सोप्याचा कोन पडला. खपरेल ढांसळलें. आरब हटले नाहीं. त्यानीं सरकारचे लोक दहा वीस ठार केले. अद्यापि समजी जाली नाहीं. श्रीमंत रा॥ पंत प्रधान यांची मर्जी कठिण आहे. "वाडा पाडावा. पारिपत्य करावें. निदानीं वाडा जाळावा. परंतु आरब शेर जाहले आहेत, जागां जागां शहरांत कलागत करून खून करितात, यास्तव पारिपत्यच करावें." याप्रमाणें ताकीद आहे. उद्यीक काय घडतें श्रीसत्ता ! भवानी पेठ व गंजपेठेचा शेरा व वेताळ पेठ लुटली गेली. गरीब नागवले. उद्यीक विवेक काय होतो न कळे. शहरांत भय प्राप्त जाहलें आहे. श्रीकृपेंकरून घडेल तें प्रमाण. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५८६ श्री. ( ज्येष्ठ० व १२– १९ जून. )

पै॥ छ० २८ मोहरम इहिदे मय्यातैन व अलुफ.

सेवेशीं येसाजीराम कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० २५ मोहरमपर्यंत असे. विशेष. इकडील वर्तमान तर सावनूर तालुका तर वाघानें बहुतेक घेतला. राजश्री वासुदेवकाका सावनुरास सांपडले त्यांस बहुत उपद्रव करीत आहेत. वाघाची प्रबलता बहुत दिसते. मुळगुंद वगैरे घेतलें. झाडून देसक पाळेगार वगैरे त्यास सामील आहेत. पंचवीस हजारपर्यंत जमाव आहे. श्री॥ राजश्री बाबासाहेब मारेहाळ मोदगें येथें पेठ तालुक्यांत आहेत. हजार दीड हजार फौज व पेंढार दीड हजारपर्यंत आहे. तमाम दिगरगांवांस रोखे करून मनस्वी घासदाणा घेत आहेत. मारेहाळा-पासून सहा हजार ( रुपये घेतले. ) मोदगें तर अगदींच मारिलें. धामणें लुटून जाळून टाकिलें. याप्रमाणें अवस्था. मागाहून श्री॥ राजश्री दाजीसाहेब यांस मिळावयास येतात. गोकाकेवर आले. इकडे मास दोन मास क्रमिणार. कित्तुर तालुकेंत कही वगैरे जाते. परस्पर मारामारीही होते. इकडे दोन मास राहिले असतां तालुक्यांत पायमल्लीखालीं बाकी रहात नाहीं. राजश्री धोंडो-पंतदादा गोखले रुद्रापुरावर कित्तूर तालुक्यांत. नजीकच श्री॥ राजश्री चिंता-मणराव आपा आहेत म्हणून वर्तमान आहे. सामानगडकरी मालजी लोंढा व रामाजी नाईक हजार पांचशें लोक नेसरी दड्डी धरून आहेत. कर्या-तीवर स्वांरी करून मारून न्यावी ही मसलत फार आहे. जागजागां चौक्या बातमी राखून सावध आहों. स्वामींचे प्रतापें घडेल तें खरें. ... सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५८७ श्री. ( वैशाख–जून. )

सेवेशीं धोंडो अनंत कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना ऐसी जे, वाघा-कडील वर्तमान—डंबळास होता तेथून डंबळ घेऊन देसाई याचे हवालीं केलें. गद-गही देसाई याचे हवालीं केलें. पांच लाख रुपये घेतले. त्यानंतर लक्ष्मेश्वर मारून अगदीं लुटून मुळगुंदची खंडणी करून व आणिगिरी व कुंदगोळ व नवलगुंद नरगुंदची खंडणी करून सावनुरास गेला. सावनूर घेतलें. तेथें राजश्री वासुदेवकाका सांपडले. त्यांस कैद केलें. सावनूर महाल सारे घेतले. हावनूर मासूर व राणे-

---

१ पत्र मिरजेस बाळासाहेबांस. २ पत्र रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस अनगोळ-नजीक बेळगांव येथून.

बिदनूर मात्र तीन राहिलीं. तींही घेईल. राजश्री बाळकृष्णपंत सावनुरीं होते ते तुंगापार फिरंग्याचे तालुक्यांत गेले असें वर्तमान आहे. तडसचें ठाणें वाघानें घेतलें. हुबळीस येणार याप्रमाणें वर्तमान. गोखला मुरगुडाजवळ रुद्रापुरावर आहे. नदी उतरून पुढें जात नाहीं. वाघाचे दहशतीमुळें. पुढें काय मसलत करितात पहावी. कित्तूरकर रोज कहीचीं घोडीं बाबांचे लष्करचीं पाडून नेतात. गोखल्याचें त्याचें सख्य आहे. तो सांगतो कीं करणें. त्याजवरून करितो ! मलप्रभा उतरून दाक्षिणतीरास सध्या कोणी जात नाहीं असें दिसतें. मग काय मसलत कारितात पहावें. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. ५५८८ श्री. ( १८ जून. )

पै॥ छ० ३ सफर. गुरुवार अस्तमान.

अपत्यें[1] रामचंद्र श्रीधर काळे शिरसा॥ नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत जेष्ठ वद्य द्वादाशीपर्यंत पुण्यांत सुखी आहें. विशेष. परवां बनाजी जासूद याजबरोबर पत्रें पाठविलीं आहेत त्याजवरून कळेल. अली-कडील मजकूर तर ज्या दिवशीं चक्रदेव यांस कैद केलें तेव्हां सरकारचे लोक वाड्यांत होते. शामीरखान रोहिला पांचशें लोकांनिशीं आंत होते. शिंदे यांजकडीलही पांचसातशें लोक वाड्यांत होते. जेव्हां मंडळी कैद केले तेव्हां शामीरखान याणें कांहीं वांकडें बोलला कीं, " मंडळी धरावयाचें प्रयोजन काय ? त्यांस सोडून देणें. अथवा आमचा विसा वर्षांचा फडशा तलबेचा करणें. हें होत नसल्यास तरवार चालेल." ऐसें गुरकावतांच सर्वांस जड पडलें. तेव्हां शामीरखान याची तोड पडावयास एक प्रहर लागला. खुद्द श्रीमंतानीं सांगितलें कीं, आमचे कारकून आम्हीं कैद केले. तुम्ही सरकारचाकर असतां दंगा करणें ठीक नाहीं. जो तुमचा तलबेचा फडशा होणें तो आम्ही करवून देऊं. तुम्ही जमातसुद्धां बाहीर जाणें. तेव्हां शामीरखान आपले कारकुनास बरोबर घेऊन वाड्यांतून बाहेर निघोन आपले वाड्यास गेला. त्याचा कारकून विनायकपंत घांगरेकर म्हणोन आहे त्यासही कैद करणार आहेत हें समजून त्यासुद्धां गेला. इतकी गोष्ट होण्यास शुक्रवारीं बारा घटका रात्र जाली. नंतर शिंदे यांची स्वारी डेरियास गेली. बजाबा शिराळेकर याजकडील पांच सातशें आरब आहेत. कांहीं निजसुरे यांजकडील आहेत.

१ हरीपंत बाबा, परशुरामभाऊचे दुसरे चिरंजीव, यांच्या. २ हें व पुढच्या नंबरचें अशीं दोन्ही पत्रें रामचंद्रपंत आपास लिहिलेलीं.

ते आरब त्या दिवशीं कैलासवासी नाना फडणीस यांचे वाड्यांत शिरले. तैसेच तुळसीबागपर्यंत पांच सात वाड्यानीं आहेत. चक्रदेव यांचे घरीं आहेत. त्याणीं जंग धारिला कीं, बजाबा वगैरे कैद केलेत, तेव्हां आमचे तलबेचा फडशा कोण करतो ? तलबेचा फडशा करणें. आम्ही पार होऊन जाऊं. ऐसें म्हणूं लागले. तेव्हां मागती शिंदे यांचे कारभारी दशमीच्या दिवशीं सरकारवाड्यांत येऊन मनसबा ठराविला कीं, आरब आणि शामीरखान यांचें पारिपत्य करितों. हें ठरवून एकादशी मंगळवारीं प्रातःकाळीं एक पलटण येऊन शामीरखान याचे घरावर तोफा लागू केल्या. तेथें रोहिल्यांचे पलटणचें झूज जाहलें. प्रथम पलटणच्या दोन तोफा शामीरखान याणें आणिल्या. तिकडील इकडील शंभरपर्यंत माणून जायां जालें. वेताळपेठ आणि चौथाई भवानीपेठ ऐसी लुटून टाकिली. नंतर शामीरखान कत्तल होऊन जातो तेव्हां शिंदे यांजकडील पठाण मध्यस्थ पडून सलुखाने दीडशें दोनशें माणसांनिशीं शिंदे यांजकडे घेऊन गेले. याजउपरी शामीरखानाचा ग्रंथ समाप्त जाहलासा वाटतो. मग कळेना. तेव्हांच (सरकार) वाड्यापाशीं शिंदे यांचीं दोन पलटणें होतीं त्याणीं नानांचे वाड्यास तोफा लागू केल्या. रस्त्यांतून तोफा वाड्यास लागू होईनात. दोनप्रहरपर्यंत शेंपन्नास गोळे मारिले. परंतु लागू जाले नाहीं. आरबांनीं वाड्यावरून दहा वीस माणूस जायां केलें. फारच निकड करावी तर शहर मारलें जातें म्हणोन तृतीय प्रहरापासोन आरबांसीं बोलणें लाविलें आह. तेव्हांपासून गोळी बंद आहे. तह जाहल्यास कलह तुटला. नाहीं तर जें होणें असेल तें होईल. परंतु याजउपरी वाढत नाहींसें वाटतें. कळावें. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५८९ श्री. ( ज्येष्ठ व. १२–१८ जून. )

विज्ञापना. आरबांचा व शामीरखानाचा मजकूर लिहिलाच आहे. त्यास आरबांचा तह ठरला. राजेबहाद्दर दरम्यान घेतले. आरब वीस कोस पार करून द्यावे ऐसें ठरलें. वाड्यांत मंडळी कैद केली होती त्यांस शृंखलाबंधन होऊन शिवनेरीस पाठविलें म्हणोन वर्तमान आइकलें. फार करून खरेंच असेल. मी शुक्रवारापासोन सरकारवाड्यांत गेलों नाहीं. बिऱ्हाडींच आहें. लपून राहिलों नाहीं. जर लपून रहावें तर चक्रदेव याचे व्हावें ! मला पळावयाचें नाहीं म्हणोन स्वस्थ आहें. आपलें पुण्य आहे तर मला कोण उपद्रव करितो ? मग जें दैवीं असेल तें होईल ! चुकणार नाहीं. शिंदे यांचे घरीं घाटगे यांसीं संधान

केलें आहे. एक दोन दिवशीं भेटीस जातों. श्रीमंतांस पुसोन जातों. म[...] जें होणें तें होईल. येथें कांहीं दिक्क राहिला नाहीं. जो बळी तो मारतो ऐसें घ[...]डलें आहे. वडिलीं अवसान सोडूं नये. मी जर येथें आमची गति काय म्हण[...]न पायां पडूं लागलों तर पुसणार नाहींत. जमीयतदार यास आपणच ( होऊन ? ) पुसतील ! परंतु एक चित्तांत असूं द्यावें. याजउपरी जशी आज्ञा श्री॥ राजश्री[1] बाबासाहेब करितील तशी वर्तणूक करीत असतां पार पडों. नाहीं तर कल्याण व्हावयाचें नाहीं. आजपर्यंत मागील दौलतींतील कारभारी माणसें होतीं तीं सारीं कैद जालीं. याजउपरी श्रीमंतांस व नवे कारभारी यांस दरद कांहीं राहिली नाहीं. निर्भर जाले आहेत. तेव्हां याजउपरी जशी आज्ञा श्रीमंत करितील तशी वर्तणूक आपणाकडून व्हावी. लाख रुपयांस कर्जभरू जाहलों ही फिर्याद येथें लागावयाची नाहीं. याजउपरी श्रीमंतांचे मर्जीप्रमाणें वर्तावें तरच अन्नवस्त्र. नाहीं तर ठीक नाहीं. कळावें. येथून लिहीन अथवा श्रीमंतांचीं पत्रें येतील तैसें घडावें. श्रीमंत सांबाचा अवतार आहेत. आमचे दैवानें फलद्रूप जाहालियासही होतील. यांची मर्जी रुष्ट करून घेतल्यानें परिच्छिन्न परिणाम लागणार नाहीं. काल बळवंतराव नागनाथ मजपाशीं म्हणत होते कीं नारायणराव घोरपडे मुधोळकर यांचीं घोडीं तुम्हीं घेतलीं आहेत तीं आणून येथें हवालीं करणें, आणि आबा काळे याजकडील महाल हवालीं करावे, ऐसें श्रीमंतानीं तुम्हांस सांगावयास सांगितलें आहे. त्यास येथें जाबसाल करीन म्हटलें तर परिणाम लागावयाचा नाहीं. अथवा रदबदली करा म्हटल्यास जागा राहिली नाही. जशी आज्ञा करितील तैशी वर्तणूक करून राहिल्यानें कालक्षेप होईल. त्यास उत्तरें कशीं करूं ? आइकलें वर्तमान कळावें. मर्जी असेल तैसें ल्याहावें म्हणजे तसेंच उत्तर सांगेन. येथें घोरपडे यांचे घोड्यांविशीं शिंदे यांचा नेट आणि श्रीमंतांचा आग्रह, तेव्हां बोलून परिणाम नाहीं. मीही विनंती करावयास सांगितलें आहे कीं, आम्ही घोडीं घेतलीं तीं घरपागेस लाविलीं नाहीं. सरकारपागाच केली आहे. बोलणारे म्हणतात कीं, किती घोडीं आलीं पाहिजेत ? आजपर्यंत चक्रदेव वगैरे होते याजमुळें सरकारांतून निस्सीम आज्ञा होत नव्हती. याजउपरी बिनदिक्कत आज्ञा होती. त्यास कसें बोलावें ती आज्ञा होत जावी. तैसेंच बोलेन. परंतु विचार व्हावा हें चांगलें. रवाना द्वादशी बुधवार. हे विज्ञापना.

---

१ बाजीरावसाहेब.

नं. ५५९० ( १९ जून. )

रामराव भावे नरगुंदकर यांचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र. ज्येष्ठ व० १२ बुधवारचें—

" कंपूवाले सरंजामसुद्धा जुगुळावरी आहेत. मिरज तालुक्यांत घासदाण्याचा वगैरे उपद्रव करितात. पुण्याहूनही फौजा येणार म्हणून इकडे बाजारी वदंता बोलतात. याजकरितां आपणाकडील वगैरे सर्व वर्तमान लिहून पाठवावें. इकडील वर्तमान तरी रा॥ धोंडजी वाघ याणीं कर्नाटक प्रांतीं बहुत आक्रम केला. तमाम ठाणीं घातलीं. मुख्य मुख्य दोन चार स्थळें राहिलीं आहेत. सावनुरास अमल त्याचा बसला. हुबळीसही येणार. पुढें काय घडतें पहावें. रा॥ बाबासाहेब शाहापूर प्रांतीं आहेत व धोंडोपंत गोखले मुरगोड तालुक्यांत रुद्रापुरावर आहेत. "

नं. ५५९१ ( २१ जून. )

परशुराम याचें शिंद्याच्या लष्करांतून पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र ज्येष्ठ व॥ १४ चें—

" आम्हांकडील वर्तमान तूर्त यथास्थित आहे. रा॥ सखाराम घाटगे सर्जेराव बापू यांजवळ आहों. ते बहुत कृपा करितात. चार काजकामें सांगतात. तिकडे पलटणें व फौज शिंदे यांची आहे त्यांस मिरजेस उपद्रव करावा म्हणून आज्ञा आहे हें वर्तमान आम्हास कळलें. त्यास आपण बहुत सावधपणें असावें. कंपूकडील माणूस गांवांत न ये तें करावें."

नं. ५५९२ श्री. ( ज्येष्ठ व० १४–२१ जून. )

पै॥ छ० २७ मोहरम. सन इहिदे मय्यातैन ज्येष्ठमास.

सेवेसीं अर्जी[1] परवगौडा पाटील कसबे सांगली कृतानेक साष्टांग दंडवत विनंती विज्ञापना ऐसी जे, कंपूचे लष्करचा रोखा कुपवडेंस आला हें वर्तमान कळलें. दुसरे दिवशीं ठाणें आहे म्हणोन स्वारी येते ऐसी बातमी समजलेवरी रा॥ बापूजीपंत कुलकर्णी यांस लष्करास पाठविलें. तेथें जाऊन पोहोंचले तों रोखा व स्वार तयार जाहले होते. जाऊन भेटलेनंतर कुलकर्णी मजकूर यांस पहाऱ्यांत बैसविलें. पेशजी रोखा घेऊन स्वार पन्नास असामी आले होते. रोखा ( आम्ही ) माघारा टाकिला. सबब राग बहुत करून बैसविलें. रोखा ज्या तेरखेपासून जाहला आहे त्या तेरखेपासून पन्नास स्वारांचा

१ अर्जी बाळासाहेब मिरजकर यांस

रोज द्यावा याप्रमाणें बोलतात. रदबदलीमुळें ठराव चांदवडीस सत्तेचाळीसशें ऐन सरकार, खेरीज दरबारखर्च अंतस्थ, याप्रमाणें रुपये चांदवडी तीन दिवसांत फडशा करून दिलेस हे बोली प्रमाण ठराव. ऐवज न पावल्यास गांवचा बचाव व्हावयाचा नाहीं. ऐसी बोली ठरली आहे. येविशी धण्यास अर्जदास्त लिहिलें जे, रात्रौ जाबसाल लष्करास पोहोंचविला पाहिजे. जाबसाल न पोहोंचल्यास सूर्योदयीं स्वार येणार. आज्ञा जाहली पाहिजे. त्याप्रमाणें वर्तणूक करूं. दुसाला खंडणी केली त्यास ऐवजाची हरकत पडली हें सेवेसी विदितच आहे. पुढें खंडणी केलिया निभावणी कैसी ? हें धण्यानीं आज्ञा केली पाहिजे. तेथें ठराव जाहल्या यादीची नक्कल पाठविली आहे. 'हरिपुर (सांगली) कसबेच्या रानांतलें. त्याचेही खंडणीचा जाबसाल तुम्ही करून द्यावा' (म्हणतात.) तेव्हां हरिपुरचा जाबसाल आम्ही कैसा करावा ? तो जाबसाल आम्हांकडे[1] नाहीं म्हणोन बोलिल्यानंतर 'इकडे आम्ही पाहून घेतों' असें बोलिले. येक दोन दिवसांत स्वांरी तिकडे जाणार. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५५९३ श्रीगणपति. (२२ जून.)

पौ॥० छ २९ मोहरम. इंदुवार सन इहिदे मय्यातैन व अलफ.

अपत्यें रामचंद्रानें सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ ज्येष्ठ व॥ ३० रविवार पर्यंत मुकाम गुडदहाळ नजीक गलगलें येथें सुखरूप असें. विशेष. वडिलीं छ० २४ मोहरम बुधवार अस्तमानचीं पत्रें पाठविलीं ती मंदवार अस्तमान दोन घटिकांस मुकाम मजकुरीं पावलीं. पुण्याचें पत्र आलेलें पाहिलें. कृष्णा उत्तरतीरीं लौकर यावें, त्यास ती॥ राजश्री दादांकडील[2] पत्राचा जाब आला त्यांतील मजकूर कळला. चिरंजीव उभयतां व गोखले यांस आणवावें, मालगांवावर पलटणें आलीं, म्हणोन लिहिलें तें सर्व कळलें. वडिलांचे आज्ञेप्रमाणें काल आठ कोस मुकाम मजकुरीं आलों. आज पुढें जमाखिंडीचे कोणुरास येतों. पुढें कृष्णा कोठें उतरूं ? चिरंजीव राजश्री नारायणराव (व) ती॥ राजश्री दादा फौजेसह कोठें राहतात, त्यांस कोणते स्थळीं येऊन मिळूं, हें वडिलीं लिहिलें पाहिजे. त्यासारखें करीन. रा॥ भास्करपंत[3] मामांस टोकरे जमा करणेंविशीं लिहिलें आहे. चिरंजीव राजश्री चिंतामणरावआपांकडे जलद

---

१ हरिपुर चिंतामणराव आपांचें. सांगली आम्हांकडे म्हणजे मिरजकरांकडे आहे. २ पत्र बाळासाहेबांस मिरजेस. ३ जमाखिंडीचे कमाविसदार. उपनांव सहस्रबुद्धे.

लिहिलें आहे. चिरंजीव राजश्री बाबांकडे लिहिलें, परंतु इंग्रज सावनूराकडे येणार ( ते आम्हांस ) तें सामान पाहिजे म्हणतात. यास्तव लागूंचीं पत्रें आलेलीं काल पाठविलीं आहेत. त्या रोखें बाबा आहेत. तिकडील पुर्तेपणीं कळेल तसें करितील. तेंही काम हातीं लागेल तर मोठेंच आहे. गोखले यांचा प्रकार तरी प्रामाणिक माणूस ! या दिवशीं संगतीचे उपयोगी नव्हेत. आणि दरमहा पावणे दोन लक्ष रुपये त्यांस खर्चास दिले पाहिजे. आणि कोण वेळेस कसे करितील हें प्रमाण नाहीं ! आम्हांकडे चिरंजीव राजश्री बाबा फडणिसांकडून पत्रें आलीं नाहींत. पुण्याचें पत्र पाहून पाठविलें आहे. कांहीं सुचत नाहीं. पलटणें तेथें आहेत कीं पुढें गेलीं ( ही ) आज्ञा करावी. पलटणांत आनवरी म्हणोन एक पलटणाचा सरदार आहे. आपले लक्षांतील थोर माणूस आहे. तिकडे बातमी कळत जाईल. मीं इकडून आजच त्यास पत्रें पाठविलीं आहेत. इमाम ढालाईत त्याचे ओळखीचा त्याजकडे पाठविला आहे. वडिलांकडे येईल. हे विज्ञापना.

नं. ५५९४ श्रीशंकर. (ज्येष्ठ व० ३०–२२ जून.)

राजश्री गंगाधररावजी गोसावी यांसी.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित भगवंतराव बाजी घाटगे. दंडवत. विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असावें. विशेष. चिरंजीवाचे लग्नाकरितां सावंताचे वाडीस गेलों होतों. कार्यसिद्धि करून छ० २६ भृगुवारीं कुरुंदवाडचे मुक्कामास आलों. आज नदी उतरोन आपणापाशीं मुक्कामास येतों. कंपूचे लष्करचा मुक्काम कोणे ठिकाणीं, कोणीकडे जाणार, हें सविस्तर समजावें यास्तव सूचनार्थ लिहिलें असे. बहुत काय लिहिणें लोभ असों द्यावा हे विनंती.

नं. ५५९५ श्री. ( २३ जून. )

पै॥ छ० २९ मोहरम. सन इहिदे मय्यातैन. आषाढ.

श्रीमंत राजश्री बाळा साहेब स्वामीचे सेवेसीं पोष्य समस्त ब्राह्मण कसबे सांगली. साष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम ता॥ आषाढ शु॥ १ इंदुवार पावेतों क्षेम असों. विशेष. कंपूचे खंडणोचे पट्टीचा फार घोळ पडला आहे. अबूरर[1] गोष्ट आली. त्यास कृपा करून शहाणा कारकून आज सायंकाळ पावेतों ( कंपूवाल्यांकडे ) पाठवावा. तो सांगेल त्याप्रमाणें पैका देऊं. कारकून आज

---

१ मलवडीकर.

न आल्यास आमची अब्रू राहत नाहीं. बहुत काय लिहिणें विदि होय हे विज्ञापवा.

नं. ५५९६ श्री. (२३ जून.)

आश्रित रामचंद्र दीक्षित. अनेक आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत आषाढ शु॥ १ इंदुवासर जाणोन स्वकीय कुशललेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. आपण राजश्री नागोजीपंत यांजबरोबर पत्र पाठविलें तें पावलें. इकडेही याप्रमाणेंच वर्तमान आहे. कळावें. यानंतर श्री॥ राजश्री दादासाहेब यांस ( आपण ) मृगसालीं पांच हजार रुपये द्यावे अगर शिरढोणची कमाविशी सांगावी याप्रमाणें आमचे विद्यमानें करार जाहला आहे. तसेंच जमीन द्यावयाचें करारांत आलें आहे. त्याप्रमाणें विल्हेस लावून द्यावें म्हणोन श्रीमंतानीं दोन वेळां ( मला ) विचारलेवरोन आपणांस लिहिलें आहे. येविशींचा जाबसाल विल्हेस लावून द्यावयाची आज्ञा जाहली पाहिजे. काल पुणेंहून पत्रें आलीं. नाना फडणीस याचे वाड्यांत कांहीं कारकूनमंडळी होती ती शिंदे मागत होते. आरब तेथें जमा जाहले होते त्याणीं हातीं दिलें नाहींत याजकारितां मंगळवारीं तोफा लावून वाडा कांहींसा पाडिला. कारकून मंडळी कांहीं सांपडली. कांहीं पळाले. आरबही कांहीं जायांजखमी जाले. वरकड वाट सांपडेल तिकडे गेले. याप्रमाणें वर्तमान जाहलें. आपणाकडे पत्र आलें असेल तें कळवावें. श्री॥ राजश्री ( रामचंद्रपंत ) आपासाहेब गलगल्यानजीक आहेत. तिकडून आठ दिवसांत कांहीं वर्तमान आलें नाहीं. वाघानें लक्ष्मेश्वर घेऊन देसाई याचे स्वाधीन केलें. याप्रमाणें वर्तमान आहे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. ५५९७ श्री. ( ज्येष्ठ व० ७ श० १७२१
( २४ जून १७९९. )

पै॥ छ० २० मोहरम सन मय्यातैन व अल्लफ. ज्येष्ठमास.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधर रावजी स्वामीचे सेवेशीं. पोष्य नारो विनायक सा॥ नमस्कार विनंति येथील कुशल ता॥ छ० १९ माहे मोहरम यथास्थित असे. विशेष. रा॥ बाळाजी कृष्ण निसबत शिंदे बाई यांचा मुक्काम तिकोटयावर आहे. तिकोटयाची वाडी होसहट्टी म्हणून आहे तेथें चौकी देऊन दहा हजार रुपये करार केले. दोन तीन रोज

१ रमाबाई घोरपडे इचलकरंजीकर यांस कुरुंदवाडाहून पत्र.

तिकाट्यास चौकी दिली आहे. गोळागोळी होत आहे. याप्रांतीं प्रजेस त्याणीं बहुत पीडा केली. बाईचीं पत्रें त्यास निघोंनं येणेंविशीं वरचेवर येत असतां दिवसगत करून उपद्रव करितात. तिकोटयाचा जाबसाल उरकल्यावर कोणोकडे जातात न कळे. रा॥ भाऊसाहेबांकडील लष्कर व शिंदे बाई व पागनीस यांच्या भेटी होऊन इत्यर्थ काय ठरला येविशींचें वर्तमान आलें असेल तें कळविलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ करावा हे विनंति.

नं. ५५९८ श्री. ( २४ जून. )

सेवेसी विज्ञापना. ' मुंगीचा राजा ' म्हणोन कोण दोनशें स्वार हजार पायदळ घेऊन गांवगन्ना घासदाणा घेत होता. खानापुराजवळ कारंजें म्हणोन आहे तेथें उतरला होता. मग खानापुरकरानीं व आठपाडीकरानीं जमाव करून तोफा दोन घेऊन जाऊन गांठ घातली. प्रातःकाळापासून दोन तीन प्रहरपर्यंत लढाई जाली. नंतर त्याचा मोड जाला. त्यास लुटला. दहाविसांनिशीं खासा पळून सावळजेकडून गेला. कोणीकडे गेला न कळे. याप्रमाणें तिसिंगीहून माणूस आला त्याणें वर्तमान सांगितलें. हे विज्ञापना.

नं. ५५९९ श्री. ( आषाढ शु० २–२४ जून. )

छ० ४ सफर. सन इहिदे मय्यातैन. आषाढ. शु० ५ भृगुवार.

विज्ञापना[1]. ता. छ० १ सफर भौमवार. प्रातःकाळ. सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री मोरोबादादा यांची व श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांची भेट काल इंदुवारीं दोन प्रहरीं जाहली. भांबवडें येथें वांकडे यांचे मळ्यांत रविवारीं दादांचा मुक्काम आला. सोमवारीं श्रीमंत त्रिवर्गांची स्वांरी जाऊन बागांत भेटी होऊन स्वांरी पुण्यास आली. श्रीमंत राजश्री पंतप्रधान व दादा एक अंबारीमध्यें बसोन आले. मोरोबादादा वृद्ध जाहले आहेत. श्रीमंतांनीं कृपा करून स्नेहाचारें भेटी जाहल्या. मागाहून विनंती लिहितों. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६०० श्री. ( आषाढ शु० २–२४ जून. )

छ० ४ सफर. सन इहिदे मय्यातैन. आषाढ.

विज्ञापना. श्रीमंत राजश्री पंतप्रधान व उभयतां श्रीमंत कैलासवासी नानांचे वाड्यांत स्वांरी आली होती. छ० २८ मोहरम रविवारीं सायंकाळचे

---

१ हें व पुढचीं पांच पत्रें मोरोपंत परांजपे वकील यानीं पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस लिहिलीं.

घटका दिवसास स्वांरी येऊन नानांचे स्त्रीचें[1] शांतवन करून अर्ध घटका स्वांरी राहून पुन्हां गणेश दरवाजेयानें पायउतारा वाड्यांत गेले. येतांनाही पायउताराच आले होते. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६०१ श्री. ( आषाढ शु. २–२४ जून. )

पै।। छ० ४ सफ़र. सन इहिदे मय्यातैन. आषाढ.

विज्ञापना. आरब प्रबळ जाहले. शहरांत कजिया कफावती करून खून करावे, याप्रमाणें आज दोन तीन वर्षें शेर जाहले; याजकरितां श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांची मर्जी कठिण जाहली. आरब शहरांत चाकर आहेत त्याणीं सर्वांनीं निघोन देशास जावें याप्रमाणें ठरोन आरबांस ताकीद केली. कैलासवासी नानांकडील आरबांस ताकीद केली. त्याणीं उत्तर केलें कीं ' आम्हांकडे हरामखोरी कांहीं नाहीं. खावंदांची मर्जी नाहीं असें असल्यास आमचे तलबेचा फडशा करून द्यावा. निघोन जातों. ' ' तलब कोण देतो ? जाहली चाकरी, पावला मुशाहिरा ! उठोन जाणें;' म्हणोन आज्ञा जाहली. परंतु त्याणीं मान्य केली नाहीं. नानांचे वाड्यांत राहून दंगा मांडिला. तेव्हां वाड्यास तोफा लाविल्या. आरबांकडील दहा असामी ठार जाहले. सरकार व शिंदे यांजकडील मिळोन वीस वीस माणूस गोळीनें ठार जाहलें. परंतु कौलास येत नाहीं हें समजोन सरकारांतून त्यांचे तलबेचा फडशा करून देऊन घालवून दिले. आरब निघोन गेले. राजश्री होळकर[2] याचा पुत्र जुने कोटांत केसोपंत कुंटे यांचे वाड्यांत होता त्याजपाशींहि आरब दोनशें होते. त्यांसही ताकीद जाहली. परंतु तलबेचा फडशा करून (त्यानीं) घेतला. श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधि[3] यांजकडे चारशें आरब होते त्यांचे चाळीस हजार रुपये तलब चढली होती. त्यांनीं तीन दिवस पावेतों श्रीमंत पंतप्रतिनिधि यांस व वाड्यांतील झाडून मंडळी चाळीस पन्नास समवेत उपवासी बसविले होते. चाळीस हजार पैकीं तीस हजार पावेतों बाकीचाही फडशा करून देतों म्हणोन करार केला तेव्हां भोजनास उठिले. आणखी दहा हजार रुपये तलबेपैकीं व

---

१ नानाची स्त्री जिऊबाई नऊ वर्षांची होती ! पेशव्यानीं तिचें शांतवन काय केलें ! ' तुला दत्तक घेऊं देत नाहीं, तुझा सरंजाम, तैनात, दरक, संपत्ति वाडे, बागा, मळे सर्व काढून घेतलें, आतां सुखानें रहा, म्हणून !' २ मल्हारजी बिन तुकोजी होळकर. ३ परशुराम श्रीनिवास.

पंधरा हजार रुपये आरबांचे जमातदारांपासून कर्ज पंतांनीं घेतलें आहे त्याचा फडशा करून घेतल्याखेरीज धरणें उठत नाहीं. तोही ऐवज घेतील. होळकर यांचे पुत्राजवळ आरब होते त्यांचा फडशा करून दिल्यानंतर श्रीमंतांनीं जयीबाई–होळकर यांचे स्त्रीस–चार गोष्टी सांगोन दिलासा दिला. ' मुलाविषयीं काळजी न करणें. ' त्यावरून खातरजमा जाहली. सरकार वाड्यांत मुलास व बाईस राहण्यास स्थळ दिलें. वाड्यांत येऊन राहिलीं आहेत. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६०२ श्री. ( आषाढ शु० २–२४ जून. )

छ० ४ सफर. सन इहिदे मय्यातैन. आषाढ.

विज्ञापना. सरकारवाड्यांत मंडळी कैद केली. बारा दिवस जाहले. अद्यापवर सरकार वाड्यांतच आहेत. चिमणाजी खंडेराव यास ताडण केलें. आणखी कोणा एकास कांहीं निकर्ष केला नाहीं. या उपरांतीक न कळे. चिंतोपंत देशमुख यांची मुक्तता जाहली. परंतु सरकार वाड्यांतच आहेत. त्यांचे घरीं आरब आहेत. ( हे घरीं ) गेले असतां दंगा करितील म्हणून आपले घरीं जात नाहीं. फडावर कामकाज तेच पहात असतात. तेरीख खासा श्रीमंत राजश्री पंतप्रधान घालितात. बाळोजी कुंजर कारभारामध्यें प्रमुख व बळवंतराव नागनाथ आहेत. याउपरी मागाहून विनंती पत्रीं लिहितों. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६०३ श्री. ( आषाढ शु० २–२४ जून. )

पै॥ छ० ४ सफर. सन इहिदे मय्यातैन. आषाढ.

विज्ञापना. श्रीमंत राजश्री मोरोबादादा राजश्री भिकाजी नाईक कोलटकर यांचे वाड्यांत राहिले. आपले वाड्यांत अस्त सरे तोंपावेतों जात नाहींत. एक महिना अस्त आहे. नंतर जाणार. हे विज्ञापना.

नं. ५६०४ श्री. ( आषाढ शु० २–२४ जून. )

पै॥ छ० ४ सफर. सन इहिदे मय्यातैन. आषाढ.

विज्ञापना. चक्रदेव व मंडळी यांणीं विचार केला होता ( कीं ) नानांस पुत्र द्यावा. श्रीमंतांजवळ पांच चार मंडळी आहेत यांस कैद करून द्यावें. तीस लक्ष रुपये हप्तेबंदीप्रमाणें द्यावे याप्रमाणें बोलण्यांत ठरोन ठरावाची याद शिंदे याणीं करून घेतली. आणि तेच याद श्रीमंतांस दाखविली म्हणोन ऐकण्यामध्यें आहे. ही मसलत करावयास कारण काय, तरी राजश्री आपाजीपंत गोंधळेकर शिंदे यांजकडे सैन्यांत राहून 'तीस लक्ष

रुपये द्यावे. हल्लीं मंडळींस प्रतिबंध केला आहे यांस प्रतिबंध करून आमचे स्वाधीन करावें.' याप्रमाणें बोलत होते परंतु त्याणीं तोच नाद राखिला होता. खचीत मात्र जाहलें नव्हतें. हल्लीं ( हे ) दस्तऐवजीं सांपडलेवर श्रीमंतांनीं तीस लक्ष रुपये द्यावयाचा करार करून प्रतिबंध करविला. याउपर शिंदे यांस ऐवज द्यावयाचा आहे. कारभारी शिंद्यांकडील नित्य सरकार वाड्यांत येत असतात. सरकार वाड्यासभोंवती दोन पलटणें पंधरा तोफा आहेतच. राजश्री कृष्णोबाबाबा नेहमीं ( तगाद्यासाठीं ) सरकारचे वाड्यांत श्रीमंतांचे पंक्तीस भोजन करून आहेत. श्रीमंत राजश्री मोरोबादादांही आले. याउपर कोणता विचार होतो नकळे. आढळलें वर्तमान विनंती लिहिली आहे. श्रीमंत राजश्री रावसाहेब यांस मंडळींस कैद केले याविशींची सूचना अगोदर नव्हती म्हणोन लौकिकांत आहे. यादीवर 'द्यावें' रावसाहेब कालपावेतों करितात. कारभार खासा श्रीमंत राजश्री पंतप्रधान मनास आणितात. याप्रमाणें आहे. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६०५. श्रीगजानन. ( आषाढ शु० ३–२५ जून. )

वडिलांचे सेवेसीं अपत्यें बापूजी त्रिंबक परचुरे शिरसा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० २ माहे सफर सौम्यवासर पावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून मु॥ कुसेगल येथें सुखरूप असों. विशेष. धोंडजी वाघ याची स्वारी सावनुरास गेलीयाचें वर्तमान पेशजी लिहिलें होतें. त्यास सावनूर तालुक्याची ठाणीं बहुतेक घालून छ० २५ मोहरमीं फौजसुद्धां कूच करून कुंद्गोळास आला. कुंद्गोळचें ठाणें घातलें. त्याच दिवशीं रात्रौ ठाण्यांत कारकून ठेवून आम्ही निघोन आलों. दुसरे दिवशीं कुंद्गोळावर मुक्काम करून तिसरे दिवशीं छ० २७ मोहरम फौजसुद्धां हुबळीवर मुक्कामास आले. महालचे जमीदार व पेठेचे देव पुढें भेटीस कुंद्गोळास गेले होते, परंतु खंडणीचा जाबसाल ठरला नाहीं. येतांच ठाणें द्यावयासीं एक भला माणूस व दोनशें प्यादे पाठविले. गांवची रखवालीही केली. आम्हांकडील कारकुनास 'ठाणें देऊन तुम्ही जाणें' म्हणोन सांगितलें. गोळी वाजवून परिणाम नाहीं, फौज भारी, याजमुळें कारकुनानीं कौल घेऊन सायंकाळचे प्रहर दिवसास ठाणें त्यांचे हवालीं करून लोकसुद्धां उतरोन आले. त्यापासून आज पांच रोज मुक्काम हुबळीसच आहे. जुनेहुबळीचें ठाणें अद्याप हस्तगत जालें नाहीं व गोळीही वाजली नाहीं.

---

१ पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

पुढें काय होतें पहावें. राजश्री बाळकृष्णपंतभाऊ याणीं इंग्रजांकडे संधान करून हरिहरावर पलटणें आणिलीं आहेत. वसलीसाहेब बारा चौदा पलटणें घेऊन आले. त्यांचे भेटीस भाऊ गेले होते. भेटी मोठ्या सन्मानानें जाल्या आणि नदी उतरावयास लागले. चार हजारपर्यंत पलटणचे लोक अलीकडेस उतरले. पुढेंही उतरत आहेत. झाडून लोक व तोफा उतरल्यानंतर सावनूर तालुकेयाची ठाणीं घालणार. याप्रमाणें वर्तमान आहे. राणेबिदनूरचें ठाणें इंग्रजाकडील लोक लागूंकडील जमातसुद्धां येऊन घेतलें. आठ दिवसांत सावनूरपर्यंत येतात. वाघ इंग्रजापुढें ठरत नाहीं. श्री॥ राजश्री रामचंद्रपंत आपासाहेब यांजकडे लागूंनीं पत्रें पाठविलीं आहेत. श्रीमंतही लवकर येतील ऐसा सुमार आहे. ईश्वरसत्ता प्रमाण. सेवेसीं विदित होय. बहुत काय लिहिणें. कृपा करावी. जुने हुबळीस कालपासून गोळी वाजों लागली याप्रमाणें वर्तमान आलें. हे विज्ञापना.

नं. ५६०६ श्री. ( २५ जून. )

ती॥ राजश्री आपासाहेब वडिलांचे सेवेशीं—

अपत्यें[1] रामचंद्र श्रीधर काळे शिर सा॥ नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत आषाढ शु॥ तृतीया बुधवारपावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असें. विशेष. वडिलीं गलगल्याचे मुक्कामचें पत्र पाठविलें तें पावलें. सावनूर वाघानें घेतलें. राजश्री वासुदेवकाका धरून नेले. बाळकृष्णपंत हरिहरास गेले. ती॥ राजश्री बाबासाहेब व चिंतामणरावआपा ऐसे बारीपार गेले होते तेही बारींत आले. येणेंप्रमाणें वडिलीं तपशीलवार पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर कळला. श्रीमंतांचे श्रवणीं कर्नाटकचा मजकूर घातला. 'ईश्वरइच्छा !' म्हणोन बोलले. राजश्री नारोपंत चक्रदेव व बज्याबा वगैरे मंडळी कैद केल्याचा मजकूर लिहिलाच होता त्यास चिमणाजी खंडेरावजाधवाकडील—त्यासमात्र कमच्या पंचवीस मारल्या. जेष्ठ वद्य एकादशीच्या दिवशीं सर्वांस बेड्या घातल्या होत्या. तीन प्रहर बेड्या होत्या. नंतर सर्वांचे अलंकार काढले. एक चिमणाजी खंडेराव यांचे पायांत मात्र शृंखला आहे. परवां मी बंदीवान मंडळी किल्यास नेली म्हणोन लिहिलें होतें, त्यास अद्यापि सरकावाड्यांत आहेत. यांस कैद केल्यानंतर शामीरखान याजवर पलटणें घालून तोफांची मारगिरी वाड्यावर केली हेंही लिहिलें होतें. कळलेंच असेल. पुण्यांतून फार करून आरब गेले. मागती ठेवावे ऐसीही आवई आहे. शामीरखान

---

१ हें व पुढचीं तीन पत्रें रामचंद्रपंत आपास लिहिलेलीं आहेत.

गेला त्यासही आणवावा ऐसी वदंता आहे. सकाळीं मनसबा जाहला तो दुसरे दिवसपावेतों तसाच काईम राहील हा भरंवसा नाहीं ! चक्रदेव यांसही मागती सोडणार ऐसेंही बोलतात. श्री॥ राजश्री मोरोबादादा फडणीस जुन्नराहून आषाढ शु॥ प्रतिपदा सोमवारीं पुण्यास आले. श्रीमंत गारपिरावर गेले होते. शिंदे होळकरही फडणिसांस भेटावयास आले होते. भेटींचा समारंभ यथास्थित होऊन शिंदे होळकर आपले मुक्कामास गेले. श्रीमंतानीं खवासियांत दादा घेतले होते. तैसेच वाड्यांत आले. नंतर दादा मुरलीधराचे देवालयीं येऊन राहिले. आठ पंधरा दिवस तेथेंच रहाणार. तेच दिवशीं रात्रीस श्रीमंतानीं दादांस भोजनास बोलाविलें. भुईवर भोजन करीत होते ते ते दिवशीं ताटांत जेवले ! कंठी शिरपेंच जेगा चार वस्त्रें दिलीं. मीही भेट घेतली. येणेंप्रमाणें समारंभ जाला. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६०७ श्री. ( आषाढ शु॥ ३--२५ जून. )

पै॥ छ० ९ सफर. सन इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. याजउपरी शिंदे यांचे घरीं खेटे घालतों. त्यांचें म्हणणें काय पडतें, पलटणें आमचे प्रांतांतून काढितात किंवा नाहीं, पुढें आम्हांस काय म्हणतात, याचा शोध आठ दिवसांत करून तपशीलवार कळण्याजोगें लिहून पाठवितों. परंतु दरबारखर्चाशिवाय कोणी बोलत नाहीं ! आमचें बोलणें कोरडें, तेव्हां जवळ कोण बोलावतो ! परंतु शिंदे यांचे घरचें कच्चें पक्कें याजउपरी समजून घेऊन लिहितों. अद्यापि श्रीमंतानीं शिंदे यांस पटवर्धन यांचा सरंजाम जप्त करा म्हणोन सांगितलें नाहीं. मी येथें आलों नसतों तर परवानगीही देते ऐसें भासतें. अद्यापि नाहीं कशावरून ! कोणतीही गोष्टी अद्यापि ठरली नाहीं. राजश्री मोरोबादादा आले. मी भेट घेतली. परंतु ओळख अगदीं नाहीं. मी प्रामाणिक किंवा कसा हें त्यांस ठाऊक नाहीं. तसेंच आपलेंही त्याप्रमाणें. तेव्हां तेथें माझा प्रवेश कसा होतो ! त्यास वडिलीं राजश्री धोंडोपंतबाबा जोग यांसच पत्र मोरोबा दादांस लिहून रवाना लवकर करावें. म्हणजे ते स्नेही आहेत आणि बाबा जोग प्रामाणिक आपलेस मान्य, तेव्हां उभयपक्षीं खातरजमा होईल. यास्तव बाबा जोग यांची रवानगी लवकर करावी. दादा किती जाले तरी थोर आहेत. त्याणीं श्रीमंतांस आम्हांविशीं एखादी गोष्ट सांगितली असतां कार्य सहजांत घडून येईल. माझें मानस कोणीकडून तरी पाय भुईस लागोत, म्हणोन बाबांस पाठवावें. जर बाबा जोग नच येत तर मग मी येथें आहें. " आपण

खातरजमेनें चिरंजीवासीं बोलावें. चिरंजीव आपणासीं बोलतील तें आमचें. दिक्कत धरूं नये. ममता करीत जावी." ऐसें पत्र आपलें दादांचे नांवचें यावें म्हणजे खटपट करून पाहीन. तूर्तकाळीं सरकारची मर्जी दादांचे ठायीं यथास्थित आहे. मला मर्जी संपादून घेण्यास अवकाश पाहिजे. बाबा जोग आले असतां खचितच बोलणें पडेल. परस्परें योग्यताही आहे. माझें बोलणें थोरा जागीं हलकें मानितील. बाबा जोगाचें प्रमाण प्रौढ मानितील म्हणोन विनंती लिहिली आहे. जसें मनांत येईल तसें घडावें. सारांश, दरबारीं कोठें तरी ठपावयास जागा केल्याशिवाय परिणाम नाहीं. रवाना छ० ३ सफर. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६०८ श्री. ( आषाढ शु॥ ३–२५ जून. )

छ० ९ सफर इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. चक्रदेव वगैरे मंडळी कैद करण्याबद्दल शिंदे यांस सहा लक्ष रुपयेचा सरंजाम द्यावयाचा करार केला आहे. तो कर्नाटकपैकीं द्यावयाचा. याच धरण्याचे संधींत सर्जेराव याणीं करवीरकर यांचा तह ठरवून घेतला. रामचंद्र परशुराम यांचे देणें आहे तें बुडवावें, चिकोडी तालुका माघारा द्यावा, याशिवाय पावणेतीन लक्षांचा सरंजाम सरकारपैकीं महाराजांस द्यावा, कर्नाटकपैकीं द्यावा, असें म्हणतात. परंतु यादवाड, गोकाक, पाच्छापूर ऐसे त्यांस लगत तालुके आहेत तेच ते मागणार. शिंदे, घाटगे देवविणार, तेव्हां जें मागतील तेंच देतील! सरकारपैकीं तालुका देतात त्याऐवजीं जेव्हां सरकारांत कार्य लागेल तेव्हां फौज चाकरीस यावी असा करार. सात लाख रुपये करवीरवासी याणीं सरकारांत द्यावे. त्यास हप्तेबंदी सालमजकूर सन इहिदे मय्यातैनांत आश्विनमासीं दोन लाख. इसन्नेंत अडीच. तैसेंच सल्लासांत अडीच. एकूण सातांची भरती. येणेंप्रमाणें ठराव होत आहे. आमचें बोलणें कोणी आइकत नाहींत. मला येथें येऊन आज पंचवीस दिवस जाले. शिंदे यांची घाटगे यांची भेटी घेतली. याजउपरी रोज जाऊन येतों. येथें कोणासी काय बोलावें? जें शिंदे व सर्जाराव करील तें होतें. आमचा तांता श्रीमंतांकडे अथवा शिंदे व सर्जाराव यांजकडे अगदीं नाहींसा जाला. कै॥ नाना व पागनीस यांजकडे भर आमचा पडला. लिहिलीं द्वारें अगदीं बुडालीं याजमुळें या थरास आलें. खटपटीस अंतर करीत नाहीं. परंतु कोणी विचारीना! जेथें बोलावयास जावें तो दरबारखर्च मारणार. शिंदे यांचे लष्करांतून जाऊन आलें म्हणजे पुनर्जन्म जाल्यासारखा होतो! खटपट

करीत आहें. काय ठरेल तें लिहितों. याजउपरी करवीरची आशा राहिली. कर्ज बुडालें. चिकोडी जाती. सावनूरतालुकाही असाच वांटतात. आजपर्यंत स्वांम्यांचें चाळीस लाख रुपये कर्ज सरकारांत, तें नानास पुसावें ऐसे रंग येथील! तेव्हां सर्व कर्जसुद्धां पाणी पडलें. फक्त सरंजाम राहिला म्हणजे भाग्य आहे. त्यासही सर्जेराव जप्ती करीन म्हणतच आहे. त्यांत श्रीमंतांची अवकृपा. इतक्या नोबती गुदरल्या आहेत. यांत ईश्वर कशी लज्जा राक्षितो समजत नाहीं. सारांश याजउपरी जसें श्रीमंत सांगतील तैसें वर्तावें तरीच परिणाम. नाहीं तर परिणाम अवघड. रवाना छ० ३ सफर. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६०९ श्री. ( आषाढ शु० ४–२६ जून. )

छ० ९ सफर. इहिदे.

विज्ञापना. परवां राजश्री बळवंतराव नागनाथ व गोपाळराव मुनशी यांजपाशीं श्रीमंतानीं सांगितलें, बाबा काळे यास पुसा कीं वाळवें रावसाहेबांचे हवालीं करावयाचें आहे किंवा नाहीं ? गतवर्षीपासून पांच सात कागद पाठविले असतां हवालीं होत नाहीं हें काय ? ऐसें पुसावयास सांगितलें. उभयतानीं मला पुसिलें. मी उत्तर केलें कीं, वाळवें आम्हांपाशीं कोठें आहे ? थोरातांचे हवालीं केलें आहे. आमचा कांहीं लढा नाहीं. आपण थोरातापासून घ्यावें. ऐसें सांगितलें तें कांहीं त्यांचे मनांत भरलें नाहीं. नंतर वाळव्यांत हुजरे होते त्यांस आणिलें. त्याणीं गोही भरली कीं ठाणें रामचंद्र परशुराम यांचें आहे. तेथें बाळाजीपंत सहस्रबुद्धया म्हणोन कमावीसदार होता त्याणें आमची गैर अबरू देखील केली. ऐसें बोलले. तेव्हां आमची फजीती वाड्यांत चौघानीं केली कीं, अद्यापि तुमचे ढंग जाईनात! सरकार आज्ञेप्रमाणें तुम्हांस वर्तावयाचें नाहीं. ऐसें बहुत जाहलें तें पत्रीं कोठवर लिहूं ? त्याजनंतर मी सांगितलें कीं, रागां कां भरतां ? वास्तविक ठाणें आम्हांकडे नाहीं. थोराताकडे आहे. तुम्हास पाहिजे तैसें करावें. याजउपरी आम्हांकडून आगळीक व्हावयाची नाहीं. नाना तात्या ठाणें हवाली करूं नका म्हणोन लिहित होते त्या भरावर आपण आजपर्यंत वोढलें ऐसेंही म्हणतां नये! म्हणोन त्याणीं अधिक उणें जसें बोलले तसें सोसणें प्राप्त आलें. प्रथम मी आलों तेव्हां ( आपली ) आज्ञाही आहे कीं, थोराताकडील बोलणें बोलावें. थोरात उपयोगी आहेत. ऐसी आज्ञा, त्याजवरून जें बोलतील तें सोसणें प्राप्त. परंतु

थाजउपरी जर सरकाराशी वोढलें तर अबरू येथें रहाणें अवघड. जाहला मजकूर कळावाकरितां लिहिला आहे. वाळवेंविशीं माझी बोलण्याची सीमा जाली. मग याजउपरी वडिलांची मर्जी. याजउपरी आम्हास दरबारीं द्वार बोलण्यास राहिलें नाहीं. तेव्हां जशी श्रीमंतांची मर्जी तशी वर्तणूक घडत चालली तर अन्नवस्त्र मिळाल्यास मिळेल. नाहींतर परिणाम नाहीं. आबा काळे दोनी महाल सावनूरतालुकेपैकीं त्यासाठीं आमचे दारीं माणसें बसविणार. महाल वाघानें घेतले, परंतु सरकारआज्ञेप्रमाणें मान्य करून महाल हवालीं करून सरकारमर्जी ( आम्हीं ) रक्षिली नाहीं तेव्हां येथें बोलण्यास अवघड पडतें. सेवेशीं कळावें म्हणोन लिहिलें आहे. रवाना छ० ३ सफर श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६१० श्रीगणराज. ( आषाढ शु० ४–२६ जून. )

पै॥ छ० २ सफर. बुधवार. सन इहिदे मय्यातैन व अल्लफ.

विज्ञापना.[1] चिरंजीव रा॥ रामचंद्रपंत आपाचें पत्र आलें त्याची नकल पाठविली ती पावली. त्यास चिरंजीवाचे लिहिण्यांत दोनी[2] फौजा कोणत्या जागीं येतात हा निश्चय समजल्याउपर नदी उतरणार. त्यास ही फौज जावी तेव्हां नदी उतरावी असाच आशय असलिया तजवीज भिन्न, परंतु पलटणवाले येऊन समीप उतरले त्यांच्या पोटांत दुर्बुद्धि. गुंता नाहीं. परंतु घासदाणा वगैरे उपद्रव मात्र. दुर्गाकडे[3] अवलोकन नाहीं. दुसरें, चिरंजीवाचें ( व ) पलटणवाले यांचें कटाक्ष. तेपक्षीं चिरंजीवानीं नदी उतरों नये. उतरले असतां पुण्यास लिहोन हे त्याजवर गालब होणार. पुण्याकडील धर्म पाहतांही ( असें होणें ) आवश्यक ! असा समय. त्यास ही गोष्ट दुर्घट. न उतरावें तर दुर्गास समय कसा पडतो हेंही समजत नाहीं ! हे भाव रा॥ मोरो आपाजीस पुण्यास ल्याहावे. तेथील धर्म राहिला नाहीं अशी जनवार्ता. परंतु लिहावें. त्यांची सल्ला काय येती, चिरंजीवापाशीं जमीयत किती, चिरंजीव रा॥ चिंतामणराव आपासुद्धां किती जमाव, हा आविर्भाव पहावा. कृष्णा उत्तरतीरास चिरंजीव आले असतां ( पलटणवाले ) गालब त्यांजवरच होतील. यापूर्वीचे अतिदेश आहेत. न व्हावें तरी संकट. ह्या दोन्ही फौजा समीपच आहेत. चिरंजीव रा॥ विठलराव बापू गेल्याचें लिहिलें, त्यास हस्तीसहवर्तमान जावयाचा काल नव्हे. जाणें तरी या काळीं भेटून जावें. या कालींही

---

१ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें कुरुंदवाडाहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र. २ मिरजेची व कुरुंदवाडची. ३ मिरजेच्या किल्ल्याकडे.

शत्रुत्वें शत्रूस साहाय्य होतें. येणेंकडून सर्व गोष्टी विलग पडतात. ही गोष्ट शत्रूस समजली असतां पक्षच नाहीं. असे अर्थ करोन अपाय होतो. नौका सिद्ध करोन बसल्याचा विचार—त्यास स्त्रीबुद्धिःप्रळयंगता ! मागेंही जालेंच आहे. पुढेंही या गोष्टी होणारच. ऐवज किती ! मुख्यत्वें करवीरकरांचे पारिपत्यास पलटणें आलीं तेव्हां बराऊनकडे अश्व जात होते तीही बातमी रक्षिली पाहिजे. शिरोळाहून दारूगोळी जलचराकडे गेली, नाकेवर खटला जाला, असें वर्तमान. बाजारांत मिरजेच्या खटला जाला. दुर्गासमीप राहणारांस आज्ञा द्यावी जे, स्थलांतर संपादावें. श्री कृष्णा दक्षिणतीरीं यादवाडकर जाणार हेंही ऐकिलें. मिरजेंत सर्वांचे देह मात्र आहेत. वसु कोणी विष भक्षावयास ठेविलें नाहीं. नित्य दिनचर्या निर्वाह मात्र रक्षिला आहे. बाहेर भ्रम ! असें श्रीनें संकट प्राप्त केलें आहे. जलचराच्या दोन कुंपण्या हुपरीस जाऊन कांहीं वसु पन्नास सहस्रपावेतों घेऊन गेले. घाटावर ब्राह्मणांस उपद्रव व लुगडीं बाइकांचीं घेऊन गेले. कलागत बाजारांत सौदा घ्यावयास गेले असतां भगिनीवरून गालिप्रदानें दिल्याशिवाय कांहीं घ्यावयाचें नाहीं अशी अवस्था पुण्यांत तो असे ! सुधानामक याचें कृत्य बाहेरील व त्याचे लक्षांत होते त्यांचे पारिपत्य सध्या चाललें असे. रा॥ मोरोबा दादा यांस आणविले, त्यास शिंद्याचें म्हणणें असे ( कीं ) मागें रा॥ दादानीं आपणांस पंचवीस लक्ष रुपये कर्ज दिलें त्याची पावती तूर्त द्यावी. आणखी दहा लक्ष पावेतों सावकारांकडून कर्ज काढून द्यावें. मग यानीं कारभार करावा. अशास्तव आणविले. अशा अनेक वार्ता. श्रीगजानन निर्वाह करील तो खरा. ईसमेत यास निरोप दिला. पक्का बेमान ! दंग्याचें निमित्य काढून आला ते दिवशीं पोटांत दुर्बुद्धि बहुत होती. परंतु आपल्या आशीर्वादें पार पडलों. पुण्याहून कांहीं डास नामकाकडे द्रव्यही आलें नित्य खर्चीचें. दहा महिन्यांचा रोजमुरा त्याचा तटला होता. चिरंजीवाचे पत्रीं ‘ लघुकाष्टधारी जलचराचा स्नेही आहे तो पाठविला आहे. बातमी पोहोंचवील. ’ त्यास बातमी रक्षावी. ह्या जमयेतेनिशीं दुर्गाचे काय करणें ! परंतु पेठेंत परिवार बहुत.

---

१ पलटणवाले त्रास देऊं लागतील तर कृष्णापार जावें म्हणून सरस्वतीबाई हरिपुरास नावा तयार ठेवून बसल्या आहेत. २ अमृतराव. ३ या सुमारास कुरुंदवाडकरानीं इस्मित साहेबास पलटणांसुद्धां निरोप दिला होता. ४ डालाइत.

आमचा परिवार काय आहे हेंही ध्यानांत आहेच. राहिले गाडदी कांहीं प्रसंगानुसार मर्जीस आलिया ठेवावे. चिरंजीव रा॥ रामचंद्रपंत आपाकडील गाड्यांचे जमादार कुल वडिलांजवळचे झाडून आणवावे. हल्लीं त्यांपैकीं दहा पांच जमादार नेरलीस आहेत ( ते ) आणवावे. हजार पांचशें जमीयत नवी ठेवावी. इस्मेताचें सामान चांगलें होतें परंतु बदमामली ! नाहीं तर आज उपयोगीं पडता. चि॥ रा॥ विठलराव तेरदळास जाणार; त्यांस आतांही फौजा येणार तेपक्षीं तेरदळ तालुक्यास उपद्रव होतो. राहतो न राहतो हें ध्यानांत आहेच ! रवाना छ० ३ सफर. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६११ श्री. ( आषाढ शु० ४–२६ जून. )

पै॥ छ० ७ सफर. सु॥ इहिदे मय्यातैन व अल्लफ.

सेवेसीं[1] मोरो आपाजी परांजपे साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० ३ सफर गुरुवार सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. कसबे रहिमतपूर येथें रा॥ दौलतराव शिंदे यांणीं आपलें खाजगीकडील ठाणे घालावें म्हणोन रा॥ सखो गिरमाजी यांसमागमें एक कुंपीण साठ लोक व पन्नास स्वांर देऊन रवाना केलें, दोन दिवस जाहले, म्हणोन वर्तमान तहकीक लागलें. त्यावरून इकडे प्रेत्नास लागलों आहें. ठाण्याची मजबुती राखणें म्हणोन रा॥ बाळाजीपंत दामले नि॥ लागू यांसही पत्र पाठविलें आहे. इतक्या सामानानें कांहीं व्हावयाचें नाहीं. स्वामीकडून कांहीं कुमक यावी तरी मिरजेसन्निध पलटणें तीन कोशांवर आलीं आहेत. या प्रसंगीं तिकडून कुमक येणार नाहीं याजकारितां शें दोनशें प्यादे ठेवावयाविशीं बाळाजीपंतास आज्ञा यावी. स्वामींचीं पत्रें रा॥ आलिजाबहादर यांस व रा॥ आबा चिटणीस व सखाराम घाटगे येणेप्रमाणें तीन पत्रें यावीं. घाटगे यांचे विद्यमानें रा॥ दौलतराव बाबा यांची भेट घेतों. किंवा आबा चिटणीस यांचे विद्यमानें भेट घेऊन तिकडे बोलतों. जिकडून प्रेत्न होईल तिकडून करितों. हजार दीड हजार पावेतों दरबारखर्च करून ठाणें याचा बचाव खातरजमेनें होतो ऐसाही विचार जाहल्यास करावा न करावा येविशीं विचार करून आज्ञा यावी. आज्ञेप्रमाणें वर्तणूक घडतां घडेल तें प्रमाण. परंतु त्यांजकडील लोक येतांच गडबड होईल याज-

---

१ हें मुख्य पत्र व पुढचीं सहा पुरवणीपत्रें मिरजेस बाळासाहेबांस लिहिलेलीं.

करितां बाळाजीपंतांस सूचना लिहिली आहे. हल्लीं पत्रें तीन लिहिलेप्रमाणें यावीं. पत्रांत भाव असावा—

अलिजाबहादूर यांचे पत्रांत भाव कीं, कैलासवासी महादजी शिंदे पाटीलबावा यांचा आमचा घरोबा कोणते प्रकारें होता याची माहितगारी आपणास आहे. त्याप्रमाणें स्नेह असावा. मिरज प्रांतांत आपलीं पलटणें आहेत त्यास उपद्रव घासदाणे याचे रोखे करून आरंभिला आहे व सखो गिरमाजी रहिमतपुरचें ठाणें घालावयास आले म्हणोन ऐकतों. त्यास मनाचिस्या द्याव्या. इकडील मजकूर मोरो आपाजी विदित करितील म्हणोन.

आबा चिटणीस यांस पत्र—इकडील मजकूर मोरो आपाजी कळवितील. इकडील लक्षाविषयीं विस्तारें आपणास ल्याहावें ऐसा प्रकार नाहीं. अलिजाबहादूर यांजकडील पलटणांचा वगैरे उपद्रव इकडे न होय ऐसा प्रकार करावा म्हणोन पत्र. १

घाटगे यांस पत्र स्नेहाच्या गोष्टीचें कार्याकारण थोरपणा देऊन— दुसरा विचार ल्याहावयासीं नाहीं. आम्हाकडील जाबसाल मोरो आपाजी तुम्हांस कळवितील त्याचा बंदोबस्त व्हावा—म्हणोन पत्र. १

येकूण तीन पत्रें स्वामींनीं विचार करून यावीं. यांत अधिक उणें पत्रीं ल्याहावयाचें असेल तें लेहून पत्रें लौकर यावीं. सरकारांतून शिंदे यांस ताकीद होऊन बचाव व्हावा ऐसा प्रकार तूर्त प्रसंगीं नाहीं. यास्तव समयास मान देऊन घडेल तें करावें ! सखाराम घाटगे यांचें लक्ष स्वामीचे पायांजवळ बोलण्यामध्यें आहे. मराठे आहेत. खुलवून लिहिलें असतां थोरपणा त्यांस येतो. मर्जीस येईल त्याप्रमाणें विचार होऊन पत्रें यावीं. सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६१२ श्री. ( आषाढ शु० ४–२६ जून. )

पै॥ छ० ७ सफर. सन इहिदे मय्यातैन. आषाढ.

विज्ञापना. धोंडजी वाघ प्रबळ जाहला आहे, त्यास पारिपत्य जाहलें पाहिजे, म्हणोन सरकारांतून इंग्रजास व नबाबास सांगितलें. उभयतां मिळोन पारिपत्य करावें. इकडून नवाबाची फौज व तिकडून पलटणें येऊन पारिपत्य करावें. याप्रमाणे विचार ठरला म्हणोन तथ्य आइकण्यांत आलें. त्यावरून विनंती लिहिली आहे. विदित होय हे विज्ञापना. घोरपडे यांजकडील कारकून याणीं आपले यजमानांस पत्र लिहिलें आहे. प्रविष्ट होऊन जाब आला पाहिजे. हे विज्ञापना.

नं. ५६१३ श्री. ( आषाढ शु० ४—२६ जून. )

पै॥ छ० ७ सफर. इहिदे मय्यातैन व अलुफ.

विज्ञापना. श्रीमंतांच्या व मोरोबा दादा यांच्या भेटी जाहल्याचा मजकूर लेहून विनंती पत्रें रवाना केलींच आहेत. स्वामींचें पत्र दादांस यावें येविशीं दोनचार वेळां विनंती लिहिली आहे. रा॥ बाळाजी नाईक भिडे यांचे विद्यमानें श्रीमंत रा॥ मोरोबा दादांची भेट घेतली. दादांचे लक्ष आपले जागां बहुत आहे. नाईक मशारनिल्हे यांस पत्र जुनरास असतां आलें होतें कीं, रा॥ गंगाधररावजी यांचे पत्र आम्हांस आल्यानंतर कितेक विचार बोलावयाचे आहेत, त्यास स्वामींचें पत्र आज तागायत रवाना जाहलेंच असेल. नसल्यास लौकर यावें. श्रीमंतांची कृपा दादांचे जागां बहुत आहे. आज दोन तीन दिवस दरबार चांफेखणांत होतो. तोड जाबसाल वगैरे अर्जबाब होते. सायंकाळीं चार सहा घटका पावेतों दरबार होतो. दादा आपले वाड्यांत अस्त सरल्यावर जाणार व तारीखही अस्त सरल्यानंतर घालणार. याप्रमाणें विचार या समयीं आहे. नित्य नाईक पत्र कां येत नाहीं म्हणोन बोलावून पुसत असतात. नाइकांचें लक्ष सर्वप्रकारें आपणाजवळ आहे. नाइकांचा दादांचा स्नेह बहुत चांगला. नाईक भेटीस गेले ते दिवशीं दिसोन आला. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६१४ श्री. (आषाढ शु० ४—२६ जून.)

पै॥ छ०७ सफर सन इहिदे मय्यातैन. आषाढ.

विज्ञापना. राजश्री यशवंतराव घोरपडे यांजकडे बाबा काळे यांचें बोलणें चालणें फार आहे. त्यांचे विद्यमानें ( काळे यांनीं ) घाटगे याची भेट घेतली. बोलणें घाटगे याचेंही जाहलें. ठरावांत एकही गोष्ट आली नाहीं. श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांचें एक वेळ दर्शन मात्र जाहलें. एक दोन वेळां नमस्कार जाहला. परंतु बोलणें जाहलें नाहीं. मध्येंच गवगवाच पडला होता. राजश्री आपाजीपंत सहस्रबुद्धे याणीं सांगितलेवरून विनंती लिहिली आहे. घरकलहाचा विचार सहस्रबुद्धे यांस सर्व कळविला आहे. श्रीमंतांजवळ विनंती करून तुम्ही आम्ही मिळोन विनंती करूं म्हणोन बोलले आहेत. गांठ पडोन बोलणें जाहल्यावर काय आज्ञा होईल ते विनंती पत्रीं लिहितों. श्रीमंत राजश्री रावसाहेब यांजपाशीं बोलणें जाहले याचें वृत्त मागें विनंती लिहिलीच आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६१५ श्री. ( आषाढ शु॥ ४–२६ जून. )

पै॥ छ० ७ सफर सन इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. लखबा लाड उज्जनीस आले. बायांचा मुक्काम बरानपुरास आहे. बायांचे भेटीस लाड येणार. होळकर यांचा व लाड यांचा एक विचार आहे म्हणोन बातमी आहे. हिंदुस्थानांतील प्रांतांत बाकी राहिली नाहीं. तिकडील पांच रुपये अलिजाबहादर यांस यावयाचे नाहीं. येथें खर्च मोठा. गवगवा देण्याचा फार. पलटणवाले तो महिना भरतांच पैका घेतात. हल्लीं दोन महिन्यांची तलब चढली आहे यामुळें पैक्याची निकड त्यांस फार आहे. ईश्वर त्यांस कृपा करील ! पैकाही मिळतो. याप्रमाणें चार पांच वर्षें चालिलें आहे. सरकारांत इंग्रजाकडील बोलणें गोपाळराव मुनसी बोलतात. इंग्रजांनीं व नबाबाकडील फौज मिळोन वाघाचें पारिपत्य करावें याप्रमाणें ठरोन त्याणीं उभयतांनीं कबूल केलें आहे. वाघाचें सामान भारी जाहलें आहे. सरकारांतही सविस्तर कळलें. त्यावरून बंदोबस्त वाघाचा लवकर व्हावा (ही) तजवीज चालली आहे. करवीरवासी महाराज यांचा तह अकरा लक्षांवर शिंदे यांचे विचारें ठरला. पैका अकरा लक्ष द्यावयास नाहीं म्हणोन घाटगे याणीं चिकोडी मनोळी दोनी महाल व आणखी सरंजाम आपणाकडे घेऊन हवाला सरकारचा आपण घेतला. याप्रमाणें ठराव जाहला. पहिला सरंजाम करवीरकरांकडे होता त्याखेरीज आणखी दोन लाख रुपयांचा सरंजाम त्यांजकडे जाजती द्यावा याप्रमाणें यादी ठरल्या. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६१६ श्री. ( आषाढ शु० ४—२६ जून.)

पै॥ छ० ७ सफर. सन इहिदे मय्यातैन व अलफ. आषाढ.

विज्ञापना. ता॥ छ० ४ सफर भृगुवार सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. नरसिंगराव मल्हार चिटणीस अष्टेकर—घाटगे यांचे चिटणीस—याणीं कंपूंतील पलटणावाल्यांस अलिजा बहादर यांचें पत्र (व) कंपूस चिटी आलिजाबहादर याणीं लिहिलें तें येणेंप्रमाणें छ० ११ मोहरमचीं पाठविलीं. त्यास पत्राची परवानगी सर्जेराव याजकडून व आलिज्याबहादर यांजकडून घ्यावयाची खटपट वासुदेव नारायण सांगलीकर याणीं करून पत्र सरकारचें घेतलें. कंपूस चिटी घेतली ती चिटी येथें कंपूस घेऊन त्यांची चिठी पलटणांतील सरदारांस द्यावी तें न करितां इकडे पुण्यांत गडबडीमुळें वासुदेवपंत गुंतले. अष्टेकर याणींच पत्रें स्वामींकडे रवाना केलीं. हल्लीं त्या पत्राची चौकशी करितां अष्टेकर याणीं रवाना केलीं म्हणून सांगितलेवरून

( शिंदे त्यांस बोलले कीं ) तुम्हांस रवाना करावयाचें कारण काय ? येथील कंपूस चिठी होती तीच रवाना केली हें काय ? त्यावरून हल्लीं फिरोन राजश्री दौलतराव बाबा यांस ( घाटगे यानीं ) विनंती करून कंपू पुण्यांत करणेल सतलंज साहेब फिरंगी बहादर आहे त्यास चिठी घेऊन करणेल फिरंगी याची चकती पलटणांतील सरदारांस घेऊन पाठवावयास दिली ते हल्लीं सेवेसीं पाठविली आहे. पलटणांतील सरदार यांस पावती व्हावी म्हणजे उठोन जातील. निखालस ताकीद आहे. कदाचित् कांहीं गडबड करीत असल्यास स्वामीचें पत्र येतांच फिरोन निखालस पत्रें व हलकारे घेऊन पाठवितों म्हणून मशारनिल्हे याणीं सांगितलें आहे. हल्लीं चकती पावली-याजवर फिरंगी उठोन जातात किंवा नाहीं हे आज्ञा जाली पाहिजे. मालोजी सांबाळा यांजबरोबर काल छ० ३ सफरीं कसबे रहिमतपूर येथील मजकूर लिहून पाठविला आहे. त्यास त्याप्रमाणें तीन पत्रें स्वामींनीं पाठविलीं पाहि-जेत. इकडे मीहि प्रेत्नास लागलों आहें. कसबे मजकुरीं दामले यांस खबर-दारीनें असावें म्हणोन आज्ञा यावी. आठ पंधरा दिवसांत इकडे प्रेत्न होईल तो करून मनाचिडीचा उद्योग करितों. पांच रुपये दरबार खर्च जाहल्यास करावे न करावे हे विशींहि मर्जी काय त्याची आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तूणूक करीन. शिंदे यांचें दरबार थोर. येथील विचार पत्रीं कोठवर विनंती ल्याहावी ? पैक्यांसी गांठ. आज्ञा येईल त्याप्रमाणें करीन. पत्रांचीं उत्तरें देऊन लवकर जासूद रवाना केले पाहिजेत. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना

नं. ५६१७ श्री. ( आषाढ शु० ४–२६ जून. )

छ० सफर. इहिदे मय्यातैन. आषाढ.

विज्ञापना. सरकार वाड्यांत प्रतिबंध ज्यांस केला होता ते आज पावेतों वाड्यांतच होते. छ० २ सफर बुधवारीं मध्यरात्रीस किल्ले प्रतापगड व रायरी येथें रवाना जाहले. चक्रदेव असामी दोन, बज्याबा सिरालेकर, व राघोपंत गोडबोले व आणखी एक कारकून एकूण पांच असामी राजश्री बाळाजीपंत पटवर्धन रवासा पागासुद्धां व कुंजर यांची पागा येणेंप्रमाणें घेऊन किल्ल्यास पोंचवायास गेले आहेत. चिमणाजी खंडेराव व आणखी दोन असामी चौकसीबद्दल वाड्यांतच ठेविले आहेत. लखबा लाड उज्जनी-नजीक आले. इंदुराजवळ होळकर आहेत. पंचवीस तीस कोसांचें अंतर आहे. एक जागा होणार. बाया दरकूच तिकडे जातात.

त्रिवर्ग एक जागां होणार. मसलत जड होते असे लोक बोलतात. मल्हारराव होळकर यांचा पुत्र व मल्हारराव यांची स्त्रीसह सरकार वाड्यांत स्थळ देऊन श्रीमंतांनीं ठेविली. हें वर्तमान पेशजी विनंती लिहिलीच आहे. वाड्यांत ठेवावयाचें कारण काशीबा होळकर रातबिरात दगा फटका करितील याजकरितां बाईस धीर न पुरे, म्हणोन विनंती श्रीमंतांस केली. त्यावरून वाड्यांतच स्थल दिलें आहे. चिरंजीव धोंडोबाचे प्रकृतीचा मजकूर पेशजी लिहिलाच आहे. अलीकडे तसीच प्रकृत आहे. बाळाजीपंत सहस्रबुद्धे येथें होते. काळेपंतांचें त्यांचें चित्त शुद्ध नवतें. येथून निघोन धोमाकडे गेले. तेथून कोणीकडेच जातील नकळे. आरब पुण्याहून अद्याप गेले नाहीं. सरकारचाही बहुतसा नेट निघोन जावयाचा दिसत नाहीं. छ० ३ सफर गुरुवारीं दोनप्रहरीं शिंदे सरकारवाड्यांत आले. श्रीमंत राजश्री राव[1]साहेबाची यांची स्वांरी वडगांवास शिंदे येतांच गेली. अगोदर तयारीच स्वारीची होती. गेले. शिंदे आल्यावर उभयतां श्रीमंत व मोरोबादादा व शिंदे व घाटगे आबा चिटणीस याप्रमाणें बैठक दारूकाम नाच रागरंग जाहले. दीडप्रहर शिंदे वाड्यांत होते. दोन घटका दिवसास आपले गोटास गेले. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६१८ श्रीगणराज. ( ज्येष्ठ व० ९ श० १७२१ )
( २६ जून १७९९ )

पै. छ० २१ मोहरम. सन मय्यातैन व अल्लफ. ज्येष्ठ.

विज्ञापना.[3] तिकोट्यावर रा॥ बळवंतराव कृष्ण निसबत बाया शिंदे यांची फौज आली आहे. नित्य ठाण्यावर येतात. गोळा गोळी होत असतां ऐलीकडे मोर्चेबंदी करावी म्हणोन येऊन गांवाभोंवती वेढा घालून लहान तोफा समागमें आहेत त्या लाविल्या. प्रहर रात्रपर्यंत लढाई होऊन रात्रीस ठाण्यांतील लोकांनीं निकड केली. तेव्हां मोर्चा उठून गोटास माघारे गेले. ऐलीकडे दोन रोज स्तब्ध आहेत. खंडणीची रदबदली त्यांजकडून लागली आहे. परिछिन्न खंडणी देऊंनये या प्रमाणें येथून आज्ञा गेली. वरचेवर लोकांची रवानगी येथून होतच आहे. मैंदरगीकडील जमावही येऊन पोंहचला. ठाण्यांत सरंजाम पोख्त आहे. आणखी वर्तमान येईल त्याप्रमाणें

---

१ अमृतराव. २ दिवसास दारू काम कशाचें ? शब्द चुकून लिहिला गेला हें स्पष्ट आहे. ३ हें पत्र रघुनाथराव यांनीं कुरुंदवाडाहून मिरजेस बाळासाहेबांस लिहिलें.

विनंती लिहीन. काल अथणीहून रा॥ उमाजीबाबा यांचीं पत्रें आलीं तींच बाजिन्नस पाठविलीं आहेत. पाहून उत्तरें कशीं द्यावीं येविशींची आज्ञा जाली पाहिजे. रवाना छ २१ मोहरम. रा॥ बळवंतराव तो या कर्मास प्रवृत्त झाले आहेत. आसमंतात आहेत त्यांचीं पत्रें या प्रकारचीं येतात. काय ती आज्ञा जाली पाहिजे. काल घरास आलों. दोनशें कैकाडी बाणाच्या कैच्यांसह रवाना केले. उदईक पांचशें गाडदी वगैरे रवाना करितों. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६१९ श्री. ( २७ जून. )

रामचंद्रपंत आपांस लागूंचें पत्र आलें त्याची नक्कल.

सेवेसीं बाळकृष्ण लक्ष्मण. कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० ४ सफर भृगुवार मु॥ नलवागल परगणे ऐरणी तुंगभद्रा उत्तरतीर वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. " अलीकडे तुम्हांकडून पत्र येत नाहीं. त्याचें कारण काय ? राजश्री वासुदेवपंत काका कोठें आहेत हें सविस्तर वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. इंग्रजांचे भेटीस गेलांच आहांत. त्यांचे कार्यापुरती मसलत होऊं नये. पुढील आमचे कार्यांचे उपयोगी[1] पडेल असें करावें. थैली[2] पाठविली आहे. तुम्ही पाहून पोहोचवावी; " म्हणून विस्तारें लिहिलें तें कळलें. ऐसीयास इकडील वाघाचें वर्तमान वरचेवर विनंतीपत्रें श्री॥ राजश्री बाबासाहेब यांजकडे पाठवीत असतों. तेथून स्वामींकडे येत असतील. कांहीं मार्गीं जासूदजोड्या लुटल्या गेल्या. इंग्रज चित्रदुर्गाचे मुक्कामास येऊन ( त्यानीं ) आपणास व गोखले यांस व मला पेशा तीन थैल्या पाठविल्या. आपली व गोखले यांची आम्हीं आपली घेऊन दोन्ही थैल्या आपणाकडे पुढें रवाना केल्या. गोखल्यास थैली पावली. आपली थैली गोखले यांचे लष्करापुढें कोसावर दहा पांच स्वार येऊन माणसें लुटून गेली. त्या अलीकडे मी यांचे भेटीस येऊन बोलणें जालें. यावर आपणांस दुसरी थैली घेऊन पाठविली व आम्ही दोन चार पत्रें इकडील सविस्तर विनंती लिहून पाठविलीं आहेत. येऊन पावलीं असतील. हल्लीं आपण थैली पाठविली ती वसलीसाहेब यांस प्रविष्ट केली. बहुत संतोष जाला. आपली भेट घ्यावी हा त्यांचा बेत फार आहे. ' आम्हांस भेटतील किंवा नाहीं, कधीं येतील, ' हें वारंवार विचारतात. आपणासीं स्नेह करावा, आपले उपयोगीं पडावें, अशी त्यांची मर्जी आहे.

---

१ करवीरकराचा सूड घेणें हें आमचें कार्य. २ थैली इंग्रजांची.

'आपले कार्याविशीं कोणेविशीं गुंता नाहीं. मनोगतानुरूप कार्य करूं' असें बोलले. आपल्यास थैली दिली त्यांतील मजकूर समजावेकरितां त्या पत्राची तालीक करून दिली. मजकूर चांगला आहे. राजश्री धोंडोपंत गोखले यांजकडून कारकून काल ( वसलीसाहेबांकडे ) आला. भेटी जाहली. त्याणीं "धारवाडचे मुक्कामास भेटीस येतों, गोव्यांकडून तीन पलटणें आलीं आहेत हीं आम्हांसमागमें द्यावीं, त्यांतील सरदारांस पत्र पाठवावें म्हणजे त्याबरोबर येऊन पोचतों," ऐसें पत्र इंग्रजांस लिहिलें होतें. कारकून आलेला त्याणीं ठेऊन घेतला. त्यास उत्तर दिलें कीं, "धारवाडचे मुक्कामास लौकरच यावें. आम्ही सावनुरास येतों. तीन पलटणें निराळींच येतील. आपण निराळे यावें;" म्हणून लिहिलें आहे. सारांश त्याचे भेटीचेपूर्वी आपली भेट जाली असतां बहुत उपयोग आहे. आपणास दोन दिवस अधिक लागलियास बाबासाहेब यांची रवानगी पुढें करून द्यावी. इकडील कार्याविशीं किमपि गुंता नाहीं. आपले ठाईं इंग्रजांचे लक्ष बहुत आहे. निखालसपणें बोलणें व करणें आहे. धोंडजी वाघ कुंदगोळ, अणीगिरें, नवे हुबळीस ठाणीं घालोन जुन्याहुबळीस बसला आहे. काका यांस समागमें सावनुरास घेऊन गेले आहेत. आजच कूच करून राणीबिन्नूरचे मुक्कामास लष्करासमागमें जातों. थैली पाठविली आहे याचें उत्तर त्याणीं पत्र पाठविलें आहे याअन्वयें मजकुर दोस्तीचा लिहून पाठवावयाची आज्ञा जाली पाहिजे. वसलीसाहेब यांची रीझ घोड्यावर फार आहे. तर घोडा चांगला मातबर तरणा मासलेदार ऐसा पाहून पाठवावयाची आज्ञा होऊन यावा. पावता करीन. इंकडे घेऊन द्यावा, परंतु चांगले त्यांचे पसंत पडत ऐसा मिळत नाहीं. आमचेही संग्रहीं त्यांजोगा नाहीं. याजकारितां विनंती लिहिली आहे. ( इंग्रज ) राणीबिदनूर उदईक घेतात. जीं ठाणीं पडतील तीं हवालीं करितात. वचनांत अंतर नाहीं. बोलणें तें सुमार पाहूनच बोलतों. राजश्री धोंडोपंत आले नाहींत तों श्री॥ राजश्री बाबासाहेब याणीं यावें अथवा बरोबर तरी गोखले यांस घेऊन यावें ऐसें करावें. गोखले यांजकडून रा॥ लिंगोपंत नवलगुंदास असतात ते आले आहेत. त्यांस हरतऱ्हेनें ठेवून घेतलें. सारांश स्वामींवर लोभ बहुत आहे. भेट व्हावी. आज्ञेप्रमाणें ऐकतील अशी खातरजमा वाटते. वरचेवर विनंती लिहितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६२० श्री. ( आषाढ शु० ७--२९ जून. )

विनंती सेवेसीं देवजी कृष्ण देशपांडे कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० ५ सफरपर्यंत स्वामीचे कृपे सेवकाचे वर्तमान यथास्थित असे. यानंतर इकडील वर्तमान तर श्री॥ राजश्री चिंतामणराव आपासाहेब व दादा गोखले कित्तरीं आहेत. गढींत गोखले आहेत. बाहीर आपासाहेब आहेत. तोफा सभोवते ठेविल्या आहेत. परवांचे दिवशीं वाघ यांजकडील स्वांर दोन तीनशें आले. कोणाकडील म्हणोन याणीं पुसिलें. 'आपलेच' म्हणोन सांगोन वाघ बकरीं खेळत बसले होते त्यांस तोडून वीस घोडीं घेऊन गेले. तों ( चिंतामणराव ) आपासाहेब घोडीं फेरणेंस बाहेर निघाले होते, त्यांजवर गेले. त्याणीं सात घोडीं टाकून गेले ते घेऊन आले. गोखले मागून गेले. गांठ पडली नाहीं. जखमी सर्वत्र कित्तुरीं आणिले. लष्करचे वाण्यांचे बैल जोंधळें भरून येत असतां वाघाकडील राऊतानीं शेंपन्नास वळून नेले. मिश्रीकोट ठाणें ( वाघाच्या हातास ) आलें नाहीं याजकरितां खुद्द हुबळीहून परवां कूच करून गेले. काल तोफा होत होते. राजश्री बाळकृष्णपंत भाऊ हरिहरास आले. सावनुरास येणार म्हणे. राजश्री विष्ठपंत बदामीकर स्वामींचे पदरचे, त्याणीं पट्टणास लिहून पाठवून कांहीं जमीयत देऊन सावनूर तालुका फिरोन घेणेंस अनुकूल जाले. दोन तीन ठाणीं सुमारचीं घेतलीं म्हणोन वर्तमान आहे. फौज बळ पाहिजे. खुद्द इंग्रज यावे तरी ( पेशव्यांच्या ) परवानगीचे उजूर करीत आहेत. बदनगोड, प्रांत सोंदें, हा तालुका वाघानें घेतला आहे त्याजकरितां सरहद्देचे मामलेदार जो जमाव देणें तो देतीलसें आहे. धारवाडचे व जुने हुबळीचे जाबसाल तोफाकरितां[1] अजुनी मिटला नाहीं. मिश्रीकोट घेतल्यानंतर उभयपक्षीं गांठ पडेलसें दिसतें. येथील जाबसाल व कर्नाटक महालचे सर्व दादानीं[2] अंगीकार केले आहे. याजकरितां आपासाहेब सर्वस्व त्यांचे कार्यास झटत आहेत. कित्तुरकर देसाई जमावानिशीं कुमकेस जाणार आहेत. मुरगोड तेथील देशमुखानें घेतलेंच आहे. तेथें रात्रौ एकाएकी यावयाचा बेत करीत आहेत म्हणोन बातमी येत आहे. हुशारी यथामति करीत आहें. पार लावणें

---

१ वाघाजवळ तोफा नाहींत म्हणून. २ धोंडोपंत गोखले यांणीं चिंतामणराव आपासाहेब यांस कर्नाटकच्या जहागिरींत तुमचा अंमल बसवून देतों असें कबूल केलें आहे.

स्वामीचे पाय समर्थ आहेत. शिरहद्दींत सरकारचें ठाणें काईम आहे. त्याचित वर्तमान आलें. राजश्री वासुदेवपंतकाका आजपर्यंत स्वामींकडे आले असतील. वाघानें सत्कार करून पाठवितो. आजपर्यंत सावनूर तालुक्यांत वाघानें बेकौल केलें नाहीं याजमुळें सर्वत्र वश्य आहेत. बेहद्दीस कारकून शेंदोनशें लोक आहेत. घासदाणेचा जाबसाल उरकोन वहिवाट आम्हाकडील कारकुनाचे विद्यमानें करावें म्हणोन खटपट करून कारकून मिश्रीकोटेस पाठविला आहे. होईल तें विनंती लिहितों. श्री दीक्षितस्वामी देवलापुरीं आहेत. दादा गोखले यांस आग्रहानें दर्शन जालें. फल देतेसमयीं वाघाकडून आल्यावर घेईन म्हणोन तसेच गेले. आपासाहेबही[1] दर्शन घेऊन गेले. मी त्यांचे कृपे आजपर्यंत सुखरूप आहें. स्वामींनीं एक विनंतीपत्र या स्थळावर सेवकावर कृपा असों देणेंविशीं पाठविलें पाहिजे. साहेबांचें स्मरण करीत असतात. काळजी आहे. ईश्वर कधीं कृपा करील न कळे. सेवेसीं श्रुत होय. आणखी आढळेल तें वर्तमान सेवेसी लिहीन. विदित होय हे विज्ञापना.

१ चिंतामणराव आपा.

# वाघाच्या बंडाचा शेवट.

(इ. स. १८०० जुलै ते सप्तंबर अखेर.)

यद्यपि जुलै ते सप्तंबरअखेरपर्यंत घडून आलेला 'वाघाच्या बंडाचा शेवट' हा या प्रकरणाचा मुख्य विषय ठरविला आहे, तथापि त्या तीन महिन्यांच्या मुदतींत पुण्यांत वगैरे घडलेल्या इतर गोष्टींचें वर्णन करणारीं पत्रें याच प्रकरणांत छापिलीं असल्यामुळें त्याही गोष्टींचा खुलासा याच प्रस्तावनेंत केला पाहिजे; व त्यानें तिचा बराच भाग व्यापला जाणार आहे. या अवांतर गोष्टींचा संबंध वाघाच्या बंडाशीं कांहींच नाहीं; आणि त्याचें वर्णन केवळ कालक्रमानें प्राप्त म्हणून त्या बंडाच्या हकीगतींत मधून मधून केलें असतां वाचकांच्या मनाचा वारंवार विनाकारण विक्षेप होईल, याकरितां ते सर्व वृत्तांत आधीं एकदमच सांगून टाकावे आणि मग वाघाच्या बंडाकडे वळावें, असें आम्हीं ठरविलें आहे.

बहुतेक मराठी राज्य लष्करी सरंजामांत वाटलें गेलें होतें. खुद्द सरकारच्या वहिवाटीस असा थोडाच मुलूख होता व तो त्याच्या नेहमींच्या खर्चालासुद्धां अलीकडे पुरत नसे. अशा स्थितींत सरंजाम तैनाता जमिनी वगैरे देऊन बाजीरावसाहेबांस आपल्या प्रीतींतल्या मंडळींचें स्वास्थ्य करून द्यावयाचें तर जुन्या सरंजामांची घालमेल केल्याखेरीज गत्यंतरच नव्हतें. अशा जुन्या सरंजामांदरून नजर फिरवितां फिरवितां त्यांच्या लक्षांत असें आलें कीं, प्रतिनिधींच्या मुलखापैकीं एखादा लचका तोडून घेण्याला ही संधि बरी आहे. लोकापवादास पात्र न होतां राजरोसपणानें प्रतिनिधीवर सक्ती करून या वेळीं आपला मनोदय तडीस नेतां येईल असें त्यांस वाटलें. आबा काळे व बाळोजी कुंजर यानीं या मसलतींत त्यांस वारंवार चिथावणी दिल्यावरून श्रीमंतानीं मनांत आणलेल्या उद्योगाचा उपक्रम जुलैच्या प्रारंभीं केला आणि त्यांत प्रतिनिधींच्या अधिकाधिक वाढणाऱ्या बेफाम वर्तनामुळें त्यांचें चांगलेंच फावलें! तो प्रकार मिरजकर वकिलाच्या पत्रांत पुढें लिहिल्याप्रमाणें वर्णिला आहे--

" श्री ॥ राजश्री पंतप्रतिनिधि यानीं आरब दूर करावे याप्रमाणें सरकारांतून ताकीद जाली. आरब दूर करावयाचें ठरलें तेव्हां तलब चाळीस हजार

रुपये व कर्जाऊ ऐवज पंतानीं घेतला तो द्यावा म्हणोन आरब याणीं अडवून बसविलें. ते समयीं पदरचे गृहस्थानीं शक्तिनुसार ऐवज दिला. पंचवीस तीस हजार ( रुपये ) भरणा जाला. बाकीचा भरणा न होय, तेव्हां कितेकांच्या अब्रू पंतानीं घेतल्या. आठ चार दिवस दंगा जाला. नंतर सरकारांतून वारंवार ताकीद होऊं लागली कीं " लौकर आरब दूर करणें. लोकांच्या अब्रू निमित्याखेरीज घेतात हें चांगलें नाहीं. जवळ कारभारी आहेत त्यांचें ऐकत नाहीं हें कामास येणार नाहीं. महात खिजमतगार पखाली याणीं सांगावें तेंच करावें, सारा दिवस आरबांचे जमातदार यांजपाशीं बोलणें खलबत, मनस्वी वर्तणूक करावी, नाटकशाळा ठेविली ते जात तेली, बहुत निंद्य, हें कामाचें नाहीं. " ( अशी ) ताकीद सरकारची जाली. त्यावरोन रागें भरोन अटाळा अगोदर चार दिवस लावून ( देऊन ) आपण स्वार गारद तयार करून निघणार; हें वर्तमान सरकारांत विदित जाल्यानंतर " तुम्ही जाऊं नये, जाऊं म्हणत असल्यास सरकारचा हुकूम नाहीं. अटकाव होईल. " असें सांगोन पाठविलें. तत्राप आग्रहें निघोन जाणार हा विचार कळतांच सरकारांतून गाडदी व तोफा दोन, व शिंदे यांजकडील पांचशें स्वार, पलटण एक, तोफा चार, याप्रमाणें रवाना जाले. सर्जेरावबापू व आत्माराम तांबोळी काल प्रहर दिवसापासोन वाड्याचे अंतऱ्यानें होते. नंतर सायंकाळीं घाटगे पंतांच्या वाड्यांत जाऊन चार गोष्टी सांगितल्या. त्यांजकडील लोकांस वाड्याबाहेर घालवून आपले लोक वाड्यांत घातले. खासा पंतांजवळ चाळीस पन्नास लोक मात्र दिवाणखान्यांत आहेत. वरकड लोक झाडून घालविले. पंत भोजन करीत नव्हते त्यांसही भोजन करविलें. पंतांनीं नाटकशाळेचा आग्रह बहुत धरला आहे. ' हिची गत तीच माझी ' म्हणतात, हे गोष्ट विथरास जाईल. खासा बायकोचें दर्शन नाहीं हा मोठा अविवेक. वरकडही प्रकार तसाच सर्व आहे. त्यांत निवड करावी असा अर्थ नाहीं. सारांश थोर संस्थान. बहुतांचें अन्न होतें. "

" प्रतिनिधींचे वाड्यांतील लोक सर्जेराव याणीं बाहेर काढले म्हणोन पुरवणीपत्रीं लिहिलें आहे. परंतु लोक कांहीं निघाले. बाकी लोक झाडून तसेच आहेत. पांच सहाशें जमाव वाड्यांत आहे. बाहेरून सरकारचे व शिंदे यांजकडील स्वार व कवाइती लोक आहेत. पंत अडोन बसले आहेत. ऐकत नाहींत. जवळपासच्या लोकानीं सावधगिरी करून वस्तवानी भरवस्तींत आणिली. उदईक गोळा सुरू होतो ऐसा रंग दिसतो. पेठ लुटली जाईल. "

ही गोष्ट जुलैच्या तिसऱ्या तारखेस घडली. मात्र तिचा पल्ला गोळा सुरू होण्यापर्यंत गेला नाहीं. आठ दहा दिवस घोळ पडून अखेर या खेपेपुरती तरी या प्रकरणाची मिटवामिटव झाली. पंतांचीं तीन पत्रें ( शिंद्यांस एक व घाटग्यांस दोन ) या प्रकरणांत छापिलीं आहेत त्यांवरून असें दिसतें कीं, त्यानीं ‘ आपणास वांचवावें. नाहीं तर आपण अब्रूसाठीं मरतों ’ अशी शिंदे व घाटगे यांस गळ घातली व त्यांचीं बहुत आर्जवें केलीं. त्यावरून त्या दोघांनीं पंतांबद्दल पेशव्यांजवळ रदबदल केली; आणि ‘ तोलिणीची पोर टाकीन, कारभाऱ्यांच्या सल्लयाप्रमाणें वागेन, पुण्यांतून जाणार नाहीं, ’ असें पंतांकडून अळेंबळें कबूल करवून पेशव्यांचा राग शांत केला आणि हें प्रकरण समेटून घेतलें. मात्र कबूल केल्याप्रमाणें पंत वागतील असा भरंवसा येत नसल्यामुळें त्यानीं पलटणें व तोफा व स्वार छावणींत परत न नेतां पंतांवर रात्रंदिवस नजर ठेविली पाहिजे असें निमित्त करून शहरांतच ठेविलें. तसें करण्यांत त्यांस आणखी एक निराळाच हेतु साधावयाचा होता. तो हेतु कोणता, तर अमृतरावसाहेबांस पुण्यांतून घालवून देण्याचा ! ती मसलत त्यांनीं बाजीरावसाहेबांच्याच प्रेरणेवरून ठरविली होती.

बाजीरावसाहेबानीं अमृतरावांशीं बाह्यात्कारें विरुद्धभाव असा कधींच दाखविला नाहीं. मात्र त्यांविषयीं त्यांच्या मनांत मत्सर, भय व चिंता नेहमीं जागृत असत. अमृतरावाला जरी मीं दिवाणगिरीचीं वस्त्रें दिलीं आहेत तरी राज्यकारभार याच्या हातीं गेल्यास हा माझीच मुंडी मुरगाळून पेशवाईची गादी बळकावील असें त्यांस वाटे. ती त्यांची द्वेषबुद्धि प्रदीप्त ठेवण्यांत बाळोजी कुंजर नेहमीं तत्पर असे, आणि अमृतरावाप्रमाणें पेशवाईचा कारभार करण्याचा माझाही हक्क आहे असें प्रतिपादन करी ! कुंजराचा राज्यकारभाराशीं संबंध काय ? संबंध असा कीं, पुरंदरे हे पेशव्यांचे मूळपासूनचे कारभारी आणि कुंजर हा पुरंदऱ्यांचा लेकावळा ! पुरंदऱ्यांच्या घरांत कोणी कर्ता पुरुष नसल्यामुळें त्यांच्या वतीनें पूर्वीं त्यांचे कारकून सखारामबापू पेशव्यांची दिवाणगिरी करीत होते त्याप्रमाणें मी करणार असें त्याचें म्हणणें होतें. व तो प्रीतींतला असल्यामुळें श्रीमंतानीं तें त्याचें म्हणणें आंतून मान्य केलें होतें. तात्पर्य, दोघांच्याही डोळ्यांत अमृतराव सलत असून हे पुण्यांतून गेलेले बरे असें त्यांस वाटत होतें. त्यांतून नानांची मंडळी व शेणवी मुत्सद्दी यांच्या कारस्थानाला अमृतरावानीं चिथावणी दिली तो त्यांच्या हातून बाजीरावसा

हेबांचा मोठाच गुन्हा घडला होता. त्यांस कैदेंत ठेवावें तर वडील बंधूस कैदेंत बसविल्याचा दुर्लौकिक होणार, त्यापेक्षां त्यानीं पुण्यांतून कसें तरी आपखुषीनें जावें अशीच तजवीज केली पाहिजे, असा श्रीमंतानीं मनसबा ठरविला. अलीकडे शिंद्याकडून करून घेण्याचीं जीं जीं कामें असतील त्यांचें बोलणें चालणें कुंजराकडूनच ते करवीत. याही कामाचा ठराव शिंद्याशीं त्याच्याच मार्फतीनें झाला. त्या दिवसांत शिंदा म्हणेल तें सिद्ध होत होतें. तो वारंवार धमकावणी देऊं लागला तेव्हां अमृतरावांस मोठें संकट प्राप्त झालें. प्रतिनिधींची दशा त्यांनीं पाहिलीच होती. येथें शिंद्याच्या कैचींत रहाणें धोक्याचें आहे, तो आपणास कैद करूं लागला तर बाजीराव त्याचा हात धरूं शकणार नाहींत, ही त्यांची खात्री झाली. शिंद्यापुढें आपला कांहीं उपाय चालत नाहीं असा श्रीमंतानींही बहाणा केला. मग अमृतराव निरुपायानें जुलैच्या बावीस तारखेस पेशव्यांचा निरोप घेऊन तळेगांवास गेले आणि तेथून कल्याणास जाऊन पुढें वसईच्या मुक्कामीं जाऊन राहिले.

नानांच्या पक्षांतले मुत्सद्दी कैदेंत घातले, आरब रोहिले धुडकावून लाविले, प्रतिनिधींस तंबी दिली, अमृतरावास पुण्यांतून काढून लाविलें, सरकारांतून जी जी कामगिरी सांगण्यांत आली तीं ती दौलतरावानीं पार पाडिली. पण या सर्व कामगिऱ्यांबद्दल श्रीमंतांनीं जें पंचवीस तीस लाख रुपये द्रव्य देऊं केलें होतें तें कांहीं येल्या शिंद्याच्या हातास येईना ! मोरोबादादा हें मुबलक द्रव्याचें कुळ असलें पाहिजे असा श्रीमंतांना मोठा भ्रम होता. त्यांजकडून द्रव्य काढून शिंद्याची क्षुधा शांत करितां येईल अशी त्यांस आशा होती. मोरोबादादा पुण्यास आल्यावर त्यांचा त्यानीं मोठाच बडेजाव मांडला होता व त्यांच्या कामांत तीस लाख रुपये देऊं करणारा आपाजीपंत गोंधळेकर यासही 'कामापुरता मामा' या न्यायानें चार दिवस दरबारच्या कामांत घेतल्यासारखें केलें होतें. परंतु मोरोबाविषयींचा भ्रमाचा भोपळा लवकरच फुटला ! एके दिवशीं श्रीमंतानीं आपल्या मंडळीकडून त्यांजवळ हळूच गोष्ट काढविली कीं, गोंधळेकर म्हणत होता ते रुपये तुम्ही देऊन शिंद्याचें देणें भागवावें, आणि नानांप्रमाणें कुलमुखत्यारीनें पेशवाईचा कारभार करावा, अशी श्रीमंतांची मर्जी आहे. त्यावर मोरोबानीं तत्काळ साफ उत्तर सांगितलें कीं, माझ्याजवळ पैका नाहीं आणि मला तुमचा कारभारही नको ! आजपर्यंत कैदेंत जन्म गेला, आतां म्हातारपणीं घरीं रहावयास आलों आहें; श्रीमंतानीं

कृपा करून मला सुखानें घरीं राहूं दिलें तर राहीन ! नाहीं तर वाटेल तेथें नेऊन त्यांनीं मला ठेवावें. माझें कांहीं म्हणणें नाहीं.

मोरोबादादांनीं याप्रमाणें खाका वर केल्यावर शिंद्यास द्रव्य कोठून द्यावें ही श्रीमंतांस मोठी चिंता प्राप्त झाली. शिंद्यानीं तर सक्तीचा तगादा बसवून कुंजरास जर्जर केलें, श्रीमंतांस सळो कीं पळो करून सोडलें, आणि प्रतिनिधींच्या निमित्तानें शहरांत आणलेल्या पलटणें तोफांच्या बळावर सरकारच्या दारीं धरणें धरल्याचा आकार दाखविला ! ही शिंद्याची अमर्यादा व जाच आपणास सोसवत नाहीं, आपण पुण्यांतून निसटून कोठें तरी निवांत जागीं जाऊन बसणार, असें बाजीरावसाहेब बोलूं लागले; तर आमच्या देण्याचा फडशा केल्याखेरीज तुम्हांला कोण जाऊं देतो असें दौलतरावही म्हणूं लागले ! पेशव्यांच्या वैतागांत थोडासा राजकीय हेतु होता हें जरी खरें आहे, तरी एकंदरींत पहातां शिंद्याशीं त्यांचे नेहमींचे लाडझगडे चालत त्यांपैकींच हाही प्रसंग होता असें दिसतें. लोकांना मात्र हे दोघे आतां हमरीतुमरीवर आले, पुढें काय होतें कुणाला ठाऊक, अशी उगीचच काळजी पडली होती ! या लोकभ्रमाचा फायदा घेऊन बाजीरावसाहेबानीं इंग्रजबहादुरांस महिना दोन महिने केवळ मौजेखातर कसें घोळसविलें तें पुढच्या प्रकरणांत सांगूं.

नाना फडनवीस जिवंत होते तोंपर्यंत श्रीमंतांस कोणी तादृश विचारीत नसे व त्यांचें तेज फिकें पडे. पण आतां त्यांचें प्रभुत्व अकुंठित चालावें अशी स्थिति आली होती. आपलें राज्य सुरक्षित, समृद्ध, व बलवान् करण्याकडे बुद्धीचा व्यय करावा असें जर त्यांच्या मनांत असतें तर तसें करणें त्यांच्या हातीं होतें. पण नाना दिवंगत होऊन पांच सहा महिने लोटले नाहींत तोंच रावबाजींच्या बुद्धीचे प्रकाश चोहोंकडे फांकूं लागले, आणि त्यावरून त्यांची राज्य करण्याविषयींची नालायकी इतक्यांतच लोकांच्या दृष्टीनें प्रस्थापित झाली ! मिरजकरांचा वकील लिहितो—

" दौलतीमध्यें पांच पिढ्यांचे सेवक आहेत त्यांचें संरक्षण करावें हा विचार तिलप्राय ( श्रीमंतांच्या ) ध्यानांत नाहीं. जेणेंकरून नाहीं सारिखे होतील तो अर्थ करावा ! पागा दहा पंधरा मोडिल्या. पुढेंही बाकी राहिल्या त्या ठेवीत नाहींत. दोन महिन्यांमागें आठ पंधरा दिवस चार घटका दोन घटका चांफेखणांत कारभार व्हावा ऐसें आठ पंधरा दिवस चालिलें. अलीकडे तोहि विचार

राहिला. निकटवासी तूर्त शागीर्द खिजमतगार व कोपरगांव येथें मंडळी होती तितकेच मात्र आहेत. शागीर्द जवळ कारभारी ! ज्यांस कोणाची ओळख नाहीं, अक्षरशत्रु, केवळ शुद्ध शागीर्द, त्यांस मोठीं मोठीं कामें सांगावीं, त्यांस उजेडांत आणावें, हें ध्यानांत रात्रंदिवस वसतें. स्वांरी मौजे कोथरूड येथें एक दोन दिवसांनीं जात असत्ये. दोन प्रहर अडीच प्रहर रात्रीस स्वांरी माघारी येत्ये. श्री॥ सौ॥ बाईसाहेब नेहमीं स्वांरीसमागमें असतात. या प्रकारचा विचार. बोलण्याचा भरंवसा तिलप्राय नाहीं. दहा पांच गृहस्थ मातबर चार घटका एक जागां बसोन काम काज बोलणें चालणें होऊन विचार व्हावा तो अर्थ होत नाहीं. पहिलें कांहीं नसावें ही उमेद आहे. गोड बोलोन विश्वासघात करावा ही विद्या पूर्ण आहे. असो. परंतु कारभारही करितां येतो ऐसा प्रकार आहे म्हणावें तर तोही नाहीं. नाहीं येत असा म्हणावा तरी घोटाळा चाललाच आहे ! बरें अथवा वाईट जें खावंद सांगेल तें सेवकानें ऐकलेंच पाहिजे. मनांत कांहीं एक ठेऊन उपायच नाहीं. काम काजें तूर्त होणें अथवा आज्ञा चालणें ते या रीतीची चालली आहे. कोणास भरंवसा बोलण्याचा नाहीं. एक अवसरें सर्वांचा भोग उत्पन्न जाहला आहे ! लाचार ! उपाय नाहीं. सरकारचे पदरचे सेवक अथवा अन्यत्र बहुता दिवसांचे कुटुंबवत्सल त्यांच्या दिनचर्या चालणें कठिण. प्राणांशीं गांठी आहेत ! पुण्यामध्यें कोणी येक आबालवृद्ध चांगलें म्हणत नाहीं. पुढें याचा विचार कसा श्रीनें योजिला आहे कळत नाहीं. परिणाम चांगला नाहीं. स्पष्ट लोक बोलतात. ”

पेशवे व शिंदे यांच्या दरबारची स्थिति यावेळीं पुढें लिहिल्याप्रमाणें होती. ‘ तूर्त श्रीमंतांपाशीं प्रमुख बाळोजी कुंजर व बळवंतराव नागनाथ, गोपाळराव मुनशी, सदाशिव माणकेश्वर--म्हणजे पिंगळ्यांच्या घरचे— ऐसे मुखत्यार आहेत. त्यांत कुंजर खरे. बाकीचे प्रकरणानुसार कृपेंत आहेत. मुनशी इंग्रज पालमर याजकडील संधान, माणकेश्वर नबाबाकडील संधान. नागनाथ श्रीमंतांची दया ! चिंतोपंत देशमुख फडावर आहेत. ’ शिंद्याच्या दरबारीं ‘ सर्जेराव करील तें होतें. परंतु यादो भास्कर आणि चिटणीस मंडळ मुखत्यार आहेत. त्याशिवाय कांहीं होत नाहीं. यजमान घाटगे यांचें ऐकतात, सबब तेही त्याच रंगांत आहेत. परंतु सर्वाध्यक्षता त्यांजकडे. ’

दौलतराव शिंद्यांच्या दरबारीं यादो भास्कर व चिटणीस मंडळ यांजकडे इतर कारभाराची सर्वाध्यक्षता असली तरी—बाजीरावसाहेबांच्या अत्यंत

प्रीतीला कारण होणारें शेणवी सरदार मुत्सद्यांचें शासन—अमलांत आणण्याची सर्वाध्यक्षता सर्जेरावानें आपणाकडेच राखून ठेविली होती, आणि तिचा प्रताप तो मन मानेल त्या प्रकारें गाजवीत होता !

" दौलतराव शिंदे यानीं छ० १५ सफर भौमवारीं ( ८ जुलै ) यशवंतराव शिवाजी व काळा बहिरू लेकवळा यांस पांच पाट काढून डोकीवर शेंदूर घालून नाक कान छेदन करून लष्करांतून फिरवून तास रात्रीस मेख-सूखालीं मारून टाकिलें. तेच दिवशीं नारायणराव बक्षी यांस कैद करून किल्ले नगरास रवाना केलें. धोंडीबा दादा पेशजी नगरास रवाना केले होते त्यानीं तेथें फितूर केला. दस्तैवजीं सांपडले. त्यांस तेथेंच तोफेच्या तोंडीं दिलें. "

नारायणराव बक्षी यांचा लष्करांत मनाजोगा विचित्रवध करणें धोक्याचें असल्यामुळें सर्जेरावानें त्यांची नगरास रवानगी केली. तेथें ते गेल्यावर त्यांच्या अंगाला बाण बांधून ते पेटवून त्यांस उडवून दिलें ! याप्रमाणें घाटग्यानें त्या दुर्दैवी ' बक्षीचा पक्षी ' केला तरी त्याच्या कुडीला प्राण सोडीना ! अखेरीस वध करणाऱ्या मांगांना करुणा येऊन त्यानीं त्याचा शिरच्छेद केला.

शिंदे होळकर यांस दिवाण नेमून देण्याचा अधिकार पेशव्यांचा होता व त्यास अनुसरून बाजीराव साहेबानीं शिंद्याची दिवाणगिरी सर्जेरावास देऊं केली होती. पण शिंद्याचे जुने दिवाण सदाशिव मल्हार सरकारांतूनच नेमलेले होते ते दूर झाल्याखेरीज नव्या दिवाणाची स्थापना कशी करितां येईल ? ती अडचण नाहींशी करण्याकरितां दौलतराव शिंद्यानीं जुलैच्या २८ तारखेस सदाशिव मल्हार यांस कैद करून नगरच्या किल्ल्यास रवाना केलें. नंतर ता० ५ सपटेंबर रोजीं श्रीमंतानीं सर्जेराव घाटगे यांस शिंद्याच्या दिवाणगिरीचीं वस्त्रें दिलीं. "देण्याचे अथवा कराराचे यादीवर श्रीकाराजवळ ' नाथ प्रसन्न ' असें निशाण दिवाणानीं करावें असें ठरलें. "

आनंदराव रास्ते आषाढ शु० ९ भृगुवार ( २७ जून ) या दिवशीं वांईच्या मुक्कामीं वारले. त्यांच्या सरदारीचीं वस्त्रें त्यांचे पुत्र माधवराव यांस श्रीमंतानीं दिलीं. साताराप्रकरणामुळें हे माधवराव रास्ते ऐ. ले. संग्रहाच्या वाचकांस उत्तम परिचयाचे झालेले आहेत. तूर्तकाळीं त्यांवर श्रीमंतांचीं बहुत खुषी झालेली दिसत होती. एकदां तर त्यास फौजेचे मुख्य सरदार नेमून बाघावर पाठवावें, आणि पटवर्धन पानशे गोखले व कर्नाटकांत असलेलीं

शिंद्याचीं पलटणें सुद्धां सर्वांस त्यांच्या हाताखालीं द्यावें, अशीदेखील बोलवा पुण्याच्या दरबारीं निघाली होती ! पण ही सर्व कृपा मायावी होती. श्रीमंतांच्या मनांतून पुढें लवकरच रास्त्यांचें सर्वस्वहरण करावयाचें होतें त्याची ही प्रस्तावनाच होती ! बाजीरावसाहेबांचा स्वभाव पराकाष्ठेचा खुनशी होता. परशुरामभाऊंच्या बाबतींत रास्ते आपल्या मर्जीप्रमाणें वागले नाहींत ही गोष्ट त्यांच्या मनाला डांचत होती. ( पहा भाग १० पृ० ५५६८ ) लोकांकडून द्रव्य काढण्याबद्दलचे श्रीमंतांचे अडाखे आतां इतके सर्वविश्रुत झाले होते कीं अमुक प्रसंगाचा रोख अमुक माणसावर आहे असें कोणासही सांगतां येई. उदाहरण—

" इकडील राजकी वर्तमान तरी शिंदे यांस पैका द्यावयास केला त्याचा नेट शिंद्यांचा फार आहे. सरकारदौलतीमध्यें पैका आहे नाहीं हा विचार कळतच आहे ! एक दोघांचीं घरें बुडवून पैका भर करावी तरी असा गृहस्थही कोणी राहिला नाहीं. श्रीमंतांस तो पैक्याची निकड शिंदे यांस द्यावयाची आहे. दौलतीमध्यें कारभारी तो पेशजी नांवें लिहिलींच आहेत. पुढें कळवंडी ( ? ) पडाव्या ऐसा रंग दिसतो. आज उद्यां पैका देतों म्हणोन कुंजर वगैरे बोलतात. त्यांस तो पैका पावत नाहीं. पांच चार वायदे केले तेहीं टळले. श्रीमंतांस मोठा विचार पडला आहे. ( भाद्रपद व० १३ स ) मौजे कोथरूड येथील बागांत श्रीमंत स्वारीस गेले. रास्ते, बाबा फडके, व मोराबा दादा व बिनीवाल्यांस बोलावून नेऊन त्यांजपाशीं श्रीमंतानीं पुसिलें कीं, राज्यामध्यें बखेडा जाला. जलचर प्रबळ जाला. बंदोबस्त एकही नाहीं. त्यास तुम्ही बहुता दिवसांचे सरकारचे येखत्यारी. याचा बंदोबस्त कसा करावा याचा विचार करून सांगावा. त्याप्रमाणें करावयाचें. त्यावरून सर्वांनीं कोणी उत्तर केलें नाहीं. मोरोबादादा याणीं उत्तर केलें कीं, याचा बंदोबस्त करणें तो राजश्री दौलतराव बाबा याणीं करावा. ते आज सरकारचे सेवेशीं तत्पर आहेत. ते यांतील अर्थ पाहून विनंती करितील. ( त्यांस ) श्रीमंतानीं आज्ञा करणें ते करावी. याप्रमाणें उत्तर जालें. शिंदे यांचे कारभारी आबा चिटणीस व यादवराव भास्करही होते. त्याणीं उत्तर केलें कीं, श्रीमंतांचे पदरीं चार सरदार आहेत तसेच आम्ही. याचें उत्तर आम्हीं तरी काय सांगावयाचें आहे ? याप्रमाणें बोलणें जालें. स्वारी माघारी आली. पैक्याचें कांहीं बोलणें जालें नाहीं. परंतु कांहीं पैका रास्ते फडके बिनीवाले यांजपाशीं मागावा हा मजकूर दिसतो ! "

राज्यांतले मोठमोठे बलाढ्य सरदार व मुत्सद्दी यांचें निर्दलन करून झाल्यावर आतां रावबाजींस ‘ घरच्या म्हातारीचा काळ’ होण्याला फुरसत सांपडली ! माजी पेशव्यांची स्त्री यशोदाबाई शनिवार वाड्यांतच रहात होती. जुने कारभारी व मुत्सद्दी हयात होते तोंपर्यंत तिच्या वाटेस बाजीराव-साहेबांना जातां आलें नाहीं. तिचा लवाजमा नोकरपेशा व थाटमाट पूर्वीपासूनचा काय होता तो सर्व त्यांस तसाच चालू ठेवावा लागला. आतां तिचा कैवार घेणारें कोणी राहिलें नाहीं; तेव्हां तिला हळू हळू संपुष्टांत आणून कोठें तरी किल्ल्यावर अडकवून टाकावें असा विचार त्यांच्या मनांत उद्भवला. मात्र हें काम लोकविद्वेष होऊं न देतां आस्ते आस्ते सावधपणानें करावयाचें होतें. तो उद्देश मनांत धरून श्रीमंतानीं बाईजवळचे दोघे कारकून परशुरामपंत भावे व महादाजीपंत साठे यांस पटवर्धनांच्या फौजेंत रोजगार सांगितल्याचें निमित्त करून युक्तीनें दूर घालवून दिलें. भावे यानीं हरिपंतबाबांच्या व साठे यानीं चिंतामणराव आपांच्या फौजेंत नेहमीं राहून तेथील बातमी पुण्यास लिहून पाठवीत जावी हा रोजगार त्यांना सांगण्यांत आला होता. आमच्या लष्करांत आजपर्यंत हुजुरून बातमीदार ठेवण्याचा शिरस्ता नसतां आतांच हे बातमीदार कोण कुठचे व कशाकरितां पाठविले, म्हणून रामचंद्र-पंतानीं पुण्यास वकील बाबा काळे यांस खुलासा विचारिला. तेव्हां काळयानीं उत्तर लिहिलें कीं, ‘ मागील श्रीमंतांपाशीं ( भावे ) हे गृहस्थ रहात होते. हल्लीं सरकारवाड्यांत मातुश्रींकडें भोजन करीत असतात. त्यांस कांहीं एक हिल्ल्यानें दूर घालवावें असें मनांत आणून लांबविलें असेल तर ईश्वर जाणे ! ” “ आपणाकडे भावे आले आहेत तसे राजश्री महादाजीपंत साठे पडे राव-साहेबांपाशी होते त्यांची रवानगी चिंतामणराव आपांकडे होत आहे. ”

पहा जग कसें निष्ठुर आहे तें ! बिचारा सवाई माधवराव माडीवरून पडून जिवाला मुकला तो मुकलाच, आणि शिवाय ‘ पडे रावसाहेब ’ हें तुच्छताबोधक अभिधान पावला ! थोरले माधवराव लढे रावसाहेब तर धाकटे माधवराव पडे रावसाहेब !

प्रतिनिधींच्या हालचालींवर पेशव्यांनीं सक्त नजर ठेविली होती व त्यांचा पुंडावा चालूं द्यावयाचा नाहीं हें मनांत ठरवून ठेविलें होतें. “ प्रतिनिधि यांनीं मागती दोनशें आरब चाकरीस ठेविले त्यांवर शिंदे यांच्या पलटणांची तंबी येऊन आरब काढून दिले. ( ५ सप्तंबर. ) त्यामुळें पलटण-

वाल्यांनीं पुलाजवळचीं कांहीं घरें झाबडलीं." इतकें झालें तरी प्रतिनिधींच्या वर्तनांत सुधारणा दिसून येईना. पेशव्यांच्या ताकिदी झाल्या, शिंद्यांकडून इशारे झाले, तथापि कोणासही न जुमानतां त्यांनीं मनाप्रमाणें वागण्याचा क्रम चालूच ठेविला होता. पण ही दांडगाई किती दिवस चालणार? पंतांच्या स्वातंत्र्याचें घटीपात्र सप्टेंबरच्या तीस तारखेस तोंडोतोंड भरलें! त्या दिवशीं पेशव्यांनीं पलटणें पाठवून पंतांच्या वाड्यावर एकाएकीं हल्ला केला व त्यांस कैद करून शनिवारवाड्यांत नेऊन ठेविलें. तो वृत्तांत मिरजकर वकिलाच्या पत्रांत आला आहे तो याप्रमाणें—

"श्री॥ राजश्री पंतप्रतिनिधि यांची वर्णणूक चांगली नाहीं म्हणोन दोन वेळां सरकारांतून शिंदे यांस सांगोन तोफा पलटणांच्या चौक्या बसविल्या होत्या. फिरोन बोलणें होऊन चौक्याही उठल्या. 'गैरवाजवी वर्तणूक करूं नये, नाटकशाळा लावून द्यावी, कारभारी यांचे हातून सुरळीत कामकाज घ्यावें, ऐसा ठराव जाला होता. परंतु तेंही जालें नाहीं. पूर्ववत्-प्रमाणें बेजहां वर्तणूक व्हावयास लागली. प्रातःकाळीं दोन पलटणें व पांच तोफा स्वार पांचशें येऊन एकाएकीं वाड्यांत चढाई करून गेले. पंतांकडील कांहीं लोक पळोन गेले. दहा वीस लोक सळ सोडोन लढों लागले. झटपट जाली. पांच सात लोक पंतांकडील ठार जाले. शिंद्याकडील पांच सात ठार, दहा वीस जखमी जाले. खासा पंत बंगल्यामध्यें जिन्याचे तोंडचें कवाड लावून बसले आहेत. हातीं निमच्या सळ सोडोन बसले आहेत. वाड्यांतील झाडून चीजवस्त लुटली. शेंदोनशें घरें सभोवतीं लुटलीं. त्यांजवर समय विलक्षण गुदरला आहे."

"श्री॥ राजश्री पंतप्रतिनिधि यांचा मजकूर पेशजी लिहिला आहे. त्यास पंतांच्या वाड्यांत दंगा जाला. पांच सात असामी ठार व दहा पांच जखमी जाले. शिंदे यांजकडील तीन असामी ठार, वीस जखमी जाले. बाकी लोक झाडून बाहेर काढिले. खासा पंतांजवळ बंगल्यामध्यें दहा पंधरा असामी केवळ निदानचे सोबती मात्र एक दिवस होते. सरकारांतून बाळोजी कुंजीर जाऊन पंतांस चार गोष्टी सांगोन सरकारांत वाड्यांत आणिलें. निराळें स्थळ हौदाकडील पूर्वेचे अंगचें थोरलें देवघर व आंतील सोपा व वरील दिवाणखाना पंतांकडे दिला. चार लुच्चे होते त्यांस प्रतिबंध केला आहे. नाटकशाळा कोणी म्हणतात पंतानीं ढांबबिली. कोणी म्हणतात शिंदे यांणीं

सैन्यांत धरून नेली. परंतु पंतांजवळ नाहीं. पंतांचे वाड्यांत गर्दी जाली तें समयीं वाडा झाडून लुटला. सुतळीचा तोडादेखील राहिला नाहीं. सभोंवते चाळीस पन्नास लहान मोठे वाडे व घरें लुटलीं. लाखों रुपयांची नुकसानी जाली. पंतांचा आब गेला ही गोष्ट लौकिकांत चांगली जाली नाहीं. लोक बहुत श्रमी होतात. बहुत दिवसांचे दौलतवान. त्यांजवर समय गुदरला! भगवत्सत्ता प्रमाण! श्री॥ राजश्री पंतप्रधान यांसच पंतांचा रोष बहुत आला होता याजमुळें या थरास गोष्ट आली. शिंदे यांचा आग्रह बहुतसा कांहीं नव्हता. यांचा आब घेतला असतां पंतांजवळ पैका अथवा हरएक प्राप्त होतें ऐसा अर्थ नाहीं. परंतु सरकारआज्ञेस उपाय नाहीं. होणारें चुकत नाहीं. सांप्रत पंतांचे वाड्यांत चाळीस असामी प्यादे चौकीस मात्र कुंजीर याजकडील आहेत. शंभर दीडशें पात्र पंतांचे पंगतीस नित्य होत असतां हल्लीं या स्थितीस सरकाररोषानें आले. वाड्यांत दीपदेखील लागणेंस संकट आलें."

वरच्या उताऱ्यांत पंतांच्या नाटकशाळेचें काय झालें तें नक्की ठाऊक नाहीं असें दर्शविलें आहे. तथापि आम्ही वाचकांस कळवितों कीं, पंतांची नाटकशाळा ताई तेलीण सुस्थळीं सुखरूप ठेवण्याची तजवीज पंतानीं केली होती! छत्रपतींच्या अष्टप्रधानांपैकीं रावपंडितप्रधान व रावपंडित प्रतिनिधि यांमध्यें जो हा चुरशीचा झगडा झाला त्याला कारण काय, तर 'तेलिणीची पोरगी'! बाकी जिच्याबद्दल एवढ्या बड्या लोकांत झगडा व्हावा अशाच लायकीची ती 'नाटकशाळा' होती एवढें मात्र खरें! तिच्या पराक्रमांचा भरपूर वृत्तांत ऐ. ले. संग्रहाची मजल पंधराव्या किंवा सोळाव्या भागापर्यंत कधीं काळीं पोंचलीच तर वाचकांना वाचावयास मिळेल!

घरांत दोघी विवाहित स्त्रिया असतां त्यांचें दर्शन वर्ज्य करून परशुरामपंत प्रतिनिधि बाहेरख्यालीपणाच्या नादीं लागले याचें कारण लोक सांगतात तेंही चमत्कारिक आहे. पंतांचे वडील भवानराव प्रतिनिधि ज्या दिवशीं वारले त्याच दिवशीं पंतांचा जन्म झाला. त्यावरून कोणी लुच्चानीं त्यांची अशी समजूत करून दिली होती कीं, ज्या दिवशीं तुम्हांला मुलगा होईल त्या दिवशीं तुम्ही मरायचे आहां! संभाळून रहा!

शिंद्याचीं पलटणें मिरजेनजीक मालगांवास होतीं तीं तेथून निघून कृष्णा उतरावयास उगार येथें गेलीं हें मागच्या प्रकरणीं लिहिलें आहे. तिकडे त्यानीं जाण्याचें कारण त्यांस चिकोडी मनोळी या तालुक्यांत संचार करावयाचा होता व करवीरकरांशीं ठरलेल्या नवीन तहाप्रमाणें हे तालुके पट-

वंर्धनांच्या ताब्यांतून काढून सर्जेरावाच्या म्हणजे पर्यायानें करवीरच्या महाराजांच्या हवालीं करावयाचे होते. उलटपक्षीं या पलटणांस हरकत करण्याचें काम चिकोडी परगण्याचे मुतालिक देसाई नागो शामजी यानीं पतकरलें होतें. त्यांच्या कुमकेस रामचंद्रपंत आपानीं हरबाजी नरसिंह धायगुडे यांस पाठविलें होतें. नागोपंत आपा व हरबाआपा यानीं पलटणांशीं झूज देण्याकरितां चार हजार पायदळ व हजार बाराशें स्वांर असें सामान तयार केलें होतें व नेरलीचें ठाणें लढविण्याची उत्तम तयारी केली होती. त्या ठाण्यांत परशुरामभाऊच्या पदरचे कित्येक नामांकित गारद्यांचे जमातदार चाकरीस होते. पलटणांवरचा मुख्य सरदार आपा देसाई निपाणकर यानें चिकोडीकरांची तयारी पहातांच त्यांस जरबेंत आणण्यापुरतें आपलें बळ नाहीं असें मानिलें. शिवाय घटप्रभा व मलप्रभा यांच्या दुआबांत त्या वेळीं धोंडजी वाघ व त्याचा पाठलाग करणाऱ्या इंग्रज वगैरे फौजा यांचें झेंबट लागलें होतें त्याचें सान्निध्य शक्य तेवढें चुकवावें असेंही त्याच्या मनांत आलें. सबब आणखी फौज पाठविण्याविषयीं त्यानें पुण्यास पत्र लिहिलें व ती फौज येईपर्यंत तो कृष्णा उतरून कुडची येथें मुक्काम करून राहिला. त्याच्या कुमकेस शिंद्यांनीं दोन पलटणें व सात तोफा देऊन बराऊनसाहेब यास पाठविलें. करवीरच्या वेढ्यासंबंधें हा बराऊनसाहेब वाचकांच्या ओळखीचा झालाच आहे. ती कुमक येऊन पोंचली व वाघाच्या पाठीस लागत इंग्रजही मलप्रभा उतरून तुंगभद्रेकडे गेले असें पाहून आपा देसाई यानें चिकोडीतालुक्यांत प्रवेश केला व सप्तंबरच्या १८ तारखेस नेरलीच्या ठाण्यास वेढा घातला. त्याच्या पलटणांजवळ दिवाळतोड म्हणजे किल्ल्याचीं भिंताडें पाडणाऱ्या थोर तोफा नसल्यामुळें या वेढ्याचें काम रेंगाळत चाललें होतें.

जुलई ते सप्तंबरअखेरपर्यंत मराठी राज्यांत घडलेल्या ठळक ठळक गोष्टींचें विवेचन एवढा वेळपर्यंत झालें. आतां वाघाच्या बंडाचा शेवट लावायचा तेवढा राहिला. त्या प्रकरणीं धोंडजी वाघानें धोंडोपंत गोखल्यांचा पराजय करून त्यांस मारून टाकलें हा प्रसंग प्रथम नजरेसमोर येतो, म्हणून त्याचेंच वर्णन आधीं करूं. कित्तूरच्या मुक्कामीं धोंडोपंत गोखले व चिंतामणराव आपा यांस धोंडजी वाघानें कसें घेरीत आणलें हें मागच्या प्रकरणांत दाखविलेंच आहे. वाघाचें लष्कर मुगुटखानाच्या हुबळीपर्यंत आलेंच होतें. तेथून तो लढाई देण्याच्या इराद्यानें ता० २८ जून दिवशीं कित्तुरापासून तीन कोसांवर मरग म्हणून खेडें आहे तेथें येऊन उतरला. त्याची फौज भारी. कित्तूर ही

जागा बळकट खरी, परंतु तेथें पाण्याचा तोटा. शत्रूचा वेढा बसल्यास निभाव लागणार नाहीं, याकरितां तेथून सुमारें दहा कोसांवर हल्याळ येथें इंग्रजाचें ठाणें व दोन पलटणें आहेत त्या आसऱ्यास तूर्त जावें, आणि तेथून पुढें इंग्रजांच्या संमतानें लढाईचा विचार कर्तव्य तो करावा, अशी धोंडोपंत व चिंतामणराव यानीं मसलत ठरविली; आणि ते त्याच दिवशीं ( आषाढ शु० ६ मंदवार ता० २८ जून ) रात्रौ चंद्रास्त झाल्यावर हल्याळास जाण्याकरितां लष्कर घेऊन निघाले. रात्र काळोखी व तो मार्ग दाट झाडींतून असल्यामुळें सात कोस मजल येई तों प्रहर दिवस आला. तेथून हल्याळ तीन साडेतीन कोस होतें. वाटेंत एक 'डवगी नाला' म्हणून ओढा लागला. त्यांत गोखल्यांची काळा पहाड नांवाची नामी तोफ होती ती रुतून बसली ती बाहेर काढण्याच्या उद्योगांत एक प्रहर खोळंबा झाला. लष्करचें बुनगें पुढें चालतें झालेंच होतें. वाघाच्या टापूंतून आपण सुटलों, आपली मसलत साधली, अशी समजूत झाल्यामुळें सैन्यांत बेसावधपणा उत्पन्न झाला होता. त्यामुळें सर्व पायदळ व निम्मेशिमे घोडेस्वांर पुढें निघून मुक्कामास गेले. धोंडोपंत व त्यांचे पुतणे आपा व बापू व चिंतामणरावआपा तोफांजवळ ओढ्यावर बसून राहिले होते. त्यांजवळ जुजबी तीन चार हजार स्वांर मात्र होते. रुतलेली तोफ बाहेर काढण्याचा उद्योग चाललाच होता. तों इतक्यांत दोन प्रहरच्या सुमारास वाघ पाठलाग करीत आला त्याची गांठ पडली. नंतर तेथें मोठी भयंकर लढाई होऊन मराठ्यांचे शेकडों लोक पडले व सैन्याची दाणादाण झाली. खुद्द धोंडोपंत व आपा गोखले ठार झाले. बापू गोखले व चिंतामणरावआपा यांस जखमा लागल्या तरी ते शौर्यानें लढत लढत हल्याळापर्यंत बचावून गेले. तेथपर्यंत वाघानें पाठलाग केला होता, परंतु इंग्रजांनीं तोफा सुरू केल्यामुळें तो मागें हटून मुक्कामास परत गेला. गोखल्यांच्या तोफा व हत्ती घोडे पालख्या अंबाऱ्या वगैरे स्वारीचा सर्व सरंजाम वाघाच्या हातीं लागला.

याप्रमाणें या डवगीनाल्याच्या लढाईचा संक्षिप्त वृत्तांत आहे. अधिक तपशील चिंतामणराव आपानीं लढाईनंतर पत्रें लिहिलेलीं या प्रकरणांत छापलीं आहेत त्यांत आढळून येईल. तथापि या लढाईचा साग्र व अत्यंत मनोवेधक वृत्तांत ज्यांस वाचावयाचा असेल त्यानीं तो चिंतामणरावआपानीं स्वतःच्या चरित्राचा वाका लिहून ठेविला आहे त्यांतलाच वाचला पाहिजे. तो वाका आम्ही बहुधा तेराव्या भागांत छापूं. तेथपर्यंत वाचकांस तिष्ठत

ठेवण्यापेक्षां या लढाईपुरता त्या वाक्यांतला मजकूर येथें उतरून घेणें अधिक योग्य होय असें जाणून आम्ही तसें करितों.

" हल्याळास जाण्याकरितां आम्ही व धोंडो बल्लाळ गोखले असे रात्री निघालों. रात्रीचा विषय. झाडीचें रान. सारी रात्र चाललों. वाघमजकुराकडील फौजेस अंतर पडलें हें समजोन प्रहर दिवसाचे सुमारें डवगीनाला म्हणोन आहे तेथें आम्ही व गोखले असे उतरलों. कांहीं फौज व बुनगें असें पुढें गोटास गेलें. कित्तुराहून आम्ही व गोखले निघाल्याची बातमी वाघमजकूर यास कित्तूरकर देसाई याणीं कळविली. वाघ टाकोटाक फौजसुद्धां चालोन आला त्याची बातमी समजली नाहीं. डवगी नाला तेथें सन इहिदे मय्यातैन व अल्लफ आषाढ शु॥ ७ रविवारीं छ० ६ सफरीं चवदा पंधरा घटकेचे आंत वाघमजकूर याचे फौजेची लढाई जाली. त्यासमयीं धोंडो बल्लाळ गोखले यांचे वडील पुतणे आपाजी गणेश व धाकटे बापूजी गणेश हे दोघे वाघमजकूर याचे फौजेवर उठले. बापूजी गणेश यांस जखमा दोन, उजव्या डोळ्यावर व डाव्या मनगटावर, अशा तरवारेच्या ला गल्या. तोंड कचकरलें. वाघमजकूर याची जमियत भारी. लढाई बिघडली. फौज उधळली. माणसें सरकारकामास बहुत आलीं. बापूजी गणेश गोखले यांची गांठ पडली. धोंडो बल्लाळ गोखले याणीं 'तोंडांत रगत जाऊं देऊं नको' म्हणोन सांगितलें. त्यासमयीं बापूजी गणेश बोलले त्यांतील भाव ' आतां तोंड काय दाखवावें ? ' म्हणोन. मशारनिल्हेबरोबर भवानराव शिंदे वाळेखिंडीकर होते त्यांस धोंडो बल्लाळ याणीं बापूस संभाळून घेऊन जाणेंविशीं सांगितलें आणि आम्ही व आमचे पदरचे जिवाजी रामचंद्र जोशी उत्तुरकर व धोंडो बल्लाळ गोखले असे बरोबर लोक होते त्यांसुद्धां मागें फिरलों. त्यासमयीं मारामारी बहुत जाहली. वाघमजकूर याजकडील लोक मोडून माघारे घातले. दोहींकडील बहुत जायां जखमी जाले व ठार जाले. वाघाकडील जमियत भारी. झाडी बहुत. आम्ही व धोंडो बल्लाळ गोखले असे बरोबर होतों. जवळ लोक थोडे राहिले. निभावणी होणें कठिण हें समजून धोंडो बल्लाळ गोखले यांस आम्ही हातांत धरून मागें फिरविलें. तों त्यांजकडील लोकांची सरमिसळ जाली. आम्हांस सरकारकामावर जखमा कहरी नाकावर तरवारेची व उजवे बरकडीस व कुशीस भाल्याची, अशा तीन लागल्या. वरकड पाठीस ढाल गेंड्याची होती तिजवर लागल्या. ढाल अडीच बोटें सुमारें कांठास तुटली व ढालेस भाला लागला तो पार जाहला. ढाल पाठीस होती याजमुळें बचाव जाला. त्या

गर्दींत धोंडो बल्लाळ गोखले यांची चुकामूक जाहली. मशारनिल्हे धोंडो बल्लाळ यांस झाड लागोन घोड्याखालीं आले. त्यांचा घोडा मोकळा पाहिला. धोंडो बल्लाळ गोखले राहिले हें समजून त्यांचे पुतणे आपाजी गणेश गोखले हे मागें फिरले त्यांस जखमा लागल्या. पाडाव जाले. वाघमजकुराकडील फौजेची निकड भारी बसली. आमचे नाकावर जखम, त्याणें नाक लोंबत होतें तें बांधावयासीं फुरसत पडेना ! पाठीवर जखमा घेऊन मरावें यापरीस समोर होऊन मारावें मरावें, यांत श्रीमंतांचे अन्नाचा लौकिक, व वडिलांचे पोटीं जन्म घेतला त्याची सार्थकता, रक्षिता श्रीगणपति महाराज, हा निश्चय करून जेथें जेथें त्याजकडील स्वांरांची निकड तेथें तेथें उलटून थोपीत गेलों. आम्हांकडील लोक जानराव मगर व मितापा जानकर व शिंदे वाळेसिंडीकर व यशवंतराव व त्यांचे चिरंजीव रघुनाथराव शिंदे बेंदरीकर व चव्हाण व तात्या जाधव येडूरकर वगैरे होते. अंमळ फुरसत पडली त्यासमयीं नाक रुमालानें बांधलें. आम्ही चि॥ राजश्री हणमाजी रघुनाथ याचें पालन चिरंजीवाप्रमाणें केलें. त्याजकडे पागेचें काम सांगितलें. त्यास ' चिरंजीव ' म्हणोन लिहिणेंचा पाठ. त्याणें बारगिराचा तांब्या घेऊन पाणी आणिलें. आमचे तोंडांत रगत उतरलें होतें. चूळ भरून टाकिली. तों पुन्हां त्याजकडील लोकांची सरमिसळ जाली. त्या समयीं वाघाकडील स्वांरानें आमचे डावे दंडास धरिलें. त्याजकडे पाहिलें तों आपल्याकडील स्वांर नव्हे. जखमेमुळें हात उचलेना. सबब आम्हांबरोबर लोक त्यांतील तात्या जाधव यांस याला हाणा म्हणोन आम्हीं बोललों. लोक बरोबर होते त्यांचा हात पोंहचण्याची फुरसत पडली नाहीं. स्वांर निघोन गेला. येथपर्यंत गर्दी जाली. मैदानांत आल्यावर पुनरपि आमची व बापूजी गणेश गोखले यांची गांठ पडली. इतक्यांत चि॥ हणमाजी रघुनाथ याचा भाऊ राजश्री बाबाजी रघुनाथ हा शागीर्दी करीत होता त्याणें पाणी आणलें. तेव्हां बापूजी गणेश गोखले याणीं पाणी मागितलें. त्यांस साखरपाणी देविलें. आम्हीही घेतलें. सदरीं लिहिलेअन्वयें आम्हांकडून श्रीगणपतिमहाराजांचे कृपे व श्रीमंतांचे अन्नप्रतापें व वडिलांचे पुण्यें जी जवामर्दी जाहली तो प्रकार राजश्री हरिहरराव आपा हेरवाडकर हे गोखले यांजबरोबर होते त्यांस व गोखले यांचे पदरचे लढाईचे समयीं होते त्यांस माहीत आहे. आम्ही व बापूजी गणेश असे हल्याळास

गेलों. आमचे पदरचे सुलतानबा गारडीकर म्हणोन शिलेदार यांचे पायास गोळी लागली. पाय गैरउपयोगी जाहला. हल्याळास गोखले यांजकडील एक तोफ बचावून आली. हल्याळचे किल्ल्यांत कंपणी सरकारचीं दोन पलटणें होतीं त्याणीं वाघ यांची फौज पीछावर हल्याळचे लगत आली त्यांजवर तोफेचे बार तीन केले. वाघ याजकडील फौजेंत गोळा लागोन माणसें वगैरा जायां जाहलीं. वाघ याजकडील फौज माघारी हटली. इंग्रजी सरकारचे पलटणचे साहेब याणीं आसरा दिला याजमुळें बचाव जाला. नाहीं तर बाकी राहिली नव्हती. आमचे जखमेस टांके आमचे पदरचा बारगीर मिरासाहेब कुन्नुरकर म्हणोन होता त्याणें घेतले. नंतर हल्याळचे किल्ल्यांत आम्ही गेलों. इग्रजी सरकारचे पलटणांतील डाकतर याणें जखमेस टाके घेतले ते पाहून पसंत केले. डाकतर याणें आपल्या मलमाच्या पट्या लाविल्या. पुढें तीन चार दिवस अद्मासें उजवे हाताची शीर तोडून रगत काढलें. नित्य येऊन जखमा पाहून पट्या लावून जाई. सुलतानबा गारडीकर याचा पाय गोळी लागोन गैरउपयोगी जाहला तो प्रकार सदरीं लिहिला आहे. त्याचा पाय कंपणी सरकारचे पलटणांतील डाकतर याणें कापून काढिला. त्यास मलमाच्या पट्या लाविल्या. धोंडो बल्लाळ गोखले हे झाड लागोन घोड्याखालीं आले तो प्रकार सदरीं लिहिला आहें. ते पाडाव जाले त्यांस वाघ याणे जिवें मारिलें. आपाजी गणेश गोखले पाडाव गेले तो प्रकार सदरीं लिहिला आहे. त्यांसही जिवें मारिलें. त्यांचें डोचकं कापून झाडास टांगलें. उभयतांहि सरकारकामास आले. सरकारचाकरीविशीं धोंडो बल्लाळ गोखले व त्यांचे पुतणे आपाजी गणेश व बापूजी गणेश या त्रिवर्गानीं कसूर केली नाहीं. धोंडो बल्लाळ गोखले यांजकडील काळा पहाड तोफ डवगी नाल्यांत रुतली ती वगैरा तोफा वाघमजकूर याजकडे पाडाव गेल्या. धोंडो बल्लाळ याचा मुडदा व आपाजी गणेश याचें धड असें वाघमजकूर याणें आपले मुक्कामास घेऊन गेला. तेथें कृष्णराव देशपांडे कारडगीकर याणीं धोंडो बल्लाळ गोखले यांचा मुडदा व आपाजी गणेश यांच्या धडास शिरःस्थानीं नारळ ठेवून उभयतांस कित्तुरास भडाग्नि

---

१ गारडी जि० सातारा हा गांव कलढोण मायणीचे देशमुख घारगे यांचा आहे. घारगे हे पेशवाईतले नामांकित शिलेदार चिमाजी आपाच्या सैन्यांत व प्रायः रामचंद्र हरीच्या पथकांत चाकरीस असत. हा सुलतानबा घारग्यांपैकींच होता. किंवा दुसरा कोणी होता हें ठाऊक नाहीं.

दिला. आपाजी गणेश यांचें डोचकें झाडास टांगिलें त्याचा पत्ता दुसरे दिवशीं ( आम्हांस ) लागला. तें आणून त्याचें दहन हल्याळास केलें. उभयतां लढाईंत सरकारकामास आल्याचें वर्तमान उभयतांच्या पत्न्या नरगुंदास होत्या त्यांस कळलें. उभयतांच्या अस्थि कृष्णराव देशपांडे याणीं नरगुंदास पाठविल्या. तेथें आपाजी गणेश याची पत्नी सहगमन गेली. ”

याप्रमाणें धोंडोपंत गोखल्यांचा शेवट झाला. त्यानीं वाघाचा विश्वासघात केला त्याचा सूड त्यानें कसा उगवला याची कथा ही अशी आहे. इंग्रजांच्या येण्याला आणि धोंडोपंतांवर हें लढाईचें संकट प्राप्त होण्याला केवळ आठ पंधरा दिवसांची चुकामूक पडली. ती चुकामूक न पडती तर ही डवगीनाल्याची लढाईच मुळीं झाली नसती. कारण गोखल्यांचा वकील वसलीसाहेबांकडे जाऊन उभयपक्षीं बोलणें चालणें झालें होतें व वाघावर मोहीम करावयाची तींत एकमेकानीं कसें वागावें व एकमेकांची कुमक कशी करावी हें सुद्धां सर्व ठरलें होतें. पण त्या सर्व गोष्टी बाजूला राहून दैवगतीनें हा लढाईचा प्रसंग उद्भवला आणि धोंडोपंताचा ग्रंथ एकाएकींच समाप्तीला गेला !

रामचंद्रपंत आपानीं मनापासून धोंडोपंताची कुमक केली असती तर त्यांना बरोबरीच्या जोरानें वाघाशीं टक्कर देतां आली असती, व कित्तूर सोडून हल्याळाकडे पळून जाण्याचा प्रसंग आला नसता, हें खरें आहे. पण यांत रामचंद्रपंत अथवा त्यांचे बंधु यांचा कांहीं दोष नाहीं. कारण अलीकडे तासगांवकर व गोखले यांत सलोखा दिसून येत होता तो बाह्यात्कारी मात्र होता. आंतून त्या दोघांचीं मनें परस्परांविषयीं सरळ नव्हतीं. त्याचें कारण त्या दोघांच्या मैत्रीवर बाजीरावसाहेबानीं गुप्तपणानें बिब्बा घालून ठेविला होता हें होय ! तासगांवकरांकडे रदकर्जास लावून दिलेले सावनूरराज्याचे महाल त्यांना एक पैसा न देतां श्रीमंतांना घ्यावयाचे होते. त्याकरितां त्यानीं धोंडोपंत गोखल्यांस गुप्त हुकूम पाठविला होता कीं, हे महाल तुम्ही पटवर्धनांपासून जबरीनें हिसकून घ्यावे ! एकदां ते महाल ताब्यांत आले म्हणजे ते पेशव्यांस देऊं नयेत आणि पटवर्धनांस देऊं नयेत, फौजेच्या बेगमीकरितां म्हणून आपणच दाबून बसावें, अशी गोखल्यांची मनीषा होती. वाघाची मसलत आटपल्यावर गोखले व पटवर्धन यांमध्यें या महालांच्या निमित्तानें युद्ध सुरू होणार हें ठरलेलेंच होतें. यामुळें धोंडोपंत गोखले व धोंडजी वाघ या दोघांपैकीं कोणाचेंही अभीष्टचिंतन करण्याचें परशुरामभाऊंच्या मुलांना

कारणच नव्हतें. दोघेही त्यांचे शत्रुच होते. एकानें त्यांचे महाल बळकावले होते म्हणून आणि दुसरा ते पुढें बळकावणार होता म्हणून ! वाघाशीं लढाई होण्यापूर्वी पांच चार दिवस गोखल्यांचा वकील वसलीसाहेबांजवळ स्पष्टपणें बोलला होता कीं, पुण्याहून आम्हाला गुप्त हुकूम आलेला आहे तो आम्ही इतक्यांत फोडीत नाहीं आणि वाघाचा बंदोबस्त होईपर्यंत तासगांवकरांशीं विरुद्धभाव दाखवीत नाहीं. तें काम आटपल्यावर तुम्ही तिऱ्हाईतपणें तमाशा पहात रहा, आम्ही आणि तासगांवकर पाहून घेतों ! अशी स्थिति झाल्यामुळें रामचंद्रपंतांस गोखल्यांशीं वरकरणी मैत्री दाखवावी लागत होती तरी धोंडजी वाघावर त्यानीं करडी नजर धरली होती असें नाहीं. त्यानें वासुदेवकाकांस कैदेंतून सोडून रामचंद्रपंतांकडे पाठविलें व त्यांच्या द्वारें मैत्रीचा संदर्भ लाविला, तेव्हां त्यालाही ते हूं हूं म्हणतच होते ! तूर्त 'रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति' अशांतलें धोरण त्यानीं धरलें होतें. पेशव्यानीं गोखले व तासगांवकर यांमधल्या द्वेषाचें जें हें रोपडें लावून ठेविलें तें कालांतरानें कसें पल्लवित झालें हें पुढें यथानुक्रमें सांगण्यांत येईल.

धोंडोपंत गोखल्यांस वाघाच्या हातून मृत्यु आला तो त्यांच्या बेइमानामुळें आला हें वसलीसाहेबांचें लिहिणें मात्र आम्हाला खरें भासत नाहीं. ते लिहितात कीं, "धोंडोपंतानें वाघाशीं किंवा आम्हांशीं—दोघांतून कोणाशीं तरी—दगलबाजी करण्याचा बेत केला होता त्याचें फळ त्याला खासें चांगलें मिळालें. त्याचा वकील म्हणून जो इसम आम्हांकडे आला होता तोच इसम थोडे दिवसापूर्वी मैत्रीच्या संधानाकरितां वाघाच्या लष्करांत गेला होता हें आमच्या हेरानें प्रत्यक्ष पाहिलें आहे ! " यावर आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं, केवळ वाघाकडे वकील पाठविला एवढेंच जर धोंडोपंतांची दगलबाजी सिद्ध करण्याचें साधन साहेबानीं मानिलें असलें तर ती त्यांची चूक होती. वकील येतो तो तेव्हांही मैत्रीच्या मिषानें येणार हें उघडच आहे. पण त्याचा उद्देश नेहमीं मैत्रीचा अथवा तडजोडीचा असतोच असें मात्र नाहीं. पुष्कळ वेळां तो उद्देश शत्रूच्या मनांतलें इंगित काढून घेण्याचा अथवा हुलकावणी दाखविण्याचा असूं शकतो. युद्धाचा पुकारा झाल्यावरच काय, पण प्रत्यक्ष त्याची घनचक्कर चाललेली असतां देखील उभयपक्षांचे वकील एकमेकांकडे जाऊं येऊं शकतात. युरोपांत तशी चाल नसेल, पण हिंदुस्थानांत होती.

आणखी एका बाबतींत वसलीसाहेबांची समजूत निराधार असल्याचें आम्हाला दिसून आलें आहे. धोंडोपंताच्या काळजाच्या रक्तानें मी माझ्या

मिशा रंगवीन अशी वाघानें प्रतिज्ञा केली होती व त्यानें ती वैऱ्याचा वध केल्यावर अक्षरशः पूर्ण केली, असा वसली बहादूरांचा कोणी समज करून दिला होता. या गोष्टी खऱ्याच घडलेल्या आहेत असें त्यांस मनापासून वाटत असलें पाहिजे हें निःसंशय आहे. कारण त्यानीं वाघास मारल्यावर विलायतेस पाठविण्याकरितां त्याच्या मिशा काढून घेतल्या असें चिंतामणरावआपानीं आपल्या वाक्यांत लिहून ठेविलें आहे. युद्धाच्या काळांत वैरभाव जागृत असतो. त्या वेळीं कोणी येऊन शत्रूची कसलीही नालस्ती केली तरी ती खरी मानण्याकडे मनाची प्रवृत्ति असते. असल्या नालस्त्या सांगून मर्जी खूष करणारीं माणसें बडे लोकांस नेहमीं भेटतात. त्यामुळें वसलीसाहेबांच्या मनाचा गैरसमज क्षम्य आहे. मात्र तो क्षम्य असला तरी साधार आहे असें आम्हांस वाटत नाहीं. आम्ही तो निराधार मानितों याचें कारण या व मागच्या प्रकरणांत आम्ही वाघाच्या मजकुराचीं पत्रें छापिलीं आहेत त्यांत अथवा चिंतामणराव आपांच्या वाक्यांत याबद्दल उल्लेख नाहीं एवढेंच नव्हे, तर या प्रकरणीं आम्ही आणखी पांचचारशें पत्रें वाचिलीं आहेत त्यांत बारीक बारीक अनंत तपशील भरले आहेत, तरी त्यांत हा वाघानें मिशा रंगविल्याचा मजकूर आम्हांस कोठेंही आढळला नाहीं.

इंग्रज, वाघ, मराठे व मोंगल असे चार पक्ष प्रस्तुतच्या मोहिमेंत गुंतलेले दृष्टीस पडतात. त्यांचे उद्देश व बलाबल याविषयीं येथें चार शब्द लिहिणें आवश्यक वाटतें. इंग्रजानीं टिपूचें राज्य घेतलें तेव्हां ते आतां आमच्या राज्यावर कधीं घोरपड आणतील याचा नेम नाहीं ही मराठ्यांना काळजी पडलीच होती. त्यांतून वसलीसाहेब जंगी सामानानिशीं जेव्हां कोणास न जुमानतां व कोणी न बोलावतां तुंगभद्रा उतरून अलीकडे आले तेव्हां महाराष्ट्रांत भ्रमाच्या भोपळ्यांचें सडकून पीक आलें व जागोजाग कुतर्कांचीं जाळीं माजून राहिलीं ! अगदीं प्रथम लोक म्हणत होते कीं वाघाची मसलत हें इंग्रजांचें केवळ ढोंग आहे. त्यांच खरा हेतु धारवाड काबीज करण्याचा असून त्यासाठींच ते स्वारी करून आले आहेत. धारवाड कांहीं दिवसपर्यंत तरी आपल्या ताब्यांत असावें असें वसलीसाहेबांस वाटत होतें हें खरें आहे. पण तें शहर तरी वाघाचा पक्का बंदोबस्त होईपर्यंतच त्यांना पाहिजे होतें. आणि तें सुद्धां पेशव्यानीं सामोपचारानें दिलें तरच पाहिजे होतें. मनांत त्यांच्या कांहीं असो, पण निदान बोलण्याचालण्यांत

तरी ते हाच भाव दाखवीत होते. इंग्रज धारवाडाच्या वाटेस जात नाहींत असें जरी सर्वत्र कळून चुकलें तरी त्यांच्या मागचा संशयाचा ससेमिरा सुटला असें मात्र घडलें नाहीं. या राज्यांत ते आल्यापासून पुन्हां परत आपल्या हद्दींत जातपर्यंत त्यांच्या हालचालींवर सर्वांचें लक्ष लागलेलें होतें, आणि हे आतां काय करणार, यांच्या मनांत तरी काय आहे, यांच्या मसलतीचा पल्ला कोठपर्यंत आहे, अशी सर्वांना—इंग्रजांचे दोस्त पटवर्धन यांनासुद्धां—धास्ती वाटत होती ! इंग्रजांच्या प्रत्येक कृत्याबद्दल जे तर्क घेण्यांत येत ते पुष्कळ प्रसंगीं विपरीत स्वरूपाचे असत हें या प्रकरणांतल्या अनेक पत्रांवरून दिसून येतें.

सार्वत्रिक भ्रम असा होता कीं, पटवर्धनांच्या सूत्रावरूनच इंग्रज इकडे आले आहेत. वाघाचें पारिपत्य केल्यावर ते पटवर्धनांची कुमक करणार, आणि दोघे मिळून करवीरचें राज्य धुळीला मिळवणार ! हा तर्क दिसतांना तरी सयुक्तिक दिसत होता. कारण पट्टणच्या स्वारींत परशुरामभाऊंनीं इंग्रजांना वांचविलें, त्यामुळें मराठ्यांत सर्वांपेक्षां त्यांचीच ओळख इंग्रजांनीं विशेष राखिली होती. वाघाचें बंड मोडण्याकरितां कां होईना, पण हल्लीं इंग्रजांना आणावयास गेलेले बाळकृष्णपंतभाऊ लागू हे तरी परशुरामभाऊंचेच मामलेदार होते. शिवाय इंग्रजांनीं इकडे आल्याबरोबर आपण रामचंद्रपंत आपांचे सल्ल्याप्रमाणें व त्यांच्याच मदतीनें वाघाची मसलत तडीला लावणार असा पुकारा केला होता. याच वेळीं रामचंद्रपंतांचा मुलगा गोपाळराव यास इंग्रजांनीं पांच हजारांचा सरंजाम दिल्याची अफवा उठली होती ती कशावरून उठली होती न कळे ! असो. इतकी सामग्री तर्क घेण्यापुरती असल्यावर इंग्रजांना घेऊन रामचंद्रपंत आपा करवीरावर चालून येणार

---

१ बाळकृष्णपंत भाऊनीं आपल्या पदरचे कारकून आपाजी भगवंत रानडे यांस दरबार खर्चाकरितां दहा हजार होन ( चाळीस हजार रु० ) बरोबर देऊन वसली साहेबांस आणण्याकरितां पुढें पाठविलें, आणि ते साहेब फौजेसह हरिहराच्या सुमारास आल्यानंतर आपण जाऊन त्यांस भेटले. हे आपाजीपंत रानडे कै. न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांचे पणजे होत. इंग्रजांच्या विद्या व कल्पना यांचा फलावा करण्यांत व त्या द्वारें महाराष्ट्राच्या मनोभूमीवर इंग्रजांचें साम्राज्य कायम करण्यांत ज्यांचा जन्म गेला, त्यांच्याच पणजानें दक्षिणेकडून महाराष्ट्रांत प्रवेश करण्याची पाऊलवाट इंग्रजांना प्रथम काढून दिली; ही वाचकांस कौतुक वाटण्याजोगी गोष्ट आहे.

अशी जर लोकांची समजूत झाली असली तर त्यांत त्यांची काय चूक होती ? खुद्द पटवर्धन सरदार व त्यांचे हजारों आश्रित याच भ्रांतींत प्रथम प्रथम पडले होते. आणि 'शिंद्याचीं पलटणें आमच्या उपयोगीं पडलीं नाहींत म्हणून काय झालें ? इंग्रजांचीं पलटणें मदतीला आणून आम्ही करवीरच्या महाराजांवर पहा कसा सूड उगवतों तो !' अशी फुकटचीच फुशारकी मारीत होते ! आणि असे हे सकलकामनापरिपूरक इंग्रज बाळकृष्णपंतभाऊनीं आणिले म्हणून भाऊंच्या कारस्थानाची वाहवा चार दिवस उगीचच चालली होती ! इंग्रजांच्या येण्यामुळें पटवर्धनांस हर्ष झाला तर त्यांच्या वाईटावर असलेले करवीरकर, पेशवे, शिंदे, घाटगे वगैरे मंडळीस त्याच कारणामुळें मोठी चिंता व भय उत्पन्न झालें. तेही इंग्रजांच्या हालचालींकडे बारीक नजरेनें पहात होते आणि त्यांविषयीं आपापल्या परी अनिष्टाच्या कल्पना लढवीतच होते ! 'फक्त वाघाचें बंड मोडण्याकरितां इंग्रज इकडे आले आहेत, त्याखेरीज ते कोणतेंही काम जाणीत नाहींत, ते कोणाचेही शत्रु नाहींत आणि मित्र नाहींत, ते कोणासही अपकार अथवा उपकार करूं इच्छीत नाहींत,' असें जेव्हां शेवटीं सर्वांना कळलें तेव्हां पुष्कळांची निराशा झाली आणि पुष्कळांना आनंद वाटला !

इतका हा सर्व घोंटाळा माजण्याचें कारण वसलीसाहेबांचें मतलबी वर्तन हेंच होय. 'आपण ज्या कामाकरितां इकडे आलों त्याखेरीज दुसऱ्या भानगडींत पडण्याचें आपणास कारण नाहीं, व तसा आपणास वरिष्ठांचा हुकूमही नाहीं.' ही गोष्ट मनांत धरून त्या कार्यवादी साहेबानें प्रथमपासून असें धोरण ठेविलें होतें कीं, जे जे लोक आपल्या कामावर उपयोगीं पडण्यासारखे आहेत त्यांनीं स्वतःच्या फायद्याच्या कोणत्याही गोष्टी काढल्या तरी त्यांस झिटकारूं नये, सर्वांना हूं हूं म्हणत असावें, सर्वांना मिष्ट भाषण करून खूष ठेवावें, वचन मात्र कोणाला देऊं नये, म्हणजे आपलें काम संपल्यावर सर्वांना हंसत हंसत सलाम ठोकून निघून जायला आपण मोकळे ते मोकळेच ! वसलीच्या नुसत्या 'हूं. हूं.' म्हणण्यावर ज्यांनीं आशेचे मनोरे बांधले त्यांचे ते मनोरे त्यानें जातांना एकदांच मोठ्यानें 'ऊं हूं !' म्हटल्याबरोबर ढांसळले, त्याला कुणी काय करावें ?

वसलीसाहेबानीं धोंडजी वाघास कधींच बरें म्हटलें नाहीं. बोलतांना आणि लिहितांना ते त्याचा निर्देश नेहमीं तुच्छतेनें करीत आणि यांत कांहीं आश्चर्यहि नाहीं. पूर्वदेशीय शत्रूविषयीं इंग्रजांच्या बुद्धींत गुणग्राहकता

कमीच असते. त्यांतून तो त्यांच्याच हातानें पराजय पावलेला असला म्हणजे बोलायलाच नको ! तो सर्व दुर्गुणांचा पुतळा हटकून ठरलेलाच ! एरवीं पाहिलें तर वसली बहादुरानीं धाघास केवळ तुच्छ मानावें अशी स्थिति नव्हती. मोहिमेंत स्वतः टेंकीस येण्यापूर्वी त्यांनाच टेंकीला आणावें असें त्याचें सामर्थ्य होतें. हें सामर्थ्य त्याला येण्याचें कारण त्याची फौज घोडेस्वारांची आणि गनिमी काव्यानें लढणारी, आणि त्याच्या पाठीस लागणाऱ्या वसलीची फौज पायदळाची होती, हें होय. असल्या गनिमी काव्याच्या लढाया फार त्रासाच्या, धोक्याच्या, आणि दीर्घकाळपर्यंत चालणाऱ्या असतात. बाहेरचीं उदाहरणें सोडून आपला मराठी इतिहास चाळून पाहिला तरी रघोजी भोसल्यानें अलाबिरदीखानास कसें जेरीला आणिलें, महादजी शिंद्यानें गुजराथेंत जनरल गाडर्ड यास कसें दमविलें, जानोजी भोसल्यानें माधवराव पेशव्यांस कसें धांवविलें, या गोष्टी वाचकांच्या नजरेसमोर सहज येणाऱ्या आहेत. हल्लींच्या उदाहरणांत तर घोड्यावरच्या धाघाला वसलीनें पायानें पळून गांठावयाचें होतें ! त्यांतही लढाईच्या उद्योगास लागणारी धाघाची साधनसंपत्ति चांगलीच होती. आजपर्यंत त्याभोंवतीं दहा पंधरा हजार लुटारू भोजनभाऊ वीर गोळा झाले होते ते इंग्रजांचे रट्टे खाण्याचा समय दिसूं लागतांच फरारी झाले हें खरें, तरी अजूनसुद्धां त्याजवळ दहा पंधरा हजार स्वार होते ते मोहिमेच्या कामाला सराईत व चांगले लढाऊ होते. त्यांचा भरणा विशेषेंकरून टिपूच्या बेकार झालेल्या घोडदळांतून झालेला होता हें सांगितलें म्हणजे ते किती चांगले होते हें निराळें ल्याहावयास नको. पायदळ, तोफा, बाजारबुणगे, तंबू, डेरे, वगैरे सर्व सरंजाम धाघानें एखाद्या राजाप्रमाणें बाळगिला होता; आणि इतकें हें सर्व लटांबर घेऊन चपळाईच्या हालचाली करणें त्यास कांहींच अवघड वाटत नसे ! सूर्योदयापासून सूर्योदयापर्यंत त्यानें चाळीस मैल मजल मारल्याचीं उदाहरणें हवीं तितकीं सांपडतील. ज्यांना प्रांताचे भुमे म्हणतात ते पाळेगार, संस्थानिक, देसाई देशपांडे वगैरे वतनदार लोक धाघाला फार मानीत व त्याच्या वचनांत वागत. कारण पेशव्यानीं घेतलेलीं या लोकांचीं संस्थानें, वतनें व उत्पन्नें सोडवून तीं त्यानें आपल्या या भक्तमंडळीला बहाल केलीं होतीं. या देसाई वगैरे लोकांकडून वेळोवेळ पैक्याची व माणसांची मदत होत गेली म्हणूनच धाघाचा इतका उत्कर्ष होत गेला. प्रांत ताब्यांत राखण्याकरितां त्यांतले बळकट किल्ले व ठाणीं स्वाधीन असावीं लागतात तशीं तीं धाघाच्या

ताब्यांत पुष्कळ होतीं. त्याचे सरदार मूळचे भुरटे व हलक्या दर्जाचे असतां करामतीच्या जोरावर उत्कर्ष पावले होते. त्यांत जोती घोरपडा छपरबंद व झोटिंग[1] काकर हे प्रमुख होते. छपरबंद व काकर या जाति भटकणाऱ्या जातींपैकीं आहेत.

धोंडजी वाघ जर एवढा बलाढ्य होता तर तो इंग्रजांना कसा मारतां आला ? या प्रश्नाला आमचें उत्तर हेंच आहे कीं, वाघ कांहीं इंग्रजांच्या समशेरबहादुरीमुळेंच मेला असें नाहीं. त्याच्या नाशाचें खरें कारण त्यावर इंग्रजानीं चालविलेलें फितुराचें घातकी शस्त्र हेंच होय. हें आमचें उत्तर वाचून पुष्कळांस अचंबा वाटेल. पण खरा प्रकार असाच घडलेला आहे याविषयीं आमची खात्री झालेली आहे. वाघावर मारेकरी घालून त्याचा प्राण घ्यावा, त्याच्या सरदारांस नाना प्रकारच्या आशा दाखवून अगर लांचलुचपत देऊन फितवावें, त्याच्या फौजेंत असंतोष व कलह उत्पन्न करून तिची जूट फोडावी, या मसलती प्रथम हैदराबादेच्या मुत्सद्यानीं सुरू केल्या त्या तेथील रेसिडेंट व वसलीसाहेब यांस कळवून त्यांच्या मान्यतेनेंच केल्या. ते मुत्सद्दी व त्यांचा अंगीकार करणारे हे इंग्रज मुत्सद्दी यांचे ते अश्लाघ्य प्रयत्न सिद्धीला गेले तेव्हांच धोंडजी वाघ इंग्रजांच्या समशेरीला बळी पडला !

या मोहिमेंत मोंगल केवळ नामधारी मदतनीस असून त्यांची संख्याही थोडी होती. सबब त्यांविषयीं कांहीं ल्याहावयास नको. मराठ्यांची फौज एकंदर पांचपासून सहा हजारपर्यंत होती, व तींत बापू गोखले आणि हरिपंत बाबा व चिंतामणरावआपा असे उभयतां पटवर्धन मिळून तिघे सरदार होते. तिघांसही वाघानें चांगलेंच ओरबाडलें असल्यामुळें त्यांवर त्याची दहशत बसली होती. त्यामुळें वसलीनें तुम्ही आमचा आश्रय सोडून अमुक एक स्वतंत्र कामगिरी करा म्हणून सांगितलें तर ती गोष्ट ते सहसा कबूल करीत नसत. इंग्रजांच्या संगतींत जेवढें काम पडेल तेवढें मात्र ते करीत व आपला आब संभाळून बाताबेतानें रहात. असें होतें तरी इंग्रजांना त्यांचा उपयोग कमी होत होता असें नाहीं. दुय्यम दर्जाचे का होईना, पण किती झालें तरी ते शिपाईच होते, व त्या मानानें स्वारींत अथवा लढाईंत त्यांचा उपयोग ही होत होता हें खुद्द वसलीसाहेबांस नाकबूल नाहीं. हे वाघाला भितात, यांना हौस नाहीं, हे सांगितलेलें काम ऐकत नाहींत, हे आमच्या बरोबरीनें झटून मेहनत करीत नाहींत, अशी त्यांविषयीं वसलींची नेहमींची कुरकूर

---

१ झोटिंग हा पूर्वी टिपूकडील बेदांचा सरदार होता. (पहा, भाग नववा पृ. ४५७८).

असे. पण ते साहेब असा विचार करीनात कीं मराठ्यांनीं पुढारीपणानें मेहनत कां करावी? इंग्रजांनीं आपल्या राज्याच्या बचावाकरितां आपण होऊन ही मोहीम पतकरली. तिचीं सूत्रें खेळवण्याचा अधिकार व जोखीम त्यांनीं स्वतःवरच लादून घेतलें. त्यांच्या उद्योगानें मराठी मुलूख आपोआप सुटतो आहे, तर तितक्यापुरती मदत हे मराठी सरदार करीतच आहेत. समजूं कीं, त्यानीं पुढें सरून एखादी लढाई मारली आणि तींत त्यांचीं घोडीं माणसें शेंदोनशें मेलीं गेलीं; तर लाख रुपयांची नुकसानी होणार ती भरून कोण देईल? इंग्रज तर छदाम देणार नाहींत. ते सरटिफिकिटें देतील, किताब देतील, फार झालें तर तोफांची सलामी देतील! त्यानें कुठें पोट भरतें आहे? केलेल्या पराक्रमाबद्दल पेशवे सरकारांतून कांहीं नवाजीस झाली तर तिचा उपयोग! तें तर होतच नाहीं. मग मराठे सरदारांनीं विनाकारण स्वतःला धोक्यांत कां पाडून घ्यावें?

युध्यमान मंडळाविषयीं इतका प्रस्ताव केल्यावर आतां प्रत्यक्ष युद्धाचें वर्णन सुरू करावयाचें. हें युद्ध भर पावसाळ्यांत चाललें होतें, व त्या दिवसांत कृष्णा, घटप्रभा, मलप्रभा, वर्धा व तुंगभद्रा भरपूर भरून चालल्या होत्या, आणि त्यांच्या टापूंतच या युद्धाचें क्षेत्र सांपडलें होतें. त्यामुळें मोहिमेच्या अनेक अडचणींत याच अडचणीची भर वसलीसाहेबांस विशेष त्रासदायक झाली होती. या एकंदर मोहिमेचें वर्णन आम्ही पुढें देत आहों तें वाचतांना वाचकांनीं बेळगांव, धारवाड व विजापूर या जिल्ह्यांचा नकाशा नजरेसमोर ठेवावा. तसें केल्याखेरीज उभयपक्षांच्या हालचालीचें स्वारस्य त्यांस नीट समजणार नाहीं.

जूनच्या २२ तारखेस वसलीसाहेब तुंगभद्रा उतरून अलीकडच्या तीरास आले. त्यावेळीं त्यानीं बरोबर आणलेल्या एकंदर सैन्याची गणना वासुदेवकाका पटवर्धन पुढें लिहिल्याप्रमाणें देतात--

"बाळकृष्णपंत भाऊ यानीं पलटणें कर्नेल वसलीस आणिलें. त्याजसमागमें तेरा पलटणें हिंदुस्थानी चटेगार ( बंदुकवाले ) तेरा हजार, गोरे ४०००, स्वार ४०००, एकूण एकवीस हजार, तोफा पंचावन, सहा हजार बैल सामानाचे, घोरपडी माळेस लावावयाच्या चार, व पाणी न मिळे तर विहीर खणावयाचें पाताळचक्र--त्यास झाडपाल्याचा रस व पारा लावावा म्हणजे पाणी जेथें असेल तेथपावेतों त्यानें चक्रासारखें फिरोन पाण्यापावेतों जावें. नंतर माती काढावी. लागेल तेवढें पाणी घ्यावें--असें

चक्र, येणेंप्रमाणें सरंजाम घेऊन आले आहेत. पांच तोफा ( चित्र ) दुर्गाहून तीस बत्तीस शेर गोळयाच्या थोर आणिल्या आहेत. ”

या वर्णनांत कांहीं अतिशयोक्ति आहे ती असो. पण यांत पाताळचक्राचा उल्लेख आला आहे तो काय मजकूर आहे ? हल्लीं विहीर खोदण्याचें बोअरिंग मशीन निघालें आहे तसलें एखादें यंत्र त्यावेळीं वसलीसाहेबांनीं मिळविलें होतें कीं काय न कळे ! पूर्वीं लष्कराच्या अफाट लोकसमुदायाला जागोजाग पाणी मिळण्याची सोय व्हावी म्हणून त्याच्या हालचाली नदीच्या तीरातीरानें कराव्या लागत. ती पाणी मिळविण्याची अडचण या पाताळचक्रामुळें इंग्रज जुमानीत नाहींत, त्यांची गति सर्वत्र अकुंठित आहे, असें लेखकांच्या लिहिण्यांतलें तात्पर्य आहे.

तुंगभद्रेच्या उत्तरतीरास आल्यावर वर्धेपर्यंत मासूर, शिकारपूर वगैरे भागांत वाघाचे लोक पसरले होते त्यांस उत्तरेकडे पिटाळून लावण्याचें काम वसलीसाहेबांना प्रथम करावें लागलें, व तें करण्यांत त्यांचे पांच चार दिवस गेले. त्याच टापूंत राणेबिन्नूरचें ठाणें आहे. ता. २८ जून रोजीं त्या ठाण्यावर वसलींनीं चाल केली. तेथें वाघाचे पांचशें लोक होते त्यांनीं इंग्रज येतांच त्यांवर बंदुकांचा मारा केला, सबब इंग्रजांनीं हल्ला करून ठाणें घेतलें व आंतले लोक कापून काढले. रसदेचा पुरवठा होईपर्यंत एक आठवडाभर तेथें वसलीसाहेबांचा खोळंबा झाला. रसदभरणा झाल्यावर जुलैच्या दहाव्या तारखेस ते वर्धा उतरून आले व त्यांनीं सावनुराचा रोख धरिला. तें पहातांच तेथें वाघाचे लोक होते त्यानीं पोबारा केला. सावनूर हें अफाट शहर होतें. त्याची तटबंदी जागोजाग मोडकळीस आली असून शिवाय त्याला मधून मधून खिंडारें पडलीं होतीं. इंग्रजांस पाहिजे होती त्याप्रमाणें ती लढाईच्या उपयोगाची जागा नव्हती. तथापि तेथें तूर्तापुरतें बिऱ्हाड ठेवलें तर चालण्याजोगें आहे असें मानून वसली साहेबानीं आपलें अवजड सामान व बाजारबुनगें सावनुरांत आणून ठेविलें.

धोंडोपंत गोखल्यांचा पराजय करून वाघ परत आपल्या मुक्कामास गरग येथें आल्यावर त्यानें किचूरच्या देसायाचीं ठाणीं मलप्रभेच्या दक्षिणतीरास होतीं तीं सर्व घेतलीं, तेव्हां त्या देसायानें घाबरून त्याला खंडणी देण्याचें कबूल केलें. नवलगुंद तालुका हा गोखल्यांस पेशवेसरकारांतून जहागीर दिलेला होता. तो तालुका या वेळीं वाघानें घेतला आणि तेथील देसाया-

पासून कांहीं रक्कम घेऊन त्याला बहाल केला ! दोडवाडचें ठाणें चिंतामणरावआपांचें होतें तें शहापुरच्या देशपांड्यानें फितवून वाघाच्या हवालीं केलें आणि त्याजकडून त्याच ठाण्याची कमाविस आपणाकडे करून घेतली. नंतर दोडवाड व नदीतीरचीं ठाणीं व नवलगुंद तालुका यांच्या संरक्षणाकरितां आणि कित्तूरकराकडून खंडणी यावयाची तिच्या वसुलाकरितां वाघानें तीन हजार स्वार व दोन तोफा देऊन जोती घोरपडे यास दोडवाडच्या ठाण्याजवळ ठेवलें. असा बंदोबस्त केल्यावर तो इंग्रजांचा समाचार घेण्याकरितां सावनुराकडे वळला.

परशुरामभाऊंप्रमाणेंच धोंडोपंत गोखलेसुद्धां चिदंबर दीक्षितबावांचे निस्सीम भक्त होते. वाघाशीं लढाई करण्याच्या उद्देशानें जेव्हां ते रुद्रापुराहून कित्तुराकडे जायला निघाले तेव्हां देवळापूर तालुका कित्तूर येथें दीक्षितबावांच्या दर्शनास गेले. आपा व बापू हे दोघेही त्यांचे पुतणे त्यांबरोबरच होते. तेथें निरोपाच्या वेळीं बावा प्रसादाचें फळ देत असतां तें धोंडोपंतानीं घेतलें नाहीं. वाघास मारून पुन्हां दर्शनास येईन तेव्हां प्रसाद घेईन असें बोलले व फलत्याग करून गेले, ते तिकडेच लढाईत मेले. त्यामुळें दीक्षितबावांस फारच दुःख झालें. दोन दिवस त्यांच्या डोळ्याचें पाणी खळलें नाहीं. हल्लीं वाघानें बावांकडे विनंती करावयास कारकून पाठविला कीं, आपण इंग्रजांवर चालून जातों, आज्ञा असावी. आशीर्वाद द्यावा. तो निरोप ऐकतांच बावांस अतिशय राग आला, आणि त्यानीं त्या कारकुनास तत्काळ मठांतून घालवून लाविलें !

वसलीसाहेब वर्धेवर असतांच धोंडजी आपणावर चालून येणार अशी वार्ता त्यांस कळली होती, आणि त्यावरून त्यानें हल्ला करण्यापूर्वी आपणच पुढें होऊन त्यास गांठावें म्हणून ते सावनुरास आले होते, व तेथें बाजारबुनगें ठेऊन लढाईला मोकळे झाले होते. पण वाघ आला नाहीं, गेला नाहीं, आणि त्याच्या येण्याची वार्ताही नाहीं, असें झालें तेव्हां त्याच्या ताब्यांतलें कुंदगोळचें ठाणें तेथून एकवीस मैलांवर होतें त्यावर जुलैच्या चवदाव्या तारखेस चालून जावयाचा बेत वसलीसाहेबानीं मुकरर ठरविला. खरी गोष्ट अशी घडली होती कीं, वाघाची स्वारी वाटेंत कुंदगोळास बाजारबुनगें ठेवून तेराव्या तारखेसच सावनुरास आली होती. इंग्रजांस मात्र तें वर्तमान कळलें नव्हतें. दोन मैल अंतरावरच्या एका टेकडीवरून त्यानें इंग्रजी लष्कराची पहाणी केली, आणि या लष्करावर कोणीकडून कसा लाग साधावा हा विचार तो करूं

लागला. त्याची बातमी इंग्रजांइतकीच उत्तम असे. त्याचे हेर यांच्या लष्करांत असत तर याचेही हेर त्यांच्या लष्करांत असतच. त्यांपैकीं एका हेरानें येऊन त्यास त्याच वेळीं वर्दी दिली कीं, उद्यां कुंदगोळावर इंग्रजांनीं स्वारी करण्याचा बेत ठरविला आहे. तें वर्तमान ऐकतांच बाघ फौजसह त्वरेनें परतून कुंदगोळास आला व तेथें काय बंदोबस्त करावयाचा तो करून आणि तेथचें बाजारबुनगें घेऊन धारवाडच्या बाजूस आणखी सात कोस दूर सरला.

ठरल्याप्रमाणें जुलैच्या चवदाव्या तारखेस वसलीसाहेब पायदळ पलटणें, तोफा, व तुरुपस्वार वगैरे सरंजाम घेऊन निघाले ते सायंकाळीं कुंदगोळास पोंचले. जातांच त्यांनीं ठाणें हल्ला करून घेतलें व आंत सहाशें लोक सांपडले त्यांची कत्तल केली. मोर्चें बांधून तोफा मारण्याची यातायात धारवाडखेरीज या प्रांतांत कोठेंही करण्याचें कारण नाहीं, सर्व ठाणीं मी केवळ हल्ला करून घेणार; असें वसली साहेबांचें म्हणणें असे, तें त्यांनीं अखेरपर्यंत खरें करून दाखविलें. इंग्रजी फौज हल्ला करण्यांत फार तरबेज झालेली होती व तिचें शौर्य आणि धाडस आश्चर्यकारक होतें. त्यामुळें कोणतेंही ठाणें तिच्या हल्ल्यापुढें टिकलें नाहीं. इंग्रजांना ठाणीं घेण्याची बिशाद कांहींच वाटत नव्हती. मात्र तीं घेतल्यावर राखावीं कशीं एवढीच त्यांस पंचाईत पडे. आपल्या फौजेपैकीं एकसुद्धां शिपाई या कामाकडे देण्याची वसलीसाहेबांना सोय नव्हती. याकरितां त्यांनीं प्रथमपासूनच अशी पद्धत ठेविली कीं ठाणें घेतल्यावर तें पेशव्यांचें असो, पटवर्धनाचें असो, कीं दुसऱ्या कोणाचें असो, तें बाळकृष्णपंत भाऊ लागू यांस मराठी राज्याचे सामान्य मुखत्यार समजून त्यांच्या हवालीं करावें, आणि भाऊंनीं आपले लोक त्या त्या ठाण्यांत घालून बंदोबस्त राखावा. त्या पद्धतीस अनुसरून इंग्रजांनीं कुंदगोळचें ठाणेंही भाऊंच्या हवालीं केलें आणि पुढें घेतलेल्या प्रत्येक ठाण्याची याचप्रमाणें व्यवस्था लाविली. याच मुक्कामीं वसलीसाहेबानीं जाहीरनामा प्रसिद्ध केला कीं, जो इसम धोंडजी वाघाचें शीर आणून आम्हांकडे हजर करील त्यास कंपनीसरकारांतून तीस हजार रुपये बक्षीस देण्यांत येतील. साहेबबहादूर हा जाहीरनामा प्रसिद्ध केल्यावर अशी आशा प्रदर्शित करितात कीं, जे मुसलमान वाघाला अपाय करण्याची मसलत घाटीत आहेत त्यांना या बक्षिसाच्या आशेमुळें तरी उत्तेजन येवो, आणि ते आपला बेत लौकर तडीला नेवोत !

कुंदगोळ घेतल्यावर दुसरे दिवशीं म्हणजे १५ व्या तारखेस वसली॰साहेब लक्ष्मेश्वरास आले. तेथचा देसाई वाघाचा मिलाफी होता व त्यानेंच तें ठाणें बळकाविलें होतें. पण इंग्रज येण्याआधींच त्याचे लोक ठाणें मोकळें टाकून पळाले. त्यामुळें तेथें बाळकृष्णपंतभाऊंचा अंमल पूर्वीप्रमाणें बसण्यास हरकत पडली नाहीं. तेथून इंग्रजांचें लष्कर सोळाव्या तारखेस शिरहट्टीस आलें. लक्ष्मेश्वरच्या देसायानें त्या ठाण्यास चार हजार लोकांनिशीं वेढा बसविला होता, परंतु इंग्रज येतात ही वार्ता ऐकतांच तो वेढा उठवून फरारी झाला.

चिंतामणराव व बापू गोखले पंधरा दिवसपर्यंत हल्याळास होते. त्या अवधींत त्यांच्या जखमा बऱ्या झाल्या व काय थोडी फौज त्यांच्या जवळ राहिली होती तिला विश्रांति मिळाली. नंतर दोघेही तेथून निघून धारवाडास गेले व तेथून हुबळीस गेले. आपणास लौकर येऊन मिळण्याविषयीं त्यांस वसलीसाहेबांचीं वारंवार पत्रें येत होतीं व त्यांच्याही मनांतून तिकडे जावयाचें होतें. तथापि वाघाची बातमी संभाळून त्यांस फौजेचे कूच मुक्काम करावे लागत, त्यामुळें त्यांस आजपर्यंत तिकडे जातां आलें नाहीं. आतां तशी संधि मिळतांच बापू गोखले ता० १९ जुलै रोजीं इंग्रजांच्या लष्करांत येऊन दाखल झाले. कांहीं कारणामुळें चिंतामणराव आपांच्या येण्यास मात्र चार दिवस दिरंग झाला.

शिरहट्टीच्या मुक्कामाहून रसदेची भरती करून घेण्याकरितां इंग्रज सावनुरास आले ते डंबळचें ठाणें घेण्याच्या उद्देशानें तेथून निघून पंचविसाव्या तारखेस पुन्हां शिरहट्टीस आले. त्याच दिवशीं तेथें चिंतामणराव आपा येऊन मिळाले. वसली लिहितात कीं, त्यांची फौज तीन हजार असल्याची बातमी ऐकत होतों, पण खरोखरी पाहिलें तों त्यांचे सारे स्वार पंधराशेंपर्यंत आहेत. लक्ष्मेश्वर व शिरहट्टी हीं लक्ष्मेश्वरतालुक्यांतलीं मुख्य ठाणीं असून तो तालुका मिरजकरांच्या जहागिरींपैकीं होता व त्यांच्याच वतीचे मामलेदार म्हणून बाळकृष्णपंत तो वहिवाटीत होते. हल्लीं चिंतामणरावआपानीं त्यांशीं बोलणें लाविलें कीं, हा तालुका मिरजकरांचा नसून आमच्या मालकीचा आहे हें तुम्हीं कबूल करावें, आणि आमच्या वतीनें वहिवाट करून वसूल आम्हांस देत जावा. भाऊनीं विचार पाहिला कीं, बाळासाहेब व चिंतामणराव दोघेही यजमान. त्यांच्या भाऊबंदकींत आपण आग्रह धरावा तर ही नवीनच भानगड उपस्थित होऊन मोहिमेच्या उद्योगाला

व्यत्यय येणार. तें कामाचें नाहीं. असा विचार करून त्यांनीं चिंतामणरावांचें म्हणणें मान्य केलें.

ता० २६ जुलै रोजीं बापू गोखले व चिंतामणरावआपांसुद्धां इंग्रजी फौज डंबळास आली. तें ठाणें बळकट असून आंत शिबंदी सामान भरपूर होतें. तथापि इंग्रजांनीं येतांच दरवाजावर हल्ला केला व त्याच वेळीं तटाच्या दोन बाजूंस तीस तीस फूट उंचीच्या शिड्या लावून आंत प्रवेश केला. नंतर त्यांनीं बंदुकांच्या फैरा झाडून किल्ल्यांतलें सात आठशें माणूस मारून टाकिलें. तेथील देसाई ब्राह्मण होता तो किल्ल्यांतच सांपडला. त्यास त्यांनीं तत्काळ किल्ल्याच्या दरवाजावर फांशीं दिलें. डंबळचा किल्ला घेतल्याचा वृत्तांत चिंतामणराव आपा पुढें लिहिल्याप्रमाणें देतात—

"मेहेरबान कदरदान वसली साहेबबहादुर डंबळास जातांना वाटेस देसाई याजकडील कारकून कृष्णाजीराम काळे हे भेटले. त्यास साहेबानीं विचारलें कीं, तुम्ही कोण, कोठील? कोठें जाता? ( त्यांनीं उत्तर केलें कीं ) आम्ही देसाई याजकडून आलों. बाळकृष्णपंत भाऊ यांचे विद्यमानें अर्ज करणार.' ( साहेब म्हणाले, ) 'केव्हां येतां'? ( त्यांनीं सांगितलें, ) 'चार घटकेंत येतों.' असें सांगून बाळकृष्णपंतभाऊंकडे गेले. मेहेरबान कदरदान वसली साहेब बहादुर ठाण्याचे पश्चिमेस टेंकावर घड्याळ लावून बसले. बाळकृष्णपंत भाऊ यावयाचे पूर्वीं बापूजी गणेश गोखले यांजकडील पेंढारी डंबळचे पेठेंत शिरले. कोणी काढकानीं बंदुकीचा बार काढिला. गोळी मारिली हें समजून वसली साहेब याणीं हल्ला केली. ठाणें घेतलें. आंतील लोक यांजवर पलटणांच्या लोकांच्या फैरा होऊन लोक मारिले. ठाण्यांत वसली साहेब बहादुर गेले. देसाई याचा शोध करीत होते. तों जिवाजी कृष्ण नि॥ आनंदराव रामचंद्र हुपरीकर, डंबळचे कमावीसदार, हे देसाई याचे कैदेंत होते त्यांनीं देसाई यास दाखविलें. देसाई यास रुबरू आणोन विचारिलें कीं, 'तुम्ही देसाई काय?' त्यानें 'होय' म्हणोन सांगितलें. देसाई हा ब्राह्मण. त्यास ठाण्याचा दरवाजा—त्यास गणपति वेश म्हणोन म्हणत—त्या दरवाजावर नेऊन गळ्यास दोर बांधोन खालीं सोडिलें. त्याचा प्राण गेला."

चिंतामणराव स्वतः मोठे गाणपत्य होते. इंग्रजानीं देसाई हा ब्राह्मण असतां त्यास फांशीं दिलें आणि तेंही पुन्हां गणपतिवेशीवर! हें कर्म त्यांना अघोरपणाचें व क्रूरपणाचें वाटावें यांत नवल नाहीं. तथापि थोड्याशा संह-

वासानें इंग्रजांची जय्यत तयारी, तडफ, करारी कायदेशीर वागणूक, आटोकाट शौर्य वगैरे गुण त्यांच्या प्रत्ययाला आले तेव्हां त्यांची तारीफ केल्याखेरीज त्यांच्यानें राहवलें नाहीं.

'वसली हल्लेस अथवा लढाईस अघाडीस चालतो' ही आश्चर्याची गोष्ट म्हणून चिंतामणराव आपांनीं मुद्दाम एका पत्रांत नमूद केली आहे. वसलीच्या योग्यतेचे थोर इंग्रज सरदार लढाईंत अघाडीस राहून सामान्य शिपायांत मिसळून कामें करितात, हें पाहून मराठी सरदारांस फार अचंबा वाटे. मागें एकदां परशुरामभाऊनीं लिटलीसाहेबाविषयीं असाच उद्गार काढिलेला आहे. ( पहा भाग ८ पृ० ४४०५ ) इंग्रजांची सैन्यरचना कशी आहे, व तींत व्यक्तिविशेषाचें माहात्म्य कितपत मानलें जातें, हें मराठी सरदारांस माहीत असतें तर इंग्रज आफिसर लढाईंत अघाडीला चालतात याचें त्यांना कांहींच आश्चर्य वाटलें नसतें. मराठी सरदारसुद्धां स्वतः सैन्याचे पुढारी होऊन लढाईच्या गर्दींत सामील होत नसत असें नाहीं. मात्र तशी आणीबाणीची वेळ येईल तरच असलें साहस ते करीत. एरवीं युद्धांत हाताखालच्या सैन्याकडून व सरदारांकडून युद्धकर्म यथास्थित करवून घेणें एवढेंच ते आपलें काम समजत. इंग्रज आफिसर आपल्या सैन्याचे नायक होते. मराठे सरदार आपल्या सैन्याचे प्रेरक होते. दोघांत हा फरक राहण्याचें कारण उघडच आहे. जी मराठी फौज ज्या सरदाराच्या हाताखालीं असे ती प्रायः त्यानेंच निर्माण केलेली व त्याच्याच जिवावर पोसली जाणारी असे. इंग्रज आफिसरावर तसली जोखीम कांहींच नसे. एक परशुरामभाऊ लढाईंत मेला तर लाखों लोक अन्नाला मोताद झाले. त्याच्या जागीं उभा करायला दुसरा परशुरामभाऊ महाराष्ट्राजवळ कोठें होता ? इंग्रजांचा एक मि० टॉम मेला तर त्याची जागा भरून काढायला आणखी तसलेच हवे तितके मि. टॉम् त्यांच्या सैन्यांत हजरच होते !

धारवाड सुभ्यापैकीं डंबळ व गदग हीं दोन ठाणीं डंबळच्या देसायानें वाघास पांच लक्ष रुपये देऊन आपणाकडे करून घेतलीं होतीं. इंग्रजानीं डंबळचें ठाणें घेतलें व देसायास फाशीं दिलें हें ऐकतांच गदगच्या ठाण्यांत त्याचा हस्तक भीमराव मुंडरगी म्हणून होता तो ठाणें टाकून पळून गेला. दुसरे दिवशीं म्हणजे ता. २७ जुलै रोजीं वसलीबहादर गदग येथें आले. त्यानीं डंबळप्रमाणें तेंही ठाणें बाळकृष्णपंतभाऊंच्या हवालीं केलें.

याप्रमाणें इंग्रजानीं ठाणीं घेण्याचा व त्यांत सांपडतील त्या लोकांची कत्तल करण्याचा धडाका सुरू केला तेव्हां वाघाच्या इतर ठाण्यांतून लोक होते ते घाबरून गेले आणि ठाणीं मोकळीं टाकून धूम पळत सुटले. दोडवाडास तीन हजार फौज व दोन तोफा घेऊन जोती घोरपडा राहिला होता तो पळून मलप्रभेच्या उत्तरतीरीं रुद्रापुरास जाऊन राहिला. दुथडा भरलेली मलप्रभा नदी इंग्रजांच्या व आपल्यामध्यें घातल्याखेरीज त्याच्या जिवाला चैन पडलें नाहीं! घोरपडा गेल्याची संधि सांपडताच चिंतामणरावआपानीं पुन्हां दोडवाडांत ठाणें बसवून तेथें चांगला बंदोबस्त केला. वाघाचे आसरे तीन होते. पहिला सोंधे सावनूर. दुसरा मलप्रभा उत्तर दक्षिण तीर, आणि तिसरा करवीर. त्यांपैकीं त्याचा पहिला आसरा इंग्रजानीं एक महिन्यांत पार नाहींसा करून टाकिला. इतकेंच नाहीं, तर धारवाडजिल्ह्यांत कोठें उभें रहायलासुद्धां त्याला जागा ठेविली नाहीं. त्यामुळें आतां तो मलप्रभेच्या आसऱ्यास गेला होता. पण तेथूनसुद्धां त्याला हुसकून लावण्याचा विचार इंग्रजानीं ठरविलाच होता.

नवलगुंद तालुक्यापैकीं सौंदत्तीचें ठाणें अजून बापू गोखल्यांकडे राहिलें होतें तें घ्यावें म्हणून वाघ त्या ठाण्यास वेढा घालून बसला आहे, ही बातमी गदग येथें असतां वसलीसाहेबांस कळली. त्यावरून त्यास गांठण्याच्या उद्देशानें ते एकुणतिसाव्या तारखेस अलगवाडी येथें आले. तेथून मनोळी २६ मैल व सौंदत्ती १५ मैल आहे. इंग्रज जवळ आल्याची बातमी येतांच वाघानें आपल्या फौजेच्या तीन टोळ्या केल्या. एका टोळीबरोबर त्यानें आपल्या तोफा व दरोबस्त बाजारबुनगें देऊन तें मनोळीच्या किल्ल्यासमोर नदी उतरण्याकरितां पाठविलें. दुसरी टोळी दोडवाडचें ठाणें पुन्हां काबीज करण्याच्या उद्देशानें तिकडे पाठविली. आणि तिसरी टोळी घेऊन आपण स्वतः मल्या प्रहांटेस जालीहाळाकडे निघून गेला.

मनोळीकडे गेलेल्या टोळींत वाघाची स्वारी असेल अशा समजुतीनें वसलीसाहेब सौंदत्तीकडे न जातां मनोळीकडे जाऊन वाघास गांठावें अशा उद्देशानें ता० ३० रोजीं अलगवाडीहून निघाले. शत्रूचे लोक वंटनाळच्या बारीनें पळून जातील याकरितां ती बारी रोंखून धरावी म्हणून त्यांनीं बापू गोखले व चिंतामणरावआपा यांस पुढें पाठविलें होतें, व त्यांचे स्वार ओळखतां यावे म्हणून भाल्यांच्या टोंकास

लावण्याकरितां त्यांस इंग्रजी निशाणें दिलीं होतीं. त्याप्रमाणें ते सरदार बारींत येऊन उभे रहातात तोंच इंग्रजांच्या फौजेनें येऊन तिसरे प्रहरीं वाघाचा तळ गांठला. शत्रूच्या तोफा व फौज आणि दोन हिस्से बाजारबुनगें नदीपलीकडे गेलेंच होतें. एक हिस्सा मात्र मागें राहिलें होतें. त्यांत येऊन इंग्रज घुसले तेव्हां मराठ्यांनीं बारी अडविल्यामुळें कोठें पळावयास वाट नाहींशी होऊन शेंकडों लोक मारले गेले. व शत्रूच्या गोटांत होतें नव्हतें तें सर्व सामान इंग्रजांच्या हातीं लागलें. त्यांत एक हत्ती, ओझ्याचीं असंख्य तट्टें व बैल, वणजारी व लमाण व त्यांचीं बायकापोरें वगैरे कचरा होता. पलीकडच्या तीरावर पांच तोफा उतरून ठेवलेल्या होत्या त्या इंग्रजानीं काबीज कराव्या तर नाव किल्ल्याच्या तटाखालीं पैलतीरीं होती. गोळे मारून तोफांचे गाडे निकामी करावे म्हणून त्यानीं यत्न करून पाहिला पण तो साधला नाहीं. अखेर रात्र पडत चालली, आणि पायदळास त्या दिवशीं लांबची मजल पडल्यामुळें तें थकलें होतें, म्हणून वसलीसाहेब गोटास परत आले. मनोळीच्या किल्ले-दाराची व वाघाची पूर्वींपासून दाट मैत्री होती. ती मैत्री घडून येण्याचीं कारणें मागें सांगितलींच आहेत. ( पहा भाग ११ पृ० ६११५ व ६११८. ) त्या प्रसंगीं आपल्या डोळयादेखत इंग्रज वाघाचा गोट लुटतात हें त्या किल्लेदाराच्यानें पहावेना. त्यानें किल्ल्यावरून इंग्रजांवर तोफा सुरू केल्या तेव्हां इंग्रजानींही त्याच्या किल्ल्यावर तोफांचा उलट मारा केला; व आसपासच्या गांवांतलीं घरें मोडून त्या लांकडांचे ताफे बांधून नदी उतरून येण्याचा रोंख दाखविला. तें पहातांच मनोळीचा किल्लेदार घाबरला आणि सायंकाळीं किल्ला मोकळ टाकून आपल्या लोकांनिशीं पळून गेला. ती बातमी वसलीसाहेबांस कळतांच त्यानीं तितक्या रात्रीस नदींत सोजीर पोहावयास घातले, व त्यांजकडून पैल-तीरची नाव अलीकडे ओढून आणविली, आणि त्याच नावेच्या साधनानें पली-कडे पांच तोफा होत्या त्याही आणविल्या. डवगीनाल्याच्या लढाईंत वाघानें काबीज केलेल्या त्या तोफा मूळच्या गोखल्यांच्या असल्यामुळें वसलीसाहेब बापू गोखल्यांस त्या देऊं लागले. पण आपणाजवळ बैल नाहींत, दारूगोळा नाहीं, गोलंदाज वगैरे माणसें नाहींत, उगीच कुठे हें लोंढणें स्वारींत बरोबर बाळगावें, म्हणून गोखल्यानीं ती देणगी नाकारली. तेव्हां साहेबानीं त्या तोफा फोडून टाकिल्या. मनोळीचा किल्ला मोकळा आहे तो तुम्हीं ताब्यांत घ्यावा म्हणून त्यानीं दुसरे दिवशीं चिंतामणराव आपा यांस सांगून पाठविलें होतें, व त्या कामाकरितां आपानीं गारदीसुद्धां पाठविले होते. पण तितक्यांत

वाघाचा मित्र तल्लूरकर देसाई यानें आपले लोक किल्ल्यांत घालून तो बळकाविला. त्यामुळें सांगलीकरांच्या गाड्यांस हात हालवीत परत यावें लागलें.

धोंडजी वाघ हा हाडाचा खरा मर्द शिपाई होता. एकीकडून एका शत्रूचे घाव आपणावर पडत असतां जो शिपाई त्याची क्षिति मानीत नाहीं, आणि त्याच वेळीं दुसऱ्या शत्रूवर घाव घालण्याचा उद्योग खुशाल चालवीत असतो, त्याच्या मर्दुमीची तारीफ किती करावी! इंग्रजांचा छापा येणार त्याची काय तजवीज करावयाची ती निर्भयपणानें करून वाघ जालीहाळाकडे गेल्याचें पूर्वीं लिहिलेंच आहे. तिकडे तो तासगांवकर हरिपंतबाबा पटवर्धन यांचें लष्कर लुटावें या उद्देशानें गेला होता. वसलीचीं वारंवार निकडीचीं बोलावणीं गेल्यावरून ते हरिपंतबाबा बागलकोटाहून बदामीस आले होते व ता० ३० रोजीं तेथें नदी उतरून ते अलीकडे येणार होते. ती बातमी पक्की आणवून वाघ त्यांचें लष्कर लुटण्याकरितां आला होता. बातमी म्हणजे अर्धी लढाई आहे. गोखले व चिंतामणराव पटवर्धन यांस मागें वाघानें ठोकर दिली त्याचें मुख्य कारण त्यांनीं बातमी राखण्यांत गाफीलपणा केला हेंच होय. हरिपंतांच्या हातूनसुद्धां या प्रसंगीं तीच चूक झाली. २९ व्या तारखेस त्यांच्या लष्करचे पांच सहाशें स्वार नदी उतरून आले ते बाकीच्या लष्कराची वाट पहात शेजारच्या एका खेड्यांत राहिले. त्या स्वारांत अंताजी गोपाळ फडके, नारायणराव रामचंद्र लिमये, व आपले सावनूरचे जुने परिचित वासुदेवकाका पटवर्धन हे मुख्य सरदार होते. मलप्रभेच्या उत्तरतीरास बदामी आहे व समोर दक्षिण तीरास जालीहाळ आहे. बदामीपासून तीन साडेतीन कोसांवर आऊरकोड म्हणून ठिकाण आहे तेथें नदी उतरण्याची जागा आहे. तेथें ३० व्या तारखेस प्रातःकाळीं हरिपंतबाबा फौज घेऊन आले. नावांची पहिली खेप सामान भरून पैलतीरीं गेली. तिच्याबरोबर शेंदीडशें स्वार नदी उतरून गेले ते पलीकडच्या तीरीं भाकरी तुकडा करण्याच्या उद्योगाला लागले. पुन्हां नावा परत गेल्या त्यांतून हरिपंतांनीं यावें तों अकस्मात् पलीकडच्या तीरास वाघानें येऊन झपाटा मारला! त्यांत त्या शेंदीडशें स्वारांची कत्तल झाली व त्यांचें घोडीं हत्यारें कंठाळांसुद्धां सर्व सामान वाघाच्या हातीं लागलें. हा अनर्थ हरिपंतांच्या डोळ्यांसमोर घडत असतां त्याचें निवारण त्यांच्या हातून कांहींएक झालें नाहीं. वाघ जितक्या वेगानें आला तितक्याच वेगानें परत फिरला तो हां हां म्हणतां अदृश्य झाला! जवळच्या खेड्यांत स्वार होते त्यांस वाघाचें वर्तमान कळतांच ते तत्काळ

होनगुंद्याच्या बाजूस पळून गेले. वाघाला त्यांची बातमी कळती तर त्यांची धडगत लागत नव्हती. निदान वाघाच्या हातीं वासुदेवकाका सांपडले असते तर या खेपेस त्यांची कंदुरी केल्याखेरीज त्यानें खचित सोडलें नसतें ! नदी उतरण्याच्या कामांत असा हा एकाएकीं विक्षेप झालासें पाहून हरिपंत-बाबा परत बदामीस गेले.

यां मोहिमेंत ता० ३० जुलै हा दिवस ध्यानांत ठेवण्याजोगा समजला पाहिजे. त्या एका दिवसांत वाघानें व इंग्रजांनीं काय काय धामधुमी केल्या त्यांचें एवढा वेळ वर्णन केलें तरी त्यांचा थोडासा अवशेष दुसरे व तिसरे दिवशीं घडून आला तो अजून सांगावयाचा राहिलाच आहे. त्या रात्रीस बापू गोखले व चिंतामणराव सौंदत्तीस[1] राहिले होते ते दुसरे दिवशीं इंग्रजी लष्करांत परत आले. त्यांस वसली-साहेबाचा निरोप आला कीं वाघ जालिहाळाकडे गेला आहे त्याच्या पाठीवर तुम्ही जावें. त्यावरून त्याच म्हणजे ३१ जुलईच्या रात्रीस बापू गोखले फौज तयार करून निघाले. ते परसगडच्या पश्चिमेस जातात तोंच तिकडून अकस्मात् वाघाची स्वारी परत येतांना त्यांच्या दृष्टीस पडली ! तो इतक्या लौकर भेटेल ही त्यांना कल्पना नव्हती ! त्यामुळें ते चपापून थबकून राहिले. जरी वाघाची फौज दोन तीन हजारांपेक्षां आधिक नव्हती, व तो खुशाल दिवट्या पेटवून चालला होता, तरी रात्रीचा विषय असल्यामुळें यांच्यानें त्याच्या वाटेस जाववलें नाहीं. तो दोडवाडच्या मार्गानें निघून गेला आणि हे ती बातमी घेऊन लष्करांत परत आले. दोडवाडांत चिंतामणराव आपानीं नुकतेंच पुन्हां ठाणें घातलें होतें. तें स्थळ घेण्याकरितां शत्रु गेला आहे हें कळल्यावर त्यांस कसें चैन पडावें ? ते पहांटेसच आपली फौज घेऊन निघाले ते दोडवाडाअलीकडे तीन कोसांवर पोंचतात तों वाघ त्या ठाण्याच्या दक्षिण बाजूस टेकडीवर उभा असल्याची त्यांस बातमी क-

---

१ चिंतामणराव आपा लिहितात, "संवदत्तीस आल्यावर संध्या केली. ते दिवशीं भोजन जाहलें नाहीं. पोहे होते तेच चिंचेच्या बरवटांत कालवून खाल्ले व नारळाचें खोबरें खाल्लें." जिथे मुख्य सरदाराची ही दशा, तिथे शिलेदार वगैरे गरिबांची मेजवानी कोणती ? अशी कोणास जिज्ञासा होईल तर त्यानें समजावें कीं, त्यांची मेजवानी घोड्याच्या तोबऱ्यांतले पसा दोन पसे हरभरे ! त्यांतच कोणाच्या संग्रहीं एखादा कांदा निघाला तर तो नशीबवान !

ळली. त्यावरून बुनगें पिछाडीस घालून अघाडीस फौज घेऊन ते सावधपणानें चाल करीत दोडवाडापर्यंत आले, तों एक प्रहर लोटला. त्या अवधींत त्यांच्या येण्याची बातमी लागल्यामुळें वाघ तेथून पळाला तो मलप्रभा उतरण्याच्या बेतानें संगोलीस गेला. लगेच चिंतामणराव आपा सडी फौज घेऊन त्याच्या पाठीवर गेले. त्या दिवशीं वाघाच्या फौजेस अहोरात्र मिळून पंचवीस कोसांची मजल पडली असल्यामुळें ती अगदींच थकून चीत झाली होती. लढण्याची रग तिच्या अंगांत बिलकुल राहिली नव्हती. ते लोक घोडीं सोडून मोकळ्या अंगानें विश्रांति घेत होते. कोणी चुली पेटवून जेवण्याच्या उद्योगास लागले होते. इतक्यांत पटवर्धनांची फौज जवळ आल्याचें वर्तमान त्यांस समजलें, तेव्हां त्यांची मोठीच तारांबळ उडाली; आणि भोजनाचा उद्योग टाकून त्यानीं पलायनाचा स्वीकार केला. त्यानीं जी एकदां धूम ठोकली ती सह्याद्रीचें जंगल दृष्टीस पडेपर्यंत मागेंसुद्धां पाहिलें नाहीं ! नंतर चिंतामणराव आपा तेथून परत दोडवाडास गेले. त्या टापूंत इंग्रजांचीं वगैरे लष्करें दहा बारा दिवस होतीं तोंपर्यंत त्यानीं दोडवाड हेंच रहाण्याचें ठिकाण केलें होतें.

शत्रूचें बुनगें लुटल्यावर वसलीसाहेब दुसरे दिवशीं सौंदत्तीस गेले. तेथें त्यांचे दोन तीन मुक्काम पडले. हैदराबादेहून इंग्रजी तीन पलटणें व तीन हजार मोंगल स्वार त्यांच्या मदतीस आले त्यांची गांठ तेथें पडली. नंतर आगष्ट महिन्याच्या पांचव्या तारखेस इंग्रज व गोखले व मोंगल वगैरे सर्व लष्कर कित्तूर येथें आलें. तेथें तें पोंचण्यापूर्वीच वाघ जंगलांत शिरून जांबोटीस राहिला होता. टोळ्या टोळ्यानीं पसरलेली त्याची फौज व चोहोंकडे पांगलेलें बाजारबुनगें त्यानें जांबोटीस एकत्र केलें होतें. त्या जंगलांत इंग्रजांचा रिघाव होत नसल्यामुळें यद्यपि त्याला सुरक्षितपणा मिळाला होता, तरी लष्करचीं जनावरें व माणसें उपासमारीनें मरूं लागल्याकारणानें त्याला लौकर लौकर जंगल सोडून मैदानांत येणें प्राप्त झालें. त्यानें इंग्रजांप्रमाणें नदी उतरण्याची कोणतीच पंचाईत ठेविली नव्हती ! मुळीं आपलें लष्करच उगमापलीकडे नेऊन तिकडून पार होण्याचा त्याचा बेत होता. तो बेत त्यानें आठव्या तारखेच्या सुमारास सिद्धीला नेला. त्याचें कांहीं बुनगें वगैरे लुटावयास सांपडेल तर पहावें म्हणून कर्नल स्टीव्हन्सन् जंगलाच्या तोंडापर्यंत गेला होता, पण त्याच्या हातास कांहीं लागलें नाहीं. वाघाचा सरदार जोती

घोरपडा मुरगोडाजवळ रुद्रापूर येथें होता तो यापूर्वींच शहापूर तालुक्यांत भारेहाळ येथें आला होता. हल्लीं वाघ जंगलांतून निघाला तोही तेथेंच गेला. त्यामुळें कर्नल स्टीव्हनसन् व कर्नल बौसर खानापुराजवळ नदी उतरून शहापुराकडे वाघाच्या हालचालींवर नजर ठेवण्याकरितां आले.

कित्तूर येथें वसलीसाहेबांचे एकंदर नऊ मुक्काम झाले. मराठ्यांचें म्हणणें इंग्रजानीं एकसारखें वाघाच्या पाठीस लागत सुटावें! तें सोडून देऊन हे वाघाच्या मुक्कामापासून सहा कोस मागें रहातात, तो जितके मुक्काम करील तितके मुक्काम हेही करितात, तो एक मजल पुढें गेला तर हेही एक मजल त्याच्या मागोमाग जातात, तो यांच्यादेखत मुलूख लुटीत असतो आणि हे पहात बसतात; त्याला गांठून मोहिमेचा कांहीं निकाल लावावा तें कांहींच करीत नाहींत, हें आहे तरी काय? यानीं भारी फौज व लढाईचें सामान गोळा केलें आहे. वाघाच्या पारिपत्याला एवढ्या सेनासंभाराची जरूरी तर कांहींच दिसत नाहीं. मग एवढी आटोकाट तयारी यानीं कशाकरितां चालविली आहे? यानीं मलप्रभेवर कोठी केली आह आणि चोहोंकडून धान्य व इतर जिन्नस खरेदी करून वर्ष सहा महिन्यांची बेगमी करण्याचा यांचा उद्देश दिसतो. हें कांहीं बरें लक्षण नव्हे. 'याजप्रमाणेंच तहाचा ठराव पांच सालांचा करून पट्टणासमीप कोठी घालून शेवटीं टिपूचें सर्वही घेऊन नाहींसा केला!" हल्लींसुद्धां यांचें वर्तन चाललें आहे त्यांत यांचा कांहीं तरी दुष्टपणाचा खोल कावा असला पाहिजे!

खरें पाहिलें तर यांत इंग्रजांचा कावा असा कांहींच नव्हता. निदान आम्हाला तरी तसें वाटत नाहीं. इंग्रजांचें पुढच्या दोन महिन्यांतलें चरित्र विचारांत घेतलें तर संशय घेण्यास जागा आहे खरी, पण वसली साहेबांचा विलंब याच मोहिमेप्रीत्यर्थ होत असावा असें मानण्यास सबळ कारणें आहेत. कवाइती पायदळाची फौज म्हटली म्हणजे तिला माणसें, जनावरें व सामानसुमान असंख्य लागतें. 'अंगापेक्षां बोंगा फार' अशी तिची स्थिति असते. व या सर्व लटांबराची व्यवस्था नीटनेटकी राखून तें पोसण्याची तरतूद मुख्य सेनापतीस पहावी लागते. मुलखांतून जात असतां 'घास लकडी' खेरीज रयतेला कोणताही उपद्रव देऊं नये असा इंग्रजांचा सक्त कायदा होता. इंग्रज, मराठे, मोंगल, म्हैसूरकर, आणि वाघ यांच्या लष्करांनीं एकाच वेळीं पायमल्ली करून ओसाड पाडलेल्या त्या मुलखांत लागेल तो जिन्नस पैसा देऊन विकत घ्यायचा म्हटलें तर तो मिळावा कसा? धान्य वगैरे हरएक

जिन्नस लागेल तेव्हां लागेल त्या मोठ्या प्रमाणावर मिळाला नाहीं तर लष्कर उपाशीं मरेल. याकरितां एवढ्या सैन्याला दोन तीन महिने पुरेल इतक्या रसदेचा पुरवठा केल्याखेरीज वसलीसाहेबांस पुढें पाऊल टाकतां येईना हें नीटच आहे. शिवाय त्यांस नदी उतरण्याकरितां नावा व टोकरे पाहिजे होते ते मिळेनात. सबब त्यांस ते तयार करून घ्यावे लागले, आणि त्यांतच त्यांचे पांच दिवस मोडले.

कित्तुराहून निघण्याच्या बाबतींत वसलीसाहेबांस विलंब कां लागला याचीं कारणें वर दिलीं आहेत हीं सयुक्तिकच आहेत, तथापि आणखी एक फारच महत्वाचें कारण एकाएकीं उत्पन्न झालें होतें तेंही येथें सांगितलें पाहिजे. प्रस्तुतच्या राजकारणाची घटना होतांना एका बाजूस सर्वांपुढें इंग्रज, आणि त्यांच्या मागें पटवर्धन, गोखले, मोंगल, व म्हैसूरकर असा व्यूह रचला गेला. तेव्हां दुसऱ्या बाजूस सर्वांपुढें धोंडजी वाघ, त्याच्यामागें करवीरचे महाराज, त्यांच्या मागें शिंदे व घाटगे, व सर्वांमागें पेशवे, अशी व्यूहाची रचना आपोआप तयार झाली. वाघास आपल्या व्यूहांत शिरूं न देतां अलग राखून पकडावें असा वसलीसाहेबांचा फार इरादा होता. परंतु हल्लीं तो बंडखोर करवीरच्या बाजूस सरकत चालला तेव्हां आपला हेतु सिद्धीस जात नाहीं असें त्यांस दिसून आलें. करवीरकर व पटवर्धन यांच्या कलहांत आपणास बिलकुल पडावयाचें नाहीं असें ते बोलत असतां असतां वस्तुगतीचा ओघ त्या राजकारणाकडे त्यांस जोरानें खेचून नेत होता! मनोळीकर किल्लेदाराच्या गैरवर्तनामुळें आधींच त्यांचा करवीरकरांवर घुस्सा होता. त्यांत हल्लीं वाघ त्यांच्याच हद्दीकडे चालला आहे त्याअर्थीं तेथील महाराजांचा बेत त्यास ठेवून घेण्याचा आहे असें त्यांस वाटूं लागलें; आणि वाघाचें बंड मोडण्याच्या पायीं करवीरकरांचें सुद्धां शासन करण्याचा प्रसंग त्यांस प्राप्त झाला. तसा तो प्रसंग यावा हेंच पटवर्धनांचें देवाजवळ मागणें होतें! पण त्यांच्या दुर्दैवानें या संधीस करवीरच्या महाराजांचा वकील वसलीसाहेबांस येऊन भेटला आणि करवीरावर इंग्रजांची स्वारी होण्याचा योग टळला.

वसली साहेबानीं करवीरच्या वकिलास गुरकावून विचारिलें कीं, "कंपनीसरकाराशीं तुमचा दोस्तीचा तहनामा झालेला असतां मनोळीच्या किल्लेदारानें आम्हांवर तोफांचा मारा केला, आणि हुलीच्या ठाण्यांतल्या

लोकांनीं प्रथम आमचा कौल मागून घेतला आणि मागून विश्वासघात करून गोऱ्या तुरुपस्वांरांचें बुनगें लुटलें. हल्लीं तर बंडखोर वाघ यास ठेवून घेण्याचा तुमचा इरादा स्पष्ट दिसतो. दोस्तीच्या तहनाम्याला विरुद्ध अशी ही आगळीक तुम्हांकडून घडली आहे. याचें कांहीं समाधानकारक उत्तर तुम्हांस देणें असेल तर द्या. नाहीं तर आम्ही तुमच्या राज्यावर स्वांरी करून या सर्व जाबसालांचा फडशा करून घेतल्याखेरीज सोडणार नाहीं." यावर त्या वकिलानें फार गरीबी दाखवून उत्तर केलें कीं, "आपण म्हणतां त्या गो ी आमच्या लोकांच्या हातून घडल्या हा आमचा अन्याय आम्ही कबूल करितों. हुलीच्या लोकांचें शासन तुम्ही वाटेल तें करावें. मनोळीचा अपराधी किल्लेदार आम्ही तुमच्या हवालीं करितों. आम्ही धोंडजी वाघास आसरा देत नाहीं. उलट तुमची कुमक करून त्याचें शासन करावें म्हणून आम्ही फौज जमवून तयार ठेवतों. पटवर्धनांचें व आमचें वांकडें आहे तें तुम्हीं सरळ करून द्यावें. तुम्ही सांगाल त्याप्रमाणें आम्ही ऐकूं व त्यानींही ऐकावें. त्यांचा आमचा तह तुम्हींच ठरवून द्यावा." करवीरच्या कारस्थानाचा हिसका कसा आहे हें वसलीसाहेबांस अद्यापि कळावयाचें होतें ! त्या वाकिलानें अघळ पघळ बोलून याप्रमाणें क्षमापनाविधि व प्रार्थनाविधि यथास्थित साजरा केल्याबरोबर साहेबबहादूर फार खूष झाले. करवीरचे महाराज व पटवर्धन यांच्या भांडणांत जरी त्यांस पडावयाचें नव्हतें, तरी त्या दोघांत मैत्री करून देण्याचें यश आपण घ्यावें आणि होतां होईल तों पटवर्धनांचें कल्याण करावें, ही त्यांस इच्छा होतीच. त्यांतून करवीरचा वकील जेव्हां आपण होऊन पटवर्धनांशीं समेट करायला तयार झाला तेव्हां साहेब त्यास बोलले कीं, मलप्रभेच्या उत्तरदाक्षिण तीरीं मुलूख आहे तो तुमच्या ताब्यांत असल्यामुळें हीं वाघासारखीं बंडें उद्भवतात व फैलावतात. हा मुलूख तुम्ही रामचंद्रपंत आपांच्या वहिवाटीस कां द्याना ? तसें केलेंत तर ते असलीं बंडें होऊं देणार नाहींत, बंदोबस्त चांगला राखतील, आणि त्या योगानें रयतेचें कल्याण होईल. हा मुलूख आपासाहेबांना बहाल करा असें कांहीं आम्ही तुम्हांला सांगत नाहीं. त्यांना तुम्ही कमावीसदारीनें अथवा इजारदारीनें अथवा जमीनदारीनें—कोणत्या तरी संबंधानें आपलें स्वामित्व राखून—द्या म्हणजे झालें ! वकिलास हें बोलणें फार पसंत पडलें. आतां तह ठरायचा तो फक्त हरिपंत बाबांच्या येण्यावर खोळंबून राहिला. ते बाबाही कित्तूरच्या मुक्कामींच फौजेसह इंग्रजी लष्करास येऊन मिळाले. आतां तहाच्या वाटाघाटीकरितां बैठकी सुरु व्हाव्या, तों करवीर-

च्या वकिलानें आज बोलूं, उद्यां बोलूं, अशी टाळाटाळ चालविली; आणि अखेरीस तहाचा बनाव कोणत्याच प्रकारें बनूं दिला नाहीं !!

शहापुराकडे वाघ आला होता तो कांहीं संधान असल्याखेरीज आला नव्हता. तें संधान काय होतें याची आतां फोड करूं. बाळासाहेब मिरजकर व चिंतामणराव सांगलीकर यांचा तंटा लागला होता आणि मिरजकरांपासून सरंजामी मुलूख जबरदस्तीनें काढून घेण्याच्या उद्योगांत सांगलीकर गढून गेले होते हें वाचकांस अवगत आहेच. त्यानीं धोंडोपत गोखल्यांच्या मदतीनें तेरदाळ व शहापूर हे परगणे व दोडवाडचें ठाणें काबीज केलें होतें हेंही मागें आलेंच आहे. हल्लीं वाघाचें बंड चोहोंकडे फैलावलें तेव्हां पाच्छापूरचा शेख मिरा देसाई व शहापूरचा देवराव कृष्ण देशपांडे यांनीं वाघाकडे जाऊन त्याशीं करार ठरविला कीं, तुम्ही बेळगांव प्रांतीं येऊन पाच्छापूर, गड व पेठ हे पेशवे सरकारचे तीन तालुके घ्यावे आणि आमच्या हवालीं करावे. या कामगिरीबद्दल आम्ही तुम्हास दोन लक्ष रुपये देऊं. शिवाय देवराव देशपांडे यानें वाघाशीं आणखी एक निराळा करार असा ठरविला होता कीं, त्यानें सांगलीकरांचा शहापूर तालुका घेऊन आपणास द्यावा व त्याबद्दल आपण त्यास नऊ लक्ष रुपये द्यावे ! ते करार पुरे करून पैका मिळवावा या हेतूनें वाघाची स्वांरी करवीरास जातां जातां शहापुराकडे वळली होती.

करवीरच्या महाराजानीं वसलीकडे वकील पाठवून बहुत लीनता दाखवून कशी बशी थोपवाथोपवी जरी केली असली तरी इंग्रज–करवीरकरांचा युद्धप्रसंग कायमचा टळला असें वाघ मानीत नव्हता. याचें कारण असें कीं, ज्या अर्थी पटवर्धनानीं आपणावर सूड उगाविण्याकरितां इंग्रज आणले आहेत त्या अर्थी ते इंग्रज कोणत्या ना कोणत्या तरी निमित्तानें आपल्या राज्यावर स्वांरी करून तें खणून काढल्याखेरीज सोडीत नाहींत, ही कल्पना महाराजांच्या मनांतून कांहीं केल्या जाईना ! ! त्यावरून त्यानीं हा सर्व मजकूर पुण्यास लिहून तिकडून कुमक मागितली होती, आणि पेशवे, शिंदे व घाटगे त्यांच्याच मताचे असल्यामुळें त्यानीं महाराजांस आश्वासन दिलें होतें कीं, पांच हजार कवाइती पायदळ आणि दहा हजार स्वांर आम्हीं ताबडतोब तुमच्या कुमकेस पाठवितों, आणि मागून लागेल तितक्या सैन्याचा पुरवठा करितों. तुम्ही दम सोडूं नये आणि इंग्रजाशीं तह करूं नये ! ! !

वसलीच्या मध्यस्थीनें पटवर्धनांशीं मैत्री करण्याच्या कामीं करवीरच्या वकिलानें आयत्या वेळीं माघार घेतली म्हणून मागें सांगितलें त्याचें तरी

बीज पुणें व करवीर येथें ही नवीनच उत्पन्न झालेली लढाईची ईर्षा हेंच होय. त्या वकिलाची चालचर्या फिरलेली पाहून वसलींच्या मनांत त्या वेळीं विकल्प आलाच होता. आतां तर पुण्याच्या व करवीरच्या बातम्या ऐकण्यांत येऊं लागल्या तेव्हां महाराजांच्या शत्रुत्वाविषयीं त्यांची खात्रीच झाली. त्या महाराजांशीं युद्ध पुकारणें म्हणजे शिंद्यांशीं युद्ध पुकारल्याप्रमाणेंच होतें, आणि तितकेंही करण्याची त्यांची तयारी होती ! वाघाच्या पाठीवर कर्नल स्टीव्हनसन् व कर्नल बौसर सात आठ पलटणें घेऊन शहापुराकडे गेलेच होते. तसेच पुढें सरून करवीरास शह द्या असा वसलीसाहेबानीं त्यांस हुकूम देण्याचाच काय तो अवकाश होता !

असें हें युद्धाचें होमकुंड पुन्हां धुमसूं लागलें तरी अखेरीस त्यापासून ज्वालानिष्पत्ति मुळींच झाली नाहीं ! कारण ‘ इंद्राय सतक्षकाय स्वाहा ’ असें वसलीसाहेबांनीं म्हणण्यापूर्वींच इंद्रानें अंगाशीं आलेल्या तक्षकाला उचलून रागानें दूर झुगारून दिलें आणि आपला प्राण वांचविला ! इंग्रज खरोखरच हातघाईवर येतात असें पहातांच महाराजांचें अवसान सुटलें ! त्यानीं विचार पाहिला कीं, इंग्रज आले दारांत आणि कुमक देणारे बाजीराव दौलतराव सर्जेराव राहिले पुण्यांत ! सर्प डोक्यावर आणि वनस्पति हिमालयावर अशांतली ही स्थिति झाली. तुम्हांविषयीं आमच्या मनांत संदेह आला आहे तो वाघामुळें आला आहे असें इंग्रज म्हणत आहेत. तर हें संदेहाचें मूळच नाहींसें करून इंग्रजांचा शह तूर्त चुकत असेल तर चुकवावा. इतकेंही करून अखेरीस पटवर्धनांच्या निमित्तानें ही लढाई उद्भवलीच तर कुमक करणारे शिंदे घाटगे आहेतच. दैवगतीनें जसें घडेल तसें घडो ! याप्रमाणें निश्चय ठरवून त्यांनीं वाघास निक्षून सांगून पाठविलें कीं, तुम्ही आम्हांकडे येऊं नये. आल्यास इकडून तुमचें पारिपत्य करण्यांत येईल ! याप्रमाणें त्यांनी वाघाचें प्रत्याख्यान केलें आणि आपण त्याचे मिलाफी नाहीं असें इंग्रजांस जाहीर केलें, तेव्हां त्यांशीं शत्रुत्व करण्याची सबब वसलीसाहेबांस अर्थातच राहिली नाहीं. करवीरच्या बाबतींत झालें इतकें बस्स झालें असें मानून त्यांस समाधान करून द्यावें लागलें. पटवर्धनांशीं तह ठरविण्याच्या प्रकरणांत आपण चार बोधाच्या गोष्टी महाराजांस सांगितल्या त्या त्यानीं ऐकल्या नाहींत म्हणून साहेबबहाद्दरांस विषाद वाटला होता. पण तो वाटून काय उपयोग ? दंडुकें दाखविल्याखेरीज हे महाराज वळणारे नव्हत हें

त्यांस समजलें होतें, पण वाघ व त्याचे मिलाफी यांखेरीज या मोहिमेंत कोणालाच दंडुकें दाखवूं नये अशी त्यांस कंपनी सरकारची ताकीद होती !

वर सांगितल्याप्रमाणें करवीरचें बस्तान फिसकटलें तरी बेळगांवप्रांतांतून कांहीं पैका काढतां येईल ही धोंडजी वाघाला आशा होती. पण तीही अखेरीस फोल ठरली. पाच्छापुरांत बेळगांवकरांचें ठाणें होतें तें त्यास बधेना, आणि शहापूरकरानीं तर वाघाशीं बेधडक लढाई देऊन त्याच्या लष्करचे दोन चार हजार बैल लुटून घेतले. करवीर नाहीं, पाच्छापुर नाहीं, शहापूर नाहीं, कोठेंच भुईला पाय लागेनात, आणि मागून तर इंग्रजी फौजेची दाटी होत चालली, असें पाहून वाघ तो टापू सोडून गोकाकेस गेला आणि तेथून यादवाडास गेला. तीं दोन्ही ठाणीं तासगांवकरांचीं होतीं व तेथें त्यांचा बंदोबस्त चांगला होता. सबब त्या ठाण्यांच्या वाटेस न जातां तेथल्या पेठा लुटून आणि खेड्याखेड्यांनीं काय मिळालें तेवढें बुचाडून तो पूर्वेच्या बाजूनें लुटालूट करीत चालला.

वाघ हा चारी मुलखांचा हरामखोर हें ठरलें होतें. त्याच्या फौजेची एक टोळी तेरदाळपर्यंत प्रांत लुटीत आली तेव्हां शिंद्याचीं पलटणें जवळच कुडची येथें होतीं. बंडखोरांवर चढाई करावी असें त्यांच्या मनांत असतें तर तें त्यांना सहज करतां आलें असतें. पण तीं त्यांच्या वाटेस मुळींच गेलीं नाहींत हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

वाघ जरी आपल्या शत्रूंशीं इतक्या बेपवाईनें वागत होता तरी आंतून त्याच्या जिवाला स्वस्थता होती असें मात्र नाहीं. त्याच्या लष्करांत वारंवार दंगे व फिसालती होत होत्या, आणि बुभुक्षित असंतुष्ट शिपायांच्या झुंडी त्याच्या दारांत नेहमीं धरणें देऊन बसत होत्या. तथापि कोणास दटाऊन फटाऊन तर कोणास देऊं दिलाऊं करून त्यानें कशी तरी कालक्रमणा चालविली होती व सैन्य हातांत राखलें होतें.

धोंडजी वाघास शहापूर प्रांतीं ज्यानें आणिलें तो कारस्थानाचा मूळ उत्पादक देवराव देशपांडे वाघाच्या लष्करांत होता व त्यानें आपलीं मुलें माणसें बेळगांवच्या किल्ल्यांत ठेविलीं होतीं. तीं माणसें आपल्या हवालीं करावीं म्हणून चिंतामणरावआपांच्या सूचनेवरून वसलीसाहेबानीं बेळगांवकरांस सक्तीचा तगादा केला; आणि त्या तगाद्याला ते जुमानीत नाहींतसें पाहून कर्नल स्टीव्हनसन बेळगांवाकडे येऊन त्या किल्ल्यास गराडा देण्याचा

विचार करूं लागला. देशपांड्याच्या कारस्थानांत बाळासाहेब मिरजकर यांचें कांहीं तरी अंग असावें असें अनुमान आहे. भाऊबंदकीचा त्वेष हा कुविचारांचा उत्तम शिक्षक होय ! दोडवाड शहापूर पुतण्यानें माझ्या ताब्यांतून जबरीनें काढून घेतलें तें त्याला तरी मी कां पचूं देईन ? ना मला ना तुला, घाल कुत्र्याला ! ( या ठिकाणीं वाघाला ! ) असा कुविचार त्यांच्या मनांत येणें अस्वाभाविक नाहीं. तें कसेंही असो. देशपांड्याचीं मुलेंमाणसें बेळगांवकरानीं इंग्रजांच्या हवालीं करूं नयेत याबद्दल बाळासाहेबानीं फार खटपट केली हें मात्र खरें आहे. बेळगांवचा किल्ला पुण्याचे सिद्धेश्वरराव बिनीवाले यांजकडे होता. आपण ज्यांना अभय दिलें तीं माणसें इंग्रजांच्या हातीं द्यावीं तर दुर्लौकिक आणि मिरजकरांचा रोष, न द्यावीं तर इंग्रज व चिंतामणराव यांचा रोष व त्या योगानें तत्काळ प्राप्त होणारें प्राणसंकट ! असा बिनीवाल्यांस दोहोंकडून मोठा पेंच येऊन पडला. त्या प्रसंगीं मिरजकर बाळासाहेबानीं बाळकृष्णपंत भाऊ लागू यांस अतिशय गळ घालन त्यांजकडून वसलीबहाद्दराची कशी बशी समजूत काढविली. ' देवराव याचीं माणसें बेळगांवच्या किल्ल्यांत आहेत तीं माझ्या जिमेस आहेत. जेव्हां कारण पडेल तेव्हां तीं आणून हजर करण्याचा जाबसाल माझ्याकडे लागला.' असें लागू यानीं साहेबमजकूर यांस सांगितल्यावरून ही भानगड मिटली. मात्र या कामांत बेळगांवकरांसंबंधानें शहापुरकरांच्या मनांत विनाकारण अढी उत्पन्न झाली. त्या अढीचा परिणाम बेळगांवकरांस कसा भोंवला तें पुढील प्रकरणीं सांगण्यांत येईल.

करवीरच्या राजकारणाच्या जाळींत वाघ शिरला होता तेथून वसलीसाहेबानीं त्यास हुसकून उघड्या मैदानांत आणिलें तेव्हां आतां इतर उपाधींपासून अलग झालेल्या या शत्रूचा समाचार निर्वेधपणानें घेणें साहेबबहाद्दरांस सोईचें झालें. त्या उद्देशानें ते आगष्ट महिन्याच्या पंधरा सोळा तारखेस कित्तुराजवळ चुरमुरी येथें मलप्रभेस टोकऱ्यांचा पूल बांधून त्यावरून अलीकडे आले. उत्तरत्तीरास तल्लूरकर देसाई हा वाघाच्या तर्फेचा एकच कंटक राहिला होता, व त्याच्या ताब्यांत मनोळी, मुरगोड व तल्लूर अशीं तीन ठाणीं होतीं. सबब तो कंटक उपटून टाकण्याचें काम वसलीसाहेबांस प्रथम करावें लागलें. त्या देसायावर त्यांनीं स्वारी केली तेव्हां तो ठाणीं टाकून फरारी झाला ! मग त्यानीं तल्लूरचें ठाणें पाडून टाकलें व त्यांत वाघानें

तोफा बंदुका व दारूगोळा इत्यादि सामान ठेविलें होतें त्याचा नाश केला. त्या प्रसंगीं तोफा फोडल्या त्यांत गोखल्यांची काळापहाड ही तोफ होती. मनोळी व मुरगोड हीं ठाणीं पूर्वीं परशुरामभाऊंकडे होतीं, सबब हल्लीं तीं वसली-साहेबानीं हरिपंतबाबांच्या हवालीं केलीं.

इतकें झाल्यावर आतां धोंडजी वाघाचा पाठलाग करण्याचें काम व्यवास्थितपणें चालू झालें. त्याकारितां वसलीसाहेबानीं इंग्रज, मराठे व मोंगल मिळून फौजेच्या चार टोळ्या केल्या व त्यांस निरनिराळीं कामें वांटून दिलीं. पहिली टोळी कर्नल स्टीव्हनसन याची. तींत चार पलटणें व दोन हजार तुरुपस्वांर असा सरंजाम होता. त्या टोळीचें काम घटप्रभेच्या दक्षिण तीरानें चाल करण्याचें. त्या टोळीला समांतर एक मजलेच्या अंतरावर चालणारी कर्नल बौसर याची टोळी. तींतसुद्धां चार पलटणें आणि मोंगल व बापू गोखले यांच्या फौजा असा सरंजाम होता. तिसरी टोळी खुद्द वसली बहाद्दर यांच्या हाताखालची. तींत चार पलटणें, दोन हजार तुरुपस्वांर, आणि म्हैसूरकर व बाळकृष्णपंत भाऊंचे मिळून सातआठशें स्वांर अस सरंजाम होता. मलप्रभेच्या उत्तरतीरानें वाघाच्या पाठीवर राहण्याचें काम या टोळीनें पतकरलें होतें. या तीन टोळ्या घटप्रभा व मलप्रभा यांमधल्या दुआबाचा तमाम मुलूख चोखाळीत पाठीस लागल्यावर शत्रूला कोठें लपावयास जागा नाहींशी होईल व तो मलप्रभा उतरून पळेल म्हणून आणखी एक चवथी टोळी मेजर केंपर याच्या हाताखालीं नेमिली गेली होती. तींत तीन पलटणें आणि हरिपंतबाबा व चिंतामणरावआपा हे उभयतां पटवर्धन सरदार आपापल्या पथकांसह होते. या चवथ्या टोळीनें मलप्रभेच्या दक्षिणतीरानें चाल करीत जालीहाळ-पर्यंत जावें व तेथें शत्रु नदी उतरूं लागेल तर त्यास अडवावें असें ठरलें होतें. पहिल्या तीन टोळ्यांच्या मार्गांत कांहीं विशेष सांगण्याजोगें घडलें नाहीं. चवथी टोळी नदीच्या दक्षिणतीरानें चालली असतां वाटेंत हुलीचें ठाणें लागलें. तिथल्या लोकांनीं पूर्वीं इंग्रज स्वांरांचें बुनगें लुटलें होतें. सबब हल्लीं त्या ठाण्यावर हल्ला होऊन आंतल्या लोकांची कत्तल करण्यांत आली. पुढें जात असतां वाघाचा स्नेही नवलगुंदकर देसाई याचें शिरसंगी हें ठाणें लागलें. त्याही ठाण्याची तीच दुर्दशा करण्यांत आली. नंतर ही फौज जालीहाळ येथें जाऊन पोंचली व वाघाच्या येण्याची वाट पहात बसली.

याप्रमाणें वाघाचा चोहोंकडून कोंडमारा झाल्यावर तो चार दोन दिवसांत फौजेसह मारला जावा व या मोहिमेचा निकाल लागावा असा संभव दिसूं लागला. परंतु वाघाची सद्दी अजून संपली नव्हती ! तो या चारी फौजांच्या हातावर तुरी देऊन निसटून जायचा तो गेलाच ! प्रथम तो नदीपार होण्याकरितां जालीहाळच्या रोखानें आला, परंतु पलीकडे केपर व पटवर्धन बसले आहेत असें पाहतांच तो तसाच नदीतीरानें पुढें चालला. नदी उतरण्याच्या जेथें जेथें जागा आहेत तेथें तेथें त्याचा तपास चालूच होता. त्यांत २४ तारखेच्या रात्रीस दैवानें एकाएकीं त्याला हात दिला ! त्या रात्रीस मलप्रभेचें पाणी अकस्मात् उतरलें, व जालीहाळापासून खालीं बारा कोसांवर बुधिहाळ येथें चांगला उतार झाला. ती बातमी कळतांच वाघ २५ व्या तारखेस दौड करून आला तो सबंध लष्करसुद्धां नदीपार झाला. आणि मोंगलाई मुलखांत शिरून स्वस्थपणानें लुटालूट करीत चालला !

तो उतार वसली व केपर या दोघांसही माहीत होता व तो पटवर्धनांनीं अडवावा अशी त्यांची इच्छा होती. पाणी उतरूं लागलें असें पहातांच केपरसाहेबानें उभयतां पटवर्धनांस सांगितलें कीं, तुम्हीं बुधिहाळ येथें जाऊन तो उतार रोंखावा. गरज लागल्यास मी सुद्धां एका मजलीनें येऊन तुमची कुमक करीन. परंतु तें त्याचें म्हणणें हरिपंत व चिंतामणराव यानीं मान्य केलें नाहीं. त्यांनीं विचार पाहिला कीं, आतां इतक्या रात्रीस ताबडतोब कूच करून बारा कोस जावयाचें. वाघ पंधरा हजार. आम्ही चार हजार. त्यांतही पुन्हां शत्रूला अडवतांना आम्हाला दोन तीन टोळ्या कराव्या लागतील. इंग्रजांना हांक मारावी तर ते रहाणार मागें बारा कोसांवर ! ते येऊन पोचतपर्यंत एखाद्या टोळीवर वाघानें तोंड टाकून ती मटकावली तर इंग्रजांचें काय जातें ? ते आपल्या कामाकरितां वाटेल तो हुकूम करतील, परंतु ऐकणारानें मागचा पुढचा विचार करूनच तो ऐकला पाहिजे ! ही त्यांची विचारसरणी अयोग्य होती असें कोणीही म्हणणार नाहीं. तथापि वाघानें झोला दिल्यामुळें चिरडीला आलेले वसलीसाहेब कोणावर तरी अपेशाचें खापर फोडावें म्हणून तें पटवर्धनांवर फोडतात आणि यांच्याच कुचराईमुळें वाघ पळून गेला म्हणून त्यांना दोष देतात ! असा दोष देणें अगदींच निरर्थक असतांही तो कोणाला द्यायचाच म्हटलें, तर त्याच्या ' प्राप्तीचा अ ब

वांटा' खुद्द वसलीसाहेबांस कां मिळूं नये ? कारण नदीच्या उत्तरतीरास वाघाच्या पाठीवर त्यांचीच टोळी होती. तो नदीवर आला तो त्यांच्याच पुढून आला असला पाहिजे. त्यानीं त्याला कां अडविलें नाहीं ? यांत मर्माचा मुद्दा असा आहे कीं, इंग्रजांजवळ पायदळ तोफांचें सामान मुबलग होतें, पण मोहिमेच्या उद्योगाला भरपूर पुरेसें स्वतःचें घोडदळ नव्हतें. त्यामुळें त्यांचें बळ जागोजाग लटकें पडे. आणि त्यामुळेंच वाघाला पळून जायला वाव सांपडला.

एतावता हातांत सांपडलेली शिकार गमावल्यावर आतां पुन्हां त्या पळत्या बंडखोराच्या पाठीस लागण्याचा उद्योग करणें वसलीबहादुरांस प्राप्त झालें आणि त्यासाठीं ते आपल्या सर्व सैन्याच्या टोळ्या एकत्र करून नदी उतरून ता० २८ रोजीं जालीहाळ येथें दाखल झाले. एक महिन्याच्या परिचयानें इंग्रजांचे रिवाज, शिस्त, धोरण, सैन्याची संख्या व रचना, वगैरे-बद्दल जी माहिती मिळाली ती या सुमारास एका गृहस्थानें लिहून कळविली आहे. ती अशी:—

"वाघाचा मुक्काम मोशी मुद्गल हणमसागर या रोंखास आहे. त्याज-करितां इंग्रजही त्या रोंखास जातात. इंग्रजानीं तीन टोळ्या केल्या आहेत. एक श्री॥ राजश्री बाबासाहेब व चिंतामणराव व केपरसाहेब म्हणून तीन पलटणांसुद्धां. दुसरी टोळी इष्टवेसणसाहेब चार पलटणें व मोंगलाकडील दोन हजार फौज व तुरुपस्वार एक हजार अदमासें. तिसरी टोळी खासे वसली-साहेब. याप्रमाणें तीन टोळ्या पांच कोसांच्या अंतऱ्यानें वाघावर जात आहेत. ( मलप्रभा ) नदीस उतार होता. परवां काल दोन रोज नदीपार जाले. आज कूच आहे. वाघ कांहीं यांचे हातास लागत नाहीं. पृथ्वी प्रदक्षिणेचा विचार आहे ! इंग्रजांचा करार वाघाचें पारिपत्य करावें किंवा आपण मरावें हाच आहे ! नदीवर ( त्यास ) गांठावें असा बेत होता. ईश्वर सानुकूल ! रात्रींत नदीस उतार जाला ! वाघ नदीपार जाला. या उपरी ईश्वरीच सत्ता न कळे ! न होन हातास लागत नाहीं. इंग्रजांसमागमें सामान गोरीं पलटणें तीन म्हणतात. परंतु रवेच्या वेळेस मीं उभा राहून पाहिलीं. दोन अदमासें आहेत. काळे चटेकरी ( बंदुकवाले ) सात आठ पलटणें आहेत. तोफा लहान सफेजंगीच्या दोन शेरी अडतीस आहेत. दिवाळतोड दहा बारा शेरी दोन आहेत. शिवाय घोडे जुंपलेले तोफा आठ आहेत. दूर

तोफेस सहा घोडे. त्यांजवर तीन माणसें एका ओळीच्या घोड्यांवर बसतात. एका ओळीचे तीन मोकळे असतात. शिवाय पाठीमागें रंजक लावणार दरतोफेस दोन असामी घोड्यावर बसोन. शिवाय पुढें निमोणा पाहणार दोन असामी घोड्यावरील. याप्रमाणें दर तोफेस आहेत. याशिवाय दोन पलटणें मोंगलाकडोन आलीं आहेत त्यांत सहा तोफा आहेत. याप्रमाणें पायचें सामान. घोडेस्वार सहाशें तुरुपस्वारांस एक रिजिमिंट म्हणतात. याप्रमाणें चार रिजिमिंटें आहेत. त्यांपैकीं दोन रिजिमिंटें तुरुपस्वार निखालस गोरे आहेत. दोन काळे मुसलमान वगैरे आहेत. घोड्यावरील तोफा आठ सदरीं लिहिल्या आहेत त्या या रिजिमिंटांतील. दर रिजिमिंटास दोन प्रमाणें आहेत. शिवाय मोंगलाकडील दोन अडीच हजार फौज आहे. त्याखेरीज गोखले, बाबासाहेब, चिंतामणराव आपा याप्रमाणें सामान आहे. अकरा असामी मुख्य सरदार इंग्रज आहेत त्यांत हुकूम बसलीसाहेबांचा. कारभारी सर्वाभ्य ( धिक ) आगसाहेब म्हणोन आहे. गोविंदराव, कृष्णराव, व बदामी विष्टापा, त्रिवर्ग ब्राह्मण आहेत. परंतु कोणाकडे काम मसलतीचें नाहीं. मेज म्हणजे सायंकाळच्या जेवणाचें नांव. ते वेळेस सर्व सरदार एक जागां मिळतात तेव्हां मसलत. याप्रमाणें आहे. ”

वसलीसाहेब सपटेंबरच्या तिसऱ्या तारखेस वरील उताऱ्यांत सांगितल्याप्रमाणें तीन टोळ्या करून निघाले ते पांचव्या तारखेस हणमसागरच्या मुक्कामीं मोंगलाई हद्दींत शिरले. आजपर्यंत वाघाचा पाठलाग झाला तो घटप्रभा व मलप्रभा यांच्या दुआबांत झाला. आतां यापुढें पाठलाग व्हावयाचा तो कृष्णा व तुंगभद्रा यांच्या दुआबांत होणार होता. वाघाला निसटून जावयास दोन मार्ग होते. एक मार्ग त्यानें कृष्णा उतरून आपला मित्र सुरापुरकर संस्थानिक याच्या मुलखांत शिरावें. दुसरा मार्ग त्यानें तुंगभद्रा उतरून कर्नूळचे पठाण व दाक्षिणतीरचे पाळेगार यांच्या राज्यांत शिरावें. तेहीं त्याचे मित्रच होते. त्या दोन्ही बाजूंनीं त्यास अडवावें म्हणून वसलीसाहेबानीं स्टीव्हनसनची टोळी कृष्णातीरानें मुद्गल मोसकीवरून चालविली, आपण कनकगिरीवरून तुंगभद्रातीरानें निघाले, आणि या दोन टोळ्यांच्या मध्यें कर्नल केपर यांचीं पलटणें आणि मोंगल व मराठी फौजा घातल्या. याप्रमाणें तीन टोळ्या वाघाच्या पाठीवर जात असतां केपरचीं पलटणें थकून मागें राहिलीं आणि पटवर्धन, गोखले व मोंगल दोन मजला पुढें सरले.

वाघानें शत्रूच्या सर्व टोळ्यांची बातमी चांगली राखली होती. केपरचें पायदळ मागें टाकून मराठे मोंगल पुढें वाढून आले आहेत हें वर्तमान समजतांच तो त्यांचा फन्ना पाडण्यासाठीं उलटून एक मजल मागें आला! त्या दिवशीं म्हणजे सप्टेंबरच्या नऊ तारखेस त्याचा मुक्काम कवतालभनू तालुक्यांत नंदिहाळनजीक पडला. त्या मुक्कामीं त्याच्या लष्करांत दंगा झाल्यामुळें त्यास तेथून हालतां आलें नाहीं. वसलीसाहेबांस त्याच्या हालचालींची चित्तिम बातमी वेळोवेळ कळतच होती. सातव्या तारखेस ते कनकगिरीस होते. तेथें त्यांस काय बातमी कळली असेल ती असो, परंतु तेथून दुसरे दिवशीं निघतांना पायदळ पलटणांस मागें टाकून फक्त दोन हजार तुरुपस्वांर बरोबर घेऊन ते झपाट्यानें चाल करीत बसवापूर येथें आले, आणि नवव्या तारखेस बारा कोसांची मजल मारून सायंकाळीं वाघाच्या मुक्कामापासून सहा मैलांवर यापलपरवी येथें येऊन राहिले. वाघ रात्रीच्या वेळीं पळून जातो कीं काय, या धसक्यामुळें त्यांस रात्रभर चैन नव्हतें!

दहाव्या तारखेस पहांटेच्या प्रहरीं वसलीसाहेबानीं तुरुपस्वांर घेऊन कूच केलें आणि सूर्योदयास वाघाचा तळ गांठिला. इंग्रज चालून येतात ही बातमी त्यालाही समजलीच होती. तो आपलें बाजार बुनगें बंदोबस्तानें रवाना करून लढाईच्या इराद्यानें तळावरच तयार होऊन राहिला होता. इंग्रजानीं येतांच त्यावर हल्ला केला तेव्हां त्यानेंही त्यांवर उलट हल्ला केला. त्यांत पिस्तुलाच्या तीन गोळ्या लागून तो ठार पडला आणि त्याची फौज पराजित होऊन पळून गेली. इंग्रजानी तसेंच पुढें होऊन त्याचें बाजार बुणगें गांठलें आणि तें सर्व लुटून घेतलें. 'उद्यां सकाळीं मी वाघावर चालून जातों, तुम्ही ताबडतोब निघून यावें,' असा आदल्या रात्रीस वसलीसाहेबानीं मराठे व मोंगल यांस निरोप पाठविला होता. त्याप्रमाणें ते लढाई आटपल्यावर दहा बारा घटका दिवसास येऊन पोंचले. त्यानीं पाठलागाचें काम पुढें चालू ठेवून सायंकाळपर्यंत वाघाचे लोक टोळ्या टोळ्यानीं सांपडले तेथें तेथें त्यांचा विध्वंस केला. त्या पाठलागांत वाघाची कलावंतीण व भाचा अशा दोन महत्वाच्या असाम्या सांपडल्या. त्यांत इंग्रजानीं कलावंतीण ठेवून घेतली आणि भाचा बापू गोखल्यांच्या राखणीस घातला. धोंडजी वाघ याचें प्रेत सांपडलें तें

---

[१] वाघाचें बुनगें लुटलें त्यांत त्याचा चार वर्षांचा मुलगा सलाबतखान नांवाचा सांपडला तो इंग्रजानीं पाळला व तो पुढें सव्वीस वर्षांचा होऊन कालऱ्यानें मेला; अशी हकीगत इंग्रजी पुस्तकांतून सांपडते.

वसलीसाहेबानीं माहितगार लोकांकडून ओळखवून ठेविलें होतें, तथापि हरिपंतबाबांच्या फौजेंत वाघाचे जुने मित्र व शत्रु वासुदेव काका पटवर्धन होते त्यांस साहेब मजकूर यानीं तें प्रेत पुन्हां दाखविलें आणि धोंडजी वाघ खरोखर मेल्याची खात्री करून घेतली ! इंग्रजानीं वाघाची कंदुरी केलेली डोळ्यानीं पहावी अशीच काकांच्या प्रारब्धाची योजना होती !

बाळकृष्णपंत भाऊ खुद्द वसलीसाहेबांच्या स्वारींतच होते आणि या लढाईत हजर होते. त्यानीं हा समग्र वृत्तांत लिहिला आहे तो असा—

"वाघ मलप्रहारानदीचे उगमाकडून गोकाक परगण्यांतून येऊन बदामीजवळ नदीपार मलप्रभा होऊन दहा हजार फौजेनिशीं तुंगभद्रा नदीपार व्हावयाकरितां कवताळ मानवीकडे गेला होता. त्याचे पीछावर इंग्रज व सरकारी फौजा व मोंगल जालीहाळानजीक पार जाहले. तेथें कर्नल इष्टवेसण साहेब पांच हजार फौज पलटणें एक टोळी करून कृष्णातीरानें जाहले. व श्री॥ राजश्री चिंतामणराव आपासाहेब व बाबासाहेब व राजश्री बापू गोखले व मोंगल ऐसी एक टोळी आठ दहा कोसांचे अंतऱ्याने जाहले. कनकगिरीच्या सुमारें कर्णेल वसलीसाहेब पांच सहा हजार फौजेनिशीं एक टोळी करून. याप्रमाणें तीन टोळ्या करून दरमजल त्याचे पीछावर आले. फौजांची दाटी पाहून वाघ पांच सहा हजार फौजेनिशीं सडा होऊन आपासाहेब व बाबासाहेब व गोखले व मोंगल यांचे फौजेवर छापा घालावा या बेतानें चालोन भोगानूर येथें आला. वसलीसाहेब याणें कनकगिरीवर सडी स्वारा करून एक हजार दोन हजार तुरुपस्वार आठ तोफा घेऊन बारा कोसांची मजल करून मुक्काम मजकुरास आला. तों वाघाचा मुक्काम तीन कोसांवर आहे ही बातमी कळली. वाघास हे आले हें समजलें नाहीं. पहांटेच्या चार घटका रात्री इंग्रज जाऊन आज सूर्योदयास गेले तों वाघही तयार होऊन उभा होता. लढाई जाली. वाघ तीन गोळ्या लागोन ठार पडला. फौज उधळोन गेली. वाघ पडला हें वर्तमान इंग्रजांस नव्हतें. इंग्रज पुढें चालोन गेले. आम्ही मागें उभे होतों. तों इंग्रजाकडील राजश्री गोविंदराव कारकून व दोन चार माणसानीं उभे होते. मुरद्याची ओळख पुरेना. आम्हांस सांगून पाठविलें. त्यावरून आम्ही व राजश्री बिष्टोपंत बदामीकर मिळोन तेथें गेलों. तों वाघ खरा. मुर्दा घोड्यावर घातला. इतक्यांत वाघाकडील पठाण करोल मिळोन एक

हजार पालखी घेऊन त्यास न्यावयाकरितां चालोन आले. आम्हांजवळ शंभरपर्यंत स्वांर होते. गोळागोळी जाली. मुर्दा न्यावा व आम्हांसीं गांठ घालावी हा त्यांचा बेत होता. परंतु स्वामीचे कृपेकरून तें परिहार होऊन मुर्दा घेऊन सांभाळोन ती जागा तोफेचे दोन गोळेचे सुमारें सोडोन आलों. तों इंग्रजाकडे सांगोन पाठविलें होतें व गोळीचे आवाज त्यानीं ऐकिलेवरून वसलीसाहेब फिरोन आला. मुर्दा पाहोन बहुत खुषी जाहला. इतक्यांत आपा-साहेब बाबासाहेब व बापू गोखले व मोंगल फौजेसह येऊन पोंचले. वाघाची टोळी जमून उभी होती ती हे पाहतांच निघाले. त्यांचे पीछावर या फौजां-पैकीं कांहीं फौज गेली. नंतर सारे जमून मुक्काम मजकुरास मुक्कामास येऊन राहिले. ”

धोंडजी वाघाच्या मुर्द्याची शहानिशा इतक्या जाहीर रीतीनें करून तो खरोखरच मेला अशी सर्वांची खातरजमा करण्यांत वसलीसाहेबांचा उद्देश पुन्हा कोणी धोंडजीचें नांव पुढें करून असलें खूळ माजवूं नये हा होता. परंतु त्यांचा तो उद्देश सफळ झाला नाहीं. कारण पुढें सहा महिने झाले नाहींत तों मींच धोंडजी वाघ असें मुलखांत सांगत फिरणारा एक इसम फकिराच्या वेषांत प्रकट झाला ! या नवीन धोंडजीचाही वध करण्याचें श्रेय इंग्रजांसच लाभलें. तो तोतया सन १८०३ मध्यें चार हजार फौज मिळवून जालिहाळपासून हणमसागरपर्यंतच्या टापूंत मोठा धुमाकूळ घालीत फिरत असतां त्या सालच्या दिसेंबरांत त्यावर मेजर जनरल क्यांबेल याच्या फौजेनें येऊन छापा घातला, व त्यास मारून त्याच्या बंडाचा विध्वंस केला. त्या वृत्तांताचा उल्लेख पुढें योग्य स्थळीं करण्यांत येईल. असो.

कर्नल वसलीसाहेब बहादुर यानीं धोंडजी वाघ याचा पीछा पुरवून त्यास कसें जमीनदोस्त केलें याचा वृत्तांत हा असा आहे. हा वाचून त्यांचा अलोट पराक्रम, दीर्घोद्योग, आणि सर्व गोष्टींची तरतूद ठेवण्याची तत्परता, याविषयीं मनांत जी गौरवबुद्धि उत्पन्न होते तिला अगदींच विरजण घालणारी या लढाईच्या कथेची दुसरी बाजू आहे ती सुद्धां वाचकांस सादर करणें आमचें काम आहे. लढाईनंतर खुद्द हरिपंत बाबानीं पत्र लिहिलें आहे, त्यांत असा मजकूर आहे--

“ मंगळवारीं ( ९ सपटेंबर ) चार पांच हजार पठाण वाघाकडील उठोन गेले होते. व बुधवारीं लढाईचे वेळेस झोटिंग काकर पांच सात हजार राउतांनिशीं पळून गेला. जोती घोरपडाही गेला. मंगळवारीं फौजेचें धरणें

बसलें होतें. कूच होऊं दिलें नाहीं. त्यानें वाघास दगा जाला." "हजार पांचशें जमियत राहिली त्यांनिशीं वाघानें चालून घेतलें. परंतु इंग्रजांचा मार भारी. ते समयीं धोंडजी वाघास दहा गोळ्या लागोन ठार जाला."

या वर्णनावरून लढाईचा वृत्तांत खरोखर घडला तो असा दिसतो—वाघाच्या फौजेंत इंग्रजानीं अथवा मोंगल मुत्सद्यानीं—अथवा दोघानीं मिळून म्हणा-फितूर केला होता, आणि त्याच्या फौजेंतले पठाण व मुख्य सरदार झोटिंग व घोरपडा हे सारे अनुकूल करून घेतले होते. आम्ही ९ तारखेस वाघाला अडवून बसवितों, तुम्ही जलदीनें निघून या, असा या फितुरी लोकानीं वसलीसाहेबांशीं पूर्वींच संकेत ठरविला होता. त्याप्रमाणें ठरलेल्या दिवशीं त्यानीं सायंकाळपर्यंत वाघास अडवून बसविलें. सायंकाळीं पांच सात हजार पठाण वाघाला सोडून गेले. दुसरे दिवशीं लढाईच्या वेळेस इंग्रज दिसूं लागले न लागले तोंच झोटिंग व घोरपडा वाघाला दगा देऊन आपापल्या फौजांसह पळून गेले. वाघाच्या पंधरा हजार फौजेची याप्रमाणें वारासार झाल्यावर तो अगदींच हलका पडला. सारे हजार पांचशें लोक त्याजवळ राहिले. तथापि नांवाप्रमाणें करणी करून दाखवणारा तो नरशार्दूल तेवढ्याच लोकांनिशीं इंग्रजांवर चालून आला. इंग्रज केवळ दोन हजार होते तरी त्या स्थितींत वाघाचा पराजय करणें त्यांना कांहींच जड गेलें नाहीं हें साहजिकच आहे. लढाईंत वाघ मारला गेला आणि त्याच्या फौजेची दाणादाण झाली.

हा वृत्तांत खरा न मानावा तर वाघाजवळ दहा पंधरा हजार फौज असतां त्याला गांठण्यासाठीं वसलीसाहेब फक्त दोन हजार तुरुपस्वार घेऊन इतक्या तांतडीनें धांवत आले ते कोणत्या दमावर? या प्रश्नाला उत्तर मिळत नाहीं. ते तसेच बांके सरदार होते, त्यांना वाघ कसपटाप्रमाणें वाटत होता, एक इंग्रज वाघाच्या दहा स्वारांना भारी आहे अशी त्यांची खात्रीच होती, आणि म्हणूनच त्यांनीं हें साहस केलें, असें म्हणावें तर हें साहस यापूर्वीं करायला त्यांना कोणी नको म्हटलें होतें? या शंकेचें समाधान होत नाहीं. तात्पर्य, फितुराची उपपत्ति खरी मानल्यावांचून हा वाघाच्या मृत्यूचा ग्रंथच मुळीं नीट बसत नाहीं. निजामअल्लीचा एक प्रमुख कारभारी मीर अलम हा हैदराबाद सोडून यावेळीं युद्धक्षेत्रांत कोपळ येथें येऊन बसला होता, ही गोष्टसुद्धां फितुराच्या उपपत्तीला अत्यंत पोषक आहे.

ही फितुराची कल्पना मनांत आली म्हणजे वाटर्लूची लढाई मारणारे जगद्विख्यात विजयी वीर वसलीबहाद्दर यानीं एवढ्या तडफेनें दौड करून वाघास गांठलें आणि मारून टाकलें; या भव्य आणि रम्य कथेचें--उपाध्येबुवानीं मुहूर्त चुकेल म्हणून धांवपळ करीत येऊन लग्नमंडप गांठला आणि नेमलेल्या वेळीं लग्न लावून दक्षिणा मिळविली--या क्षुद्र कथेशीं सादृश्य दिसूं लागतें !

आम्ही अशी टवाळी केलेली ऐकिली आहे कीं–विलायतचे बडे–फारच बडे–पाहुणे संस्थानांत येतात तेव्हां संस्थानिक लोक त्यांच्या कर्मणुकीसाठीं वाघाच्या शिकारीचा समारंभ करितात. ते आदल्या दिवशीं शिकारखान्यांतला एक भला मोठा वाघ जंगलांत नेऊन झाडाला साखळदंडानें बांधून ठेवितात आणि दुसऱ्या दिवशीं पाहुण्याला तेथें नेऊन त्याजकडून तो मारवितात ! ! नंतर नाकाच्या टोंकापासून शेंपटाच्या टोंकापर्यंत वाघाची लांबी किती, उंची किती, तो कुणीकडून आला, कसा गेला, पाहुण्यानीं कसें अचूक निशाण मारलें, कसें धाडस केलें, इत्यादि प्रकारांचीं छानदार चित्रें व गुलजार वर्णनें हे संस्थानिक वर्तमानपत्रांत छापवितात ! ! ! ही उघड उघड टवाळीच आहे. ती कोणीच खरी मानीत नाहीं. परंतु वसलीसाहेबांनीं वाघ मारिला यांत मात्र असलाच कांहीं तरी सावळागोंधळ झालेला आहे याबद्दल आम्हांस बिलकुल संशय नाहीं !

वाघाच्या बंडाचा विध्वंस झाल्यावर वसलीसाहेब परत फिरले ते दहा बारा दिवसानीं कोपळास आले. तेथें बापू गोखले व चिंतामणराव आपा यानीं इंग्रजांचा निरोप घेतला. गोखले नवलगुंदास गेले आणि चिंतामणराव आपा लक्ष्मेश्वरास गेले. हरिपंतबाबा मात्र इंग्रजी लष्कराबरोबर राहिले. इंग्रज परत जातांना सावनुराकडून जातील; तो प्रांत आपला आहे; सबब तेथून निघून ते आपल्या हद्दींत जातपर्यंत त्यांबरोबर असावें; असा हरिपंतबाबांचा विचार होता.

हें वाघाचें प्रकरण समाप्त करते वेळीं यांतील कथेच्या नायकाविषयीं कांहीं अवांतर माहिती येथें नमूद करून ठेवितों. धोंडजी वाघ याचें मूळ आडनांव पवार असें आहे. याच्या बापाचें नांव कोठें पिराजी तर कोठें गंगाजी असें म्हटलें आहे. हे वाघ वाघझरी नांवाच्या गांवाचे वतनदार पाटील होते. मूळ आडनांव पवार असतां यांस वाघ हें आडनांव पडण्याचें कारण असें सांगतात कीं, धोंडजीचा पूर्वज शिदोजी व त्याचा भाऊ बहिरजी हे विजापूरच्या बादशहाच्या पदरीं शिलेदार होते. एकदां बादशहास वाघिणीचें

दूध मिळवण्याची इच्छा झाली. तेव्हां या पवार शिलेदारानीं जंगलांत राहून मोठा प्रयत्न व हिंय्या करून दुभती वाघीण पकडली आणि बादशहापुढें नेऊन हजर केली. बादशहा खूष होऊन काय पाहिजे तें मागा असें बोलले. तेव्हां आम्हांस कांहींतरी किताब मिळावा असा यानीं अर्ज केला. त्यावरून त्यांस बादशहांनीं वाघ हाच किताब वंशपरंपरागत करून दिला.

धोंडजीचा सारा जन्म बंडें व धामधुमी करण्यांत गेला. त्याच्या दंगेखोरपणाबद्दल टिपूनें त्यास दोनदां कैदेंत घातलें. एकदां चार वर्षें व एकदां सहा वर्षें. दुसऱ्या खेपेस तूं मुसलमान हो, तुला सरदारी देतों, असें टिपू सांगत असतां तें त्यानें मान्य केलें नाहीं; सबब टिपूनें यास जबरीनें मुसलमान करून कैदेंत ठेविलें. असा हा मारून मुटकून धर्मांतर करविलेला धोंडजी मरेपर्यंत नांवाचा मुसलमान व मनाचा हिंदु असाच राहिला. मरणाच्या वेळीं याचें वय पंचावन व पांसष्ट वर्षें यांच्या दरम्यान असावें. याबद्दल आणखी माहिती नं. ५७८० च्या लेखांत पहावी.

---

नं. ५६२१ श्री. ( आषाढ शु० ७–२९जून )

सेवेशीं गोविंद वासुदेव. चरणावर मस्तक ठेवून शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ०६ सफर रोज सोमवार पावेतों स्वामींच्या कृपेकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्री॥ राजश्री बाबासाहेब यांचा मुकाम फौजसुद्धां मौजे नागनूर प्रांत लोकापूर (?) येथें आहे. चार हजार फौज बरोबर आहे. राजश्री धोंडोपंत गोखले यांचा मुक्काम मौजे मुगद प्रांत धारवाड येथें आहे. पावलोकसुद्धां दहा हजार फौज आहे. कित्तूरकर देसाई ही बरोबर आहे. श्री॥ राजश्री चिंतामणराव आपांसह तेथें आहेत. धोंडजी वाघ मिश्रीकोटावर आहे. बराबर स्वार बारा हजार, शिवाय पावलोक व पाळेगार कनकगिरीकर व सुरापूरकर आहेत. जमाव तीस हजार सुमारें आहे. गोखल्यांस व वाघास तीन कोसांची तफावत आहे. दोन चार दिवसांत उभयतांचें तोंड लागणार आहे. वाघाचा दम भारी आहे, इंग्रज तुंगापार होऊन परगणे हावनूर येथें आठ पलटणें आलीं आहेत. राजश्री बाळकृष्णपंत लागू तुंगेच्या पलीकडे हरिहरासमीप इंग्रज होते, त्यास राजश्री विष्टपय्या बदामीकर याच्या विद्यमानें "( आम्ही तुम्हांस ) दोन लाख रुपये द्यावे. ( तुम्ही ) सावनूरप्रांत सावनूरसह वाघाचीं ठाणीं पडलीं आहेत तीं घेऊन द्यावीं" याप्रमाणें करार करून आठ पलटणें तुंगेच्या अलीकडे आलीं आहेत. आणखी वरचेवर जमा होतात. श्री॥

राजश्री बाबासाहेबांस इंग्रज यांचें पत्र आलें आहे जे, तुम्ही कृष्णापार न होतां इकडे यावें. आम्हीं व तुम्हीं मिळून वाघाचें पारिपत्य करून वाघाचीं ठाणीं बसलीं आहेत तीं आपलीं ठाणीं बसवून मग आपलें राज[1]कारण थोरलें आहे त्यास मदत येतों. याप्रमाणें लागू याणीं तेथें करार ठरवून पत्र पाठविलें आहे. मिश्रीकोट यादवाडकरांचें ठाणें होतें तेथें वाघानें ठाणें घातलें आहे. श्री॥ राजश्री आपासाहेब यांचा मुक्काम मौजे मटुचनगले (?) येथें आहे. बराबर हजार फौज आहे. ... ... सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६२२ ( आषाढ शु० ८–३० जून. )

विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन यांचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र छ० ७ सफरचें—

" वडि[2]लांचें लष्कर व रा॥ धोंडोपंत गोखले यांचें लष्कर रुद्रापुरावर होतें. तिकडून वाघानें फार चढाई केली याजकरितां दोन्ही लष्करें मलप्रभा उतरून कित्तुरास गेलीं. पुढें कोणती मसलत ...ती पहावें."

नं. ५६२३ श्री. ( आषाढ शु० ८–३० जून. )

ती॥ राजश्री का[3]का वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें चिंतामणीनें शिर सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० ७ सफर इंदुवासरे दोन प्रहर पावेतों मु॥ हल्याळ येथें वडिलांचे आशीर्वादें वर्तमान क्षेम असे. विशेष. भृगुवारीं कित्तूरचे मुक्कामीं असतां इकडील छबिन्याचे लोकांवर वाघाकडील फौजेचा मोकादमा जाल्याची विनंती पेशजी लिहिली होती. मंदवारीं हुबळीहून कूच करून मिश्रीकोटावर आल्याची आवई घालून गरग म्हणोन गांव कित्तुरापासून दोन कोसांवर आहे तेथें ( वाघ ) मुक्कामास आला. रविवारीं चालोन येणार अशी बातमी समजली. तेव्हां अंदेश पाहतां–पाण्याचा अगदीं तोटा, तेथें राहिल्यानें परिणाम नाहीं, हल्पाळास इंग्रजांकडील पलटणें आहेत तेथें जाऊन मनसबा करून पुढील कर्तव्याचा विचार करावा, या बेतानें रात्रौ मध्यरात्रीस कूच करून चालते जालों. रविवारीं पांचवे तासाचे सुमारें चार कोश आलों. झाडीच्या अडचणींत ओढा होता तो उतरून अलीकडे आलों. पाठीमागून बुणगें व तोफा येई तोंपर्यंत उभे राहिलों. बुणगें तोफा येऊन चालत्या जाहल्या. इतक्यांत वाघाकडील जमाव आला. चार घटकांपर्यंत लढाई

---

१ करवीरचें. २ चिंतामणराव आपांचें. ३ बाळासाहेब मिरजकर.

जाली. दोन तीन वेळ तिकडील लोकांस मोडून माघारे घातलें. फिरून तिकडील लोकांनीं चालोन घेतलें. तेव्हां एक नाकावर तरवारेची जखम व उजवे बरकडीस भाल्याची जखम लागली. खैर आहे. धोंडोपंत यांचे पुतणे राजश्री बापू यांस कराचलीची जखम कपाळावर उजवे डोळ्याजवळ लागली. दुसरे पुतणे आपा ठार जाले. राजश्री धोंडोपंताचें ठिकाण नव्हतें, त्यास आतांच वर्तमान धारवाडास जाऊन पोचल्याचें आलें. दोन जखमा आहेत. खैर आहेत. लढाईचे वेळेस बुणग्याबरोबर लोक व पायदळ गेलें. कांहीं लोक होते त्याणीं धर सोडिला. उभे राहीनात. तेव्हां संभाळून अलीकडे येऊन दम खावून हुशारीनें येथें येऊन पावलों. इकडील लोक ठार व जखमी बहुत जाहले व दहा पांच घोडींही पाडाव गेलीं. वरकड सामान जामदारखाना डेरे राहुटयांसुद्धां बचाव जाहला. ठार व जखमी यांची नांवनिशी मागाहून सेवेसीं लिहितों. त्याणीं पाठीमागून लगट करून येथून कोशावर आले होते. इंग्रजांकडील मुख्यास सांगोन तोफा सुरू करविल्या. त्यांजकडील दोन तीन असामी ठार जाहलेनंतर ते माघारे निघोन गेले. इतकें होई तोंपावेतों दोन तास दिवस राहिला. विप्रमंडळीपैकीं बाळाजी तुकदेव यांचें ठिकाण नव्हतें. आज प्रातःकाळीं माणसें पाठविलीं होतीं. जखमा लागोन त्या ठिकाणीं पडला होता. त्यासही आणविला. भले लोकांपैकीं पांच चार असामींचें ठिकाण नाहीं. माणसें शोधास गेलीं आहेत. इंग्रजांनीं ठाण्यालगत राहण्यास जागा दिली आहे. आंत गेलों होतों. जखमा इंग्रजानें पाहिल्या. पट्टी बांधली आहे. श्रीकृपें वडिलांचे आशीर्वादें निभावून आलों. इंग्रजांकडील बोलणें खंबीर आहे. त्याणीं हरिहरास सुभा आला म्हणजे कसें असेल तसें पाहूं असे बोलले आहेत. (वाघ) आणखी तयार होऊन येणार अशी आवई आहे. होईल तो मजकूर सेवेसीं लिहितों. धोंडोपंत गोखले व आम्ही एक जागां जवळ होतों. इकडील लोकांनीं फारच चांगली केली. लढाई बिघडली. श्रीइच्छा प्रमाण ! प्रहरभर ओढ्याजवळ सर्व बसलों याजमुळें शत्रूची गांठ पडली. नाहीं तर गांवाजवळ सारे येतों. आसरेस त्याची काटगिरी व्हावयाची नव्हती. वाघ भारी जमावानें आला याजमुळें गोखले याणीं समजून इंग्रजांचे आसरेस येऊन मुक्काम करावा हें समजोन निघालों. परंतु ईश्वरनिर्मित चुकत नाहीं ! राजश्री आनंदराव लागू सुखरूप आहेत. त्यांचे घरीं कळवावें. हे विज्ञापना.

---

१ बातमी खोटी.

नं. ५६२४ श्री. ( आषाढ शु.० ९—१ जुलै )

पै ॥ छ. १० सफर इहिदे मय्यातैन.

सेवेशीं[1] विनंती. सेवक श्रीपति भावे. कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० ८ माहे सफर रोज मंगळवारापर्यंत स्वामीचे कृपें करून क्षेम असे. पत्र पाठविलें तें शिरसा वंदून सनाथ जाहलों. वरचेवर वर्तमान लिहिणेंविशीं आज्ञा, ऐसीयास श्री ॥ राजश्री चिंतामणराव आपासाहेब व गोखले कित्तुरास होते हें वर्तमान ऐकोन वाघ हुबळीहून कूच करून मिश्रीकोटावरून गरगास येऊन छ० ५ सफरीं दाखल झाला, हें वर्तमान ऐकोन श्रीमंत व गोखले छ० मजकुरीं रात्रीं कूच करून हल्याळाकडे रवपाडून निघोन चालले. वाघानें बातमी पक्की राखून गरगाहून कूच रात्रीं करून पाठलाग करून दहा बारा हजार फौजेनिशीं जाऊन हल्याळाजवळ जाऊन खुद्द गोखलेस गांठलें. नंतर उभयतांची लढाई मातबर जाहली. इकडे शेंदोनशें ठार जाले. तिकडे शेंदोनशें ठार जाले. जखमी उभयपक्षीं मनस्वी जाहले. खुद्द धोंडोपंत गोखले व त्यांचे पुतणे आपासाहेब धारातीर्थी स्वर्गस्थ जाहले. श्री॥ राजश्री चिंतामणराव-आपा व बापूसाहेब गोखले उभयतां पुढें गेले होते ते हल्याळ सांबराणीस जाऊन राहिले. इकडे लढाई संपल्यानंतर वाघ हल्याळपर्यंत पाठलाग करून गेला. हल्याळकर याणीं तोफा डागल्या हें पाहून वाघ माघारा कित्तुरास येऊन राहिला. स्वामींस विदित होय. ठाणें दोडवाड येथील जाबसालास माझे स्नेहस्थ ( वाघाच्या ) लष्करांत आहेत त्यांजकडे कारकून पाठविले आहेत. तेथें जाबसाल लागला आहे. त्यांचें म्हणणें आहे कीं, एकसाली आकार आम्हांस देणें. म्हणजे ठाणें तुम्हांकडे ठेऊं म्हणतात. त्यांची नजर भारी. गरीबी बोलणें दृष्टीस भरत नाहीं. ऐसे विचार आहेत. साहेबीं यास काय आज्ञा करणें ती करावी. इकडील अर्थ मागाहून होईल तो लिहून पाठवीन. बहुत काय लिहिणें. वरकड सविस्तर मजकूर राजश्री देवरावजी देशपांडे यानीं लिहिला आहे त्यावरून विदित होईल. हे विज्ञापना.

नं. ५६२५ श्री. ( आषाढ शु० ९—१ जुलई. )

पै॥ छ० ८ सफर इहिदे मय्यातैन. भौमवार.

मुष्पख महरबान बाळासाहेब दामाहेबतहू—

अजी दिलयेखलास डास साहेब. कपितान. सलाम. आंकी

---

१ पत्र बाळासाहेबांस दोडवाडाहून. २ वाघाची.

येथील खैर खुशी ता॥ छ० ८ सफर जाणोन आपली कलमी खैर करीत जावी. दिगर आपण पत्र पाठविलें तें पावलें. "आपले कडील तालुकेस उपद्रव लागणार नाहीं म्हणोन दोन पत्रें आलीं. पंधरा दिवस मालगांवीं मुक्काम होऊन इकडील तमाम तालुक्यांत खंडण्या घेऊन कही करून कडबा नेला. आणखी तेथेंच मुक्काम आहे. तालुक्यास उपद्रव होऊन प्रांताची खराबी जाहली. त्यास याउपर लष्करचें कूच होऊन तालुक्याची खराबी न होय तें करावें." म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशियास खंडण्यांचा मजकूर तर आम्हाकडून रोखा पत्र होत नाहीं. कहीकबाड तंव सरकारचे बैलांस कडबा आणावाच लागतो. पहिलेपासून शिरस्ता आहे जे कडबा व सर्पण द्यावेंच लागतें. खंडणी मराठेकडून होती. मालगांवाहून कूच जलदीच होईल. ज्यादा काय लिहिणें हे किताबत.

नं. ५६२६ श्रीगणराज. (आषाढ शु० १०–२ जुलई.)

राजश्री[1] केसोपंत गोरे स्वामी गोसावी यांस. विनंती उपरी.

खासगीकडील यादी पुण्यांतील सदाशिव पेठेंतील जागा व बुधवारांतील दुकान गंगाधरराव यांजकडे असावें व काळ्यांचे घराजवळची जागा उभयतांकडे असावी असें कलमीं लिहिलें आहे.

थोरले यादीस वाडा व पागा चिंतामणराव आपांकडे असावी. पागेस वाड्यास लागवड लागेल ती चिंतामणराव आपा याणीं लावावी. आमची स्वारी पुणियास गेली असतां वाड्यांत उभयतांनीं रहावें, असें कलम यादीस आहे. व घोरपडीची बाग चिरंजीवाकडे असावी.

दोन कलमें यादीचीं लिहिलीं आहेत. हा अन्वय राजश्री धोंडो बापूचे पत्रांत यावा. रवाना छ० ९ सफर. धोंडोपंतांचें पत्र पाठविलें आहे. त्याजवर सदरहू कलमबंदीप्रमाणें लिहोन पाठवावें. 'गणराज' करून पाठवून देतों. रवाना छ० मजकूर हे विनंती.

नं. ५६२७ श्रीगणराज. (आषाढ शु० १०–२ जुलई.)

पै॥ छ० ९ सफर सन इहिदे मय्यातैन. आषाढ.

विज्ञापना. रा॥ मोरोपंताकडून कागद[2] आल्याच्या नकला पाठविल्या

---

१ चिठी गंगाधरराव गोविंद यांच्या हातची. २ पत्र कुरुंदवाडाहून रघुनाथरावदादाचें मिरजेस बाळासाहेबांस.

त्या पावल्या. रा॥ मोरोबादादा आल्याचें लिहिलें, त्यास आपलें पत्र आलें पाहिजे म्हणोन राजश्रीनें लिहिलें आहे; त्यास पत्र जावें. माझे नांवचेंपत्रही पाठवावया आज्ञा जाली पाहिजे. रा॥ बळवंतराव यांस आज्ञा जाल्याप्रमाणें राजश्रीनीं सविस्तर सांगितलें. आज्ञेप्रमाणे येतों. पुण्याकडून आरब येतात त्यांपैकीं दोन तीनशें आरब ठेविले पाहिजे. जलचरास[1] चकती आली, त्यास जलचराचें लक्ष क्षुद्र[2] अन्वेषण करावें. बातमी रातबिरात पक्की असावी. चिरंजीव रा॥ रामचंद्रपंत आपाकडून कांहीं काटक[3] येणार अशी जनवार्ता. त्यास हजारपावेतों येणार. त्यास आल्याचें वर्तमान ल्याहावें. चिरंजीव रा॥ चिंतामणराव आपा गोखल्यांसमागमें आहेत. त्यास सर्वही मतलबी. त्याहीपेक्षां जलचर[4] महासाधक. चिरंजीवापाशीं कोणी बुजरुख नाहीं. त्यास इंग्रज व रा॥ बाळकृष्णपंत वाघाचे पारिपत्यास जाणार. चिरंजीवास दोन गोष्टी आपण थोरपणाच्या लिहिणार. इहीमुळें इंग्रजांचा कोण येणार त्याजकडून लिहिवितील. त्याचें उत्तर दस्ता ऐवज सरकार दौलतीस अपाय होईल असें लिहूं नये, अशीं उत्तरें जावीं. नाहींतर ते साधक. कागदांत लिहितील येक, व अर्थाचे अनर्थ होतील ! वरकड सर्व कृति श्री गजाननाचे स्वाधीन ! कोणी करितों म्हटल्यानें होत नाहीं. नको म्हटल्यास रहात नाहीं ! होणार होतच आहे. परंतु विचारास आलिया सुचवावें, ल्याहावें, ठेऊं नये. पुण्यास पयादरपया वर्तमानास पादचारी जावे. वर्तमान येत जावें. चिलमी वर्तमान मिरीचीच्या[5] सनदा श्रीमंतानीं श्रीमंत रा॥ चिमाजीआपास करून दिल्या असें बोलतात करवीरीं. रवाना छ० ९ सफर. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. ५६२८ श्री. (आषाढ शु० ११–२ जुलै.)

सेवेशीं गोविंद वासुदेव चरणावर मस्तक ठेऊन शिर सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १० सफर रोज गुरुवार पावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री धोंडोपंत गोखले यांस हल्याळ सांबराणीकडे हावनुराहून इंग्रज मिळावयाकरितां येत होते. ती बातमी राखून धोंडजी वाघ याणें फौज सुद्धां तयार होऊन इंग्रज दोन पलटणें येत होतीं

---

१ शिंद्याच्या पलटणांवरचा सरदार डाससाहेब यास पुण्याहून त्याच्या वरिष्ठाकडून. २ छिद्र. ३ कानडे प्यादे. ४ वसली. ५ भांग्या मारुतीजवळचें । दरबारी, बाजारी, भटी, चिलमी, हे वर्तमानांचे प्रकार । ६ मिरजेच्या.

त्यांजवर जाऊन पडला. त्यांस व यांस लढाई जाली. शेंपन्नास मनुष्यवाघाकडील जायां जखमी जालें. इंग्रजांकडील शेंपन्नास मनुष्य कापून काढलें. इंग्रज सांभाळून माघारे गेले. तशीच वाघाची स्वारी गोखल्यावर येऊन पडली. त्यास व यास लढाई होऊन गोखल्याकडील फौज मोडिली. बुनगें तोफखाना व हत्ती वगैरे सलतन लुटलें. सडी फौज झाडींत शिरली आहे. गोखले खुद्द लढाईंत ठार पडले. डोचकें कापून वाघानें आणिलें असे. सविस्तर पक्कें वर्तमान सेवेशीं लिहून पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६२९ श्री. ( आषाढ शु० ११–३ जुलई. )

पै ॥ छ० १० सफर इहिदे मय्यातैन. आषाढ.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब. साहेबांचे सेवेसी–आज्ञाधारक मुसांइस्मित[1] कपितान बंदगी सलाम. विनंती विज्ञापना ऐसी जे, साहेबांचे पायांजवळ येऊन नौकर जाहालों तेव्हां साहेबांचे हातून वस्त्रें घेतलीं. तेव्हां एकनिष्टपणें नौकरी करवीरावर केली ती श्रीमंत रा॥ नारायणराव साहेबांस ठाऊक आहे. निमकहलाल केली कीं नाहीं ? आमचे फिरंगीचे दस्तूर पहिला खुदा, दुसरा धणी; हें वोळखून नौकरी करितों. तिसरे जातवाले आम्ही कांहीं वोळखत नाहीं. आपलें इमान राहिल्यास जात व परजात सारखीच आहे. आम्हां श्रीमंत रा ॥ दादासाहेबांशीं अंतर करणार असतों तर मिरजी रुपये कबूल केले नसते. आम्ही दृष्ट दिली कीं, बार चार दिवस गुजराण करावें. चार रोज सगळी भाकर खादली, बार चार रोज अर्धी भाकरी खाऊन पायांजवळ गुजराण करावें. आधीं ऐकलें होतें कीं, श्रीमंत रा॥ दादासाहेब वचनीक खरे. ऐसें ऐकत होतों. परंतु हीं गोष्ट खरी यांत तफावत नाहीं, परंतु दृष्टीनें पहात नाहीं ! व कानेंकरून ऐकितात यावरी चौकशी करीत नाहींत ! यामुळें खराबी होती. ईश्वरें दौलत दिली म्हणोन गाफील असों नये. आपली व पराची चौकशी करून जें करणें तें करावें. जो घरचा इतबारी असतो तोच दगलबाज असतो. परावें माणूस बहुत भिऊन चालत असतें. आपला म्हणोन गाफील असों नये. आम्ही कुरुंदवाडीं रा॥ गणपतरावजींचे हुकुमावर एक कंपणी हजीरीस्तव गेलों होतों. तेव्हां खर्चास्तव बोलतां बोलतां आमचा व रा॥ गणपतरावजींचा तंटा

[1] कुरुंदवाडकर रघुनाथराव दादा यानीं पलटण चाकरीस ठेवलें होतें त्यावरचा सरदार.

वाढला. कां म्हणाल तर आम्ही कांहीं बोलावें तर त्याणें दुसरे प्रकारचें बोलणें श्रीमंतांशीं करावें. कां म्हणाल तर श्रीमंतांची व आमची गांठ पडल्यास पोटं[1] बाहेर पडेल ! यास्तव श्रीमंत दादासाहेबांची व आमची मर्जी खट्टी केली. आम्ही निघतेसमयीं पानाचा विडादेखील दिला नाहीं ! आम्हांशीं चोरा प्रमाणें केलें ! बरं ! असो. रा॥ गणपतरावजींचें लक्षण म्हणाल तर येक दिवसांत गोष्टी कराव्या. त्यांची निभावणी करणार ईश्वर आहे. आपण श्रीमंत. आपले मार्फतीनें तैनातजाबता दर असामीस रुपये ११ द्यावे. त्यामध्यें रुपये आठ पावले. त्यास आज तागायत आमचे सरकारचे रुपये तेवीस हजार रा॥ गणपतरावजीनें श्रीमंत रा॥ दादासाहेबांचे नांव करून घेऊन बसला आहे. हे रुपये श्रीमंत राजश्री दादासाहेबांस पावले तर आम्ही खुशी असतों. परंतु त्यांणीं इतका ऐवज घेऊन आम्हांमधें बेबनाव केला. हा ऐवजाचा भरणा येक दिवशीं बाहेर निघेल म्हणून आम्हा त्यांमधें विकल्प घालून आम्हांस श्रीमंत रा॥ दादासाहेबांस भेट न होतां रवाना केलें ! आपण श्रीमंतानीं चौकशी करावी कीं, हे रुपये आम्ही नौकरानीं खादले किंवा श्रीमंतांकडे राहिले ? हा मधींच घेऊन बैसला तेव्हां निमकहरामी कोण हें पुर्तेपणें चौकशी करावी. आपण म्हणाल कीं, तेवीस हजार रुपये कैसे खादिले ? त्यास त्याचा तपशीलवार ( हिशेब ) आम्हांकडे आहे. आम्हांस याप्रमाणें खराब करून रवाना केलें ! बरें ! असो. श्रीमंत रा॥ दादासाहेबांचें नांव घेऊन पुणेंस जाणार आहों. आपण श्रीमंत आहेत. मेहेरबानगी असों द्यावी. कामकाज पडल्यास याद करावी. नौकरीस चुकणार नाहीं. आम्ही फिरंगी लोक इमानी. पुर्तेपणें वोळखून ठेवणें. विशेष बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे विज्ञापना.

नं. ५६३० श्री. ( आषाढ शु० ११–३ जुलई. )

सेवेसी धोंडो अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १० सफर यथास्थित असे विशेष. गोखले यांची व वाघाची लढाई कित्तुराहून पुढें लढाई जाली. गोखले कूच करून हल्याळाकडे जात होते तेव्हां वाटेंत वाघाची व गोखल्याची गांठ पडली. वोढा होता तेथें थोरली तोफ मोडून पडली. तेथें गोखले होते. इतक्यांत वाघानें येऊन गांठलें. नंतर लढाई फारच जाली. दोहींकडे हजार दोन हजार जखमी ठार जाले. नंतर गोखले यांचा मोड जाहाला. बातमीस गेले ते लुटून घेऊन येतात. वाट चालत नाहीं.

---

१ पोटांतलें, मनांतलें. २ पत्र रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस अनगोळाहून.

पुढें जावयास हुबळीपर्यंत जातात. नदीपर्यंत ठाणीं वाघाचीं पडलीं दक्षिण तीरास. उत्तर तीरास मात्र देसाई यांचीं ठाणीं आहेत. देसाई देसनुरास पळून आला. तेथें वर्तमान देसाई याजकडे येतें म्हणोन बातमीस पाठविला होता. त्याणें वर्तमान लिहिलें तें पत्रच बाजिन्नस पाठविलें आहे. त्याजवरून निवेदन होईल. बहुत काय लिहिणें. इकडे गडबड बहुत. चहूंकडे दंगा भारी. सामानगडकरी याणीं जमाव केला आहे असे कोवाडेयाहून लिहिलें होतें. वाघाचें व करवीरकरांचें पहिल्यापासून संधान आहेच. ईश्वर काय करितो न कळे. स्वामीचे कृपेंकरून सर्वही निवारण होईल. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विज्ञापना.

नं. ५६३१ श्री. ( आंषाढ शु० ९–१ जुलई. )
तालीक.

पै॥ छ० ९ सफर. सन इहिदे मय्यातैन.

सेवेसीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान आजी मंगळवार जाणून यथास्थित असे. गोखले व त्याचे लेंक आपासाहेब दोघे सांपडून ठार जाले. श्रीमंत रा॥ चिंतामणरावसाहेब व गोखलेचे लेक रा॥ बापूसाहेब जिवंत निघून हल्याळास गेले. चिंतामणरावसाहेबांस तोंडावरी जखम लागले आहे. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. कृपा करावी हे विनंती. स्वामीनीं या उपरी फार सावधगें असावें. मजबूत जागा पाहून रहावें. हे विज्ञापना.

नं. ५६३२ श्रीगणपतिर्जयति. ( ४ जुलई )

पै॥ छ० १७ सफर सन इहिदे मय्यातैन. आषाढ व॥ ४ गुरुवासर. पांच तास दिवस.

तीर्थस्वरूप राजश्री काकासाहेब वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें चिंतामणीनें शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ आषाढ शुद्ध त्रयोदशी भृगुवार पावेतों मुकाम हल्याळ सामराणी येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून वर्तमान क्षेम असे. विशेष. इकडील वर्तमान तर आम्ही गोखलेसुद्धां मुरगुडालगत होतों. तेथून कूच करून कित्तुरास आलों. वाघाचा मुक्काम हुबळीस होता. तेथून गरग म्हणून गांव कित्तुरापासून

---

१ पुढच्या नंबरास छापलेलें. २ पुनण्या. ३ मागें ३० जूनचें पत्र छापिलें तें लढाईच्या दिवशीं लिहिलेलें. त्यांत व यांत थोडा फरक आहे म्हणून हें छापलें.

तीन कोश आहे तेथें आला. तेव्हां अंदेशा पाहतां त्याजवळ जमाव भारी. कित्तुरांत पाण्याचा अभाव, तेथें राहून निभावणी पडणार नाहीं, हल्याळ सामराणीस इंग्रजांकडील जमाव आहे त्या सुमारें जाऊन जमून पुढील विचार करावा, या प्रमाणें बेत करून षष्ठी मंदवारीं रात्रौ निघालों. झाडी बहुत. रविवारीं दहा बारा घटका दिवसास पांच सहा कोश आलों. इतकेंत वाघानें बातमी राखोन गांठ घातली. दोन तासपावेतों लढाई झाडींत वोढ्याचे आसरेने चांगली जाली. तीन चार वेळ तिकडील लोकांस मोडून माघारे घातले. घोडीं पाडाव आलीं. फिरोन त्याणीं चालोन घेतलें तेव्हां मला नाकावर तरवारेची जखम व डावे बोटावर हलकी तरवार व उजवे कुशीस भाल्याची जखम. दोन जखमा श्री गणपतीचे कृपें व वडिलांचे आशीर्वादें खैर आहेत. धोंडोपंतांचे पुतणे रा॥ बापूजीपंत यांस उजव्या डोळ्याजवळ कराचलीची जखम लागली. दुसरे पुतणे आपा ठार जाले. धोंडोपंतांचें ठिकाण नव्हतें परंतु तेही ठार जाल्याचें कळलें. गोखले यांजकडील तोफा पाडाव गेल्या. आम्ही दम धरून संभाळून रविवारीं सायंकाळचे दोन तास दिवसास येथें आलों. वाघाकडील लोक येथून कोशाचे तफावतीनें लगट करून आले होते, परंतु येथील इंग्रजानीं तोफा सुरू केल्या, दोनतीन असामी गोळ्यांनीं ठार जाले, तेव्हां माघारे गेले. वाघ चालोन येईल ही आगा नव्हती. एकाएकीं गफलतीनें लढाई बनोन आली. लोक बहुत करून गोखल्यांकडील बुणग्याबरोबर गोटास गेले त्याजमुळें ( लढाई ) बिघडली. परंतु श्री कृपें वडिलांचे आशीर्वादें खैर जाली. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६३३ श्री. ( ४ जुलै )

अथ स्वरशास्त्रांतर्गतस्वरोदयग्रंथरीत्या मिरजसंज्ञकदुर्गे बलाबलविचारः॥ दुर्गनक्षत्रमारभ्य ईशान्यादिक्रमेण चक्रे नक्षत्रपरिलेखनेन दुर्गबाह्यप्राकारे सूर्यसुतस्य विद्यमानत्वात् आभ्यंतरे शुभस्य गुरोरवस्थित्या उपद्रवार्थमागतानां भंगः। दुर्गचक्रे ग्रहबलाधिक्यं। अतो न किंचित् भयं। तैलाभावे यथा दीपो तथा आयासांविनैव उपद्रवनिरासः। दुर्गे न भयं॥ इति स्वरोक्तरीत्या विचारः॥ अथ रमलोक्तविधिना विचारः॥ उंक्महांतांकिमारभ्य मुतवालिदातसंज्ञकचतुष्टयपर्यंतं दाखिलद्वयमस्ति॥ "सुखात् द्वादशपर्यंतं दाखिलार्धद्वयं भवेत्॥ तदा न च हरेद्दुर्गं शुभं स्यात् भयनाशनं॥ चतुर्थे शुभखंडंचेंदुकलापंचचंद्रके॥

तदापि न हरेत् दुर्गं शुभं सर्वं वदेत् ध्रुवं ॥ दाखिलं शक्रखंडं चेत्तदापि न हरेद्रिपुः ॥ इत्यादि योगत्रयस्य कोटचक्रप्रस्तारे सत्वात् दुर्गस्य बलाधिक्यं उपद्रवनिरासः ॥ भूतभविष्यद्वर्तमान आकस्मिकशकलविचारः सूक्ष्मफलज्ञानाय क्रियते ॥ " प्रश्नकरे तव पासे दारो प्रस्तारकरे प्रथमशून्य छोडि दूसरो तिसरो चौथो जहां शून्य पावे सो चलाविजे ॥ दुसरो वायुशून्य तिसरो जलशून्य चौथो भूशून्य इनमे क्रमते. जहां शून्यपावसो क्रमते आगले शकल न चलाविजे । प्रस्तारमें अग्निवायुजलभूक्रमेण सो रहा प्रत्येक शकलचारिस्थान आग्निव यु जलभू जो न अवधि शकलमे पंद्रहे घरतो न्यून आयाहे सोवा जलभू कोनके घरको हे ज्याके घरको होई ताकी पंक्तिमे अवधिशकल कोनसोहे अवधिशकल चले. कोष्टनका अंक सोदिन पाये तीनके तीन भाग करि भूत भविष्यद्वर्तमानकालनके शकलहे तीनसो शुभाशुभफल कहे ॥ " इत्यादि विचारः ॥ सूक्ष्मरीत्या एवं एतदर्थः ॥ उपद्रवनिरासे दिनप्रामाण्यमाह ॥ बाणाग्निभूमिते दिना १३५ नंतरं निःशेषतया उपद्रवनिरासः खलु ॥ परंतु मध्ये रमऊप्रस्तारे रिपुभवने नकीशकलस्य सत्वात् ॥ " नकी यदा स्यात् रिपुभीस्तदा भवेत् दुष्टारिवार्ता कथनादिना भयं ॥ " इत्यादि वचनात् मध्ये नकीशकलस्य पुनरुक्तिवशात् दुष्टारिवार्ताकथनादिजन्यं पुनरपि उपद्रवकारककिंचित्तद्योगेन चित्तोद्वेगादिकं किंचित्कालमस्ति ॥ परंतु न भयं ॥ प्रांते शुभं ॥ बाणाग्निदिना १३५ नंतरं सर्वोपद्रवनिरासः ॥ अग्रे समीचीना दिनाः ॥ तेषु आकस्मिकयोगेन उच्चत्वं निखिलाभीष्टार्थ सिद्धिः ॥ सर्वं पूर्ववत् स्यात् ॥[1]

श्री. ( आषा० शु० १३-४ जुलै. )

नं. ५६३४

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधररावजी[2]
स्वामीचे सेवेशीं

पोष्य नारो विनायक कृतानेक सा॥ नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० ११ माहे मोहोरम. यथास्थित असे. विशेष. पलटणवाले यांचें कूच अलावे जाल्यावर व्हावें असें होतें, त्यास कूच कधीं होईल, कोणीकडे जाणार, येविशीचें व पुण्याकडील अधिकोत्तर वर्तमान असेल तें कळविलें

१ या विषयांत आम्हांला गम्य नाहीं. तर्कानें विरामचिन्हें द्यावीं तर उगीचच घोटाळा होण्याचा संभव, याकरितां पत्राचा हा भाग जशाचा तसाच छापिला.

२ रास्त्यांचा मामलेदार. परगणे अथणी. उपनाम परचुरे.

पाहिजे. इरसाल आंबे सुमार पांच पाठविले आहेत. प्रविष्ट होतील. राजश्री रामचंद्रपंत आपाकडील पत्र काल आलें होतें. मुक्काम खचीडोणी परगणे बागलकोट येथें आहे. अनवाल व येंडीगिरें येथील ठाणीं बसवून जमाखिंडीकडे येणार. राजश्री हरिहरराव बाबा यांस सावनूर तालुक्यांत वाघाचा दंगा आहे सबब तिकडे फौज सुद्धां रवाना केलें याप्रमाणें लिहिलें आहे. राजश्री गणपतराव पानशे याणीं इकडील महालीं उपसर्ग फार केला. सांप्रत गलगल्यानजीक कृष्णाउत्तरतीरीं मुक्काम आहे. गलगल्यास ठाणें घालणार. कृष्णेस पाणी आलें आहे, सबब कृष्णेअलीकडूनच तोफा लागू करणार, याप्रमाणें पत्र आलें होतें. दोन तीन वर्षें तालुक्यास नाना प्रकारचे उपद्रव होऊन प्रजापीडा फार जाली. याउप्परही किती दिवस असेच जाणार न कळे. सदैव पत्रीं परामर्ष जाला पाहिजे. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ करावा हे विनंती.

नं. ५६२५ श्री. ( ४ जुलै. )

पौ॥ छ० १९ सफर सन इहिदे मय्यातैन.

तीं॥ राजश्री आपासाहेब वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिर सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत आषाढ शु॥ त्रयोदशी भृगुवारपावेतों पुणें येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असें. विशेष. वडिलीं पत्रें छ० १ सफरचीं पाठविलीं ती छ० ९ सफरीं पावलीं. पत्रीं आज्ञा कीं "वाघास सावनूर तालुक्यांत जाऊं देऊं नये म्हणोन बारीचे तोंडास आलों, तों पलटणें कृष्णाउत्तरतीरास येऊन मुक्काम केला. तेव्हां घराचें रक्षण करावें याअर्थीं समीप येऊन इकडे राहिलों. यास्तव सरकारांतून शिंदे यांस ताकीद होऊन पलटणांस मनाई व्हावी. कै॥ नानांची मंडळी वाड्यांत नजरबंदींत आहे त्यांचें काय जालें ? व तुम्ही कोणाची अलीकडे भेट घेतली ? शंभर द्वारें पूजिलीं तरी दरबारखर्चाचा मजकूर त्याहाल तर एक श्रीमंतांचे पायांशीं नीट आहों ते अर्थीं श्री कृपा करील. शाश्वत पाहून एक दोन द्वारें राखून वागणें. बाबाजीपंत गोगटे मिरजेंत राहिले आहेत त्यांस तुम्हाकडे जाणें म्हणोन लिहिलें आहे. येतील." म्हणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. ऐसीयास वडिलीं पत्र श्रीमंतांस लिहिलें होतें तें प्रविष्ट केलें. आणि विनंती केली कीं पलटणांचा उपद्रव

---

१ हें मुख्यपत्र व पुढच्या सात पुरवण्या बाबा काळे यानीं रामचंद्रपंत आपास लिहिलेल्या.

प्रांतास लागला याजमुळें रामचंद्रपंतआपा माघारे जमखिंडीच्या सुमारें आले. त्यास याउपरी पलटणांची मनाई व्हावी. याप्रमाणें विनंती केली. तेव्हां उत्तर जालें कीं, ‘ समजून सांगतां येईल. ’ याउपरी नित्य खेटे करीत आहें. गुण येईल तेव्हां खरा ! कै॥ नानांकडील मंडळी कैद सरकारवाड्यांत केली. जेष्ठ वद्य एकादशीच्या दिवशीं नानांच्या वाड्यांत आरब होते त्यांच्यावर तोफा लागू केल्या. तेव्हां सारे मंडळीच्या पायांत शृंखला घातल्या. तेच दिवशीं शामीरखान याचेंही पारिपत्य जालें. तों अस्तमानपावेतों सर्वांस बेड्या होत्या. नंतर चिमणाजी खंडेराव—जाधव याजकडील—याचे पायची बेडी मात्र काढिली नाहीं. बाकी साऱ्यांच्या बेड्या काढल्या. नंतर पुढें दोन चार दिवशीं चिमणाजी खंडेराव यास पंचवीस कमच्या मारिल्या. काय मनसबा करीत होते तो लिहूनही त्याजपासून घेतला. नंतर आज आठ दिवस जाहले; चक्रदेव, शिराळेकर, राघोपंत गोडबोले, लक्षुमणपंत चक्रदेव ऐसे पांच सात असामींच्या पायांत बेड्या घालून शिवनेरीपलीकडे किल्ले आहेत तेथें नेऊन स्थापना केली. चिमणाजी खंडेराव व नारोपंताचा दुसरा एक भाऊ ऐसे उभयतां मात्र अद्याप सरकारवाड्यांत आहेत. श्रीमंतांचे पायांशीं जे कृत्रिमभावें चालतात त्यांचें पारिपत्य यथास्थित होतें यांत दिक्कत नाहीं. वडिलांस कळावें. भेटी कोणाच्या घेतल्या म्हणोन आज्ञा, त्यास शिंदे यांचें मंडळसुद्धां सर्वांच्या भेटी घेतल्या. सर्जेराव आमचे दैवानें करवीरकर यांस वश्य जाला आहे. शिंदे जसें सर्जेराव म्हणतात तैसे आइकतात. श्रीमंतांस तो शिंदे यांजशिवाय गतच नाहीं ! ऐसें बनलें आहे. शंभर द्वारें पुजून दरबार खर्चाचा मजकूर ल्याहालम्हणोन आज्ञा, त्यास जशी मर्जी असेल तैसेंच लिहीन. शाश्वत पाहून एक दोन द्वारें राखून वागावें म्हणोन आज्ञा, त्यास पात्र सछिद्र जालें आहे. द्वारास ठिकाण नाहीं. त्यांतही माझे बुद्धीनें शाश्वत पाहून बोलणें बोलतों. मग दैव पराधीन आहे. चि॥ बाबाजीपंत गोगटे अद्यापि आले नाहींत. येतील. आपण श्रीमंताचे पायाशीं एकनिष्ठेनें वागलां असतां श्री कृपा करील यांत दिक्कत काय ? पुरवणीपत्रीं तपशील लिहिला आहे त्यावरून श्रुत होईल. वडिलांकडून पत्रें लवकर येत नाहींत. मला येऊन चौतीस दिवस जाले. आपले दोन कागद आले. मी येथून पत्रांच्या सहा रवानग्या केल्या. पैकीं पावल्या किती समजत नाहीं. वरचेवर पत्रें येत जात असलीं म्हणजे परस्परें सर्व अर्थ समजतील. बहुत काय लिहिणें श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६३६ श्री. ( आषाढ शु० १३–४ जुलै. )

पै॥ छ० १९ सफर. सन इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. गलगल्याचा मजकूर लिहिला तो कळला. ऐसीयास आमचे बोलण्याची टांकी लागली म्हणजे हेंही बोलून घेतां येईल. करवीरप्रकरणीं मजकूर तर ( करवीरकरांनीं ) तीन लक्ष रुपये शिंदे यांस द्यावे, सात लक्ष रुपये श्रीमंतांस द्यावे, तीन वर्षांनीं पावते करावे, चिकोडी तालुका माघारा करवीरकर यांस द्यावा, आमचें कर्ज ( आम्ही करवीरकरांजवळ ) मागूं नये, शिवाय पावणेतीन लक्ष रुपयेचा मुलूख ( श्रीमंतानीं ) सरकारपैकीं द्यावा, जे समयीं सरकारांत काम पडेल तेव्हां पांच सात हजार फौज करवीराहून चाकरीस यावी, याप्रमाणें ठराव होत आहे. पलटणें कृष्णा उतरून पलीकडे जाणार. कारण चिकोडी महाल घेऊन करवीरकर यांचे हवालीं करावा यास्तव. आणि पुढें वारीपार पलटणें व्हावीं आणि वाघाचें पारिपत्य करावें, छावणी धारवाडच्या रानांत करावी, याप्रमाणें शिंदे यांचे घरीं बेत ठरत आहे. आपण मुख्य फौजेंत होऊन पलटणें आपले तैनातेंत असून वाघाचें पारिपत्य करावें, ऐसा मनसबा आलिजाबहाद्दर यांचे घरीं होत असतो. याचप्रमाणें मलाही सर्जेराव सांगत असतात. मीही ‘ उत्तम ’ म्हणोन रुकार देत असतों ! यशवंतराव पाटणकरही करवीरास जाणार आहेत. आपा देसाई निपाणीकर यांस पलटणांतील फौजेचे सरदार केलें. कळावें. वरकड मजकूर अधिक उणा जो होईल तो मागाहून लिहीन. राजश्री बाळाजीपंत दादास आपलें पत्र होतें तें प्रविष्ट केलें. दादा बहुत लपून आहेत. काय चमक बसली आहे समजूं देत नाहींत. अलीकडे राजश्री बाबाजीपंत पटवर्धन प्रगट जाले होते. एक दोन दिवस दिवसास आले होते. अलीकडे ‘कांहीं प्रकृत बिघडली आहे’ म्हणोन आइकतों. सारांश, उभयतांही बहुत तजविजेनें गुप्तरूपें वागतात. वडिलांस कळावें करितां लिहिलें आहे. वडिलीं दारकू खिजमतगार यास मल्हारजी गायकवाड याजबरोबर पाठविलें, त्यास मल्हारजी गायकवाड याचे हातें काम होत नाहीं. हल्लीं दारकूसही पाठविलें आहे. सर्व कळवील. अशीं कामें जर हुजरे यांचे हातें होतीं तर सर्वही सुलभ पडतें ! असो. या समयीं श्रीमंतांची मर्जी रक्षितांच उत्तम, आणि त्यांतच परिणाम. आपण म्हणतील कीं, आज हे दोन महाल मागतात, उद्यां दुसरे मागतील. ऐसें आपले चित्तीं येईल त्यास

जें मागतील तें द्यावें यांतच परिणाम आहे. सदैव पत्र पाठवून सांभाळ करावा. त्रयोदशी. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६३७ श्री. (आषाढ शु० १३–४ जुलै.)

विज्ञापना. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. पालमर, इंग्रजांचा वकील, यासीं बोलावयाचे भाव लिहिले, त्यास येथें आमची वळख नाहीं; आणि हा सुमनुष्य नाहीं; यास्तव या काराभाराविणें प्रयोजन नाहीं. तेथेंच राजश्री बाळकृष्णपंत लागूस लिहून तेथील कपितानाशीं बोलवावें. सारांश श्रीमंताचें जें लक्ष तेंच राखिल्यास परिणाम आहे. आपण म्हणतील, असें कां? त्यास आज राज्य बुडतें हें खरेंच. परंतु इंग्रज (व) नबाब श्रीमंतांचे लक्षानें वागतात, तेव्हां आम्ही दुसरेकडे पाहून परिणाम नाहीं हें स्पष्ट समजावें. या श्रीमंतांचें दैवच तसें आहे! घरचे घरीं राज्य बुडावें, परशत्रूनीं उठों नये, आणि ( त्यानीं ) आज्ञेप्रमाणें वर्तावें! त्यास इलाज कोणाचा? त्यास हे सर्व भाव चित्तीं आणून वर्तणूक जाल्यास चार दिवस कालहरण होईल. कळावें. रवाना त्रयोदशी. विदित होय हे विज्ञापना. ती॥ राजश्री बापूसाहेबांचें लग्न ती॥ बाळासाहेबानीं केलें म्हणोन वडिलीं लिहिलें त्याजवरोन संतोष जाहला. मला राजश्री बाळाजीपंत सोनी याणीं लिहिलें होतें कीं जेष्ठ वद्य नवमी रविवारीं लग्न जाहलें. फार उत्तम गोष्टी झाली. ज्या समयीं जें घडावयाचें तें होतें. हे विज्ञापना. राजश्री आबा चिटणीस यांचें पत्र प्रविष्ट करितों. आज त्यांचे हातीं शिंदे यांचे घरची बाजी आहे, परंतु आम्हांविशीं आळस करितात. राजश्री मोरोपंत जोग यांचीही तपश्चर्या समाप्त झाली मी खेटे घालीत आहें. ईश्वर कृपा करील तेव्हां खरी. हे विज्ञापना. पलटणें कृष्णाबाईपार होणार चिकोडी तालुका करवीरकरांकडे घेऊन द्यावयासाठीं, हा मजकूर लिहिला आहेच. यास्तव गोकाकेची मजबुदी राखावी. सामान लढाऊ आंत असावें, नाहीं तर आयते वेळेस कमावीसदार सामान नव्हतें म्हणोन टाकून येतात ऐसें होऊं नये. तैसेंच जमखिंडीसही आज्ञा असावी. इतकें जड पडणार नाहीं. परंतु सावध असावें फार चांगलें. हे विज्ञापना.

नं. ५६३८ श्री. (आषाढ शु० १३–४ जुलै.)

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिर सा॥ नमस्कार विज्ञापना. वडिलीं लिहिलें कीं "सावनूर तालुकेपैकीं दोन महाल देविले, त्यास साराच तालुका वाघानें घेतला तेव्हां द्यावयाचें न द्यावयाचें काय राहिलें तें कळतच

आहे ! तत्राप सरंजामी पुणतांबें मोशी ढवळपुरी व घोडेगांव अद्यापि सुटत नाहींत, आणि कर्जांत महाल आहेत तेही वांटूं लागलेवर पुढें राहिलें तें काय ? असो. खावंद आहेत. सारेंच घेऊन आम्हांस यात्रेस निरोप द्यावा. सालगुदस्त अंणीगिरें उगरगोळ दोन्ही महाल गेले. हल्लीं हे दिल्हे तर मर्जी राहती ! त्यास सारेंच घ्यावें ऐसी मर्जी दिसती. [1]डिलांस वस्त्रें व सनदा सालगुदस्त त्याणींच पाठविल्या. पुढें (वडील) सरकारकामास आले. आम्हांस सरकारांतून आज्ञा जाहली तिचा शेवट कसा जाला, काय पेंच आले, ध्यानीं नाहीं ! पुढें सर्वस्व घेणार, तेव्हां राहील तें काय ? मर्जी सरकारची ! " म्हणोन विस्तारें लिहिलें व " सारे वकील मिळोन मिरज रक्षा, पुढें ज्याचें दैव त्याबरोबर. " ऐसें बहुत उदासीनतेनें लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसीयास रूपराम व आबा काळे यांस सावनूरतालुकेपैकीं दोन महाल देविले त्याचा पर्याय वडिलीं लिहिला, त्यास ही गोष्ट कांहीं चांगली नाहीं. सरकारआज्ञेप्रमाणें दोन्ही महाल हवालीं करावे हें चांगलें. कारण आपण म्हणतात सरकारांतून कर्जांत सावनूर तालुका दिला. येथें समजूत ती अगदीं नाहीं ! कै॥ रावसाहेबांचे कारकीर्दीची आठवण आपलेस राहिली आहे. परंतु तो समय आतां नाहीं. मागील कर्ज नाना फडणीस यांस पुसावें ऐसें म्हणतात ! येथील मर्जी कोठें आम्हांवर शुद्ध आहे ? तेव्हां जशी आज्ञा करितील तैसें पाऊल आमचें जर पडत गेलें तरच कुटुंबनिर्वाह जाला तर होईल. आपण उदास होऊन सर्वस्व टाकिलें तर येथें कोणी पुसावयाचा नाहीं. अशी अवस्था येथील आहे. यास्तव तपशीलवार विनंती लिहिली आहे. जातां जातां जें राहील तें आपलें म्हणावें, नाहीं तर याजउपरी श्रीमंतांस आम्हाविशीं समजून सांगावयाचा कोणी राहिला नाहीं. तेव्हां जसें श्रीमंत सांगतील तैसीच वर्तणूक आपलेकडून जाहली तर निर्वाह होईल. नाहीं तर परिणाम लागणें कठिण. [2]यांत श्रीमंतांस शिंदे सहाय. याजउपरी मर्जीप्रमाणें वर्तावें हें चांगलें. सांगतील तैसें आइकावें. सरकारांतून कर्ज वारावयास ऐवज देतील तर आपण कर्जदारास देतील हें उघड आहे. नाहीं म्हणून फल नाहीं. सरकार आज्ञेप्रमाणे न घडल्यास माझे वस्तु येथें राहणें होणें नाहीं. त्यास हें पत्र सहस्र पत्रांचे जागां लिहिलें आहे. तर सरकार आज्ञेप्रमाणें

---

१ परशुरामभाऊंच्या ताब्यांत असलेल्या महालांपैकीं हे दोन महाल पेशव्यानीं अमृतरावास जहागीर दिले. २ सवाई माधवरावाचे.

दोन्ही महालाच्या सोडचिठ्या कमावीसदाराचे नांवच्या पाठवाव्या म्हणजे श्रीमंतांचे हवालीं करतों. आपण म्हणतील सावनूर तालुका वाघानें घेतला तेव्हां चिठ्या कोणाचे नांवें पाठवाव्या ? त्यास ही दिक्कत घेऊं नये. आजपर्यंत महाल होते ज्या कमावीसदार यांजकडे त्यांचे नांवच्या चिठ्या पाठवाव्या. परंतु आपण सरकाराशीं बहू होऊं नये. आज वरीसभर श्रीमंतांकडे आमचा नाद नाहीं याजमुळें मर्जी बहुत दिक्क आहे ती पत्रीं कोठवर लिहूं ? परंतु याजउपरी सोडचिठ्या येण्यास आळस होऊं नये. मग मर्जी. येथील रंग पाहून विनंती लिहिली आहे. जातां जातां जें राहील तें आपलें म्हणावें. याजउपरी आमचा दरबारीं कोणी राहिला नाहीं. यांत सर्व समजून जशी सरकारची आज्ञा त्याप्रमाणें मान्य करून काळ काढावा तरच परिणाम आहे. पुणतांबें मोशी हीं प्रथमच नानांनीं शिंदे यांस दिलीं आहेत. तीं सुटणें तो दूर आहे. मोबदला आपण कृपेंत आल्यावर मिळाल्यास मिळतील. ढवळपुरीच्या सनदा सरकारच्या जाल्या असतां आबा काळे याणीं ढवळपुरी विठलपुरी अटकावून ठेविल्या. याचें कारण आबाचे पलटणचे बेगमीस भत कुणकी हीं खेडीं दिलीं. त्यास तीं खेडीं राजश्री [1] चिंतोपंत दादानीं अटकावून ठेविलीं. आबा काळे यांचे हातास येईनात. चिंतोपंत आपले पदरचे हें समजून ढवळपुरी विठलपुरी हीं गांवें आबा काळे याणीं अटकाविलीं ! भत कुणकी सोडून देणें आणि ढवळपुरी घेणें ऐसें आबाचें म्हणणें राजश्री बाळाजीपंतदादापाशीं पडलें होतें ऐसें आतां मी येथें आलेपासून आइकतों. तेव्हां हा मजकूर मी बाळाजीपंतांस पुसला. त्यांणीं याप्रमाणेंच सांगितला. आणि त्याणीं सांगितलें कीं, मी यजमानांस हाच मजकूर लिहीत गेलों. परंतु भत कुणकी सोडतों ऐसें होईना, त्यास माझा इलाज काय ? मर्जी खावंदाची ! ऐसें बोलतात. त्यास आमचीं गांवें सरकारांतून सुटलीं. चिंतोपंतदादास सरकारांतून सरंजाम देतात यास ठिकाण नसतां भत कुणकीच्या आग्रहासाठीं आमचीं गांवें अटकावून राहिलीं, यास काय म्हणावें ? शेवटीं लिमये यांस पुसावयास ठिकाण नाहीं. काळे याणीं भत कुणकी घेतली, आमचीं गांवें अद्यापि सुटलीं नाहीं ! हें आपणास कसें समजलें असेल तें असो. कोणासाठीं कोणाचीं गांवें अटकलीं ( हा ) विचार व्हावा, असो. त्यास दोनी महालच्या सोडचिठ्या आधीं पाठवाव्या.

१ लिमये.

आग्रह करूं नये. लिमये यांजपासून शिराळेकर याणीं भत कुणकीचा पैका घेतला वेगळा. हल्लीं आबा पैका मागतो वेगळा! आमचीं खेडीं मध्येंच राहिलीं कोणीच मनास आणीना, याजवरून अपूर्व आहे! सरकारची सोडचिठी जाहली तेव्हांच ढवळपुरी हवालीं होती तर आजपर्यंत दहा हजार रुपये आले असते. हा मजकूर बाळाजीपंतानीं वारंवार आपणास लिहित गेलों म्हणोन सांगत होते. मग आपली समजूत कशी जाहली असेल ती हो. मजकूर कळावयाकरितां लिहिला आहे. सारे वकील मिळून मिरज रक्षा म्हणोन आज्ञा, त्यास जे वकील असतील ते रक्षितील! रवाना शु॥ त्रयोदशी भृगुवार. हे विज्ञापना.

नं. ५६३९ श्री (आषाढ शु० १३–४ जुलै.)

विज्ञापना. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. चि॥ राजश्री चिंतामणरावआपा गोखले यांचे नादास लागले इत्यादिक भाव लिहिले, त्यास हें काय? वडिलीं ती॥ राजश्री चिंतामणरावआपांस लिहून इकडील लक्षानें वागावें ऐसें ल्याहावें. लेंकुरभाव आहे. आपले मर्जीशिवाय चालणार नाहींत ही खातरजमा जाहे. वडिलीं लिहिलें कीं, ती॥ राजश्री बाळासाहेबांचें पत्र आलें कीं, कृष्णाबाई उतरून यावें. ऐसें आलें. ती॥ राजश्री रघुनाथरावदादांचीं लिहिलीं येतात त्यांतील भाव लिहिले ते कळले. ऐसीयास आपण नदी आतां उतरून फळ काय? मिरज प्रांताची फार करून मेजवानी पलटणवाले याणीं केली. याजउपरी विरुद्ध शिंदे यांसीं दाखविणें ठीक नाहीं. तो समय गेला. याजउपरी हरकसें करून विवेक करून घेणें फार श्रेयस्कर आहे. शिंदे यांचे घरीं मी खटपट करीतच आहें. आपण त्यांचे पलटणांचें आणि फौजेचें देणें आहे. आपण म्हणतील "करवीरची मसलत बुडविली. आतां पैका कोठें आहे?" त्यास तें खरें. परंतु न्याय पुसणार असेल तेव्हांची गोष्टी! आणि मोर्चे त्याणीं अगोदर उठविले नाहींत. तेव्हां मोठाच पेंच त्यांचे तलबेचा आहे. यास्तव शिंदे यांसीं कलह दाखविणें परिच्छिन्न चांगलें नाहीं. त्याणीं आम्हांपाशीं तसबेचा पैका मागूं नये एवढें आजचे काळीं जालें तर आपले पुण्यास पार नाहीं! तीच खटपट करीत आहें. ईश्वर यश देईल तेव्हां खरें. करवीरचा तह होत आहे त्याचा मजकूर तपशीलवार अलाहिदा पत्रीं लिहिला आहे त्याजवरून कळेल. शिंदे सर्वच पटवर्धन यांचा मुलूख घेणार ऐसें बोलतात. इलाज काय आहे? जें म्हणतील तें होय म्हणावें तर प्राण वांचतो! कळावें. रवाना त्रयोदशी. हे विज्ञापना.

नं. ५६४० श्री. ( आषाढ शु० १३–४ जुलै. )

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिर सा॥ नमस्कार विज्ञापना. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. पत्रीं लिहिलें कीं, "दरबारखर्च द्यावयास मिळेल न मिळेल हें तुम्हांस कळतच आहे. एकादशीचे घरीं शिवरात्र असा प्रकार ! तत्राप किरकोळ दोन चारशें रुपये चौकीदार चोपदार हा पडल्यास मिळेल," म्हणोन लिहिलें, ( व ) "राजश्री धोंडोपंत गोखले यांजबरोबर रहावें ( तर ) तो पैका मिळवील. आम्ही काय खावें ! हें कसें मनांत न आलें ? तोफखान्याकडे सरंजामी पथकें गेलीं तीं इकडे यावीं. वाघानें राजश्री वासुदेवकाकास धरून नेलें, प्रांत घेतला," इत्यादि मजकूर विस्तारें लिहिला तो कळला. ऐसीयास आजपर्यंत कै॥ भाऊसाहेब विद्यमान होते, नाना फडणीस हरीपंततात्यासारिखे दरबारीं वाली होते, म्हणोन आजपर्यंत दिवस दरबारखर्चाशिवाय निघाले. याजउपरी आपला पाठराखा दरबारीं कोणी नाहीं. चक्रदेवसुद्धां विल्हेस लागले. आणि आपला खंबीर कीं आजपर्यंत दरबारखर्च करून चाकरी केली नाहीं, आणि पुढेंही तसेंच, हा नेम आपला. त्यास फार चांगलें आहे. मी अंगमेहनतीस अंतर किमपि करीत नाहीं. होईल मजकूर तपशीलें अक्षरशहा लिहून पाठवीत आहें. जशी आज्ञा येईल तैसी वर्तणूक करीन. दोन चारशें रुपये मिळतील म्हणोन लिहिलें, उत्तम आहे. ज्या समयीं जेथें कारण लागेल तेथें कबूल करणें प्राप्त आहे. परंतु धणी नवे. त्यांत आपलेवर इतराजी. ऐसें असतां दरबारखर्च न करितां शेवट होईलसा मला वाटत नाहीं. मग आपण पुण्यवान् आहेत. जर श्रीमंतांचे मुखीं ईश्वर उभा राहून कृपा आपणावर केली तर पैसा पडणार नाही हें खरेंच आहे. त्यास वडिलीं याजउपरीं सरकार आज्ञेप्रमाणें वागावें. धटाई करण्यास आसरा राहिला नाहीं. वडिलीं दोनी महालच्या सोडचिठ्या आधीं लिहून पाठवाव्या. येथें बोलणें पडलें त्यांत आबा काळे याचें म्हणणें कीं, ते दोनी महाल वाघानें घेतले असले तरी त्याजपासून आम्ही घेऊं. तुम्ही सोडचिठ्या देणें. ऐसें बेमुरवत श्रीमंतांदेखत म्हणतात. तेव्हां याजउपरी वोढणें परिच्छिन्न चांगलें नाहीं. तर वडिलीं याचा पुरता विचार करून कालावर दृष्टि देऊन दोनी महालच्या सोडचिठ्या पाठवाव्या म्हणजे मी आपलेकडून आलेचें फल. नाहीं तर मी येथें राहून कांहीं फल नाहीं. करवीरचा तह मन मानेल तैसा सर्जेराव याचे मर्जीप्रमाणें करीत आहेत. शिंदे यांचें बोलणें पडलें कीं, रामचंद्रपंतांकडील बाबा काळे आले आहेत त्यांस करवीरच्या बोलण्यांत न घेतां तह विल्हेस लावावा ! जसें शिंदे

म्हणतात तसें श्रीमंतांस आइकणें प्राप्त आहे. कळावें. वाघाचा मजकूर श्रीमंतांचे श्रवणीं घातला. " ईश्वरी इच्छा " ऐसें उत्तर जाहलें ! श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६४१ श्री. ( आषाढ शु० १३–४ जुलै. )

विज्ञापना. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. " सावनूर तालुका वाघानें घेतला. राजश्री वासुदेवकाका धरून नेला. राजश्री बाळकृष्णपंत लागू व गणपतरावकाका हरिहराकडे तुंगभद्रापार गेले. सोंधें तालुकेस वाघानें उपद्रव लाविला म्हणोन चित्रदुर्गाहून दहा इंग्रजी पलटणें वाघाचे पारिपत्यास तुंगातीरीं आलीं, आणि इंग्रजांचीं पत्रें गोखले यांस व आम्हांस आलीं, रवाना जाहलीं, म्हणोन लागूंचें पत्र आलें. " म्हणोन विस्तारें लिहिलें, ऐसीयास ही गोष्टी फार चांगली झाली. वडिलीं ती॥ राजश्री बाबासाहेब (व) चिंतामणरावआपा व गोखले यांस लिहून पाठवावें कीं, जर इंग्रजांचीं पलटणें खरींखुरीं येऊन पत्रें आलीं असल्यास बातमी राखून ठाणें ठाणेंचे आश्रयानें पुढें व्हावें म्हणोन ल्याहावें. जर समयास इंग्रजास कुमक गेले तर बरें. नाहीं तर सावनूर तालुका इंग्रजानीं सोडविला म्हणजे त्यांचे हातें सुटणें अवघड पडेल. यास्तव इंग्रजांबराबर हाल शिवावी हें चांगलें. वाघ दगेखोर मर्दाना आहे. वडिलीं उभयतांस फार जपून हुशारीनें असावें ऐसें लिहावें. शिंदे यांचे पलटणांचा उपद्रव चुकता म्हणजे यासमयीं आपलें तिकडे जाणें प्रशस्त. त्यास हा मजकूर मी श्रीमंतांचे कानावर घालून पुढें कसें करावें तें विचारून जशी आज्ञा होईल तैसें मागाहून लिहून पाठवितों. शिंदे यांजकडून सर्जेराव वरचेवर निरोप घेऊन श्रीमंतांकडे येतात कीं, पटवर्धनांचा सरंजाम द्यावा. त्यास मी येथें येऊन भेटल्यापासून श्रीमंतानीं देतों असें म्हटलें नाहीं आणि सर्जेरावही अलीकडे सरंजाम घेतों असें म्हणत नाहीं. पुढें कसें ठरेल तें मागाहून लिहितों. चिकोडी तालुका जातो यांत दिक्कत नाहीं. चिकोडी तालुका देतात तेव्हां एकसंबें भोज व बोरगांव तिनी गांवें जातात. श्रीमंत माहीत नाहींत. शिंदे म्हणतील तसें आइकणें प्राप्त आहे. अशी अवस्था गुदरली आहे. यांत ईश्वर परिणाम लावील तेव्हां खरें. याजउपरी श्रीमंत जशी आज्ञा करितील तैसी वर्तणूक करून राहिलें असतां परिणाम आहे. आपण म्हणतील सरंजामाचीं राहिलीं आहेत तीं खेडीं घेऊन रहा म्हटलें असतां परिणाम काय ? माझे मतें तितकें त्याणीं दरबारखर्च न करितां म्हटलें असतां आपलेसारिखे दैववान कोणी नाहीं ! याजउपरी जें श्रीमंत

करितील तें होईल. राज्य बुडो किंवा तरो ! परंतु मर्जी रक्षणें प्राप्त आहे हें स्पष्ट समजून वर्तणूक व्हावी. याजउपरी हें राज्य टाकून दुसरीकडे जाऊं म्हटलें, तरी परिणाम नाहीं हें स्पष्ट समजावें. रवाना त्रयोदशी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६४२ श्री. ( आषाढ शु० १३–४ जुलै. )

पै॥ छ० १९ सफर.

विज्ञापना. श्री॥ राजश्री मोरोबादादा आले हा मजकूर लिहिलाच आहे. अलीकडे दादा आपले वाड्यांत आले. नित्यश: दरबारास जात असतात. दादा आल्यापासोन दररोज श्रीमंत चांफेखणांत दरबारास बसत असतात. तूर्त दादा फडणीस यांजवर मर्जी श्रीमंतांची यथास्थित आहे. पागनिशीचें काम व सरंजामींचें काम कुंजरास सांगितलें. आज श्रीमंतांचे राज्यांत दैवानें कुंजरास हातीं धरलें आहे ! आजपर्यंत मीं त्याची उपासना केली नव्हती, परंतु याजउपरी त्याजकडे जावेंसें केलें आहे. परंतु आम्ही रिक्तहस्ती, तेव्हां टांकी लागणें ईश्वराचे हातीं आहे ! या राज्यांत याजउपरी रिक्तहस्तें कांहीं व्हावयाचें नाहीं. त्यांतही आज्ञेप्रमाणें होईल ती खटपट करीत आहें. रवाना त्रयोदशी. सेवेशीं श्रुत हाय. दादा फडणीस आले आहेत त्यापक्षीं वडिलीं दादाकडे राजश्री धोंडोपंत बाबा जोग यांस अगत्य पाठवावें. अनमान करूं नये. वडिलीं लिहिलें असतां जोग येईनात तर मग माझें नांव घालून दादांस पत्र पाठवावें. कळावें हे विज्ञापना. दारकूस पाठविणार होतों, परंतु आपले कागद त्याचे नांवचे कोलत्यास व गायकवाड यास आले ते त्याजपाशीं देऊन हुजरे यांजकडे पाठविलें आहे. त्याचे वस्तु कार्य होणें अवघड आहे. परंतु आज पत्रें दारकूपाशीं दिलीं आणि मला लावून दिलें, नाहीं तर काम केलें असतें, असें म्हणूं लागेल म्हणोन आठ दिवस ठेवून घेतला आहे. काय तें आठ दिवसांत समजतें. नंतर लावून देईन. हे विज्ञापना. प्रतिनिधि कऱ्हाडकर याणीं कैलासवासी नाना जाल्यावर त्यांजकडील आरब पांचशें चाकरीस ठेवले होते. परवां चक्रदेव कैद जाहल्यानंतर पुण्यांत आरब राहूं नये ऐसें ठरलें तेव्हां प्रतिनिधींसही आज्ञा जाली कीं, आरब दूर करणें. तेव्हां आरब दूर करत्ये समयीं त्यांची तलब दिली पाहिजे, तेव्हां पैसा नाहीं, त्याजमुळें फाजिती आरबांनीं केली आणि तलब घेऊन गेले. याजमुळें पंत रुसोन कराडास जाऊन तेथें फौज ठेवून मुलूख मारावा या योजनेंत होते. हा मजकूर श्रीमंतांस ( कोणी ) समजाविल्यावरून कालपासून शिंदे याज-

कडील व सरकारपैकीं पलटणें राऊत प्रतिनिधीच्या वाड्याभोंवती तोफां-सुद्धां नाकेबंदीनें उभीं आहेत. त्याणीं पुणेंतून जाऊं नये ऐसी खातरजमा करावी म्हणजे चौकी उठेल ऐसें बोलणें पडलें आहे. पुढें कसें होतें पहावें. आणि दुसरा एक खिसा आहे. पंतानें एक तेलिणीची पोर राखिली आहे आणि दोघी बायका टाकल्या आहेत. याजमुळें घरचा बंदोबस्त करावा, एक दोघे जवळ सोदे आहेत ते घालवावे, ऐसेंही आहे. यांत कसें शेवटास जाऊन कोणे थरास जातें पहावें. अद्यापि नाकेबंदी मोकळी नाहीं. ठरलें म्हणजे मागाहून लिहीन. किंवा झुजतात कळेना ! हे विज्ञापना.

नं. ५६४३ श्री. ( आषाढ शु० १४–५ जुलई. )

पै॥ छ० १६ सफर. बुधवार चार घटका रात्र. आषाढ मास. इहिदे मध्यातैन व अल्लफ.

सेवेसीं मोरो आपाजी परांजपे साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १२ सफर मंदवार सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींचीं पत्रें छ० ७ सफरचीं जासूद जोडीबरोबर रवाना जालीं तीं आतांच दोन प्रहरीं पावलीं. श्रीमंत रा॥ पंतप्रधान यांस पत्र व श्रीमंत रा॥ मोरोबादादा व रा॥ आलिजा बहादर यांस व घाटगे यांस व चिटणीस यांस स्वामींकडून आलीं तीं पावलीं. श्रीमंतांचें पत्र प्रविष्ट करून अलाहिदा माझे पत्रीं कर्नाटकांतील बातमी वगैरे लिहिली त्याप्रमाणें विनंती करून आज्ञा होईल ते सेवेसीं लिहितों. श्रीमंत रा॥ दादांचें पत्र प्रविष्ट करून त्यांस ही बातमी किंचित् किंचित् श्रुत करितों. रा॥ आलिजाबहादर यांस पत्रें व घाटगे यांस व चिट-णीस यांस आहेत त्यास तींही पत्रें प्रविष्ठ करून बोलणें करितों. कसबे रहिमतपूर प्रकरणीं चोहोंकडून संधान लाविलें आहे. शिंदे यांचा आग्रह रहिमतपुराविशीं आहे या प्रमाणें आबा चिटणीस यांचे बोलण्यांत भाव आला आहे. श्रीमंतांस या मजकुराविशीं विनंती केली. त्यावरून आज्ञा जाली ती अलाहिदा पुरवणीपत्रीं विनंती लिहिली आहे. हल्लीं दरबार खर्चा-विशींची आज्ञा लिहिली, त्यास बशर्त काम जाल्यास आज्ञेप्रमाणें द्यावयाचें. नाहीं तरी कांहीं एक वचनास गुंतत नाहीं. आज श्रीमंत रा॥ पंतप्रधान व श्रीमंत राजश्री आपासाहेब व श्रीमंत रा॥ मोरोबादादा यांची स्वारी रा॥

---

१ हें मुख्यपत्र व पुढच्या पांच पुरवण्या अशीं सहा पत्रें मिरजेस बाळासाहे-बांस लिहिलेलीं.

यादवराव भास्कर--शिंदे यांजकडील कारभारी--यांजकडे भोजनाचे मेजवानीस गेली आहे. श्रीमंत रा॥ रावसाहेब यांची स्वारी गेली नाहीं. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना. प्रतिनिधीचे वाड्यांतील लोक सर्जेराव यांणीं बाहेर काढिले म्हणोन पुरवणी पत्रीं लिहिलें आहे. परंतु लोक कांहीं निघाले. बाकी लोक झाडून तसेच आहेत. पांच सहाशें जमाव वाड्यांत आहे. बाहेरून सरकारचे व शिंदे यांजकडील स्वार व कवायती लोक आहेत. पंत अडोन बसले आहेत. ऐकत नाहीं. जवळपासचे लोकांनीं सावधगिरी करून वस्तवानी भरवस्तींत आणिली. उद्यीक गोळा सुरू होतो ऐसा रंग दिसतो. पेठ लुटली जाईल. मागाहून लिहितों. हे विज्ञापना.

नं. ५६४४ श्री. ( आषाढ शु० १४–५ जुलई. )

पै॥ छ० १६ सफर इहिदे मय्यातैन व अल्फ.

विज्ञापना छ० १९ मोहरम पासून श्रीमंत राजश्री रावसाहेब कारभारामध्यें नाहीं. ' यावें ' मात्र करीत असतात. खासा श्रीमंत कारभार करितात. चाफेखणांत सायंकाळीं दरबार चार घटका होतो. तूर्त कारभारी हाताखालीं बाळोजी कुंजर आहेत. जप्तीचें वगैरे कामकाज त्यांजकडे आहे. शिंदे याजकडे कुंजर यांचा चलचलाव फार आहे. शिंदे यांचें व रावसाहेब यांचें फार कटाक्ष वाढलें आहे. पुढें काय घडतें नकळे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६४५ श्री. ( आषाढ शु० १४–५ जुलई. )

पै॥ छ० १६ सफर. इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. ता॥ छ० १२ सफर. सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधि यांणीं आरब दूर करावे याप्रमाणें सरकारांतून ताकीद जाली. आरब दूर करावयाचें ठरलें तेव्हां तलब चाळीस हजार रुपये व कर्जाऊ ऐवज पंतांनीं घेतला तो द्यावा म्हणोन आरब यांणीं अडवून बसविलें. ते समयीं पदरचे गृहस्थांनीं शक्तिनसार ऐवजें दिला. पंचवीस तीस हजार भरणा जाहला. बाकीचा भरणा न होय तेव्हां कितेकांच्या अब्रू पंतांनीं घेतल्या. आठ चार दिवस दंगा जाहला. नंतर सरकारांतून वारंवार ताकीद होऊं लागली कीं लौकर आरब दूर करणें. लोकांच्या अब्रू निमित्याखेरीज घेतात हें चांगलें नाहीं. जवळ कारभारी आहेत त्यांचें ऐकत नाहीं हें कामास येणार नाहीं. महात, पखाली, खिजमतगार याणें सांगावें तेंच करावें, सारा दिवस आरबांचे

जमातदार यांजपासीं बोलणें खलबत, मनस्वी वर्तणूक करावी, नाटकशाळा ठेविली ते जात तेली, बहुत निंद्य, हें कामाचें नाहीं. ( अशी ) ताकीद सरकारची जाली. त्यावरून रगें भरोन अटाळा अगोदर चार दिवस लावून आपण स्वार गारद तयारी करून निघणार, हें वर्तमान सरकारांत विदित जाहल्यानंतर 'तुम्हीं जाऊं नये. जाऊं म्हणत असल्यास सरकारचा हुकूम नाहीं. अटकाव होईल.' असें सांगोन पाठविलें. तत्राप आग्रहें निघोन जाणार हा विचार कळतांच सरकारांतून गारदी व तोफा दोन व शिंदे यांजकडील पांचशें स्वार, पलटण एक, तोफा चार, याप्रमाणें रवाना जाहले. सर्जेराव बापू व आत्माराम तांबोळी काल प्रहर दिवसापासून वाड्याचे अंतऱ्यानें होते. नंतर सायंकाळीं घाटगे पंतांचे वाड्यांत जाऊन चार गोष्टी सांगितल्या. त्यांजकडील लोकांस वाड्याबाहेर घालवून आपले लोक वाड्यांत घातले. खासा पंतांजवळ चाळीस पन्नास लोक मात्र दिवाणखान्यांत आहेत. वरकड लोक झाडून घालविले. पंत भोजन करीत नवते, त्यांसहि भोजन करविलें. पुढें काय घडतें श्रीसत्ता ! मागाहून विनंती लिहितों. पंतांनीं नाटकशाळेचा आग्रह बहुत धरिला आहे. 'इची गत तीच माझी' म्हणतात हे गोष्ट विथरास जाईल. खासा बायकोचें दर्शन नाहीं हा मोठा अविवेक. वरकडहि प्रकार तसाच सर्व आहे. त्यांत निवड करावी असा अर्थ नाहीं. सारांश थोर संस्थान. बहुतांचें अन्न होतें. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६४६ श्री. ( आषाढ ० १४—५ जुलई. )

पै॥ छ. १६ सफर. इहिदे मय्यातैन.

विज्ञापना ऐसी जे, श्रीमंत राजश्री पंतप्रधान याणीं कैलासवासी भाऊसाहेब यांची पागा सरकारांत घेऊन घरें बांधावयास वे॥ राजश्री बाळजोशी टोकेकर व वैजनाथ भट भागवत व विश्वनाथ जोशी माखजनकर वगैरे यांस जागा नेमून दिली. दक्षिणेकडे शेवटास जागा विश्वनाथ जोशी यांस दिली आहे. त्यास भिंतीचे आंत पागा भाऊसाहेब यांची, भिंतीबाहेरहि जागा आम्हांकडील होती. त्यास जागेची [illegible] जोशी याणीं घेतली. कृष्णाजी गौळी नानांकडील खिजमतगार राहत होता तो हल्लीं गैरहजर जाहला. छपर रिकामें पडलें होतें तें ( जोशी [illegible] ) मोडून नेलें. भिंतहि पाडिली.

१ ज्याच्या आजान मुसलमानीण ठेवली होती त्यानें दुसऱ्याला तूं तेलीण ठेवलीस म्हणून दोष देणें चमत्कारिकच !

द्वाहीदुराई दिली असतां 'परमानगी आम्ही घेतली असतां द्वाही ऐकत नाहीं' म्हणोन काम मना होत नाहीं. खटला करून फल दिसत नाहीं. परमानगी जाली. ( सरकारचा ) खिजमतगार आला त्याणें परमानगी सांगितली. काम चालतें केलें आहे. येविसीं स्वामींस विनंति पेशजी लिहिली होती त्याचें उत्तर आलें नाहीं. आज पावेतों काम करूं दिलें नाहीं. सरकारांत विनंती केली असतां जागा देणें म्हणोन रुबरूहि ताकीद होईल. त्यास आज्ञा येईल त्याप्रमाणें सरकारांत विनंती करीन. पत्राचें उत्तर आधीं आलें पाहिजे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

पत्र लिहिलेवर छ० १२ सफरीं सरकारची परमानगी दुसऱ्यानें 'जागा द्यावी. खटला करूं नये.' म्हणोन आली. काम चालतें करावें म्हणोन आज्ञा जाहली आहे. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६४७ श्री. ( आषाढ शु० १४–५ जुलई. )

पै॥ छ० १६ सफर इहिदे मय्यातैन. आषाढमास.

विज्ञापना ता। छ० १२ सफर मंदवार. सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री राघोपंत पेंडसे व भाऊ कापसे कैलासवासी नाना फडणीस यांचे कारकून गैरहजर जाहले होते ते गैरहजर असोन परिणाम नाहीं म्हणोन दादा गद्रे यांचे गुजारतीनें बाळोजी कुंजर यास भेटले. तूर्त गद्रे यांचे मुरलीधर याचे प्रासादामध्यें आहेत. सरकारची चौकीही ठेवली आहे. जाबसाल त्यांजकडे पुसावयाचा असेल तो पुसून उलगडाही होईल. ते होऊन भेटले आहेत. पेंच पडणार नाहीं. दादा गद्रे आपले घरास आले. राजश्री चिंतोपंत देशमुख आपले घरास जाऊं येऊं लागले. त्यांस कांहीं ( दरबारखर्च ) पडिलें असेल नसेल नकळे. तूर्त कामकाज तेच करितात. तारीख फडणीसीची खासा श्रीमंत घालितात. श्रीमंत राजश्री दादा आले आहेत यांजकडे फडणिसीचें कामकाज होईल. मागाहून विनंती लिहितों. श्रीमंत राजश्री दादा आपले वाड्यांत आले. चार दिवस जाहले. अस्त सरे तोंपावेतों येत नाहीं असें लौकिकांत होतें. परंतु वाड्यांत आले. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६४८ श्री. ( आषाढ शु० १४–५ जुलई. )

पै॥ छ० १६ सफर. इहिदे मय्यातैन व अलुफ.

विज्ञापना. ता॥ छ० १२ सफर सेवकाचें वर्तमान यथास्थित असे.

विशेष. काल प्रातःकाळीं श्रीमंतांची गांठ पडली. कर्णाटकांतील वाघाकडील व इकडील फौजांचे मुक्काम आहेत तें, व महाराज यांणी डेरे दिले आहेत, कांहीं फौज पाटणकर याजबरोबर हुपरीचे मुकामीं आहे, हे साविस्तर विनंती केली. "मिरजप्रांतांत पटणवाल्यांनी रोखे केले. गांव लुटिले. ऐवज मनस्वी घेतात. मौजे मालगांव मिरजेनजीक पूर्वेस तीन कोसांवर आहे तेथें मुक्काम नेहमीं केला आहे. छावणीचा रंग दिसतो. प्रांतांत स्थित राहिली नाहीं. गांव वोस जाहले. पुढें याचा विचार स्वामींनीं चित्तांत आणून आज्ञा व्हावी. शिंदे यांजकडील ताकिदी एक दोन वेळां पाठविल्या, परंतु बंदोबस्त होत नाहीं. सांप्रत कसबे रहिमतपूर येथें ठाणें घालावयाकरितां शिंदे यांणीं आपले खासगीकडील कारकून शेंपन्नास स्वार देऊन रवाना केला आहे. रहिमतपुरास दाखल जाहला. तेथें इकडील कमाविसदार आहे त्याणें सांगितलें कीं "मिरजेस विनंती लिहिली आहे. पुण्यासहि आम्हाकडील जाबसालाकरितां सरकारांत कारकून आहे त्यास लिहिलें आहे. श्रीमंतांस विनंति करून आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक होईल असें आहे. तुम्ही बाहेर राहावें. विना जाबसाल आल्याखेरीज ठाणें स्वाधीन होणार नाहीं." असें सांगत असतां गांवांत येऊं लागले, त्यासमईं गांवांत येऊं दिलें नाहीं. आणखीही ते जमाव करीत आहेत. शिंदे यांसहि पत्रें त्यांचीं आलीं. इकडून सरंजाम रवाना करणार. त्यास गोळागोळी जाली असतां कलागत वाढते...शिंदे यांस ताकीद केली पाहिजे." त्यावरून आज्ञा जाली कीं, शिंदे यांचा कसबे मजकुराविशीं आग्रह फार आहे. सरकारांतून अद्याप ठाणे देवितों याप्रमाणें बोलण्यांत आलें नाहीं. कसें होतें पहातों. तृतीय प्रहरीं राजश्री मोरोबादादांची आमची गांठ पडेल तेव्हां सूचनेस चिठी पाठवावी. ते आम्ही बोलोन जाबसाल सांगतों. त्यावरून तृतीय प्रहरीं सूचनेस चिठी पाठविली. उभयतांचें बोलणें काय जाहलें नकळे. मला बोलावून आज्ञा जाली कीं, शिंदे यांजपासीं बोलोन तुम्हास सांगतों. याप्रमाणें आज्ञा जाली आहे. आज स्वारी शिंदे यांचे सैन्यांत राजश्री यादवराव भास्कर यांचे डेऱ्यास भोजनास जाणार. भोजन जाहल्यानंतर शिंदे यांचे डेऱ्यास स्वारी गेल्यानंतर तेथेंही सूचना करितों. काय जाबसाल ठरतो तो मागाहून विनंती लिहितों. जिकडून प्रयत्न होईल तसा करीत आहें. फलदाता स्वामीचे पाय आहेत. आज उद्यांचे दिवसांत काय तें ठरतें. मागाहून विनंती लिहितों. रहिमतपुराहून दामले यांचाहि गडी आला होता त्यासहि

जाबसाल याचप्रमाणें सांगितला होता व पत्र लिहिलें आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६४९ श्रीअंबाबाई प्रसन्न. ( आषाढ शु० १३–४ जुलै. )

आशीर्वाद. विनंती उपरी. राजश्री सर्जाराव बापू आपलेकडून आले त्याणीं सविस्तर मजकूर सांगितला व इकडील सविस्तर मजकूर मशारनिल्हेसीं बोलण्यांत आला आहे. बोलतील त्या प्रों उलगडण्यांत यावें. खातरजमा आपल्यावर आहे. दुसरा विचार नाहीं. आपण सांगतील त्या प्रमाणेंच करूं. सर्व दौलतीचा भरंवसा अभिमान आपल्यास असावा. इकडून आपलेसी कांहीं एक वांकडें नाहीं येविशीं श्री साक्ष आहे. ही दौलत आपली आहे. येविशीं बोलणें बापू बोलतील त्याप्रमाणें करून द्यावें. छ० ११ सफर. लोभ करीत असावा हे विनंती.

नं. ५६५० श्री. ( आषाढ शु॥ १५–६ जुलै. )

आशीर्वाद उपरी. रात्री चिठीचें उत्तर पाठविलें तें पोंचलें. लिहिला मजकूर कळला. आमचें लक्ष आपलेशिवाय दुसरें नाहीं, येविशीं समक्ष खातरजमा जाहलीच आहे. राजश्री आबा काळे व बाळोजी कुंजर या उभयतानीं तो आमची पाठ पुरती घेतली. हुजरात वगैरे लोकांस ताकीद करितात कीं "प्रतिनिधीचे वाडेवर हल्ला करावयाची आहे. तयार व्हावें" ऐसी करितात. लोक पहिले काळे याजकडील आहेत ते गेले नाहीं. तर त्यांचा बंदोबस्त राजश्री दौलतराव शिंदे अलिजाबहादर यांस बोलून बंदोबस्त करून आपण लवकर यावें. दौलतीचा अभिमान आपल्यास आहे. फार काय लिहिणें. छ० १३ सफर. लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. ५६५१ श्री अंबाबाई प्रसन्न. ( आषा. शु० १५–६ जुलै. )

आशीर्वाद उपरी. चिठीचें उत्तर पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. ऐसीयास इकडे अवाया मनस्वी येतात. वाडेंतील आमची

---

१ परशुरामपंत प्रतिनिधि यांणीं हें दौलतराव शिंद्यांस व पुढचीं दोन सर्जाराव घाटग्यांस अशीं तीन पत्रें लिहिलीं आहेत. यांच्या अस्सल प्रती कागलच्या दप्तरांत आहेत व नकला आम्हांस मिळाल्या त्या येथें छापल्या आहेत. यद्यपि या नकला मूळपत्रांशीं मुकाबला पाहून दिल्या असल्याबद्दल त्यांवर कागल संस्थानचे कारभारी दामोदर पर्वतराव व कारकून अंताजी बाजी यांच्या सह्या आहेत, तरी या नकला अगदीं बिनचूक झाल्या आहेत कीं कसें, हें मूळ पत्रें पाहिल्याखेरिज सांगवत नाहीं.

मंडळी धरून नेणार. राजश्री आबाजी कृष्ण काळे याणीं एकवीस असामींची याद जाहली आहे. आज धराधर करणार. आपण लिहिलें कीं, राजश्री आबा चिटणीस व यादव भास्कर हे उभयतां येणार आहेत. त्यास ते वाड्यांत येऊन बागेंतील ( ? ) आणि तिकडे जाणार, कीं आमचे वाड्यांत येणार, तें कळलें नाहीं. तर बाबाजी पाटणकर यास तरी पुढें पाठवावा. आमची अब्रू बेअब्रू सारी तुम्हापाशीं व राजश्री दौलतराव शिंदे अलिजा-बहादर यांवर आहे. तुम्हीं उभयतानीं समक्ष बोलून जें करणें तें एकीकडे नेऊन आपलें हित ( इथे ? ) करावें. नाहींतर काशीयात्रेस जाणेंस निरोप द्यावा. आपलें इमान गुतलें. दुसरा विचार आपलेशिवाय असेल तर महारा-जाचे ( ? ) बीजाचा असेल ही खातरजमा असावी. परस्परें फार बातम्या ऐकण्यांत येतात. स्वदस्तूरची चिठी व दौलतराव शिंदे अलिजाबहादर यांचे हातची चिठी अगत्याची आली म्हणजे भरंवसा लागेल. नाहीं तर आम्ही अब्रूसाठीं मरतों. आबा काळे आम्हांसही वांचू देत नाहींत. दौलतही राहूं देत नाहीं. सारें बुडवितात. आपले हातची उभारणी आहे याचा अभिमान आपल्यास आहेच. आणखीही असावा. इतक्या-वर आमचें दैव फुटलें असल्यास उपाय काय? आपण येऊन एकदां भेटून दोन गोष्टी ऐकून जावें. इतक्यावर मर्जी. आमची अखेर आली. छ० १३ सफर. लोभाची वृद्धि असावी हे आशीर्वाद. चिठी पाहून फाडावी.

नं. ५६५२ श्री. ( आषाढ शु० १५–६ जुलै. )

पै॥ छ० १४ सफर. सन इहिदे मय्यातैन व अलफ.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब साहेबांचे सेवेसीं.

आज्ञाधारक मुसा इस्मित कपितान विनंती विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० १३ माहे सफर जाणोन तुम्ही आपलें स्वकुशल लेखन करावयासी आज्ञा जाहली पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें सुस-मयीं प्रविष्ट होऊन बहुत संतोष जाहला. त्यासी आमची मर्जी आहे कीं आपणापाशीं राहून आपली चाकरी करावी. आपण जैशी डाळभाकर द्याल ती घेऊन आपली चाकरी बजावूं. चाकरींत अंतर करणार नाहीं. आम्ही फिरंगी लोक एकइमानी आहों. त्यासी आपली मर्जी आम्हांस ठेवाव-वयाची असली तरी पत्र पाठवावें म्हणजे कारकून सेवेसीं पाठवून देतों. आपलें पत्र आलें पाहिजे. आपले पत्राची मार्गप्रतीक्षा करीत बसलों आहों. आपलें

पत्र पुरतेपणें आलें म्हणजे सेवेसीं सरंजामसुद्धां येऊन दाखल होतों. आपण चित्तांत कांहीं वसवसा न धरावा. तुमचे आमचीमध्यें ( एक ) विचार आहे. सेवेसीं कळावें. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. ५६५३ श्री. ( आषाढ व० १–७ जुलै. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं. पोष्य गणपतराव विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० १४ सफर यथास्थित असे. विशेष. अलीकडे आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर लिहिलें पाहिजे. राजश्री ( रामचंद्रपंत ) आपा कृष्णा उतरोन उत्तरतीरास आले. मिरजेस येणार म्हणोन वर्तमान आहे. राजश्री ( हरिपंत ) बाबा दुधकट्टी तालुक्यांत बारीचे अलीकडे आहेत. राजश्री चिंतामणराव आपा निघोनें गेले म्हणोन ऐकतों. परंतु कोठें आहेत हें कळलें नाहीं. धोंडोपंतानीं विचार केला नाहीं. शत्रु समीप असतां थोडक्या सरंजामानिशीं मागें राहून दगा करून घेतला आणि सरकारच्या मसलतीस धक्का बसला. याप्रमाणें तूर्त घडलें आहे. करवीराहून निघाल्यापासून ( आपलीं ) एक दोन पत्रें आलीं. अलीकडे विस्मरण जालें न कळे, म्हणोन चित्तास वारंवार वाटतें. आपणाप्रमाणें वडील असतां लेकरांचा परामर्ष कसा न होईल ? त्यांत या प्रांतीं दुसरें कोणी आम्हांस स्थळ ( नाहीं ) यास्तव विनंती लिहिली आहे. सदोदित ममतापुरःसर सांभाळास आविस्मर असावें. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे विनंती.

नं. ५६५४ श्रीगणराज. ( आषाढ व० १–७ जुलई. )

पौ॥ छ० १४ सफर, इंदुवार. तीन तासरात्र. आषाढ मास. इहिदे मय्यातैन व अल्लफ.

विज्ञापना. आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. पत्रीं आज्ञा ‘ रकमेची चौकशी आपण करितीलच ’ त्यास रकमेची चौकशी कशी करावी ती आज्ञा जाली पाहिजे. इसमेताचें पत्र ठेऊन घेतलें आहे. इसमेतानें आपल्या पत्रीं लिहिलें, ‘ येक कुंपणी घेऊन आपण गेलों होतों. ’ त्यास ही गोष्ट रा॥ बळवंतराव यांसच पुसावी. दरवाजास चौक्या बसवीत

१ पानशे. २ लढाईंतून बचावून गेले. ३ पत्र रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें बाळासाहेबांस मिरजेस.

आला. गोटांत दोन तोफा होत्या त्यांत बार भरोन कुंपणी येथें ठेविली होती त्यांस सांगोन आला होता जे, 'आम्हांवर गलबल जालीया तुम्ही तोफा तटास लावा. आम्ही खासा धरितों. असे बेत करोन आला. मग पैका देऊन तोड पाडली. समयास पैका नाहीं, तव्हां बाइ-कांच्या वस्ता गहाण देऊन भोजन केलें. तैनातजाबता वडिलापाशींच जाला. त्या तेरखेपासून लोक हजेरीस आल्याप्रमाणें खटला जाला त्या दिवसापावेतों हिशेब करोन पदरीं घातला. विडे पानदानें पाठविले असतां घेतले नाहींत असा थोर माणूस ! पत्र तो या प्रकारचें लिहिलें, त्यास कोण प्रकारें तजवीज करावी ती आज्ञा जाली पाहिजे. चौकशीचे अंतीं लागू जालिया ती आज्ञा देतील. परंतु प्रथम तैनातजाबता जाला ते समयीं उभयतांची एकवाक्यता ठरोन मग मिळकत मिळेल ती विभागून घ्यावी किंवा घ्यावी, काय गारूड समजत नाहीं. आज्ञा येईल त्या प्रमाणें वर्तणूक करीन. रा॥ धोंडो अनंत याचीं पत्रें आलेलीं पाठविलीं आहेत. चिरंजीव क्षेम आहेत. दोन जखमा आहेत. फौजही शाबूत आहे असें लिहिण्यांत आहे त्यांजकडील. त्यास बारकाईनें शोध करवावा. जलचरापासोन काय पैका घेतला ? मीही सावकाराकडे शोध करितों. मिरजेंतील सावकार व भीमभट यांजकडे बारकाईनें शोध बेतवार दस्ताऐवजीं लागलिया उत्तम जाहलें. लहान रक्कम नव्हे ! ही गोष्ट अगदीं मला कळली नाहीं. हल्लीं आज्ञापत्र आलें, त्यास कालच विपरीत म्हणावा ! इस्मेतानें इशारा करावयाचा होता. तें न करितां आपणास विनंती लिहिली ! त्यांतही एक कुंपीण घेऊन आपण गेलों होतों असें लिहिलें ! त्यास ही गोष्ट लटकी. रा॥ रावजी-पाशी पांच सातशें माणूस तोटे भरून आला. त्यास रा॥ रावजी आम्ही तीन प्रहरपावेतों उपाशीं होतों. काळ परम दुस्तर. कांहीं पत्रीं लिहितां येत नाहीं. आपला पैका आहे; विनाकारणिक भक्षिला असतां जिरणार नाहीं. वडिलीं सावकारींत भीमभटापाशीं शोध करून रकम लिहिली या अजमासें ऐवज असलिया अडकवावा. गुप्तरूपें उमज सांपडूं न देतां अडकवून ठेवावें. मग आपणच उजगऱ्यास येईल. गुंता नाहीं. चौकशीची आज्ञा जाली पाहिजे. रवाना छ० १४ सफर. विदित होय हे विज्ञापना. वीस हजार कसे खाल्ले त्याचा तपशील आम्हांजवळ आहे असें त्याच्या लिहिण्यांत आहे. त्यास ह्यां पत्राचा जाब पाठवावा. मुद्दाम खिजमतगार पाठवावा. तपशील लिहोन आणवावा. मग सहज पैका येतो. गुंता नाहीं. मुद्दाम गडी रवाना होऊंन इकडे लिहांवया

आज्ञा जाली पाहिजे. प्रांतांत बाकी राहिली नाहीं अशी आज्ञा, त्यास आपली सत्ता काढणारानीं काढून चिरंजीवास उपदेश करून ठाणीं घातलीं हल्लीं ही गत जाली. श्री गजाननाची इच्छा ! त्यास काय करावयाचें ? दुसऱ्याचें वाईट इच्छिलें असतां आपलें बरें होत नाहीं. आपल्याकडे तालुका असता तर चार रुपये देऊन तोड काढली असती. होणारास काय करावें ? हे विज्ञापना.

नं. ५६५५ श्री. ( आषाढ–जुलई. )

नकल.

विज्ञापना. नवे कारभारी प्रमुख जाहले यांपाशीं मुख्यानीं करार केला कीं, " तात्या धरावे. पटवर्धन व बाया याच अन्वयें कैद कराव्या. " याप्रमाणें त्यांस आज्ञा होऊन " पंचवीस लाख रुपये द्यावे. स्वामींचा झाडून सरंजाम कारभारी यांस द्यावा, असें ठरून हा घाट त्यांनी करावा, व आपले पदरचें जुनें मंडळ आपण जप्त करावें, असा निश्चय करून काम करावें ( असें ठरलें. ) त्यास येथील बेत चालला नाहीं. ज्याचे ते सावध जाले. विदुरांकडील बेतांत इष्ट मात्र सांपडले. स्वामी व बाया हातीं लागल्या नाहींत. तेव्हां मसलत साधली नाहीं. हल्लीं कारभारी यांचें बोलणें पडलें कीं, पंचवीस लाख रुपये द्यावयास केले ते द्यावे. तेव्हां मुख्यानीं उत्तर केले कीं ये विषयींचा तुम्हांजवळ आमचा कांहीं लेख आहे कीं काय ? त्याजवर कारभाऱ्यांचें बोलणें पडलें कीं, लेख कशास पाहिजे ? स्वामींकडून बोलावयास बळवंतराव नागनाथ व कुंजर आले ते स्वाधीन करावे. त्यांजपासून पैका घेऊं. याप्रमाणें बोलून गेले आहेत. सारांश आंतील आंत भांडून मरावें असें होत आहे. कोणते थरास जातें पहावें. पत्रें लिहितों हीं वाचून विसर्जन होत असावीं. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६५६ श्री. ( आषाढ शु० २–८ जुलई. )

पै॥ छ० १९ सफर. सन इहिदे मय्यातैन.

तीर्थस्वरूप रा॥ बाळासाहेब वडिलांचे सेवेसीं.

---

१ पुण्याहून चाचा काळे यानीं रामचंद्रपंत आपास पत्र पाठविलें त्याची ही नकल. त्यांजकडून मिरजेस आलेली. २ घाटग्यांशीं पेशव्यानीं करार केला. ३ तुमचा. पटवर्धनांचा. ४ चक्रदेव वगैरे. ५ पटवर्धन कैद करण्याचा. ६ शिंद्याकडील. ७ बाळोबातात्या. ८ घाटग्यांचें.

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता॥ छ० १५ सफरपर्यंत पुणें येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असे. विशेष. पलटणांचा मुक्काम मालगांवावर होऊन प्रांतांत बहुत उपद्रव केला म्हणोन ती॥ रा॥ आपासाहेबानी लिहिलें, आणि वडिलांची स्वारीही माघारी आली म्हणोन ऐकिलें, त्यावरून रा॥ दौलतराव शिंदे यांजकडे जाऊन मिरजप्रांतांत पलटणवाले यांचा उपद्रव बहुत जाहला; आणि मिरजेच्या शेजारीं पलटणें राहिलीं; म्हणोन सर्व वर्तमान समजावलेनंतर शिंदे याणीं सतलंजसाहेब यांस सांगून तेथें पलटणांत जो सरदार आहे त्यास चकती देऊन पाठविलें आहे कीं, याजउपरी मिरज प्रांतास उपद्रव करूं नये. तैसेंच ती॥ रामचंद्रपंत आपांचे तालुकेस हरयेकविशीं उपद्रव करूं नये. आणि मालगांवाहून कूच करून येडूरचे मुक्कामास जावें. ऐसें साहेबानें चकतींत लिहिलें आहे. त्यास हल्लीं ही चकती पलटणांत खुली शहाण्या कारकुनाबरोबर पाठवून पलटणचे सरदारास पोहोंचवावी, म्हणजे कूच करून जातील. दिक्कत पडणार नाहीं. सेवेसी कळावेंकरितां लिहिलें आहे. इकडील वर्तमान तर परवां जी मंडळी कैद जाहली ती सारी हडपसरच्या किल्ल्यावर स्थापना जाहली. त्यांपैकीं चक्रदेवाचे एक बंधु व चिमणाजी खंडेराव जाधवाकडील शृंखलाबद्ध सरकारच्या वाड्यांत आहेत. तूर्त श्रीमंतांपाशीं प्रमुख बाळोजी कुंजर, व बळवंतराव नागनाथ, गोपाळराव मुनशी, सदाशिव माणकेश्वर, म्हणजे पिंगळयांचे घरचे, ऐसे प्रमुख सरदार आहेत. त्यांत कुंजर खरे. बाकीचे प्रकरणानुसार कृपेंत आहेत. मुनशी, इंग्रज पालमर यांजकडील संधान. माणकेश्वर नबाबाकडील संधान. नागनाथ श्रीमंतांची दया! येणेंप्रमाणें वर्तमान आहे. चिंतोपंत देशमुख फडावर आहे. श्रीमंत रावसाहेब स्नानसंध्या करून आहेत. शिंदे यांचे घरचा मजकूर सर्जेराव जें करील तें होतें. परंतु यादो भास्कर आणि चिटणीस मंडळ मुखत्यार आहेत. त्यांशिवाय कांहीं होत नाहीं. यजमान घाटगे यांचें ऐकतात, सबब तेही त्याच रंगांत आहेत. परंतु सर्वाध्यक्षता त्यांजकडे, यांत समजावें. आम्हांविशी श्रीमंतांची मर्जी बरीच आहे. परंतु आज शिंदे जसें सांगतात तसें वर्तणें श्रीमंतास. नहून उपाय नाहीं. आणि त्यांतही श्रीमंतांचा मनोधर्म पाहतां जुनें मंडळ नसलें तर सुखच आहे. मग राज्य बुडो किंवा राहो! परंतु वडिलांचा सूड

---

१ अमृतराव.

उगवावा ही इच्छा कायावाचामनेंकरून आहे. ज्याच्या त्याच्या दैवानुसार घडेल तें सुखेनैव घडो. सारांश आज परचक्र उठत नाहीं म्हणोन कांहीं स्थीत आहे. करवीरकर यांजसारखे दैववान तूर्तच समाजांत कोणी नाहीं. सविस्तर रा॥ मोरोपंत लिहितच असतील. बहुत काय लिहिणें सेवेसी विदित होय हे दिज्ञापना. श्रीमंत मोरोबादादा आले आहेत त्यांजवरही श्रीमंतांची कृपा आहे. परंतु कारभारांत नाहींत. त्यांचें तेज पडणें अवघड आहे. कळावें हे विज्ञापना.

नं. ५६५७ श्री. ( आषाढ शु० २--८ जुलै. )

पै॥ छ० २२ सफर. सन इहिदे मय्यातैन. मंगळवार.

ती॥ राजश्री आपासाहेब वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० १५ सफरपर्यंत पुणें येथें सुखरूप असें. विशेष. वडिलीं पत्रें छ० ९ सफरचीं पाठविलीं तीं काल दोन प्रहरीं पावलीं. पत्री लिहिलें कीं " पलटणवाले यांचा उपद्रव मिरजेपाशीं जाहला. प्रांत अगदीं मारला. याजमुळें ती॥ राजश्री बाळासाहेबानीं कृष्णातीरास येणें म्हणोन लिहिलें त्याजवरून जमखिंडीच्या सुमारें आलों. " म्हणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. ऐशियास आपणापाशीं सामान थोडें असतां कलागत करतां येत नाहीं. तेव्हां सामच बरें, हें मनांत आणून परवां राजश्री दौलतराव शिंदे यांजकडे जाऊन त्यांस पलटणांचा उपद्रव समजावून सतलंजसाहेबाची चकती पलटणचे सरदारांस घेतली आहे कीं, याजउपरी मिरजप्रांतास उपद्रव करूं नये, जप्ती करूं नये, आणि मिरजेपाशीं आहां ते कूच करून येडुरास जाणें. ऐसें त्याणीं लिहून दिलें आहे. ती चकती हल्लीं ती॥ राजश्री बाळासाहेबांकडे पाठविली आहे. मिरजेहून पलटणांत चकती पाठविली म्हणजे पलटणचें कूच होईल. दिकत पडणार नाहीं. आपण म्हणतील माघारीं कां येतात ? त्यास कांहीं इलाज आहे कीं काय ? चिकोडी तालुकेंत ठाणीं घालावयास जातात. तूर्त मिरजेजवळचा शह सुटला म्हणजे पुरे. चिकोडीतालुका घेऊन करवीरकर यांस देणार. आणि पुढें तीच पलटणें आपलेबरोबर जाऊन वाघाचें पारिपत्य करावें हेंही बोलतात ! मन मानेल तैसें बोलतात. असो. तूर्त मिरजेजवळचा वेध सुटला ऐसें जालें आहे. पलटणांचा सरदार चकती मानतो कीं कसें हेंही समजेल त्यासारखा उद्योग करितां येईल. कळावें. आमचा सरंजामच

शिंदे यांस देणार होते, त्यास देऊं नये ऐसें ठरण्यांत आलें त्यासच विश्वप्रयत्न लागला तो लिहून किती कळवावा ? असो. आपण बहुत उदास होऊन लिहितां कीं, अन्नवस्त्र ज्याणें निर्माण केलें त्याणें सिद्ध करून ठेवलेंच आहे. पूर्ववत् बंदोबस्त करून देऊन सेवा घ्यावयाची असल्यास कळवावें म्हणोन लिहिलें, त्यास आपण सर्वजाण आहेत. या मजकुराची पुरवणी अलाहिदा लिहिली आहे त्यावरून कळेल. सारांश कालावर दृष्टि देऊन दिवस काढावे म्हणोन वारंवार लिहिणें प्राप्त आहे. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६५८ श्री. ( आषाढ शु० २–८ जुलै. )

विज्ञापना. श्रीमंतांची मर्जी आपणावर बरीच आहे. आपल्या चित्तांत सावनूर तालुका कर्जांत असावा, सरंजाम आहे तो असावा, शिवाय सरंजाम गेला आहे तो द्यावा, करवीरकरांकडून कर्जाचा फडशा व्हावा, चिकोडी तालुका आहे तसा असावा, हा आपला मनोदय. याप्रमाणें चालविलें असतां आपणाकडून सरकारसेवेंत अंतर नाहीं ही गोष्ट तो राजमार्गाची; ती कै॥ नाना व हरीपंततात्या यांजबरोबर गेली ! त्यांत ती॥ कै॥ भाऊसाहेबही गेले; याजउपरी श्रीमंत जसें सांगतील तें ऐकून काल घालवावा इतकाच अर्थ. आपण म्हणतील कीं कोठेंही पोट भरूं. जर अशी स्थलाची योजना पक्की जाहली असली तर फार उत्तम. म्हणजे तो मोठाच नक्ष ! परंतु याजउपरी श्रीमंतांसीं कृत्रिम करूं नये. " येणेंप्रमाणें आमचें सरकारांतून चालविल्यास सेवा करून सिद्ध आहों. नाहीं तर सरकारची दौलत आहे ही हवालीं करून घ्यावी आणि सुखें करून निरोप द्यावा. स्वामीचेंच नांव घेऊन पोट भरूं; " याप्रमाणें विनंती करून जाहल्यास दिगंतकीर्ति आहे ! आणि असें न होय तर कालावर दृष्टि देऊन श्रीमंत जशी आज्ञा करितील ती मान्य करून चालावें हेंही सर्वोपरी उत्तम आहे. आधीं आपलें श्रीमंतांशीं पन्नास वर्षांचें विरुद्ध. त्यांत याच श्रीमंतांस आम्हांकडून अपकार घडला. अपकार घडूनही आमचें तिरपगडें पडलें ! मागती श्रीमंतच पुढें जाहले. त्यांतही मागती सोबती होते ते मेले. कांहीं कैद जाले. याजउपरी आमचा वारीसदार श्रीमंतांपाशीं कोणी नाहीं. तेव्हां याजउपरी श्रीमंतांपाशीं काल घालविणें तर जशी आज्ञा करीत तसें वर्तन राहिलें पाहिजे. सर्व आपणास कळावें करितां तपशीलवार लिहितों. या लिहिण्याचें मनन आपण करीत असावें. आपला सरंजामच शिंदे यास देत होते तेवढा देऊं नये असें ठरत आहे. त्यास आपण

दोनी महालच्या सोडचिठ्या आधीं पाठवाव्या. आपण लिहिलें कीं, वाघानें तालुका घेतला तेव्हां देणें अथवा न देणें कोठें राहिलें ? त्यास हाही मजकूर श्रीमंतांचे श्रवणीं घातला. परंतु त्यांस सत्य वाटत नाहीं. येथें श्रीमंत (बाजीराव) बाबासाहेब बोलतात कीं, महालच्या सोडचिठ्या देणें. आम्ही वाघ पाहून घेऊं. ऐसें स्पष्ट म्हणतात. त्यास वडिलीं दोनी महालच्या सोडचिठ्या आधीं पाठवाव्या. अथवा मी श्रीमंताशीं कसें बोलावें तें ल्याहावें. तसें बोलेन. परंतु मग मी येथें राहून अबरू राहणें परम संकट आहे. गतवर्षीं रावसाहेबांस दोन महाल दिले. यंदां हे दोन दिले. बाकी राहिले तेच आपले म्हणावे. वाघाकडून सुटल्यास पुढें राहिले त्यांपैकीं देणें म्हटलें म्हणजे देऊन बाकी राहतील तेच आपले म्हणावे ! असा अर्थ येथील आहे. आज श्री॥ (सवाई) रावसाहेबांनीं उडी टाकीपर्यंत आम्ही साव होतों. आतां हें मंडल साव, आम्ही फितुरी, ऐसें जाहलें ! यांत दिवस घेणें हे चतुराईनें घेतले पाहिजेत. आपण म्हणतील कर्जदारास काय द्यावें ? याजउपरी कर्जदार झक मारतात ! कैलासवासी रावसाहेब व नाना व हरीपंत यांस जाऊन पुसा अथवा आज राज्य करितात श्रीमंत त्यांस जाऊन पुसा असें धट्ट होऊन दिवस जातां जातां जें राहील तेंच आमचें म्हणून आर्जवानें–त्यांत दरबारखर्च करून–चौघे येथें प्रमुख आहेत त्यांस आपले करून दिवस घेतल्यास या श्रीमंतांपाशीं परिणाम लागेल. नहून परिणाम नाहीं. मी येथें श्रीमंतांची अन्योन्य खातरजमा करीत आहें कीं आम्ही श्रीमंतांचे पायांशिवाय वर्तणूक करीत नाहीं. जशी मर्जी तशीच वर्तणूक घडेल. हा पाठ माझा चालला आहे. आमचे दैवानें कोठें परचक्र उभें राहिलें म्हणजे आमचें काम लागतें. अथवा या देशांतून शिंदे नाहींसे होईनात ! म्हणजे गरज लागती. बरें ! काळ काढतों. ईश्वर तोही दिवस आणील. चिंता काय आहे ? करवीरचा तह केला त्यांत आमचे स्वालजाब कांहीं उगवणी होत नाहीं. तूर्त असाच प्रसंग आहे. याजउपरी कांहीं दिवस मुलेंमाणसें तासगांवीं ठेवून परिणाम नाहीं. कुसेगलची तजवीज असावी. तूर्त तीन महिने कृष्णाबाईस पाणी आहे तों चिंता नाहीं. तैसेंच जमखिंडी, गोकाक येथें सामान यथास्थित असावें. आपण जसे जमखिंडीच्या रानांत आहेत ते ठीकच आहेत. तूर्तकाळीं दैव करवीरकर यांचें उभें राहिलें आहे. सरकारांतून आपण होऊन चिकोडी देऊन आणखी पावणेतीन लाख रुपयांचा तालुका देणार, यापरतें दैव तें काय म्हणावें ? असो.

येथें आहे प्रकार आपणास कळावा म्हणोन लिहिलें आहे. यांत जसें वागावयाचें असेल तसें वागावें. परंतु याजउपरी येथें कोणी तरी दरबारी खाशानीं असल्याशिवाय परिणाम नाहीं. आणि येथें असला म्हणजे श्रीमंतांची खातरजमाही होती. दूर राहून परिणाम नाहीं असें माझें मानस आहे. मग आपली मर्जी. ती॥ दाजीसाहेब अथवा बाबासाहेब यांतून एकजणानें दरबार रक्षून असावें म्हणजे कांहीं चिंता नाहीं. मी येथून अनेक प्रकारें लिहितों त्यांत आपल्यास खरें खोटें वाटेल. मुख्य यजमान येथें असले म्हणजे यथास्थित होईल. अथवा येथें श्रीमंतांशीं बोलून सर्व बंदोबस्त करून आपलें पूर्ववत्‌प्रमाणें करून सरकारांतून घेई असा असल्यास वडिलीं आधीं पाठवावा. मी त्याचे हाताखालीं जशी पाहिजे तैशी मेहनत करीन. येथें एका खाशानें यावें हें फार चांगलें. वडिलींही याचा विचार करावा. येथें आलें असतां दगा फटका हा अंदेशा चित्तांत येईल याची खातरजमा मी करून घेतों. वडिलीं बिनदिक्कत योजना करावी. सर्व मजकूर कळावा करितां लिहिला आहे. रवाना छ० १५ सफर. हे विज्ञापना.

नं. ५६५९ श्री (आषाढ व० ३–९ जुलै.)

विज्ञापना. वडिलीं घोरपड्याचे घोड्यांचा मजकूर "पडल्या घोड्यांत वांटलीं; कांहीं राहिलीं तीं वांटावयाचीं आहेत; आणि घोरपडे येथेंच आहेत;" म्हणोन लिहिलें, त्यास उत्तम आहे. मी आपणास लिहिल्यावर आजपर्यंत गोष्टी मागती निघाली नाहीं. कदाचित् जरी उत्तर निघाल्यास वडिलीं लिहिल्याप्रमाणें विनंती करीन. मग जें उत्तर होईल तें लिहून पाठवीन. वाळव्यांचा मजकूर लिहिला होता त्याचें ( आपण ) उत्तरच लिहिलें नाहीं. येथें स्वालजाब कसा करावा ? आपली ओढ एक प्रकारची, येथील मर्जी एक प्रकारची, तेव्हां कांहींच थाक लागत नाहीं. आपले मनांत येईल कीं हाच मध्येंच पिकवून लिहितो, यास कसें करावें ? जर हें पत्र पावतांच दोनी महालांच्या सोडचिठ्या आपण पाठविल्या तर येथें माझी वस्ती. नाहीं तर येथें राहून परिणाम लागावयाचा नाहीं. जरी महाल वाघानें घेतले असले तरी चिंता नाहीं. परंतु आधीं दोनी महालांच्या सोडचिठ्या पाठवाव्या. वरकड मजकूर जो आढळेल तो लिहितच आहें. राजश्री बाळाजीपंतदादाही येथेंच आहेत. गुप्त आहेत. आपलीं पत्रें येतात तीं त्यांस दाखवितो. तूर्त श्री॥ राजश्री मोरोबादादा आले आहेत. माझा परिचय नाहीं, यास्तव परवां लिहिलेंच आहे त्याप्रमाणें

राजश्री धोंडोपंतबाबा जोग यांस पाठविलें म्हणजे दादांपाशीं बोलण्यास परस्परें बोलावयास दिक्कत पडावयाची नाहीं. यास्तव विनंती लिहिली आहे. तूर्त काळीं कुंजरप्रमुख श्रीमंतांपाशीं आहेत. मी त्यांजपाशींही जात असतों. आपण पुण्यवान् आहेत. सर्व बंदोबस्त होईल. सारांश एका खाशानें येथें असावें हें उत्तम आहे. मग मर्जी. येथें असल्यानें गुण फार आहेत. येथें कोणी नाहीं यांत दोष फार. हें सर्व मनन व्हावें. चिकोडी तालुका जातो यांत संदेह नाहीं. शिराळें महाल घाटगे यास दिला. रवाना छ० १६ सफर. बहुत काय लिहिणें. तीा। राजश्री बाबासाहेब रामदुर्गाच्या रानांत आहेत म्हणोन लिहिलें, उत्तम आहे. चिंतामणरावआपा एकटेच कसे गोखले यांजबरोबर गेले समजत नाहीं. तिकडे वाघ आहे. दगा करावयास चुकणार नाहीं. याजउपरी आपणदेखील वाघावर जावें ऐशीं पत्रें सरकारचीं घेऊन पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६६० श्रीगणराज. ( आषाढ व० २–८ जुलई. )

पै॥ छ० १६ सफर सन इहिदे मय्यातैन आषाढ.

अपत्यें रघुनाथरायानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेष. चि॥ रा॥ रामचंद्रपंत आपा यांचे लष्कराहून वे॥ रा. विष्णु दीक्षित यांचें पत्र वे॥ रा॥ बाबा दीक्षित यांस आलें त्यांतील मजकूर तुंगभद्रा उतरोन इंग्रजांचीं चार पलटणें अलीकडे आलीं. राणीबिदनूर वगैरे दोन चार ठाणीं वाघाचीं उठवून रा॥ बाळकृष्णपंत लागू यांचे स्वाधीन केलीं. इंग्रजांनीं चि॥ रा॥ आपांकडे पत्रें व वस्त्रें पाठविलीं. इकडून चिरंजीवानींही इंग्रजांस वस्त्रें व पत्रें पाठविलीं. याप्रमाणें पत्र होतें. वडिलांस कळावें. चि॥ रा॥ बाबांचा मुक्काम मुदलावीस आहे म्हणून लिहिलें होतें. रवाना छ० १५ सफर. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६६१ श्री. ( आषाढ व० ३––९ जुलै. )

विनंती विशेष. राजश्री आपा देसाई व त्याजकडील कारकून लष्कराचे वळखी ते मालगांवच्या जमावांत आले असें ऐकून मतलब काय याचा शोध काढावा म्हणून मजकडून कोणी पाठविला[3] होता. त्याचे सांगणेंत एकंदर तालुका द्यावा अशी पुणेंची आज्ञा आहे. व हजार फौज तूर्त ठेव-

---

१ पत्र कुरुंदवाडाहून मिरजेस. २ कोणा मध्यस्थाचें पत्र बाळासाहेबांस. ३ आपा देसाई याजकडे

णार व आणखी दोन पलटणें पुण्याहून येणार असे बहुत उमेदीच्या गोष्टी सांगितल्यानंतर ( आपा देसाई यानीं मला ) सांगोन पाठविलें जे पलटण-वाला आहे त्याचें म्हणणें मिरजेवर हालचाल करावी असा बहुत आग्रह आहे. परंतु माझ्या चित्तांतून पटवर्धन यांच्या घरोब्यास अंतर करूं नये. होईल तें पाठीवर टाकावें. त्यास चार रुपये कबूल करावे म्हणजे कूच करून नदीपार व्हावें हा बेत करितों. यास्तव आपण राजश्री बाळासाहेब यांच्या कानावर घालून गोष्ट होती किंवा नाहीं हें कळवावें. न कळविलें असतां उद्ईक दोष मजकडे येईल यास्तव लिहिलें आहे. मिरज तालुक्यां-तही फिरोन रोखे झाडोन केले आहेत. याचें उत्तर पाठवावें म्हणून दोन वेळां चिठ्या आल्या त्यास जशी आपली आज्ञा होईल त्याप्रमाणें उत्तर सांगतों. कृपा करावी हे विनंती. सांगितल्याप्रमाणें बोलोन तोंड करितात असें आहे तर मजकडील कारकून मिरजेस पाठवितों. ठरावांत आलें असतां हर-एकविशीं उपद्रव होणार नाहीं. कृपा करावी हे विनंती.

नं. ५६६२ श्री. ( आषढ व० ३—९ जुलै. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधररावजी स्वामीचे सेवेशीं.

पोष्य नारो विनायक. कृतानेक सा॥ नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ० १६ माहे सफर यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. "गोखले धोंडजी वाघ यांची लढाई आषाढ शु॥ ७ रविवारीं होऊन गोखले यांचा मोड जाला. खुद्द गोखले व त्यांचे पुतणे कामास आले. एक पुतण्ये व चि ॥ राजश्री चिंतामणराव आपा अघाडीस होते ते कोणत्या पल्ल्यास जाऊन पोंचले हें पक्कें वर्तमान आलें नाहीं. आनंदरावदादा यांस देवाज्ञा जाल्याचें ऐकिलें. बहुत अनुचित गोष्ट जाली" म्हणून लिहिलें तें कळलें. गोखले यांचा मोड जाला व खुद्दही ठार जाहले हें फार वाईट जालें. ती॥ आनंदराव दादांचा काळ जाहला याजमुळें ती॥ राजश्री माधवरावजी वांईस आले आहेत. गोखले यांचे पुतण्ये ठार जाले. त्यांचे स्त्रीनें नरगुंदीं सहगमन केलें म्हणून नरगुंदाहून पत्र आलें त्यांत लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ करावा हे विनंती.

---

१ पत्र अथणीहून २ रास्ते.

नं. ५६६३ श्रीगणराज. ( आषाढ व० ३—९ जुलई. )

पै॥ छ० १६ सफर. आषाढमास. सन इहिदे मयातैन व अल्लफ. विज्ञापना. चिरंजीव राजश्री गोपाळराव रामचंद्र यांचे नांवें फौजेचा सरंजाम पांच हजारांचा[2] इंग्रजांनीं द्यावयाचा करार करोन तैनातजाबता करोन देऊन वस्त्रें जवाहीर पाठविलीं असी जनवार्ता बोलतात. रवाना छ १६ सफर विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६६४ श्रीगणराज. ( आषाढ व० ३—९ जुलई. )

पै॥ छ० १७ सफर सन इहिदेमय्यातैन आषाढ.

विज्ञापना. चिरंजीवांकडून[3] पत्रें आलीं त्यांची नकल पहावयास पाठविली ती पावली. श्रीगजाननें मोठी खैर केली. गोखलेही गेले. अनुचित गोष्ट जाली. चिरंजीव पुढें इंग्रजाकडे जाणार. कागदोपत्रीं गुंततील, यास्तव बुद्धिवाद लिहावयाचा असलिया आपणाकडून लिहावा. पलटणें वगैरे तुंगाउत्तरतीरीं आलीं हीं वर्तमानें चिरंजीव रा॥ रामचंद्रपंत आपाकडून लिहून आलीं असतील त्यांतील दारमदार काय होतात तेही लिहावया आज्ञा जाली पाहिजे. येथेंही दहा[4] तोफा केल्या. वडिलांस कळावें. रवाना छ० १६ सफर विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६६५ श्रीवेंकटेश. ( आषाढ व० ३—९ जुलई. )

तालीक.

पै॥ छ० २१ सफर. सन इहिदे मय्यातैन.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री आपासाहेब स्वामीचे सेवेसीं.

पो॥ वेंकटराव[5] भास्कर. साष्टांग नमस्कार उपरी येथील कुशल ता॥ छ०१६ सफर जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. इकडील वर्तमान परवां लिहिलें आहे तें पत्र पाहून कळलेंच असेल. अलीकडील वर्तमान तर रा॥ चिंतामणराव आपा व रा॥ बापू गोखले यांकडून

---

१ कुरुंदवाडाहून पत्र रघुनाथराव यांचें मिरजेस बाळासाहेबांस. तसेंच पुढचें.
२ म्हणजे पांच हजार रुपयांचा. पांच हजार स्वारांचा नव्हे. तितक्या स्वारांच्या बेगमीस पंधरा लक्ष रुपयांचें दरसाल उत्पन्न पाहिजे. तें इंग्रज कोठून देणार ?
३ चिंतामणराव आपाकडून. ४ चिंतामणरावांच्या खैरखुशालीबद्दल कुरुंदवाडास.
५ भावे. पत्र नरगुंदाहून.

माणसें आलीं. जखमा खैर आहेत. स्वल्प दिवसांत जखमा बऱ्या होतील. कळावें याकरितां लिहिलें आहे. नबाब यांचा मुक्काम गरगावर होता. सांप्रत जाडरहेबळीवर आला म्हणोन वर्तमान आहे. इंग्रज तुंगभद्रा अलीकडे आले ते राणे बिदनूर परगण्यांत ठाणीं घातलीं. देवगिरीचे नदीवर इंग्रजांचा मुक्काम आहे. हल्लीं नबाबांकडून आपले नांवें लाखोटा आला तो पाठविला आहे. प्रतिउत्तर आलें पाहिजे. नबाब यांकडे पाठवावयास येईल. नवलगुंद तालुका देसाई यांस बाहाल करून दिला. ठाणीं घालावयास देसाई तालुकेंत आले आहेत. इंग्रजांच्या तोंडावर चार हजार फौज नबाब यांणीं पाठविली आहे. याप्रमाणें वर्तमान आहे. सेवेशीं कळावें याजकरितां लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंती.

नं. ५६६६ श्री. ( आषाढ व० ४–१० जुलई. )

नक्कल.

पै॥ छ० १७ सफर सन इहिदे मय्यातैन. आषाढ.

श्रीमंत रा॥ बाळासाहेब साहेबांचे सेवेसीं–

आज्ञाधारक मुसा इस्मित कपितान. विनंती विज्ञापना. येथील कुशल जाणोन आपले स्वकुशल लेखन करावयासी आज्ञा जाली पाहिजे. विशेष. स्वामीनीं कृपावंत होऊन पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें कीं, रा॥ गणपतरावजी यांणीं तुम्हांपासून ऐवज जो घेतला असेल तो तपशीलवार लिहून पाठविणें म्हणोन आज्ञा जाहली, त्याजबरोबर तपशीलवार याद पाठविली आहे. तरी हे ऐवज घेऊन आम्हांस पाठवावा. आमचे मुला लेंकरांचें अन्न आहे. सेवेसीं कळावें. ऐवज आम्ही रा॥ गणपतरावजीपासून जेथें गाठ पडेल तेथें ऐवज घेऊं. आपण धणी आहेत. या गोष्टीची दर्याप्त करावी. यादीबरहुकूम ऐवज रा॥ सिनापा दिवान याचे मार्फतीनें पावले आहेत. आपले सरकारचा वाजवी जो हिशेब होईल तो हिस्सा घ्यावा. बाकी आमचा ऐवज द्यावा. आम्ही आपला ऐवज सोडणार नाहीं. सेवेसीं कळावें बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

आम्ही जेथें जातों तेथें गणपतरावजी सांगोन पाठवितात कीं, यांसीं ठेऊं नका. ऐसी कांहीं रीत असती कीं काय हें लिहून पाठवावें. हे विज्ञापना.

---

१ धोंडजी वाघ मुल्केजहां बहादूर !

नं. ५६६७ श्री. ( आषाढ० व० ४–१० जुलई. )

पौ॥ छ० २० सफर. रविवार अस्तमान. सन इहिदे मय्यातैन व अलफ. आषाढ मास.

सेवेसीं मोरो आपाजी. दोनी कर जोडून शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १७ सफर गुरुवार. सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं पत्रें छ० १२ सफरचीं पाठविलीं तीं छ० १६ सफर सौम्यवारीं तास रात्रीस पावलीं. धोंडोपंत गोखले व त्यांचे पुतणे लढाईत पडले. झाडून सलतनत गेलें. दुसरे पुतणे बापू गोखले व श्रीमंत रा॥ चिंतामणराव आपा फौजेंत अघाडीस चालत होते ते हल्याळ सांबरणीकडे गेले ऐसी बातमी आली दोडवाडाहून, त्यावरून स्वामीनीं लिहिलें तें सविस्तर कळलें. श्रीमंत रा॥ पंतप्रधान यांस विनंती करणें म्हणोन आज्ञा, त्याप्रमाणें आजच प्रातःकाळीं विनंती केली. अगोदर हें वर्तमान दोन दिवस श्रीमंतांस आणिगिरेयाहून कमावीसदार याणें लिहिलें होतें. त्याही पत्रांतील असाच भाव लिहिला होता. जाजती नाहीं. श्रीमंत रा॥ चिंतामणरावआपा यांस जखमा लागल्या आहेत म्हणोन अणीगिरें येथील पत्रांत आहे. तहकीक वर्तमान आल्यावर लिहावयाची आज्ञा जाली पाहिजे. इकडील सविस्तर अलाहिदा विनंती लिहिली आहे त्यावरून श्रुत होईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६६८ श्री. ( आषाढ व० ४–१० जुलई. )

पौ॥ छ० २० सफर. सन इहिदे मय्यातैन आषाढमास.

विज्ञापना. ता॥ छ० १७ सफर गुरुवार. सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. रा॥ दौलतराव शिंदे अलिजा बहादर याणीं छ० १५ सफर भौमवारीं यशवंतराव शिवाजी व काळा बहिरू लेकवळा यास पांच पाट काढून डोकीवर शेंदूर घालून नाक कान छेदन करून लष्करांतून फिरवून तास रात्रीस मेखसूंखालीं मारून टाकिलें. तेच दिवशीं रा॥ नारायणराव बक्षी यांस कैद करून किल्ले नगरास रवाना केलें. धोंडीबा दादा पेशजी नगरास रवाना केले होते त्याणीं तेथें फितूर केला. दस्ताऐवजीं सांपडले. त्यांस तेथेंच तोफेचे तोंडीं दिलें. आणखीही फितुरी कोण असतील त्यांचीं

---

१ हें व पुढचीं दोन अशीं तीन पत्रें पुण्याहून वकील परांजपे यानीं मिरजेस बाळासाहेबांस लिहिलीं.

पारिपत्यें करणार. मुलाहिजा करीत नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधि यांचा जाबसाल अद्यापवत् ठरावांत आला नाहीं. मागाहून ठरल्यानंतर विनंती लिहितों. हे विज्ञापना.

नं. ५६६९ श्री. ( आषाढ व० ४—१० जुलई. )

पै॥ छ० २० सफर. इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. कसबे रहिमतपुराविशीं पत्रें स्वामीनीं शिंदे यांस व घाटगे व आबा चिटणीस यांस लिहिलीं होतीं, त्यास पत्रें प्रविष्ट केलीं. घाटगे यांजपाशीं घरोबा स्नेहाचें बोलणें केलें. त्याणीं उत्तर केलें कीं रा॥ अलिजाबहादर यांजपाशीं बोलतों. नंतर सायंकाळीं अलिजाबहाद्दर यांस पत्र प्रविष्ट केलें. त्याणींही उत्तर केलें कीं, उद्यीक तुम्ही येणें. जाबसाल सांगतों. बोलण्यांत कांहीं आग्रह दिसोन आला नाहीं. परंतु प्रमाण कांहीं मोजावयाचें नाहीं! श्रीमंत रा॥ पंतप्रधान यांस दोन वेळां विनंती केली. शिंदे यांचे कारभारी यांजपाशीं बोलोन ताकीद करितों म्हणोन आज्ञा जाली आहे. आज फिरोन लष्करांत शिंदे यांजकडे जातों. आज आठ दिवस दुसरें काम करीत नाहीं. परंतु उभयतांकडे गांठ पडोन जाबसाल उलगड्यांत यावयास विलंब लागतो. काय जाबसाल ठरतो तो मागाहून सेवेसीं विनंती लिहितों. सैन्यांतून कंपूकडील लोक अथवा तोफा रवाना जाहल्या नाहींत. मीही दोनचार दिवसांत जाबसाल जसा ठरेल तसा ठरावून घेतों. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना. कसबे रहिमतपुरासही[1] बाळाजीपंत दामले यांस सूचना लिहिली आहे. त्यांचींही वरचेवर पत्रें मजकडे येत असतात. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६७० श्रीगणराज. (आषाढ व० ४–१० जुलई.)

पै॥ छ० २१ सफर. सन इहिदे मय्यातैन व अल्लफ.

चिरंजीव रा॥ बाळासाहेब यांसीं प्रती वासुदेव धोंडदेव. आशीर्वाद विनंती ता॥ छ० १७ सफर पावेतों यथास्थित असे. विशेष. रा॥ बाळकृष्ण भाऊ याणीं पलटणें कर्नेल व मलीस आणिलें त्याजसमागमें तेरा पलटणें हिंदुस्तानी चटेगार १३०००, गोरे ४०००, स्वार ४०००, एकूण २१०००. तोफा २५ सहा हजार बैल सामानाचे, घोरपडी माळेस लावावयाच्या चार, व पाणी न

---

१ रहिमतपुर घेण्याकरितां.

मिळे तर विहीर खणावयाचें पातालचक्र—त्यास झाडपाल्याचा रस व पारा लावावा म्हणजे पाणी जेथें असेल तेथपावेतों त्याणें चक्रासारखें फिरोन पाण्यापावेतों जावें. नंतर माती काढावी, लागेल तेवढें पाणी घ्यावें, असें चक्र. येणेंप्रमाणें सरंजाम घेऊन आले आहेत. पूर्णय्या व विष्टापाही हरिहरास आले आहेत. पांच तोफा दुर्गाहून तीस बत्तीस शेर गोळ्यांच्या थोर आणिल्या आहेत. चि॥ रा॥ बाबासाहेब फौज घेऊन येत आहेत म्हणून वाट पहात आहेत. सरंजाम हवेरीस आला. सावनूरचें ठाणें बसलें; " भाऊसाहेबानीं आम्हांवर उपकार बहुत केले ते पट्टणचें स्मरण करून एकवेळ आमचे हातून सेवा घडावी म्हणत होतों तो समय आला आहे. आपासाहेबांकडून बाबासाहेब येतांच धोंडजीचें पारिपत्य करून कोल्हापूर घेऊन देतों. " याप्रमाणें बोलत आहेत. " एक पैसा तुम्हांकडून घ्यावयाचा नाहीं. " याप्रमाणें पूर्णय्याआदि इंग्रजांचें म्हणणें. " आमचें पट्टणचें राज्य देखील तुमचे हवालीं करितों ! " याप्रमाणें बोलणें पक्कें. येथून तुकोपंत पाठविला होता तो आम्हांजवळ आजच आला गोकाकेस. त्याणें हें वर्तमान सांगितलेवरून आपणास कळावें म्हणोन लिहिलें आहे. धोंडजी वाघ याणीं गोखलेचें पारिपत्य करून दीक्षितबावांकडे कारकून पाठविला जे, " इंग्रजावर जाणार. त्यास येविशींची आज्ञा असावी. " त्यास गोखलेचें वर्तमान ऐकोन दोन रोज दीक्षितांचे डोळ्यांतून पाणी येत होतें. वाघाकडील कारकून आले त्यांस त्याच क्षणीं ' घोड्यावर बसून निघून जाणें ' म्हणोन सांगितलें. ते निघोन गेले. गारगावर वाघ आहे. तेथून इंग्रजावर जावें म्हणून हुबळीस आज जाणार असें वर्तमान आहे. आम्ही चार रोज येथें राहून चि॥ रा॥ आपासाहेबांकडे जातों. वाघाकडील कारकून पाठविले आहेत त्यांचेंही उत्तर येत आहे. येतांच निघोन जातों. इकडून वाट फुटल्यास याच वाटेनें चि॥ रा॥ बाबासाहेबांकडे जावें असेंही आहे. परंतु कित्तूरकर यांस वाघानें ताकीद केली जे, या मार्गें स्वांर राऊत कोणी येऊं देऊं नये, असेंवर्तमान आतांच आलें आहे. यास्तव आपासाहेब यांजकडेच जावें लागतें. गोकाकेस ठाणें घालण्याकरितां पाच्छापुरकर यांनीं वाघाचा रोखा घेऊन कित्तुरकर व ते मिळोन दहा प्यादे पाठविले होते. रा॥ गंगाधरराव नाना यांनीं रोखा माघारा दिला. हुशारीनें आहेत. गांव फोडून सडे आहेत. कळावें म्हणून लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें हे

---

१ लेखक फार भोळा आहे !

आशीर्वाद. याखेरीज हल्याळ सांबराणीचीं पलटणें व चि॥ रा॥ चिंतामणराव आपा व गोखलेचे चिरंजीव ही फौज निराळी. याप्रमाणें आहे. हे आशीर्वाद.

नं. ५६७१ **श्री.** ( आषाढ व० ४--१० जुलै. )

विज्ञापना. श्री॥ राजश्री आनंदराव रास्ते आषाढ शु॥ पंचमी भृगुवासरीं वाईस देवाज्ञा जाले म्हणोन बाबानीं पत्रीं लिहिलें आहे. स्वामीस अगोदर समजलेंच असेल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६७२ **श्रीगणपतिर्जयति.** ( आषाढ व० ४–१० जुलई. )

पै॥ छ० २१ सफर.

अपत्यें[1] चिंतामणीनें साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १७ सफर मुकाम हल्याळ येथें वडिलांचे आशीर्वादें सुखरूप असें. विशेष. वडिलीं छ० ११ सफरचें पत्र पाठविलें तें आज येथें पावलें. "दम सोडूं नये. श्रीवर भार आहे. रा॥ बापू गोखले यांस चिठी लिहिली आहे. द्यावी. आणि मशारनिल्हेस दम द्यावा;" म्हणोन लिहिलें, त्यास गफलतीनें लढाई बिघडली. कित्तराहून रात्रीं कूच करून हल्याळास यावें म्हणोन निघालों. वाट झाडीची. गोखले यांजकडील पेंढारी याणीं वाघास बातमी कूच जाहलेची कळवून पाठीवर + + + + + + + होते, म्हणोन झाडींत वोढा होता. तेथें प्रहरभर उभे राहिलों. तों जवळून भले लोक दोहींकडील येक येक हळू हळू मजलीस जावें म्हणोन निघोन गेले. चौथाई सुमार जवळ स्वारींत होते. झाडींमुळें समजलें नाहीं. अकस्मात् वाघाकडील लोकांनीं येऊन बुनग्यावर वोढेपलीकडे मारा भारी करूं लागले. हें कळतांच पायदळ व रा॥ बापू गोखले यांस वोढेपलीकडे पाठविलें. त्यांची यांची बरीच जाली. आम्हांकडील लोक वोढेपार गेले होते त्याणीं चांगलीच करून ( वाघाचीं ) घोडीं पंचवीसपर्यंत पाडाव आलीं. गोखले यांस उजवे डोळेवर जखम तरवारेची लागली, सबब माघारे आले. तों वाघाचे लोकांनीं पाठीवर दाटी केली. धोंडोपंत व आम्ही वोढे अलीकडे उभे होतों. त्यांजकडील लोकांच्या हिरिऱ्या होत. आमचे लोक वोढेपलीकडे गेलेले माघारे निघाले. त्यांबरोबर त्यांचे लोकानीं फार

---

१ मागें ३० जून व १४ जुलईचीं पत्रें चिंतामणराव आपानीं लिहिलेलीं छापिलीं आहेत त्यापेक्षां यांत लढाईच्या वृत्तांताचा पुष्कळच अधिक तपशील दिला आहे.

दाटी केली. तेथें हत्यार चाललें. आम्हांजवळ जमाव थोडा. ते फार. तेथें आम्हास नाकावर तरवारेची जखम लागली असतां त्यांवर उठलों. तों दुसरी जखम उजवे कुशीस भालेची भारी लागली. तिसरी भालेची कडुसरावर लागली. याजमुळें माघारे संभाळून निघालों. ते पाठीवर, आम्ही पुढें, परंतु मागें गुरकावीत निघालों; म्हणोन जमाव न फुटतां येथील मुक्कामास वोढे-पासून तीन कोस आलों. ते पाठीवर आले. आमचा गोट गांवाशेजारीं उतरला होता. लढाई बिघडली ऐकोन (गोटांतले) लोक गांवचे आसरेस गेले. तों आम्ही आलों. येथील इंग्रजांनीं बुनग्यास आसरा देऊन किल्लेवरून वाघाचे फौजेवर तोफ लागू केली. सहा बार केले. पांच चार माणूस त्याचें जायां जालें. माघारा निघोन गेला. आम्हांस जखमा लागल्या तेथेंच धोंडो-पंतास जखमा लागोन घोडेवरून खालीं पडले. त्यांची आमची चुकामूक मला जखमा लागल्या तेव्हां जाली. त्यांचा घोडा आमचे दळवटांत आला. त्यांचे पुतणे आपा माघारे फिरोन उभे राहिले होते. उभे राहूं नये म्हणोन लोक सांगत असतां माघारे फिरले नाहींत. तेही ठार जाले. दोघे चुलते पुतणे पडले. जातीचे खंबीर. परंतु समयास फौज जवळ नव्हती व वाघ पाठीवर येईल ही आगा नव्हती. जें जालें तें दैवें करून जालें. (बापू) गोखले याणीं आपले लोकांस दिल भरंवसा देऊन ठेवून घेतले. फुटले नाहींत. इकडीलही लोक जमून आहेत. हरिहराकडून इंग्रज आले ते देवगिरीवर आले. समागमें रा॥ बाळकृष्णपंत भाऊ आहेत. इंग्रजांचीं पत्रें थैली आम्हास आलीं होतीं. बाळकृष्णपंत भाऊ यांचीं पत्रें आलीं होतीं. दोहींचीं उत्तरें लिहून दिलीं. जखमा शेजेस आल्या म्हणजे लौकरच धारवाडचे समोरें जातों. इंग्रजानीं जखमा चांगल्या बांधल्या येणें करून स्वस्थ आहें. वडिलीं काळजी करूं नये. घोड्यावर बसावयाचें सामर्थ्य आलें म्हणजे कूच करितों. श्रीकृपेनें व वडिलांचे आशीर्वादें मोठी खैर जाहली. भले लोक जखमी जाहले आहेत त्यांच्या जखमा इतक्यांत शेजेस येतात. वाघासीं लढाई द्यावी हें मनांत वागत आहे. ईश्वरें सिद्धीस न्यावें. ढालेवर चार पांच जखमा लागल्या. ढाल नसती तरी बाकी राहिली नव्हती ! सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

सेवेसीं जिवाजी रामचंद्र कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. स्वामीनीं आज्ञा केल्याप्रमाणें वर्तणूक करितों. यजमान स्वामीनीं या लढा-ईत चौघालोकांनीं चांगले लढले असें म्हणावयाजागें केलें. भाल्याची जखम

भारी. परंतु अवसानें होते. पाठीचे ढालेवर तीन जखमा आहेत. लोक सारे जमून असते तरी फत्तेच होत होती. यजमानांस श्रीनें राखिलें. वाघासीं आणखी लढाई द्यावी हें फौजेचे मनांत वागत आहे. यजमान हुशार असते तर आज पर्यंत धारवाडानजीक गेले असते. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६७३ श्री. ( आषाढ व० ४–१० जुलई. )

पै॥ छ० २० सफर. इहिदे मय्यातैन व अल्लफ.

विज्ञापना. ता॥ छ० १७ सफर सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत रा॥ पंत प्रधान यांची आज प्रातःकाळीं गांठ पडली. आज्ञा जाली कीं, " गंगाधर रावजी यांची आमची भेट होईल कीं काय ? रघुनाथराव यांची गांठ पडली आहे. थेऊरास ( आम्हां ) बरोबरच होते. तेथून भाऊंजवळ रुसोन गेले. एक वेळ गंगाधररावजी येऊन पंधरा दिवस राहून भेटोन जातील. तुम्हीं त्यांस लिहिणें " म्हणोन आज्ञा जाली. त्यावरून विनंती केली, " स्वामींचे भेटीस येतील. खावंदाचे पायां-खेरीज दुसरा विचार काय आहे ? परंतु तूर्त प्रसंगीं पलटणें किल्ल्या-संनिध आहेत. करवीरवासी महाराज यांचा शिलशिला. फौजही त्यांची हुपरीनजीक आहे. स्वामींचा किल्ला स्वाधीन आहे. या प्रसंगीं येणें कैसें होईल ? सुभत्ता जाहलियानंतर सेवेसीं येतील. या प्रमाणें विनंती केली. स्वामींस विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६७४ श्री. ( आषाढ शु० १३–४ जुलई. )

नक्कल.

[1]

सेवेसीं धोंडो अनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० ११ सफर यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान लढाई जाहल्याचें लिहिलेंच आहे. गोखले कित्तुराहून निघोन हल्याळास जावयास चालले. श्रीमंत रा॥ चिंतामण-राव आपा व गोखल्यांचे चिरंजीव पुढें गेले. हल्याळास जावयास गोखले व आपा—त्यांचे पुतणे—उभयतां मागाहून जात होते तेव्हां वाघानें येऊन गांठलें. लढाई फार जाहली. गोखले व पुतणे आपा साहेब उभयतां ठार जाहले. गांडद बहुत ठार व जखमी जाहले. आरब दोनशें होते व पलटण पवनचक्की त्याची लढाई बहुत जाहली. ठार जाहले. वाघाचा जोरा फार. तेव्हां हे पडल्यानंतर

---

१ पत्र मोरो आपाजीचें पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस.

मोड जाहला. बुनगें व गोखल्यांचा लेंक व श्रीमंत रा॥ चिंतामणराव आपा पुढें गेले होते त्यांस कळून माघारे आले. नंतर त्यांची लढाई फार जाहली. दोन जखमा श्रीमंत रा॥ आपासाहेबांस लागल्या. येक तरवारेची. येक भाल्याची. मग माघारे ठिकाणास गेले. वाघ पाठीस लागून गेला होता. इंग्रज हल्याळास आहेत त्यांनीं तोफेचा मार केला. मग वाघ माघारा आला. बुणगें वगैरे सर्व आहे. कांहीं गेलें नाहीं. येक तोफ व गोखले यांजवळ हत्ती वगैरे तितकें मात्र गेलें. श्रीमंत रा॥ आपासाहेबांजवळ सात आठ हजार फौज आहे. पायदळ व तोफाही आहेत. हल्याळास आहे. इंग्रजही निघणार ऐसें वर्तमान आहे. पहिल्यानें सर्व लष्कर लुटलें ऐसें आलें होतें वर्तमान तें लिहिलें होतें. त्यानंतर बातमीस पाठविले होते त्यांनीं सांगितलें वर्तमान गरगावर वाघ जाहे. कित्तुर प्रांत अगदीं दक्षिणतीरचीं ठाणीं वाघानें घातलीं. यांजकडूनही कारकून व लिंगाडे गेले आहेत. खंडणी करितील. दोडवाडास देवजी कृष्णा यांनीं निशाण घेतलें व खंडणी पंधरा हजार केली ऐसे वर्तमान. व त्यांचा कारकून वाघाजवळ आहे. इकडील प्रांतीं फौज आणावयाचे राजकारणांत आहेत. काय घडतें पहावें. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. ५६७५ श्री. ( आषाढ व० ५–११ जुलई. )

छ० २२ सफर. सन इहिदे मय्यातैन. आषाढ.

विज्ञापना. लढाई बिघडोन उभयतां गोखले सरकार कामास आले. श्रीमंत राजश्री चिंतामणराव आपा व धोंडोपंताचे पुतण्ये बापू गोखले असे उभयतां अघाडीस चालत होते. लढाई बिघडली तेव्हां हल्याळ सांबराणीचे रोखें सांभाळून गेले असें वर्तमान आलें आहे, म्हणोन स्वामींनीं लिहिलें तें कळलें. सरकारांत अणीगिरेंयाहून पत्रें कमावीसदार यानें लिहिलीं, त्यास त्या पत्रीं आपासाहेब यांस जखमा लागल्या आहेत म्हणोन लिहिलें आहे. स्वामींचें पत्रांत कांहीं नाहीं. त्यास आजतागाईत पक्कें वर्तमान आलेंच असेल. चिंता लागली आहे. आधी संतोषाचें वर्तमान लिहिलें पाहिजे. श्रीमंत राजश्री आपासाहेब यांणीं गोखले यांजबरोबर फिरावें असा लौकिक प्राचीनपासून नाहीं. परंतु कारभारी आहेत त्यांच्या सल्लयानें प्रकार घडणें तो घडतो ! होणार त्यासारखी बुद्धि होते. वडिलीं सविस्तर लिहावें. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

१. पत्र मोरो आपाजींचें पुण्याहून बाळासाहेबांस मिरजेस.

नं. ५६७६ श्री. ( आषाढ व० ५–११ जुलई. )

पै॥ छ० २२ सफर. सन इहिदे मय्यातैन.

सेवेसीं मोरो आपाजी परांजपे दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १८ सफर भृगुवार सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींकडे काल पत्रें देऊन जासूद रवाना केलाच आहे त्यावरून विदित होईल. इकडे पर्जन्य मृगाचे मात्र दोन तीन सुमाराचे जाहले. त्याअलीकडे पर्जन्य नाहीं. धारण पेशजी लिहिल्याप्रमाणे आजपावेतों आहे. श्रावणमासाचे दक्षिणेस प्रारंभ जाहला. चौथाई बंद करून दक्षिणा वाड्यांत चालीस लागली. कसबे रहिमतपुराविसीं शिंदे यांजकडील कारभारी यांस ताकीद करितों म्हणोन श्रीमंतांनीं आज्ञा केली आहे. शिंद्याकडील कारभारी आले म्हणजे श्रीमंतांस विनंती करितों. शिंदे यांजकडेहि घाटगे यांजकडून संधान केलें आहे. जसें बनेल तसें करून मनाचिठी घेतों. तोफा अथवा पलटणी लोक अद्यापवत् रहिमतपुरास रवाना जाहले नाहीं. बातमींत आहे. श्रीमंत राजश्री मोरोबादादा यांचें कामकाज फडणिसीचें अद्यापवत् त्यांचें त्यांजकडे चालतें जाहलें नाहीं. कालचे पत्रीं राजश्री शिंदे याणीं पारिपत्य केल्याचा मजकूर लिहिला आहे. आणखीहि चौकसी चालली आहे. फितुरी यांचें पारिपत्य करावयास ठेवीत नाहीं. श्रीमंत राजश्री पंतप्रधान कारभार बाळोजी कुंजर हाताखालीं असोन करितात. खासाच तोडमोड करावयाचा प्रकार जाहला आहे. दरबार चाफेखणांत सायंकाळीं चार घटका फार करून होतो. फडाचा कारभार राजश्री चिंतोपंत देशमुख यांजकडे आहे. तरीख खासा श्रीमंत करितात. राजश्री दौलतरावबाबा व श्रीमंतांचें एकचित्त आहे. शिंदे यांची निष्ठा श्रीमंतांचें पायांजवळ चांगली. राजश्री सर्जेराव घाटगे शिंदे यांचे दौलतीमध्यें मुखत्यार आहेत. श्रीमंत राजश्री रावसाहेब 'यावें' मात्र करितात. खासा श्रीमंत तोडमोड करितात. याप्रमाणें बंदोबस्त आहे. स्वामींकडून पत्रें आलीं त्यांतील बातमीचा अर्थ श्रीमंतांस सर्व श्रुत केला. इंग्रजांनीं ठाणीं वाघानें घातलीं तीं उठवून राजश्री बाळकृष्णपंत लागू यांचे स्वाधीन केल्याचा मजकूर वगैरे श्रुत केला. "इंग्रज इमानी. वावगी गोष्ट करणार नाहीं." (असें) उत्तर जालें. मागाहून विनंती लिहितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र.

## श. १७२२ वाघाच्या बंडाचा शेवट. इ. स. १८००

नं. ५६७७ श्री. ( आषाढ व० ५– ११ जुलै . )

पौ॥ छ० २२ सफर. सन इहिदे मय्यातैन. आषाढ.

विज्ञापना. रा॥ बाबा काळे रा॥ घाटगे यांजकडे बोलणें बोलतात त्यांतील अर्थ " दोन लक्ष रुपये यांची वरात केली त्याची मनाई व्हावी. आमचे प्रांतास उपद्रव होऊं नये. करारावमोजीब ऐवज आम्हीं पलटणांस द्यावयाचा, त्यास मसलत शेवटास गेली नाहीं. कितेक गोष्टींचे चित्तांत अंदेशे होऊन श्रीमंत रा॥ रामचंद्रपंत आपा शहर सोडून गेले. पुढें करवीरवासी महाराज यांचा तह ठरणें तो तुम्हांकडून ठरोन पांच रुपये त्यांणीं कबूल केले ते तुम्हांकडे सरकारांतून देविले असतां आम्ही पैका कशाचा द्यावयाचा? खंडणी ठरली आहे ती आम्हांकडे फडशा व्हावा, पलटणांस पैका कबूल केला तो आम्ही देतों." याप्रमाणें बोलणें एक दोन वेळां जाहलें. घाटगेही ममतेच्या गोष्टी सांगतात. ठरावांत ही गोष्ट आली, वरातेची मनाई जाहली, ऐसें ऐकण्यांत आहे. बातमीमध्यें आहे. कळल्यानंतर साद्यंत लिहितों. घरकुँलहाचा मजकूरही बोलतात. असो. पक्केपणें समजलें म्हणजे सेवेसीं विनंती लिहितों. श्रीमंत रा॥ चिंतामणराव आपा यांचीं पत्रें पेशजी माणसाबरोबर बाबा काळे, दिनकरपंत, रा॥ बाबा फडके, बळवंतराव नागनाथ, यांस आलीं. हल्लीं हा मजकूर. पेशजी विनंती लिहिली आहे. जाबसाल सरकारांत बाबा काळे बोलणार. नागनाथ, दिनकरपंत, बाळाजीपंत यांचा येक विचार आहे. वांटणीच्या यादीच्या नकला पाठवून द्याव्या येविशीं आपाजीपंत यांचे विचारें आलें त्यावरून पेशजी लिहिलें होतें. त्यास यादी पाठवावयाच्या किंवा नाहीं याची आज्ञा यावी. त्या प्रमाणें वर्तणूक करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६७८ श्री. ( आषाढ व० ५–१२ जुलै. )

पौ॥ छ २१ माहे सफर. इहिदे मय्यातैन व अल्लफ.

सेवेशीं धोंडो अनंत. कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १८ सफरपर्यंत स्वामींच्या कृपेवरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान—धोंडजी वाघ गरग हरगेचे मुक्कामावर होता तो कित्तूर

---

१ हेंही पत्र वकील परांजपे यांनीं पुण्याहून बाळासाहेबांस लिहिलें. २ करवीरकरानीं सरकारांत खंडणी दिली ती तुम्हीं घेतलीत. ती आम्हांला द्या म्हणजे तुमच्या पलटणांचा पैका देऊं. ३ मिरज सांगलीच्या भाऊबंदकींत चिंतामणरावांतर्फेनें. ४ उपनांव सखदेव जोशी. पत्र अनगोळाहून कुरुंदवाडकरांस. तसेंच पुढचें.

तालुक्याची खंडणी करून माघारा सावनूर तालुक्याकडे फौजसुद्धां जावयास गेला. राजश्री देवजी कृष्ण देशपांडे व पाच्छापूरकर शेख मिरा देसाई हे वाघाचे लष्करांत जाऊन मिळाले आहेत. फौज घेऊन शहापूर प्रांतीं चार दिवसांत येणार अशी अवाई दाट आहे. दोडवाडास फौज कांहीं चारपांचशें त्यांस ठेऊन घेतलें आहे, आणि लोकांचा जमाव करून दोन दिवसांत येणार, अशी बातमी आली. कित्तूरकर देसायाकडे देशपांडे यानीं जाऊन मसलत करून वाघाचे लष्करास गेला आहे. देसाई देसनुरास आला होता तेथें येऊन बोलून गेला आहे. आणखी फौज कांहीं घेऊन येणार हे खचित बातमी आली आहे. [1]कडेगुदीस श्री॥ राजश्री चिंतामणराव आपांचें ठाणें, त्यास तेथें दोन दिवस चार पांचशें लोक येऊन बसले आहेत. गोळा गोळी होत आहे. शहापूरकरानीं लोकही कडेगुदीस पाठविले आहेत. काय होतें पहावें. आम्हीं येथें पांचशें लोक नवे ठेविले आहेत. शत्रु चालून आल्यास बेजरब गोळी घालतों. स्वामीचे कृपेंकरून होईल तें खरें. फिरंगीही सावनूर प्रांतीं आले. सुमारें सात आठ पलटणें आहेत. राजश्री बाळकृष्णपंत लागू ( त्यांबरोबर ) आहेत. कांहीं चार पांच ठाणीं फिरंग्यांनीं घातलीं आणि लागूंचे स्वाधीन केलीं. आणि फिरंग्यांचीं पत्रेंही श्री॥ राजाश्री आपासाहेबांस गेलीं आहेत लौकर येण्याविशीं, म्हणोन वर्तमान आहे. हल्याळासही कांहीं फिरंग्यांचे जमाव जाले आहेत. तेथें श्री॥ राजश्री चिंतामणराव आपा आहेत. जखमा बऱ्या होतांच फिरंग्यांस घेऊन वाघावर येणार असें वर्तमान आहे. वाघही चालून फिरंग्यांचे तोंडावर गेला आहे. काय होतें पहावें. कडेगुदीचें ठाणें घातलें असतां मग इकडील ठाण्यांचा टिकाव होणें कठीण आहे. या समयीं स्वामींकडून कांहीं फौत्त आली असतां तालुक्याचा बंदोबस्त होईल, व आणीकही कित्येक कामें होतील. पाच्छापूर तालुका, गड तालुका व पेठ तालुका एकूण तीन तालुके मिळून दोन लक्ष रुपये देऊन ठाणीं घालून द्यावीं ही मसलत आहे. हलगेकर ( ? ) देसाई बेळगांवीं आहे तोही या मसलतींत आहे. विठल गंगाधर व श्रीपतराव त्रिमल बागेवाडीकर हेही याच मसलतींत आहेत. स्वामीनीं कांहीं फौज पाठविली असतां सर्व बंदोबस्त होईल. आणखीही सरकारकामें बहुतेक होतील. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

---

१ कडेगुदी हा देवराव कृष्ण देशपांडे यांचा इनामगांव. (पहा भाग अकरावा. पृ. ६१७२ ) २ ही जनरल वेलस्लीची फौज.

नं. ५६७९ श्री. (आषाढ व० ६–१२ जुलै.)

सेवेसीं धोंडो अनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागा-यत छ० १९ सफर यथास्थित असों. विशेष. वाघाकडील गडबड फार. देवजी कृष्ण दोडवाड आपलेकडे करून घेऊन वस्त्रें घेऊन बरोबर जमाव घेऊन दोडवाडास गेले. तेथून शहापूर प्रांतीं यावें हा निश्चय जाहला. पन्नास हजार रुपये दोडवाडास कबूल केले. नऊ लाख रुपये शहापूरप्रांताचे करार करून आपलेकडे घेऊन आला आहे. हें वर्तमान आल्यानंतर मुलें माणसें अनगोळाहून काढिलीं. कित्तुरकर व वाघ सर्व एक्र पाच्छापुर प्रांतास गोखल्याचें ठाणें होतें तेथें शेख मिरा देसाई पाच्छापूरकर हा वाघाकडे जाऊन त्याचा जमाव आणिलासा करून ठाणें घातलें. तेव्हां शेखमिरा व देवजी कृष्ण एक. त्याचा जमाव आणून दंगा करावयास चुकणार नाहींत. सारे खेळ त्यांचेच आहेत. याकरितां कुणकुपास गेलों. इकडे पर्जन्य आतिशय. जागा नाहीं. ऐशी फजिती जाली आहे. येथें जाग्याची वगैरे सोय करून मग मी अनगोळास जातों. देवजी कृष्ण वगैरे सर्व एकच जाहले आहेत व बागेवाडीकरही त्यांस मिळाले आहेत. स्वामींचे कृपेकरून घडेल तें खरें. कळावें बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. ५६८० श्रीगणराज. (आषाढ व० ६–१२ जुलई.)

पै॥ छ० १९ सफर. सन इहिदे मय्यातैन. आषाढ.

विज्ञापना. इस्मेतास नोकरीस तासगांवास ठेवून तीनशें लोकांनिशीं पाठवितात. चिरंजीवास जखमा लागल्या त्यास नाकावरील जखमेस तीन टाके किंवा पांच बसले ऐसे ऐकिलें. त्यांस वडिलीं पांच टांके बसले असें जबानी माणसाचे सांगण्यांत. त्यास जखम उजवेकडे आहे कीं डावेकडे हें पत्र नव्हतें. भाल्याची उजवे कुशींत आहे. आज बाजारी वर्तमान जलचरांनीं वाघावर छापा घालून वाताहत केली असें आतांच आलें. रवाना छ० १९ सफर. विदित होय हे विज्ञापना.

---

१ पत्र रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें बाळासाहेबांस मिरजेस. २ चिंतामणराव आपास.

नं. ५६८१ श्री. ( आषाढ व० ६–१२ जुलई. )

पै॥ छ० २० सफ़र. सन इहिदे मय्यातैन.

रा॥ गंगाधर रावजी गोसावी यांसीं

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ सिदोजीराव नाईक निंबाळकर देसाई प॥ हुकेरी. दंडवत. विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ० १९ सफ़र जाणोन स्वकीय लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष करवीराहून सरकारचा खजिना रा॥ जानराव जाधव घेऊन येतात. त्यास आपली नाव चालत नाहीं, बंद आहे, म्हणोन कळलें. ऐसियास येथें मुक्काम असले परियंत नावकरी यांस करवीराहून येतील त्यांस पार करणेंची परवानगी असावी. आपणाकडे रा॥ बाळाजीपंत दिवाणजी आले आहेत. सर्व मजकूर निवेदन केलाच असेल. आम्हीं येथे आहों त्यापेक्षां आपण कांहीं संशयाची जात चित्तांत आणूं नये. नदी लवकर पार करणेंची परवानगी द्यावी. बहुत काय लिहिणें. कृपा कीजे हे विनंती.

नं. ५६८२ श्रीगणराज. ( आषाढ व० ७–१३ जुलई. )

पै॥ छ० २१ सफ़र. सन इहिदे मय्यातैन. आषाढ.

विज्ञापना. तीर्थस्वरूप रा॥ काकांचा लखोटा कोकणांतून आलेला पाठविला तो पावला. रा॥ मोरो आपाजी यांच्या पत्रीं लिहावयाचा मजकूर लिहिला, उत्तम आहे. पत्रें पाठविलीं तीं पावलीं. रवाना छ० २० सफ़र. विदित होय हे विज्ञापना. लाट रांगोळी येथील व अकीवाटकर दोन तीनशे पायचे व राऊत जमा होऊन रेणदाळास आले. रात्रौ दोन तीन हुलडी केल्या. दोन प्रहरपावेतों भोंवते उभे राहोन गोळागोळी केली. इकडील तिकडील जखमी जाले. मग येथून पन्नास साठ प्यादे रवाना करितांच निघून गेले. जानराव जाधव शिरोळास आले होते. तेथून दहा स्वारांनिशीं आपाजी देसाई यांजकडे गेला अशी बातमी. रायाजी जाधव वगैरे कागलावर स्वार चारशें व पायदळ जमा जालें आहे. नदी उतरणार येक वार्ता. दुसरें, हुपरीस येणार, राजापुराजवळ दक्षिणतीरास उतरणार, असेंही बोलतात. कारण काय, ( तर ) पलटणवाले यांस ( श्रीकृष्णा ) पार व्हावयाची सोय जाली पाहिजे यास्तव रवाना. हे विज्ञापना.

---

१ रघुनाथरावांचें पत्र कुरुंदवाडाहून बाळासाहेबांस. तसेंच पुढचें.

नं. ५६८३ श्रीगणराज. ( आषाढ व० ९–१५ जुलई. )

पै॥ छ० २२ सफर. सन इहिदे मय्यातैन. आषाढ.

विज्ञापना. आज्ञापत्रें पाठविलीं तीं पावलीं. राजश्री आपाजी देसाई याजकडून कारकून आले त्यांस प्रतिउत्तर केल्याचें लिहिलें, त्यास वडिलीं उत्तर यथास्थित केलें. कालपर्यायेंकडून अशी बुद्धि त्यास निर्माण जाली! जलचरास[1] पत्र पाठविलें होतें त्याचेंही उत्तर आल्याचें लिहिलें तेंही कळलें. देसाई यांची वलगना लिहिली, त्यास या कालीं त्यानीं न करावी तर आणखी कोणें करावी? सर्वांचे समय हेच आहेत! राजश्री मोरोबादादांचे नांवचें पत्र लिहोन कालीं पाठविलें आहे. रवाना करावया आज्ञा जाली पाहिजे. नावांविशीं, त्यांच्या नावा घेऊन येथें दर्यावर्दी व हरकारे आले होते त्यांसही आज्ञेप्रमाणें सांगितल्याबरोबर निघोन गेले. जुगुळास मुक्काम करून राहिले. रोज वीस रुपये भांग तंबाखू म्हणोन व जेवण पन्नास माणसांस कणीक तूप वगैरे याप्रमाणें उपद्रव. गांव राहतां दिसत नाहीं. चिरंजीवाचे जखमेचें लिहिलें तें कळलें. चि॥ राजश्री बाबा काळे यांचे पत्राची नक्कल पाठविली ती पावली. चिरंजीवानीं विस्तार अपूर्व लिहिला आहे. राजश्री सदाशिवपंत व रावजी गणपतराव पानसे यांजकडे पाठविले होते. त्यांचे कारकून पुण्यांतून आले त्यांच्या सांगण्यांतही यजमानांची मर्जी संतुष्ट जाली आहे. अगदीं निर्वैर जालें. कारभारी चिरंजीवानीं लिहिलेप्रमाणें कुंजरादिक लेखक नूतन आले, त्यांचे हातून निर्वाह राजकारणाचा होईल असें दिसत नाहीं. मर्जी संपादून आहेत. करवीराहून जानराव जाधव वगैरे त्यांजकडे येऊं जाऊं लागले. त्यांचें संधान मिळालें. जाधव वगैरे पाठविले त्यापक्षीं यांसीं सख्यत्व नव्हतें तें करावें याअर्थीं पाठविले असतील असें दिसतें. बातमी मात्र पक्की राखावी. लिहिणीं मानभावी आहेत. रवाना छ. २२ सफर. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६८४ श्रीगणराज. ( आषाढ व० १०–१६ जुलई. )

( नक्कल )

चि॥ राजश्री[2] दादा यांसीं आशीर्वाद उपरी. आपण पत्र पाठविलें तें काल अकरावें तासीं पावलें. "मुसा इस्मितास ठेविला, त्यास मुक्कामीं होता तोंपर्यंत ऐवज लागला त्यापैकीं निम्मे ऐवज आपण देऊं असें ( आपलें )

१ शिंद्याच्या पलटणांचा सरदार डासूसाहेब. २ पत्र गंगाधरराव बाळासाहेबांचें रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस.

वाचादत्त आहे" म्हणोन लिहिलें, ऐसीयास कार्तिकमांसीं[1] (पलटण) ठेवावयाचा उपक्रम आपण केला ते समयीं मला आपण बंगलेवर बसलों होतों तेथें प्रातःकाळीं विचारलें, "पलटण सजावें असें मनांत आहे. परंतु सरकारांतून फौजा करवीरचे पारिपत्यास न आल्यास कसें करावें ? " ते समयीं चि॥ राजश्री रामचंद्रपंत आपा कुटुंबसह कुसेगलास जाणार अशी वार्ताही श्रवणीं आली. तेव्हां मीं आपल्यास बोलिलों, 'ती॥ भाऊसाहेबांसारखे सरदार सरकारकामास आले. बाजी बिघडली आहे. खामखां सरकारांतून व शिंदे यांजकडील फौजा व पलटणें रवाना करितों अशीं पत्रें येतात. त्यापक्षीं दोन दिवस कमजवाद, परंतु मसलत होते. न जाणो. चिरंजीव कुसेगलास गेले आणि सरकारांतून फौज मसलतीस नाहीं आली, तरी पलटण सजेल याचा ऐवज आपण निम्मे द्यावा. निम्मे मी देईन. पाहिजे तितके दिवस ठेऊं" असें बोललों. नंतर थोडेच दिवसांत ( शिंद्याचीं ) पलटणें रवाना जालीयाचीं पत्रें आलीं. हलके हलके राहिमतपुरास येऊन " इकडून फौज पुढें यावी म्हणजे येतों, " अशीं बराऊन याचीं पत्रें चिरंजीवास येऊं लागलीं. नंतर चि॥ राजश्री रामचंद्रपंत आपा डेरेदाखल जाले. चि ॥ राजश्री नारायणराव यांसही दुसरे दिवशीं मुहूर्ते डेरेस पाठविलें. नंतर सत्वरच कूच करून चिरंजीव गेले. आमचे घराऊ मजकुराचें बोलणें ठरावाप्रमाणें अमलांत न आणिलें आणि आपणाबरोबर मसलतसंबंधें बोलणें होतें तेंही राहून चिरंजीव गेले. पलटणांस मिळालेनंतर आपल्यासीं मी बोललों, " चिरंजीव गेले. पलटणें फौजा पुण्याहून आल्या. पुढें विचार कसा ? " आपण उत्तर केलें, " काय चिंता आहे ? चिरंजीव गेले तर वडील कैलासवासी जाले ते स्वर्गी हंसतील यास्तव त्यांचें उत्तीर्ण व्हावें याजकरितां मला लाख रुपयेपर्यंत खर्च करणें जरूर. राजश्री रावजी[2]- बरोबर पलटण व फौज पाठवूं. स्वतंत्र बाजूस उभे करवूं. " असें दहा पांच वेळ आपलें उत्तर जालें. माघ शुद्धपक्षीं आपण लिहिलेप्रमाणें राजश्री रावजी लेले यांस आपण मजकडे हा मजकूर बोलावयास पाठविलें ते वेळेस मीं उत्तर केलें, "पलटणें रवाना होऊन फार दिवस जाहले. सरकार- चाकरीवर येऊन रुजू जालीं. चिरंजीवही गेले. हल्लीं चिरंजीवांचे बोलणेंत वडिलांकरितां लाख रुपये खर्च करणें जरूर आहे. पलटण ठेवावयास प्रारंभ केला. सरकारांतून व शिंदे यांजकडून फौजा व पलटणें रवाना जालीं तोंपर्यंत माझेकडे ऐवज ठरेल तो देईन," असें रावजी लेलेजवळ सांगितलें.

---

१ कार्तिक श. १७२१. २ कुरुंदवाडकरांचे कारभारी बळवंतराव लेले.

त्यांनीं आपणांस विदित केलेंच असेल. छ० २३ सफर. लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. ५६८५ श्रीगणपतिर्जयति. ( आषाढ व० १२–१८ जुलै. )

पै॥ छ. २ रबिलावल. सन इहिदे मय्यातैन. श्रावणमास.

अपत्यें चिंतामणीनें सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० २५ सफरपावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असें. विशेष. वडिलीं नेरलीकरांच्या माणसाबरोबर आशीर्वादपत्र पाठविलें तें पावोन परम संतोष जाहला. 'तुमचें स्वदस्तूरचें कुशल पत्र यावें.' म्हणोन आज्ञा, त्यास येविशींचें हल्ल्याळच्या मुक्कामाहून लढाईचें वगैरे सेवेशीं विनंतीपत्र पाठविलें होतें तें पावलें असेल. त्याजवरून सविस्तर निवेदन जाहलेंच असेल. अश्मनामक[2] व त्याचे ज्येष्ठ भ्रातृपुत्र हे सरकारकामास आले हें सर्व पेशजीचे पत्रीं लिहिलेंच आहे. माझ्या जखमा बऱ्या जाहल्या. येक जखम भाल्याची मात्र ओली आहे. वडिलांचे आशीर्वादें दोन चार दिवसांत बरी होईल. वडिलीं काळजी करूं नये. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६८६ श्री. ( तालीक ) ( १८ जुलै. )

वडिलांचे[3] सेवेशीं. अपत्यें गंगाधरानें दोन्ही कर जोडून शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल आषाढ व॥ १२ शुक्रवार तिसरा प्रहर-पर्यंत वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. इकडील वर्तमान वाघाचे लष्करांत बातमीस माणसें पाठविलीं होतीं तीं आलीं. इंग्रजांचीं पलटणें कुंदगोळास आलीं. कुंदगोळचें ठाणें घेऊन कापून काढलें. राजश्री चिंतामणराव आपा व गोखले यांचे कनिष्ठ पुतण्ये फौजसुद्धां धारवाडास आले. वाघ फौजसुद्धां पळून डंबल प्रांतीं कपोतगुड्डाकडे गेला. कांहीं फौज इंग्रजांचे तोंडावर ठेविली होती ती इंग्रजानीं लुटली. चिंतामणराव आपाच्या व इंग्रजांच्या भेटी सत्वरच होणार. जोती घोरपडा दोन तीन हजार फौज व तोफा दोन सुद्धां दोडवाडास कित्तूर व नवलगुंद, तल्लूर वगैरेचे बंदोबस्तास राहिला होता तो पळून मलप्रभेअलीकडे मुरगुडानजीक रुद्रापुरावर आला. याप्रमाणें वर्तमान आलें. वडिलांस कळावें म्हणोन वर्तमान लिहिलें आहे. बरकड उदईक जनार्दनपंत पोतनीस येणार आहेत ते सविस्तर निवेदन करितील. विशेष काय ल्याहावें ? लोभ करावा हे विज्ञप्ति.

---

१ पत्र बाळासाहेबांस हल्याळाहून. २ धोंडोपंत गोखले व त्यांचे थोरले पुतणे आपा. ३ पत्र गोकाकच्या किल्लेदाराचें बाळासाहेबांस.

नं. ५६८७ श्री (आषाढ व० १४-२० जुलै.)

ती॥ राजश्री आपासाहेब वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० २७ सफरपर्यंत पुणें येथें वडिलांचें आशीर्वादेंकरून सुखरूप असें. विशेष. वडिलीं छ० १४ रोजचें पत्र पाठविलें तें छ० २१ सफरीं पावलें. " ती॥ राजश्री चिंतामणरावआपा व गोखले बारीपार गेले. वाघाची गांठ पडून लढाई जाहली. गोखले चुलतेपुतणे सरकारकामास आले. आपासाहेब व बापू गोखले यांस जखमा लागल्या आहेत. हल्याळ सांबराणीची वाट धरून गेले. तथ्य वर्तमान आलें म्हणजे लिहितों. नरगुंदचें बातमीचें पत्र पाठविलें आहे. श्रीमंतांस पत्र पाठविलें आहे. प्रविष्ट करावें." म्हणोन वडिलीं तपशीलवार लिहिलें तें कळलें. ऐसीयास छ० ६ सफरीं लढाई जाली. सातवे तारखेचें पत्र हल्याळचे मुक्कामचें ती॥ राजश्री चिंतामणरावआपांचें आलें. श्रीमंतांस तपशीलवार पत्र होतें. तें पत्र येथें एकोणीसावे तारखेस पावलें. आपासाहेबांस नाकावर जखम आहे. जशी (धोंडोपंत) गोखले यांस होती तशी आहे. सात टांके बसले आहेत. आणि भाल्याची उजवे कुशींत आहे. परंतु खैर आहेत. बापू गोखले यांस उजवे डोळ्यापाशीं व डावे हाताचे मनगटावर एक आहे. परंतु खैर आहेत. दहा वीस माणूस व कांहीं दहा पांच घोडीं ऐसीं जायां जाहलीं. बाकी बुणगें सुद्धां संभाळून इंग्रजांचे आसरेस गेले. चुलतेपुतणे उभयतां ठकले. येणेंप्रमाणें मजकूर होता. श्रीमंतांस पत्र नेऊन दाखविलें. 'चिंतामणरावआपानीं शिपाईगिरी चांगली केली!' म्हणोन फार संतोष जाहले. 'गोखले गेले' म्हणोन श्रमी जाहले. 'पदरचे मर्द मनुष्य गेले' म्हणोन बोलत होते. चिंतामणरावआपांकडे पत्रें पाठवावयास तयार होत आहेत. एक दोन दिवशीं तयार जालीं म्हणजे रवाना करितों. वडिलांचे पत्राचेंही उत्तर घेऊन पाठवितों. वडिलांकडून विठू अबदागिऱ्या व शिदू भोई आला तो दोन चार दिवशीं पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६८८ श्री. (आषाढ व० १४-२० जुलै.)

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २७ सफरपर्यंत सुखी असें. विशेष. माझेपाशीं कुमैत पञ्चोण घोडी आहे, त्यास मी तासगांवाहून निघावयाचे पूर्वींच विनंती लिहिला होता कीं घोडी थोर, दुसरें लहानसें (त ) पाठवून द्यावें. त्यास आपण लिहिलें कीं,

राजश्री बाळाजीपंत सोवनी याजपाशीं बेगची शिंगी आहे ती घेऊन जाणें. ती पाहिली तों केवळ शिंगरूं. त्यांत तयार नाहीं, आणि मनस्वी बुजर ! याजमुळें पद्मीणच घेऊन आलों. नित्य शहरांतून रातबिरात हिंडावें लागतें. त्यास ही घोड़ी मनस्वी बुजते आणि थोर हें एकीकडे; आणि परवां श्री॥ राजश्री मोरोपंत दादा फडणीस यांचे चिरंजीवानीं घोडी पाहिली हें खूळ दुसरें जालें ! जर अशानीं मागितली तरी नाहीं म्हणणें अवघड, आणि देऊन यांचे हातें कार्य किती होणें हें कळतच आहे ! परंतु हें चांगलें नाहीं. त्यास आज चार पांच दिवस मी पावतारा हिंडत असतों. तर दुसरें घोडें धीट, दिसाऊ, गरीब, बसावयाजोगें, चालणार, ऐसें आधीं पाठवावें म्हणजे या घोडीस आपलेकडे पाठवून देतों. नाहीं तर व्यर्थ घोडी मजपासून जाईल. आधीं पागेंत थोर घोडी राहिली नाहीं आणि आहे ही जाईल, यास्तव विनंती लिहिली आहे. ती॥ राजश्री दाजीसाहेबांपाशीं बोर तुरकी आहे तो मुद्दाम एका बारगिरास बसवून येथपावेतों तो घोडा पोंचता करावा म्हणजे त्याच बारगिराबरोबर ही घोडी वडिलांकडे लावून देतों. कळावें. एवढी थोर घोडी चांगली म्हणोन मला काळजी लागली आहे. आपलेकडून घोडें न येईल तर आजपासून पंधरा दिवस मार्ग पाहून ही घोडी तासगांवास पाठवून देईन. कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६८९ श्री. ( आषाढ व० १४–२० जुलै. )

विज्ञापना. मला येथें येऊन आज दीड महिना जाला. आपणांस चार पांच वेळां विनंती लिहिली कीं, सावनूर तालुक्यैकीं दोन महाल देविले यांच्या सोडचिठ्या पाठवाव्या. त्यास आपण तपशीलच लिहिला कीं महाल वाघानें घेतले तेव्हां देणें न देणें कोठें राहिलें ? ऐसें आपलें लिहिलें येतें त्याप्रमाणें श्रीमंतांस विनंती केली, परंतु मर्जीस उतरत नाहीं. कारण "वाघाजवळचे महाल हातास येतील परंतु तुम्ही देणार नाहीं. यास तुम्ही दोनी महालच्या सोडचिठ्या देणें. नाहीं तर नाहीं म्हणोन सांगणें." ऐसें कचेरींत स्पष्टच म्हणतात. त्यास वडिलीं वाघाकडे महाल गेले तर जावोत, परंतु दोनी महालच्या सोडचिठ्या पाठवून द्याव्या. नाहीं तर माझी अबरू रहात नाहीं. याजउपरी मागील कर्ज वारून मुक्त होणें दूर आहे. याजउपरी जसें श्रीमंत म्हणतील त्याच डौलानें वागल्यास परिणाम आहे. कारण आज दरबारीं आमचें कोणी नाहीं आणि जसें तूर्त शिंदे सांगतात तैसें श्रीमंतांस

वागणें प्राप्त आहे. तेव्हां याजउपरी वोढून परिणाम लागावयाचा नाहीं ह स्पष्ट समजावें. श्रीमंत सांबाचा अवतार आहे ! मर्जीप्रमाणें वागावें म्हणजे सर्वस्व प्रसन्न जाहल्यावर देईल. तैसेंच वाळवेंचेसाठींही अबरूच जाईल. तें उत्तर कांहींच आपण लिहिलें नाहीं. त्यास काय म्हणावें ? आपणास भासत असेल मीच लिहितों, सरकारचा तगादा नसेल, हें खरें. जेव्हां आमची येथें शोभा होईल तेव्हां प्रमाण वाटेल ! असो. तूर्त श्री॥ रावसाहेब स्नानसंध्या करून आहेत चक्रदेव नेल्यापासून, म्हणोन वाळवेंसाठीं तगादा नाहीं. नाहीं तर येथें मला बसूं देखील देतेना. कळावें. तर लिहिलेप्रमाणें दोनी महालच्या सोडचिठ्या आधीं पाठवाव्या. नाहीं तर मी कसें करूं तें लिहून पाठवावें. महाल जातां जातां जे राहतील ते आपले म्हणावे. नाहीं तर परिणाम नाहीं ही खातरजमा असावी. आपण सर्वज्ञ आहेत तेथें माझी मति किती ? परंतु आपणापाशीं चौघे शहाणे आहेत त्यांस घेऊन मनसबा करावा. या श्रीमंतांशीं जो वांकडें पाहील त्याचें बरें होत नाहीं ऐसें आजपर्यंत सर्वांस प्रतीति आल्या आहेत, हें समजून वागावें हें बरें आहे. मग मर्जी ! रवाना छ० २७ सफर हे विज्ञापना.

नं. ५६९० श्री. ( आषाढ व० १४–२० जुलै. )

विज्ञापना[1]. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. " राजश्री मोरोपंतदादांस पत्र पाठविलें आहे. प्रविष्ट करावें. ती॥ राजश्री धोंडोपंतदादास पत्र पुण्यास जावें म्हणोन पाठविलें आहे. जातात किंवा नाहीं कळेना. तूं जाऊन भेट घेणें. राजश्री बाळाजीनाईक भिडे यांचे गुजारतीनें ओळख करणें; " म्हणोन तपशीलवार लिहिलें तें कळलें. ऐसीयास श्री॥ राजश्री दादा फडणीस यांची भेट प्रथम दिवशींच घेतली. राजश्री धोंडोपंत नाना आठवले येथें होते त्यांचे विद्यमानेंच भेटलों. अद्यापि बोलणें बैठक होऊन त्यांचें माझें जालें नाहीं. आपलें पत्र आलें हेंही प्रविष्ट कारितों. बाबा जोग येतात म्हणोन बोलण्याचा प्रसंग घातला नाहीं. ते येत नाहींत ऐसें ठरलें म्हणजे बोलणेंही बोलतों. आपण म्हणतील 'तूंच कां जाऊन बोलेनास ? ' त्यास दादा आले तेव्हां आठ दिवस रंग चांगला होता. हल्लीं मध्यम आहे. कारभार करितीलसा डौल दिसत नाहीं. कारण जुन्नराहून आलेचे पूर्वीं आणि चक्रदेव धरावयाचे सुमारास शिंदे यांचे घरीं राजश्री आपाजीपंत गोंधळेकर जाऊन तीस लाख रुपये कबूल केले आहेत कीं, " चक्रदेव वगैरे मंडळी धरून आमचे हवालीं

[1] पत्र पुण्याहून बाबा काळे यांचें रामचंद्रपंत आपांस.

करावी. फडणिसीचें काम आम्ही करूं तेव्हां इतका पैका आम्ही देऊं." त्यास दादा आलेवर दादांचें म्हणणें पडलें कीं, मला पैका मिळावयाचा नाहीं. आणि मला कारभारही नको. तैनातही नको. कृपा करून घरीं राहूं द्याल तर राहीन. अथवा मर्जी असेल तेथें ठेवावें. ऐसें म्हणून स्वस्थ आहेत. श्रीमंतांची कृपा आहेच, परंतु अशी तऱ्हा पडली आहे. तेव्हां मी तेथें झटून फल नाहीं म्हणोन विचार पाहूनच आहें. त्यांतही श्री॥ दादा श्रीत्रिंबकेश्वरास होते तेव्हां मांडवगणाहून राजश्री बाबा जोग तेथें गेले होते. तेव्हांचीं त्यांचीं त्यांचीं काय खुणेचीं बोलणीं जाहलीं आहेत समजत नाहीं. बाबा जोग आले म्हणजे सर्व समजेल. अथवा ते येतच ना ऐसें ठरलें म्हणजे त्यांशीं संधान करीन. दादांचे घरीं आमचे परिचित गृहस्थ समीचीन आहेत. मिळवून घेणेंस अवघड नाहीं. आज त्यांचें आर्जव करून आमचें कांहीं कार्य व्हावयाचें नाहीं. आज श्रीमंतांपाशीं काय आहेत ते कुंजर आहेत ! त्यांचें साधन केलें आहे. वडिलींही एक पत्र धातुपोषणार्थ कुंजरास गोडगोड लिहून पाठवावें. "चिरंजीव तुम्हांपाशीं बोलतील त्याप्रमाणें इकडील कार्यें होत असावीं. आम्ही सरकारलक्षाशिवाय नाहीं ही खातरजमा चिरंजीव करितील." ऐसा भाव लिहून पत्र यावें. कळावें. रवाना छ० २७ सफर हे विज्ञापना.

नं. ५६९१ श्री. (आषाढ व० १४–२० जुलै.)

विज्ञापना. मी आपणास पेशजी पत्र पाठविलें त्यांत लिहिलें होतें कीं, गोकाक यादवाड चिकोडी पाच्छापूर हीं सारीं ठाणीं करवीरकर यांस देणार. आपलेस अन्नवस्त्र दिलें तर फार, ऐसें मी लिहिलें होतें. त्याचें उत्तर वडिलीं लिहिलें कीं, उत्तम आहे. अन्नवस्त्र ज्याणें जन्मास घातलें त्याणें नेमणूक केली आहे. काय द्यावें तें येक वेळ लिहिणें म्हणजे तसाच डौल धरूं. राज्यच बुडतें तेथें आमचा पदार्थ काय ? ऐसें वडिलीं एक दोन पत्रीं बहुत उदास होऊन लिहिलें हें काय ? येथें जसें मला आढळतें तैसें आपणास कळावें म्हणोन लिहित असतों. आपण एखादा मनसबा ल्याहावा तें एकीकडे राहून उदासीन लिहितात येणेंकरून बहुत कष्ट मला होतात. त्यास माझा इलाज काय आहे ? ज्या समयीं घाटगे सुटले तेव्हांपासून धरबंद बोलणारानें केला असता तर ठीक पडतें. मी येथें आलों त्याजवर विसावे दिवशीं शिंदे यांची भेट घेतली. तेथें जाऊन माघारे आलें म्हणजे पुनर्जन्म होतो ! अशी येथील अवस्था आहे. पागनीस यांजपाशीं व चक्रदेव यांजपाशीं बाळाजी-

पंत काय बोलले आहेत, कोणत्या रंगांत होते, समजत नाहीं. त्याजमुळें मी आलों आहें, परंतु अद्यापि कोठें बोलणें रुचत नाहीं. बाळाजीपंत गुप्त जाहले म्हणोन बरें! नाहीं तर तेच समयीं अबरू घेते. आपले आशीर्वादें-करून मला कांहीं उपद्रव नाहीं. आजपर्यंत सरंजामाच्या सनदा शिंदे यांस द्याव्या, परंतु आपण पुण्यशील म्हणोन श्रीमंतानीं कृपा करून सरदारी मोडूं नये याअर्थीं घाटगे यांसीं बहुत प्रकारें श्रीमंतानीं सांगून सरंजाम राह-विला आहे. मला याप्रमाणें रुबरू श्रीमंतानीं सांगितलें. करवीरचा तह शिंदे म्हणतील तसा श्रीमंतांस करून देणें प्राप्त आहे. आज जें शिंदे करितात तें होतें. मी काल शिंदे यांजकडे गेलों होतों. मी पडच घेतली आहे. शिंदेही प्रसन्नवदन आहेत. आम्हांपाशीं खाऊ कबूल करावयास नाहीं, तेव्हां बोलणें जें जें होईल तें होऊ! आपण याप्रकारें उदास जाहले, याजवर मी येथें काय बोलूं? उदास होऊन फल नाहीं. जें होतां होईल तें हो. बिघडली बाजी सुधारेल तेव्हां खरी. आज दीड महिना मला येऊन जाहला परंतु एक धोरण लागला नाहीं. सोईसोईनें सर्व घडेल. चिकोडी जाती यांत संदेह नाहीं. वडिलीं सरकारसनदेचा मात्र उजूर करावा. रवाना छ० २७ सफर. हे विज्ञापना.

नं. ५६९२ श्री. (आषाढ व० १४–२० जुलै.)

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसा।। नमस्कार विज्ञापना. वडिलीं छ० १४ सफरचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. पत्रीं लिहिलें कीं, चि॥ "राजश्री बाबा बदामीस आहेत. इंग्रज तुंगा उत्तरतीरीं आले ते वाळा नदीपार जाह-ल्याचें वर्तमान अजून आलें नाहीं. अलीकडे आल्यावर चिरंजीव जाऊन मिळतील" म्हणोन वडिलीं लिहिलें तें कळलें. ऐसीयास इंग्रजी पलटणें किती आलीं आहेत, त्यांचा मनसबा काय आहे, सरकारी महाल वाघानें उठविले ऐसें असतां इंग्रज कां आले, तीं॥ राजश्री बाबासाहेब जाऊन इंग्रजांस मिळ-णार यांतील हांशील काय, हें कांहींच आपण लिहीत नाहीं. मी आपणाकडून येथें आहे. जर मला श्रीमंतानीं पुसिलें कीं हरीपंतबाबा इंग्रजांस कां जाऊन मिळाले? ऐसें पुसिलें असतां उत्तर काय करूं? वाघाचे पारिपत्यास मिळाले किंवा दुसरा कांहीं मनसबा आहे हेंही समजावें म्हणजे येथें प्रसंगानुसार बोलतां येईल. येथील अविचारी प्रकार आहे. भलतेंच निमित्य ठेवतील यास्तव विनंती लिहिली आहे. इंग्रज कां आले, त्यांस पुढें कर्तव्य काय, तीं॥ बाबा-साहेब मिळणार यांत मनसबा कोणता, वाघाचें पारिपत्य इंग्रजांसीं मिळून करावयाचें तेव्हां इंग्रजांस कबूल काय केलें, आपण चित्र-

दुर्गीहून इंग्रज आणविले किंवा ते आपले मनसब्यानें आले, यांतील हांशील काय तें तपशीलवार कळावयाजोगें लिहिलें पाहिजे. म्हणजे प्रसंगानुसार येथें बोलतां येईल. काल शिंदे यांचे घरीं आपा देसाई निपाणकर यांचें पत्र आलें त्यांत लिहिलें आहे कीं, इंग्रज आणि बाबासाहेब एक जाहले, वाघाकडून राजश्री वासुदेवकाकाही आपासाहेबांकडे आले. त्यास वस्त्रें घेऊन काका गेले आहेत. राजकारण मोठें दिसतें. ऐसें बातमीचें पत्र घाटगे यांस आलें. त्याणीं मला बोलावून पत्रच दाखविलें. मी उत्तर केलें कीं माझें लिहिलें आलें नाहीं. आलें म्हणजे कळवीन. त्यास हा विचार दिनचर्या कळविली पाहिजे. नाहीं तर आपण तेथें मनसबा करितील आणि येथें माझे गळ्यास गोणी येईल. त्यांत याजउपरी सर्वस्व जावो, परंतु श्रीमंतांचे लक्षाशिवाय पाऊल टाकिलें असतां परिणामास जाणार नाहीं. कां ऐसें चित्तांत येईल तर दरबारीं आपला वाली कोणी राहिला नाहीं. तर याजउपरी श्रीमंतांचे पायांशीं लक्ष राखून जें करणें तें करावें त्यांतच परिणाम आहे. देसाई यांचें असें पत्र आलें त्याच समयीं चिंतामणरावआपांस जखमा लागल्या हें वर्तमान आलें, म्हणोन आमची बोलण्याची सुराणी पडली ! कळावें. तिकडील वर्तमान वरचेवर कळवावें. मग मर्जी ! रवाना छ० २७ सफर. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५६९३ श्रीगणराज. ( श्रावण शु० २–२३ जुलई. )

पै॥ छ० ३० सफर सन इहिदे मय्यातैन. बुधवार.

विज्ञापना. आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. पलटणांचे कुचाचें लिहिलें, त्यास छकडे वगैरे काढून दिले, असे कुचाचे बहाने अनेक प्रकारचे पत्रीं लिहितां येत नाहीं. छकडे गेले त्यांनीं तीनशें रुपये घेतले. कडबा दोनशें तीनशें कट व गांवांतील थाळे तांबे लुगडीं वाकळा असा गांवचा नाश केला. तेथून जुगुळास गेले. पहिल्यानें गांव लुटलाच होता. छकडेवाल्यांनीं जाऊन तीनशें रुपये घेतले. नावा घेऊन गेले आहेत ते गांवकरांपासीं वीस रुपये खुराक व पोटगी दर माणसास तीन शेर कणीक. शिवाय तूप गूळ. त्यांत त्या गांवीं कणाक गूळ तूप उत्पन्न होणें कळतच आहे ! उत्पन्न होत नाहीं तेव्हां गांवकरास मारावें ! प्रांतांत देसाई आल्यापासून उपद्रव म्हणोन आज्ञा, त्यास नवा सुभा ! कमाईवांचून आप्तपणा कसा कळेल ? मुख्य प्रजाभोग आहे ! आपल्या आशीर्वादें प्रजन्य जाला. तृण गाईस मिळेल. हल्लीं कुरुंद-

---

१ रघुनाथराव कुरुंदवाडकरांचें मिरजकर बाळासाहेबांस पत्र.

वाडीं परगांवचें मनुष्य दुर्लभ जालें आहे. मग वर्तमानाची वार्ता काय? सुवर्णयष्टीचे प्रकार—त्यास अभ्युच्छ्रय जाला तेथें अभिपतनहेतु उत्पन्न जाहलाच आहे! पात घडेल तेव्हां खरें! चि॥ राजश्री रामचंद्रपंत आपाकडून पत्रें आलीं. इंग्रज वाळा नदी उतरून आले. चिरंजीव राजश्री हरिपंतबाबा यांस खर्चास नाहीं. जावयाची निकड. इंग्रजांचीं पत्रेंहि येतात. त्यांस ह्या गोष्टी श्रीगजाननें निर्वाह करावा इतकीच मर्यादा! पत्रीं काय ल्याहावयाची! राजश्री मोरोबादादाचें पत्र रवाना केलें म्हणोन लिहिलें, त्यास उत्तम ( केलें. ) इचलकर्जीस पलटणवाल्यांनीं रोखा केला त्याच्या जाबसाला-साठीं कारकून जावा यास्तव या मार्गें आले. पलटणवाले यांचे पहारे वगैरे शिरोळाहून निघोन औरवाडास राहिले. कारकून यास शिरोळावरून जातां नये म्हणोन या मार्गें आले नदी उतरून. यामुळें दोन प्रहर अधिक लागले. तों पलीकडे जातांच जळचराकडील पहारेवाल्यांनीं कारकुनाचे अप्रतिष्ठेंत कांहीं बाकी ठेविली नाहीं. मिशा उपटल्या! श्रीपुराहून वाटमार्ग. कवठें वगैरे गांवास निराळें निराळें भोजनास घेतात. श्रीपुरच्या ब्राह्मणास धरून दस्ते मारोन पांच रुपये दहा रुपये येतां जातां घेतात. लाईलाज गोष्टी! बंडगर प्रकरणीं जप्तीस आबा काळे याजकडून तोफा वगैरे आले होते ते हल्लीं पंढरपुरास आहेत. त्यांनीं देवासीं रोखा करोन गांवची जप्ती केली असें चिरं-जीवाकडील कारकुनानें सांगितलें! चिरंजीव सेवेशीं आहेत. विनंती केलीच असेल. इनामाच्या जप्तीचें कारण काय? राजश्री मोरो आबाजीस लिहोन शोध करवावा. काय उत्तर येतें तें लिहावया आज्ञा जाली पाहिजे. रवाना छ० २८ सफर. कादरखानास पाठवून देतों. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५६९४ श्री. ( श्रावण शु० ५—२६ जुलई. )

आज्ञाधारक मोकदमानी कसबे जुगुळ दीर्घदंडायमान विज्ञापना. ऐसी जे, येथील कुशल तागायत छ० ३ माहे रबिलावल मंदवार दोनप्रहरपर्यंत यथास्थित असे. विशेष. आज कंपूचे लष्करांतून स्वार "घासदाण्याचें बोलणें आहे, तर पाटील कुळकर्णी हुजूर येणें आणि मसाला शंभर रुपये देणें;" म्हणोन रोखे घेऊन स्वार येऊन तूर्त मसाला व कमरछोडी द्यावयास पाहिजे. याविषयीं खर्च तो मनस्वी. त्यास काहीं मोताद नाहीं. याप्रकारचें अरिष्ट

---

१ सर्जेराव घाटगे यांस करवीरच्या महाराजांनीं सोन्याच्या काठीचा मान दिला. २ गणेशवाडीहून. ३ चाळासाहेब मिरजकर यांस अजंदास्त.

आज आलें आहे. येविशींची आज्ञा काय ते निरोपावी त्याप्रमाणें वागणूक करूं. यांचे मनाचिठीची तरतूद लवकर होऊन स्वार उठून लाविले तर उत्तम. नाहीं तर कांहीं स्थीत रहात नाहीं. खर्चाखालेंच गांव बुडवितात. येविशीं निवेदन व्हावें म्हणोन विनंती लिहिली आहे. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. ५६९५ श्रीगणराज. ( श्रावण शु० ६–२७ जुलई. )

पै॥ छ० ४ रबिलावल. सन इहिहे मय्यातैन. श्रावण.

विज्ञापना. आज्ञापत्रें पाठविलीं तीं पावलीं. पुण्याचे पत्राच्या नकला पाठविल्या त्या पावल्या. राजश्रीनीं लिहिल्या गोष्टी खऱ्या आहेत. कोकणचा आणा जाला. 'केलें तूज, भावलें मज !' असें जालें. आपण पुण्यवान् आहेत. जलचराचा विश्वास धरूं नये. बातमी राखावी. मिरजेस यांचे हातून काय व्हावयाचें ? मुख्य एक गोष्ट. तालुक्यांत उपद्रव जाला तो पत्रीं लिहितां येत नाहीं. शिंद्याचेथील मनसबा चांगला. त्यांनीं स्थलास उपद्रव किंनिमित्त करावे ! तालुक्यांतील पैका आपण घेतला म्हणजे सहजच पेचांत ( मिरजकर ) आले असा मनसबा. परंतु बहुकालिक आहे. तोंपावेतों श्रीगजानन उपेक्षा करणार नाहीं. राजश्री मोरोबादादाचा प्रकार लिहिला, त्यास त्यानीं तरी काय करावें ! आजपावेतों कैदेंतच होते. हल्लीं जुन्नरास होते. तेथून येणें म्हणोन सरकारची आज्ञा गेली, आले. कारभार वगैरे घेणें, योग्यतेस आणणें, ही प्रभूची इच्छा ! प्रभूच्या चित्तीं नसलिया त्यानीं काय करावें ? आज्ञाधारकता. आज्ञेप्रमाणें रहाणें प्राप्त. सुधानामधारक[3] याची गत असी केली. यांची काय कथा ! राजश्री गोविंदराव काळे यांची मुक्तता जाली, मोठी गोष्ट जाली. त्यानीं वडगांवीं राहतों हें पद घातलेंच आहे ! चिरंजीवाकडे एका नकलेखेरीज बाकीच्या नकला रवाना करितों म्हणोन लिहिलें, उत्तम आहे. नकला खासदस्तूरच्या व राजश्रींचे हातच्या तीन नकला दृष्टीस कोणाच्या पडूं नयेत म्हणोन आज्ञा, त्या आज्ञेप्रमाणें पडूं देत नाहीं. चिरंजीव राजश्री रामचंद्रपंतआपा विजापुराच्या रोंखें कूच करोन जातात असें लिहिलें, उत्तम. राजश्री आपादेसाई व या पलटणांची बातमी कोठवर ठेवावी ! दरबार तो या प्रकारचा. तथा राहिली नाहीं. जिवाजी रामचंद्र यांचें पत्र अनगोळाहून आलेलें पाठविलें आहे. पाहोन माघारें पाठवावया आज्ञा जाली पाहिजे. रवाना छ० ४ रबिलावल. दोडुरास चिरंजीवांनीं[4] ठाणें घातलें. विदित होय हे विज्ञापना.

---

१ रघुनाथराव कुरुंदवाडकराचें मिरजेस बाळासाहेबास पत्र. २ म्हण. ३ अमृतरावाची. ४ चिंतामणरावानीं.

नं. ५६९६ श्री. ( श्रावण शु० ६—२७ जुलै. )

विज्ञापना. दोन्ही महालांच्या चिठ्या येत नाहींत याजमुळें येथें माझा परिणाम लागावयाचा नाहीं. त्यास काय ती आज्ञा करावी. येथें जें श्रीमंतांचे मनास आलें तें घडत गेलें तर परिणाम. नाहीं तर ठीक नाहीं. येथें कांहीं त्यांचे आज्ञेशिवाय वर्तलें असतां परिणाम नाहीं. हें मी वारंवार लिहितों. आपण सोडचिठी पाठवीत नाहीं यावरून अपूर्व भासतें ! मग आपली मर्जी ! पुण्यांतील घर जप्त आहे तें सोडवावयाचें, त्यास हजार रुपयेपर्यंत दरबारखर्च पाहिजे. त्यास कसें करावें ? हजार रुपये कबूल करून घर सोडवून घेणें असल्यास आत्तां घर सोडवून घेतों. पन्नास हजार रुपयेची इमारत जायां होत आहे ! वाडा स्वाधीन जाला असतां दागदोजी करावयास दीड हजार दोन हजार रुपये पाहिजेत. त्यास कसें करावें ती आज्ञा व्हावी तशी वर्तणूक करीन. हजार रुपये घरासाठीं दिले असतां घर मोकळें होईल. त्यास काय तें उत्तर यावें. श्री॥ राजश्री मोरोबादादाकडे गेलों होतों. त्यांणीं आज्ञा केली आहे कीं, श्रीमंतांस एक पत्र मीं सांगतों त्याप्रमाणें पाठवावें. त्याप्रमाणें आपलेस खातरजमेचें पत्र यावें म्हणजे आम्हांस श्रीमंतांपाशीं बलावयास प्रशस्त. त्याणीं मसुदा करून दिल्हा आहे त्याप्रमाणें पत्र श्रीमंतांचे नावें पाठवावें. माझा बोलण्याचा अंदेशा दादा घेतात. कां कीं (मी) परिचित नाहीं. त्यास राजश्री धोंडोपंतबाबा जोग आले म्हणजे परस्परें बिनदिक्कत. त्यास तेच येत नसल्यास मसुदा राजश्री भिकाजीपंतआपा आठवले यांचे हातचा पाठविला आहे त्याप्रमाणें पत्र यावें म्हणजे बोलतां येईल. तूर्त श्रीमंतांपाशीं सर्वाध्यक्ष बाळोजीबाबा कुंजर आहेत. कळावें. वरचेवर पत्र येत असावें. याजउपरी श्रीमंत आपले सरंजामाविशीं विक्षेप करीत नाहींत. आपण श्री कृष्णाबाईपार उत्तरतीरास आले म्हणोन आइकलें हें समजत नाहीं. यांतील हांशील काय तें समजावें. श्रावण मासची दक्षिणा यथास्थित होत आहे. खड्यांचे स्वारीचेपूर्वींचे सालाप्रमाणें दक्षिणा देत आहेत. वाड्यांतील दक्षिणा फार करून दिली. आज सतरा घटकानंतर रमण्यांतील दक्षिणेस प्रारंभ आहे. पाऊस चांगला पडला. रवाना छ० ४ रबिलावल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ पत्र पुण्याहून बाबा काळे यांचें रामचंद्रपंत आपास. २ पुण्यांत हल्लीं जमखिंडीकरांचा वाडा म्हणतात तो.

नं. ५६९७ श्री. ( श्रावण शु० ६–२७ जुलै. )

विज्ञापना. राजश्री बाळकृष्णपंत लागू यांचीं पत्रें आल्यास येत असतां मनोळीच्या रानांत ते कागद मनोळीकर यांस सांपडले. त्याणीं ते कागद येथें घाटगे यांजकडे पाठविले. त्या पत्रांत मजकूर लिहिला आहे कीं, पलटणें सामील करून करवीरावर यावयाचें. हें कार्य उरकल्यावर शिंदे यांजवर चाल करावी हाही इरादा आहे. ” ऐसे अनेक प्रकारचे मनसबे पत्रीं लिहिले आहेत. तीं पत्रें वाचून घाटगे याणीं शिंदे यांस दाखविलीं आणि मला बोलावं पाठविलें. हें वर्तमान मला समजलें. त्याजवर आज दोन दिवस मी त्या सैन्यांत गेलों नाहीं. न जाऊन परिणाम नाहीं. गेलें असतां काय पुसतील हेंही समजत नाहीं. त्यास लागूंस अथवा तिकडे ती॥ राजश्री बाबासाहेब गेले आहेत त्यांस सूचना जावी कीं, कागदपत्र येणें ते बहुत जपून कोणाचे हातास न जात ऐसे येत जात असावे. नाहीं तर व्यर्थ न करितां दगा होईल. पत्रें सांपडलेलीं आलीं म्हणतात हें सत्य मिथ्या हेंही समजत नाहीं. त्यास उद्यां परवां शिंदे यांचे सैन्यांत जातों. होईल मजकूर मागाहून लिहीन. इंग्रज तुंगापार आले यांतील हांशील काय, बाबासाहेब जाऊन मिळणार यांतील मनसबा काय, वाघ कोठें आहेत, ती॥ राजश्री चिंतामणरावआपा कोठें आहेत ? ईश्वरी कृपेकरून आपांचे प्राण रक्षण जाहले. याजउपरी तरी त्यांस लिहावें कीं धसास अडकूं नये. मागाहून आपणास श्रीमंतांचीं पत्रें ही पाठवितों. वडिलीं मागें लिहिलें होतें कीं, तोफखानेवाले यांजपाशीं सरंजामी फौज आहे त्यांस आम्हांकडे यावयास सरकारची आज्ञा व्हावी. ऐसीयास तोफखानेवाले यांजपाशीं एकही सरंजामी राऊत नाहीं. सारीं पथकें माघारीं आलीं. तोफखानेवाले यांस आपणाकडे पाठवावें तर दरमहाचा उपद्रव लावितील, याजमुळें श्रीमंतांस विनंती केली नाहीं. नाहीं तर तोफखानेवाले यांस पाहिजे तर आत्तां परवानगीपत्र पाठवितां येईल. ईश्वर याजउपरी कृपा करीलसें वाटतें. विना हालीमानीशिवाय ( आमच्या सरदारीची ) उभारणी होत नाहीं. घाटगे यांसही पलटणवाले अपाय करितीलसें भासतें. सविस्तर मागाहून लिहितों. सेवेशीं श्रुत होय. रवाना छ० ४ रबिलावल. हे विज्ञापना.

नं. ५६९८ श्री. ( श्रावण शु० ७–२८ जुलै. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधररावजी स्वामीचे सेवेसीं. पोष्य नारो विनायक. कृतानेक सा॥ नमस्कार विनंती येथील कुशल तागायत

१ बाबा काळे याचें रामचंद्रपंत आपास पुण्याहून पत्र. २ राज्यक्रांति, दंगाधोपा.

छ० '१ माहे रबिलाबल यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. "पलटणवाले भृगुवासरीं कूच करून मालगांवाहून कूच करून आरग लिंगनुरावरी गेले. तुम्हास समजलेंच असेल. पुण्याकडील वर्तमान राजश्री सदाशिव मल्हार यांस शिंदे यांनीं कैद करून किल्ल्यास पाठविलें. राजश्री गोविंदराव काळे किल्ल्यावर कैदेंत होते. श्रीमंतांनीं कृपा करून त्यांची मुक्तता करून वडगांवास आणिले. श्रीमंतांची स्वारी तेथें जाऊन काळे यांस भेटून माघारी आली याप्रमाणें लिहिलें आलें. पाऊस सर्वत्र जाहला. तिकडेही जालाच असेल," म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशीयास पलटणवाले यांचें कूच काल रविवारीं आरगेहून होऊन उगारास मुक्काम गेला. इकडील तालुक्याचा घासदाण्याचा ठराव राजश्री जनार्दन मुकुंद याचे विद्यमानें होऊन फडशा जाला असतां हल्लीं राजश्री आपा देसाई कारभारी जाले याणीं मागती या तालुकियांत तमाम गांवगन्ना रोखे पाठविले आहेत. अथणीसही रोखा आला आहे. येथील कारकून लष्करांत आहेत ते बोलतात, परंतु आणखी कांहीं घेतल्याविना उपद्रव तुटेल असें दिसत नाहीं. प्रजेचा भोग आला आहे. पाऊस इकडेही चांगला जाहला. पेरणीचा हंगाम, परंतु दंग्यामुळें कांहींच स्वस्थ वाटत नाहीं. पुण्याकडील वृत्त कळलें. धोंडजी वाघ याचा मुक्काम जालीहाळ तालुक्यांत गाडगोली मनुरावर आहे. इंग्रजी पलटणें सावनुरास आहेत. राजश्री चिंतामणराव आपा व बापू गोखले त्यांजवळ येऊन पोचले. वाघाजवळ दहा हजार फौज आहे. मलप्रभातीरानेंच रामदुर्गाकडे येणार याप्रमाणें नरगुंदाहून वर्तमान आलें आहे. बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे विनंती.

नं. ५६९९ श्रीगणराज. (श्रावण शु० ८—२९ जुलै.)

पै॥ छ ७ रबिलावल. सन इहिदे मय्यातैन. श्रावण.

सेवेशीं हरबाजी नरसिंह. कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० ६ रबिलावल जाणोन वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपल्याकडून छ० २ रबिलावलचें पत्र आलें तें काल पोचलें. "रा॥ शिंदे नि॥ पलटणें मालगांवावर होतीं. कूच करून कुडची ऐनापूर येथें कृष्णा दक्षिणतीरास रहावयास जाणार म्हणोन बातमींत आहे. व पुण्याकडील वर्तमानाचीं पत्रें आलीं तेथें छ० २५ सफरीं राजश्री सदाशिव मल्हार यांस

१ धायगुडे. पत्र बाळासाहेबांस.

राजश्री शिंदे याणीं कैद करून नगरास पाठविलें व गोविंदराव काळे यांजवर श्रीमंतानीं कृपा करून वडगांवचे बागेंत आणिलें. तेथें स्वारी जाऊन भेट घेतली व राजश्री मोरोपंतदादा यांजवर कृपा यजमानांची पूर्ण आहे. परंतु कामांत मात्र नाहींत. राजश्री आपासाहेब विजापूरप्रांतीं आहेत" म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐसीयास पलटणांचें कूच लिंगनुराहून होऊन मंगसुळीवर मुक्काम जाला. याजप्रमाणें तेथें कारकून आहे त्यांचें ही पत्र आलें. याजपर या लगत्यास यावयाचा मनसबा आहेच, त्याजप्रमाणें येतील. सदाशिव मल्हार कैद जाले त्यास ईश्वर कृपा करून अबरू राखील तो निभावला ! तूर्त सर्जेराई जाली आहे. यांत ईश्वरेंच निभवावें. राजश्री आपासाहेब विजापूर प्रांतीं आहेत म्हणून लिहिलें, त्यास त्यांचें ×××××× येथील मुक्कामचें पत्र मलाही होतें. परंतु बहुत लांब गेले. फौज अगदीं थोडी, यास्तव याच लगत्यास असावें हें उत्तम. येविशीं आपलेंही लिहिलें जावें. त्याणींही लिहिलें होतें कीं मिरजप्रांतें येतों. लांब जात नाहीं. राजश्री चिंतामणराव आपा यांचें पत्र हुबळीचे मुक्कामचें आलें आहे त्यांत 'राजश्री बापू गोखलेसह येथें आलों. याजउपर इंग्रजी पलटणांस लवकरच जाऊन मिळतों' म्हणोन लिहिलें आहे. इंग्रजी पलटणें वाघाचे पीछास लागलीं आहेत त्याजमुळें गदग डंबळाकडे जाऊन तेथून कपोतगुड्डाकडे जाऊन तेथें बुनगें ठेऊन सडे फौजेसह मागारे आला. याजप्रमाणें एका पत्रांत बातमी आहे. दुसरे पत्रांत गुर्लहोसूर नजीक येकुडी मलापहारीतीरास मुक्काम आहे. दोहींस तफावत पांच चार कोसांची म्हणोन काल छ. ५ रोजीं अस्तमानीं दोहींकडून बातमी आली होती. घोरपडा वाघाकडील दोन हजार फौज व दोन तोफा याजप्रमाणें दोडवाडावर होता तो मुरगोड तालुक्यांतील रुद्रापूर येथें आला. तेथून गच्चीकुरबेट प्रा॥ गोकाक येथें काल मुक्कामास येणार म्हणोन राजश्री गंगाधरराव नाना जोग यांचें पत्र गोकाकेहून आलें आहे. तालुका फार गडबडला आहे. याजकरितां पांच चारशें स्वार घेऊन यावे म्हणून त्यांचें पत्र आलें आहे त्यापक्षीं एक दिवस जातों. वाघाचा मनसबा बारीअलीकडे यावें हा मनसबा आहे म्हणोन बोलतात. पत्रांतही वर्तमान आहे कीं फित्तूरकरांचें तूर्त वाघाचें सख्यत्व आहे. त्यांचेंही वर्तमान अलीकडे येतो म्हणोन आहे. तिकडे गेला होता तो फिरोन या लगत्यास यावयाचें कारण समजत नाहीं. पलटणें मागें आहेत त्यापक्षीं इकडे तरी जागा

आश्रयास कोणती आहे ? करवीरकरांकडे गेल्यास न कळे. परंतु पलटणें मागें त्याअर्थे तेही जागा देतीलसें वाटत नाहीं. आणखीहि बातमीस पाठविले आहेत. बातमी येईल तशी लिहीन. राजश्री आपासाहेब लांब गेले. त्यांजकडे इकडून पत्रें जावयास लांब पडतें यास्तव त्यांजकडे वर्तमान कळलें पाहिजे याजकारितां विनंती लिहिली आहे. तरी वाघाचें वगैरे वर्तमान त्यांस लिहून पाठवावें. अगर हींच पत्रें जावीं. नदी एकथडीनें गेलीं म्हणजे लवकर जाऊन पावतील यास्तव मुजरद आपासाहेब यांजकडे रवानगी जाली पाहिजे. जासूद नेहमीं जात असतीलच. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५७०० श्री. (श्रावण शु० १०—३१ जुलै.)

पै॥ छ० ११ माहे रबिलावल सन इहिदे मय्यातैन व अलफ.

सेवेशीं गोविंद वासुदेव....[1].... विज्ञापना. तागायत छ० ८ रबिलावल......विशेष.......धोंडजी वाघ फौज सुद्धां येऊन बारीपलीकडे सौंदत्तीवर येऊन उतरला आहे. फौज भारी आहे. बुनगें मनोळीजवळ मलप्रभा पार होऊन मनोळीस येतें. मुरगोड नजीक दोन कोसांवर वाघाकडील तीन हजार फौज येऊन उतरली आहे. यादवाड व गोकाक प्रांतावर स्वारी करून परवां गुरें घेऊन गेले. याप्रमाणें दंगा अनिवार जाला आहे. या प्रांतांत सर्वत्र आपलीं कुटुंबें घेऊन गुळयांस जातात. ....... सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५७०१ श्री. (श्रावण शु० ११—१ आगष्ट)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधररावजी स्वामीचे सेवेशीं.

पोष्य नारो[2] विनायक. कृतानेक सा॥ नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० ९ माहे रबिलावल यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. " राजश्री अमृतरावसाहेब पुण्याहून छ० ९ सफरीं निघोन तळेगांवास गेले. तेथें भोजन करून पुढें चालते जाले. कोणीकडे जातात पहावें. " म्हणोन लिहिलें तें कळलें. विपरीत गोष्टीच घडत जातात. श्रीइच्छा काय आहे न कळे. वाघ याचा मुक्काम मौजे मणिसंगी तालुके नरगुंद येथें मलप्रभा दक्षिणतीरीं आहे. इंग्रजी पलटणें आणिगिरें

---

१ जागा मोकळी टाकिली आहे तेथें पत्र फाटलें आहे. २ पत्र अथणीहून बाळासाहेबांस.

याचे सुमारें आहेत. याप्रमाणें बागलकोटाहून वर्तमान आलें होतें. आणखी वर्तमान येईल तें कळवितों. ( शिंद्याच्या ) पलटणांचा मुक्काम उगारावर आहे. इकडील गांवगन्ना रोखे आले आहेत. व कहीचा वगैरे उपसर्ग होतो. पेशजी घासदाणा उरकला असतां मागती घांसदाणा मागतात. बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे विनंती.

नं. ५७०२ श्री. (श्रावण शु० ११–१ आगष्ट.)

पै॥ छ० १२ रबिलावल. इहिदे मय्यातैन व अलुफ.

सेवेशीं गोविंद वासुदेव. दोनी कर जोडून शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ९ रबिलावल पावेतों स्वामींचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. इंग्रज सावनुरास होते तेथून दरमजल करून छ० ३ रोजीं डंबळास आले. हे बातमी वाघ सौंदत्तीवर होता त्यास लागून रुडी फौज घेऊन लहान दोन तोफा घेऊन रातोरात निघून गेला. कोणी कित्तूर-तालुकेकडे गेला आहे. ( असें म्हणतात. ) मलप्रभेच्या उगमास नदीपार होणार व इकडे येणार अशी एक आवाई व बदामीकडे जालिहाळच्या रोखें गेला अशी एक आवाई आहे. जोती छपरबंद वाघाकडील अद्यापि मौजे होंगल परगणे कित्तूर येथें आहे. वाघ निघोन गेला. बुनगें मनोळीजवळ अगोदर नदीपार होत होतें. ती बातमी इंग्रज डंबळास होते त्याणीं आणवून चार पलटणें व दोन हजार स्वांर येऊन मनोळीनजीक मलप्रभेपलीकडे येऊन उतरले होते. पलीकडे बुनगें व लमाण वगैरे दहा हजार व एक हत्ती होता त्यांजवर येऊन पडून लुटलें. त्यांजपैकीं कांहीं उपलाणीं घोडीं व माणसें वगैरे नदीमध्यें पडून अलीकडे पार होऊन आले. बाकीचे झाडून लुटले गेले. खराबी भारी जाली. नदीपैलतीरीं कसबे शिंदोळीजवळून मनोळीच्या किल्ल्यास तोफा मारितात. शिंदोळी गांवचीं घरें उलगडून लांकडें आणवून ताफे बांधून नदीपार होऊन मनोळी व तोरगल घेणार असें वर्तमान आहे. तोरगलकर राजश्री संभाजीराव शिंदे सेनाखासकेल करवीराहून कसबे कटकोळ येथें दोन हजार प्यादे जमा करून आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७०३ श्री. ( नकल ) ( श्रावण शु० २–२ आगष्ट. )

पुरवणी अनेक आशीर्वाद उपरी. इंग्रज सावनुरास बुनगें आणावयास

---

१ ठाणें कोवाडें प्रांत बेळगांव येथून पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

गेले होते ते फिरोन माघारे श्रावण शु॥ पंचमी शनिवारीं डंबळास येऊन हल्लयानें किल्ला घेऊन काटकांचीं डोंचकीं मारलीं व देसाई यास गळीं दिल्हा. किल्ला राजश्री जिवाजी कृष्ण याचे हवालीं करून गदगचें ठाणेंही बसवून कूच करून सोमवारीं अलगवाडी व नवलगुंदानजीक गेले. मंगळवारीं वाघ संवदत्तीस वेढा देऊन बसला होता तेथें जाऊन गांठ घालावी म्हणोन कूच करून निघाले तों वाघ याणें बुनगें सोडून सडा तीन हजार फौजेनिशीं जालेहाळचे रोखें निघाला. श्री॥ राजश्री बाबासाहेब येथून कूच करून सोमवारीं बदामीकडे इंग्रजांस मिळावयास जावें म्हणोन निघाले. मंगळवारीं चार पांचशें स्वांर नदी उतरोन पलीकडील खेडेंत राहिले होते व बुधवारीं शेंदीडशें लोक दीडप्रहर प्रातःकाळीं नदी उतरोन नदीवर भाकरी तुकडा करीत होते. यजमानही फिरोन टोकरा येतांच त्यांत बसन पार होणार होते. इतक्यांत वाघ तिकडून फौजसुद्धां आला. परंतु इकडील फौजेस गनीमाची फौज असें समजलें नाहीं. श्री॥ राजश्री चिंतामणराव आपा भेटावयास आले असतील या भानावर गेलें. कोण्ही सावध जाले नाहींत. ते नीटच चालून येतांच गडबड जाली. खेडेंत स्वांर व राजश्री वासुदेव काका व नारायणराव लिमये व अंताजीपंत फडके होते ते तयार होऊन पळ काढून होनगुंद्याचे सरदेस गेले. नदीवर लोक होते व घोडीं होतीं तीं (वाघानें) पाडून घेतलीं. सामान कंठाळा वगैरे झाडून गेलें. सांड उंट पाडून नेली. यजमान अलीकडेच होते ते माघारे बुनगेंत आले. वाघमजकूर बुधवारीं जालेहाळास मुक्काम करून दीड तास रात्रीस कूच करून फिरोन माघारा कोणूरचे रोखें गेला. वाघ इकडे आला तेच दिवशीं इंग्रजानीं त्याचें बुनगें व तोफा पाडाव करून नदीदक्षिणतीरास तोफा ठेवून मनोळी किल्ल्यास लाविल्या आहेत. मनोळीकर जेर आले म्हणतात. एक दोन दिवशीं तहकीक वर्तमान कळेल. यजमान बदामीस मुक्काम करून आहेत. मंडळी पळून गेली होती ती येऊन लष्करास परवांच मिळाली. इंग्रजांबरोबर राजश्री बाळकृष्णपंतभाऊ आहेत. गोखले येऊन मिळाले. चिंतामणरावआपा मिळाले. वाघ जालेहाळानजीक आला ते दिवशीं हिरेहाळचे ठाणेंतील जदीद लोक पळून गेले. ते जातांच राळापा काटक याणीं ठाणेंत शिरोन ठाणें बळकावून बसले आहेत. वाघ कित्तुराकडे गेला म्हणोन वदंता आहे. तोंड देऊन उभा राहून लढण्याचा सुमार दिसत नाहीं. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशी-

वाद. राजकी वर्तमान श्री॥ राजश्री अमृतरावसाहेब लोहगडाकडे गेले म्हणोन वर्तमान आहे. सविस्तर ल्याहावें हे आशीर्वाद.

नं. ५७०४ श्री. (श्रावण शु० १२–२ आगष्ट.)

सेवेशीं नागो शामराव सा॥ नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ० १० रबिलावल जाणोन स्वकीय लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. श्रीमंत रावसाहेब निघोन तळेगांवपावेतों गेले. तेथोन कोणेकडे गेल्याचें वर्तमान आलें नाहीं ऐसे पत्रीं मजकूर आपल्या होते. उगेच जीव जगविणेस गेले किंवा तिगस्तां-प्रमाणें जमणार अथवा मोंगलाच्या फौजेकडे किंवा बाया शिंदे यांजकडे गेले ही बातमी आपणाकडे लिहोन येईल त्याप्रमाणें कळवावें. तूर्त कृष्णातीरीं अरिष्ट आम्हावरी आलें आहे याचे निवारणेंविशीं पुणेंत कांहीं प्रयोग जाहला असल्यास आम्हांस कालहरण होईल. येविशीचें वर्तमान ईश्वर (कृपे) करून यावें तरीच बरें आहे. होंगल प्रांत कित्तूर येथें कित्तूरकरानीं करार (बाघास) ऐवज द्यावयाचा केला त्याचा वसूल व्हावयाचा, त्याजकारितां जोती घोरपडे दोन हजारांनिशीं आहे. बाघाचें बुनगें व तोफा मनोळीस नदी उतरून आले. राजश्री चिंतामणरावआपा हुबळी जुनी येथें आहेत. गोखले इंग्रजांस मिळाले. इंग्रज सावनुरास दोन तीन पलटणें आहेत त्यांसीं मिळाले. आपाही (त्यांजकडे) जाणार होते. गदगावरी वरकड इंगरज सरंजामसुद्धां आले होते. निकड पडल्यास बाघानें थांगा मनोळीचा केला आहे. याप्रमाणें बातमी आली आहे. राजश्री बाबा बागलकोटाकडे कटेकेरीवरी आहेत. इकडे येऊन पोंहोंचावें तेंही होत नाहीं. इंगरजांत मिळावें तेंही घडत नाहीं. काय योजना असेल तें न कळे. तसेंच राजश्री आपासाहेबांस आम्ही व राजश्री हरबा-आपानीं महिनाभर लिहितों. "अथणीचे अजमासें विसा कोसांचे अंतरानें असतां पलटणांचें भय नाहीं आणि पलटणांस कृष्णा उतरावयाची उमेद होत नव्हती आणि मिरजेचा रोंख करून असावें" याप्रमाणें वारंवार लिहितों. परंतु समय घालवितात. "जमखिंडी व यादवाड, तेरदाळ, गोकाक पांचशें पांचशें जमावानिशीं कुडचीवरी आम्हांजवळ आलां असतां नदीवरी निपाणीकराची मसलत करीतच नव्हते." हें सर्व लिहिलें त्याचें उत्तर पाठ-

---

१ पत्र नेरलीहून बाळासाहेबांस मिरजेस. २ शिंद्यांचीं पलटणें चिकोडी तालुका घ्यावयास आलीं हें अरिष्ट. ३ चिंतामणरावआपा.

वितात कीं, " नदी उतरणारच नाहींत. उतरूं लागल्यास आम्ही येतों ! " याप्रमाणें उत्तर पाठवितात. परंतु येणेंचें घडत नाहीं. काय कल्पना मनांत आणिली आहे न कळे. शत्रूची मसलत शेवटास जाऊन नंतर उद्योग करितात त्यास आपणही वरचेवरी अथणीचे सुमारें येणेंविशीं लिहिलें पाठवीत जावें आणि जमखिंडी यादवाडचे लोक आम्हांकडे कुमकेस पाठविणेंविशीं जलदीनें लिहोन पाठवावें. संकट तरी आलें आहे. ईश्वरसत्तेनें घडेल तें घडो. सदैव पत्रीं चित्त संतोष करावें. बहुत काय लिहिणें. लोभ करावा हे विनंती.

नं. ५७०५ श्रीगणपतिर्जयति. ( २ आगष्ट. )

ती॥ राजश्री काकासाहेब वडिलांचे सेवेसी.

अपत्यें चिंतामणीनें शिर सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत श्रावण शुद्ध द्वादशीपावेतों मुक्काम दोडवाड येथें वडिलांचे आशीर्वादें वर्तमान क्षेम असे. विशेष. वडिलीं छ० २४ सफरचें पत्र पाठविलें तें छ० २८ सफरीं पावोन लिहिलें वर्तमान कळलें. " जखमा शेजेस जाल्या असतील, पथ्य करीत जावें. स्नान करूं लागल्याचें ल्याहावें. तुमचा मुक्काम कोठें आहे, कर्णेल वसलीसाहेब कोणे ठिकाणीं आहेत हें ल्याहावें " म्हणोन आज्ञा, ऐशास पंधरा दिवस हल्याळांत होतों. जखमा शेजेस आल्या यास्तव तेथोन निघोन राजश्री बापू गोखलेसुद्धां धारवाडास आलों. तेथून हुबळीस आलों. चार दिवस पर्जन्य बहुत लागला यास्तव तेथें राहणें जालें होतें. शुद्ध तृतीयेस कूच करून शिरटीचे मुक्कामास जाऊन इंग्रजांस सामील जालों. तेथून डंबळास इंग्रजांसुद्धां गेलों. तेथील ठाण्यांतून गोळी वाजविली तेव्हां इंग्रजांनीं हल्ला करून आंत गेले. तीनचारशेंपर्यंत माणूस कापून काढिलें. गांव लुटून फस्त जाला. ठाण्यांत इकडील लोक घालून बंदोबस्त करून गदगास आलों. तेथीलही बंदोबस्त जाला. वाघ फौजसुद्धां संवदत्तीवर ( आहे, ) बुनगें मनोळीजवळ नदी उतरणार, अशी बातमी कळल्यावर मजल दरमजल मनोळीनजीक आलों. इतक्यांत धोंडजी कांहीं जमाव घेऊन बदामीच्या सुमारें गेला. कांहीं फौज व पेंढार, लमाण, बुणगें कित्तुरचे रोखें गेलें. बुनगें थोडें पलीकडे उतरून गेलें. अलीकडे दोन तीन हजार सांपडलें तें लुटलें. तेथून काल कूच करून आम्ही येथें आलों. इंग्रजांचा मुक्काम संवदत्तीवर जाला. धोंडजी बदामीकडे गेला होता त्याणें ती॥ राजश्री बाबासाहेबांकडील बुणगें थोडें नदीअलीकडे इकडे येण्याकरितां आलें होतें त्यांजवर तोंड टाकून झाबडाझाबड करून काल या मार्गें येऊन कित्तुराकडे गेला. त्याचे पिच्छावर आज जावयाचा बेत होता,

परंतु मोंगलाकडील फौज आज संवद्त्तीचे मुक्कामास आली. त्यांच्या भेटी व्हावयाच्या, सबब आज इंग्रजांचा मुक्काम जाला. उदईक कूच करून वाघाचे पिच्छावर जाणार. आम्ही बुणगें येथें ठेवून सडे होऊन पुढें जातों. जखमा निखालस बऱ्या जाल्या. स्नान हल्याळांतच केलें. कर्णेल वसली-साहेब बहादुर यांजबरोबर सामान तीन हजार तुरुपस्वार, दहा बारा पलटणें, त्यांत दोन अडीच हजार गोरे आहेत. चाळीस तोफा, पन्नास हत्ती, या-प्रमाणें पोक्त सामान आहे. वाघास शिकस्त करण्याचें बोलण्यांत बहुत आहे. होईल तें मागाहून सेवेसीं विनंती लिहितों. तुरुपस्वारांतील तोफांस घोडेच जुंपतात. लयनेनेंच तोफा अघाडीस ठेवून चालतात. सात रीजीमेंट बरोबर आहेत. त्यांत एक गोऱ्यांचें. दर रिजिमिंटास पांचशें स्वार याप्रमाणें असेल. घण्याची कस्त भारी. वसली हल्लेस अथवा लढाईस अघाडीस चालतो. वडि-लांस कळावें. सदैव पत्र पाठवून बालकाचा सांभाळ करीत जावा. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५७०६ श्रीगणराज. (श्रावण शु॥ १२--२ आगष्ट.)

विज्ञापना. वडिलीं तीन पुरवण्या पाठविल्या त्या मीच पाहिल्या. दुसऱ्यास दाखविल्या नाहींत. राजश्री मोरोबादादांसीं पहिलेंच बोलणें त्यांचें जालें. मागोन राजश्री मोरो आपाजीचें जालें. त्यास राजश्री दादानीं राजश्री मोरो आपाजीचें बोलणें ऐकोन घेतलें. परंतु त्यानीं काय बोलण्यांतील भाव समजाविले त्याचे उद्गार निघाले नाहींत. ते पक्षीं प्रथम बोलणारानीं खचित करोन ठेविलें असें भासतें. त्यास राजश्री मोरो आपाजी बोलले तें यथास्थित आहे. राजश्री दादांकडे प्रसंगच आलिया मग चिंता करूं नये. परंतु बिंबव-णारानीं सर्व कार्याच्या पूर्वीं बिंबवून ठेविलें. काय गोष्ट इमानाची आहे! ज्यानीं गोष्ट बिंबविली ते आपल्या यजमानांपेक्षां यांस अधीक मानतात! अगत्याच्या गोष्टी अशाच आहेत! परंतु इमान ज्याचें शाबूद त्याजला बेमानाचे हातून कांहीं व्हावयाचें नाहीं. राजश्री मोरोबादादाचें पत्र आलेलें पाठविलें तें पावलें. आपल्या पत्राची नक्कलही पाहिली. चि॥ राजश्री धोंडो-बाची प्रकृत ठीक नाहीं म्हणोन पुरवणी लिहिली तिचा अर्थ ध्यानांत आला नाहीं. वरकड विचार पाहतां कांहीं ठिकाण नाहीं. चिरंजीवास वस्त्रें घेऊन

१ रघुनाथराव कुरुंदवाडकरांचें बाळासाहेबांस पत्र. २ वांटणीसंबंधें सांगली-करांच्या वकिलाचें मोरोबादादाशीं. ३ रामचंद्रपंत आपास सरदारीचीं वस्त्रें घेऊन पेशव्यांचा कारकून येणार.

येणार ते आधीं मिरजेस येऊन मग तिकडे जाणार, त्यास किल्ल्यांत येतील त दिवशीं बंकांत चांगले पदाति घालून भव्य दर्शन होई असें करावें. शिलेदारमंडळी आपणापाशीं कचेरीस लोक जमादार असे भव्य प्रदर्शकता दिसली पाहिजे. वस्त्रें व रकमा कोणा कोणास येणार ती आज्ञा जाली पाहिजे. करवीरचे स्वारीस जातेसमयीं आपण वस्त्रें देत होते ती घेतली नाहींत. हल्लीं सरकारचीं आलीं हीं तो घेतली पाहिजेत, असें आहे. सर्व गोष्टी श्रीचे स्वाधीन. बाण अंगास बांधून ( बक्षी ) उडविले, मारिले, त्यास या गोष्टी अतिरिक्त होतात असें जन बोलतें. परिणाम काय होतो पहावें. सुधा निघोन गेले, परंतु कांहीं डौल करितील किंवा कसें काय करितील याची आज्ञा जाली पाहिजे. राजश्री काळे यानीं राजश्री ( मोरोबा दादांस ) गोष्ट बिंबवून ठेविली हिचा बूट काय तो राजश्री मोरोपंतास लिहोन कांहीं निघालिया लिहिण्यांत यावें. काळे यानीं अवतारच घेतला आहे ! आमच्या वकिलांचे दारीं माणसें बसवून अबरू घेतात. काळे पैका कबूल करोन आले तोही कोणी मागत नाहीं व सरदारीचीं वस्त्रें व इतर कार्य करितात. प्रथम अक्षरी याचे देवतेची आराधनाच पावली असेलसें दिसतें. ज्वर उपशम जाल्याचें लिहावया आज्ञा जाली पाहिजे. रवाना छ० १० रबिलावल. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५५०७ श्री. ( श्रावण शु० १३–२ आगष्ट. )

सेवेशीं तागायत छ० ११ रबिलावल मु॥ नेरली वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तोरगलाहून बातमीचें पत्र आलेलें त्यांतील अर्थ राजश्री हरबाआपा याणीं लिहिलें आहे त्यावरून अवगत होईल. राजश्री ( रामचंद्रपंत ) आपासाहेब याणीं इकडील आस्था सोडोन आम्हास टाकोन निघोन गेले. आम्ही त्यांस लिहितां दमास आलों. हल्लीं इंग्रजांची स्वारी मनोळीस येऊन पोचली. याउप्परी तरी आपासाहेबानीं माघारे परतून मिरजेचे सुमारें आलें असतां कंपूचे पाय पोटांत येतात हा अर्थ आपण त्यांस लिहून ध्यानांत त्यांचे येई तें करावें. त्यांचा कालच फिरला त्यापक्षीं त्यांस लिहून थकलों. आपण तरी लिहून सुचवावें. ईश्वर इच्छा प्रमाण. सर्व अर्थ ध्यानांत आहे. पुणेंकडील वर्तमाम कळवीत जावें. सेनाखासकेल यांचें पत्र

---

१ अमृतराव. २ या सांकेतिक शब्दांतून दौलतराव अथवा कुंजर या नांवांचा बोध व्हावयास पाहिजेसें वाटतें. ३ नागो शामजी यांचें पत्र बाळासाहेबांस

बातमीचें आलें त्याची तालीक पाठविली आहे त्यावरून कळेल. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नं. ५७०८ श्री. ( श्रावण शु० १३–३ आगष्ट. )

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गंगाधररावजी

स्वामीचे सेवेशीं

पोष्य नारो विनायक. सा॥ नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० ११ रबिलावल यथास्थित असे. विशेष. धोंडजी वाघ संवदत्तीवर होता तेथून सडी स्वारी करून दोडवाडाकडे गेला. त्याजकडील बुनगें मनोळीजवळ मलप्रभा पार होत होतें. इतक्यांत इंग्रज मजल दरमजल लक्ष्मेश्वराहून येऊन बुनगें नदीपार होत होतें तें झाडून लुटलें. नदींत नाव भरून येत होती तिजवर तोफा लागू करून नाव बुडविली. मनोळीस नदीपलीकडून इंग्रजांनीं तोफा लाविल्या आहेत. याप्रमाणें यादवाडाकडून वर्तमान आलें आहे. मागाहून आणखी वर्तमान येईल तें लिहून पाठवूं. पलटणवाल्यांचा मुक्काम उगारावरच आहे. बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे विनंती.

नं. ५७०९ श्रीगणराज. ( ३ आगष्ट. )

ती॥ राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेसी.

अपत्यें गणेशानें दोनी कर जोडून सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत श्रावण शु॥ १३ मु॥ दोडवाड येथें वडिलांचे आशीर्वादें सुखरूप असे. विशेष. अलीकडे वडिलांकडून आशीर्वादपत्र येऊन सांभाळ होत नाहीं तर सदैव आशीर्वादपत्र पाठवून सांभाळ केला पाहिजे. यानंतर इकडील मजकूर तर इंग्रजांचा मुक्काम संवदत्तीस आहे. वाघाचा मुक्काम परवां एकादशीस संगोलीस बुनगेंसुद्धां होता. पुढें झाडींत जावें हा मनसबा आहे. वाघाकडील कांहीं बुनगें मलापहारी दक्षिण तीर मनोळीजवळ होतें तें इंग्रजानीं लुटलें. किल्ल्यावरून मारागिरी जाली. करवीरकर व इंग्रजांची चुरस लागली. सावनूर तालुक्यापैकीं ठाणें एक हनगल मात्र अद्याप इकडे स्वाधीन नाहीं. बाकीचीं झाडून ठाणीं बसलीं. गदग, डंबळ, लक्ष्मेश्वर झाडून सरंजामी बसलीं. वडिलांस कळावें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना. पुण्याकडील इकडे लोक मनस्वी वर्तमान बोलतात सरंजाम वगैरे याचें. विदित होय हे विज्ञापना.

---

१ पत्र अथणीहून. २ गणेश विश्वनाथ पटवर्धन भिलवडीकर यांचें बाळासाहेबांस पत्र. ३ पटवर्धनांचा सरंजाम पेशव्यांनीं शिंद्यांस दिला वगैरे.

५७१० श्री. ( श्रावण शु० १४–४ आगष्ट. )

पै॥ छ० २३ रबिलावल. भृगुवार. श्रावणमास. सन इहिदे मय्यातैन व अल्लफ.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब सेवेसीं

पोष्य बाळकृष्ण लक्ष्मण. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ १२ रबिलावल मुक्काम लष्कर नजीक संवदत्ती मलप्रहरा दक्षिणतीर वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री पूर्णय्या यांचा व आमचा ऋणानबंध. या स्वारींत बहुत उपयोगीं आले. त्यांचें काम आम्ही करावें लागतें. याजकरितां त्याणीं आम्हास सांगितलें कीं, आमचे प्रांतांतील गृहस्थ मिरजेस राहून इकडे खेळ करितो तो धरून दिला असतां आम्हांवरी कृतोपकार होतील; व इंग्रज बहादूर याणींहि सांगितलें, यास्तव स्वामीस विनंती लिहिली आहे. तरी आयगरु कृष्णापा नाईक मिरजेस असतात त्यांस धरून नेविले पाहिजेत. त्याचे ओळखी पूर्णय्याकडील हरकारे दोघे आले आहेत हे दाखवितील. हें कार्य जालें असतां इकडून समयानुसार उपयोगीं पडतील. हें कार्य करवून देवितों असें मी बोललों आहें. हें काम जरूर करावें. उपयोग आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७११ श्री. तालीक. ( श्रावण व० २–६ आग. )

राजश्री बाळकृष्णपंत गोसावी यांस

विनंती उपरी. पत्र पाठविलें तें पावलें. पलटणें नदीपार होणार कीं काय, वाघ कोठें आहे, मनोळीस ठाणें पडल्याचें वर्तमान कसें आहे, सरदेसाई होंगळ टाकून जावयास कारण काय, पक्कें वर्तमान आणवून ल्याहावें म्हणोन लिहिलें, त्यास पलटणें संगोळीस आहेत. वाघ खानापुरापाशीं नदी उतरून अलीकडे येणार याप्रमाणें मौरिहाळचे लष्कराहून परवां पत्र आलें होतें. अद्याप उतरल्याचें वर्तमान नाहीं. वाघ नदी उतरोन अलीकडे आल्यास पलटणेंही उतरणार. त्याचा पीछा कोठपर्यंत जाईल तेथपर्यंत पुरवणार, याप्रमाणें पाच्छापुराहून राजश्री महादाजीपंत देशपांडे गोकाककर यांचें लिहिणें आतांच आलें. मनोळीस ठाणें पडल्याचें वर्तमान तहकिकांत नाहीं. चचंडी, मुरगुड वगैरे ठाणीं टाकून लोक पळाले. ठाणीं रिकामींच आहेत. सरदेसाई जावयाचें कारण वाघ नदीपार होणार त्याच्या पाठीमागें पलटणें येणार.

---

१ ल.गु. २ शिंद्यांचीं. ३ वाघाचा सरदार जोती घोरपडा याच्या लष्करांतून. ४ इंग्रजाचीं.

दोघांचाही विश्वास नाहीं. पैंचांत असावयाचें कारण काय, या अर्थें झाडींत आसरा केला. रवाना छ० १४ राबिलावल. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं. ५७१२ श्री. (श्रावण व० २–६ आगष्ट.)

सेवेशीं नागो शामराव. सा॥ नमस्कार विनंती तागायत छ० १४ राबिलावल वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तेथें इकडील बातमीविशीं लिहिलें, पेशास काल आपणास सविस्तर लिहिलेंच आहे. संवदत्तीवर पलटणेंसुद्धां मुक्काम करून आहेत. वाघ निघोन खानापुराकडे गेला. जोती छपरबंद मारेहाळाजवळ उतरोन गांवास उपद्रव केला आहे, म्हणोन वर्तमान आहे. शिंदे यांजकडील कंपूपैकीं एक पलटण अलीगोल यांजकडील कृष्णा उतरलें आहे. वरकर अद्याप पैलीकडे आहेत. वरचेवर उतरतात. बरकड अधिकोत्तर नाहीं. आपणास कळावें. इंग्रजी पलटणें पुढें येणार ऐसें वर्तमान आहे. आपणास पक्कें वर्तमान आल्यानंतर लिहून पाठवितों. मुद्दाम माणसें पाठविलीं आहेत. येतांच पाठवून देतों. पुणेंकडील अलीकडील वर्तमान आलें असल्यास लिहून कळवावें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नं. ५७१३ श्री. (श्रावण व० ३–७ आगष्ट.)

सेवेशीं बाळकृष्ण लक्ष्मण. सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० १५ राबिलावल मु॥ लष्कर (नजीक) कित्तुर वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तुंगभद्रातीरपासून सरकारी अंमल होता तो झाडून सरकारच्या हवालीं झाला. मामलतीवर जुने कमावीसदार होते त्यांचे हवालीं जाला. सरंजामी तालुक्यास घालमेल नवे अमलाची दिसते. समय येईल तसें करावें लागतें. पुढें कसा विचार पाहिजे तसा करावयासीं येईल. श्री॥ राजश्री आपासाहेब यांची भेट जाहली. शिरपेंच घोडा व वस्त्रें दिल्हीं. अद्याप बोलणें जालें नाहीं. मागाहून होईल ती विनंती लिहितों. वाघ शहापूरनजीक गेला. जोती घोरपडे वगैरे मिळोन फौजा दहा हजारपर्यंत आहे. तो पळतो. हे पाठीस लागत चालले आहेत. कोठपर्यंत मजल जाते पहावें. फौजा फार मिळाल्या. इंग्रज दहा बारा हजार फौज आहे व नबाबाकडील चार हजार फौज आली. गोखले व आपली फौज पांच हजार आहे. वरचेवर

---

१ पत्र नेरलीहून बाळासाहेबांस. २ इंग्रजांच्या लष्करांतून बाळासाहेबांस पत्र लागूंचें. ३ चिंतामणराव आपांची व वसली साहेबांची औपचारिक भेट.

गेले होते ते फिरोन माघारे श्रावण शु॥ पंचमी शनिवारीं डंबळास येऊन हल्ल्यानें किल्ला घेऊन काटकांचीं डोंचकीं मारलीं व देसाई यास गर्दी दिल्हा. किल्ला राजश्री जिवाजी कृष्ण याचे हवालीं करून गदगचें ठाणेंही बसवून कूच करून सोमवारीं अलगवाडी व नवलगुंदानजीक गेले. मंगळवारीं वाघ संवदत्तीस वेढा देऊन बसला होता तेथें जाऊन गांठ घालावी म्हणोन कूच करून निघाले तों वाघ याणें बुनगें सोडून सडा तीन हजार फौजेनिशीं जालेहाळचे रोखें निघाला. श्री॥ राजश्री बाबासाहेब येथून कूच करून सोमवारीं बदामीकडे इंग्रजांस मिळावयास जावें म्हणोन निघाले. मंगळवारीं चार पांचशें स्वांर नदी उतरोन पलीकडील खेडेंत राहिले होते व बुधवारीं शेंदीडशें लोक दीडप्रहर प्रातःकाळीं नदी उतरोन नदीवर भाकरी तुकडा करीत होते. यजमानही फिरोन टोकरा येतांच त्यांत बसन पार होणार होते. इतक्यांत वाघ तिकडून फौजसुद्धां आला. परंतु इकडील फौजेस गनीमाची फौज असें समजलें नाहीं. श्री॥ राजश्री चिंतामणराव आपा भेटावयास आले असतील या भानावर गेले. कोण्ही सावध जाले नाहींत. ते नीटच चालून येतांच गडबड जाली. खेडेंत स्वांर व राजश्री वासुदेव काका व नारायणराव लिमये व अंताजीपंत फडके होते ते तयार होऊन पळ काढून होनगुंद्याचे सरदेस गेले. नदीवर लोक होते व घोडीं होतीं तीं (वाघानें) पाडून घेतलीं. सामान कंठाळा वगैरे झाडून गेलें. सांड उंट पाडून नेली. यजमान अलीकडेच होते ते माघारे बुनगेंत आले. वाघमजकूर बुधवारीं जालेहाळास मुक्काम करून दीड तास रात्रीस कूच करून फिरोन माघारा कोणूरचे रोखें गेला. वाघ इकडे आला तेच दिवशीं इंग्रजानीं त्याचें बुनगें व तोफा पाडाव करून नदीदक्षिणतीरास तोफा ठेवून मनोळी किल्ल्यास लाविल्या आहेत. मनोळीकर जेर आले म्हणतात. एक दोन दिवशीं तहकीक वर्तमान कळेल. यजमान बदामीस मुकाम करून आहेत. मंडळी पळून गेली होती ती येऊन लष्करास परवांच मिळाली. इंग्रजांबरोबर राजश्री बाळकृष्णपंतभाऊ आहेत. गोखले येऊन मिळाले. चिंतामणरावआपा मिळाले. वाघ जालेहाळानजीक आला ते दिवशीं हिरेहाळचे ठाणेंतील जदीद लोक पळून गेले. ते जातांच बाळापा काटक याणीं ठाणेंत शिरोन ठाणें बळकावून बसले आहेत. वाघ कित्तुराकडे गेला म्हणोन वदंता आहे. तोंड देऊन उभा राहून लढण्याचा सुमार दिसत नाहीं. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशी-

वादि. राजकी वर्तमान श्री॥ राजश्री अमृतरावसाहेब लोहगडाकडे गेले म्हणोन वर्तमान आहे. सविस्तर ल्याहावें हे आशीर्वाद.

नं. ५७७४ श्री. ( श्रावण शु० १२–२ आगष्ट. )

सेवेशी नागो शामराव सा॥ नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ० १० राबिलावल जाणोन स्वकीय लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. श्रीमंत रावसाहेब निघोन तळेगांवपावेतों गेले. तेथोन कोणेकडे गेल्याचें वर्तमान आलें नाहीं. ऐसे पत्रीं मजकूर आपल्या होते. उगेच जीव जगविणेस गेले किंवा तिगस्तां-प्रमाणें जमणार अथवा मोंगलाच्या फौजेकडे किंवा बाया शिंदे यांजकडे गेले हो बातमी आपणाकडे लिहोन येईल त्याप्रमाणें कळवावें. तूर्त कृष्णातीरीं अरिष्ट आम्हावरी आलें आहे याचे निवारणेंविशीं पुणेंत कांहीं प्रयोग जाहला असल्यास आम्हांस कालहरण होईल. येविशीचें वर्तमान ईश्वर ( कृपे ) करून यावें तरीच बरें आहे. होंगल प्रांत कित्तूर येथें कित्तूरकरानीं करार ( वाघास ) एवज द्यावयाचा केला त्याचा वसूल व्हावयाचा, त्याजकरितां जोती घोरपडे दोन हजारांनिशीं आहे. वाघाचें बुनगें व तोफा मनोळीस नदी उतरून आले. राजश्री चिंतामणरावआपा हुबळी जुनी येथें आहेत. गोखले इंग्रजांस मिळाले. इंग्रज सावनुरास दोन तीन पलटणें आहेत त्यांसीं मिळाले. आपाही ( त्यांजकडे ) जाणार होते. गदगावरी वरकड इंगरज सरंजामसुद्धां आले होते. निकड पडल्यास वाघानें थांगा मनोळीचा केला आहे. याप्रमाणें बातमी आली आहे. राजश्री बाबा बागलकोटाकडे कटेकेरीवरी आहेत. इकडे येऊन पोंहोंचावें तेंही होत नाहीं. इंगरजांत मिळावें तेंही घडत नाहीं. काय योजना असेल तें न कळे. तसेंच राजश्री आपासाहेबांस आम्ही व राजश्री हरबा-आपानीं महिनाभर लिहितों. " अथणीचे अजमासें विसा कोसांचे अंतरानें असतां पलटणांचें भय नाहीं आणि पलटणांस कृष्णा उतरावयाची उमेद होत नव्हती आणि मिरजेचा रोंख करून असावें " याप्रमाणें वारंवार लिहितों. परंतु समय घालवितात. "जमखिंडी व यादवाड, तेरदाळ, गोकाक पांचशें पांचशें जमावानिशीं कुडचीवरी आम्हांजवळ आलां असतां नदीवरी निपाणीकराची मसलत करीतच नव्हते." हें सर्व लिहिलें त्याचें उत्तर पाठ-

---

१ पत्र नेरलीहून बाळासाहेबांस मिरजेस. २ शिंद्यांचीं पलटणें चिकोडी तालुका घ्यावयास आलीं हें अरिष्ट. ३ चिंतामणरावआपा.

वितात कीं, " नदी उतरणारच नाहींत. उतरूं लागल्यास आम्ही येतों ! " याप्रमाणें उत्तर पाठवितात. परंतु येणेंचें घडत नाहीं. काय कल्पना मनांत आणिली आहे न कळे. शत्रूची मसलत शेवटास जाऊन नंतर उद्योग करितात त्यास आपणही वरचेवरी अथणीचे सुमारें येणेंविशीं लिहिलें पाठवीत जावें आणि जमखिंडी यादवाडचे लोक आम्हांकडे कुमकेस पाठविणेंविशीं जलदीनें लिहोन पाठवावें. संकट तरी आलें आहे. ईश्वरसत्तेनें घडेल तें घडो. सदैव पत्रीं चित्त संतोष करावें. बहुत काय लिहिणें. लोभ करावा हे विनंती.

नं. ५७०५ श्रीगणपतिर्जयति. ( २ आगष्ट. )

ती॥ राजश्री काकासाहेब वडिलांचे सेवेसी.

अपत्यें चिंतामणीनें शिर सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत श्रावण शुद्ध द्वादशीपावेतों मुक्काम दोडवाड येथें वडिलांचे आशीर्वादें वर्तमान क्षेम असे. विशेष. वडिलीं छ० २४ सफरचें पत्र पाठविलें तें छ० २८ सफरीं पावोन लिहिलें वर्तमान कळलें. " जखमा शेजेस जाल्या असतील, पथ्य करीत जावें. स्नान करूं लागल्याचें ल्याहावें. तुमचा मुक्काम कोठें आहे, कर्णेल वसलीसाहेब कोणे ठिकाणीं आहेत हें ल्याहावें " म्हणोन आज्ञा, ऐशास पंधरा दिवस हल्याळांत होतों. जखमा शेजेस आल्या यास्तव तेथोन निघोन राजश्री बापू गोखलेसुद्धां धारवाडास आलों. तेथून हुबळीस आलों. चार दिवस पर्जन्य बहुत लागला यास्तव तेथें राहणें जालें होतें. शुद्ध तृतीयेस कूच करून शिरटीचे मुक्कामास जाऊन इंग्रजांस सामील जालों. तेथून डंबळास इंग्रजांसुद्धां गेलों. तेथील ठाण्यांतून गोळी वाजविली तेव्हां इंग्रजांनीं हल्ला करून आंत गेले. तीनचारशेंपर्यंत माणूस कापून काढिलें. गांव लुटून फस्त जाला. ठाण्यांत इकडील लोक घालून बंदोबस्त करून गदगास आलों. तेथीलही बंदोबस्त जाला. वाघ फौजसुद्धां संवदत्तीवर ( आहे, ) बुनगें मनोळी जवळ नदी उतरणार, अशी बातमी कळल्यावर मजल दरमजल मनोळीनजीक आलों. इतक्यांत धोंडजी कांहीं जमाव घेऊन बदामीच्या सुमारें गेला. कांहीं फौज व पेंढार, लमाण, बुणगें कित्तुरचे रोखें गेलें. बुनगें थोडें पलीकडे उतरून गेलें. अलीकडे दोन तीन हजार सांपडलें तें लुटलें. तेथून काल कूच करून आम्ही येथें आलों. इंग्रजांचा मुक्काम संवदत्तीवर जाला. धोंडजी बदामीकडे गेला होता त्याणें ती॥ राजश्री बाबासाहेबांकडील बुणगें थोडें नदीअलीकडे इकडे येण्याकरितां आलें होतें त्यांजवर तोंड टाकून झाबडाझाबड करून काल या मार्गें येऊन कित्तुराकडे गेला. त्याचे पिच्छावर आज जावयाचा बेत होता,

परंतु मोंगलाकडील फौज आज संवदत्तीचे मुक्कामास आली. त्यांच्या भेटी व्हावयाच्या, सबब आज इंग्रजांचा मुक्काम जाला. उद्ईक कूच करून वाघाचे पिच्छावर जाणार. आम्ही बुणगें येथें ठेवून सडे होऊन पुढें जातों. जखमा निखालस बऱ्या जाल्या. स्नान हल्याळांतच केलें. कर्नेल वसली-साहेब बहाद्दुर यांजबरोबर सामान तीन हजार तुरुपस्वार, दहा बारा पलटणें, त्यांत दोन अडीच हजार गोरे आहेत. चाळीस तोफा, पन्नास हत्ती, या-प्रमाणें पोक्त सामान आहे. वाघास शिकस्त करण्याचें बोलण्यांत बहुत आहे. होईल तें मागाहून सेवेसीं विनंती लिहितों. तुरुपस्वारांतील तोफांस घोडेच जुंपतात. लयनेनेंच तोफा अघाडीस ठेवून चालतात. सात रीजीमेंट बरोबर आहेत. त्यांत एक गोऱ्यांचें. दर रिजिमिंटास पांचशें स्वार याप्रमाणें असेल. घण्याची कस्त भारी. वसली हल्लेस अथवा लढाईस अघाडीस चालतो. वडि-लांस कळावें. सदैव पत्र पाठवून बालकाचा सांभाळ करीत जावा. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५७०६ श्रीगणराज. (श्रावण शु॥ १२–२ आगष्ट.)

विज्ञापना. वडिलीं तीन पुरवण्या पाठविल्या त्या मीच पाहिल्या. दुसऱ्यास दाखविल्या नाहींत. राजश्री मोरोबादादासीं पहिलेंच बोलणें त्याचें जालें. मागोन राजश्री मोरो आपाजीचें जालें. त्यास राजश्री दादानीं राजश्री मोरो आपाजीचें बोलणें ऐकोन घेतलें. परंतु त्यानीं काय बोलण्यांतील भाव समजाविले त्याचे उद्गार निघाले नाहींत. ते पक्षीं प्रथम बोलणारानीं खचित करोन ठेविलें असें भासतें. त्यास राजश्री मोरो आपाजी बोलले तें यथास्थित आहे. राजश्री दादांकडे प्रसंगच आलिया मग चिंता करूं नये. परंतु बिंबिव-णारानीं सर्व कार्याच्या पूर्वी बिंबवून ठेविलें. काय गोष्ट इमानाची आहे! ज्यानीं गोष्ट बिंबविली ते आपल्या यजमानांपेक्षां यांस अधीक मानतात! अगत्याच्या गोष्टी अशाच आहेत! परंतु इमान ज्याचें शाबूद त्याजला बेमानाचे हातून कांहीं व्हावयाचें नाहीं. राजश्री मोरोबादादाचें पत्र आलेलें पाठविलें तें पावलें. आपल्या पत्राची नक्कलही पाहिली. चि॥ राजश्री धोंडो-बाची प्रकृत ठीक नाहीं म्हणोन पुरवणी लिहिली तिचा अर्थ ध्यानांत आला नाहीं. बरकड विचार पाहतां कांहीं ठिकाण नाहीं. चिरंजीवास वस्त्रें घेऊन

१ रघुनाथराव कुरुंदवाडकरांचें बाळासाहेबांस पत्र. २ वांटणीसंबंधें सांगली-करांच्या वकिलाचें मोरोबादादाशीं. ३ रामचंद्रपंत आपास सरदारीचीं वस्त्रें घेऊन पेशव्यांचा कारकून येणार.

येणार ते आधीं मिरजेस येऊन मग तिकडे जाणार, त्यास किल्ल्यांत येतील त दिवशीं बंकांत चांगले पदाति घालून भव्य दर्शन होई असें करावें. शिलेदारमंडळी आपणापाशीं कचेरीस लोक जमादार असे भव्य प्रदर्शकता दिसली पाहिजे. वस्त्रें व रकमा कोणा कोणास येणार ती आज्ञा जाली पाहिजे. करवीरचे स्वारीस जातेसमयीं आपण वस्त्रें देत होते ती घेतली नाहींत. हल्लीं सरकारचीं आलीं हीं तो घेतली पाहिजेत, असें आहे. सर्व गोष्टी श्रीचे स्वाधीन. बाण अंगास बांधून ( बक्षी ) उडविले, मारिले, त्यास या गोष्टी अतिरिक्त होतात असें जन बोलतें. परिणाम काय होतो पहावें. सुधा निघोन गेले, परंतु कांहीं डौल करितील किंवा कसें काय करितील याची आज्ञा जाली पाहिजे. राजश्री काळे यानीं राजश्री ( मोरोबा दादांस ) गोष्ट बिंबवून ठेविली हिचा बूट काय तो राजश्री मोरोपंतास लिहोन कांहीं निघालिया लिहिण्यांत यावें. काळे यानीं अवतारच घेतला आहे ! आमच्या वकिलांचे दारीं माणसें बसवून अब्रू घेतात. काळे पैका कबूल करोन आले तोही कोणी मागत नाहीं व सरदारीचीं वस्त्रें व इतर कार्य करितात. प्रथम अक्षरी याचे देवतेची आराधनाच पावली असेलसें दिसतें. ज्वर उपशम जाल्याचें लिहावया आज्ञा जाली पाहिजे. रवाना छ० १० राबिलावल. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५७०७ श्री. ( श्रावण शु० १३–३ आगष्ट. )

सेवेशीं तागायत छ० ११ राबिलावल मु॥ नेरली वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तोरगलाहून बातमीचें पत्र आलेलें त्यांतील अर्थ राजश्री हरबाआपा याणीं लिहिलें आहे त्यावरून अवगत होईल. राजश्री ( रामचंद्रपंत ) आपासाहेब याणीं इकडील आस्था सोडोन आम्हास टाकोन निघोन गेले. आम्ही त्यांस लिहितां दमास आलों. हल्लीं इंग्रजांची स्वारी मनोळीस येऊन पोचली. याउप्परी तरी आपासाहेबानीं माघारे परतून मिरजेचे सुमारें आलें असतां कंपूचे पाय पोटांत येतात हा अर्थ आपण त्यांस लिहून ध्यानांत त्यांचे येई तें करावें. त्यांचा कालच फिरला त्यापक्षीं त्यांस लिहून थकलों. आपण तरी लिहून सुचवावें. ईश्वर इच्छा प्रमाण. सर्व अर्थ ध्यानांत आहे. पुणेंकडील वर्तमान कळवीत जावें. सेनाखासकेल यांचें पत्र

---

१ अमृतराव. २ या सांकेतिक शब्दांतून दौलतराव अथवा कुंजर या नांवांचा बोध व्हावयास पाहिजेसें वाटतें. ३ नागो शामजी यांचें पत्र बाळासाहेबांस

बातमीचें आलें त्याची तालीक पाठविली आहे त्यावरून कळेल. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नं. ५७०८ श्री. ( श्रावण शु० १३–३ आगष्ट. )

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गंगाधररावजी

स्वामीचे सेवेशीं

पोष्य नारो विनायक. सा॥ नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० ११ रबिलावल यथास्थित असे. विशेष. धोंडजी वाघ संवदत्तीवर होता तेथून सडी स्वारी करून दोडवाडाकडे गेला. त्याजकडील बुनगें मनोळी-जवळ मलप्रभा पार होत होतें. इतक्यांत इंग्रज मजल दरमजल लक्ष्मेश्वराहून येऊन बुनगें नदीपार होत होतें तें झाडून लुटलें. नदींत नाव भरून येत होती तिजवर तोफा लागू करून नाव बुडविली. मनोळीस नदीपलीकडून इंग्रजांनीं तोफा लाविल्या आहेत. याप्रमाणें यादवाडाकडून वर्तमान आलें आहे. मागाहून आणखी वर्तमान येईल तें लिहून पाठवूं. पलटणवाल्यांचा मुक्काम उगारावरच आहे. बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे विनंती.

नं. ५७०९ श्रीगणराज. ( ३ आगष्ट. )

ती॥ राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेसी.

अपत्यें गणेशानें दोनी कर जोडून सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत श्रावण शु॥ १३ मु॥ दोडवाड येथें वडिलांचे आशीर्वादें सुखरूप असे. विशेष. अलीकडे वडिलांकडून आशीर्वादपत्र येऊन सांभाळ होत नाहीं तर सदैव आशीर्वादपत्र पाठवून सांभाळ केला पाहिजे. यानंतर इकडील मजकूर तर इंग्रजांचा मुक्काम संवदत्तीस आहे. वाघाचा मुक्काम परवां एकादशीस संगो-लीस बुनगेंसुद्धां होता. पुढें झाडींत जावें हा मनसबा आहे. वाघाकडील कांहीं बुनगें मलापहारी दक्षिण तीर मनोळीजवळ होतें तें इंग्रजानीं लुटलें. किल्ल्यावरून मारगिरी जाली. करवीरकर व इंग्रजांची चुरस लागली. सावनूर तालुक्यापैकीं ठाणें एक हनगल मात्र अद्याप इकडे स्वाधीन नाहीं. बाकीचीं झाडून ठाणीं बसलीं. गदग, डंबळ, लक्ष्मेश्वर झाडून सरंजामी बसलीं. वडि-लांस कळावें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना. पुण्याकडील इकडे लोक मनस्वी वर्तमान बोलतात सरंजाम वगैरे याचें. विदित होय हे विज्ञापना.

---

१ पत्र अष्टणीहून. २ गणेश विश्वनाथ पटवर्धन भिलवडीकर यांचें बाळासाहेबांस पत्र. ३ पटवर्धनांचा सरंजाम पेशव्यांनीं शिंद्यांस दिला वगैरे.

५७१० श्री. ( श्रावण शु० १४–४ आगष्ट. )

पै॥ छ० २३ रबिलावल, भृगुवार. श्रावणमास. सन इहिदे मय्यातैन व अल्लफ.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब सेवेसीं

पोष्य बाळकृष्ण लक्ष्मण. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ १२ रबिलावल मुक्काम लष्कर नजीक संवदत्ती मलप्रहरा दक्षिणतीर वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री पूर्णय्या यांचा व आमचा ऋणानबंध. या स्वारींत बहुत उपयोगीं आले. त्यांचें काम आम्ही करावें लागतें. याजकरितां त्याणीं आम्हास सांगितलें कीं, आमचे प्रांतांतील गृहस्थ मिरजेस राहून इकडे खेळ करितो तो धरून दिला असतां आम्हांवरी कृतोपकार होतील; व इंग्रज बहादूर याणींहि सांगितलें, यास्तव स्वामींस विनंती लिहिली आहे. तरी आयगरु कृष्णापा नाईक मिरजेस असतात त्यांस धरून नेविले पाहिजेत. त्याचे ओळखी पूर्णय्याकडील हरकारे दोघे आले आहेत हे दाखवितील. हें कार्य जालें असतां इकडून समयानुसार उपयोगीं पडतील. हें कार्य करवून देवितों असें मी बोललों आहें. हें काम जरूर करावें. उपयोग आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७११ श्री. तालीक. ( श्रावण व० २–६ आग.)

राजश्री बाळकृष्णपंत गोसावी यांस

विनंती उपरी. पत्र पाठविलें तें पावलें. पैलटणें नदीपार होणार कीं काय, वाघ कोठें आहे, मनोळीस ठाणें पडल्याचें वर्तमान कसें आहे, सरदेसाई होंगळ टाकून जावयास कारण काय, पक्कें वर्तमान आणवून ल्याहावें म्हणोन लिहिलें, त्यास पलटणें संगोळीस आहेत. वाघ खानापुरापाशीं नदी उतरून अलीकडे येणार याप्रमाणें मौरिहाळचे लष्कराहून परवां पत्र आलें होतें. अद्याप उतरल्याचें वर्तमान नाहीं. वाघ नदी उतरोन अलीकडे आल्यास पलटणेंही उतरणार. त्याचा पीछा कोठपर्यंत जाईल तेथपर्यंत पुरवणार, याप्रमाणें पाच्छापुराहून राजश्री महादाजीपंत देशपांडे गोकाककर यांचें लिहिणें आतांच आलें. मनोळीस ठाणें पडल्याचें वर्तमान तहकिकात नाहीं. चचंडी, मुरगुड वगैरे ठाणीं टाकून लोक पळाले. ठाणीं रिकामींच आहेत. सरदेसाई जावयाचें कारण वाघ नदीपार होणार त्याचया पाठीमागें पलटणें येणार.

---

१ लगू. २ शिंद्यांचीं. ३ वाघाचा सरदार जोती घोरपडा याच्या लष्करांतून. ४ इंग्रजांची.

दोघांचाही विश्वास नाहीं, पेंचांत असावयाचें कारण काय, या अर्थें झाडींत आसरा केला. रवाना छ० १४ राबिलावल. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं. ५७१२ श्री. (श्रावण व० २–६ आगष्ट.)

सेवेशीं नागो शामराव. सा॥ नमस्कार विनंती तागायत छ० १४ राबिलावल वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तेथें इकडील बातमीविशीं लिहिलें, ऐशास काल आपणास सविस्तर लिहिलेंच आहे. संवदत्तीवर पलटणेंसुद्धां मुक्काम करून आहेत. वाघ निघोन खानापुराकडे गेला. जोती छपरबंद मारेहाळाजवळ उतरोन गांवास उपद्रव केला आहे, म्हणोन वर्तमान आहे. शिंदे यांजकडील कंपूपैकीं एक पलटण अलीगोल यांजकडील कृष्णा उतरलें आहे. वरकर अद्याप पैलीकडे आहेत, वरचेवर उतरतात. बरकड अधिकोत्तर नाहीं. आपणास कळावें. इंग्रजी पलटणें पुढें येणार ऐसें वर्तमान आहे. आपणास पक्कें वर्तमान आल्यानंतर लिहून पाठवितों. मुद्दाम माणसें पाठविलीं आहेत. येतांच पाठवून देतों. पुणेंकडील अलीकडील वर्तमान आलें असल्यास लिहून कळवावें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नं. ५७१३ श्री. (श्रावण व० ३–७ आगष्ट.)

सेवेशीं बाळकृष्ण लक्ष्मण. सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० १५ राबिलावल मु॥ लष्कर (नजीक) कित्तुर वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तुंगभद्रातीरपासून सरकारी अंमल होता तो झाडून सरकारच्या हवालीं झाला. मामलतीवर जुने कमावीसदार होते त्यांचे हवालीं जाला. सरंजामी तालुक्यास घालमेल नवे अमलाची दिसते. समय येईल तसें करावें लागतें. पुढें कसा विचार पाहिजे तसा करावयासीं येईल. श्री॥ राजश्री आपासाहेब यांची भेट जाहली. शिरपेंच घोडा व वस्त्रें दिल्हीं. अद्याप बोलणें जालें नाहीं. मागाहून होईल ती विनंती लिहितों. वाघ शहापूरनजीक गेला. जोती घोरपडे वगैरे मिळोन फौजा दहा हजारपर्यंत आहे. तो पळतो. हे पाठीस लागत चालले आहेत. कोठपर्यंत मजल जाते पहावें. फौजा फार मिळाल्या. इंग्रज दहा बारा हजार फौज आहे व नबाबाकडील चार हजार फौज आली. गोखले व आपली फौज पांच हजार आहे. वरचेवर

१ पत्र नेरलीहून बाळासाहेबांस. २ इंग्रजांच्या लष्करांतून बाळासाहेबांस पत्र लागूंचें. ३ चिंतामणराव आपांची व वसली साहेबांची औपचारिक भेट.

नं. ५७२३ श्री. (श्रावण व० ९–१४ आगष्ट. )

विज्ञापना. " मनोळीस पत्रें सांपडलीं असलीं तरी शिंदे यांचें वांकडें करावें हा अर्थ नसेल. परंतु अस्सल पत्रें पाहून नकला करून पाठवाव्या. "रोशेल तेल पक्का एक शेर चांगलें व चंदेरीचे तिवंट पाठवावें. बोर जंगमिणीचा शिंगा देवजी लवाटे बारगीर याजबरोबर पाठविला आहे. हा ठेवून घेऊन कुमेत पद्मीण घोडी मंगळवेढें यास पाठवावी. म्हणजे त्यासुमारें आम्हांस पावेल. " म्हणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. ऐसीयास पत्रें सांपडलीं तीं करवीरकर याणीं शिंदे यांचे घरीं पाठविलीं. त्याणीं सरकारच्या मुत्सद्यांस दाखविलीं. मलाही पुसलें. परंतु चतुष्टाई अद्यापि जाहली नाहीं. चतुष्टाई जाहल्यास अस्सल पाहून मग नक्कल करून सेवेशीं पाठवितों. तेल रोशेली व तिवंट चंदेरी ऐसें पाठविलें आहे. पावेल. देवजी लवाटे याजबरोबर जंगमिणीचा शिंगा पाठविला तो पावला. पद्मीण घोडी देवजी लवाटे याजबरोबर पाठविली आहे. पावेल. हा तट्ट आला येणेंकरून मी बिनघोरी जाहलों. व्यर्थ एखाद्यानें मागितली तर नाहीं म्हणतां येईना, देऊन फल नाहीं ! घोडी मात्र गमावावी इतकाच अर्थ. येथून पाठविली आहे. आपले पाशीं पोंचली म्हणजे स्वस्थ जाहलों. कळावें. पावल्याचें उत्तर पाठवावें. ती॥ राजश्री गणपतराव कोन्हेर येथें पुण्यांत येऊन आठ वर्षें जाहलीं. अलीकडे आज चार महिने ती॥ सौ॥ सरस्वतीबाईसही आणिली होती. आजपर्यंत घरचें खावून पंचवीस हजार रुपये कर्ज केलें. कर्जदार अन्न खाऊं देईनात. बहुत हलाखी ती पत्रीं लिहितां येत नाहीं. सौभाग्यवतीचे दोन गोट घेऊन मोडले. अशानें परिणाम लागेना. बाकी राहिलेले गोट मागूं लागले तेव्हां ती देईनाशी जाली आणि ती बाई येथें आली होती, परंतु (गणपतराव यांस ) पुण्यांतील गोडी विशेष ! याजमुळें समागमही तावत् मर्यादाच होता. असो. इतकेंही एकीकडे. कर्जें घेतलीं तीं तेलंग ब्राम्हणांचीं. त्यांचा तगादा भारी. हें समजून एके दिवशीं देवास जातों म्हणोन निघोन गेले ! दुसरे दिवशीं सौ॥ सरस्वतीबाईनीं आटपाआटोप करून निघोन गेली ती बोरगांवास पावली. गणपतराव तिकडे गेले

---

१ पागोटें. २ कुरुंदवाडकर. हे रघुनाथरावांपासून म्हणजे चुलतबंधूपासून सरंजामाची वांटणी मिळविण्याची खटपट करण्यासाठीं पुण्यांत राहिले होते. ३ बोरगांव नजीक कुरुंदवाड.

नाहींतसें भासतें. मग कोणीकडे गेले समजत नाहीं. सारांश येथून दिवाळें निघालें. पळून गेले. पंधरा दिवस जाले. आपणाकडे आले असल्यास भेटतील. अथवा मिरज, कुरुंदवाड अथवा श्रीमंत रावसाहेब कल्याणास गेले आहेत तेथें गेले असल्यास कळेना. येणेंप्रमाणें वर्तमान. आठ वर्षें राहिल्याचें सार्थक जालें. एक मात्र दैव मोजितों. ते गेले, दुसरे दिवशीं कर्जदार बायकोस अडिवते म्हणजे फजीतीस पार नव्हता! परंतु वडिलांचे पुण्येंकरून या पुण्यांतून अब्रूनिशीं गेली. कळावें. रवाना छ० २२ रबिलावल हे विज्ञापना.

नं. ५७२४ श्री. (श्रावण व० ९–१४ आगष्ट.)

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे. शिर सा॥ नमस्कार विज्ञापना. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. पत्रीं लिहिलें कीं "करवीरकरांकडील वकीलही इंग्रजाकडे गेले आहेत. आमचे तहाचें बोलणें बोलतात. 'त्यांचा आमचा तह तुम्ही आपले विद्यमाने करून देणें' ऐसें इंग्रजांसीं बोलणें लाविलें आहे. सबब इंग्रजांचें पत्र चिरंजीवांस आलें होतें कीं, 'करवीकरांकडील तालुकेस उपद्रव करूं नये. कुंपणीची व त्यांची दोस्ती आहे.' वाघ आमचे तालुकेंत आल्यास आसरा देत नाहीं. तुमचे हवालीं करूं हें बोलणें (करवीरकरांनीं इंग्रजांसीं) लाविलें आहे. त्यास तूं पालमराशीं बोलणें करून चिठी त्याची येऊन पोचल्यास[3] मोठा उपयोग आहे. तर हे खटपट जरूर करणें आणि पत्र घेऊन पाठविणें. मागाहून सरकारी साधन करणें;" म्हणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. ऐसीयास ज्यासमयीं इंग्रज तुंगभद्रा उतरूं लागला, सामान मोठें येतें, पटवर्धन आणिवतात, हा अंदेशा श्रीमंतांस व शिंदे यांस पडला, तेव्हां ते मला पुसूं लागले (कीं) इंग्रज आणावयाचें कारण काय? तेव्हां मी विनंती केली कीं आमचे आणिवल्यानें इंग्रज येतो कीं काय? वाघाचें पारिपत्यास इंग्रज आला. असें सांगितलें. तेव्हां मजकडील बोलणें सोडून राजश्री गोपाळराव मुनशीस श्रीमंतानीं पालमर वकील याजकडे पाठविला; आणि पुसलें कीं, तुंगभद्रे अलीकडे पलटणें फार येतात तीं येऊं नये. वाघाचें पारिपत्य सरकारांतून होईल. त्यास तुम्ही लिहून पाठवून पलटणें मना करावीं, ऐसें पालमरास सांगितलें तेव्हां त्याणें उत्तर केलें कीं, (चेना) पट्टणास जनराल आहेत त्यांचे हुकमानें कर्णेल वसलीसाहेब बहादूर आले आहेत. त्यांजवर माझा हुकूम चाला-

---

१ अमृतराव. २ हरिपंतबाबास. ३ पालमराचें पत्र वसलीसाहेबास आल्यास.

वयाचा नाहीं. याप्रमाणें त्याणें स्पष्टच सांगितलें. हें मला पुर्तें ठाऊक असतां जर मी त्याजकडे बोलणें लाविलें तर कांहीं रुचावयाचें नाहीं. त्यांत पालमराचे घरीं सरकारची बातमी असती. तेव्हां तें परिच्छिन्न मनांत देखील आणतां नये. त्यांत शिंदे जसें श्रीमंतांस सांगतात त्याप्रमाणें सरकार आइकतें. शिंदे यांचें मत करवीरकर यांचें रक्षण करावें असें असतां ही गोष्टदेखील बोलतां येत नाहीं. त्यास माझे वस्तु होईल खटपट ( ती ) करितों. परंतु साध्य नव्हे. त्यास वडिलांस ( श्रीमंतांचें ) पत्र वाघाचे पारिपत्यास जावें असें लिहिलें गेलेंच आहे. तर वडिलीं पत्रदर्शनीं कूच करून इंग्रजांस जाऊन मिळावें. म्हणजे सरकार आज्ञा मानलीसी जाहली, आणि तेथेंच चार गोष्टी कर्णेलासीं बोलून जर पट्टणावरील इंग्रज ( आम्हीं ) वांचिवले हा उपकार मनांत आणून कार्य करून देत असल्यास फार उपयोगीं पडेल. त्यांचें सामान भारी आलें आहे. काम सहजांत करितील. त्यांचे पुढें शिंदे यांच्यानें अथवा सरकारच्यानेंही कांहीं व्हावयाचें नाहीं. येथें मी तो बहुत आवया आइकत होतों कीं, ‘ लागूंसीं इंग्रजानें वचन दिलें आहे कीं करवीरकर यांचें पारिपत्य करितों. ’ तें कांहीं दिसत नाहीं. वडिलीं तेथें जाऊन खटपट करून पहावी. तें नच होय तर त्याचे विद्यमानें आपलीं चारी कामें करवीरकर यांजकडील आहेत तीं उलगडून घेऊन ( करवीरकरांशीं ) तह पक्का ठरावून घ्यावा; म्हणजे चार दिवस स्वस्थ राहावयास तरी उपयोगी पडेल. हावनुरास मुलेंमाणसें सोय पाहून न्यावीं म्हणोन पेशजी लिहिलें आहे. बनल्यास त्याचे तालुक्यांत मुलामाणसांस निर्भय स्थळ होई असाही भाव बोलण्यांत असावा. अनायासें इंग्रजासी स्नेह घडला आहे. यास्तव तपशीलवार कळावें करितां विनंती लिहिली आहे. येथून कांहीं पालमर याचे हातें व्हावयाचें नाहीं आणि करितांही नये. या कामास आमचा सर्व तालुका इंग्रज घेऊन जरी करवीरकर यांचा सूड आपले मनोदयाप्रमाणें करितील तरी कबूल करावें आणि तेवढा मनोदय सिद्ध जाल्यावर आम्हा सर्वांस अन्नदेखील न मिळालें तरी श्रेयस्कर आहे. त्यास वडिलीं खटपट करून पहावी. नच बने तर तूर्त त्यास मध्यें घालून तह तरी बनावून घ्यावा यांत फार बरें आहे. वडिलीं लिहिलें कीं, “ करवीरकर यांचें पारिपत्य जेव्हां घडेल तेव्हां पटवर्धनवंशांत जन्मल्याचें सार्थक. नाहीं तर व्यर्थ ! ” म्हणोन लिहिलें त्या गोष्टी सिद्धच आहेत. आपले चित्तांत येईल ( यांत ) नवल काय ! ज्याणीं कै॥ भाऊसाहेबापाशीं त्रिरात्र क्रमिली असेल

त्याणीं देखील करवीरकर यांचा सूड घ्यावा. मग आपलें चित्त कां व्यग्र होईना ? त्यास हें वारंवार चित्तांत आणून फल नाहीं. ज्यासमयीं घडेल तें खरें. आमचा वंशच संपला तर इलाज नाहीं. इथपर्यंत आमची बुद्धि बदला घेणेंची आहे. पत्र विसर्जन करावें आणि लिहिलेप्रमाणें वडिलीं ( इंग्रजाकडे ) जावें. रवाना छ० २२ राबिलावल. हे विज्ञापना.

नं. ५७२५ श्री. ( श्रावण व० १०–१५ आगष्ट. )

अपत्यें[1] रामचंद्र श्रीधर काळे. शिर सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ० २३ राबिलावलपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलांस तपशीलवार पत्रें लिहिलीं आहेत त्याजवरून कळेल. तीं॥ राजश्री बाबासाहेब इंग्रजांस मिळावयास गेलेच आहेत. जर तेथें तहाचें[2] बोलणें बोलावें लागलें तर बाबासाहेबांबरोबर कोणी माहीत नाहीं, तेव्हां ठीक कसें पडेल ? त्यास वडिलीं हीं पत्रें पावतांच गलगल्याजवळ नदीपार होऊन लवकर जाऊन त्यांस[3] मिळावें. जमाखिंडीजवळ येऊं नये. कारण शिंदे यांचीं पलटणें उगारावर आहेत त्यांपासून दूर उतरावें हें चांगलें. तह हो अथवा करवीरास इंग्रज पोंचोत, तथापि आपण तेथें असलें म्हणजे सर्व गोष्टी यथास्थित. बाबासाहेब आहेतच, परंतु गैरमाहीत; आणि इंग्रजापाशीं वजन पडलें पाहिजे, यास्तव विनंती लिहिली आहे. सर्व अर्थ ध्यानीं आणून आधीं जावें. इंग्रजांस चार गोष्टी बढाऊन सांगितल्या पाहिजेत. ज्या समयीं पट्टणा वर टिपूनें वाखा करून विलायत बुडविली होती, पन्नास पलटणें (इंग्रजाचीं) असतां ताराज केलें होतें, त्या समयीं कै॥ वडिलानीं धांवून जाऊन इंग्रज बांचविला. त्याची शरम त्याणीं चित्तांत आणून करवीरचा सूड घेतल्यास अवघड नाहीं. इत्यादिक गोष्टी त्यांसीं बहुत खुलाशानें बोलल्या पाहिजेत तेव्हां ते वळतील. अशा बोलण्यास आपण तेथें गेल्याशिवाय परिणाम कसा लागेल ? त्यास आपण पत्र पोंचतेक्षणीं लांब लांब मजली करून जाऊन त्यांस मिळावें. तिकडे कूच जालें म्हणजे इकडे पत्रें पाठवावीं. येथें कालपासून वर्तमान उठलें आहे कीं, इंग्रजानें मनोळी घेऊन सामानगडतालुक्यांत आले. वाघ करवीराकडे गेला. ऐसें मनस्वीं बोलतात. पटवर्धन याणीं इंग्रज आणून करवीरचें पारिपत्य करितात ऐसें बहुत लोक बोलतात. बहुतांस हर्ष जाला

---

१ पत्र रामचंद्रपंत आपास. २ करवीरकरांशीं तह ठरविण्याचें. ३ इंग्रजांस.

आहे तो पत्रीं लिहितां येत नाहीं. आणि काल आपलें पत्र आलें त्यांत " इंग्रज म्हणतो, करवीरचे तालुकेस उपद्रव करूं नका. कंपनीचा त्यांचा स्नेह आहे. " ऐसें लिहिलें आलें त्यावरून कंबरच बसली. त्यास वडिलीं तेथें गेल्याशिवाय एखादी गोष्ट सुधारणार नाहीं यास्तव विनंती लिहिली आहे. या प्रांतीं आलेले तुम्ही होऊन धांवून जातां तर येथें शंख करिते ! तो प्रकार नाहीं. श्रीमंतानींच वाघाचें पारिपत्य करणें ऐसें लिहिलें आहे इतकीच सरकारची सनद जाण्यास पुरे. वडिलीं तेथें जाऊन इंग्रजांची दोस्ती मनावून ठीक करावें. जर आमचे दैवानें करवीरचें पारिपत्य जाहलें तर मुलेंमनुष्यें कोणीकडे लांबवावयास नकोत. आणि पारिपत्य करणें इंग्रजांचे मनांत न येई तर कालावर नजर देऊन इंग्रजांचे विद्यमानें तह करून घेणें प्राप्त आहे. आणि एखादी जागा, अथवा हावनुरास मुलामाणसानीं रहावें यास संकट आहे तर तुंगा दक्षिणतीरीं आसरा पक्का, ऐसीं अनेक प्रकारचीं बोलणीं वसलीबहादर यासीं बोललीं पाहिजेत. हीं आपली गांठ पडल्याशिवाय कांहीं घडावयाचें नाहीं हा एक प्रकार; दुसरें सरकारांतून पूर्ववत् बंदोबस्त जर इंग्रज करून देतील तर काम येथून सहजांत होईल. सरकारासीं आम्हासीं मध्यें इंग्रज असावे. आम्ही सरकारासीं गैरहा वर्तणार नाहीं ही खातरजमा इंग्रेजानीं सरकारांत करावी. ऐसें बनल्यासही हालवून पहावें. यांतून कोणतें नच बनेल तर दैव म्हणावें ! प्रयत्नास अंतर करूं नये. मी येथें होईल खटपटीस चुकत नाहीं. परंतु येथें परस्वाधीन जाणांन विनंती लिहिली आहे. अनायासें वाघाचे योगानें इंग्रजासी स्नेह घडला आहे त्याचें वर्धन होय तें करावें तरच कारस्थान ! इतकेंही बनावणें आपलेकडे आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७२६ श्री. ( श्रावण व० १३–१८ आगष्ट. )

तीं॥ राजश्री आपासाहेब वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे. शिर सा॥ नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ० २६ रबिलावलपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष.

---

१ ही इंग्रजांच्या हमीची कल्पना प्रथमच येथें लिहिलेली आढळते. एव्हांपासून ही पटवर्धनांच्या मनांत वेळोवेळ घोळत असावी. स. १८११ त पंढरपूरचा तह झाला त्यांत हेंच मुख्य कलम आहे.

वडिलीं इंडी तांब्यांच्या मुक्कामचें पत्र छ० १८ रोजचें पाठविलें तें छ० २४ रबिलावलीं पावलें. राजश्री वेंकटराव नरगुंदकर व बाळकृष्णपंत लागू यांचे पत्राच्या नकला पाठविल्या त्या पावल्या. करवीरच्या पारिपत्याचें पालमराकडून जाहलेस पहावें म्हणोन आज्ञा, ऐसीयास लागूंचे पत्राची नक्कल पाहिली त्यांतील अभिप्राय पाहतां जे इंग्रज आले आहेत ते बराईखुद्द धणी आहेत. सर्वांवर हुकूम त्यांचा. आमची फौज अनिवार. त्यांत ( आम्हांजवळ ) पैका नाहीं. ऐसें असून इंग्रजांसीं रात्रंदिवस गांठ. ते खजानपूर आणि वचनी. त्यांचे सांगितल्याप्रमाणें ( आमचे सरदार ) वर्तले तर बरें. नाहीं तर अबरूच घेतील ! ‘ घास लकडी घ्यावी. वरकड कशास हात लावूं नये. ’ ऐसा हुकूम ते करितात. इतका बंद आमचे येथें रहाणें अवघड. तेव्हां त्यांसीं संगत पडून पार पडणें दुरापास्त दिसतें. ईश्वर कसा परिणाम लावील कळत नाहीं. त्यास वडिलीं ती॥ राजश्री बाबासाहेब व चिंतामणराव आपा यांस आधीं लिहून पाठवावें आणि यावत् त्यांसीं गांठ आहे तावत् रात्रंदिवस सावध असावें. वडिलीं मला लिहिलें कीं, पालमराकडे शोध घ्यावा. त्यास पूर्वी मालीट होता तो थोर माणूस होता. हा मोठा लोभी आणि किंवेंडा[1] आहे. येथें माझा जाऊन परिणाम लागायचा नाहीं. तेथें नेहमीं सरकारची बातमी असते. याजमुळें येथून कांहीं कार्य व्हावयाचें नाहीं. तेथेंच लागूंस सांगून पाठवून सोईस आलिया पहावें. पालमराकडे आमचें संधान लागून आपणास गुण येईऊ ही आशादेखील धरूं नये. मी खटपट करीत नाहीं ऐसें नाहीं. परंतु लाग बसावयाचाच नाहीं, तेथें श्रम करून काय होतें ? पालमरापाशीं कदाचित् बोलावयास गेलों, त्याणें दोन लाख रुपयांची सावकारी निशा मागितली, तर पुढें कसें करावें ? तेव्हां हा अर्थ ध्यानीं आणूं नये. दैवयोगें तिकडील तिकडे जर कार्य जाहल्यास पहावें. दुसरी तोड नाहीं. अथवा सल्ला करून देतों म्हणतात तें तरी तूर्त कालावर नजर देऊन समेट करून घ्यावा. नाहीं तर आपण मनस्वी कलमें लिहून देतील आणि कांहींच बनणार नाहीं ! त्यास तूर्त इंग्रजांचे हातें काम होईल आणि करवीरकर यांचा शिलशिला तुटून कांहीं नक्ष राही ऐसें करून तरी घ्यावें; आणि शिंदे यांचीं पलटणें आलीं आहेत हीं माघारीं जावीं; येणेंप्रमाणें होईल तर खटपट करून पहावी.

---

[1] किंवडा म्हणजे बहिरा. पण तो अर्थ इथे लागत नाहीं. सर काय ज्याला द्रव्यध्वनीखेरीज ऐकायला येत नाहीं असा लांचखाऊ असा अर्थ घ्यायचा !

ते तहाचें बोलूं लागले म्हणोन आपणाकडून मनस्वी यादी जातील आणि कांहींच होणार नाहीं. जुन्नरची गती होऊं नये. त्या वेळीं प्रथम सात कलमांची याद लिहिली ती सही जाली. मागती चौघे शहाणे मिळून दुसरी फार कलमांची याद लिहिली याजमुळें या घरास आलें ! ऐसें होऊं नये. कालावर दृष्टि देऊन समेटून घ्यावें. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७२७ श्री. ( श्रावण व० १३–१८ आगष्ट. )

विज्ञापना. अलाहिदा पत्रीं सविस्तर लिहिल्यावरून श्रुत होईल. दुष्ट स्वभाचा इशारा लौकर व्हावा. लागूनीं होऊन स्पष्ट त्यास विचारावें. इंग्रजांचा कारभार बदमामली नाहीं. त्यांचे विश्वासावर त्यांजपाशीं गेलें असतां दगा फटका करितील असें वाटत नाहीं. परंतु निखालसपणें सारे अर्थ त्यांसीं बोलावे आणि खातरजमेनें मेळवून घ्यावे. इंग्रज मोठे सामानानिशीं आले, त्यांस आपल्या फौजा जाऊन मिळाल्या, ही गोष्ट शिंद्यांचे घरीं मोठी असह्य जाली आहे. ते हरतऱ्हेनें पायमल्ली करणार. मग ईश्वर कसा परिणाम लावील तो लावो. रवाना छ० २६ राबिलावल सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७२८ श्री. ( श्रावण व० १३–१८ आगष्ट. )

विज्ञापना. वडिलीं छ० ११ राबिलावलचें पत्र पाठविलें तें पावलें. त्यांत आज्ञा कीं " ती॥ सौ॥ आत्याबाईस वर्षश्राद्धाकरितां आणविलीं आहेत. तर भाडेंचीं तट्टें व डोली करून देऊन पोचवून द्यावी " म्हणोन आज्ञा, त्यास काल राजश्री पांडुरंगपंत आपटे तासगांवाहून आले. आज पुढें पेणेस निघोन जात आहेत. आत्याबाई येथें आली म्हणजे जें येथून साहित्य पाहिजे तें करून देऊन तासगांवाकडे रवानगी करून देतों. आपले या पत्रांतील भाव पाहतां वर्षश्राद्धास मिरजेस येण्याचा आपला रंग दिसता. त्यास हें सर्वथैव होऊं नये. वडिलीं श्राद्धाचे सुमारें जाऊन इंग्रजापाशीं नमूद व्हावें. घरीं तूर्त मिरजेमध्यें ती॥ बापूसाहेब आहेत ते येथें वेगळें वर्षश्राद्ध करितील. आपण त्रिवर्ग एकत्र होऊन जसा प्रसंग पडेल तैसें जेथें जसें बनेल तैसें करावें. परंतु मिरजकर जसे वरीं आहेत तैसे आपण येऊं नये. तूर्त प्रसंग मोठा आणि घरीं येणार हें काय ? त्यास सहस्र कामें सोडून

१ चिमाजीआपास घेऊन परशुरामभाऊ जुन्नरास पळून गेले तेथें धरले गेले. त्यावेळची गत. २ पत्र पुण्याहून बाबा काळे यांचें रामचंद्रपंतांस. तशींच पुढचीं दोन.

वडिलीं तिकडे जावें. तेथील स्थळशुद्धि करून मग जावें. याजउपरी इकडे राहूं नये. आपण म्हणतील, तिकडे जाऊन खावें काय ? त्यास तिकडे गोखले व ती॥ राजश्री चिंतामणराव व बाबासाहेब आहेत त्याअर्थी आपणा· पाशीं थोडी फौज असली तरी पुरे. खर्च फार आहे तर कांहीं कमी करावा. परंतु आपण तेथें जावें. करवीरचें पारिपत्य ईश्वरें घडविलें तर बरें. नाहीं तर त्यास साम तरी बनावावें. आणि इंग्रजाशीं स्नेह. इतक्या गोष्टी आधीं जाऊन कराव्या. त्या आपण गेल्याखेरीज कांहीं घडावयाचें नाहीं. कागदोपत्रीं लिहून फल नाहीं यास्तव विनंती कळावीकरितां लिहिली आहे. इकडून पालमर आम्हां-कडे वळून कार्य घडेलसें भासत नाहीं. आहेत पलटणें यांचे पुढें वाघ उभा राहीना, असें असतां पलटणें मागाहून येतात हा भाव आपण लिहिला यांतील अर्थ काय ? लागूंचे लिहिण्यांत 'वाघाचें पारिपत्य जालें म्हणजे माघारे फिरतील' हें काय ? संगत लागत नाहीं. लागूंकडून कारकून वडिलां-कडे आला होता त्यांत कांहीं कुपया असल्यास सुचवावी म्हणजे कांहीं संतोष होईल ! त्यास वडिलीं वर्षश्राद्धास माघारे येऊं नये. तिकडे जावें आणि येथील दुष्ट वार्ता पालमराचे चकतीची लिहिली आहे याचा लागूंस लिहून आधीं शोध आणवावा. हें वर्तमान लागूंस कळून त्याणीं वसलीबहादुर यांचें पक्कें वचन घेऊन आपल्यास लिहितील, आपलें पत्र मला येईल, तेव्हां समा-धान होईल. कळावें. लक्ष पत्राचे जागां हें लिहिलें आहे. रवाना छ० २६ रबिलावल. लोभ असों दीजे हे विज्ञापना. राजश्री नाना पुरंदरे म्हणजे बज्या पुरंदरे याचे दत्ते. त्यास काल मुहूर्त करून डेरेदाखल सरकारांतून करविलें. गारपिरावर राहिले आहेत. मोहीम कोणीकडे समजत नाहीं. तिगस्तां राजश्री माधवराव रामचंद्र तेथेंच होते. ते जागां माधवराव रामचंद्र याणीं दत्या घेतला. हे पंधरा दिवस महिन्याचे सोबती आहेत. हे विज्ञापना. पुरंदरे यांस पुढें करणारे कुंजर.

पै॥ छ० ७ रबिलाखर. सन इहिदे मय्यातैन.

नं. ५७२९ श्री. ( श्रावण व० १३–१८ आगष्ट. )

विज्ञापना. इकडील वर्तमान तर करवीरकर यांचा तह शिंदे यांचे विद्यमानें जाहला. हल्लीं पलटणें कृष्णापार जाहलीं. चिकोडी तालुका घेऊन राजास द्यावयासाठीं. त्यांत वाघाचे पारिपत्यासाठीं इंग्रज आले आहेत त्यांस

---

१ पुण्याहून बाबा काळे याचें रामचंद्रपंत आपास पत्र.

आमची फौज मिळाली याजमुळें करवीरकर यांस बहुत कठिण होऊन करवाराहून शिंदे यांस पत्रें आलीं आहेत. याजमुळें शिंदे आणखी पांच पलटणें त्या पलटणांस सामील होणेंसाठीं रवाना करीत आहेत. आणि पांच हजार फौजही रवाना करण्याचा बेत आहे. त्यांणीं पलटणेंसुद्धां जाऊन करवीरची कुमक करावी, येणेंप्रमाणें सर्जेराव याणीं ठराविलें आहे. अलीकडे आठ पंधरा दिवस मजबरोबर यथास्थित बोलत नाहींत. कारण पटवर्धन इंग्रजांस मिळून करवीरचे पारिपत्यास येतात हा अन्याय. पुढें कोणत्या थरास जातें पहावें. काल वर्तमान आइकलें कीं, घाटगे याणीं पालमर वकील याजकडे संधान करून त्यास कांहीं पैका व सरंजाम कबूल करून वसलीबहाद्दर यांस पत्र घेतलें आहे कीं " जितके पटवर्धन तुम्हापाशीं येतील त्यांस अपकार करून कैद करावें," अशी वकिलाची चकती घेतली आहे, म्हणोन बाजारी वदंता आहे. दुष्ट स्वप्न पडलें म्हणजे विष्णुस्मरण करावें म्हणोन आपणास विनंती लिहिली आहे. सर्जेराव यांत कमी करणार नाहीं. आज दैवानें त्यास हातीं धरलां आहे. तो म्हणेल तें करील. यास्तव विनंती लिहिली आहे. त्यास आधीं ही सूचना वडिलीं लागूंस करून आणि स्पष्ट वसली कर्णेल यासीं बोलून खचित करून ठेवावें. " तुझे वचनावर तुजपाशीं आलों. पुण्यांत ऐसें बोलतात. यास पुढें आम्ही कसें करावें ? पेशवे आम्हांस मारितात, शिंदे मारितात, या राज्यांत जागा नाहीं म्हणोन तुम्हांस जवळ केलें, त्यास येथेंही अशी अवस्था जाली तर पुढें गत काय ? आपण दगा करणार नाहींत परंतु आइकलें वर्तमान कळवावें ( म्हणून सांगतों. ) ऐशा तऱ्हेनें त्यास कळवून त्यांचें वचन पक्केपणें घेऊन ठेवावें. अनमान करूं नये. " याजउपरी सरकारांतील आमचा बंदोबस्त तुमचे हातें करून घ्यावयाचा, " ऐसें ओझें त्याचे माथां बसवून कच्छपास लागावें. दुसरें स्थल शाश्वत राहिलें नाहीं. वाघाचे पारिपत्यास जावें म्हणोन सरकारआज्ञा आपणास आहे. त्यास याउपरी तिकडे आधीं जावें. याप्रमाणें बयाद लागूंस लिहून तेथील खातरजमेचीं पत्रें आणून एखादे डौलानें जाऊन त्यास भेटावें. याजउपरी त्याची मित्रता केल्याविना परिणाम लागणें अवघड आहे. तूर्त येथें शिंदेमय आहे. श्रीमंत दया करितील परंतु तूर्तचा प्रसंग परस्वाधीन. ते जसें म्हणतील तसें हूं म्हटलें पाहिजे. त्यास वडिलीं वास्तविक लागूंस कळवून आधीं स्थळशुद्धि[1] करवावी.

१ जिथें जाणें अगर रहाणें ती जागा निर्भय असल्याची खात्री.

लिहून परिणाम लागावयाचा नाहीं. त्यास कोणी शहाणा विश्वासू आपण सांगतील तितकींच अक्षरें लागूंपाशीं जाऊन बोले ऐसा योजून आधीं पाठवावा. येथें दुष्ट वार्ता आइकली ती आपणांस कळावीकरितां विनंती लिहिली आहे. वडील सर्वजाण आहेत. परंतु मला जें सुचलें तें कळवावें याअर्थें अधिक आगळें लिहितों. उपयोगी असेल तें ग्रहण करीत जावें. दुष्ट स्वप्न आधीं हें तिकडे कळवावें. रवाना छ० २६ रबिलावल हे विज्ञापना.

नं. ५७३० श्री. ( १६ आगष्ट )

विज्ञापना. चंदेरीचीं पागोटीं पाहिलीं, परंतु पंचेचाळीस हात लांब. जाजती मिळेना याजमुळें पाठविलें नाहीं. रोशेल पक्का शेरभर पाठविलें आहे. किंमत दरशेरीं नऊ रुपये चांदवडी. तिवटाचा शोध करून मागाहून पाठवून देतों. बोरघोडा पाठविला त्यास डावा डोळा अगदीं नाहीं. उजवा मात्र आहे. कळावें. तूर्त येथें असाच पुरे ! घोडी सामानसुद्धां देवजी लवाटे याजबरोबर पाठविली आहे. ती॥ राजश्री दाजीसाहेबांस घोड्याचे मोबदला यावी. लिहिलेप्रमाणें कूच करून तिकडे जावें. पत्र वरचेवर येत असावें. राजश्री माधवराव रास्ते वांईहून पुण्यास आले त्यांस तिकडे पाठविणार. सर्वांचा वडीलपणा रास्ते यांस देणार. पानशे गोखल्यास देणार होते त्यापेक्षां हा गृहस्थ चांगला आपला. बिकत नाहीं. याचे हाताखालीं आम्ही नांदूं ऐसें बोलणें पडल्यास बोलावें म्हणतों. याचा अर्थ ‘ जमीन देऊन जामीनसुद्धां जाणें ’ याप्रमाणें हा मार्ग आहे. यास्तव सूचना लिहिली आहे. कळावें. रवाना छ० २४ रबिलावल. मंदवार. एकादशी. प्रातःकाळ. श्री॥ राजश्री मोरोपंतदादा फडणीस यांजकडे कांहीं कामकाज सांगूं लागले आहेत. हे विज्ञापना.

नं. ५७३१ श्री. ( श्रावण—आगष्ट. )

सेवेशी विज्ञापना. पुण्याकडील वर्तमान. —शिंदे निसबत मंडळीकडील राजश्री सदाशिव मल्हार यास कैद करून नगरास पाठविलें. राजश्री यशवंतराव शिवाजी व आणखी एक दोन मराठे तोफेच्या तोंडीं दिले. राजश्री नारायणराव बक्षी याचे अंगास बाण बांधोन उडविला असतांही प्राण

---

१ पत्र पुण्याहून बाबा काळे यांचें रामचंद्रपंतआपांस. २ पत्र बाळासाहेबांस लिहिलेलें आहे. कोणी लिहिलें तें समजत नाहीं. यांत मोकळी जागा सोडली आहे त्या ठिकाणीं पत्र फाटलें आहे.

न गेला, सबब ढोचकें मारिलें. ... यास मेखसूनें मारिला. बायांचा मुक्काम बराणपुरानजीक आहे. कळावें. श्री॥ राजश्री अमृतरावसाहेब वसईस जाऊन पोंचले. तेथून त्रिंबकेश्वरावरून खानदेशांत जाऊन बायांकडे जावें असा संकेत आहे. अमृतरावसाहेब निघोन गेले. कुटुंब पुण्यांत वाड्यांत आहे. येविशीं शिंदे यांचें व श्री॥ बाजीरावसाहेब यांचें बोलणें होणार होतें. परंतु श्रावणमासाच्या दक्षिणेचा देकार व्हावयाचा होता याजमुळें विलंबावर पडलें होतें. अलीकडे जाब जाहला असेल. राजश्री भावे सरकारांतून वस्त्रें घेऊन मिरजेस आले. तेथून श्रीमंत राजश्री आपासाहेबांकडे जाणार असें वर्तमान आहे. शिंद्याकडील कंपू कुडचीवर आहे. चिकोडीकर यांचाही जमाव भिरडीनजीक आहे. चार हजारांपर्यंत प्यादा व हजार बाराशें राऊत याप्रमाणें आहे. केवळ कंपूचा परिणाम लागेल असा भाव दिसत नाहीं. आणखी कुमक आल्यास उपाय नाहीं. आहे इतक्या सामानास चिकोडीकर बधणार नाहींतसें वाटतें. श्री॥ राजश्री गणपतराव बोरगांवकरही अमृतराव-साहेबांबरोबर गेले असें वर्तमान आहे. आपासाहेबांकडीलही बोलणें पुण्यांत पडलें आहे कीं चिकोडी वगैरे ठाणीं आपण घालून देतों असें ऐकितों. यांतील भाव व वस्त्रेंही कोणत्या संबंधें हेंही कळत नाहीं. स्वामींकडेही पत्रें हमेशा येतच असतील. आढळलें वर्तमान लिहिलें आहे. राजमंडळकरांनीं पुण्यांत घाटगे यांजवळ ...... आहेत कीं, इचलकरंजीकर व शिरगांवकर अद्यापि ऐवज देत नाहींत. यास्तव तेथून वराता परभारा करविणार, आणि आपले तहांत ऐवज घेणार, हा बेत आहे. काय घडतें पहावें. पट्टणाकडीलही सामान येत आहे तेंही सत्वरच येईल असें आहे. राजश्री नारायणराव घोरपडे यांस करवीराहून हुजरे जाऊन पंचवीस हजारांची वरात केली आहे. घाटगे यांचें व त्याचें वांकडें आहे. कळावें.

नं. ५७१२ श्री. (श्रावण व० १३–१८ आगष्ट.)

पै॥ छ० २६ रबिलावल. इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. मौजे तिकोटें आमच्या रदकर्जांत असतां हल्लीं सरकारची सनद राजश्री गणेश विश्वनाथ पानसे यांचे स्वाधीन तिकोटें करण्याविशीं

---

१ रामचंद्रपंत आपा २ गणपतराव कोन्हेर. ३ हें सामान जनरल वेलस्लीचें.
* पत्र रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें बाळासाहेबांस मिरजेस.

आली. हें कृत्य राजश्री आबा काळे यांचें असेलसें वाटतें. तिकोट्याचा लोभ पानशांस दाखवून आपले कोटींत मिळवून घ्यावें, पुढें बंडगराचे तालुके जप्त करण्याचा संकल्प व उद्योग काळ्यांचा आहेच ! त्यास तोफखानेवाले जमियतवान आहेत. हे अनकूल जाहले असतां सहजांत मनोदय सिद्धीस जाणार असा भाव दिसतो. रदकर्जांत तालुका याचा पूर्वसंबंध कागदपत्र आदापावतों पाहून जो विचार होणें तो सरकारांतून व्हावा तें एकीकडे राहून सनदच आली ! ठाणें द्यावें तर पैक्यास ठिकाण नाहीं. न द्यावें तर बदअंमल करणार. गैरवाका सरकारांत सांगोन जमियतवंत समीप आहेत यांस ताकीदी सादर करून शिलशिला लावणार. तेव्हां आजपावेतों लाखों रुपये गुंतले ते एकीकडे ठेवून आणखी शिबंदीच्या पेचांत यावें ! असें चहूंकडून संकट आहे. याचें कसें करावें ते आज्ञा आली पाहिजे. जे गोष्ट उपस्थित होते ते बुद्धीपलीकडचीच होते ! ईश्वरनिर्मित काय असेल तें असो. तिकोट्याचा मजकूर राजश्री मोरोपंतास लिहून उपक्रम कोणीकडून याचा शोध करवावा व मनाचिठीचा प्रयत्नहि करून पहावा. 'हजार दोन हजार रुपये खर्च जाहला तरी करून मनाचिठी येत असल्यास घ्यावी' असें वडिलांचें लिहिणें जाऊन उत्तर आणविलें पाहिजे. रवाना छ० २६ रबिलावल. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. ५७३३ श्रीगणराज. (श्रावण व० १४–१९ आगष्ट.)

सेवेसीं उभयतांचे सा ॥नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० २७ रबिलावल मंगळवार प्रातःकाळ वर्तमान यथास्थित असे. विशेष. छ० २५ रबिलावलचें पत्र आलेलें काल छ० २६ रबिलावलीं पावलें. इकडील वर्तमान तर कर्नेलसाहेब याचें पत्र डाससाहेब नि॥ शिंदे याजला होतें तें कारकुनासमागमें पाठविलें होतें. माझेही नांवचें पत्र लिहिलें होतें. त्यास कर्नेलसाहेब याचे पत्राचा जाब दिला नाहीं. तें पत्र पुणियास रवाना करणार. तेथील लिहिलें येईल त्याजप्रमाणें उत्तर देणार. माझे पत्राचा मात्र जाब दिला तो राजश्री बाळासाहेब यांजकडे रवाना केला. वाघाची फौज यादवाडाकडे गेली म्हणोन लिहिलें होतें त्याप्रमाणें तो यादवाडास जाऊन यादवाड लुटलें. पुढें काय करतो, कोणीकडे जातो, पहावें. निपाणीकरांचा कंपूचा मुक्काम कुडची

---

१ हरबाजी नरसिंह घायगुडे व नागो शामजी यांनीं कुरुंदवाडकरांस पत्र लिहिलें, त्याची ही नकल खाशांच्या हातची.

वर आहे. तेरदळास साठ स्वार व रोखा गेला आहे. लाख रुपये मागतात. राजश्री बापूसाहेब तेथें आहेत. तोफा पलटण ( तेथें ) जावें असा मनसबा आहे म्हणोन ऐकितों. तेरदळ बहुत भरलें आहे म्हणोन तेथें निकड करणार. वाघही गेला आहे. कसें घडतें हीच चिंता आहे. निपाणीकरानीं झाडून गांवगन्ना रोखे केले आहेत. उगारकर यशवंतराव नाईक याजला तीन हजार रुपये मागत होता. पहाऱ्यांत देऊन तसदी बहुत जाली सबब हजार रुपये कबूल जाला. परंतु सोडलें नाहीं. शेवटीं ब्राह्मण मेला. बायकोनें सहगमन केलें. पुणियांत घाटगे हत्या पाडावयास ईश्वरें निर्माण केला. या देशांत निपाणीकर जाला ! ब्राह्मण मारावयास प्रारंभ ईश्वरें केला ! निपाणीकराच्या हातून कुणाचा अंत आहे न कळे. पुण्याकडील पत्रें आलीं. त्यांत बाळोबातात्या व सदाशिव मल्हार जिवंत आहेत असें आहे. उत्तम आहे. आयुष्यमर्यादा असल्यास ईश्वर बुद्धि देईल तरी देऊ. राजश्री आपासाहेब कूच करून आल्याची बातमी आली असेलच. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५७३४ श्री. ( तालीक ) (भाद्र० शु० ६–२६ आगष्ट. )

राजाश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्र परशुराम स्वामी गोसावी यांसीं

पोष्य बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. धोंडजी वाघ जमावसुद्धां त्या प्रांतांत शिरोन सरकारचीं ठाणीं घेतलीं. धोंडो बल्लाळ यांसीं लढाई होऊन ते सरकारकामास आले. त्यानंतर इंग्रजांकडील पलटणें व सरकारच्या फौजा एकत्र होऊन वाघासीं लढाया होतात. त्यास वाघमजकूर याचें पारिपत्य जाहलें पाहिजे. यास्तव राजश्री बापूजी गणेश गोखले व राजश्री रघुनाथराव नीळकंठ व राजश्री चिंतामणराव पांडुरंग व तुम्ही एकत्र होणें. राजश्री दौलतराव शिंदे अलिजाबहाद्दर यांस येविशीं आज्ञा जाली आहे. त्यांजकडील फौज पलटणें तुमच्या इशाऱ्याप्रमाणें तुम्हापाशीं येतील. ते व तुम्ही एकविचारें होऊन वाघाचें पारिपत्य करणें. तुम्हीच अवघ्यांनीं एकत्र होणें ते मनोळीस होणें. जाणिजे. छ० ५ रबिलाखर. सु॥ इहिदे मय्यातैन व अल्लफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं. ५७३५ श्री. ( भाद्र शु० ६—२६ आगष्ट. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बळवंतरावजी स्वामीचे सेवेशीं

पोष्य नीलकंठ आबुराव सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असावें. विशेष. बहुत दिवस पत्र येऊन कुशलोत्तर कळत नाहीं तरी असें नसावें. सदैव पत्रद्वारें संतोषवीत जावें. यानंतर आपले संग्रहीं वैद्यकी ग्रंथ राजानिघंट व हरीतकी कोशादि ग्रंथाचीं पुस्तकें आहेत त्यांचें प्रयोजन आहे. तरी पाठवून द्यावीं. प्रत लेहून घेऊन माघारीं लौकरच पावतीं होतील. माचपत्रीचीं झाडें आपले बागांत असल्यास दोन रोपें पाठवावीं. रवाना छ० ५ रबिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नं. ५७३६ श्रीगणपतिर्जयति. ( भाद्र. शु० ९–२८ आगष्ट. )

नक्कल.

पै॥ छ० ७ रबिलाखर सन इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. इंग्रजी पलटणें सोळा, व तुरुपस्वार चार हजार, तोफा सामान आहे हें सामान केवळ वाघास पाहिजे असा अर्थ नाहीं. तेव्हां कागदींपत्रीं याचा अर्थ समजतो ऐसें नाहीं, म्हणोन मुद्दाम कारकून पाठविला होता. त्याणें लष्करांत राहून येविशींचा शोध घेऊन यावें. केवल इंग्रजांचे घरचा शोध लागतो असा अर्थ नाहीं. त्यांतही बारकाईनें शोध घेतां, वाघाकरितांच आले आहेत असें नाहीं. हें सामान आलें आहे. आणखीही हजार तुरुपस्वार नवे आठ रोजांत आले. मागाहून पट्टणास सात पलटणें व मोठ्या तोफा याजप्रमाणें सामान येत आहे. आणखी चेनापट्टणास पलटणें इकडे यावीं त्यांची तयारी आहे. जंगी सामान वरचेवर नवें येत आहे. एका वर्षाची बेगमी तांदूळसुद्धां करावी याजप्रमाणें बेत होऊन खरेदी चालली आहे. मनसबा मोठा आहे. मग मनांत काय बेत आहे ते जाणत! परंतु कारकुनास बातमी ज्याजपाशीं लागली त्याचे सांगण्यांत कीं हा ( वाघाबद्दलचा ) कारभार नव्हे. कांहीं मनसबा आहे. मग कोणत्या थरास जाईल ता जाऊ. याजप्रमाणेंच तहाचा ठराव पांच सालांचा करून पट्टणासमीप कोठी घालून शेवटीं टिपूचें सर्वही घेऊन नाहींसा केला! वाघाची मसलतमात्र पुढें सांगावयास केली, परंतु मनांतील ते जाणे! राजश्री बाबासाहेब व चिंतामणराव आपा व गोखले व कर्णेलसाहेब मिळून दरबार वेगळे वाटेनें करून बोलणें जालें.

---

१ बारामतीकर. २ हरबा आपा धायगुडे याचें किंवा नागो शामजी याचें पत्र रघुनाथराव कुरुंदवाडकरांस आलें त्याची ही नक्कल खाशांच्या हातची.

त्यास सर्वत्रानीं मुधोळ, बागलकोट वगैरे इलाख्यांत जाऊन मुक्काम करावे. राजश्री आपासाहेबांही त्याच रोखें भेटीस्तव यावे म्हणोन पत्रें जावीं ऐसें ठरलें आहे. तेथें जाऊन वाघाचा पत्ता जिकडे लागेल तिकडे रवानगी करावी. बाकी सारे सरंजामानें कृष्णातीरास त्या लगत्यास मुक्काम करावे, याजप्रमाणें घाटत आहे. माघारे जावयाचा सुमार जरी वाघाचें उरकलें तरी जावयाचें नाहीं. कृष्णातीरास मुक्काम करावा असें आहे. तूर्तकाळीं कारमारास माहीत पूर्णय्या. त्याचा हस्तक येथें बिष्टापा बदामी, त्याजपाशील हें वर्तमान आढळलें. येथें येऊन सांगितलें. यांत खरें लटकें किती न कळे. परंतु वाघास इतके सामानाचें कारण नाहीं. त्यापक्षीं ईश्वर निर्मित काय आहे न कळे. हे विज्ञापना.

नं. ५७३७ श्रीगणराज. ( भाद्र० शु० १०–२९ आगष्ट. )

पै ॥ छ० ८ रबिलाखर सुरुसन इहिदे मय्यातैन व अल्लफ.

ती॥ राजश्री काकासाहेब वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें विठोबानें चरणावर मस्तक ठेवून शिरसा ॥ नमस्कार विज्ञापना ता॥ छ० ८ रबिलाखर पावेतों मुक्काम हरिपूर येथें सुखरूप असे. विशेष. ती॥ राजश्री आपासाहेबाकडील लष्करांतून पत्रें आतांच आलीं त्यांतील मजकूर " पेशजी अलीकडे कर्णेलाबरोबर चार पलटणें होतीं त्यांखेरीज सामान चार पलटणें व हजार तुरुकस्वार गोरे पंचवीस तोफा येणेंप्रमाणें मलापहारी दक्षिणतीरास येऊन मिळाले. त्यानंतर आणखीही एक पलटण हल्याळास होतें तें दोडवाडचे मुक्कामीं येऊन मिळालें त्यांत चार तोफा आहेत. इंग्रजांचें सामान दिवसोंदिवस अधिक येत चाललें. वाघाचा पाठलाग करितात, परंतु सहा कोशीं जवळ आला म्हणजे दोन चार मुक्काम करितात. वाघ पुढें गेला म्हणजे फिरोन पाठलाग करितात. जांबोटीच्या सुमारें वाघ जवळ होता तेव्हां कित्तुरावर नऊ मुक्काम केले. वाघ गोकाकेहून यादवाडाकडे गेल्यानंतर मलापहारी नदी उतरले ! याप्रमाणें इंग्रजांचें वर्तमान आहे. सामान भारी येत चाललें आहे. पोटांतून बुद्धि दुष्ट दिसते आणि पल्ला दूरचा दिसतो. वाघानें पुढें चालावें हाच त्यांचा बेत आहे. मोंगलांचें सामान चार पलटणें तीन हजार फौज व पंधरा तोफा आल्या आहेत. त्यांत वसलीसाहेबांचा हुकूम आहे. कित्तुराकडील पलटणें व हे जलचर एकच असा भास होतो. पुढें काय होतें पहावें. नाळा नदावर इंग्रजानें बातेरी बांधून आंत चारपांचशें माणूस पांच तोफा

दो प्रहरां कूच करून कौजलगीकडे गेला. इंग्रज हुबळी प्रांत कित्तूर येथें नदी उतरतात. राजश्री बाळकृष्णपंत लागू यांचें पत्रही गोकाकेस आलें म्हणोन लिहिलें आहे. आमचें पत्र आज सकाल आलें म्हणजे सेवेसीं पाठवीन. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

नं. ५७४१ श्री. (भाद्रपद–आगष्ट.)

ताजा कलेम. विजयदुर्ग येथील मामलत चि॥ राजश्री रामकृष्ण गंगाधर (भानु) यांजकडे होती. त्यास तेथील घालमेल हल्लीं होऊन दुसरे याजकडे सांगितली आहे. त्यांचे निसबतीचें बोलणें सरकारांत तुम्हीं बोलावें व श्री॥ राजश्री मोरोबादादा यांस सांगोन त्यांजकडून सरकारांत विनंती होई असें करवून जी रसद दुसरे याणीं दिल्ही आहे तीच त्यांजकडून घेऊन व पांच रुपये दरबारखर्चीही बोलोन फिरोन त्यांची मामलत त्यांजकडे राही असा प्रेत्न करावा. सरसुभा हल्लीं जाला आहे त्याचे कारभारी राजश्री अन्याबा अभ्यंकर आहेत त्यांची व खासा राजश्री बाजीराव बर्वे यांची भानूंची सोयरीक आप्तपणाची आहे. त्यांसींही बोलोन प्रेत्न करून त्यांची त्यांजकडे मामलत राही असा प्रकार होत असल्यास रसदेचे बोलण्यास वगैरे कारभार करून घेण्यास खचित असल्यास राजश्री महादाजीपंत बेहेडकर यांस पाठवून देऊं. नंतर पुसोन उत्तर पाठवावें व प्रभाकरपंत भावे कोठें आहेत तें ल्याहावें.

नं. ५७४२ श्रीशंकर (भाद्र० शु० १२–३१ आगष्ट.)

वडिलांचे सेवेशीं बालकें त्रिंबकराव बल्लाळ शिर सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ. १० रबिलाखर रोज रविवार मुक्काम मलापहारीतीरीं नजीक जालीहाळ येथें वडिलांचे आशीर्वादें क्षेम असे. विशेष. इकडील वर्तमान वाघाचा मुक्काम मोसी मुद्गल हणमसागर या रोखास आहे. त्याजकारितां इंग्रजही त्या रोखास जातात. इंग्रजानीं तीन टोळ्या केल्या आहेत. एक श्री॥ राजश्री बाबासाहेब व चिंतामणराव व केपरसाहेब म्हणोन तीन पलटणांसुद्धां. दुसरी टोळी इष्टेवेसणसाहेब चार पलटणें व मोंगलाकडील दोन हजार फौज व तुरुस्वार हजार अजमासें. तिसरी टोळी खासे वसलीसाहेब.

---

१ मोरोपंत पराजपे पुण्यातील वकील यांस लिहावयाच्या पत्राचा हा मसुदा बाळासाहेबांच्या हातचा. २ भानूंच्या.

याप्रमाणें तीन टोळ्या पांच कोसांच्या अंतऱ्यानें वाघावर जात आहेत. नदीस उतार होता. परंतु काल दोन रोज नदीपार जाहले. आज कूच आहे. वाघ कांहीं यांचे हातास लागत नाहीं. पृथ्वीप्रदक्षिणेचा विचार आहे. इंग्रजांचा करार वाघाचें पारिपत्य करावें किंवा आपण मरावें हाच आहे. नदीवर गांठावें असा बेत होता. ईश्वर सानुकूल! रात्रींत नदीस उतार जाला! वाघ नदीपार जाहला. या उपरी ईश्वरीच सत्ता न कळे. न होन वाघ हातास लागत नाहीं. इंग्रजासमागमें सामान गोरीं पलटणें तीन म्हणतात, परंतु रवेच्या वेळेस मीं उभा राहून पाहिलीं. दोन अजमासें आहेत. काळे चटेकरी सात आठ पलटणें आहेत. तोफा लहान सफेजंगीच्या दोन शेरी अडतीस आहेत. दिवालतोड दहा बारा शेरी दोन आहेत. शिवाय घोडे जुंपलेल्या तोफा आठ आहेत. दर तोफेस सहा घोडे. त्याजवर तीन माणसें एका ओळीच्या घोड्यांवर बसतात. एका ओळीचे तीन मोकळ असतात. शिवाय पाठीमागें रंजक लावणार दर तोफेस दोन असामी घोड्यावर बसोन. शिवाय पुढें निमोणा पहाणार दोन असामी घोड्यावरील. याप्रमाणें दर तोफेस आहेत. याशिवाय दोन पलटणें मोंगलाकडून आलीं आहेत. त्यांत सहा तोफा आहेत. याप्रमाणें पायचें सामान. घोडेस्वार सहाशें तुरुस्वारांस एक रीजमिंट म्हणतात. याप्रमाणें चार रीजमिंटें आहेत. त्यांपैकीं दोन रीजमिंटें तुरुपस्वार निखालस गोरे आहेत. दोन काळे मुसलमान वगैरे आहेत. घाड्यांवरील तोफा आठ सदरीं लिहिल्या आहेत त्या या रिजमिंटांतील. दर रीजमिंटास दोनप्रमाणें आहेत. शिवाय मोंगलाकडील दोन अडीच हजार फौज आहे. त्याखेरीज गोखले, बाबासाहेब, चिंतामणरावआपा याप्रमाणें सामान आहे. अकरा असामी मुख्य सरदार इंग्रज आहेत त्यांत हुकूम वसलीसाहेबाचा. कारभारी सर्वाभ्यधिक अ.गसाहेब म्हणोन आहे. गोविंदराव, कृष्णराव व बदामी बिष्टापा त्रिवर्ग ब्राह्मण आहेत. परंतु कोणाकडे काम मसलतीचें नाहीं. मेज म्हणजे सायंकाळच्या जेवणाचें नांव. ते वेळेस सर्व सरदार एक जागां मिळतात तेव्हां मसलत. याप्रमाणें आहे. विदित होय हे विज्ञापना.

५७५३ श्री. (भा० शु० १३–१ सपटेंबर.)

तीं॥ राजश्री आपासाहेब वडिलांचे सेवेशीं

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिर सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील

---

१ नमुना. नेम. निशाण. २ सर्वाभ्यधिक. सर्वश्रेष्ठ.

कुशल तागायत छ० ११ रबिलाखरपावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. वडिलीं छ० ३ रबिलाखरचें पत्र पाठविलें तें छ० १० रोजीं पावलें. 'घोडा पावला असेल, घोडी अद्याप पावली नाहीं.' म्हणोन लिहिलें, त्यास देवजी लवाटे याजबरोबर घोडी छ० २४ रबिलावलीं रवाना केली ती पावलीच असेल. पावल्याचें ल्याहावें. "राजश्री विनायकपंत गोडबोले यांस सांगून खोगर तयार करवावीं" म्हणोन लिहिलें, ऐसीयास यंदांची आखाडीची लोंकर घेतली नाहीं. त्याचें कारण मेंढरेंही येथून लांब होतीं. पावसाळे दिवस. तेथून लोंकर आणावी तर वाटेस शिंदे यांजकडील कटकट. म्हणोन हीं कातरणी मेंडक्यास दिली आणि पुढची आम्ही आणावीसी केली आहे. तेव्हां लोंकरच नाहीं त्याअर्थी खोगीरजोड व्हावयाचे नाहींत. मेंढरें लांब आहेत. टीप लिहून आली नाहीं, परंतु दीड हजार अदमासें आहेत. राजश्री महादजी शितोळे यांजविशीं श्रीमंतांस विनंती केली. वडिलांचें पत्रही दिलें. उत्तर जालें कीं, "यंदां सर्व सरंजामी जितके लहान लहान आहेत त्यांची चौकशी करून कोणाचा सरंजाम कसा आहे तो रुबरू पहावा ऐसी योजना करून बोलावलें आहे. त्यास शितोळे याणीं आपले सरंजामानिशीं येथें यावें. रुबरू त्यांचा सरंजाम पाहूं आणि तैसेच तुम्हांकडे लावून देऊं." याप्रमाणें आज्ञा जाली आहे. मला लिहिणें म्हणोन सांगितलें आहे. त्यास वडिलीं महादजी शितोळे यांस येथपावेतों पाठवून द्यावें. पाहणी सरकारची जाली म्हणजे माघारे आपल्याकडे लावून देतों. ती॥ सौ॥ मातुश्री आत्याबाई पुणेहून परवां येथें आली. काल पुढें मिरजेस जावयास निघून गेली. बरोबर चिमणाजीराजे व विसोबाभाऊ कुटुंबसह व आपा व कन्या इतकीं आहेत. वे॥ त्रिंबकभट आपटे अशक्त आहेत म्हणोन पावसाळ्याचे आले नाहींत. आठ तट्टें भाड्याचीं दर तट्टास आठ रुपयेप्रमाणें करून दिलीं. वाटेस शिंदेशाईचा खटला आहे. ईश्वरइच्छेनें पार होऊन जातील! पोंचल्याचें पत्र आलें म्हणजे बरें आहे. त्यांजबरोबरच राजश्री बाळाजीपंत दादा सहस्रबुद्धे गेले ऐसी वार्ता आहे. गणेशचतुर्थीस भेटले होते तेव्हां जाणार म्हणत होते. काल गेले तेव्हां भेटले नाहींत. मर्जी त्यांची. वरकड बारीक मोठें वर्तमान राजश्री पुरुषोत्तमपंत लिमये दाजी सांगतां कळेल. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

ती॥ रा॥ केसोपंत दादास शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. वडिलीं आशीर्वादपत्र पाठविलें तें पावलें. सर्व मजकूर राजश्री दाजीबा लिमये सांग-

तील त्यावरून कळेल. वर्षश्राद्धाकारितां यजमानानीं मिरजेकडे जाणें चांगलें नाहीं. शिंदे यांचा शिलशिला ह्या प्रांतीं नेहमींच आहे, तेव्हां चांगलें नाहीं. जें करणें तें समजून व्हावें हे विज्ञापना.

नं. ५७४४ श्रीगणराज. ( भाद्र० शु० १४–२ सप्तं. )

पै॥ छ० २३ रबिलाखर. सुरूसन इहिदे मय्यातैन. भाद्रपद शुद्ध १४ तीर्थस्वरूप रा॥ काकासाहेब वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें विठोबानें चरणावर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १२ रबिलाखर पावेतों मुक्काम मोळें येथें सुखरूप असों. विशेष. वडिलीं निंबाजबिराबर पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. ऐसेंच निरंतर पत्र पाठवून बालकाचा सांभाळ केला पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तर ती॥ राजश्री आपासाहेबाकडून पत्रें छ० ४ रबिलाखरचीं आलीं. त्यांतील मजकूर तीर्थस्वरूप रा॥ बाबासाहेब व इंग्रजांचीं चार पलटणेंसुद्धां जालेहाळनजीक सूर्यबन मलप्रभा दक्षणतीरास आले. येक दोन दिवशीं मलप्रभा उतरणार. बराऊन उगारावरच आहे. बराबर जमाव येक पलटण व सात तोफा येणेंप्रमाणें सामान आहे. पलीकडे येक दोन दिवशीं जाणार. पलीकडील पलटणें अद्याप अलीकडे आलीं नाहींत. मीही बातमी राखून हुशार आहें. पुण्याकडील अथवा दुसरीकडील नवलविशेष आढळल्यास सविस्तर लिहावया आज्ञा असावी. वडील सर्वज्ञ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७४५ श्रीगणपति. ( भाद्र० व० १–४ सप्तं. )

पै॥ छ० १५ रबिलाखर. इहिदे मय्यातैन. भाद्रपद.

अपत्यें रामचंद्रान शिरसा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० १४ रबिलाखरपर्यंत यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. शिंदे निसबत पलटणांकडील व राजश्री हरबाआपाकडील वर्तमान सविस्तर कळलें. शिंदे निसबत पलटणें कांहीं मागती उत्तरतीरास येणार, सरंजाम उतरत आहे त्यापक्षीं काय बेत असेल तो असो. आम्ही काल आटपाडीनजी मुक्काम होता तेथून कूच करून नागजेच्या मुक्कामास आलों. आज येऊन सावळज येथील मुक्कामास येतों. "मासिक निवृत्ति होऊन

१ विठ्ठलराव पांडुरंग २ पत्र काकासाहेबांस मिरजेस.

मंगळकार्यही जालें त्यापक्षीं दुसरें कांहीं ऊनाब्दिक करावयाचें नाहीं. एक वर्षश्राद्ध मात्र करावयाचें " म्हणोन आज्ञा, उत्तम आहे. बुनगें फार आहे. वैरणीची सोय पाहून ठेवून सडे निघोन येतों. शिंदे निसबत पलटणें अलीकडे आलीं यांतील तात्पर्य पुरतें कळलें पाहिजे. शोध घेतावा. विदित होय. उदैक अमृतसिद्धियोगें वडिलांचें दर्शनही होईल. हे विज्ञापना.

नं. ५७४६ श्रीगणराज. ( भाद्र० व० २–५ सप्तं. )

विज्ञापना. वडिलीं पत्रीं आज्ञा केली कीं ' वर्षश्राद्धास सडेनिशीं बनल्यास यावें ' म्हणोन. त्यास आतां यावयास बनत नाहीं आणि दिवसही थोडे राहिले. यास्तव येथेंच करितों. कडकोळचें इनामपत्र आहे म्हणोन आम्ही वसलीसाहेबांस सांगितलें आहे. त्यास तीं इनामपत्रें राजश्री सदाशिवपंत मनोळीकर यांजकडून आणवून आम्हांस लौकर पावतीं करावयाची आज्ञा जाली पाहिजे. पक्ष कधीं करावा, ब्राह्मण किती सांगावे, याची याद पाठवावी. वडिलीं मनोळीचे सुमारें यावें. धोंडजी श्रीकृष्णा उत्तरतीरास जाणार असें वर्तमान आहे. वडिलीं बातमी राखून सावध असावें. घटप्रभेचे व मलप्रभेचे मधें नदी उतरावी. मनोळी ठाणें चांगलें आहे. येविशीं पेशजी लिहिलेंच आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७४७ श्री. ( भाद्र० व० २–५ सपटें. )

ती ॥ राजश्री आपासाहेब वडिलांचे सेवेशीं

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिर सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० १५ राबिलाखर पावेतों वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलीं आशीर्वाद पत्र पाठविलें तें पावलें. करवीरच्या खटपटीसाठीं सरकारचें पत्र अथवा पालमर वकील याचें लिहिलें पाठवावें म्हणोन विस्तारें लिहिलें, ऐसीयास सरकारचें पत्र तो शिंदे येथें कायम आहेत तावत्पर्यंत व्हावयाचें नाहीं. ( इंग्रज ) वकीलाचे घरीं बारकाईनें शोध घेतला. त्यासीं दोस्ती उत्तम प्रकारें केली आहे. पेशजी कांहीं दुष्ट स्वप्न लिहिलें होतें त्याचा शोध वकिलापाशीं केला. परंतु त्या गोष्टी अगदीं नाहींत. त्यांणीं बहुत प्रकारें खातरजमा केली. दिक्कत धरूं नका येणेप्रमाणें बोलले. " कर-

---

१ परशुरामभाऊंचें वर्षश्राद्ध. २ रामचंद्रपंतास पत्र हरिपंतबाबाचें. इंग्रजांच्या लष्करांतून.

वीरचें पारिपत्य तूर्त व्हावयाचें नाहीं. वाघाचें पारिपत्य आधीं होईल. मग पहावयास येईल. त्यास तुमचे मुद्दे करवीरकर यांजकडे खरे किती आहेत ते तपशीलवार लिहून वसलीबहाद्दर याजपाशीं द्यावे आणि एक फर्द इकडे पाठवावे " ऐसें बोलले आहेत. त्यास वडिलीं विचार करून एक याद करून इकडे पाठवावी आणि वकील पालमर यांस दोस्तीचें पत्र एक बहुत गोडीचें लिहून थैली करून शहाण्या माणसाबरोबर पाठवावी. वाटेस दगाऊं नये ऐसें झालें पाहिजे. म्हणजे मी त्याचें प्रत्योत्तर घेऊन पाठवून देतों. तैसेंच दोस्तीचें पत्र लाला गणपतराव म्हणोन कायथ आहे त्यास एक पत्र पारशीच पाठवावें. वसलीबहाद्दर हे करवीरचा आपला समेट करून देत असल्यास आधीं करून घ्यावें. अनमान करूं नये. आपण श्राद्धास मिरज प्रांतीं यावयाचें नव्हतें. त्यास श्राद्ध होतांच निघोन फौज सुद्धां गलगल्याचे सुमारें जावें. फौज चार हजार पांच हजार मिळवावी. रास्ते यांचे तालुकेशिवाय बाकीचा मुलूख जहागिरी-दाखलच आहे ! आणि पोट भरून सरकारची आज्ञा रक्षून असावें. कोणाचा विश्वास मानूं नये. आपले जमयतीसुद्धां रातबिरात हुशार असावें. सरकारची आज्ञाही आपण फौज जमा करावी अशी आहे. तोफखानेवाले फौज जमा करितात. त्यांसही आज्ञा आहे. येथील मर्जी जशी वाहील तैसें होय म्हणून दिवस घेतला पाहिजे. आपण कोणतेंही मनांत न आणितां जमयत मिळ-वावी. रास्ते यांची आपली दोस्ती याजमुळें त्यांच्या तालुकेस आपणाकडून हरएकविशीं उपसर्ग होऊं नये. सरकारचे बातमीदार भावे समागमें आहेत त्यांसीं गोड बोलून संभाळावें. आजचे प्रसंगीं फौज राखून बाहीरच्या बाहीर पैका मिळवून धण्याचे म्हणवून स्वस्थ असावें. घाटगे यास चिकोडीच्या सनदा सरकारांतून दिल्या. कळावें. वसलीबहाद्दर यांजकडे ती॥ राजश्री चिंतामणराव आपा व बाबासाहेब गेले आहेत तितके पुरेत. वडिलीं भोंवताले भोंवताले असावें. सविस्तर मागाहून लिहितों. कर्नाटक प्रांतीं सरकारचे महाल आहेत ते पानशे याजकडे देविले आहेत. तें वडिलीं लागूंस लिहून डंबळ गदग प्रभृती सुटले ते देवावे. आज्ञा जाली आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० १८ रबिलाखर. भाद्र. वद्य ६.

नं. ५७५८ श्री. ( भाद्र व० ३–६ सपटें. )

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिर सा॥ नमस्कार विज्ञापना येथील

---

१ पत्र रामचंद्रपंत आपास पुण्याहून.

कुशल तागायत छ० १६ रबिलाखरपावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असें. विशेष. जमालखान बारगीर घरीं गेला होता तो हल्लीं वडिलांकडे आला आहे. पावेल. इकडील वर्तमान अधिकोत्तर लिहिजे ऐसें नाहीं. सर्जेराव घाटगे यास शिंदे यांचे दिवाणगिरीचीं वस्त्रें जालीं. दिवाणानीं देणेंचे अथवा कराराचे यादीवर श्रीकाराजवळ निशाण ' नाथप्रसन्न ' ऐसें करावें येणेप्रमाणें जाहलें आहे. आतां सरकारचीं दिवाणगिरीचीं वस्त्रें कोणास होतात कळत नाहीं. वडिलीं वर्षश्राद्ध होतांच फौजेंत जावें. एक दिवसही राहूं नये. सर्व वर्तमान मागाहून एक दोन दिवशीं लिहितों. सर्जेरावबापूस बहुत गोडीचें पत्र लिहून पाठवावें. त्यांस ल्याहावें कीं, " चिरंजीव बाबा काळे यास आपणाकडे पाठवून तीन साडेतीन महिने जाहले. अद्यापि आमचे दौलतीचा बंदोबस्त होऊन येत नाहीं. करवीरकर याणीं आमचा बहुत नाश केला ही माहिती बापू ! आपणास असून आम्ही देशोदेशीं हिंडावें हें चांगलें नाहीं. त्यास राजश्री दौलतराव बावांपाशीं आपण मुखत्यार असून आम्ही हिंडावें चांगलें नाहीं. त्यास चिरंजीव सर्व मजकूर तुम्हास कळवितील. त्याप्रमाणें बंदोबस्त करून द्यावा. सरकारांतही बहुत कामें आहेत. सर्व बंदोबस्त जाला पाहिजे. तुम्ही तेथें असून आम्ही वाऱ्यावर हिंडणें तुम्हास चांगलें दिसतें कीं काय ? उत्तर पाठवावें. फडणीस येऊन तुम्हापाशीं बोलत नसतीलसें भासतें. त्यास या पत्राचें उत्तर आधीं पाठवावें. सर्व भरंवसा तुमचा जाणोन लिहिलें आहे. राजश्री दौलतरावबाबांस पत्र लिहिलें आहे हें तुम्ही व चिरंजीव मिळून देऊन आधीं बंदोबस्त करून देवावा. " येणेंप्रमाणें बहुत गोडीचें पत्र एक पाठवावें. तसेंच दौलतरावबाबांचे नांवें एक पाठवावें. त्यांसही बहुत स्नेहपूर्वक ल्याहावें. त्यांत ल्याहावें कीं " कै॥ पाटिलबावाचा आणि भाऊसाहेबांचा भाऊपणा चालला तसाच भाऊपणा आपण पुढें आम्हासीं चालवावा. आपणाकडे चिरंजीव बाबा काळे पाठविले आहेत. त्यास जेणेंकरून या दौलतीचा बंदोबस्त होई तो अर्थ करावा. आपले पलटणांचा उपद्रव या प्रांतीं बहुत होतो. त्यास याउपरी उपद्रव होऊं नये. यांत जसें आपले विचारें येईल तसा बंदोबस्त करून द्यावा. श्रीमंतांस आम्हाविशीं आपण चार गोष्टी सांगून सर्व बंदोबस्त करून द्यावा. पत्राचें उत्तर पाठवावें " येणेप्रमाणें बाबा शिंदे यांस ल्याहावें. ऐसीं दोनी पत्रें बहुत मिष्टतेचीं गुदगुल्या होत ऐसीं पाठवावीं. प्रयोजन आहे. येथें मीच लिहिलीं असतीं, परंतु शिके वडिलांपाशीं इतकाच अवकाश. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७४९ श्री ( नक्कल. ) ( भाद्र. व. ४–७ सप्तं. )

शिक्का.

आज्ञापत्र राजश्री पंतप्रधान तहां कुंभार कसबे रहिमतपूर प्रांत वांई सुरुसन इहिदे मय्यातैन व अल्लफ. तुमचीं वधूवरें घोड्यावर बसावावयाचा करार सन सल्लास सबैनांत जाहला तेव्हां नजर कमाल जमेवर शेंकडा आठ आणेप्रमाणें द्यावयाचा ठराव जाला. त्याबद्दल ऐवज बाकी राहिला ते रुपये १०० शंभर येणें, त्याचे वसुलास रामजी महादेव कारकून रवाना केले आहेत यांजकडे ऐवज देऊन कबज घेणें. या कामास लोक पाठविले आहेत त्यांस मसाला रुपये दोन आदा करणें. जाणिजे छ० १७ रबिलाखर. परवानगी हुजूर. मोर्तबसूद.

नं. ५७५० श्री. ( भाद्र० व० ६–९ सपटें. )

विज्ञापना[1]. परवां यशवंतखान बारगीर याचे लेंकाबरोबर पत्र पाठविलें आहे त्यांत शिंदे व घाटगे यांस पत्रें लिहून पाठवावीं म्हणोन लिहिलें आहे त्याप्रमाणें पत्रें यावीं. सारांश लिहिण्यांत गोडी फार असावी. रवाना छ० १९ रबिलाखर हे विज्ञापना.

नं. ५७५१[2] श्री. ( भाद्र० व० ६–९ सपटें. )

ती॥ राजश्री आपासाहेब वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० १९ रबिलाखरपावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असें. विशेष. वडिलीं आशीर्वादपत्र पाठविलें तें पावलें. राजश्री महादजी शितोळे यांजविशीं सरकारांत पत्र पाठविलें तें श्रीमंतांस प्रविष्ट केलें. मनाई-

---

१ बाबाकाळे याचें रामचंद्रपंत आपास पत्र. कारकून आणि सरदार यांच्या समजुतींत असा फरक पडतो. बाबाकाळे आर्जवी, युक्तायुक्त विचार न पहातां वाटेल ती शक्कल लढवून कार्य संपादन करणारा, कार्यवादी कारकून होता. त्यानें शिंदे व घाटगे यांस स्वाभिमानत्यागपूर्वक बहुत लीनतेचीं गोडगोड ' गुद्गुल्या होतीलशीं ' अमुक अमुक मजकुराचीं पत्रें लिहून पाठवावीं म्हणून रामचंद्रपंतआपास वारंवार लिहिलें, परंतु त्यानीं तशीं पत्रें कधींच पाठविलीं नाहींत. मानी मनुष्याचा काळ फिरला तरी पीळ जात नसतो! २ पुढचीं दोन पत्रें याच पत्राच्या पुरवण्या आहेत.

विशीं विनंती केली. उत्तर जाहलें कीं " जितके लहान सरंजामी आहेत त्यांस एकजागां करावें ऐसें ठरावून पत्रें लिहिलीं आहेत. त्यास तूर्त येथ-पावेतों पाठवावें. सरंजाम पाहून मागती तुम्हांकडे पाठवून देऊं." ऐसें बोलले तेव्हां राजश्री बाळोजी कुंजीर यांजकडे जाऊन त्यांस सांगितलें. त्याणीं सांगितलें कीं, राजश्री नाना पुरंदरे यांजकडे सरंजामी लोकांचें काम सांगितलें आहे. लहान सरंजामी आहेत याणीं नानांपाशीं चाकरी करावी ऐसें ठरलें आहे. त्यास शितोळे याणीं न राहतां यावें. ऐसें उत्तर केलें. तेव्हां मीं सांगितलें कीं, तुम्हांस पत्र आहे त्याचा जाब द्यावा. तेव्हां बाळोजीबाबा बोलले कीं, ज्याअर्थीं आपानीं पत्र लिहिलें असतां आजच आणवावे हें चांगलें नाहीं. तर दोन तीन महिने शितोळे याणीं आपापाशीं चाकरी करावी. नंतर यावें. राहूं नये. ऐसें बोलले. आणि कुंजीर याणीं पत्र लिहिलें आहे. त्यास तूर्त दोन तीन महिने शितोळे यांस ठेवून घ्यावें. नंतर पाठवावें. इतकियांत बरसातही जात आहे; आणि वाघाचें पारिपत्य होऊन इंग्रज माघारा जातो किंवा कसा डौल पडतो हेंही समजतें. जर मसलत न वाढतां ताम्रमुखी माघारा जातो ऐसें जाहलें याजवर शिताळे यांस पाठविलें असतां काय दिक्कत ! तें न घडतां कांहीं डौल दुसरा दृष्टीस पडल्यास फिरून विनंती करीन. कळावें. " भत कुणकीपासून पांच रुपये घांसदाणा घेतला. तेथें गैरवाका समजावितील यास्तव लिहिलें आहे; " म्हणोन आज्ञा, वारंवार विनंती लिहीत आहें कीं तूर्त मंडळी श्रीमंतांपाशीं आहे यांस स्वर्ग शिलकेस राहिला नाहीं. तेव्हा आम्हीं कितीही विनंती केली असतां सरकारांत प्रमाण वाटत नाहीं. आणि आपण तेंच करितात त्यापुढें इलाज नाहीं ! येथें प्रीतीचें मंडल आहे त्याशिवाय प्रांत थोडका आहे कीं काय ! काय पाहिजे तैसें केलें असतां येथें फिर्यादी होतील, परंतु विषाद पावणार नाहींत. ढवळपुरीचे गांवकरी आमचे हवालीं करावयास आणिलेले या भत कुणकीच्या हजार रुपयेकरितां ( आबा काळे ) हवालीं करीना ! काय करावें ? येथील मर्जी विलक्षण आहे. त्याप्रमाणें वर्तलें असतां परिणाम. यास्तव विनंती लिहिली आहे त्याप्रमाणें घडावें. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७५२ श्री. ( भाद्र० व० ६–९ सपटें. )

विज्ञापना. घाटगे शिंदे यांचे आग्रहामुळें इंग्रजापासून निघावें ऐसीं

पत्रें घेणार. मनोळीचें ठाणें हस्तगत होतें तर फार बरें होतें. परंतु इलाज नाहीं. कर्णेल दोस्त करवीरकर यांस म्हणतात यास काय करावें? पेशजी मीं आपणांस लिहिलें होतें कीं, येथून कर्णेलास लिहून कांहीं दगा करण्याचा मजकूर लिहिला होता त्याचा शोध वकिलापाशीं केला. आणखीही चोहीं-कडे केला. परंतु अगदीं वर्तमान खोटें. वडिलीं कांहीं काळजी करूं नये. वकिलानीं खातरजमा केली. "आपण काळजी करूं नये. कर्णेल वसली बहुत थोर आहेत. त्यांची तुमची भेट जाली त्यांत दगाबाजी कदापि होणार नाहीं." येणेंप्रमाणें खातरजमा केली. वडिलांस कळावें. वडिलीं मात्र जमियतेनिशीं असावें. खर्चास सर्व राज्य जहागिरीरूप आहे! जमियती-शिवाय राहिल्यास कोणी पुसणार नाहीं. श्रीमंतांची आज्ञाही आहे कीं फौज ठेवावी. आपण म्हणतील पैका. त्यास तेवढेंमात्र नाहीं! बाकी सर्व आहे. पानशे यांसही पांच हजार फौज ठेवावी ऐसी आज्ञा केली आहे. कळावें. कर्नाटकचे तालुके सरकारी सारे पानशे यांजकडे देविले आहेत. मलाही आज्ञा जाहली आहे. त्यास वडिलीं लागूंस लिहून डंबळ गदग वगैरे महाल सरकार आज्ञेप्रमाणें पानशे यांचे हवालीं करावे. सर्वांसीं दोस्ती दुरून राखावी. श्रीमंतांचे पायांशीं अंतर असूं नये. जें होईल वर्तमान तें मागाहून लिहून पाठवितों. पत्रें वरचेवर येत असावीं. घोडी पावलीं न पावली कांहीं समजलें नाहीं, तर कळवावें. घोड्याचा मोतादार गेला तो अद्यापि आला नाहीं. त्यास पाठवावा अथवा तो येत नसल्यास दुसरा येथें ठेवीन, यास्तव लिहिलें आहे. ती॥ राजश्री सखोपंत काकाकडे पलूस होतें त्याचे फाजिलाचा ऐवज अखेरसाल जाहलें म्हणजे विद्यमान कमावीसदार याजकडून फाजील देवितों. त्यास आज्ञा व्हावी. तैसेंच इंगलहल्लीची घालमेल होती ऐसें काकानें लिहिलें होतें. त्यास वडिलांची मर्जी जाल्यास धालमेल जाहलेस चिंता नाहीं. परंतु जो इंगलहल्ली करील त्याणें वाजवी फाजील द्यावें ऐसी आज्ञा व्हावी. प्रति-निधि याणीं मागती दोनशें आरब ठेविले होते. त्याजवर शिंदे यांची तंबी पलटणांची येऊन आरब काढून दिल्हे. याजमुळें पुलाजवळील कांहीं घ[illegible] पलटणवाले याणीं झाबडलीं. आपणाकडे भावे आले आहेत तसे राजश्री महादाजीपंत साठे पडे रावसाहेबांपाशीं होते त्यांची रवानगी ती॥ राजश्री चिंतामणराव आपांकडे होत आहे. सारांश बातमी. रवाना छ० १९ रबिला-खर. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७५३ श्री. (भाद्र. व. ६—९ सपटें.)

विज्ञापना. मुनशीशीं बोलावें म्हणोन विस्तारें लिहिलें, ऐसीयास आज ते श्रीमंतांपाशीं मुखत्यार आहेत. आमचे पक्षाचावर येऊन उपयोगीं पडलतीसें भासत नाहीं. तथापि खटपटीस अंतर करीत नाहीं. साधल्यास बनवावयास चुकत नाहीं. परंतु ज्या अर्थी कर्नेल करवीरकर यांस दोस्त म्हणतात त्या अर्थी खटपट करणें व्यर्थ आहे. कांहीं फळ व्हावयाचें नाहीं. तर वाडिलीं याजउपरी अंदेशे मनांत न आणितां कर्नेलाच्या विचारें तह ठरावून घेऊन तूर्त कामावर नजर देऊन विल्हे करून घ्यावी आणि शिंदे यांचे पलटणांस कर्नेल याणीं लिहून पाठवावें कीं, करवीरकर यांचा आणि पटवर्धन यांचा तह आम्ही करतों. तुम्ही करवीरचे साहित्यासाठीं कृष्णापार जालां आहां, तर याजउपरी पटवर्धन व करवीरकर यांचे तालुक्यास उपद्रव न करितां माघारे पुण्यास जाणें. आम्ही तह करून देतों. याप्रमाणें स्पष्ट लिहून त्यांच्या दाबावरच हीं पलटणें माघारीं आलीं तर आलीं. नाहीं तर माघारीं येत नाहींत. हीं पलटणें त्या प्रांतीं असतां वस्ती होणें कठिण यावरून विनंती लिहिली आहे. आजचे प्रसंगीं तह करून देतों म्हणतात ही गोष्ट फार चांगली आहे. मी पांच सात वेळां हीच विनंती लिहिली आहे. काय घडेल तें खरें. आपले चित्ती येईल कीं येथून पालमर अथवा सरकारांतून लिहून हें घडावयाचें नाहीं. तेथें आपलें कर्नेल आईकत नाहीं. मग रंगाच्या मोटा कां? कसेंही असो. तह मिटवून घेतला असतां ठीक. कर्नेलानीं तह केला आणि समजूत केली म्हणजे येथें सरकारांत अथवा शिंदे यांचे घरीं फिरावयाचें (कारण) नाहीं. हल्लीं घाटगे मनसबा करितात कीं, इंग्रज इतके सामानानिशीं येतो तेव्हां चाल चांगली दिसत नाहीं. तर चिंतामणरावआपा व बाबा व गोखले याणीं इंग्रजापासून निघावें आणि आपलेपाशीं यावें. आपण आणि तोफखानेवाले याणीं एकत्र होऊन सर्वांनीं एका जागां होऊन डास साहेबापाशीं सर्वांनीं जमा व्हावें. सर्वांवर हुकूम आपला असावा. येणेंप्रमाणें फौज एक जागां करून इंग्रजांपासून दहा कोसांचे अंतरानें असावें. इंग्रज वाघाचें पारिपत्य करून माघारा गेल्यास गुंता उरकला. पारिपत्य करून पुढें या दौलतीवर बदचाल धरली तर मग त्याचें पारिपत्य करणें जरूर. हा मनसबा घाटीत आहेत. याप्रमाणें पत्रें सरकारचीं व शिंदे यांचीं आपणास घेणार आहेत आणि घेतील. वडिलांस कळावें करितां लिहिलें आहे.

जरी या मायन्याचीं पत्रें आपल्यास आलीं तर शिंदे यांस पत्राचा जाब द्यावा कीं, आपण लिहिल्याप्रमाणें सिद्ध आहों. ऐसें पत्र शिंदे यांस द्यावें आणि त्याच पत्रीं लिहून पाठवावें कीं, जें सांगणें तें चिरंजीवापाशीं सांगत जावें. ऐसें त्यास लिहून द्यावें. आणि श्रीमंतांस ल्याहावें कीं, इंग्रजापाशीं सरदार आहेत त्यांस निघून यावें म्हणोन आज्ञा, त्यास येविशींची विनंती चिरंजीवांस करणेंविशीं लिहिलें आहे. विनंती करितील. समजून आज्ञा व्हावी. त्याप्रमाणें वर्तणूक घडेल. म्हणजे समजून विनंती करून लिहीन. सरकारचीं पत्रें आलीं म्हणोन इंग्रजांस सोडूं नये. सविस्तर मजकूर मागाहून लिहीन. रवाना छ० १९ रबिलाखर. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७५४ श्री. ( भाद्र० व० ६–९ सप्टें. )

राजश्री रामचंद्रपंत आपा गोसावी यांसीं

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित बाळोजी कुंजीर. दंडवत. विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० १९ रबिलाखर पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. "राजश्री महादजी शितोळे यांस सरकारची आज्ञा जाली, त्यास मशारनिल्हे येथें आहेत. तर मनाई सरकारांत विनंती करून पाठवावी" म्हणोन लिहिलें, त्यास सरकारांतून सरंजामी फौजेचें काम श्री॥ राजश्री नाना पुरंदरे यांजकडे जाहलें आहे. त्यास श्रीमंतांची मर्जी सर्व सरंजामी याणीं येऊन हुजूर हाजीर व्हावें. त्यावरून सर्वांसच पत्रें गेलीं आहेत. त्यांत आपण लिहिल्यावरून श्री॥ नाना पुरंदरे यांस सांगून महादजी शितोळे यांस तूर्त आणवूं नये म्हणोन सांगितलें आहे. तर दोन तीन महिने आपलेपाशीं महादजी शितोळे यांस ठेवून घेऊन नंतर सरकारआज्ञेप्रमाणें पाठवून द्यावें. आम्ही आपले आहों. वरचेवर पत्रें पाठवीत असावीं. बहुत काय लिहिणें, लोभ करावा हे विनंती.

नं. ५७५५ श्री. ( १० सप्टेंबर )

पै॥ छ० २८ रबिलाखर. भाद्रपद व० ३० गुरुवासर. सन इहिदे.

सेवेशीं बाळकृष्ण लक्ष्मण कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० २० रबिलाखर मुक्काम लष्कर नजीक यापलपरवी प्रांत रायचूर वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपणाकडून पत्र येऊन वर्तमान

कळत नाहीं तरी सविस्तर त्याहावयाची आज्ञा जाहली पाहिजे. यानंतर इकडील वर्तमानाचीं दोन चार पत्रें पाठविलीं. एक जोडी बारींत मारली गेली व एक जोडी तोरगलकरानीं अटक करून ठेविली होती ती परवां सुटोन आली. वाघ मलप्रहरा नदीचे उगमाकडून गोगाकपरगण्यांतून येऊन बदामीजवळ नदीपार मलप्रभा होऊन दहा हजार फौजेनिशीं नदीपार व्हाव-यांकरितां कवताल मानवीकडे गेला होता. त्याचे पीच्छावर इंग्रज व सरकारी फौजा व मोंगल जाळेहाळानजीक पार जाहले. तेथें कर्णल इष्टवेसण साहेब पांच हजार फौज पलटणें एक टोळी करून कृष्णातीरानें जाहले. व श्रीः राजश्री चिंतामणराव आपासाहेब व बाबासाहेब व राजश्री बापू गोखले व मोंगल ऐसी एक टोळी आठ दहा कोशाचे अंतऱ्यानें जाले. कनकगिरीच्या सुमारें कर्णेल वंसलीसाहेब पांच सहा हजार फौजेनिशीं एक टोळी करून. याप्रमाणें तीन टोळ्या करून दरमजल त्याचे पीछावर आले. फौजांची दाटी पाहून वाघ सहा हजार फौजेनिशीं सडा होऊन आपासाहेब व बाबासाहेब व गोखले व मोंगल यांचे फौजेवर छापा घालावा ह्या बेतानें चालोन भागनूर येथें आला. वसलीसाहेब याणें कनकगिरीवर सडी स्वारी करून एक हजार दोन हजार तुरुपस्वांर आठ तोफा घेऊन बारा कोसांची मजल करून मुक्काम-मजकुरास आला. तों वाघाचा मुक्काम तीन कोशांवर आहे ही बातमी कळली. वाघास हे आले हें समजलें नाहीं. पहांटेच्या चार घटका रात्रीं इंग्रज चालोन जाऊन आज सूर्योदयास गेले तों वाघही तयार होऊन उभा होता. लढाई जाली. वाघ तीन गोळ्या लागून ठार पडला. फौज उधळोन गेली. वाघ पडला हें वर्तमान इंग्रजांस नव्हतें. इंग्रज पुढें चालोन गेले. आम्ही मागें उभे होतों तों इंग्रजांकडील राजश्री गोविंदराव कारकून व दोन चार माणसानीं उभे होते. मुर्द्याची ओळख पुरेना. आम्हांस सांगून पाठविलें त्यावरून आम्ही व राजश्री बिष्टोपंत बदामीकर मिळोन तेथें गेलों तों वाघ खरा. मुर्दा घोड्यावर घातला. इतक्यांत वाघाकडील पठाण करोल मिळोन एक हजार पालखी घेऊन त्यास न्यावयाकरितां चालोन आले. आम्हांजवळ शंभरपर्यंत स्वांर होते. गोळागोळी जाली. मुर्दा न्यावा व आम्हासी गांठ घालावी हा त्यांचा बेत होता परंतु स्वामीचे कृपेंकरून तें परिहार होऊन मुरदा घेऊन सांभाळोन ती जागा तोफेचे दोन गोळेचा सुमारें सोडोन आलों. तों इंग्रजांकडे सांगून पाठविलें होतें व गोळीचे आवाज त्यांणीं ऐकिलेवरून वसलीसाहेब फिरोन आला. मर्दा पाहोन बहुत खुषी जाहला. इतक्यांत आपा-

साहेब, बाबासाहेब व बापू गोखले व मोंगल फौजसह येऊन पोंचले. वाघाची टोळी जमून उभी होती ती हे पाहतांच निघाले. त्याचे पीछावर या फौजां-पैकीं कांहीं फौज गेली. नंतर सारे जमून मुकाम मजकुरास मुक्कामास येऊन राहिले. याउपरी पुढें मसलतीचा विचार काय घडतो तें बोलोन मागाहून सविस्तर लिहून पाठवितों. स्वामीचे पुण्येंकरून हे दिवस पाहिले. मी सर्वो-परी लोकांचे देण्याचे पेचांत आलों आहें. सर्व पार करणार स्वामी आहेत. हें कार्य मोठें जालें. पुढील जाणें येणें याचे विचार आज उद्यां ठरतील ते कळवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७५६ श्री. ( भाद्र० व० ६–९ सपटें. )

पै॥ छ० २४ राबिलाखर सन इहिदे.

विज्ञापना. वडिलीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं "वाघ यादवाड पर-गण्यांत आला. बागलकोटाकडे जाणार. सात आठ हजार जमियतही त्याज-पाशीं आहे. यास्तव त्याचे मागून जावें तर वाघाची घोड्यावरील फौज आपण पायचे, यास्तव दुरोखी असावें म्हणजे जिकडे तो जाईल त्या तोंडीं पीछावर जावयास ठीक पडेल. हा मनसबा इंग्रजांनीं करून चि॥ राजश्री चिंतामणराव आपा व बाबा यांजबरोबर चार पलटणें देऊन मलप्रभा दक्षिण-तीरानें जावें असें सांगितल्यावरून उभयतां चिरंजीव नरगुंदचे रोखें मलप्रभा दक्षिणतीरानें गेले. कर्णेल मलप्रभा पार होत आहेत. पाच्छापूरचे बारीनें मनोळी तालुक्यांतून जिकडे वाघ तिकडे इंग्रज येणार. कर्णेलाबरोबर राज-श्री बापू गोखले व लागू ऐसे आहेत. ऐसी बातमी आली आहे. लिहिलें आलें नाहीं; म्हणोन लिहिलें, व "श्रीपंढरीक्षेत्र सरकारांत आल्यापासून आम्हांकडे (होतें) त्यास सरकारांत विनंती करून लिहिणें" म्हणोन आज्ञा, ऐसीयास येथें काल राजश्री गणपतराव पानशी यांचीं पत्रें आलीं त्यांतील मजकूर वाघ घटप्रभा पार होऊन गेला. पीछावर चिंतामणराव आपा व बाबा व गोखले व इंग्रजांकडील दोन हजार तुरुपस्वार ऐसे आहेत. पांच कोसांचा तफावत आहे. पलटणें दौडीस पुरेनात म्हणोन मागें राहिलीं ऐसें लिहिलें आहे. पानशेही कृष्णापार होणार. येणेंप्रमाणें मजकूर आहे. त्यास आपण

---

१ बाबा काळे यांचें रामचंद्रपंत आपास पत्र. तशींच पुढचीं दोन. २ पूर्वीं प्रतिनिधीकडे होतें तें स. १७५० च्या सुमारें पेशव्यानीं घेतल्यापासून.

लिहिलें तें खरेंच. ती॥ राजश्री आपासाहेब व बाबासाहेब वाघाचे पिछावर आहेत. वाघ दगेखोर आणि जुमामर्द आहे. यास्तव उभयतां वडिलांस आपण सूचना ल्याहावी कीं, पाठीस लागणें तथापि जमून चालावें. नाहीं तर मागले[1] झुजाची गति होईल. ऐसी आधीं सूचना करावी. कर्णेल वसली-बहादुरही आजपर्यंत मलप्रभा उत्तरतीरीं येऊन बारीपार जाले असतील. करवीरचें लिहिलें ( आलें ) की, इंग्रजांनीं मनोळी घेतली. हीं पत्रें आलीं त्यावरून घाटगे बहुत दिलगीर आहेत. मला पुसत होते. मीं सांगितलें कीं आमचीं पत्रें अद्यापि आलीं नाहींत. वाघ ज्याअर्थी पूर्वेस गेला त्यापक्षीं या प्रांतींचा उपद्रव तुटला. याउपरी शिंदे यांचीं पलटणें चिकोडी तालुका घेतात. मागें आपण लिहिलें होतें कीं, कर्णेल वसली यांचें पत्र शिंदे याचे पलटणचे डास यास आलें[2]. त्यास तें खोटेंसें भासतें. जर पत्र आलें असतें तर येथें तीळपापड होता ! तो मजकूरच नाहीं तेव्हां खोटेंसें भासतें. त्यास जर तसें घडेल तरच परिणाम. नाहीं तर चिकोडी तालुका घेऊनही उपद्रव चुकत नाहीं. पंढरपूरचा मजकूर तर राजश्री बापु कमलाकर याणें श्रीमंतांपाशीं तीस हजार रुपये भरून आमचे धांदलींत क्षेत्र करून घेतलें. त्याचा पैका आज दिला असतां क्षेत्राची कमावीस होण्यास दिक्कत नाहीं. पैका न देतां घेऊं म्हटल्यास कांहीं व्हावयाचें नाहीं. आपण म्हणतील, “ सावनूर तालुके यांजवर आमचे कर्ज असतां महाल दुसरेयास देवितात; तेथें न्याय नाहीं, आणि कमलाकर यांजविशीं न्याय कां ? ” तर हा कारभार खुद्द श्रीमंतानीं केला आहे. त्यांस पार पाडावयाचा. आपला कारभार कै॥ रावसाहेबांचे[3] कारकीर्दीचा. यांत सर्व आहे. जर क्षेत्र पाहिजे ऐसें आहे तर कमलाकर याचा ऐवज व्याजसुद्धां देवावा. मग हवालीं होणेंस दिक्कत नाहीं. ऐसा मजकूर आहे. रवाना छ० १९ रबिलाखर. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७५७ श्री. ( भाद्र० व० ८–११ सप्टें. )

ती॥ राजश्री आपासाहेब वडिलांचे सेवेशीं

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिर सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० २१ रबिलाखर पावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. वडिलांची स्वारी मिरजेस आली म्हणोन राजश्री

---

१ वाघ व गोखले यांच्या लढाईप्रमाणें. २ चिकोडी तालुक्यांत पाऊल ठेऊं नये म्हणून. ३ सवाई माधवरावांच्या.

बाळाजीपंत सोवनी याणीं लिहिलें त्यावरून कळलें. ती॥ सौ॥ मातुश्री आत्याबाईही पावलीं असतील. राजश्री बाळाजीपंतदादा सहस्रबुद्धेही गेले म्हणोन आइकलें. तेही पावले असतील. गणेशचतुर्थीच्या दिवशीं बाळाजीपंत दादा गडबोले यांचे घरीं भेटले होते. आत्याबाई जाणार तेव्हां मी जाईन ऐसें बोलले होते. परंतु गेले तेव्हां भेटून गेले नाहींत. मर्जी त्यांची ! वडिलीं येथें रहावें म्हणोन लिहिलें असतां दादांच्या मनास आलें नाहीं. काय अंदेशानें गेले ते जाणत. असो. येथून दाजीबा लिमये गेले ते वडिलांस भेटले असतील. भेटले असल्यास सर्व मजकूर श्रवण केला असेल. काल श्रीमंतांची गांठ पडली होती. कर्नाटकचे सरकारतालुके पानशे यांचे हवालीं करावे ऐसें ठरलें आहे. मीही कबूल केलें आहे. त्यास लागूंस लिहून सरकारतालुके पानशे यांचे हवालीं करावे. सावनूरमहाल हवालीं करूं नये ऐसें ठराऊन घेतलें आहे. अशीच बुद्धि काईम राहील तेव्हां खरी. त्यास सरंजामी तालुका सावनूरतालुका खेरीज करून बाकी महाल सरकारचे पानशे यांचे हवालीं करावे. दिक्कत करूं नये. श्रीमंतांची मर्जी प्रसन्न आहे. वडिलीं मात्र सरकार लक्षानें आज्ञेप्रमाणें चालावें. भावे आपणापाशीं आहेत त्यांचीं पत्रेंमात्र यथास्थित श्रीमंतांस यावीं म्हणजे मी येथें खातरजमा करितों त्याचें सार्थक जालें. भावे ही कुलशील ( वंत ) आहेत. दिक्कत नाहीं. राजश्री धोंडोपंत बाबा जोग यांचे स्वकीय आहेत. त्यांजकरवीं एकांतीं चार गोष्टी सांगून श्रीमंत खूष होईत ऐसीं भावे यानीं लिहिणीं लिहीत असावीं. त्यास हुजरेसुद्धां उदास करूं नये. कालानुरूप वर्तावें. सावनूर तालुका रहावासा केला आहे. कळावें. परंतु पांच रुपये देणें पडतील तेही कबूल करितों. कळावें. वरचेवर पत्र येत असावें. कर्णेल वसली पुढें येत नाहीं हें काय तें कळवावें. वाघ कोठें आहे, ती॥ राजश्री बाबासाहेब आपासाहेब कोठें आहेत, हें कळवावें. उभयतांकडील रात्रंदिवस काळजी आहे. उत्तरें यावीं. इंग्रज आला आहे हा वसवसा शिंदे घाटगे यांस[१] फार आहे. सारांश वडिलीं श्रीमंतांशीं एकरूप असावें. सविस्तर मागाहून लिहीन. बहुत काय लिहिणें. मिरजेस बहुत दिवस राहूं नये. फौजबंदी करून पैका मिळवून श्रीमंतांस कल्याण चिंतून असावें. सारांश कर्णेलास लिहून करवीरचा तह करून

---

१ शिंदे घाटगे यांस वसवसा कां, बाजीराव साहेबानीं वसलीशीं गुप्तपणानें काय बोलणें लाविलें आहे, याची वार्ता बाचाकाळे यासच काय, पण खुद्द पटवर्धन सरदारांसुद्धां या वेळीं कांहींच कळली नव्हती असें दिसतें.

घ्यावा आणि शिंदे यांचीं पलटणें त्याजकडून माघारीं यावीं तरच परिणाम. येथून कांहीं व्हावयाचें नाहीं हें सत्य आहे. त्यांत होईल खटपटीस अंतर नाहीं. बहुत काय लिहिणें. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७५८ श्री. ( भाद्रपद व० ८–११ सपटेंबर. )

विज्ञापना. रूपराम व गोसावी यांस दोन महाल सरकारांतून देविले. मीही वडिलांस लिहिलें परंतु अद्यापि महाल त्यांचे कारकुनाचे हवालीं होत नाहींत येणेंकरून श्रीमंत बहुत नाखूष आहेत. ‘ तुझें बोललेलें एकही खरें नाहीं. तर दोनी महाल आधीं स्वाधीन करणें. ’ ऐसी दोन चार रोजीं एकदां रुबरू ताकीद होती. त्यास वडिलीं लागूस लिहून दोनी महाल हवालीं होऊन त्यांची पावती पाठवावी. नाहीं तर येथें माझी बाकी रहात नाहीं. पालमर येथें बोलतो कीं, सरकारची आणि कंपनीसरकारची दोस्ती. तेव्हां सरकारी महाल वाघाकडील सोडविले त्यास ( सोडविण्याच्या खर्चाबद्दल ) पैका घेत नाहीं ही खातरजमा. येणेप्रमाणें खातरजमा करितो. मी पैका कबूल केला आहे म्हणतों. तेव्हां माझें बोलणें खरें पडत नाहीं. त्यांतही दोनी महाल मिळून दहा वीस हजार रुपये देतील. दिक्कत पडत नाहीं. त्यास वडिलीं दोनी महाल आधीं स्वाधीन व्हावे. सेवेशीं कळावें करितां लिहिलें आहे. न्यामतखान येथें रिकामा आहे त्याचें म्हणणें मला आपासाहेबांकडे पाठवावें. मी चार पांचशें स्वार ठेवून आपासाहेबांचे अघाडीस मुलूख मारून पोट भरतों. बोभाट जाला तर आम्हांस सरकारांत पुसल्यास सरकारचा चाकर येथून गेला हें आम्हांस कां पुसतां ? ऐसें म्हटलें तरी चिंता नाहीं. मर्द मनुष्य आहे. आपणापाशीं इमानानें राहील. त्यास आज्ञा जाहल्यास पाठवून देतों. उत्तर आधीं यावें. आजचे प्रसंगीं ऐसे पोटभरु असावे आणि मर्दही आहे. यानें खानदेशांत सात हजार सामान मिळवून मुलूख मारीत होता तेव्हां कोणी पुसलें नाहीं, तेव्हां आतां कोण पुसतो ? त्यास आज्ञा जाहली म्हणजे लावून देतों. नाहीं तर सर्जेराव याजकडे जाऊन रहाणार आहे. सर्जेराव याजकडे राहून व्यर्थ आमचा मुलूख मारील. त्यास आपण ठेवावा म्हणजे जिथे धाडला तेथें जाऊन काम बजावावयाचा आणि पोटही

---

१ सावनूर राज्यापैकीं राणीबिदनूर व हनगल हे दोन महाल पेशव्यानीं रूपराम चौधरी व मनोहरगिरी गोसावी यांस फौजेच्या खर्चाकरितां दिले. रामचंद्रपंत आपास दोन महाल हवालीं करण्याविषयीं बाबा काळे दरपत्रांतून लिहितो ते हेच महाल. २ चौधरी व गोसावी देतील. ३ करावे.

भरून राहील. आपल्यास फौजही ठेविलीच पाहिजे यास्तव लिहिलें आहे. तर आज्ञा जाली तर न्यामतखान यास पाठवून देतों. दिलभरंवसा देऊन ठेवावा. ज्या मुलुखांत धांदल करणें ऐसी आज्ञा होईल तेथेंच करील. रवाना छ० २१ रबिलाखर. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७५९ श्रीगणपति. (भाद्र. व. ७–१० सप्तं.)

अपत्यें हरीचे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २० रबिलाखर. बुधवार. दिवस तीन प्रहर. मुक्काम नजीक कवताल भनू दोन कोस येथें वडिलांचे आशीर्वादें सुखरूप असों. विशेष. इंग्रजानीं दोन टोळ्या करून दोनी बाजूस वाघाचे पिछाडीवर चार पांच कोस आमची फौज व चि॥ राजश्री चिंतामणराव आपा व राजश्री बापू गोखले व नबाबाकडील साद्धल्लाखान वगैरे सरदार ऐसे घालून मजल दरमजल चालले तों भनूजवळ धोंडजी वाघाचा मुक्काम होता. त्याजपासून इंग्रजानींही चार पांच कोसांवर मुक्कामास जाऊन कर्णेल वसलीसाहेब याणें मंगळवारचे रात्रीं पहांटेस बुधवार उजाडतांना छापा घातला. वाघाचेंही कूच जालें होतें. बुणगें पुढें चाललें होतें. त्यास तुरुपस्वारानीं गांठून लढाई जाली. वाघाची फौज अगदीं उधळून गेली. हजार पांचशें जमीयत राहिली त्यांनिशीं वाघानें चालून घेतलें. परंतु इंग्रजांचा मार भारी. ते समयीं धोंडजी वाघास दहा गोळ्या लागून ठार झाला. वाघाचा मुर्दा इंग्रजानीं आणिला आहे. मुडदा ती॥ राजश्री वासुदेव पंत काकानीं वोळखिला. इंग्रजानींही ओळखून ठेविला होता. काकानींही पाहिला. मंगळवारीं चार पांच हजार पठाण वाघाकडील उठोन गेले होते व बुधवारीं लढाईचे वेळेस झोटिंग काकर पांच सात हजार राऊतांनिशीं पळून गेला. जोती घोरपडाही गेला. मंगळवारीं फौजेचें धरणें बसलें होतें. कूच होऊं दिलें नाहीं. त्याणें वाघास दगा जाला. आम्ही सारे मंगळवारीं निकडीनें रात्रीं गेलों तों अगोदर कर्णेल वसलीसाहेब याणें छापा घालून वाघाचा मुडदा हस्तगत करून रणाचे जाग्यावरच उभे होते. तों मोंगलांचे फौजेसुद्धां सारे जाऊन पोंचलों. लढाई समाप्त जाली होती. वाघाचें शें दीडशें माणूस पठाणसुद्धां दोनशें पर्यंत ठार जालें. याशिवाय जखमी जालें. बुणगें वाघाचें सारें इंग्रजानीं लुटून आणिलें. मग सारे इंग्रजसुद्धां माघारे भनूपासून तीन कोसांवर येऊन राहिलों. कळावें. हें वर्तमान सरकारांत पुण्यास

१ हरिपंत बाबाचें रामचंद्रपंतआपास पत्र.

व चि ॥ राजश्री बाबा फडणीस यांस जलद कळवावें. आम्ही येथून जासूद पाठविले आहेत. परंतु आपणही पत्र पावतांच दुसऱ्याचे अगोदर वर्तमान कळवावें. वरकड इंग्रजांची भेट जालियावर लिहितों. गांठ पडून बोलणें जाल्यावर सविस्तर लिहितों. वडिलीं मनोळीचे सुमारें यावयाचें करावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७६० श्री. ( भाद्र० व० १२-१५ सप्टें. )

सेवेशीं विनंती सेवक श्रीपति तीर्थो कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० २५ रबिलाखर पावेतों स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान ठाणें दोडवाड येथील घांसदाणा वगैरे उपद्रव होईल म्हणोन पेशजी वाघाकडे डंबळच्या मुक्कामापासून संधान राखून पक्केपणें वचन घेतलें होतें. त्यानंतर वाघ तेथोन निघोन गदगच्या मुक्कामास आला. दरम्यान गृहस्थ होता त्याजकडे कारकून पाठवून रखवालीस स्वांर आणिले. दुसरे दिवशीं फौजसुद्धां वाघानीं गोखले यांचे पाठलाग करून पारिपत्य करून मागती गरगच्या मुक्कामास आला. तेथें ठाणेंमजकूरचे स्थळिक व आसपासचे शूद्र लोक मिळोन गैरवाका वाघास मनस्वी समजाविलें. सांगणाऱ्यांच्या गोष्टींवरून इकडील मध्यस्तदार होते त्यांची गोष्ट खातरजमेस न आणितां लबाडी करून एकाएकीं फौज पाठवून दंगा करून ठाणें घेतलें. राजश्री देवराव देशपांडे यांस व मला कैद करून चीजवस्त व घोडीं वगैरे सुद्धां नागवून घेऊन मुलें माणसें होतीं त्यांस निरोप देऊन आम्हां उभयतांस धरून लष्करास नेऊन पाहऱ्यांत घालोन लागलेच वाघानीं आम्हां उभयतांस शिरच्छेदन करावें यास तीन परवानग्या जाहल्या. बाकी कांहीं राहिली नव्हती. इतक्यांत स्वामींचा पुण्यप्रताप उभा राहून जोतीबा घोरपडे याणीं आम्हां उभयतांविशीं फार प्रकारें वाघास अर्ज केला. जीव वांचवावे यासाठीं तोड काहडून पैका मनस्वी कबूल करविला. उपाय नाहींसें होऊन कतबा त्याणीं जसें सांगितलें त्याप्रमाणें लिहून दिला. व जामीन मागितलेवरून तेही दिले. नंतर जोती घोरपडे याणीं गांवास घेऊन येऊन पाटील कुळकर्णी व रयतेस आणवून भेंट घालोन वसुलातीस लाविला. दोन तीन दिवस वसूल करून थोडेबहुत ऐवज दिला. इतक्यांत फिरंगी हुबळीस

---

१ पत्र बाळासाहेबांस. लिहिणें कांगाव्याचें आहे. पत्र लिहिणारा व देवराव देशपांडे दोघेही वाघानें फितविले होते.

आले. तें पाहून जोतीबा घोरपडे फौजसुद्धां निघाला. त्याजबरोबर आम्ही निघोन मुरगोडास आलों. ठाणेंत वाघाचे लोक होते तेही ठाणें टाकोन निघोन आले. ठाणें रिकामें पाहून गांवकरानीं श्री॥ राजश्री चिंतामणराव आपासाहेब यांजकडे जाऊन लोक आणून ठाणें घातलें. नंतर आद्यंत जाहलेलें वर्तमान तपशीलवार पेशजी मुरगोडच्या मुक्कामावरून सेवेशीं विनंतीपत्रें लिहून घेतलीं होतीं त्यावरून विदित जालें असेल. त्या उपरांतिक लष्कराबरोबर आम्हांस मारिहाळपर्यंत नेलें. तेथून जोतीबा व राजश्री देवराव यांचे निरोप घेऊन श्री स्वामींचे दर्शनास्तव देवळापुरास आलों. इतक्यांत फिरंगी पाठलाग करून नंदीस आले हें ऐकून ( ज्योती घोरपडे ) टाकोटाक बारीपार होऊन मजल दरमजल पुढें गेले. समागमें राजश्री देवरावही गेले ते आजपर्यंत फिरोन माघारे आलेले वर्तमान नाहीं. इकडे मी जाहलेलें सविस्तर वर्तमान श्रीचे चरणास श्रुत केलें. माझें तापत्रय पाहोन श्रीस्वामींनीं बहुत प्रकारें कृपा करून आज्ञा केली जे चहूंकडे गडबड आहे अनिवार व समीपेस आहेत यास्तव कोठें न जातां येथें स्वस्थ राहणें. निरोप देऊं तेव्हां जावयास येईल. तंवपर्यंत राहणें म्हणोन स्वामींनीं आपले चरणाजवळ ठेवून घेतले आहेत. यास्तव तिकडे सेवेशीं येणें जाहलें नाहीं. अद्याप निरोप नाहीं. वरचेवर मर्जी रक्षीत आहें. निरोप घेऊन सेवेशीं येऊन विनंती करीन तें ध्यानांत आणोन तापत्रयविमोचन करून प्रतिपाल करणार धणी स्वामी समर्थ असां. राजकी वर्तमान धोंडजी वाघ यादवाड व बागलकोट व बदामी-वरून मलप्रभा नदीपार होऊन पलीकडे जाऊन तेथून तुंगभद्रापार जाहला. बरोबर अद्याप दहा पंधरा हजार फौज आहे. पट्टणाकडे फराशीस आले आहेत म्हणोन वदंता. हे ते मिळोन इंगरजांचें पारिपत्य करून मुलूख काबीज करणार. इकडे फिरंगी व गोखले व राजश्री बाळकृष्णपंतभाऊ तिकडून आले ते मुगुटखान हुबळीजवळ नदी उतरोन तसेच देवलापुरावरोन गोखले व भाऊ व बिष्टापा बदामी हे त्रिवर्ग श्री स्वामींचें दर्शन घेऊन पुढें फिरंगीसुद्धां मुरगोड रामदुर्गवरून पुढें मलप्रभा नदीपार होऊन पैलीकडे ते तुंगभद्राचे सुमारें गेले. तुंगभद्रापार होणार. श्री॥ राजश्री आपासाहेब व बाबासाहेब कांहीं थोडेबहुत फिरंगी ऐसे मलप्रभा दक्षिणतीरीं संवदत्ती व हुली शिरसंगीवरून हेही जाऊन त्यांस मिळाले. फिरंगी तुंगभद्रापार होणार. श्रीमंत त्यांजबरोबर नदी उतरोन पैलीकडे जाणार किंवा ऐलीकडे रहाणार हें न कळे. कळावें. स्वामींस विदित होय. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. ५७६१. श्रीवेंकटेश. ( भाद्र. व. १४–१७ सपटें. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाळासाहेब स्वामींचें सेवेशीं.

पोष्य वेंकटराव भास्कर कृतानेक सा॥ नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० २७ रबिलाखर पावेतों आपले कृपेकरून यथास्थित असे. विशेष. आपणाकडील बहुत दिवस अलीकडे वर्तमान न कळतां चित्त असमाधान आहे. तर सदैव पत्रीं पुण्याकडील वगैरे सविस्तर लिहिणेंची आज्ञा असावी. यानंतर इकडील वर्तमान इंग्रजांचा जमाव वाघाचे पारिपत्याबद्दल भारी जमून आला. राजश्री चिंतामणरावआपा व बाबासाहेब व बापूजीपंत गोखले हे फौजसुद्धां (व) इंग्रज एकत्र होऊन वाघाचे पाठलाग केल्याचें सविस्तर वरचेवर राजश्री बाळकृष्णपंत भाऊ लागू यांजकडून पत्रें येऊन समजण्यांत आलेंच असेल. रायचूरच्या सरहद्दींत भनू तालुकेंत नंदीहाळनजीक वाघासीं गांठ घालोन छ० २० रबिलाखरीं गांठ पडतेक्षणीं मातबर लढाई होऊन वाघ गोळी लागोन ठार जाला. सहाशेंपर्यंत त्याजबरोबर खत्तल जाले. वरकड फौज वाट फुटेल तिकडे दणाण होऊन गेली म्हणोन आतांच लष्करांतून पत्रें आलीं. विस्तारें परभारें लष्करांतून आपल्यास पत्रें येतील. येथें आढळांत आला तो मजकूर समजावा याकरितां लिहिला आहे. राजश्री चिंतामणराव आपा व बाबासाहेब यांची स्वारी कित्तूर तालुकेंतून शत्रूचा पाटलाग करून जाते समयीं नरगुंद[1] तालुकेंत दोन तीन मुक्काम करून घासदाणेचें बोलणें बोलावें म्हणोन आपांची मर्जी बहुतच करडी जाहली. सबब नदीकिनारेचे गांव समग्र बेचिराख जाले. प्रजेच्या भोगास उपाय काय? जालें वर्तमान श्रुत असावें म्हणोन विस्तारें लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंती.

नं. ५७६२ श्री. ( आश्विन शु० १–१९ सपटें. )

पुरवणी राजश्री गंगाधररावजी स्वामीचे सेवेशीं

पोष्य नारो विनायक. सा॥ नमस्कार विनंती. धोंडजी वाघ कनकगिरीकडे होता तेथें फौजा व इंग्रजानीं जाऊन लढाई दिली. वाघ पांचशें स्वारानीं पळोन गेला. फौज वगैरे सर्व लुटलें गेलें व बहुतेक मेले. याप्रमाणें लष्कराहून राजश्री चिंतामणराव आपांचे गोटांतून शिलेदार आले त्याणीं

१ भावे नरगुंदकर.

सांगितलें. याप्रमाणें बागलकोटाहून पत्र आलें आहे. आपणास कळावें. तेथेंही वर्तमान आलें असेल तें कळविलें पाहिजे. बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे विनंती.

नं. ५७६३ श्री. ( आश्विन शु० ३–२१ सप्तं. )

पै॥ छ० ६ जमादिलावल. इहिदे मय्यातैन.

विज्ञापना ऐसीजे, श्रीमंत रा॥ रामचंद्रपंत आपांची स्वारी मिरजेस आली आहे. त्यास घरकलहाचा प्रकार फार दिवस लांबणीवर पडिला. पुढेंही लांबविला असतां अमुक एक येऊन फडशा होतो ऐसाही अर्थ नाहीं. त्यास प्रसंगीं विशेषेंकरून पांच रुपये कमतीही येत असल्यास कबूल करून फडशा करून घ्यावा यांत चांगलें आहे. ऐसे येथें एक दोघानीं सांगितलें. कोणी सांगितलें वडील म्हणतील तरी श्रीमंत रा॥ मोरोबा दादा याणींच सांगितलें. त्याचें कारण तूर्त मलई जाली आहे ती फोडावी. पुढें जसा रागरंग दिसोन येईल तसें करावयास येईल. तूर्त इकडे बल अथवा अबल कांहींच मोजावयाचें नाहीं. किल्ला स्वाधीन आहे. दौलत चालली पाहिजे. याजकरितां रागरंग पाहून उलगडून घ्यावें या प्रमाणें सांगितलें. त्यावरून मी श्रीमंत रा॥ रघुनाथ राव दादा यांस पुरवणी लिहिली आहे त्यांत हाच अर्थ लिहिला आहे. वडिलीं विचार करावा. लांबवूं नये. लांबविलें असतां त्यांचें कूट जाहलें आहे. तूर्त टाळा देऊन फडशांत यावें. इकडील स्वामींचे जागां सर्वांची ममता पूर्ण आहे खरी, परंतु हातीं तूत प्रसंगीं कांहीं येक नाहीं. याजकरितां ( रघुनाथराव ) दादानीं उपक्रम करून जें बोलणें तें रुबरू रा॥ रामचंद्रपंत आपांजवळच बोलावें आणि एखादी गोष्ट ठरावांत यावी. पांच चार हजारांकडे तूर्त प्रसंगीं स्वामीनीं पाहों नये. स्वामीचें दैव विचित्र आहे. भाग तुटे ऐसा भाव असेल तोच करावा. लांबवून फल नाहीं. स्वामी सर्वज्ञ आहेत. सेवकानें विनंती लिहावी ऐसा अर्थ नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. उभयतां कृष्ण नामक व आणखी कारभारी तिसरे एक होऊन लांबणीवर टाकिलें आहे. त्यास या प्रसंगीं भाग तुटक व्हावा. मलई तुटल्यानंतर इकडील अथवा तिकडील बलाबल पाहून सोईनें सर्व बंदोबस्त होईल. दादा साहेब याणींच काय तें बोलावें. श्रीमंत रा॥ रामचंद्रपंत आपांजवळ चार

१ मोरो आपाजीचें पत्र पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस. २ बाबा व केसोपंत काळे. ३ चिंतामणराव आपांचे कारभारी जिवाजी रामचंद्र.

गोष्टी एक वेळ एकांतीं गोड बोलाव्या. इतकेंही असोन तुटक जाहलें नाहीं, तरी स्वस्थ असोन निर्वाह कसा होतो? कांहींतरी उद्योग केलाच पाहिजे त्याची पैरवी स्वामीनीं केलीच पाहिजे. कोणताही विचार करणें तो याउपर लौकर व्हावा. पत्राचें उत्तर यावें. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७६४ श्री. (आश्विन शु० ४-२२ सप्तं.)

पै॥ छ० ६ जमादिलावल. आश्विन. सन इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. येथील दरबारचा केवळ बारीक विचार पाहतां दौलतीमध्यें पांच पिढ्यांचे सेवक आहेत त्यांचे ठायीं अगत्य असावें; याखेरीज अलीकडेही श्रीमंतांचे दौलतीमध्यें दहा वीस वर्षांमध्यें नांवलौकिकास सेवा करून आले असे गृहस्त पदरीं आहेत, पुढेंही सरकारकामास अंतर करावयाचे नाहीं, त्यांचें संरक्षण करावें; हा विचार तिळप्राय (श्रीमंतांच्या) ध्यानांत नाहीं. जेणेंकरून नाहींसारिखे होतील तो अर्थ करावा! पागा दहा पंधरा मोडिल्या. पुढेंही बाकी राहिल्या ठेवीत नाहीं. दोन महिन्यांमागें आठ पंधरा दिवस चार घटका दोन घटका चांफेखणांत कारभार व्हावा ऐसें आठ पंधरा दिवस चालिलें. अलीकडे तोही विचार राहिला. निकटवासी तूर्त शागीर्द, खिजमतगार, व कोपरगांव येथें मंडळी होती तितकेच मात्र आहेत. शागीर्द जवळ कारभारी. ज्यास कोणाची वोळख नाहीं, अक्षरशत्रु, केवळ शुद्ध शागीर्द, त्यांस मोठीं मोठीं कामें सांगावीं, त्यांस उजेडास आणावें, हें ध्यानांत रात्रंदिवस वसतें. स्वारी मौजे कोथरूड येथें येक दोन दिवसानीं जात असत्ये. दोन प्रहर अडीच प्रहर रात्रीस स्वारी माघारी येत्ये. श्रीमंत सौ॥ बाईसाहेब नेहमीं स्वारीसमागमें असतात. या प्रकारचा विचार. बोलण्याचा भरंवसा तिळप्राय नाहीं. दहा पांच गृहस्थ मातबर, चार घटका एक जागां बसोन कामकाज बोलणें चालणें होऊन विचार व्हावा, तो अर्थ होत नाहीं. पहिलें कांहीं नसावें ही उमेद आहे. गोड बोलोन विश्वासघात करावा ही विद्या पूर्ण आहे. असो. परंतु कारभारही करितां येतो ऐसा प्रकार आहे म्हणावें तर तोही नाहीं. नाहीं येत असा म्हणावा तरी घोंटाळा चालिलाच आहे! बरें अथवा वाईट जें खावंद सांगेल तें सेवकानें ऐकलेंच पाहिजे. मनांत कांहीं येक ठेवून उपायच नाहीं. कामकाजें तूर्त होणें अथवा आज्ञा चालणें ते या रीतीची चालिली आहे. कोणास भरंवसा बोलण्याचा नाहीं. एक अवसरें सर्वांचा भोग उत्पन्न जाहला आहे! लाचार; उपाय नाहीं. सरकारचे पदरचे सेवक अथवा अन्यत्र बहुता दिवसांचे,

कुटुंबवत्सल, त्यांच्या दिनचर्या चालणें कठीण. प्राणांशीं गांठी आहेत ! पुण्यामध्यें कोणी येक आबालवृद्ध चांगलें म्हणत नाहीं. पुढें याचा विचार कसा श्रीनें योजिला आहे कळत नाहीं. परिणाम चांगला नाहीं. स्पष्ट लोक बोलतात. पत्र विसर्जन जाहलें पाहिजे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५७६५ श्री. ( आश्विन शु० ४-२२ सप्तं. )

पै॥ छ० ६ जमादिलावल. इहिदे मय्यातैन.

सेवेसीं मोरो आपाजी साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथें किरकोळ लोकांचें देणें आहे त्याची निकड फार आहे. याजकरितां पेशजी विनंती लिहिली आहे. त्यास थोडी थोडी हुंडी करून ऐवज ज्याचा त्यास देईन. पत्राचा जाब यावा. रा॥ आपाजी राम सहस्रबुद्धे यांजकडे सरकारांतून गाडदी यांचें काम काज सांगितलें. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५७६६ श्री. ( आश्विन शु० ४-२२ सप्तं. )

पै॥ छ० ६ जमादिलावल. इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. ता॥ छ० २ जमादिलावल इंदुवार. क्षेम असे. विशेष. श्रीमंत रा॥ मोरोबादादा मागें कैलासवासी माधवराव साहेब यांचे स्वारी-समागमें कर्नाटकांत होते. तेव्हां तालुके नरगुंद येथें मुक्काम होता. तेथें गाई चांगल्या मिळाल्या. दोन तीन गाई खरेदी केल्या. इकडेही आणिल्या. त्यास गाई दादांचे मर्जीस आल्या. त्यास येथेंही शोध करितां नरगुंद तालुक्यांत गाई चांगल्या होतात याप्रमाणें त्यांनीं शोध करून मला रुबरू सांगितलें कीं, " रा॥ गंगाधररावजी यांस पत्र लिहून तीन गाई चांगल्या एकवर्णाच्या उत्तम खरेदी करून आणवाव्या. पन्नास पंचावन साठ रुपये पावेतों गाईस किंमत पडिल्यास पडावी. परंतु गाईस दूध चार शेर पांच शेर असावें. तिकडे गाई खरेदी करावयास शहाणा माणूस पाठवून अगत्य जरूर आणवाव्या म्हणोन लिहोन पाठविणें. " त्यावरून विनंती लिहिली आहे. गाईचा विचार थोडका आहे. कोणीतरी शहाणा माणूस गाईखरेदीबद्दल पाठविला पाहिजे. रा॥ वेंकटराव नरगुंदकर यांसही स्वामींचें पत्र व ऐवज गेला असतां तेही तालुक्यांत चौकशी करून गाई खरेदी करून पाठवितील. विण्याचे भोपळे कंकणवाडीस होतात. सालमजकुरीं तो दंग्यामुळें मिळतील न मिळतील. शोधास माणसें पाठविलीं आहेत म्हणोन पत्रीं आज्ञा होती त्याजवरून विण्याचे

भोपळे यांचें उत्तर काय आलें म्हणोन ( मोरोबादादानीं ) पुसिलें. त्यावरून सांगितलें कीं सालगुदस्त तो दंग्यामुळें भोपळे जाहले नाहीं. माणसें शोधास गेलीं आहेत. मिळाल्यास आणितील. नाहीं तरी 'यंदां प्रेत्नांत असावें. जरूर भोपळे पाहिजेत' म्हणोन सांगितलें आहे. उत्तर येईल त्याप्रमाणें विनंती करीन. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

सेवेसीं घोंडो बापूजी जोशी शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. इकडील मजकूर दादानीं लिहिला आहे. आजच प्रजन्य गर्जना करून वळीव मात-र लागला. शिंदे यांस काल मेजवानी कोथरूडचे बागेंत जाली. कळावें बहुत काय लिहिणें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना,

नं. ५७६७ श्री. ( आश्विन शु० ४–२२ सप्तं. )

पौ॥ छ० ६ जमादिलावल. इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. छ० ३० राबिलाखरीं मौजे कोथरूड येथील बागांत श्रीमंतांची स्वारी गेली. रास्ते यांस (व) बाबा फडके बिनीवाले व रा॥ मोरोबादादा फडणीस सर्वांस स्वारीसमागमें बोलावणें जाहलें. शिंदे यांसही बोलाविलें होतें. सर्वांसीं स्नेहाच्या गोष्टी जाहल्या. शिंदे यांस भोजनाची मेजवानी केली. बहुत मुदारत केली. अठरा घटका रात्रीस स्वारी सरकारवाड्यांत आली. काल भोजनोत्तर श्रीमंतांची स्वारी रा॥ दौलतराव बाबा शिंदे यांचे गोटास गेली. स्वारी दहा स्वारांनिशीं निघोन गेली. मागाहून हुजरातीचे लोक वगैरे झाडून मागून नेले. सूर्यास्तपावेतों स्वारी शिंदे यांचे गोटास होती. रागरंग खलबत जाहलें. याप्रमाणें स्नेह विचार पांच सहा दिवस फार चालविला आहे. इतर गृहस्थांस कोथरूडास स्वारीबरोबर नेलें यांजपाशींही खलबतें झालीं. फौज ठेवावी. बंदोबस्त हरएकविशीं झाला पाहिजे. याप्रमाणें चाललें आहे. पुढें होईल विचार ते विनंती लिहितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७६८ श्री. ( आश्विन शु० ४–२२ सप्तं. )

पौ॥ छ० ६ जमादिलावल. इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. इकडील राजकी वर्तमान तरी शिंदे यांस पैका द्यावयास केला त्याचा नेट शिंद्यांचा फार आहे. सरकार दौलतीमध्यें पैका आहे नाहीं हा विचार कळतच आहे. येक दोघांचीं घरें बुडवून पैका भर करावी तरी

असा गृहस्थही कोणी राहिला नाहीं. श्रीमंतांस तों पैक्याची निकड शिंदे यांस द्यावयाची आहे. दौलतीमध्यें कारभारी तो पेशजी नांवें लिहिलीं आहेत. पुढें कळवंडी पडाव्या ऐसा रंग दिसतो. आज उद्यां पैका देतों म्हणोन कुंजर वगैरे बोलतात. त्यांस तो पैका पावत नाहीं. पांच चार वाइदे केले तेही टळले. श्रीमंतांस मोठा विचार पडला आहे. भाद्रपद वद्य त्रयोदशीस मौजे कोथरूड येथील बागांत श्रीमंत स्वारीस गेले. रास्ते, बाबा फडके व रा॥ मोरोबा दादा व बिनीवाल्यांस बोलावून नेऊन त्यांजपाशीं श्रीमंतांनीं पुसिलें कीं, राज्यामध्यें बखेडा जाहला. जलचर प्रबळ जाहले. बंदोबस्त एकही होत नाहीं. त्यास तुम्ही बहुता दिवसांचे सरकारचे पदरचे. येकत्यारी. याचा बंदोबस्त कसा करावा याचा विचार करून सांगावा. त्याप्रमाणें करावयाचें. त्यावरून सर्वांनीं कोणी उत्तर केलें नाहीं. श्रीमंत रा॥ मोरोबा दादा याणीं उत्तर केलें कीं, याचा बंदोबस्त करणें तो रा॥ दौलतराव बाबा याणीं करावा. ते आज सरकारचे सेवेसीं तत्पर आहेत. ते यांतील अर्थ पाहून विनंती करितील. श्रीमंतानीं आज्ञा करणें ते करावी. या प्रमाणें उत्तर जालें. शिंदे यांचे कारभारी रा॥ आबा चिटणीस व रा॥ यादवराव भास्करही होते. त्याणीं उत्तर केलें कीं श्रीमंतांचे पदरीं चार सरदार आहेत तसेच आम्ही. याचें उत्तर आम्ही तरी काय सांगावयाचें आहे ? या प्रमाणें बोलणें जाहलें. स्वारी माघारी आली. पैक्याचें कांहीं बोलणें जाहलें नाहीं. परंतु कांहीं पैका रास्ते, फडके, बिनीवाले वगैरे यांजपाशीं मागावा हा मजकूर दिसतो. स्पष्ट बाहेर पडोन बोलण्यांत आला नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७६९ श्री. ( आश्विन शु० ४—२२ सप्तं. )

पै० छं० ६ जमादिलावल. इहिदे मयातैन व अलुफ.

सेवेसीं मोरो आपाजी परांजपे साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २ माहे जमादिलावल इंदुवार सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. " रा॥ सिद्धेश्वरराव दादा बिनीवाले यांस पत्र लिहिलें आहे. प्रविष्ट करून रा॥ देवराव कृष्ण देशपांडे यांचीं मुलें माणसें व रामाजी भरमाजी व बाळाजी बाबूराव कुटुंबसुद्धां बेळगांवीं आहेत त्यांचें संरक्षण आज तागायत केल्याप्रमाणें पुढेंही त्यांस दगा लागों नये येविशीं त्यांजकडील कमाविसदार

---

१ हें व पुढचीं पांच पत्रें वकील मोरो आपाजी परांजपे यानीं मिरजेस बाळासाहेबांस लिहिलीं.

यांस ताकीदपत्र व पत्राचा जाब घेऊन पाठवणें. " म्हणोन आज्ञा, त्यावरून रा॥ रावजी यांजकडे पत्र प्रविष्ट केलें. सविस्तर आज्ञेप्रमाणें त्यांस श्रुत केलें. त्याणीं उत्तर केलें कीं, " जें आपणास अगत्य तेंच आम्हास. दुसरा अर्थ तिळप्राय नाहीं. याप्रमाणें वडिलांदारभ्य स्नेह चालत आला आहे. दुसरा अर्थ नाहीं. आम्हांस रा॥ बाळासाहेब परकी हा विचार ध्यानांतही नाहीं. आम्हीं आज तागायत देवराव वगैरे यांचें संरक्षण केलें आहे. पुढेंही सहसा हवालीं करावयाचे नाहीं. परंतु घरफुटीमुळें[1] लोकानीं यत्न मांडिले आहेत. पेशजी येक वेळ येविशीं तगादा जाहला होता तेव्हां रा॥ बाळकृष्णपंत लागू याणींच कर्नेल वसली साहेब यांस सांगोन निवारण केलें. हल्लीं फिरोन रा॥ बाळकृष्णपंतच उद्योगास कारण जाहले आहेत. याचें कारण कांहीं लोभ उत्पन्न जाहला आहे ऐसा संभव आहे. रा॥ धोंडो अनंत याणीं मोहास गुंतविलें ऐसें दिसतें. त्यास बाळकृष्णपंत लागू यांचे आपले स्नेह विचार आहेत. त्यांस पत्र जावें. इकडून आम्ही लागूंसही पत्र लिहितों. सहसा हातीं देत नाहीं. कमाविसदारयासही लेहून पाठवितों. येथें इंग्रजाकडील बोलणें बडेखान व गोपाळराव मुनशी बोलतात. त्यांचीं पत्रें कर्नेल वसली साहेब यांसही द्यावयाचा उद्योग केला आहे. साधेल तें करीतच आहों. सारांश रा॥ धोंडो अनंत याणीं प्रयत्न मांडिला आहे. होईल तिकडून निवारण करावें. " याप्रमाणें निखालस बोलिले. स्वामींसही त्यांनीं पत्र लिहिलें आहे. पावोन श्रुत होईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. चिंतोपंत यांचें पत्र बेळगांवाहून आलें. नक्कल लागूंचे पत्राची आली ते रा॥ रावेजीनीं पहावयास पाठविली आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७७० श्री. ( आश्विन शु० ४–२२ सप्तंबर.)

पै॥ छ० ६ जमादिलावल. इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. रा॥ सिद्धेश्वरराव दादा यांजकडील रा॥ रामराव यांस रा॥ बाबा काळे भेटले होते. ते समयीं काळे याणीं ( सांगितलें कीं ) " देवराव याचीं मुलें माणसें हरामखोरांचीं तुम्ही ठेवून उगाच खटला वाढवावा, यांत जीव कांहीं नाहीं. मुलें माणसें त्यांचे स्वाधीन करावीं हें उत्तम. " त्यास रामराव याणीं उत्तर केलें कीं, " देवराव यांजकडे हरामखोरी काय आहे ?

---

१ मिरजकर व सांगलीकर यांच्या भाऊबंदकीमुळें. २ बिनवाल्यानीं.

बाघाचा मिलाफी म्हणावा तरी बाघाचे कैदेंत अद्यापवत् पावेतों कां राहता ? आम्ही त्याचीं मुलें माणसें ठेविलीं ते हवालीं करावीं म्हणतां, त्यास आमचा देवराव जमीदार आहे. आणि त्याजकडे लढा फंद फितुराचा किमपि नसतां पाठीस पडला त्यास हातीं द्यावें हा धर्मही नाहीं. बाबा ! अशी गोष्ट तुम्ही म्हणतां हें काय ? वरकड रा॥ बाळासाहेब यांचा व चिंतामणराव आपा यांचा घरकलह आहे, त्यास आम्हांस उभयतांही सारखे. वडिलांपासून स्नेह चालत आल्याप्रमाणें चालेल. दुसरा विचार नाहीं. " याप्रमाणें निखालस उत्तर केल्यानंतर उगे राहिले. हल्लीं राजश्री रामराव यांणीं सांगितलें कीं, रा॥ नागोपंत पोंक्षे यांचा व रा॥ बालकृष्णपंत लागू यांचा घरोबा चांगला आहे. त्यास राजश्रींचें पत्र लागूंस जावें कीं, " देवराव यांचे कुटुंबाविशींचा बंदोबस्त करणें तो आपणच मागें केल्यावरून कांहीं एक त्वष्ट लागलें नाहीं. हल्लीं त्याजविशींची खटपट करणें ती इंग्रजांकडे आपणच करावी. चार रुपये कबूलही करणें जाहल्यास देशपांडे यांचे सामर्थ्यानुरूप कबूल करावे. त्याचीही तजवीज करितील. परंतु मागें अभिमान धरून जो कारभार केला तो सोडिला असतां लौकिक चांगला दिसणार नाहीं हें पुर्तेपणें चित्तांत आणून बंदोबस्त करून द्यावा; " म्हणून पत्र गेलें असतां बंदोबस्त होईल म्हणोन रा॥ रामराव यांणीं सांगितल्यावरून सूचना लिहिली आहे. मर्जीस येईल त्याप्रमाणें होईल. रा॥ सिद्धेश्वररावजी यांचा आपले जागां प्रेम आहे. त्यांत दुसरा विचार नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. बेळगांव येथील कमावीसदार यांजकडून पत्रें आलीं. त्यांसही पुन्हा सहसा कुटुंब देऊं नये म्हणून रा॥ सिद्धेश्वर रावजी यानीं लिहिलें आहे. हे विज्ञापना.

नं. ५७७१ श्री. (आश्विन शु० ३–२१ सप्तंबर.)

पै॥ छ० ६ जमादिलावल. इहिदे मय्यातैन.

राजश्रिया विराजित राजमान्य रा॥ गंगाधर रावजी स्वामीचे सेवेसीं.

पो॥ सिद्धेश्वर महिपतराव. साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता॥ छ० १ जमादिलावलपर्यंत यथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. संतोष जाहला. " रा॥ देवजी कृष्ण यांचीं मुलेंमाणसें व रामाजी भरमाजी व बाळाजी बाबूराव कुटुंबसुद्धां बेळगांवीं आहेत. त्यांचें रक्षण आजपावेतों जाहलें त्याप्रमाणें पुढेंही कोणेविशीं उपद्रव न लागे असा बंदोबस्त करावा; "

म्हणून लिहिलें, त्यास आपणास ज्यांचें अगत्य, त्यांचें आम्हांसही अगत्य. दुसरी गोष्ट नाहीं. परंतु घरचा खटला पडला. पदरचेच यत्न करणार! थोडक्या गोष्टीसाठीं मोठा उपद्रव करावयास अनमान जाहला नाहीं. व पुढेंही त्याच योजनेंत आहेत. प्रस्तुत राजश्री बाळकृष्णपंत लागू कर्नेल वसलीसाहेब बहादुर यांजपाशीं आहेत. त्यांजला उपदेश होऊन किल्ल्यांतून कारकून त्यांजकडे गेला होता त्याबरोबर रा॥ चिंतो केशव यांस पत्र आलें त्याची नक्कल पाठविली आहे त्याजवरून कळों येईल. येविशीं विस्तारें मजकूर रा॥ मोरोपंत लिहितील. सारांश परभारें आपणांकडून लागूंस पत्र जाऊन त्यांचें समाधान जाहलें असतां पुन्हा वारंवार उपद्रव लागणार नाहींत. याचा उद्योग आगाव जाहला पाहिजे. दूर आहेत तों बंदोबस्त व्हावा. आमच्या हातून उद्योग होणें तो करीतच आहों. पाच्छापुरच्या माणसाबरोबर आम्ही लागूंस पत्र लिहिलेंच आहे. परंतु रामाजी भरमाजी व बाबूराव यांचे चिरंजीवाविशीं बोलण्यास बळ कमी पडतें. याजकरितां आपणाकडून यत्न व्हावा. सदैव पत्र पाठवून संतोषवीत असिलें पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभ केला पाहिजे हे विनंती.

नं. ५७७२ श्री. (आश्विन शु० ३—२१ सप्टं.)

नकल.

राजश्रिया विराजित राजमान्य रा॥ चिंतोपंत सुभेदार स्वामीचे सेवेसीं. पो॥ बालकृष्ण लक्ष्मण. साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. किल्ले बेळगांव येथें रा॥ देवजी कृष्ण व रामाजी भरमाजी व बाळाजी बाबूराव वगैरे धोंडजी निमकहराम याजकडे मिळाले, तालुक्याची खराबी केली, त्यांचीं मुलें माणसें व चीजवस्त व खुद्द वगैरे यांस लष्करास आणवावें येविशीं कर्नेल वसली साहेब बहादुर याणीं हुकूम केला. त्या वरून तुम्हांस त्यांचा बंदोबस्त पक्का करावा म्हणोन लिहिलें. तों कर्नेल इष्टेसन साहेब यांची स्वारी त्या प्रांतीं गेली. त्याणीं तुम्हांकडे निकड केल्यावरून आमचें पत्र कारकुनाजवळ तुम्हीं देऊन त्यांजकडे पाठविल्यावरून तुम्हांस उपद्रव कमी जाला. नंतर इष्टेसणसाहेब याणीं कारकून तुम्हांकडून आला त्याजबरोबर आमचें पत्र देऊन कर्नेल वसली साहेब

---

१ लागू याचें हें बेळगांवच्या किल्लेदारास पत्र.

बहादूर यांजकडे पाठविला. त्याणीं कारकुनास आम्हांकडे लाऊन देऊन कुळें आमचे अंगीं लाविलीं. हल्लीं त्या कुळांविशीं आम्हांस तगादा जाला आहे. व पाच्छापुर गोखल्याकडे देणें म्हणोन म्हणतात. याजकरितां तुम्हीं गुदस्तां सरकारचीं पत्रें व आपले यजमानांचीं[१] आणविलीं आहां तीं रा॥ वासुदेवपंत यांजबरोबर लवकर पाठवून द्यावीं. म्हणजे दोनी मजकूर समजून देऊन होईल त्या प्रकारें बंदोबस्तांत आणावयास येईल. रवानगीस दिवसगत लागों नये. वासुदेवपंत याणीं घोडी आपलेजवळ द्यावयाची आहे. किमत पांचशें पावेतों अजमासें ठरली आहे म्हणोन सांगत होते. त्यास घोडी आम्हांस पाहिजे. तरी ती घोडी रा॥ वासुदेवपंत यांजबरोबर पाठवून द्यावी. किंमत पाठऊन देऊं. आम्ही आपलें आजपर्यंत वोढऊं. आतां ( इंग्रज ) निकड करितात. मुलें माणसें आलीं तरी शहापूरकर यांचे जिमेस करीत नाहीं. व यांजकडून उपद्रव होऊं देत नाहीं. आमचेकडे आलीं हें सांगून कांहीं तोड करितों. पाच्छापूरचें काम जालें पाहिजे. तर वासुदेवपंत यास लवकर पाठवावें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती

नं. ५७७३ श्री. ( २१ सपटें. )

सेवेशीं धोंडो केशव नेने. दोन्ही कर जोडून शिर सा॥ नमस्कार विनंती विज्ञापना. तागायत आश्विन शु॥ तृतीयापावेतों मुक्काम हुबळी येथें स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींचा निरोप घेऊन वर्षप्रतिपदेस निघोन तडसास आलों. ( आपण मला ) तडसची मामलत सांगितली. ( मीं ) हजार होन रसद दिली. येथे आलों तों धोंडजी वाघ याचा दंगा जाहला. जमीदार त्यास मिळोन फितूर केला. आम्हांस धरून द्यावें. ( असा ) ठाणेंतील प्यादेदेखील फितूर केला ! प्याद्यानीं अडविलें. दीड महिन्याची तलब राहिली त्याचा फडशा ( त्यानीं ) करून घेतला तों वाघाची स्वारी आली. तेव्हां बाहीर निघालों. जातीनिशीं निघोन प्रहर रात्रीस मौजे सोमनकोप येथें आलों. चीजवस्त गेली. दीडशें होन कर्ज करून शिबंदी वारली. जिवानिशीं स्वामींचे कृपेंकरून बचाव जाला. त्याच दिवशीं सोमनकोपचे तिमापा देसाई याणीं कारकून श्री॥ राजश्री चिंतामणराव आपाकडे पाठविला होता. सबब बेमीगड्डे येथील महादाजीपंत याचें

---

[१] सिद्धेश्वरराव बिनीवाले यांचीं.

व देसाई याचें वांकडें आलें. याजमुळें ( देसाई यानें ) आपासाहेबांकडे संधान केलें. ठाणें घालून देतों म्हणोन करार केला. तेव्हां त्याणीं सांगितलें कीं ठाणें घालून धोंडोपंत तडसास आहेत त्यांचे स्वाधीन करणें. त्याप्रमाणें आम्हांस ताकीद घेऊन आले. त्याप्रमाणें दुसरे दिवशीं त्याणीं प्यादे पाठवून ठाणें घालून आमचे हवालीं केलें. आम्ही एक कारकून ठेविला. महादाजीपंत याचा कारकून होता व चीजबस्त होती ती सोडून दिली. त्याणीं काय गैरवाका सेवेशीं लिहिला असेल न कळे. मजकडून एवढें कृत्य जालें. मीच जाऊन ठाणें घातलें नाहीं. त्याजवर बारा दिवस ठाणें मजकडे होतें. उपरांत धोंडजी वाघ हुबळीस आला तेव्हां जमीदार जाऊन भेटोन ठाणें त्याचें आणिलें. तेव्हां कोठें जावयास ठिकाण नाहीं. तेव्हां तेथून सडा निघालों ते तिसरे दिवशीं झाडींतून हल्याळ सांबराणीचे मुलखांतून धारवाडास आलों. तेथें पेठेंत बिऱ्हाड करून राहिलों. चार दिवस जाले तों वाघाची व धोंडोपंत गोखले यांची लढाई किंत्तुरावर जाहली. आपासाहेब बरोबर होते. धोंडोपंत ठार जाहले. आपासाहेबांस दोन जखमा लागोन खैर होऊन हल्याळास इंग्रजांचें ठाणें होतें तेथें झाडून बुनगेंसुद्धां गेले. जखमा शेजेस आलियावर कूच करून धारवाडास आले. आमचें बिऱ्हाड खिजमतगार याणीं पाहिलें होतें तेथें आले. आमच्याच बिऱ्हाडांत राहिले. अकस्मात् आले, मग चुकावून कोठें जावें ? भेट घेतली. चार दिवस राहिले. उपरांत इंग्रज सावनुरास आला. त्याचीं पत्रें जलद आलीं तेव्हां तेथून निघोन हुबळीस आले. बरोबर आम्हास घेतलें. हुबळी ठाणें वाघाचें होतें. येथें आले तों ठाणें झुजावयास लागलें. गोळीमार हल्ला करावयास फौज थोडकी. आम्हांकडे संधान आंत देवजी गोविंद होता व शेटचे दैव याणीं बोलणें लाविलें. परंतु विश्वास नाहीं. तीन दिवस जुने हुबळींत मुक्काम केला. ठाणें हस्तगत न होय, इंग्रजांची दाटी जाहली, तेव्हां येथून कूंच करून दरमजल शिरहट्टीस गेले. तेथें इंग्रजांची भेट जाली. दुसरे दिवशीं डंबळ घेऊन देसाई यास ठार मारिलें. धास्ती पडली. गदगसुद्धां ठाणीं पळोन गेले. वाघ फिरोन किंत्तुरावर आला. इंग्रज मनोळीवर जाऊन तेथोन वाघाचे पाठीस लागला. वाघ किंत्तुराहून निघोन शहापूरप्रांतीं गेला. इकडील ठाणीं तमाम पडलीं. परंतु हुबळीचें ठाणें पडलें नाहीं. इंग्रजांचीं पलटणें चार नेमलीं तेव्हां चिठी ( मी ) लिहोन पाठविली, 'जिवानिशीं जातां. पेठ मारली जात्ये.' तेव्हां फिरोन आम्हांकडे संधान लावून आमचा कारकून गोपन-

कोपास होता तेथून रातोरात कारकून नेऊन ( जुने हुबळीकरानीं ) ठाणें स्वाधीन केलें. दुसरे दिवशीं दोडवाडचे मुक्कामीं पत्र कारकुनाचें आलें कीं, ठाणें हुबळीचें आपले स्वाधीन जाहलें. वाघाचे लोक निघोन गेले. दुसरे दिवशीं आम्हांस ( आपासाहेबानीं ) सांगितलें, " तुमचे स्वाधीन ठाणें जालें. तेव्हां तुम्हींच जाऊन बंदोबस्त करणें. " समस्त महालकरी व दैव शेटये यांचाही आड पडला कीं, " धोंडोपंत यास ठेवितां तर राहतों. नाहीं तर गांवांत रयत येत नाहीं. आमची नांदणूक होत नाहीं. " तेव्हां आम्हांस जप्तीदाखल पाठविलें. त्यास येथें येऊन दीड महिना जाला. रयत कौल देऊन आणिले तों आनंदराव लागू यांस ( आपासाहेबानीं ) मामलत सांगितली ! सनद घेऊन आले. तेव्हां तमाम पळ सुटला. दुसरेयास मामलत सांगत नाहीं. ( असें आपासाहेब बोलले आणि ) एक महिना जाहला नाहीं तों आनंदराव यांस मामलत सांगितली. तेव्हां विश्वास नाहीं म्हणोन उजाड गांव खेडीं झाडून गेलीं. हें वर्तमान कळलियावर फिरोन सनद व कौल आले कीं, धोंडोपंत यास तुम्ही मानतां, त्याचप्रमाणें त्यासच मामलत सांगितली. गांवीं त्यांचे रजे तलबेंत वर्तणूक करणें. त्यावरून पेठकरी वगैरे यांस कौल देऊन आणिलें. वस्ती जाहली. महालचा व पेठेचा वसूल सालमजकुराचा झाडून वाघाचे खंडणीस गेला. हल्लीं शिबंदीस द्यावयास पैका नाहीं. हल्लीं ( आपासाहेबानीं ) वराता केल्या आहेत. 'पांच हजार होन द्यावे. खर्चाची निकड, शिलेदार यांचा गवगवा भारी' म्हणून निकड केली आहे. येथें पैसा मिळणें नाहीं. आम्ही साफ लिहिलें, "कोणी आपणास पैका देईल त्यास मामलत सांगावी. आम्हांस होत नाहीं. पैसा मिळत नाहीं. भुतलानवाद (?) करून दोन हजार होन समस्तानीं दिल्हे. आम्हांस याउपर पैसा मिळत नाहीं. " याजवर फिरोन लागूंनी पांच हजार कबूल केले आहेत. त्यांसच मामलत होईलसें दिसतें. परंतु त्याजमुळें महालची वर्णणूक होत नाहीं. येथील ठाणें घातलें तेव्हां बेमिकट्टें व सरदेसकत येथें ठाणीं वाघाचीं होतीं तेथें प्यादे पाठवून तीं ठाणीं घातलीं. बेमिगट्टें व सरदेसकत नाडगौडकी मजकडेच आहे, परंतु क्षणभंगुर कारभार आहे. हल्लीं वाघाचें पारिपत्य जालें. वाघ ठार पडला. झाडून फौज लुटली गेली. याजवर माघारे कनकगिरीस आले. याप्रकारचें वर्तमान आहे. सेवक तूर्त येथें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ति. तडसची रसद उगवणी जाली नाहीं. बुडलों आहें. हे विज्ञप्ति.

नं. ५७७४ श्री. (आश्विन शु० ४–२२ सप्तं.)

पै॥ छ० ९ जमादिलावल सन इहिदे मय्यातैन. आश्विन.

वडिलांचे सेवेशीं अपत्यें समान जनार्दन रघुनाथ दोनी कर जोडून शिर सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २ जमादिलावल पावेतों मुक्काम हुबळी वर्तमान यथास्थित असे. विशेष. कसबे रहिमतपूरचे ठाणें शिंद्यांनीं घेऊन राजश्री बाळाजीपंत दामले[1] यांस धरून नेलें होतें. ते समयीं राजश्री मोरोपंत परांजपे याणीं जलदी करून मनाचिठी पाठविली त्याजवरून मशारनिल्हेची सुटका होऊन परतोन ठाणें स्वाधीन जाल्याचें लिहिलें, तें पाहून संतोष जाला. सर्व प्रकारें वडिलांचे पाय पार पाडणार समर्थ आहेत. परंतु आमची वस्तवानी व गुरें घोडीं भांडीं वगैरे सर्व सरंजाम रहिमतपुरीं पेशजी गेला व हल्लीं ठाणें घेतेसमयीं गेला. व कुल्यींस वस्तभाव ठेविली होती ती राजश्री बापू फणसाळकर याणीं कुलें लुटलें तेव्हां गेली. याप्रमाणें ईश्वरें चोहींकडून पाठ घेतली आहे. सर्व प्रकारें आधार आपले पायांचा आहे. लोकांचे पेचांत बहुत आलों आहें. आपले पाशीं लोकांचा उपद्रव चुकोन निभाव होई तें करणें आपले हातीं आहे. तूर्त पुणियाचा दरबारखर्च तीन हजार रुपये व मशारनिल्हेस सोडतेसमयीं एक हजार रुपये पडले. एकूण चार हजार रुपयांची निकड बाळाजीपंतास असेल, तेव्हां ऐवज कोठून द्यावा? गांवांत ऐवज उगवून घेऊं म्हटल्यास गांवकरी देणार नाहींत. आणखी मशारनिल्हेची फजिती होईल. आजपर्यंत ऐवज फसला. आणखी दिवसेंदिवस अधिकच पेंचांत पडावयाचा सुमार दिसतो. गांवकरी साळसूद ठाणं व दिवस एक प्रकारचे. एक दिवस स्वस्थ नाहीं. तशांत आम्ही पैकेकरी नव्हे. याजकरितां विनंती लिहिली आहे. तर पुण्याचे दरबारखर्चाचे तीन हजार रुपये व मशारनिल्हेस सुटावयास पडले असतील ते ऐसे रोख देऊन पार पाडिलें पाहिजे. या समयीं त्या निकडीस गांवाकडून ऐवज येणार नाहीं. व कोठें कर्ज मिळणार नाहीं. पदरचे घालूं म्हटलें तरी अर्थ ध्यानांतच आहे! तेव्हां व्यर्थ फजिती करणें प्राप्त होईल. प्रसंग कठिण आहे, यास्तव विनंती मान्य करून ऐवज द्यावयाची आज्ञा जाली पाहिजे. पुढें ऐवजाविशीं जशी आज्ञा होईल त्याप्रमाणें करीन. तूर्त निकडीस द्यावयाविशीं आज्ञा जाली

१ लागू. हे रहिमतपूरचे कमावीसदार. बाळाजीपंत दामले हा रहिमतपुरास होता तो यांच्या निसबतीचा कारकून.

पाहिजे. आमचें सर्वस्व तेथें गेलें व बाळाजीपंतांची चीजबस्त गेली. चोहीं-कडून खराबींत आलों. यांतून पार करणार वडील समर्थ आहेत. बाळाजी-पंतांनीं सेवा केली आहे, कृपा करणार आपण आहां. सूचनार्थ विनंती लिहिली आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५७७५ श्री. ( आश्वि. शु० ९–२७ सप्टें. )

सेवेशीं सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम तागायत छ० ७ जमादिलावल जाणोन स्वकीय लेखन केलें पाहिजे. विशेष. राजश्री आपा देसाई निपाणीकर पलटणेंसुद्धां येऊन नेरलीस येऊन बसले आहेत. आज मंदवारास नऊ दिवस जाले. आंतील सामान साहित्य बंदोबस्त चांगलाच आहे. निपाणीकर यांजकडोन बोलण्याचें संधान लावावें असा आशय मध्यस्थाकडून समजल्यानंतर इकडून कारकून पाठविला होता. मध्यस्थाचे बोलण्यांत कोगनोळी दिल्यानंतर शह उठवावा असें होतें. त्यावरून कारकून पाठविला असतां एकसालीचा फडशा करावा, नंतर शह उठवूं, असें म्हणों लागले ! तेव्हां बोलण्याचा घर नाहीं त्यापक्षीं काय बोलावें ? आंतून दम कमी नाहीं. चिरंजीव आंत आहेत त्याविशींची मात्र काळजी. हरतऱ्हा करून शह उठवून चिरंजीव काढून आणावा हा विचार आहे. ईश्वरसत्तेकडून घडेल तें प्रमाण. पंचवीस बाणांचें बहुत जरूर आहे. आपल्या संग्रहापैकीं पंचवीस बाण जरूर देविले पाहिजेत. जकीऱ्यापैकीं जुने देऊं नये. नव्यापैकीं पंचवीस बाण व दोघे बाणदार वंटमुरीस पोंहचोन देविले पाहिजेत. यासमयीं आम्हांस आपल्याशिवाय कोणेविशीं भरंवसा अन्यत्र राहिला नाहीं. ईश्वरसत्तेनें घडेल तें प्रमाण. बहुत काय लिहिणें. कृपा करावी हें विनंती. पुणेंकडील व राजश्री आपासाहेबांचा मुक्काम कोठें आहे हें वर्तमान ल्याहावें. हे विनंती.

नं. ५७७६ श्री ( आश्विन शु० १३–३० सप्तं. )

पै॥ छ० १५ जमादिलावल. आश्विनमास. सन इहिदे मय्यातैन.

सेवेसीं मोरो आपाजी परांजपे सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० १० जमादिलावल भौमवार सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. छ० १ जमादिलावलचीं पत्रें स्वामीचीं आलीं ते छ० ७ जमादिलावलीं पावलीं.

---

१ नागो शामजी यांचें पत्र बाळासाहेबांस मिरजेस. २ पत्र बाळासाहेबांस मिरजेस पुण्याहून.

आज्ञापत्रीं सविस्तर लिहिलें तें कळलें. अलीकडे मिरजेहून पत्राची रवानगी होत्ये, परंतु श्रीमंतांस पत्र येत नाहीं त्यास रवानगीसमयीं एक पत्र श्रीमंतांस असावें. 'सविस्तर मोरो आपाजी विनंती करितील' इतका नात्र मजकूर असावा. मर्जीस आल्यास कांहीं अधिकोत्तर ल्याहावयाजोगें असिल्यास लेखन व्हावें. परंतु पत्र यावें. राजश्री बाळकृष्णपंत बाळ यांचें पत्र प्रविष्ट केलें. पेशजी आज्ञा आहे त्याप्रमाणें राजश्री माधवरावजी रास्ते यांजकडे दर्शनास जात असतों. तिकडील मजकूर पुसतात तो सांगतों. रावजीही कांहीं एक मजकूर दरबारी असिल्यास मला कळवितात. थोरच आहेत. राजश्री सिद्धेश्वरराव बिनीवाले यांस पेशजी स्वामीनीं पत्र पाठविलें होतें तें प्रविष्ट करून जाब घेऊन पाठविले आहेत. पावलेच असतील. देशपांडे यांस ( इंग्रजाच्या ) हातीं सहसा देऊं नये, येविशीं परभारें राजश्री चिंतोपंत कमावीसदार यांस लिहिलें आहे. व राजश्री बाळकृष्णपंत लागू यांसही लिहिलें आहे. इकडून हातीं सहसा देऊं नये हा खंबीर आहे. स्वामीचेंही पत्र आलें. अधिकच अगत्य धरिलें आहे. राजश्री नारोपंतनाना पोंक्षे यांचें पत्र राजश्री बाळकृष्णपंत लागू यांस जावें, याविशीं पेशजी विनंती लिहिली होती. मर्जीस आल्यास पत्र गेलेंच असेल. श्री॥ राजश्री मोरोबादादा व राजश्री आपाजीपंत गोंधळेकर यांचीं पत्रें प्रविष्ट केलीं. उत्तरें एक दोन दिवसानीं घेऊन सेवेसीं पाठवितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७७७ श्री. ( आश्विन शु० १३–३० सप्टं. )

पै॥ छ० १५ जमादिलावल. इहिदे मय्यातैन. आश्विन.

विज्ञापना. श्री॥ राजश्री पंतप्रतिनिधि यांची वर्तणूक चांगली नाहीं म्हणोन दोन वेळां सरकारांतून शिंदे यांस सांगोन तोफा पलटणांच्या चौक्या बसाविल्या होत्या. फिरोन बोलणें होऊन चौक्याही उठल्या. 'गैरवाजवी वर्तणूक करूं नये. नाटकशाळा लावून द्यावी. कारभारी यांचे हातून सुरळीत कामकाज घ्यावें.' ऐसा ठराव जाला होता. परंतु तेंही जालें नाहीं. पूर्ववत्प्रमाणें बेजहा वर्तणूक व्हावयास लागली. आज प्रातःकाळीं दोन पलटणें व पांच तोफा स्वार पांचशें येऊन एकाएकीं वाड्यांत चढाई करून गेले. पंताकडील कांहीं लोक पळोन गेले. दहा वीस लोक सळ सोडून लढों लागले. झटपट जाली. पांच सात लोक पंताकडील ठार जाले. शिंद्यांकडील पांच सांत ठार व दहा

१ पत्र मोरो आपाजींचें बाळासाहेबांस. तसेंच पुढचें.

वीस जखमी जाले. खासा पंत बंगल्यामध्यें जिन्याचे तोंडचें कवाड लावून बसले आहेत. हातीं निमच्या सळ सोडून बसले आहेत. वाड्यांतील झाडून चीजबस्त लुटली. शें दोनशें घरें सभोंवतीं लुटलीं ! त्यांजवर समय विलक्षण गुजरला आहे. मागाहून होईल प्रकार तो विनंती लिहितों. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५७७८ श्री. ( आश्विन शु० १३–३० सप्तं. )

पै॥ छ० १५ जमादिलावल इहिदे मय्यातैन.

विज्ञापना ऐसीजे. स्वामींची शरीरप्रकृत गुदस्तांपासोन यथास्थित नाहीं. त्यास ' वैद्य चांगला प्रामाणिक चिकित्सक उत्तम यशस्वी पाहोन त्याजपाशीं बोलोन इकडे लेहून पाठविणें ' म्हणोन आज्ञा, त्यास राजश्री माधवराव रास्ते यांजपाशीं कनक सभापति वैद्य तेलंग चांगला आहे, परंतु सांप्रत राजश्री माधवरावजी त्याजकडून कांहीं रसायणें करवितात आहेत. रसायणें जाल्यानंतर वैद्य आपले देशास जाणार. याप्रमाणें राव रास्ते याणीं सांगितलें. राजश्री लक्ष्मणराव वैद्य, शिवराव वैद्य यांचे पुत्र, वडुद साताऱ्यानजीक आहे तेथील राहणार वैद्य चांगले आहेत. त्यांची भेट घेतली आहे. त्यांचें आणखी बोलणें व्हावयाचें आहे. वडुदकर वैद्य स्वामींचे ऐकण्यांत असतीलच. दहा पांचांचे विचारें वैद्य चांगले असें आहे. राजश्री माधवराव यांजपाशींही कसे वैद्य आहेत म्हणोन सांगितलें. त्याणींही सर्वोपरी चांगले आहेत म्हणोन सांगितलें आहे. त्यास त्यांजपाशीं शरीरप्रकृतीचा वगैरे देण्याघेण्याचा विचार बोलोन सेवेशीं लिहितों. त्यांचा मानस मिरजेस येण्याचा आहे. श्री॥ राजश्री विठ्ठलराव बापू यांस औषध[1] वे॥ राजश्री दयारामभट वैद्य काशीकर श्रीनाशिकास राहतात त्याणीं गुदस्तां दिलें. बापूसाहेबांस चांगला गुण आला. आणखीही पुण्यांत दहा पांचांस औषधें दिलीं त्यांस उत्तम आरोग्य जालें. रसायणक्रिया बहुत चांगली. भले आहेत, यशस्वी चांगले. बहुतांस त्याणीं औषध देऊस आरोग्य केलें आहे. त्यास ते सांप्रत नाशिकास आहेत. त्यांजकडे पत्रें लेहून मुजरद अजूरदार रवाना आजच करितों. दयारामभटजी जर करितां येतील तरी सर्वोपरी उत्तम. त्यास पत्रीं ' पांचशें रुपये आपणांस पावतील, आपण कृपा करून पत्राचें उत्तर येतांच मिरजेहून

---

१ औषध क्षयावर.

पालखी वगैरे सरंजाम आणावयास पाठवितों ' म्हणोन पत्रीं लिहितों. पांचशें रुपये याजवर त्याणीं कबूल केल्यास बहुत उत्तम. आणखी शेंदोनशें त्यांचे लिहिण्यांत भाव आल्यास चिंता नाहीं. परंतु सर्वोपरी दयाराम वैद्य उत्तम. येथें शेंपन्नास वैद्य आहेत त्यांत हे उत्तम. मुख्य गोष्ट यशस्वी आणि सुज्ञ भले याप्रमाणें आहेत. पत्राचा जाब नाशिकाहून येतांच सेवेशीं लिहितों. हे विज्ञापना.

नं. ५७७९ श्री. (आश्विन शु० ४–६ अक्टों.)

पै॥ छ० २० जमादिलावल भृगुवार इहिदे मय्यातैन व अल्लफ.

सेवेसीं मोरो आपाजी सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १६ जमादिलावल सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्री॥ राजश्री पंत प्रतिनिधि यांचा मजकूर पेशजी लिहिला आहे. त्यास पंतांचे वाड्यांत दंगा जाला. पांच सात असामी ठार व दहा पांच जखमी जाले. शिंदे यांजकडील तीन असामी ठार. वीस असामी जखमी जाले. बाकी लोक झाडून बाहेर काढिले. खासा पंताजवळ बंगल्यामध्यें दहापंधरा असामी केवळ निदानचे सोबती मात्र एक दिवस होते. सरकारांतून बाळोजी कुंजीर जाऊन पंतांस चार गोष्टी सांगोन सरकारांत वाड्यांत आणिलें. निराळें स्थळ हौदाकडील पूर्वेचे अंगचें थोरलें देवघर व आंतील सोपा व वरील दिवाणखाना पंतांकडे दिल्हा. चार लुच्चे होते त्यांस प्रतिबंध केला आहे. नाटकशाळा कोणी म्हणतात पंतानीं लांबाविली, कोणी म्हणतात शिंदे याणीं सैन्यांत नेली. परंतु पंतांजवळ नाहीं. पंतांचे वाड्यांत गर्दी जाली ते समयीं वाडा झाडून लुटला. सुतळीचा तोडा देखील राहिला नाहीं. सभोंवते चाळीस पन्नास लहान मोठे वाडे व घरें लुटलीं. लाखों रुपयांची नुकसानी जाली. पंताचा आब गेला हे गोष्ट लौकिकांत चांगली जाली नाहीं. लोक बहुत श्रमी होतात. बहुत दिवसांचे दौलतवान, त्यांजवर हा समय गुजरला ! भगवत् सत्ता प्रमाण ! श्री॥ राजश्री पंतप्रधान यांसच पंतांचा रोष बहुत आला होता, याजमुळें या थरास गोष्ट आली. शिंदे यांचा आग्रह बहुतसा कांहीं नव्हता. यांचा आब घेतला असतां पंतांजवळ पैका अथवा हरएक प्राप्त होतें ऐसा अर्थ नाहीं. परंतु सरकार आज्ञेस उपाय नाहीं. होणारें चुकत नाहीं. सांप्रत पंतांचे वाड्यांत चाळीस असामी प्यादे चौकीस मात्र कुंजर याजकडील आहेत. शंभर दीडशें पात्र पंतांचे पंगतीस नित्य होत असतां हल्लीं या स्थितीस सरकार

रोषानें आले. वाड्यांत दीप देखील लागणेंस संकट आलें. याज उपरांतीक पुढें पंतांचा विचार काय घडतो तो मागाहून सेवेसीं लिहितों. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७८० श्री.

टिप्पण. धोंडजी वाघ हा प्रथम कांहीं वर्षे पटवर्धनांच्या व करवीरकर महाराजांच्या फौजेंत चाकरीस होता. पुढें तो लक्ष्मेश्वरचा देसाई केंचनगौडा याच्या पदरीं राहिला. देसाई हा मूळचाच मोठा दंगेखोर होता. त्यांत त्याला वाघासारखा मर्दाना हरदमख्याली सोबती मिळतांच त्यानें स. १७७६।७७ त बंड केलें व हैदरअल्लीची फौज आणून सांवशीच्या लढाईंत मराठ्यांचा पूर्ण पराजय करविला. पुढच्या वर्षी त्याचें पारिपत्य करण्याकरितां परशुरामभाऊ व हरिपंततात्या आले तेव्हां केंचनगौडा श्रीरंगपट्टणास पळून गेला. त्याचीं मुलेंमाणसें शिरहट्टीच्या किल्ल्यांत होतीं, सबब भाऊ व तात्या यानीं तो किल्ला घेऊन पाडून जमीनदोस्त केला, देसायाचीं मुलेंमाणसें कैद करून मिरजेस पाठविलीं, व त्याचें वतन जप्त केलें. नंतर इंग्रजांशीं लढण्यास हैदरअल्लीची कुमक मिळवावी म्हणून त्यास नाना फडणविसानीं स. १७७९ त मलप्रभा व तुंगभद्रा यांमधला मुलूख देऊन टाकला. या नवीन अंमलांत देसायाचें वतन जप्तींतून मोकळें व्हावें तें झालें नाहीं. उलट केंचनगौडा देसाई पट्टणास होता त्यास टिपूनें नजरबंद केलें. तेव्हां देसायाची रखेली केंचव्वा म्हणून होती तिचें नांव पुढें करून धोंडजी वाघानें शिरहट्टीचा किल्ला पुनः बांधला व त्यांत राहून भोंवतालच्या मुलखांत दंगा आरंभिला. तो दंगा पांच सात वर्षे चालला होता. पुढें स. १७८६ त टिपूकडून दौलतखान नांवाचा सरदार फौज घेऊन आला त्यानें वाघाचा बंडावा मोडला आणि केंचव्वा व वाघ या दोघासही धरून पट्टणास नेलें. नंतर स. १७९० त परशुरामभाऊंचें लष्कर श्रीरंगपट्टणच्या स्वारीकरितां धारवाडप्रांतीं आलें तेव्हां मला सोडाल तर तिकडे जाऊन धामधूम करितों व भाऊंचा अंमल त्या मुलखांत बसूं देत नाहीं, अशी टिपूला थाप मारून वाघानें आपली सुटका करून घेतली. पण टिपूस कबूल केल्याप्रमाणें तो भाऊंशीं विरोध न करितां उलट त्यांचीच कुमक करण्यास तयार झाला, व त्याप्रमाणें फौज जमा करून तो श्रीरंगपट्टणची सबंध स्वारी आटपेपर्यंत मराठी लष्करांत चाकरी करीत होता. ही कामगिरी करून दाखविण्यांत

भाऊनीं आपल्या धन्याचें वतन जप्त झालें आहे तें सोडावें हा त्याचा हेतु होता. व त्या कामासाठीं तो भाऊंच्या स्वांरीबरोबर तासगांवापर्यंत सुद्धां आला होता. परंतु त्याचा तो हेतु पूर्ण न करितां भाऊ घाईघाईनें पुण्यास निघून गेले. त्यामुळें रुसून धोंडजीनें सावनुराकडे जाऊन मोठा दंगा केला. भाऊनीं पुण्याहून आल्यावर हें वाघाचें बंड मोडण्याकरितां रामचंद्रपंत आपास बरोबर मोठी फौज देऊन पाठविलें. आपानीं मासूर येथें वाघास गांठून त्याच्या फौजेचा धुव्वा उडवून त्यास तुंगभद्रापार टिपूच्या राज्यांत पिटून घातलें. तिकडे गेल्यावर स्वस्थ न बसतां तो बिदनूर प्रांतांत लुटालूट करूं लागला तेव्हां टिपूनें त्यास पकडून पुन्हां कैदेंत घातलें. टिपू मरेपर्यंत वाघ कैदेंतच होता. नंतर त्याची सुटका झाली तेव्हांपासून त्यानें काय काय केलें हा वृत्तांत पुढील उताऱ्यांत आला आहे. ऐ. ले. संग्रहांत वाघाच्या प्रकरणीं वेळोवेळ अंशा अंशानें आलेला व या उताऱ्यांतला वृत्तांत प्राय: एकच आहे. तरी सुसंगत एकत्र जुळविलेली माहिती वाचकांस एकदम वाचावयास मिळावी व कांहीं नवीन माहितीही त्यांस प्राप्त व्हावी या इरायानें हे उतारे आम्ही येथें छापीत आहों. श्री ॥ कै ॥ चिंतामणराव आपासाहेब सांगलीकर यानीं आपल्या चरित्राचा एक वाका लिहून ठेवला आहे, हें मागें सांगितलेंच आहे. त्या वाक्याखेरीज त्यानीं 'धोंडजी वाघाची बखर' म्हणून एक निराळीच बखर लिहिली आहे तींतून हे उतारे घेतले आहेत. सन. १८४०च्या सुमारास ही बखर लिहिली गेली आहे.

"वाका. सन तिस्सा तिसैन मय्या व अल्लफांत चैत्र व० ३० स इंग्रजी सरकारचे फौजेनें पट्टण हल्ला करून घेतलें. त्या वख्तीं टिपू सुलतान हा गोळा लागोन ठार जाहला. टिपूचें राज्य इंग्रजी सरकारचे ताबेंत आलें. पट्टणांत बंदीवान होते ते ( इंग्रजानीं ) सोडले त्यांत धोंडजी वाघ होता तो सुटला. टिपू सुलतान याची दौलत इंग्रजी सरकारचे ताबेंत आली त्याचा बंदोबस्त करण्यास दोन तीन महिने लागले. वाघ मजकूर सुटला तो प्रकार सदरीं लिहिला आहे त्यावरून कळों येईल. त्याणें जमाव करून बंड केलें. तुंगभद्रेपलीकडे इंग्रजी सरकारचे इलाख्यांत उपद्रव केला. कांहीं पैका मिळविला. त्याचे पीछेवर इंग्रजी सरकारचीं पलटणें आलीं. आपला परिणाम लागणार नाहीं हें समजून ( धोंडजी वाघ ) सन मय्यातैनांत श्रावणमासीं तुंगभद्रेअलीकडे उत्तरतीरास वरद्धानदीचे दक्षिणतीरास दोन

नद्यांचे मध्यें आला. कै॥ धोंडो बल्लाळ गोखले हे सरकारांतून कर्नाटक तालुक्याचे बंदोबस्तीकरितां होते. त्यांस वाघ मजकूर याणें आपल्यास आसरा द्यावा म्हणोन सांगोन पाठविलें. त्याणीं बेलभंडार दिला म्हणून ऐकण्यांत. वाघमजकूर याणें वरदानदीचे उत्तरतीरास आपला जामदारखाना व बुणगें वगैरे पाठविलें तें धोंडोपंत गोखले यागीं लुटलें. वाघमजकूर हा वरदानदी हनगलाजवळ उतरोन लक्ष्मेश्वरास आला. कै॥ बाळकृष्णपंतभाऊ लागू हे इंजानेबांचे[1] पदरचे. त्यांस वाघास आसरा द्यावा म्हणून सांगोन पाठविलें.[2] त्याणीं त्यास आसरा दिला नाहीं. गोखले हे वाघाचे पीछेवर लक्ष्मेश्वरास आले. त्याच दिवशीं दोन घटका दिवसास गोखले वाघावर चालोन गेले. वाघानें तोफेचे गोळे मारिले व बाण सोडले, परंतु लागू झाले नाहींत. वाघमजकूर याची फौज उधळली व लुटली गेली. तोफा वगैरे सलतनत गोखले यांचे हातीं लागलें. वाघमजकूर हा अजमासें दहा बारा स्वारांनिशीं निघोन गेला. तिकडून कोणीकडे गेला त्याची माहिती नाहीं. वाघमजकूर हा श्री॥ महाराज छत्रपति संस्थान पन्हाळा यांचे इलाख्यांतील मौजे शिदोळी सुभा मनोळी येथें येऊन मनोळीच्या ठाण्यांत खंडेराव भोंसले होते त्यांस सांगोन पाठविलें. वाघमजकूर याची व भोसले यांची भेट जाली. भोंसले याणीं वाघमजकूर यास आसरा दिला. वाघमजकूर हा मनोळीस धुमण्णानाईक म्हणन वैष्णव सावकार होता त्याचे घरीं राहिला. सदरीं लिहिलेला प्रकार ऐकण्यांत आला तो लिहिला आहे. ”

“ सन मैय्यातैनांत श्री॥ कै॥ महाराज छत्रपति संस्थान पन्हाळा यांचे फौजेची व इंजानेबाचे पेटं[3]यांतील ती॥ परशुरामपंत भाऊसाहेब यांचे फौजेची लढाई निपाणीनजीक पट्टणकुडीचे मैदानांत भाद्रपद वद्य ४ मंगळ-

---

१ आमच्या. इंजानेब = आम्ही स्वतः २ परशुरामभाऊनीं सांगून पाठविलें. ३ पटवर्धनांची मुख्य सरदारी व २७ लक्षांच्या जहागिरीचा ‘ साहेबसुभा ’ माझ्या-नांवें पेशवे सरकारांतून झाला, सबब मी मालक; आणि मिरजकर, तासगांवकर, कुरुंदवाडकर व इतर सर्व भाऊबंद माझे ताबेदार; त्यांस जहागिरी आहेत त्या आमच्या जहागिरींतून आम्हीं तोडून दिलेल्या; हा आप्पासाहेब सांगलीकर यांचा मोठा आग्रह होता. पेशवाई कारकीर्दीपुरतें त्यांचें म्हणणें खरें होतें. पण इंग्रजी झाल्यावर हा न्यूनाधिकभाव कांहीं एक राहिला नाहीं. तरी आपासाहेबानीं मरेपर्यंत आपलें म्हणणें सोडलें नाहीं ! त्यांच्या लेखांतून हा त्यांचा हेका जागोजाग दृष्टीस पडतो.

वारीं जाहली. ईश्वरइच्छें लढाई बिघडली. फत्ते होणें या शिकस्त होणें ही मर्जी ईश्वराचीच ! ती॥ भाऊसाहेब यांस सरकारकामावर जखमा कहरी लागोन खेतांत राहिले. पाडाव जाले. त्यांस छत्रपतींजवळ नेलें. त्यांचे जखमेची बरदास्त करावी तें न करितां ( छत्रपतींनीं ) त्यांस जिवें मारिलें हें बहुत खराब काम केलें. त्याजबद्दल करवीरची मसलत करावी असें श्री॥ राजश्री पंतप्रधान बाजीरावसाहेब यांचे सरकारांतून ठरलें. सरकारचा तोफखाना वगैरा जंगीसामानसुद्धां कै॥ गणपतराव पानशे व कै॥ नाना फडणीस व नरसिंगराव अन्या विंचूरकर या उभयतांचे निसबतचे स्वारांचीं पथकें अशीं वगैरा व कै॥ दौलतराव शिंदे अलिजाबहाद्दर यांजकडील पलटणें व फौज अशी कुमकेस पाठविली. श्री॥ महाराज छत्रपति यांचे फौजेची लढाई जाली. शिकस्त जाले. छत्रपति पन्हाळ्याच्या आश्रयास गेले. करवीरास मोर्चे बसविले. मशारनिल्हे धोंडो बल्लाळ गोखले कर्नाटकांतील तालुक्याचे बंदोबस्तीकरितां कर्नाटकांत होते ते सरकारआज्ञेवरून कुमकेबद्दल करवीरास आले. त्यांचे बरोबर त्यांचे वडील बंधूंचे पुत्र कै॥ आपाजी गणेश व त्यांचे धाकटे बंधु बापूजी गणेश हे होते. ”

“ वाघमजकूर याणें मनोळींत राहून जमियत केली. श्री॥ कै॥ महाराज छत्रपति याणीं ती॥ भाऊसाहेब हे इंज्यानेब्राचे पदरचे, पेट्यांतील,— त्यांचे निसबतचे स्वारांचे वगैरे तैनातांस महाल वगैरा इकडून—त्यांपैकीं गोकाक वगैरा महाल त्यांचें गुळें जालें तें गुळें वगैरा लुटून वाघानें पैका मिळविला. अकोळकर ( ? ) शेख मिरा हा वाघमजकूर यास अनुकूळ जाला. वाघमजकूर याणें पाच्छापूरचें ठाणें सरकारचे बिनीवाले होते त्यांजकडे होतें तेथें येऊन ठाणें घातलें. तेथून निघोन चिकलदिनीचे डोंगरांतून इंज्यानेब्राचे इलाख्यांतील शहापूर तालुक्यांतील काकतीस येऊन देसाई याचे घर लुटून देसाई याचा विषय त्याचे हातीं लागला. बेळगांवचें ठाणें बिनीवाले यांजकडे, तेथील किल्लेदार यांजकडील लोक व इंजानेब्राचे जहागिरींतील शहापूर येथील मामलेदार यांजकडील लोक ऐसे मिळोन वाघमजकूर याजवर गेले. शहापूर तालुक्यांतील कडोलीनजीक लढाई जाली. यांचा लढाईंत मोड जाला. नंतर वाघमजकूर हा करवीरास गेला. श्री॥ महाराज छत्रपति यांस भेटला. तेथें कांहीं लोक चाकरीस ठेविले. तेथून निघोन कुलगोड हें ( गांव )—ती॥ कै॥ रघुनाथरावदादा हे इंज्यानेब्रांचे चुलत

चुलत बंधु–ते पेट्यांतील–त्यांचे निसबतचे स्वारांचे तैनातीस जहागिरीपैकीं महाल वगैरा इकडून–त्यांतील तें व सत्तीसंवदत्ती व शूर्पाल वगैराची खंडणी ( वाघानें ) केली व लूट केली. मागाहून श्री॥ महाराज छत्रपति यांजकडील कै॥ रत्नाकरपंत आपा राजाज्ञा फौज घेऊन आले तेव्हां ते व वाघमजकूर ऐसे–अथणी ही रास्ते यांजकडे–तिकडे गेले. तेथें रास्ते यांजकडील ठाणेदार नारोपंत परचुरे यांची व त्यांची लढाई जाली रास्ते यांजकडील लोक कचरले. ( वाघ व राजाज्ञा यांनीं ) अथणी वगैरा आसपास खेडेंची खंडणी घेतली व लुटालूट केली. वाघ यास खंडणीपैकीं रुपये द्यावयाचा करार. त्याप्रमाणें ( राजाज्ञानीं ) त्यास ऐवज दिला नाहीं. याजमुळें वाघमजकूर हा राजाज्ञा यांजपाशीं बिघडून बागलकोटाकडे गेला. दिवसेंदिवस जमीयत अधिक जाहली. ‘ मुल्के जहां ’ म्हणवूं लागला. ”

“ धोंडोपंत गोखले हे कर्नाटकांतील तालुक्याचे बंदोबस्तीकरितां होते ते सरकार आज्ञेवरून करवीरास कुमकेस आले तो प्रकार सदरीं लिहिला आहे. कर्नाटकांत फौजबंद कोणी नाहीं, मोकळें ( रान ) पाहून वाघ मजकूर याणें कर्नाटकांतील गदग वगैरा व सरकारी व इंजानेबाचे जहागिरींतील वगैरा ठाणीं घातलीं. करवीरचे मोर्चे उठविले. कर्नाटकांतील ठाण्यांचा बंदोबस्त करावा या इराद्यानें इंजानेब निघाले ते इंजानेबाचे जहागिरींतील शहापुर येथें जाऊन तेथील बंदोबस्त करून तेथून पाच्छापुरचे मुक्कामास गेले. धोंडोपंत गोखले हे ही त्या मुक्कामास आले. उभयतां पाच्छापुरचे बारीनें पार होऊन रुद्रापूर तालुके मुरगोड त्या मुक्कामास गेलों. सरकारचेंपी आज्ञापत्र वाघमजकूर याचे पारिपत्याविषयीं आलें. धोंडजी वाघ याणें सावनूर वगैरा सरकारी व इंजानेबांचे जहागिरींतील महालांपैकीं परगणे लक्ष्मेश्वर वगैरा कर्नाटकांतील ठाणीं घातलीं. परगणे मजकूरचा देसाई खानगौडा थोरला याणें दत्तक केंचनगौडा यास घेतला. त्याचा लेक खानगौडा व फकीर स्वामी याचा शिष्या चेनवीरय्या यांस वाघमजकूर याणें अनुकूळ करून घेतलें. त्यानीं जहागिरींतील परगणे लक्ष्मेश्वर पैकीं शिरहट्टीचे ठाण्यास मोर्चे बसविले. धारवाड, कुसेगल, शिरहट्टी, हावनूर, गजेंद्रगड हीं मात्र ठाणीं वाघ याचे स्वाधीन जालीं नाहींत. वरकड अंमल वाघ याचा जाला ”

“ तुंगभद्रेस उतार जालेवर दक्षिणेस इंग्रजी सरकारचे इलाख्यांत वाघ दंगा करूं लागेल हें समजून त्यास तंबी करणेबद्दल मेहेरबान कदरदान बुलंद

अलकाब जनराल वसलीसाहेब बहादुर मुख्यत्यार हे इंग्रजी सराकरचीं पलटणें व तुरुपस्वारांचीं रिजिमिटें वगैरा सरंजाम घेऊन पट्टणाहून निघाले त्यांस सामील व्हावयास जावयाचें. वाघमजकूर याजकडील फौज रस्त्यास ( ती ) जमीयत भारी. कित्तुरास गांव कुसूं. तेथें जावें, ( वाघ ) अंगावर आलेस गांवचे आसऱ्यानें लढाई द्यावी, या इराद्यानें इंजानेब व धोंडो बल्लाळ गोखले ऐसे फौजसुद्धां रुद्रापुराहून कूच करून मौजे देवळापूर तालुके कित्तूर येथें वे ॥ शा॥ संपन्न कै॥ चिदंबर दीक्षित होते त्यांचें दर्शन घेऊन कित्तुरास गेलों. धोंडो बल्लाळ गोखले यांचे दुसरे पुतणे बापूजी गणेश यांची पत्नी नरगुंदास होती ती प्रसूत होऊन पुत्र जाहला. ती वारल्याचें वर्तमान कित्तूरचे मुक्कामीं आलें. वाघ मजकूर हा इंजानेब व धोंडो बल्लाळ गोखले ऐसे कित्तुरास त्या रोखें गरगचे मुक्कामास आला. कित्तुरास पाण्याचा तोटा. तेथें निभावणी पढणार नाहीं हें समजून हल्याळास इंग्रजी सरकारचीं पलटणें ( होतीं ) तेथें जावें. असा विचार करून कित्तुराहून आषाड शु॥ ६ मंदवार छ० ५ सफरीं हल्याळास जावयाकरितां इंजानेब व धोंडो बल्लाळ गोखले ऐसे रात्रीं निघालों. ”

या नंतर वाघाशीं लढाई झाली तिचा वृत्तांत या बखरींतला व वाक्यांतला एकच आहे व तो या प्रकरणाच्या प्रस्तावनेंत उतरून घेतलाच आहे. सबब आणखी निराळा येथें देण्याचें कारण नाहीं. लढाई झाल्यानंतरची हकीगत आपासाहेब लिहितात—

“वाघमजकूर याचे फौजेची लढाई झाली. इंज्यानेबास सरकारकामास जखमा लागल्या. त्या मजकुराचें विनंतीपत्र श्री॥ राजश्री पंतप्रधान बाजीरावसाहेब यांस लिहिलें त्यांत दोन जखमा लागल्याचें लिहिलें. तिसरी हलकी सबब लिहिली नाहीं. इंजानेबास जखमा लागल्या, फौज गारद जाली, इंजानेबाचा ठिकाण नाहीं, अशी आवई जाऊन इंजानेबाचे चुलते ती॥ कै॥ गोपाळरावसाहेब यांची पत्नी ती॥ कै॥ मातुश्री सरस्वतीबाईकाकू—ती इंजानेबाची मातुश्रीच असें इंजानेब मानीत होते— ती व इंजानेबाची मातुश्री तीर्थरूप मातुश्री बाई हीं श्रमी होतील, सबब “ लढाई जाली, इंजानेबास जखमा लागल्या, खैर आहेत, ” हें कळण्याकरतां पत्र ल्याहावयाचें त्यांत ‘ वडिलांचे पोटीं जन्म घेतला त्याची सार्थकता हीच ’ म्हणून ल्याहावें असें इंजानेबाचे दिलांत आलें; परंतु लिहिलें नाहीं. याचें कारण लढाईचा

प्रसंग, आम्हीं वांचून घरीं न गेल्यास, असें लिहिलें म्हणोन मातुश्री वारंवार आठवण काढून श्रमी होतील, सबब लिहिलें नाहीं. इंजानेबास जखमा लागल्याचीं व पदरचे शिलेदार वगैरे जखमी व ठार जाले त्याचीं विनंतीपत्रें उभयतां मातुश्रींस लिहिलीं. इंजानेबास जखमा कहरी लागल्या त्यासमयीं सरकार-कामावरच यावयाचे, परंतु श्रीगणपतिमहाराजांची कृपादृष्टि त्यायोगें वांचलों. जखमा लागल्या त्यासमयीं इंजानेबांचें वय पंचवीस वर्षांचें होतें. ”

“ सदरहू लढाईंत श्रीगणपतिमहाराजांचे कृपें व श्रीमंतांचे अन्नप्रतापें इंजानेबाकडून जवामर्दी झाल्याचें व बापूजी गणेश यांसुद्धां हल्याळास गेल्याचें वर्तमान मेहेरबान् कदरदान्[1] बुलंद अलकाब जनराल वसलीसाहेब यांस कळोन त्यांचें खत छ० १७ सफरचे तारखेचें आलें त्यांत “ धोंडजी वाघ याची लढाई होऊन गोखले सरकारकामास आले व आपण फार जवामर्दी करून त्याचे फर्जंदासही हमरहां घेऊन हल्लीं हल्याळास गेलां म्हणून ऐकून खुषी जाली. फत्ते शिकस्त येखत्यार खुदाचा आहे. लेकिन त्याचे दिलास आलें त्यास इलाज नाहीं. आणि श्रीमंतांची व कंपनीसरकारची दोस्ती एकरंग जाणोन निमकहरामासीं तंबी करणेंबद्दल भारी फौजसुद्धां अनेकरीब येऊन पोचत असों. ऐसीयास तवाईमुळें उठून गेले फौजेस बोला-वून त्यांची खातरी करून आयंदा केला असाल. लेकिन जानोबैनजुदाई नाहीं. करितां लिहिलें आहे जे, आपले हमरहां फौज किती जमा जाली आहे त्या कैफियतेस मुफसल कलमी करीत असें करावें. आणि जमा जाले फौजेसहित मकानचे आसऱ्यानें अडताळा जागा पाहून राहतसें करावें. ” म्हणून लिहिलें आहे. सदरीं लिहिलेअन्वयें इंजानेबास सरकारकामावर जखमा लागल्या त्या मजकुराचें विनंतीपत्र श्रीमंतांस लिहिलें त्या पत्राचें आज्ञोत्तर छ० १९ रबिलावल सन इहिदे मय्यातैनचे तारखेचें आलें. त्यांत “ वाघानें दगा करून गांठ घातली. लढाई होऊन तुम्हांस व बापूजी गणेश यांस दोन दोन जखमा लागल्या असतां संभाळून निघोन इंग्रजांचे तालुक्यांत हल्याळास गेलां. बरें झालें. जवामर्दीनें सरकारचाकरी केली, योग्य केलें. आपाजी गणेश सरकारकामास आले. धोंडो बल्लाळही सरकारकामास आल्याचें वर्तमान बापूजी गणेश याणीं सरकारांत लिहिलें, त्यास वाईट गोष्ट जाली. याजकरितां बापूजी गणेश यांचें समाधान करणें. तुम्ही सावधपणें रहाणें. येथून वाघाचे पारिपत्याविषयीं राजश्री रामचंद्र परशुराम व बापूजी गणेश व

---

१ कदरदान = अब्रूदार. बुलंदअलकाब = उच्च दर्जाचे. २ ताबडतोब.

गणपतराव विश्वनाथ यांस अलाहिदा पत्रें पाठविलीं आहेत. ते व तुम्ही मिळोन वाघाचें पारिपत्य करणें. तुम्ही अवघे एक ठिकाणीं होऊन बातमी राखून सावधपणें राहून खूळ मोडणें. तुम्ही आपले जखमेची बरदास्त करून आरोग्य जाहल्याचें वृत्त लिहिणें; " म्हणून लिहिलें. × × × × लढाई जाल्याचें कळोन ती॥ रामचंद्रपंत आपा यांचें पत्र इंज्यानेबाचे नांवचें छ० २० सफरचे तारखेचें आलें त्यांत " तुम्ही शिपाईगिरीची शर्थ केली, वंशांत आल्याची उजळणी जाहली. परंतु सरदारानीं अघाडी घेऊं नये हें उत्तम आहे. आपण सर्वजाण आहां; " म्हणून लिहिलें. आम्ही श्रीगणपति महाराजांचे व खावंदाचे कृपें व वडिलांचे पुण्यप्रतापें वांचून हल्याळाहून निघोन धारवाडास आषाढ व॥ १० बुधवारीं आलों. "

यापुढें वसलीसाहेबानीं पटवर्धन, गोखले व मोंगल यांच्या मदतीनें धोंडजी वाघावर मोहीम केली ती सर्व हकीगत या बखरींत लिहिलेली व या प्रकरणाच्या प्रस्तावनेंत आलेली एकच आहे. सबब ती पुन्हा येथें उतरून घ्यावयास नको. बखरीच्या अखेरीस आपासाहेबांनीं मजकूर लिहिला आहे तो—

" धोंडजी वाघ आडनांवाचा पवार. यास वाघ म्हणावयाचें कारण, त्याची माहिती बाभुळगांवकर घोरपडे यानीं लिहोन दिली त्यांतील हांशील— शिदोजी पवार त्याचा भाऊ बहिरजी पवार हे वाघझरीकर पाटील. हे विजापूरचे पादशहापाशीं आले. पादशहा याणीं अमीरशहा जोरावर मर्दानखान वजीर यांचे तैनातेस पोवार यांस लावून दिलें. वजीर यास ( पादशहाचा ) हुकूम जाला कीं, वाघाचें दूध पैदा करून आणावें म्हणून. त्यास पवार याणीं वजीर यास सांगितलें कीं, दोन वर्षांची मुदत मागून घ्यावी त्यावरून मुदत मागून घेतली. पवार याणीं अनेगोंदी ( व ) कृष्णातीरचे रानांत गुरें व बकरीं बांधोन वाघ धरणेंचा यत्न केला. वाघीण दुधाची सांपडली ती पादशहाजवळ आणून दिली. त्याजवरून पादशहा खुषी मानून ' मागा ' म्हणून म्हणाले. त्याजवरून पवारानीं पादशाई किताबत देण्याचा हुकूम व्हावा म्हणून अर्ज केला. त्याजवरून ' वाघ ' ही किताबत दिली; म्हणून लिहिलें आहे. त्यांत धोंडजी वाघ याचा बाप गंगाजी वाघ म्हणून त्यांत लिहिलें आहे. ऐकण्यांत धोंडजी वाघ याचा बाप पिराजी वाघ म्हणोन. धोंडजी वाघाचे बापाचे नांवाचा भेद आला यास्तव बाभुळगांवकर याणीं लिहून दिलें त्यांत लिहिलें तें दखलबाद लिहिलें आहे. "

नं. ५७८१ श्री. ( श. १७६१ इ. स. १८३९ )

+यादी, धोंडजी वाघ प्रकरणीं वाक्यांत दिक्कती आल्या त्याचा शोध करून लिहिणेंविशीं आज्ञा आली त्यावरून—

प्र० प्रथम बंदाचे फुली(खालीं) हैदरखान याणें ( धोंडजी वाघ ) कैद केला कीं टिपूनें केला याचा पत्ता. कलम १

याचें उत्तर टिपूनें कैद केला.

प्र० अंमल टिपूचा जाला असें ( बखरींत ) लिहिलें आहे. त्यावेळेस टिपू होता किंवा हैदरखान होता त्याचा शोध. कलम १

याचें उत्तर—हैदरखान मेला होता. टिपूनें ( धारवाडप्रांतीं ) अंमल बसविला.

प्र० भाऊसाहेब पट्टणाकडे गेले तेव्हां धोंडजी वाघ लोक घेऊन बरोबर गेला असें लिहिलें आहे. ते वेळेस कोन्हेर नरसिंव्ह होता किंवा नव्हता ? व हरपनहळ्ळी वगैरे ठाणीं घेऊन धारवाडास येऊन भाऊसाहेब यांचे स्वारीबरोबर ( वाघ ) गेला किंवा भाऊसाहेब पट्टणाकडे गेले ते वेळेस हरपनहळ्ळीकडून येऊन मिळाला ? कलम १

याचें उत्तर——कोन्हेर नरसिंह होता. भाऊसाहेब धारवाड किल्ला सर करून पट्टणाकडे चालते होऊन तुंगभद्रे पलीकडे गेले. तेथें वाघ जमेत सुद्धां हरपनहळ्ळीकडून येऊन मिळाला.

प्र० त्रिंबकराव रेटरेकर फौज घेऊन आले म्हणोन लिहिलें आहे कोठून आले ? कलम १

याचें उत्तर——त्रिंबकराव रेटरेकर यांस सरकारांतून धारवाड वगैरे कर्नाटक प्रांताचे बंदोबस्तास नेमणूक होऊन धारवाडास ठेविले होते ते वरचेवर धारवाडाहून येऊन कुमक करीत होते.

प्र० तेथें श्रावण शु॥ ४ म्हणोन लिहिलें आहे तेथें वार लागणें बंद १३.
याचें उत्तर—प्रकरण कोणतें व संवत्सर कोणता हें समजल्यावर वाराचा छडा लावावयास येईल.

प्र० केंचन गौडाची राख ही ( शिरहट्टीचें ) ठाणें घेतल्यावर राख

---

+ ऐ. ले. संग्रह भाग नववा. पृ० ४६३६।३७।४५।९६।९७।९८ व ४५९५ हीं पहा. १ सांगलीहून चिंतामणराव आपासाहेबांची आज्ञा आली त्यावरून शिरहट्टीच्या मामलेदारानें ही यादी लिहिली.

सबब ( टिपूच्या फौजेनें ) सोडली किंवा पळून गेली याचा शोध करावयाचा. कलम १.

याचें उत्तर—टिपूकडून दौलतखान फौज घेऊन शिरहट्टीस वेढा देऊन देसायाची राख केंचव्वा व तिचे निसवतीची मंडळीसुद्धां धरून पट्टणास नेलें. तेथें केंचनगौडा देसाई होता त्याचे स्वाधीन ( राख ) केली. कांहीं दिवसानीं देसाई ( पट्टणास ) मेला. मागून केंचव्वाही तेथेंच मेली.

प्र० ( वाघानें ) हरपनहळ्ळी वगैरे तालुक्यांत काटकाई करून सांवशीचें ठाणें घातलें असें लिहिलें आहे. त्यास हरपनहळ्ळी तुंगभद्रेपलीकडे. तिकडे काटकाई करून नंतर तुंगभद्रे अलीकडे येऊन ठाणें घातलें किंवा कसें याचा शोध करावयाचा. कलम १.

भाऊसाहेब यांची स्वारी पट्टणाकडून फिरली तेव्हां वाघ तासगांवपर्यंत जाऊन तेथून फिरला तो सावनूर तालुक्यांत झाडीच्या आसऱ्यानें राहून सांवशीकडून हरपनहळ्ळीपर्यंत स्वारी करून आला.

प्र० तेथें पांच तोफा गोखले यांचे हातीं लागल्या म्हणोन लिहिलें आहे. त्यास तोफा किती होत्या ? कलम १.

याचें उत्तर—लक्ष्मेश्वर मुक्कामीं धोंडोपंत गोखले याणीं ( वाघास ) लुटलें तेव्हां पांच तोफा गोखलेकडे पाडाव आलेल्या.

प्र० जालिहाळचे मागें मुक्काम म्हणोन लिहिलें आहे तेथील [illegible] लावावयाचें. कलम १.

याचें उत्तर—मुक्काम राणे आबीगिरें.

प्र० कवताल भनू नजीक टेंकडी म्हणोन लिहिलें आहे तें हणमंतराव सरनोबत यांस विचारावयाचें. कलम १.

याचें उत्तर—हणमंतराव सरनोबत तेथेंच आहेत.

येणेंप्रमाणें शोध करून लिहिलें आहे.

धोंडजी वाघप्रकरणीं दंगा कोणत्या सालांत जाला तें लिहून पाठविणें-विशीं आज्ञा जाली, त्यास सन आर्बा तिसैन अखेरीपासून सन सीत तिसैन भाद्रपदमासपर्यंत दंगा होता. पुढें श्रीमंत कै॥रामचद्रपंत आपा तासगांवकर[1] फौजसुद्धां येऊन माहसुरावर लढाई होऊन वाघाचा मोड होऊन पट्टणाकडे निघोन गेला. आपासाहेब तासगांवास माघारे गेले.

---

१ सांगलीस.

नं. ५७८२ श्री. ( माघ—फेब्रु. )

भागानगराकडील[1] वर्तमान मीर अलम यास पट्टणाकडे रवाना केलें ते समयीं सुरापुरकरांस शह देऊन खंडणीचा फडशा जाल्यावर पुढें जावें असें सांगितलें असतां निकडीमुळें ते पुढें गेले. याजमुळें बेरडानें दिगर गोष्ट सांगितली. सबब सुभानखान याजसमागमें लैन[2] सरकारांतून देऊन फौज-सुद्धां सुरापूरप्रांतीं रवानगी जाली. खंडणी घेऊन ठाणीं घालणार असें त्यास समजल्यावरून सुरापूर खालीं करून अन्यत्र स्थळीं जाऊन राहिला असें लिहिलें आलें. रेणुराव याची रवानगी रामेश्वरास जाल्याचें वगैरे वर्तमान लिहिलें आहे. अलीकडे बाबाराव वकील नबाबाकडील शिंयाकडे वकिलीस होते व कल्याणराव निंबाळकर व मशारनिल्हेचे वकील हरराव या त्रिव-र्गांनीं मिळोन पुण्याचे मुक्कामीं श्री॥ कै॥ भाऊसाहेब यांजवळ मध्यस्ती करून मशीरनमुलूक याची मुक्तता कराविली, त्यापासून ते मुखत्यार होते. दरम्यान रघोत्तमराव याणीं शीड उचलोन महाडाहून श्री॥ राजश्री नाना यावयाचे प्रारंभीं संधान सिद्ध केलें ते समयीं प्रमुख जाले. तेव्हां हे सहजच माजी जाले. त्यांपैकीं कल्याणराव सालमजकुरीं वारले. हरराव उगेच आहेत. बाबा-राव याणीं गंगातीरीं स्नानसंध्या करून असावें, कोणीकडे जाऊं नये, असें सांगून शंभर गारदी समागमें देऊन ठिकाणास पोचविलें. इन्त्याजुद्दौला याचे आज्ञेप्रमाणें निघोन कल्याणास राहिले. आमजदनमुलुक पागेवाले यांजकडे बहाली बरतर्फी पहिलेप्रमाणें होतीच. हल्लीं महालचा कारभार रघोत्तमराव करितात तसा बहाली बरतर्फीचा कारभार त्याणींच पाहून घ्यावा याप्रमाणें आहकाम (?) आणोन लाविलें. दस्तक व मोहर दोन मात्र उर्वरित आमजदनमुलुक याजकडे राहिलीं आहेत. प्रतीपै दिंवसैः तदपि आदाय बहि र्निवास्यते. रावरंभा यास रेणुराव गेल्यापासून तगादा होत आहे. परंतु ते जबरदस्तीच्या गोष्टी सांगून आजपर्यंत राहिले आहेत. अजमल उम-राव याणीं पुत्राची कन्या पोलादजंगास देविली. त्यासच तेथील अधिकार द्यावा असें त्यांचें मानस. आणखी चौघे नबाब निजामअल्ली याचे पुत्र आहेत त्यांचे पुठ्यांत कितेक मनसबदार सरदार आहेत. समयास खटला करतील यास्तव पाश तोडावे असें ध्यानांत आणोन यास उपाय योजिला.

---

१ हैदराबादेकडची हालहवाल वर्णन करणारें असलें एक पत्र पूर्वीं याच भागांत छापिलें आहे. त्यानंतर हें पत्र व पुढच्या नंबरास छापलला एका पत्राचा तुकडा अशीं मिळालीं सबब तीं येथें छापिलीं. २ कवाइती पायदळ पलटण.

काय तर खर्ड्यांचे स्वारींतून हजरत बंदेगानअली शहरास आल्यावर आलिज्याबहादूर ज्येष्ठ पुत्र याणीं खूळ करून बेदरच्या आसऱ्यानें लढाई केली. तेथेंही टिकाव न होय तेव्हां औरंगाबादेस जाऊन तेथें हस्तगत जाले. खुळाचे प्रारंभी त्याणीं सर्वांचें संमतपत्र केलें आहे त्याजवर बेवीस माणसांचें दस्तक व मोहोर आहे. तें निमित्य करून हल्लीं सदरहू असामी यांस दशदिशेप्रति संचार करावयास सांगतात. मुख्याची प्रकृति आहे तशी आहे. सर्वभावेंकरून मंत्रीयाचे स्वाधीन. रेणुराव व पागा या दोन गोष्टी खेरीज करून सर्व बंदोबस्त आरस्तु जहांबहादुर यांजकडे सांगितला. त्यापासून संधि पहात असतां सांप्रत काळाची अनुकूल( ता ) होऊन कार्याची सिद्धता संपादून कृतार्थ जाले. धोंडजी वाघ याणीं विजापूर येथें पंधरा हजार रुपये खंडणीचा ऐवज हस्तगत करून घेऊन बागेवाडीकडे गेला असें भीमातीरीं ऐकिलें. सेवेशीं विदित होय.

नं. ५७८३

तपश्चर्या अधिक असें आपण वारंवार बोलल्याप्रमाणें दृष्टिगोचर जालें. सहा चौ महिन्यास एक वेळ बंगल्यावर येणार ते हल्लीं...अगत्येंकरून नेहमीं येतात. मीर अलम याणीं पट्टणाकडील जिनसाना जवाहीर तोफखाना वगैरे आणून सरकारदाखल केला. महत्कार्य करून यश संपादून आले. याजवरून बंदेगानअली बहुत संतुष्ट आहेत. आज पाहतां आरस्तु जहांसमान त्याची योग्यता जाली आहे. प्रस्तुत फौज सरंजामसुद्धां समागमें देऊन मीर अलम यांस शहर बेदरास रवाना करणार अशी वार्ता आहे. कांहीं फौज धारूराकडे जाणार म्हणून बोलतात. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७८४ श्रीगणपति. ( मार्ग. शु० ४–३० नोव्हें. श. १७२१–इ. स. १७९९ )

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाळकृष्णपंत लागू स्वामीचे सेवेशीं.

पोष्य हरि परशुराम. सा॥ नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें तें कळलें. त्या अन्वयें आम्ही फौजेसुद्धां मार्ग॥ शुद्ध पंचमीचे सुमारें येऊन पोंचतों. तुम्ही सावधपणें रहावें. आज मुक्काम करजाळें नजीक म्हमदापूर येथें आहे. मजल दरमजल लौकरच येतों. ती॥ राजश्री कोंकांस व राजश्री

१ गणेश विश्वनाथ पटवर्धन भिलवडीकर.

धोंडोपंतांस पत्रें पाठविलीं आहेत तीं पावतीं करणें बहुत काय लिहिणें हे विनंती.

पै॥ छ० २ रजेब.

नं. ५७८५ श्रीगणपतिर्जयति. ( पौष शु० १२–७ जाने. श. १७२१ )

छ मशरुल अनाम देशमुख व देशपांडे परगणे हुबळी यांसीं.

चिंतामणराव पांडुरंग, सु॥ मय्या तैन व अलफ. आमचा घरगुती जाबसाल अद्याप तुटक जाला नाहीं. त्यास परगणेमजकूर येथील सालमजकूरचा ऐवज पाठविणेंविशीं मिरजेहून ती॥ राजश्री काकासाहेबांकडून पत्र मामलेदार यांस आलेयास तुम्ही वसूल परिच्छिन्न अंमलदार यांजकडे न देणें. जर करतां वसूल तिकडे दिला ऐसें जाहल्यास ऐवज तुम्हास द्यावा लागेल. हे पुर्तेपणें समजोन वसूल त्यांजकडे न देणें. जाणिजे. छ० ११ साबान.

मोर्तबसूद

नं. ५७८६ श्रीगणपतिर्जयति. (वैशाख शु० ८–२ मे.)

राजाश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाळकृष्णपंत भाऊ स्वामीचे सेवेशीं.

पोष्य चिंतामणराव पांडुरंग साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ० १२ सवाल वतमान यथास्थित जाणून स्वकीय लिहीत जावें. विशेष. घोंडजी वाघ याजकडील लुटींतील हत्ती, घोडीं वगैरे चीजबस्त तेथें सांपडली त्याची याद समजली नाहीं. यास्तव राजश्री अण्णाजी जनार्दन यांस पाठविले आहेत. तर जें जें आलें असेल त्याची याद तपशीलवार पाठवावी. येविशीं मिरजेहून वडिलांचे पत्र आल्यास तिकडे कांहीं पाठवूं नये. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

पै॥ छ० ७ जिल्हेज सन मय्यातैन व अलफ.

नं. ५७८७ श्री. ( वैशाख व० १३–२१ मे ).

पै॥ छ० २ मोहरम मय्यातैन.

ती॥ राजश्री आपासाहेब वडिलांचे सेवेशीं.

---

१ गोसले.

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिर सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० २६ जिल्हेजपर्यंत सुखी आहें. विशेष. वडिलीं आशीर्वाद पत्र पाठविलें तें पावलें. पत्रीं आज्ञा कीं पुणियास जावें. त्यास रविवारीं शुद्ध द्वितीयेस मुहूर्त पाहिला आहे. त्या दिवशीं निघोन जातों. सविस्तर मजकूर सूतरस्वांराबरोवर लिहून पाठविला जाहे. त्यास चिरंजीव राजश्री बाबजीपंताची रवानगी करून द्यावी. राजश्री तात्या पागनिसांकडील भवानीपंत आपल्यास विदितच आहेत. त्यांजकडोन एक गृहस्थ नारोपंत म्हणोन हल्लीं आपणाकडे आले आहेत. तात्याचींहि ( आपणास ) पत्रें आहेत.... विदित करितील. घाटगे यांत ईश्वर शेवटास नेईल तेव्हां खरी... सारांश ( बाळोबातात्यांची अद्यापि मुक्तता नाहीं. नारोपंत घाट असा सांगतात तेव्हां मी पुण्यांत जाऊन कसें वर्तावें तें लिहिलें पाहिजे. नाहीं तर मी एक शोधीन आणि आपण एक करतील. तेव्हां कशास कांहीं मिळणार नाहीं. एवढा तांता मात्र यथास्थित राखावा. मला जशी आज्ञा होईल तोच शोध करीत जाईन. या गृहस्थाचें सांगण्यावरून मनसबा बहुत कठिण दिसतो. सारे पटवर्धनांच्या तालुक्याच्या चिठ्या सर्जाराव यास दिल्या असें याचें सांगण्यांत आहे तेव्हां मी पुण्यास जाऊन कसा परिणाम लागेल समजत नाहीं. त्यांत श्रीमंतांचे बुद्धीसही विपर्यास पडला ऐसें आहे. याजवरून परम संकट आहे. श्रीगणपतीचें स्मरण करून निघतों. श्रुत होय हे विनंती.

नं. ५७८८ . श्रीगणराज. ( ज्येष्ठ शु० ३–२६ मे )

चि॥ राजश्री बापूजीपंत परचुरे यांसी प्रंती गंगाधरराव गोविंद आशीर्वाद उपरी. तुम्ही पत्र छ० २४ जिल्हेजचें पाठविलें तें छ० १ मोहरमीं पावलें. धोंडजी वाघाकडील वगैरे वर्तमान दंग्याचें लिहिलें तें कळलें. चि॥ राजश्री चिंतामणराव आपा शहापुराहून पुढें गेले नाहींत. धोंडजी वाघ यासीं घासदाण्याचें बोलणें आजपर्यंत तुम्ही लावलें नाहीं, ठीक केलें. सावधपणें रहावें. चि॥ राजश्री रामचंद्रपंत आपा मनोळी तालुकियांत आहेत. कंपूवाल्यांचा मुक्काम सदलग्यावर होता. हल्लीं जुगोळावर आहेत. मिरजप्रांतीं वगैरे रोखे पत्र करून उपसर्ग मांडला आहे. श्रीइच्छेनें बंदोबस्त त्यांचा होईल तेव्हां खरें. रवाना छ० १ मोहरम. सन मय्यातैन व अल्लफ. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. ५७८९ श्रीगणपति. ( ज्येष्ठ व० ५–११ जून. )

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाळकृष्णपंत लागू स्वामीचे सेवेशीं

पोष्य रामचंद्र परशुराम सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. तालुके सावनूर येथील असाम्या

१ जनार्दन विठ्ठल दिवाण.

१ गोपाळ गोविंद दप्तरदार.

१ आबाजी सदाशिव, हशमाकडील दप्तरदार.

३

एकूण तीन असामींवर गुमास्ते पाठविले आहेत. तरी यांचे हातून दरकाचें कामकाज यथास्थित घेऊन नेमणुकेप्रमाणें वेतन व कारकुनीचा ऐवज सर्वांबरोबर देत जावा. व निसबतीचीं मागसें चालवीत जावीं. रवाना छ० १७ मोहरम. सु॥ इहिदे मय्यातैन व अल्लफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं. ५७९० श्रीगणपति. ( ज्येष्ठ व. १२–१८ जून )

राजाश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाळकृष्णपंत स्वामीचे सेवेशीं.

पोष्य रामचंद्र परशुराम सा॥ नमस्कार विनंती उपरी. नबाब अब्दुल खैरखान सावनूरकर यांस ( सावनूर ) शहर ठाणेंसुद्धां रहावयास व खर्चास दरमहा चार हजार रुपये—शहरचे अंमलाचा ऐवज वजा जाऊन बाकीचा ऐवज—तालुके मजकुरपैकीं पावतो. त्यास सरसालाचा आकार आहे अठ्ठेचाळीस हजारांचा. त्याजपैकीं शहराचा ऐवज पेशजी तीर्थरूप कै॥ भाऊसाहेबानीं जमाबंदी व जकात व कुल आकार होईल त्याजपैकीं गांवखर्च वजा जाऊन बाकी बेरीज लावून देविली आहे त्याप्रमाणें ती बेरीज वजा करून बाकीचे ऐवजास गांव लावून द्यावे म्हणोन राजश्री वेंकटराव शामजीनीं बिदित केलें, त्यावरून हें पत्र लिहिलें आहे. तरी शहरचे लगत ठाण्याखेरीज गांव असतील त्यांजपैकीं सदरहूचे भरतीचे गांव कमाल आकाराचे बेरजेस सालमजकूर अव्वलसालापासून नेमून द्यावे आणि नबाब मशारनिल्हे यानीं आम्हांस एक गांव हजार रुपयेचा सदरहू गांव नेमून द्याल त्याजपैकीं द्यावयाचा करार आहे. त्याजप्रमाणें गांव खासगीकडे घेऊन लिहिलेप्रमाणें सरकारचा जाबसाल उलगडून देणें. याजखेरीज दरबारखर्चाचा ऐवज येणें त्याची निशा राजश्री तमाण्णानाईक कलकेरीकडे करून द्यावयाचा करार आहे. त्यास कलकेरीचें पत्र तम्हांस, कीं 'ऐवजाची निशा आम्हाकडे आली. सरकारचे पत्राप्रमाणें

१ आम्ही नमून देऊं त्यांपैकीं.

शहर व गांव हवाला करणें आणि नबाबास शहरास लावून देणें.' असें पत्र आलेयावर सदरहू लिहिलेप्रमाणें उलगडा करून देणें. रवाना छ० २४ मोहरम बहुत काय लिहिणें हे विनंती

पै॥ छ० १ रबिलावल. सन इहिदे मय्यातैन.

नं. ५७९१ श्रीगणराज. ( आषाढ शु० २–२४ जून. )

चि॥ राजश्री बापूजीपंत परचुरे यांसीं प्रती गंगाधरराव गोविंद आशीर्वाद. उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष. तुम्ही छ० २४ मोहरमचें पत्र पाठविलें तें येथें छ० २९ तारखेस पावलें. "धोंडजी वाघ याची प्रबलता इकडे दिवसेंदिवस विशेष होत चालली. हावनूरखेरीज करून झाडून तालुका काबीज केला. गोखले इकडे येण्याचा सुमार दिसत नाहीं. मुरगोडाजवळ आहेत. लागू यानीं कुंदगोळचा घांस दाणा वाघास कबूल केला असतां दिला नाहीं. जुने हुबळींत येऊन राहिले आहेत. नवी हुबळीचे खंडणीचा जाबसाल उरकला असतां परिणाम लागेल येविशींची आज्ञा काय ?" म्हणोन वगैरे मजकूर तपशीलवार लिहिला तो कळला. ऐसीयास तुमचे लिहिण्यांत वाघाची प्रबलता भारी. तेव्हां घासदाणा देऊन ही महाल राहतो असा अर्थ दिसत नाहीं. श्रीइच्छा प्रमाण ! ठाण्यांत हुशारीनें राहून वरचेवर पत्र पाठवीत जाणें. रवाना छ० १ सफर. सु॥ इहिदे मय्यातैन व अलुफ. बंचाव होत असल्यास थोडे बहुतावर उरकावें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

पै॥ छ० ८ सफर. इहिदे मय्यातैन.

नं. ५७९२ श्रीरामसमर्थ. ( श्राव० शु० १–२२ जुलै. )

( नक्कल. )

दंडवत. विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ० २९ सफरपावेतों यथास्थित जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री आपा निपाणीकर कंपूचे लष्करीं आहेत त्यांचे रोखे ( आमच्या ) सरंजामावरी येत आहेत म्हणोन आपण लिहिलें, त्यास आम्ही ताकीदपत्रें मागितलीं. त्याजवर त्यांचा उद्गार निघाला कीं, कर्नाटकांतून पलटणें फिरंगी यांचीं आलीं त्याचा लक्ष राजश्री रामचंद्रपंत आपा यांणीं

१ येथून खासदस्तूर. २ यशवंतराव घोरपडे अमीर उल् उमरा यांचें बाळासाहेबांस पत्र. ३ दौलतराव शिंद्यांचा.

धरून मसलत सरकारावरी करावी ऐसे विचारांत आहेत, त्यापेक्षां तुम्ही रखवालीचीं पत्रें मागतां याचा आशय कसा आहे तो पक्केपणें आम्हांस समजला पाहिजे; म्हणोन बोलले. तेव्हां आम्ही उत्तर केलें कीं, त्या लगतेंत हे नाहींत म्हणोन. त्यांजकडील कोणी बोलणेंस तुम्हांकडे आले आहेत कीं काय असें बोलणें पडलें; त्यास आपली खंबीरता असलेस कोणी येतील म्हणोन मोघमांत आम्ही उतर केलें. त्यावरून आपणास लिहिलें आहे. आलें मर्जीस तरी कोणी कारकून येथें पाठवून द्यावा म्हणजे श्रीमंतांकडील व येथील दरबारचें हृद्गत समजोन घेऊन मंजूर पडलेसारखे दिवस घालविले जातील. किंवा राजश्री जिवाजीपंत येथें आहेत त्यांसच येविशीं येखत्यारीचें पत्र आपलें आलेस तेही कर्तव्यता करणें तें करतील. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे हे विनंती

नं. ५७९३ श्रीगणपति. ( भाद्र० शु० १३–१ सपटें.)

राजश्री बाळकृष्णपंत[1] स्वामीचे सेवेशीं विनंती उपरी. इंग्रजाकडे जावयाचे कागद तयार जाले. उदईक चालते होतील. त्यास तुमचे कागद व तुम्ही आपलेकडील जोडी माहितगार लवकर तयार करून प्रातःकाळींच पाठवून देणें. रवाना छ० ११ रबिलाखर. हे विनंती. राजश्री नारोपंतास[2] येण्याविषयीं लिहिलें आहे. हे विनंती.

नं. ५७९४ श्री. (आश्विन शु० ८–२६ सपटें. )

विनंती. ' पत्रांत तारीख मुक्काम[3] नाहीं तो कळवावा ' म्हणोन लिहिलें. त्यास मुक्काम कुद्रीमोती तालुके कोपळ. छ० २९ जमादिलावल भृगुवार प्रतिपदा आहे. दुसरे पुरवणींत लिहिलें आहे जे, मोंगलाकडील पीर सादक[4] म्हणोन अंमलदार त्याजकडील वकील इंग्रजांचा कोपळास आहे. तेथें मेजवानीस जाणार. तेथून सावनुरास खैरामिय्या शिरहट्टीस होता त्यास इंग्रजानीं सांगोन पन्नास हजार रुपयेचा तालुका देविला तेथें मेजवानीस जाणार. राजश्री पूर्णय्या हरिहरास आला आहे. मास पक्ष सावनुराच्या रोखें[5] दिवस

---

१ चिठी हरिपंतबाबांची. २ हें वसलीसाहेबाकडे कागद घेऊन जाणाऱ्या कारकुनाचें नांव. ३ मुक्काम वसलीच्या लष्कराचा. ४ सादक्ष असेंही होईल. ५ दरमहा चार हजार रुपये सावनूरच्या नबाबास देणें रामचंद्रपंत अप्पास पुरवेना म्हणून त्यानीं आपण होऊन तितक्या आकाराचे गांव नबाबास नेमून दिले. यांत वसलीचा उपकार नबाबावर कोणताच नाहीं.

घालवावे किंवा धारवाडाच्या असा ( वसलीचा ) बेत आहे. शिंद्याकडील पलटणांनीं उपद्रव चिकोडी तालुकेंत केल्याचें लिहिलें आलें. त्याजवरून इंग्रजांनीं सांगितलें ( कीं ) "पामरसाहेब यास उपद्रव करूं नये असा बंदोबस्त करणेंविशीं पुणियास लिहिलें आहे.ताकीदी येतील." असें उत्तर केलें म्हणे. सारांश एक वाघ जलदी मेला याजमुळें सारे हिसके. नाहीं तर जसें म्हटलें तसें सोईस येतें. कृपा करावी हे विनंती.[1]

नं. ५७९५ श्री. ( आश्विन–आक्टो. )

यादी. इंग्रजांचे स्वारींबरोबर घोडीं व चीजबस्त गेली. सु॥ इहिदे मय्यातैन व अल्लफ.

२ छ० २७ सफर. शिरटीस जातांना धोंडजी वाघ याजकडील स्वारांची गांठ पडोन लढांई जाली ते समयीं पाडाव गेलें सामान.

२ घोडीं. रास २

१ कोकाटी कुमाईत. कपाळीं टिक्का. मागील दोन पाय जवरे.

१ संती घोडी. निळी दांडीस बल्हाणी.

२

३ हत्यारें

१ जनार्दन रामचंद्र. निमच्या तोल सुद्धां.

१ येसाजी हाटकर बारगीर याची तलवार.

१ गुणाजी नागण्ये याची तलवार.

३

९ सनगें.

१ टोपी सखलादी.

२ पांगोटीं.

२ शेले.

२ अंगरखे.

२ घोंगड्या.

९

---

१ पत्र नागो शामजी यांचें बाळासाहेबांस मिरजेस.

८ नक्त.
  ४ रुपये चांदवडी.
  ४ होन एकेरी.
  ———
  ८
———
२२

छ० २० रबिलाखर. भोगानूरचे मुक्कामीं धोंडजीस मारिला ते दिवशीं घोडीं वगैरे सामान गेलें.

४ घोडीं. रास.
  १ घोडी निळी गोमाशी.
  १ घोडा निळा. चेहरा साफ.
  १ घोडी जर्दी. शिंगरूसमेत.
  १ तट्टं मोरगा.
  ———
  ४

१ बैल सर.

२ तरवार व जमदाड.
  १ मानाजी साळोंखे याची तरवार.
  १ खंडोजी यादव याची जमदाड.
  ———
  २

२२ नक्त नाणें एकेरी.
  १० बाळाजी नरसिंव्ह याचे.
  ५ रघोजी साठे.
  ३ बाळू मशालजी.
  ४ पागेपैकीं.
  ———
  २२

४९ नक्त रुपये.
  ३० रघोजी[1] साठे याचे.
  ५ भवानी मिसाळ.
  ३ संभाजी मीरगणे.

---

१ जात मराठी.

१० मानाजी साळोंखे.
१ खंडोजी यादव.
———
४९

२७ भांडीं.

२ घागरी.
१ तपेलें पायलीचें.
१ तपेलें दोन शेराचें.
३ तपेलीं
१ शेराचें.
१ अदशेराचें
१ पावशेराचें.
———
३

१ परात.
२ तवे.
१ पळी पितळेची.
६ तांबे.
५ पातेलीं व बोहगणीं
३ पितळ्या.
१ वाटी.
१ पंचपात्री.
———
२७

२ कंठाळा.
२ पालें.
१ बुरणूस
१ रुमाल दप्तराचा.
२५ सनगें.
७ बाळाजी नरसिंव्ह.
१ शेला.

१ तिवट मोठें.
१ अंगरखा.
१ सोवळें.
१ शालेचा फर्द.
१ धाबळी.
१ सुरती ( सो ) वळें
―――
७

१८ बारगिरांचीं व माणसांचीं.
२ शेले.
५ पागोटीं.
३ घोत्रें.
१ पासोडी.
२ अंगरखे.
५ घोंगड्या.
―――
१८
―――
२५
―――
१३६

नं. ५७९६ श्री.

१ मौजे कळंबें तर्फ परळी या १ दहा वर्षांपूर्वी प्रतिनिधींकडे

---

१ कऱ्हाडचे श्री० राजश्री अण्णासाहेब मुतालीक यांच्या संग्रहीं असलेल्या कागदांत एक कलमबंदीची याद आहे तींतले हें एक कलम येथें उतरून घेतलें आहे. ही याद वासुदेवबाबा मुतालीक व पेशवे दरबार यामध्यें झालेली आहे. मुतालिकांचें म्हणणें डावे रकान्यांत छापिलें असून त्यावरची मसलाशी उजव्या रकान्यांत छापिली आहे ती हरिपंत फडके यांच्या हातची आहे. परभू स्वतःस प्रभु म्हणावितात व लिहिण्यांत प्रभु हेंच पद योजितात. परंतु पेशवाईंत ब्राह्मण त्यास प्रभु न म्हणतां परभू हेंच पद लावीत. वास्तवीक परभूंना प्रभु म्हणण्यांत कांहीं दोष घडतो असें मुळींच नाहीं. पण पेशवाईंत ब्राह्मण त्यांस तसें म्हणत नव्हते हें

[ ६७५१ पृष्ठ पहा. ]

गांवचा मोकासा आपाजी प्रभु सुभेदार सातारा यांजकडे आहे. तेथील अंमल चालत आला आहे त्याप्रमाणें चालवणें. नवीन उपद्रव न करणें

---

[ ६७५० पृष्ठावरून. ]

सरें. आमच्या विधानास बाधक असें या टिप्पणांत प्रथमच उदाहरण आढळलें तेंही वाचकांच्या नजरेसमोर आणणें न्यायाचें आहे असें समजून तसें केलें आहे. तेवढ्यासाठींच हें टिप्पण छापिलें असें मात्र नाहीं. तर हें छापण्यांत आम्हांस आणखी एक महत्वाचा मुद्दा स्पष्ट करावयाचा आहे. देह उर्फ खेडें, कर्यात, परगणा, सरकार व सुभा ही मुलखाची वांटणी मुसलमानी पद्धतीची आहे. शिवाजीमहाराजांचें राज्य डोंगराळ मुलखाचें असल्यामुळें त्यानीं त्याची वांटणी किल्ला व जिल्हा अशी दोनच प्रकारची केली. मध्यवर्ती एक किल्ला व त्याच्या घेऱ्यांत जीं काय पांच पन्नास खेडीं असतील तो त्याचा जिल्हा. किल्ल्याचा अंमल त्या त्या जिल्ह्यावर चालावयाचा आणि जिल्ह्याचें कांहीं उत्पन्न किल्ल्याचे पोषणाकडे जावयाचें असे व बाकीचें प्रांतिक अधिकाऱ्याकडे नेमलेलें असे. किल्ल्याकडे जाणारा ऐवज तो किल्लेचा ऐवज व प्रांतिक अधिकाऱ्याकडे नेमून दिलेला तो जिल्हेचा ऐवज. जिल्ह्यावर ताबा किल्ल्याचा पण जिल्हा व किल्ला या दोहोंवर ताबा प्रांतिक अधिकाऱ्याचा. त्यानें फौज बाळगून आपल्या ताब्यांतले अनेक किल्ले व त्यांचे जिल्हे यांचा बंदोबस्त राखावा. एक किल्ला व त्याचा जिल्हा ओलांडला कीं दुसरा किल्ला व त्याचा जिल्हा. नंतर तिसरा. नंतर चवथा. याप्रमाणें सारें राज्य किल्ले व त्यांचे जिल्हे यानींच व्यापलें होतें. फळ्या, खिळेमोळ्यानीं परस्परांत आवळून ज्याप्रमाणें गलबताचें बारदान पक्कें केलें असतें त्याप्रमाणें किल्ले बांधून महाराजानीं आपलें राज्य जागोजाग जखडून घेतलें होतें, महाराजांच्या कारकीर्दीतल्या सरदारांच्या सरंजामाच्या यादी छापिल्या आहेत त्यांत फक्त किल्ल्यांचीं नावें नमूद असतात त्यावरून ते ते डोंगर व त्यावरच्या इमारती एवढ्यांचाच बोध होतो. या सरंजामांना ऐवज कोणता हा बोध होत नाहीं. वर विवेचन केलें आहे त्यावरून ही अडचण दूर होईल. सातारा व परळी हे किल्ले परशरामपंत प्रतिनिधि यांच्या सरंजामांतले. साताऱ्याचा शूर किल्लेदार प्रयागजी सुभेदार हा महाराजांच्या नेमणुकीचा पण पंतांच्या हाताखालचा. त्याचा पुत्र आपाजी प्रभु. याचें अगत्य मुतालीक यांस असावयाचें कारण ते पंतांच्या घरचे मुख्य अधिकारी. कळंब्याचा मोकासा आपाजी प्रभूस मिळावा व तेथला जिल्हेचा एवज आपल्या नेमणुकींत पूर्वीपासून आहे तो आपणांस मिळत जावा अशी वासुदेवबावा मुतालीक यानीं पेशवे दरबाराजवळ मागणी केली ती या यादींत नमूद आहे. नागोजी शिंदे

जिल्हेचा ऐवज राजश्री वासुदेवपंताकडे आहे. त्यास भवानराव यांच्या दंग्यांत सातारकर यांणीं गांव अडथळला आहे तो सोडून देण्याविशीं पेशजी ताकीदपत्र दिलें. परंतु गांव सोडीत नाहींत. तर त्यांस निक्षून ताकीद होऊन वसूल सुरळीत चाले तें करावें.

म्हणोन नागोजी शिंदे व बाबूराव कृष्ण यांस पत्र.

---

[ ६७५१ पृष्ठावरून. ]

व बाबूराव कृष्ण आपटे हे साताऱ्याचे अधिकारी. किल्ला व जिल्हा या संज्ञा शिवाजीमहाराजानीं प्रचारांत आणिलेल्या असल्या तरी त्या त्यानीं कल्पिलेल्या नसून त्या त्यांच्याही फार पूर्वीच्या आहेत. कारण गायनविद्येंत याच अर्थानें जिल्हा शब्द आलेला आहे. जसें, काफी हा एक स्वतंत्र राग असून त्याच नावाचा त्याचा जिल्हाही आहे. त्यांत काफीचेच सूर प्रायः असून थोडी इतर सुरांची भेसळ केलेली असते. तात्पर्य तो जिल्हाही काफीच्या परिघांत मोडतो.

# शिंद्याचें हिंदुस्थानांत प्रयाण.

प्रस्तुत प्रकरणांतल्या पत्रांचा गोषवारा देण्याची सुरवात करण्यापूर्वी सांप्रत इंग्रजाचें राजकीय धोरण बदलत बदलत हल्लीं कोणत्या स्वरूपाचें झालें होतें व त्यामुळें स्वदेशी राज्यांच्या स्थितींत कशी क्रांति होऊं पहात होती हें आधीं सांगितलें पाहिजे. कारण त्याचा संबंध या प्रकरणांतल्या एका प्रसंगाशीं येत आहे व या पुढचा मराठी इतिहास समजण्यास त्याचा उपयोग-ही मोठा आहे.

पेशव्यांच्या कुळाचा उदय झाल्यापासून या भारतवर्षाच्या राजकीय सत्तेचा केंद्र दक्षिणेकडे झुकला होता तो अद्यापि तसाच कायम होता. ज्यानें दक्षिण जिंकली त्यानें सबंध हिंदुस्थान जिंकल्यासारखेंच होतें. दक्षिणेंत इंग्रज, टिपू, मराठे व मोंगल अशीं चार राज्यें होतीं. त्यांत इंग्रजांस बाकीचीं तीन जिंकावयाचीं असल्यामुळें तो हेतु सिद्धीस नेण्याकरितां सामदंडादि उपायांच्या योजनेंत ते गर्क होऊन गेले होते. त्यांत लार्ड वेलस्लीसाहेबानीं 'सब्सिडियरी अलायन्स्' ची कल्पना काढिली ती इंग्रजांस फारच फायदेशीर झाली. या कल्पनेला आपण "पगारी मैत्री" ची कल्पना असें नांव ठेवूं. जशी मराठ्यांची चौथ सरदेशमुखी तशी ही इंग्रजांची पगारी मैत्री ! या मैत्रीचें स्वरूप असें कीं, इंग्रजांनीं परकी राजास सांगावें कीं तुमचा आमचा दोस्तीचा तह व्हावा. तुमच्या राज्यांत बंडाळी माजली आहे ती मोडण्या-साठीं तुम्ही आमचीं पलटणें चाकरीस ठेवावीं व त्यांचा खर्च चालवावा. आम्ही तुमच्या राज्याचा बंदोबस्त राखूं आणि तुम्हांवर परचक्र येईल तर लागेल तेवढी आणखी फौजेची मदत करूं. इंग्रजांनीं याप्रमाणें त्या दुर्दैवी राजाला लोभ दाखवून एकदां तहाच्या जाळ्यांत अडकविलें, म्हणजे पुढें इंग्रजी फौजेनें त्या राजाच्याच खर्चानें त्याच्याच राजधानींत त्याच्याच उरा-वर संगिनी रोखून रहावें, व त्याची दौलत वाटेल तशी वापरावी, हें सर्व आपोआपच घडत होतें ! निजामअल्ली दुबळे म्हणून त्यानीं इंग्रजांची ही पगारी मैत्री कबूल केली. टिपू जबरदस्त. तो असल्या मानभावी मैत्रीला भीक घालणारा नव्हता. सबब इंग्रजांनीं निजामअल्लीची मदत घेऊन टिपूवर स्वारी केली आणि त्याला मारून त्याचें राज्य घेतलें, त्या राज्यांतला कांहीं हिस्सा

म्हैसूरच्या राजाला देऊन बाकी मुलूख इंग्रज व निजामअल्ली यानीं आपसांत वांटून घेतला. त्या वांटणीच्या वेळीं तुम्ही निजामअल्लीप्रमाणें आमचा पगारी मैत्रीचा तह कबूल कराल व आमचीं पलटणें आपल्या राज्यांत ठेवून घ्याल तर म्हैसूर राज्यापैकीं तुमची वांटणी म्हणून तुम्हाला दहा पांच लक्षांचा मुलूख देतों असें बाजीरावसाहेबांस इंग्रज म्हणत होते. पण स्वराज्याचें स्वातंत्र्य राखण्यांत जागरूक असणारे नाना फडनवीस त्या वेळीं हयात होते. त्यांनीं इंग्रजांस धुडकावून लाविलें व इंग्रजांशीं असला तह करून स्वतःला केव्हांही अडकावून घेऊं नका; घ्याल तर नाश पावाल, असें श्रीमंतांस स्पष्ट बजावलें. त्यामुळें त्यावेळीं इंग्रजांचा लाग साधला नाहीं. तथापि ते निराश झाले असें मात्र नाहीं. ‘आम्हाला दम आहे, नाना कांहीं फार वर्षें वांचत नाहीं. पुढें मागें हाच पेशवा आमच्या घरीं पायां पडत येईल आणि आम्ही म्हणूं त्या शर्तींवर तहाचा कागद लिहून देईल’ अशी त्यांस खात्री वाटत होती.

राज्याची रखवाली हें राजाचें काम. ती रखवाली करण्यांत शिरजोर परकी राजांना भागीदार करणें हें स्वतःचें स्वातंत्र्य गमावण्याचें लक्षण! कोणीही राजा झाला तरी अगदीं केवळ टेंकीस आल्याखेरीज इंग्रजांची ही घातकी मैत्री पतकरणार नाहीं. असें असतां निजामअल्लीनीं ती पतकरली आणि इंग्रजांचा पाय स्वतःच्या दौलतींत शिरकावून घेतला याचें कारण काय? याचें कारण शिंद्याची कवाइती फौज! महादजी शिंदे पुण्यास येतांच मोंगलाईवर मोहीम करण्याच्या गोष्टी बोलूं लागले. ‘डिबॉइन्’ यानें तयार केलेलीं कवाइती पलटणें व तोफखान्याचा जय्यत सरंजाम शिंद्याच्या पदरीं असल्यामुळें निजामअल्ली व त्यांचे कारभारी मशीरउन्मुलूख यांस मोठें भय पडलें. या संकटावर तोड म्हणून त्यांनीं मुसा रेमू या फ्रेंच सरदाराकडून डिबॉइन्च्याच धर्तीवर कवाइती फौज व तोफखाना तयार करविला. पण खर्ड्याचें लढाईंत शिंद्यापुढें रेमूच्या पलटणांचें कांहीं चाललें नाहीं. तीं पराभव पावलीं आणि खर्ड्याची मोहीम संपून तह होऊन गेला तरी मोंगलाईवर स्वारी करण्याची खुमखूम दौलतराव शिंद्याच्या मनांतून जाईना. मशीर पुण्यांत कैदेंत होता तेव्हां त्यानें पुण्याच्या दरबारांतली चंडाळी व शिंद्याचा बोलबाला प्रत्यक्ष पाहिलाच होता. कैदेंतून सुटून हैदराबादेस परत गेल्यावर त्यानें निजामअल्लीस सल्ला दिला कीं, पुण्याचा कारभार हल्लीं अनन्वित स्वच्छंदी

प्रकारानें चालत असतो. त्या दौलतीवर नानांचा आंवर आतां राहिला नाहीं व शिंदा केव्हां काय करील याचा भरंवसाही मानतां येत नाहीं. याकरितां आतां इंग्रजांसारखा कोणी बलिष्ठाचा आश्रय करून आपल्या बचावाची सोय करून ठेवावी हें उत्तम. निजामअल्ली वार्धक्यानें जर्जर झाले होते. त्यांना हा सल्ला मानवला. त्यानीं इंग्रजांकडे मैत्रीचा प्रेष करतांच तिकडून तत्काळ रुकार मिळाला हें सांगावयास नकोच. कारण नबाबाकडून असलें बोलणें आपणाकडे यावें यासाठीं लॉर्ड वेलस्ली यांचे दीर्घ प्रयत्न आजपर्यंत अव्याहत सुरूच होते. नंतर निजाम व इंग्रज यांमध्यें तह ठरला. त्यांत असें ठरलें कीं, इंग्रजाचीं सहा काळीं पलटणें व त्यांच्या तोफा व गोरे गोलंदाजसुद्धां सर्व सरंजाम निजामअल्लीनीं आपल्या हद्दींत नेहमीं चाकरीस ठेवावा व त्याच्या खर्चाबद्दल इंग्रजांस सालीना चोवीस लक्ष रुपये देत जावे.

या तहाप्रमाणें इंग्रजी पलटणें मोंगलाईंत येऊन चाकरीस हजर झालीं. त्यानंतर वर्ष दोन वर्षें लोटतात न लोटतात तोंच वरील तहाची स्वतःला सर्वस्वी फायदेशीर अशी दुरुस्ती करून घेण्याची इंग्रजांनां संधी सांपडली ती त्यानीं वायां जाऊं दिली नाहीं. निजामअल्ली फार वृद्ध व दुखणेकरी झाल्यामुळें त्यानीं राज्यकारभारांतून मन काढलें होतें व राज्याचा सर्व बंदोबस्त व अखत्यार मैनुद्दौला उर्फ मशीरुल्मुलुख याजवर सोंपविला होता. शिंद्यांना मशीर किती भीत होता हें पूर्वीं दाखविलेंच आहे. धोंडजी वाघाच्या निमित्तानें करवीरकरांचें व वसलीबहाद्दरांचें युद्ध जुंपण्याचा प्रसंग आला तेव्हां करवीरकरांस मदत करण्याच्या उद्देशानें शिंद्यांनीं आपल्या पलटणांची व फौजेची जारीनें तयारी सुरू केली तेव्हां आपला मतलब झांकण्याकरितां ही सर्व तयारी निजामअल्लीवर स्वारी करण्याकरितां आहे असा त्यानीं खोटाच बोभाटा केला होता. तो बोभाटा खोटा आहे हें इंग्रजांस माहीत असतांही त्यानीं शिंद्याच्या स्वारीचा धाक मैनुद्दौला यास दाखवून फार घाबरें केलें आणि त्याजकडून पूर्वीच्या तहाची दुरुस्ती करून घेतली. या दुरुस्तीचें तात्पर्य असें होतें कीं पूर्वींच्या तहाखेरीज आणखी दोन पलटणें इंग्रजांनीं नबाबाच्या चाकरीस ठेवावीं आणि या सर्व फौजेच्या खर्चासाठीं नबाबानीं आपल्या राज्यापैकीं सांप्रत बल्लारी व कडपा या जिल्ह्यांत मोडणारा चाळीस लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख निराळा तोडून इंग्रजांच्या हवालीं करावा. शिवाय या नवीन तहांतलें अत्यंत महत्वाचें कलम असें होतें कीं, नबाबाचें राज्य राखणें व त्यावर

येणाऱ्या कोणत्याही परचक्राचें निवारण करणें या दोन गोष्टींबद्दलची हमी इंग्रजानीं पतकरावी. राजा म्हणून म्हणविण्याजोगा निजाम अल्लीचा बोज पूर्वींच्या तहांत कांहीं तरी राहिला होता. पण या नवीन तहामुळें त्याच्या राजेपणाचा आब अगदींच मावळला ! याउप्पर मोंगलाई आणि इंग्रजी अशीं नावें मात्र निराळीं, परंतु जें इंग्रजांचें धोरण, वागणूक व कारस्थान असेल तें सर्व तसेंच मोंगलाई दरबाराचें असलें पाहिजे हा प्रकार ओघानेंच प्राप्त झाला.

इंग्रजांच्या राजकीय धोरणाचा कसा उत्कर्ष होत गेला हें एवढा वेळ सांगितलें. आतां आपण पेशव्यांच्या दरबारांत यावेळीं जी खळबळ उडाली होती तिकडे लक्ष पुरवूं. बाजीरावसाहेबांशीं विरोध करण्यासारखे जेवढे म्हणून मराठी राज्यांतले बलाढ्य मुत्सद्दी व सरदार होते त्या सर्वांचा नायनाट करण्यासाठीं श्रीमंतानीं आज पांच चार वर्षें शिंद्यास त्याच्या कंपूसह व फौजेसह पुण्यांत राहून घेतलें होतें. या अवधींत श्रीमंतांच्या डोळ्यांत सलणारे ते सर्व लोक मेले, गेले किंवा कैदेंत पडले, त्यांचा ग्रंथ आटपला, तेव्हां आतां श्रीमंतांना तोच दौलतराव शिंदा डोळ्यांसमोरसुद्धां नकोसा झाला ! तो केव्हां एकदां इथून तळ हालवून हिंदुस्थानची वाट धरील आणे त्याच्या उपाधीपासून मुक्त होऊन आपण निर्भयपणानें आणि स्वच्छंदानें केव्हां एकदां राज्य करावयास लागूं असें श्रीमंतांना झालें होतें ! तथापि दौलतरावास जा म्हणावें कुणी ? आणि कोणीही जा म्हटल्यानें तो जाग्यावरून थोडाच हालणारा होता ! पण या वेळीं बाजीरावसाहेबांच्या सुदैवानें असा योग आपोआप जमून आला कीं ज्यामुळें दक्षिणेंतलीं सर्व कामें टाकून शिंद्यास घाईघाईनें हिंदुस्थानांत निघून जाणें प्राप्त झालें ! बाया व यशवंतराव होळकर व लखबादादा लाड यानीं मोठमोठ्यां फौजा बाळगून शिंद्याचा हिंदुस्थानांत जेवढा म्हणून मुलूख होता तेवढा सर्व ग्रासून टाकिला होता. याउप्पर त्यांची उपेक्षा करावी तर पुन्हां नर्मदेपलीकडे पाऊल टाकण्याची आशा ठेवूं नये असाच प्रसंग दौलतराव शिंद्यास प्राप्त झाला. तेव्हां त्यानीं सत्वर पुण्यांतून तळ हालवून माळव्यांत जाण्याचा निश्चय कायम केला.

एतावता दौलतराव जातात हें तर ठरलेंच, व त्या अनुषंगानें त्यांची पाठवणी करण्याचा प्रसंग साजरा करणें श्रीमंतांस प्राप्त झालें. शिंद्यांनीं त्यांस

पेशवाई मिळवून दिली— त्यांचें राज्य निर्वैर केलें— त्यांवर फार उपकार केले, हें सर्व खरेंच होतें. त्यांच्या उपकाराची फेड करण्याकरितां ते मागतील तितका पैका व मुलूख त्यांस देणें श्रीमंतांना भाग होतें. परंतु त्यांचें मनोगत पाहिलें तर तें आतां असें होतें कीं, आतां नवीन मुलूख—विशेषेंकरून दक्षिणेंतला मुलूख शिंद्यास कांहीं एक देऊं नये ! अशी त्यांची वासना होती ! पैका तर त्याजवळ फारसा द्यायला नव्हताच. तथापि या लक्ष्मी-दानाच्या बाबतींतसुद्धां एखाद्या नाठाळ कुळाप्रमाणें देतों देतों असें फक्त सरस्वतीदान करीत करीत दिवस घालवावे. त्यांतून शिंदा काय जबरदस्तीनें वसूल करील तो करो ! हाच त्यांचा बेत ठरला होता. उलटपक्षीं श्रीमंतां-कडून काय निघेल तें काढून घेण्याची हीच अखेरची वेळ आहे असें समजून शिंद्यानीं आपली मागणी अपरंपार वाढविली होती. शिंद्यांची प्रथमची मागणी अशी होती कीं आपणास दक्षिणेंत दहा लक्षांचा सरंजाम द्यावा. त्यांत प्रतिनिधींच्या सरंजामापैकीं पांच लक्षांचा व इतर पांच लक्षांचा असा द्यावा. आपणास गादीवर बसविल्याबद्दल श्रीमंतानीं पूर्वीं नगरचा किल्ला व दहा लक्षांचा सरंजाम शिंद्यास दिलाच होता. आतां आणखी दहा लक्षांचा सरंजाम शिंदे मागूं लागले तेव्हां त्यांस होय म्हणणें श्रीमंतांच्या जिवावर आलें. पण ते तरी काय करणार ? त्यांच्या होय नाहीं म्हणण्याची पर्वा न मानतां शिंद्यानीं मागितलेला मुलूख ताब्यांत घेण्याचा उपक्रम केला. त्यांचें एक पलटण व चार तोफा कोरेगांवानजीक चिमणगांव येथें आल्या व पंतांच्या वर्धनगड किल्ल्यास त्यानीं वेध लाविला. किल्लेकऱ्यांचें व त्यांचें झुंज सुरूं झालें तों इतक्यांत हें दहा लक्षांचें मागणें तितकेंच ठेवून शिंद्यानीं श्रीमंतांजवळ नवीन मागणें असें केलें कीं, आपणास तुंगभद्रेपासून धारवाडापर्यंतचा सर्व मुलूख सरंजामांत द्यावा ! एवढ्या थोरल्या मुलखाचें उत्पन्न चाळीस लक्षांत खचित कमी नसावें. या टापूंत पटवर्धनांच्या जहागिरीचे तालुके, त्यांजकडे सावनूर राज्यापैकीं रदकर्जास लावून दिलेले महाल, गोखले व भावे यांच्या जहागिरी आणि सरकारचे कित्येक खालसा परगणे या सर्वांचा समावेश होत होता.

श्रीमंतानीं आश्चर्यानें स्तब्ध व्हावें अशीच ही मागणी होती. पण शिंद्यापुढें त्यांचें काय चालणार ? हा सर्व मुलूख आम्हास पाहिजेच, तो आम्ही घेणारच याप्रमाणें दौलतराव बोलूं लागले तेव्हां बाजीरावसाहेबानीं

शिंद्यांस सांगितलें कीं, तुम्ही वाटेल तितक्या राज्याच्या सनदा लिहून तयार करा, मी त्यांवर शिक्केमोर्तब करून देतों ! ही मान्यता अर्थातच बाह्यात्कारी होती. कारण ज्या ज्या तालुक्याच्या सनदा त्यानीं शिंद्यास लिहून दिल्या त्या त्या तालुक्याच्या अंमलदारांस त्यानीं आंतून गुप्तपणानें आमच्या सनदा मानूं नयेत, शिंद्याचीं माणसें कोणी तालुक्याचा कबजा मागावयास येतील तर त्यांस हांकून लावावें, अशीं पत्रें पाठविलीं होतीं. पटवर्धन व गोखले यांसही त्यांचा गुप्त हुकूम गेला होता कीं निरुपायामुळें तुमचे सरंजाम व तालुके आम्ही शिंद्यास दिले खरे, परंतु आमच्या सनदा तुम्ही मानूं नयेत व लढाई-खेरीज शिंद्याच्या हाताला एकही खेडें लागूं देऊं नये !

शिंद्यांचा कारभार स्वच्छंदी. त्यांचा दिवाण सर्जेराव हा उत्पाती माणूस. त्या दोघांचा हिरमोड करण्यासाठीं श्रीमंतानीं काय तजवीज करायची ती वर लिहिल्याप्रमाणें करून ठेविली तरी तेवढ्यानें परिणाम लागेलसें त्यांच्या मनास वाटेना, आणि ते दोघे कोणत्या अतिप्रसंगाला प्रवृत्त होतील व केव्हां काय करतील हें भय त्यांच्या मनांतून जाईना. त्यामुळें शिंद्याचें पाऊल पुण्यांतून हालेपर्यंत त्यांचा प्रत्येक दिवस मोठ्या काळजींत जात होता.

दक्षिणेंतल्या राज्यांपैकीं टिपू व निजामअल्ली यांचीं राज्यें आक्रांत केल्यावर मराठी राज्य घशाखालीं केव्हां उतरतें म्हणून लॉर्ड वेलस्ली-साहेब ऑ करून बसले होते. मोंगलाई राज्य काबूंत आणण्याची करामत हैदराबादेचा रेसिडेंट कर्क पॅट्रिक यानें करून दाखविली त्याप्रमाणें तूंही कांहीं करामत करून दाखव अशी त्यांची पुण्याचा रेसिडेंट कर्नेल पालमर यास एकसारखी टोंचणी सुरू होती. पालमर स्वस्थ बसला होता असें नाहीं. मराठी राजकारणाच्या काळजांत आपला शिरकाव करून घेण्याचा त्याचा उद्योग एकसारखा चालूच होता हें या भागांतल्या मजकुरावरूनसुद्धां दाख-वितां येईल. नानांच्या स्त्रीस दत्तक देण्याविषयीं त्यानें बाजीरावसाहेबांस शिफारस केली. ( पृ० ६३३२ ) शिंद्याच्या पलटणवाल्यानीं बाळोबातात्याशीं विश्वासघात करून त्यास शिंद्याच्या हवालीं केलें याबद्दल त्या गोऱ्या पलटणवाल्यांचा त्यानें धिःकार केला. ( पृ० ६४६२ ) पेशव्यांची दिवाण-गिरी सर्जेरावास मिळूं नये म्हणून अमृतरावाची खटपट सुरू होती तींत त्यास पालमरचें पाठबळ होतें. ( पृ० ६४६३ ) शिवाय बाळोबातात्यांस शिंद्याच्या कैदेंतून सोडविण्याविषयीं धोंडीबादादाचें व पालमरचें बोलणें

सुरू झालें होतें असाही उल्लेख अन्यत्र आढळतो. ( Selections from state papers Bombay P. P. ) पूर्वींचा इंग्रज रेसिडेंट मालिटसाहेब पेशवाईच्या अंतर्गत कारभारांत केव्हांही मन घालीत नसे. आपलें काम बरें कीं आपण बरे असा त्याचा व्यवहार चाले. आणि हा नवीन रेसिडेंट नाना फडनवीस मेल्याबरोबर आतां मराठी दरबाराच्या कामांत ढवळाढवळ करूं लागला ही गोष्ट पेशव्यांच्याच काय पण कोणाच्याही लक्षांत सहज येण्याजोगी होती.

असो. पालमरच्या खटपटी वर सांगितल्या त्यांत शिंद्यास फिकें पाडावें व त्याच्या विरुद्ध बाजूला जे जे लोक असतील त्यांस मदत करावी असें त्याचें धोरण होतें हें दिसून येईल. शिंद्याच्या जुलमामुळें व शिरजोरपणामुळें नाडलेल्या लोकांचा कैवार घेणाऱ्यापैकीं आपण आहों हें जाहीर करण्यांत त्यानें बाकी ठेविली नव्हती. शिंद्यानीं बाजीरावसाहेबांस कसें घेरलें होतें हें तो प्रत्यक्ष पहातच होता. ते दोघे पुन्हां पुन्हां वर्दळीवर आल्यासारखें दिसे तेव्हां त्यास मोठी आशा उत्पन्न होई. पण शिंद्याचा जाच असह्य झाल्यामुळें त्यांतून सुटण्याकरितां पेशव्यानीं आपणाकडे धांव घ्यावी हा प्रसंग त्यास यावयास पाहिजे होता तो कांहीं केल्या येईना ! अखेरीस वाट पहातां पहातां तोही पर्वकाळ त्यास प्राप्त होऊन त्याची हौस बाजीरावसाहेबानीं पूर्ण केली !

कर्नल पालमर यास काय व्हावयास पाहिजे होतें तें बाजीरावसाहेबानीं ताडलें होतें. दक्षिण महाराष्ट्राचा मुलूख आपणास देण्याविषयीं श्रीमंतांस शिंद्यांनीं कसें कचाटींत धरलें होतें हें पूर्वीं दर्शविलेंच आहे. आगष्ट महिन्याला सुरवात होण्याच्या सुमारास शिंद्याच्या जिकिरीचा अगदीं कळस होऊन गेला होता. त्या दिवसांत बाजीरावसाहेबांच्या मनांत अशी कल्पना आली कीं, शिंद्याच्या त्रासांतून सुटण्याकरितां इंग्रजांची उठावणी केल्याची हूल दाखवावी म्हणजे त्या दहशतीनें शिंदे मुलूख मागण्याचा हट्ट सोडतील व आपणावर आलेलें संकट टळेल. कर्नल पालमरच्या लुब्रेपणाचा या कामीं चांगलाच फायदा करून घेतां येईल असें त्यांस दिसून आलें आणि त्याच्याच द्वारानें त्यांनीं मनांत आणिलेला हेतु सिद्धीस नेला. त्यांतल्या त्यांत स्वतः एकाही अक्षरानें दस्तैवजांत न सांपडतां परभारेंच्या परभारें आपल्या दरबारी लोकांकडून हें काम त्यानीं करविलें व आपण नामानिराळे

राहिले ही विशेष तारफेची गोष्ट आहे. या कार्याचा उपक्रम कसा कसा झाला हा तपशील कर्नल पालमर यानें आपल्या वरिष्ठांस केलेल्या रिपोर्टीत सांपडावयाचा, पण ते रिपोर्ट उपलब्ध नाहींत. तथापि 'वेलिंग्टन्स् डिस्पॅचीस' या पुस्तकांत जागोजाग आलेल्या उल्लेखांवरून तर्कानें हा तपशील जुळवितां येतो. तो असा—

एके दिवशीं हे श्रीमंतांचे दरबारी कर्नल पाल्मर याजकडे आले, व बोलूं लागले कीं, शिंद्यानें श्रीमंतांस ग्रासून टाकिलें. शिंद्याच्या परवानगीखेरीज कोणाजवळ अक्षरदेखील त्यांस बोलतां येत नाहीं. शिंदा म्हणतो तें तें झालेंच पाहिजे असें चाललें आहे. श्रीमंत उगीच नामधारी मालक आहेत. चोहोंकडे शिंदेशाही व सर्जेरावी माजली आहे. त्यामुळें श्रीमंतांना वैताग आला आहे व कोठें तरी पळून जावें असा त्यांचा बेत आहे. पण तो तरी सिद्धीस कसा जाणार ? कारण त्यांच्या वाड्यावर शिंद्यांचा पहारा आहे हें तुम्हांला ठाऊकच असेल. शिंदा मागतो तितका मुलूख श्रीमंतांच्यानें देववत नाहीं व मुलूख न देण्याचा आग्रह त्यांनीं आठ चार दिवसांत सोडला तर बरें, नाहींतर शिंदा त्यांस कैदेंत बसविणार आणि नवीन पेशवा गादीवर बसवून आपलें कार्य सिद्धीस नेणार हें स्पष्ट दिसतें आहे. आमचेही प्राण धोक्यांतच आहेत. या संकटाला उपाय काय करावा ? हीं बोलणीं ऐकून पालमर यास हर्षाचा उमाळा आला. तो त्या मंडळीस म्हणाला कीं, तुम्ही कांहीं चिंता करूं नये. शिंद्याची बंडाळी मोडण्याची तजवीज आपण गव्हर्नर जनरल साहेब यांस लिहून ताबडतोब करवितों. वसलीबहाद्दरांची फौज लढाईच्या तयारीनें आयर्ता मोहिमेवर निघालेलीच आहे. लॉर्ड वेलस्लीसाहेब त्यास पुण्यावर चालून येण्याविषयीं हुकूम लिहितील व त्याप्रमाणें ते जलदीनें येथें येऊन शिंद्याचें पारिपत्य करितील.

याप्रमाणें उत्तर प्रत्युत्तर झाल्यावर याच बैठकींत पुढील मसलतीची रूपरेषा निश्चित झाली. त्यांत त्याच वेळीं बाजीरावसाहेबांचा बचाव करण्यासाठीं म्हणून एक गुप्त मंत्रिमंडळ ( Secret commission ) स्थापलें गेलें. या मंडळाचे सभासद कोण कोण होते हें कोठें लिहिलेलें नाहीं. पण आम्हांस अजमासानें तीं नावें सांगतां येण्यासारखीं आहेत. पेशव्याकडून रेसिडेंटाकडे नेहमीं जाणारे येणारे गोपाळराव मुनशी व बडेखान हे तर त्यांत असायचेच. शिवाय बाळोजी कुंजर मुख्य दिवाण म्हणून आणि सदाशिव माणकेश्वर

मोंगलाई दरबार संभाळणारा म्हणून यांत पाहिजेच. आणखीही चार दोन प्रमुख प्रमुख मुत्सद्दी या बेतांत असावेत. या वेळीं अमृतराव जरी दूर वसईस रहात होते तरी या कटवाल्यानीं—स्वबुद्धीनें म्हणा किंवा पाल्मरच्या सूचनेवरून म्हणा—त्यांस आपल्या मंडळाचे मुख्य नेमिलें व त्यानीं फौज चाकरीस ठेवून इंग्रजांची कुमक करावी असें ठरविलें. ते पेशव्यांचे बंधु होते, शिंद्याशीं त्यांचें वांकडें होतें आणि त्यांस लष्करी कामाचा अनुभव होता, त्यावरून त्यांवर सोपविलेलें काम ते उत्तमप्रकारें करतील याविषयीं कोणास संशय नव्हताच. पाल्मर व हे उपटसुंभे मंत्री यांच्या मतानें योजिलेल्या मसलतीचा बनाव तर उत्तमप्रकारें बसल्याचा रंग दिसूं लागला. कारण गव्हर्नर जनरलसाहेब यांचा हुकूम पोंचतांच वसलीसाहेब पुण्यावर चालून येणारच. त्यांच्या बगलेंत पटवर्धन, गोखले व पानशे आहेतच. त्यांस सूचना जातांच तेही आपापल्या फौजा घेऊन वसलीबरोबर येतीलच. या इंग्रजी व मराठी फौजा पुण्यास पोंचतात तों कोकणांतून अमृतराव येतील व पेशव्यांच्या तर्फेनें सर्व मराठी फौजांचे मुख्य अधिकारी होतील. हें झाल्यावर आपण येथें जमलेले आहों ते गुप्त मंत्री प्रकट होऊं व पेशव्यांच्या नांवें राज्यकारभार हातीं घेऊं व वसलीबहाद्दरांस लागेल ती मदत देऊं. इतकी सिद्धता झाल्यावर वसलीच्या अजिंक्य फौजेपुढें शिंद्याचें काय चालणार आहे? याप्रमाणें या गुप्तमंडळाचा व कर्नल पाल्मरचा बेत सर्व ठाकठीक जुळला.

वर लिहिल्याप्रमाणें अलिजाबहाद्दरांस पुण्यांतून हुसकून लावण्याकरितां वसलीबहाद्दरांस आणविण्याचा ठराव पंतप्रधान—पदवी—संरक्षक गुप्त—मंत्री—मंडळाच्या सभेंत सर्वानुमतें पसार झाल्यावर कर्नल पाल्मर यानें हा सर्व मजकूर लॉर्ड वेलस्लीसाहेब यांस तावडतोब लिहून कळविला. त्यांनीं या मसलतीस मोठ्या खुषीनें मान्यता दिली. पण पाल्मरप्रमाणें ते हुरळूनमात्र गेले नाहींत. बाजीरावाचा दस्तैवज आपणाजवळ कांहीं एक नसतां त्याच्या बचावासाठीं म्हणून कां होईना—पण त्याच्या राज्यांत शिरून त्याच्याच मुख्य सरदाराशीं कुरापत काढण्याची मसलत आपणास करावयाची आहे. बाजीराव जरी हल्लीं मोठ्या संकटांत सांपडला असला तरी तो लुच्चा माणूस आहे हें विसरून चालावयाचें नाहीं. न जाणो, तुम्हांला ही उठाठेव करायला मीं सांगितलें नव्हतें, तुम्ही काय म्हणून माझ्या राज्यांत येऊन बंडाळी माजविलीत, असें जर तो पुढें मागें म्हणूं लागला तर काय करावें? तर या मसलतींत जपून जपूनच पुढें पाऊल टाकलें

पाहिजे. उतावळीनें कांहीं तरी करावें आणि मागून पस्तावव्यांत पडावें हें ठीक नाहीं, असा पोक्त विचार करून लॉर्ड वेलस्ली यानीं आगष्ट महिन्याच्या अखेरीस वसलीबहाद्दरांस हुकूम पाठविला. त्यांत ही सर्व हकीगत त्यांस कळवून स्पष्ट लिहिलें होतें कीं, तुम्ही वाघाची मोहीम कशी तरी लवकर आटपून मोकळें व्हावें आणि मराठी मुलखांत कोठें तरी सोईची जागा पाहून लढाईच्या तयारीनें तळ देऊन रहावें. शिंद्यानें बाजीरावास कदेंत बसाविलें अगर बाजीराव पुणें सोडून पळून गेला या दोन गोष्टींपैकीं कोणती तरी एक गोष्ट घडल्याचें जर तुम्हास कर्नल पामर पुण्याहून लिहून पाठवील तर तुम्ही तत्काळ पुण्यावर चाल करून जावें आणि शिंद्यास हुसकून लावून बाजीरावाची सत्ता पुन्हां प्रस्थापित करावी. नंतर पुढें काय काय करावयाचें तें आम्ही पाहून घेऊं. मात्र वर लिहिलेल्या दोन गोष्टींपैकीं कोणती तरी एक गोष्ट घडल्याची पक्की खात्री झाल्याखेरीज तुम्ही पुढें पाऊल टाकूं नये व शिंद्याशीं बिघाड केल्याचें चिन्ह यत्किंचित् सुद्धां दाखवूं नये.

लॉर्ड वेलस्ली यांचा हा हुकूम आगष्ट महिन्याच्या २८ व्या तारखेस वसलीबहाद्दर यांस पोंचला. त्यावेळीं ते वाघावर चालू असलेल्या मोहिमेंत गर्क होऊन गेले होते तरी या नवीन मसलतीचे विचारही तेव्हांपासून त्यांच्या मनांत घोळत होतेच. तथापि धोंडजी वाघ मरेपर्यंत यासंबंधाचें एक अक्षरसुद्धां त्यांनीं आपले सोबती पटवर्धन, गोखले व लागू यांजवळ काढलें नाहीं, इतकेंच नव्हे तर वाघाची मोहीम संपल्यावरसुद्धां आपण पुढें काय करणार याचा कांहीं एक मागमूस त्यांनीं आपल्या या मराठी सोबत्यांस लागूं दिला नाहीं. उघडच आहे. खेळीमेळीनें वागणारा व गोडगोड बोलणारा आमचा हा इंग्रज दोस्त पेशवाईच्या स्वातंत्र्यवृक्षावर घाव घालण्याकरितां कुऱ्हाड पाजळतो आहे असें जर त्यांस कळलें असतें तर ते तत्काळ बिथरून मैत्रीचा बेरंग झाला असता. वसलीसाहेबांना तर या मराठी सरदारांच्या मैत्रीची अत्यंत जरूर होती. कारण या वाघाच्या स्वारींत जसा त्यांचा आपणास मोठा उपयोग झाला तसा तो पुढच्याही मसलतींत करून घेतां येईल असा त्यांस भरंवसा वाटत होता. यासाठीं आपलें इंगित झांकण्याकरितां ते फार सावधपणानें वागत असत.

वाघास मारून वसलीसाहेब परत फिरले ते दहा बारा दिवसांनीं कोपळास आले हें मागें सांगितलेंच आहे. वाटेंत बापू गोखले व चिंतामण-

राव आपा यानीं आपापल्या ठिकाणास जाण्याकरितां त्यांजवळ निरोप मागितला. त्यानीं जाऊं नये, आपल्या लष्करावरोबरच कांहीं दिवस रहावें अशी त्यांची इच्छा होती. पण तें कशाकरितां हें त्यांस सांगतां येईना सबब त्यांचा नाइलाज होऊन त्यानीं त्यांस मोठ्या कष्टानें निरोप दिला. तथापि निरोप देतांना अजून कांहीं दिवस आम्हांपासून दूर जाऊं नये, जवळपास असावें असें त्यानीं त्यांस सांगितल्यावरूनच चिंतामणराव लक्ष्मेश्वर तालुक्यांत व गोखले नवलगुंद तालुक्यांत जाऊन राहिले होते.

कोपळच्या मुक्कामास आल्यावर आतां पुढें इंग्रजी लष्कर निजामअल्लीकडून नवीन मिळालेल्या कडपें कर्नुळ वगैरे तालुक्यांत अंमल बसविण्याकरितां तिकडे जाईल असें लोकांस वाटत होतें. पण तो त्यांचा कयास अगदींच चुकला ! प्रथम वसली बहाद्दरानीं तुंगभद्रापार होण्यासाठीं थोड्याशा हालचाली केल्यासारखें दाखविलें खरें, पण पुढें एकाएकीं तो रोंख बदलून ते जे तडक निघाले ते सप्टेंबरच्या २७ व्या तारखेस डंबळास जाले आणि तेथून निघून ता० ३ आक्टोबर रोजीं हुबळीस येऊन तेथें लष्करचा तळ देऊन राहिले.

चार महिन्यांपूर्वीं वाघाची धामधूम सुरू होती ती मोडण्यासाठीं वसलीसाहेब या देशीं आले. त्या प्रसंगीं त्यांच्या येण्यामुळें महाराष्ट्रांत कसे तर्क वितर्क उत्पन्न झाले व लोकांस किती धास्ती वाटली याचें विवेचन मागच्या प्रकरणीं आलेंच आहे. त्यांचें लष्कर वाघाच्या पाठीस लागत इकडून तुंगभद्रेकडे दूर गेलें तेव्हां बरी पीडा गेली असें मानून लोकांचीं मनें अंमळ शांत होतात न होतात तोंच पुन्हां ही इंग्रजांची ब्याद अकस्मात् या देशीं येऊन बसल्यावर पुन्हां सर्व महाराष्ट्र सभय व चिंताक्रांत व्हावा यांत आश्चर्य तें काय ? " इंग्रज पलटणें हुबळीस आलीं. त्यांचा उद्योग दीर्घ दिसतो. वरचेवर जमियत मिळत आहे. मागें जाण्याचा रंग नाहीं उमेद पुढें येण्याची आहे. " " इंग्रज मसलत समजूं देत नाहीं. कूच ( कोणीकडे होणार हें ) देखील कळत नाहीं. आम्ही बरोबर राहून देखील कळवितात असें घडत नाहीं. " " इंग्रज हुबळीवर आहे. हुबळीस कोठी केली आहे. तेथेंच जम पाडतो. पुण्यापर्यंत चाल करणार. " " इंग्रज वसली हुबळीवर आहे. त्याचे मनांतील समजत नाहीं. परंतु माघारा जात नाहीं. पट्टणाहून इंग्रजांचे पन्नास हजार बैल भरून येतात तेव्हां काय

मनसबा कळेना. " " ताम्रमुखी यांचा सरंजाम बेमुबलग येतो. हजार बैल फरासखान्याचा सरंजाम आला. याचप्रमाणें सावनुरास जाकिरा होत आहे. " " इंग्रज हुबळीवर आहेत. धारवाडास वेध लावणार. शिंद्या वगैरे सामान करवितात. " वसलीच्या लष्करांतून या प्रकारचीं बातमीपत्रें येत होतीं तीं जरी लोकांस भयप्रद वाटत होतीं तरी या उत्पाताचें बीज बाजीरावसाहेबांच्या कुटिल कारस्थानांत आहे हें त्या वेळीं कोणाच्याच लक्षांत आलें नाहीं !

मोंगलाई राज्याचा चालक मैनुद्दौला ऊर्फ मशीर उल्मुलूक हा इंग्रजांचा कसा बंदा बनून राहिला होता हें पूर्वी सविस्तर सांगितलेंच आहे. लॉर्ड वेलस्ली यानीं वसली बहाद्दरांस गुप्त हुकूम पाठविला त्याच वेळीं त्याचें तात्पर्य मैनुद्दौला यांस कळवून वसलीची सर्व प्रकारें कुमक करण्याविषयीं त्यास सूचना केली. शिंद्याची खुमखुम मोडावी हें मैनुद्दौला याच्या मनांत होतेंच. वसलीबहाद्दर हुबळीस पोंचतात तों मैनुद्दौलानें नबाबाच्या चाकरीस असलेलीं इंग्रजी सहा पलटणें व दहा बारा हजार स्वांर व तोफा असा सरंजाम परांडा येथें गोळा केला. याशिवाय त्यानें सात आठ हजार फौज राक्षसभुवन येथें आणून ठेविली आणि आपल्या सरहद्दीवर जागोजाग धान्याचीं कोठारें व दारूगोळा वगैरे लढाऊ सरंजाम तयार करून ठेविला. वसलीसाहेबांकडून इशारा येण्याचा अवकाश, कीं या दोनी मोंगल फौजांनीं आपली सरहद्द ओलांडून इंग्रजी लष्करास मिळावें असें ठरलें होतें.

राजा बोले आणि दळ हाले या म्हणींतल्या राजाला निदान एखादा तरी शब्द बोलावा लागतो व त्या शब्दावरून जें दळ हालतें तें त्याच्या पदरचें असतें. येथें बाजीरावसाहेब बोलले तर कांहींच नाहींत आणि त्यांनीं परक्या इंग्रजांचे व मोंगलांचें लष्करमात्र उगीचच्या उगीच हेलपाटे घालायला लावून घामाघूम केलें ! हा त्यानीं आपल्या बुद्धिप्रभावानें घडवून आणिलेला चमत्कार आश्चर्यकारक आहे खरा ! ही लीला करून दाखविण्यांत शिंद्यांची व इंग्रजांची लढाई व्हावी अगर शिंद्याचें कांहीं प्रत्यक्ष नुकसान व्हावें असा त्यांचा हेतु मुळींच नव्हता. दौलतराव व सर्जेराव अत्याग्रहाला प्रवृत्त झाले, ते मुलूख मागण्याच्या हेका कांहीं केल्या सोडीनात, सबब त्यांच्याकरितां हें इंग्रजांचें बुजगावणें त्यांनीं हुबळीस बिनखर्चानें आणून उभें केलें. शेतकरी पाखरांना भेडसावण्याकरितां शेतांत गवताचें बाहुलें उभें करतो तद्वत्

श्रीमंतानीं शिंद्यास भेडसावण्याकरितां इंग्रजांचा हा असा उपयोग करून घेतला !

पण पेशव्यानीं आपणांस केवळ गवताचें बाहुलें बनविलें आहे हें वसलीसाहेब कुठें उमजत होते ? आतां शिंदा व तत्पक्षीय सरदार यांच्या माझ्याशीं व मत्पक्षीय सरदारांशीं मोठमोठ्या लढाया होणार व त्या अनुषंगानें मोठमोठ्या उलाढाली व मसलती आपणांस उरकाव्या लागणार; आणि त्या सर्वांचें पर्यवसान ईष्ट इंडिया कंपनीस मराठी राज्याचा एक भला मोठा अंश प्राप्त होणार, याच हर्षांत आणि आवेशांत प्रथम प्रथम ते दंग होऊन गेले होते. परंतु आक्टोबरची एक एक तारीख लोटत चालली तों तों त्यांच्या मनांतला हर्ष व आवेश कमी होतां होतां अखेरीस अगदीं नाहींसा होऊन त्याजागीं निराशेनें बिऱ्हाड घेतलें. कारण तो मठ्ठ बाजीराव कांहीं केल्या पुण्यांतून पळून जाईना आणि तो कावेबाज दौलतरावही त्यास कैदेंत बसवीना ! आणि या दोन गोष्टींतली कोणती तरी एक गोष्ट घडल्याचें पालमरनें कळविल्याखेरीज तुम्हीं एकही पाऊल पुढें टाकतां कामा नये, अशी लॉर्ड वेलस्ली यांची वसलीबहाद्दरांस सक्त ताकीद होती ! बाजीरावानीं वसलीसाहेबांस या मसलतीच्या पेचांत अडकवून हुबळीस चरफडत बसविलें त्यासंबंधानें त्या साहेबबहाद्दरांच्या मनांत घोळणारे कल्पनेचे तरंग, भावी युद्धाकरितां त्यानीं योजिलेल्या तरतुदी, त्यांच्या अडचणी व चिंता, शिंद्याशीं लढण्याकरितां त्यांच्या अंगांत संचरलेला उद्दाम युद्धोत्साह वगैरेचें वर्णन Wellington's Despatches या पुस्तकामध्यें आलें आहे तें फार मनोरंजक आहे. परंतु विस्तारभयास्तव तें आम्हीं येथें देत नाहीं.

हें इंग्रजी व मोंगलाई फौजांचें काहूर आपणावर अकस्मात् उठलेलें पाहून दौलतराव शिंद्यांस फार आश्चर्य वाटलें. पण याच्या मुळाशीं श्रीमंतांची स्वारी असेल हें त्यांच्या लक्षांत आल्याचें दिसत नाहीं. ही इंग्रजांची घोरपड पटवर्धनानींच आपणावर आणिली असली पाहिजे असें ते समजत होते व तो त्यांचा तर्क त्यावेळीं सयुक्तिक दिसण्याजोगा होता. कारण अलीकडे पटवर्धनांची व इंग्रजांची फारच गट्टी जमल्याचा बोभाटा झाला होता व परशुरामभाऊंचे चिरंजीव हरिपंतबाबा आपल्या फौजेसह अद्यापि वसलीसाहेबांच्या लष्करांत राहिलेच होते. आपण श्रीमंतांजवळ दक्षिणमहाराष्ट्राचा मुलूख मागतों त्यांत पटवर्धनांच्या जहागिरी येत असल्यामुळें त्यांचेंच नुक-

सान सर्वांहून अधिक होणार याकरितां आपला प्रतिकार करावा या हेतूनें त्यानीं इंग्रजांस आणलें असलें पाहिजे हा समज केवळ दौलतरावांचाच होता असें नाहीं. सर्व लोक हेंच खरें मानीत होते. पटवर्धनांनीं इंग्रजांशीं गट्टी करावी हें बाजीरावसाहेबांस बिलकूल पसंत नव्हतें तरी पेशव्यांच्या इच्छेस न जुमानतां ते यावेळीं इंग्रजांसच अधिक चिकटून राहिले ही गोष्ट श्रीमंतांच्या कारस्थानाला अधिकच उपयोगाची झाली! कारण यांत इंग्रज आणल्याचें बालंट आपणावर येऊं न देतां तें परभारें पटवर्धनांवर घालण्याची मोठी सोय होती!

इकडे श्रीमंतानीं वसली बहाद्दरांस हुबळीस आणून पेंचांत अडकावून पाडिलें होतें त्यांस मागें जातां येईना आणि पुढेंही जातां येईना! स्वस्थपणानें माशा मारीत बसण्याचें काम त्यांच्या कपाळीं आलें त्याला ते लवकरच अगदीं कंटाळून गेले! “ असें काय वेड्यासारखें हा बाजीराव करतो आहे! हा शिंद्याची आंच काय म्हणून सोसतो आहे? तो मला एक बोटभर चिठी लिहील तर शिंद्याची गठडी वळवण्यास मला कितीसा उशीर लागणार आहे? पण तेवढेंही त्याच्या हातून होईना. ” याप्रमाणें ते आपल्याशीं चरफडत होते. शिंद्याचीं सात पलटणें कृष्णा उतरून आयतींच अलीकडे आलेलीं होतीं त्यांचा चक्काचूर करण्याकारितां त्यांचे हात वळवळत होते. त्या पलटणानीं नेरलीस वेढा घातला होता तो उठविण्याविषयीं नागो शामजी फार गयावंया करीत होता सबब तें तेवढें त्याचें काम करून द्यावें असें त्यांच्या मनांत येई. चिकोडी मनोळी घाटग्याकडून काढून पुन्हां पटवर्धनांस द्यावी अशीही त्यांची इच्छा होती. परंतु काय करणार? ज्या दोन गोष्टींपैकीं कोणती तरी एक गोष्ट पुण्यास घडावयास पाहिजे होती ती घडल्याचें पालमरकडून लिहून येईपर्यंत त्यांचे हातपाय बांधलेले होते. पालमर तरी काय करतो बिचारा! आपण कोणत्या कलावर काय करावयास गेलों आणि त्याचें पर्यवसान कुणीकडे वहावत चाललें असें वाटून त्याचें मन वारंवार खिन्न होई. त्यानें वसलीस लिहिलें कीं, पेशवे व शिंदे यांचा कलह विकोपास जाण्याचा संभव आगष्टांत होता तो सपटंबरांत राहिला नाहीं. आणि आतां अक्टोबरांत तर त्या कलहाचा लवलेशही राहिला नसून उलट त्या दोघांत प्रेमाचा पूर वहात असल्याचा देखावा दिसत आहे! आणि खरोखरच तसा प्रकार चालू होता. पालमरला

खिजविण्याकरितां जणु काय बाजीरावसाहेबानीं दौलतराव शिंद्यावर यावेळीं कृपामृताचा केवळ वर्षाव चालवला होता ! याला उदाहरण ता. १२ आक्टोबरची गोष्ट—

" श्री॥ राजश्री पंतप्रधान यांचा लोभ दौलतराव बाबा यांचे जागां फार. छ० २२ जमदिलावलीं स्वारी श्रीमंतांची शिंदे यांचे गोटांत गेली. शहराबाहेर स्वारी जातांच पांच असामीनिशीं खासा श्रीमंत मागें जिलबे व स्वांर हत्ती अंबाऱ्या वगैरे अगदीं सोडून पांच असामीनिशीं गेले. दौलतराव बाबा निद्रा केले होते इतकियांत खासा श्रीमंत दाखल होतांच जलदीनें उठोन मुजरा केला. खावंद व सेवकाचे हास्यविनोद घटकाभर जाहला. नंतर मागाहून स्वारीही दाखल जाली. चार सहा घटका स्वारी तेथें होती. नंतर दौलतरावबाबास मेजवानीस बोलावून स्वारीसमागमेंच घेऊन आले. एक अंबारीमध्यें उभयतां श्रीमंत खवासेयांत दौलतरावबाबा चवरी ढाळीत सूर्यास्तीं पुण्यांत आली. वाड्यांत दाखल जाहल्यावर हौदाचे चौकांत रांगोळी घालून भोजनाची मेजवानी जाहली. नव घटका रात्रीस निरोप घेऊन शिंदे आपले गोटास गेले. याप्रमाणें स्नेहभाव चालविला आहे. "

शिंदे व पेशवे यांचें या प्रकारचें सौरस्य पाहून पाल्मरच्या निराशेला सीमाच राहिली नाहीं. त्यानें वसली बहादरांस साफ लिहिलें कीं, आपली मसलत सपशेल फसली. बाजीराव फार लबाड आहे. त्यानें आम्हांस फसविलें. तो जन्मभर असाच सर्वांना फसविणार ! हें पत्र वाचल्यावर वसलीसाहेबांचा धीर खचला व इथून आतां लवकर निघून गेलेलें बरें, असें त्यांच्या मनांत येऊं लागलें. तों मागून आक्टोबरच्या अखेरीस खुद्द पेशव्यांचेंच त्यांस एक पत्र आलें त्यावरून त्यांची खात्रीच झाली. त्या पत्रांत असें लिहिलें होतें कीं तुम्ही तुमच्या कामाकरितां माझ्या मुलखांत राहिलां आहां त्याला माझी हरकत आहे असें नाहीं. खुशाल वाटेल तितके दिवस रहा. मात्र माझ्या रयतेला उपद्रव देऊं नका म्हणजे झालें ! या पत्राचा एकंदर झोंक त्या चाणाक्ष साहेबानें तत्काळ ओळखला. माझ्या मुलखांत तुम्ही राहिलांत त्याला माझी हरकत नाहीं, असें बाजीराव आज म्हणतो आहे, हा उद्यां माझी हरकत आहे, इथून चालते व्हा असेंही म्हणेल आणि माझे सोबती हे मराठे सरदार आहेत यांनाच या इंग्रजाला हांकून लावा अशीं पत्रें पाठवूं लागेल तेव्हां कशी गत

होईल ? इतकी शोभा करून घेण्यापेक्षां आजच निघून गेलेलें बरें. याप्रमाणें विचार ठरवून वसलीबहाद्दर लष्करचा तळ हालवून ता० ३१ आक्टोबर रोजीं हुबळीहून परत निघाले ते वर्धा व तुंगभद्रा यांच्या संगमावर गलगनाथाजवळ नदी उतरावयास गेले. परंतु तेथें उतार न झाल्यामुळें ते तीरातीरानें कोपळच्या दक्षिणेस १० मैलांवर जाऊन तेथून तुंगभद्रापार झाले. अजूनसुद्धां पुण्यास कांहीं तरी घडेल व मला बोलावणें येईल असा एक आशेचा बारीकसा तंतु त्यांच्या मनांत जिवंत होता. यास्तव पंधरा दिवस त्यानीं आपलें सैन्य फुटूं दिलें नाहीं. नंतर मात्र त्यानीं सैन्याचा कांहीं भाग कर्नूळ प्रांतीं ठेवून बाकीचीं पलटणें जिकडचीं तिकडे रवाना केलीं आणि आपण श्रीरंग पट्टणास निघून गेले.

शिंद्याचीं सात पलटणें चिकोडी तालुक्यांत आलीं होतीं त्यांचा बेत इंग्रज निघून गेल्याबरोबर पटवर्धनांच्या महालांत घुसून ते काबीज करावे असा होता. त्यामुळें वसलीसाहेब जाण्याच्या गोष्टी बोलूं लागले तेव्हां पटवर्धनांस मोठें संकट प्राप्त झालें. आणखी कांहीं दि वस रहाण्याविषयीं त्यानीं त्यांस आग्रह केला परंतु वसलीसाहेब ऐकेनात. अखेरीस पटवर्धनांनीं त्यांस सांगितलें कीं करवीरकरांवर सूड घेण्याच्या कामीं आम्हांस मदत कराल व शिंद्याच्या भयापासून आमचें संरक्षण कराल या आशेनें आम्हीं तुमची दोस्ती केली व आज पांच महिने पदरच्या खर्चानें तुम्हांबरोबर स्वारींत राहून श्रमसाहस केलें आणि संकटें व नुकसान सोशिलें. असें असतां तुम्हीं आमचा कांहीं एक उपयोग न करितां निघून जातों म्हणतां याला इलाज नाहीं. जातां तर जा. पण आतां आमचें एवढें एक काम करा. आमच्या सरहद्दीस लागून तुमचा सोंदें प्रांत आहे व म्हैसूरचें राज्य आहे. तुम्हीं आपल्या मुलखांत आमचीं कुटुंबें ठेवण्याकरितां एखादें बंदोबस्ताचें स्थळ आम्हाला द्या अगर पूर्णय्यास सांगून म्हैसूरच्या हद्दींत देववा. त्या स्थळीं आपलीं मुलेंमाणसें ठेवून आम्ही आपल्याच बळावर शिंद्याशीं लढाई मारूं आणि तो आमचे मुलूख कसा काय घेतो तें पाहून घेऊं. शिंद्याशीं लढाई करायची तर पेशवाईच्या हद्दींत कुटुंबें ठेवतां येत नाहींत सबब ही जागेची मागणी आम्ही तुम्हांजवळ करितों. यावर साहेब बहादुरानीं शिंद्याशीं लढण्याचा तुमचा मनोदय फार उत्तम आहे, तुमच्या मागणीचा आपण अवश्य विचार करूं असें आश्वासन दिलें. याप्रमाणें मुलेंमाणसें ठेवण्याकरितां इंग्रजांजवळ निर्भयपणाचें स्थळ मागणाऱ्यांत परशुरामभाऊंचे पुत्र व चिंतामणराव आपा व

बाळकृष्णपंत लागू एवढ्यांचींच नांवें आढळतात. यावरून शिंद्याशीं लढण्याकरितां एवढ्यानींच कंबर बांधली होती असें दिसतें. बाळासाहेब मिरजकर व रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचीं नांवें जागा मागणाऱ्यांत नाहींत यावरून ते दोघे शिंद्याच्या भयापासून बाजीरावसाहेब आमचें रक्षण करितील असें मानून स्वस्थ होते असें दिसतें.

पटवर्धनांच्या मागणीप्रमाणें त्यांस इंग्रजांनीं अगर पूर्णय्यानें स्थळ दिलें कीं नाहीं हें माहीत नाहीं व या गोष्टीचा छडा लावण्यांत कांहीं तात्पर्यही नाहीं. कारण परराज्यांत कुटुंबें ठेवून शिंद्याच्या पलटणांशीं गनिमी काव्यानें लढण्याचा जो बेत पटवर्धनांनीं योजिला होता तो अंमलांत आणण्याचें त्यांस कारणच पडलें नाहीं. वसलीसाहेब फक्त एक महिना हुबळीस राहून आपल्या मुलखाला गेले तरी त्यांच्या येण्यापासून दौलतरावाच्या मनावर जो परिणाम व्हावा अशी श्रीमंतांची इच्छा होती तो तसा होऊन चुकलाच. दौलतरावानीं विचार पाहिला कीं आपण जो मुलूख मागतों तो इंग्रजांच्या व म्हैसूरकरांच्या हद्दीला लागून आहे. त्या दोघांसही आपला शेजार बिलकूल खपत नाहीं हें त्यांच्या वर्तनावरून दिसतेंच आहे, पटवर्धन आम्हाशीं वांकडे, त्यांना इंग्रजांचें पाठबळ आहे, त्यांच्या जहागिरीच आम्ही घेणार, तेव्हां ते आमचा अंमल सुखेपणानें कसा नांदूं देतील ? आपण थोडीशीं पलटणें व फौज या नवीन मिळणाऱ्या मुलखांत ठेवून हिंदुस्थानांत गेल्यावर तिला त्राता कोण ? ती निःसंशय मारली जाईल. त्यांतून श्रीमंत या गोष्टीला अनुकूल असते तर कांहीं तरी करायला येतें. पण तेही अनुकूळ नाहींत. मग हा दक्षिणमहाराष्ट्रांतला मुलूख मिळविण्याचा वेडा हट्ट धरून उपयोग काय ? या गोष्टी मनांत आणून शिंद्यानीं आपला आग्रह सोडून दिला.

यावरून शिंद्याला विरोध करण्यासाठीं गुपचिपपणानें इंग्रजांस उठविण्याची मसलत बाजीरावसाहेबानीं केली ती पूर्ण यशस्वी झाली हें दिसून येईल. आतां या कारस्थानाची योग्यता औचित्याच्या दृष्टीनें पहावयाची तेवढी राहिली. इंग्रजांच्या लोभीपणानें त्यांची निराशा झाली हें ठीकच झालें. पण यांत श्रीमंतानीं जें वर्तन केलें तें योग्य होतें कीं अयोग्य होतें ? नुसतें कारस्थान एवढ्याच बाजूनें विचार केला तर तें फार सुंदर वठलें हें कबूल करावें लागतें व ‘ तटस्थः स्वानर्थान् घटयति च मौनंच भजते ’

या उत्कृष्ट कारस्थानी मुत्सद्याच्या प्रशंसेला ते पात्र होतात असें सकृद्दर्शनीं वाटतें. पण अधिक विचारांतीं असला हा– बालिशाची कुचेष्टा करण्याचा उपद्व्याप त्यानीं केला याबद्दल प्रशंसेऐवजीं त्यांचा उपहास करावा अशीच बुद्धि उत्पन्न होते ! कोणी विचारील कीं पूर्वीं नाना फडनवीस यानीं असाच इंग्रजांचा बागुलबोवा वेळोवेळ दाखवून महादजी शिंदे, हैदर-अल्ली व निजामअल्ली वगैरे प्रतिस्पर्ध्यांवर मात केली व त्या वेळचा आपला हेतु सिद्धीस नेला. या त्यांच्या चातुर्याबद्दल सर्व लोक त्यांची तारीफ करतात आणि तीच गोष्ट बाजीरावसाहेबानीं केली त्याबद्दल त्यांचा उपहास कां ? या प्रश्नाला उत्तर हेंच कीं नानांचें अवसान नानाला आणि बाजीरावाचें बाजीरावाला ? दोघांच्या अवसानांत फरक आहे. नानानीं जरी ब्रिटिश सिंहाचें आयाळ पकडून त्याला फरफर ओढलें असलें तरी ते कधीं त्याच्या उपकाराचे मिंधे झाले नाहींत अथवा त्याच्या आहारीं पडले नाहींत. आणि बाजीरावांकडे पहावें तर त्यानीं ज्या इंग्रजांची कुचेष्टा करून मन रंजविलें त्यांच्याच दारीं पुढें दोन वर्षांनीं जाऊन माझे प्राण वांचवा म्हणून याचना केली ! हाच तो दोघांतला फरक. आम्ही तर असें म्हणतों कीं आपल्याच सरदाराला घालवून लावण्याच्या उद्देशानें बाजीरावसाहेबानीं परक्या लोकांस आपल्या मुलखांत आणण्याचा जो हा दुर्लक्षणी चाळा केला यांत त्यानीं पुढें इंग्रजांप्रीत्यर्थ केलेल्या स्वातंत्र्यदानयज्ञाची ही शुष्क इष्टींच करून पाहिली अथवा पुढें लवकरच होणाऱ्या वसईचा तह या शोकपर्यवसायी नाटकाची ही त्यानीं रंगी तालीमच करून दाखविली !

मराठी राज्यांतले किल्लेकोट व तटबंदीचीं बळकट शहरें, त्यांची लांबी रुंदी, तट, बुरूज, खंदक, माऱ्याच्या जागा व तीं काबीज करण्यांच्या साधनांचा विचार, ही सर्व माहिती बाजीरावसाहेब गादीवर येण्यापूर्वींच इंग्रजानीं यथास्थित मिळवून ठेविली होती, हें कोणास सांगितलें तर अचंबा वाटेल. पण हें सर्व खरें आहे. नुसते किल्लेकोटच काय, पण व्यापाराच्या पेठा, दळणवळणाचे मार्ग, निरनिराळ्या स्थळांचीं अंतरें, घांट, खिंडी, बाऱ्या, दऱ्या, त्यांतून लष्कर नेण्याच्या सोई, लोकांचे रीतिरिवाज व धर्मसमजुती, राज्यांतले सरदार, मुत्सद्दी वगैरे प्रमुख लोकांचीं घराणीं, त्यांचे परस्पर हिताहिताचे संबंध, याही सर्व गोष्टींचें ज्ञान जिकडून मिळेल तिकडून मिळविण्याचा त्यांचा उद्योग अव्याहत सुरू होता. ही सर्व

खटपट त्यानीं कशाकरितां चालविली होती ? तर मराठी राज्य घ्यावें हा त्यांचा फार वर्षांचा संकल्प ठरून गेला होता म्हणून ! टिपूचें राज्य घेतल्यावर आपला तो संकल्प सिद्धीस नेण्याची त्यांस फारच घाई झालेली दिसूं लागली. कोणतीही हिकमत लढवून अथवा कांहीं तरी कुरापत काढून आधीं धनसंपन्न गुजराथदेश बळकावावा हा त्यांचा बेत ठरला होता. पेशवा आपल्या अधिकाराला नालायख असून त्याचें आसन डळमळतें आहे, आज शिंद्याच्या नाहीं तर उद्यां होळकराच्या अथवा भोसल्याच्या भयामुळें त्यास आपला आश्रय करणें भाग आहे हें त्यास स्पष्ट दिसूं लागलें होतें.

पुष्कळ गोष्टी अशा आहेत कीं ज्यांचें ज्ञान लेखी अगर ऐकीव माहितीवरून यथास्थित होत नाहीं, त्या प्रत्यक्षच पाहाव्या लागतात. वाघाशीं लढाई करण्याच्या निमित्तानें या देशीं पांच महिने राहून त्या गोष्टी वसली बहाद्दरानीं प्रत्यक्ष पाहिल्या. विशेषेंकरून या अवधींत पटवर्धन मंडळी, लागू, गोखले, निपाणकर, नागो शामजी, तळूरकर व कित्तूरकर देसाई, करवीरचे महाराज, या सर्व लोकांशीं त्यांचा जो प्रत्यक्ष अगर वकिलाच्या द्वारें परिचय झाला त्याचा उपयोग पुढें दोन तीन वर्षांनीं शिंदे भोंसल्यावरच्या मोहिमेंत त्यांस उत्तम प्रकारें करून घेतां आला.

वसली बहाद्दर श्रीरंगपट्टणास पोंचल्याबरोबर त्यानीं लॉर्ड वेलस्ली व लॉर्ड क्लाइव्ह वगैरे आपल्या वरिष्ठांस कळविलें कीं मराठ्यांशीं आपलें युद्ध जुंपणार त्याची वेळ जवळ येत चालली. आतां एव्हांपासून तयारीला लागलेंच पाहिजे. त्यावरून मद्रास, बंगाला, मुंबई, श्रीरंगपट्टण, हैदराबाद वगैरे जागीं भावी युद्धाचा सरंजाम जुळविण्याची तजवीज जारीनें सुरू झाली. यानंतर तीन महिन्यांनीं पटवर्धनांचा एक कारकून वसलीसाहेबांकडे कांहीं कामाकरितां श्रीरंगपट्टणास गेला होता. तो लिहितो कीं, " येथें लढाऊ सरंजाम जारीनें तयार होत आहे. आमच्या मुख्यस्थानपर्यंत ( म्हणजे पुण्यापर्यंत ) येण्याची उमेद फार आहे. " आजपर्यंत इंग्रजानीं मोहिमा केल्या त्यांत दहा पांच पलटणांपेक्षां अधीक फौज त्यांस लढाईस आणविली नाहीं. त्यांचा सर्वांत मोठा पराक्रम टिपूवर केलेल्या स्वारीचा. पण तींतसुद्धां त्यांचीं सारीं पंचवीसपासून तीसपर्यंतच पलटणें होतीं. आणि त्यांचीही मरामत चांगलीशी राखलेली होती असें म्हणवत नाहीं. असें असतां पुढें तीन वर्षें झालीं नाहींत तों याच इंग्रजानीं चाळीस हजार कवाइती पायदळ, पंचवीस हजार स्वार व दोन तीनशें तोफा असें उत्तम तयार केलेलें सामान लढाईच्या

कामावर नमूद केलें आणि शिंदे, होळकर, भोंसले यांस जबरदस्त तडाखे मारून जेरीस आणिलें, हें झालें तरी कसें ? एवढी प्रचंड सेना दुरुस्त व तयार राखण्यास लागणारी सामग्री, माणसें व बेमुबलग पैसा त्यांनीं एकाएकीं कोठून पैदा केला ? या गोष्टी आश्चर्यकारक वाटतात खऱ्या. परंतु वरील विवेचनावरून यांत आश्चर्य असें कांहीं नाहीं हें वाचकांस समजून येईल. त्यांची ही तयारी दोन तीन वर्षें एकसारखी चालली होती व त्या दीर्घोद्योगाचें त्यांस उत्तम फल प्राप्त झालें हें स्पष्ट आहे.

असो. बाजीरावसाहेबांनीं केलेल्या या कारस्थानाचें विवेचन लांबतां लांबतां भलतीकडे लांबलें व त्यानेंच आमच्या प्रस्तावनेची बहुतेक जागा व्यापून टाकिली. नेहमींच्या परिपाठाप्रमाणें या प्रकरणांतल्या पत्रांचें तात्पर्य सांगावयाचें त्याला जागा थोडी राहिली. त्यामुळें तें काम संक्षेपानेंच उरकून घेणें भाग आहे. याकरितां आतां येथें तसेंच करूं.

राजकीय विषयांत मन घालण्यापूर्वीं बाजीरावसाहेबांचे स्वभावगुणवर्णनपर कांहीं मजकूर या प्रकरणांत आले आहेत ते आधीं उतरून घेऊं. ते बरेच मनोरंजक आहेत.

पहिले बाजीराव यांनीं रणशूरत्वाबद्दल दिगंत कीर्ति केली. सांप्रत हे दुसरे बाजीराव ऊर्फ सवाईबाजीराव पेशवाई पदावर विराजमान झाले होते. यांवर रणशूरत्वाचा आळ कधींच कोणी घेणार नाहीं. तथापि आपण दानशूरत्वाचा लौकीक मिळवावा अशी त्यांस केव्हां केव्हां लहर लागे. मात्र असल्या लहरींत ते पैका खर्चीत त्यांत अस्ताव्यस्तपणाचा व अप्रयोजकपणाचाच प्रकार सर्वदा दिसून येई. यंदा श्रीमंतानीं देणग्या पुष्कळ दिल्या त्या सर्वांची तऱ्हा हीच होती. ज्यानीं लढाईत कामकाज करून दाखविलें व सरदारीबद्दल स्वतःची लायखी स्थापित केली अशा मर्द शिपायांस दसऱ्याच्या दिवशीं सरकारांतून पागेची सरदारी मिळण्याची आशा व संधि असे. ज्यानें अनेक लढाया मारल्या त्या शिलेदारास, ज्यानें अनेक सभा जिंकून विद्वत्तेची कीर्ती मिळविली त्या पंडितास, ज्यानें द्रव्याच्या अगर कर्तृत्वाच्या द्वारें सरकारचा उपयोग केला अशा थोर योग्यतेच्या माणसास दसऱ्याच्या दिवशीं सरकारांतून पालखीचा बहुमान देण्याची वहिवाट होती. यंदा बाजीरावसाहेबानीं पागा व पालख्या कोणा कोणास दिल्या ? ज्यांस पागा दिल्या त्यांत एक आबा काळ्याच्या वशिल्याचा व दुसरा शिंबाच्या

एका कारभाऱ्याच्या वशिल्याचा आणि तिसरा तर नुसता भालदारच होता ! ज्यांस पालख्या दिल्या त्यांत श्रीमंतांच्या मयत प्रथम स्त्रीचे चुलते वैजनाथभट मामा भागवत यांचें नांव आहे. हा बहुमान त्यास आप्तपणाच्या निमित्तानें दिला गेला असें एक वेळ म्हणतां येईल. तें असो. पण गोविंदपंत केळकर नांवाच्या दुसऱ्या एका माणसास पालखी दिली तिचीं कारणें मात्र मौजेचीं आहेत. तीं काय तर म्हणे, हे गृहस्थ कोपरगांवीं श्रीमंतांजवळ पवमान म्हणत होते ! आणखी दुसरें कारण काय तर त्यास श्रीमंत गुरूजी म्हणतात ! वा ! केवढीं जबरदस्त कारणें हीं ! आणखी देणग्या—

" वे॥ राजश्री धोंडभट भागवत पहिले सासरे यांचे घरीं विजयादशमीस ( श्रीमंत ) रात्रौ फराळास गेले होते. सासूस लुगडें आठशें रुपयांचें व धोंडभट याचे सुनेस लुगडें सहाशें रुपयांचे भरजरी, दोन्हीं लुगडीं दिलीं. शिवाय सहा हजार रुपयेचा कंठा सुनेस दिला. याप्रमाणें मागें कोणी दानशूर जालें नाहीं. धोंडभट यास पुत्र एकच आहे. त्याचें नांव राघोपंत भागवत. गुदस्तां कर्नाळा किल्ल्याची मामलत त्यास सांगितली. सर्वप्रकारें ममता आहे. "

' श्वशुरस्य बलं भार्या ' हें सुभाषित या ठिकाणीं गतार्थ ठरलें ! कारण श्रीमंतांची पहिली भार्या म्हणजे धोंडभट भागवत याची कन्या कधींच मरून गेली होती. तरीसुद्धां या पहिल्या सासुरवाडीवर श्रीमंतांची ' सर्वप्रकारें ममता ' अद्यापि जागृत राहिली !

" हिराबाग राजश्री सदाशिव माणकेश्वर यास द्यावयाचा करार पेशजी झाला होता. काल सनद दिली. हिराबाग तळ्याचे काठीं चार दिवाळी आहे. आंत बंगले वगैरे अजमास लाख रुपयेची इमारत आहे. कृपा करून दिला. "

" बाळोजी कुंजर यास पांच सात हजार रुपयेचा चौकडा दिला. वरकड मंडळी आहेत, त्यास झाडून पोषाख सोनेरीबुट्टीचे दिले. हजार सातशे आठशे खालीं पोषाख कोणास दिल्हा नाहीं. राजश्री आपाजीराम सहस्रबुद्धे यास आठशें रुपयेचा पोषाख दिला. "

" छय्या गोसावी पैठणकर मागें सरकारांत कै॥ नानासाहेब याजपाशीं होते. त्यांचे नातू रामचंद्र गोसावी गाणार चांगले आहेत. त्याजवर श्रीमंतांची कृपा पूर्ण आहे. श्रीमंतांनीं हत्ती बक्षीस दिला व शिंदे यानींही हत्ती बक्षीस दिला. रविवारांत गोसावी यास वाडा सरकारांतून देऊन तेथें राहिले आहेत. दोन हत्ती झुलतात. त्याचें गाणें पांच चार दिवशीं एकांतीं

नवे इमारतीमध्यें होत असतें. ते समयीं अन्यत्राचा प्रवेश नाहीं. श्रीमंतच आहेत यांत अंदेशा नाहीं. परंतु जन त्रिविध, यास कोणाचा उपाय नाहीं. दोन्ही प्रकारें बोलतात. ”

वरच्या वर्णनावरून बाजीरावसाहेबांचा स्वभाव उघळ्या होता असें कोणास वाटेल तर तसें मात्र नाहीं. खर्चांत काटकसर करण्याकडेसुद्धां त्यांचें पूर्ण लक्ष होतें. काटकसरीचें पुढील उदाहरण पहा—

“ बहुता दिवसांचे सरकारचे वाड्यांत भोजन करीत होते, त्यास थोरले पंगतीस दीडशेंपावेतों पात्र होत असे. त्यास फांटा दिल्हा. त्यांतून दहा वीस असामीमात्र करार केले. बाकीचे दूर करून थोरली पंगत मोडिली. श्रीमंतांच्या पंगतीसच करार केले त्याणीं भोजन करावें याप्रमाणें केलें. थोरले पंगतीसच शागीर्द तेथून भोजन करीत होते त्यांस दूर केलें. ज्यांचे शागीर्द आहेत त्याणीं घरीं भोजन करावें याप्रमाणें जालें. श्रीमंताच्या पंगतीस जेवणार त्याचे देखील शागीर्द दूर जाले. कांहीं पांच सात मात्र करार केले. वरकडांस फांटा. ”

शागीर्द म्हणजे नोकर नव्हे. शागीर्द म्हणजे शिष्य अथवा शिकणाऊ उमेदवार. मुत्सद्दी सरदार दरकदार वगैरे बडे लोक गरीब पण अब्रूदार प्रतिष्ठित कुळांतले पांच चार होतकरू मुलगे पदरीं बाळगीत व ते युद्धाच्या अथवा कारकुनीच्या विद्येंत तयार झाले म्हणजे आपापल्या खात्यांतच कोठें तरी त्यास रोजगार लावून देत आणि मग दुसरे शागीर्द बाळगीत. फडणीस मुजुमदार हुजुरपागे व खासगीवाले वगैरे सरकारी संबंधाचे लोक होते ते आपल्या शागीर्दांस सरकारवाड्यांत भोजनास पाठवीत. वर लिहिल्याप्रमाणें श्रीमंतानीं हा प्रघात बंद केला.

श्रीमंतांचें सोवळें फार कडक होतें—

“ वाड्यांत पंधरा असामी ब्राह्मण कारकून हौदाचे चौकांत चौकीदार ठेविले व ब्राह्मण हौदाचे बाहेरील मोऱ्या वगैरे धुवावयास म्हणून पांच सहा असामी ठेविले. ब्राह्मण कामाठी असे नांव त्यांस सहजांतच पडलें. सारांश श्रीमंतांचें सोवळें फार आहे. तरीच ईश्वरें कृपा करून राज्याधिकार दिला आहे ! ”

दानाच्या बाबतींत पात्रापात्र विचार मुख्य आहे. तो विचार श्रीमंत कांहीं एक मानीत नव्हते. मनाची मर्जी हेंच त्यांचें शास्त्र असे—

" नित्यदानसमयीं लोटी, पंचपात्र, ताम्हन, तांबेंतील पात्र, सुवर्ण मासा व पुतळी एक एकूण वीस रुपये आकार होता. त्यास वैदिकांसच द्यावे असा विचार नाहीं. जवळ शागीर्द आहेत त्यांसही द्यावे. शागीर्दास दर आसामी दोन तीन चार वेळां एक एकास नित्यदान पावलें. राघोबा शेंडे यांस पांच सात वेळां नित्यदान पावलें. छ० ११ जमादिलाखरीं राजश्री दादा गद्रे श्रीमंताजवळ दीडप्रहर दिवसाचे सुमारें होते. नित्यदान द्यावयाचा समय आला तेव्हां श्रीमंतांनीं गद्रे यांस पागोटें काढावें म्हणोन सांगितलें. गद्रे याणीं पागोटें काढिलें. नित्यदानाचा संकल्प करून उदक त्यांचे हातावर घातलें. त्यांणीं नित्यदान गोळा करून बाहेर आले आणि ब्राह्मणास दिलें. गद्रे बहुत चित्तांत खफा जाहले. उपाय नाहीं."

खुन्या मुरलीधराचें देवालय बांधणारे हे प्रसिद्ध सावकार दादा गद्रे. दान घेण्याचा प्रसंग त्यांस जन्मांत कधीं आला नव्हता. पण काय करणार ? जो वेठीस धरला गेला तो त्याची ती वेठ भागल्याखेरीज कसा मोकळा होईल ?

हिंदुस्थानांत बायांचा दंगा जोरानें फैलावत होता तो मोडण्याकरितां दौलतरावास तिकडे जावयाचें होतें. परंतु इकडील देण्याघेण्याचे बंदोबस्त सरकारांतून व्हावयाचे ते व्हावे, सरकारची परवानगी जाण्याविषयीं व्हावी, आणि नंतर त्यानीं निघावें, या गोष्टी अवकाशाच्या होत्या. तेथपर्यंत कांहींच हालचाल केली नाहीं तर लौकिकाला कमी पडतें असें समजून शिंद्यानीं गोपाळरावभाऊ चिटणीस यांची विजयादशमीच्या मुहूर्तानें हिंदुस्थानांत रवानगी केली. त्या प्रसंगीं शिंद्यानीं त्यांचा मोठा सन्मान केला. त्यांस स्वतःची ढाल तरवार व गळ्यांतली कंठी बहाल केली. तमाम हिंदुस्थानच्या सुभ्याचा मुख्य अधिकार त्यांस दिला. तूर्त पलटणाचा एक कंपू बरोबर घेऊन भाऊनीं निघावें व पंचवीस हजार फौज चाकरीस ठेवावी आणि बायांचें बंड मोडून टाकावें असा या वेळीं संकेत ठरला. एवढ्या महत्वाच्या कामगारीवर निघालेल्या गोपाळराव भाऊंबरोबर त्यांचा जोडीदार म्हणून सरकारचा कोणी सरदार जावयास पाहिजे, सबब कुंजराच्या पुरस्कारावरून श्रीमंतानीं दसऱ्याच्याच मुहुर्तावर नाना पुरंदरे यांची या स्वारीवर रवानगी केली. त्याबरोबरसुद्धां सरकार स्वारीचा लगी, डंका, जरीपटका वगैरे इतमाम देण्यांत येऊन ही स्वारी जितकी भव्य दिसेल तितकी दाखविण्यांत आली होती. त्याप्रमाणें गोपाळरावभाऊ निघून खराडीस मुक्कामास गेले व पुरंदरे

गारपिरावर जाऊन राहिले. पण पुढें काय ! पुढें सारें स्तब्ध ! पैक्याच्या नावानें दोघेही नकारघंटा वाजविणारे आणि रोख पैका घेतल्याखेरीज एकही घोडेस्वार त्यांच्या स्वारींत जाण्यास धजेना ! 'पैका घोडी चालवितो' ही इंग्रजी म्हण येथें खरोखरच प्रत्ययाला आली. तात्पर्य या दोघां सरदारांच्या रवानगीमुळें बायांस दहशत बसावी तें बाजूला राहून यांच्या स्वाऱ्या हा एक लोकांच्या थट्टेचा विषय होऊन बसला !

दक्षिणेंतून बायांवर फौजा पाठविण्याची मसलत वर लिहिल्याप्रमाणें फसली तरी बायांच्या कूटांतून यशवंतराव होळकर यांस फोडण्याची मसलत शिंद्यानीं केली होती ती उत्तमप्रकारें साधली. त्यांनीं होळकरांस लिहिलें कीं, तुम्ही बायांस मिळून आमच्या दौलतींत बखेडा करतां हें ठीक नाहीं. तुम्ही त्यांशीं बिघाड करावा म्हणजे खंडेराव होळकर श्रीमंताजवळ आहे त्यास सरदारीचीं वस्त्रें देऊन सरंजामासुद्धां तुम्हांकडे पाठवितों. याप्रमाणें बेलभंडार व शफतपुरस्सर पत्रें जातांच यशवंतराव यांच्या बुद्धीस मोह पडला. ते बायांस दगा करण्याच्या बुद्धीनें त्यांवर एकाएकीं चालून गेले. परंतु बायांस दैववशात् या गोष्टीचा इशारा आगाऊच कळला होता. त्यांची व होळकराची लढाई झाली. तींत त्यास न जुमानतां त्या रगडून पुढें निघून गेल्या व लखबा लाड याची फौज मदतीस आणून पुन्हां लढाईस उभ्या राहिल्या. तेव्हां होळकराच्यानें त्यांच्या वाटेस जाववेनासें झालें. इतकें झाल्यावर आपण कराराप्रमाणें वागलों, तुम्ही कबूल केल्याप्रमाणें खंडे-रावाची रवानगी करावी असा होळकरांनीं शिंद्यांस तगादा लाविला. शिंद्यानीं याबद्दल श्रीमंतांजवळ गोष्ट काढतांच त्यानीं जबाब दिला कीं त्या मुलास तुमच्या हातीं देणें हें दुर्लौकिकास कारण होईल. सबब तसें करतां येत नाहीं. यानंतर शिंद्यानीं वारंवार त्या मुलाची मागणी करावी आणि श्रीमंतानीं नाहीं म्हणत असावें अशी घासाघीस उभयतांत चालू झाली. पण तींत कांहीं तात्पर्य नव्हतें. कारण शिंद्यापुढें श्रीमंतांचा नेट कितपत टिकेल हें लोकांस कळून चुकलेंच होतें !

खंडोपंत वर्तक व अन्याबा अभ्यंकर हे नानांच्या कूटांतले दोन गृहस्थ अद्यापि मोकळे होते. त्यांस चक्रदेव शिराळेकर गोडबोले वगैरे कैदेंत सांपडलेली आपली मित्रमंडळी सोडविण्याची खटपट करावी अशी दुर्बुद्धि झाली ! त्याप्रमाणें त्यानीं दौलतराव शिंदे व मोरोबा फडणीस यांच्या घरीं जाऊन कांहीं प्रयत्न केला म्हणजे त्यांस कांहीं पैका देण्याची लालूच दाखविली. तें

वर्तमान त्या दोघानीं तत्काळ श्रीमंतांस सांगितलें! शिंद्यानीं सांगितलें तें लोभामुळें सांगितलें. वर्तकावर नानांची बहाल मर्जी होती. नानांचा कांहीं ऐवज त्याजवळ ठेवलेला असावा व तो सरकारांत जप्त झाला तर आपणास मिळेल ही शिंद्यांना आशा होती. मोरोबादादानीं सांगितलें तें भयामुळें सांगितलें. कारण कीं आपणास ही खटपट कळली होती हें श्रीमंतांस कळलें तर आपणावरच एखादें किटाळ यायचें! श्रीमंतानीं खंडोपंत वर्तक व त्याचा पुत्र व अन्याबा अभ्यंकर यांस पकडून सिंहगडावर पाठविलें व त्यांचें घरदार जप्त केलें, परंतु विशेषसा लाभ झाला नाहीं. अन्याबा अभ्यंकर तर गरीबच होते. वर्तकांच्या घरांतमात्र लाख पन्नास हजारांचा माल निघाला.

शिंद्यानीं जातों जातों म्हणावें, श्रीमंतानीं रहा रहा म्हणावें, असा दोघांचा लाडझगडा सुरू होता. त्याचें पर्यवसान अखेरीस शिंद्याच्या जाण्यास श्रीमंतानीं कबुली देण्यांत झालें. नंतर शिंदे सरकारवाड्यांत ता० १ नोव्हेंबर दिवशीं निरोप घ्यावयास आले तेव्हां श्रीमंतानीं त्यांस भोजनास राहून घेतलें. दोन अडीचशें पात्र भोजनास झालें. श्रीमंतानीं सर्वांस योग्यतेनुसार वस्त्रें व जवाहीर दिलें. सरकारचा निरोप झाला तरी निदान आणखी महिनाभर पुण्यांतून शिंद्यांचें जाणें व्हावयाचें नव्हतें. त्यांची स्त्री बायजाबाई गरोदर होती. तिला आठवा महिना सुरू होता. तिला नववा महिना लागल्यावर जांबगांवास जावें. तेथें प्रसूति झाल्यावर हिंदुस्थानचा मार्ग धरावा याप्रमाणें शिंद्यांचा बेत ठरला होता.

द्रव्याबद्दल पेशव्यांस शिंद्याचा तगादा बोलून आणि न बोलून असा दोन्ही प्रकारचा होता. परोपरीच्या तकरारी, जिकीरी, हवाले, वायदे, वराता, चिठ्याचपाठ्या हे व्यवहार दररोज चालत होते ते प्रत्यक्षच होते. शिवाय शिंद्यांचे कारभारी आबा चिटणीस, यादवराव भास्कर व सर्जाराव हे छावणी सोडून पुण्यांतच वाडे घेऊन राहिले होते व आणखीही एक दोघे कारभारी सरकारवाड्यांत बिऱ्हाड धरून होते ते श्रीमंतांच्या पंक्तीस भोजन करून असत! या लोकांचें नेहमीं घडणारें दर्शन व भाषण हीसुद्धां एकप्रकारें तगाद्याची बोचणीच नव्हे काय? असा हा असह्य उपद्रव देणारा दौलतराव लवकरच निघून जाणार म्हणून श्रीमंतांच्या जिवाला अंमळ अंमळ मोकळें मोकळें वाटूं लागतें तोंच त्यांस वार्ता कळली कीं, शिंदा गेला तरी पुण्यांत आपणाजवळ पलटणांचा एक कंपू व सर्जाराव यास ठेवून जाणार.

घाटग्याचें वास्तव्य बाह्यात्कारें श्रीमंतांच्या रक्षणांकरितां पण वास्तविक द्रव्याच्या वसुलीकरितां आणि दरबारच्या कामांत शिरजोरपणानें ढवळाढवळ करून पैका मिळविण्याकरितां ! तें वर्तमान ऐकून श्रीमंतांचें मन फार उद्विग्न झालें. त्यानीं यावर अशी तोड काढली कीं घाटग्याची ब्याद टाळण्यासाठीं आपणच कोठें तरी सड्या स्वारीनें बाहेरगांवीं फिरत रहावें. आपणाबरोबर घाटग्या व त्याचा कंपू यांना कांहीं फिरत रहाणें व्हायचें नाहीं. त्यांना बसूंदे पुण्यांत माशा मारीत ! घाटगे पुण्यांतून गेल्यावरच आपण परत येऊं म्हणजे झालें. पण सर्जाराव झाला तरी वस्तादच होता. तो म्हणाला कीं श्रीमंत बाहेरगावीं वाटेल तिकडे फिरते रहाणार ती त्यांच्या मर्जीची गोष्ट आहे. पण मला तर त्यांना तसें निराधार हिंडूं देतां येत नाहीं. ते जिकडे जातील व जेथें रहातील तेथें तेथें त्यांच्या स्वारींत माझीं दोन पलटणें व दोन हजार स्वार राहिलेच पाहिजेत ! इतकें झालें तरी श्रीमंतानीं आपला बाहेरगावीं जाण्याचाच निश्चय कायम केला.

राजदर्शनाकरितां कदाचित् आपण साताऱ्यास जाऊं व तेथून पंढरपुरास जाऊं अथवा कदाचित् जेजुरीस देवदर्शन करून नाशीक त्रिंबकास जाऊं असें बाजीरावसाहेब म्हणत होते; त्यांतलें कांहींच तडीला गेलें नाहीं. मात्र राजदर्शनाच्या निमित्तानें साताऱ्यास जाऊन त्यांस जी घडामोड करावयाची होती ती त्यानीं पुण्यांतच बसून केली. साताऱ्याचें संस्थान माधवराव रास्त्यांच्या हवालीं होतें. महाराजांचा दंगा आंवरण्यासाठीं तें संस्थान तीन वर्षांपूर्वीं रास्त्याकडे कसें सोपविण्यांत आलें व पेशव्याकरितां तेथील बंदोबस्त संभाळण्यांत त्यांस आजपर्यंत कसे प्रयास पडले हें वाचकांस ठाऊकच आहे. हल्लीं श्रीमंतांच्या मनांत रास्त्यांचें सर्वस्व घ्यावयाचें असल्यामुळें साताऱ्याचा किल्ला त्यांजकडे राहूं देणें फारच गैरसोईचें झालें होतें. याकरितां त्यानीं साताऱ्याचा अधिकार रास्त्यांकडून दूर करून तो सदाशिव भास्कर वांकनीस यांजकडे सोंपविला व त्याच्या हाताखालीं आपल्या विश्वासाचीं व आपल्या ठेवणुकीचीं माणसें नेमिलीं.

बाजीरावसाहेब कार्तिक वद्य पंचमी ( ६ नोव्हेंबर ) स आवशीच्या तेरा घटका रात्रीस प्रस्थानानें निघाले ते बाबा फडके यांच्या वाड्यांत रहावयास गेले. तेथें त्रिरात्र राहिल्यावर कोथरूडचा बाग, पुन्हां फडक्यांचा वाडा, तेथून पेठ्यांचा वाडा, तेथून रास्त्यांचा वाडा याप्रमाणें प्रत्येक स्थळीं त्रिरात्र

मुक्काम करून पुन्हां फडके यांच्या वाड्यांत रहावयास आले. हा विलक्षण प्रकार कशासाठीं चालला होता हें पुण्यांतल्या लोकांस कळत होतें. तिऱ्हाइतास मात्र तें कळण्याजोगें नव्हतें. पिंजऱ्याचें दार मोकळें असतां पोपट पंख फडफडावीत पिंजऱ्यांतूनच हिंडतो आहे ! बाहेर पळून कां जात नाहीं ? हा प्रश्न गैरमाहित मनुष्य विचारील. या पोपटाच्या पायाला बारीक मऊ रेशमाची बळकट दोरी बांधलेली असून ती कोणी अदृश्य मनुष्य धरून बसला आहे हें ज्याला माहीत असतें तो असला प्रश्न कशाला विचारील ? श्रीमंतांची दशा तूर्त अशीच झाली होती. ते कोठेंही जावोत व राहोत त्यांच्या स्वारींत आमचीं दोन पलटणें व दोन हजार स्वार राहिलेच पाहिजेत हा शिंद्यांचा आग्रह होता. हें लोढणें आपल्या प्रभुत्वाचा उपमर्द करणारें व लांछनास्पद आहे. सबब हें शिंद्यानें आपल्या गळ्यांतून काढल्याखेरीज आपण स्वारीस निघत नाहीं हें श्रीमंतांचें म्हणणें होतें व त्यासाठींच ही त्यांच्या मुक्कामांची तारांबळ चालली होती. या चढाओढींत आपलें एकपट तर शिंद्याचें दुप्पट हसें होत आहे, सबब त्यासच आधीं माघार घ्यावी लागणार हें बाजीरावसाहेब जाणून होते. आणि अखेरीस झालें तसेंच. फडक्यांच्या वाड्यांत पुन्हां मुक्कामास आल्यानंतर श्रीमंतानीं शिंद्यांस एकदां येऊन भेटून जावें अशी हातचिठी पाठविली. त्यावरून दौलतराव ता० २३ नोव्हेंबर दिवशीं रात्र पडल्यावर भेटीस आले. नंतर श्रीमंतांचें व त्यांचें बारा घटका रात्रपर्यंत खलबत झालें. त्यांत श्रीमंतानीं शिंद्यास विनविलें कीं, तुम्ही पलटणें व फौज आम्हावर पहारा म्हणून आमच्या स्वारीबरोबर देणार, घाटगे व कंपु यांस पुण्यांत नेहमीं ठेवणार, या योगानें आमची हुरमत जाते. तर असें करूं नका. तुम्हांस जी रक्कम द्यायची ती मुदतबंदीनें देण्याची तजवीज कुंजरानें केली आहे त्याप्रमाणें ती तुमच्या पदरीं पडेल याबद्दलचें जोखीम मी पतकरतों. श्रीमंतांच्या विनवणीनें शिंद्यांच्या मनाला द्रव आला. त्यानें तुमच्या स्वारीबरोबर फौज पलटणें देत नाहीं आणि घाटगे व कंपू यांसही पुण्यांतून सोईसोईनें काढतों असें कबूल केलें व तो निरोप घेऊन गेला. लगेच दुसरे दिवशीं श्रीमंतांची स्वारी भोजनोत्तर निघून सासवडास चालती झाली.

या स्वारीबरोबर लढाऊ सरंजाम म्हटला तर अगदींच जुजबी म्हणजे तीन पागा दोन हजार गारदी व पांच तोफा—त्यांत २ मध्यम व ३ लहान—एवढाच होता. बरोबर पागे व पथके बोलावले होते तेसुद्धां एखादी राहुटी,

दोन घोडीं, दोन उंट, एखादा कारकून आणि चार दोन चाकरीचीं माणसें इतक्याच इतमामानिशीं आले होते. श्रीमंतानीं पुण्यांत बाळोजी कुंजर कारभारी ठेवले होते व घाटग्याची व त्याची गांठ घालून दिली होती. आपल्या गैरहजेरींत ज्यांच्यामुळें बखेडा उत्पन्न होण्याचें भय होतें अशी राजकीय महत्त्वाचीं माणसें यशोदाबाई, चिमाजी आपा, नानांची स्त्री जिऊबाई, परशुरामपंत प्रतिनिधि व मोरोबादादा हीं सर्व स्वारीबरोबर नजरकैदेंत असल्यादाखल बाळगलेली होतीं.

बाजीराव कोणत्या तरी निमित्तानें मला पुण्यांतून बाहेर काढील आणि एखाद्या किल्ल्यावर अडकवून ठेवील हें यशोदाबाईच्या पोटांत भय होतें; याकरितां बाहेर निघण्यास प्रथम ती कबूल नव्हती. " मातुश्री यशोदाबाई यांसही समागमें घ्यावयाची योजना केली. तिकडे सूचनाही केली. त्याणीं सांगितलें कीं माझ्या येण्याचें काम काय ? त्यास श्रीमंतानीं सांगितलें कीं समय या प्रकारचा, यास्तव आपणच येथें रहाणें ठीक नाहीं. आपासाहेबदेखील समागमें स्वारीबरोबर आहेत त्याअर्थीं आपणही निघावें. आपण ऐकावें हें उत्तम. न आइकलें असतां ठीक नाहीं. याप्रमाणें सांगितलें. आंतून नेट आहे कीं संतोषानें निघाल्यास उत्तम. नाहीं तरी श्री॥ कै॥ नानासाहेब यांचे नाटकशाळांकडून जबरदस्तीनें पालखींत घालून वाड्याबाहेर काढावें. याप्रमाणें विचार दिसतो. "

नानासाहेबांच्या नाटकशाळा यावेळीं जख्ख म्हाताऱ्या झालेल्या असतील ! या आखाडसास्वांचा धाक दाखवून श्रीमंतानीं यशोदाबाईला ताळ्यावर आणलें ! वरील उताऱ्यांत ' आपासाहेबदेखील समागमें स्वारीबरोबर आहेत त्या अर्थीं आपणही निघावें ' असें वाक्य आहे त्यावरून आपणापेक्षां बाईशीं आपासाहेबांचें नातें निराळें आहे असें बाजीरावसाहेब मानीत असल्याचें ध्वनीत होतें. पूर्वीं झालेलें दत्तविधान जरी आपण अशास्त्र ठरविलें व तें कराविणाऱ्या शास्त्रीपंडितांस व खुद्द आपासाहेबांससुद्धां सक्षौर प्रायश्चित्त करावयास लाविलें, तरी हें दत्तविधान अशास्त्र म्हणतां येत नाहीं. असा कांहीं तरी किंतु बाजीरावसाहेबांच्या मनांत वसत असावा हें निःसंशय आहे. याला आणखी प्रत्यंतर मागच्या प्रकरणांतल्या एका पत्रांत नानासाहेब यांचा पक्ष आपासाहेबांनीं केला असा मजकूर आला आहे. त्यावरून नानासाहेबांचा वंश अद्यापि चालू आहे असें ते समजत होते.

बाजीरावसाहेबांच्या स्वारींत परशुरामपंत प्रतिनिधि होते त्यांची त्यावेळीं फारच दुर्दशा होती. त्यांस शनवारवाड्यांत धरून आणलें तेव्हां त्यांचें शेपन्नास हत्यारबंद माणूस बरोबर होतें तें थोडक्याच दिवसांत श्रीमंतानीं काढून लाविलें आणि दहा वीस शिपाई व दोन चार कारकून इतके लोकमात्र बरोबर राहूं दिले. आक्टोबर अखेरीस त्यांस सरकारवाड्यांतून काढून गोविंदराव काळे यांच्या वाड्यांत रहावयास आणिलें. याच संधींत पंताची सापत्न मातोश्री वारली. पंतांची जहागीर शिंद्याला देण्याची वाटाघाट यावेळीं ऐन रंगांत होती. पुढें तो मजकूर तितकाच राहिला. नंतर ही सासवडची स्वारी आली तेव्हां पंतास पुण्यात राहूं देण्याचा धीर बाजीरावसाहेबांस होईना. सबब त्यांस त्यानीं बरोबर घेतलें. त्यांच्या निमित्तानें वेगळा असा खर्च फारसा ठेवलेला नव्हताच. त्यांच्या पंक्तीस सारें १५।२० पात्र जेवीत होतें. परंतु पुढें सासवडास गेल्यावर श्रीमंतानीं तेही लोक हांकून लाविले आणि पंताजवळ एक खासा वैदिक, एक पूजेचा ब्राह्मण व एक चाकरीचा माणूस इतकींच माणसें रहावीं असें केलें. त्या दिवसापासून पंतानीं अन्नव्यवहार सोडला. फक्त दूध व रताळीं भक्षण करून रहात. हीं उपोषणें किती दिवस चाललीं व पुढें त्यांचें काय झालें हें आमच्या कागदांत कोठें नमूद केलेलें आढळलें नाहीं.

शिंद्यांचे जुने दिवाण सदाशिव मल्हार व बाळोबातात्या नगरास कैदेंत होते ते मृत्यु पावले तो वृत्तांत— "बाळोबातात्या नगरास होते. छ० १४ जमादिलाखरीं मंदवारीं अकस्मात् मृत्यु पावले. अगोदर पांच सहा दिवस त्यांचे स्त्रीस जांबगावास बलात्कारेंकरून आणली होती. नंतर बाळोबाचा काळ जाहला. अंतसमयीं जवळ कोणी नाहीं या तऱ्हेचा समय ईश्वरें दाखविला." "शिंदे यांणीं सदाशिव मल्हार व बाळोबा पागनीस असे नगरास कैदेंत ठेवले होते ते उभयतांही देवाज्ञा पावले. पंधरा दिवसांचे अंतरानें उभयतांनीं कैलासवास केला. आधीं सदाशिव मल्हार मागाहून पागनीस. शेणव्यांचा ग्रंथ समाप्तीस गेला." तो ग्रंथ समाप्तीस गेला असेंच केवळ नाहीं. कारण पाटीलबावांच्या राजीवठ्यांतले लखबा लाड व जगोबा बापू हे सरदार हिंदुस्थानांत होते ते अजून जिवंत होतेच. दक्षिणेंत जेवढे होते त्यांचा निःपात झाला हें मात्र खरें. कांहीं कालगतीनें मेले आणि बाकीचे बाजी–दौलत–सर्जाराबानीं मारून टाकिले.

देवराव देशपांडे वगैरे वाघाकडील फितुरी लोकांस बेळगांवकरानीं किल्ल्यांत आश्रय दिला याबद्दल शहापूरकरांच्या मनांत वितुष्ट उत्पन्न झालें असें पूर्वीच्या प्रकरणांत लिहिलें आहे. त्या वितुष्टामुळें शहापूरचा कमावीसदार नारोपंत आपटे यानें या आक्टोबर महिन्यांत बेळगांवचा किल्ला विश्वासघातानें घेण्याचा यत्न केला परंतु तो सिद्धीला गेला नाहीं. तो प्रकार असा—

" शहापुरास राजश्री नारोपंत आपटे ( कमाविशीच्या ) कामावर आहेत त्याणीं हजार जमाव आरब व विदेशी मिळोन केला आहे. दोनशें दीडशें स्वांर भरणा आहे. जांबोटकर यांचें पारिपत्य करावयाचें येविशीं श्री॥ राजश्री चिंतामणरावआपांची आज्ञा आहे यास्तव जमाव केला. जांबोटकर यांचा एक गांव मारिला. हल्लीं जांबोटीस जातात. किल्ल्यापैकीं एक तोफ द्यावी म्हणोन यजमानाजवळ विनंती केली त्यावरून यजमानस्वामीनीं तोफ देवितों पारिपत्य करावें म्हणोन सांगितलें. शहापूर बेळगांव दोन नाहींत. हरवक्त समय पडला असतां येथून जमाव द्यावा, पुरावा करावा अशी चाल व यजमानायजमानांचा घरोबा. त्या चालीवरून तोफेची परवानगी दिली. श्रावण वद्य दशमी गुरुवारीं तोफ न्यावयाकारितां जमाव घेऊन किल्ल्याचे दरवाजापाशीं आले. चि॥ राजश्री तात्या यास बाहेर जाऊन तोफ स्वाधीन करणें म्हणोन खाशानीं सांगितलें; त्यावरून बाहेर येऊन तोफ स्वाधीन केली. दारूगोळीचा छकडा दिला. निघोन जावयाचें, यजमानांचें दर्शन घेऊन जातों, परवानगी सांगवावी म्हणोन सांगोन पाठविलें. चालीप्रमाणें दहा लोकानीं(शीं) येणेस परवानगी दिली. ते आंत आरब घेऊन शिरले. ते दुसरा दरवाजा काठ्याचा आहे तेथें येऊन बार केला आणि परदेशी वगैरे होते त्यास दोन चार असामीस ठार मारिलें. बाराचे इशारतीबरोबर बाहेर जमाव होता त्याणीं आंत शिरोन चाल करावी हा बेत. त्या बेतानुरूप बाहेरील लोकानीं चाल केली. दरवाज्यांत दांडगाई होतांच दरवाजकरानीं दरवाजा लोटला व टोपानीं वगैरे लोक होते त्यांची लढाई होऊन दोनचार असामी ठार जाले. इकडे नारोपंत दुरगाडीच्या दरवाज्यांत शिरोन मारीत चालले वाड्याकडे. याचे पीच्छावर जिभींतील रायचंदाकडील लोकानीं चाल केली तेव्हां दुरगाडीचा दरवाजा नारोपंतानीं लोटला आणि तेथें पांच सात आरब घेऊन वाड्याकडे मारीत चालले. आरबांचा व किल्ल्यांतील लोकांचा दंगा झाला असेल हीच भ्रांत धरून

कजिया सोडवावा म्हणून वाड्यांतील मंडळी उघडीं बोडकीं धांवत आले त्यांवर गोळ्या घातल्या. तेव्हां एक दोन माणसें मेलीं व दोन तीन ब्राह्मण मंडळीस गोळ्या लागल्या. यजमान तुळशीच्या बागांत होते. दंगा झाला हें वर्तमान समजतांच धावून आले. दहा वीस लोक बरोबर होते. आड हत्यारी त्याणीं चालोन घेतलें. तेव्हां नारोपंत रणमंडळांत शिरले. त्यास आसरा बळकट जाला. वरून बाहेरील लोकांस हांका मारावयास लागले जे किल्ला काबीज जाला. तुम्ही जलदी करून शिड्या लावून चढावें म्हणोन हांका देऊन आणि आसरा धरून गोळ्या मारावयास लागले. चार घटका रात्र जाली. अंधार तशांत यजमानानीं सांगून पाठविलें, कोणता विचार करून आला ? केलें तें काय ? त्याणीं उत्तर सांगितलें कीं सरकारची आज्ञा आहे. सनदा आहेत. किल्ला घ्यावयाचा व बिनीवाले यास शिकस्त करावयाचें म्हणोन आज्ञा आहे. किल्ला खालीं करून द्यावा. त्यासमयीं मशाल लावून चंद्रज्योत लावून दुरगाडच्या दरवाज्यांत नारोपंताचे लोक होते ते मारले आणि रणमंडळावर चालोन घेतलें. तेव्हां नारोपंत याणीं उडी घेतली आणि पळोन गेले. लोकांनीं उड्या घेतल्या ते पाण्यांत बुडोन मेले, हातपाय मोडून पडले, कांहीं सांपडले. नारोपंत याचें आयुष्य अती विशेष ! कांहीं एक न लागतां जिवानिशीं वांचोन गेला. बाहेरील जमाव अगोदरच निघोन गेला. दरवाज्यास अग्न दिली होती परंतु जिभींतील लोकानीं विजविली. दरवाज्यास धक्का लागला नाहीं. वरील छप्पर जळालें. तात्यास बाहेरील आरबानीं धरून नेलें होतें. त्याचे लोक सांपडले होते त्यांस सोडून दिलें. त्याणीं तात्यास सोडून दिलें. याप्रमाणें वर्तमान जालें. ”

सांगलीकर चिंतामणराव व मिरजकर बाळासाहेब यामध्यें दौलतीची वांटणी कसकशी झाली ती याद मागें अकराव्या भागांत छापलेलीच आहे. बाळासाहेब मिरजेच्या भक्कम किल्ल्यांत राहून शिरजोरपणानें गोष्टी सांगणारे, दौलतीचीं माणसें त्यांस अनुकूळ, एकंदर जहागिरीचे परगणे त्यांचे ताब्यांत यामुळें ठरलेल्या यादींतील कलमें अमलांत आणण्याविषयीं ते हेंटाळणी करूं लागले. चिंतामणरावआपांचा पक्ष त्यावेळीं दुर्बळ असल्यामुळें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. परंतु आपासाहेबानीं पराक्रमाच्या जोरावर सहा महिन्यांतच सर्व पारडें फिरविलें; मंगळवेढें, तेरदाळ, बहुतेक मिरजप्रांत, लक्ष्मेश्वर, हुबळी वगैरे जहागिरीचे तमाम परगणे जबरदस्तीनें ताब्यांत घेतले. वाघाच्या लढाईत तरवार गाजवून त्यानीं बाजीरावसाहेबांच्या दरबारापर्यंत आपलें

नांव महशूर केलें आणि जनरल वसलीबहादुराशीं मैत्री संपादिली. इतक्या गोष्टी केल्यावर ते मिरजप्रांतीं परत आले व किरकोळ ठाणीं कांहीं राहिलीं होतीं तीं घेऊन खुद्द मिरजेचा किल्ला घेण्याच्या तयारीला लागले. याप्रमाणें चिंतामणरावआपाचें वर्चस्व बेसुमार वाढलें तेव्हां कसें तरी करून आतां हा वांटणीचा तंटा मिटवा म्हणून बाळासाहेबानीं पूर्वींच्याच पंचांस म्हणजे रामचंद्रपंत आपा व रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस प्रार्थना केली. नंतर त्या दोघानीं मिरजेस येऊन चुलते पुतण्यांची कशी बशी समजूत काढिली व हा भाऊबंदकीचा तंटा तोडिला. या प्रसंगीं वांटणीचीं पूर्वींचींच कलमें कायम केलीं गेलीं. मात्र त्यांत आपल्या फायद्याचा असा पुष्कळ फेरफार चिंतामणरावआपानीं करून घेतला.

हें वांटणीप्रकरण संपविल्यावर रघुनाथराव कुरुंदवाडकर श्रीमंताच्या दर्शनाकरितां पुण्यास गेले. ते आपण होऊन गेले म्हणण्यापेक्षां श्रीमंतानीं कांहीं एक क्लृप्ति लढवून त्यांस पुण्यास येणें भाग पाडिलें असेंच म्हणणें योग्य होय. ती क्लृप्ति अशी. कुरुंदवाडकर हे अक्कलकोटकरांचे मुजुमदार होते व त्या दौलतींत बंडगर या नांवाचे एक सरदार होते. तिकोटें महाल या बंडगरांच्या सरंजामांत लावून दिलेला होता. कुरुंदवाडकरानीं बंडगरांस कर्ज देऊन त्याच्या फेडींत तो महाल आपणाकडे लावून घेतला होता. या गोष्टीला पुष्कळ वर्षें होऊन गेलीं तरी कुरुंदवाडकरांचें कर्ज फिटेना व बंडगरांचा महाल त्यांस परत मिळेना! हल्लीं श्रीमंतानीं पानशे तोफखानावाले यांस तिकोट्याचें ठाणें व महाल ताब्यांत घेण्याविषयीं हुकूम केला. तो त्यानीं तत्काळ अंमलांत आणिला. कर्जाचे रुपये बुडाले आणि हातचा महालही गेला असें पाहतांच दाद मागण्यासाठीं वर लिहिल्याप्रमाणें रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस श्रीमंतांकडे पुण्यास जावें लागलें.

या वर्षीं गोविंदराव गायकवाड मृत्यु पावले. त्यांचा कारभारी रावजी आपाजी म्हणून होता. अहंमदाबादेंत पेशव्यांचा मामलेदार आबा शेलूकर म्हणून होता. त्या शेलूकराशीं लढाई मारून रावजीनें अहंमदाबाद ताब्यांत घेतली होती. परंतु पुढें आबा शेलूकर यानें रावजीशीं समेट करून त्याच्या मुलाची दिवाणगिरी पतकरिल्याचें मिष केलें आणि दगाबाजीनें पुन्हां अहंमदाबाद सर केली.

कुलाब्याचे आंगरे यांचा लेकवळा जयसिंगराव म्हणून होता तो यापूर्वींच वारला होता. त्याची स्त्री कुलाब्याचा किल्ला बळकावून बसली होती.

ती बाबूराव आंगरे यांस बधेना त्यामुळें त्यानीं किल्ल्यास वेढा घालून तो जेर केला व आपल्या स्वाधीन करून घेतला.

शिंद्याच्या पलटणानीं सपटेंबर महिन्यांतच नेरलीच्या ठाण्यास वेध लाविला होता. नागो शामजीस वसलीबहाद्दरांची फौज आपल्या कुमकेस येईल ही फार आशा होती व त्या आशेवर त्यानें शत्रूशीं जोराचा विरोध चालू ठेविला होता. पण आक्टोबर अखेरीस वसलीबहाद्दर या देशांतून निघून गेले व करवीरची फौज पलटणांच्या कुमकेस आली तेव्हां नागोपंतआपांचा निरुपाय होऊन नेरलीचें ठाणें पलटणानीं घेतलें. त्या वेळीं नोव्हेंबरमहिना निम्मा होऊन गेला होता. नेरली काबीज होतांच आपा देसाई पलटणें व फौज घेऊन कृष्णा उतरून आले. त्यांचा रोख इचलकरंजीवर होता परंतु तेथील संस्थानिकानीं घांसदाण्याबद्दल चाळीस हजार रुपये देऊन आपणावरचें अरिष्ट टाळलें. हें काम अनायासें उरकल्यावर आपा देसाई यांची स्वारी पुन्हां नदी उतरून मनोळीच्या रोखानें निघाली मनोळीचा किल्ला वसलीबहाद्दरानीं घेऊन रामचंद्रपंतआपांच्या हवालीं केला होता. शिंद्याच्या पलटणानीं चिकोडी मनोळी तालुक्यांतलीं बाकीचीं ठाणीं घेतलीं तरी त्याच्या हातास मनोळीचा किल्ला लागूं देऊं नका असे हा वेळपर्यंत पेशव्यांचे गुप्त निरोप रामचंद्रपंतआपास येत होते व त्यानीं तो किल्ला लढविण्याची तयारीही केली होती. परंतु आतां आयत्या वेळीं पटवर्धनांकडून मनोळी आम्हांस देववा अशी शिंद्यांची श्रीमंतांस भीड पडतांच ते रामचंद्रपंतआपांच्या वकिलास सांगूं लागले कीं कसेंही करा पण तंटा न करितां शिंदा मागतो तें ठाणें त्याच्या हवालीं करा ! मनोळीप्रकरणाची साद्यंत हकीगत वकील बाबा काळे यानीं आपल्या यजमानांस लिहिली आहे ती अनेक दृष्टीनीं मनोरंजक आहे व तीवरून बाजीरावसाहेबांच्या स्वभावाची धरसोड, शिंद्याविषयीं त्यांच्या मनांतली भीति व त्यास हिंदुस्थानांत घालविण्याची उत्सुकता वगैरे कित्येक गोष्टी चांगल्या प्रकारें समजून येतात. ती हकीगत अशी—

"काल मला श्रीमंतानीं बोलावून नेलें. तेथें शिंदे यांचे कारभारी घाटगे व यादवराव भास्कर असे आले होते. तेथें बोलणें पडलें कीं करवीरचा तह राजश्री दौलतराव बाबा शिंदे यांचे विद्यमानें ठरला. त्यांत सरकारांतून चिकोडी मनोळी करवीरकर यांस द्यावी. त्यास चिकोडीचें ठाणें बसलें. नेरलीस मोर्चे बसले होते. तें ठाणें हस्त करून घेतलें. याजउप्परी

मनोळीचें ठाणें घेतों. त्यास ठाणें राजश्री आपाकडे आहे तें देवावें म्हणजे कलागतीचें प्रयोजन नाहीं. याप्रमाणें बोलणें शिंदे यांचे कारभारी श्रीमंतांचे रुबरू बोलले. तेव्हां मी उत्तर केलें कीं मनोळी पहिलीच करवीरकर यांजकडून आम्हांकडे कर्जांत आहे. मधें चार वर्षें सरकारची गैरमर्जी आम्हांवर होती म्हणोन करवीरकर याणीं दाबली होती. त्यास परवां आमचे हवालीं इंग्रजानीं केली आहे. आजपर्यंत करवीरकर यांजकडे आमचे लढे बहुत करवीरकर यांजकडे आहेत. शिवाय यंदाची मसलत दहा लाख रुपये कर्ज करून केली ती व्यर्थ गेली. हल्लीं मनोळी शिंदे मागतात यास आमचा इलाज काय ? जशी सरकारची मर्जी असेल तैशी आज्ञा करावी. तैशी वर्तणूक करूं ऐसें कचेरींत रगडून बोललों. तेव्हां कारभारी बोलूं लागले कीं तुम्ही करवीरचे मोर्चे उठवून मसलत बिघडविलीत. मग जसा समय तैसा तह करणें प्राप्त जाहला. तेव्हां उत्तर केलें कीं मोर्चे उठविले हे दोष आम्हांवर ठेवितां ? तेथें आमचा प्राण घ्यावा हा विचार तुम्ही केला होता. श्रीमंतांचें पुण्य आमचे पदरीं होतें म्हणोन आम्ही हे दिवस पाहिले. ऐसें उत्तर केलें तेव्हां गोष्ट मोठे तटास लागली. कारभारीही उठोन गेले. श्रीमंतही उठले. मी उठोन येऊं लागलों तेव्हां मागती मला श्रीमंतानीं बोलावून फडके यांचे दिवाणखान्यांत बसले होते तेथें समीप राजश्री गोपाळराव मुनशी होते. वरकड कोणी नव्हतें. तेव्हां मला श्रीमंत बोलले कीं तुम्ही शिंदे यांचे घरचे कारभारी यांस बहुत बोललां. तेव्हां उत्तर केलें स्वामींचा मात्र अभयहस्त रामचंद्रपंतआपांचे मस्तकीं असावा म्हणजे मी कोणास भ्यावयाचा नाहीं. परंतु इलाज काय ? स्वामी हातीं लागेनात इतकाच आम्हास उणेपणा आहे. नहून कांहीं दिक्कत नाहीं. ऐसें बोललों. तेव्हां श्रीमंत बोलले कीं तूर्त आम्ही हरकसेंकरून शिंदे यांस देशांतून लावून देतों. शिंदे जबरदस्त. कै॥ नानानीं आज पांच सात वर्षें शिंदे देशांतून जावे म्हणोन पैका दिल्हा. प्रयत्न होता तितका केला. परंतु गोष्ट घडली नाहीं. त्यास आम्ही हरइलाज करून शिंदे यास पाठवणी करतों. त्यास तुम्ही मनोळीसाठीं हिसका घेऊं नका. शिंदे याचे हवालीं करा. पुढें शिंदे देशांतून गेल्यानंतर करवीरचें पारिपत्य करावयाचें यांत दिक्कत नाहीं. चार महिने तुम्ही माझेसाठीं कष्ट सोसा. इंग्रजांचा पैका करवीरकर याणी द्यावयाचा तो हवालादेखील श्रीमंत म्हणूं लागले कीं मी घेतला. तूर्त शिंदे यास करवीरकर यांचें अगत्य पडलें म्हणोन इतकेंही करणें, तेव्हां मी श्रीमंतांस उत्तर केलें

करवीरकर याणीं इंग्रजांचा पैका देणें त्यास याचा हवाला आपण घेण्याचें प्रयोजन काय ? तेव्हां उत्तर जाहलें शिंदे अविवेकी. इंग्रज करवीरावर येणार तेव्हां शिंदे करवीरची कुमक करणार. तेव्हां इंग्रज त्यांचें यांचें पारिपत्य करून आमचे दौलतीवरही तोंड टाकणार मग सुभता कैचा ? हा विचार करून इंग्रजानीं पुढें येऊं नये, शिंदे याणीं देशांतून जावें म्हणोन शिंदे लाथा मारितात त्याही सोसतों. कसेंही करून शिंदे यास नर्मदापार करावें ही खटपट करतों. तेव्हां तुम्ही तूर्त मनोळीसाठीं व्यर्थ कलह करूं नका. तेवढी मनोळी हवालीं केल्यावर तुमचे खेड्यास घेऊं नये येणेंप्रमाणें धरबंद करून देतों. आणि याजउपरी शिंदे याचीं पलटणें व फौज तुमचे प्रांतांत राहू नये येणेंप्रमाणें बंदोबस्त करतों. पुढें मी तुम्हाशिवाय नाहीं. येणेंप्रमाणें श्रीमंतांचें म्हणणें पडलें आहे. आज मनोळी हवालीं केली असतां शिंदे यांचा सरंजाम त्या प्रांतांत राहत नाहीं. मी अंतर्यामींही विनंती केली कीं इंग्रजांस सूचना केली असतां शिंदे सहजांत नर्मदापार होतील. तेव्हां उत्तर केलें कीं आम्ही होऊन इंग्रज घरीं आमंत्रण देऊन बोलाविलासा होतो याजमुळें ही गोष्ट करावयाची नाहीं. शिंदे बहुशः माघअखेरपर्यंत देशांतून जातील. नाहीं जात तर इतक्याही गोष्टी करणें प्राप्त आहेत. ऐसें श्रीमंतांचें म्हणणें पडलें. त्यास तूर्त तुम्ही मनोळीविशीं ओढूं नका ऐसें उत्तर जाहलें. तेव्हां जशी मर्जी असेल त्यास मान्य आहों म्हणोन बिऱ्हाडास आलों. नंतर अस्तमानीं सर्जेराव याणीं बोलावून नेले आणि बोलूं लागले कीं तुम्ही आज श्रीमंतादेखत बहुत चढोन बोललां. आम्ही सोसली. तेव्हां उत्तर केलें तुम्ही काय सोसलें ? आम्हांकडे मनोळी कर्जांत आहे ती मागतां. मागील कर्ज मागूं नये ऐसें श्रीमंतांचें लिहिलें घेतलें. यापरता आमचा प्राण रहात नाहीं. समजून विनंती केली तेव्हां बहुत गळीं पडोन बोलूं लागले कीं शिंदे यांचा आग्रह मनोळीविशीं आहे. तुम्ही हवालीं करावी. तुम्ही सर्वस्वीं पेचांत आलां खरें. त्यास तुम्हांस करवीरकर याजकडून पंधरा हजार निदान वीस हजार रुपये गांव इमान करून देवितों. मनोळी तालुकेंत पाहिजे तर घेणें अथवा चिकोडी तालुकेंत घेणें. आज राजपत्रें करून देवितों. परंतु मनोळीसाठीं खटला घालूं नका. ऐसें बोलले. तेव्हां उत्तर केलें कीं मी कांहीं मुखत्यार नाहीं. लिहून पाठवितों. उत्तर येईल तैसी वर्तणूक करीन. दहा दिवसांत जाब आणवितों ऐसें सांगून आलों. नंतर रात्रीं श्रीमंतांकडे गेलों. तेथें वर्तमान श्रवण केलें. उत्तर केलें कीं पंधरा हजार वीसहजारापर्यंत वडिलीं गांव इनाम करून

देत असल्यास तूर्त घेणें. पुढें चार महिन्यानीं त्यांचें पारिपत्य करणें आहे. ऐसी माझे गळ्यावर शपथ श्रीमंतानीं केली आणि कसेंही करून शिंदे जातात यास अडथळा होऊं नये ऐसें साफ बोलले."

श्रीमंतानीं इतकी गळ घातल्यावर रामचंद्रपंतआपांचें काय चालणार? त्यांनीं निमूटपणें मनोळीचा किल्ला शिंद्याच्या पलटणांच्या हवालीं केला. नंतर आपा देसाई फौज व पलटणें घेऊन कित्तूर संस्थानांत शिरले व तेथील संस्थानिकाकडून त्यानीं घासदाण्याची रक्कम वसूल केली. करवीरकरांशीं तह ठरला त्यांत त्यांच्या तर्फेनें सात लक्ष रुपयांचा हवाला घाटग्यानें घेतला होता व त्यास तारण म्हणून चिकोडी व मनोळी हे महाल स्वतःकडे लावून घेतले होते हा सर्व मजकूर मागें आलाच आहे. त्याप्रमाणें पलटणांच्या जोरावर घाटग्यानें ते महाल तर घेतलेच. पण सात लाख रुपये त्यानें देणें ते अजून त्यास मिळाले नव्हते. कारण घांसदाण्याची जी रक्कम येई ती फौजेच्या व पलटणांच्या खर्चास पुरवितां पुरवितां आपा देसाई याच्या नाकीं नव येत. अशा स्थितींत श्रीमंतांची परवानगी घेऊस घाटग्यानें रामचंद्रपंतआपास त्वष्ट लाविलें कीं हा सात लाखांचा ऐवज तुम्ही सावनूरच्या महालावर आम्हांस उगवून द्यावा. तसें होत नसेल तर महाल आमच्या हवालीं करावे म्हणजे आम्ही उगवणी करून घेतों. इतकेंच बोलून तो थांबला नाहीं. तासगाव-करांस दहशत देण्याच्या हेतूनें तो पुणें सोडून वाटेनें खेड्यापाड्यांस उपद्रव देत मिरज कोल्हापुराकडे येऊं लागला. आपणास श्रीज्योतीबाचें दर्शन घ्यावयाचें व देवास दीपाराधना करावयाची, त्यासाठीं आपण येत आहों असा त्यानें पुकारा केला होता.

डोईजड शिंद्याच्या लष्करचा तळ हालल्यावर प्रजेचा भोग सरेल म्हणून लोक आशा करीत होते तों या दुर्दैवी महाराष्ट्रावर विपत्तींची नवीन नवीन अभ्रपटलें येऊन कोसळण्याची सुरवात झालीच होती. शिंदे होळकर व पेशवे यांच्या फौजांस योग्य प्रेरणा देऊन त्यांस परमुलखांत स्वारीस न्यावें व तिकडे त्यांचें परभारें पोट भरून देशांत पैका आणावा ही कर्तबगारी करून दाखवणारे महाराष्ट्रांतले सर्व सेनानायक आतां मरून गेले होते. जे दौलतीचे धनी म्हणवीत होते त्यांस या फौजा संभाळण्याची ऐपत व अक्कल नसल्यामुळें त्यानीं त्यांस कधींच निरोप दिला होता. अशा स्थितींत हजारों लाखो शिपायांच्या झुंडी जागोजाग गोळा होऊन त्यांनीं आपलाच

मुलूख लुटीत सुटावें यांत आश्चर्य काय ? हल्लीं चोहोंकडे हाच अनर्थ कोसळला होता. काशीराव होळकराचा सरदार मालजी गावडे हा दहा हजार लुटारू शिलेदार गोळा करून खानदेश लुटीत होता. होळकराचा आणखी एक सरदार जिवाजी यशवंतराव म्हणून होता. त्यानें गोदावरीच्या तीरास लुटालुटीचा भयंकर अनर्थ केला होता. त्याच्या हाताखालीं पंचवीस हजार फौज गोळा झाली होती व ही संख्या इतकी फुगण्याचें मुख्य कारण तींत पेशवे शिंदे यांच्या फौजेंतल्या बेकार स्वारांचाच भरणा विशेष होता. तिसरी एक लुटारू फौज विठोजी होळकर याच्या हाताखालीं गोळा होऊन मंगळवेढें करकंब पंढरपूर या बाजूस हिंडत होती. तींत पेशव्यांचा सरदार बाळकृष्ण गंगाधर बावनपागे व शिंद्याकडील येशवंत रामकृष्ण व कृष्णराव मोदी हे शेणवी सरदार सामील झाले होते. विठोजी होळकरावर श्रीमंतांचा फारच क्रोध झाला होता. याचें कारण तो राज्य लुटीत होता म्हणून नव्हे, तर तें तो अमृतरावाच्या नांवानें लुटीत होता म्हणून ! विठोजी होळकर यानें मुलखांत जाहीर केलें होतें कीं आपली फौज हीं अमृतरावाची फौज आहे. आपण अमृतरावाचे सरदार आहों. बाजीरावाचें राज्य घेण्याविषयीं आपलेजवळ अमृतरावाच्या सनदा आहेत ! या जाहीरनाम्याप्रमाणेंच त्याचें वर्तन चाललें होतें. तो किल्ले कोट ठाणीं जेवढीं घेई त्यांवर अमृतरावांचें निशाण लावी. याप्रमाणें तो बंडाळी करीत सोलापुरास आला. तेथल्या किल्लेदारानें लाख रुपये खंडणी देतों, उपद्रव न देतां चालते व्हा म्हणून बोलणें लाविलें; परंतु विठोजी तें ऐकेना. मला खंडणी नको. किल्ला हवालीं करा. तो घेण्याविषयीं माझ्याजवळ अमृतरावाच्या सनदा आहेत हेंच त्याचें बोलणें पडलें. यावर किल्लेदार बोलला कीं बाजीरावसाहेबांची सनद असेल तर दाखवा म्हणजे किल्ला देतों. अमृतरावाची सनद आपण मानीत नाहीं. याप्रमाणें उत्तर प्रत्युत्तर झाल्यावर विठोजी होळकर चार हजार फौज घेऊन सोलापूरच्या किल्ल्यावर चालून आला तेव्हां सोलापूरकर त्यास आडवे झाले. त्याच्या कुमकेस आबा काळे व पानशे यांची फौज तोफांसह आली होती. चार घटका गोळागोळी झाल्यावर होळकरानें हल्ला करून पानशे व काळे यांची फौज मोडून पिटून लाविली व त्यांच्या तोफा हिसकून घेतल्या. सोलापूरकरानीं बराच वेळ नेटानें लढाई दिली; परंतु सोबत्यांची दुर्दशा पाहिल्यावर त्यांसही मागें फिरावें लागलें. त्यांच्या मागोमाग होळकरानें गांवांत शिरून पेठ लुटून फस्त केली व इतर नासधूस

बरीच केली. तो किल्ल्यास वेढा घालण्याच्या भरीस न पडतां तेथून काय खंडणी मिळाली तेवढीच घेऊन निघून गेला. या पराजयामुळें श्रीमंतांचें मन फारच व्यग्र झालें. हें होळकराचें बंड कसेंही करून आधीं मोडलें पाहिजे ही त्यांची खात्री झाली. हें काम बापू गोखल्यांखेरीज कोणाच्यानें व्हावयाचें नाहीं असें समजून त्यांनीं गोखले कर्नाटकांत होते त्यास बोलावणें पाठविलें. सर्व सरदारांपेक्षां बापूंच्या एकनिष्ठेवर व पराक्रमावर त्यांचा भरंवसा अधीक होता. बापू गोखल्यास ते आपल्या राज्याची समशेर म्हणत.

गतवर्षींच्या नोव्हेंबरांत समुद्रांत मोठें वादळ उत्पन्न होऊन अपरंपार नुकसान झालें त्याचें वर्णन अकराव्या भागांत आलेंच आहे. यंदाही तसें एक वादळ उद्भवलेंच होतें परंतु त्याचा उग्र प्रभाव कोठें फारसा जाणवला नाहीं. गेल्या वर्षाप्रमाणें यंदा अतिवृष्टीमुळेंही कोठें नुकसान झालें नाहीं. नाहीं म्हणावयास औरंगाबादेस मात्र तसें नुकसान झाल्याचा मजकूर एका पत्रांत सांपडतो—

" औरंगाबादेनजीक गंधी नाला म्हणोन थोर आहे. त्यास स्वातीचा पर्जन्य अकस्मात् मोठा लागून जंगलांतील देखील पाणी नाल्यास आलें. रात्रौ पर्जन्य लागला. नाल्यास पाणी अपरिमित मर्यादा सोडोन आल्यावर नाल्याचे काठीं घरें होतीं तीं शेपन्नास वाहोन माणसेंही वाहिलीं. आणखीही कोणी उदमी नाल्याचे काठीं राहिला होता त्याचाही बैल सरंजाम वगैरे वाहोन गेला. दोन तीनशें माणसें मृत्यु पावलीं. "

पूर्वीं ठरल्याप्रमाणें मार्ग॥ व॥ ५ शके १७२२ ता० ६ नोव्हेंबर सन १८०० या दिवशीं दौलतराव शिंदे वानवडीची छावणी सोडून वाघोलीस गेले व तेथें कांहीं दिवस राहून जांबगावास गेले. तेथून त्यांच्या लष्करानें हिंदुस्थानचा मार्ग धरिला. वाघोलीच्या मुक्कामीं असतां त्यांनीं पेशव्यांजवळ खंडेराव होळकरास आपणाकडे पाठवून देण्याविषयीं निक्षून मागणी केली व तो हातीं आल्याखेरीज आपण जात नाहीं म्हणून अडून बसले. शिंदा कसा तरी इथून जाऊं दे म्हणून श्रीमंतांस घाई सुटली होती. एवढ्याच निमित्तानें याच्या जाण्याचें बिनसावयास नको असें समजून श्रीमंतानीं खंडेराव होळकरास शिंद्याकडे पाठवून दिलें ! अजूनसुद्धां शिंद्यानीं दक्षिणेंतून आपली फौज काढली असें म्हणतां येत नव्हतें.

कारण त्यानीं पुण्यास पांच पलटणें ठेविलीं होतीं. सर्जेराव करवीराकडे गेला होता त्याबरोबर एक पलटण व दोन हजार स्वार होते. कित्तुरास आपा देसाई होता त्याबरोबर बराऊन साहेबाच्या हाताखालीं सात पलटणें होतीं. तथापि हे सर्व लोक चार सहा महिन्यांत जाणारे असल्यामुळें त्यांच्या रहाण्याचें विशेष महत्त्व राहिलें नाहीं. एतावता जांबगांवच्या मुक्कामापासून शिंद्यास हिंदुस्थानाकडे जाण्याचा खरोखरीचा वेध लागल्यामुळें त्यांनीं दक्षिणेच्या कारभाराचें सूत्रचालकत्व सोडलें व सर्व राज्य बाजीरावाच्या हवालीं केलें असें म्हणावयास हरकत नाहीं. खड्यांची लढाई मारून हिंदुस्थानांत जावयास निघालेले दौलतराव शिंदे सन १७९६ च्या फेब्रुवारींत परत फिरले ते बाजीरावसाहेबांस गादीवर बसविण्याकरितां फिरले. यानीं त्यांस गादीवर बसवावें व त्यानीं यांस एक कोट रुपये द्यावे असा उभयपक्षीं करार. तो करार शिंद्यानीं पुरा केला तरी माझें राज्य निर्भय व निर्वैर होईपर्यंत तुम्ही जाऊं नका असें श्रीमंतानीं सांगितल्यावरून शिंद्याचें राहणें या देशीं आजपर्यंत जवळ जवळ पांच वर्षें होत गेलें. आतां ते कृतकृत्य होत्साते. आपल्या मुलखाला चालले. दाक्षिणच्या लोकांना त्यानीं कायमचा रामराम ठोकला. अशा वेळीं यानीं इतके दिवस येथें राहून काय केलें व त्याचे महाराष्ट्रावर काय परिणाम झाले याचा थोडक्यांत आढावा घेणें प्रसंगोचित आहे.

रयतेपुरतें पाहिलें तर तिचें रक्षण करावें हा विचार शिंद्याच्या मनास कधींच शिवला नाहीं व आपला चरितार्थ चालविण्याकरितां रयतेचें निसंतान करतांना त्याला कधींच दया आली नाहीं. रयत मारून मारून पिळून पिळून त्यानीं ती इतकी दीन व दुर्बळ बनविली कीं चोराचिरट्यापासून सुद्धां स्वतःचा बचाव करण्याचें अवसान तिच्यांत बिलकूल राहिलें नाहीं ! कोठें सन १७०० तला महाराष्ट्र आणि कोठें सन १८०० तला ! त्यावेळीं मोंगल फौज गावांवर आली तर ठाण्यांतले प्यादे व ' गांवचे शेपन्नास दांडगे ' मिळून तिला सहज हुसकून लावीत व तिचींच घोडीं हिसकावून घेऊन गबर होत. आणि सन १८०० तली दशा पहा ! कोठें मुंगीचा राजा तर कोठें घाटग्याची राणी, कोठें बापू फणसळकर तर कोठें भीमराव मुंढरगी, वाटेल त्यानें शेपन्नास हत्यारबंद माणूस गोळा करून रयत मारीत सुटावें आणि रयतेनें खालीं मान घालून मार खावा आणि नागवून घ्यावें पण प्रतीकार कोणीच करूं नये !

फक्त एका व्यक्तीचें मात्र शिंद्यानीं कल्याण केलें खरें. ती व्यक्ती खुद्द बाजीरावसाहेब होत. मला सांबानें राज्यपद दिलें आणि तें शिंद्यानें

राखलें असें श्रीमंत वारंवार बोलून दाखवीत आणि तें अक्षरशः खरें होतें. राज्याचें वाटोळें झालें तरी बेहत्तर, पण मीच पेशवाईच्या गादीवर बसणार हा बाजीरावसाहेबांचा दुराग्रह होता. लोकांना तर ते मुळींच नको होते. श्रीमंतांभोंवतीं शिंद्यांनीं बागनिटांचें भक्कम कुंपण घातलें नसतें तर त्यांचा निभाव क्षणभरही लागताना. अशा स्थितींत आपणाला पाण्यांत पाहणारे हे जुनें राजिक मुळींच नसावें असें श्रीमंतांस साहजिकच वाटूं लागलें व तें मोडण्याचा ते उद्योग करूं लागले तेव्हां दौलतरावानीं त्यांस सर्वप्रकारें सहाय्य केलें. तसें करतांना त्यानीं धर्माधर्म, पापपुण्य, सूक्तासूक्त याचा कांहीं एक विचार पाहिला नाहीं. त्यानीं धन्याच्या तोंडचा शब्द हेंच आधिदैवत मानिलें व त्याप्रमाणें भक्तिपूर्वक आचरण केलें. त्याचा परिणाम काय झाला? परिणाम असा झाला कीं जुन्या सरदाऱ्या लिलावांत निघाल्या, पागा मोडल्या, पथकें देशोधडीला लागलीं, मोठमोठे सरदार, मुत्सद्दी, संपन्न सावकार, कार्यकर्ते पुरुष, समाजाचे धुरीण सर्व धुळीला मिळाले व लोप पावले. देशांत पौरुषाचा लेशही राहिला नाहीं. हुरूप रग स्वाभिमान जेवढा म्हणून मुलखांत होता त्यावरून वरवंटा फिरला! आणि अशी दुर्दशा झाल्यामुळें इंग्रजांना हा देश काबीज करायला आयताच सोपा मार्ग झाला!

स्वामीभाक्ति हा सद्गुण असतांही कारणपरत्वें कसा दुर्गुण होऊं शकतो याचें दौलतराव शिंदे हें एक ठळक उदाहरण आहे. उत्तम राजा व राज्य यांचा मिलाफ बनलेला असला म्हणजे वीरपुरुषानीं राजाला वाहिलेली भक्ति राज्याच्या महोदयाला कारण होते. उलटपक्षीं अधम राजाला वाहिलेली तीच भक्ति राज्याला अनर्थावह होते! शिंद्यांचें घराणें स्वामीभक्त म्हणून प्रख्यात आहे हें खरें, बाळाजी विश्वनाथ उर्फ थोरले बाळाजीपंतनाना यांच्या वेळेपासून सवाई रावसाहेबापर्यंत पेशवे कुळांतल्या पुरुषांना शिंदे घराण्यांतल्या राणोजी, जयापा, दत्ताजी, जनकोजी व महादजी यानीं निस्सीम भक्ति अर्पून दिगंत कीर्ति केली हेंही सर्व खरें आहे. पण त्याच शिंदे घराण्यांतल्या दौलतरावानीं नादान रावबाजींना तीच स्वामीभाक्ति आंधळेपणानें अर्पण करतांच काय काय अनर्थ झाले हें वर सांगितलेंच आहे.

नं. ५७९७ श्री. ( आश्विन शु. १३–३० सप्तं. )

पै॥ छ० १५ जमादिलावल. इहिदे मय्यातैन.

सेवेशीं विज्ञापना. विजयादशमीस श्री॥ राजश्री पंतप्रधान याणीं पदरचे मंडळीस उचित ( ? ) द्यावयाचा करार करून वस्त्रें दिलीं. येणेंप्रों.

१ राजश्री मोरोबादादा यांस फडणिशीची तेरीख सांगितली. वस्त्रें दिलीं.

२ पालख्या नवीन दिल्या.

१ वैजनाथभट भागवत.

१ गोविंदपंत केळकर. कोपरगावीं श्रीमंतांजवळ पवमान वगैरे म्हणत होते. 'गुरुजी' म्हणोन त्यास श्रीमंत म्हणतात.

२

३ पागा नव्या दिल्या. वस्त्रें दिलीं.

१ आबा काळे यांचे पुतण्ये दादा काळे यांस.

१ दाऊदभाई भालदार.

१ वेंकटराव भास्कर. यादवराव भास्कर शिंदे यांजकडे आहेत त्यांचे बंधूस.

३

१ हिराबाग राजश्री सदाशिव माणकेश्वर यांस द्यावयाचा करार पेशजी जाला होता. काल सनद दिली. हिराबाग तळयाचे कांठीं चारोदिवाळी[2] आहे. आंत बंगले वगैरे अजमास लाख पन्नास हजार रुपयेची इमारत आहे. कृपा करून दिला.

येणेंप्रमाणें वस्त्रें दिलीं. बाळोजी कुंजीर यास पाच सात हजार रुपयेचा चौकडा दिला. सीमाउल्लंघन होऊन शमीपूजा होऊन स्वारी वाड्यांत सूर्यास्तीं आलीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. सेवेशीं धोंडो बाजूजी जोशी शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. इकडील मजकूर दादानीं[1] लिहिला आहे. इकडे हस्त नक्षत्राचें पाणी चारपाच मातबर ( पाऊस ) जाले. अद्याप लागत आहे. गल्ला हरभरे ८। बाजरी ८।॥. साडेचार पायली, जोरी दर

१ वकील मोरोपंत परांजपे याचें पत्र मिरजेस. २ चारी बाजूंस भिंती असलेला.

८।२ गहूं ८।· तांदूळ माल पाहून दर पल्ला ९। ९॥ १० ११ १२ प्रमाणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५७९८ श्री. ( आश्वि० शु० १५–२ आक्टो. )

पै॥ छ० १५ जमादिलावल. आश्विनमास. इहिदे मय्यातैन व अल्लफ.

सेवेशीं सा॥ नमस्कार विनंती. तागायत छ० १२ जमादिलावल पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण छ० ९ तेरखेचें पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री आपासाहेब आगरणीवरी सत्तर संबरगेवर आहेत म्हणोन लिहिलें तें कळों आलें. 'दाक्षिणेकडील इंग्रज व आपल्या फौजा डंबळचे रोखें आल्याचें वर्तमान आहे. तुम्हांकडे वर्तमान असेल तें कळवावें' म्हणोन लिहिलें, तर छ० ७ तेरखेचीं पत्रें आम्हांकडून कारकून गेले आहेत त्यांचीं डंबळचे मुक्कामाहूनच आलीं. वर्तमान प्रमाण आहे. चेनापट्टणास पत्रें गेलीं आहेत, उत्तराचा मार्ग ( वसली बहादर ) पाहतात. 'येकूण बंदोबस्त करून देतों' असें खाचित सांगितलें आहे. म्हणोन ( कारकुनाचीं ) पत्रें येतात. परंतु दिवसगतीवर गोष्ट आहे. नेरलीस मोर्चे देऊन चौदा दिवस जाले. गोळागोळी चाललीच आहे. आंतील लोक कामकाज चांगलेंच करितात. इंदुवारीं बाहेर पडून मोर्चेवर तोडोन मोर्चे उठवून गेले. याप्रमाणें करितात. बाहेरून कुमक पोंहचून शह उठावा अशी सोई तूर्त कोठेंही नाहीं. त्यांजेकडून बोलण्याचा आशय परभारें आज्ञा ( कीं, ) कोगनोळी द्यावी, एकसालीचें बोलावें, त्याजवरून तोरगलकर राजश्री सेनाखासकील यांजकडील कारकून आले त्यांस पाठविलें आहे. खुद्द येऊन जाबसाल उलगडोन देऊं असें त्याणीं लिहिलें होतें. त्यावरून त्यांसही बोलाऊं पाठविलें आहे. चि॥ राजश्री आबा आंत गुंतलें याजमुळें विचार पडला आहे. अद्याप महिना पंधरा दिवस दम धरावयास चिंता नाहीं. परंतु पुढेंही कुमकेचा भरंवसा नाहीं. बोलणेंचा नाद लाविला आहे. सेनाखासकील आलियानंतर काय घडतें पहावें. बोलण्यास केवळ पळपळीतही असों नये, वरचेवर हुल्लडही होत असावी, यास्तव बाणांविशीं आपणांस लिहिलें होतें. आपण जुने बाण आहेत, पाहिजे तर न्यावे, म्हणोन लिहिलें; तर जुने असल्यास चिंता काय आहे ? पंचवीस बाण त्यांतून निवडोन व दोघे बाणदार राजश्री

---

१ हें व पुढचें अशीं दोन्ही पत्रें नागो शामजी याचीं बाळासाहेबांस वंटमुरीहून. २ निपाणकराकडून.

रामचंद्रपंत यांचे जिमे करावे. सोईने रवाना करून देतील. आम्ही तूर्त वंटमुरीस आहों. राजश्री आपा मोरवेकर राजश्री बाबासाहेब यांजकडे जावयास निघोन गेले. गोकाकेस आहेत. गारदी याणीं तेथें तलबेकारितां दंगा केला याजमुळें राहिले आहेत. समजी करून जातील. निपाणीकर यांस दारूचा तोटा आहे. मिरजेस बोहरी याजकडे दारू खरीदीस पाठवून खरीदी करवितात. तर आपण बोहरी यास ताकीद करून तेथून दारूगोळा खरीदी होऊन येऊं नये याप्रमाणें बंदोबस्त जाला पाहिजे. पुण्याकडील वर्तमान लिहिलें तें कळलें. इकडून वरचेवरी वर्तमान समजावें तरी पंथ दूर. यास्तव × × × × आपण कृपा करून साहित्य होई तें करावें. ईश्वरसत्ता आहे. प्राप्तीसारखें अनभविलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. लोभ करावा हे विनंती.

नं. ५७९९ श्री. ( आश्विन शु० १५—२आक्टो. )

पै॥ छ० १५ रबिलावल. इहिदे मयातैन.

पुरवणी. सेवेशीं सा॥ नमस्कार विनंती विशेष. दारूगोळाखरेदीस निपाणीकरानीं तेथें बोहरी याजकडे ( माणूस ) पाठविला आहे. त्यास आपले आज्ञेशिवाय खरेदी देऊं नये म्हणोन आपली आज्ञा आहे. परंतु त्यांचें अंग न दाखवितां परभारें खरेदी करून पाठविण्याचा उद्योग तेथें व्हावयासारखें आहे. त्यास आपले आज्ञेशिवाय दारूगोळा व बारुदसामान कोणी खरेदी करूं नये, येऊन नेऊं नये, याप्रमाणें ताकीद एकंदर करवावी. सरकार नि॥ ठाणेंस सामान पाहिजे म्हणोन आपणापाशीं परवानगी मागतील तर त्यांसही देऊं नये. सरकार ठाण्याचें निमित्त करून त्यांस पोंचविणार असेही आहेत. यास्तव लिहिलें असे. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंती.

नं. ५८०० श्री. ( आश्विन व० ४—६ अक्टो. )

पै॥ छ० २० जमादिलावल. इहिदे मय्यातैन व अलुफ.

विज्ञापना ऐसीजे, श्री॥ राजश्री पंतप्रधान याणीं विजयादशमीस नवीन पालख्या वगैरे बक्षीस दिल्या त्याचा मजकूर सेवेशीं लिहिला आहे त्यावरून श्रुत जाहलाच आहे. वे॥ राजश्री धोंडभट भागवत पहिले सासरे यांचे वरीं विजयादशमीस रात्रौ फराळास गेले होते. सासूस

१ हरबाजी नरसिंह धायगुडे. २ वकील मोरोपंत परांजपे यांचें पत्र मिरजेस बाळासाहेबांस तसेंच पु चें

लुगडें आठशें रुपयांचें व धोंडभट याचे सुनेस लुगडें सहाशें रुपयांचें भरजरी दोन्हीं लुगडीं दिलीं. शिवाय सहा हजार रुपयेचा कंठा सुनेस दिला. याप्रमाणें मागें कोणी दानशूर जाहलें नाहीं. धोंडभट यास पुत्र एकच आहे. त्यांचें नांव राघोपंत भागवत. गुदस्तां कर्नाळा किल्याची मामलत त्यास सांगितली. सर्वप्रकारें ममता आहे. वरकड जवळ मंडळी आहेत त्यांस झाडून पोषाख सुनेरी बुटीचे दिल्हे. हजार सातशें आठशेंखालीं पोषाख कोणास दिला नाहीं. राजश्री आपाजीराम सहस्रबुद्धे यास आठशें रुपयांचा पोषाख दिला. छय्या गोसावी पैठणकर मागें सरकारांत कै॥ नानासाहेब यांजपाशीं होते. त्यांचे नातू रामचंद्र गोसावी गाणार चांगले आहेत. त्यांजवर श्रीमंतांची कृपा पूर्ण आहे. श्रीमंतानीं हत्ती बक्षीस दिला व शिंदे याणींही हत्ती बक्षीस दिला. रविवारांत गोसावी वाडा सरकारांतून देऊन तेथें राहिले आहेत. दोन हत्ती झुलतात. त्यांचें गाणें पांच चार दिवशीं एकांतीं नवे इमारतीमध्यें होत असतें ते समयीं अन्यत्राचा प्रवेश नाहीं. श्रीमंतच आहेत, याचा अंदेशा नाहीं. परंतु जन त्रिविध. यास कोणाचा उपाय नाहीं. दोन्ही प्रकारें बोलतात. उपाय नाहीं. श्रीमंतांचा कावा अट्टल. मनचें मुखचें कोणास समजावयाचें नाहीं. दोन घटकानीं एखाद्याचा घात अथवा ऊर्जित करावें असें असतां कोणास कळावयाचें नाहीं. काल काय बोलिलों, आज काय बोलतों, याचा सुमार ध्यानांत रहात नाहीं. सरकारचे दौलतींतील मागील मातबर सरदार मुत्सद्दी आहेत त्यांचे जागां अभक्त. सहजांत निर्माल्य होतील तिकडून करावे हा भाव सात पडद्याआंत आहे. नवीन मंडळी यांस नावलौकिकास आणावें याप्रमाणें उमेदी दिसतात. बोलण्यांतही आढळ पडतो. कारभाराविषयीं समज किती आहे म्हणावा तरी ईश्वरें दौलत उगाच दिली नसेल ! चटक कारभाराची नाहीं, उत्तर समर्पक होत नाहीं. परंतु अंतर्यामीं सर्व त्यांचे आहे म्हणोन जवळील सांप्रतकाळचे उमेदवार म्हणतात. लोकांस खरें दिसोन येत नाहीं. राज्यकारभारावांचून लोकांस खोळंबा काय पडिला आहे ? परंतु घरोघर हाच विचार आबालवृद्ध म्हणतात. सारांश विचार पाहतां चांगला नाहीं. पत्र विसर्जन व्हावें. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५८०१ श्री. ( आश्विन व० ४–६ अक्टो. )

पै॥ छ० २० जमादिलावल इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. तागायत छ० १६ जमादिलावल वर्तमान यथास्थित असे

विशेष. स्वारी काल शिंदे यांची पुण्यांत राजश्री सखाराम घाटगे याजकडे आली होती. दोन प्रहरांपासोन अस्तमान चार घटका रात्रपावेतों स्वारी होती. घाटगे व त्रिवर्ग कारभारी पुण्यांतच आहेत. श्री॥ राजश्री रावसाहेब भिवंडीस आहेत. बाया शिंदे उज्जनीस दाखल जाली. प्रांतांत तमाम अंमल बसवितात. होळकर घारेनजीक आहेत. बायांस त्यास वीस कोशांचा अंतरा आहे. बायांजवळ फौजा आठ दहा हजार सुमारें जमाव जाला. लखबा लाड उदेपूर येथील खंडणी घेऊन दिल्लीचे रोखें पिछवर चालोन जावें हा मनसबा करून एक दोन कूच जाले आहेत. अंबोजी इंगळे मथुरेनजीक पांच सहा हजार फौजेनिशीं आहेत. फार करून लखबा जवळपास गेले असतां त्यांजकडे मिळतील असें लोक म्हणतात. प्रांत हिंदुस्थान येथील अंमल लौकर उठोन बायांचे स्वाधीन होतो असा रंग दिसतो. शिंदे यांजकडेही पत्रें आलीं. विचार मोठा पडला आहे. सारांश कोणीकडेच स्वस्थ नाहीं. प्रजेचा भोग एक अवसरें सारखा चालिला आहे. बाया शिंदे पुत्र घेणार असें लोक म्हणतात. कोणी घेतला असेंही म्हणतात. परंतु लिहिण्यांत कोठें नाहीं. याउपरी आढळेल तें सेवेशीं विनंती लिहितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५८०२ श्री. ( आश्विन व० ४-६ आक्टो. )

पै॥ छ० २० जमादिलावल. भृगुवार. इहिदे मयातैन व अलफ.

सेवेशीं मोरो आपाजी परांजपे सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १६ जमादिलावल वर्तमान यथास्थित असे. स्वामींची प्रकृत गुदस्तांपासोन यथास्थित नाहीं. त्यास " वैद्याचा शोध करणें. वैद्य चांगला, प्रामाणिक, यशस्वी, याचा शोध करून त्याजपाशीं बालोन लेहून पाठविणें " म्हणोन पत्रीं आज्ञा, त्यास पेशजी वैद्याचा मजकूर विस्तारें करून लिहिलाच आहे. सांप्रत वैद्य चांगले रास्ते यांजपाशीं कनक सभापति वैद्य तेलंग व वे॥ राजश्री दयाराम भटजी वैद्य काशीकर सांप्रत श्री नाशिकास असतात व वे॥ राजश्री लक्ष्मणराव वैद्य वडुदकर यांचे पुत्र हे त्रिवर्ग वैद्य चांगले. त्यास कनक सभापति वैद्य यांस देशास महिना दोन महिन्यानीं जावयाचें. आणि राजश्री माधवराव रास्ते सांप्रत रसायणें औषधें करवीत आहेत. त्यांचें येणें होत नाहीं. वे॥ राजश्री दयाराम भटजी यांजकडे श्रीनाशिकास पत्रें लेहून देऊन मुद्दाम अजूरदार रवाना केला आहे. पांचशें रुपयांचा विचार त्यास लिहिला आहे. आले असतां उत्तम. पत्राचें उत्तर नाशिकाहून तीन चार दिवसांत येतच आहे. वडुदकर वैद्य यांजपाशीं बोलिलों. तेही

यावयास कबूल आहेत. परंतु त्यांजपाशीं कांहीं एक बोली असावी म्हणोन प्रश्न केला. त्याणीं उत्तर केलें कीं, हा विचार आमचा नाहीं. त्याणीं बोलाविलें असतां जाऊन औषध देऊन आरोग्य करून द्यावें. ते जें देतील तें पुष्कळ आहे. कांहीं दिलें नाहीं, दोन वस्त्रें देऊन रवानगी केली, तत्रापि बहुत संतोष आहे. आमचा कांहीं एक विचार नाहीं. रास्ते कृपा करितात त्याप्रमाणें श्री॥ राजश्री बाळासाहेब याणीं कृपा करून सांभाळ करावा. कांहीं एक अमुक असें बोलावयाचें नाहीं. मागेंही एक वेळ मिरजेस आलों होतों. पंचवीस वर्षें जालीं. कै॥ भाऊसाहेबही कृपा करीत होते त्याप्रमाणें याणीं करावी. जें देतील तेंच लक्ष आहे याप्रमाणें मिरजेस लिहिणें म्हणून सांगितलें. सारांश त्यांचा सांप्रदाय कोणाजवळ बोलायाचा नाहीं. संतोषें करून दिलें तेंच कबूल याप्रमाणें आहे. तंटा खटला पडावयाचा नाहीं. याप्रमाणें प्रामाणिक गृहस्थ आहेत. वैद्य तों चांगले आहेत. श्री॥ राजश्री माधवराव रास्ते याणींही लक्ष्मणरावजी यांसच पाठवावें किंवा दयाराम या उभयतांतून एक जणास पाठवावें, उभयतां यशस्वी आहेत, याप्रमाणें सांगितलें. त्यास येविशींचा विचार होऊन आज्ञा येईल तोंपावेतों दयाराम भटजी यांचाही जाब नाशिकाहून येतो. त्याचा अर्थ येण्याचा समजेल त्याप्रमाणें विनंती लिहीन. लौकर औषध घ्यावयाचा विचार व्हावा. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५८०३ श्री. ( आश्विन व. ४–७ आक्टो. )

पै॥ छ० २४ जमादिलावल. आश्विनमास. इहिदे मय्यातैन व अल्लफ.

सेवेशीं बाळकृष्ण लक्ष्मण. कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० १७ जमादिलावल मु॥ लष्कर नजीक हुबळी वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं पावलीं. "राजश्री देवराव कृष्ण देशपांडे शहापूरकर हे धोंडजी वाघाचे लष्करांत कैदेंत होते. वाघाचा फडशा जाला तेव्हां देशपांडे याची गत काय जाहली न कळे. ते हस्तगत जाले असले तरी स्वाधीन करून द्यावे व त्यांचीं मुलें माणसें वगैरे असाम्यांचीं बेळगावीं आहेत तीं धरून देणें म्हणोन बेळगांवकरांस उपद्रव कर्णेल बसली साहेब बहादुर यास समजावणारानीं समजावून करविला होता. नंतर बेळगांवकरांनीं इंग्रजांकडे कारकून पाठविला. वाका समजल्यावर

१ लागू. पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

उपसर्ग मना करवून कारकुनास निरोप दिला. हा मजकूर सर्व तुम्हांस दखलच आहे. तरी याजविशीं तगादा न लागे तें करावें. ” म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐशीयास वाघाचा फडशा जाला ते समयीं त्यांचा बहुत शोध केला. परंतु ठिकाण लागलें नाहीं व हस्तगतही जाले नाहींत. आणखी शोध करितों. बेळगांवास लिहून शोध करतों. ब्राह्मण मारले फार गेले. ठिकाण नाहीं. बेळगांवकर यांजवर लढाईचा प्रसंग होता, परंतु ते समयीं माझें नांव घेतलें याजकरितां कारकून धरून नेले ते मजकडे आले. तेव्हां मी इंग्रजांजवळ गृहस्थ आम्हांकडे आले ऐसें कबूल करून कारकून सोडवून पाठविले. आमची चाकरी एकीकडे राहिली, त्याणींच आपली शिफारस लिहिली! उत्तम केलें! कोणीकडून सरकारचें काम जाहलें म्हणजे जालें. गृहस्थ शेवटपर्यंत तेथें होते याजकरितां चार रुपये दरबारखर्च यांचे मंडळींत केले असतां चांगलें दिसतें. आज्ञा येईल त्याप्रमाणें करीन. हीं कुळें तुमचे स्वाधीन राखणें ऐसें पत्र वसली-साहेब यांचें आहे तें शिरटीस रुमाल ठेविला त्यांत आहे. मागाहून नक्कल पह्यावयासीं पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५८०४ श्री. ( आश्विन व० ४-६ आक्टो. )

पै॥ छ० २० जमादिलावल, आश्विन. सन इहिदे मय्यातैन व अलुफ

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामीचे सेवेसीं.

पोष्य मोरो बाबूराव साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ० १६ जमादिलावलपर्यंत जाणून स्वकीय लिहीत जावें. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. “ धोंडजी वाघाचें पारिपत्य कौतालभनूवर जाहलें. टोपकराचें लोकानीं धांवणी करून छापा घातला, त्याजला गोळ्या लागोन तो ठार जाहला. मागाहून सरकारी फौजाही जाऊन पोंहोंचल्या. ” म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास वाघाचें पारिपत्य जाहलें हें ठीकच जाहलें. कां कीं, प्रांतांत बहुत त्याणें दंगा केला होता. प्रजेस फार दुःख दिलें होतें. रयतेचा काच तुटला. जो प्रजेस दुःख देतो त्याचें बरें होत नाहीं हें अर्थांतच आहे. पुढें टोपकरांचे लोक कोणीकडे जातात हें वरचेवर लिहीत असावें. वरकड रा॥ मोरो आपाजी विनंती करितील म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास याणींही तुमचे सुजनतेचा मजकूर बहुत सांगितला व लोकांतींही ऐकला आहे.

---

१ फडणीस. पत्र पुण्याहून मिरजेस.

त्यास व्यवहारामध्यें सार्थक हेंच आहे कीं, ज्याची कीर्ति तोच माणूस. ऐसियास पूर्वापर संबंध जाणोन ज्याशीं जे कर्तव्यता योग्यतानुसार तें तुम्ही करोन दाखवाल हेंही इकडे ध्यानांत आहेच. रा॥ रघुनाथरावही प्रस्तुत तुम्हांजवळच आहेत. त्यांजला पेशजी व हल्लीं पत्र लिहिलें आहे. त्यास मागील लिहिण्याचा अभिप्राय तुम्हांस त्याणीं कळविलाच असेल. त्या-विशींचे भावगर्भ हरयेकविशीं बोलणें तुमचें त्यांचें जाहलेंच असेल. तोही अर्थ लिहावा. व रा॥ रामचंद्रपंत आपा यांसही पत्र पेशजी लिहिलें आहे. तेंही सध्यां या काळीं तुम्हांजवळ आहेत. तेही लिहिण्याचा अर्थ तुम्हाशीं बोल-लेच असतील. त्यास तुम्ही कदाचित् म्हणाल कीं, ज्याचे ते आपलाले कर्तृत्वांत दक्षच आहेत. त्या पक्षीं इकडून कांहीं एक सांगणें तें काय आहे ? असें म्हणाल तर तुम्ही त्यांजला वडील आहां. आणि विवेकी दुरंदेशी आहां. त्या अर्थे त्याणींही तुम्हांस हितगुज सांगावें आणि तुम्हीही त्यांजला पुसावें हें उचित आहे. याजकरितां लिहिलें आहे. तरी सविस्तर जाब पाठवावा. वरकड पंत मशारनिल्हे लिहितील त्याजवरून कळेल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं. ५८०५ श्री. ( आश्वीन वद्य ६–९ आक्टो. )

पै॥ छ० ३ जमादिलाखर. सन इहिदे मय्यातैन.

तीर्थस्वरूप राजश्री आप्पासाहेब वडिलाचे सेवेशीं अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ० १९ जमादिलावल पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष वडिलीं छ० ९ जमा-दिलावलचें पत्र पाठविलें तें पंधरावे तारखेस पावलें. वडिलीं लिहिलें कीं " आम्हांकडे सरकारी महाल सावनूर तालुकेशिवाय कोणते राहिले ? आणि-गिरें वगैरे परभारेंच आहे. एक मिश्रीकोट तेंही ती॥ राजश्री विठ्ठलराव यादवाडकर यांजकडे सरंजाम आहे. पानसे यांचा पाय इकडे शिरकों नये. कवळ शिरले असतां जसे गोखले तसेच हे होतील. त्या पक्षीं बंदोबस्त पक्कपणें राखावा. हयगय होऊं नये. सावनूर तालुका राणेबेनुर व हनगल ऐसे दोनी महालसुद्धां राहते केल्यास तीस चाळीस हजार पर्यंतही ( रुपये ) देणें जाल्यास करावें. शिंदे यांचे पलटणवाले याणीं नेरलीस मोर्चे लाविले आहेत. सारेंच नागो शामजीचें घेणार. मग सरंजाम प्रांत. मनोळीकडे येणार ऐसें आहे " म्हणोन वडिलीं विस्तारेंकरून लिहिलें तें कळलें. ऐसियास

सावणूर तालुकेशिवाय आपणांकडे महाल राहिले नाहींत, हें खरेंच आहे. मिश्रीकोटें यादवाडकर यांचे सरंजामास म्हणोन लिहिलें, त्यास सरकार आज्ञेशिवाय मिश्रीकोटें सरंजामास कसें राहील याचा विचार होतच असेल! व्यर्थ ऐवज चार सालांचा बाकीस काढून तगादा मात्र होईल. याचा विचार होतच असेल. त्यांस सरकार सनदेशिवाय मिश्रीकोटें महाल सरंजामास पचेल, हें आपले विचारें तरी जाहलें कीं काय? त्यास जें होणें तें समजून व्हावें. पानसे यांचा पाय इकडे पडों नये, म्हणोन लिहिलें. ऐशियास हें फिरिविणें हें कांहीं दरबारखर्च पैका खर्च केल्याशिवाय घडावयाचें नाहीं. त्यांत आपणांवर सरकारची गैरमर्जी याजमुळें पानसे हे कोल उभें केलें आहे! त्यांत सावनूर तालुका व सरंजामी तालुका खेरीज करून बाकी सरकारी महाल पानसे याचे हवाली करणार. ते जर पानसे यांस देऊं नये म्हटलें असतां कसें रुचेल? त्यांतही आम्हांवर पूर्ण कृपा असती तर तेंही घडिवलें असतें. राणेबेन्नूर व हनगल दोन्ही महालसुद्धां सावनूर तालुका राहता व्हावा, म्हणजे तीस चाळीस हजार सरकारांत कबूल करावें म्हणोन लिहिलें, त्यास राणेबेन्नूर व हनगल हे दोन्ही महाल जाऊन बाकीचे महाल आमचे आम्हांकडे रहावयास पन्नास हजार रुपये कबूल केले. आपली परवानगीही पुसली नाहीं. आपण म्हणतील, परवानगीशिवाय रुपये कबूल करणेचें प्रयोजन काय? त्यास सरंजामी महालांशिवाय एक खेडें देखील आम्हांकडे ठेवीत नाहीं ऐसा सिद्धांत जाहला, तेव्हां सारेंच काम हातचें जातें हें चित्तांत आणून दोनी महाल दिले ते वजा घालून बाकी महाल आपल्याकडे रहाते व्हावे याजबद्दल पन्नास हजार रुपये चांदवडी कबूल करणें प्राप्त जाणोन केलें. वडिलांस कळावें. इतका पैका देऊन तरी कर्ज आमचें फिटेपावेतों अक्षतमरिष्ट हेंच प्रमाण राहून सावनूर तालुका राहील हें प्रमाण कुठें आहे? एक इहिदे मय्यातैन मात्र निभावेल. पुढें इसन्ने आलें म्हणजे ते सालचा स्वालजाब जुदा आहे! सारांश सावनूर तालुका हल्लीं दोनी महाल जाऊन जो राहील त्यास दरसाल पन्नास हजार रुपये श्रीमंतांस यावे तेव्हां सावनूर तालुका आपणाकडे राहील हें पुरतें खाचित चित्तांत ठेवावें. यांत अंतर व्हावयाचें नाहीं. वडिलांचे चित्तांत येईल दरसाल आम्ही पन्नास हजार रुपये अंतस्थ कोठून द्यावे? याणें परिणाम कसा? त्यास जो तालुक्यांत ऐवज उत्पन्न होईल त्यांत हे पन्नास हजार रुपये श्रीमंतांस द्यावे,

बाकी राहील ऐवज सावकार यांस द्यावा, ऐसें होईल. कळावें. शिंदे यांचीं
पलटणें नेरलीस बसलीं आहेत तीं नेरली घेतात. पुढें मनोळी घेतात. यांत
दिक्कत नाहीं. करवीरचा तह येथें जाहला तेव्हांच मनोळी चिकोडी दोन्ही
महाल करवीरकर याणीं शिंदे यांस खंडणीचे ऐवजीं दिले. सरकारांत शिंदे
यांचे देणें त्यांत सात लाख रुपये करवीरचे दिले. जरी मनोळी करवीरकर
यांजकडे होती, तथापि शिंदे घेतेच. दिक्कत नाहीं. मग आतां आपणाकडे
आहे ही घेणेंस आळस कशाचा? करवीरकर हे कदाचित् मनोळीसाठीं
नाहीं होय शिंदे यांशीं म्हणते. तेव्हां करवीरकर यांचें शिंदे यांचे वांकडें
येतें. तें राहिलें. आतां करवीरकर म्हणतात कीं, मनोळी तुम्ही घेणें, ऐसें
पडलें आहे. सरंजामी महालांस शिंदे उपद्रव करणार नाहींतसें भासतें.
विश्वास तों नाहींच. परंतु खचीत बोलणें आहे. वडिलांस कळावेंकरितां
विनंती लिहिली आहे. आजचे प्रसंगीं शिंदे यांशी घासून परिणामही
कोणाचा नाहीं. श्रीमंतही जसे शिंदे म्हणतात तसें होय म्हणतात. काला-
वर दृष्टि दिली आहे. कळावें. सारांश वडिलीं जसें श्रीमंत म्हणतील त्या
रंगानें चाललें असतां कल्याण होईल वांकडे कदापि होणार नाहीं ही खातर-
जमा असावी. इंग्रज आलेला माघारा गेला ही गोष्टी फार चांगली झाली.
श्रीमंतांचे मनांतील आपणाविषयींचा संशय बहुत आला होता तो निवा-
रण जाहला. कळावें. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५८०६ श्री. ( आवि० व० ८–११ आक्टो. )

विज्ञापना. श्रीमंतानीं मला बोलावून राजश्री गोपाळराव मुनशीच्या
विषमानें सांगितलें कीं, पूर्वीं कै॥ ती॥ दादासाहेबांशीं व गोपाळराव यांशीं
दैवयोगानें राव सरकार चाकर असतां वांकडे पडलें तें रावसाहेब याणीं उडी
टाकून कैलासवास केला तावत् संकल्प पटवर्धन यांचा ईश्वरें शेवटास नेला.
पुढें नाना फडणीस यांसीं वासना दत्तक करून राज्य चालवावें ऐसी
वासना जाली असतां ईश्वरें संकल्प शेवटास नेला नाहीं. पुढें आम्ही शिंदे
यांजकडे संधान केलें हें नानांस समजल्यावर भाऊंस नानानीं मजकडे
जुन्नरास पाठविलें. तेव्हां मी भाऊंस पाहून बहुत संतोष पावलों. आधींच
भाऊ वृद्ध, एकवचनी, जितेंद्रिय, कुटुंबवत्सल, आणि प्रसन्नवदन पाहून

१. वाघास मारल्यावर वसलीसाहेबांनीं परत न जातां फक्त जाण्याची हूल दाख-
विली त्यामुळें रामचंद्रपंत आपा फसले असें दिसतें. २ बाबाकाळे याचें रामचंद्रपंत
आपास पत्र.

भाऊंच्या पायांवर मस्तक ठेविला आणि दादासाहेब भाऊंस म्हणोन भाऊंच्या वचनावर मी आणि चिमण्या ऐसे भाऊंबरोबर खडकीच्या मुक्कामास आलों. नंतर भाऊनीं सर्वांच्या भेटी करविल्या. नानास अंतर देऊं नये ऐसें वचन भाऊनींच देविलें, नंतर शिंदे यांचे भयानें नानास काढून भाऊनींच दिलें. यावत् बोबखेलच्या मुक्कामावर येईपावेतों भाऊंची प्रकृत मजविशीं यथास्थित होती. नंतर माझे दैवयोगानें भाऊ आणि पागनीस एक होऊन पुढें थेऊरावर मला शिंदे यांचे घरीं कैद करून चिमण्यास जबरदस्तीनें पुण्यास नेऊन सुनेच्या मांडीवर बसवून माधवराव याचे पुत्र केलें आणि राज्य करूं लागले. पुढें नानांचें भाऊंचें वांकडें पडलें. नंतर नाना मला सामील जाले. मग माझे दैवयोगानें शिंदे याणीं पागनीस यांस कैद केलें. भाऊ पळोन चिमण्यास घेऊन गेले. नंतर वडिलांचे पुण्येंकरून इच्छिलें पदही सांबानें दिलें. भाऊही कैद जाले. त्यानंतर नानाही कैद जाहले. पुढें नाना आले. भाऊंस सोडलें. पुढें भाऊंवर कृपाही केली. नंतर दैवयोगानें भाऊ सरकार कामास आले. नंतर मागती नाना (व) पागनीस याणीं रामचंद्र परशुराम यास उभें केलें. करवीरची मसलत समाप्त जाली म्हणजे त्या फौजेच्या बळावर मला आणि दौलतराव यांस अपकार करावे ऐसाही बेत होता. परंतु बेत करणार मेले. कैद जाले. पुढें आपाही रानोरान हिंडूं लागले. नंतर मागती रामचंद्रपंत आपाचे लक्ष मजाशिवाय नाहीं अशी खातरजमा होणारां-कडून जाहल्यावर सरंजाम राखावा ऐसें केलें. त्यास याजउपरी रामचंद्र परशुराम याणीं एकनिष्ठ मजपाशीं वर्तावें. मी दादासाहेबांचा पुत्र आहें. मी याजउपरी त्यांचे कदापि वांकडें करणार नाहीं. त्याणीं मात्र सर्व अंदेशे सोडून सरळ मजबरोबर व्हावें. मी त्यांची दौलत आणि अबरू यथास्थित चालवावी. यास अंतर असेल तर सांब साक्ष! याप्रमाणें मजपाशीं चार घटका बोलले. त्यास मी दोन तीन पत्रें आपणांस लिहिलीं आहेत. तर वडिलीं ती॥ राजश्री दाजीसाहेबांस बिनदिक्कत पाठवून यावें. अनमान करूं नये. मी सेवक सुचेल तितकें लिहिलें आहे. मग मर्जी. तथापि............ रवाना छ० २१ जमादिलावल. हे विज्ञापना.

नं ५८०७ श्री. (आश्विन शु. ८–११ अक्टो.)

विज्ञापना. इकडील वर्तमान तर प्रतिनिधि प्रकरणीं मजकूर लिहि-

१ बाबा काळे याचें रामचंद्रपंत आपास पत्र. तसेंच पुढचें.

लाच होता. त्यास हल्लीं सरकारवाडियांत आहेत. शेंपन्नास लोक हत्यारबंद सुद्धां आहेत असें परवांचे पत्रीं लिहिलें होतें. त्यास अलीकडे पावलोक दहा वीस माणूस, दोन चार कारकून, इतक्यानिशीं आहेत. हत्यारबंद माणूस सरकारवाडियांतून काढिलें. सारांश इतकें होण्यास कारण पंतांची वर्तणूक यथास्थित नाहीं, सबब इतकें करणें प्राप्त. दुसरा प्रकार कांहीं नाहीं. परवां राजश्री खंडोपंत वर्तक आणि अन्याबा अभ्यंकर यांस कैद करून सिंहगडास नेलें. कारण चक्रदेव कैद केले आहेत त्यांचे राजकारणांत शिंदे यांचे घरीं खटपट करींत होते. तो पत्ता मुद्दा शिंदे याणीं दस्तैवजसुद्धां समजाविला. श्रीमंत मोरोबादादास चक्रदेवप्रकरणीं हाताखालीं घेऊन मनसबा सिद्ध करावा या बेतांत होते. तें दादानीं ऐकून घेऊन श्रीमंतांस सर्व मजकूर समजावला. त्यावरून उभयतांचें याप्रमाणें करून घरें सुद्धां जप्त करून फडशा केला. वडिलांस कळावें. नित्य फितूर करण्यास आळस करीत नाहींत ! पारिपत्यें होत असतां करणारानीं मागें सरूंच नये, या पुढें इलाज नाहीं. जसें ज्याचें कर्म तसें फळ पावतात. परवां राजश्री नाना पुरंदरे यांस स्वांरीस बाहेर काढिलें. बराबर जरीपटका लगी वगैरे सर्व साहित्य सुद्धां गारपिरावर जाऊन राहिले आहेत. पुरंदरे म्हणजे कैलासवासी बजाबा यांचे दत्ये. हल्लीं यांजवर कृपा, कारण कुंजीर, याजमुळें हें पद पावले आहेत. कोणीकडे स्वांरी आहे समजली नाहीं. समजली म्हणजे लिहून पाठवितों. पेशजी माधवराव रामचंद्र गारपिरावर वर्षभर होते. नंतर दुखणें लागलें आणि डेरेही कुजले, म्हणोन शहरांत घरास आले. आज तीन महिने झाले. माधवराव मेला त्यास दत्या दिला. हे स्वयमेव दत्येच आहेत, याजमुळें निभावल्यास निभावतील. शिंदे यांचे घरीं राजश्री गोपाळराव चिटणीस यांस हिंदुस्थानचे सुभेचीं वस्त्रें बायांचे पारिपत्याविशीं जालीं आहेत. निघतील तेव्हां खरे. शिंदेही जाणार अशीं बोलणीं सरकारांत पडलीं आहेत. मग कोणे रंगास जातें पहावें. श्रीमंत कांहीं शिंदे यांस निरोप देत नाहींत. शिंदे बळेंच जाऊं म्हणतात. ऐसे लाडझगडे आहेत. सारांश आजपर्यंत सरकारांतून शिंदे यांस जा म्हणत होते ते जाईनात. हल्लीं श्रीमंत रहा म्हणतात याजमुळें वाटतें कीं जातील. त्यांत हिंदुस्थान बाया गेल्यामुळें डुलेसें जालें आहे ही भ्रांत लोकांस वाटती याजमुळें जातीलसा भास होतो. सारांश प्रजेचा भोग सरला पाहिजे हें खरें आहे तर शिंदे

जातील यांत दिक्कत नाहीं. श्री॥ रावसाहेब भिवंडीस स्वस्थ आहेत. वरकड अधिकोत्तर लिहिजेसें नाहीं. यंदा पुणें देशांत पाऊस पाहिजे तैसा जाला. धारण तूर्त येथें स्वस्त आहे. विशेष महागाई नाहीं. कळावें रवाना छ० २१ जमादिलावल सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

मशीरनमुळीक यास पत्र नाना कसें लिहीत होते तो मायना लिहून पाठवावा म्हणोन लिहिलें, त्याजवरून मुनशीस पुसून पारशी व हिंदवी दोनी पत्रांचे मायने लिहिले आहेत. पत्रांतील मतलब समजता तर पारशी पत्रच तयार करून पाठविलें असतें. हे विज्ञापना.

नं. ५८०८ श्री. ( आश्विन व० ८–११ अक्टो. )

पै॥ छ० ३ जमादिलाखर. सन इहिदे.

विज्ञापना. वडिलीं श्रीमंतांस एक दोन पत्रें पाठविलीं होतीं. त्यांचीं उत्तरें परवां कोथरूडास गेलों तेथें मागितलीं. तेव्हां मला म्हणूं लागले, तूर्त पत्रें काय द्यावयाचीं आहेत ? तूं लिहितच आहेस. तेव्हां विनंती केली कीं, मी पत्रें पोचवितों कीं नाहीं हें तरी माझे यजमानास समजलें पाहिजे. त्यावरून समीप राजश्री चिंतोपंत देशमुख बसले होते त्यांस हात चिठ्या लिहिणें म्हणोन सांगितलें. त्याणीं चिठ्या दोन लिहिल्या. आणि श्रीमंत बाबासाहेबांनीं पुरत्या केल्या. याचप्रमाणें दुसरी चिठी ती॥ राजश्री चिंतामणराव आपाचे नांवें आहे. कळावें. वडिलीं आठ चार दिवसांचे अंतरेनें श्रीमंतांस उगेच तपशीलवार पत्र पाठवीत जावें म्हणजे पत्र जाण्यायेण्याचा सिलसिला राहतो. आणि श्रीमंतांस भासतें कीं आपाचें लक्ष मजवर आहे. पत्र येण्यांत इतकेंच सुख. जशी येथील मर्जी तशी वर्तणूक होत जावी हें चांगलें. रवाना छ० २१ जमादिलावल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५८०९ श्री. ( आश्वि० व० ८–११ आक्टो. )

पै॥ छ० २५ जमादिलावल सन इहिदे मय्यातैन आश्विन.

सेवेशीं नागो शामराव सा॥ नमस्कार विनंती. तागायत छ० २१ जमादिलावल जाणोन स्वकीय कुशल लिहीत गेलें पाहिजे. विशेष. आपण छ० १६ जमादिलावलचीं पत्रें पाठविलीं तीं छ० मजकुरीं पावलीं. पंचवीस बाण राजश्री येसाजीपंत याचे स्वाधीन करवितों म्हणोन निरोपिलें, त्यास मशारनिल्हेनीं बाण स्वाधीन जाल्याचें उत्तर पाठविलें. त्याणीं रवानगी केली

---

१ पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

आहे. येऊन पावतील. पुणियाहून राजश्री बाळकृष्णपंत बाळ यांचें पत्र आलेलें पाठविलें तें पावलें. राजश्री मोरोपंतदादास दसऱ्यास वस्त्रें होऊन तेरीखा घालूं लागले म्हणोन लिहिलें तें कळों आलें. इकडील वर्तमान हुबळीस दक्षिणेकडील पलटणें आलीं. छ० १७ तेरीखेचीं पत्रें राजश्री बाळकृष्णपंत लागूचीं आलीं त्यांतील पर्याय त्यांचे मसलतीचा उद्योग दीर्घ दिसतो. वरचेवर जमियत मिळतच आहे. फिरोन माघारे जावयाचा रंग नाहीं. उमेद पुढेंच आहे. आम्हांस संकट प्राप्त जालें आहे. या साधनास येऊन पोहचण्यास अवकाश आहे. ठाण्यांतील वर्तमान हा कालपर्यंत यथास्थितच आहे. बाहेरील मोर्चे आहेत त्या स्थळींच आहेत. नित्य गोळागोळी चालली आहे. तोरगलकरांकडून संधानास रा॥ सुबराव घाटगे आले ते कालच येथून निपाणकराकडे गेले आहेत. पोचल्यानंतर बोलण्याचा अर्थ अद्याप समजला नाहीं. समजल्यानंतर आपणाकडे लिहून पाठवितों. सदैव पत्र पाठवून समाचार घेत जावा. संकटांत आहों. ईश्वर कृपा करील तेव्हां करो. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

(१४ आक्टो.)

नं. ५८१० श्री.

पै॥ छ० २४ जमादिलावल आश्विनमास इहिदे मयातैन.

विज्ञापना. इकडील वर्तमान इंग्रज कौतालभनूहून माघारे फिरले. तेथून अलीकडे एक मजलेहून मोगलांचे फौजेस निरोप दिला. कोपळाचे आसपास आल्यावर श्री॥ राजश्री चिंतामणराव आपासाहेब व राजश्री बापू गोखले यांस निरोप दिल्हा. आपासाहेब जालीहाळजवळ आहेत. गोखले यांचे वाघाची कलवंतीण व भाचा असे गजेंद्रगडास आले होते. गोखले यांचे हस्तगत जाले. इंग्रजानीं कळवंतीण लष्करास आणिली आहे. भाचा गोखलें यांचे हवालीं जाला. इंग्रज दरमजल हुबळीपर्यंत आले. हल्याळ सांबराणीकडे जाणार असें म्हणतात. आठ चार मुक्काम येथें होतील असा सुमार दिसतो. येथून कूच होऊन पुढें जातांच सविस्तर लिहून पाठवितों. मसलत समजूं देत नाहींत. कूच देखील कळत नाहीं. बरोबर राहून कळवितात ऐसें घडत नाहीं. आपले तालुके याजकरितां आलों. याजउपरी निरोप घेऊन घरास जाणार आहें. मागाहून विनंती लिहितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. मंगळवेढें यास ठेवावयाकरितां दोन जंबुरे लहान शेर गोळ्याचे

---

१ पत्र बाळकृष्णपंत लागूंचें बाळासाहेबांस मिरजेस.

आम्ही मिळवून शिरटीस ठेविले होते त्यापैकीं घेऊन गेले[1]. जो उपद्रव होईल तो दोन रोज संभाळतों. सेवक स्वामींचा आहे. हे विज्ञापना.

नं. ५८११ श्री (आश्वीन व० ११–१४ आक्टो.)

पै॥ छ० ३ जमादिलाखर. सन इहिदे.

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागयत छ० २४ जमादिलावल पर्यंत पुणें येथें सुखरूप असें. विशेष. वडिलीं पत्र छ० १८ रोज भौमवारचें पाठविलें तें छ० २३ जमादिलावलीं पावलें. जतपरगणेंत आहों म्हणून लिहिलें तें कळलें. "जमखिंडीजवळ नदीपार होऊन मनोळीचे रोखें जातों. चि॥ बाबासाहेबांचीं पत्रें आलीं. चिंतामणराव-आपानीं इंग्रजाचा निरोप घेऊन निघाले. गोखलेही निघाले. इंग्रजसह चिरंजीव डंबळावर आहेत. इंग्रजाचा मनसुबा वचनास गुंतत नाहींत. वाघाचे करवीरकरप्रकरणीं कागद इंग्रजास सांपडले याजमुळें ते कागद पट्टणास पाठविले आहेत. त्याचीं प्रत्योत्तरें येतपर्यंत इंग्रज तुंगापार होत नाहींत. परंतु अजूनही इंग्रज इकडे येतात हा निश्चय होत नाहीं. चि॥ रा॥ दाजीचे पाठविण्याचा मजकूर लिहिला, त्याजवरून मिरजेस व चि॥ राजश्री बाबांकडे लिहिलें आहे. तिकडून सल्ला जशी पडेल तैसे करीन. केवळ लिहिल्याप्रमाणें चिरंजीव आले तर शोभा नाहीं." पानसे याणीं इंग्रजास पत्रें पाठविलीं. त्याचीं उत्तरें प्रतीउत्तरें पाठविल्याचा मजकूर वडिलीं लिहिला तो वगैरे सर्व समजला. ऐशियास श्रीकृष्णाबाई जमखिंडीपाशीं उतरून जाणार, त्यास फार चांगलें आहे. मनोळीचे बारीचे पार जाऊन रहावें. मनोळीस आणि नेरलीस फार समीप पडतें. रातबिरात दगा धांऊन करण्यास (पलटणवाले) चुकावयाचें नाहींत. जरी लांब राहिलां तथापि बातमी पलटणांत बेमालूम असावी. आपण बारीपार असतां मनोळीवर ते यावयास त्यांस अंदेशा पडेल. ती॥ राजश्री बाबासाहेबांचीं पत्रें आलीं त्यांतील अर्थ पाहतां जेव्हां चेनापट्टणाहून परवानगी येणार त्यासारखें इंग्रज करणार ! आणि वचनासही सांपडत नाहीं. तेव्हां दुरंदेशा आहे. वाघाचे कागद करवीरप्रकरणीं इंग्रजांस सांपडले, त्यास वाघ मेल्यावर जे कागद सांपडले त्यांत विशेष फल नाहींसें भासतें. ती॥ राजश्री चिंतामणराव आपा व गोखले ऐसे इंग्रजाचा निरोप घेऊन निघोन आले हें श्रीमंतांस समजलें.

---

१ चिंतामणराव आपा घेऊन गेले. २ हें व पुढचीं सहा पत्रें बाबा काळे याचीं रामचंद्रपंतआपास.

चिंतामणराव आपाचीं पत्रेंच श्रीमंतांस होतीं. याजमुळें श्रीमंत बहुत संतोष जाहले. कारण वाघाचें पारिपत्य जाहलें आणि इंग्रजांपासून निघाले याजमुळें. ती॥ राजश्री बाबासाहेब तसेच इंग्रजापाशीं आहेत याजमुळें श्रीमंत बहुत अंदेशांत आहेत. ' हे भाऊचे पुत्र आहेत. इंग्रजास मिळून दौलतीवर चाट आणतील. मी वारंवार खातरजमा करितों. परंतु संशय निवारण होत नाहीं. ' त्यास कारणही उभें राहतें. उभयतां सरदार निरोप घेऊन निघाले. सरदारांचीं लिहिलीं आलीं कीं, इंग्रज माघारा जातो असें असोन जेव्हां बाबा इंग्रजापाशीं आहेत, कोपळाहून पुढें एक मजल इकडे दरमजल कूच करून ( इंग्रज ) डंबळावर आले तेव्हां कांहीं मसलत योजिली आहे ऐसा श्रीमंत अंदेशा घेतात. मी विनंती केली कीं, आमचे म्हटल्यावर जर इंग्रज येईल तर मग काय पाहिजे ! बाबा इंग्रजांबरोबर राहिले याचें कारण इंग्रज माघारा जातो त्यांजबरोबर सावनूर तालुकेपर्यंत जावें म्हणजे तालुकेचा बचाव होईल. इंग्रज तुंगा दक्षिणतीरास गेला म्हणजे बाबा सावनूर तालुकेंत रहाणार. ऐसे समजाऊन खातरजमा करितों. तथापि मनांतील चमक जाईना ! गोखले, चिंतामणराव, निघाले. हे कां राहिले ? याजमुळें कांहीं विश्वास पटत नाहीं. कळावें. त्यास माझे मतें याजउपरी इंग्रजाबरोबर ती॥ राजश्री बाबासाहेबानीं राहूं नये. मग जसें आपले विचारें येईल तैसें करितील—सूचना लिहिली आहे. ती॥ राजश्री दाजीसाहेबांस पाठविण्याचा मजकूर मिरजेस व बाबांकडे लिहिला आहे. तेथील सल्लयासारखें करणार, फार चांगलें आहे. लिहिल्या सामानानें येऊन परिणाम कसा लागेल म्हणून लिहिलें, ऐशियास पुण्यांत किती लोकानिशीं येऊन परिणाम लागणार आहे कळतच आहे ! आधीं आपणापाशीं पैसा खर्चास नाहीं. ऐसें असोन येथें पुणेंची महागाई. यांत लोकांचा परिणाम नाहीं. असेंही असून दोन चारशें आले तर शिंदे व सरकार यांजवर दाब बसतो असेंही होत नाहीं. येथें तूर्तचे प्रसंगीं येणें एक श्रीमंत बोलावतात, मागील वांकडीं जावीं, पुढें सरळ व्हावें, याजमुळें ती॥ राजश्री दाजीसाहेबानीं यावयाचें. त्यास लोकांचें प्रयोजन नाहीं. केवळ सडे यावें म्हणजे श्रीमंतांचे मनांत कदापि दिक्कत येणार नाहीं. असा माझा मानस. मग तेथें सर्वांचे विचारें येईल तैसेंच आपण करितील. ती॥ राजश्री दाजीसाहेबांचे येण्याचा मजकूर अलाहिदा पुरवणी लिहिली आहे त्याजवरून श्रीमंतांचीं बोलणीं कशीं पडतात यांतील आशय आपणांस सम-

जतील. याजमुळें वडिलीं चित्तांत आणून कसेंही असो, दाजीसाहेबांस पाठवावें. आपण मिरजेस सल्ला पुसला तर रुकार यावयाचा नाहीं. पेशजी गोविंद बापूजी आला त्याविशीं खंबीर राहिला नाहीं. दरमहा खंडणी आपणाकडून देविली ! हे दाजीसाहेबांस पुण्यास पाठविणें ऐसे कदापि सांगणार नाहींत ! तर वडिलीं जीव घट्ट करून दाजीसाहेबांस पाठवावें. मग मर्जी. पानसे याणीं पत्रें पाठविलीं तो मजकूर समजला. त्यास मी येथें सावनूर तालुकेविसीं सरकारांत बोलत आहे. कदाचित् आपणासही पत्र पानसे यांचें आलेस सावनूर तालुकेचा मजकूर गाळून उत्तर लिहावें. इतकीयांत मी ठरावून लिहितों. सविस्तर मजकूर मागाहून लिहीन. कळावें बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५८१२ श्री (आश्वीन व० ११–१४ आक्टोबर.)
पै॥ छ० ३ जमादिलाखर. सन इहिदे.

विज्ञापना. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. “ धोंडजी वाघाचे पारिपत्यास इंग्रज आला त्याचे मनोदयाप्रमाणें पारिपत्य जाहलें” हा मजकूर चि॥ राजश्री बाबानीं तुम्हास लिहून पाठविला आहे. आम्हांस पत्रें आलीं त्याची नक्कल पाठविली आहे. पहावी. फौज ठेवावी तर नित्य कृत्यही चालणें अवघड. त्यांत तोफा असत्या तर ठीक पडतें. कालगतीमुळें दिवस घालवावे असा समय आहे. ईश्वर इच्छा प्रमाण. वडिलांचे पुण्येंकरून घडेल तें खरें” म्हणोन लिहिलें तें त्यास वाघ मारला हें वर्तमान ती॥ राजश्री बाबासाहेबानीं कवताळ भानूचे मुक्कामाहून लिहिलें होतें. नंतर ती॥ चिंतामणरावआपाचीं पत्रें दोन तीन कागद आले. गोखले याणीं “ आपासाहेबानीं इंग्रजाचा निरोप कोपळच्या मुक्कामाहून घेतला. मिरजप्रांतीं येत आहेत घरकलहासाठीं, ” ( असें लिहिलें आहे. ) आज छ. १२ जमादिलावलचीं पत्रें जालेहाळचे मुक्कामचीं चिंतामणराव आप्पांचीं आलीं त्यांत आपण व ती॥ राजश्री रघुनाथरावदादानीं पत्र पाठविलें त्याची नक्कल पाठविली. तीच नक्कल श्रीमंतांस दाखविली. श्रीमंत पुसत होते, “ रामचंद्र परशुरामही चिंतामणरावआपाचा बंदोबस्त करणार कीं काय ? सरदारीची वांटणी घरचे घरीं करणार कीं काय ? तेव्हां मी उत्तर केलें कीं, कैलासवासी भाऊनीं वांटणीची विवक्षा केली आहे त्याप्रमाणें घडलें असतां चिंतामणराव आइकतील. तेव्हां उत्तर जाहलें, भाऊनीं जें केलें असेल तें समजूनच केलें असेल. त्याप्रमाणें

उभयतांनीं वर्तावें. ऐसें बोललें. वडिलांस कळावें म्हणून लिहिलें आहे. इंग्रज माघारा जातो. ती॥ राजश्री बाबासाहेब सावनूर तालुकेपर्यंत इंग्रजाबरोबर जाऊन मग निरोप इंग्रजाचा घेऊन आपण सावनूर तालुकेंत राहणार, ऐसें पत्र आलें होतें चिंतामणरावआपाचें. फौज ठेवणेचा प्रकार आपण लिहिला, त्यास पैका मिळविणेस समागमें तोफा पाहिजेत यांत दिक्कत नाहीं. तें साहित्य नाहीं, त्याअर्थीं वडिलीं याजउपरीं सावनूर तालुकेचे आसपास जावें. दूर पडलें असतां बहुत फौजही ठेवणेचें प्रयोजन नाहीं. आणि बाबासाहेब आपण एक जागा व्हावें. इंग्रज गेले. त्याअर्थीं मनोळी राहत नाहीं. त्यांतही करवीरकर याणीं इंग्रजाचे सोळा लाख रुपये देणें आहेत त्यांत चिकोडी, मनोळी लाऊन द्यावी असाही त्यांचा घाट आहे. शिंदे याच्या बाया उज्जनीस गेल्या. लखबा लाडही बायांस मिळणार, तेव्हां हिंदुस्तान डुलेसें जाहलें याजमुळें शिंदेही जाणार ऐसें बोलतात. बहुतकरून जातीलसें भासतें. मग काय करितात पहावें. वडिलीं लिहिलें कीं ' श्रीमंत आम्हास इशारा मनोळी राखावी हा करितात. आणि फुट गांवसुद्धां चिकोडी मनोळी शिंदे यांचे हवालीं करा म्हणोन लिहितात हें काय ? तेव्हां आंतचें आंत कलागत हें ठीक नाहीं. जर श्रीमंत मनोळी रक्षितात. तर तेथेंच घाटगे यास सांगणेंस श्रीमंतांस अशक्य काय आहे ? ' म्हणोन लिहिलें. त्यास जर इंग्रज जाताना, तर खामखा सांगते. श्रीमंतांची मर्जी मी लिहून किती कळवूं. ? बहुत शिंदे यांस भयाभीत आहेत याजमुळें असें घडतें. कळावें. ' राणेबिन्नूर व हनगल देणेविशीं पत्र दिल्हें. तुम्ही ऐवजाची निशा करून घेणें ' म्हणोन आज्ञा, त्यास ऐवज दोनी महालांवर किती बरगतीचा बसला हें समजलें नाहीं. मग निशा ती कशी घ्यावी ? तर ऐवज किती हें लिहून कळवावें. वडिलीं दोनी महाल हवालीं करावे—अनमान करूं नये. रवाना छ० मजकूर. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५८१३ श्री. ( आश्वीन व० ११–१४ आक्टो. )

वै॥ छ० २ जमादिलाखर. सन इहिदे.

विज्ञापना. श्रीमंतांचें बोलणें पडलें आहे कीं, रामचंद्रपंत आपा याणीं आपले बंधु दाजीबास आम्हापाशीं आणून ठेवावें म्हणजे आमची खातर होती. नाहीं तर परिछिन्न खातरजमा होत नाहीं. हा आग्रह मोठा आहे. आणि माझे मतें ती॥ राजश्री दाजीसाहेब येथें यावे हें फार चांगलें. आजपर्यंत आपणाकडील एक माणूस आलें असतां कंटाळा करीत होते. त्यास

हल्लीं वासना जाहली आहे कीं, आपण चौघे बंधु, त्यांतून एका जणानें समीप असावें. याप्रमाणें बुद्धि उत्पन्न जाहली आहे. वांकडी नजर दिसत नाहीं. वडिलीं कांहीं काळजी न करितां दाजीसाहेबांस लावून द्यावें यांत गुण बहुत आहेत. श्रीमंतांशीं विन्मुख होऊन बाहीर किती फिरावें ? आम्ही होऊन रदबदली करून चरणांपाशीं येतों ऐसी रदबदली करीत असावें तें एकीकडे राहून तेच म्हणतात कीं एकानें येथें रहावें. त्यांत आपणास राहावें म्हणते तर अवघड वाटतें. दाजीसाहेबांस यावें म्हणतात हें फार चांगलें आहे. हा मजकूर वडीलपणें श्रीमंत राजश्री मोरोबादादा फडणिसांस पुसला. त्यांस बहुत संतोष जाहला. आणि दादानीं उत्तर केलें कीं, जर श्रीमंतांची चाकरी तुम्हांस करावयाची हें खचीत आहे आणि मागील पाप निवारण करून घ्यावयाचें असल्यास श्रीमंत बोलावतात या वचनावर विश्वास ठेऊन दाजीबास येथें आणावें. पांच राऊत देखील आणूं नये. केवळ सडे असावें. म्हणजे तुम्ही पुण्यांतील खर्चाखालीं ही येणार नाहीं. आणि जितके सडे राहाल तितकी श्रीमंताची मर्जी निखालस होईल. तेव्हां मीं उत्तर केलें कीं, आपण एक पत्र रामचंद्रपंत आपास द्यावें. तेव्हां दादा बोलले कीं जर आपाची मर्जी दाजीबास पाठवावें ऐशी असल्यास मला कळव म्हणजे मी पत्र देईन. आपाचा माझा परिचय नाहीं. मीं पत्र दिलें त्यासारिखें आपानीं दाजीस पाठविलें तर बरें. नाहीं तर व्यर्थ पत्र खालीं पडेल. यांत जीव नाहीं. ऐसें बोललें सारांश श्रीमंतांपाशीं एका खाशानें असावें यांत गुण बहुत आहेत. आपण सर्वजाण आहेत. विचार करून समर्पक उत्तर यावें. सारांश श्रीमंतांची मर्जी राही ऐसें करावें. ही आपले वर्तणुकेची परीक्षा आहे. मला नित्यानीं आज्ञा होती कीं, दाजीबा येतात किंवा नाहीं मला कळव. माझा अंदेशा असल्यास पाहिजे तशी खातरजमा करितों. पत्र देतों. दिक्कत न धरितां आणवा. ऐसें बोलणें आहे. काय तें उत्तर यावें. मार्गप्रतीक्षा करितों. दाजीसाहेब आले म्हणजे बरें आहे. कळावें रवाना छ० २० जमादिलावल. हे विज्ञापना.

नं. ५८१४ श्री. ( आश्विन व॥ ११–१४ अक्टो. )

पै॥ छ० ३ जमादिलाखर सन इहिदे.

विज्ञापना. काल श्रीमंतांची स्वारी कोथरुडचे बागेंत गेली आणि मला बोलाविलें. तेथें मी गेलों. नंतर बंगल्यांत श्रीमंतांची आणि माझी चार घटका एकांती गांठ पडली होती. तेव्हां आज्ञा जाहाली कीं, मनोळीविशीं

तुम्ही तूर्त खटपट करूं नका. शिंदे यांचे हवालीं करणें. दोन महिन्यांचे आंत शिंदे हिंदुस्तानांत जातात. गंगापार गेले म्हणजे तुम्हांस करवीरचे पारिपत्याविशीं आज्ञा करितों. तावत् दम खावा या प्रमाणें आज्ञा जाहली. तेव्हां मी विनंती केली कीं, आपण आज्ञा करितात ही शिरसा मान्य, परंतु शिंदे दोन महिन्यांनीं जातात हें प्रमाण कोठें आहे ? तेव्हां उत्तर जाहलें, पुशी पौर्णिमेपावेतों जातात किंवा नाहीं याचा भाव सहज लागतो. गेल्यास ईश्वर पावला. न गेल्यास त्याची तजवीज दुसरी काढूं. तावत् तुम्ही आपल्याकडून शिंदे यांशीं घांसूं नका. तुमचे सरंजामी तालुकेस उपद्रव करणार नाहींत या प्रमाणें खचीत आहे. तुम्ही फौज सुद्धां तालुका सावनूरचे सरदेस असावें. याप्रमाणें आज्ञा आहे. वडिलीं तूर्त फौज सुद्धां सावनूर तालुकेचे सरदेस असावें. नेरली घेऊन जेव्हां मनोळीकडे पलटणें जातील त्यास अवकाश पाहिजे. आणि आपणापाशीं फौज आहे ही पैक्याशिवाय. कदाचित् पलटणें मनोळीवर आलिया त्यांजवर तोंड टाकूं ऐसेंही आपले मनांत आलें, तथापि मनसबा चांगला नाहीं. चार माणूस जायां जाहलें पुरवलें. दहा घोडीं ठकलीं म्हणजे प्राणाशीं गांठ आहे! आपण जें करितील तें विचार करून करितील. त्यास मनोळी मुरगोड येथें अंमल बसला आहे तेथें विचारास आल्यास महालसुद्धां दिडी दुप्पट पैका बेजरब वसूल करून द्यावा—आणि कदाचित् इंग्रज माघारा गेला, आणि मनोळी हवालीं केली, तथापि ऐवज ठोकून घेतलासा होईल. सूचना लिहिली आहे. वसुलाचें आधीं करावें. जसें श्रीमंत म्हणतात तैसें वर्तावें यांत गुण फार आहेत. रवाना छ० मजकूर. हे विज्ञापना.

नं. ५८१५ श्री. (आश्विन शु. ११–१४ आक्टो.)

पै॥ छ० ३ जमादिलाखर. सन इहिदे.

विज्ञापना. 'सावनूर तालुकेपैकीं दोन महाल व सरकारी तालुका सरकार सांगतें त्याप्रमाणें घ्यावयास अनमान काय ?' म्हणोन मी वडिलांस लिहिलें होतें त्याचें उत्तर वडिलीं लिहिलें कीं, इंग्रजांनीं तालुका सोडवून आमचे स्वाधीन केला हेंच अनमानास कारण; म्हणोन वडिलीं लिहिलें त्याजवरून बहुत आनंद जाहला तो पत्रीं कोठवर लिहावा ? प्रथम इंग्रजानीं वाघावर मसलत करावी हें चित्तांत आणून पालमर वकील यास लिहिलें तेव्हां वकिलानीं सरकारांत कानावर घातलें कीं, तुंगा उत्तरतीरीं येऊन वाघमजकुराचें पारिपत्य करितों. तेव्हां सरकारांतून आज्ञा जहाली कीं, सरकार तालुके

वाघानें घेतले आहेत ते सोडवून सरकारांत हवालीं करावे. आणि वाघाचें पारिपत्य करून माघारी जावें. ऐसें श्रीमंतानीं सांगितलें त्या प्रमाणें इंग्रजानीं केलें. सहजांत लागू पळून तुंगापार गेले. हे भाऊसाहेबांचे मामलेदार हें समजून इंग्रजांनीं सुटलेले तालुके लागूचे हवालीं केले. त्यांत वडिलींही मनसबा करून इंग्रज आणिला नाहीं, अथवा लागूनीं आणिला नाहीं. हीं कारस्थानें समजतच आहेत. जें होणें तें श्रीमंतांचे आज्ञेवरून जाहलें. इंग्रजानें पारिपत्य वाघाचें केलें. दैवेंकरून यश आपणांस आलें कीं इंग्रजास आणून वाघ बुडिवला. तेवढें यश पुरे! इंग्रजानीं तालुके दिले हा संतोष मानून सरकार आज्ञेचा अव्हेर करून तालुकेस इंग्रजाचें निमित्य लिहिणें हें चांगलें नाहीं. ज्या समयीं करवीरची लढाई बिघडली तेव्हां इंग्रज लागू आणिते तर कारस्थान खरेंसें भासतें. कावळा बसला, खांदी मोडली, या भरंवसेवर जाऊं नये. सरकार आज्ञेप्रमाणें वर्तावें यांत कल्याण. वडिलीं दोनी महाल हनगल व राणे बेन्नूर देणेंस आळस करूं नये. बाकीचे सावनूर तालुकेपैकीं देऊं नये. तेवढे पांच रुपये देऊन राहते करितों. इंग्रज आज येतील, उद्यां जातील. परंतु सर्वकाल गांठ श्रीमंतांशीं आहे. मग श्रीमंत कसेही असोत! वडिलीं मात्र याजउपरी दुसरी बाही धरून श्रीमंतांशीं तेढीनें वागणें चांगलें नाहीं. मी फार लिहिलें म्हणोन विषाद मनांत आणूं नये. मी लिहितों फार, यांत आपले उपयोगी येईल तितकें घेत जावें. सुचले प्रकार लिहिले आहेत. चित्तास येईल तैसे करावें. रवाना छ० २४ जमादिलावल. लोभ असो दीजे हे विज्ञापना.

नं. ५८१६ श्री. (आश्विन व ११–१४ आक्टो.)

पै ॥ छ० ३ जमादिलाखर. सन इहिदे.

विज्ञापना. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. "रूपराम व गोसावी यांजकडून कोणी यावें. वर्षे अलीकडील तालुका सोडण्यास इंग्रजाकडे खर्च पडला आहे तो हिस्सेरसदीप्रमाणें उभयतां देतात. त्या अर्थी इकडून दुसरा विचार घडावयाचा नाहीं. तालुका सोडवण्यास इंग्रजास पैका देणें पडला नाहीं ऐसे तेथें वकिलाचें म्हणणें, त्यास पैका पडला नसतां सरकारांत कसें म्हणवेल? तालुका खर्च न पडतां सुटला असें नाहीं. असें असून सरकारांत पैसा न पडतां तालुका सुटला असें समजण्यांत येतें, तेव्हां ईश्वर इच्छा म्हणावी!" म्हणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. ऐशियास रूपराम व गोसावी यांचें बोभाट नित्य उठोन आहेत. त्यास दोनी तालुके त्यांचे

स्वाधीन व्हावे. तालुके स्वाधीन जाहले असतां तेथेंच हिसेरसदेची तोड पाडून देतील. जी हिसेरसीद मागणें ती वाजवी मागावी. नाहीं तर येथें पालमर आहेत. रुजवात पडेल. तैसें होऊं नये. तालुका सुटणेंस पैका फार पडला नाहीं ऐसें येथें इंग्रजाचें बोलणें आहे. मुनसी म्हणत होते. पालमर याचें कर्णेल वसलीस लिहिलें जाऊन अमुक घेतलें ऐसें लिहिलेंही सरकारांत आणिवलें आहे. येईल ऐसें सांगत होते. यास्तव सूचना लिहिली आहे. कळावें. वाजबी दोनी महालांस वरगत काय बसली तें कळवावें. आणि महाल दिक्कत न करितां हवालीं करवावे. लागू नाहक खटला करून ठाणीं देणार नाहींत, मला लबाड पाडतील, ( म्हणून ) ही विनंती. कळावें. हे विज्ञापना.

नं. ५८१७ श्री. (आश्विन व० ११–१४ आक्टो. )

पै ॥ छ० ३ जमादिलाखर. सन इहिदे.

विज्ञापना. ती॥ राजश्री बाबासाहेब इंग्रजापाशीं राहिले यांतील अर्थ करवीरचें पारिपत्य—त्यास इंग्रज मतलबी आहेत. तुमचे म्हटलेयावर करवीरचें पारिपत्य करितील. पुढें सरकारचे दौलतीवर तोंड टाकतील. याचा विचार मनांत आणावा. नाहीं तर आपण मनसबा मनांत आणतील एक, आणि त्याचा परिणाम होईल भलता ! हें ब्राह्मणी राज्य कोणाचे दैवानें चालतें यांतील विचार होत नाहीं ! आपण कारण होऊन जर श्रीमंतांचे राज्यास इंग्रजांनीं अपाय केला तर यावत् तावत् आपण राज्य बुडविलें, इंग्रजाचे घरीं घातलें, ( असें होईल. ) त्यांत आपण सामील जाहले म्हणून आपलें तरी इंग्रज कल्याण करितील ऐसें होणार नाहीं. याचा विचार पुरता असावा. आणि मी वरचेवर लिहीत आहें कीं जो या श्रीमंत बाजीराव याशीं प्रतारणें करून वागतो, त्याचें बरें ही होत नाहीं. तर वडिलीं या खटपटींत अगदीं पडूं नये. तूर्त शिंदे आहेत तावत् करवीरकर उड्या मारतात. शिंदे देशांतून गेल्यावर श्रीमंतांकडूनच करवीरचें पारिपत्य करावयाचें. श्रीमंतानीं वचन दिलें आहे कीं शिंदे आहेत तावत् तुम्ही करवीरकर यांचें नांव घेऊं नका. हे गेल्यानंतर रामचंद्रपंत आपाचे हातेंच करवीरकर यांचें पारिपत्य करीन. ऐसें खचीत वचन मी घेतलें आहे. आपानीं मला सोडून इंग्रज अथवा मोंगल यांजकडे जाऊं नये. मग त्यांची मर्जी ! ऐशीं ( श्रीमंतानीं ) बहुत प्रकारें खातरजमा केली आहे. त्यास वडिलीं याजउपरीं दुसरे कडे संधान लाऊं नये. एक श्रीमंतांचे पायांशीं लक्ष धरून चार दिवस नष्टचर्यैचे आहेत

तवढे सावनूर तालुकेंत घालवावे. मी शिंदे याचे घरीं होईल ती खटपट करून सरंजामी महालांस उपद्रव करूं देत नाहीं. वडिलीं तीं ॥ राजश्री दाजीसाहेबांस पाठवावें, श्रीमंतांची मर्जी मात्र प्रसन्न करून घ्यावी, म्हणजे सर्व बंदोबस्त होतील. जर श्रीमंतांची चाकरी करावयाची नाहीं हा खंबीर असला तर मी दाजीसाहेबांस पुण्यास पाठविणेंचा आग्रह करणार नाहीं. सूचना लिहिली आहे. कळावें. सारांश इंग्रज हरयेक निमित्त करून प्रांतांतून तुंगापार जात नसल्यास बाबासाहेबानीं संतोषानें इंग्रजाचा निरोप घेऊन सुरापूर प्रांतीं यावें. न हून निमित्तास पात्र होणें चांगलें नाहीं. हे सर्व विचार तेथें होतच असतील. रवाना छ० २४ जमादिलावल. हे विज्ञापना.

नं. ५८१८ :।· ( नकल. ) ( आश्वि. व० ११–१४ आक्टो. )

साहेब मुषफक मेहेरबां करमफर्माय मोखलिसा बालकिसनपंत भाऊसाहेब जुसल मुला हुताला—

अज तर्फ कर्नेल वसलीबहादुर सलाम मोहबल मकसूद आंकी येथील खैर सल्ला तारीख छ० २४ माहे जमादिलावल जाणोन आसाहेबीं आपलीं खैरखुषाली नामेसी कलमी करून दिलखूषी करवीत आलें पाहिजे. दरी अयाम. नारोपंत यांस वापस साहेबांजवळ पाठविलें असे. आणि आमची दिलची दोस्ती सर्वदा तुमचे मनांत याद ठेवणें व तुम्ही व पटवर्धन याणीं सरकार कुंपणीचे कामांत मेहनत केलेत हे गोष्टी आम्ही विसरत नाहीं व चिंतामणराव रावसाहेबांचें नांवचें पत्र एक व बाबासाहेबांचें नांवचें पत्र एक ऐसें दोन्हीं पत्रें पंतमजकूरचे हातांत देऊन पाठविलें असे. व हरहमेषा आम्हांस दोस्त समजून खैरयत खबर लिहून पाठवीत जाणें. जादा काय लिहिणें. प्यार मोहबत असूं दीजे हे किताबत.

नं. ५८१९ श्रीगणपति. ( आश्विन–आक्टो. )

चि ॥ राजश्री हरिपंत बाबा यांसीं प्रती रामचंद्र परशुराम आशीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. वे ॥ शा ॥ संपन्न राजश्री सोमयाजी तेलंग ब्राह्मण मिरजेंत श्रीकृष्णेचे घांटावर रहातात. कुटुंब थोर. कर्ज जालें आहे म्हणून देशावर फिरत तुम्हांकडे आले आहेत. यांची माहितगारी चि ॥ सौ ॥ रमाबाईस[1] आहे. थोर आहेत. त्यांस बाळकृष्णपंतांस सांगून कोणी प्रकारें यांचें साहित्य होईल तें करावें. रवाना

---

१ हरिपंत बाबांची स्त्री.

छ० १४ जमादिलावरु. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. भटजीस दोन हजार रुपये कर्ज आहे. हे आशीर्वाद.

नं. ५८२० श्री. (आश्विन व० १२-१५ आक्टो.)

पै ॥ छ० २९ जमादिलावल इहिदे मय्यातैन.

विज्ञापना ऐसीजे शिंदे यांचे घरांत बैदा जाहला. बाया शिंदे अवंतीपुरीस दाखल होऊन तमाम माळवे यांतील राजश्री दौलतराव बाबा यांचा अंमल उठवीत आहेत. फौजही जमा करीत आहेत. होळकर यांचें व बायांचें एक चित्त आहे. राजश्री लखबा याजपाशीं पंचवीस हजार फौज चांगली आहे. तसीच होळकर याजपाशीं पंधरावीस हजार फौज व बायांजवळ आठ दहा हजार फौज याप्रमाणें जमेत जाहली. लखबाही अंमल तिकडे बायांचा बसवीत येत आहेत. यामुळें तूर्त शिंदे यांस मसलत मोठी पडिली आहे. राजश्री सदाशिव मल्हार यांस नगराहून आणावयाकरितां पालखी स्वार पाठविलीं आहेत. तोही दोन चार दिवसांत येणार. राजश्री गोपाळराव भाऊ चिटणीस यांची रवानगी हिंदुस्थानांत जाहली. विजयादसमीच्या मुहूर्तें वस्त्रें दिलीं. तरवार ढाल दौलतराव बाबांनीं आपली खासा दिली. कंठी दिली. एक कंपू बरोबर दिला. कंपूची तयारी होत आहे. गोपाळराव कूच करून तीन कोसांवर मौजे खराडी येथें नदीचे पाण्यानजीक मुक्काम जाहला आहे. पंचवीस हजार फौज राजश्री गोपाळराव याणीं ठेवावी याप्रमाणें आज्ञा आहे. फौजेस पैसा पाहिजे त्याची तजवीज चालली आहे. होईल तेव्हां कूच होईल. सरकारांतून राजश्री नाना पुरंदरे विजयादशमीच्या मुहूर्तें डेरा दाखल जाहले आहेत. पांच चार पागा व कांहीं लोक शिलेदार शेंदीडशें इतकेसुद्धां गारापिरावर आहेत. पुरंधरे यांसही राजश्री गोपाळराव भाऊ यांजबरोबर द्यावें याप्रमाणें विचार सरकाराचा ठरला आहे. परंतु पुरंधरे यांस सरकारांतून पैसा पावल्याखेरीज अथवा पागा सिलेदार यांस पैका पावल्याखेरीज निघावयाची तरतुदीच होणें कठीण आहे. असो. डेरा दाखल तों जाहले आहेत. याउपरी पुढें तिकडील रागरंग कसा होतो नकळे. हिंदुस्थानांतील इकडे पैसा एक यावयाचा नाहीं. (बाया) तमाम मामलतदार आणून रसदा घेतात. याप्रमाणें वेव्हार चालिला आहे. शिंदे याजकडेहि संकट आहे.

---

१ हें व पुढचीं दोन अशीं तीन पत्रें मोरोपंत परांजपे वकील यांणीं मिरजेस बाळासाहेबांस लिहिलीं.

दौलतरावबाबा यांचे ताले विचित्र आहेत ! काय घडेल नकळे. सांप्रत राजश्री सखाराम घाटगे सैन्यांतच फार करून राहतात. पुण्यांत वाडा गोडबोले यांचा घेतला त्यांतही दोन चार दिवसांनीं येत असतात. परंतु फार करून लष्करांत आहेत. राजश्री यादवराव भास्कर व आबा चिटणीस पुण्यांतच आहेत. श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांचा लोभ दौलतरावबाबा यांचे जागां फार. छ० २२ जमादिलावलीं स्वारी श्रीमंताची शिंदे गोटांत गेली शहराबाहेर स्वारी जातांच पांच असामीनिशीं खासा श्रीमंत, मागें जिलबे व स्वांर, हत्ती, अंबाऱ्या, वगैरे अगर्दी सोडून पांच असामीनिशीं गेले. दौलतरावबाबा निद्रा केले होते. इतकियांत खासा श्रीमंत दाखल होतांच जलदीनें उठोन मुजरा केला. खावंद व सेवकाचे हास्य विनोद घटकाभर जाहले. नंतर मागाहून स्वांरीहि दाखल जाहली. चार सहा घटका स्वांरी तेथें होती. नंतर दौलतरावबाबा यांस मेजवानीस बोलाऊन स्वांरी समागमेंच घेऊन आले. एक अंबारीमध्यें उभयतां श्रीमंत, खवासेयांत दौलतरावबाबा चवरी ढाळीत, स्वारी सूर्यास्तीं पुण्यांत आली. वाड्यांत दाखल जाहल्यानंतर हौदाचे चौकांत रांगोळी घालून भोजनाची मेजवानी जाइली. नवघटका रात्रीस निरोप घेऊन शिंदे आपले गोटास गेले. याप्रमाणें स्नेहभाव चालिला आहे. श्रीमंतानीं सेवकावर स्नेह करावा हें तो चांगलें. दौलतरावबाबा यांची नेत धन्याजवळ तसीच असेल, यास्तव हे विचार होतात. लोक पुण्यांतील म्हणतात कीं आज पावेतों श्रीमंतांवर शिंदे याणीं कोणी खवासेयांत बसोन चवरी ढाळली असा प्रकार जाहला नाहीं. याची माहितगारी स्वामींस असेल. याउपरांतीक होईल विचार तो विनंती लिहितों. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५८२१ श्री. (आश्विन व० १२–१५ आक्टो.)

पै छ० २९ जमादिलावल. इहिदे मय्यातैन.

सेवेशीं विज्ञापना. रा॥ खंडोपंत वर्तक पुत्रसह, रा॥ अन्याबा जुन्नरकर यांस सरकारांतून कैद केलें. वाड्यांच्या जप्त्या केल्या. पन्नास साठ हजार रुपयांची मालियत वर्तक यांची जप्तीस लागली. अन्याबा जुन्नरकर हे तों केवळ गरीबच होते. लोकांचेंच देणें चाळीस पन्नास हजार रुपये होतें. घरांत मात्र किरकोळ हांडे भांडे जुन्नरकर यांजकडे सांपडलें तें मात्र जप्त केलें. त्रिवर्गास किल्ले सिंहगडास पाठविलें. वर्तक कैलासवासी नानांजवळ

पेशजी होते. मागे कांहीं नानांजवळ श्रीमंत रा॥ मोरोबादादाविशीं वलगना केली होती तें चित्तांत दादांचे होतें. वर्तकांस प्रतिबंध करावयाचा नेट दादांकडील फार होता. असो. थोर गृहस्थ होते. ईश्वर सत्ता ! आणखी त्यांजकडे कांहीं फंदफितुराचा प्रकार नाहीं. नानांचा लोभ होता. कांहीं यांजपाशीं नानांचा ऐवज असेल हें चित्तांत आहे. परंतु दिसण्यांत येत नाहीं. या उपर नकळे. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५८२२ श्री ( आश्विन व० १२–१५ आक्टो. )

पै ॥ छ० २९ जमादिलावल. इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. श्रीमंत रा॥ पंतप्रधान यांची कृपा मागील दौलतींतील कारखानदार यांचे जागां नाहीं. कोणी कारखानदार याणीं हरयेक बाबें विनंती केली असतां रागास येतात. कांहीं इलाज चालत नाहीं. या प्रकारची तऱ्हा जाहली आहे. याणीं कोठें जावें ? केवळ खराबी खालीं येऊन दीनाप्रमाणें जाहले आहेत. पुढें श्रीमंतांस कोणते दिवशीं दया येऊन कृपा करितील तें नकळे. सांप्रत काळची मंडळी श्रीमंतांजवळ आहेत तेही स्वामींच्या आईकण्यांत आहेतच. त्यांजवर लोभ आहे. श्रीइच्छा प्रमाण. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५८२३ श्रीगणपतिर्जयति. (आश्विन व० १२–१५ आक्टो.)

पै ॥ छ० २६ जमादिलावल. सन इहिदे मय्यातैन व अलुफ.

तीर्थस्वरूप राजश्री आपासाहेब वडिलाचे सेवेशीं अपत्यें चिंतामणीनें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २६ जमादिलावल पावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असें विशेष. अलीकडे वडिलांकडून आशीर्वाद पत्र येऊन बालकाचा सांभाळ होत नाहीं. तरी असें नसावें. सदैव पत्र पाठवून बालकाचा सांभाळ करावा. इकडील वर्तमान तर सेवेशीं बाळा भाल्याबरोबर लिहिलें होतें त्याजवरून विदित झालें असेलच. करवीरचे मुक्कामीं वडिलास दोन चार वेळां विनंती जबुंरेविसीं केली होती. देतों म्हणून आज्ञा जाहाली होती. याजकरितां सेवेशीं विनंती लिहिली आहे. मनोळींत तोफा आहेत त्यांजपैकीं पांच तोफा देण्याविसीं राजश्री हरिपंत फाळके मनोळींत आहेत त्यांस पत्र देवावें. म्हणजे आणावयास तेरदळास लिहीन. कांहीं जेजालाही देवाव्या. 'दारू गोळे वगैरे सामान सुद्धां चिरंजीव कोणी तरी पाठवितील त्यांचे परीक्षेनें देणें.' म्हणून पत्र द्यावें. येविशींची विनंती सविस्तर माहिपाति करील त्याप्रमाणें आज्ञा जाहली पाहिजे.

मंगळवेढेचे ठाण्यांत जंबुरे अगदीं नाहींत. तोफाही नाहीं. स्वारी वडिलांची गेली होती तेव्हां पाहण्यांत आलें असेल. मनोळींतील चार पांच दागिने पंचरशी आहेत. परंतु लहान, किल्ल्याचे उपयोगी पडावया जोगेच आहेत. दोनतीन मध्यम प्रतीच्या आहेत त्या बिडी आहेत. वडिलीं कृपाकरून चार पांच जंबुरे पंचरशी व दोनतीन बिडी याजप्रमाणें देविले पाहिजेत. नेरलीचा कारभार उरकला असतां निघणार नाहींत. याजकारितां विनंती लिहिली आहे. मशारनिल्हेस पत्र द्यावें. तेरदळास पोचवून द्यावें म्हणोन लिहावें, म्हणजे जलद येतील. मंगळवेढेस राहिले असतां वडिलांचे उपयोगी पडतील. याजकरितां विनंती लिहिली आहे. वडिलीं अगत्य देविले पाहिजेत. सेवेशीं विदित होय हें विज्ञापना.

नं. ५८२४ श्री. (आश्विन व० १२-१६ आक्टो.)

तीर्थस्वरूप राजश्री आपासाहेब वडिलाचें सेवेशीं. अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० २६ जमादिलावल पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री बापूजीपंत जोशी बारामतीकर याणीं श्रीक्षेत्र पंढरीची मामलत सरकारांतून तिगस्तां केली हा मजकूर परवां आपली स्वारी श्रीपांडुरंगाचे दर्शनास आली त्याचे पूर्वीं पंढरपूर प्रकरणीं मजकूर तपशीलवार लिहिला. तो त्याप्रमाणें वडिलीं हरएक विसीं उपद्रव क्षेत्रास न करितां त्रिरात्र क्षेत्रीं राहून स्वारी मिरजेकडे गेली. अलीकडे एक गृहस्थ भाऊ थिट्या म्हणोन आहे त्याणें शें दोनशें प्यादे मिळवून क्षेत्रावर चालून जाऊन राजश्री बापू कमलाकर याचे कारकुनास माराहाण करून पंढरीचें ठाणें बसाविलें. दहापांच असामी गृहस्थांची घरेंही लुटली. अशी अवस्था केली. त्या भाऊ थिटे यांस राजश्री दाजीबा लिमये सामील. त्यांजकडील रामचंद्रपंत भास्कर पंत ऐसे उभयतां कारकून त्या थिटे यास सामील होऊन थिटे यास पुढें करून हें काम केलें. हल्लीं रामचंद्रपंत भास्करपंत उभयतां थिटे याचे लोकांबरोबर पंढरीस येऊन लिमये यांचे घरीं राहिले आहेत. हल्लीं जो कारभार थिट्या करितो तो रामचंद्रपंत यांचे विद्यमानें करितो. ऐसी कागाळी येथें पंढरीहून श्रीमंतांपाशीं आली. तेव्हां मला श्रीमंतानीं आज्ञा केली कीं, परवां तुम्हीं काय बोललां, हल्लीं काय केलें ? तेव्हां मी उत्तर केलें कीं, आम्ही परभारें पंढरीस उपद्रव करणार नाही. जें बोलणें तें हुजूर विनंती करून पंढरीची कमाविस करून घेणें

तरी येथून घेऊं. परस्परें हर एक विशीं उपद्रव करणार नाहीं ऐसें बोललों होतों. ऐशी विनंती कारितांच उत्तर जाहलें कीं, तुम्हीं असें बोलतां आणि लिमये लुच्चे यांस पुढें करून आपण पुरावा करून सरकारचे मामलेदा याची अबरू घेतात हें काय ? तेव्हां मीं उत्तर केलें कीं लिमयांकडून ऐसें घडणार नाहीं. जर या थिटे याचे खेळांत लिमये याजकडील कारकून पडले असल्यास धरून आणावे. आम्हांकडून गुंता पडणार नाहीं. वाजवी लिमये यांचे आंगीं थिटे याची उभारणी लागल्यास आम्ही बोलणार नाहीं. ऐशी विनंति केली. आणि हल्लीं वाडिलांस हें पत्र लिहिलें आहे. तर वडिलीं राजश्री चिंतोपंत दादांस सांगावें कीं या खटल्यांत कांहीं प्रयोजन नाहीं. पंढरपूर करणें तर मागील मामलेदार यांचें फाजील देऊन कमाविस करीत असले तर आज मी सरकारांतून करून घेतों. सरळ गोष्टी असतां नाहक कलह वाढवावा हें काय ? जर एकादी गोष्ट बिघडली तर लिमये यांस मग जड जाईल. यांत नफा कांहीं नाहीं. जें बोलणें तें सरकारांत बोलून करावें. त्यास वडिलीं त्यांस ताकीद करून या खटल्यांत व्यर्थ पडूं नये याप्रमाणें सांगावें. सूचना लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. भास्करपंत म्हणोन लिहिलें, परंतु एक रामचंद्रपंत मात्र असें ऐकण्यांत आलें आहे. भास्करपंत तेथें नाहींत ऐसें बोभाटांत आहे. कळावें हे विज्ञापना.

नं. ५८२५ श्री (२० अक्टोबर)

पै॥ छ० १९ जमादिलाखर. सन इहिदे.

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत कार्तिक शुद्ध द्वितीया पावेतों पुणें येथें सुखरूप असें. विशेष. श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, राजश्री महादाजी परशुराम यांस येथें आणवावें. त्यावरून दोन तीन कागद रवाना जाहले आहेत. हल्लीं साहेबांनीं आपले स्वदस्तूरचें पत्र दिले आहे तें चि ॥ राजश्री बाबाजीपंत गोगटे याजबराबर पाठिवलें आहे. तें शिरसावंद्य करून सरकार आज्ञे प्रमाणें ती॥ राजश्री दाजीसाहेबांची रवानगी करून द्यावी. बरोबर खर्च बहुत देऊं नये. पुण्याची वस्ती यास्तव विनंती लिहिली आहे. येथील पर्याय सर्व चिरंजीव समजा-वितील. येथील प्रसंग पाहतां आपल्यास कोणी दाजीसाहेबांस पाठवावें असा सल्ला देणार नाहींत. त्यास पुरता विचार करून जें करणें तें करावें. येथें न येऊन परिणाम नाहीं. जर या श्रीमंतांपाशीं दिवस घ्यावे ऐशी इच्छा आहे तर मग दुसरा विचार न करितां रवानगी करावी. बहुत काय लिहिणें.

सेवेशीं विदित होय हे विज्ञापना. राजश्री निंबाजी चिंतामण कारकून ह आजपर्यंत कैलासवाशी वाडदेकर याजपाशीं होते. बहुत गरीब. कोठेंही लबेस पाठविलें असतां फार उपयोगीं. दरबारीं माहीत. चांगला विश्वासू आहे. त्यास वडिलीं कारकून शिलेदारीची असामी करार देऊन येथें मजकडे नेमणूक करून द्यावी. एक वर्ष पर्यंत राजश्री बाळाजीपंत दादा याजपाशींही होते. उपयोगी आहे म्हणोन विनंती लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५८२६ श्री. ( कार्तिक शु० ३–२१ आक्टो. )

पै॥ छ० ५ जमादिलाखर सनं इहिदे मय्यातैन. कार्तिक.

सेवेशीं उभयतांचे सा॥ नमस्कार विनंती. तागायत छ० २ जमादिलाखर जाणोन स्वकीय लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. उत्तरेकडील वर्तमान लिहिलें तें सविस्तर कळों आलें. स्वकीय वृत्त तर नेरलीस पलटणांचे मोर्चे चाललेच आहे. गोळागोळी होत आहे. निपाणीकराकडून कारकून बोलण्यास आले होते. त्यांसीं बोलून माघारे पाठविले आहेत. बोलणें ठरावांत आल्याचें उत्तर अद्याप आलें नाहीं. त्यांचे संग्रहीं मात्तबर मनुष्य कोणी नाहीं. असो. मागाहून ठरावांत येईल तें वर्तमान आपणाकडे लिहून पाठवितों. दाक्षिणेकडील पत्रें राजश्री लागूंचीं येतात. पलटणांचा मुक्काम अद्याप हुबळीवरच आहे. दीपवाळी जाल्यानंतर कूच होणार म्हणून लिहिण्यांत होतें. अद्याप कूच होऊन पुढें आलियाचें वर्तमान आलें नाहीं. राजाज्ञा नेरलीवर बाहेर निपाणीकरांस येऊन सामील जाहले. गोटास गोट लागून लगत्यास उतरले आहेत. सामानगडाकडील वगैरे पाईचे लोक जमा करीत आहेत. पुढें त्याणीं एक मोर्चा चालवावा हा मनसबा आहे. होळकर धारेचे नजीक आले, व उज्जनीकडील वर्तमान लिहिलेंप्रमाणें समजलें. तूर्त प्रसंग आम्हांवरी बेतली आहे. ईश्वराशिवाय नाथ कोणी नाहीं. ईश्वरइच्छेनें घडेल तें प्रमाण ! बहुत काय लिहिणें. कृपा निरंतर असावी हे विनंती.

नं. ५८२७ श्री. ( कार्तिक शु० ६–२३ अक्टो. )

पै॥ छ० ४ जमादिलाखर. तास रात्र. इहिदे मय्यातैन.

सेवेसीं रामाजी अनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ. ४

---

१ नागेशामजी व विरूपाक्ष शामजी यांचें पत्र बाळासाहेबांस मिरजेस.
२ फडणीस तेरदाळकर. पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

माहे जमादिलाखर मुकाम अथणी येथें स्वामींचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत रा॥ चिंतामणराव आपा काल श्री कृष्णा उतरोन अलीकडे अवरखोडचे मुक्कामास आले. आज मोळयास येणार असें वर्तमान आहे. समागमें तोफाही आहेत. दारूगोळींचा सरंजामही पोक्त आहे. पुढील मसलत समजत नाहीं. सूचनार्थ विनंती लिहिली आहे. श्रीमंत रा॥ अपासाहेब यांजकडे लष्करास जावयाचा बेत असतां स्वारी इकडे फिरवून आपासाहेब याजकडून सूचना यांस समजली किंवा नाहीं हें कळलें नाहीं. आढळलें वर्तमान विनंती लिहिली आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५८२८ श्री. ( मार्ग. शु० १०–२६ नोव्हें. )

पै छ० ११. रजब. सन इहिदे मय्यातैन मार्ग ॥ शु ॥ १२

सेवेशीं मोरो आपाजी सा॥ नमस्कार विज्ञापना. छ० ८ माहे रज्जब सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींकडून पत्रें महादू चोपडा जासूद याजबराबर आलीं त्यास पंधरा दिवस जाले. त्याअलीकडे समाचार कळत नाहीं. तरी सविस्तर पत्र ल्याहावयाची आज्ञा जाली पाहिजे. सांप्रत इकडील वर्तमान तरी बाया शिंदे यांसीं मिळोन यशवंतराव होळकर होते. त्यानी बदनियत करून बायांवर दगा करावा याप्रमाणें मनसबा करोन चालोन आले. इतक्यांत बायांकडे इशारा होऊन सावधागिरी जाली. लढाई जाली. बाया सांभाळून दोन मजला उज्जनीपलीकडे गेल्या. इतक्यांत लखबा याजकडून पांच सात हजार फौज येऊन मिळाली. हल्लीं पंधरा हजार जमाव सुद्धां आहेत. याउप्पर होळकर याच्यानें चालोन जाववत नाहीं. मागाहून लखबा आल्यानंतर लढाई होईल असा रंग दिसतो. यशवंतराव बायांजवळ मिळोन असतां फाटाफूट व्हावयाचें कारण शिंदे याजकडून पत्रें होळकर यांस गेलीं कीं मागें जाली गोष्ट ती जाली. याउप्पर तुम्ही बायांस मिळोन आमच्या दौलतीमध्यें बखेडा करूं नये. मल्हारराव याचा पुत्र खंडेराव होळकर सरकारांत श्रीमंतांजवळ आहे त्यास सरंजामसुद्धां तुम्हांकडे दौलतीचीं वस्त्रें देऊन रवाना करितों. याप्रमाणें पत्रीं बेलभंडार लेहून शफताही अनेक प्रकारें करून पत्रें गेलीं. नंतर त्या माहास गुंतोन बायांजवळ बिघाड केला. बाया तों सांभाळोन गेल्या. पुढें तूर्त होळकर याचें बायांचें कटाक्ष वाढलें आहे. राजश्री दौलतराव शिंदे श्रीमंताजवळ खंडेराव होळकर यास मागतात. श्रीमंतानीं सांगितलें कीं सरकारचे वाड्यांत आहेत ते तुम्हांजवळच आहेत. तुमचा आमचा एक विचार. त्यास तुम्हा-

जवळ दिले असतां लौकिक चांगला दिसणार नाहीं. याप्रमाणें एक दोन वेळां आज्ञा जाली. परंतु हाच नेट शेवटास जाईल असा नाहीं. त्याणीं निक्षुण आमचे हातीं द्यावाच असे आग्रहास पडिले असतां द्यावा लागेल. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५८२९ श्रीशंकरप्रसन्न ( कार्ति० शु० ७–२४ आक्टो. )

पै॥ छ० ३ रज्जब. सन इहिदे मय्यातैन. मार्गशिर्ष.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गंगाधररावजी स्वामीचे सेवेशीं.

पोष्य माधवराव अनंत सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असिलें पाहिजे. विशेष. श्री नारायण स्वरूप सदानंद तीर्थ स्वामी संस्थान मठ मुळबागल हे श्री महायात्रा करून पुणियास आले. येथून संस्थानास मिरजेहून जाणार. तेथून सोबत लावून द्यावी म्हणाले त्यावरून आपणास लिहिलें आहे. त्यास ज्या मार्गानें सुभचा असेल तिकडून सोबतीची सोय करवून देविली पाहिजे. स्वामी थोर आहेत. आपणांस ल्याहावेसें नाहीं. राजश्री रामचंद्रराव आपाही पुढें आहेत त्यांस लिहून स्वामी सुखरूप जाऊन मठास पोंहचत तें व्हावें. व पुढें श्री रामेश्वरयात्रेस जावें असें आहे. याकरितां आपास लिहून इंग्रजांकडील मार्गाचा बंदोबस्त होऊन ये तें करावें. रवाना छ० ५ जमादिलाखर बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे विनंती.

नं. ५८३० श्री ( कार्तिक शु० १३–३० आक्टो. )

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री बालकृष्ण लक्ष्मण गो॥ यांस.

सेवक अमृतराव रघुनाथ. नमस्कार सु॥ इहिदे मय्यातैन व अल्लफ. देवजी शामजी गुमास्ता देसाई अण्णीगिरीकर वगैरे असाम्या धोंडजी वाघ याजकडे मिळोन कर्यात मजकूर येथील ठाणें घेतलें व महालची नुकसानी करून रयतेस खंड बांधला. सांप्रत सरकारचा अंमल बसल्यानंतर परागंदा होऊन महालांत मनस्वी बखेडे केले. प्रस्तुत तुमचे लष्करांत आहेत म्हणोन हुजूर विदित जाहलें. त्याजवरून हें पत्र तुम्हास सादर केलें असें. देवजी शामजी वगैरे असाम्या हरामखोर आहेत. यास्तव त्यांस कर्यात मजकूरचे कमावीसदाराचे हवालीं करणें. अण्णीगिरें व उगर-

---

१ रस्ते.

गोळ या महालांस तुम्ही आपला व दुसरे कोणाचा उपसर्ग लागों न देणें. जाणिजे. छ० ११ जमा दिलाखर. बहुत काय लिहिणें

श्री.
लेखन
सीमा

नं. ५८३१ श्री. ( कार्तिक शु० ७–२४ आक्टो. )

नक्कल.

बळवंतराव त्रिंबक यांचे वडील बंधु माणकोपंत यांस पत्र आलें त्याची नक्कल.

रवाना छ० ५ जमादिलाखर.

विज्ञापना. राजश्री सखोपंत काळे याजकडून शहापुरास राजश्री नारोपंत आपटे कामावर आहेत त्याणी हजार जमाव आरब व बिदेशी मिळोन केला आहे. दोनशें दीडशें स्वार भरणा आहे. ' जांबोटकर यांचें पारिपत्य करावयाचें, येवशीं श्री॥ राजश्री चिंतामणराव आपांची आज्ञा आहे,यास्तव जमाव केला. जांबोटकर यांचा एक गांव मारिला. हल्लीं जांबोटीस जातात. किल्यापैकीं एक तोफ द्यावी म्हणोन यजमानाजवळ विनंती केली. त्यावरून यजमान स्वामीनीं तोफ देवितों, पारिपत्य करावें, म्हणून सांगितलें. शहापूर बेळगांव दोन नाहीं. हरवक्त समय पडिला असतां येथून जमाव द्यावा, पुरावा करावा, अशी चाल व यजमानां यजमानांचा घरोबा. त्या चालीवरून तोफेची परवानगी दिली. श्रावण वद्य दशमी गुरुवारीं तोफ न्यावयाकरितां जमाव घेऊन किल्याचे दरवाज्यापाशीं आले. चि॥ राजश्री तात्या यास बाहेर जाऊन तोफ स्वाधीन करणें म्हणून खाशानीं सांगितलें. त्यावरून बाहेर येऊन तोफ स्वाधीन केली. दारूगोळीचा छकडा दिला. निघोन जावयाचें, यजमानांचें दर्शन घेऊन जातों, परवानगी सांगवावी, म्हणून सांगोन पाठविलें. चालीप्रमाणें दहा लोकांनीं येणेंस परवानगी दिली. ते आंत आरब घेऊन शिरले, ते दुसरा दरवाजा कांठ्यांचा आहे तेथें येऊन बार केला. आणि परदेशी वगैरे होते त्यांत दोन चार असामींस ठार मारिलें. बाराचे इशारतीबरोबर बाहेर जमाव होता त्याणीं आंत शिरोन चाल करावी हा बेत. त्या बेतावरून बाहेरील लोकांनीं चाल केली. दरवाज्यांत दांडगाई होतांच दरवा-

जकरांनीं दरवाजा लोटला, व टोपानीं वगैरे लोक होते त्यांची लढाई होऊन दोन चार असामी ठार जाले. इकडे नारोपंत दुरगाडीच्या दरवाज्यांत शिरोन मारीत चालले वाड्याकडे. त्यांचे पीछावर जिभींतील रायचंदाकडील लोकानीं चाल केली. तेव्हां दुरगाडीचा दरवाजा नारोपंतानीं लोटला. आणि तेथें पांच सात आरब घेऊन वाड्याकडे मारीत निघाले. आरबांचा व किल्यांतील लोकांचा दंगा जाला असेल हीच भ्रांत धरून कजिया सोडवावा म्हणून वाड्यांतील मंडळी उघडी बोडकी धांवत आले त्यांवर गोळ्या घातल्या. तेव्हां एक दोन माणसें मेलीं व दोन तीन ब्राम्हण मंडळीस गोळ्या लागल्या. यजमान तुळशीच्या बागांत होते. दंगा जाला हें वर्तमान समजतांच धांऊन आले. दहा वीस लोक बरोबर होते. आडहत्यारी त्याणीं चालोन घेतलें. तेव्हां नारोपंत रणमंडळांत शिरले. त्यांस आसरा बळकट जाला. वरून बाहेरील लोकांस हांका मारावयास लागले कीं किल्ला काबीज जाला तुम्ही जलदी करून शिड्या लावून चढावें म्हणून हाका देऊन आणि आसरा धरून गोळ्या मारावयास लागले. चार घटका रात्र जाली. अंधार, तशांत यजमानानीं सांगून पाठविलें, 'कोणता विचार करून आलां आणि केलें तें काय?" त्याणीं उत्तर सांगितले कीं, सरकारची आज्ञा आहे, सनदा आहेत, किल्ला घ्यावयाचा व बिनीवाले यांस शिकस्त करावयाचें म्हणून आज्ञा आहे. किल्ला खालीं करून द्यावा. त्यासमयीं मशाल लावून चंद्रजोत लावून दुरगाडीच्या दरवाज्यांत नारोपंताचे लोक होते ते मारिले आणि रणमंडळावर चालोन घेतलें. तेव्हां नारोपंत याणीं उडी घेतली आणि पळोन गेले. लोकानीं उड्या घेतल्या ते पाण्यांत बुडोन मेले, हाय पाय मोडून पडले, कांहीं सांपडले. नारोपंत याचे आयुष्य आतिविशेष ! काहीं एक न लागतां जिवानिशीं वांचोन गेला. बाहेरील जमाव अगोदरच निघोन गेला. दरवाज्यांस अग्न दिली होती परंतु जिभींतील लोकानीं विझाविली. दरवाज्यास धक्का लागला नाहीं. वरील छप्पर जळालें. तात्यास बाहेरील आरबानीं धरून नेलें होतें. त्यांचे लोक सांपडले होते त्यास सोडून दिले. त्याणीं तात्यास सोडून दिलें. याप्रमाणें वर्तमान जालें. एवंच मोठी गोष्ट खैर जाली. सविस्तर पेशजी सांगोन पाठविलेंच होतें. तपशील समजावा म्हणून लिहिलें आहे. हे विज्ञापना.

नं. ५८३२ श्री. ( कार्तिक शु. १५—१ नोवेंबर. )

पै॥ छ० १६ जमादिलाखर. दोन घटका दिवस. भौमवार. अस्तमान. इहिदे मयातैन व अल्लफ.

( ६८२६ )

शं. १७२२ यशोदाबाईस धमकी. इ. स. १८००

सेवेशीं मोरो आपाजी सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० १३
जमादिलाखर सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीमंतांची स्वारी
कार्तिक वद्य पंचमीस डेरादाखल होणार. समागमें श्री॥ सौ॥ राधाबाई
यांस घेणार. श्री॥ मातुश्री यशोदाबाई यांसही समागमें घ्यावयाची योजना
केली. तिकडे सूचनाही केली. त्याणीं सांगितलें कीं माझे येण्याचें काम
काय ? त्यास श्रीमंतानीं सांगितलें कीं, समय याप्रकारचा, यास्तव आपणच
येथें रहाणें ठीक नाहीं. आपासाहेब देखील समागमें स्वारीबरोबर आहेत
त्याअर्थे आपणही निघावें. आपण ऐकावें हें उत्तम. न आइकलें असतां ठीक
नाहीं. याप्रमाणें सांगितलें. आंतून नेट आहे कीं संतोषानें निघाल्यास उत्तम.
नाहीं तरी श्री॥ कै॥ नानासाहेब यांचे नाटकशाळांकडून जबरदस्तीनें पाल-
खींत घालून वाड्याबाहेर काढावें याप्रमाणें विचार दिसतो. वाड्याबाहेर
काढिली असतां स्वारीबरोबरच न्यावें हाच विचार प्रमाण नाहीं. कोठें तरी
दुर्गांत ठेवावें ऐसा मनसबा दिसतो. आग्रहच केला असतां मातुश्रीचें कांहीं
चालावयाचें नाहीं. ईश्वरइच्छा प्रमाण. तूर्त आढळलें वर्तमान विनंती लिहिली
आहे. मागाहून पक्केपणें समजेल तसें लिहितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्री. ( कार्ति० शु० १५-१ नोव्हे. )

नं. ५८३३

पै॥ छ० १६ जमादिलाखर. इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. तागायत छ० १३ जमादिलाखर सेवकाचें वर्तमान यथा-
स्थित असे. विशेष. सदाशिव मल्हार नगरास कैदेंत होते. दुखणें होऊन
मृत्यु पावले. पंधरा दिवस जाले. गोविंदराव गायकवाड गुजराथेंत मृत्यु पावले.
एक मास जाला. अमदाबाद किल्ला रावजी आपाजी—गोविंदराव यांचे
दिवाण—याणीं आबा शेलुकर यासी लढाई देऊन घेतला होता. गोविंदराव
मृत्यु पावल्यानंतर त्याचे पुत्राबरोबर सलुख करून कारभार शेलूकर याणीं
दिवाणगिरी केली. फिरोन अमदाबादेंत फितुर करून रावजी आपाजी यास
कैद करून किल्ला सर केला. याप्रमाणें बातमी आहे. हिंदुस्थानांतील राज-
कारण बिघडलें. बाया उज्जनीनजीक आहेत. दहा पंधरा हजार फौज
जमाव जाला. उज्जनी नजीक विसा कोसांवर तमाम राजे रजवाडे गिराशी-
सह मिळोन पंचवीस हजार जमावानिशीं बायांचे विचारें आहेत. कोस्या-

१ हें व पुढचीं दोन अशीं तीन पत्रें परांजपे यांनीं मिरजेस बाळासाहे-
बांस लिहिलीं.

नजीक इंगळे दहा हजार फौजेनिशीं आहेत. इंगळे तो राजश्री दौलतराव-बाबा यांजकडील, त्यांचे ममतेंत आहेत खरे, परंतु इकडील बायांचा वगैरे जथ जाहला हें समजोन त्या विचारांत शिरले. बाळोजी इंगळे राघोगडास सहा हजार फौजेनिशीं होते. राघोगडवाले गिराशी मिळोन दगा करून छापा घालून इंगळे यांस लुटून फस्त केलें. पळोन अंबोजी इंगळे यांजकडे गेले. लखबा जगबा वगैरे राजेरजवाडे जमाव सुद्धां होळकर यांजकडील पलटणें घेऊन पिरु दिल्लीनजीक आहे त्याचे मोकाबलेयाजवर जाणार. कोस्या-पावेतों दाखल जाले. पिरूजवळ दहा हजार फौज सात पलटणें आहेत. त्याचे चित्तांत एक वेळ टक्कर घ्यावी हा दम आहे. वरकड तो कोणी एक बायांचे विचाराशिवाय नाहीं. दिल्लीस आपला कारभारी पिरूनें ठेऊन शिक्का मोर्तब होणें अथवा कारभार होणें तो इतल्लयाखेरीज कारभारी याचे होऊं नये. याप्रमाणें केल्यावरून शहाची मर्जी क्रूर आहे. उपाय नाहीं. बायांचें संधान दिल्लीस गेलें. बायांकडे लक्ष शहाचें आहे. दिल्लीच्या पूर्वेस झाज फिरंगी व समरूची बेगम फिरंगीण हीं उभयतां मिळोन तूर्त पिरूच्या मोकाबलेयाजवर येणार. दहा पलटणें पांच हजार फौज दोघां मिळोन आहे. लखबाचे कारकून पत्रें त्यांजकडे गेलीं. त्यांचें ही सूत्र मिळालें. झाडून हिंदुस्थानांत अंमल नर्मदे-पासून बायांचा जाला. होळकर यांचा सरंजाम हिंदुस्थानांत आहे. त्याचे वाटेस शिंदे बाया जात नाहींत. होळकर त्यांचे सरंजामाचे महालास धक्का लावीत नाहीं याप्रमाणें विचार ठरोन मामलतीची घालमेल करून रसदा बायाशिंदे व होळकर आपले महालांच्या घेतात. याउप्पर होईल मजकूर आइकण्यांत येईल तो विनंती लिहितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५८३४ श्री. ( १ नोव्हेंबर. )

पै ॥ छ० १६ जमादिलाखर. इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. तागायत छ० १३ जमादिलाखर वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्री ॥ राजश्री प्रंतप्रधान याणीं सांप्रत सरकारवाड्यांत बंदोबस्त वगैरे नवीन केले.

बहुता दिवसांचे सरकारचे वाड्यांत भोजन करीत होते. त्यास थोरले पंगतीस दीडशें पावेतों पात्र होत असे त्यांस फांटा दिल्हा. त्यांतून दहा वीस असामी मात्र करार केले. बाकीचे दूर करून थोरली पंगत मोडिली. श्रीमंताचे पंगतीसच करार केले त्याणीं भोजन करावें याप्रमाणें केलें.

वाड्यांत पंधरा असामी ब्राह्मण कारकून हौदाचे चौकांत चौकीदार ठेविले व ब्राह्मण हौदाचे बाहेरील मोऱ्या वगैरे धुवावयास म्हणोन पांच सहा असामी ठेविले. ब्राह्मण कामाठी असें त्यांस नांव सहजांतच पडिलें. सारांश श्रीमंताचें सोवळें फार आहे. तरीच ईश्वरें कृपा करून राज्याधिकार दिल्हा आहे ! १

थोरले पंगतीस शागीर्द तेथून भोजन करीत होते त्यांस दूर केलें. ज्याचे शागीर्द आहेत त्याणीं घरीं भोजन करावें याप्रमाणें जालें. श्रीमंताचे पंगतीस जेवणार त्यांचे देखील शागीर्द दूर जाले. कांहीं पांच सात मात्र करार केले. वरकडांस फांटा. १

नित्यदान समयीं लोटी, पंचपात्र, ताम्हन, तांबेंतील पात्र, सुवर्ण मासा, व पुतळी एक, एकूण वीस रुपये आकार होता. त्यास वैदिकासच द्यावें असा विचार नाहीं. जवळ शागीर्द आहेत त्यांसही द्यावें. शागीर्दास दर असामीस दोन तीन चार वेळां एकएकास नित्यदान पावलें. राघोबा शेंडे यास पांच सात वेळां नित्यदान पावलें. छ० ११ जमादिलाखरीं राजश्री दादा गद्रे श्रीमंताजवळ दीड प्रहर दिवसाचे सुमारें होते. नित्यदान द्यावयाचा समय आला तेव्हां श्रीमंतानी गद्रे यांस पागोटें काढावें म्हणोन सांगितलें ! गद्रे याणीं पागोटें काढलें. नित्यदानाचा संकल्प करून उदक त्यांचे हातावर घातलें. त्याणीं नित्यदान गोळा करून बाहेर आले आणि ब्राह्मणांस दिलें. गद्रे बहुत चित्तांत खफा जाहले. उपाय नाहीं. हें वर्तमान तहकीक म्हणोन पांच सातांनीं सांगितलें. तशांत एक दोन दिवसांत पक्का शोधही करितों. परंतु संभव होईल. गुंता नाहीं. शागीर्दास तो लिहिल्याप्रमाणें नित्यदानें पावलीं. श्रुत होय हे विज्ञापना.

श्री. (१ नोव्हेंबर.)

नं. ५८३५

पै॥ छ० १९ जमादिलाखर सन इहिदे.

तीर्थस्वरूप राजश्री अप्पा साहेब वडिलाचे सेवेशीं. अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत कार्तिक शु॥ पौर्णिमा पावेतों सुखी आहें. विशेष. वडिलांकडून आशीर्वाद पत्र येऊन समाचार कळत नाहीं. तर सदैव पत्र पाठवीत जावें. यानंतर इकडील वर्त-

---

१ हें व पुढचीं अकरा पत्रें रामचंद्रपंत आपास बाबा काळे वकील याणीं पुण्याहून लिहिलीं.

मान तर राजश्री दौलतराव शिंदे आलिजाबहाद्दर यांणीं परवांच्या दिवशीं श्रीमंताचा निरोप हिंदुस्थानास जावयाकारितां घेतला. परंतु कार्तिक अखेरपर्यंत कूच होत नाहीं. कारण त्यांची स्त्री घाटगे यांची कन्या गरोदर आहे. तिला आठवा महिना कार्तिक अखेरीस समाप्त होईल. नववा महिना लागला म्हणजे कूच करून चालते होणार. शिंदे हिंदुस्थानांत जाणार परंतु चिकोडी तालुके यांत पलटणें आहेत. तीं कांहीं आणीत नाहींत. आणखी दोन पलटणें येथून शिराळ्याकडे रवाना केलीं तीं बुध पाचेगांवचे सुमारें गेलीं आहेत. कारण इसलामपूर व बागणी घेणार म्हणोन जात आहेत. आतां मी बोलणें राजश्री यादवराव भास्कर आज शिंदे यांचें घरीं प्रमुख आहेत, शहाणे आहेत, त्यांजकडे बोलणें लाविलें आहे. त्यांणीं वचन दिलें आहे कीं पलटणें त्या प्रांतींहून आणवितों. त्यास वडिलीं एक पत्र यादवराव भाऊचे नांवें पाठवावें. माझें नांव लिहावें कीं तुम्हांकडे येतील त्यांस इकडील सर्वोपरी अगत्य धरून कार्य करावें. येणें प्रमाणें बहुत गोडीनें लिहिणें. घाटगे, शिंदे यांस पत्रें पाठवावीं म्हणोन लिहिलें होतें. आळस जाहला. आपण म्हणतील पत्रें पाठवून लाभ कोणता ? त्यास जसा समय तैशी वर्तणूक जाली पाहिजे. इतकाच लाभ. त्यांत आपला नक्ष राहील ऐशी वर्तणूक एथें करीत आहें. ईश्वर आपलें बरेंच करील. दिक्कत नाहीं. यादवराव भाऊ म्हणोन लिहावें. परम ममतेनें लिहावें. श्रीमंतही स्वारीस कार्तिक शु॥ पंचमीस निघणार. श्रीजेजुरीस जाऊन श्री गंगातीर पर्यंत जाऊन यावें ऐसें ठरलें आहे. मला बरोबर गेलें पाहिजे. तेव्हां साहित्य पाहिजे. दोन उंट, दोन तीन तट्टें, व बैल, शिवाय जाजती माणसें ऐशीं पाहिजेत. श्रीमंतांचे डेरेयापाशीं राहणें तेव्हां दरिद्रीपणें राहून परिणाम नाहीं. यांत कसें वर्तावें तें लिहावें. तैशी वर्तणूक करीन. राहुटी, पालें, चांदणी पाहिजे, तें एथें होईल. खर्चास पाहिजे. उत्तर लवकर यावें. येथें असून बरोबर न जाणें कसें घडेल ? अथवा जाऊं नये ऐसें असल्यास तैसेंच लिहावें. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय विज्ञापना.

नं. ५८३६ श्री. ( का. शु० १५–१ नोव्हेंबर )

पै॥ छ० १९ जमादिलाखर. सन इहिदे.

विज्ञापना. " इंग्रज हुबळीवर आहे. बाबासाहेब बरोबर आहेत. वसली धारवाड पहावयास गेला होता तो बाबासाहेबांचे संधानानें गेला. हुबळीस कोठी केली आहे. इंग्रज तेथेंच जम पाडतो. पुढें पुण्यापर्यंत चाल करणार. "

ऐशा मनस्वी आवाया आणि तिकडून लिहिलीं येतात. त्यास ही गोष्टी सर्वो-परी वाईट. व्यर्थ आपण इंग्रज न आणतां आणल्याचें श्रेय येतें ! ऐशीयास ही गोष्टी परिछिन्न वाईट आहे. याउपरी पत्रें वडिलीं बाबासाहेबांस पाठऊन इंग्रजाचा निरोप घेऊन वेगळे दहा वीस कोशीं जावें. आणि लिहिलीं यावीं. तर बरें आहे. माझे लिहिण्याची सीमा जाहली. कसेंही असो. श्रीमंतांचे राज्यांत भीक बरी. परंतु दुसरे याचे दौलतींत सुखही समान होणार नाहीं. बाबासाहेब इंग्रजाबराबर आहेत हें बहुत वांकडें श्रीमंतांस आहे. यांत जसें विचारास येईल तैसें करावें. आपल्यावर श्रीमंतांची मर्जी प्रसन्न आहे. आपली चाल मात्र यथास्थित पडली पाहिजे. इकडून दिक्कत नाहीं. याजउपरी कांहीं संशय मनांत न आणितां दाजीसाहेबांस अगत्यरूप रवाना करून द्यावें. ऐथें दाजीसाहेब आले असतां परस्परें दिक्कत काडीची रहात नाहीं. यांत सर्व बंदोबस्त होतील. हें दाजीसाहेबांचें येणें घडत नाहीं तर कांहीं एक होत नाहीं हें स्पष्ट समजावें. आणि दाजीसाहेबांची रवानगी करावी. येथें खर्च बाळगून प्रयोजन नाहीं. दरमहा दीड हजार रुपयेचा खर्च बराबर असला म्हणजे पुरे. उत्तरें लवकर यावीं. रास्ते यांस सरदारीचीं वस्त्रें जाहलीं. कांहीं गुप्तरूप पूजा जाहली आहेसें भासतें. बेरीज समजली नाहीं. तोंडावर पैसा दिला नाहीं म्हणतात. परंतु कांहीं दिलें यांत दिक्कत नाहीं. तोही शोध घेऊन लिहितों. वडिलीं कोणाचे न आइकतां दाजीसाहेबांची रवानगी करावी. सौ॥ पार्वतीबाई सुद्धां आली तरी किमपि दिक्कत नाहीं. स्नेहानें स्नेह होईल. येवढें आधीं करावें. रवाना छं० १३ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें, सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५८३७ श्री ( कार्तिक शु० १५–१ नोव्हेंबर )

पौ॥ छ० १९ जमादिलाखर. सन इहिदे.

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० १३ जमादिलाखर पावेतों सुखी आहें. विशेष. “ ती॥ राजश्री बाबासाहेब इंग्रजांबरोबर आहेत. हुबळीवर मुक्काम आहे. धारवाडास वेध इंग्रज लावणार. शिड्या वगैरे करितात;” असें धारवाडचे कमाविसदार सरकारांत लिहितात. इतकें बाबासाहेब करिवतात असें स्पष्ट कारकून धार-वाडाहून लिहितात ! मला श्रीमंतांनीं नेऊन काल बहुत फजीत केलें तें पत्रीं लिहितां येत नाहीं. त्यास पुढें विचार काय ? इंग्रजांपासून चिंतामणराव निघाले. गोखले निघाले. तसेच बाबासाहेब निघावे तें न होतां इंग्रजां-

बरोबर राहून करावयाचें काय ? व्यर्थ श्रीमंतांशीं विरुद्ध वाढवावें यांत कांहीं जीव नाहीं. आपल्यास भास असेल कीं इंग्रज येऊन करवीरचें पारिपत्य होईल. त्यास जरी इंग्रजानें करवीरचें पारपत्य केलें तरी फायदा काय ? शिंदे यांचीं पलटणें नेलीं त्यांनीं परिणाम लाविला. आतां इंग्रज लावतील ! हे सर्व अर्थ ध्यानीं आणून जो विचार होणें तो व्हावा. याजउपरी इंग्रजाचा निरोप घेऊन बाबासाहेबांनीं सावनूरचे सुमारें जावें. इंग्रजापाशीं राहूं नये तर येथील मर्जी राहती. नाहींतर कांहीं ठीक नाहीं. हुबळी अथवा धारवाड येथें उपद्रव होऊं नये, आणि याजउपरी इंग्रजांपाशीं राहूं नये, तरच ठीक आहे. मग मर्जी. बाबासाहेब इंग्रजाचा निरोप घेऊन गेल्यावर मग इंग्रज आपले सरदेस जावोत किंवा राहोत, त्याचे आपलेकडे कांहीं नाहीं. तर इंग्रज आणिल्याचें श्रेय आपले माथां न आणतां येतें. आपण पुण्यशील आहेत. ईश्वर आपले हातेंच करवीरचें पारिपत्य करवील. दिक्कत नाहीं. व्यर्थ इंग्रजापाशीं राहून श्रीमंतांशीं वांकडें होणें मला चांगलें दिसत नाहीं. मग इच्छा वेगळी आहे. हें पत्र सहस्र पत्रांचे जागां लिहिलें आहे. याउपरी इंग्रजाची संगति सोडून निराळे रहावें. आणि पत्रें यावीं. चि॥ राजश्री बाबाजींपत पोचले असतील. यजमानांनीं लिहिलेप्रमाणें दाजीसाहेबांस पाठवावें हें उचित आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५८३८ श्री. ( कार्तिक व० २–३ नोव्हेंबर )

पौ॥ छ० २० जमादिलाखर. सन इहिदे.

विज्ञापना. वाघाचे पारिपत्यास इंग्रज आला त्याणें सरकारी तालुका सोडून हवालीं केला. त्यास खर्च पडल्याशिवाय कसा सुटला असेल ! असें आपलें लिहिलें आलें होतें. हल्लीं खर्च पडला नाहीं म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशीयास मी श्रीमंतांपाशीं इंग्रजास घासदाणा कबूल केला, विशेष खर्च पडला नाहीं, ऐसें बोलणें पहिलेंच केलें. वडिलीं लिहिल्यावरून व ती॥ राजश्री बाबासाहेबांचें पत्र पाठविलें याजवरून खचीत समजलें. त्यास येथें या खर्चाचें बोलणें पडण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. त्यास वडिलीं रूपराम व मनोहरगीर यांचे दोनी महाल हवालीं करावे. किमान खर्च म्हणून दहा हजार रुपयेस कमी बेरीज त्यांस सांगूं नये. महाल मात्र बिनदिक्कत हवालीं व्हावे. दोनी महाल मिळून दहाहजार रुपये खर्च मुकाट्यानें देतील. कळावें. जसे सरकारांत देविले, तसे हवालीं व्हावे. यांत गूण बहुत आहेत. कळावें. रवाना छ० १५ जमादिलाखर. याज उपरी सरकारी तालुके सुटणें विषयीं

खर्च काय पडला म्हणोन सरकारांत विचारूं लागल्यास विनंती करितों. दिक्कत नाहीं. कळावें हे विज्ञापना.

नं. ५८३९ श्री. ( कार्तिक व० २-३ नोहेंबर. )

पै॥ छ० २० जमादिलाखर. मन इहिदे.

विज्ञापना. वडिलीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. इंग्रज वसली हुबळीवर आहे त्याचे मनांतील समजत नाहीं. परंतु माघारा जात नाहीं. पट्टणाकडून इंग्रजांचे बैल भरून पन्नास हजार येतात तेव्हां काय मनसुबा कळेना! म्हणोन वाडिलीं विस्तारें करून लिहिलें तें कळलें. ऐशीयास इंग्रज सरद सोडीत नाहीं. आपले उपयोगी पडून कार्य घडत नाहीं. मग ती॥ राजश्री बाबासाहेब इंग्रजापाशीं व्यर्थ राहिले, यांचें प्रयोजन काय? श्रीमंत बहुत अंदेशे करीत असतात कीं 'रामचंद्रपंत आपाचे बंधु इंग्रजापाशीं आहेत, तेव्हां चाल चांगली दिसत नाहीं. याज उपरी दाजींस ते पाठवीत नाहींत. तूं मात्र व्यर्थ खातरजमा करितोस.' याप्रमाणें श्रीमंत म्हणतात. त्यास जर वडिलांस सरकारचें लक्ष राखून वर्तावें, ही इच्छा असली तर वाडिलीं बाबासाहेबांस लिहून पाठवावें कीं तुम्ही वसली बहादूर याचा निरोप घेऊन बहुत प्रीतीनें निघावें. आपण इंग्रजापासून गेल्यावर जरी सरकारचे दौलतीवर इंग्रजानें वांकडी नजर धरली तथापि आपण दोषास पात्र होणार नाहीं. सारांश आपलेंच लिहिलें येतें त्यांत इंग्रजाची नजर यथास्थित नाहीं असें येऊन बाबासाहेबांनीं तेथें राहणें चांगलें नाहीं. वडिलीं श्रीमंतांची मर्जी संपादावी म्हणजे करवीराविशीं मनोरथ सिद्धीस जाईल. व्यर्थ इंग्रजापाशीं राहून श्रीमंतांची ममता कमी करून अवकृपेस पात्र व्हावें यांत नफा नाहीं. चिंतामणराव इंग्रजापासून निघाले आणि बाबासाहेब तसेच त्याजबराबर आहेत. आधींच सारे पटवर्धन बरें. एक आपलें घर मात्र श्रीमंतांशीं विरुद्ध ऐसें जघन्य जाहलें आहे. पुढें वर्तणूकही लोकांस तशी दिसती. आपले मनांत देखील श्रीमंतांचे पायांशीं वांकडें नाहीं. परंतु ओघास तसें येतें. त्यास वडिलीं याजउपरी इंग्रजाची सोबत सोडावी. ममता अंतरंगीं राखावी. सारांश श्रीमंतांची कृपा संपादून घ्यावी, यांत बहुत कामें आहेत. एथें इंग्रजाकरवीं धारवाड व हुबळी बाबासाहेब घेविवतात ऐसें लोक बोलतात व लिहिलीं येतात. या पापांत कांहीं प्रयोजन नाहीं. मला सुचेल तें लिहितो. आपण सर्वज्ञ आहेत तेथें माझी बुद्धि ती किती? एक मात्र चित्तांत असावें कीं, श्रीमंताचे घरीं गमावलें आहे तेथेंच मिळवावें, हें चित्तांत असून तसें वर्तावें. सारांश याजउपरी इंग्रजाशीं स्नेह राखून

त्याजपासून जावें. आणि श्रीमंतांस पत्रें यावीं. याजउपरी हा मजकूर लिहिणार नाहीं. रवाना छ० १५ जमादिलाखर सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५८४० श्री. ( कार्तिक व० २–३ नोहेंबर )

पै॥ छ० २० जमादिलाखर. सन इहिदे.

विज्ञापना. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. ती॥ राजश्री दाजीसाहेबांचे रवानगीचा मजकूर लिहिला तो कळला. " नाद न तोडणें. आज्ञेप्रमाणें लिहितों. ऐसे बोलून मर्जी खूष राखावी. आमचा काल विपरीत. तेव्हां चिरंजीवाची निभावणी कशी होईल ? इतकाच अंदेशा " म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास एकवेळां गोष्टी निघाली, मग आठ चार दिवस मध्यें गोष्ट निघाली नाहीं, ऐसें असल्यास नाद राखतां येईल. तो स्वालजाबच नाहीं. नित्य उठोन मला खुद्द श्रीमंत विचारतात कीं, दाजीबा येतात किंवा नाहीं ? तेव्हां नाद कसा राखूं ? नित्य खातरजमा करतों कीं खामखा दाजींस घेऊन येतों. परवां चिरंजीव राजश्री बाबजीपंत यास श्रीमंतांची हातचिठी स्वदस्तुरची देऊन पाठविलें आहेच. जर बाबजीपंताबरोबर रवानगी न जाहली तर मला पाठिवतात. माझी खेप रिकामी आली यावर ग्रंथ दुसरा ! येथील श्रीमंतांचा रोख पाहतां घात करावा ऐसें वाटत नाहीं. तसेंच श्रीमंतांनीं रक्षण करितों म्हटलें असतां शिंदेही वावगे जाणार नाहींत. ऐशी पुरती खातरजमा आहे. मग त्यांचे पोटांतील भाव कोणास कळावयाचे ? परंतु दिसण्यांत अथवा आचरणांत वांकडें किमपि दिसत नाहीं. त्यास वडिलीं अंदेशे मनांत न आणतां दाजीसाहेबांची रवानगी करावी. अथवा कांहीं संशय मनांत असल्यास मला बोलवावें. येतों. परंतु याज उपरी ऐथें न येऊन परिणाम नाहीं. वडील सर्वजाण आहेत. तेथें फार कशाला लिहूं ? रवाना छ० १५ जमादिलाखर हे विज्ञापना.

नं. ५८४१ श्री. ( कार्तिक व० २–३ नोव्हेंबर. )

पै॥ छ० २० जमादिलाखर. सन इहिदे.

विज्ञापना. ती॥ राजश्री दाजीसाहेबांची रवानगी जाहली असल्यास उत्तम जाहलें. गोगटे वडिलांपाशी येऊन ही पाठवावयाची मर्जी नसल्यास कळवावें म्हणजे मी येतों. माझी भेटी होई पावेतों वडिलीं कृष्णा दक्षिण तीरीं इतक्यांत असावें. येऊन विनंती करितों. मग मर्जीस आल्यास दाजीसाहेबांस पाठवावें, अथवा विचारास न आल्यास पाठवूं नये. परंतु मी येइपावेतों फार दूर जाऊं नये. मला मागाहून येतां मार्ग फुटणार नाहीं यास्तव विनंती लिहिली आहे. रवाना छ० १५ जमादिलाखर, हे विज्ञापना.

नं. ५८४२ श्री. ( कार्तिक व० २-३ नोव्हेंबर )

पै॥ छ० २० जमादिलाखर. सन इहिदे.

विज्ञापना. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. "परांड्यास नबाबाचा सरंजाम होतो, कलम ज्यारी चालली आहे, ऐसें आइकिलें व श्रीमंत अमृतराव साहेब यांचा मजकूर कळविणें. शिंदे बाया यांचें वर्तमान लिहिणें. प्रतीनिधीचे कसें आहे हें तपशीलवार लिहिणें" म्हणोन आज्ञा, ऐशीयास परांडे येथें नबाबाकडील फौज आहे तेथें कमलज्यारी नाहीं. परंतु तेथें हजार दीड-हजारपावेतो शिंदे यांचे घरचे उंडगे उठोन गेलेले जमले आहेत. इंग्रजी पलटणें जीं नबाबाचे घरीं चाकरीस आजपर्यंत आहेत तींच आहेत. शिवाय यंदा जाजती नबाबांनीं चाळीस लक्षांचा मुलूख सरंजाम इंग्रजास देऊन आणखीं दोन तीन पलटणें चाकर ठेविलीं आहेत. इंग्रजाचें बोलणें नबाबाचें घरीं पडलें आहे कीं, आमचा पालमर वकील पुण्यांत आहे तोच बोलणें तुमचें बोलेल. तुमचा वकील पुण्यांत कशास पाहिजे ? त्याजवरून ऐथें मशीरुलमुलुकाकडून शेषाद्रिपंत होते त्यांस बोलाऊन नेले आहेत. याजउपरी नबाबाचें बोलणें इंग्रजच बोलणार किंवा कसें पडतें पहावें. जर फिरून शेषाद्रिपंत अण्णा माघारे आले तर मग जें लिहिलें तें खोटें. आइकलें वर्तमान श्रवण व्हावें म्हणोन लिहिलें आहे. इंग्रज दोनी दौलतींत पाय घालतात, यांत दिक्कत नाहीं. श्रीमंतांचें पुण्य आणि सर्व ब्राह्मणांचें दैव, तरच ताम्रमुखी या दौलतींत शिरणार नाहींत. नाहींतर मसलतीनें बाकी राहिली नाहीं. मग ईश्वर इच्छा वेगळी. श्रीमंत रावसाहेब भिंवडीस कल्याणापाशीं तेथें आहेत. शिंदे हिंदुस्तानांत गेल्यावर आलेतर येतील. नहून मसलत नाहीं. आपणाकडून रावसाहेबाकडे कारकून गेला होता म्हणोन आइकलें. त्यास हें खोटें असेल. पाठिवणें तर मला कळवावें. आधीं प्रयोजन नाहीं. तथापि पाठिवणें तर मला इशारा असावा. शिंदे यांच्या बाया उज्जनीपलीकडे पंधरा कोसांवर आहेत. लखबा लाड येणार. अद्याप भेटी जाहल्या नाहींत. हिंदुस्तानांत बखेडा आहे याजमुळें शिंदेयाणीं श्रीमंतांचा निरोप घेतला. मार्गशीर्ष शुद्धांत कूच होईल. श्रीमंतही कार्तिक वद्यपक्षीं डेरे दाखल होणार आहेत. गंगेपर्यंत जातीलसें भासतें. प्रतिनिधी यांस सरकारी वाडियांत ठेविलें होतें. हल्लीं चौकांत गोविंदराव काळे यांचे वाडियांत नेऊन ठेविले आहेत. अद्यापि कैदेदाखल आहेत. सरंजाम जप्त जाहला नाहीं. पुढें काय करितात पहावें. कर्मासारखें फल जाहलें. प्रतीनिधीची सापत्न मातुश्री देवाधीन जाहली. सारांश कांहीं

सरंजाम प्रतीनिधीपैकीं घेतील. कळावें. रवाना छ० १५ जमादिलाखर. हे विज्ञापना.

नं. ५८४३ श्री. ( कार्तिक व० २–३ नोव्हेंबर )

पै॥ छ० २० जमादिलाखर. सन इहिदे.

विज्ञापना. " मिरजेहून राजश्री बाबाजीपंत चांफेकर व बाळाजीपंत सहस्रबुद्धे आले होते. बाबाजीपंत आहेत. बाळाजीपंत कागदपत्राचे जाब घेऊन मिरजेस गेले आहेत. घर कलह तुटला तर चांगला. ईश्वर इच्छा ! मनोळीचें मागती फिसकटलें कसें ? खर्चीखालीं मात्र आलों " म्हणोन लिहिलें, ऐशि-यास मिरजप्रकरणीं घरकलह तुटावा ही इच्छा सर्वांची आहे. वडिलीं ये वढें यश घ्यावें. मनोळीचे फिसकटलें म्हणोन लिहिलें, त्यास यांतील हांशील समजलें नाहीं. मी अंदेशांत पडलों आहें. समजावयाजोगें लिहून कळवावें. रवाना छ १५ जमादिलाखर. हे विज्ञापना.

नं. ५८४४ श्री ( कार्तिक व० २–३ नोव्हेंबर )

पै॥ छ० २१ जमादिलाखर. सन इहिदे.

विज्ञापना. डंबळ ठाण्याची जागा आहे. श्रीमंतांस विनंती करून आपलेकडे राही ऐसे करावें व ती॥ राजश्री बाबासाहेबांचें पत्र वडिलांस आलें तें पाठविलें तें पावलें. ज्या समयीं डंबळ इंग्रजांनीं घेतलें तेव्हां ती॥ राजश्री चिंतामणरावांनीं मला डंबळच्या मुक्कामाहून लिहिलें होतें. त्यावरून डंबळ चिंतामणराव आपास द्यावें म्हणोन मीं श्रीमंतांस विनंती केली. तेव्हां उत्तर जाहलें आहे कीं तूर्त देत नाहीं. पुढें इंग्रज गेल्यावर विनंती करणें. द्यावयास येईल. ऐसे स्वाल जाब प्रथम आज दोन महिन्याचे पूर्वींच जाहले आहेत. तेव्हां आज आपणाकडे डंबळ द्यावें म्हणोन विनंती करितां नये. चिंताम-णराव आपानीं लिहिलें त्याचे पूर्वीं वडिलांचे लिहिलें आलें असतें तर विनंती करून ठेविली असती. त्यांत वडिलीं ती॥ राजश्री दाजीसाहेबांस पाठवावें. डंबळसें काय ? त्याशिवाय आपले उपयोगी जें ठाणें असेल तें येईल. दिकत नाहीं. एक श्रीमंतांचे मर्जीप्रमाणें वडिलीं वर्तूणूक करून दाजी साहेबांस पाठवावें म्हणजे यथास्थित होईल. न पाठविलें असतां कांहीं एक रुपयाचें काम देखील सरकारांतून आमचें व्हावयाचें नाहीं. त्यास वडिलीं मन घट्ट करून रवानगी करावी. यांत गुण बहुत आहेत. ती॥ राजश्री बाबासाहेबांनीं दाजींस पाठविणेंविशीं बहुत अंदेशे लिहिले. तैनात करून द्यावी, कुंडल पुणदी द्यावी, हे खिसे श्रीमंत बलावतात तेव्हां काढावयास

योग्य कीं काय ? श्रीमंतांची मर्जी प्रसन्न करून मग जें पाहिजे तें मागावें. हें एकीकडे ठेऊन लटके खिसे पुढें करावे यांत कांहीं जीव नाहीं. आपणही या गोष्टीचा आंदेशा करीत असतील. मला समजतें तें मी लिहितों. वडिलीं जेणेंकरून दौलत राहून कल्याण तें करावें. रवाना छ० १५ जमादिलाखर. हे विज्ञापना.

नं. ५८४५ श्री. ( कार्तिक व० २–३ नोव्हेंबर )

पै॥ छ० २१ जमादिलाखर. सन इहिदे.

तीर्थस्वरूप राजश्री आपासाहेब वडिलांचे सेवेशीं

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ० १ जमादिलाखरपावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असें. विशेष. वडिलीं छ० ४ जमादिलाखरचें पत्र पाठविलें तें छ० १३ माहेमजकुरीं पावलें. “ प्रस्तुत गोटें परगण्यांत आहों. याउपरी कृष्णा दक्षिण तीरास जावयाकरितां ममदापुरचे सुमारें जातों. पत्राचीं उतरें तिकडील मजकूर आद्यंत लिहून लौकर पाठिवणें. ती॥ राजश्री दादा चि॥ राजश्री चिंतामणराव आपाकडे आले तर आम्हांस जावें लागेल. कसा समेट होतो न कळे. ” म्हणोन वडिलीं विस्तारें लिहिलें तें कळलें. ऐशिवाय आजपर्यंत कृष्णा उतरावयास ममदापुरचे सुमारें जाणें जाहलेंच असेल. पत्रांची उत्तरें लिहून पाठविणें म्हणोन आज्ञा, त्यास वडिलांचे पत्राचीं उत्तरें व इकडील वर्तमान आजपर्यंत जें आढळलें तें तपशीलवार अलाहिदा पत्रीं लिहिले आहे त्याजवरून विदित होईल. ती॥ राजश्री रघुनाथराव दादा ती॥ राजश्री चिंतामणराव आपांकडे गेले तर आपणही जातील. त्यास आपलें जाणें व्यर्थ भासतें. कारण प्रथम मिरजेच्या मुक्कामीं ती॥ राजश्री बाळासाहेबांचे मनांत आलें कीं, तुम्ही चिंतामणराव आपाचें खूळ उभें केलें. पुढें त्याणींच आपणास पंचाइतींत घातलें. त्या पंचाइतीची तऱ्हाही ध्यानांत आहेच. तथापि जावेंसें वडिलांचे मनांत येतें तेव्हां कांहीं मणदोरा हातांत उभयपक्षींचा असेल. आपण जावें लागेल म्हणोन लिहिलें, उत्तम आहे. जावें आणि यश द्यावें. घर कलह तुटला असतां बहुत गोष्टी चांगली जाहली. आपण आणि दादांनीं चिंतामणरावांस पत्र मिरजेच्या मुक्कामाहून पाठविलें तें पाहिलें. अशा पत्र पाठविणेनें समेट होईलसें भासत नाहींसें वाटतें. मी तें व पत्र श्रीमंतांस दाखविलें होतें. त्याजवरून श्रीमंतही आपा अशीं पत्रें चिंतामणराव आपास

लिहितात. म्हणोन तारीफ करीत होते ! आपले पत्र लिहिण्यांत रग नाहीं– मग वडिलीं मध्यें पडून यश येईलसें भासत नाहीं–वडिलांबरोबर करवीरीं येऊन चिंतामणराव यांणीं कर्ज खाल्लें. पुढें सरकार चाकरीही जीवादारभ्य केली. आणि सरकारमहशूर सरदार जाहले. तेव्हां सरदारी वांटून घेणें अवघड पडेल. त्यांत जे दादा वांटणी हल्लीं करणार, त्यांणीं आपले घरची रीत कशी केली आहे तें ध्यानांतच आहे ! तेव्हां हें शेवटास जाईलसें भास होत नाहीं. त्यांतही कैलासवासी भाऊसाहेबांनीं जी विवक्षा केली आहे तसें केलें असतां शेवट होऊनच यश येईल. नाहींतर कांहीं व्हावयाचें नाहींसें वाटतें. मला सुचलें तें लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५८४६ श्री. ( कार्तिक व. २–३ नोव्हेंबर. )

पै॥ छ० २० जमादिलाखर. सन इहिदे.

विज्ञापना. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. मौजे शिरवडें व वठार ऐसे दोनीं गांव शिंदे यांनीं जप्त केले आहेत याचें कारण काय ? सरकारांतून निक्षून ताकीद करून उपद्रव हरदू गावांस न लागे, आपलें सुरळीत चालेलसें करणें म्हणोन लिहिलें. ऐशीयास प्रथम दोनी गांव घाटगे यांणीं जप्त केले. पुढें चिटणिसांनीं केले. नंतर राजश्री दौलतराव शिंदे अलिजाबहादुर यांस विनंती करून दोनी गांव मोकळे करून घेतले. वठार राजश्री सदाशिवपंत जोशी कोडोलीकर यांचे हवालीं केलें. शिरवडेंही हवालीं करून घेणें म्हणोन राजश्री बाळाजीपंत सोवनीं यांत लिहून पाठविलें आहे. दिक्कत नाहीं. मोसी जप्तीस शिंदे यांजकडे आहे ती सोडून देतों म्हणोन शिंदे यांणीं वचन दिल्हे आहे. आठचार दिवसांत सोडवून राजश्री विनायकपंत गोडबोले याचे स्वाधीन करितों. मोसी सोडाविणेंविशीं दीड हजार रुपये खर्च करावा लागतो. रवाना छ० १५ जमादिलाखर.

नं. ५८४७ श्री. ( कार्तिक व० ३–४ नोव्हें. )

पै॥ छ० १६ जमादिलाखर. इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. राजश्री दौलतराव शिंदे यांचे घरांत कलह उत्पन्न जाला. हिंदुस्थानांत झाडून अंमल बाया शिंदे यांचा जाला. पुण्यांत राहोन बंदोबस्त होत नाहीं. शिंदे यांणीं आम्हांस निरोप द्यावा म्हणोन सरकारांत पंधरा दिवस बोलणें करून छ० ११ जमादिलाखरीं सौम्यवार द्वादशीयुक्त त्रयोदशीस तेरा

घटका रात्रीस श्रीमंतांचा निरोप घेतला. भोजनाची मेजवानी जाली. शिंदे यांजकडील मंडळी भोजनास मराठे खासे खासे अडीचशें जाहले. सर्वांस वस्त्रें दिलीं. शिंदे यांस वस्त्रें जवाहीर दिल्हें. पंधरा घटका रात्रीस गोटास गेले. छ० १२ जमादिलाखरीं गोपाळराव भाऊ यांचें कूच जालें. शिंदे यांचे गोटांत तयारी निघावयाची चालली आहे. तूर्त जांबगांवास कूच करून जावें. तेथून गोपाळराव याजबरोबर फौजेची सरफरा करून देऊन रवानगी करावी. दोन कंपू दौलतरावबाबांबरोबर निघावयाचा करार. एक कंपू दोन हजार फौजेनिशीं राजश्री सखाराम घाटगे सर्जेराव यांणीं पुण्यांत श्रीमंतांजवळ असावें असा विचार ठरला. श्रीमंतांची स्वारी निघावयाचा विचार ठरत आहे. तयारी होत आहे. स्वारी निघाली असतां सर्जेराव याणीं श्रीमंतांबरोबर निघावें हा विचार आहे. सरकारचे कारखाने यांतही थोडीबहुत तयारीची ताकीद होत आहे. पुढें मनसबा होईल तो खरा. जांबगांवास शिंदे गेल्यानंतर राजश्री बाळोबातात्या यांस भेटोन मुक्त करावें. वडिलांचे जागां त्यांस म्हणोन शफत आण देऊन पोटांत डोकी घालावी हाही विचार आहे ( असें ) लोक बोलतात, परंतु ती गोष्ट घडणें कठिण. कारण श्रीमंतांस बाळोबाचें नांव घेतलें असतां स्नान करणार असें आहे. घाटगे यांस तो तसाच विचार. त्याअर्थीं गोष्ट घडणें कठिण. राजश्री दौलतरावबाबा याणींच येकादां नेट धरावा आणि करावें तर ते गर्भश्रीमंत आणि इतका कारभाराचा पछाही नाहीं. असो. आढळलें वर्तमान लिहिलें आहे. पुरंधरे याजबरोबर पागा जरीपटका देऊन राजश्री गोपाळराव चिटणीस याजसमागमें रवानगी होत आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५८४८ श्री. ( ४ नोव्हेंबर. )

पै॥ छ० १६ जमादिलाखर. इहिदे मय्यातैन.

विज्ञापना. आमचे पागेचे पिच्छाडीस रस्ता आहे. त्यास राजश्री बाजीराव बर्वे श्री॥ राजश्री पंतप्रधान यांचे मातुल. श्रीमंतांची स्वारी मातुलाचे घरीं आठ पंधरा दिवशीं जात असत्ये. त्या रस्तेयांत पेशजी फरस नाहीं. हल्लीं स्वारी येते, सबब श्रीमंतांची आज्ञा फरसबंदी बांधावयाची जाली. लोकांनी आपलाले हद्देचे फरसास कामें लाविलीं. जो बांधीत नाहीं त्याजकडे हुजरे ढालाईत बसोन कामें करवितात. आम्हाकडेही हुजरे ढालाईत आले होते त्यांस सांगितलें कीं, लोकानीं सर्वांनीं बांधिला असतां आम्हांसही

बांधावा लागेल. परंतु मिरजेस श्री॥ राजश्री यजमानस्वामींस लेहून आज्ञा आल्यावर बांधतों; म्हणून दहा बारा दिवसांचा करार केला आहे. वरकडांचे फरस चालते जाहले. आम्हांस बांधावयास पाहिजे. येविशीची आज्ञा जाली पाहिजे. आमचे हद्देचा फरस बेचाळीस गज लांब, रुंद गज चार व फरसाचे पोटीं मोरी मिळोन सव्वा दोनशें रुपयाचा आकार होईल. पांच दहा कम-जाजती. पैसा नाहीं. येथें देणें दोन हजार ( रु० ) लोकांचे स्वामींस लिहिलेंच आहे. सरकारची निकड बसली असतां सांप्रतकाळीं कोणाची रदबदली देखील चालावयाची नाहीं. अकस्मात् अभ्रूशीं गांठ ! याप्रकारचें वर्तमान आहे. विचार करून आज्ञा काय ते लिहिली पाहिजे. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५८४९ श्रीगणपति. ( कार्तिक व० ४–५ नोव्हें. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाळकृष्णपंत लागू स्वामीचे सेवेशीं.

पोष्य रामचंद्र परशुराम सा॥ नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. सन तिस्सा तिसैनांत परगणें कुंदगोळ व मुळगुंद व कसबे इंगलहळ्ळी येथें गोखल्यानें ठाणीं घातलीं होतीं त्याचे मोकळिकेबद्दल गोखल्यांस तुमचे विद्यमानें ऐवज देणें पडला आहे तो हल्लीं महालकरी यांस हिशेबीं मजुरा द्यावा लागतो. याकरितां तिन्ही महालकऱ्यांकडून ऐवज काय पावला असेल तो तपशीलवार लिहून सत्वर पाठविणें. कमज्यास्त होऊं नये असें असलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. रवाना छ० १७ जमादिलाखर. लोभ कीजे हे विनंती.

नं. ५८५० श्रीगणराज. ( कार्तिक व० ५–६ नोव्हें. )

पै॥ छ० १८ जमादिलाखर. बुधवार. इहिदे मय्यातैन व अल्लफ.

आपल्यें[1] रघुनाथानें व रामचंद्रानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. चिरंजीव राजश्री चिंतामणरावआपा याणीं कूच करोन उद्यीक गुंडेवाडीचे मुक्कामास जावें 'प्रांत मिरज येथें खेड्यांनीं रोखे वसूल करूं नये. आपणही मिरज प्रांतांत वसूल करूं नये. आठा दिवसांत जावसाल तोडावा' याप्रमाणें ठरोन वडिलांस विनंती लिहिली आहे. तर उद्यांपासून मिरज प्रांतांत वडिलीं वसूल घेऊं नये. चिरंजीव घेत नाहींत. उद्यीक गुरुवारीं कूच आहे. कळावें. रवाना

---

१ पत्र बाळासाहेबांस.

छ० १८ जमादिलाखर. विदित होय. तीर्थस्वरूप मातोश्री चिरंजीवाचे भेटीस येणार यास्तव कूच हे विज्ञापना.

नं. ५८५१ श्री. ( कार्तिक व० ५–६ नोव्हें. )

पै॥ छ० २३ जमादिलाखर. सन इहिदे मय्यातैन कार्तिक.

[1]सेवेशीं नागो शामराव सा॥ नमस्कार विनंती तागायत छ० १८ जमादिलाखरपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील दंग्यामुळें आमचे देसाई याचें कुटुंब आपले स्थळीं रवाना करून देणार. पेशजी त्यांचें कुटुंब तेथें आलें असतां आपण संगोपन केलें. यास्तव हल्लीं कुटुंब पाठविणार आहेत. तर घरजागयाची सोई करून देण्याची आज्ञा व्हावी. वरकड स्वकीय वर्तमान तर ठाण्यांतील वर्तमान हा कालपर्यंत आपले कृपेकरून स्वस्थ आहे. तहाचे बोलण्याचें संधान त्यांजकडून आलें होतें तेव्हां वसूल घेतला असेल तो मजुरा यावा असें बोलणें त्याजकडूनच होऊन फिरोन वसूल मजुरा देत नाहीं असा फेर तिकडूनच आला असें दोन तीन वेळां जालें. नाद तर अद्याप तुटला नाहीं. सिद्धीस जाईल तें प्रमाण. दक्षिणेकडील ताम्रमुखी याचें वर्तमान राजश्री बाळकृष्णपंत लागू याचीं पत्रें येतात. त्याचा सरंजाम बेमोबलग येतो. हजार बैल फरासखान्याचा सरंजाम आला. याप्रमाणें जकीरा सावनुरास होत आहे. हुबळीवर मुक्काम होता तो दोन कोस बंकापूरचे लगत्यास जाला. याप्रमाणें लिहिलें आलें. आपणाकडे पत्रें वरचेवर येतच असतील. स्थळाची सोय जरूर करून देविली पाहिजे. पुणेकडील वर्तमान अलीकडे संजीवनीकडील येत असेल तें कळविलें पाहिजे. ईश्वरें तो संकटांत घातलें आहे. कृपाही करणार तोच समर्थ आहे. सदैव कृपा करून परामर्ष करीत जावा. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नं. ५८५२ श्री. ( कार्तिक व० ५–६ नोव्हेंबर. )

पै॥ छ० २१ जमादिलाखर. सन इहिदे.

तीर्थस्वरूप राजश्री आपासाहेब वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० १८ जमादिलाखरपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष.

---

१ सरस्वतीबाई. २ पत्र बाळासाहेबांस ३ अमृतरावाकडचें.

पेटा चिंमळ । ।। महाल राजश्री बळवंतराव नागनाथ यांजकडे सरंजामास आहे. त्यास आपली स्वारी त्या प्रांतीं आहे. तेव्हां चिमळगें महालास उपद्रव होईल. त्यास हरएकविसीं वडिलांकडून उपसर्ग होऊं नये अथवा दुसरा कोणी त्या महालास तशिसि देईल तर वडिलीं उपराळा करून बचाव होई तें करावें. रावजींचा आपला घरोबा म्हणून विनंती लिहिली आहे. घासदाणा अथवा चिटीचपाटी देखील होऊं नये. रखवाली व्हावी. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. रावजींच्या परगण्यापासून घासदाण्याचा वगैरे ऐवज कांहीं घेतला असल्यास माघारा देववावा. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ५८५३ श्री. ( कार्तिक व० ६–७ नोव्हेंबर. )

पै॥ छ. २४ जमादिलाखर सन इहिदे मय्यातैन कार्तिक.

सेवेशीं मोरो आपाजी परांजपे सांष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १९ जमादिलाखर सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान सांप्रत—

नबाबाची फौज परांड्यानजीक दाहा बारा हजार व परांड्यानजीक पलटणें सहा येणेंप्रमाणें जमाव आहे. आणखी फौज राक्षसभुवनास आठ दहा हजार येणेंप्रमाणें जमाव आहे. नबाबाकडील राजश्री शेषाद्रिपंत सरकारांत जाबसालाकारितां होते ते भागानगरास जाऊन पाऊण महिना जाहला. मशीर डेरा दाखले जाले. जमाव होत आहे. मसलत शिंदे यांजवर येणार असें म्हणतात. नकळे. १

शिंदे यांचें कूच व्हावयाची तयारी तो आहे. परंतु लौकर कूच होणें कठिण. पैसा नाहीं. जाबगांवास जावयाचा नेट होता, परंतु दोन चार दिवस कुचाचें मंदच दिसतें. १

मोहनसिंगाची हुंडी अद्याप केली नाहीं. गडबडीमुळें कोणी जबाबी हुंडी करीत नाहीं. तशांत अगत्यवादें करावी म्हणून गेलें असतां मनस्वी हुंडणावळ मागतात. त्यास सुमार पाहून करितों. लखोटा पारसी अक्षराचा मोहनसिंगाचे घरीं रवाना करावयाचा जतन ठेविला आहे. १

बाळोबा तात्या नगरास होते. छ० १४ जमादिलाखरीं मंदवारी अकस्मात मृत्यु पावले. अगोदर पांच सहा दिवस त्याचे स्त्रीस जांबगांवास बला–

१ हें व पुढचीं चार पत्रें मिरजेस बाळासाहेबांस लिहिलेलीं.

त्कारेंकरून आणली होती. नंतर बाळोबाचा काल जाहला. अंतसमयीं जवळ कोणी नाहीं या तऱ्हेचा समय ईश्वरें दाखविला ! १

खानदेशांत होळकर याजकडील मालोजी गावडे व आणखी पथकी होळकर याजकडील मिळोन फौज दहा बारा हजार व जिवाजी यशवंतराव म्हणोन पांच हजार व आणखी शिंद्याकडून रुसोन गेले, उठोन गेले, मिळोन दहा हजार व लेकावळे शिंद्याकडील चार असामी पागांसुद्धां निघोन गेले ते एकंदर वीस हजार जमाव आहे. प्रांतांत तमाम खंडण्या घेऊन लुटितात. मोठा अनर्थ मांडिला आहे १

इकडे पर्जन्य नित्य लागतो. शेतें पिकूंन कुजलीं. त्राहित्राहि लोकांस केलें. कोणांत तो अगदीं दाणा पिकावयाचा नाहीं. कुजोन गेला. मोठी खराबी मांडिली आहे. उपाय नाहीं. १

धारण पुण्यांत साडेपांच पायली बाजरी. जोरी पावणे सहा पायली जाली. आणखी धारणेस चढेंचें आहे. बद्दा चांदवडी शिक्क्यास दरसदे रुपये सवासाहा आहे. १

श्रीरामेश्वरची यात्रा निघोन पंढरपुरास गेली. यात्रा सालमजकूर रामेश्वरास फार गेली. श्रीकाशीस यात्रा कांहीं निघणार ते नागपूरचे मार्गें जाणार असी वार्ता आहे. १

बाबूराव आंगरे संस्थान कुलाबा यांणीं किल्ला खांदेरी तीन वर्षें लढत होती ते घेतली. जयशिंग त्याचे घराचा लेकावळा याची बायको किल्ल्यांत होती ती किल्ला लढवीत होती. सांप्रत किल्ला घेतला. सरकारांत पत्रें आलीं. १

हिंदुस्थानांतिल अलीकडे अधिकोत्तर ऐकण्यांत आलें नाहीं. पेशजी विस्तारेंकरून विनंती लिहिली आहे. अधिकोत्तर त्यापेक्षां आढळलेवर विनंती लिहितों. सारांश अंमल झाडून हिंदुस्थानांत बायांचा जाहला. १

कार्तिक शु॥ एकादशी द्वादशीच्या सुमारें समुद्रांत वादळ पडिलें. बहुत तरांडीं दर्यागरक जालीं म्हणोन बातमी आली आहे. तथ्य कळल्यावर विनंती लिहितों. १

औरंगाबादेनजीक गंधीनाला म्हणोन थोर आहे. त्यास स्वातीचा पर्जन्य अकस्मात् मोठा लागून जंगलांतिल देखील पाणी नाल्यास आलें. रात्रौ पर्जन्य लागला. नाल्यास पाणी अपरिमित मर्यादा सोडोन आल्यावर नाल्याचे कांठीं घरें होतीं तीं शेंपन्नास वाहोन माणसेंहि वाहलीं, आणखीहि

कोणी उदमी नाल्याचे कांठी राहिला होता त्याचाहि बैल सरंजाम वगैरे वाहोन गेला. दोन तीनशें माणसें मृत्यु पावलीं. येणेंप्रमाणें आढळलें वर्तमान विनंती लिहिली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ५८५४ श्री. ( कार्तिक व० ६–७ नोवें. )

पै॥ छ० २४ जमादिलाखर. सन इहिंदे मय्यातैन कार्तिक.

सेवेसीं विज्ञापना. तागायत छ० १९ जमादिलाखर शुक्रवार वर्तमान यथास्थित असे. विशेष. मिरजकर पटवर्धन यांजवर रोष श्रीमंतांचे चित्तांत आहे. अद्यापवर उद्गार चांगले निघत नाहीं. श्रीमंतांचा मनसबा खोल कोणास अंत लागत नाहीं. राजश्री बाबा काळे याणीं श्रीमंतांजवळ बोलणें करून श्रीमंत राजश्री दाजीसाहेब यांस येथें पुण्यांत आणावें येविशीं श्रीमंतांची आज्ञा घेऊन राजश्री बाबा कांळे याणीं राजश्री बाबाजीपंत गोगटे यांस पाठविले. त्यास पंधरा दिवस होत आले. परंतु तेथें विचार होईल तो पक्का. तूर्तकालीं शिंदे देशीं आहेत तों पावेतों तेथें कोणी एकानीं येऊं नये ऐसें कोणी कोणी म्हणतात. परंतु याचा विचार श्रीमंत राजश्री रामचंद्रपंतआपा याणीं वडिलांस लेहून सर्वांचे विचारास आल्यासच इकडे येण्याचें होईल. कोणी एक गृहस्थानीं बातमी सांगितली कीं, शिंदे यांजकडील यादवराव भास्कर याजपासीं श्रीमंत बोलिले कीं, वरकड ईश्वरें सर्व गोष्टी श्रीचे ईच्छेनें वडिलांचे पुण्यें शेवटास गेल्या. एक गोष्ट राहिली. मशारनिल्हे याणीं विनंती केली कीं राहिली गोष्ट तो कोणती ? त्यावरून पटवर्धन यांचें खूळ राहिलें. वडिलांचा उपमर्द याणींच केला. आमची तो स्थित तुम्ही पाहिलीच आहे, श्रीचे कृपेकरूनच हे दिवस दृष्टीस पडिले. त्यांस असो, जें कालीं जें घडेल तें प्रमाण ! त्यांस याप्रमाणें रोषेंकरून उद्गार निघतात. त्यास इकडे येणें उत्तम किंवा कसें काय वडील विचार करितील. सेवकानें लिहावा ऐसा प्रकार नाहीं. आढळलें वर्तमान विनंती लिहिली आहे. श्रीमंत राजश्री मोरोबादादांसहि एकांतीं विनंती केली कीं श्रीमंत राजश्री दाजीबा अथवा बाबा उभयतांतून एकजण येथें यावें हा विचार श्रीमंतानीं केला याचा अर्थ आपणास श्रुत आहे किंवा कसें ? आज्ञा केली कीं बोलोन निश्चयांत येऊनच यावें ऐसें ठरलें आहे. त्यांस राजश्री बाबा काळे याणीं इकडील खातरजमा करून घेऊन एकादा विचार केला असेल. वडिलींही या पत्रांतील किंचित् भाव श्रीमंत राजश्री रामचंद्रपंतआपा यांस सुचवावयाजोगा मर्जीस आल्यास सुचविला पाहिजे. हें पत्र तिकडे पाठवावयाचें नाहीं. वडिलीं आपणाजवळ जतन ठेवलें पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

# ऐतिहासिक-लेख-संग्रह.

या पुस्तकांत पटवर्धन सरदारांच्या जुन्या दप्तरांतील ऐतिहासिक महत्वाचे निवडक
अस्सल कागदपत्र सालवारी व प्रकरणवारी लावून तारीख, महिना व सन यांच्या अनु-
क्रमानें आम्ही छापीत आहों. प्रत्येक कागदावर तारीख महिना व सन घातलेला असतो
आणि त्याखालीं अर्थाची फोड करणाऱ्या भरपूर टिपाही दिलेल्या असतात. शिवाय प्रत्येक
प्रकरणास आंतील विषयाचें सुसंगत विवेचन करणारी एक एक प्रस्तावनाही जोडिलेली
असते. पानिपतच्या युद्धापासून तों तहत बाजीरावीच्या अखेरीपर्यंतचा इतिहास या
पुस्तकांत येत असून तो त्या त्या काळांतील पेशवे, प्रमुख मुत्सद्दी व सरदार यांच्याच
शब्दांनीं वर्णिला जात आहे! आजपर्यंत या पुस्तकाचे दहा भाग प्रसिद्ध झाले आहेत.
त्यांपैकीं पहिले चार भाग शिल्लक नाहींत. पुढचे पांचव्यापासून दहाव्यापर्यंत सहा भाग
विक्रीस आहेत. दहाव्या भागाची किंमत चार रुपये असून बाकी सर्व भागांची किंमत
प्रत्येकीं ३ रु० आहे. शिवाय पोस्टेज प्रत्येक भागास ८३ निराळें पडेल.

---

## ऐतिहासिक-लेख-संग्रहांतील विषयानुक्रम.

**भाग पहिला**—सन १७६० जानेवारी ते १७६३ मेपर्यंत. नानासाहेब पेशव्यांच्या
कारकीर्दीची अखेर-माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें-मोंगलांची पुण्यावर स्वारी-लढाया व
तह-माधवराव व दादासाहेब यांमध्यें वितुष्ट-घोडनदीची लढाई-समेट-राघोबाची पटवर्धन
वगैरे सरदारांवर गैरमर्जी-मिरजेचा वेढा-मोंगलांची पुण्यावर दुसरी स्वारी-पुण्याचा विध्वंस-
पेशव्यांची मोंगलाईवर स्वारी. डे. अ. पृ. ४८०.

**भाग दुसरा**—सन १७६३ मे ते १७६४ डिसेंबरापर्यंत. राक्षसभुवनची लढाई-
मोंगलांशीं तह-हैदरअल्लीचें मनोवेधक चरित्र-पेशव्यांची हैदरअल्लीवर पहिली स्वारी-
रटेहळ्ळी, अनवटी, हावेरी येथील लढाया-सावनूरचें रक्षण-धारवाडचा वेढा. डे.
अ. पृ. ४८०.

**भाग तिसरा**—सन १७६४ डिसेंबर ते १७६९ ऑक्टोबरपर्यंत. अनंतपूर व बिदनूर
येथील लढाया-हैदरअल्लीशीं तह-भोंसल्यावर पहिली स्वारी-तोतयाप्रकरणाचा उद्भव-
राघोबाची गोहद वगैरे उत्तरप्रांतीं स्वारी-पेशव्यांची हैदरअल्लीवर दुसरी स्वारी-शिरें-
मदगिरी, चेनरायदुर्ग, येथील लढाया-तह-माधवराव व राघोबा यांची आनंदवल्लीस भेट-
घोडपची स्वारी व राघोबास कैद-भोंसल्यावर दुसरी स्वारी. डे. अ. पृ. ४८०.

**भाग चवथा**—सन १७६९ ऑक्टोबर ते १७७३ ऑगस्टपर्यंत. भोसल्याशीं तह-हैदरअल्लीवर तिसरी स्वारी-कोल्हार, बाळापूर, नंदिदुर्ग वगैरे ठिकाणीं लढाया-हैदराचा गोपाळरावावर छापा-निजगलचा वेढा-पेशवे देशीं येतात-गोपाळरावाचा मृत्यु-त्रिंबकराव मामाचे पराक्रम-मोतीतलावाची लढाई-श्रीरंगपट्टणाचा वेढा-तह-बिनीवाल्यांची फत्तरगडावर स्वारी-जाटांशीं लढाई-बादशहाची स्थापना-दिल्लीची लढाई-रोहिल्यांवर सूड-पेशव्यांचा आजार व त्यांतील अनेक हृदयद्रावक प्रसंग-मृत्यु-रमाबाईचें सहगमन-नारायणरावाची पेशवाईवर स्थापना-छोटी कारकीर्द व खून. डे. अ. पृ. ६००.

**भाग पांचवा**—स. १७७३ ऑगस्ट ते १७७६ जुलईपर्यंत. बारभाईचें कारस्थान-निजामअल्लीशीं लढाई व भेट-गंगाबाईची स्थापना-कासेगांवची लढाई-राघोबाचा पाठलाग-समेटाची खटपट व राघोबाचें पलायन-गुजराथची मोहीम-इंग्रजांशीं लढाया-पुरंदरचा तह-कोळ्यांचा दंगा-प्रतिनिधींचा दंगा-कोल्हापूरकराशीं लढाया-तोतयाच्या बंडाची सुरुवात. डे. अ. पृ. ६००.

**भाग सहावा**—१७७६ ऑगस्ट ते स. १७७८ एप्रिलपर्यंत. तोतयाच्या बंडाचा बीमोड-परशुरामभाऊंची कोल्हापुरावर मोहीम-पांडुरंगरावांची धारवाडप्रांतीं स्वारी-सावशीची लढाई व सैन्याची वाताहत-परशुरामभाऊ कुमकेस जातात-त्यांच्या गनीमी हालचाली-पाळेगारांचें पारिपत्य-भाऊ व हरिपंत यांची धारवाडप्रांतीं छावणी-हैदरअल्लीवर पांचवी स्वारी-महादजी शिंद्यांची कोल्हापुरावर स्वारी-मोरोबादादांचें कारस्थान-उभारणी व चलती-कर्नाटकच्या फौजा देशीं येतात. डे. अ. पृ. ६००.

**भाग सातवा**—सन १७७८ एप्रिल ते १७८४ एप्रिलपर्यंत. मोरोबादादांचें कारस्थान (उत्तरार्ध) व पारिपत्य-दरबारची डळमळ-परशुरामभाऊ स्वारीस निघतात-बेरड बंडखोरांचा दंगा-भाऊंची सुरापुरावर स्वारी-इंग्रजांची पुण्यावर स्वारी-पराजय व वडगांवचा तह-करवीरकरांचा बंदोबस्त-कित्तूरकरांचें पारिपत्य-इंग्रजांशीं तिसरा बिघाड-इंग्रज गुजराथ व्यापितात-वसई व कल्याण घेतात-पुण्यावर चालून येतात-पटवर्धनांशीं निकरानें लढतात-रसदेची लूट व पीछेहाट-सालबाईचा तह-स्वस्थतेचीं दोन वर्षें-काशीयात्रा-करवीरकरांचा पुन्हां बंदोबस्त व तह. डे. अ. पृ० ६१०.

**भाग आठवा**—स. १७८४ मे पासून १७९१ फेब्रुवारीपर्यंत-मराठे व मोंगल यांच्या यादगीर येथें भेटी-टिपूचा नरगुंदास वेढा-नरगुंदकरांची मर्दुमी-परशुरामभाऊ कुमकेस येतात-झटापटी-तह-टिपू दगा करून नरगुंद व कित्तूर घेतो-टिपूवर पहिली मोहीम-होळकर व बेहेरे कित्तूर प्रांतीं येतात-मराठे व मोंगल यांच्या पुनः भेटी-बदामी-अदवानी-टिपू मराठे व मोंगल यांस छापे घालून हैराण करितो-तह-स्वस्थतेचीं पुनः तीन वर्षें-पेशवे नाशिकास जातात-प्रभू ग्रामण्यप्रकरण पुन्हां उद्भवतें-सोनार व वेदोक्त-टिपूवर दुसरी मोहीम-मराठे, मोंगल व इंग्रज एकत्र होतात-परशुरामभाऊंचा धारवाडास वेढा-निकराच्या लढाया-इंग्रजांची मर्दुमी-बातेऱ्या, पेठ, रेवणी, व खंदक यांवर हल्ले. डे. अ. पृ. ६००.

**भाग नववा**—स. १७९१ मार्च ते १७९६ नोव्हेंबरपर्यंत. धारवाड काबीज होतें-म्हैसूरच्या राज्यावर स्वारी-बांकी नबाबाचा पराजय-इंग्रजांची श्रीरंगपट्टणावर स्वारी व पीछेहाट-इंग्रजी व मराठी लष्करांच्या भेटी-इंग्रजांचा पट्टणास वेढा-घाशीराम कोतवाल-पाटीलबावा देशीं येतात-श्रीमंतांची कृष्णास्नानार्थ स्वारी-साताऱ्यास महाराजांची भेट-टिपूशीं तह-पाटीलबावांचा पुण्यास मुक्काम-वकीलमुतलखी-नानाशीं वैमनस्य-सचिव प्रकरण-गायकवाडांची सरदारी-पाटीलबावांचा मृत्यु-अळत्याची लढाई-करवीरकरांवर मोहीम-खड्यांची लढाई-सवाई रावसाहेबांचा मृत्यु-बाजीरावसाहेब पुण्यास येतात-

शिंद्यांचें प्राबल्य-नाना साताऱ्यास जातात-शेणवी कारभारी व पटवर्धन सरदार यांचा मिलाफ-चिमाजीआप्पाची स्थापना व छोटी कारकीर्द-नाना वाईस जातात-महाडाकडे पळतात-महाडचें कारस्थान-शेणवी व पटवर्धन यांचा पाडाव-परशुरामभाऊंस कैद. डे. अ. पृष्ठें ६००.

**भाग दहावा**—स. १७९६ दिसेंबर ते १७९८ डिसेंबरअखेर. बाजीरावसाहेबांची स्थापना-नबाब, भोसले, शिंदे, होळकर यांच्या लष्करांचा पुण्यास मुक्काम-पेशवे व शिंदे यांजविषयीं नानांचा बेभरंवसा-शिंद्याकडून नानांच्या द्रव्यहरणाची सुरुवात-नबाब, शिंदे व भोसले यांचे लढे व समजूत-काशीराव होळकरांस सरदारीचीं वस्त्रें-खुन्या मुरलीधर-मल्हारराव होळकरावर छापा व त्याचा मृत्यु-नाना व शिंदे यांत द्रव्यमूलक वितुष्ट-मुकीराची दगलबाजी-नानांचा कारागृहवास-घाटगेशाहीच्या राक्षसी लीला-अब्रूदार धनिकांचा अमानुष छळ-शेणवी सरदारांवर साडेसाती-शिंदे बायांचें बंड उद्भवतें-बंड जोरावतें-घाटग्याचा अमृतरावावर छापा-पेशवे व शिंदे यांत बेबनाव-सातारकर महाराजांचा दंगा-रास्त्यांची त्रेधा-परशुरामभाऊंची सुटका-नानांची सुटका-भाऊंच्या सातारकरांशीं लढाया-साताऱ्यावर हल्ला व लूट-महाराजांचा बंदोबस्त-पेशव्यांकडून नानांची पायधरणी-नाना पुन्हां कारभारी होतात-परशुरामभाऊंची शेवटची स्वारी-सुरापूरची खंडणी-कर्नाटकची मुलूखगिरी. डे. अ. पृष्ठें ६००. किं. ४ रु.

---

## आमचीं इतर ऐतिहासिक पुस्तकें.

**अधिकार-योग** अथवा नाना फडनवीस यांस राज्याधिकार मिळाल्याचा इतिहास—'खूब शर्तीनें राज्य राखणाऱ्या' नाना फडनविसानीं राज्य बुडविणाऱ्या एकाहून एक बलिष्ठ अशा प्रतिस्पर्ध्यांवर मात करण्यासाठीं लढविलेलीं कारस्थानें, तीं लढवितांना त्यांवर आलेलीं दुर्धर संकटें, त्या संकटांतून पार पडतांना त्यानीं प्रकट केलेली निस्सीम स्वामिभक्ति, उज्वल देशाभिमान व अलौकिक चातुर्य यांचें सप्रमाण वर्णन सरदार परशुरामभाऊ पटवर्धन वगैरेंच्या लेखांतून जागोजाग भरपूर उतारे देऊन या ग्रंथांत केलें आहे. किं. ६।० पोस्टेज ७।.

**हरिवंशाची बखर** अथवा पटवर्धन सरदारांच्या हकीगती—या पुस्तकांत पेशवाईंतील पटवर्धन वगैरे प्रसिद्ध सरदार व थोर थोर मुत्सद्दी यांचे अद्भुत पराक्रम, चातुर्य, धाडस, स्वाभिमान, गुरुजनांविषयीं आदर, औदार्य व निस्सीम स्वामिभक्ति वगैरे सद्गुणांचें उत्तम प्रकारें आविष्करण करणाऱ्या आणि वीर, करुण व हास्य या रसांनीं ओथंबलेल्या आख्यायिका असून लढाईंतले, छावणींतले, दरबारचे व नानाप्रकारचे घरगुती प्रसंग फार मनोरंजक प्रकारें वर्णिले आहेत. किं० ६।० ट. ख. ७।.

**हैदरअलीवर तिसरी स्वारी**—ऐ. ले. संग्रहाच्या तिसऱ्या भागापैकीं फुटकळ प्रकरण. किं. ७६ ट. ख. ७७६.

**इचलकरंजी संस्थानाचा इतिहास**—यांत प्रारंभीं कापशीकर प्रसिद्ध सेनापति संताजी घोरपडे यांचा वृत्तांत सांगून नंतर त्यांच्या दौलतींतून इचलकरंजी संस्थान कसें उद्भवलें, कसें फैलावलें व नानाविध संकटांतून आजपर्यंत कसें पार पडत आलें याचें सविस्तर विवेचन केलें आहे. व त्याच्या अनुषंगानें संस्थानाचे मूळ संपादक नारो महादेव यांजपासून तों विद्यमान नारायणराव गोविंद यांजपर्यंतच्या सर्व अधिपतींचीं चरित्रें वर्णिलीं आहेत. या पुस्तकांत विशेष हा आहे कीं, शाहू महाराजांच्या मरणापूर्वीचे व त्यानंतरचे प्रसंग, राजसत्ता भोसल्यांच्या घरांतून निघून पेशव्यांच्या हातीं कशी गेली तो प्रकार, मराठी राज्याची घटना व तिचे मोगलसत्तेशीं संबंध वगैरे अत्यंत महत्वाच्या विषयांची

चर्चा अन्यत्र कोठेंही न केलेली या पुस्तकांत वाचावयास मिळेल. इचलकरंजी संस्थानाच्या प्राचीन दप्तरांतील ज्या पत्रें, यादी वगैरे अस्सल लेखांच्या आधारें हा इतिहास लिहिला ते लखही याच पुस्तकांत छापिले आहेत. डे. अ. पृष्ठें ५३० किं. ३ रु. पोस्टेज ८३.

सदरहू संस्थानाचा फक्त इतिहास, पत्रें यादीविरहित. डे. अ. पृ. १८७ किं. १६८ पोस्टेज ८२.

**मालोजी व शहाजी**—मालोजी राजे व शहाजीमहाराज भोंसले यांविषयींची जेवढी माहिति बखरींतून व मुसलमानी तवारिखांतून मिळणारी आहे तिच्या ग्राह्याग्राह्यतेबद्दल चिकित्सक पद्धतीनें विचार करून आम्हीं हें बुक नुकतेंच तयार केलें. यांत मनोरंजक नवी माहिती पुष्कळच आली. असून याच्या वाचननें शिवाजीमहाराजांच्या अद्भुत चरित्राच्या पूर्वभागाची उपपत्ति चांगली कळते. किं. ८५ ट. ख. ८८६.

---

## कविता व नाटकें.

**फुटकळ चुटकेः**—यांत स्फुट विषयांवर कविता छापिल्या आहेत. यांतल्या कांहीं कविता सरकारी क्रमिक पुस्तकांत आल्या आहेत व शाळाखात्यानें हें बुक बक्षिसाकरितां पसंत केलें आहे. किं. ८४. ट. ख. ८८६.

**गुणोत्कर्षः**—( गद्य. आवृत्ति पांचवी. ) शककर्ते श्रीशिवाजीमहाराज यांच्या चरित्राच्या आधारावर एका स्वामिभक्ताचें वीरकरुणरसात्मक उज्वल चित्र या नाटकांत रेखाटलें आहे. किं. ८८. ट. ख. ८१.

**तारामंडळः**--( गद्य, सचित्र, आवृत्ति दुसरी. ) यांत एका देशभक्ताचा अपूर्व स्वार्थत्याग, देशभक्ति व पितृभक्ति यांत विरोध आला असतां दुसरीनें पहिलीचें साचिव्य पतकरिल्यामुळें झालेले सुपरिणाम, भगवद्भक्तीचें साफल्य, सत्यव्रताचा बाणा, श्रीमंतीचा तोरा, दुर्जनाचें गूढ निष्ठुर दौर्जन्य इत्यादि गोष्टी मनोवेधक प्रकारानें दाखविल्या आहेत. नाटकांतील प्रसंग विविधरसात्मक कल्पिले असून ते जागोजाग उदात्त विचार व रमणीय कल्पना घालून सुशोभित केले आहेत. किं. ८१२ ट. ख. ८१.

**शिवसंभवः**—( गद्य. सचित्र. ) यांत शिवाजी महाराजांच्या जन्माची रमणीय अद्भुत कथा वर्णिली असून त्यांच्या धीरोदात्त मातापितरांनीं महाराष्ट्रांत स्वराज्याचा चैतन्यचंद्रोदय व्हावा म्हणून कोणचीं दुर्धर संकटें सोशिलीं, हें नानाविध हृदयस्पर्शी रोमहर्षण प्रसंगांनीं दाखविलें आहे. किं. १ रुपया. ट. ख. ८१.

**चित्रवंचनाः**—( संगीत. सचित्र. ) यांत बुद्धिमान् व सुशिक्षित परंतु भिन्न स्वभावाच्या दोन मुलींच्या संसारावर निर्व्याज व कृत्रिम प्रेमाचे भिन्न परिणाम कसे घडले हें दाखविलें आहे. यांत शृंगार व हास्य हे प्रधानरस असून वीर व करुण याही रसांची छटा प्रसंगविशेषीं साधिली आहे. किं. ८१२ ट. ख. ८१.

**कृष्णकांचनः**--( संगीत. सचित्र. ) यांत राष्ट्रधर्माच्या उदात्त भावना नवीन प्रकारें उद्दीपित करणारे विस्मयोत्पादक प्रसंग साधले असून त्यांच्या द्वारें वीर, करुण, शांत व हास्य या रसांचा परिपोष केला आहे. पदांच्या चाली प्रसंगपरत्वें प्रेमळ, गोड व गंभीर असून त्यांची निवड रा. टेंबे यांनीं केली आहे. किं. १ रुपया. ट. ख. ८१.

---

री घालती
गं कुमकेस आणितात-
स करितात-करवीरावर

—करवीरचा वेढा-हल्ले-
टतो-मराठी फौजांची
द-संतरावी राक्षसी लीला-
शिंदे-बायांची मर्द की-
ति, यशोदाबाई, पंत
गनिमीकावा-
जिकाचा नौ
इग्रजांस

( आवृ

ळी ' करितां लिहिलेल
र असेच आहेत. हें नाट
ताचाच दृष्टांतरूपानें

कडे मिळणाऱ्या पुस्तकांची
चार भाग, हैदरअलीवर
वंचना नाटक हीं पुस्तकें
नाटक ( तिसरी आवृत्ति )
आणि लायब्ररींना विशेष

वासुदेव खरे, मिरज.